श्री.



# श्रीमद् भगवद् गीता प्रवचने

श्री. माधव गणेश दीक्षित.

This book is distributed for free by eSahity Pratishthan
under permission by author.
www.esahity.com
under permission by author.
www.esahity.com

---

ही प्रवचने लिहिण्यासाठी ज्यांच्या हाताला धरून चाललो,
ज्यांचा आधार घेतला,
ज्यांचे ग्रंथ वाचले, अभ्यास केला,
मनन केले, चिंतन केले,
ज्यांना प्रश्न विचारले, चर्चा केल्या,
ज्यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले,
त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात महानुभावांना
सविनय शिरसाष्टांग नमस्कार.

---

ह्या लेखनावर व्याकरणाच्या दृष्टीने
शुद्धिसंस्कार केल्याबद्दल
माझी ज्येष्ठ भगिनी
**सौ. अनघा श्रीपाद दामले**
हिचे मन:पूर्वक आभार.

---

चिरंजीव **निमिष**
आणि
चिरंजीव **नील** ह्यांस
माझ्या बाळांनो,

तुम्हाला गीता शिकवता शिकवता
मीच नव्याने गीता शिकलो.
वेळोवेळी जे सुचत गेले होते,
तेच लिहून काढले आहे.
आणि आता ते सगळे
तुम्हाला भेट देतो आहे.

आजोबांचा हा खाऊ,
गोड मानून घ्या!

## — प्रस्तावना —

आदरणीय वाचक हो ऽऽ! नमस्कार.
तुम्हाला नमस्कार करायची इच्छा झाली आणि लगेच नमस्कार केला.
त्यामागे विशेष असे, महत्त्वाचे असे कारण आहे. ते म्हणजे —
' वाचणारे असतील तरच लिहिणाऱ्याच्या लिखाणाला महत्त्व येते.
वाचकच नसतील तर लिहिणाऱ्याला आणि त्याच्या लेखनाला काय किंमत आहे? काहीही किंमत नाही.'
वाचक हा लेखकाच्या इतकाच महत्त्वाचा आहे असे मला वाटते.
म्हणून मनामधले विचार सांगायला सुरवात करताना, अगोदर तुम्हाला नमस्कार केला. त्याचा स्वीकार करावा ही नम्र विनंती.
माझे नांव **श्री. माधव गणेश दीक्षित.** माझे वय त्रेसष्ट वर्षे पूर्ण. मी ठाण्याला राहतो. ह्यापेक्षा जास्त काही सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. कारण विशेष सांगण्यासारखे असे माझ्याकडे काहीच नाही.
मी एक सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणूस आहे.
मी विद्वान नाही. बुद्धिमान नाही. उच्चविद्याविभूषित नाही. संस्कृतज्ञ नाही.
कलावंत, वक्ता, लेखक, कवी, श्रीमंत वा प्रसिद्ध व्यक्ती, ह्यापैकी कोणीही नाही.
' एका सर्वसामान्य कुटुंबामधे जन्माला आलेला, सामान्य परिस्थितीमधे वाढलेला, शक्य झाले तेवढे शिकलेला, चरितार्थ चालवण्यासाठी नोकरी व्यवसाय केलेला, आयुष्य जगत असताना अपरिहार्यपणे समोर आलेल्या यातना, वेदना व दु:खे भोगलेला, एक मध्यमवर्गीय माणूस जितकी चैन करू शकेल तितकी चैन केलेला, दोन नातवंडे असलेला आणि त्यांच्यावर यथाशक्ती, यथामती संस्कार करण्याचा प्रयत्न करणारा असा एक आजोबा,' हीच माझी ओळख. असो.
असे असले तरीही मी स्वत:ला नशिबवान समजतो. सुदैवी समजतो.
कारण मला योग्य वेळी भगवद्‌गीता वाचायला मिळाली. माझ्या एका हितचिंतकाच्या सततच्या आग्रहामुळे १९७६ साली मी प्रथम भगवद्‌गीता वाचली. संस्कृत भाषा येत नसल्यामुळे, त्यावेळी मला काहीही समजले नाही.
मग परत परत वाचायला लागलो आणि तसे वाचन आजपर्यंत चालूच आहे.
गीतेचे व्यसनच लागले आहे असे म्हटले तरी चालेल. दररोज थोडी तरी गीता वाचल्याशिवाय राहू शकत नाही.
समजा वाचत नसलो तरीही मनामधे गीतेचे पारायण आपोआप होतच असते.
ते थांबतच नाही. थांबवता येतच नाही आणि तशी गरजही वाटत नाही.
आजही, गीतेतले फारसे काही कळते आहे अशातला भाग नाही,
परंतु पहिल्यापेक्षा थोडी सुधारणा आहे असे मला वाटते.
**' काहीच न कळण्यापेक्षा थोडेसे काहीतरी कळणे चांगले.'** असो.
गीता वाचत असताना, गीतेचा अभ्यास करीत असताना, अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करीत असताना, नकळत ' रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, दासबोध, मनाचे श्लोक ' ह्यांची आवड निर्माण झाली. ह्या सर्व ग्रंथांचे आणि त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांचे सतत वाचन करीत असतो. त्याविषयी इतरांचे मत जाणून घेणे आणि आपले मत इतरांना सांगणे हे सारखे चालूच असते.
तसे ठरवून करावे लागत नाही. आपोआप होत राहते. त्यामुळे मला आनंद मिळतो. शांती मिळते. समाधान मिळते. स्वार्थ कमी होतो. माझ्या मन:शक्तिमध्ये वाढ होते. आयुष्याला सामोरे जायला बळ मिळते. असो.
मी गेली अनेक वर्षे गीतेचा अभ्यास करीत आहे. गीता वाचतो आहे. म्हणतो आहे.
ते ऐकून ऐकून माझ्या मोठ्या नातवाला, तो पाच वर्षांचा असताना गीता शिकायची इच्छा झाली. मग त्याला गीता शिकवायला सुरवात केली. त्याने पण चिकाटीने प्रयत्न केले. सलग अडीच वर्षे गीता शिकला. वयाच्या सातव्या वर्षी त्याची संपूर्ण गीता तोंडपाठ झाली. शृंगेरीच्या श्रीमद्‌शंकराचार्यांच्याकडून त्याचे कौतुकही झाले. आता धाकट्या नातवालाही गीता शिकवतो आहे. असो.
ह्या सगळ्याचा व्हायचा तो परिणाम झाला.
पूजनीय ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी एक अर्थपूर्ण विधान केलेले आहे. **' आत फार झाले म्हणजे ते बाहेर येतेच.'**
आकाशातला मेघ पाण्याने पूर्णपणे भरला म्हणजे त्यामधील पाणी पावसाच्या रूपाने बाहेर पडतेच. ते मेघामधे राहूच शकत नाही.
पावसाच्या पाण्याने शेत ओलेचिंब झाले, पुरेसे भिजले म्हणजे त्यामधे असलेल्या बीजांमधून अंकुर बाहेर येतातच. बीजांचे अंकुर रूपाने बाहेर येणे अनिवार्य असते.
माठ पाण्याने पूर्ण भरला म्हणजे पाणी बाहेर वाहायला लागतेच. ते आत राहू शकत नाही. पाण्याचे बाहेर वाहत जाणे अनिवार्य होते.

तसाच काहीसा प्रकार माझ्या बाबतीतही घडला असावा.
श्रीमद्भगवद्गीता म्हणजे आपल्या भारतीय संस्कृतीचा **मानदंड** आहे.
' आपल्याला गीतेविषयी काय वाटते? गीतेचे महत्त्व काय आहे? ती आजच्या काळामधेही उपयुक्त आहे काय?
समाजाच्या उत्कर्षासाठी आवश्यक आहे काय? आपल्या देशाच्या नैतिक उन्नतीसाठी उपयुक्त आहे काय?
सर्वांनी, विशेष करून तरुण मुलामुलींनी, गीता कशासाठी शिकली पाहिजे?
आपल्याला गीतेच्या सातशे श्लोकांमधून कोणता अर्थ समजला?' ह्याविषयी मनामधे येणारे विचार लिहून काढावेत असे तीव्रपणे वाटायला लागले. मला तसा आग्रह करणारे, परिचयाचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लोक होतेच.
त्यांच्या सततच्या आग्रहामुळे, सन २०११ च्या फेब्रुवारीमधे गीतेविषयी माझ्या मनात येणारे सगळे विचार लिहायला सुरवात केली.
हे लेखन कधी पूर्ण होईल? अथवा पूर्ण होईल की नाही? ते मला माहीत नव्हते.
परंतु परमेश्वराच्या कृपेने सन २०१४ च्या ऑक्टोबर अखेरीस लेखन पूर्ण झाले.
मी अत्यंत प्रामाणिकपणे, मनापासून प्रयत्न केला आहे.
' मला लेखनामधे आनंद मिळतो ' म्हणून लिहीत गेलो आहे. **( स्वांत सुखाय । )**
मी गीता वाचायला सुरवात केली तेव्हा तेवीस वर्षांचा होतो. आजही वाचतोच आहे. अभ्यास करतो आहे. चिंतन करतो आहे.
मनन करतो आहे. इतरांना शंका विचारतो आहे. त्यांचे बरोबर चर्चा करतो आहे.
गीतेसारखे आनंददायक दुसरे काही असेल असे मला तरी वाटत नाही. प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर माझे असे मत झालेले आहे.
गीतेच्या वाचनाने, पठणाने आणि अभ्यासाने अनेक लाभ होतात.
त्यांपैकी दैनंदिन व्यवहारामधे उपयोगी पडणारे जे लाभ आहेत ते पुढील प्रमाणे —

१) आपल्या जिभेला भरपूर व्यायाम होतो. त्यामुळे जीभ लवचीक होऊन आपले उच्चारण सुधारते. बोलणे सुस्पष्ट होते. वाणीतले सर्व दोष नाहीसे होतात. आपले बोलणे प्रभावशाली आणि परिणामकारक व्हायला मदत होते.
२) प्राणायाम आपोआप घडतो. त्यामुळे श्वसन संस्था कार्यक्षम होते. श्वासप्रश्वासावर ताबा ठेवता येतो. दम्यासारखे विकार होण्याची शक्यता जवळजवळ नाहीशी होते.
३) मन एकाग्र व्हायला मदत होते. परिणामी कोणत्याही विषयाचा अभ्यास पूर्ण लक्ष देऊन करता येतो. कोणताही विषय चांगल्या प्रकारे समजायला मदत होते.
४) ' शरीर हे नाशिवंत असून आत्मा हा अविनाशी आहे!' हे तत्त्व मनावर बिंबविले जाते. त्यामुळे मृत्यूची भीती कमी होते.
५) आपले जे कर्तव्य असेल ते फळाची अपेक्षा न ठेवता, जास्तीतजास्त चांगल्या प्रकारे पार पाडण्याची वृत्ती निर्माण होते आणि तसे वागायला सुरवात होते.
६) बोलण्यात आणि वागण्यात सुसूत्रता येते. बोलल्यासारखे वागण्याची प्रवृत्ती वाढू लागते. त्यामुळे समाजामधे आपली विश्वासार्हता वाढते.
७) कोणत्याही प्रकारच्या भीतीची भावना कमी व्हायला लागते आणि धैर्य वाढायला लागते. आपण संकटाना तोंड द्यायला समर्थ होतो.
८) मनावर ताबा मिळवता येतो. विपरीत परिस्थितीमधेही मनाचा तोल सांभाळता यायला लागतो. त्याला स्थिर ठेवणे शक्य होते.
९) मनामधे ' अयोग्य गोष्टींना विरोध करण्याचे आणि योग्य गोष्टींना पाठिंबा देण्याचे ' सामर्थ्य येते. तसे करण्याचा निश्चय आणि कृती दोन्हीही केले जाते.

इतक्या सर्व गोष्टी गीतेच्या वाचनाने, पठणाने आणि चिंतनाने प्राप्त होतात.
येथे आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते आहे. ती म्हणजे, गीतेचा अभ्यास आणि पठण हे वयाच्या वीस वर्षांच्या अगोदरच केले पाहिजे. म्हणजे गीता आचरणात आणायला पुरेसा अवधी मिळतो. म्हातारपणी गीतेचा अभ्यास करता येत नाही.
समजा केला तरी त्याचा उपयोग होत नाही कारण आयुष्य संपायला आलेले असते. असो.
माझ्या जवळ भाषेचे सामर्थ्य नाही. लेखनाची विशेष व आकर्षक अशी शैली नाही. प्रसंग वर्णन करायचे कसब नाही.
संवाद लिहायची हातोटी नाही. माझा अभ्यास कमी पडतो. कल्पनाशक्ती कमी पडते. शब्दसामर्थ्य कमी पडते.
गीतेसारख्या गहन विषयावर लेखन करता येण्यासाठी जी एक विशेष पात्रता असावी लागते ती माझ्याकडे नाही.
ह्या सगळ्या गोष्टींची मला पूर्णपणे जाणीव आहे. तरीही मी ही प्रवचने लिहायचे धाडस केले आहे.
आपल्या मनामधे कदाचित् पुढील प्रश्न येऊ शकतील. त्यांची उत्तरे येथेच देतो.

**१) हे धाडस मी कशाच्या जोरावर केले आहे?**

माझी एक श्रद्धा आहे आणि त्या श्रद्धेनेच मला लिहायला लावले आहे.

**मूकम् करोति वाचालम् पङ्गुं लङ्घयते गिरिम् ।**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ।। ८ ।।**

अर्थ — ज्याची कृपा झाली असता मुका मनुष्य देखील बोलायला लागतो आणि पांगळा मनुष्य देखील पर्वतावर चढतो त्या परमानंददायी माधवाला माझा नमस्कार असो.

' परमेश्वराची कृपा झाली म्हणजे अशक्य गोष्टीसुद्धा शक्य होतात.' हा विचार मला मनापासून पटतो. विश्वसनीय वाटतो.

त्याच बरोबर, ' त्यासाठी अगोदर, मुक्या माणसाने बोलायचा प्रयत्न करणे आणि पांगळ्या माणसाने चालायचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.' हे सुद्धा मला पटते. मी प्रयत्न केले आहेत. त्यांना यश येईल की नाही ते मला माहीत नाही.

कर्ता करविता तोच आहे! त्यानेच माझ्याकडून हे सगळे लिहून घेतले आहे!

मी केवळ निमित्तमात्र आहे! एक निर्जीव बाहुली आहे! त्याच्या इच्छेप्रमाणे, तो नाचवील तशी नाचणारी बाहुली!

' **मी! – माझे! – माझ्यासाठी! – माझ्यामुळे!**' असा स्वत:चा, प्रथम पुरुषी एकवचनी उल्लेख सतत करीत रहायची सवय जडलेली बाहुली! हीच गोष्ट खरी! बाकी सगळे शब्दांचे बुडबुडे! त्या बुडबुड्यांना काहीही अर्थ नाही!

उगाचच आपणच आपली फसवणूक करण्याचा प्रकार! दुसरे काय म्हणायचे?

**२) हे धाडस मी कशासाठी केले आहे?**

गीतेविषयी माझ्या मनामधे आलेले विचार तुम्हाला सांगावेत, विशेष करून तरुण मुलामुलींना सांगावेत असे मला वाटते.

आज त्याचीच फार गरज आहे.

हे एका सर्वसामान्य माणसाचे विचार आहेत ही गोष्ट ध्यानात ठेवून आपण वाचन करावे अशी माझी नम्र विनंती आहे.

**यत् रोचते तत् ग्राह्यम् यत् न रोचते तत् त्याज्यम् ।**

अर्थ – वाचताना जे आवडेल ते स्वीकारा आणि जे आवडणार नाही ते सोडून द्या.

त्यामुळे आपल्या विचारामधे, आचारामधे फरक पडेल. मन:शक्तीमधे वाढ होईल.

आपण गीता वाचायला सुरवात कराल. गीता म्हणायला सुरवात कराल.

गीतेचे मनन करायला सुरवात कराल. चिंतन करायला सुरवात कराल.

गीतेने सांगितलेले विचार आपल्या आचरणामधे आणायला सुरवात कराल.

आपणा सर्वांचे आयुष्य आनंदाने भरून जाईल. शांती व समाधानाने भरून जाईल.

तसेच व्हावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. गेल्या सुमारे चार वर्षांच्या कालावधीमधे,

' विषयप्रवेश, एक ते अठरा अध्याय, गीता माहात्म्य आणि समारोप ' अशी एकूण एकवीस प्रवचने लिहिली गेली आहेत आणि त्यानंतर ही प्रस्तावना लिहिली आहे.

येथे आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो आहे. कृपया आपण ती गोष्ट लक्षात ठेवा.

आपल्याला एकूण प्रवचनांमधे जर काही चुका आढळल्या, तर त्या सर्वस्वी माझ्याच असतील.

त्याबद्दल आपण मला क्षमा करावी ही नम्र विनंती.

जर काही प्रभावशाली, यथायोग्य आणि परिणामकारक असे लेखन आढळले, तर तो सगळा श्रीमद्भगवद्गीतेचा प्रभाव आहे.

ह्याविषयी कोणताही संशय नाही. गीताभ्यासासाठी तुम्हा सर्वांना माझ्या शुभेच्छा!

अस्तु !!!

**श्री. माधव गणेश दीक्षित.**

ई / ०१३, हर हर महादेव सोसायटी.

पाटीलवाडी, पाचपाखाडी.

ठाणे ( पश्चिम ) — ४०० ६०१

दूरध्वनी क्रमांक — २ ५३३२७१४

ई मेल — magadix@rediffmail.com

## — श्रीमद् भगवद् गीता प्रवचन —

## विषय प्रवेश

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

हा महाभारताच्या पहिल्या पर्वाच्या म्हणजे आदिपर्वाच्या, पहिल्या उपपर्वाच्या म्हणजे अनुक्रमणिकापर्वाच्या, पहिल्या अध्यायाचा पहिला श्लोक आहे. महाभारताची सुरवात ह्या श्लोकाने झालेली आहे.

महाभारताविषयी किंवा श्रीमद्भगवद्गीतेविषयी काहीही बोलायचे झाल्यास, वाचन करायचे झाल्यास किंवा पठण करायचे झाल्यास, त्याची सुरवात ह्या श्लोकानेच केली जाते. तशी परंपराच आहे. अगोदर ह्या श्लोकाचा अर्थ समजून घेऊया.

म्हणजे तशी परंपरा का आहे ह्याचा उलगडा आपोआपच होईल.

' **नारायणाला** म्हणजे **श्रीकृष्णाला** म्हणजेच **परमेश्वराला** नमस्कार करून, त्यानंतर त्याचा सखा असलेला, नरांमधील सर्वोत्तम नर असा जो **अर्जुन,** त्याला नमस्कार करून, त्यानंतर त्या दोघांची अद्वितीय अशी लीला प्रकट करण्यासाठी आवश्यक अशी बुद्धी देणारी जी **सरस्वती देवी,** तिला नमस्कार करून आणि सरतेशेवटी ती लीला वर्णन करणारे जे **महर्षी व्यास**, त्यांना नमस्कार करून, मग जय म्हणजे महाभारत म्हणण्यास सुरवात करावी.'

हा अर्थ लक्षात घेतला म्हणजे, ' ज्यांच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे त्यांना, तशी इच्छा आणि प्रज्ञा देणाऱ्या देवतेला आणि ज्यांनी ते वर्णन केले आहे त्यांना ' मनापासून नमस्कार करून त्यांचे ऋण मान्य केले असल्याचे कळते.

आता येथे आपल्या मनामधे एक प्रश्न येऊ शकेल.

' व्यास मुनींनी महाभारतीय इतिहासाची रचना केलेली आहे. मग त्यांनी स्वत:च स्वत:ला नमस्कार कसा काय केला असेल?'

तर ती वस्तुस्थिती नाही. व्यासांनी तसे केलेले नाही.

महर्षी व्यासांनी जेव्हा महाभारताचा इतिहास शब्दबद्ध केला, तेव्हा ती छंदोबद्ध रचना पंचवीस हजार श्लोकांची होती आणि तिला त्यांनी **' जय '** असे नांव दिले होते. **' जय ' म्हणजे जय नांवाचा इतिहास किंवा विजयाचा इतिहास.**

त्यावेळी हा श्लोक वेगळा होता. श्लोकाचा तिसरा पाद **' देवीं सरस्वतीं चैव '** असा होता.

कालांतराने व्यासांच्या शिष्यांनी त्या रचनेचा विस्तार केला. वाढता वाढता पंचवीस हजार श्लोकांचे, एक लक्ष श्लोक झाले आणि त्याचे मूळचे **' जय '** हे नांव बदलले. ते **' महाभारत '** असे झाले.

त्या इतिहासाचे सार्वजनिकरित्या कथन करायला अगोदरच सुरवात झालेली होती.

परीक्षित राजाचा मुलगा जनमेजय ह्याने केलेल्या सर्पसत्राच्या दीर्घकाळ चाललेल्या कार्यक्रमाच्या वेळी, खुद्द व्यासमुनींनी दिलेल्या आदेशावरून, त्यांचेच शिष्य असलेल्या वैशंपायनमुनींनी महाभारताची कथा प्रथमच सार्वजनिकरित्या सांगितल्याचा उल्लेख आढळून येतो. म्हणजे युद्ध झाल्यानंतर पुढे महाभारताच्या कथेचे सार्वजनिक कथन होण्याच्या मधे सुमारे साठ ते सत्तर वर्षांचा काळ लोटला असावा असा अंदाज करता येईल. त्यावेळी व्यासमुनींनी रचलेला आदिम श्लोक तसाच्या तसा म्हटला जात असे.

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ।।**

त्यानंतर पुढील हजारो वर्षांच्या कालावधीत विस्तार केला गेला आणि त्यानुसारच कथन केले जाऊ लागले.

त्याच दरम्यान, असा विस्तार करणाऱ्या सर्व शिष्यगणांनी दोन महत्त्वाच्या गोष्टी केल्या.

पहिली गोष्ट म्हणजे, आपल्या गुरुदेवांच्या विषयी आदर व्यक्त करण्यासाठी, ह्या श्लोकामधे त्यांचे नांव घातले.

श्लोकाच्या तिसऱ्या पादामधे **' देवीं सरस्वतीं व्यासं '** असा यथायोग्य बदल केला.

दुसरी गोष्ट म्हणजे, ज्या स्थानी बसून ते श्रोत्यांना महाभारताची कथा सांगायचे, त्या स्थानाला **' व्यासपीठ '** असे नांव दिले.

व्यासपीठावर बसून किंवा उभे राहून बोलणारा मनुष्य हा चारित्र्यवान, गुणवान, बुद्धिवान, नीतिवान आणि अंतर्बाह्य शुचिर्भूत असणे अपेक्षित असते. हे नांव आजही प्रचारात आहे. असो.

आता आपण, **' गीता म्हणजे काय आहे.'** ते समजून घ्यायचा प्रयत्न करूया.

मी येथे ' प्रयत्न करूया.' असे म्हणालो त्याला कारण आहे. गीतेचा अर्थ लावणे सोपे काम नाही. फार फार कठीण काम आहे. गेली हजारो वर्षे हे काम चालले आहे आणि यापुढील काळातही चालूच राहील.

कित्येक ज्ञानी विचारवंतांनी गीता म्हणजे ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि राजयोग ह्या चारही मार्गांचा सुरेख समन्वय साधणारा ग्रंथ आहे असे सांगितले आहे. ह्या जगामधे आपले आयुष्य योग्य प्रकारे जगण्यासाठी आणि त्यानंतर मोक्ष प्राप्त करण्यासाठी,
ज्याला जो मार्ग आवडेल तो त्याने अनुसरावा, असे मत मांडले आहे.
ह्या बरोबर उलट मत कित्येक विचारवंतांनी मांडलेले आहे.
गीतेतील ब्रह्मविद्या वरवर सुलभ दिसत असली, श्लोकांचा अर्थ लावता येतो आहे असे वाटत असले, तरी तिचे खरे मर्म अत्यंत गूढ आहे आणि ते समजणे जवळजवळ अशक्य आहे. एखादा भगवान श्रीकृष्णाच्या किंवा महर्षी व्यासमुनींच्या तोडीचा गुरू भेटला तर त्या गुरुच्या मुखातूनच कदाचित् ते मर्म समजू शकेल, असे मत मांडले आहे.
खुद्द व्यासमहर्षी महाभारताच्या आदिपर्वामधे पुढील श्लोकांत असे सांगतात की, —

**ग्रंथग्रंथिं तदा चक्रे मुनिर्गूढं कुतुहलात् ।**
**यस्मिन् प्रतिज्ञया प्राह मुनिर्द्वैपायनस्त्विदम् ।। १/८० ।।**
**अष्टौ श्लोकसहस्राणि अष्टौ श्लोकशतानि च ।**
**अहं वेद्मि शुको वेत्ति संजयो वेत्ति वा न वा ।। १/८१ ।।**
**तच्छ्लोककूटमद्यापि ग्रथितं सुदृढं मुने ।**
**भेत्तुं न शक्यतेऽर्थस्य गूढत्वात् प्रश्रितस्य च ।। १/८२ ।।**

अर्थ — आणि मग महामुनी व्यासांनी आपल्या ग्रंथरचनेमध्ये कूटस्थळे निर्माण करायला सुरवात केली. त्याविषयी त्यांनी प्रतिज्ञापूर्वक असे सांगितले आहे की, ' मी संपूर्ण महाभारतामधे आठ हजार आठशे गूढ श्लोक किंवा कूटस्थळे ठेवलेली आहेत. त्यांचा खरा अर्थ फक्त मला आणि माझा पुत्र शुक ह्यालाच माहिती आहे. माझा शिष्य संजय हा काही श्लोकांचा अर्थ जाणतो तर काही श्लोकांचा अर्थ जाणत नाही.' त्या कूटश्लोकांचा अर्थ आजपर्यंत न समजल्यामुळे आजही ते अगम्यच आहेत.
त्या कूटस्थळांपैकी काही कूटस्थळे दर्शनशास्त्रविषयक आहेत, काही प्रसंगवर्णनात्मक आहेत, काही कूटस्थळे स्थलनिर्देशविषयक आहेत आणि काही कालगणनात्मक आहेत.
त्यापैकी दर्शनशास्त्र विषयक अनेक गूढ श्लोक गीतेच्या सर्व अठरा अध्यायांतच विखुरलेले आहेत, असे अनेक विद्वज्जन म्हणतात.
आपणा सर्वांना प्रश्न पडला असेल की, **दर्शनशास्त्र** म्हणजे काय?
**' जे शास्त्र जाणले असता, सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीच्या मूलभूत तत्त्वाचे सुस्पष्ट ज्ञान होते, दर्शन होते, ते दर्शनशास्त्र होय.'**
त्यामुळे गीतेचा खरा अर्थ काय आहे ते निश्चितपणे कोणाला सांगता येईल? कुणीही जरी झाला तरी तो, त्याला काय वाटते तेच सांगणार आणि तेच गीतेमधे सांगितलेले आहे, तेच गीतेचे सार आहे असे प्रतिपादन करणार.
आता त्या सर्व बुद्धिमान, ज्ञानी आणि चिकित्सक अशा आदरणीय जनांच्या तुलनेत आपण कोण आहोत? कुणीही नाही.
आपण नगण्य आहोत. आपले आणि आपल्या विचारांचे काहीही महत्त्व नाही.
अहो ऽऽ, त्यांच्यामधे खुद्द **' महाभारतकार '** व्यासमुनींच्यापासून ते **' गीताई '** ची रचना करणाऱ्या आचार्य विनोबा भाव्यांपर्यंत अनेक प्राचीन आणि अर्वाचीन विद्वान समाविष्ट होतात. ही यादी फारच मोठी आहे आणि त्यात समाविष्ट असलेला प्रत्येक माणूस हा विद्वान आहे. ज्ञानी आहे. आदरणीय आहे. जर आपला अहंकार बाजूला ठेवून विचार केला, तर —
' आपण कोणत्याच बाबतीत त्यांच्या पासंगालाही पुरत नाही.' हे सत्य जाणवते. मग आपण काय करायचे? अभ्यास कसा करायचा?
यावर एक उपाय आहे. एक मार्ग आहे. अत्यंत विश्वसनीय मार्ग आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो राजमार्ग आहे.
' आपण त्यांनाच आपले गुरूजन मानायचे. त्यांचे शिष्य व्हायचे. आदराने, विनम्रपणे नमस्कार करून त्यांनाच मार्ग विचारायचा. ते काय सांगतात ते वाचायचे, ऐकायचे आणि त्याचे मनन करायचे. त्यांचेच बोट धरून चालायला सुरवात करायची. धडपडायला झाले तरी काळजी करायचे कारण नाही. तेच आपले रक्षण करतील.'
ज्ञानवान, बुद्धिमान आणि चारित्र्यवान माणसांची संगती फार लाभदायक असते.
ते शरिराने आपल्या बरोबर नसले तरीही आपल्याला मार्गदर्शन करीत असतात.
त्यांच्या कृपाप्रसादाने आपल्यालाही काही काही गोष्टी समजायला लागतील. आपला वैचारिक गोंधळ कमी व्हायला लागेल.
आपले आयुष्य जगत असताना, येणाऱ्या अडचणींना सामोरे जाऊन त्यांमधून मार्ग काढायची शक्ती प्राप्त होईल.
मनामधे काही नवीन विचार यायला लागतील. काही नवीन कल्पना सुचायला लागतील.
इतरांच्या बरोबर त्या विचारांची देवाणघेवाण केली तर आपल्या ज्ञानामधे सतत भर पडत राहील. आपला बौद्धिक विकास होईल.

'**केवळ स्वत:साठीच जगणे.**' हा विचार हळूहळू कमी व्हायला लागेल.
मनामधे '**आपण इतरांच्या उपयोगी पडले पाहिजे.**' अशी इच्छा उत्पन्न होईल.
त्या दिशेने प्रयत्न करायला सुरवात होईल. आपले जगणे सुसह्य होईल. आपल्या जगण्याला काही अर्थ येईल.
आपल्याला हा फार मोठा लाभ होईल. असो.

**श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे काय आहे बरे?**

गाणे आहे? कविता आहे? उपनिषद् आहे? ब्रह्मविद्येविषयी सविस्तर माहिती सांगणारे व्याख्यान आहे?
निरनिराळ्या योगशास्त्रांची सांगोपांग चर्चा आहे? दोन माणसांच्या मधला संवाद आहे? इहपरलोकी कल्याणकारक असे स्तोत्र आहे?
कथा आहे? काय आहे काय? गीतेमधे असे काय आहे की ज्याच्या योगे गेली पाच हजार वर्षें ती जनमानसावर राज्य करते आहे?
गीतेच्या प्रत्येक अध्यायाचा समारोप पुढील वाक्याने केलेला आहे.

**इति श्रीमद् भगवद् गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे — योगो नाम — ऽध्यायः ।**

अर्थ — ह्याप्रमाणे श्रीभगवंतानी गायिलेल्या म्हणजे सांगितलेल्या उपनिषदात ब्रह्मविद्यांतर्गत योगशास्त्रावरील श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादातील अमुकयोग नांवाचा अमुक अध्याय समाप्त झाला.

ह्या वाक्याचा अर्थ लक्षात घेतला म्हणजे मग स्वत: महाभारतकार श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे काय आहे ते स्पष्टपणे सांगत असल्याचे जाणवते.

**भगवद् गीतासु** — श्रीभगवंतानी गायिलेले — म्हणजे गाणे आहे!
ते गाणे आहे. गद्य गाता येत नाही. पद्य छंदोबद्ध असते म्हणून गाता येते. म्हणजे ते पद्य आहे! ती कविता आहे!
**उपनिषत्सु** — उपनिषद् ह्या शब्दाचा अर्थ, जवळ बसून ज्ञान घेणे किंवा जवळ बसवून ज्ञान देणे असा आहे.
अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाच्या जवळ बसूनच ज्ञान घेतले आहे आणि भगवंतानी अर्जुनाला आपल्या जवळ बसवून ज्ञान दिले आहे. म्हणजे ते उपनिषद् आहे!
**ब्रह्मविद्यायाम्** — ब्रह्मविद्यांतर्गत — म्हणजे ती ब्रह्मविद्या आहे!
**योगशास्त्रे** — योगशास्त्रावरील — म्हणजे ते योगशास्त्र आहे!
**श्रीकृष्णार्जुनसंवादे** — श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादातील — म्हणजे तो दोन माणसांच्या मधला संवाद आहे!
**स्तोत्र** म्हणजे माणसाने रचलेली, देवाची स्तुती करणारी कविता.
आपल्या आवडत्या देवाची किंवा देवतेची स्तुती करणारी कविता म्हणजे स्तोत्र. त्यामधे देवदेवता काहीच बोलत नाहीत. केवळ भक्तच बोलतो. देवाची मनापासून स्तुती करतो. देवाला श्रद्धेने नमस्कार करतो.
गीतेमधे मात्र स्वत: परमेश्वर बोलतो आहे. माणसाला उपदेश करतो आहे. आपले आयुष्य जगताना कसे जगावे ते शिकवतो आहे. काय करावे आणि काय करू नये ते सांगतो आहे. ह्या सर्व विश्वाची उत्पत्ती - स्थिती आणि लय म्हणजे विनाश करण्याचे त्याचे सामर्थ्य, त्याचा प्रभाव, त्याचे मूळ स्वरूप ह्याविषयी स्पष्टपणे बोलतो आहे. आपल्या मूळ स्वरुपात दर्शनही देतो आहे.
असे असूनही, गीता हे इतर स्तोत्रांच्या सारखे केवळ परमेश्वराची स्तुती करणारे काव्य नसले तरीही, त्यामधे अर्जुनाने आणि संजयाने काही ठिकाणी परमेश्वराची स्तुती केलेली आहे. म्हणून ते काही प्रमाणात स्तोत्रही आहे!
भगवद्‌गीता कोणी सांगितली? कोणाला सांगितली? कधी सांगितली? कोठे सांगितली? कशासाठी सांगितली? आणि कशा प्रकारे सांगितली? ह्या सर्व प्रश्नांचा विचार करून सुसंगत मांडणी केली तर तिचा एकूण विस्तार हा एखाद्या स्वतंत्र कथानकासारखा आहे हे देखील समजते. गीतेच्या अगोदर घडलेला आणि गीता सांगून झाल्यानंतर घडलेला इतिहास विचारात घेतला नाही तरीही गीता पूर्ण राहते. पूर्ण होते. ती महाभारतात असली तरीही महाभारतावर संपूर्णपणे अवलंबून नाही. म्हणजे ती कथा आहे!
ही सर्व विधाने मान्य होण्यासारखी असली तरीही मूळ प्रश्नाचे निश्चित उत्तर काय आहे?
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे गाणे आहे पण केवळ गाणे नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे कविता आहे पण केवळ कविता नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे उपनिषद् आहे पण केवळ उपनिषद् नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे ब्रह्मविद्या आहे पण केवळ ब्रह्मविद्या नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे योगशास्त्र आहे पण केवळ योगशास्त्र नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे दोन माणसांच्या मधला संवाद आहे पण केवळ दोन माणसांच्या मधला संवाद नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे काही प्रमाणात स्तोत्रही आहे पण केवळ स्तोत्र नाही.

श्रीमद्भगवद्गीता म्हणजे कथा आहे पण केवळ कथा नाही.
श्रीमद्भगवद्गीता म्हणजे हे सर्वकाही आहेच पण त्या शिवाय अजूनही बरेच काही आहे.
त्याचाच शोध घेण्याचे काम जगभर सतत चाललेले असते.
प्रत्येक विद्वान व्यक्ती आपापल्या बुद्धी - शक्तीनुसार युक्तिवाद करीत असते. आपले मत मांडत असते.
ते मत इतर विद्वान व्यक्तींना पटतेच असे नाही. मग त्या व्यक्ती आपापली मते मांडतात. इतरांची मते खोडून काढायचा प्रयत्न करतात. हा प्रकार गेली अनेक शतके चालू आहे. वाद संपतच नाहीत आणि कधी संपतील असे वाटत नाही.
असे असले तरीही एक गोष्ट निश्चित आहे.
' खरा अर्थ कळो किंवा न कळो, वैचारिक मतभेद असोत किंवा नसोत, संप्रदाय कोणताही असो, मतप्रणाली कोणतीही असो, भगवद्गीता सर्वांनाच वंदनीय आहे! पूजनीय आहे! आदरणीय आहे! चिंतनीय आहे! मननीय आहे! अनुकरणीय आहे!'
ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे — **' भगवद्गीता ही स्थलकालातीत आहे.'**
सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अर्जुनाला जे प्रश्न पडले होते, तेच प्रश्न आपल्याला आजही, वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या प्रसंगी पडतात. युद्धभूमी बदलते, व्यक्ती बदलतात, संदर्भ बदलतात, परिस्थिती बदलते पण प्रश्न तेच असतात.
इतकेच नव्हे तर अजून पाच हजार वर्षांनीसुद्धा त्यावेळच्या माणसांना वेळोवेळी तेच प्रश्न पडतील. कारण काळ कोणताही असला तरी मनुष्यप्राणी तसाच असतो. त्याचा मूळ स्वभाव तसाच असतो. त्याची वृत्ती-प्रवृत्ती आणि क्रिया-प्रतिक्रिया पण तशाच असतात.
त्या कधीही बदलत नाहीत.
दुसरी गोष्ट म्हणजे भगवद्गीता ही आपल्या हिंदू धर्माच्या सर्वोच्च स्थानी असली तरीही ती एका अर्थी धर्मातीत आहे.
मनुष्य कोणत्याही धर्माचा असला, कोणत्याही जातीचा असला, कोणत्याही पंथाचा असला तरीही, त्याला असे अनेक प्रश्न नेहमीच पडतात. त्याचा गोंधळ उडतो. काय करावे आणि काय करू नये ते कळत नाही.
अशावेळी जर त्याने भगवद्गीतेचा आधार घेतला तर, भगवद्गीता त्याला मार्ग दाखवते.
भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली हा इतिहास झाला.
पण त्याने एकट्या अर्जुनालाच गीता सांगितलेली नाही. अर्जुनाच्या निमित्ताने जगातल्या प्रत्येक माणसाला उपदेश केलेला आहे.
त्याला धर्माचे आणि जातीचे बंधन नाही.
अर्थ समजून घेऊन गीता वाचणाऱ्या कोणालाही, स्वत: श्रीकृष्ण आपल्या बरोबर बोलतो आहे, आपल्याला समजावतो आहे, आपल्या पाठीवरून हात फिरवितो आहे आणि योग्य मार्ग दाखवितो आहे असेच वाटते.
गीता आजही सर्व जगभर अभ्यासली जाते. तिच्या विषयी चर्चा केली जाते.
अनेक लोकांच्या जीवनावर मूलगामी परिणाम करते. त्यांना एखादे महान कार्य करण्यास प्रवृत्त करते.
अनेक व्यक्तींना साहित्य निर्मितीची प्रेरणा देते. जवळजवळ प्रत्येक महनीय व्यक्तीला आपला एखादा विचार समाजाला सांगताना, त्या विचाराच्या समर्थनासाठी गीतेचा आधार घ्यावासा वाटत आलेला आहे.
त्याच एकमेव हेतूने अनेक उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण झालेले आहेत.
सर्व वेदांचे सार वेदांतामधे आहे. वेदांत म्हणजे उपनिषदे.
वेदांमधे अपौरुषेय वाणीने सांगितलेले गूढ ज्ञान सोपे करून सांगण्यासाठी उपनिषदांची निर्मिती झालेली आहे.
त्यासाठी उपनिषदांमधे वेगवेगळ्या कथा सांगण्यात आलेल्या आहेत.
त्यानंतर सर्व उपनिषदांमधे जे काही सांगितलेले आहे त्याचे सार श्रीमद्भगवद्गीतेमधे सांगितलेले आहे.
गीतामहात्म्यामधे ह्याच अर्थाचा एक सुंदर श्लोक सांगितलेला आहे.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दन ।**
**पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धम् गीतामृतम् महत् ।।**

अर्थ — सर्व उपनिषदे म्हणजे गायी, भगवान् श्रीकृष्ण हे स्वत: दूध काढणारे गवळी, अर्जुन हा त्या गायींना पान्हा आणणारा भोक्ता वत्स म्हणजे वासरू आणि अशी अपूर्व सामग्री जुळून आल्यावर, जे दूध काढले तेच हे मोठे गीतारूपी अमृत होय.
आता ह्या सर्व शास्त्रांचे सार असलेल्या गीतेचे सार काय असेल?
**स्वामी रामकृष्ण परमहंस** म्हणत की, गीतेचे सार तिच्या नांवातच आहे.
जर आपण गीतेचे नांव वारंवार म्हणायला लागलो तर काय होते ते पहा.
**' गीता गीता गीता गीता गीता गीता '** म्हणता म्हणता, **' तागी तागी तागी तागी तागी तागी '** असे ऐकायला येते.

**‘ तागी ’** म्हणजे **‘ त्यागी ’.** गीता आपल्याला **‘ त्यागी व्हा! त्याग करा!’** असे शिकविते. कशाचा त्याग करायचा?
परमेश्वराने दिलेल्या ह्या अनमोल अशा जीवनाचा त्याग करायचा? **नाही.**
जीवनामधे स्वधर्माला अनुसरून कराव्या लागणाऱ्या कर्मांचा त्याग करायचा? **नाही.**
आपले कर्म करायचे नाकारून संन्यासी व्हायचे? **नाही.**
जर तसे सांगायचे असते तर श्रीकृष्णाचे काम अगदीच सोपे होते. काही करायची गरजच नव्हती.
अर्जुन संन्यास घ्यायला, भिक्षा मागायला आणि परत वनवासी व्हायला तयार झालेलाच होता.
आता ‘ त्याचे कौतुक करून, अभिनंदन करून, त्याच्याशी सहमती दर्शवून, कुरुक्षेत्राची रणभूमी सोडून त्याच्याबरोबर निघून जाणे.’ एवढेच करावे लागले असते.
‘ अरे अर्जुनाऽऽ! शाब्बाऽऽस! काय उत्तम गोष्ट बोललास तू! अगदी माझ्या मनातलेच बोललास! चल आता आपण दोघे हा रणवेश उतरवून टाकूया! अंगावर भगवी वस्त्रे घालून आणि ह्या सर्व सैन्याचा तसेच युद्धकर्माचा त्याग करून परत वनवासात जाऊया! तेथेच राहून, संन्यास घेऊन, अष्टांगयोगाची साधना करून किंवा परमेश्वराची भक्ती करून आपले कल्याण करून घेऊया!’
अशा अर्थाचे दहा वीस श्लोक आणि पुढे सगळ्यांचा निरोप घेऊन रणांगणावरून निघून जाण्यासाठी म्हणून दुसरे दहा वीस श्लोक सांगून गीतेची समाप्ती करता आली असती.
कुरुक्षेत्रावर जमलेले सगळे महारथी उपहास करीत आहेत? करूदेत! माता कुंती आणि द्रौपदी निर्भत्सना करतील? करूदेत!
आजवर झालेल्या अन्यायाचा बदला घ्यायच्या प्रतिज्ञा फोल ठरतील? ठरूदेत!
आजवर मिळवलेल्या यशाचे आणि कीर्तीचे वाटोळे होईल? होऊदे!
येथून पुढे कोणालाही तोंड दाखवायला जागा उरणार नाही? नको उरूदे!
एकदा संन्यास घेऊन आत्मकल्याण साधायचे ठरवल्यावर, असल्या क्षुद्र गोष्टींचा विचार कशाला करायचा? त्याची काय गरज आहे? मुळीच नाही! अजिबात गरज नाही. असे झाले असते तर — मग गीता दोनच अध्यायांची झाली असती.
मुख्य म्हणजे ते तसले दोन अध्याय श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणून ओळखले गेलेच नसते. त्यांचे नांव दुसरेच काहीतरी असते.
मुख्य म्हणजे महाभारताचा पुढचा सगळा इतिहासच बदलला असता.
असे झाले नाही म्हणूनच तो इतिहास तसा घडला आणि ते विख्यात महाभारत झाले.
असे झाले नाही म्हणूनच ती **श्रीमद्‌भगवद्‌गीता** आहे आणि सर्व जगाला वंदनीय आहे.
आजही सर्व जगभर तिचे वाचन, पठण, मनन व अध्ययन केले जाते.
गीता आपल्याला सांगते की, ‘ आसक्तीचा त्याग करा! मोहाचा त्याग करा!
काम - क्रोध - लोभ - मोह - मद - मत्सर ह्यांचा त्याग करा! आणि सरतेशेवटी आपल्या अहंकाराचा त्याग करा!’
गीता आपल्याला कसे जगावे ते सांगते. कशासाठी जगावे ते सांगते. **( Art of living.)**
माणसाने आपल्या जीवनाचे व्यवस्थापन कसे करावे ते सांगते. **( Life Management.)**
जीवनात समोर येणाऱ्या अडचणींना आणि संकटांना कसे तोंड द्यावे ते सांगते. **( Self and Social Management.)**
गीता आपल्याला कसे मरावे ते सांगते. कशासाठी मरावे ते सांगते. अमृतत्व कसे मिळवावे ते सांगते. **( Art of Dying.)**
गीता हे जगण्याचे शास्त्र तर आहेच त्या शिवाय गीता हे मरण्याचेही शास्त्र आहे. **( Science of Life and Death.)**
ती आपल्याला सखोल विश्लेषण करून सांगते की, जीवन म्हणजे काय आहे? जीवनाचे महत्त्व काय आहे?
जीवनाचा अर्थ काय आहे? मानवी जीवन आणि पशु जीवन ह्यामधे काय फरक आहे? मानवी जीवन अनमोल का आहे?
मरण म्हणजे काय आहे? मरणाचे महत्त्व काय आहे? मरणाचा अर्थ काय आहे?
माणसाने कशासाठी जगायचे आणि कशासाठी मरायचे?
आजच्या गतिमान जगामधे माणसाला सर्व प्रकारच्या ताणतणावांना सतत सामोरे जावे लागते.
आपली इच्छा असो किंवा नसो. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत वेगवेगळ्या ताणतणावांचे आक्रमण सुरूच असते.
इतकेच नाही तर उद्या काय होणार ह्या चिंतेमुळे रात्री झोपही लागत नाही.
सगळे काही आहे. पैसा, गाडी, घर, दागदागिने, मालमत्ता, सगळे काही आहे. पण शांती नाही! सुख नाही! समाधान नाही!
वादविवाद आणि भांडणांना अंत नाही. पती - पत्नी, पिता - पुत्र, माय - लेक, भाऊ - बहीण, ही नातीसुद्धा मोडकळीस आलेली दिसतात. गीता ह्यामधून बाहेर यायचा मार्गही सांगते. **( Crisis Management.)**
अलीकडे व्यवस्थापनाविषयीचा एक नवीन विचार मांडला जातो आहे.
त्याला सर्व्हंट मॅनेजमेंट असे म्हणतात. **( Servant Management.)**

त्यामधे एक अत्यंत महत्वाचे विधान सांगितलेले आहे.
‘ कोणीही माणूस उत्तम नेता होण्यासाठी, अगोदर उत्तम अनुयायी असला पाहिजे.’
ह्यातल्या सर्व्हंट शब्दाचा अर्थ केवळ नोकर असा नसून, ‘ एखाद्या विशिष्ट ध्येयाला वाहून घेतलेला मनुष्य.’ असा आहे.
एकदा एखाद्या ध्येयाला वाहून घेतल्यावर, ते ध्येय गाठण्यासाठी जे जे करणे आवश्यक असेल ते ते, मानापमानाच्या सर्व संकल्पना बाजूला ठेवून, करणारा मनुष्य.
हा विचारही पाच हजार वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णाने स्वत: आचरणात आणून दाखवलेला आहे.
श्रीकृष्ण हा स्वत: राजा नव्हता. त्याला सहज शक्य असूनसुद्धा, तो कधीही राजा झाला नाही.
तो राज्य निर्माण करणारा होता. तो राजा निर्माण करणारा होता.
एकदा ‘ परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्!’ हे ध्येय ठरल्यावर त्यासाठी त्याने, मानापमानाच्या सर्व कल्पना बाजूला सारून, सर्व काही केले. तो पांडवांचा दूत झाला, मध्यस्थ झाला, सहाय्यक झाला, मार्गदर्शक झाला. इतकेच नाही तर अर्जुनाच्या मागणीप्रमाणे त्याचा सारथीही झाला. सर्वश्रेष्ठ अशा माणसाच्या नम्रपणाची ही परिसीमा झालेली आहे.
गीता हे सर्व काही आपल्याला सविस्तरपणे सांगते. उत्तम प्रकारे मार्गदर्शन करते.
म्हणून गीतेचे वाचन, गीतेचे पठण, गीतेचे मनन आणि चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे.
ते प्रत्येकाने केले पाहिजे. एक अत्त्यावश्यक गोष्ट मानून केले पाहिजे.
तसेच ते शक्य तितक्या लवकर म्हणजे वयाच्या अठरा ते वीस वर्षांपूर्वीच केले पाहिजे.
म्हणजे मग आपल्याला ह्या उत्तम गीताशास्त्राचा उपयोग पुढील जीवनामधे करता येऊ शकेल. जगामधे वावरत असताना करता येईल आणि त्याचे सर्व प्रकारचे लाभही होतील.
गीतेचा अभ्यास जर उतारवयामधे करायला सुरवात केली तर त्याचा फारसा उपयोग होत नाही. तसे करताही येत नाही.
आयुष्य संपत आलेले असते, स्मरणशक्ती मंदावलेली असते आणि शरीर व मन साथ देत नाही. असो.
गीतेमधे एकूण सातशे श्लोक आहेत. त्यापैकी धृतराष्ट्राचा एक श्लोक आहे.
संजयाचे चाळीस श्लोक आहेत. अर्जुनाचे चौऱ्याऐंशी श्लोक आहेत आणि भगवान श्रीकृष्णाचे पाचशे पंचाहत्तर श्लोक आहेत.
भगवान श्रीकृष्णाच्या श्लोकांपैकी, अठराव्या अध्यायातील सदुसष्ट ते एकाहत्तर हे पाच श्लोक फलश्रुती म्हणून सांगितलेले आहेत.
म्हणजे प्रत्यक्ष गीतेच्या उपदेशाचे असे पाचशे सत्तर श्लोक आहेत. ह्या श्लोकांमधे सगळी ब्रह्मविद्या आणि त्या अंतर्गत येणारे योगशास्त्र सामावलेले आहे. आपल्याला त्या योगशास्त्राचाच शोध घ्यायचा आहे.
गीतेमधे कोणकोणत्या योगमार्गांचे प्रतिपादन केलेले आहे ते समजण्यासाठी अगोदर गीतेच्या अठरा अध्यायांचा अर्थ, त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध आणि त्यांच्यामधली सुसंगतता समजावून घेण्याचा प्रयत्न करूया.
येथून पुढे आपण दररोज एका अध्यायची चर्चा करीत जाऊया.
अध्यायामधले श्लोक म्हणून त्यांचा अर्थ समजावून घेऊया.
तसेच त्या अध्यायाचा त्याच्या मागील व त्याच्या पुढील अध्यायाचे बरोबर काय संबंध आहे ते जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.
अस्तु!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। १८ - ७८ ।।**

हा श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या शेवटच्या म्हणजे अठराव्या अध्यायाचा, शेवटचा म्हणजे ७८ वा श्लोक आहे.
गीतेचे वाचन अथवा पठण करीत असताना, हा शेवटचा श्लोक एकापाठोपाठ तीन वेळा म्हणायची पद्धत आहे.
तसेच गीतेविषयी काहीही बोलायचे झाल्यास, व्याख्यान द्यायचे झाल्यास अथवा प्रवचन करायचे झाल्यास ह्या श्लोकाने समापन केले जाते. तशी परंपराच आहे. आपण ह्या श्लोकाचाही अर्थ समजून घेऊया.
‘ हे राजा धृतराष्ट्रा! जिकडे योगेश्वर भगवान श्रीकृष्ण व जिकडे धनुर्धर अर्जुन आहे, तिकडेच श्री, विजय, शाश्वत ऐश्वर्य आणि नीति आहे असे माझे मत आहे.’
गीतेच्या अठराव्या अध्यायातला ७३ वा श्लोक अर्जुनाचा आहे.
त्यामधे त्याने, ‘ हे श्रीकृष्णा! तुमच्या गीतारूपी प्रसादाने माझा मोह नष्ट झाला असून, तुमच्या सांगण्याप्रमाणे, मी युद्धाला तयार आहे.’ असे सांगितले आहे. त्यानंतरचे ७४ ते ७८ हे पाच श्लोक संजयाचे आहेत.
त्यामधे त्याने, गीतोपदेश ऐकून त्याला काय वाटले आणि ह्या युद्धाविषयी त्याचे अंतिम मत काय आहे ते, धृतराष्ट्राला सांगितले आहे.
युद्ध सुरू होण्यापूर्वी, व्यासमुनींनीही धृतराष्ट्राला असेच भविष्य सांगितले होते आणि युद्धाच्या शेवटी, त्यांचे ते भविष्य खरे ठरले.

हा संजय म्हणजे एक भाग्यवान मनुष्य होता. कोणतीही विशेष योग्यता नसूनही, व्यासमुनींच्या आशिर्वादाने त्याला दिव्यदृष्टी लाभली.
श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला महान उपदेश त्याने प्रत्यक्ष पाहिला आणि ऐकलाही.
श्रीकृष्णाचे मूळ स्वरूप म्हणजेच विश्वरूप प्रत्यक्ष पाहिले.
त्या भीषण महायुद्धामधे सहभागी झाला आणि युद्धाचे शेवटी जिवंतही राहिला.
तो अर्जुनाच्या इतकाच भाग्यवान होता असे म्हणावे लागेल.
किंबहुना तो अर्जुनापेक्षाही जास्त भाग्यवान होता असे म्हटले तरी चालेल.
कारण अर्जुन हा महापराक्रमी योद्धा होता. श्रीकृष्णाचा आत्तेभाऊ, मेहुणा, मित्र, सखा आणि शिष्य होता आणि श्रीकृष्णाच्या मनामधे त्याच्या विषयी अपरंपार प्रेम होते.
संजय तसा कोणीही नव्हता. श्रीकृष्णाचाही नव्हता आणि व्यासमुनींचाही नव्हता.
तो धृतराष्ट्राचा सारथी होता, एक सेवक होता. केवळ दैवयोगाने, अनपेक्षितपणे त्याला व्यासमुनींच्याकडून दिव्यदृष्टीचा लाभ झाला आणि जे अर्जुनाने ऐकले, पाहिले आणि अनुभवले तेच त्यालाही ऐकायला, पहायला आणि अनुभवायला मिळाले. असो.
असे म्हणतात की, अर्जुनाला श्रीकृष्णाने केलेला गीतोपदेश हा चार जणांनी ऐकला, पाहिला आणि अनुभवला.
ते भाग्यवान पुरुष कोण होते माहीत आहे?
पहिला **अर्जुन** , दुसरा **संजय** , तिसरे स्वत: **व्यासमुनी** आणि —
चवथा पुरुष म्हणजे अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर बसलेला कपिवर, **महाबली हनुमान मारुती.**
हा प्रदीर्घ काळ श्रीरामचंद्रांच्या बरोबर राहिला होता.
त्यांचा दासानुदास झाला होता. सदैव त्यांचेच कार्य करीत होता.
त्याच्या हृदयामधे प्रभू रामचंद्र वास्तव्य करून होते.
त्याला अष्टसिद्धी प्राप्त झालेल्याच होत्या.
असे असूनही त्याला भगवंताचे मूळ स्वरूप पहायला मिळाले नव्हते.
तो दुर्मिळ योग जुळून यायला फार मोठा काळ म्हणजे सुमारे दोन हजार वर्षे वाट पहावी लागली. असे कशावरून म्हणायचे?
तर ' रामायण काल हा महाभारत कालाच्या, कमीतकमी दोन हजार वर्षे अगोदरचा आहे.' अशी विद्वान संशोधकांची मान्यता आहे.
पण त्याच्या नशिबात तो योग होता म्हणून त्यालाही श्रीकृष्णाने दाखवलेले विश्वरूप प्रत्यक्ष पहायला मिळाले.
अस्तु!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।**

## अध्याय पहिला

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या पहिल्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

चर्चेला सुरवात करण्यापूर्वी एक महत्त्वाची गोष्ट माहिती असणे गरजेचे आहे. म्हणून मी आपणा सर्वांना ती गोष्ट सांगतो.

बऱ्याच श्रोत्यांची अशी समजूत असते की, —

' महाभारतीय युद्ध सुरू होत असताना, युद्धाच्या पहिल्याच दिवशी अगदी पहाटेच्यावेळी, सारथी संजय राजा धृतराष्ट्राच्या समोर येऊन बसला आणि राजाने प्रश्न विचारल्याबरोबर त्याला दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे समालोचन करायला लागला.'

गीतेविषयी बोलताना, अनेक वक्ते ह्या समजुतीला पूरक अशी विधाने करीत असतात.

विशेष करून संजयाला प्रश्न विचारताना धृतराष्ट्राने वापरलेल्या **' मामका: पांडवाश्चैव '** म्हणजे **माझ्या आणि पांडूच्या पुत्रांनी** ह्या शब्दांवर बरीच टीका करतात.

त्यामुळे ' महाभारतातल्या द्यूताच्या प्रसंगी, पांडवांच्या विषयी वाटणाऱ्या मत्सराने आणि त्यांना जिंकण्याच्या विकृत ईर्षेने अत्यंत उतावळा होऊन धृतराष्ट्र जसा वागत होता, **दुर्योधनाने युधिष्ठिराचे काय काय जिंकले?** ह्या विषयी सतत विचारणा करीत होता, तसाच ह्यावेळीही, त्याच वृत्तीने, संजयाला युद्धाची माहिती विचारीत होता.' अशी श्रोत्यांची समजूत होते.

परंतु ही समजूत खरी नाही. येथे धृतराष्ट्र हा चांगला होता की वाईट होता हा प्रश्न नाही.

संजयाला युद्धाविषयी प्रश्न विचारीत असताना त्याची मनस्थिती कशी होती हा प्रश्न आहे.

युद्धाला सुरवात होण्यापूर्वी महर्षी व्यासांनी धृतराष्ट्राची भेट घेतली. त्याला होऊ घातलेल्या युद्धाच्या भयानक परिणामांची कल्पना देऊन झाल्यावर ते म्हणाले की, —

' हे राजन्! तुझे पुत्र आणि इतर अनेक राजे ह्यांचा मृत्युकाल जवळ आलेला आहे. आता काळाच्या आधीन होऊन ते सगळे जेव्हा नष्ट व्हायला लागतील तेव्हा शोक करू नकोस. हे सगळे काळाचे चक्र आहे असे समज. जर तुला रणभूमीवर ह्या सर्वांची होणारी अवस्था पहायची इच्छा असेल तर मी तुला दिव्य दृष्टी देतो. माझ्या मुला! त्या दिव्य दृष्टीच्या सहाय्याने, तू आपल्या महालात बसल्या बसल्या, रणांगणावर होणारे सगळे युद्ध पहा.'

त्यावर राजा धृतराष्ट्र त्यांना म्हणाला की, —

' हे मुनिवर! मला माझ्या पुत्रपौत्रांचा आणि स्नेहीसंबंधीजनांचा वध झालेला पहायला आवडणार नाही. मी तसे करू इच्छित नाही. परंतु आपल्या सामर्थ्याच्या प्रभावाने, जर मला ह्या युद्धाचा सगळा वृत्तांत सविस्तरपणे ऐकता येणे शक्य असेल, तर आपण माझ्यावर तशी कृपा अवश्य करावी.'

त्यावेळी संजय धृतराष्ट्राच्या जवळच बसलेला होता. त्याच्याकडे पाहून व्यासांनी विचार केला आणि ते राजाला म्हणाले की,

' हे राजन! तुझ्या ह्या संजयाला मी वरदान देतो. रणभूमीत घडून येणारी प्रत्येक गोष्ट, मग ती प्रगट असो किंवा अप्रगट असो, दिवसा घडो किंवा रात्री घडो, ह्याला दिसेल. इतकेच नाही तर योध्यांच्या मनामधे वेळोवेळी येणारे बरे किंवा वाईट विचारही ह्याला लगेच समजतील. हा गल्वगणाचा पुत्र संजय ह्या भयानक युद्धामधून जिवंत राहील. ह्याला रणभूमीवर मरण येणार नाही. हा तुला युद्धाचा सगळा वृत्तांत सविस्तरपणे सांगेल. ह्या युद्धामधे अपरिमित नरसंहार होईल आणि जेथे धर्म असेल त्या पक्षाचाच विजय होईल.'

त्यानंतर व्यासांनी त्यावेळी होत असलेल्या अमंगल उत्पातांचे, तसेच विजयसूचक लक्षणांचेही वर्णन केले आणि ते निघून गेले.

पुढे धृतराष्ट्राने विचारल्यामुळे संजयाने त्याला सर्व पृथ्वीचे सविस्तर वर्णन करून सांगितले.

**येथे भीष्मपर्वाचा बारावा अध्याय समाप्त झालेला आहे.**

नंतर संजय युद्धामधे सहभागी होण्यासाठी म्हणून रणभूमीवर गेला. त्याने संपूर्ण युद्धामधे रणांगणावर योद्ध्यांच्या रथांचे सारथ्यकर्म केले. युद्धाच्या दहाव्या दिवशी सायंकाळी, पितामह भीष्मांचे रणभूमीवर पतन झाल्यानंतर संजय धृतराष्ट्राकडे गेला आणि त्याने अत्यंत दु:खित अंत:करणाने पितामह भीष्मांच्या पतनाची अमंगल वार्ता सांगितली.

ती वार्ता ऐकून धृतराष्ट्राच्या मस्तकावर जणू काही वज्राघातच झाला.

त्याने अपरंपार शोक केला. शोकाचा अतिरेक झाल्यामुळे तो दोन वेळा बेशुद्ध झाला. त्याला संजयानेच शुद्धीवर आणले.

पितामह भीष्मांचा रणांगणावर पराभव होऊ शकेल ह्याची त्याने कधी कल्पनाही केलेली नव्हती. युद्धामधे ते खरोखरच अजिंक्य होते.

वयाच्या एकशे पंचावन्नाव्या वर्षी, जराही न थकता, सतत दहा दिवस कौरवांच्या सेनापतीपदाचा भार सांभाळून, त्याशिवाय स्वत: घनघोर युद्ध करून लक्षावधी सैनिकांना रणांगणात मारणे म्हणजे गंमत नाही. असे करणे कुणा सोम्यागोम्याला जमणार नाही. ते येऱ्या - गबाळ्याचे कामच नाही. भीष्माचार्य म्हणजे तेच आणि तेच एकमेव. त्यांचा पराभव करणे कोणालाही शक्य नव्हते.
त्यामुळे भीष्म बाणांच्या शय्येवर पडले ह्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता.
परंतु वार्ता स्वत: संजयानेच दिलेली असल्यामुळे ती खरीच असेल ह्याविषयी त्याच्या मनामधे कोणताही संशय नव्हता.
म्हणून त्याने संजयाला सविस्तर माहिती विचारली. त्याने संजयाला विचारले की,
' संजया! कुरुकुलामधले सर्वश्रेष्ठ पुरुष आणि मला पित्यासमान असलेले असे महापराक्रमी भीष्म शिखंडीच्या हातून कसे मारले गेले? देवराज इंद्रासारखे महान पराक्रमी असलेले भीष्म आपल्या रथामधून धरणीवर कसे पडले?'
नंतर संजयाने त्याला माहिती सांगायला सुरवात केली.
कौरवांची सेना, पांडवांची सेना, दोनही सेनांचे व्यूह, योध्यांची वाहने आणि ध्वज, कौरवांनी भीष्मांच्या रक्षणासाठी केलेली व्यवस्था, त्यासाठी दुर्योधनाने दु:शासनाला दिलेला आदेश, दोन्ही सैन्यांचे सविस्तर वर्णन, युधिष्ठिराचा खेद आणि त्याला अर्जुनाने दिलेले उत्तर, अर्जुनाने केलेली दुर्गामातेची स्तुती, श्रीकृष्णाने भीमसेनाला आणि अर्जुनाला युद्धासाठी दिलेले प्रोत्साहन, दोन्ही बाजूंकडील सैनिकांचा उत्साह इत्यादींचे वर्णन करून झाले.
भीष्मपर्वाच्या तेराव्या अध्यायामधे संजय धृतराष्ट्राला भीष्मपतनाची माहिती देण्यासाठी भेटला.
जेथे वर उल्लेखिलेली सर्व माहिती सांगून होते, **तेथे चोविसावा अध्याय समाप्त झालेला आहे.**
ह्या माहितीच्या योगे मूळ प्रश्नाचे उत्तर मिळाले नसल्यामुळे, धृतराष्ट्राने त्याला परत प्रश्न विचारला आणि त्यानंतर श्रीमद्‌भगवद्‌गीतेला सुरवात झालेली आहे.
**पुढे पंचविसाव्या अध्यायापासून ते बेचाळीसाव्या अध्यायापर्यंत श्रीमद्‌भगवद्‌गीता आलेली आहे.**
भीष्मपर्वामधील अध्याय तेरा ते बेचाळीस हे तीस अध्याय **' श्रीमद्‌भगवद्‌गीतापर्व '** म्हणून उल्लेखिलेले आहेत.
तरीही प्रत्यक्ष भगवद्‌गीता ही अध्याय पंचवीस ते अध्याय बेचाळीस ह्या अठरा अध्यायांत आलेली आहे.
हे सांगण्यामागचा हेतू हा आहे की, धृतराष्ट्राच्या मनस्थितीची आपणाला यथायोग्य कल्पना असावी.
युद्धाला सुरवात होण्यापूर्वी त्याची मनस्थिती इतकी वाईट नव्हती.
त्याला युद्ध व्हावे असेही वाटत होते आणि होऊ नये असेही वाटत होते. कदाचित् हे युद्ध होणार नाही असेही त्याला वाटत होते. आपल्या मुलांची मने बदलणे शक्य नसले तरी, कुरुक्षेत्राच्या धार्मिक वातावरणाचा परिणाम होऊन, मुळामधे धार्मिक आणि पापभिरू असलेल्या पांडूच्या मुलांची मने बदलू शकतील आणि ते पाच बंधू युद्ध करण्याचा विचार सोडून देतील, अशी शक्यताही त्याला वाटत होती. पण त्याला अपेक्षित होते तसे झाले नाही. ठरल्याप्रमाणे युद्ध सुरू झाले.
पांडवांच्या सैन्यापेक्षा कौरवांचे सैन्य संख्येने फार मोठे असूनही, व्यासमुनींनी सांगितलेल्या भविष्यामुळे, तो स्वत: यशापयशाविषयी साशंकच होता. त्याची सर्व भिस्त प्रामुख्याने, आपल्याच प्रतिज्ञेने बांधल्या गेलेल्या, महारथी भीष्माचार्यांच्या पराक्रमावरच होती आणि त्यांच्यामुळेच तो आश्वस्थ होता. असो.
गीतेच्या पहिल्या अध्यायाचा पहिला श्लोक धृतराष्ट्राचा आहे.
त्यात त्याने संजयाला ' अत्यंत दु:खित अंत:करणाने ' प्रश्न विचारलेला आहे.
भीष्माचार्यांच्या पतनामुळे तो आपल्या पुत्रांच्या भवितव्याविषयी साशंक झालेला असून अत्यंत चिंताग्रस्त झालेला आहे.
तो म्हणतो आहे की, —

**धृतराष्ट्र उवाच :**

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सव: ।**
**मामका: पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ।। १ ।।**

संजया! कुरुक्षेत्राच्या पुण्यभूमीत एकत्र जमलेल्या माझ्या आणि पांडूच्या युद्धेच्छु पुत्रांनी काय केले?
संजयाला धृतराष्ट्राच्या मनस्थितीची पूर्ण कल्पना होती. त्याची स्वत:ची मनस्थितीही जवळपास तशीच होती.
त्याने राजाला परत माहिती सांगायला सुरवात केली. तो सांगतो आहे की, —

**संजय उवाच :**

**दृष्ट्वा तु पांडवानीकम् व्यूढन् दुर्योधनस्तदा ।**
**आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवित् ।। २ ।।**

हे राजन! त्यावेळी पांडवांचे सैन्य व्यूह रचून उभे राहिले आहे असे पाहिल्यावर राजा दुर्योधन द्रोणाचार्यांच्या जवळ जाऊन त्यांना म्हणाला की, —

यापुढील तिसऱ्या श्लोकापासून अकराव्या श्लोकापर्यंतचे नऊ श्लोक हे दुर्योधनाचे आहेत.

त्यामध्ये त्याने द्रोणाचार्यांना दोन्ही बाजूंच्या सैन्याची सर्वसाधारण माहिती दिलेली आहे. नंतरचा बारावा श्लोक संजयाचा आहे.

असे असूनही तिसऱ्या श्लोकाचेपूर्वी **' दुर्योधन उवाच -'** असे म्हटले जात नाही.

मला अजूनपर्यंत गीतेच्या कोणत्याही पुस्तकामध्ये ही ओळ वाचायला मिळालेली नाही.

**' संजय उवाच -'** असे म्हणूनच ते श्लोक म्हटले जातात.

इतकेच नाही तर गीतेच्या कोणत्याही रूपांतरामधे देखील दुर्योधनाचा उल्लेख केला गेलेला नाही.

फक्त महाराष्ट्र कवी मोरोपंतांच्या **आर्यागीते** मधे **' दुर्योधन उवाच '** असा उल्लेख करून त्यापुढील नऊ आर्या दिलेल्या आहेत.

त्यानंतरच्या बाराव्या आर्येपूर्वी परत **' संजय उवाच '** असा उल्लेख केलेला आहे.

ह्या मागील कारण काय आहे ते मला अजूनही कळलेले नाही. असो.

**पश्यैताम् पांडुपुत्राणाम् आचार्य महतिञ् चमुम् ।**
**व्यूढान् द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ।। ३ ।।**
**अत्र शूरा महेश्वासाः भीमार्जुनसमा युधि ।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ।। ४ ।।**
**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।**
**पुरुजित् कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ।। ५ ।।**
**युधामन्युश्च विक्रान्तः उत्तमौजाश्च वीर्यवान् ।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ।। ६ ।।**
**अस्माकन् तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।**
**नायका मम सैन्यस्य सञ्ज्ञार्थम् तान्ब्रवीमि ते ।। ७ ।।**
**भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ।। ८ ।।**
**अन्ये च बहवः शूराः मदर्थे त्यक्तजीविताः ।**
**नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ।। ९ ।।**
**अपर्याप्तन् तदस्माकम् बलम् भीष्माभिरक्षितम् ।**
**पर्याप्तन् त्विदमेतेषाम् बलम् भीमाभिरक्षितम् ।। १० ।।**
**अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।**
**भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ।। ११ ।।**

अहो आचार्य ! तुमचा बुद्धिमान शिष्य द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न ह्याने जिचा व्यूह रचला आहे अशी पांडुपुत्रांची ही मोठी सेना पहा. या सेनेमधे शूर, महाधनुर्धर आणि युद्धात भीमार्जुनासारखेच पराक्रमी असे, सात्यकी, विराट आणि महारथी द्रुपद, धृष्टकेतु, चेकितान, बलवान व शूरवीर काशिराज, पुरुजित्, कुंतिभोज आणि नरश्रेष्ठ शैब्य, तसाच महापराक्रमी युधामन्यु, बलवान उत्तमौजा, सुभद्रापुत्र अभिमन्यु आणि द्रौपदीचे पाच पुत्र हे सर्वच महारथी आहेत. हे ब्राह्मणश्रेष्ठा ! आता आमच्या बाजूचे जे प्रमुख नायक आहेत त्यांची नांवे आपणास माहितीसाठी सांगतो ती समजून घ्या. आपण स्वत: आणि पितामह भीष्म, तसेच कर्ण व युद्धामधे विजयी होणारा असा कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण आणि सोमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा, तसेच दुसरे पुष्कळ शूरवीर माझ्यासाठी प्राण देण्यास तयार असून ते सर्वच नाना प्रकारच्या शस्त्रांनी लढणारे व युद्धामधे प्रवीण आहेत. भीष्मांनी रक्षण केलेले आपले सैन्य फार मोठे असून त्याच्या तुलनेत, भीमाने रक्षण केलेले त्यांचे सैन्य फार लहान आहे. तरी आता आपण सर्वांनी, आपल्या सैन्यातील सर्व प्रवेशद्वारात नेमून दिल्याप्रमाणे आपापल्या जागी उभे राहून, भीष्मांचे सर्व बाजूंनी रक्षण करावे.

येथे दुर्योधनाची एकूण मनोवृत्ती समजून येते. तो द्रोणाचार्यांना अगोदर माहिती असलेल्या गोष्टीच परत सांगतो आहे. सर्वांनी सर्व बाजूंनी भीष्मांचे रक्षण करावे असे सांगतो आहे. यशाविषयी त्यालाही धास्ती होतीच. तरीही युद्धाची सर्वात जास्त खुमखुमी त्यालाच होती. त्याला युद्ध व्हायलाच हवे होते. पांडवांचा नि:पात करण्यासाठी तो कमालीचा उतावीळ झालेला होता.

जो पर्यंत भीष्माचार्य रणांगणात युद्ध करीत असतील तो पर्यंत आपला पराभव होणार नाही ह्याची त्याला खात्री होती. त्याच बरोबर त्यांना शिखंडी पासूनच धोका आहे हे ही तो जाणून होता. म्हणूनच त्याने आपल्या सेनेला भीष्मांच्या रक्षणाबरोबरच, महारथी शिखंडीचा वध करण्याचा प्रयत्न करण्याविषयी सूचना दिलेल्या होत्या. असो.

**तस्य सञ्जनयन् हर्षम् कुरुवृद्धः पितामहः ।**
**सिंहनादम् विनद्योच्चैः शङ्खन् दध्मौ प्रतापवान् ।। १२ ।।**
**ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।**
**सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ।। १३ ।।**

इतक्यात दुर्योधनाला आनंद देण्यासाठी, पितामह भीष्मांनी सिंहाप्रमाणे मोठी गर्जना करून आपला शंख फुंकला. त्याबरोबर अनेक शंख, भेरी ( नगारे ), पणव ( ढोल ), आनक ( मृदुंग ) आणि गोमुख ( कर्णे ) ही रणवाद्ये वाजण्यास एकदमच सुरवात झाली व त्यांचा तो आवाज फार भयंकर झाला.

येथे दुर्योधनाची ती विकृत, पण त्याच बरोबर ' शिखंडीपासून आपल्या रक्षणासाठी सूचना देणारी ' मनस्थिती पाहून, त्याला आनंद देण्यासाठी भीष्मांनी गर्जना करून शंख फुंकला खरा, पण तसे करताना, अशा कृतीने आपण आपल्या सैन्याला,

**' युद्ध सुरू करण्याचा आदेश देत आहोत.'** ही गोष्ट ते विसरले.

त्यांनी तसे केले नसते तर पांडवांना विलक्षण पेच पडला असता.

पांडव हे आक्रमण करीत नव्हते. ते कौरवांनी त्यांच्यावर केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करीत होते.

कौरवांच्या सैन्याकडून आक्रमण केले गेल्यावाचून त्याचा प्रतिकार कसा करणार?

खरे म्हणजे भीष्माचार्यांनी युद्ध सुरू करण्याचा आदेश देण्याच्या हेतूने शंख फुंकलेलाच नव्हता.

परंतु कौरवसेनेलाही, **' आपल्या सेनापतीने युद्धाचा आदेश दिला आहे '** असे वाटले आणि सर्वांनी एकदम रणवाद्ये वाजवायला सुरवात केली. तसे होणे हे केवळ प्रतिकात्मक होते. त्यामुळे पांडवांचा मार्ग आपोआप मोकळा झाला.

तसेच पुढे जेव्हा प्रत्यक्ष युद्धाला सुरवात झाली तेव्हा, —

**' प्रथम पांडवसेनेने आक्रमण केले आणि ते कौरव सेनेवर तुटून पडले. नंतर कौरव सेनेने प्रतिकार करायला सुरवात केली आणि भीषण असे महायुद्ध सुरू झाले.'** भीष्मपर्व अध्याय ४४ मधे तसे स्पष्टपणे सांगितलेले आहे.

तरीही महाभारतीय इतिहासामधे मात्र, **' त्या अभूतपूर्व अशा युद्धाला आणि महाघोर अशा नरसंहाराला कौरवांनी सुरवात केली!'** अशीच नोंद झालेली आहे. असो.

**ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।**
**माधवः पांडवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ।। १४ ।।**
**पांचजन्यम् हृषीकेशः देवदत्तन् धनंजयः ।**
**पौंड्रन् दध्मौ महाशङ्खम् भीमकर्मा वृकोदरः ।। १५ ।।**
**अनंतविजयम् राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।**
**नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ।। १६ ।।**
**काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।**
**धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ।। १७ ।।**
**द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।**
**सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान् दध्मुः पृथक् पृथक् ।। १८ ।।**
**स घोषो धार्तराष्ट्राणाम् हृदयानि व्यदारयत् ।**
**नभश्च पृथिवीञ्च चैव तुमुलो व्यनुनादयन् ।। १९ ।।**

त्यानंतर पांढऱ्याशुभ्र घोड्यांनी युक्त अशा उत्तम रथात बसलेले श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्यांनी सुद्धा दिव्य शंख फुंकले. श्रीकृष्णानी पांचजन्य नांवाचा शंख, अर्जुनाने देवदत्त नांवाचा शंख आणि भयंकर कर्मे करणाऱ्या भीमसेनाने पौंड्र नांवाचा महाशंख फुंकला. कुंतीपुत्र युधिष्ठिर राजाने अनंतविजय नांवाचा, नकुलाने सुघोष नांवाचा आणि सहदेवाने मणिपुष्पक नांवाचा शंख फुंकला. तसेच महाधनुर्धर काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट व अजिंक्य असा सात्यकी, द्रुपद राजा, द्रौपदीचे पाच पुत्र आणि महाबाहु अभिमन्यु या सर्वांनी सर्वबाजूंनी आपापले वेगवेगळे शंख फुंकले. आकाश व पृथ्वी दणाणून सोडणाऱ्या त्या भयंकर आवाजाने कौरवांची हृदये

विदीर्ण केली.

पांडव ह्याचीच वाट पहात होते. कौरव सेनापतीने युद्ध सुरू करण्याचा आदेश (? ) म्हणून शंख फुंकल्यावर, त्यांचे ते आव्हान स्वीकारीत असल्याचे दर्शवीत पांडवांच्या बाजूने शंखनाद केला तो **<u>श्रीकृष्णाने.</u>** सेनापती धृष्टद्युम्नाने केला नाही.

आता जे काही करायचे असेल ते श्रीकृष्णच करील अशी सर्व पांडवांची खात्री होती.

सर्व पांडवसेनेची तशी श्रद्धाच होती. सर्वप्रथम श्रीकृष्णाने ते आव्हान शांतपणे आणि निर्भयपणे स्वीकारले आणि नंतर इतर पांडववीरांनी त्याचे अनुकरण केले. पांडवसेनेच्या त्या तुमुल अशा शंखनादाने कौरवांची ह्रदये विदीर्ण झाली.

कौरवसेनेनेही तुमुल असा शंखनाद आणि वाद्यघोष केलेला होता.

परंतु त्यामुळे पांडवांची ह्रदये विदीर्ण झाली नाहीत. कारण ते अन्याय करीत नव्हते तर अन्यायाचा प्रतिकार करीत होते. पापी माणसांचे, अन्याय करणाऱ्यांचे, गुन्हेगारांचे असेच होते. जे **<u>धृतराष्ट्र</u>** असतात, म्हणजे <u>‘ दुसऱ्यांचे राज्य बळकावणारे, त्यांच्यावर अन्याय करणारे.’</u> असे असतात, त्यांच्या छातीत धडकी भरतेच.

**<u>अगोदर स्वार्थापोटी पाप केल्यामुळे भीती वाटते. भीती वाटत असल्यामुळेच परत पाप केले जाते आणि केलेल्या पापामुळेच परत परत भीती वाटते.</u>**

भीती आणि पापांची ही मालिका चालूच राहते. ती कधीही थांबत नाही. थांबवता येत नाही.

पण जे **<u>हृतराष्ट्र</u>** असतात, **<u>हृतराष्ट्र</u>** असतात, म्हणजे <u>‘ ज्यांचे राज्य बळकावले गेलेले असते, ज्यांच्यावर अन्याय झालेला असतो.’</u> त्यांचे मात्र तसे नसते. त्यांनी पाप केलेले नसते म्हणून त्यांना कधीही, कशाचीही भीती वाटत नसते.

**<u>जे कधीही पाप करीत नाहीत, त्यांना कोणाचीही भीती वाटत नाही. तसेच त्यांना कोणाचीही भीती वाटत नसल्यामुळे, ते कधीही पाप करीत नाहीत.</u>**

निष्पाप असल्यामुळेच ते निर्भय असतात. असो.

**अथ व्यवस्थितान् दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः ।**

**प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पांडवः ।। २० ।।**

**हृषीकेशन् तदा वाक्यम् इदमाह महीपते ।**

**अर्जुन उवाचः**

**सेनयोरुभयोर्मध्ये रथम् स्थापय मेऽच्युत ।। २१ ।।**

**यावदेतान् निरिक्षेऽहम् योद्धुकामानवस्थितान् ।**

**कैर्मया सह योद्धव्यम् अस्मिन् रणसमुद्यमे ।। २२ ।।**

**योत्स्यमानानवेक्षेऽहम् य एतेऽत्र समागताः ।**

**धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः ।। २३ ।।**

नंतर योग्य व्यवस्थेने उभे असलेल्या कौरवांना पाहून, एकमेकांवर शस्त्रप्रहार करण्याची वेळ आलेली असताना, ज्याच्या रथाच्या ध्वजावर मारुती आहे असा पांडव म्हणजे अर्जुन आपले धनुष्य उचलून, श्रीकृष्णाला असे म्हणाला की —

हे अच्युता! जरा माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मधे नेऊन उभा कर. म्हणजे तेवढ्या वेळात ह्या रणसंग्रामात मला कोणाकोणाबरोबर लढायचे आहे आणि त्या दुर्बुद्धि दुर्योधनाचे युद्धात कल्याण करण्याच्या इच्छेने येथे कोणकोण योद्धे जमले आहेत ते मी पाहून घेतो.

अर्जुन हा त्याच्या काळातला **<u>‘ वीरशिरोमणी!’</u>** होता.

त्याला सर्वश्रेष्ठ योद्धा म्हणून मान्यता होती. त्यासाठी तशीच कारणेही होती.

त्याच्या बरोबरीचेच नाहीत तर त्याच्यापेक्षा काकणभर सरस असे अनेक महारथी त्याकाळी अस्तित्वात होते. ही गोष्ट स्वतः श्रीकृष्णानेही मान्य केलेली आहे. परंतु त्याची विशेषता ही होती की तो सर्वच बाबतीत आदर्श व्यक्ती होता.

तो आदर्श विद्यार्थी होता. तो आदर्श शिष्य होता. तो आदर्श अनुयायी होता. तो आदर्श सहकारी होता. तो आदर्श शासक होता. तो आदर्श रक्षक होता. तो ज्ञानवान होता. तो धैर्यवान होता. तो बुद्धिमान होता. तो नीतिमान होता. तो दैवीसंपदेने संपन्न होता. तो सात्त्विक वृत्तीचा होता. तो अत्यंत प्रामाणिक होता. तो निष्पाप होता. तो पापभीरू होता.

प्रत्यक्ष पाप करणे तर सोडूनच द्या, तसा विचार करणेही त्याला मान्य नव्हते.

तो आपल्या सामर्थ्याचा वापर नेहमी सत्कार्यासाठीच करीत असे.

तो ‘ **नरोत्तम** ’ म्हणजे <u>‘ पुरुषांमधला उत्तम पुरुष ’</u> होता. त्याला कोणाचीही आणि कशाचीही भीती वाटणे अशक्य होते.

महाभारतीय युद्ध लढण्याचे अगोदर तो अनेक युद्धे लढलेला होता. अनेक नावाजलेल्या महारथ्यांना त्याने पराभूत केले होते.
आपल्या युद्धकौशल्याच्या जोरावर त्याने त्याकाळच्या अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ योद्ध्यांना प्रसन्न केलेले होते आणि त्यांच्याकडून अनेक वरदाने मिळवलेली होती. अनेक शस्त्रास्त्रांचे संपूर्ण ज्ञान मिळवले होते.
कोणत्याही प्रसंगामधे प्रत्यक्ष कृती करण्याचे अगोदर, तो न्याय - अन्याय, नीती - अनीती, सत्य - असत्य, योग्य - अयोग्य, पाप - पुण्य ह्या सर्व गोष्टींचा सखोल विचार करीत असे. तो उदार होता. तसाच तो क्षमाशीलही होता.
परंतु कौरवांनी पांडवांच्यावर पराकोटीचे अन्याय केलेले होते, अत्याचार केलेले होते. त्यांचा पराकोटीचा द्वेष केलेला होता.
ज्याला आततायीपणा म्हणता येईल अशी सर्व कृत्ये करून, त्यांचा सर्वनाश करायचे प्रयत्न सतत केलेले होते.
**‘ आततायी कोणाला म्हणतात? ’** ह्या प्रश्नाचे उत्तर मनुस्मृतीत दिलेले आहे.
‘ घर जाळण्यास आलेला, विष खायला घालणारा, हातात शस्त्र घेऊन मारण्यास आलेला, आपले धन लुटून नेणारा, आपल्या पत्नीला पळवून नेणारा आणि आपल्या भूमीचे हरण करणारा असे सहा आततायी होत. ह्यांना लवकरात लवकर ठार मारावे. तसे करण्यात कोणतेही पाप नाही.’ — **मनुस्मृती.**
त्यामुळे न्याय मिळवण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर, युद्धाचा अंतिम आणि एकमेव मार्ग शिल्लक राहिला. त्यामार्गाने जायचे सर्वानुमते ठरले. त्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करून झाल्यावर, युद्धाच्या दिवशी सुसज्ज सैन्यासह पांडव रणांगणावर आलेले होते. प्रत्येक नामांकित योद्धाच नाही तर प्रत्येक सामान्य सैनिकही अटीतटीच्या युद्धासाठी तयार झालेला होता.
अर्जुन तर युद्धाचा दृढनिश्चय करून रणांगणात उतरला होता. तो क्षात्रतेजाने पूर्णपणे भारलेला होता. आपल्या शत्रूचा विनाश करायला अत्यंत आतूर झालेला होता. मागील सर्व अपमानांचा प्रतिशोध घ्यायच्या तीव्र इच्छेमधे बुडालेला होता.
युद्ध न करण्याचा अथवा युद्ध टाळण्याचा, कोणताही विचार त्याच्या मनामधे नव्हता.
अशा मनस्थितीमधे असताना, शंखनाद करून झालेले असताना, अर्जुन आपले धनुष्य हातात घेऊन उभा राहिला आणि त्याने श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्यांच्यामधे नेऊन उभा करायची सूचना केली. त्या मागचे कारणही सांगितले.
ते कारण श्रीकृष्णालाही पटल्यामुळे,

**संजय उवाच :**
**एवमुक्तो हृषीकेशः गुडाकेशेन भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ।। २४ ।।**
**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषाञ् च महीक्षिताम् ।**
**उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान् कुरूनिति ।। २५ ।।**

हे राजा धृतराष्ट्रा ! आळसाला जिंकणाऱ्या अर्जुनाने याप्रमाणे सांगितल्यावर, इंद्रियांचा स्वामी असलेल्या श्रीकृष्णाने तो उत्तम रथ, दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा केला व भीष्मद्रोणांच्या व इतर सर्व राजांच्या समोर **‘ अर्जुना, येथे जमलेले हे कौरव पहा !’** असे म्हणाला. श्रीकृष्णाने असे सांगताच अर्जुनाने सर्व सेनेचे निरीक्षण करायला सुरवात केली.
तो कौरवांच्या आणि स्वतःच्या म्हणजे पांडवांच्याही सेनेचे निरीक्षण करायला लागला.

**तत्रापश्यत् स्थितान् पार्थः पितृनथ पितामहान् ।**
**आचार्यान् मातुलान् भ्रातृन् पुत्रान् पौत्रान् सखिन् तथा ।। २६ ।।**
**श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।**
**तान् समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान् बंधूनवस्थितान् ।। २७ ।।**
**कृपया परयाऽऽविष्टः विषीदन्निदमब्रवीत् ।**
**अर्जुन उवाच :**
**दृष्ट्वेमम् स्वजनङ् कृष्ण युयुत्सुम् समुपस्थितम् ।। २८ ।।**

त्यानंतर अर्जुनाच्या असे लक्षांत आले की, तेथे जमलेले सर्व आपलेच वडील, आजे, आचार्य, मामे, भाऊ, पुत्र, नातू, मित्र, सासरे व स्नेही दोन्ही सैन्यात आहेत. त्या सर्व बांधवांना पाहिल्यावर, कुंतीपुत्र अर्जुन आत्यंतिक करुणेने व्याकुळ होऊन, खिन्न होऊन श्रीकृष्णाला असे बोलला की, ‘ हे कृष्णा ! युद्धाच्या इच्छेने येथे जमलेल्या ह्या स्वजनांस पाहून, —
आपल्याला कोणाकोणाबरोबर युद्ध करायचे आहे हे अर्जुनाला त्या क्षणापर्यंत माहीतच नव्हते अशातला भाग नव्हता.
कौरवांच्या सर्व अतिरथी - महारथींना तो चांगलाच ओळखत होता.
इतकेच नाही तर प्रसंग पडल्यावर त्याने सर्वांशी दोन हात केलेले होते.

तसेच हे युद्ध भयानक असणार आहे आणि युद्धाच्या अखेरीस येथे रणांगणावर जमलेल्या योद्ध्यांच्यापैकी कोण जिवंत राहील ते सांगता येणार नाही. कोणी जिवंत राहील की नाही ते ही सांगता येणार नाही. आणि —

ह्या अद्वितीय अशा महायुद्धामधे जय कोणाचा होईल ते ही सांगता येणार नाही. ह्या सर्व गोष्टींची त्याला पूर्ण कल्पना होती.

भविष्यात घडण्याची शक्यता असलेल्या ह्या युद्धाला तोंड देण्याच्या हेतूने, सर्व विख्यात महारथ्यांचा पराभव करण्याचे सामर्थ्य मिळविण्याच्या हेतूने, वनवासाचे पहिले वर्ष संपल्यावर लगेचच, त्याने युधिष्ठिराच्या सांगण्यावरून नवनवीन शस्त्रास्त्रे प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. पुढील सहा ते सात वर्षांच्या कालावधीत त्याने भगवान शंकरांच्याकडून पाशुपतास्त्र मिळविले. तसेच इंद्रलोकी जाऊन आणि तेथे पाच वर्षे राहून त्याने आपल्या पित्याकडून म्हणजे देवराज इंद्राकडून अनेक अस्त्रे मिळविली. धनुर्विद्येचा सराव तर तो नेहमीच करीत होता.

अज्ञातवास संपल्यानंतर, विराटराजाच्या राजसभेमधे, श्रीकृष्णाने पांडवांची बाजू घेऊन पहिले प्रगट भाषण केले. तेव्हापासून युद्धाच्या दिवसापर्यंत घडलेल्या सर्व घटना, ते युद्ध टाळण्याच्या दिशेने झालेले सर्व प्रयत्न अर्जुनाला माहीत होते. इतकेच नाही तर त्यामधे त्याचा सहभागही होता. म्हणजे, त्याला युद्धाच्याविषयी सर्व काही माहीत होते.

त्याने कौरव पक्षामधील अनेक योद्ध्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे धमक्याही दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने काही प्रतिज्ञाही केल्या होत्या. युद्ध करण्याविषयी त्याच्या मनामधे कोणतीही शंका नव्हती.

आपल्या शत्रूंच्या बरोबर युद्ध करून, त्यांचा सर्वनाश करून, आपले बळकावलेले राज्य परत मिळवायचा दृढनिश्चय झालेला होता. असे असूनही रणांगणावर उभे राहून दोन्ही बाजूंच्या योध्यांना समोर प्रत्यक्षपणे पाहताना त्याच्या मनाची घालमेल व्हायला लागली. त्याचे सर्व शत्रू त्याला अचानकपणे ' **स्वकीय!**' वाटायला लागले. ' **आपले!**' वाटायला लागले. ' **स्वजन!**' वाटायला लागले. त्यांच्या बरोबर असलेले ' **नातेसंबंध!**' तीव्रतेने आठवायला लागले.

' **आपण त्यांच्या आधाराने, मार्गदर्शनाने, सदिच्छेने आणि मदतीनेच आजवरची वाटचाल केलेली आहे.**' असेही आठवायला लागले. अगदी दुर्योधन, दु:शासन आणि शकुनी हे देखील —

' **राज्यलालसेने बुद्धी भ्रष्ट झालेले, आततायी स्वभावाचे बंधुबांधव!**' वाटायला लागले. त्यांना विरोध न करणारे, गप्प बसून सहकार्य करणारे, ज्येष्ठ व श्रेष्ठ लोक देखील ' **कौरवांचे मिंधे असलेले आपलेच लोक!**' वाटायला लागले.

' **त्यांच्या बरोबर युद्ध करून त्या सर्वांना ठार मारणे योग्य नाही. ते पाप आहे.**' असे वाटायला लागले.

एकदा त्याचे मन भरकटायला सुरवात झाल्यावर, त्याच्या शरीरावरही प्रतिकूल असे परिणाम व्हायला लागले.

तो करुणेने अत्यंत व्याकूळ झाला. खिन्न झाला. त्याला अपरंपार दु:ख झाले. त्या दु:खाच्या आवेगामधे तो बोलायला लागला.

**सीदन्ति मम गात्राणि मुखञ् च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।। २९ ।।**
**गाण्डीवम् स्रंसते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते ।**
**न च शक्नोम्यवस्थातुम् भ्रमतीव च मे मन: ।। ३० ।।**

माझी गात्रें शिथिल पडू लागली आहेत आणि तोंडालाही कोरड पडू लागली आहे. तसेच शरीराला कंप सुटला असून सर्वांगावर रोमांच उभे राहिले आहेत. हातातून गांडीव गळून पडते आहे आणि त्वचेचाही दाह होत आहे. तसेच माझे मन भ्रमित झाले असून, भरकटले असून, मला उभे सुद्धा राहवत नाही.

त्याक्षणी त्याला जे काही होते आहे ते तो स्पष्टपणे सांगतो आहे. सत्य तेच सांगतो आहे.

कोणतेही ढोंग करीत नाही. नाटक करीत नाही. हे महत्त्वाचे आहे.

त्याचे सर्व शरीर गलितगात्र झाले असल्याचे सांगतो आहे. सर्वांगाला कापरे भरलेले आहे आणि तोंड कोरडे पडले आहे असे सांगतो आहे. त्याच्या अंगातली शक्ती नाहीशी झाल्याचे सांगतो आहे. त्याच्या हातामधले धनुष्य धरून ठेवण्याइतकी शक्तीही राहिलेली नाही. असे होणे त्याला स्वत:लाही अनपेक्षित आहे. पण तसे झालेले आहे ही गोष्ट खरी.

आपल्या शारिरीक अवस्थेचे वर्णन करून झाल्यावर तो आपल्या विपरीत अशा मानसिक अवस्थेविषयी सांगायला लागला आहे. तो काय सांगतो आहे ते नीट ऐका.

**निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।**
**न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ।। ३१ ।।**
**न काङ्क्षे विजयङ् कृष्ण न च राज्यम् सुखानि च ।**
**किम् नो राज्येन गोविंद किम् भोगैर्जीवितेन वा ।। ३२ ।।**

**येषामर्थे काङ्क्षितम् नः राज्यम् भोगाः सुखानि च ।**
**त इमेऽवस्थिता युद्धे प्राणान् त्यक्त्वा धनानि च ।। ३३ ।।**
**आचार्याः पितरः पुत्राः तथैव च पितामहाः ।**
**मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा ।। ३४ ।।**
**एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।**
**अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किम् नु महीकृते ।। ३५ ।।**
**निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्यात् जनार्दन ।**
**पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिनः ।। ३६ ।।**
**तस्मान्नार्हा वयम् हन्तुम् धार्तराष्ट्रान् स्वबान्धवान् ।**
**स्वजनम् हि कथम् हत्वा सुखिनः स्याम माधव ।। ३७ ।।**

हे केशवा ! ही सगळी लक्षणे मला विपरीत दिसतात आणि स्वजनांना युद्धात मारून कल्याण होईल असे दिसत नाही. हे कृष्णा ! मला विजयाची इच्छा नाही तसेच राज्याची व सुखाचीही इच्छा नाही. हे गोविंदा ! राज्य घेऊन काय करायचे? तसेच उपभोग तरी कशाला पाहिजेत? आणि जगून तरी काय करायचे? आम्ही ज्यांच्यासाठी राज्याची, उपभोगांची आणि सुखाची इच्छा करायची, तेच हे जिवाची व धनाची आशा सोडून युद्धाला उभे आहेत. आचार्य, वडील, मुलगे तसेच आजे, मामे, सासरे, नातू , मेहुणे आणि इतरही अनेक संबंधी, हे आम्हास मारण्यास उठले आहेत. असे असले तरीही आणि ह्या सर्वांना मारून त्रैलोक्याचे राज्य मिळणार असले तरीही, हे मधुसूदना ! मी त्यांना मारू इच्छित नाही मग पृथ्वीवरील राज्याची काय कथा? हे जनार्दना ! या कौरवांना मारून आमचे काय भले होणार? हे जरी आततायी असले तरी त्यांना मारल्याने आम्ही पापाचेच भागी होणार. म्हणून आपलेच बांधव असलेल्या कौरवांना आम्हीच मारणे योग्य नव्हे. कारण हे माधवा ! स्वजनांस मारून आम्ही सुखी कसे होणार?

ज्या कारणासाठी तो युद्ध करायला आला होता ती सर्व कारणे बाजूला पडली आणि भलत्याच विचारांनी त्याच्या मनाचा ताबा घेतला. वर वर पाहता, ते विचार चुकीचे नव्हते. सर्वसाधारण मानवी स्वभावाला अनुरूप असेच होते. कोणीही झाला तरीही, कितीही धाडसी असला तरीही, कितीही दृढ निश्चय केलेला असला तरीही, जेव्हा प्रत्यक्ष प्रसंगाला सामोरे जायची वेळ येते, प्रत्यक्ष कृती करायची वेळ येते, तेव्हाच त्यातले गांभीर्य आणि त्याचे परिणाम तीव्रतेने जाणवायला लागतात.

कोणत्याही प्रसंगाच्या आणि घटनेच्या प्रत्यक्ष दर्शनाचा एक वेगळाच परिणाम असतो आणि तो प्रत्येक माणसावर होतो.

‘ आपल्या दोन्ही बाजूंना आपल्याच नातेवाईकांचा, सग्यासोयऱ्यांचा आणि अनेक हितचिंतकांचा प्रचंड मोठा समुदाय उभा आहे. आजोबा - वडील - मुले - नातवंडे - पंतवंडे अशा आप्तसंबंधियांच्या चार पिढ्या मरण्या - मारण्याचा अंतिम निश्चय करून समोरासमोर उभ्या राहिल्या आहेत. वयाने सर्वात मोठे असलेले भीष्माचार्य हे, वयाने सर्वात लहान असलेल्या अभिमन्यूचे पणजोबा आहेत. अभिमन्यू हा त्यांचा पणतू आहे. ते दोघेही एकमेकांना ठार मारण्यासाठीच निकराचा प्रयत्न करणार आहेत.

ह्या युद्धाने सर्वांचे अस्तित्वच पुसून टाकले जाणार आहे.’

हे प्रत्यक्ष दिसल्यावर अर्जुनाच्या मनामधे प्रचंड कालवाकालव झाली. त्याला फार वाईट वाटले. तो अत्यंत दु:खित झाला.

त्यापूर्वी त्याने अनेक युद्धांमधे असंख्य योद्ध्यांचा संहार केला होता. त्यावेळी त्याला जराही दु:ख झाले नव्हते.

कारण त्या त्या वेळी त्याने ज्यांना मारले ते सगळे ‘ **जन** ’ होते पण ‘ **स्वजन** ’ नव्हते.

ह्यावेळीही जर त्याच्या समोर आप्तेष्ट नसते, त्याचे ‘ **स्वजन** ’ नसते तर,

त्याने जराही शोक न करता, स्व - धर्म आणि स्व - कर्तव्य म्हणून, शत्रूंच्या मुंडक्यांची रास रचली असती.

एकदा का हा ‘ **स्व** म्हणजे **स्वतः** म्हणजेच **मी** ’ आला की सगळे संदर्भ बदलायला लागतात.

**‘ मी - मला - माझे - माझ्यामुळे - माझ्यासाठी - माझ्याशिवाय ’** ही सगळी ह्या ‘ **स्व** ’ चीच वेगवेगळी रूपे आहेत.

जरा ‘ अर्जुनाच्या जागी आपण स्वत: उभे आहोत आणि **आपल्याच** नातेवाईकांना ठार मारण्याच्या हेतूने त्यांच्याकडे पाहतो आहोत ’, अशी कल्पना करा! आणि मग आपल्याला काय वाटेल ह्याचा विचार करा!

तसा विचार केलात तर आपणालाही हे सगळे स्पष्टपणे जाणवायला लागेल.

मनाची घालमेल व्हायला लागेल आणि आपलाही अर्जुनच होईल.

अहो ऽऽ! भीमसेन लाखामधे एखादाच असतो. त्याला असले मोह झाले नाहीत. त्याच्या हातातली गदा गळून पडली नाही, त्याला कापरे भरले नाही आणि त्याच्या तोंडाला कोरडही पडली नाही. त्याचा कोणत्याही प्रकारचा वैचारीक गोंधळ उडाला नाही.

**श्रीकृष्णावर, त्याला उपदेश करायची वेळ कधीही आली नाही.**

आपल्या व आपल्या प्रिय पत्नीच्या सर्व अपमानांचा सूड उगवण्यासाठी शत्रूचा नाश करणेच योग्य आहे आणि आवश्यकही आहे ह्याची त्याला पूर्ण कल्पना होती. तसे करीत असताना शत्रूचे वय, नातेसंबंध, प्रेमभावना, ममत्व, उपकार, मैत्री इत्यादी कोणतीही भावना त्याच्या निश्चयाच्या आड कधीही आली नाही.
त्याची गोष्टच निराळी होती. तो असामान्य मनुष्य होता. तसा मनुष्य दुर्मिळ असतो. खरोखरच लाखामधे एखादाच असतो. जगामधे सर्वसाधारणपणे सगळे अर्जुनच असतात. असो.
ही अर्जुनाची अहिंसावृत्ती नव्हती तर स्वजनांच्या विषयीचा मोह होता. स्वजनांच्याविषयीची सुप्त आसक्ती होती.
त्यामुळेच त्याला आपल्या कर्तव्याचा विसर पडला. स्वधर्मपालनावरली निष्ठा मोहाने ग्रासली गेली. पार झाकोळून गेली.
कर्तव्याच्या भावनेची जागा करुणेने बळकावली आणि त्यामुळे विवेक नाहीसा झाला. विवेक वनवासी झाला. त्याच्या विवेकाचे अस्तित्वच संकटात आले. स्वजनांच्या होऊ घातलेल्या, अटळ अशा, विनाशाच्या कल्पनेने त्याच्या आसक्तीवर आघात झाला.
आसक्तीला विरोध न होता, अडथळे न येता, जर तिची पूर्तता झाली तर ' **हर्ष** ' होतो. आनंद होतो. ही सहज प्रक्रिया आहे.
परंतु जर आसक्तीला विरोध झाला, अडथळे निर्माण झाले आणि तिची पूर्तता झाली नाही तर ' **शोक** ' होतो. दु:ख होते.
ही देखील सहज प्रक्रियाच आहे.
स्वधर्माचे, स्वकर्माचे आणि स्वभावाचे पालन करण्यासाठी रणभूमीवर आलेल्या अर्जुनाच्या मनामधे, स्वजनांना प्रत्यक्ष समोर बघून ऐनवेळी आणि अत्यंत चुकीच्या वेळी, आसक्तीचा उद्रेक झाला. त्या आसक्तीची पूर्तता होणे अशक्य आहे हे माहीत असल्यामुळे, तिची सहज प्रक्रिया म्हणूनच, पराकाष्ठेचा शोक झाला. विषाद झाला. खेद झाला. तो दु:खाने व्याकूळ झाला.
असे असले तरीही अशा प्रकारची कर्तव्यच्युती, एक महारथी म्हणून, अर्जुनाला स्वत:लाच सहन होत नव्हती.
म्हणूनच आपल्या त्या वर्तनाचे समर्थन करण्यासाठी, तो आपल्या विचारांचे समर्थन करायला लागला.
त्याचे विचारच कसे योग्य आहेत ते सांगायला लागला.
युद्धामुळे घडून येणाऱ्या पापांची आणि त्यांच्या योगे होणाऱ्या एकूण परिणामांची यादी सांगायला लागला.
प्रत्यक्ष श्रीकृष्णालाच समजावायचा प्रयत्न करायना लागला. त्यालाच तत्वज्ञान सांगायला लागला. तो काय सांगतो आहे ते ऐका.

**यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।**
**कुलक्षयकृतन् दोषम् मित्रद्रोहे च पातकम् ।। ३८ ।।**
**कथम् न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।**
**कुलक्षयकृतन् दोषम् प्रपश्यद्भिर्जनार्दन ।। ३९ ।।**
**कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।**
**धर्मे नष्टे कुलङ् कृत्स्नम् अधर्मोऽभिभवत्युत ।। ४० ।।**
**अधर्माभिभवात् कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः ।। ४१ ।।**
**सङ्करो नरकायैव कुलघ्नानाङ् कुलस्य च ।**
**पतन्ति पितरो ह्येषाम् लुप्तपिण्डोदकक्रियाः ।। ४२ ।।**
**दोषैरेतैः कुलघ्नानाम् वर्णसङ्करकारकैः ।**
**उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ।। ४३ ।।**
**उत्सन्नकुलधर्माणाम् मनुष्याणाञ् जनार्दन ।**
**नरके नियतम् वासः भवतीत्यनुशुश्रुम ।। ४४ ।।**

जरी लोभामुळे बुद्धि भ्रष्ट झालेले हे लोक कुलक्षयामुळे होणारा दोष आणि मित्रद्रोहाचे पातक पाहत नाहीत. तरी हे जनार्दना ! कुलक्षयाचा दोष आम्हाला दिसत असता, आम्ही ह्या पापापासून दूर होण्याचा विचार का बरे करू नये?
कुलाचा नाश झाला असता सनातन कुलधर्म नष्ट होतात आणि कुलधर्म नष्ट झाला म्हणजे सर्व कुलावर अधर्माचाच पगडा बसतो.
हे कृष्णा ! अधर्म प्रबल झाला असता कुलस्त्रिया बिघडतात आणि स्त्रिया बिघडल्या म्हणजे हे वार्ष्णेया ! वर्णसंकर होतो.
वर्णसंकर झाला म्हणजे तो कुलघातक आणि कुलाला नरकाला नेण्यास कारण होतो. पिंडदान तर्पणादि क्रिया लुप्त झाल्यामुळे त्यांचे पितरही पतन पावतात. कुलघातक्यांच्या ह्या वर्णसंकरकारक दोषांनी सनातन कुलधर्म आणि जातिधर्म नष्ट होतात आणि ज्यांचे कुलधर्म नष्ट झाले त्या मनुष्यांना, हे जनार्दना ! अनंत काळापर्यंत नरकवास भोगावा लागतो असे आम्ही ऐकले आहे.

त्याचे समर्थन चुकीचे नव्हते. कोणत्याही युद्धाचे अंतिम परिणाम हेच आणि असेच होतात. परंतु ते त्याचे स्वत:चे विचार नव्हते. मूलतः तो युद्ध करण्याच्या वृत्तीचाच होता. युद्ध करणे हे त्याचे स्वभाव प्राप्त आणि अपरिहार्य असे कर्तव्यच होते.

ते कर्तव्य तो मोहाने टाळू पहात होता आणि त्यासाठीच तो आपल्या कृतीला एखाद्या सद्‌विचाराच्या आवरणाखाली झाकायचा प्रयत्न करीत होता.

**अहो बत महत् पापम् कर्तुम् व्यवसिता वयम् ।**
**यद् राज्यसुखलोभेन हन्तुम् स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥**
**यदि मामप्रतिकारम् अशस्त्रम् शस्त्रपाणयः ।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन् मे क्षेमतरम् भवेत् ॥ ४६ ॥**
**संजय उवाच :**
**एवमुक्त्वार्जुनः सङ्‌ख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
**विसृज्य सशरञ् चापम् शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥**

अहो किती खेदाची गोष्ट आहे पहा ! राज्यसुखलोभामुळे स्वजनांना मारण्यास उठलो हे आम्ही खरोखरच एक मोठे पाप करण्यास तयार झालो आहोत. ह्यापेक्षा निशस्त्र होऊन प्रतिकार करायचे सोडून दिले असता, हे शस्त्रधारी कौरव मला रणांगणात ठार मारतील तर त्यात माझे अधिक कल्याण होईल.

संजय राजा धृतराष्ट्राला म्हणाला की, ' ह्याप्रमाणे भाषण करून, शोकाकुल झालेला अर्जुन, हातचे धनुष्यबाण टाकून देऊन रथांत आपल्या जागी उगा बसला.'

असले महापाप करून स्वत:सह सर्व कुळाला नरकात फरफटत घेऊन जाण्यापेक्षा, शस्त्रत्याग करून कौरवांच्या हातून मरण पत्करणे अधिक चांगले होईल असे त्या महापराक्रमी महारथ्याला वाटले. त्याप्रमाणे त्याने शस्त्रत्याग केला आणि रडत रडत आपल्या जागी बसला. ह्यावरूनच त्याला कसे पराकाष्ठेचे दु:ख झाले होते ते समजून येते.

आपल्या अत्यंत प्रिय, आदरणीय, वंदनीय अशा आजोबांना, गुरूंना आणि आप्तांना, कोणत्याही कारणासाठी असेना, शस्त्राघात करून ठार मारणे सोपे नाही. फार फार कठीण आहे. हे केवळ अर्जुनाच्या बाबतीतच घडलेले नाही.

जगाच्या इतिहासामधे अशा प्रकारची अनेक उदाहरणे घडलेली आहेत. तसेच त्यावेळी श्रीकृष्णासारखा एखादा यथायोग्य मार्गदर्शक न मिळाल्यामुळे, अनेक सुविख्यात व्यक्तींच्या जीवनाची शोकांतिका झालेली आहे.

सांगायचा मुद्दा हा की अशा प्रकारची आसक्ती केव्हाही, कोठेही आणि कशीही उसळी मारून वर येऊ शकते. त्यातही विशेष गोष्ट म्हणजे, अशी आसक्ती एखादे गोजिरवाणे रूप धारण करूनही येते.

कधी <u>**' कृपा!'**</u>, कधी <u>**' दया!'**</u>, कधी <u>**' करुणा!'**</u> तर कधी आणखी कोणते तरी रूप घेऊन येते.

हे म्हणजे, चोराने सावाचे किंवा शत्रूने मित्राचे रूप घेऊन समोर येण्यासारखेच आहे. त्याने माणूस सहजपणे फसतो.

अगोदर आसक्ती, तिची प्रतिक्रिया म्हणून हर्ष किंवा शोक आणि त्यापुढे मोह अशी एक साखळी तयार होते.

ह्या मोहामुळे विवेक नाहीसा होऊन त्याची जागा अविवेक घेतो आणि अविवेकाने ग्रासलेला मनुष्य, योग्य काय व अयोग्य काय हे न समजणाऱ्या विपरीत बुद्धीने ग्रासलेला मनुष्य, प्रमाद म्हणजेच चूक करण्याखेरीज दुसरे काहीही करत नाही. करु शकत नाही.

ह्या संदर्भामधे पूजनीय आचार्य <u>**विनोबा भावेंनी**</u> एक अत्यंत मार्मिक गोष्ट सांगितली आहे.

एक न्यायाधीश होते. त्यांनी न्यायदान करताना शेकडो अपराध्यांना फाशीची शिक्षा दिलेली होती. एके दिवशी त्यांचा स्वत:चा मुलगाच त्यांच्या समोर उभा करण्यात आला. त्याच्यावर खुनाचा आरोप होता. रीतसर सुनावणी झाली. खुनाचा आरोप सिद्ध झाला.

आता शिक्षा सुनावण्याची वेळ आली. पण तसे करताना न्यायमूर्ती महाशय कचरले. घाबरले. भ्याले.

सारासार विवेक बाजूला सारून ते बुद्धिवाद बोलायला लागले.

' फाशीची शिक्षा अमानुष आहे. त्यामुळे माणसाच्या सुधारण्याची आशा नाहीशी होते. माणसाने माणसाला फाशीची शिक्षा देणे हे माणुसकीला काळिमा फासणारे आहे.' इत्यादी अनेक मुद्दे मांडायला लागले.

तो मुलगा आरोपी म्हणून समोर येईपर्यंत हे महाराज आपले कर्तव्य म्हणून, न्यायदानाच्या धर्माचे पालन म्हणून, नि:संकोचपणे फाशीची शिक्षा सुनावत होते. आताचे त्यांचे बोलणे आंतरीक नव्हते. विवेकाचे नव्हते.

ते बोलणे आसक्तिजन्य होते. ' <u>हा माझा मुलगा आहे!</u>' ह्या जाणिवेतून, ममत्वाच्या भावनेमधून निर्माण झालेले होते. त्यांची ही अवस्था अर्जुनाहून निराळी नव्हती. असो.

आता रणांगणावर परिस्थिती कशी आहे पहा!

अनेक प्रयास करून, दुष्टांना शासन करून सज्जनांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने, एकत्र केलेले सैन्य शस्त्रसज्ज होऊन उभे राहिले आहे. सूचना देऊन झाल्या आहेत. शंखनाद करून झालेले आहेत. रणवाद्ये वाजवून झालेली आहेत. आता प्रत्यक्ष युद्धाला सुरवात करायची आहे. आणि ह्याच वेळी, ह्याच अत्यंत आणीबाणीच्या वेळी, सैन्याची मदार प्रामुख्याने ज्याच्या शौर्यावर आहे, असा मुख्य योद्धा, ' मी हे युद्ध करणार नाही! ' असे म्हणून शस्त्रत्याग करून रथामधे तोंड झाकून रडत बसलेला आहे.

**श्रीकृष्ण आश्चर्यचकित होऊन अर्जुनाकडे पाहतो आहे.**

अत्यंत अविश्वसनीय घटना, अत्यंत विपरीत वेळी, अत्यंत अनपेक्षितपणे घडून आलेली आहे. आता काय करायचे?
आता जरा ' श्रीकृष्णाच्या जागी आपण स्वत: उभे आहोत आणि रडत बसलेल्या अर्जुनाकडे पाहतो आहोत ' अशी कल्पना करा!
आणि मग ' आपण काय बरे केले असते?' असा विचार करा.
ह्यातले काहीही अगोदर ठरवून घडलेले नाही. सगळे काही अचानक घडलेले आहे. विचार करायलाही फारसा वेळ नाही.
जे काही करायचे ते लगेच करायचे आहे. तात्काळ करायचे आहे आणि तेथल्या तेथेच करायचे आहे.
त्यातही विशेष गोष्ट म्हणजे ते ज्याच्या बाबतीत करायचे आहे, तो अत्यंत ज्ञानी आणि अत्यंत बुद्धिमान मनुष्य आहे.
अडाणी माणसाची समजूत काढणे तुलनेने सोपे असते. पण बुद्धिमान माणसाची समजूत काढणे फारच कठीण असते.
खरंच, काय केले असते आपण? आपल्याला काही करता आले असते काय?
नुसती कल्पना केली तरी त्रेधातिरपीट उडून जाते. आपली बुद्धी काम करीत नाहीशी होते.
अर्जुनाचा राग यायला लागतो. त्यालाच शासन करावे असे वाटायला लागते.
परंतु त्या ठिकाणी आणि त्यावेळी तसे करणे शक्य नसल्यामुळे, स्वत:लाच हतबल व्हायला होते.
आता येथे जमलेल्या ह्या विराट सेनेला काय सांगायचे?
भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण, दुर्योधन, दु:शासन, शकुनी इत्यादी सर्व योद्ध्यांना काय सांगायचे? द्रौपदीच्या अपमानाचे काय करायचे?
कुंतीसमोर कसे जायचे? तिला काय सांगायचे? पापी कौरवांना शासन कसे करायचे?
पांडवांचे गेलेले राज्य परत कसे मिळवायचे? त्यांचे रक्षण कसे करायचे?
हे आणि अशासारखे इतर अनेक प्रश्न निर्माण होतील आणि त्यांचे योग्य उत्तरही देता येणार नाही.
आपली अत्यंत वाईट अवस्था होईल. दुसरे काहीही होणार नाही.
' कदाचित, राज्याचा उपभोग घेणे ह्या पांडवांच्या नशिबातच नसेल. परमेश्वराने त्यांना अनंतकाळ वनवास भोगण्यासाठी आणि भिक्षा मागण्यासाठीच जन्माला घातले असेल. त्याला कोण काय करणार?
कदाचित, कुंतीमातेच्या आणि पांचालीच्या नशिबात, केवळ दु:ख आणि दु:खच लिहिलेले असेल. म्हणूनच ह्या अर्जुनाला अशी विपरीत बुद्धी झाली आहे. असल्या प्रसंगाला सामोरे जाण्यापेक्षा येथून निघून गेलेले बरे!
नाही तरी आपण प्रत्यक्ष युद्ध करणारच नाही आहोत. तसे अगोदरच स्पष्टपणे सांगितलेले आहे. येथे जमलेल्या सर्वांना ते माहीत आहे.
आता ह्या कौरव - पांडवांना काय गोंधळ घालायचा असेल तो घालूदेत! आपण येथे थांबण्यात अर्थ नाही.
चला! निघा येथून! लवकरात लवकर निघा! अगोदर ह्या कुरुक्षेत्रामधून बाहेर पडूया आणि मग द्वारकेला कसे जायचे ते ठरवूया!'
आपल्यापैकी कोणालाही असेच वाटेल ना? शांतपणे विचार करा! आपणही माझ्याशी सहमत व्हाल ह्याविषयी मला तरी संशय नाही.
पण श्रीकृष्णाचे तसे झाले नाही. त्याच्या मनामधेही अनेक प्रश्न आले असतील. पण तो गोंधळून गेला नाही. चिडला नाही.
हताश झाला नाही. निराश झाला नाही. त्याच्या मनाचे संतुलन बिघडले नाही. तो अत्यंत शांत राहिला.
उलट अत्यंत खंबीरपणे, अत्यंत आत्मविश्वासाने आणि अत्यंत कुशलतेने त्या विपरीत प्रसंगाला, तात्काळ सामोरा गेला.
त्याने आपल्या अद्वितीय बुद्धिमत्तेचा, दीर्घ अनुभवाचा आणि अमोघ वाणीचा यथायोग्य वापर करायला सुरवात केली.
जे जे बोलणे आवश्यक होते ते ते बोलून, जी कृती करणे आवश्यक होती ती करून, अखेरीस

**' अर्जुनाचे मन वळवून त्याला युद्धासाठी परत उभा केला.'**

ते महायुद्ध घडवून आणले आणि दुष्टांना शासन करून धर्माची संस्थापना केली.
म्हणूनच तो आणि त्याचे गीतारूपी **काव्य** अजरामर झाले.
काव्य म्हणजे काय? कविता म्हणजे काय? इंग्रज कवी **वर्डस्वर्थ** ह्याने काव्याची सर्वमान्य अशी व्याख्या केलेली आहे.
तो काय म्हणतो आहे ते समजून घ्या —

**' Poetry is the spontaneous overflow of human feelings, expressed in a melodious sequence of words.'**

अर्थ — मानवी भावभावनांचा, नादमधुर शब्दरचनेमधे व्यक्त केलेला, उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे कविता!

भगवद्‌गीते इतके उत्स्फूर्त, नादमधुर व अर्थपूर्ण काव्य दुसरे कोणते आहे?
निदान मला तरी माहिती नाही आणि असेल असे वाटतही नाही.
श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणजे काय आहे? ह्या प्रश्नाची अनेक उत्तरे दिली गेलेली आहेत.
तरीही माझ्या समजुती प्रमाणे, ह्या प्रश्नाचे उत्तर सांगायचा प्रयत्न करतो.
भारतीय इतिहासाला ज्ञात असलेल्या अनेक नामवंत, श्रेष्ठ व आदरणीय वक्त्यांमधील,
‘ सर्वकालीन सर्वोत्तम वक्त्याने, आपल्या जीवनामधील सर्वाधिक प्रतिकूल परिस्थितीत, उत्स्फूर्तपणे केलेले, सर्वश्रेष्ठ, अद्वितीय, अतुलनीय आणि अत्यंत परिणामकारक असे वक्तव्य म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीता होय. ’
गीतेची तुलना इतर कशाच्याही बरोबर होऊ शकत नाही.
गीतेला पर्याय म्हणजे फक्त गीताच! दुसरे काहीही नाही! असो.
हा पहिला अध्याय विषयप्रवेशाचा अध्याय आहे. ह्या अध्यायामधे श्रीकृष्णाने आपला शंख फुंकला आहे.
अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्यांच्या मधे नेऊन उभा केला आहे आणि त्याला तेथे रणांगणावर जमलेले कौरव पहायला सांगितले आहे. बस्!
ह्याशिवाय तो स्वत: काहीही बोललेला नाही. जे काही बोलले आहेत ते धृतराष्ट्र, संजय आणि अर्जुनच बोलले आहेत.
परंतु हा अध्याय झाला म्हणूनच दुसऱ्या अध्यायात उपदेशाला सुरवात झालेली आहे.
हा अध्याय त्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.
खरे म्हणजे आपण अर्जुनाचे आभार मानायला हवेत.
जर त्याला विषाद झाला नसता तर आपल्याला भगवंताचा उपदेश ऐकायला मिळाला नसता.
एका फार मोठ्या ठेव्याला आपण सगळेच मुकलो असतो. असो.

**येथे पहिला अध्याय पूर्ण झालेला आहे.**

हा पहिला अध्याय म्हणजे, **गीतारूपी मंदिराचा दरवाजा आहे.**
दरवाजा उघडल्याशिवाय देवाचे दर्शन कसे होईल?
**‘ गीते मधला कोणता अध्याय सर्वांत महत्त्वाचा?’** आणि —
**‘ गीते मधला कोणता श्लोक सर्वांत महत्त्वाचा?’**
ह्या दोन प्रश्नांवर फार मोठ्या प्रमाणावर मतभेद आहेत. अनेक वादविवाद आहेत.
विशेष म्हणजे वादविवाद करणारे सगळे सन्माननीय विद्वज्जन आहेत.
गेली कित्येक शतके वादविवाद चालू आहेत आणि यापुढेही अनेक शतके तसे वादविवाद चालूच राहतील.
ते कधीही संपणार नाहीत. आपण त्या वादामधे न पडलेलेच बरे.
वाद घालून काय करायचे आहे? आणि त्याचा उपयोग तरी काय आहे?
अहो ऽऽ, आपल्या समोर रसाळ फळांनी लगडलेला असा हा गीतारूपी विशाल आम्रवृक्ष उभा आहे.
त्याचा घेर, त्याची उंची, त्याची पाने, फळे व फांद्या मोजत राहून आपला वेळ वाया घालविण्यापेक्षा, —
**‘ आपण सरळ त्याच्या मधुर फळांचा आस्वाद घेऊन तृप्त होऊया!**
**आनंदित होऊया! समाधान मिळवूया!!!!! ’**
आपण मंदिराचा दरवाजा उघडलेला आहे.
आता देवाचे दर्शन घ्यायला, त्याचे अमोघ वक्तृत्व ऐकायला, आत जाऊया!
अस्तु!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८ - ७८ ॥**

## अध्याय दुसरा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या दुसऱ्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे आपण, ' अर्जुनाची एकूण मनस्थिती कशी झाली होती, तो कशाप्रकारे शोकग्रस्त झाला होता आणि त्याने कशाप्रकारे युक्तिवाद करून, युद्ध न करण्याचा निर्णय घेतला ' हे पाहिले.

हे सगळे त्याने श्रीकृष्णाला सांगितले आणि हातातले धनुष्य बाजूला ठेवून रथामधे आपल्या जागेवर गपचुप बसून राहिला. त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. तो नकारार्थी मान हलवीत होता.

हे पाहून श्रीकृष्णाची काय अवस्था झाली असेल बरे?

त्याच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहिले असतील. जे घडले ते सगळेच अनपेक्षित होते.

दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी आपला रथ नेऊन उभा करायला सांगताना, आता पुढल्या काही मिनिटात आपली अत्यंत दयनीय अवस्था होणार आहे ह्याची, खुद्द अर्जुनाला देखील कल्पना नव्हती. तो क्षात्रतेजाने पूर्णपणे भारलेला होता. आपल्या शत्रूंचा विनाश करायला अत्यंत आतूर झालेला होता. मागील सर्व अपमानांचा प्रतिशोध घ्यायच्या तीव्र इच्छेमधे बुडालेला होता.

श्रीकृष्ण स्वत: त्याची ही अवस्था प्रत्यक्ष बघत होता. त्याच्या मनामधे अर्जुनाविषयी अपरंपार प्रेम, स्नेहभावना आणि त्याच्या शौर्याविषयी पूर्ण विश्वास होता. त्यामुळे, आता पुढल्या काही मिनिटात ह्याची अत्यंत दयनीय अवस्था होणार आहे आणि त्या अवस्थेमधून त्याला बाहेर काढण्याचे काम आपल्यालाच करावे लागणार आहे ह्याची, श्रीकृष्णाला तरी कशी कल्पना असणार?

तेथे जे काही घडले ते इतके अचानकपणे घडले की, त्यावरील उपाय करण्यासाठी श्रीकृष्णाने कोणतीही पूर्वतयारी केली असण्याची शक्यताच नव्हती. तशी संधीच नव्हती. तितका वेळही नव्हता. जे काही करायचे ते लगेच करायचे आणि तेथल्या तेथेच करायचे. विचार करायलाही फारसा वेळ नाही. अर्जुनाची समजूत काढून त्याला परत युद्धाला उभा करायची संपूर्ण प्रक्रिया ही तात्काळ घडली. गीता सांगायला जेवढा वेळ लागला असेल तेवढ्या वेळातच घडली.

अशा वेळेला श्रीकृष्णाची मनस्थिती कशी झाली असेल?

रथामधे शस्त्रत्याग करून रडत बसलेल्या अर्जुनाकडे पाहून त्याच्या मनामधे कोणते विचार आले असतील?

त्याला अर्जुनाचा राग आला असेल? कीव करावीशी वाटली असेल? त्याच्या अवसानघातकी पवित्र्यामुळे संताप आला असेल?

नाना विचारांचे थैमान सुरू झाले असेल? आता येथे जमलेल्या ह्या विराट सेनेला काय सांगायचे?

भीष्माचार्य, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कर्ण, दुर्योधन, दु:शासन, शकुनी इत्यादी सर्व महारथ्यांना काय सांगायचे?

द्रौपदीच्या अपमानाचे काय करायचे? कुंतीसमोर कसे जायचे? तिला काय सांगायचे?

हे आणि अशासारखे इतर अनेक विचार त्याच्या मनामधे निश्चितच आले असतील. त्याच्या समोर दोनच पर्याय उरले असतील.

अर्जुनाची समजूत काढून त्याला युद्ध करायला लावणे हा पहिला पर्याय.

जर ते शक्य झाले नाही तर त्याला बाजूला सारून त्याच्याशिवाय युद्ध सुरू करणे हा दुसरा पर्याय.

अर्जुनाशिवाय युद्ध करणे आणि विजय मिळवणे शक्यच नव्हते आणि समजा तसे शक्य असते तरी स्वत: श्रीकृष्णालाही ते करायची इच्छा नव्हती. म्हणूनच त्याने पहिल्या पर्यायासाठीच प्रयत्न सुरू केले.

श्रीकृष्णाला अर्जुनाइतका प्रिय दुसरा कोणीही नव्हता. महाभारतामधे, ही गोष्ट त्याने अनेक प्रसंगी अनेकांना बोलून दाखवली आहे. अर्जुन म्हणजे श्रीकृष्णाचा बहिश्चर प्राणच होता. तो जे काही करायचा ते अर्जुनाच्या हितासाठी, कल्याणासाठी आणि यशासाठीच करायचा. ' अर्जुनाचे यश म्हणजे त्याचेच यश आणि अर्जुनाचे अपयश म्हणजे त्याचेच अपयश!' अशीच त्याची धारणा होती.

' एखादी आई जशी सदैव आपल्या मुलाच्या कल्याणाचीच इच्छा करीत असते. सतत त्याचे रक्षण करीत असते.

त्याच्या उत्कर्षासाठीच प्रयत्न करीत असते. वेळोवेळी त्याला मदत करीत असते. मार्गदर्शन करीत असते.

गरज वाटली तर त्याला दोन चार धपाटेही घालते.' तसाच हा प्रकार होता. अशा विचित्र परिस्थितीतही श्रीकृष्ण शांतच होता.

त्याला अर्जुनाचा राग आला असणारच. तो संतापला असणारच. परंतु तो राग आणि संतापाच्या आहारी गेला नाही.

आपल्या भावनांवर त्याचा पूर्णपणे ताबा होता. तो नेहमीसारखाच प्रसन्न दिसत होता.

दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या सैनिकांना, अर्जुनाचे आणि त्याचे काहीतरी बिनसले आहे ह्याची, पुसटशी कल्पनाही आली नाही.

तशी जाणीवही झाली नाही. श्रीकृष्ण अर्जुनाला काहीतरी सांगतो आहे एवढेच त्यांना दिसत होते.

ही अत्यंत महत्त्वाची आणि विशेष अशी गोष्ट आहे.

श्रीकृष्णाने त्याच्या मनाचे, बुद्धीचे, भावनांचे आणि विकारांचे समत्व किती उत्तम प्रकारे साधले होते ते आपल्याला समजून येते.
तो स्वत: स्थितप्रज्ञ होता ही गोष्ट येथे सिद्ध होते. त्यानेच पुढे सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणे हीच आहेत आणि ती सांगायच्या अगोदर त्याने स्वत:च्या आचरणातही आणली आहेत. ' **सदा बोलण्यासारिखे चालताहे!**' असो.
अर्जुन त्याच्या स्वभावाला न शोभेल असे बोलतो आहे, त्याच्या स्वभावाला न शोभेल अशी कृती करतो आहे आणि रथामधे शस्त्रत्याग करून रडत बसला आहे, हे पाहिल्यावर ' ह्याला मानसिक व्याधीने ग्रासले आहे. हा मनोरुग्ण झालेला आहे.' हे त्याने तात्काळ ओळखले. कोणते उपचार करायला हवेत तेही ठरवले.
' ह्याला बरा करण्यासाठी अगोदर एक जोराचा झटका द्यायलाच हवा! त्यामुळेच हा जरा ताळ्यावर येईल!'
मनोरुग्णाला बरा करताना, उपचाराचा एक भाग म्हणून, कधीकधी त्याला ' **शॉक ट्रीटमेंट!**' द्यावी लागते.
तेव्हाच तो इतर औषधोपचारांना प्रतिसाद द्यायला लागतो. असो.
आपण श्रीकृष्णाकडे ईश्वरी अवतार म्हणून पाहतो. त्यामुळेच आपले ह्या आणि अशा अनेक गोष्टींच्याकडे लक्ष जात नाही. यदाकदाचित् लक्ष गेले तरी त्याला महत्त्व दिले जात नाही. त्याच्यासाठी सगळ्या गोष्टी अगदीच किरकोळ असणार असे आपण गृहीत धरून चालतो. ' साक्षात् परमेश्वराला कोणती गोष्ट अशक्य आहे?' हाच विचार आपल्या सर्वांच्या मनामधे प्रामुख्याने असतो.
दुसरी गोष्ट म्हणजे, एकदा एखाद्या माणसाला देवत्व दिले, त्याला परमेश्वराचा अवतार म्हटले, त्याची पूजा करायला सुरवात केली म्हणजे त्याच्या चरित्रामधून काहीतरी शिकण्याची, बोध घेण्याची आणि तसे वर्तन करण्याचा प्रयत्न करण्याची, माणूस म्हणून येणारी नैतिक जबाबदारीपण टाळता येते.
' अहो, मी तर एक साधा माणूस आहे! तो तर साक्षात् परमेश्वर आहे! त्याने केले ते सगळे मला करायला कसे काय जमेल?' असा युक्तिवाद करायची आयती सोय होते. पण मला हे पटत नाही. सगळे जमणार नाही हे बरोबरच आहे.
तरीही थोडेसे काहीतरी जमायला, जमले नाही तरी, निदान तसा प्रयत्न करायला काय हरकत आहे?
**श्रीकृष्ण हा परमेश्वराचा पूर्णावतारच होता ह्यामधे संशय नाही.**
त्याच्या जीवनकालामधेच, तत्कालीन समाजामधे तशी मान्यता होती.
पण आपल्या एकशे पंचवीस वर्षांच्या जीवनकालामधे त्या परमेश्वरी, अमानवी शक्तीचा वापर त्याने, पंचवीस ते तीस वेळाच केलेला आहे. त्याने आपले अलौकिक दैवी सामर्थ्य काहीवेळा अपवादात्मक परिस्थितीमधेच दाखविले आहे.
बाकीचे सर्व आयुष्य तो इतर सामान्य माणसांच्या सारखेच जगला आहे, ह्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.
त्या सर्व कालामधे तो आपले सर्व व्यवहार सामान्य माणसासारखेच करीत होता.
महाभारतीय महायुद्धाच्या कालावधीत, त्याच्या अगोदर आणि त्यानंतरही अनेक वेळा, त्याच्यावर ' अतिशय अडचणीत सापडण्याचा, शस्त्राघात सहन करायचा, अत्यंत हताश होण्याचा, अत्यंत संतप्त होण्याचा, अत्यंत बचावात्मक पवित्रा घेण्याचा, रणांगणातून पळून जाण्याचा, प्रतिस्पर्ध्यांच्या उपरोधिक व तीक्ष्ण शब्दांनी मान खाली घालण्याचा, दु:खाने ढसढसा रडण्याचा,' असे अनेक प्रसंग आलेले आहेत. त्या सर्व प्रकारच्या प्रसंगांमधे त्याचे वर्तन हे कोणाही सामान्य माणसासारखेच होते.
अत्यंत सहजपणे घडून आलेली नैसर्गिक अशी प्रतिक्रियाच होती.
एकूणच महाभारतीय युद्धाचे वेळी, त्याने **धर्मयुद्ध** करण्याचा अट्टाहास न करता, **युद्धधर्माचे** पुरेपूर पालन केले आहे.
त्यामुळेच ज्यांचा पराभव करणे कोणालाही शक्य नव्हते असे अनेक अतिरथी महारथी रणांगणामधे मारले गेले.
त्याच्या ह्या अनुकरणीय अशा वर्तणुकीमुळेच पांडवांना विजय मिळाला आणि धर्मसंस्थापना झाली. म्हणून —
**' श्रीकृष्ण हा किती महान नेता होता, बुद्धिमान होता, रणज्ञ होता, उत्तम मनोवैज्ञानिक होता, उत्तम राजनीतिज्ञ होता, उत्तम कूटनीतिज्ञ होता, उत्तम वक्ता होता, उत्तम सहकारी होता, उत्तम मार्गदर्शक होता, उत्तम सारथी होता,'**
हे जर खरोखरच जाणून घ्यायचे असेल तर त्याच्याकडे, —
**एक असामान्य माणूस** म्हणूनच पाहिले पाहिजे. त्याचे चरित्र हे एका **अद्वितीय माणसाचे चरित्र** म्हणूनच अभ्यासले पाहिजे, असे मला नेहमीच आणि मनापासून वाटते. असो.
गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचा पहिला श्लोक संजयाचा आहे.
तो धृतराष्ट्राला पुढे सांगतो आहे की, —
**संजय उवाच :**
**तन् तथा कृपयाविष्टम् अश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।**
**विषीदन्तमिदम् वाक्यम् उवाच मधुसूदनः ।। १ ।।**

याप्रमाणे करुणेने व्यापलेल्या, अश्रूंनी डोळे भरून आलेल्या आणि खेद झालेल्या अर्जुनाला मधुसूदन असे म्हणाला की, —
ह्या पुढील, दुसऱ्या श्लोकापासून गीतोपदेशाला सुरवात झाली आहे.
आता येथून पुढे सगळी गीता पूर्ण होईपर्यंत **भगवान श्रीकृष्ण, अर्जुन** आणि **संजय** हे तिघेच बोलणार आहेत.
**श्रीभगवानुवाच** — म्हणजे श्री भगवान म्हणाले — ह्या विधानाने सुरू होणारे सर्व श्लोक म्हणजे गीतेचा उपदेश आहे.
स्वत: भगवान आपल्याला उपदेश करीत आहेत. अर्जुनाला जीवन जगण्याची कला समजावून सांगत आहेत.
असे करून त्यांनी सगळ्या मानव जातीवर अनंत उपकार केलेले आहेत. आपण त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठी त्यांना मनापासून नमस्कार करीत जाऊया!
जेव्हा जेव्हा ' श्रीभगवानुवाच —' म्हटले जाईल, तेव्हा तेव्हा श्रीकृष्णाला हात जोडून नमस्कार करूया!
**अर्जुन उवाच** — म्हणजे अर्जुन म्हणाला — ह्या विधानाने सुरू होणारे सर्व श्लोक म्हणजे अर्जुनाने विचारलेले प्रश्न, शंका, प्रसंगानुरूप केलेली श्रीकृष्णाची स्तुती आणि श्रीकृष्णाने उपदेशाच्या अखेरीस विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आहे.
**येथे अर्जुनाच्या जागी आपण आहोत असे समजू या.**
म्हणजे अर्जुनाचे प्रश्न हे आपलेच प्रश्न होतील आणि श्रीकृष्णाने दिलेली उत्तरे ही आपल्यालाच दिलेली उत्तरे होतील.
खरे म्हणजे, अर्जुन हा केवळ निमित्तमात्र आहे. **श्रीकृष्णाने केलेला उपदेश हा आपल्या सर्वांनाच केलेला आहे.**
**संजय उवाच** — म्हणजे संजय म्हणाला — ह्या विधानाने सुरू होणारे सर्व श्लोक म्हणजे संजयाने धृतराष्ट्राला युद्धाची माहिती सांगताना केलेले समालोचन आणि प्रसंगानुरूप केलेली श्रीकृष्णाची स्तुती आहे. असो.

**श्रीभगवानुवाच :**

**कुतस्त्वा कश्मलमिदम् विषमे समुपस्थितम् ।**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यम् अकीर्तिकरमर्जुन ।। २ ।।**
**क्लैब्यम् मा स्म गम: पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रम् हृदयदौर्बल्यम् त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप ।। ३ ।।**

अरे अर्जुनाऽऽऽ! सत्पुरुषांनी कधीही न आचरलेले, अधोगतीला नेणारे व दुष्कीर्तीकारक असे हे काळेबेरे, ह्या संकटसमयी तुझ्या मनामधे कोठून आले? हे पार्था ! असा नामर्द होऊ नको ! हे तुला शोभत नाही ! अरे शत्रुतापना ! हृदयाची ही क्षूद्र दुर्बलता सोडून दे आणि युद्धाला उभा रहा.
हे दोन श्लोक फार महत्त्वाचे आहेत. अतिशय महत्त्वाचे आहेत. अर्जुनाच्या मर्मावर आघात करणारे आहेत.
ह्या दोन श्लोकांच्यामधला प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे. त्या प्रत्येक शब्दाचा अर्थ नीट समजून घ्या.
श्रीकृष्णाच्या मनातला सगळा संताप, तिरस्कार, उद्वेग, काळजी, प्रेम आणि अभिमान ह्या दोन श्लोकात दिसून आला आहे आणि अर्जुनालाही त्या सगळ्या भावना स्पष्टपणे जाणवल्या आहेत.
त्याला अर्जुनाचा रागही आला आहे. त्याचा तिरस्कारही वाटतो आहे. त्याच्या अशा वागण्याचा उद्वेगही वाटतो आहे.
त्याच बरोबर त्याला अर्जुनाची काळजीही वाटते आहे. त्याच्या विषयी प्रेमही वाटते आहे आणि त्याचा अभिमानही वाटतो आहे.
ह्या दोन श्लोकांना समानार्थी असलेले दोन मराठी श्लोक, येथे सांगावेसे वाटतात.
**श्री. वामन गोपाळ थत्ते** नांवाच्या कवींनी इसवीसन १९३९ - १९४० मध्ये भुजंगप्रयात वृत्तामधे **' बालबोध गीता.'** लिहिली.
ती भगवद्गीतेला समश्लोकी आहे. **' समश्लोकी '** म्हणजे भगवद्गीतेच्या प्रत्येक श्लोकाला समानार्थी मराठी श्लोक.
गीतेचा अर्थ सांगण्याच्या हेतूने अनेक समश्लोकी, समओवी, समआर्या रचल्या गेलेल्या आहेत. परंतु ह्या दोन मूळ श्लोकांचा अर्थ, इतक्या अचूकपणे व्यक्त करणारी अशी दुसरी रचना, माझ्यातरी वाचनात आलेली नाही.
त्यातील दुसऱ्या अध्यायातला दुसरा व तिसरा श्लोक पुढीलप्रमाणे —

**श्रीभगवान म्हणाले :—**

**रणाच्या प्रसंगांत या ऐनवेळी । मनीं कश्मलें सांग कोठून आलीं? ।**
**असे वागणे हे अनार्यास शोभे । तयें स्वर्ग वा कीर्ति तीही न लाभे ।।**
**नको आठवूं अर्जुना षंढतेला । न शोभे असें हे तुझ्यासारख्याला ।**
**नको क्षूद्र ही भ्याड वृत्ती अजेया । करीं चाप घे उठ आतां लढाया ।।**

अतिशय सोपी, अर्थवाही आणि सुंदर रचना आहे! अप्रतीम! अनुरूप चालीत म्हणताना अतिशय प्रभावी वाटते.

**<u>समर्थ रामदास स्वामींनी</u>** रचलेला **<u>‘ श्रीमनोबोध ’</u>** म्हणजेच मनाचे श्लोकही भुजंगप्रयात वृत्तामधेच रचलेले आहेत.
त्यांना कोणत्याही रागामधे चाल लावता येते आणि म्हणताना विलक्षण आनंद होतो.
आपल्याला दैवी स्पर्श झाल्यासारखे वाटते. **( Divine Touch.)**
ह्याच अध्यायामधे पुढे येणारी ‘ स्थितप्रज्ञाची लक्षणे ’ समजून घेताना मनाच्या श्लोकांचा संदर्भ येईलच.
हे थोडेसे विषयांतर झाले, पण मोह आवरता आला नाही. असो. आपण परत मूळ विषयावर येऊया.

**‘ क्लैब्यम् मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । ’**

**<u>स्वामी विवेकानंदांचा ह्या दोन श्लोकांवर भर होता.</u>**

त्यातही दुसऱ्या श्लोकावर फारच भर होता. ते नेहमीच सांगत असत की,
‘ जगामधले आपले पूर्वीचे वैभवाचे आणि सन्मानाचे स्थान पुन्हा एकदा प्राप्त होण्यासाठी, हिंदुस्थानाला आज ह्या एकाच श्लोकाचा अभ्यास करून, तो आचरणात आणण्याची आवश्यकता आहे. एकवेळ बाकी गीतेचा अभ्यास नाही केला तरीही चालेल.
पण हा श्लोक आपणा सर्वांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.
आपल्या देशाच्या प्रत्येक नागरिकाने, विशेष करून प्रत्येक तरुणाने, सर्वप्रथम भयाचा त्याग केला पाहिजे! भीतीचा त्याग केला पाहिजे! दुर्बलतेचा त्याग केला पाहिजे! येणाऱ्या प्रत्येक संकटाचा सामना करायला सदैव तयार राहिले पाहिजे!
संकटाला पाहून पळून जाण्यात काहीही अर्थ नाही आणि पुरुषार्थ तर नाहीच नाही!
पळून जाऊन कोणतेही संकट नाहीसे होत नाही उलट अधिकाधिक उग्र होत जाते!
अगोदर असते त्याच्यापेक्षा अधिक तीव्र होत जाते! आपल्यावर अधिक जोराने उसळून चाल करून येते!
जर संकट नाहीसे करायचे असेल तर आपला भ्याडपणा सोडून, त्याच्या समोर निर्भयपणे उभे राहून लढलेच पाहिजे!
संकटनिवारणाचा तोच एकमेव मार्ग आहे! माझ्या हिंदुस्थानी तरुण मित्रांनो ऽऽ! भय हे पापाचे उगमस्थान आहे!
संकटांचे उगमस्थान आहे! अपयशाचे उगमस्थान आहे! दु:खाचे उगमस्थान आहे!
म्हणून सर्वप्रथम तुम्ही भयाचा त्याग करा! निर्भय बना! आपल्या राष्ट्राच्या दुर्बलतेचे भय हेच एकमेव कारण आहे.
भयापासून लवकरात लवकर मुक्त व्हा! भय नाहीसे झाले तर इतर सर्व प्रकारे उत्कर्ष घडून येईल!
तुम्ही अनादि - अनंत - अमर आणि आनंदमय अशा दिव्य तत्त्वाचे संतान आहात!
लक्षात ठेवा की, तुम्ही दुर्बल नाही आहात! सबल आहात! सशक्त आहात!
तुमच्या आत अमर्याद शक्ती भरलेली आहे! तिला जागी करा!

**‘ उत्तिष्ठत! जाग्रत! प्राप्य वरान्निबोधत! ।’ ( कठोपनिषद )**

तसे झाले तर तुम्ही चमत्कार घडवून आणू शकाल! म्हणून माझे तुम्हा सर्वांना आवाहन आहे! **<u>निर्भय व्हा! निर्भय बना!</u>**’

**क्लैब्यम् मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रम् हृदयदौर्बल्यम् त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप ॥**

<u>‘ अर्जुना! तू नामर्द बनू नकोस! नामर्दासारखा वागू नकोस!</u> ( संताप, तिरस्कार.)
<u>हे तुझ्यासारख्याला शोभत नाही.</u> ( प्रेम, काळजी.)
<u>अरे ऽऽ! तू शत्रूचा सर्वनाश करणारा आहेस, महावीर आहेस, हे विसरलास काय?</u> ( अभिमान, उद्वेग.)
<u>मनाचा हा क्षुद्र दुबळेपणा सोडून दे आणि **युद्धासाठी उभा रहा!**’</u> ( संमिश्र भावना.)
कोणत्याही पुरुषाला, अगदी सर्वसामान्य पुरुषालाही, सर्वांत जास्त अपमानकारक वाटेल असा शब्द कोणता असेल तर तो म्हणजे <u>‘ नामर्द!, हिजडा!, षंढ!, नपुंसक!, क्लीब!’</u> ह्यापैकी कोणताही एक. ह्या सगळ्या शब्दांचा अर्थ एकच आहे.
‘ भ्याडपणाने वागणारा मनुष्य! भित्रा मनुष्य! भेकड मनुष्य! पुरुषार्थहीन मनुष्य! ’
अर्जुन भ्याड नव्हता तर **‘ नरोत्तम!’** होता. हे श्रीकृष्णालाही माहीत होते.
परंतु, त्यावेळी, त्या ठिकाणी, त्या परिस्थितीत, दुसरे काही करता येण्यासारखे नव्हते, म्हणून त्याने शब्दांचा वापर करून झटका दिला.

**‘ क्लैब्यम् मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । ’**

अर्जुना ऽऽ! ह्या विपरीत वेळी आणि विपरीत स्थळी, तू हे काय करतो आहेस?
अर्जुना ऽऽ! तू नामर्द झाला आहेस. नामर्दासारखा वागतो आहेस. तसे वागू नकोस!
ऐन युद्धाच्यावेळी असा दुबळेपणा योग्य आहे काय?
हे सगळे वीर आपले बंधुबांधव आहेत ही गोष्ट तुला आत्ताच कळली का रे ऽ? कालपर्यंत तुला हे माहीत नव्हते काय?

आणि ते जसे तुमचे बंधुबांधव आहेत तसेच तुम्ही पांडवही त्यांचे बंधुबांधव आहात, ह्या गोष्टीचा विचार कौरवांनी आजपर्यंत कधीतरी केला आहे काय? तुमच्यावर अन्याय करताना, भीमसेनाला विष खायला घालताना, तुम्हाला लाक्षागृहामधे जाळण्याचा प्रयत्न करताना, कपटाने तुमचे राज्य बळकावताना, पांचालीचा भर सभेमधे अपमान करताना, तुमचे राज्य बळकावून तुम्हाला वनवासाला पाठवून देताना आणि वनवास भोगून झाल्यानंतरही तुमचे राज्य तुम्हाला परत न देताना, नातेसंबंध लक्षात घेऊन, ते एकदा तरी परावृत्त झाले आहेत काय? तुमच्याविषयी त्यांच्या मनामधे एकदा तरी करुणा निर्माण झाली आहे काय? नाही ना?
मग तुला हा विचार करायची आणि त्यासाठी असा पळपुटेपणा करायची काय गरज आहे?
तू आपला लौकीक, आपल्याच कृतीने धुळीत मिळवू नकोस! हा केवळ तुझा षंढपणा आहे. दुसरे काहीही नाही.
असे करू नकोस! आता तू इतर कोणताही विचार करू नकोस!
**केवळ युद्धाचाच विचार कर आणि त्यासाठी उभा रहा!**

**' क्लैब्यम् मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । '**

गीतेचे सर्व श्लोक व्यक्तपणे जे काही सांगतात, त्यापेक्षा, अव्यक्तपणे जास्त सांगतात.
त्यांच्यामधे असलेल्या ' रिकाम्या जागा ' बरेच काही सांगतात. असा माझा नेहमीचा अनुभव आहे.
आपण जसजसे पुढे जात राहू , श्लोकांवर विचार करू, अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करू, तसतसा आपल्यालाही माझ्यासारखाच अनुभव येईल. असो.
अर्जुनाला अपेक्षित झटका बसला. त्याचे रडणे थांबले. तो श्रीकृष्णाकडे पहायला लागला. पहातच राहिला.
' अचानकपणे कुणीतरी आपल्या श्रीमुखात वाजवली.' असेच त्याला वाटले. तो ' कुणीतरी ' म्हणजे दुसरा - तिसरा कोणी नव्हता, तर त्याचा अत्यंत प्रिय असा मित्र, हितचिंतक, सहाय्यक आणि भक्कम आधार असलेला असा श्रीकृष्ण होता.
श्रीकृष्ण त्याचे सर्वस्व होता. म्हणूनच त्याने यादवांचे एक अक्षौहिणी सैन्य सोडून दिले आणि एकट्या श्रीकृष्णाचा हात धरला. त्याला आपल्या रथाचे सारथ्य करायला सांगितले. त्याच्यामुळेच पांडव इतक्या सैन्यासह रणांगणावर युद्धासाठी उभे राहू शकले होते. त्याला माहीत होते की, श्रीकृष्णाशिवाय अर्जुन म्हणजे —
**' मुठीवाचून तलवार! धनुष्यावाचून बाण! अश्वावाचून रथ! प्राणांवाचून शरीर!'**
तोच श्रीकृष्ण आज त्याचा अपमान करीत होता. बोलायला नको ते बोलत होता.
त्यालाही श्रीकृष्णाचा राग आला असणारच. तसा राग येणे हे मनुष्य स्वभावाला धरूनच आहे. त्यामधे विशेष काहीही नाही.
विशेष उल्लेखनीय गोष्ट पुढे आहे. श्रीकृष्णाचे बोलणे सत्य होते आणि अर्जुनाला ते पटतही होते.
परंतु त्याच्या मनाला मोहाचा विळखा पडला होता. स्वजनांच्याविषयी वाटणाऱ्या आसक्तीचा विळखा पडला होता आणि तो काही केल्या सुटत नव्हता. श्रीकृष्णाचा राग आल्यावरही त्याची बुद्धी काम करीतच होती.
तो विचार करायला लागला की, ' ज्याअर्थी श्रीकृष्ण मला असे बोलला, त्याअर्थी माझेच काहीतरी चुकले आहे. मी जे काही करू पाहात आहे ते त्याला मान्य नाही. म्हणजे माझे काहीतरी चुकते आहे. नाहीतर तो मला असे बोललाच नसता.'
त्याचा श्रीकृष्णावर किती दृढ विश्वास होता ते पहा! किती अविचल श्रद्धा होती ते पहा!
त्याच बरोबर आपली चूक झाली तर ती मोकळ्या मनाने मान्य करण्याचे धैर्यही होते.
आपली चूक मान्य करण्याचा प्रामाणिकपणा किती जणांच्याकडे आहे?
प्रत्येकाने स्वतःलाच हा प्रश्न विचारून पहा आणि त्याचे उत्तर काय मिळते ते ही जाणून घ्या!
आज सगळ्या भारतीयांची हीच अवस्था आहे. स्वतःची चूक कबूल करायला सहसा कोणीही तयार होत नाही.
जपानी औद्योगीक क्षेत्रामधे फार वर्षांपासून **' कायझन.'** ह्या नांवाची व्यवस्थापनाची एक पद्धत राबविण्यात येते.
ही सर्व जपानमधे अत्यंत यशस्वी ठरलेली पद्धत आहे.
कायझन हा जपानी भाषेतला शब्द आहे. त्याचा अर्थ ' सुधारणेसाठी केलेला बदल!' **( Change for Betterment.)**
ही पद्धत भारतामधे मात्र फारशी यशस्वी झाली नाही. योग्य प्रकारे राबवलीही गेली नाही. राबवता आलीच नाही.
असे का झाले असावे? ह्या प्रश्नाचा माझ्यापरीने शोध घ्यायचा प्रयत्न केला.
मला कारण सापडले आणि ते कारण कायझनच्या मूलतत्त्वामधेच आहे.
कायझनचे काही प्राथमिक नियम आहेत. त्यातला पहिला नियम आहे की —
**" Accept your mistake at the earliest. That will be the first step towards betterment."**
अर्थ — ' आपली चूक लवकरात लवकर कबूल करा. ती सुधारणेच्या दिशेने जाणारी पहिली पायरी असेल.'
आता हे आपल्या देशात कसे काय जमणार? स्वतःची चूक कोणी कधी कबूल करतो काय?

प्रत्येकजण आपली चूक नेहमीच दुसऱ्यावर ढकलत असतो. इतरांना दोष देण्यात सगळेच तत्पर असतात.
परंतु ' आपले काही चुकले आहे काय? चुकते आहे काय?' ह्याचा कोणीही विचार करीत नाही.
कोणालाही तसा विचार करण्याची गरज भासत नाही.
किंबहुना ' आपणही चुका करू शकतो. आपल्या हातूनही चूक होऊ शकते.' असे आपल्याला वाटतच नाही.
आजच्या घडीला आपल्या देशाच्या नागरिकांची सर्वसाधारण नीतिमत्ता, म्हणजेच आपली राष्ट्रीय नीतिमत्ता फारच खालावलेली आहे.
**( National Morality )** ती उंचावण्यासाठी तरी प्रत्येकाने भगवद्गीता वाचली पाहिजे.
भगवद्गीतेचा अभ्यास केला पाहिजे आणि गीतेत सांगितल्याप्रमाणे आचरण करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.
मला तर असे वाटते की, शालेय अभ्यासक्रमामधे इतर विषयांच्याप्रमाणे **' भगवद्गीता '** हा एक स्वतंत्र विषय असला पाहिजे आणि तो सक्तीचा असला पाहिजे. कम्पल्सरी असला पाहिजे. ऐच्छिक असता कामा नये. ऑप्शनला टाकता येता कामा नये. असो.
अर्जुन ह्या शब्दाचा अर्थच ' सरळ स्वभावाचा.' असा आहे.
अर्जुन खरोखरच तसा होता. अत्यंत सरळ स्वभावाचा होता.
अतिशय शुद्ध विचारांचा होता. आत एक आणि बाहेर एक अशी त्याची वृत्ती नव्हती.
कोणतेही सोंग करणे, ढोंग करणे, नाटक करणे हे त्याला शक्य नव्हते. ते त्याच्या स्वभावातच नव्हते.
श्रीकृष्णाच्या मुखावरील भाव पाहिल्यावर अर्जुनाची दृष्टी आपोआप त्याच्या पावलांकडे वळली.
आई रागावली तरी तिचा हेतू आपल्या मुलाचे कल्याण व्हावे हाच असतो. मग मुलगा तरी दुसरीकडे कुठे जाणार?
तो आपल्या प्रिय आणि वंदनीय आईकडेच परत जाणार. तिची क्षमा मागणार आणि तिच्याकडूनच मदत मागणार. अर्जुनाने तेच केले.
त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीला अनुसरून जे अपेक्षित होते तेच केले. आपले दोन्ही हात जोडून श्रीकृष्णाला नमस्कार केला आणि गदगदलेल्या स्वरात तो कळवळून बोलू लागला. तो म्हणतो आहे की, —

**अर्जुन उवाच :**

**कथम् भीष्ममहम् सङ्ख्ये द्रोणञ् च मधुसूदन ।**
**इषुभिः प्रति योत्स्यामि पूजार्हावरिसूदन ।। ४ ।।**
**गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुम् भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वाऽर्थकामान्स्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ।। ५ ।।**
**न चैतद्विद्मःकतरन्नो गरीयः यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषामः तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ।। ६ ।।**
**कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वाम् धर्मसम्मूढचेताः ।**
**यच्छ्रेयःस्यान्निश्चितम् ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहम् शाधि माम् त्वाम् प्रपन्नम् ।।७।।**
**न हि प्रपश्यामि ममापनुद्यात् यच्छोकमुच्छोषणमिद्रियाणाम् ।**
**अवाप्य भूमावसपत्नमृद्धम् राज्यम् सुराणामपि चाधिपत्यम् ।। ८ ।।**

हे मधुसूदना ! मी रणामधे भीष्म व द्रोण ह्यांच्याबरोबर बाणांनी कसे लढू?
कारण हे शत्रुमर्दना ! मला ते दोघेही पूजनीय आहेत. परमपूज्य गुरुजनांना मारण्याऐवजी,
ह्या लोकी भीक मागून पोट भरणेही मला कल्याणप्रद वाटते. कारण अर्थाला ओशाळलेले असले तरीही जे गुरुजन, त्यांना मारून त्यांच्याच रक्ताने माखलेले भोग मला ह्या जगातच भोगावे लागणार. त्यांचा पराभव करून आम्ही जय मिळवावा किंवा त्यांनी आम्हाला जिंकावे ह्यामधे कल्याणकारक काय हे ही कळत नाही आणि ज्यांना मारल्यावर आम्हाला जिवंत रहावे असेही वाटणार नाही तेच हे कौरव समोर युद्धासाठी उभे आहेत. कारुण्यव्याप्त दैन्याने माझी स्वाभाविक वृत्ती नष्ट होऊन, धर्माविषयी मनाला मोह पडलेला मी तुला विचारीत आहे. जे निश्चितपणाने कल्याणकारक असेल ते मला सांग. मी तुझा शिष्य, तुला शरण आलेला असून, मला उपदेश कर. कारण पृथ्वीचे निष्कंटक समृद्ध राज्य मिळाले किंवा देवांचेही स्वामित्व मिळाले तरीसुद्धा इंद्रियांना शोषून टाकणारा हा शोक दूर करू शकेल असा कोणताही उपाय मला दिसत नाही.
हा महत्त्वाचा क्षण आहे. हे अर्जुनाचे आत्मसमर्पण आहे. **( Total Surrender.)**
असे झाले नसते तर गीता सांगितली गेली नसती. पण जे योग्य होते आणि जे व्हायला हवे होते तेच झाले.
' आपण कमजोर झालो आहोत, कमकुवत झालो आहोत. आपली स्वाभाविक अशी वृत्ती नाहीशी झाली असून स्वधर्म आचरणाविषयी आपल्या मनाचा गोंधळ उडून गेला आहे. समजा युद्ध केले तरीही विजय होईल की पराजय होईल ते सांगता येत नाही.

काय करावे आणि काय करू नये तेच समजत नाही.' अर्जुन हे समजून चुकलेला आहे.
म्हणूनच तो श्रीकृष्णाला शरण गेलेला आहे. स्वत:चे अज्ञान आणि त्यामुळे घडून आलेली चूक स्पष्टपणे मान्य करतो आहे.
त्याची हात जोडून विनवणी करतो आहे. योग्य मार्ग दाखवायला सांगतो आहे. हे फार महत्त्वाचे आहे.
**आपण असे करतो का?** जरा विचार करा! जेव्हा आपण देवाला नमस्कार करतो तेव्हा काय करतो?
आपण देवालाच सूचना करायला लागतो. अटी घालायला सुरवात करतो.
' हे देवा! मी तुला नमस्कार करतो. नारळ अर्पण करतो. तेल - माळ वाहतो. शंभर प्रदक्षिणा घालतो. फुलांचा हार घालतो.
तुझ्या पुढे पेढे ठेवतो. त्याच्या बदल्यात तू मला अमुक अमुक दे! मला हे मिळवून दे! मला ते मिळवून दे!' किंवा —
' हे देवा! मी तुला नमस्कार करतो. जर तू मला हवे आहे ते दिलेस तर, माझे काम झाल्यावर मी तुला अमुक अमुक देईन!'
अशा प्रकारे वाटाघाटी करायला सुरवात करतो. ह्यालाच **' नवस करणे '** असें म्हणतात.
जणू काही देवापेक्षा आपल्यालाच जास्त समजते. आपणच जास्त हुशार आहोत. बुद्धिमान आहोत.
आपल्याला जे हवे आहे तेच त्याने दिले पाहिजे आणि ते ही आपल्याला अपेक्षित असलेल्या वेळीच दिले पाहिजे. तरच आपण त्याच्यापुढे काहीतरी ठेवणार. त्याला नमस्कार करून बोललेला नवस पुरा करणार आणि लगेच दुसरे मागणे मागायला सुरवात करणार.
आपल्या मागण्याला अंत नसतो. ' आता मला काहीही नको.' असे कधीही होत नाही.
दुसरे म्हणजे, आपण त्याच्या पुढे जे काही ठेवतो ते ही आपले नसतेच. सगळे काही त्यानेच दिलेले असते.
जरा स्वत:शी विचार करून पहा. **आपल्याकडे आपले म्हणावे असे काय आहे?** काहीही नाही. खरोखर काहीच नाही.
त्यातही एक गंमत आहे. काय गंमत आहे सांगू का?
' आपण पुढ्यात ठेवलेली कोणतीही गोष्ट देव कधीही खात नाही, खिशात घालत नाही, थोड्या वेळाने ती आपल्यालाच खायला मिळणार आहे.' ह्याची प्रत्येकाला खात्री असते. जर देवाने त्याच्या पुढ्यात, ह्या तथाकथित भक्त मंडळींनी ठेवलेला प्रसाद, खायला सुरवात केली तर त्याच्यापुढे प्रसाद ठेवणाऱ्या भक्तांची संख्याही कमी होईल.
ह्याला भक्ती म्हणता येईल काय? नाही.
कशाच्यातरी बदल्यात काही तरी द्यायचे किंवा घ्यायचे म्हणजे भक्ती नाही. ही तर केवळ व्यापारी वृत्ती झाली.
देव आपल्याकडे काहीही मागत नाही. त्याला आपल्याकडून फक्त शुद्ध भक्तीची अपेक्षा असते.
निखळ श्रद्धेची अपेक्षा असते. शुद्ध प्रेमाची अपेक्षा असते.
' हे देवा! मी तुला नमस्कार करतो. तुझी इच्छा असेल त्याप्रमाणेच सर्व काही होणार आहे. माझे सदैव रक्षण कर!' इतके मागणे पुरेसे आहे. आणखी काही सांगायची गरजच नाही. त्याला सर्व काही माहीत असते.
समर्पणाच्या भावनेने, त्याला संपूर्णपणे शरण गेलो तर तो आपली सर्व प्रकारे काळजी घेतोच.
आपल्या भक्ताला तो कधीही अंतर देत नाही. त्याची उपेक्षा करीत नाही. त्याच्याकडे दुर्लक्ष करीत नाही.
सदैव त्याचे रक्षणच करतो. कल्याणच करतो.
समर्थ रामदास स्वामींनी सांगितलेच आहे, **' नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी.'**
' देव आपल्या भक्ताचा अभिमानी असतो. तो भक्ताची कधीही उपेक्षा करीत नाही.'
अट फक्त एकच. भक्त हा खराखुरा भक्त असला पाहिजे.
मुळामधे देव कोणाला म्हणायचे? परमेश्वर कोणाला म्हणायचे?
' ज्याच्याकडे मागितले तर काहीही मिळत नाही आणि मिळालेच तर मागितले असेल तेच मिळते. तेवढेच मिळते.
परंतु जर काहीही मागितले नाही तर मात्र सर्व काही मिळते. भरभरून मिळते. अपरंपार मिळते. अगणित मिळते. अपरिमित मिळते.
आपले दोन हात घेऊ शकणार नाहीत इतके मिळते. जो असा असतो तोच **देव** होय!'
एक अतिशय प्रसिद्ध असे विधान आहे. ते आपणा सर्वांना माहीत आहे.

**' अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने?'**

' अरे ऽऽ माणसा, जर तो लक्ष्मीपती प्रसन्न झाला आणि त्याच्या कृपेचा वर्षाव करायला लागला, आपल्या अगणित हातांनी द्यायला लागला, तर तू तुझ्या दोन हातांनी त्यातले किती घेऊ शकशील?'
देव आणि त्याची कृपा कोठेही विकत मिळत नाहीत. कोणालाही खरेदी करता येत नाहीत.
देवासमोर असत्य बोललेले, खोटेपणाने वागलेले चालत नाही. ही गोष्ट कोणी लक्षात घेतच नाहीत. असो.
जोराच्या झटक्याने अपेक्षित काम केले. रोगी जरा ताळ्यावर आला.

इतर औषधोपचारांची मागणी करायला लागला. वैद्याला प्रतिसाद द्यायला लागला. परंतु अजून तो युद्ध करायला तयार नाही.
त्याने धनुष्य - बाण बाजूलाच ठेवलेले आहेत. आता तो रडत नाही आहे पण खिन्न होऊन रथामधे बसूनच राहिला आहे.
ही गोष्ट संजय धृतराष्ट्राला सांगतो आहे. तो सांगतो आहे की, —

**संजय उवाच :**

**एव मुक्त्वा हृषीकेशम् गुडाकेशः परंतप ।**
**न योत्स्य इति गोविंदम् उक्त्वा तूष्णीम् बभूव ह ॥ ९ ॥**
**तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये विषिदन्तमिदम् वचः ॥ १० ॥**

ह्या प्रमाणे, शत्रूला ताप देणारा असा जो, आळसाला जिंकणारा अर्जुन, त्याने इंद्रियांना जिंकणाऱ्या श्रीकृष्णाला सांगितले आणि 'मी लढणार नाही!' असे गोविंदाला स्पष्टपणे सांगून स्तब्ध राहिला. त्यानंतर हे धृतराष्ट्रा! दोन्ही सैन्यांचेमधे खिन्न होऊन बसलेल्या त्या अर्जुनास श्रीकृष्ण हसल्यासारखे करून असे म्हणाले की, —
बघा! येथे श्रीकृष्ण अर्जुनाकडे बघून हसतो आहे. उपरोधाने हसतो आहे. उपहासाने हसतो आहे. त्याला खिजविण्यासाठी हसतो आहे. अशा प्रसंगी आपल्याला ठरवूनही हसता येणार नाही. हसायला जमणारच नाही. आपण फक्त संतापलेले असू!
अर्जुनाकडे रागारागाने पहात असू! त्याला काय बोलावे ते सुचणारच नाही! पण श्रीकृष्ण हसतो आहे.
विपरीत परिस्थितीतही त्याच्या मनाचा तोल ढळलेला नाही.
त्याचे मन किती संतुलित आहे पहा! **( Perfectly balanced mind.)**
म्हणूनच त्याला **<u>हृषिकेश</u>** म्हटले आहे! इंद्रियांचा स्वामी म्हटले आहे! हसत हसत तो अर्जुनाची टर उडवतो आहे. म्हणतो आहे की,

**श्रीभगवानुवाच :**

**अशोच्यानन्वशोचस्त्वम् प्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः ॥ ११ ॥**
**न त्वेवाहञ् जातु नासम् न त्वन् नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥**
**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारम् यौवनञ् जरा ।**
**तथा देहान्तरप्राप्तिः धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥**
**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्याः तान् तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥**
**यम् हि न व्यथयन्त्येते पुरुषम् पुरुषर्षभ ।**
**समदुःखसुखन् धीरम् सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥**

' अर्जुना ऽऽ! तू हे जे काही बोलतो आहेस त्याचे मला फार आश्चर्य वाटते आहे.
एका बाजूला ज्यांच्यासाठी शोक करण्याची गरजच नाही, त्यांच्यासाठी शोक करतो आहेस आणि दुसऱ्या बाजूला एखाद्या ज्ञानी माणसाच्या सारखा, नीती आणि अनीतीच्या, मोठ्या मोठ्या गप्पाही मारतो आहेस.
तुला काय म्हणावे तेच कळत नाही बघ! मला एका गोष्टीचे उत्तर दे!
ह्या सर्व जगाचे असणे किंवा नसणे केवळ तुझ्यावरच अवलंबून आहे काय?
अरे ऽऽ! तू जन्मालाही आला नव्हतास तेव्हाही हे सर्व जग असेच होते.
आज तू आहेस तरीही हे सर्व जग असेच आहे आणि उद्या तू नसलास तरीही हे सर्व जग असेच असणार आहे.
त्यामध्ये काडीचाही बदल होणार नाही. हे सत्य तुला माहीत नाही काय ऽऽ?
जन्म आणि मृत्यू हे दोन्ही तू निर्माण केले आहेस काय ऽऽ?
तू एकटाच मारणारा आणि बाकीचे हे सर्व वीर मरणारे आहेत. तू मारशील तरच हे सगळे मरतील नाहीतर कधीही मरणारच नाहीत, अमर होतील अशी तुझी समजूत आहे काय?
अरे बाबा ऽऽ! कालचक्र हे अनादि काळापासून असेच चालत आलेले आहे आणि यापुढेही अनंत काळापर्यंत असेच चालत राहणार आहे. त्याचे चालणे हे तुझ्या आणि माझ्यासह कोणाच्याही असण्यावर किंवा नसण्यावर अवलंबून नाही.

त्यामुळे कोणाचे प्राण गेले काय किंवा राहिले काय, ज्ञानी माणसे त्याविषयी कधीही शोक करीत नाहीत.
येथे तू , मी आणि हे सर्व राजे-महाराजे जमलेले आहोत, ते पूर्वी कधीही नव्हतो तसेच ह्या युद्धानंतर पुढे कधीही असणार नाही असे तू का समजतोऽऽस?
जेव्हा तू जन्माला आलास तेव्हा बालक होतास. काही कालानंतर कुमार झालास.
त्यापुढे काही कालानंतर तरूण युवक झालास. आणखी काही काल गेल्यानंतर तोच तू आज प्रौढ झाला आहेस.
आज तो बालक अर्जुन, कुमार अर्जुन आणि तरूण युवक अर्जुन कोठे आहेत ऽऽ? आता ते तिघेही अस्तित्वात नाहीत.
त्यांच्यासाठी कधी शोक करावा असे तुला वाटले काय ऽऽ? नाही!
आता ह्यापुढेही आणखी काही काल गेला म्हणजे तू म्हातारा होशील. त्यावेळी आजचा प्रौढ अर्जुन अस्तित्वात नसेल.
प्रत्येकाच्या बाबतीत हीच गोष्ट सतत घडत असलेली प्रत्यक्ष पहायला मिळते.
ज्याप्रमाणे एकाच देहामध्ये हे सर्व बदल घडून येतात त्याचप्रमाणे मनुष्याचा एक देह जाऊन त्याऐवजी दुसरा देह प्राप्त होतो.
हे सत्य जाणल्यामुळे ज्ञानी पुरुषाला जन्म आणि मरणाची भ्रांती उत्पन्न होत नाही.
सर्व इंद्रियांच्या द्वारे अनुभवास येणारे विषयांचे भोग हे क्षणभंगुर आहेत हे समजून घे आणि त्यांना सहन कर.
जो हे जाणतो त्याला सुख आणि दु:ख समान असतात.
इंद्रिये आणि त्यांच्या विषयांच्या योगे तो आनंदित किंवा दु:खी होत नाही आणि म्हणूनच तो मोक्ष प्राप्तीसाठी योग्य होतो.'
येथे देहाचे नाशित्व म्हणजेच अनित्यत्व सांगितले आहे. देह हा क्षणभंगुर आहे. त्याचा कधी ना कधी नाश होणारच आहे.
त्यामुळे देहाच्या असण्याला अगर नसण्याला, एका मर्यादेच्या पलीकडे महत्त्व देण्याचे व त्यासाठी दु:ख करण्याचे कारण नाही.

**नासतो विद्यते भाव: नाभावो विद्यते सत: ।**
**उभयोरपि दृष्टोऽन्त: त्वनयोस्तत्वदर्शिभि: ।। १६ ।।**
**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदन् ततम् ।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित् कर्तुमर्हति ।। १७ ।।**
**अन्तवन्त इमे देहा: नित्यस्योक्ता: शरीरिण: ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्मात् युध्यस्व भारत ।। १८ ।।**

' अर्जुना ऽऽ! ह्या विश्वामधे दोन सत्ता सतत कार्य करीत असतात.
त्यातली पहिली म्हणजे आपल्या डोळ्यांना नेहमी दिसणाऱ्या, अनेक रूपांनी नटलेल्या, विश्वाची सतत बदलणारी सत्ता.
तिला **' प्रकृती '** असे म्हणतात. ही सतत बदलत असते. तिच्यामधे सतत परिवर्तन होत असते.
किंबहुना ती सत्ता मुळामधे नसतेच. आपल्याला होणारे तिचे दर्शन हा केवळ भास असतो. तिचे अस्तित्व हा एक भास आहे.
समुद्राच्या पाण्यावरील लाटांच्यासारखा किंवा आकाशातल्या ढगांमधे दिसणाऱ्या अनेक पशु, पक्षी, राक्षस इत्यादींच्या आकारासारखा भास आहे.
दुसरी सत्ता म्हणजे ह्या बदलणाऱ्या सत्तेच्या मागे असलेली, कधीही न दिसणारी, कधीही न भासणारी परंतु सदैव अस्तित्वामधे असलेली सत्ता. तिला **' पुरुष '** असे म्हणतात.
ही सत्ताच अनेक नाम रूपांनी विलसत असते.
ज्याप्रमाणे अनेक लाटांना आधारभूत असलेला समुद्र सदैव असतो. लाटा आल्या किंवा गेल्या तरी समुद्राचे अस्तित्व नाहीसे होत नाही.
ज्याप्रमाणे अनेक आकारांनी दिसणाऱ्या ढगांना आधारभूत असलेले आकाश सदैव असते.
ढगांचे विविध आकार दिसले किंवा न दिसले, तरी आकाशाचे अस्तित्व नाहीसे होत नाही.
त्याचप्रमाणे ह्या नाम रूपांनी भासणाऱ्या विश्वाच्या मुळाशी जी कधीही न बदलणारी सत्ता आहे ती सदैव असते.
हे विश्व भासले काय किंवा न भासले काय, असले काय किंवा नसले काय, तिचे अस्तित्व नाहीसे होत नाही.
ज्ञानी पुरुषांनी ही महत्त्वाची गोष्ट जाणलेली आहे.
ज्याने हे सर्व जग व्यापलेले आहे, ते मूळ आत्मतत्त्व म्हणजेच आत्मा हा अविनाशी आहे. त्याचा नाश करणे कोणालाही शक्य होणार नाही. देह बदलत असला तरी त्यामध्ये राहणारा आत्मा नित्य असतो हे जो जाणतो,
तो पुरुष आसक्ति आणि तिच्या मुळे निर्माण होणाऱ्या आनंद किंवा दु:खासारख्या प्रतिक्रियांनी वाहवत जात नाही.
ही गोष्ट तू नीट समजून घे ऽऽ आणि **युद्धाला उभा रहा ऽऽ!**
कोणताही देह पंचमहाभूतांच्या संयोगाने उत्पन्न झालेला असतो, म्हणून तो केव्हातरी नष्ट होणार हे निश्चित.

देह हा अनित्य आहे, नाशिवंत आहे हे सांगून झाल्यावर, पुढे आत्म्याचे अनाशित्व म्हणजेच नित्यत्व सांगायला सुरवात केलेली आहे.

**य एनम् वेत्ति हन्तारम् यश्चैनम् मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतः नायम् हन्ति न हन्यते ।। १९ ।।**
**न जायते म्रियते वा कदाचिन् नायम् भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयम् पुराणः न हन्यते हन्यमाने शरीरे ।। २० ।।**
**वेदाविनाशिनम् नित्यम् य एनमजमव्ययम् ।**
**कथम् स पुरुषः पार्थ कङ् घातयति हन्ति कम् ।। २१ ।।**
**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णानि अन्यानि संयाति नवानि देही ।। २२ ।।**
**नैनञ् छिन्दन्ति शस्त्राणि नैनन् दहति पावकः ।**
**न चैनङ् क्लेदयन्त्यापः न शोषयति मारुतः ।। २३ ।।**
**अच्छेद्योऽयमदाह्योऽयम् अक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुः अचलोऽयम् सनातनः ।। २४ ।।**
**अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयम् अविकार्योऽयमुच्यते ।**
**तस्मादेवम् विदित्वैनम् नानुशोचितुमर्हसि ।। २५ ।।**

जो या आत्म्याला मारणारा समजतो आणि जो याला मरणारा समजतो ते दोघेही सत्य जाणत नाहीत. कारण हा आत्मा कोणाला मारीतही नाही आणि कोणाकडून मारलाही जात नाही. हा आत्मा कधीही जन्माला येत नाही किंवा मरतही नाही. हा एकदा होऊन पुन्हा होणारा नाही असेही नाही. हा आत्मा न जन्मणारा, नित्य, शाश्वत आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला तरी हा नाश पावत नाही. हे पार्था! हा आत्मा अविनाशी, नित्य, शाश्वत आणि अव्यय आहे हे जो जाणतो तो पुरुष कोणाला मारविणार कसा आणि मारणार तरी कसा? ज्याप्रमाणे एखादा पुरुष जुनी वस्त्रे टाकून देऊन दुसरी नवीन वस्त्रे परिधान करितो त्याच प्रमाणे आत्मा जुनी शरीरे टाकून दुसरी नवीन शरीरे धारण करतो. ह्या आत्म्याला शस्त्रे तोडू शकत नाहीत, अग्नि जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वारा सुकवू शकत नाही. कधीही न तुटणारा, न जळणारा, न भिजणारा आणि न सुकणारा हा आत्मा नित्य, सर्वत्र भरलेला, स्थिर, अचल आणि चिरंतन आहे. हा आत्मा इंद्रियांना अगोचर, मनानेही जाणण्यास अशक्य आणि विकाररहित आहे असे म्हणतात. त्यामुळेच अशा आत्म्याचा शोक करणे योग्य नाही.

अनादि कालापासून ह्या सर्व विश्वाचे कार्य अत्यंत अचूकपणे, काटेकोरपणे आणि सातत्याने चालविणाऱ्या वैश्विक शक्तीचे म्हणजेच परमात्म्याचे प्रतिबिंब किंवा प्रतिकृती असलेल्या जीवात्म्याचे अत्यंत समर्पक वर्णन केलेले आहे.

ह्यावर काहीही बोलणे शक्य नाही. काही बोलायची गरजही नाही. कारण आत्मा म्हणून जे काही आहे, ते मानवी शक्तीच्या आवाक्या पलीकडचे असून कोणत्याही प्रचलित साधनांनी त्याचे मोजमाप घेता येणार नाही.

आजपर्यंत कोणत्याही प्राण्याचा आत्मा कोणीही पाहिलेला नाही.

तरीही प्रत्येक जिवंत प्राण्याच्या शरीरामधे जीव किंवा आत्मा असतो आणि तो शरीर सोडून जातो तेव्हा प्राणी मरतो हे सर्वांना माहीत आहे. आधुनिक विज्ञान मृत्यूची व्याख्या करताना असे सांगते की,

" Clinical death is – Complete, Permanent and Irreversible termination of the **Vital Energy** within human body."

अर्थ — ' मानवी शरीरामधील **अत्यावश्यक ऊर्जेचे** पूर्णपणे, कायमचे आणि परत सुरू न करता येण्यासारखे थांबणे किंवा जाणे म्हणजे मृत्यू होय!'

ही **' व्हायटल एनर्जी!'** किंवा **' अत्यावश्यक ऊर्जा!'** म्हणजेच जीव किंवा प्राण किंवा आत्मा होय.

त्याला कोणतेही नांव द्या! काहीही म्हणा! किंवा काहीही म्हणू नका! त्याने काय फरक पडतो? तो दिसत नसेल तर नको दिसू दे! दिसत नसले तरी काहीतरी अलौकिक आहे आणि ते आहे म्हणूनच आपले, एक जिवंत माणूस म्हणून, अस्तित्व आहे हे मात्र सर्वांनाच मान्य आहे. आधुनिक विज्ञान ह्या ' एनर्जी! ' विषयी अधिक माहिती सांगताना म्हणते की,

" **Total energy** in the universe is constant. No body can neither create nor destroy energy. What we can do is, we can only change the form of existing energy."

अर्थ – विश्वातील **एकूण ऊर्जा** स्थिर आहे. ( पूर्ण! ) कोणीही ऊर्जा निर्माण करू शकत नाही किंवा ऊर्जा नष्ट करू शकत नाही.

आपण फक्त मुळामधे असलेल्या ऊर्जेचे स्वरूप बदलू शकतो. ( ऊष्णतेचे प्रकाशात, प्रकाशाचे ऊष्णतेत वगैरे )
म्हणजे ' आत्मा अमर आहे. त्याला निर्माण करता येत नाही. त्याचा नाश करता येत नाही. सर्व प्राणिमात्रांच्या आत तोच असतो. पाहणाऱ्याच्या दृष्टीला त्याचे बाह्यरूप मात्र वेगवेगळे दिसते.' हे, अपरोक्षपणे का असेना, विज्ञानालाही मान्य आहे.

**श्रीकृष्णाने पाच हजार वर्षांपूर्वी तेच सांगितले आहे.**

ह्या मताला छेद देणारी, आक्षेप घेणारी आणि त्याविषयी शंका व्यक्त करणारी अशी दुसरी एक विचारसरणी आहे.
त्या विचारसरणीचेही बरेच अनुयायी आहेत. पुढे त्यांच्या शंकेचा यथायोग्य समाचार घेतला आहे.

**अथ चैनम् नित्यजातम् नित्यम् वा मन्यसे मृतम् ।**
**तथापि त्वम् महाबाहो नैवम् शोचितु मर्हसि ॥ २६ ॥**
**जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवञ् जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वम् शोचितुमर्हसि ॥ २७ ॥**

आणि जरी तू ह्याला सदा जन्मणारा आणि सदा मरणारा मानीत असलास, तरीही हे महाबाहो ! त्याचा शोक करणे उचित नाही.
कारण जो जन्मला त्याला मृत्यू निश्चित आहे आणि जो मेला त्याला जन्म निश्चित आहे.
म्हणून ह्या अपरिहार्य गोष्टीचा शोक करणे उचित नाही.
ही चार्वाक पंथियांची विचारसरणी आहे. त्यांना परमेश्वराचे अस्तित्वच मान्य नाही.
पंच महाभूतांच्यापैकी **' आकाशतत्व '** त्यांना मान्य नाही.
कारण ते प्रत्यक्ष दिसत नाही. त्याचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही.
त्यांच्या मते पृथ्वी, आप, तेज आणि वायू ह्या चार तत्वांच्या पासूनच सर्व सृष्टी निसर्गतःच निर्माण झाली आहे.
ते नेहमीच सांगत असतात की, —
' प्रत्यक्ष दर्शन हे एकच प्रमाण आहे. जे दिसत नाही ते असणे शक्य नाही.
ह्या जगाचा निर्माता, पालनकर्ता आणि विनाशकर्ता असा कोणीही नाही.
सर्व विश्वाची निर्मिती ही निसर्गतःच घडून येत असते. तो निसर्गाचा स्वभाव आहे.
धर्म आणि अधर्म हे गाढवाच्या शिंगांच्यासारखे आहेत. ते अस्तित्वातच नाहीत. म्हणून शहाण्याने त्यांचा विचार करू नये.
देहाहून वेगळा असा **' आत्मा '** नांवाचा पदार्थ अस्तित्वात नाही. आत्म्याला स्वतंत्र अस्तित्वच नाही.
चैतन्याने युक्त असलेला देह किंवा देहाने युक्त असलेले चैतन्य हाच आत्मा आहे.
देहभिन्न आत्मा कधीही नसतो. देहरूप आत्माच असतो. तो देहाबरोबरच जन्मतो आणि देहाबरोबरच नष्ट होतो.'
त्याकाळीसुद्धा ही विचारसरणी मानणारे, तिच्यावर श्रद्धा असणारे, लोक होते.
त्यांच्या विचाराला अनुसरून अर्जुनाच्या मनामधे शंका येणे सहज शक्य होते.
ती शक्यता गृहीत धरून, त्या शंकेचेही निरसन केले आहे.
आता या पुढील तीन श्लोकात ' शरीराचे नाशित्व आणि आत्म्याचे अविनाशित्व ' ह्या विषयाचा समारोप केला आहे.

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥**
**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम् आश्चर्यवत् वदति तथैव चान्यः ।**
**आश्चैर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनम् वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥**
**देही नित्यमवध्योऽयम् देहे सर्वस्य भारत ।**
**तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वम् शोचितुमर्हसि ॥ ३० ॥**

हे अर्जुना ऽऽ! जन्म होण्याअगोदर सर्व प्राणिमात्र हे अव्यक्त असतात.
आपल्याला दिसत नाहीत म्हणून ते नसतातच असे मानणे अयोग्य आहे. जन्माला आल्यावर ते व्यक्त होतात म्हणजे आपल्याला दिसायला लागतात. ते आहेत असे वाटायला लागते. हा देखील एक प्रकारचा भ्रमच आहे.
शेवटी मृत्यूनंतर परत ते अव्यक्त होतात. आपल्याला दिसेनासे होतात. येथेही ते दिसत नसले तरीही अस्तित्वात असतातच.
तर मग त्यात शोक करण्यासारखे काय आहे?
आत्मा प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे, आत्मा म्हणजे एखादे आश्चर्य आहे असे मानून त्याच्याकडे पाहिले जाते, त्याचे वर्णन केले जाते आणि ते वर्णन ऐकलेही जाते.

परंतु असे करणाऱ्यांच्यापैकी कोणीही आत्म्याला तत्त्वतः **( In principle )** जाणत नाहीत.
देहाचे अस्तित्व हे संपूर्णपणे आत्म्यावरच अवलंबून असते.
परंतु आत्मतत्व हे देहामधे असूनही, देहावर अवलंबून नाही. ते स्वतंत्रच आहे.
अर्जुना ऽऽ! सर्वांच्या देहामध्ये असलेला आत्मा हा अमर आहे म्हणून तू कोणाच्याही मृत्यूबद्दल शोक करू नकोस ऽऽ!'
मागील बारा श्लोकांमधे आत्म्याचे शब्दचित्रच तयार केले आहे. आत्म्याचे संपूर्ण वर्णन केलेले आहे. सविस्तर वर्णन केलेले आहे. हे वर्णन इतक्या उत्तम प्रकारे केलेले आहे की, आपल्या डोळ्यांपुढे, अगदी सहजपणे, आत्म्याचे कल्पनाचित्र उभे राहते. आत्मतत्त्व कसे असेल ह्याची साधारण कल्पनाही येते.
त्यावर आणखी काही बोलणे शक्य नाही आणि तशी आवश्यकताही नाही. असो.
आता अर्जुनाला त्याच्या स्वधर्माची म्हणजेच क्षात्रधर्माची जाणीव करून द्यायला सुरवात केली आहे. आपला धर्म कोणता हे लक्षात घेऊन त्याप्रमाणे स्वधर्माचे आचरण करण्यासाठी उद्युक्त करायला सुरवात केली आहे.

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।**
**धर्म्याद्धि युद्धात् श्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ।। ३१ ।।**
**यदृच्छया चोपपन्नम् स्वर्गद्वारमपावृतम् ।**
**सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ।। ३२ ।।**
**अथ चेत् त्वमिमन् धर्म्यम् सङ्ग्रामम् न करिष्यसि ।**
**ततः स्वधर्मङ् कीर्तिञ् च हित्वा पापमवाप्स्यसि ।। ३३ ।।**
**अकीर्तिञ् चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।**
**संभावितस्य चाकीर्तिः मरणादतिरिच्यते ।। ३४ ।।**
**भयाद् रणादुपरतम् मंस्यन्ते त्वाम् महारथाः ।**
**येषाञ् च त्वम् बहुमतः भूत्वा यास्यसि लाघवम् ।। ३५ ।।**
**अवाच्यवादांश्च बहून् वदिष्यन्ति तवाहिताः ।**
**निन्दन्तस्तव सामर्थ्यम् ततो दुःखतरन् नु किम् ।। ३६ ।।**
**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।। ३७ ।।**
**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवम् पापमवाप्स्यसि ।। ३८ ।।**

शोकग्रस्त झाल्यामुळे आपल्या कर्तव्याचा विसर पडलेल्या अर्जुनाला श्रीकृष्ण सांगतो आहे की, ' अर्जुना ऽऽ! तुझ्या धर्माचा विचार केलास तरीही तुझे वागणे योग्य नाही. तू क्षत्रिय आहेस! योद्धा आहेस! महारथी आहेस! योग्य कारणासाठी युद्ध करणे हे तुझे पहिले आणि शेवटले कर्तव्य आहे. हे युद्ध करायची तुझी इच्छा नव्हती.
परंतु सामोपचाराचे सगळे मार्ग बंद करून, कौरवांनी तुमच्यावर हे युद्ध लादलेले आहे. आता न्याय मिळवण्यासाठी युद्ध करणे आवश्यक आहे आणि तोच तुझा धर्म आहे हे विसरू नकोस. कोणाही क्षत्रियाला धर्मोचित युद्धाहून अधिक कल्याणकारक असे दुसरे काहीही नाही. अशा प्रकारचे, **' सहजपणे उघडलेले स्वर्गाचे प्रवेशद्वारच '** असल्यासारखे, हे युद्ध भाग्यवंतांनाच प्राप्त होत असते. आता जर मागे फिरलास तर स्वधर्माचरण न केल्यामुळे तुझी अपकीर्ती होईल.'
' कल्पना नसताना, सहजपणे उघडलेले स्वर्गाचे प्रवेशद्वार!' ह्या कल्पनेला **ज्ञानेश्वर महाराजांनी** फार सुंदर उपमा दिली आहे.

**ना तरी जांभया पसरे मुख । तेथ अवचटे पडे पीयूख ।**
**तैसा संग्रामु हा देख । पातला असे ।। (ज्ञानेश्वरी अ. २/१९५)**

अर्थ — सहज जांभई देण्यासाठी म्हणून तोंड उघडावे आणि त्यामध्ये अचानक अमृताची धार पडायला लागावी, त्याप्रमाणे तुझ्या बलवत्तर अशा दैवयोगाने हे अद्वितीय असे महायुद्ध समोर आलेले आहे.
असे असूनही जर तू हे युद्ध लढला नाहीस, तर स्वधर्म आणि स्वकीर्तीला घालवून तर बसशीलच शिवाय स्वधर्माचे पालन न करण्याच्या पापाचा धनी मात्र होशील.
आता ह्या रणांगणातून युद्ध न करताच परत फिरलास तर सर्व लोक तुझी सदैव निंदाच करतील. तुझी कुचेष्टाच करतील.

**हे म्हणतील गेला रे गेला । अर्जुन आम्हां बिहाला ।**
**हा सांग बोलु उरला । निका कायी ।। (ज्ञानेश्वरी अ. २/२०८)**

अर्थ — तुझा हेतू काहीही असला तरीही, हे सर्व महारथी मात्र ' तू त्यांना घाबरलास आणि भिऊन रणांगणातून पळालास!' असेच म्हणतील. तुझी यथेच्छ निंदा करतील. तुझ्यावर असा दोष येणे चांगले आहे का सांग बघू?
हे सगळे महावीर योद्धे, आजवरचा तुझा पराक्रम विसरून जातील. तुला य:कश्चित मानून चारही बाजूंनी घेरतील आणि बाणांचा वर्षाव करतील. मग त्यांच्या तावडीतून तुझी सुटका होणार नाही.
यदाकदाचित् सुटका झालीच तरीही, तुझे ते जगणे मरणापेक्षाही वाईट असेल. अत्यंत दु:खदायक असेल.
अर्जुना ऽऽ! कोणत्याही स्वाभिमानी आणि शूर वीराला, त्याची अपकीर्ति ही मरणाहूनही फार फार वाईट असते. तू तर वीरांचाही वीर आहेस. अत्यंत कीर्तिवान योद्धा आहेस. म्हणूनच असा विचार करू नकोस! **दृढ निश्चय करून युद्धासाठी उभा रहा ऽऽ!**
ह्या युद्धामधे मारला गेलास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल आणि विजयी झालास तर सर्व पृथ्वीचे राज्य मिळवशील.
म्हणून ऊठ ऽऽ! इतर कोणताही विचार न करता केवळ **युद्धासाठी उभा रहा ऽऽ!**
सुख किंवा दु:ख, लाभ किंवा हानी, यश किंवा अपयश हे सारखेच मानून **निग्रहाने युद्ध कर ऽऽ!**
असे केलेस तर तुला कसलेही पाप लागणार नाही.

**एषा तेऽभिहिता साङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमाम् श्रुणु ।**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धम् प्रहास्यसि ।। ३९ ।।**

अर्जुना ऽऽ! येथपर्यंत मी तुला सांख्यमार्गाचे ज्ञान सांगितले. **ज्ञानयोग्यांची** विचारसरणी सांगितली.
आता योगमार्गाचे ज्ञान सांगतो ते ऐक.
ते ज्ञान समजून घेऊन आचरणात आणलेस तर, आपले कर्तव्यकर्म करूनही तू त्या कर्माच्या बंधनातून सुटशील.
आता येथून पुढे योगमार्गाचे म्हणजे कर्मयोगाचे विवेचनसुरू होते आहे. गीतेमधे **' योग.'** हा शब्द अनेक वेळा आलेला आहे.
त्यापैकी बहुतेक वेळी त्याचा अर्थ **' कर्मयोग.'** असाच आहे. हे सर्वांनी ध्यानात घेतले पाहिजे.
ह्या विषयाचे प्रतिपादन सर्वप्रथम **लोकमान्य टिळकांनी** केलेले आहे.
त्यांचा जगप्रसिद्ध असलेला **' श्रीमद् भगवद्‌गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र.'** नांवाचा ग्रंथ आपण सर्वांनी जरूर वाचावा असे माझे आग्रहाचे सांगणे आहे. तो ग्रंथ म्हणजे, ' अत्यंत कठीण विषय जास्तीत जास्त सोपा करून कसा सांगावा.' ह्याचे उत्तम उदाहरण आहे असे मला वाटते. असे असूनही, विषय समजून घेण्यासाठी, त्याचे अनेक वेळा वाचन करावे लागते. तो एकदा वाचून समजण्यासारखा विषय नाही.
गीतेमधे कोणत्या योगमार्गाचे प्रतिपादन प्रामुख्याने केलेले आहे?
गीता म्हणजे ज्ञानयोग आहे की कर्मयोग आहे? गीता म्हणजे राजयोग म्हणजेच अष्टांगयोग आहे की भक्तीयोग आहे?
गीता म्हणजे अद्वैतवादी भक्तीयोग आहे की द्वैतवादी भक्तियोग आहे?
गीता म्हणजे विशिष्टाद्वैतवादी भक्तीयोग आहे की शुद्धाद्वैतवादी भक्तीयोग आहे?
गीता म्हणजे पुरुषार्थयोग आहे की अनासक्तियोग आहे?
हा एक मोठा वादाचा प्रश्न आहे. त्याविषयी अनेक मतभेद आहेत. सर्व मतप्रणालींचे अनेक समर्थकही आहेत आणि विरोधकही आहेत. अनेक विद्वान व्यक्तींनी उत्तमोत्तम ग्रंथ लिहून आपापल्या मतांचे समर्थनही केलेले आहे.
ते ग्रंथ वाचताना, वाचकाला प्रत्येकाचे म्हणणे योग्यच आहे असे वाटायला लागते.
' गीतेमधे हेच सांगितलेले आहे.' किंवा ' गीतेमधे हे सुद्धा सांगितलेले आहे.' असे वाटायला लागते. त्यामागे ग्रंथकर्त्यांची प्रगाढ बुद्धिमत्ता, गीतेचा दीर्घकाळ केलेला अभ्यास आणि आपला प्रतिपादनाचा विषय मांडण्याची उत्कृष्ट पद्धती ह्यांचा फार मोठा हात आहे.
हे जरी खरे असले तरीही तर्कशास्त्राचा आधार घेतला असता, एक गोष्ट मात्र निश्चितपणे समजते. ती म्हणजे गीतोपदेशाचा परिणाम, ' भारतीय युद्धारंभी शस्त्रत्याग करून, लढण्यास नकार देणारा अर्जुन, भगवंताच्या मुखामधून गीतोपदेश ऐकल्यानंतर युद्धासाठी सज्ज झाला आणि त्याने पुढे अठरा दिवसांचे घनघोर युद्ध करून शत्रूवर अंतीम विजय मिळवला.' हाच आहे.
' गीतेतला उपदेश करणे!' हे श्रीकृष्णाचे **' कार्य '** आहे. कोणतेही कार्य कारणाशिवाय घडून येत नाही.
गीतोपदेशाच्या कार्यामागे ' अर्जुनाचे युद्धकर्म करायचे नाकारणे!' हेच **' कारण '** आहे. कोणत्याही प्रभावीपणे केलेल्या कार्याचा योग्य परिणाम होतोच. गीतोपदेशाच्या कार्याचा ' अर्जुनाने परत युद्ध करायला तयार होणे!' हाच **' परिणाम '** आहे.
त्यामुळे गीतेमधे इतर कोणत्याही मार्गापेक्षा निष्काम कर्मयोगाचेच प्रामुख्याने प्रतिपादन केले आहे असे म्हणावयास हरकत नसावी.

आपण जर गीतेच्या शब्दांची आणि त्यांच्यामधून व्यक्त होणाऱ्या अर्थाची कोणतीही ओढाताण न करता, अलिप्तपणे विचार केला तर हेच सत्य समोर येते. असो.

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥**
**व्यवसायात्मिका बुद्धिः एकेह कुरुनन्दन ।**
**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥**
**यामिमाम् पुष्पिताम् वाचम् प्रवदन्त्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥**
**कामात्मानः स्वर्गपराः जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलाम् भोगैश्वर्यगतिम् प्रति ॥ ४३ ॥**
**भोगैश्वर्यप्रसक्तानाम् तयाऽपहृतचेतसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥**
**त्रैगुण्यविषया वेदाः निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थः निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥**
**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।**
**तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥**

मनामधे कोणतीही फलाशा न बाळगता, नेहमी केवळ आपले कर्तव्य म्हणून कर्म करणाऱ्या माणसाचे कर्म कधीही व्यर्थ होत नाही, त्याच्या मार्गात विघ्नही येत नाही आणि त्या कर्माचे विपरीत फळ मिळायची शक्यताही उरत नाही. निष्काम कर्मयोगाचे थोडेसे आचरणही मनुष्याचे मोठ्या भयापासून रक्षण करते. नेहमी कशाचीतरी अपेक्षा बाळगून कर्म करायला प्रवृत्त होणारे लोक, वेदांमधील सकाम कर्मपद्धती आणि त्या पद्धतीने कर्मे केली असता काय लाभ होईल हे सांगणाऱ्या फलश्रुती ह्यांचा आधार घेऊन, स्वर्गप्राप्तीची इच्छा बाळगून, अनेक प्रकारचे यज्ञयाग करीत राहतात आणि ' जन्म - नाना प्रकारचे ऐश्वर्यभोग - मृत्यू ' ह्या चक्रामधे अडकून राहतात. त्यामुळे त्यांची, कार्य आणि अकार्य ह्यांचा निर्णय करणारी बुद्धी एकाच ठिकाणी स्थिर रहात नाही. सदैव भरकटत असते. ह्या उलट, ज्याला आत्मज्ञान प्राप्त झाले आहे त्याच्यासाठी वेदांमधे सांगितलेले सकाम कर्म अनावश्यक ठरते. ज्याप्रमाणे एखाद्या तहानलेल्या माणसाला, सर्वत्र शोध घेत असताना, पाण्याने काठोकाठ भरलेला मोठा जलाशय मिळाला म्हणजे त्याची तहान सर्वार्थाने भागते आणि त्यानंतर त्याला एखाद्या लहान विहिरीचा शोध घेऊन तिच्यामधील पाणी पीत राहण्याची गरज भासत नाही, तशी आवश्यकताच उरत नाही, त्याचप्रमाणे एकदा आत्मज्ञान प्राप्त झाले म्हणजे मग त्या आत्मनिष्ठ ज्ञानी माणसाला, कर्मकांड करायला सांगणारे वेद आणि त्यामुळे होणारे ऐहिक लाभ ह्यांची आवश्यकताच रहात नाही. त्याची, कार्य आणि अकार्य ह्यांचा निर्णय करणारी बुद्धी नेहमीच स्थिर राहते. कुठेही भरकटत नाही. फलाशा नसल्यामुळे, तो तटस्थपणे विचार करून निर्णय घेऊ शकतो. निश्चय करू शकतो.

येथे कर्मयोगाच्या आचरणासाठी आवश्यक असणारी विशिष्ठ प्रकारची बुद्धी आणि तिला अनुसरून केलेल्या आचरणामुळे होणारा लाभ सांगितला आहे. त्यासाठीच अर्जुनाला आत्मनिष्ठ होण्यास, आत्मज्ञानी होण्यास सांगितले आहे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूः मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥**

कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे. फळ मिळणे किंवा न मिळणे हे केव्हाही तुझ्या अधिकारातले नाही. म्हणून तू कर्माच्या फळाची इच्छा करणारा होऊ नको आणि कर्मे न करण्याचाही आग्रह धरू नको.

हा श्लोकही फार फार महत्त्वाचा आहे. वादविवाद निर्माण करणारा आहे.

वरवरचा विचार करणाऱ्या कोणालाही त्याचा अर्थ मान्य होणे कठीण आहे. कसे ते सांगतो.

ह्या विषयी आपण थोडा अधिक विचार करूया.

कर्म करायचे पण फळाची अपेक्षा ठेवायची नाही म्हणजे काय?

**१) मी नोकरी करतो ती कशासाठी?**

नोकरी केल्यावर मला दरमहा पगार मिळालाच पाहिजे. तो माझा अधिकार आहे.

तसेच नोकरीमधे दरवर्षी पगारवाढही मिळालीच पाहिजे. माझ्या **' अपॉइंटमेंट लेटर '** मधे तसे ठरलेले आहे.

मला स्वत:च्या आणि माझ्या कुटुंबियांच्या गरजा भागवायच्या असतात. महागाई किती झाली आहे माहीत आहे काय? महिन्याच्या अखेरीला नाकी नऊ येतात. माझी हालत खराब होते. तुम्हाला बोलायला काय जाते?

**२) मी व्यवसाय करतो तो कशासाठी?**

व्यवसायामधे मला नफा मिळालाच पाहिजे. नफा मिळणार नसेल तर व्यवसाय कशाला करायचा? समोर आलेल्या ग्राहकाला हवा असलेला माल देताना, मी त्याच्याकडून मालाची किंमत आणि माझा नफा घेणार हे गृहीत धरलेले असते. तो माझा अधिकार आहे. धंद्यात होणारा फायदा हाच माझा **' देव '** आहे आणि फायदा मिळवण्यासाठी जे जे करावे लागेल ते ते करणे हाच माझा **' धर्म '** आहे. बाकी मला काहीही माहीत नाही. बोलणाऱ्यांना काय बोलायचे असेल ते बोलू द्या.

मला काहीच फरक पडत नाही. मी असाच राहणार.

**३) अरेऽऽ, तुम्ही हे काय बोलत आहात?**

कोणतेही काम करताना ते करणाऱ्यासमोर काहीतरी ध्येय असलेच पाहिजे.

ते नसले तर काम करायची प्रेरणाच निर्माण होणार नाही. काम सुरूच होणार नाही. ठरविलेले ध्येय गाठणे हे त्या कामाचे फळच असते. ते का नाकारायचे? आणि जर फळ नकोच असेल तर झाड लावायचेच कशाला?

शेताची नांगरणी करून धान्य पेरायचेच कशाला? खतपाणी देऊन त्याची निगा राखायचीच कशाला? शेतावर राहून, दिवसरात्र डोळ्यात तेल घालून, जनावरे आणि चोरचिलटांपासून पिकाचे रक्षण करायचेच कशाला? तुम्ही मला वेडा समजता काय?

तुम्ही समजत असलात तरी मी शहाणा आहे. अजून मला वेड लागलेले नाही !!!!

किती प्रश्न विचारले जातात पहा. सगळे प्रश्न आपापल्या जागी बरोबरच आहेत.

त्यामधे चुकीचे असे काहीही नाही. वाद होतो तो श्लोकाचा योग्य अर्थ न समजल्यामुळे!

**' कर्मण्येवाधिकारस्ते -'** म्हणजे तुझा अधिकार कर्म करण्याचाच आहे.

**' मा फलेषु कदाचन! '** म्हणजे कर्माचे फळ मिळणे किंवा न मिळणे हे तुझ्या अधिकारात नाही.

कर्माचे फळ तुझ्या अधिकारात नाही ह्या विधानाचा अर्थ ' तुला तुझ्या कर्माचे फळ मिळणारच नाही.' असा होत नाही.

श्रीकृष्ण भगवान तसे म्हणालेले नाहीत. आपण केलेल्या कर्माचे फळ तर प्रत्येकाला मिळणारच.

जसे कर्म कराल तसे फळ प्राप्त होईल. त्यापासून कोणाचीही सुटका नाही.

वाईट कर्माचे फळ वाईटच असेल आणि चांगल्या कर्माचे फळ चांगलेच असेल.

**कर्म हे स्वत: चांगले किंवा वाईट नसते! ते केवळ कर्म असते!**

एखादे कर्म करणाऱ्या माणसाचा म्हणजेच कर्त्याचा त्यामागील **हेतू,** त्याची **वृत्ती** आणि त्याची **आसक्ती** ह्या तीन गोष्टींच्या वरून त्याचे कर्म चांगले आहे की वाईट आहे, सत्कर्म आहे की दुष्कर्म आहे, ते ठरत असते!

काही कर्मांचे फळ तात्काळ मिळेल. काही कर्मांचे फळ थोड्या उशिराने मिळेल.

काही कर्मांचे फळ फार उशिराने मिळेल. कदाचित् पुढल्या जन्मामधे मिळेल.

असे बघा ऽऽ! सगळे काही योग्य प्रकारे केले, आवश्यक ती काळजी घेतली आणि दैवाची साथ मिळाली तर —

**केळीचे** झाड लावले तर एका वर्षाने केळी खायला मिळतील.

**पपयीचे** झाड लावले तर तीन वर्षांनी पपया खायला मिळतील.

**आंब्याचे** झाड लावले तर दहा वर्षांनी आंबे खायला मिळतील.

**कोकणी नारळाचे** झाड ( माड ) लावले तर वीस वर्षांनी नारळ मिळतील.

असे म्हणतात की जो माड लावतो त्याला सहसा नारळ खायला मिळत नाहीत. त्याच्या मुलाबाळांना मात्र आयुष्यभर नारळ खायला मिळतात. त्यामुळे त्याविषयी काही सांगणे कठीण आहे. परंतु कर्मफळ मिळणारच.

या विश्वामधे कोणत्याही जीवाने केलेल्या प्रत्येक कृतीला फळ आहे.

अगदी **' विचार करणे.'** ही सुद्धा एक कृतीच आहे आणि तिचेही फळ आहे.

ह्या फळ देणाऱ्या कृतीलाच **' कर्म!'** असे म्हणतात. प्रत्येकाच्या सर्व कर्मांची काटेकोरपणे नोंद ठेवली जाते.

तशी नोंद ठेवणाऱ्याला **' चित्रगुप्त!'** असे म्हणतात. चित्रगुप्त ह्या नांवाला विशेष अर्थ आहे. आपल्या प्रत्येक कर्माची नोंद ही, आपल्याला न दिसणाऱ्या अशा कॅनव्हासवर म्हणजेच आकाश तत्त्वाच्या पडद्यावर चित्ररूपाने ठेवली जाते.

**आपल्या नकळत, गुप्तपणे, चित्ररूप नोंदी ठेवणारा म्हणून तो चित्रगुप्त!**

ह्यालाच **' विधिलिखित!'** असे म्हणतात.

ब्रह्मविद्येमधला कर्माचा सिद्धांत हेच सांगतो. **( Law of Karma.)**
हा सिद्धांत भौतिक शास्त्रातल्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताइतकाच अचूक आहे. **( Law of Gravity.)**
कोणाला मान्य असो किंवा नसो, पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण बल आपले कार्य करणारच.
तसेच कोणाला मान्य असो किंवा नसो, प्रत्येकाला कर्माचे बरे वाईट फळ मिळणारच. भगवान असे सांगत आहेत की,
' जर तुम्ही फळाची अपेक्षा बाळगून कर्म कराल, फळ मिळावे म्हणून कर्म कराल, तर मर्यादित फळ मिळेल. कमीतकमी फळ मिळेल. परंतु जर तुम्ही फळाची अपेक्षा न ठेवता कर्म कराल, केवळ तुमचे कर्तव्य म्हणून निरपेक्षपणे कर्म कराल, केवळ कर्मासाठीच कर्म कराल तर अमर्याद फळ मिळेल. अनंत फळ मिळेल.'
हीच गोष्ट व्यावहारिक भाषेत सांगायची झाली तर कशी सांगता येईल ते ऐका.
समजा आपण एखाद्या बँकेमधे मुदत ठेव योजनेत पैसे गुंतवले. तर काय होते?
आपल्याला दर वर्षासाठी एका ठरावीक दराने व्याज मिळते आणि आपण गुंतवलेले पैसे जसेच्या तसे राहतात.
मुदत संपली की आपले पैसे आपल्याला परत मिळतात. मुदत जितकी जास्त तितके व्याजही जास्त मिळत जाते.
म्हणजेच आपल्या गुंतवणुकीचे फळ मुदतीच्या प्रमाणात वाढायला लागते.
आता जर आपण बँकेला सांगितले की, ' आम्ही गुंतवलेले पैसे आम्हाला कधीही परत नकोत. ते पैसे, ठेव म्हणून, कायमचे तुमच्याकडेच असू देत.' तर मग काय होईल?
बँक आपले पैसे ठेवून घेईल आणि आपल्याला अनंत काळासाठी व्याज देत राहील. आपल्याला अनंत फळ मिळेल.
आता असे समजा की, आपण गुंतवलेले पैसे म्हणजे **' कर्म!'.** गुंतवणूकीची मुदत अनंत काळ.
म्हणजे आपण गुंतवणुकीचे फळ अनंतकाळ नाकारले आहे. पण म्हणून आपल्याला फळ मिळायचे थांबणार नाही. फळ तर मिळणारच. उलट आपल्याला कर्माच्या अनेक पटीने जास्त फळ मिळेल. अनंत फळ मिळेल.
आपले कर्म जर चांगले असेल तर फळही चांगलेच मिळेल आणि कर्म जर वाईट असेल तर त्याचे फळही वाईटच मिळेल.
**' मा कर्मफलहेतुर्भूः - '** म्हणून फलप्राप्तीचा हेतू बाळगून, फळाकडे लक्ष ठेवून कर्म करणारा होऊ नकोस.
**' मा ते संगोऽस्त्वकर्मणि! '** आणि कर्म न करण्याचा आग्रहही धरू नकोस.
तसा विचार करू नकोस. उलट फलाची आसक्ती न ठेवता कर्म केलेस तर त्या कर्माच्या बंधनामधे अडकणार नाहीस.
भगवान सर्वांनाच असे सांगत आहेत की,
**' आपल्या धर्माला अनुसरून आपले जे कर्तव्य आहे, ते कर्तव्य मनापासून पार पाडा!**
**अत्यंत प्रामाणिकपणे काम करा! देहभान विसरून काम करा!**
**आपली सर्व शक्ती पणाला लावून काम करा! आपले लक्ष पूर्णपणे केंद्रित करून काम करा!**
**यशाची किंवा अपयशाची चिंता करू नका! शंका बाळगू नका!**
**आपले प्रत्येक काम म्हणजे देवाची पूजाच आहे असे समजून करा!**
**देव आपल्या कर्मामधे दडलेला आहे! तुम्ही आपले काम उत्तम प्रकारे केलेत तर,**
**तुम्हाला त्या पूर्ण झालेल्या कामामधेच देवाचे दर्शन होईल!**
**देव अत्यंत आनंदाने हसत हसत तुमच्याकडे पाहील! प्रेमाने पाहील!**
**तुमचे कौतुक करील आणि तुम्हाला आशिर्वाद देईल!'**
ह्या सांगण्यामधे जराही अतिशयोक्ती नाही. जराही खोटेपणा नाही. मी हा अनुभव ह्यापूर्वी अनेकवेळा घेतलेला आहे.
आजही घेतो आहे. साधे ' घरातला कचरा काढायचे ' काम असले तर ते कामही मन लावून करा. जीव ओतून करा.
तुम्ही स्वच्छ केलेल्या घरामधे तुम्हाला देवाचे दर्शन होईल. मनापासून प्रयत्न केलात तर आपल्यालाही असाच अनुभव येईल.
ह्या विषयी माझ्या मनामधे तिळमात्र शंका नाही. असो.

**योगस्थः कुरु कर्माणि सङ्गम् त्यक्त्वा धनंजय ।**
**सिध्यसिध्योः समो भूत्वा समत्वम् योग उच्यते ।। ४८ ।।**

हे धनंजया ! आसक्ती सोडून व कर्मे सिद्ध होवोत किंवा निष्फल होवोत, दोन्ही सारखीच मानून, योगस्थ होऊन म्हणजे योगामधे स्थिर होऊन कर्म कर. कर्माच्या ठिकाणी असलेल्या ह्या सारखेपणाच्या वृत्तीलाच योग म्हणतात.
कर्मसिद्धांतामधे कर्माचे तीन प्रकार सांगितलेले आहेत.
१) **संचित कर्म** — ही प्रत्येकाच्या आतापर्यंत झालेल्या सर्व जन्मांमधील सर्व कर्मांची गोळाबेरीज असते.

२) **प्रारब्ध कर्म** — हे मागे कधीतरी केलेले आणि आता फळाला आलेले कर्म असते. ह्या कर्माचा प्रभाव चालू आयुष्यामधील घटनांमधे सतत जाणवतो. पण आपल्याला तो समजत नाही. जर यश मिळाले तर आपण स्वत:ला कर्तृत्ववान समजतो आणि अपयश आले तर देवाला किंवा दैवाला दोष देत राहतो.

३) **क्रियमाण कर्म** — हे ह्या जन्मातील आपल्या बऱ्या - वाईट वर्तणुकीमधून नुकतेच जोडले गेलेले कर्म असते. ह्याचा परिणाम आपल्या भविष्यावर होत असतो.

ही तीनही प्रकारची कर्मे प्रत्येक जीवाला जोडली गेलेली असतात, सतत जोडली जात असतात आणि भविष्यामधेही जोडली जात राहतात. ह्या कर्मविपाक प्रक्रियेचा सहज परिणाम म्हणून प्रत्येक प्राणी त्याने केलेल्या कर्मांचे फळ भोगण्यासाठी, जन्म - मरणाच्या चक्रामधे फिरत राहतो. जोपर्यंत तीनही प्रकारच्या कर्मांची फळे भोगून संपत नाहीत आणि त्यांचे बंधन गळून पडत नाही तोपर्यंत कोणाही प्राण्याचे जन्म - मरणाचे चक्र थांबत नाही.

**ह्याला अपवाद आहे तो निष्काम कर्माचा.**

कर्त्याचा हेतु शुद्ध असेल, वृत्ती सात्त्विक असेल आणि तो स्वार्थविरहित व आसक्तिरहित असेल तर त्याला कोणत्याही कर्माचे बंधन पडत नाही. आपले कर्म सफळ होवो किंवा निष्फळ होवो, त्याला दोन्ही सारखेच असते.

फलासक्ती नसल्यामुळे सर्व प्रकारची कर्मे करूनही, तो त्यांच्यापासून अलिप्त असतो.

येथे कर्मयोगाची एक व्याख्या सांगितली आहे. ' **समत्वम् योग उच्यते ।**' म्हणजे —

**' यशापयशाविषयीच्या ह्या सारखेपणाच्या वृत्तीलाच योग असे म्हणतात.'**

**दूरेण ह्यवरङ् कर्म बुद्धियोगात् धनंजय ।**
**बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ।। ४९ ।।**
**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्मात् योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।। ५० ।।**

हे धनंजया ! बुद्धीच्या सारखेपणाच्या योगापेक्षा सकाम कर्म फारच कनिष्ठ होय. म्हणून ह्या साम्यबुद्धीला शरण जा. फलाकडे लक्ष ठेवून असणारे लोक हे खालच्या पायरीचे होत. साम्यबुद्धीने जो युक्त झाला तो पाप आणि पुण्य ह्या दोहोंपासून या लोकी अलिप्त राहतो म्हणून योगाचा आश्रय कर. पापपुण्य न लागता कर्म करण्याचे जे कौशल्य त्यालाच योग असे म्हणतात.

कर्म करायचे अजिबात नाकारण्यापेक्षा, कोणत्यातरी फलप्राप्तीसाठी केलेले कर्म हे तुलनेने उजवे असले तरीही, निष्काम कर्माहून खालच्या पातळीचे असते.

तसेच सदैव फळाकडेच लक्ष ठेवून कर्म करणारे लोक हे निष्काम कर्म करणाऱ्यापेक्षा खालच्या पायरीवर असतात.

परंतु ज्याला यशापयशाविषयी समत्वबुद्धी प्राप्त होते, तो पाप आणि पुण्य ह्या दोघांच्याही पासून सदैव अलिप्त राहतो.

म्हणून निष्काम कर्मयोगाचा आश्रय करावा असे भगवान सांगत आहेत.

येथे कर्मयोगाची अजून एक व्याख्या सांगितली आहे. **' योगः कर्मसु कौशलम् ।'** म्हणजे —

**' पाप किंवा पुण्य न लागता आपले विहित कर्म करण्याचे जे कौशल्य असते त्यालाच योग असे म्हणतात.'**

**कर्मजम् बुद्धियुक्ता हि फलन् त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदङ् गच्छन्त्यनामयम् ।। ५१ ।।**
**यदा ते मोहकलिलम् बुद्धिर्व्यतितरिष्यति ।**
**तदा गन्तासि निर्वेदम् श्रोतव्यस्य श्रुतस्य च ।। ५२ ।।**
**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिः तदा योगमवाप्स्यसि ।। ५३ ।।**

ज्ञानी पुरुष समत्व बुद्धीने युक्त झाले म्हणजे कर्मफलाचा त्याग केल्याने ते जन्मबंधापासून मुक्त होऊन अमृतमय परम पदाला जाऊन पोहोचतात. जेव्हा तुझी बुद्धी मोहरूपी चिखलाला तरून जाईल तेव्हा तुला ऐकण्यासारख्या व ऐकलेल्या गोष्टींविषयी वैराग्य प्राप्त होईल. नानाप्रकारच्या वेदवाक्यांनी गोंधळून गेलेली तुझी बुद्धी जेव्हा समाधिवृत्तीत स्थिर होईल तेव्हा तुला हा योग प्राप्त होईल.

ज्याला आत्मज्ञान झालेले आहे अशा पुरुषाने समत्व बुद्धीचा स्वीकार केला म्हणजे मग तो अगदी सहजपणे कर्मफलाचा त्याग करतो. त्याला तसा त्याग करायचे ठरवावे लागत नाही. त्याचा कर्मफलाचा त्याग अत्यंत नैसर्गिकपणे होत राहतो.

त्यामुळेच कर्माचे बंधन न राहिल्यामुळे, जन्म आणि मृत्यूच्या चक्रामधून मोकळा होऊन तो, जेथे जन्म आणि मृत्यू दोन्हीही नाहीत

अशा, अमरत्वाला, परमेश्वरत्वाला जाऊन पोहोचतो. परंतु असे प्रत्यक्षपणे केव्हा घडून येऊ शकते?
अर्जुना ऽऽ! जेव्हा तुझी बुद्धी आप्तेष्टांच्या विषयी वाटणाऱ्या आसक्ती आणि मोहा मधून बाहेर येईल, जेव्हा अनेक प्रकारच्या वेदवाक्यांनी आणि त्यामधे सांगितलेल्या सकाम कर्मांच्या फलश्रुतींनी गोंधळून गेलेली तुझी बुद्धी अत्यंत समतोल होईल, समाधी वृत्तीत स्थिर होईल, तेव्हा तुला आजपर्यंत ऐकलेल्या आणि ऐकावयाच्या सर्व वेदोक्त कर्मकांडात्मक गोष्टींच्याविषयी विरक्तता प्राप्त होईल. उदासीनता प्राप्त होईल. निरिच्छता प्राप्त होईल आणि मग तुला सहजपणे निष्काम कर्मयोगाची प्राप्ती होईल.
श्रीकृष्ण जे सांगतो आहे ते लक्षपूर्वक ऐकून, अर्जुन त्यावर विचार करतो आहे.
अर्थातच त्याच्या मनामधेही शंका यायला सुरवात होते आहे.
आपल्या मनामधे आलेल्या शंकांचे निराकरण करण्यासाठी तो प्रश्नही विचारतो आहे.

**अर्जुन उवाच :**

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।**
**स्थितधी: किम् प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।। ५४ ।।**

हे केशवा ! समाधिस्थ स्थितप्रज्ञ कोणाला म्हणावे? त्याचे बोलणे, बसणे व चालणे कसे असते?
येथे अर्जुनाच्या मनामधे एक प्रश्न उपस्थित झाला आहे.
श्रीकृष्ण आपल्याला आत्मज्ञानी व्हायला सांगतो आहे. आत्मनिष्ठ व्हायला सांगतो आहे. समत्वबुद्धीचा स्वीकार करायला सांगतो आहे.
माया - मोह - लोभ - आसक्ती ह्यांच्यापासून मोकळे व्हायला सांगतो आहे. कर्मफळाच्याविषयी उदासीन व्हायला सांगतो आहे.
स्वधर्माचे पालन करायला सांगतो आहे. निरपेक्षपणे आपले विहित कर्म करायला सांगतो आहे.
हे सर्व काही पाळून, त्यानुसार आपले आयुष्य जगणारा माणूस कसा असेल?
एकटा असताना किंवा समाजामधे वावरत असताना तो कसा वागत असेल?
इतरांच्या बरोबर कसा बोलत असेल? तो आपले सर्व दैनंदिन व्यवहार कसे पार पाडीत असेल?
हे प्रश्न त्याने श्रीकृष्णाला विचारले. श्रीकृष्णाने त्याच्या प्रश्नांचे सविस्तर उत्तर दिले.
पुढील अठरा श्लोकांमधे आदर्श पुरुषाचे सविस्तर वर्णन आलेले आहे.
स्थितप्रज्ञ होऊ इच्छिणाऱ्या आणि त्या दिशेने प्रयत्न करणाऱ्या माणसाच्या मार्गामधे येणाऱ्या अडथळयांची माहितीपण दिलेली आहे.
हे उत्तर म्हणजे, ' कोणाही माणसाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी एक आदर्श पाठ आहे.'
व्यक्तिमत्व विकास म्हणजेच **( Personality Development.)**
अनेक तरुण आपले व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी, हजारो रुपये फी देऊन, क्लासला जातात.
त्याचा खरोखर किती फायदा होतो ते त्यांचे त्यांनाच माहीत. त्यांना माझे आग्रहाचे सांगणे आहे की, —
' एकदा हा धडाही वाचून पहा. त्याचा अभ्यास करून पहा. तो आपल्या आचरणात आणायचा मनापासून प्रयत्न करून पहा.'
तसे केलेत तर तुमचा व्यक्तिमत्व विकास आपोआप घडून येईल.

**श्रीभगवानुवाच :**

**प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।। ५५ ।।**
**दु:खेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।**
**वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते ।। ५६ ।।**
**य: सर्वत्रानभिस्नेहः तत् तत् प्राप्य शुभाशुभम् ।**
**नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ५७ ।।**
**यदा संहरते चायम् कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।**
**इंद्रियाणिंद्रियार्थेभ्य: तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ५८ ।।**
**विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।**
**रसवर्जम् रसोऽप्यस्य परम् दृष्ट्वा निवर्तते ।। ५९ ।।**
**यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभम् मन: ।। ६० ।।**

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।**
**वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ६१ ।।**
**ध्यायतो विषयान् पुङ्सः सङ्गस्तेषूपजायते ।**
**सङ्गात् सञ्जायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते ।। ६२ ।।**
**क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः ।**
**स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशः बुद्धिनाशात् प्रणश्यति ।। ६३ ।।**
**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।। ६४ ।।**
**प्रसादे सर्वदुःखानाम् हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ।। ६५ ।।**
**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शान्तिः अशान्तस्य कुतः सुखम् ।। ६६ ।।**
**इंद्रियाणाम् हि चरताम् यन्मनोऽनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञाम् वायुर्नावमिवाम्भसि ।। ६७ ।।**
**तस्मात् यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।**
**इंद्रियाणीनिद्रयार्थेभ्यः तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ६८ ।।**
**या निशा सर्वभूतानाम् तस्याञ् जागर्ति सञ्यमी ।**
**यस्याञ् जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।। ६९ ।।**
**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम् समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यम् प्रविशन्ति सर्वे सः शान्तिमाप्नोति न कामकामी ।। ७० ।।**
**विहाय कामान्यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ।। ७१ ।।**
**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनाम् प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ।। ७२ ।।**

हे पार्था ! जेव्हा मनामधील सर्व वासना सोडून आपण आपल्या ठायीच संतुष्ट होऊन राहतो, तेव्हा त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. दु:खात ज्याला खेद होत नाही, सुखात ज्याला आसक्ती नाही आणि ज्याचे प्रीति, भय व क्रोध नष्ट झाले, त्याला स्थितप्रज्ञ मुनी म्हणतात. सर्वच गोष्टीत ज्याचे मन नि:संग झाले आणि ज्याला यथाप्राप्त शुभाशुभाचा आनंद किंवा दु:ख होत नाही त्याची बुद्धी स्थिर झाली असे म्हणायचे. ज्याप्रमाणे कासव आपले अवयव सर्व बाजूंनी आखडून घेतो त्याप्रमाणे एखादा पुरुष आपल्या इंद्रियांना त्यांच्या विषयांच्या पासून आवरून धरतो तेव्हा त्याची बुद्धी स्थिर झाली असे म्हणायचे. निराहारी पुरुषाचे विषय सुटले तरी त्यातील गोडी सुटत नाही पण परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यावर विषय व त्यातील गोडी ही दोन्ही सुटतात. हे कौंतेया ! इंद्रियदमनासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्वानाचे मन देखील ही इंद्रिये बलात्काराने भलतीकडे ओढून नेतात. म्हणून या सर्व इंद्रियांचे संयमन करून योगयुक्त व मत्परायण होऊन रहावे. आपली इंद्रिये ज्याच्या स्वाधीन झाली त्याची बुद्धी स्थिर झाली असे म्हणायचे.

विषयाचे चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्या विषयात आसक्ती उत्पन्न होते आणि आसक्तीमुळे कामना उत्पन्न होते. त्या कामनेच्या आड विघ्न आले म्हणजे क्रोध उत्पन्न होतो. क्रोधापासून अविवेक उत्पन्न होतो, अविवेकापासून स्मरणशक्ती भ्रष्ट होते, स्मृतिभ्रमापासून बुद्धिनाश होतो आणि बुद्धिनाशापासून पुरुषाचा सर्वस्वी घात होतो. परंतु स्वाधीन अंत:करणाचा पुरुष, प्रीती व द्वेष सुटलेल्या व आपल्या स्वाधीन असलेल्या इंद्रियांनी विषयांना भोगीत असतानाही चित्ताने प्रसन्न असतो. चित्त प्रसन्न असले म्हणजे त्याच्या सर्व दु:खांचा नाश होतो कारण ज्याचे चित्त प्रसन्न त्याची बुद्धीही तात्काळ स्थिर होते. जो पुरुष योगयुक्त झालेला नाही त्याला स्थिरबुद्धी आणि भावनाही नसते. ज्याला भावना नाहीत त्याला शांती नाही आणि ज्याला शांती नाही त्याला सुख तरी कोठून मिळणार? पाण्यामधील नावेला वारा ज्याप्रमाणे पळवतो त्याचप्रमाणे विषयात संचरणाऱ्या इंद्रियांच्या मागोमाग जाणारे मन पुरुषाची बुद्धी हरण करीत असते. म्हणून, हे महाबाहो अर्जुना ! ज्यापुरुषाची इंद्रिये विषयांच्या पासून सर्व प्रकारे आवरून धरलेली असतात त्याचीच बुद्धी स्थिर होत असते.

सर्व लोकांना जी रात्र आहे अशा ठिकाणी स्थितप्रज्ञ जागृत असतो आणि सर्व प्राणीमात्र जेथे जागृत असतात तेथे या ज्ञानवान् पुरुषास रात्र वाटत असते. चोहोबाजूंनी पाण्याने भरत जात असतानाही ज्याची मर्यादा सुटत नाही अशा समुद्रात सर्व नद्यांचे पाणी ज्याप्रमाणे प्रवेश करते, त्याप्रमाणे ज्या पुरुषाचे ठिकाणी सर्व विषय कसल्याही प्रकारचा विकार उत्पन्न न करता प्रवेश करतात त्यालाच खरी शांती मिळते. विषयांची इच्छा करणाऱ्याला अशी शांती मिळणे शक्य नाही. जो पुरुष सर्व आसक्ती सोडून ममतारहित, अहंकाररहित व नि:स्पृह होऊन वावरत असतो त्यालाच शांती मिळते. हे पार्था! ब्रह्मप्राप्ती झालेल्या पुरुषाची स्थिती हीच आहे. ही स्थिती प्राप्त झाल्यावर तो मोहित होत नाही आणि मरणाच्या वेळी सुद्धा ह्याच स्थितीमधे राहून त्याला ब्रह्मनिर्वाण म्हणजे मोक्ष प्राप्त होतो. — सर्वसाधारणपणे कोणाही पुरुषाचा विषयांचा उपभोग सुटला तरीही त्या उपभोगांची मनामधे उपजतच असलेली आवड नाहीशी होत नाही. इंद्रियांना ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्ञानी माणसाच्या मनाला देखिल ही इंद्रिये जबरदस्तीने भलतीकडे खेचून नेतात. विषयांचे सदैव चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्यांच्याविषयी आसक्ती निर्माण होते.

त्या आसक्तीमुळे मनामधे कामना उत्पन्न होते. त्या कामनापूर्तीच्या मार्गामधे कोणतेही विघ्न आले तर क्रोध उत्पन्न होतो.

क्रोधापासून अविवेक, अविवेकामुळे स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशाच्या योगे बुद्धिनाश होतो आणि त्यामुळे मनुष्याचा सर्वनाश होतो.

अशा लोकांना स्थिरबुद्धी नसते आणि स्थिर भावनाही नसते. त्यामुळे त्यांना शांती आणि सुख दोनही प्राप्त होत नाही.

पण जो स्थितप्रज्ञ असतो त्याची अवस्था ह्याच्या बरोबर उलट असते. असा मनुष्य सदैव सुखी, शांत आणि आनंदी असतो.

सतत कर्म करूनही त्यापासून अलिप्त असतो. त्याची लक्षणेही उल्लेखनीय अशीच असतात.

' सर्व वासनांचा त्याग करणे, आत्मसंतुष्ट असणे, सुखाची आसक्ती किंवा दु:खाचा खेद न वाटणे, प्रीती - भय आणि क्रोध ह्या भावनांचा लय झालेला असणे, मन नि:संग झालेले असणे, कशामुळेही आनंद किंवा दु:ख न होणे,

आपल्या सर्व इंद्रियांना त्यांच्या विषयांच्यापासून आवरून धरलेले असणे आणि अशा स्वाधीन इंद्रियांच्यायोगे विषयांना भोगत असतानाही सदैव आनंदातच असणे,

सर्व लोकांना ज्या ज्या विषयांमधे रुची असते त्या त्या विषयांमधे अरुची असणे तसेच सर्व लोकांना ज्या ज्या विषयांमधे अरुची असते त्या त्या विषयांमधे रुची असणे,' ही सगळी स्थितप्रज्ञाची लक्षणे होत.

ज्याच्या ठिकाणी सर्व प्रकारचे विषय प्रवेश करतात परंतु कोणताही विकार उत्पन्न करू शकत नाहीत, जो सदैव ममतारहित तसेच अहंकाररहित होऊन नि:स्पृहपणे वावरत असतो तो पुरुष स्थितप्रज्ञ असतो.

त्याची बुद्धी सदैव स्थिर झालेली असते. तो कोणत्याही परिस्थितीत आनंदात असतो. प्रसन्न असतो.

कोणत्याही कारणाने कधीही मोहग्रस्त होत नाही. आयुष्याच्या अंतिम क्षणीही अशाच अवस्थेत राहिल्यामुळे त्याला मोक्ष प्राप्त होतो.

आता स्थितप्रज्ञाची सगळी लक्षणे सांगून झाली.

**येथे दुसरा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

समर्थ रामदास स्वामींनी ' श्रीमनोबोध ' म्हणजेच मनाचे श्लोक लिहिले आहेत.

त्यामधे ४७ ते ५६ हे दहा श्लोक ' परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त कसा असतो!' त्याचे वर्णन करणारे आहेत.

भगवंतानी येथे सांगितलेली **' स्थितप्रज्ञाची लक्षणे '** आणि समर्थांनी सांगितलेली **' श्रेष्ठ भक्ताची लक्षणे '** ह्यांची तुलना करून पाहण्यासारखी आहे. येथील सर्व गुण समर्थांनीही तेथे सांगितलेले आहेत.

त्याशिवाय काही अधिक गुणही सांगितले आहेत.

समर्थ काय म्हणत आहेत ते नीट लक्ष देऊन ऐका!

**मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे । जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।**
**गुणीं प्रीत राखे क्रमू साधनाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ४७ ।।**
**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ।**
**स्वधर्मे चि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ४८ ।।**
**सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासि पाहे ।**
**सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ४९ ।।**
**नसे अंतरीं कामकारी विकारी । उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ।**
**निवाला मनीं लेश नाहीं तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५०।।**
**मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी । प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ।**
**सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५१ ।।**

**क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभ वादे विवादें ।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५२ ।।**
**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।**
**न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५३।।**
**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।**
**चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५४ ।।**
**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा । वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा ।**
**ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।**
**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ।**
**तया अंतरीं क्रोध संताप कैचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ५६ ।।**

' मनाने आणि डोळ्यांनी केवळ परमेश्वरालाच पाहणे, आत्मज्ञान करून घेऊन मग भक्तीमार्गास अनुसरणे, परमार्थामुळे प्राप्त होणाऱ्या प्रसन्नता, समाधान, आनंद, शांती इत्यादी गुणांच्या विषयी प्रेम असणे, त्या गुणांच्या प्राप्तीसाठी योग्य साधनांचा क्रम राखून सदैव आराधना करणे, आपले शरीर सदैव परमेश्वराच्या सेवेसाठी आणि परमेश्वराच्या कार्यासाठी राबविणे, वाणीने अखंडपणे देवाचे नांव घेत असणे, सदैव केवळ स्वधर्माचेच पालन करणे, आपण इतरांना जे करायला सांगतो त्याप्रमाणे स्वत: वागणे म्हणजेच उक्ती - वृत्ती - कृती ह्यांचा मेळ घालणे, ब्रह्म हे निर्गुण व निराकार आहे हे ह्या विषयी कोणताही भ्रम नसणे आणि तरीही लोककल्याणासाठी, लोकसंग्रहाच्या हेतूने सगुण उपासनेचा पुरस्कार करणे, कामाने भारलेल्या विकारांच्यापासून मुक्त असणे, अलिप्त, तपस्वी आणि ब्रह्मप्राप्तीसाठी प्रयत्नशील असणे, मनामधे पूर्णपणे शांत असणे आणि तमोगुणाचे प्राबल्य नसणे, मद - मत्सर - स्वार्थ ह्यांनीच त्याला सोडलेले असणे, प्रापंचिक उपाधी नसणे, नेहमी इतरांच्या बरोबरचे बोलणे नम्र - हळुवार - सौजन्याचे - मधुर असणे, आपला मोकळा वेळ परमार्थ चिंतन करण्यात घालविणे, अहंकाराने, दुराग्रहाने आणि वादविवादाने कधीही लिप्त न होणे, कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी सत्य काय आहे ह्याचाच विचार करणे, नेहमी विनयाने बोलणे, सरळपणे वागणे, लोकांमधे प्रिय असणे, नेहमीच सत्य बोलणारा आणि समतोल बुद्धीचा असणे, कधीही खोटे न बोलणे, तरुणपणीच साधनेसाठी अरण्यात राहणे, कल्पनांच्या पसाऱ्यात न गुंतता, सुखदु:खाचे मोजमापही अलिप्तपणे करणे, कोणत्याही परिस्थितीत आपल्या ध्येयापासून न ढळणे, दृढ निश्चयी असणे, मनामधे दुष्ट किंवा वाईट आशा नसणे, मनाला सदैव परमेश्वराच्या भक्तीची आणि प्रेमाची तहान लागलेली असणे, उत्कट भक्तिभावामुळे प्रत्यक्ष परमेश्वरच त्याचा ऋणी होणे, दीन - दुबळया - पीडित लोकांच्याविषयी दया बाळगणे, करुणेने अंत:करण भरून येणे, नेहमी स्नेहाने वागणे, कृपादृष्टीने पाहणे, अंतरंगामधे जराही क्रोध किंवा संताप नसणे, — ही सगळी श्रेष्ठ भक्ताची लक्षणे आहेत.'

पण त्या लक्षणांनी युक्त असलेल्या माणसाला समर्थ **' स्थितप्रज्ञ!'** म्हणत नाहीत तर —

**' जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा!'** असे म्हणतात.

**' परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त!'** असे म्हणतात.

येथे अजून एक महत्त्वाची गोष्ट आहे आणि ती आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवी असे मला मनापासून वाटते.

श्रीकृष्णाने सांगितलेली **स्थितप्रज्ञाची** लक्षणे असोत किंवा समर्थांनी सांगितलेली **परमेश्वराच्या श्रेष्ठ भक्ताची** लक्षणे असोत,

ती सर्व लक्षणे आदर्श आहेत. कोणाही साधकाला आपल्या आचरणात आणता येऊ शकतील अशी आहेत.

निदान आचरणात आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न तरी करता येईल, अशी आहेत.

साधकाच्या साधनामार्गामधे उपयोगी पडतील अशी आहेत.

त्यामधे कोठेही, कोणत्याही प्रकारच्या **सिद्धींचे** अगर **चमत्कार** करण्याच्या शक्तीचे वर्णन आलेले नाही.

त्यामागचे कारण उघड आणि सरळ आहे.

कोणत्याही प्रकारच्या सिद्धींचा किंवा चमत्कारांचा, माणसाच्या आचरणाच्या, व्यक्तिमत्व विकासाच्या, भक्तीच्या अगर परमार्थाच्या दृष्टीने काहीही उपयोग होत नाही. अशा मार्गाने केवळ पोकळ श्रद्धा किंवा अंधश्रद्धाच निर्माण होऊ शकते.

आज आपल्या समाजामधे दिसणाऱ्या, तथाकथित चमत्कार करणाऱ्या, अशा अनेक ' बाबा - दादा - महाराज - भगवान ' इत्यादींची दुकाने त्यामुळेच तेजीत येतात. त्यांचा अहंकार सुखावला जातो.

ही सर्व मंडळी ' स्थितप्रज्ञ ' असतीलच किंवा ' परमेश्वराचा श्रेष्ठ भक्त ' असतीलच असे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही.

हे आपण सर्वांनी नीट समजून घ्यायला हवे. असो.

हा दुसरा अध्याय म्हणजे पुढील सोळा अध्यायांचा पाया आहे.

पुढील सर्व अध्यायांमधे ज्या वेगवेगळ्या विषयांवर भाष्य केलेले आहे, त्यापैकी बहुतेक सगळ्या विषयांचे मूळ ह्या अध्यायात आहे. जवळजवळ सगळ्या विषयांची सुरवात ह्या अध्यायात झालेली आहे.

सगळे **गीतामंदिर** ह्या दुसऱ्या अध्यायाच्या पायावर उभे आहे.

मंदिराचा पाया मजबूत आणि स्थिर असलाच पाहिजे. त्याशिवाय दीर्घकाळ टिकून राहणारे बांधकाम करता येणार नाही.

श्रीकृष्णाने बांधलेल्या ह्या गीतामंदिराच्या बांधकामाला पाच हजार वर्षे होऊन गेलेली आहेत.

आजही ते स्थिरपणे उभे आहे. मजबूतपणे उभे आहे. अभंग आहे. आणि —

यापुढील पाच हजार वर्षेच नाही तर, जोपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर मनुष्य प्राणी असेल तोपर्यंत हे गीतामंदिर असेच उभे असणार आहे. आपले जीवन योग्य प्रकारे जगता यावे म्हणून, जगातील सर्व जाती - धर्म - पंथांच्या माणसांना, सतत मार्गदर्शन करीतच राहणार आहे. येणाऱ्या अनेक पिढ्यांमधील, अनेक माणसे, भगवान श्रीकृष्णाने दाखविलेल्या मार्गावरून वाटचाल करून धन्य होणार आहेत. कृतार्थ होणार आहेत. आपल्या जगण्याचे सार्थक करून घेणार आहेत.

हे मंदिर अत्यंत सुंदर आहे. आकर्षक आहे. पाहता क्षणीच प्रेमात पडायला लावणारे आहे.

ज्याला पाहिल्यावर, पाहणारा स्वत:ला विसरून जाईल आणि फक्त त्याच्याकडेच पहात राहील असे आहे.

आणखी काय सांगू? माझ्याजवळ पुरेसे शब्दसामर्थ्य नाही. तरीही —

आपण सर्वांनी काही गोष्टी सदैव लक्षात ठेवाव्यात असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

त्यासाठी विशेष असे कारण आहे. आपण सर्व मनुष्यप्राणी आहोत. स्खलनशीलता हा आपला गुणधर्म आहे.

परंतु परमेश्वराने आपल्याला माणसाचा जन्म हा दानव होण्यासाठी दिलेला नसून देवत्वाकडे वाटचाल करण्यासाठी दिलेला आहे.

आणि आपल्याला त्या दिशेने चालण्याची प्रेरणा आणि मार्गदर्शन एका गीतेच्या अभ्यासाने मिळते. असो.

**गीता ही आपल्या भारतीय संस्कृतीचे सारसर्वस्व आहे!**

**गीता ज्या परिस्थितीमधे सांगितली आहे ती परिस्थिती अद्वितीय आहे!**

**गीता जेथे सांगितली गेली ती जागा अद्वितीय आहे!**

**गीता ज्याने सांगितली तो अद्वितीय आहे!**

**गीता ज्याला सांगितली तो देखिल अद्वितीय आहे!**

**कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी गीता ही अद्वितीय आहे! अतुलनीय आहे!**

गीतेची शब्दरचना, शब्दक्रम, शब्दांच्या सलग उच्चारणाने सहजपणे प्रगट होणारा मधुर नाद, तिची गेयता आणि अर्थपूर्णता ही केवळ अद्वितीय आहे. गीता म्हणणाऱ्याच्या जिव्हेला आणि कानांना विलक्षण सुखद संवेदना व्हायला सुरवात होते.

कानांना शब्दांची मधुर चव कळायला लागते आणि जिभेला शब्दांच्या बरोबरीने निर्माण होणारा मधुर नाद ऐकायला यायला लागतो.

दैवी स्पर्श होत असल्याची जाणीव होते. त्यासाठी कोणतेही स्पष्टिकरण द्यायची किंवा भाषण करायची गरजच नाही.

कुणीही गीता म्हणायला सुरवात करावी आणि प्रत्यक्ष अनुभव घ्यावा.

अहो ऽऽ, हापूसच्या पिकलेल्या रसाळ आंब्याची चव ही केवळ अनुभवायचीच गोष्ट आहे.

त्यावर भाषण करून किंवा चर्चा करून काहीही उपयोग होणार नाही.

ज्यांना शब्दांचा योग्य उच्चार करून म्हणता येत नसेल त्यांनी, इतरांनी म्हटलेली गीता लक्षपूर्वक ऐकावी.

त्यांनाही तसाच अनुभव येईल ह्याविषयी कोणताही संशय नाही.

गीतेचा अर्थ लावणे सोपे काम नाही. आपण आपल्या परीने प्रयत्न करूया. असो.

आता आपण **गीतामंदिरा** मधे प्रवेश केला आहे. देवाच्या सर्वसाधारण रूपाचे, सगुण रूपाचे दर्शन घेतले आहे.

त्याचे अमोघ वक्तृत्व ऐकायला सुरवात केली आहे.

सर्वसाधारण रूप अशासाठी म्हणतो आहे की,

देवाचे अद्वितीय असे विश्वरूप आपल्याला पुढे गीतेच्या कळसाध्यायामधे पहायचे आहे.

आता पुढील अध्यायामधे अर्जुन काय विचारतो आणि श्रीभगवान त्याला काय उत्तर देतात ते ऐकूया!

अस्तु!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८ - ७८ ॥**

<u>अध्याय तिसरा</u>

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या तिसऱ्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे आपण, करुणेने व्याप्त झालेल्या, व्याकूळ झालेल्या आणि अश्रू ढाळणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्णाने कशा प्रकारे शब्दांनी झटका दिला, त्यामुळे अर्जुन कसा ताळ्यावर आला आणि त्याने श्रीकृष्णाला शरण जाऊन त्यालाच मार्गदर्शन करण्याची विनंती कशी केली ते पाहिले. त्यानंतर श्रीकृष्णाने त्याचा युक्तिवाद खोडून काढायला सुरवात केली.

मानवी शरिराचे नाशित्व आणि अनित्यत्व सांगितले तसेच आत्म्याचे अविनाशित्व आणि नित्यत्वही सांगितले. देह हा क्षणभंगुर आहे. त्याचा कधी ना कधी नाश होणारच आहे. परंतु देहामधे असणारा आत्मा हा अनादि, अनंत, अजर, अमर असाच आहे.

म्हणून देहाच्या नाशामुळे शोक करण्याचे कारण नाही.

समजा आत्मा हा देहाच्या बरोबरच जन्माला येतो आणि देहाच्या बरोबरच मरतो असे मानले तरीही, ' जो जन्मला त्याला मरण निश्चित आहे आणि जो मेला त्याला जन्मही निश्चित आहे.' म्हणून त्याविषयी शोक करायची गरजच नाही असे सांगितले.

त्यानंतर अर्जुनाला त्याच्या स्वधर्माची म्हणजेच क्षात्रधर्माची आणि त्याप्रमाणे आचरण करण्याची जाणीव करून दिली.

त्यानंतर कर्मयोग, त्याच्या आचरणाने होणारे लाभ, कर्मयोगाच्या आचरणासाठी आवश्यक असणारी विशिष्ट प्रकारची बुद्धी ह्या विषयीचे विवेचन केले. बोलण्याच्या ओघामधे कर्मयोगाच्या दोन व्याख्याही सांगितल्या.

<u>**' समत्वम् योग उच्यते ।'**</u> म्हणजे, <u>' यशापयशाविषयीच्या ह्या सारखेपणाच्या वृत्तीलाच योग असे म्हणतात.'</u> आणि —

<u>**' योगः कर्मसु कौशलम् ।'**</u> म्हणजे, <u>' पाप किंवा पुण्य न लागता आपले विहित कर्म करण्याचे जे कौशल्य असते त्यालाच योग असे म्हणतात.'</u> ह्या त्या दोन व्याख्या होत.

ज्याला यशापयशाविषयी समत्वबुद्धी प्राप्त होते, तो पाप आणि पुण्य ह्या दोघांच्या पासून सदैव अलिप्त राहतो. म्हणून निष्काम कर्मयोगाचा आश्रय कर असे सांगितले. बोलण्याच्या ओघामधे अर्जुनाने काही प्रश्न विचारल्यामुळे त्याला उत्तर देताना,

' स्थितप्रज्ञ कोणाला म्हणतात ' ते ही सांगितले.

सारांश सांगायचा म्हणजे आत्मज्ञान महत्त्वाचे असून, आत्मबोधाच्या अनुभवाची पात्रता ही कर्मयोगामधील —

<u>**' कर्माने '**</u> येत नसून त्यातील <u>**' योगाने '**</u> म्हणजे समत्वबुद्धीने प्राप्त होते.

<u>' मी आणि माझे काहीही नाही, हे भगवंता ऽऽ! सर्वकाही तू आणि तुझेच आहे!'</u> ह्या बोधाने प्राप्त होते.

कर्म हे दुय्यम असून बोध महत्त्वाचा आहे. म्हणून —

' हे अर्जुना ऽऽ! तू त्या बोधाचा आश्रय घे. फळाची आशा न बाळगता, <u>**युद्धाला उभा रहा.**</u>

स्वधर्माचे पालन करण्यासाठी, केवळ तुझे कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी म्हणून <u>**युद्ध कर.**</u>' असे सांगितले.

आता अर्जुनाच्या मनामधे एक शंका उत्पन्न झाली आणि तिच्याविषयी विचार करताना त्याचा गोंधळ व्हायला लागला.

म्हणून त्याने श्रीकृष्णाला प्रश्न विचारला. <u>गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे.</u>

तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।**

**तत् किङ् कर्मणि घोरे माम् नियोजयसि केशव ।। १ ।।**

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिम् मोहयसीव मे ।**

**तदेकम् वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ।। २ ।।**

' हे श्रीकृष्णा ऽऽ! तू आपल्या बोलण्याने मला गोंधळवून टाकत आहेस.

जर प्रत्यक्ष कर्मापेक्षा आत्मबोध श्रेष्ठ आहे, आत्मज्ञान महत्त्वाचे आहे, समत्वबुद्धी महत्त्वाची आहे असे तुझे निश्चित मत आहे, तर मग तू मला ह्या युद्धासारखे क्रूर आणि भीषण कर्म करायला का सांगतो आहेस?

जर कर्मापेक्षा साम्यबुद्धीच श्रेष्ठ आहे आणि त्या साम्यबुद्धीमुळे कर्म आणि त्याचा कर्ता हे उरतच नाहीत, तर त्याचा अर्थ ' कर्म केले काय किंवा केले नाही काय, दोन्ही सारखेच.' असाही होतो.

मग हे युद्ध करायची काहीच आवश्यकता नाही. आपल्याच हाताने, आपल्याच कुळाचा विध्वंस करायची गरजच नाही.

मी सरळ आत्मज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करायला लागतो. तसे करणेच माझ्यासाठी योग्य आणि श्रेयस्कर नाही का होणार? मग मी नक्की काय करू? आत्मबोधात मग्न होऊ की कर्मयोगाचे आचरण करू? जे मला श्रेयस्कर ठरेल, ज्याच्यायोगे माझे इहपरलोकी कल्याण होईल ते एकच नक्की काय ते सांग.'

वास्तविक पाहता अशी शंका येण्याचे काहीही कारण नव्हते. सांख्यमार्ग आणि कर्ममार्ग ह्या दोन्ही मार्गांचे ज्ञान सांगून झाल्यावर श्रीकृष्णाने त्याला, **' कर्मण्येवाधिकारस्ते – तुझा अधिकार कर्म करण्याचाच आहे.'** असे स्पष्टपणे सांगितलेले होते.

तरीही अर्जुनाला खरोखरच तशी शंका आली. असे झाले त्याचे कारण **' अर्जुन अजूनही युद्ध टाळू पहात होता.'**

अजूनही त्याच्या मनामधे स्वजनांविषयीची आसक्ती सळसळत होती.

म्हणून मग श्रीकृष्णाने तोच मुद्दा अधिक स्पष्ट करून सांगायला सुरवात केली.

**श्रीभगवानुवाच :**

**लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।**

**ज्ञानयोगेन साङ्ख्यानाम् कर्मयोगेन योगिनाम् ।। ३ ।।**

**न कर्मणामनारम्भान् नैष्कर्म्यम् पुरुषोऽश्नुते ।**

**न च संन्यसनादेव सिद्धिम् समधिगच्छति ।। ४ ।।**

हे निष्पाप अर्जुना ! ज्ञानयोगाने सांख्यांची आणि कर्मयोगाने योग्यांची अशी ह्या लोकी दोन प्रकारची निष्ठा आहे असे मी ह्याआधी सांगितले. पण कर्माच्या न करण्याने पुरुषाला नैष्कर्म्य प्राप्त होत नाही आणि कर्माचा त्याग करण्यानेही सिद्धी प्राप्त होत नाही.

येथे भगवान श्रीकृष्ण काय म्हणतात ते नीट समजून घ्या.

' ह्या लोकी, सांख्यांचा ज्ञानयोग आणि योग्यांचा कर्मयोग अशी **दोन प्रकारची निष्ठा** आहे.' असे सांगत आहेत.

मागील अध्यायातही त्यांनी असेच सांगितलेले आहे.

' ज्ञानयोग आणि कर्मयोग ह्या दोन वेगवेगळ्या निष्ठा आहेत, दोन स्वतंत्र निष्ठा आहेत, त्यांचा एकमेकांच्या बरोबर काहीही संबंध नाही.' असे सांगितलेले नाही.

ज्ञानयोग्यांची ज्ञाननिष्ठा आणि कर्मयोग्यांची कर्मनिष्ठा हे दोन मार्ग असून त्यांचे अंतिम लक्ष्य एकच आहे. ते लक्ष्य म्हणजे

**' ब्रह्मनिष्ठा! आत्मज्ञान! आत्मबोध!'**

हे दोन मार्ग ब्रह्मनिष्ठेच्या म्हणजे आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीच असल्यामुळे, ते एकमेकांपासून स्वतंत्र राहू शकत नाहीत.

परस्परनिरपेक्ष असू शकत नाहीत. प्रश्न आहे तो **' अधिकाराचा! योग्यतेचा! पात्रतेचा! लायकीचा!'**

प्रत्येक माणसाने आपल्या पात्रतेप्रमाणे योग्य तो मार्ग, योग्य ती निष्ठा आचरायला हवी.

तरच तो आपले मोक्षप्राप्तीचे अंतिम ध्येय गाठू शकेल. मोक्षप्राप्तीची इच्छा झाली, म्हणून प्रत्येक मनुष्य लगेच ज्ञानयोगाच्या मार्गासाठी पात्र होत नाही. प्रत्येकाची योग्यता वेगवेगळी असते. अधिकार वेगवेगळा असतो. त्यानुसार वेगवेगळ्या मार्गाने वाटचाल करावी लागते. ह्या नियमाला कोणताही अपवाद नाही. कोणाचाही अपवाद नाही.

' ज्याचे अंत:करण पूर्णपणे शुद्ध आहे, जो ज्ञानाच्या भूमीवर स्थिर झालेला आहे, ज्याला सर्वत्र परमेश्वराचे अस्तित्व सतत जाणवत असते आणि जो सुखदु:खातीत म्हणजे सुख आणि दु:खाच्या पलीकडे गेला आहे,' अशा ज्ञानवान साधकाचे ते ज्ञान सिद्ध होण्यासाठी ज्ञानयोगाचा मार्ग सांगितलेला आहे. त्या मार्गाने तो मोक्षप्राप्ती करून घेऊ शकतो.

' जो अशा ज्ञानी साधकांच्या उच्च पातळीला पोहोचलेला नाही, परंतु ज्ञानाच्या भूमीवर स्थिर होऊ इच्छितो,' अशा साधकाचे अंत:करण शुद्ध होऊन त्यालाही ज्ञाननिष्ठा प्राप्त व्हावी आणि तो त्या पातळीला स्थिर व्हावा म्हणून त्याच्यासाठी कर्मयोगाचा दुसरा मार्ग सांगितलेला आहे.

ज्याप्रमाणे दोन भिन्न नद्या, पाहणाऱ्याला वेगवेगळ्या वाहताना दिसतात, तरी त्या शेवटी सागरालाच मिळतात. त्याचप्रमाणे ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा ह्या दोन्ही निष्ठा वेगवेगळ्या भासत असल्या तरी शेवटी त्या ब्रह्मनिष्ठेतच विलीन होतात. आत्मबोधातच लय पावतात. आत्मज्ञानातच एकरूप होऊन जातात. कर्मनिष्ठा ही अखेरीस ज्ञाननिष्ठा प्राप्त होण्यासाठीचे साधनच आहे.

वैराग्याच्या सामर्थ्याने कर्माच्या फलाची इच्छा टाकून देऊन, केवळ परमेश्वराची उपासना करण्यासाठी, केवळ आपले कर्तव्य म्हणून जो कर्म करतो, त्याच्या चित्ताची मलिनता त्या निष्काम कर्मामुळेच नाहीशी होते. त्याची सर्व इंद्रिये शांत होतात.

तो सुखदु:खाच्या पलीकडे जातो. त्यालाही ज्ञाननिष्ठेचा अधिकार प्राप्त होतो आणि त्या मार्गानेच तो मोक्षाप्रत पोहोचतो.

कर्मनिष्ठेचा मार्ग जरा लांबचा असला तरीही शेवटी तो मोक्षप्राप्तीच करून देतो.

केवळ योग्य कर्म सुरूच न केल्याने, कोणालाही निष्कर्म्यता प्राप्त होणार नाही.

( जी अवस्था प्राप्त झाल्यावर कर्म हे अकर्म बनते म्हणजे ते फल उत्पन्न करीत नाही, ती अवस्था म्हणजे निष्कर्म्यता )
किंवा योग्य कर्म करायचे टाळल्याने कोणीही आत्मबोधाचा अधिकार प्राप्त करून घेऊ शकणार नाही.
म्हणजेच त्याला, ती सिद्धी प्राप्त होणार नाही.
' आपण स्वत:च्या इच्छेप्रमाणे कर्म केले तरच ते घडते आणि केले नाही तर घडत नाही ' ही समजूतही चुकीची आहे.
वस्तुस्थिती तशी नाही. कोणताही मनुष्य जोपर्यंत शरीराच्या आधाराने राहतो आहे आणि तसे राहणे सुरू आहे, चाललेले आहे, तो पर्यंत **' मी कर्म टाकतो '** आणि **' मी कर्म करतो '** ह्या म्हणण्याला काही अर्थ नाही.
हाच मुद्दा भगवंतांनी पुढील पाच श्लोकांमधे स्पष्ट करून सांगितलेला आहे.

**न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवश: कर्म सर्व: प्रकृतिजैर्गुणै: ।। ५ ।।**
**कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचार: स उच्यते ।। ६ ।।**
**यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्याऽऽरभतेऽर्जुन ।**
**कर्मेंद्रियै: कर्मयोगम् असक्त: स विशिष्यते ।। ७ ।।**
**नियतङ् कुरु कर्म त्वम् कर्म ज्यायो ह्यकर्मण: ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिध्येदकर्मण: ।। ८ ।।**
**यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽयङ् कर्मबंधन: ।**
**तदर्थङ् कर्म कौन्तेय मुक्तसङ्ग: समाचर ।। ९ ।।**

कारण कोणीही झाला तरी कर्म केल्यावाचून केव्हाही क्षणभरसुद्धा रहात नाही. प्रकृतीचे गुण परतंत्र झालेल्या प्रत्येक पुरुषास नेहमी काही ना काही तरी कर्म करण्यास लावत असतात. जो मूढ पुरुष आपल्या कर्मेंद्रियांना आवरून, मनाने मात्र विषयांचे चिंतन करीत राहतो, त्याला दांभिक म्हणतात. परंतु, हे अर्जुना ! जो पुरुष मनाने इंद्रियांना वश करून, अनासक्त होऊन, केवळ कर्मेंद्रियांनी कर्मयोगाचे आचरण करतो, तो श्रेष्ठ होय. तुझ्या धर्माप्रमाणे नेमलेले कर्म तू कर कारण कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे हे अधिक चांगले आहे. शिवाय तू कर्म केले नाहीस तर तुझ्या शरीराचा निर्वाहसुद्धा चालणार नाही. यज्ञासाठी म्हणून जे कर्म करतात, त्या शिवाय अन्य कर्मात गुंतलेला मनुष्य कर्मबंधनात पडतो. म्हणून हे कौंतेया! यज्ञासाठी करावयाचे कर्म देखील तू आसक्ती सोडून कर.
कर्म हे स्वभावत:च प्रकृतीच्या गुणांच्यायोगे घडत असते. त्यामुळे ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय ह्यांचे स्वभाव कधीच नाहीसे होत नाहीत. एखाद्याने कितीही ठरविले तरीही त्याला पूर्णपणे कर्मत्याग करता येणे शक्य नाही.
कोणीही झाला तरी, त्याला आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांना आणि कर्मेंद्रियांना त्यांचे विहित कर्म करण्यापासून कसे बरे थांबविता येईल?
**डोळे** हे पाहण्याचे कर्म करणारच. **कान** हे ऐकण्याचे कर्म करणारच. **नाक** हे वास घेण्याचे कर्म करणारच.
**त्वचा** ही स्पर्श जाणण्याचे कर्म करणारच. **जिव्हा** म्हणजेच जीभ पदार्थाची चव जाणून घेण्याचे काम करणारच.
**हात, पाय, गुदद्वार, मूत्रद्वार** आणि **जिव्हा** ही पाचही कर्मेंद्रिये आपापले विहित कर्म करणारच.
समजा एखाद्याने **' मी काहीही न करता बसून राहीन.'** असे म्हटले तरीही, **' काहीही न करणे.'** आणि **' बसून राहणे.'** ही कर्मे त्याच्या नकळत घडून येतातच. इतकेच नाही तर **' काहीही न करता बसून राहण्याचा विचार करणे '** हे देखील मनाचे बुद्धीच्या सहाय्याने केलेले, **' विचार करण्याचे '** कर्मच आहे.
' श्वास घेण्याचे आणि सोडण्याचे.' कर्म तर जन्माला आल्यापासून मरेपर्यंत सदैव चाललेलेच असते. जर ते कर्म थांबविले तर प्राण्याला जिवंत राहता येणारच नाही. त्याचे जगणेच थांबेल. त्याचे अस्तित्वच नष्ट होईल. तो मरून जाईल.
जो कोणी आपल्या वाट्याला आलेले कर्म करायचे नाकारतो आणि त्यायोगे ' मी कर्मातीत अवस्थेला पोहोचण्याचा प्रयत्न करतो आहे.' असे म्हणतो, त्याला खरा कर्मत्याग घडत नाही. तो केवळ कर्मेंद्रियांचा निरोध करतो.
जो मनुष्य आपल्या कर्मेंद्रियांना त्यांच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध वागायला भाग पाडतो आणि असे करीत असताना, मनाने मात्र सदैव निरनिराळ्या विषयांचेच चिंतन करीत राहतो, तो विषयासक्त असतो, ढोंगी असतो, मूर्ख असतो.
ह्याच्या उलट, जो कोणी मनाने सदैव परमात्म्याच्या स्वरुपाविषयी चिंतन करण्यात गढलेला असतो आणि बाहेरून मात्र इतर लोकांच्या प्रमाणेच सर्व व्यवहार करीत असतो, कर्मेंद्रिये आपापली कर्मे करीत असली तरी त्यांच्यावर अवाजवी बंधन न घालता, त्यांनी आपापल्या स्वभावानुसार कोणते कर्म करावे आणि कोणते कर्म करू नये हे ठरवतो, तसेच त्यांच्यामुळे उत्पन्न होणाऱ्या विकारांनी ग्रस्त

होत नाही, आपल्या वाट्याला आलेल्या कर्माचा आदर करतो आणि ते योग्य रितीने पार पाडतो, तोच श्रेष्ठ कर्मयोगी असतो.
त्याने आपल्या मनाला आवरून धरलेले असते त्यामुळे त्याची कर्मेंद्रिये आपापले व्यवहार करीत असूनही तो त्यांच्यापासून अलिप्तच असतो. अर्जुना! तू असा कर्मयोगी हो! आपल्या मनाला आवरून धर आणि अंत:करणात स्थिर हो!
म्हणजे तुला कोणत्याही कर्माचे बंधन लागणार नाही.
स्वधर्माप्रमाणे जे विहित कर्तव्य असते ते पार पाडण्यासाठी आपल्याला जे कर्म करावे लागते ते कर्म म्हणजे यज्ञच असतो.
म्हणून त्याचे आचरण करीत असताना पाप लागत नाही. स्वधर्माचरण करणे म्हणजेच नित्य यज्ञयाग करणे होय.
जेव्हा असे स्वधर्माचरण सुटते तेव्हा मनुष्याकडून वाईट कर्मे केली जातात आणि त्या कर्मांचा बंध प्राप्त होतो.
आपल्या ह्या निष्कामकर्मरूपी यज्ञाला जो यथाशक्ती - यथामती पार पाडीत नाही, तो काम्य म्हणजेच कोणत्यातरी इच्छेने फळाची आशा ठेवून केलेल्या कर्माने बांधला जाऊन देहाच्या आधीन होतो.

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥**
**देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।**
**परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥**
**इष्टान् भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।**
**तैदत्तानप्रदायैभ्यः यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥**
**यज्ञशिष्टाशिनः सन्तः मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।**
**भुञ्जते ते त्वघम् पापाः ये पचन्त्यात्मकारणात् ॥ १३ ॥**

पूर्वी यज्ञासह प्रजा उत्पन्न करून ब्रह्मदेव त्यांना म्हणाला की, या यज्ञाच्या योगाने तुम्ही वृद्धित व्हा. हा यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा होवो. या यज्ञाने तुम्ही देवांना संतुष्ट करा आणि ते देव तुम्हाला संतुष्ट करोत. ह्याप्रमाणे परस्परांची उन्नती करत दोघेही परम कल्याण प्राप्त करून घ्या. कारण यज्ञाने तृप्त झालेले देव इच्छिलेले सर्व भोग तुम्हाला देतील. त्यांनी दिलेले त्यांना परत न देता जो केवळ स्वत:च उपभोगतो तो खरोखरच चोर होय. यज्ञातील शेष राहिलेले अन्न खाणारे श्रेष्ठ पुरुष सर्व पापापासून मुक्त होतात आणि जे पापी लोक स्वत:साठीच अन्न शिजवतात ते तर केवळ पापच भक्षण करतात.
' सर्व ब्रह्मांडाच्या उत्पत्तीच्या अगोदर काय होते?, त्यावेळी कशी अवस्था होती?' ह्याविषयी ऋग्वेदामधील दहाव्या मंडलातील १२९ व्या सूक्तामधे फार सुंदर वर्णन केलेले आहे. हे सूक्त **' नासदीय सूक्त.'** या नांवाने प्रसिद्ध आहे.
'' तेव्हा म्हणजे मूळारंभी असत् नव्हते आणि सत् ही नव्हते! अंतरिक्ष नव्हते आणि त्या पलीकडचे जे आकाश ते ही नव्हते!
अशा स्थितीत कोणी कोणाला आवरण घातले म्हणावे? कोठे घातले म्हणावे? कोणाच्या सुखासाठी घातले म्हणावे?
आवरण घालणारा सर्वश्रेष्ठ कोण होता? कोठे होता? अगाध व गहन पाणी तरी होते काय? ते ही नव्हते.
तेव्हा मृत्यु म्हणजे मृत्युग्रस्त नाशवंत दृष्य सृष्टी नव्हती व म्हणून अमृतत्व म्हणजे अविनाशित्वही नव्हते. सूर्य आणि चंद्र नव्हते.
रात्रही नव्हती आणि दिवसही नव्हता. अर्थात, रात्र आणि दिवस ह्यांचा भेद कळण्यास काहीं साधन नव्हते. अंधारही नव्हता आणि उजेडही नव्हता. जे काही होते, ते एकले एकच आपल्याच शक्तीने वायूशिवाय स्फुरत होते. त्याखेरीज दुसरे असे काहीच नव्हते.''
ह्या एकल्यालाच हिरण्यगर्भ किंवा ब्रह्म किंवा परमात्मा किंवा ईश्वर मानले आहे.
सर्वकाही अंधकाराने व्याप्त होते. गती नव्हती. दिशा नव्हत्या. काल नव्हता. अहं नव्हता. कोणत्याही प्रकारचे द्वंद्व नव्हते.
त्या अवस्थेला साम्यावस्था असेही म्हणता येत नाही. कारण समान पातळीमधे येण्यासाठीसुद्धा, पातळी स्वत: आणि तिच्यामधे येण्यासाठी दुसरे काहीतरी असावे लागते. ह्याचा अर्थ इतकाच की, आपल्या कल्पने पलीकडची, शब्दामधून व्यक्त न करता येण्यासारखी, अगम्य, अतर्क्य आणि अद्वितीय अशी अवस्था होती.
पुढे ( जे काही होते ) त्यालाच अनेक होण्याची, पुष्कळ होण्याची, अधिक होण्याची इच्छा झाली. **' एको हम् बहुस्याम् ।'**
तशी इच्छा का झाली त्याचे कारण कोणालाही माहीत नाही. पण इच्छा झाली हे खरे. म्हणजेच इच्छा होण्याचे **कर्म** घडले.
मग **' त्याने केवळ संकल्पानेच आकाश उत्पन्न केले.'**
ह्याहून वेगळा किंवा निराळा असा एक अर्थही सांगितलेला आहे.
**' तो स्वत:च आकाश झाला. त्याने आकाशाचे रूप घेतले.'** असेही म्हटले आहे.
त्यामागचे कारणही सांगितलेले आहे. ते म्हणजे, —
' काहीतरी उत्पन्न करण्यासाठी अगोदर कच्चा माल **( Raw Material )** असावाच लागतो आणि त्यावेळी तर काहीही अस्तित्वातच

नव्हते. त्यामुळे कशापासूनतरी काहीतरी उत्पन्न करणे शक्यच नव्हते.' म्हणजे हाच आदिसंकल्प होता.

**येथें ब्रह्मांडाच्या उत्पत्तीकरिता कर्माचा प्रारंभ झाला.**

त्याच आत्मस्वरूप ब्रह्मापासून म्हणजेच ब्रह्मदेवापासून आकाश उत्पन्न झाले. आकाशापासून वायु, वायुपासून अग्नी, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न आणि अन्नापासून पुरुष उत्पन्न झाला.

म्हणजे स्वत: ब्रह्मदेवानेही हे विश्वनिर्मितीचे कर्म त्याचा धर्म म्हणून, त्याचे कर्तव्य म्हणून, कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता केलेले आहे. असो. आपले विहितकर्म करून झाल्यावर ब्रह्मदेवाने सर्व प्राणिमात्रांना यथायोग्य मार्गदर्शनही केले.

' तुम्ही सदैव आपल्या धर्माचे आचरण करा. ते आचरण तुम्हाला ह्या लोकी आधारभूत ठरेल. त्यायोगे तुम्हा सर्वांच्या इच्छा आपोआप पूर्ण होतील. स्वधर्माप्रमाणे विहित कर्म केलेत तर त्याशिवाय इतर काहीही करायची आवश्यकता उरणार नाही.

हा स्वधर्माचरणरूप यज्ञच तुम्हाला तारून नेईल. तुम्हाला कधीही अंतर देणार नाही आणि तुमच्या सर्व इच्छा पुरवील. ह्या कर्मयोगाच्या यज्ञानेच तुम्ही इतरांना संतुष्ट करा म्हणजे ते देखील तुम्हाला संतुष्ट करतील. तुमची काळजी घेतील. तुमचा योगक्षेम चालवतील. अशाप्रकारे परस्परांच्या सहयोगाने तुम्ही कल्याण प्राप्त करून घ्या.

जर तुम्ही निष्ठापूर्वक स्वधर्माचे पालन कराल तर सर्व प्रकारच्या भोगांनी संपन्न होऊनही तुम्ही त्यांच्यापासून अलिप्त राहाल. निरिच्छ व्हाल. पण जर तुम्ही संपन्नतेने उन्मत्त होऊन, स्वधर्माचे पालन न करता, केवळ भोगांमधेच गढून गेलात तर मात्र तुम्हाला मिळालेले भोग उपभोगता येणार नाहीत आणि तुमचे सर्व ऐश्वर्य नाहीसे होईल.

जे इतरांनी आपल्याला दिले ते त्यांना परत न देता जो स्वत:च उपभोगतो तो चोर असतो.

तो पापाचेच सेवन करीत असतो. त्याचा विनाशच होईल.

ह्याउलट आपली जी संपत्ती आहे ती समाजाकडूनच मिळालेली आहे असे जाणून, ती स्वधर्मरूपी यज्ञाने समाजालाच परत देण्याची कामना मनामधे बाळगून, जो मनुष्य स्वधर्माचरणाने जे मिळाले ते स्वधर्मपालन करण्यातच खर्च करून त्यानंतर जे उरेल त्याचा आनंदाने उपभोग घेतो, त्याच्या सर्व पापांचा नाश होतो. त्याला शांती मिळते.

मूळ श्लोकांमधे ' देवांनी दिलेले - देवांनाच परत देणे किंवा न देणे!' असे म्हटलेले आहे.

परंतु व्यावहारिक दृष्टीने विचार केला तर, ' देव म्हणजे स्वर्गामधील, मनुष्य योनीपेक्षा उच्च योनीचे लोक!' असे न समजता, ' देव म्हणजे सर्व ज्ञात जीवसृष्टी!' असे समजले पाहिजे किंवा, ' देव म्हणजे आपला देश, आपला समाज, आपले देशबांधव.' असे समजले पाहिजे. तेच योग्य ठरेल. **स्वामी विवेकानंदांनी** सर्व देशवासियांना एक संदेश दिलेला आहे.

' प्रत्येक जीव हा अव्यक्त ब्रह्मच आहे. परमेश्वराचे दृष्य रूपच आहे. केवळ तीर्थक्षेत्रांना जाऊन तेथे ईश्वराचे दर्शन घेण्याने काहीही साध्य होणार नाही. त्याऐवजी सर्व मानवजातीची सेवा कशा प्रकारे करता येईल ह्याचा विचार करा आणि त्याप्रमाणे आचरण करा. आपले दीन, दु:खी आणि दुर्बल देशबांधव म्हणजे त्या ईश्वराचीच अनंत रूपे आहेत. त्यांची सेवा करणे म्हणजे परमेश्वराचीच सेवा करणे आहे. परमेश्वराची पूजा करण्यासारखेच आहे.'

**अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभव: ।**
**यज्ञाद् भवति पर्जन्य: यज्ञ: कर्मसमुद्भव: ।। १४ ।।**
**कर्म ब्रह्मोद्भवम् विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।**
**तस्मात् सर्वगतम् ब्रह्म नित्यम् यज्ञे प्रतिष्ठितम् ।। १५ ।।**

सर्व प्राणिमात्र अन्नापासून उत्पन्न होतात. अन्नाची उत्पत्ती पावसापासून होते. पाऊस यज्ञापासून उत्पन्न होतो आणि यज्ञ कर्मापासून उत्पन्न होतो. कर्माची उत्पत्ती ब्रह्मापासून आहे असे जाण आणि हे ब्रह्म अक्षरापासून म्हणजे परमेश्वरापासून उत्पन्न झालेले आहे म्हणून यज्ञात नेहमी सर्वव्यापी ब्रह्मच अधिष्ठित असते.

ज्या अन्नाच्यायोगे प्राण्यांच्या शरीराचे भरण-पोषण होते, ज्याच्या संतर्पणाने सर्व समाज संतुष्ट होतो, सर्वांना आपापले नेहमीचे व्यवहार करण्यासाठी शक्ती प्राप्त होते, ते अन्न कमी योग्यतेचे समजू नये. त्याचा अनादर करू नये.

अन्न हे ब्रह्मरूपच आहे कारण ते सर्व प्राणिमात्रांच्या जगण्याचे साधन आहे.

अन्नामुळे सर्व प्राणिमात्र जगतात, पावसामुळे अन्न निर्माण होते, यज्ञामुळे पाऊस उत्पन्न होतो, कर्मापासून यज्ञ प्रकट होतो आणि ब्रह्म हे कर्माचे उगमस्थान आहे. अशी ही निरंतर चालणारी साखळी आहे.

**एवम् प्रवर्तितञ् चक्रं नानुवर्तयतीह य: ।**
**अघायुरिंद्रियाराम: मोघम् पार्थ स जीवति ।। १६ ।।**

हे पार्था ! याप्रमाणे सुरू केलेल्या सृष्टि-चक्राला अनुसरून, जो पुरुष या लोकी वागत नाही, म्हणजे शास्त्रानुसार कर्मे करीत नाही,

तो इंद्रियसुखात मग्न असणारा पापी पुरुष व्यर्थ जगतो.

ह्या मृत्युलोकी प्रत्येकाने स्वधर्मरूप यज्ञाचे आचरण करणेच श्रेयस्कर आहे. तसे न करता, जो कोणी अयोग्य आचरण करून केवळ आपल्या इंद्रियांचेच चोचले पुरवितो, त्यांना आवडतील अशाच गोष्टी करीत राहतो, त्याचे जगणे व्यर्थ आहे.

जर त्याला मिळालेले शरीरही त्याच्या पूर्वकर्मामुळेच मिळालेले आहे, तर मग आपले विहित कर्म का नाकारायचे?

मानवी शरीर मिळूनही, कर्म करायचा कंटाळा करणारा कोणीही असला, तरी तो अडाणीच समजला पाहिजे. अज्ञानीच समजला पाहिजे. त्याचे जगणे समाजासाठी उपयोगी नसल्यामुळे व्यर्थ असते.

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।**

**आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यन् न विद्यते ।। १७ ।।**

**नैव तस्य कृतेनाथः नाकृतेनेह कश्चन ।**

**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ।। १८ ।।**

**तस्मादसक्तः सततम् कार्यङ् कर्म समाचर ।**

**असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पुरुषः ।। १९ ।।**

**कर्मणैव हि संसिद्धिम् आस्थिता जनकादयः ।**

**लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन् कर्तुमर्हसि ।। २० ।।**

परंतू जो मनुष्य केवळ आत्म्यातच रमलेला, आत्म्यातच तृप्त व आत्म्यातच संतुष्ट असेल त्याला स्वत:चे असे कोणतेच कर्तव्य रहात नाही. तसेच ह्या जगात एखादी गोष्ट केल्याने त्याचा काहीच नफा नसतो आणि न केल्यानेही नसतो. सर्व भूतांचे ठायी त्याचा स्वत:चा म्हणून काही अर्थ गुंतून राहिलेला नसतो. म्हणून तू ही फलाचे ठायी आसक्ती न ठेवता आपले कर्तव्यकर्म नेहमीच कर. कारण अनासक्तपणे कर्म करीत असणाऱ्या पुरुषाला परमगती मिळते. जनकादिकांनीही याचप्रमाणे कर्मानेच सिद्धी मिळवली. तसेच लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊनही तुला कर्म करणेच उचित होय.

जो पुरुष आत्मस्वरूप जाणतो आणि सदैव त्या स्वरूपाचाच विचार करीत असतो, त्याला कोणाकडूनही कशाचीही अपेक्षा नसते. कोणतीही गोष्ट केल्याने किंवा न केल्याने त्याला वैय्यक्तिक लाभ किंवा हानी होणार नसते. किंबहुना त्याला कर्तव्य म्हणून काहीही राहिलेले नसते. तरीही तो सर्व प्रकारची कर्मे, सदैव करीत राहतो. फळाची अपेक्षा न बाळगता करीत राहतो. इतकेच नाही तर सर्व कर्मे करूनही तो त्यांनी बांधला जात नाही. लिप्त होत नाही. मागे जनकादिक राजे होऊन गेले. त्यांनी कर्माचा त्याग कधीही केला नाही. उलट निष्काम कर्मयोगाच्या आचरणानेच मोक्ष प्राप्त करून घेतला आहे.

**यद् यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः ।**

**स यत् प्रमाणङ् कुरुते लोकस्तदनुवर्तते ।। २१ ।।**

श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करतो तसेच इतर लोक करीत असतात. तो जी गोष्ट, प्रमाण म्हणून अंगिकारतो तिलाच लोक अनुसरतात. दुसरी गोष्ट म्हणजे समाजाचा विचार केला असताही, कर्मत्याग करणे उचित नाही.

समाजामधे लोकमान्यता प्राप्त झालेले असे जे ज्ञानी, श्रेष्ठ व ज्येष्ठ पुरुष असतात, त्यांच्याकडे सामान्यजन **' आपला आदर्श!'** म्हणून पाहतात. ते जसे वागतात त्यालाच **' धर्म!'** असे म्हणतात आणि आपण स्वत:ही त्याप्रमाणेच आचरण करू पाहतात. त्यामुळे ज्ञानी व श्रेष्ठ अशा पुरुषांनी अधिक काळजीपूर्वक वागले पाहिजे. सर्व सामान्य लोकांना योग्य मार्गदर्शन होईल असेच वागले पाहिजे. इतरांच्यापुढे आपल्या वागण्याचा वस्तुपाठ ठेवला पाहिजे.

तसे केले नाही तर अज्ञानी जनांचा बुद्धिभेद घडून येईल आणि ते विपरीत वर्तन करायला लागतील. आपापली कर्तव्ये करायचे नाकारतील. मग एकूण समाजामधे गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल.

हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्याच्या हेतूने श्रीकृष्ण अर्जुनाला स्वत:चेच उदाहरण सांगत आहे आणि ते उदाहरण अत्यंत समर्पक असेच आहे. जरा विचार करा —

श्रीकृष्णाला पांडवांच्या पाठीशी उभे रहायची काय गरज होती?

त्यांची वकिली करण्यासाठी कौरवांच्याकडे जायची काय गरज होती?

युद्धामधे अर्जुनाचे सारथ्य करायची काय गरज होती?

आत्ताही इथे अर्जुनाची समजूत काढायची काय गरज आहे?

अर्जुन हे युद्ध लढला काय किंवा लढला नाही काय, युधिष्ठिर विजयी झाला काय किंवा दुर्योधन विजयी झाला काय, कौरव नष्ट झाले काय अथवा पांडव नष्ट झाले काय किंवा दोघेही नष्ट झाले काय, श्रीकृष्णाला कोणता लाभ होणार आहे?

कोणताही नाही. त्याची तशी अपेक्षाही नाही.
**न मे पार्थास्ति कर्तव्यम् त्रिषु लोकेषु किञ्चन ।**
**नानावाप्तमवाप्तव्यम् वर्त एव च कर्मणि ।। २२ ।।**
**यदि ह्यहन् न वर्तेयम् जातु कर्मण्यतन्द्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।। २३ ।।**
**उत्सीदेयुरिमे लोकाः न कुर्याङ् कर्म चेदहम् ।**
**सङ्करस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ।। २४ ।।**
पार्था ऽऽ! इतरांचे कशाला सांगायचे? तू माझेच उदाहरण ध्यानात घे.
सर्व विश्वामधे अशी कोणती गोष्ट आहे की जी माझ्याकडे नाही? सर्व जगामधे अशी कोणती गोष्ट आहे की जी मला मिळवायची आहे? त्रैलोक्यामधे अशी कोणती गोष्ट आहे की जी मला मिळू शकणार नाही? एकही गोष्ट नाही.
मी सर्वच बाबतीत सर्वच दृष्टीने परिपूर्ण आहे. ह्या जगामधे माझ्या बरोबरीचा दुसरा कोणीही नाही हे तू देखील जाणतोस.
असे असूनही मी सदैव कर्म करीतच असतो. त्यामागचे कारण समजून घे.
सर्व प्राणिमात्र हे माझ्याच तंत्राने वागणारे आहेत. मी जे काही करतो, वेगवेगळ्या परिस्थितीमधे जसा वागतो ते सर्व काही उचित आणि अनुकरणीय समजले जाते. सर्व समाज तसेच वागायचा प्रयत्न करतो. त्यामुळेच माझ्यावर फार मोठी जबाबदारी असते.
‘ सर्व लोक योग्य मार्गावर रहावेत, त्यांनी आपले विहित कर्म योग्य प्रकारे पार पाडावे, कोणत्याही अयोग्य विचाराने आपले कर्म करायचे सोडून भलतीकडे भरकटत जाऊ नये.’ म्हणून मी नेहमी यथायोग्य कर्माचे आचरण करीत असतो.
मीच जर कर्म करायचे टाकले तर सर्व लोकही तसेच करायला लागतील आणि शेवटी त्यांचा सर्वनाश होईल. ते नष्ट होतील. परिणामी त्यांच्या विनाशाला मीच जबाबदार असेन. त्यांचे पालन करण्या ऐवजी त्यांचा घात करणारा ठरेन.
**सक्ताः कर्मण्यविद्वांसः यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्यात् विद्वांस्तथाऽसक्तः चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।। २५ ।।**
**न बुद्धिभेदञ् जनयेत् अज्ञानाङ् कर्मसङ्गिनाम् ।**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ।। २६ ।।**
**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।**
**अहङ्कारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।। २७ ।।**
**तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।**
**गुणा गुणेषु वर्तन्ते इति मत्वा न सज्जते ।। २८ ।।**
**प्रकृतेर्गुणसम्मूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।**
**तानकृत्स्नविदो मंदान् कृत्स्नविन् न विचालयेत् ।। २९ ।।**
हे पाच श्लोक महत्त्वाचे आहेत. विशेष करून समाजामधे मान्यता प्राप्त झालेल्या आणि होत असलेल्या, तसेच समाजकार्य करू इच्छिणाऱ्या लोकांच्यासाठी तर फारच महत्त्वाचे आहेत. त्यांनी समाजामधे वावरताना कसे वागायला हवे ते स्पष्टपणे सांगितलेले आहे.
सर्वसाधारणपणे जी ज्येष्ठ, श्रेष्ठ व ज्ञानी माणसे समाजामधे वावरत असतात, त्यापैकी बरीच माणसे निष्क्रीय असतात.
समाजासाठी विशेष काही करताना दिसत नाहीत. समाजावर सतत टीकाच करीत असतात. आपल्या समाजाची किती अधोगती होते आहे ह्याविषयी नेहमीच बोलत राहतात. परंतु त्यांच्या ज्ञानाचा, कर्तृत्वाचा आणि अनुभवाचा समाजाला उपयोग होईल असे काही करताना दिसत नाहीत. केवळ ‘ बोलाची कढी आणि बोलाचाच भात!’
आपल्या देशामधे आजही असे अनेक लोक आहेत, जे अत्यंत निस्वार्थीपणे कार्य करीत असतात. ज्यांना सर्व समाजाला सुधारण्याची कळकळ असते. ज्यांची ‘ सर्व समाजाचा उत्कर्ष व्हावा.’ अशीच मनोमन इच्छा असते.
परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश येताना दिसत नाही. प्रत्यक्षात सुधारणा घडून येताना दिसत नाही.
उलट लोकांमधली अंधश्रद्धा वाढत चाललेली दिसते. परावलंबित्व वाढायला लागलेले दिसते.
हल्ली सामान्य माणसाचे जगणे अत्यंत असुरक्षित झालेले आहे. सकाळी घरातून बाहेर पडलेला कोणीही मनुष्य, संध्याकाळी घरी सुरक्षित परत येईल ह्याची शाश्वती नाही. कधीही काहीही होऊ शकते आणि ते टाळणे आपल्या हातात नसते.
फारच विचित्र परिस्थिती आलेली आहे. सामान्य माणूस निराश झालेला आहे. हताश झालेला आहे. हतबल झालेला आहे.
ह्या हतबलतेमुळे प्रत्येकाला, ‘ आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणी आणि संकटांचे निवारण दुसऱ्या कुणीतरी करावे.’ असे

सतत वाटत राहते. त्यासाठी कुणातरी तथाकथित ' बाबा - दादा - भाऊ - बुवा - महाराज - गुरुदेव ' इत्यादींच्या आश्रयाला जाण्याची इच्छा व्हायला लागते. ह्याचा फायदा घेणारी मंडळी गल्लोगल्ली बसलेली असतात.
सध्या हा एक मोठा व्यवसायच झालेला दिसून येतो.
ह्या मंडळींच्या संपत्तीविषयी ऐकल्यावर आपले डोळे पांढरे व्हायची वेळ येते. त्यांच्या संपत्तीचे जाहीर झालेले आकडे समजायलाही बराच वेळ लागतो. हीच मंडळी निरनिराळ्या आवेशात, वेगवेगळ्या पोझमध्ये, स्वत:चे रंगीबेरंगी फोटो काढून जाहिरात करतात.
सत्संगाच्या नांवाने शिबिरे आयोजित करतात. हीच मंडळी समाजामधे ज्येष्ठ, श्रेष्ठ व ज्ञानी म्हणून वावरायला लागतात.
ह्यांच्याकडे उत्तम वक्तृत्व, सभाधीटपणा, चांगले विक्रय कौशल्य **( Marketing Skill )** इत्यादी गुणही असतात.
त्या गुणांच्या जोरावर अनुयायी जमवायला सुरवात होते.
जसजसे अनुयायी वाढत जातात तसा अहंकारही वाढायला लागतो. अनुयायी वाढवणे आणि त्यांना टिकवून ठेवणे ही त्यांची गरज होऊन बसते. मग जाणीवपूर्वक अंधश्रद्धा पसरवायला सुरवात होते. खऱ्या खोट्या चमत्कारांच्या कथा जाणीवपूर्वक पसरविल्या जातात.
हे एका प्रकारे संमोहनच असते आणि त्याला बहुसंख्य जनता बळी पडते. हे चक्र कधीही थांबत नाही. सदैव चालूच राहते.
एक बाबा गेला तर त्याची जागा घ्यायला दुसरे येतात. सामान्य लोकांचा जाणीवपूर्वक, ठरवून बुद्धिभेद करतात.
त्यांच्यामधे आत्मविश्वास निर्माण करण्याऐवजी त्यांचे परावलंबित्व वाढवतात. लोक आपल्या नादी लागावेत, आपल्याच पाठी यावेत, आपण सांगू तेच त्यांनी करावे, ह्याच एकमेव हेतूने सर्वकाही करतात. त्यामुळे त्यांचा व्यवसाय चालू राहतो.
अगदी **' मी परमेश्वराचा अवतार आहे!'** असेही जाहीर करतात.
तशा अर्थाची भजनेही लिहून घेतात आणि सर्वांना म्हणायलाही सांगतात.
परिणामी लोकांचा आत्मविश्वास नाहीसा होतो. स्वावलंबनाची वृत्ती नाहीशी होते.
आपले कर्तव्यकर्म करीत राहण्याची प्रवृत्ती नाहीशी होते. परावलंबन वाढायला लागते.
त्यामुळे सर्व समाजाचा उत्कर्ष होण्याऐवजी अपकर्षच होत असलेला दिसतो.
समाजामधे नाना प्रकारचे लोक असतात. त्यांची वृत्ती - प्रवृत्ती, बौद्धिक - वैचारिक - मानसिक पातळी, समजूत आणि गैरसमजूत वेगवेगळी असते. सर्वसाधारणपणे प्रत्येकाला आपले वर्तन योग्य आहे असेच वाटत असते.
आपणही चुका करतो, करू शकतो ही गोष्ट कोणीही विचारात घेत नाहीत.
त्यामुळे आपल्या चुका सुधारण्याचा आणि जे योग्य असेल तेच करण्याचा विचारही केला जात नाही.
बहुसंख्य लोक सदैव दुसऱ्यावर अवलंबून राहतात. ' अमुक अमुक बाबाने माझे प्रश्न सोडवावेत, माझा उत्कर्ष करावा, माझ्या चिंता, विवंचना व काळज्या दूर कराव्या!' ह्याच हेतूने सामान्यजन त्या बाबाला डोक्यावर उचलून घेतात.
त्याच्या संपत्तीत यथाशक्ती - यथामती भर घालायला लागतात. त्याच्या नादी लागतात.
ह्या सगळ्याला ते ' बाबा - दादा - भाऊ - बुवा - महाराज - गुरुदेव ' जबाबदार असतात.
ते सामान्य जनांचा बुद्धिभेद करीत असतात आणि कळत नकळत सामान्य माणसेही बुद्धिभेद करून घेतात. अंधश्रद्ध होतात.
श्रद्धा ही आवश्यक असते व हितकारकही असते. पण अंधश्रद्धा ही अनावश्यक व अहितकारकच असते.
आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे, —
**' श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्यांच्या मधली सीमारेषा फारच पातळ व पुसट असते.'**
ती कधी आणि कशी ओलांडली जाते ते आपले आपल्यालाच कळत नाही.
तशीच गोष्ट अहंकाराविषयी आहे. अभिमान असणे चांगले असते इतकेच नाही तर ते आवश्यकही असते. पण अहंकार हा वाईटच असतो. मग तो दुर्गुणांचा असो किंवा सद्‌गुणांचा असो. वाईटच असतो. विशेष म्हणजे, —
**' अभिमान आणि अहंकार ह्यांच्यामधली सीमारेषा फार पातळ व पुसट असते.'**
त्यामुळे अभिमानाचे अहंकारामधे म्हणजेच गर्वामधे परिवर्तन कधी होते ते आपले आपल्यालाच समजत नाही.
ह्यात सर्व प्रकारचे लोक येतात. अडाणी माणसापासून ते उच्चशिक्षित माणसापर्यंत सगळे येतात. कारण —
**' प्रत्येक सुशिक्षित मनुष्य शहाणा असेलच असे सांगता येत नाही.'**
आता ह्या सर्व प्रकारच्या लोकांना बरोबर घेऊन पुढे जायचे असेल तर त्यांच्या बरोबर मिळून मिसळूनच रहावे लागेल.
आपण कुणीतरी फार मोठे आहोत हा विचार बाजूला सारावा लागेल. अहंकाराचा त्याग करावा लागेल. स्वार्थ सोडावा लागेल आणि इतरांचा विचार करावा लागेल. इतरांना दूषण न देता, इतरांना नांवे न ठेवता, इतरांचा कोणत्याही प्रकारे बुद्धिभेद न करता, स्वत: शास्त्राप्रमाणेच वागून, इतरांच्याप्रमाणेच पण निष्काम बुद्धीने सर्व प्राप्त कर्मे करून, सत्कर्माचे आचरण करून दाखवावे लागेल. आपल्या वर्तणुकीने त्यांच्यापुढे उदाहरण ठेवावे लागेल.

‘ आम्ही जसे वागतो तसेच हा देखील वागतो.’ हे त्यांना जाणवेल अशा प्रकारेच वागावे लागेल. तसे आचरण करीत असतानाच, इतरांचे सतत प्रबोधन करून, सामान्यजनांना समजेल अशा प्रकारे समजावून, हळूहळू योग्य मार्गावर आणावे लागेल.
कर्म कोणालाही चुकले नाही ही वस्तुस्थिती आहे. मग आपले विहितकर्म न करायचा विचार का करायचा?
लोकांच्यापुढे तसे उदाहरण का निर्माण करायचे? इतरांना तसा उपदेश कशाला करायचा?
त्याचा उपयोग होणार नाहीच उलट उपद्रव होऊ शकेल.
ज्ञानी पुरुषाला स्वार्थ रहात नाही म्हणून त्याला कोणाकडूनही कशाचीही अपेक्षा नसते हे खरे असले तरीही, आपल्या वर्तनाने लोकांना चांगला धडा घालून देऊन त्यांना उन्नतीच्या मार्गाला लावणे हे त्याच्या अनेक कर्तव्यांपैकीच एक कर्तव्य आहे.
म्हणून त्याने लोकसंग्रहासाठी, प्राप्त झालेली कर्मे निष्काम बुद्धीने केली पाहिजेत.
ज्ञानी माणसाने निष्काम कर्म करून, अज्ञानी माणसांना सदाचरणाचा धडा घालून देण्याची आवश्यकता असते. त्यायोगेच समाजाची उन्नती होऊ शकेल.

**मयि सर्वाणि कर्माणि सन्न्यस्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥**
**ये मे मतमिदन् नित्यम् अनुतिष्ठन्ति मानवाः ।**
**श्रद्धवन्तोऽनसूयन्तः मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥**
**ये त्वेतदभ्यसूयन्तः नानुतिष्ठन्ति मे मतम् ।**
**सर्वज्ञानविमूढान् तान् विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥**
**सदृशञ् चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिम् यान्ति भूतानि निग्रहः किङ् करिष्यति ॥ ३३ ॥**
**इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत् तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ३४ ॥**

अर्जुना ऽऽ! तू एक आदर्श पुरुष आहेस. नावाजला गेलेला योद्धा आहेस. महारथी आहेस.
अनेक महावीर योद्ध्यांचा कौतुकाचा विषय आहेस. क्षत्रियांच्या आदराचा विषय आहेस.
तू जे करतोस ते इतर अनेक सैनिकांच्यासाठी **‘ आदर्श वर्तन!’** असते.
म्हणूनच, तुझा जो मूळ स्वभाव आहे त्याला अनुसरून, आपली सर्व कर्मे मला अर्पण करून, मनामधे कोणतीही आशा न बाळगता, कशाविषयी ममत्व न बाळगता आणि मनामधे कशाचीही काळजी न करता, चिंता न करता **युद्ध कर!**
माझ्या ह्या सांगण्यावर ज्यांची श्रद्धा असते आणि कोणत्याही शंका कुशंका न काढता जे पुरुष माझ्या सांगण्याप्रमाणे नेहमीच वागतात त्यांचे कर्म हे नैष्कर्म होते. त्यांना कर्माचे बंधन पडत नाही.
परंतु जे माझ्या ह्या सांगण्याकडे दूषित दृष्टीने पाहून शंकाकुशंका काढीत बसतात आणि परिणामतः माझ्या सांगण्याप्रमाणे वागत नाहीत, ते मूर्ख पुरुष ज्ञानाला मुकतात आणि त्यांचे कधीही कल्याण होत नाही.
अरे, कोणताही ज्ञानवान पुरुषसुद्धा, अखेरीस आपल्या मूळ स्वभावानुसारच वागतो.
सर्व भूते ही आपापल्या प्रकृतीच्या स्वभावाप्रमाणेच वागतात त्यामुळे कोणावरही, कोणतीही जबरदस्ती, कशी करता येईल?
आपली सर्व इंद्रिये आणि त्यांचे विषय ह्यांचा परस्पर संबंध फारच घट्ट असतो.
इंद्रिये आणि त्यांचे विषय ह्यांच्यामधे प्रीति व द्वेष, हे दोन्ही लपून राहिलेले असतात आणि ते प्राण्याला सुखाच्या खोट्या आशा दाखवून खेचून नेतात म्हणून तू स्वतःला त्यांच्या ताब्यात जाऊ देऊ नकोस. ते दोघेही कल्याणमार्गामधे विघ्न आणणारे शत्रू आहेत.

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनम् श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥**

उत्तम रीतीने आचरलेल्या परधर्मापेक्षा, सदोष असला तरी आपला धर्मच अति उत्तम व कल्याणकारक होय. स्वधर्माचे आचरण करीत असताना मरण आले तरी त्यात कल्याण आहे परंतु परक्यांचा धर्म भयंकर व भीतिदायक आहे.
ह्या श्लोकामधे **स्वधर्म** आणि **परधर्म** हे शब्द ठळकपणे वापरलेले आहेत. ते काही विशिष्ट हेतूने वापरलेले आहेत.
त्यामधील **‘ धर्म!’** म्हणजे हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी असे वेगवेगळे धर्म नाहीत. हे नीट समजून घ्या.
येथे सांगितलेला धर्म म्हणजे **‘ कर्तव्यपालनाचा धर्म!’** असा आहे.

**विद्यार्थ्यांचा धर्म! शिक्षकांचा धर्म! गृहस्थाचा धर्म! सैनिकांचा धर्म!**

**राज्यकर्त्यांचा धर्म! नागरिकांचा धर्म! शेतकऱ्यांचा धर्म! कामगारांचा धर्म!**

प्रत्येक माणसाचे कर्तव्य हाच त्याचा धर्म आणि त्या कर्तव्याचे निष्ठापूर्वक पालन करणे म्हणजेच धर्माचे पालन करणे होय.

**विद्यार्थ्याचा धर्म** ' मन लावून अभ्यास करणे आणि ज्ञान मिळवण्याचा सतत प्रयत्न करणे.' हा आहे.

**शिक्षकाचा धर्म** ' विद्यार्थ्यांना विविध प्रकारे ज्ञान देणे, त्यांच्यावर उत्तम संस्कार करणे, त्यांना देशाचे उत्तम नागरीक करण्यासाठी सतत प्रयत्न करणे. ' हा आहे.

**गृहस्थाचा धर्म** ' आपली पत्नी, मुले, आप्तेष्ट, अवलंबून असणारी इतर माणसे, ह्यांची सर्व प्रकारे काळजी घेणे. कुटुंबाचा उदरनिर्वाह योग्य प्रकारे चालवणे. समाजामधील गरीब व गरजू माणसांना यथाशक्ती मदत करणे.' हा आहे.

**सैनिकाचा धर्म** ' आपल्या देशाचे परकीय आणि स्वकीय शत्रूंच्यापासून रक्षण करणे. त्यासाठी प्रसंगी प्राण देण्यासाठी सदैव तयार असणे.' हा आहे.

**राज्यकर्त्याचा धर्म** ' उत्तम प्रकारे राज्य करणे, गुन्हेगारांना कोणत्याही प्रकारे संरक्षण न देता त्यांना कठोर शासन करून समाजामधले स्वास्थ्य, स्थैर्य आणि सौहार्द सांभाळणे, सर्वांना न्यायाने वागवून सर्व समाजाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष घडवून आणणे.' हा आहे.

**नागरिकाचा धर्म** ' सर्व प्रकारच्या कायद्यांचे प्रामाणिकपणे पालन करणे. सचोटीने वागणे. फसवाफसवी न करणे आणि तसे करणाऱ्याला विरोध करणे, सर्व प्रकारचे कर वेळच्यावेळी भरून राष्ट्रीय उभारणीच्या कार्याला हातभार लावणे.' हा आहे.

**शेतकऱ्याचा धर्म** ' देशाच्या शेतकी उत्पन्नामधे वाढ करण्याचा सतत प्रयत्न करणे. त्याचबरोबर शेती उत्पादनाचा दर्जा उत्तम राहील ह्याची काळजी घेणे.' हा आहे.

**कामगाराचा धर्म** ' देशाच्या औद्योगिक उत्पन्नामधे वाढ करण्याचा सतत प्रयत्न करणे. त्याचबरोबर उत्पादनाचा दर्जा उत्तम राहील, ते विश्वासार्ह असेल आणि योग्य किंमतीला उपलब्ध होऊ शकेल ह्याची काळजी घेणे.' हा आहे.

आपण कोण आहोत ह्यावरून, आपला धर्म कोणता आहे ते ठरते. आपले कर्तव्य काय आहे ते ठरते.

एकदा आपला कर्तव्यधर्म ठरला म्हणजे मग त्याचे कसोशीने पालन करणे ही आपली जबाबदारी होते.

कोणत्याही कर्तव्यधर्माच्या पालनामधे काही ना काही अडचणी असतातच. स्वधर्मपालन सोपे नसते.

उलट, अनेकवेळा ते फारच कठीण असते. तरीही त्याचेच पालन करणे चांगले, योग्य व हितकारक असते.

' स्वधर्माचरण कठीण आहे, जमत नाही.' म्हणून किंवा अन्य कोणत्याही कारणाने ते नाकारणे आणि जे अपेक्षित नाही ते करणे म्हणजे परधर्माचे पालन करणे होय. असे करणे म्हणजे पाप आहे. त्यामुळे माणसाची अपकीर्तीच होते.

म्हणूनच परधर्माचे पालन करणे कोणासाठीही, कधीही योग्य ठरणार नाही. हितकारक ठरणार नाही.

उलट स्वधर्माचे आचरण करीत असताना मरण आले तरीही ते कल्याणकारक असते.

**अर्जुन उवाच :**

**अथ केन प्रयुक्तोऽयम् पापञ् चरति पूरुषः ।**

**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ।। ३६ ।।**

हे वार्ष्णेया ! मग स्वतःची इच्छा नसताना देखील, हा पुरुष, बलात्काराने करावयास लावल्याप्रमाणे पाप करतो ते कोणाच्या प्रेरणेने?

येथे अर्जुनाला एक शंका आली. योग्य अशी शंका आली. ही शंका आपल्यालाही वारंवार येत असते.

हल्लीच्या **' घोटाळे पर्वात '** तर ही शंका रोजच येते. रोजच्या रोज नवीन नवीन घोटाळे बाहेर येत आहेत.

घोटाळ्यांच्या रकमा समजायलाही वेळ लागतो आणि वर्तमानपत्रामधे छापलेले आकडे वाचणे किंवा लिहून दाखवणेही फार कठीण जाते. हे सगळे घोटाळे करणारी माणसे अगदी उच्चपदस्थ असतात. सत्ताधीश असतात.

त्यांच्याजवळ मुळामधे सुबत्ता असते. समाजामधे मानमरातब असतो. त्यांच्या मालकीची मोठी घरे असतात.

दाराशी गाड्या उभ्या असतात. हातात अधिकार असतो. कशाचीही कमतरता नसते. तरीही घोटाळे करतात.

कोटी कोटी रुपयांची लाच खात असतात. कशासाठी? भ्रष्टाचार करून मिळविलेल्या इतक्या पैशांचे ते काय करतात?

माणूस जेवढा जास्त शिकलेला असेल, तेवढा मोठा घोटाळा करतो आहे. का?

देवाने माणसाला खाण्यासाठी एकच तोंड दिलेले आहे! खाल्लेले पचविण्यासाठी एकच जठर दिलेले आहे! आणि —

पचना नंतर शिल्लक राहिलेला, शरीरासाठी निरुपयोगी असा भाग, विष्ठारूपाने शरिराबाहेर टाकण्यासाठी एकच गुदद्वार दिलेले आहे!

कितीही धनवान मनुष्य असला तरी, तो आपल्या तोंडात नाणी किंवा नोटा भरून चघळू शकत नाही.

सोने किंवा चांदीच्या तुकड्यांचा घास घेऊ शकत नाही.

त्याला भात, भाजी, आमटी, पोळी ह्या पदार्थांचेच घास घ्यावे लागतात.
ते सुद्धा जठराचा अर्धा भाग भरेपर्यंतच घेता येतात. त्यापुढे नाही. त्यानंतर जेवणाच्या ताटावरून उठावेच लागते.
कारण जठराचा पाव भाग पाण्यासाठी आणि उरलेला पाव भाग हवेसाठी राखीव असतो.
हे जर सत्य आहे तर मग ही सगळी मंडळी लाच का खातात? भूखंड का गिळतात? जे आपले नाही त्याची हाव का बाळगतात? जेथे जातात तेथे हात का मारतात? दुसऱ्याच्या तोंडचा, त्याच्या हक्काचा घास का हिरावून घेतात? समाजामधील मोठी मोठी माणसे पाप का करतात?
त्यांना चांगले आणि वाईट, खरे आणि खोटे, योग्य आणि अयोग्य, पाप आणि पुण्य म्हणजे काय हे पूर्णपणे माहीत असते.
कोणत्याही स्वरुपामधे भ्रष्टाचार करणे हे पाप आहे. तसे करणे म्हणजे **राष्ट्रद्रोह** करणेच आहे. हे ही माहीत असते.
लोकांच्यामधे बोलताना ही मंडळी, शुचिर्भूत चारित्र्याच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारतात, लंबीचौडी भाषणेही करतात.
नेहमी, ' जनतेने काय काय केले पाहिजे ' तेच सांगत असतात. पण स्वत:मात्र करू नये तेच करतात.
घोटाळे करतात. अनैतिक गोष्टी करतात. जनतेची सतत फसवणूक करतात. ठरवून भ्रष्टाचार करतात आणि त्याचे समर्थनही करतात.
मुख्य म्हणजे त्यांना ह्याची जराही लाज वाटत नाही. खंत वाटत नाही.
' माणूस असे का करतो? कोणाच्या प्रेरणेने पाप करतो?' हाच प्रश्न अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारला आहे.
त्यामधे त्याने, त्याच्या व्यक्तिमत्वाला अनुरूप असा ' स्वत:ची इच्छा नसतानाही.' असा शब्द प्रयोग केला आहे आणि जरी तो आजच्या काळासाठी योग्य नसला तरीही, त्याच्या काळासाठी योग्यच आहे.
आजचे जवळ जवळ सगळे भ्रष्टाचारी हे उच्च पदस्थच असतात. त्यांच्याकडे सर्व काही असते. तरीही स्वत:च्या इच्छेने, अत्यंत हुशारीने, नीट विचार करून आणि त्यासाठी खास योजना आखूनच, भ्रष्टाचार करताना दिसतात.
भ्रष्टाचार उघडकीला आलाच तर वर्षानुवर्षे चौकशी आणि खटल्यांचे नाटक चालत राहते.
काही अपवादात्मक प्रकरणे सोडली तर त्यांच्यापैकी कोणालाही शिक्षा झालेली दिसत नाही.
सगळे अगदी मजेत राहात असतात.

**श्रीभगवानुवाच :**

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।। ३७ ।।**
**धूमेनाव्रियते वन्हिः यथादर्शो मलेन च ।**
**यथोल्बेनावृतो गर्भः तथा तेनदमावृतम् ।। ३८ ।।**
**आवृतम् ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।**
**कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ।। ३९ ।।**
**इंद्रियाणि मनो बुद्धिः अस्याधिष्ठानमुच्यते ।**
**एतैर्विमोहयत्येषः ज्ञानमावृत्य देहिनम् ।। ४० ।।**
**तस्मात् त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानम् प्रजहि ह्येनम् ज्ञानविज्ञाननाशनम् ।। ४१ ।।**
**इंद्रियाणि पराण्याहुः इन्द्रियेभ्यः परम् मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतस्तु सः ।। ४२ ।।**
**एवम् बुद्धेः परम् बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।**
**जहि शत्रुम् महाबाहो कामरूपन् दुरासदम् ।। ४३ ।।**

अर्जुना ऽऽ! सर्व प्राणिमात्र सत्व, रज आणि तम ह्या तीन गुणांनी युक्त असतात.
ज्या गुणाचे प्राबल्य असेल त्याप्रमाणे प्राणी वागत असतो.
तीन गुणांच्यापैकी रजोगुणापासून उत्पन्न झालेला **काम** आणि **क्रोध** ह्यांच्या प्रभावाने मनुष्य पाप करतो.
ह्यांचा प्रभाव वाढला म्हणजे ते तमोगुणाच्या वाढीलाही अनुकूल होतात.
लोभ, मोह, मद आणि मत्सर हे चारही ह्यांच्यामुळेच वाढायला लागतात. हे सगळे माणसाचे शत्रू आहेत असे समज.
काम म्हणजे कामना म्हणजे काहीतरी मिळवायची इच्छा होणे. हे एका मर्यादेपर्यंत आवश्यक आहे. उपकारकही आहे.

परंतु जेव्हा ती मर्यादा ओलांडली जाते तेव्हा तोच काम माणसाचा मोठा शत्रू होतो. कामनांना अंत नसतो. त्या कधीही संपत नाहीत. अमर्याद कामना ही माणसाच्या ज्ञानाला झाकून टाकते. सारासार विचारशक्तीला बाजूला सारते.
ज्याप्रमाणे धुराने अग्नी किंवा धुळीने आरसा आच्छादला जातो अथवा वारेने गर्भ झाकलेला असतो त्याप्रमाणे हा काम माणसाचे ज्ञान पूर्णपणे झाकून टाकतो.
कामना पूर्ण झाली नाही तर क्रोध आपला प्रभाव गाजवायला लागतो.
क्रोध हा माणसाची इंद्रिये, मन आणि बुद्धी ह्यांचा ताबा घेतो.
त्याची सारासार विचारशक्ती नाहीशी करून टाकतो आणि त्याला मोहात पाडतो.
नंतर स्वत:विषयीचा अहंकार म्हणजेच **मद** आणि आपल्या कामनापूर्तीच्या आड येणाऱ्या माणसाविषयीचा **मत्सर** हे दोघे क्रियाशील होतात. ह्या सगळ्यांच्या परिणामामुळे माणूस **पाप** करायला लागतो.
म्हणून काम आणि क्रोध हेच माणसाचे खरे वैरी आहेत असे समज.
ज्याला ह्या दोघांच्यावर विजय मिळवायचा असेल त्याला आपल्या इंद्रियांचे संयमन केले पाहिजे. इंद्रिये ताब्यात आणली पाहिजेत.
आपली इंद्रिये ताब्यात आली म्हणजे मनाचे इतस्तत: भटकणे थांबते आणि बुद्धी मोकळी होते.
सारासार विचार करण्याची शक्ती आपले काम करायला लागते.
परिणामी काम आणि क्रोध ह्यांचा मनावरील प्रभाव नाहीसा होतो.
माणसाच्या सर्व शारिरीक क्रिया प्रतिक्रिया ह्या त्याच्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारे आणि कर्मेंद्रियांच्या द्वारे होतात. म्हणून इंद्रिये ही स्थूल शरीरापेक्षा श्रेष्ठ आहेत.
इंद्रियांच्यावर मनाचेच राज्य चालते. मनच इंद्रियांना कार्य करायला लावते. म्हणून इंद्रियांच्यापेक्षा मन श्रेष्ठ आहे.
मनावर बुद्धीचा म्हणजेच सारासार विचारशक्तीचा अधिकार चालतो. म्हणून मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे.
आणि जो बुद्धीच्याही पलीकडे, बुद्धीहूनही सूक्ष्म आणि बलवान असतो व जो बुद्धीवरही राज्य करतो, तो आत्मा सर्वश्रेष्ठ आहे.
ही साखळी तू नीट समजून घे आणि आत्मा हा सर्वश्रेष्ठ आहे हे जाणून, बुद्धीच्या द्वारे मनाचे संयमन करून, ह्या कामरूपी अजिंक्य अशा शत्रूला मारून टाक.

**येथे तिसरा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे कर्मयोगावर विवेचन केलेले आहे.
माणसाने आपले विहितकर्म **' का करायचे?'** आणि **' का टाळायचे नाही?'** ते स्पष्टपणे, स्वच्छपणे सांगितलेले आहे.
कोणत्याही प्राण्याला **' कर्म करणे '** चुकलेले नाही. चुकवता येत नाही.
इतर सर्व प्राणिमात्रांना निसर्गाने फारच मर्यादित बुद्धिमत्ता दिलेली आहे. त्यामुळे ते सर्व आपापल्या नैसर्गिक प्रेरणे प्रमाणेच वागतात.
निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करीत नाहीत. करू शकत नाहीत. निसर्गाला धरून राहतात. त्याच्याशी एकरूप होऊन राहतात.
वाघाला भूक लागली म्हणजे तो हरिणासारख्या इतर प्राण्यांना मारून खातो. तो त्याचा स्वभाव असतो. सहज प्रवृत्ती असते.
परंतु एकदा पोट भरले म्हणजे मग तो ती शिकार असेल तेथेच सोडून देतो आणि तेथून निघून जातो.
**' उद्या खायला लागेल.'** म्हणून उचलून आपल्या गुहेत नेऊन ठेवीत नाही.
तसेच परत भूक लागेपर्यंत शिकारही करीत नाही. आपले पोट भरलेले असताना कोणालाही मारत नाही.
तो देखील त्याचा स्वभावच असतो. सहज प्रवृत्ती असते. सर्व प्राणिमात्र असेच वर्तन करतात.
त्यांचेकडून नैसर्गिक मर्यादांचे सहजपणे पालन केले जाते. ते **' पाप किंवा पुण्य '** करू शकत नाहीत.
ते जे काही करतात तो त्यांचा स्वभाव असतो. माणसाला मात्र निसर्गाकडून अमर्याद बुद्धिमत्तेचे वरदान मिळालेले आहे.
त्यामुळे तो **' कर्म '** करताना **' विवेकाचा '** वापर करू शकतो.
एखादे कर्म करणे ' योग्य की अयोग्य, नैतिक की अनैतिक, न्याय्य की अन्याय्य, सत्य की असत्य ' ह्या सर्वांचा विचार करू शकतो. त्यावर निर्णयही घेऊ शकतो आणि त्याप्रमाणे वर्तनही करू शकतो.
काही अपवादात्मक परिस्थिती बाजूला ठेवली तर सर्वसाधारणपणे ते स्वातंत्र्य आपल्यापैकी प्रत्येकालाच असते. म्हणून केवळ माणूसच **' चांगले किंवा वाईट '** वर्तन करू शकतो. एखादे **' पाप '** किंवा **' पुण्य '** करू शकतो.
माणूस ह्या स्वातंत्र्याचा, अनेकवेळा दुरुपयोगच करीत आलेला आहे ही गोष्ट वेगळी. ते आपण रोजच्या व्यवहारामधे नेहमीच पाहतो.
' आपण माणसांनी निसर्गाला निर्माण केलेले नाही तर निसर्गानेच आपल्याला निर्माण केलेले आहे.' ही सत्य गोष्ट तो विसरतो.
निसर्गावरच अधिकार गाजवायला लागतो. निसर्गाचा समतोल बिघडवायला लागतो.

मग त्याचे बरे वाईट परिणामही भोगावेच लागतात.
समुद्रामधे भराव टाकून मोठे मोठे सागरी पूल बांधले.
त्यामुळे प्रवाशांची वाहतूक व माल वाहतूक सुलभ झाली आणि वेळेची बचत झाली हे खरे. पण मग समुद्राचे पाणी कुठे जाणार?
आपण त्याची जागा बळकावल्यावर ते आपली जागा बळकावल्याशिवाय कसे बरे राहील?
अखेरीस ते पाणी शहरामधेच घुसणार आणि शहराची वाताहात करणार.
निसर्ग आपला समतोल अत्यंत योग्य प्रकारे सांभाळत असतो. त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी तोच घडवून आणत असतो.
‘ महापूर येणे, भूकंप होणे, अशनिपात होणे, ज्वालामुखींचे उद्रेक होणे, मोठमोठ्या आगी लागणे, रोगांच्या साथी पसरणे, पृथ्वीचा अक्ष बदलणे, हवामान बदलणे, ऋतुचक्र बदलणे, समुद्राची पातळी वाढणे, पर्वतांचे खचणे आणि कोसळणे ’
इत्यादी सर्व घटना म्हणजे निसर्गाची अत्यंत शक्तिशाली हत्यारे आहेत.
ह्यातले कोणतेही एक कारण घडले तरी कमालीचा विनाश घडून येतो. एकाचवेळी अनेक कारणे घडली तर बघायलाच नको.
माणसाला हे सगळे समजते. सगळे कळते पण वळत नाही हेच खरे दुखणे आहे.
ह्या पृथ्वीवर जीवन अस्तित्वामधे आल्यापासून आजपर्यंत अनेकविध सजीव प्राणी जाती उत्पन्न झाल्या आणि काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्यांच्या नष्ट होण्यामागे कोणते ना कोणते तरी बाह्य कारण होते.
पण माणसाच्या बाबतीत मात्र वेगळे विधान केलेले आहे.
‘ भविष्यकाळामधे केव्हा तरी मानव जातही ह्या पृथ्वीवरून नष्ट होईल. पण त्यासाठी कोणत्याही बाह्य कारणाची गरज भासणार नाही. माणूस स्वत:च स्वत:ला नष्ट करील.’
असे विधान केले गेलेले आहे आणि ते खरे ठरेल असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण व्हायला लागली आहे.
असे असले तरीही मानवाला आपण **‘ दानव व्हायचे की देव व्हायचे? ’** हे ठरविण्याचे स्वातंत्र्य मात्र निश्चित असते. असो.
आता पुढील अध्यायामधे हा कर्मयोगाचा विषयच पुढे चालणार आहे.
किंबहुना पुढील सर्व अध्यायांच्यामधे, विवेचन कोणत्याही विषयाचे असले तरीही, हा कर्मयोग, एखाद्या पालुपदासारखा सतत येत राहणार आहे. कारण **‘ युद्ध करायचे नाकारणाऱ्या अर्जुनाला युद्धासाठी परत उभे करणे!’** हाच श्रीकृष्णाचा मुख्य हेतू आहे.
एकमेव हेतू आहे. त्यासाठीच त्याचा प्रयत्न चाललेला आहे.
त्यामुळे कर्मयोग हाच गीतोपदेशाचा मुख्य विषय असणार आहे.
आणि इतर सर्व विषय हे कर्मयोगाच्या समर्थनासाठीच आलेले असणार आहेत.
आता पुढील अध्यायामधे श्रीभगवान काय सांगतात ते ऐकूया!
अस्तु!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८ - ७८ ॥**

## <u>अध्याय चवथा</u>

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या चवथ्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
मागील अध्यायामधे आपण, कर्मयोगाच्या विवेचनाला सुरवात झाली ते पाहिले.
ह्या जगामधे सांख्यांचा ज्ञानयोग आणि योग्यांचा कर्मयोग अशी दोन प्रकारची निष्ठा आहे आणि त्या दोनही निष्ठांचे अंतिम ध्येय **' आत्मज्ञानप्राप्ती!'** हेच आहे. कर्म करणे कोणालाही चुकले नाही, चुकविता येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.
मग जे अनिवार्य आहे, करावेच लागणार आहे, ते कर्म कसे करावे त्याविषयी सांगितले.
कर्म करीत असताना त्याच्या फळाची आशा न बाळगता, केवळ आपले कर्तव्य म्हणून जर विहित कर्म पार पाडले, तर कर्त्याला त्या कर्माचे बंधन पडत नाही. तो कर्मबंधनापासून सदैव मोकळाच राहतो हे सांगितले.
समाजामधील ज्येष्ठ व श्रेष्ठ पुरुषांनी, सर्व समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी, जनसामान्यांच्यामधे वावरताना कसे वागले पाहिजे ते स्पष्ट करून सांगितले.
त्यानंतर अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नावरून, रजोगुणापासून उत्पन्न होणारे काम आणि क्रोध हे माणसाला पाप करायला भाग पाडतात. तेच माणसाचे खरे वैरी आहेत. त्यांच्यावर विजय मिळवायचा असेल तर आपल्या इंद्रियांचे संयमन केले पाहिजे.
इंद्रिये ताब्यात ठेवली पाहिजेत. त्यांना योग्य वळण लावले पाहिजे असे सांगितले.
आता तोच धागा पकडून श्रीकृष्णाने, <u>' कर्मयोगाची प्राचीन परंपरा!'</u> कशी आहे ते सांगायला सुरवात केली आहे.
<u>गीतेच्या चवथ्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे.</u>
तो अर्जुनाला सांगतो आहे की, —

**श्रीभगवानुवाच :**
**इमम् विवस्वते योगम् प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत ।। १ ।।**
**एवम् परम्पराप्राप्तम् इमम् राजर्षयो विदुः ।**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ।। २ ।।**
**स एवायम् मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।**
**भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यम् ह्येतदुत्तमम् ।। ३ ।।**

' अर्जुनाऽऽ! मी हा अविनाशी योग कल्पारंभी सूर्याला सांगितला होता. सूर्याने आपला पुत्र मनू याला ह्या योगाची सविस्तर माहिती सांगितली. राजर्षी मनूने स्वतः तसे आचरण केले. पुढे मनूने आपला पुत्र इक्ष्वाकू याला ह्या योगाचा उपदेश केला.
त्यानंतर ह्या प्रकारे परंपरेने प्राप्त झालेला हा योग राजर्षींना माहीत झाला. त्यांनी त्याचे मनोभावे आचरणही केले.
पण हे अर्जुना ! पुढे माणसांना आत्मज्ञानाचा विसर पडला. त्यांचा सगळा भर आपला देह, आपली इंद्रिये, त्यांच्या विविध वासना आणि त्यांची तृप्ती ह्यावरच पडायला लागला. त्यांना विषयसुख हेच सर्वोत्तम वाटायला लागले. नश्वर देहच अत्यंत प्रिय झाला.
हा मोह अतोनात वाढल्यामुळे दीर्घकालाने ह्या लोकी हा योग नष्ट झाला.
तोच, हा सर्व रहस्यांमधील उत्तम रहस्य असलेला, प्राचीन योग मी आज येथे तुला सांगितला. कारण तू मला अतिशय प्रिय आहेस. माझा प्रिय सखा तर आहेसच, त्याशिवाय तू माझा भक्तही आहेस. मला तुझ्या इतका प्रिय असा दुसरा कोणीही नाही. तुझ्या कल्याणाची चिंता मी नेहमीच करत असतो आणि त्या दृष्टीनेच सगळे प्रयत्न करीत असतो.'
हे ऐकल्यावर अर्जुन विचारात पडला.
' अरेऽऽ, हे कसे शक्य आहे? हा आत्ता माझ्या समोर उभा आहे. हा माझ्यापेक्षा मोठा आहे पण फार मोठा नाही आहे.
सूर्याचे वय तर लक्षावधी वर्षांचे असेल आणि हा तर मला न पटणारी गोष्ट सांगतो आहे.
काय तर म्हणे, मी हा अविनाशी योग कल्पारंभी सूर्याला सांगितला!!!
पण हे श्रीकृष्ण सांगतो आहे म्हणजे ते सत्यच असेल हे निश्चित.
त्याचे हे सांगणे खोटे असणारच नाही. परंतु मला ते पटतही नाही.'
मनामधे अशी शंका आल्यामुळे तो श्रीकृष्णाला प्रश्न विचारतो आहे की, —

**अर्जुन उवाच :**

**अपरम् भवतो जन्म परञ् जन्म विवस्वत: ।**

**कथमेतत् विजानीयाम् त्वमादौ प्रोक्तवानिति ।। ४ ।।**

‘ हे कृष्णा! तुझ्या बोलण्याने मी परत एकदा गोंधळून गेलो आहे.

तू माझ्यापेक्षा वयाने मोठा आहेस तरी आपण दोघे एकाच पिढीचे आहोत. तुझा जन्म माझ्या अगोदर झालेला असला तरी अलिकडचाच आहे. सूर्यनारायण तर फार प्राचीन आहे. त्याचा जन्म कधी झाला ते कोणालाही सांगता येणार नाही. असे असूनही, त्याला हा निष्काम कर्मयोग तू सांगितलास असे सांगतो आहेस. आता मी ह्याचा अर्थ काय समजायचा?’

अर्जुनाच्या ह्या प्रश्नाचे उत्तर देताना, श्रीकृष्ण **‘ तो खरा कोण आहे?’** ते सांगायला सुरवात करतो आहे.

ह्या सांगण्याचा परमोच्च आविष्कार पुढे अकराव्या अध्यायात झालेला आहे. असो.

आतापर्यंत त्याने अर्जुनाला, ‘ मला ह्या जगामधे कोणाकडूनही काहीही मिळवायची इच्छा नाही. तरीही मी सदैव आपले विहितकर्म करीत असतो. माझे हे वर्तन एक उदाहरण म्हणून समजून, तू त्याप्रमाणे वाग. माझ्यावर विश्वास ठेव! माझे अनुकरण कर! मी सांगतो आहे त्याप्रमाणे आप्तांच्या विषयीची ममता सोड. कर्मफलाचा विचार न करता, त्याची आशा न धरता, आपले कर्तव्य म्हणून युद्ध कर!’ असे सांगितले आहे.

पण ते सांगणे म्हणजे, अर्जुनाला युद्ध करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने केलेली सर्वसाधारण विधाने आहेत.

कोणताही बुद्धिमान, कर्तृत्ववान आणि आदरणीय ज्येष्ठ पुरुष, त्याच्याशी संबंधित असलेल्या, त्याच्यावर श्रद्धा व विश्वास असलेल्या आणि कोणत्यातरी प्रसंगामधे पूर्णपणे गोंधळून गेलेल्या अशा दुसऱ्या पुरुषाला अगर स्त्रीला, मार्गदर्शन करीत असताना असे सांगू शकेल. संबंधित व्यक्तीवर त्याच्या सांगण्याचा यथायोग्य परिणामही होऊ शकेल.

त्यामधे विशेष उल्लेखनीय असे फारसे काही नाही.

परंतु येथे बोलण्याच्या ओघामधे, ही अत्यंत महत्त्वाची आणि विशेष अशी गोष्ट, अगदी सहजपणे सांगितली गेली आहे आणि त्यामधे फार मोठा अर्थ दडलेला आहे. म्हणूनच तिला तेवढे महत्त्वही आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**

**तान्यहम् वेद सर्वाणि न त्वम् वेत्थ परन्तप ।। ५ ।।**

अर्जुनाऽऽ! आज येथे मी कृष्ण आहे आणि तू अर्जुन आहेस. आपण दोघे ह्या रणांगणावर युद्धासाठी उभे आहोत.

परंतु ह्याचा अर्थ **‘ ह्यापूर्वी आपण नव्हतो! ’** असा नाही. तुला असे वाटत असेल तर तो ही एक भ्रमच आहे.

वास्तविक ह्या अगोदर तुझे आणि माझे अनेक जन्म होऊन गेलेले आहेत.

तुला त्याविषयी काहीच आठवत नसले तरी मला मात्र सगळे काही आठवते आहे.

ह्या पूर्वीचा माझा प्रत्येक जन्म आणि त्या जन्मामधे केलेले कार्य स्पष्टपणे आठवते आहे. ह्याचे कारण तुला सांगतो ते ऐक.

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**

**प्रकृतिम् स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया ।। ६ ।।**

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**

**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानम् सृजाम्यहम् ।। ७ ।।**

**परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।**

**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।। ८ ।।**

असे पहा की, खरे म्हणजे मी जन्मरहित आणि नाशरहित असा आहे. माझा जन्म आणि मृत्यू हे दोनही संभवतच नाहीत. मी सर्व विश्वाचा, सर्व भूतांचा, सर्व प्राणिमात्रांचा स्वामी आहे. परंतु माझ्या बाबतीत, ‘ कोणते तरी विशिष्ट कार्य करण्यासाठी व्यक्त होणे म्हणजे जन्माला येणे आणि ठरविलेले कार्य पूर्ण करून परत अव्यक्त होणे म्हणजेच जीवनाचा त्याग करणे ’ हे सुद्धा घडत असते. स्वभावत: मी निर्गुण व निराकारच आहे. तरीही काही विशेष कार्य करण्याच्या हेतूने, मी आपल्या योगमायेचा आश्रय घेऊन, प्रकृतीला वश करून, सगुण आणि साकार रूपाने नटतो. आवश्यकतेप्रमाणे एखादा देह धारण करतो.

तसा देह धारण केल्यावरही माझ्या मूळच्या अविनाशित्वाला बाधा येत नाही. **मी सदैव स्वतंत्रच असतो. सर्वथैव स्वतंत्रच असतो.**

अर्जुनाऽऽ! जगामधे जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्म बलवान होतो, अधर्म हाच धर्माची जागा घेतो आणि धर्माचा पराभव होऊन तो वनवासी होतो, त्यावेळी, आपले अव्यक्तपण बाजूला ठेवून, मी स्वत:च जन्माला येतो.

जगामधे अशी परिस्थिती वारंवार येतच असते. कालचक्र आपल्या नैसर्गिक गतीने सतत फिरत असते.
सर्व विश्वाचा व्यवहार हा एखाद्या रहाटगाडग्यासारखा चालत असतो. त्यामुळे समाजाचा उत्कर्ष आणि अपकर्ष हे घडून येतच असतात. ह्या दोनही बाबतीत कमाल मर्यादा गाठली जातच असते.

**ज्यावेळी उत्कर्षची कमाल मर्यादा गाठली जाते** त्यावेळी, —

सर्व समाज सुख, शांती, समाधान, सुरक्षितता, विकास आणि मुक्तीचा अनुभव घेतो. प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात तत्पर असतो. कर्तव्यपालनामधे कोणाकडूनही कसूर केली जात नाही. कोणाच्याही मनामधे पाप करायचा विचारही येत नाही. त्यामुळे कोणाकडूनही प्रत्यक्ष पापाचरण संभवत नाही. दुसऱ्याच्या कोणत्याही गोष्टीचे अन्यायाने अपहरण केले जात नाही. म्हणूनच सर्वांना त्यांचे योग्य अधिकारही सहजपणे प्राप्त होतात. परिणामी सर्व समाजाचा, सर्व बाबतीत, सर्व दृष्टीने विकास घडून येतो.

पण **ज्यावेळी अपकर्षाची कमाल मर्यादा गाठली जाते** त्यावेळी, —

अत्यंत विपरीत परिस्थिती निर्माण होते. सगळीकडे अज्ञानाचा घोर अंधकार पसरतो. समाजामधे अहंकार, दंभ आणि दर्प हे बळावतात. अन्यायाची परिसीमा होते. अनीतिमान व असत्य आचरण हाच धर्म मानला जातो. पापी माणसांचा अमर्याद उत्कर्ष व्हायला लागतो. ती सत्ताधीश होतात. जे दुर्जन असतात तेच बलवान होतात आणि आपल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करून सज्जनांना अनेक प्रकारे यातना देतात. त्यांना सरळपणे जगणे अशक्य केले जाते. त्यांच्यावर अपमानित होऊन, हताश होऊन, निराश होऊन, देशोधडीला लागण्याची वेळ येते. एखाद्या निराश्रिताप्रमाणे रानोमाळ भटकण्याची वेळ येते. अशा विपरीत वेळी सर्वच दृष्टीने बलवान असलेल्या त्या दुष्टांचा सर्वनाश करून, सर्वच दृष्टीने दुर्बल झालेल्या सज्जनांचे सर्वतोपरी रक्षण करण्यासाठी आणि **न्याय, नीति व धर्माची** पुन:स्थापना करण्यासाठी प्रत्येक युगामध्ये मी जन्म घेतो.

आचार्य विनोबा भाव्यांच्या **गीताई** मधे ह्या श्लोकाला समओवी दिलेली आहे.

**राखावया जगीं संतां दुष्टां दूर करावया ।**
**स्थापावया पुन्हां धर्म जन्मतों मी युगीं युगीं ।। गीताई ४ - ८ ।।**

**' विनाशाय च दुष्कृताम् ।'** ह्या पादाचा अनुवाद त्यांनी **' दुष्टां दूर करावया ।'** हे शब्द वापरून केला आहे.
दुष्टांना दूर करायचे म्हणजे काय करायचे? आणि दुष्टांना दूर केले तर ते गप्प बसून राहतील का? नाही! मुळीच नाही!
उलट संधी मिळताच ते दुप्पट जोराने अंगावर धावून येतील!
खरे म्हणजे ' विनाशाय च दुष्कृताम् ' म्हणजे **' दुष्टां नष्ट कराया!'** किंवा **' दुष्टां ठार कराया!'** असे म्हणायला हवे होते.
पण ह्या श्लोकाचा अनुवाद करताना आचार्यांची अहिंसा आडवी आली असावी.
असे असले तरीही माझ्या मते **गीताई** सर्वोत्तम आहे.
ज्याला भगवद्गीतेचा अर्थ समजून घ्यावयाची इच्छा असेल त्याने गीताई अवश्य वाचावी.
आचार्यांनी स्वत:चे कोणतेही मत न मांडता, गीतेच्या प्रत्येक श्लोकाचा अर्थ सोप्या मराठीत उत्तम प्रकारे सांगितलेला आहे.
' जर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला मराठीमधून भगवद्गीता सांगितली असती, तर त्याचे ते सांगणे **गीताई** सारखेच असते!' असे मला नेहमीच वाटते. एक महत्त्वाची गोष्ट तुम्हाला माहीत आहे कां? आपल्यापैकी अनेकांना कदाचित् माहीत नसेल म्हणून सांगतो.
**' गीताई '** हे मराठी भाषेतील सर्वाधिक विकले गेलेले पुस्तक आहे. असो.

**येथे पुनर्जन्म ह्या संकल्पनेचे समर्थन केलेले आहे.**

दुसऱ्या अध्यायामधे १२, १३, २०, २२ आणि २७ हे पाच श्लोक ह्या संकल्पनेला स्पर्श करतात.
गीतेच्या सर्व अध्यायांमधे एकूण २६ श्लोक हे पुनर्जन्मविषयक आहेत. **पुनर्जन्म** ह्या संकल्पनेचा आधार घेत सांगितलेले आहेत.

**परंतु येथे अत्यंत स्पष्टपणे समर्थन केलेले आहे.**

' प्राण्याला पुनर्जन्म आहे की नाही?' हा फार गहन विषय आहे. ह्या विषयी अनेक वादविवाद सतत होत असतात.
येथे मात्र श्रीकृष्ण ' प्रत्येक प्राणिमात्राला पुनर्जन्म असतो.' असे स्वच्छपणे सांगतो आहे. तसेच अपरोक्षपणे, जन्म आणि मृत्यूचे चक्र सदैव फिरत असते असेही सांगतो आहे. ह्या श्लोकांमधून दुसरा अर्थ काढताच येणार नाही.

**जन्म कर्म च मे दिव्यम् एवम् यो वेत्ति तत्वत: ।**
**त्यक्त्वा देहम् पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ।। ९ ।।**
**वीतरागभयक्रोधा: मन्मया मामुपाश्रिता: ।**
**बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागता: ।। १० ।।**

आजपर्यंत माझे असे अनेक दिव्य जन्म होऊन गेलेले आहेत आणि त्या जन्मांमधे मी अनेक दिव्य कर्मे केली आहेत.
माझे अशाप्रकारे **' अजन्मा '** असूनही जन्म घेणे आणि **' अक्रिय '** असूनही नानाविध कर्मे करणे, ह्यामागील तत्त्व जो जाणतो, तो सदैव मुक्तच असतो. देहत्याग केल्यावर त्याला परत जन्म येत नाही. तो मला म्हणजे परमेश्वराला येऊन मिळतो.
ज्यांची स्वत:विषयीची किंवा इतरांच्याविषयीची आसक्ती, भय आणि क्रोध नाहीसे झालेले असतात, जे सदैव मला शरण येऊन माझेच चिंतन करतात, माझीच भक्ती करून माझ्या ठिकाणी स्थिर होतात आणि माझ्याच आश्रयाने राहतात, असे अनेक लोक, तपश्चर्येने आणि माझ्या विषयीच्या ज्ञानाने शुद्ध होऊन, अखेरीस मलाच येऊन मिळालेले आहेत.

**ये यथा माम् प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।। ११ ।।**

अर्जुनाऽऽ! जे मला ज्या प्रकारे भजतात, त्यांना मी त्याच प्रकारे भजतो. जे माझी ज्या प्रकाराने आणि ज्या प्रमाणात भक्ती करतात, त्यांच्यावर मीही त्याच प्रमाणात प्रेम करतो. हे रहस्य जाणूनच, बुद्धिमान लोक सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुकरण करतात.
हा झाला ह्या श्लोकाचा सरळ अर्थ. परंतु ह्या श्लोकामधे एक दुसराही अर्थ सामावलेला आहे असे मला वाटते.
आपण जरा अधिक खोलात जाऊन विचार करूया.

**' ये यथा माम् प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ।'**

' अर्जुनाऽऽ! जे लोक माझ्या बरोबर ज्या प्रकारे वागतात, त्यांच्या बरोबर मी देखील त्याच प्रकारे वागतो.'
श्रीकृष्णाने आपल्या जीवनामधे, अनेक वेळा अनेकांच्या बरोबर वागताना, वरील विधानाचे पालन केलेले आहे.
त्यापैकी काही घटना पुढील प्रमाणे —
१) कंसाच्या सांगण्याप्रमाणे पूतना त्याला मारायला गोकुळात आली होती. त्याने तिलाच मारून टाकली.
२) सर्व गोकुळवासियांचे त्याच्यावर अतोनात प्रेम होते. तो सर्वांचाच लाडका होता. सर्वांनाच प्रिय होता. जेव्हा वेळ आली तेव्हा त्याने, गोकुळवासियांचे इंद्राच्या रागापासून रक्षण करण्यासाठी, गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलून धरला.
दुसऱ्या एका प्रसंगी कालियाला यमुनेच्या डोहामधून पळवून लावला.
३) कंसमामाने त्याला मारण्याचे अनेक प्रयत्न केले. ते सगळे प्रयत्न अयशस्वी झाले. पुढे जेव्हा त्या दोघांची समोरासमोर गाठ पडली तेव्हा, ती त्यांची पहिली आणि शेवटची भेट ठरली. त्याने मामाला नव्याने काही गडबड करायची संधीच दिली नाही. अगोदर त्याच्या मल्लांना मारून नंतर सरळ त्याच्यावरच झेप घेतली आणि मारून टाकले.
सर्वशक्तिमान अशा त्या कंसाच्या सुशोभित रंगशालेमधे, अगणित प्रेक्षकांनी गर्दी केलेली होती. त्या रंगशालेमधे, त्याने आपल्या ज्येष्ठ बंधू बलरामासह प्रवेश केला. सगळे प्रेक्षक त्याच्याकडेच पहात होते. त्यावेळी तो कोणाला कसा दिसत होता?
ह्याचे एका कवीने फार सुरेख वर्णन केलेले आहे.

**मल्लां वज्र गमे, नरां नृप गमे, काम स्वयें स्त्री जनां ।**
**गोपां आप्त, खला नृपा प्रभु, शिशु मातापित्यांच्या मना ।**
**कंसा मृत्यु, विराट पामर जनां, संतांसि तत्वांबुधी ।**
**श्रीशेषासन यादवां, हरि दिसे रंगांत नानाविधी ।।**

अर्थ — एकच श्रीकृष्ण, तेथे असलेल्या मल्लांना वज्रासारखा, पुरुषांना राजासारखा, स्त्रियांना कामदेवासारखा, गोपजनांना नातलगासारखा, दुष्टांना अपराधाचे शासन करणाऱ्यासारखा, मातापित्यांना लहान बालकासारखा, कंसमामाला मृत्यूसारखा, दीन दुबळ्यांना आधारासारखा, संतांना परमेश्वरासारखा आणि यादव गणांना भगवान विष्णूसारखा दिसत होता. जो जसा होता त्याप्रमाणे त्याला श्रीकृष्णाचे रूप दिसत होते.
४) रणांगणामधे जरासंधाच्या समोरून त्याला अनेक वेळा पळून जावे लागले होते. त्याचे **' रणछोडदास.'** हे नांव त्यामुळेच अस्तित्वात आले. जरासंध आणि त्याचे मित्र व सहकारी राजे, ह्यांचेपासून वृष्णींना सुरक्षितपणे राहता यावे म्हणून, त्याला भर समुद्रामधे द्वारका नगरी उभी करावी लागली होती. तरीही योग्य वेळ आल्यावर त्याने भीमसेनाकरवी जरासंधाला मारून टाकले.
५) बालमित्र सुदामा त्याचा अनन्य भक्त होता. तो अत्यंत गरीब होता. जेव्हां तो श्रीकृष्णाला भेटायला द्वारकेला गेला, तेव्हां सुदाम्याने भेट म्हणून दिलेले जाडेभरडे पोहे त्याने अत्यंत आनंदाने खाल्ले. त्याला आपल्याकडे ठेवून घेतले, पाहुणचार केला आणि त्याच्या सर्व चिंता - विवंचना नाहीशा केल्या. सुदाम्याने संकोचामुळे काहीही मागितले नसतानाही, त्याला सर्व काही मिळाले.
६) शिशुपालाने आपली मर्यादा ओलांडली आणि शंभरावा अपराध केला. तेव्हां त्याने पांडवांच्या राजसभेमधे, सर्वांच्या समोर, त्याला मारून टाकले.

७) महाराणी दौपदी ही त्याची मानलेली बहीण होती. कौरवांच्या राजसभेमधे तिच्यावर विपरीत प्रसंग ओढावला. भर सभेमध्ये दुर्योधनाच्या आज्ञेने, दु:शासन तिचे वस्त्र खेचायला लागला. महापराक्रमी असलेले तिचे पाच पती विवश होऊन, माना खाली घालून बसले होते. राजसभेमधे उपस्थित असलेले सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठ जन हताश होऊन, विवश होऊन, हा सगळा संतापजनक प्रसंग पाहात होते. त्यावेळी आपले रक्षण करायला कोणीही पुढे येत नाही हे पाहिल्यावर, अत्यंत अपमानित झालेल्या त्या मानिनीने अत्यंत दु:खाने, कळवळून, आर्त स्वरामधे आपल्या प्रिय भावाला हाक मारली. कशी हाक मारली ते ऐका!

भाषाप्रभू म्हणून आपण सगळे ज्यांना ओळखतो, त्या महाराष्ट्रकवी मोरोपंतांनी **' आर्याभारत.'** लिहिलेले आहे. त्यामधे ह्या आर्या आहेत. द्रौपदी रडत रडत, श्रीकृष्णाला साद घालते आहे.

**' हे नाथ! रमानाथ! व्रजनाथ! हरे! मुकुंद! कंसारे! ।**
**गोविंद! कृष्ण! केशव! दीनार्तिहरस्त्वमेव संसारे. ।।**

अर्थ — हे नाथा! हे रमानाथा! हे वृंदावनाच्या नाथा! हे हरी! हे मुकुंदा! हे कंसाचा शत्रू असणाऱ्या! हे गोविंदा! हे कृष्णा! हे केशवा! ह्या संसारात दीनजनांचे दु:ख दूर करणारा तूच आहेस.

**भो भगवन्! भो वत्सल! भो हतचाणूरमल्ल! भागावें. ।**
**विश्वें तुझें चि, दुसरें न, यश श्रीप्राणवल्लभा ! गावें. ।।**

अर्थ — हे भगवंता! हे वत्सला! हे चाणूर मल्लाला मारणाऱ्या श्रीकृष्णा! दु:खी हो आणि धावत ये. माझे रक्षण कर. हे लक्ष्मीच्या प्राणप्रियकरा! सर्व विश्वाने इतर कुणाचेही यश न गाता केवळ तुझेच यश गावे.

तिच्या हाकेला प्रतिसाद देत तो वस्त्ररूपाने आला. आणि त्याने तिचे रक्षण केले.

**हा अंबरावतार श्रितलज्जारक्षणार्थ अकरावा, ।**
**प्रभुमत असें,' सदवनी आग्रह वेषीं कदापि न करावा.' ।।**

अर्थ — साधूंचे रक्षण करताना ज्याची गरज असेल ते कोणतेही रूप धारण केले पाहिजे असे मत असलेल्या प्रभूने, एका स्त्रीच्या लाजेचे रक्षण करण्यासाठी, अकरावा म्हणता येईल असा अंबरावतार घेतला.

८) कौरवांचा महामंत्री आणि धृतराष्ट्राचा धाकटा भाऊ असलेला विदुर त्याचा परमभक्त होता. अत्यंत चारित्र्यवान होता. पांडवांचा दूत म्हणून श्रीकृष्ण कौरवांच्या बरोबर वाटाघाटी करायला गेला असताना, जेव्हा वेळ आली तेव्हां, त्याने कौरवांचे निमंत्रण नाकारले, त्यांचा मानसन्मान नाकारला आणि तो विदुराकडे रहायला गेला. विदुराने यथाशक्ती - यथामती केलेले आदरातिथ्य मोठ्या आनंदाने स्वीकारले.

९) पाचही पांडव त्याचे भाऊ होते. त्या सर्वांचे त्याच्यावर प्रेम होते, श्रद्धा होती, भक्ती होती. ते चारित्र्यवान होते. तो त्यांच्यापाठी सतत उभा राहिला. त्यांचे सदैव रक्षण केले. त्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शनही केले. महायुद्धाच्या शेवटच्या रात्री अश्वत्थाम्याने केलेल्या नृशंस हत्याकांडातून त्यांना वाचवले. त्यानंतरही, त्यांना घेऊन हस्तिनापुरातील राजवाड्यात प्रत्यक्ष भेटीला गेले असताना, धृतराष्ट्राच्या क्रोधापासून भीमसेनाचे रक्षण केले.

१०) अर्जुन हा त्याचा निष्ठावान अनुयायी होता, परम भक्त होता. त्याचा बहिश्चर प्राणच होता. अर्जुनाच्यासाठी त्याने सर्व काही केले. त्याच्या रथाचे सारथ्य केले. त्याला वेळोवेळी मार्गदर्शन केले. उत्तेजन दिले. त्याची युद्धाची इच्छा आणि जिद्द सतत टिकवून ठेवली. शत्रूने त्याच्यावर सोडलेल्या प्राणघातक अस्त्राचा प्रहार, दोघांच्या मधे उभा राहून, स्वत:च झेलला. इतकेच नाही तर युद्ध संपेपर्यंत अर्जुनाच्या रथाचे आणि अश्वांचेही संरक्षण केले.

११) भीष्माचार्य हे सर्वच बाबतीत आदर्श पुरुष होते. त्याचे नि:सीम भक्त होते. तरीही योग्य वेळ आल्यावर, त्याने जराही वेळ न लावता, अर्जुनाकरवी त्यांना धराशायी केले.

१२) द्रोणाचार्य त्याचे भक्त होते. त्याचे माहात्म्य ओळखून होते. तरीही योग्य वेळ येताच, त्यांना भीमसेन आणि धर्मराजा कडून फसवून, धृष्टद्युम्नाकरवी मारून टाकले.

१३) कर्ण त्याचा मित्र होता आणि भक्तही होता. तरीही योग्य वेळ आल्यावर त्याने अर्जुनाला दुसरा कोणताही विचार करू दिला नाही आणि त्याला मारून टाकले.

१४) पांडवांचा वंश नष्ट व्हायचीच वेळ आलेली होती. अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रामुळे उत्तरेचा पुत्र मृतावस्थेतच जन्माला आला. त्याला त्याने आपल्या सामर्थ्याने जिवंत केले.

तोच परिक्षित राजा पुढे साठ वर्षे जगला. त्याला संतती झाली आणि पांडवांचा वंश पुढे चालू राहिला.

**' ये यथा माम् प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ।'**

त्याने अपराध करणाऱ्याला कठोर शासनच केले. ज्यांना शासन केले त्यापैकी कोणालाही त्याने निषेध खलिते पाठवले नाहीत.

पत्रकार परिषदा घेऊन कडक शब्दात ठणकावीत बसला नाही.
फालतू वाटाघाटी केल्या नाहीत. बंदिवान करून खटले चालवीत बसला नाही.
न्यायालयाने फाशीची शिक्षा दिल्या नंतरही त्यांना वर्षानुवर्षे पोलीस संरक्षणात ठेवून बिर्याणी खायला घालीत बसला नाही.
वरच्या कोर्टात अपील करू दिले नाही. मानवी हक्कांची चर्चा करीत बसला नाही. राष्ट्रपतींच्याकडे दयेचे अर्ज करू दिले नाहीत.
स्वत: वेळकाढूपणा केला नाही आणि इतरांनाही करू दिलाही नाही. त्याने ह्यातले काहीही केले नाही. सरळ सरळ ठार मारले.
नष्ट केले. अपराध्यांचे अस्तित्व नाहीसे करून टाकले. त्यांना संपवून टाकले.
ज्यांच्यावर अन्याय होत होता त्यांना न्याय मिळवून दिला. सज्जनांचे रक्षणच केले.
त्यासाठी जे जे करायला हवे होते ते ते सर्व काही नि:संकोचपणे केले. धर्म आणि अधर्माचा विचार बाजूला सारून केले.
जे कृपा करण्यायोग्य होते त्यांच्यावर सदैव कृपाच केली. त्यासाठी त्याने कोणाचीही परवानगी विचारली नाही.
तसेच कोणाला काय वाटेल, कोणाची मने दुखावली जातील आणि कोणाला राग येईल ह्याचीही काळजी केली नाही.
त्याच्या अशा वर्तनामागले हे रहस्य जाणून घेऊन जे बुद्धिमान लोक त्याप्रमाणे वागतात, त्यांचे हेतू सफल होतात. ते यशस्वी होतात.
दहा दहा वर्षे लपून राहिला तरी शेवटी ओसामा बिन लादेन मारला जातोच!
जेव्हा तथाकथित बुद्धिमान लोक तसे वागत नाहीत, तेव्हा सर्व समाजावर कशी परिस्थिती ओढावते ते आपण सगळे आज आपल्या देशामधे सर्वच क्षेत्रात पाहतो आहोत. त्याविषयी काहीही बोलायची गरज नाही.

**' ये यथा माम् प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ।'**

परमेश्वराला खोटेपणा चालत नाही. लबाडी केलेली चालत नाही.
लबाड, भ्रष्ट, कपटी आणि ढोंगी माणसाला परमेश्वर कधीही भेटणार नाही.
कधी भेटलाच तर शासन करण्यासाठी. कृपा करण्यासाठी नाही. देव दयाळू आहे हे सत्य आहे. परंतु तो बावळट किंवा भोळसट नाही. उलट तो पक्का आहे. जशास तसे वागणारा आहे.
देव गुन्हेगाराला कधीही क्षमा करीत नाही. योग्य वेळ साधून त्याला जबरदस्त शिक्षाच करतो.
देव दयाळू आहे की न्यायी आहे? ह्याविषयी समर्थ रामदास स्वामींनी त्यांचे मत स्पष्टपणे मांडलेले आहे. ते काय म्हणतात ते नीट ऐका.

**जैसे जयाचे भजन । तैसेचि दे समाधान ।**
**भाव होता किंचीत न्यून । आपणही दुरावे ।।**
**जरी भाव असला मायिक । तरी देव होय महाठक ।**
**नवल तयाचे कौतुक । जैशास तैसा ।।**
**देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळचरु ।**
**देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाही ।।**
**देवे भक्त कोण वधिला । कधी देखिला ना ऐकिला ।**
**शरणागतास देव जाला । वज्रपंजरु ।।**
**सख्य देवाचे तुटेना । प्रीती देवाची विटेना ।**
**देव कदा पालटेना । शरणागतासी ।।**

म्हणूनच हा श्लोक फार महत्त्वाचा आहे असे मला वाटते. असो.
आता आपण मूळ अर्थाकडे जाऊया.
' जे माझी ज्या प्रकाराने आणि ज्या प्रमाणात भक्ती करतात, त्यांच्यावर मीही त्याच प्रमाणात प्रेम करतो. हे रहस्य जाणूनच, बुद्धिमान लोक सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुकरण करतात.' प्रत्येक माणूस हा स्वभावत: देवाची भक्ती करीत असतो.
प्रत्येक जण आपापल्या विचारांप्रमाणे वेगवेगळ्या देव - देवतांवर श्रद्धा ठेवतो आणि त्यांची उपासना करीत राहतो.
आपल्याकडे तेहेतीस कोटी देव आहेत आणि त्यातल्या प्रत्येकाचे अनेक भक्तही आहेत.
देवांना तोटा नाही आणि भक्तांना तर नाहीच नाही.
जर परमेश्वर एकच आहे तर मग असे का होते? ह्याचे उत्तर पुढे सांगितले आहे.

**काङ्क्षन्त: कर्मणाम् सिद्धिम् यजन्त इह देवता: ।**
**क्षिप्रम् हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ।। १२ ।।**

**चातुवर्ण्यम् मया सृष्टम् गुणकर्मविभागशः ।**
**तस्य कर्तारमपि माम् विद्ध्यकर्तारमव्ययम् ।। १३ ।।**
' मी परमेश्वर एकच आहे आणि मीच सर्वत्र भरून राहिलेला आहे!' हे सत्य बहुतेकांना माहीत नसते.
जरी माहीत असले तरीही ते पचनी पडत नाही. सर्वांची ' कळते पण वळत नाही!' अशी अवस्था असते.
मग ते नाना प्रकारचे हेतू मनामधे धरून, आपल्याला मान्य असलेल्या देवतांची, विधिपूर्वक उपासना करीत राहतात. त्यांना फलप्राप्ती होते. परंतु मिळालेले फळ हे केवळ त्यांच्या कर्माचेच फळ असते. ह्या मनुष्यलोकामधे फक्त माणसाचे कर्मच फळ देणारे असते. कर्मावाचून फळ देणारे असे दुसरे कोणीही नसते.
केवळ कर्मफळाचीच इच्छा असणारे लोक, ते लवकर प्राप्त व्हावे म्हणून, विविध देवतांची उपासना करीत असतात आणि त्या सर्व प्रकारच्या उपासनांना मी केवळ साक्षी असतो.
मनुष्याचे कर्म आणि त्याचे गुण ह्यांच्या मधील भेदाप्रमाणे, चार वर्णांची व्यवस्था मीच निर्माण केलेली आहे. त्यामुळे मूलतः एकच असलेल्या लोकांची, चार वर्णात विभागणी झालेली आहे. पण ती व्यवस्था प्रत्येक माणसाच्या गुण आणि कर्मानुसारच केली जात असल्यामुळे वास्तविक पाहता, निर्मिती करूनही, मी त्या व्यवस्थेचा कर्ता नाही.
ही गोष्ट तू नीट समजून घे.
**न माम् कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।**
**इति माम् योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ।। १४ ।।**
**एवम् ज्ञात्वा कृतम् कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।**
**कुरु कर्मैव तस्मात् त्वम् पूर्वै पूर्वतरङ् कृतम् ।। १५ ।।**
मी सर्व प्रकारची कर्मे करीत असतो. परंतु त्यांच्या फळाची मला इच्छा नसते. म्हणून मला कोणतेही कर्म बंधनकारक होत नाही.
मी सदैव मुक्तच असतो. हे सत्य आणि ह्या प्रकारे कर्म करणाऱ्या मला जो जाणतो आणि त्याप्रमाणे वागतो, त्याला कर्माची बाधा होत नाही. ह्यापूर्वीही ' मोक्ष प्राप्तीची इच्छा असणाऱ्या ' अनेक लोकांनी आपले विहित कर्म, फलाशा न बाळगता, केवळ स्वधर्म आणि स्वकर्तव्य म्हणून केले आहे.
अर्जुनाऽऽ, ते पूर्वज जसे वागले, त्याचप्रमाणे तू सुद्धा वाग. फलाशा न बाळगता, केवळ आपले कर्तव्य म्हणून, विहित कर्म कर.
**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्रमोहिताः ।**
**तत् ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्षसेऽशुभात् ।। १६ ।।**
**कर्मणो ह्यपिबोद्धव्यम् बोद्धव्यम् च विकर्मणः ।**
**अकर्मणश्च बोद्धव्यम् गहना कर्मणो गतिः ।। १७ ।।**
कर्म म्हणजे काय? अकर्म म्हणजे काय? विकर्म म्हणजे काय?
ह्या तीन प्रश्नांच्या उत्तराच्या विषयी कमालीचा मतभेद आहे. अनेक विद्वान लोक आपापल्या मताचे समर्थन करण्याच्या हेतूने **' कर्म, अकर्म आणि विकर्म '** ह्या तीन शब्दांची फार ओढाताण करीत असतात.
संन्यासमार्गी मूलतः ' सर्व कर्मांचा त्याग!' आवश्यक मानतात. त्यामुळे ते अकर्माचा अर्थ, त्यांना अनुकूल असाच लावतात.
फलाची आशा बाळगून कर्म करणारे मीमांसक, ' काम्य कर्म ' सोडून इतर सर्व प्रकारचे कर्म अनावश्यक मानतात. त्यामुळे ते विकर्माचा अर्थ, त्यांना अनुकूल असाच लावतात.
इतर धर्मशास्त्री देखील आपापल्या मताप्रमाणे ह्या तीनही शब्दांचा, अनुकूल किंवा प्रतिकूल अर्थ लावतात.
त्यामुळे सर्व सामान्यांचा ह्याविषयी फार गोंधळ होतो. येथे एक महत्त्वाची गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे.
कोणतेही कर्म हे केवळ कर्म असते. ते स्वतः चांगले किंवा वाईट असे नसते.
कर्त्याचा स्वभाव, त्याचा हेतू, त्याची आसक्ती आणि त्याची वृत्ती ह्यांच्या योगाने एखादे कर्म चांगले आहे किंवा वाईट आहे हे ठरते!
एखाद्या कर्माचा परिणाम वेगवेगळ्या कर्त्यांच्या बाबतीत वेगवेगळा होऊ शकतो.
एकच **कर्म** हे कधी **अकर्म** तर कधी **विकर्म** होऊ शकते.
कर्त्याला फळ देणारी म्हणजे जिचे बरे किंवा वाईट परिणाम भोगावे लागतील अशी कोणतीही कृती म्हणजे **' कर्म !'**
कर्म करायचे नाकारणे, कर्म करायचे टाळणे म्हणजे **' अकर्म !'**
जे आपले कर्तव्य आहे, जबाबदारी आहे आणि आपला धर्म आहे, ते कर्म प्रामाणिकपणे पार पाडणे म्हणजे **' सत्कर्म !'**

जे आपले कर्तव्य आहे, जबाबदारी आहे आणि आपला धर्म आहे, ते कर्म पार न पाडणे म्हणजे ' **विकर्म !**' म्हणजे दुष्कर्म, विपरीत कर्म किंवा वाईट कर्म. जरा त्याविषयी अधिक विचार करूया.

' समोरच्या माणसाचे पोट सुरी खुपसून फाडणे!' हे **कर्म** झाले.

ते कर्म जर एखाद्या निष्णात सर्जनने, रोग्याला बरे करण्याच्या हेतूने, शस्त्रक्रिया करीत असताना केले तर **सत्कर्म** ठरते.

पण तेच कर्म जर एखाद्या चोराने, दुसऱ्याची संपत्ती लुटण्याच्या हेतूने, आपल्याला विरोध करणाऱ्या बरोबर, आपल्या मार्गातला अडथळा दूर करण्यासाठी केले तर **दुष्कर्म** ठरते.

ते कर्म जर एखाद्या सैनिकाने, रणांगणावर देशासाठी युद्ध करीत असताना, शत्रूला मारण्याच्या हेतूने केले तर **सत्कर्म** ठरते.

पण तेच कर्म जर एखाद्या अतिरेक्याने, समाजामधे दहशत पसरविण्यासाठी, भय निर्माण करण्यासाठी केले तर **दुष्कर्म** ठरते.

' काहीही न करता शांत राहणे!' हे देखील **कर्म** असले तरीही **अकर्म** ठरते.

परंतु जर एखाद्या स्त्रीला कोणी धटिंगण त्रास देत असेल आणि ती भयग्रस्त होऊन मदतीच्या आशेने ओरडत असेल. इतरांच्या कडून मदतीची अपेक्षा करीत असेल. अशा प्रसंगी तेथे हजर असणारा, ती घटना प्रत्यक्ष पाहात असणारा माणूस जर काहीही न करता शांतपणे उभा राहिला किंवा तेथून पळून गेला, तर त्याचे तसे वागणे **विकर्म** ठरते.

ब्रह्मविद्या म्हणजे थिऑसॉफी ह्या शास्त्रामधे कर्माचे तीन प्रकार सांगितलेले आहेत.

१) **संचित कर्म** — हे कर्म म्हणजे प्रत्येक प्राणिमात्राच्या आतापर्यंत झालेल्या सर्व जन्मांच्या सर्व कर्मांची गोळाबेरीज असते.

२) **प्रारब्ध कर्म** — हे कर्म म्हणजे मागे केलेले आणि आता फळाला आलेले कर्म असते. ह्या कर्माचा प्रभाव ह्या आयुष्यामधील घटनांमधे जाणवतो.

३) **क्रियमाण कर्म** — हे कर्म म्हणजे ह्या जन्मामधील बऱ्या किंवा वाईट वर्तनाला अनुसरून नुकतेच जोडले गेलेले कर्म. ह्याचा प्रभाव भविष्यावर होत असतो.

' **प्रारब्ध कर्म** भोगून संपवणे. तसे करीत असताना, **क्रियमाण कर्म** न जोडणे आणि त्यायोगे सहजपणे **संचित कर्म** नाहीसे करणे.' म्हणजे **मोक्ष** प्राप्त होणे होय. हीच गोष्ट व्यावहारिक भाषेत सांगायची म्हणजे —

' असलेल कर्ज व्याजासह फेडायचे आणि नवीन कर्ज काढायचे नाही.
असलेली ठेव मिळालेल्या व्याजासह वापरून संपवायची आणि नवीन ठेव ठेवायची नाही. नवीन व्याज निर्माण होऊ द्यायचेच नाही.
म्हणजे कर्जही नको आणि ठेवही नको. व्याज देणेही नको आणि घेणेही नको. बँक बॅलन्स झिरो केला पाहिजे.
परमेश्वराच्या बँकेत आपले खाते असूनही नसल्यासारखे झाले पाहिजे.'

पण असे घडून येणार कसे? कर्म तर करावेच लागते आणि कर्माचे फळही मिळतेच.

दुष्कर्म केले काय किंवा सत्कर्म केले काय, त्याचे बरे वाईट फळ मिळतेच व ते भोगावेही लागतेच. सत्कर्म देखील बंधनकारकच असते. ते देखील मोक्षाच्या मार्गामधील अडथळाच असते.

साखळी सोन्याची असली तरी ती प्राण्याला जखडूनच ठेवते. बांधूनच ठेवते.

पिंजरा सोन्याचा असला आणि त्यामधे असलेल्या पोपटाची खाण्यापिण्याची चंगळ असली तरीही तो पोपटाचे स्वातंत्र्य हिरावून घेतो. हेच सत्य आहे. ह्याविषयी विचार करताना भले भले लोकही पार गोंधळून जातात.

मी मी म्हणणाऱ्यांची बोलती बंद होते. असे हे फारच विचित्र त्रांगडे आहे.

म्हणूनच कर्मगती ही गूढ आहे, गहन आहे असे सांगितले आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे येथे श्रीकृष्ण भगवान, कर्म करायचे नाकारणाऱ्या अर्जुनाला, त्याच्या स्वधर्मानुसार कर्म करायला सांगतो आहे. मनामधे भीती न बाळगता, होणाऱ्या परिणामांची चिंता न करता आणि स्वजनांच्या विषयीची आसक्ती बाजूला सारून आपले कर्तव्यकर्म पार पाडायला सांगतो आहे. गीतेमधे ह्या प्रश्नाचा विचार ज्या दृष्टिकोनामधून केला आहे, तो दृष्टिकोन हा एका —

**निष्काम कर्म करणाऱ्या कर्मयोग्याचा** आहे हे ध्यानात घ्यायला पाहिजे. त्या दृष्टिकोनातूनच यापुढील सहा श्लोकांमधे, कर्मयोगाचे आणि कर्मयोग्याचे म्हणजेच आदर्श कर्त्याचे वर्णन केलेले आहे. सविस्तर विवेचन केलेले आहे.

कर्म करूनही त्याचे बंधन पडणार नाही आणि पापापासून मुक्त राहता येईल, अशा प्रकारचे कर्म कोणते व ते कसे करायचे त्याविषयी सांगितले आहे.

**कर्मण्यकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ।। १८ ।।**

**यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणम् तमाहुः पंडितम् बुधाः ।। १९ ।।**
**त्यक्त्वा कर्मफलासङ्गम् नित्यतृप्तो निराश्रयः ।**
**कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंञ्चित् करोति सः ।। २० ।।**
**निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।**
**शारिरङ् केवलङ् कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। २१ ।।**
**यदृच्छालाभसन्तुष्टः द्वन्द्वातीतो विमत्सरः ।**
**समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ।। २२ ।।**
**गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।**
**यज्ञायाचरतः कर्म समग्रम् प्रविलीयते ।। २३ ।।**

खरे म्हणजे ' अजिबात कर्म न करणे.' कोणालाही शक्य नाही.
कोणताही मनुष्य कर्मशून्य म्हणजेच ' अकर्म ' ह्या अवस्थेत राहूच शकत नाही. दैनंदिन जीवनात वावरताना प्रत्येकाला आपले शारीरिक व्यवहार तरी करावेच लागतात. केवळ जिवंत राहण्यासाठीही श्वास घेणे व सोडणे हे कर्म करावेच लागते.
त्यामुळे कर्मविपाक प्रक्रियेच्या दृष्टीने विचार केला तर, जे कर्म करूनही कर्त्याला बाधत नाही, बंधनकारक होत नाही, ते कर्म हे अकर्मच समजायला हवे.
अशा अर्थाने पाहता, कर्माचे ठायी अकर्म आणि अकर्माचे ठायी कर्म ज्याला दिसते तो पुरुष सर्व मनुष्यांत ज्ञानी असतो.
तोच योगयुक्त असतो व सर्व कर्मे करणारा असतो असे म्हटले आहे. ज्याला कोणताही स्वार्थ नाही, फळाची इच्छा नाही, किंबहुना एखादा स्वार्थमूलक संकल्पही नाही, संकल्प असलाच तर तो समाजाच्या कल्याणासाठीच असेल, जो केवळ कर्तव्य म्हणून कर्म करीत असेल, अशा कर्त्याची सर्व कर्मे, त्याला असलेल्या परमेश्वरविषयक ज्ञानामुळे नाहीशी होतात.
त्यालाच सर्व ज्ञानी माणसें **' पंडित !'** असे म्हणतात. त्याने कर्मफलाची आसक्ती सोडलेली असते.
त्यामुळे तो कधीही **' मी ह्या एका माणसासाठी हे कार्य करीत आहे.'** किंवा, **' हे कार्य मी करीत आहे.'** अशी कर्मफळाला आश्रय देणारी बुद्धी बाळगत नसतो. तो सदैव आनंदामधे निमग्न असतो, तृप्तच असतो. शांतच असतो.
असा पुरुष, नाना प्रकारची नानाविध कर्मे करण्यात गुंतलेला असला तरी तो काहीच करीत नाही असे समजले पाहिजे.
कर्माच्या फळाची आशा सोडणारा, आपल्या चित्ताचे सर्व प्रकारे नियमन करणारा आणि सर्व भोगसामग्रीचा व संग्रहबुद्धीचा परित्याग केलेला पुरुष, इतरांना कर्मे करीत असताना दिसत असला तरीही त्याला पाप लागत नाही. कारण तो केवळ शरीराने कर्म करीत असतो. दैवगतीमुळे आपोआप जे प्राप्त होईल त्यात संतुष्ट राहणारा, कोणाचाही मत्सर न करणारा, सुखदु:खादी सर्व प्रकारच्या द्वंद्वापासून मुक्त असलेला आणि कार्य सिद्ध होणे किंवा न होणे, दोन्ही सारखेच मानणारा पुरुष सर्व प्रकारची कर्मे सदैव करूनही त्यांच्या पापपुण्याने बांधला जात नाही. आसक्तिहीन, परमात्म्याविषयीच्या ज्ञानाचे ठिकाणी चित्त स्थिर झालेला, देहाभिमान आणि ममत्व ह्यांना दूर सारलेला व केवळ यज्ञासाठी म्हणून कर्माचरण करणाऱ्या मुक्त पुरुषाचे संपूर्ण कर्म लयास जाते.
हे विवेचन इतके स्पष्ट, अचूक आणि समर्पक आहे की ह्यावर जास्त काही सांगायची आवश्यकताच नाही. असो.
येथून पुढे कर्म करणे म्हणजे यज्ञ करणेच होय असे प्रतिपादन करून त्याचे निरनिराळे लाक्षणिक प्रकार सांगितले आहेत.
तसेच त्यामधे सर्वश्रेष्ठ यज्ञ कोणता तेही सांगितलेले आहे.

**ब्रह्मार्पणम् ब्रह्म हविः ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**
**ब्रह्मैव तेन गन्तव्यम् ब्रह्मकर्मसमाधिना ।। २४ ।।**

मागील अध्यायाच्या पंधराव्या श्लोकामधे ' ब्रह्म हे कर्माचे उगमस्थान आहे.' असे सांगितलेले आहे. आता जो मनुष्य ' सर्व काही ब्रह्मरूपच आहे, सर्व काही ब्रह्मानेच व्यापलेले आहे, इतकेच नाही तर सर्वकाही प्रत्यक्ष ब्रह्मच आहे.' असे जाणतो आणि त्यानुसार वर्तन करतो, त्याची कर्म करण्यामागील दृष्टी कशी असते ते फार चांगल्या प्रकारे सांगितले आहे.
जो कर्मयोगी ' अर्पण करणारा स्वत:, अर्पण करण्याची क्रिया, अर्पण करायचे द्रव्य आणि ते द्रव्य ज्यामधे अर्पण करायचे ते ' असे सगळे काही ब्रह्मच आहे असे समजतो आणि त्यामुळेच कोणतेही कर्म करायचा विचार मनामधे येत असताना, ते कर्म करीत असताना आणि ते कर्म करून झाल्यावरही ' ब्रह्माग्नीत ब्रह्मरूप कर्त्याकडून ब्रह्मच अर्पण केले गेले.' अशी ज्याची बुद्धी झाली,
त्याला फलरूपाने ब्रह्मच मिळायचे. दुसरे काय मिळणार?
**ही निष्काम कर्मयोगाची पराकाष्ठा म्हणावी लागेल.**

**दैवमेवापरे यज्ञम् योगिनः पर्युपासते ।**

**ब्रह्माग्नावपरे यज्ञम् यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥**

काही योगिजन कर्मफळाची आशा बाळगणारे असल्यामुळे, ब्रह्मबुद्धी न बाळगता, विविध देवदेवतांचे पूजन - अर्चन - आराधन उत्तम प्रकारे करतात. तर दुसरे काही योगीजन परब्रह्मरूपी अग्नीत, ऐक्यभावनेने स्थित होऊन, आत्मरूप यज्ञाचे हवन करतात.

( येथे ' परब्रह्म परमात्म्यामधे, त्याच्या विषयीच्या ज्ञानाच्या योगाने, संपूर्ण ऐक्यभावनेने स्थिर होणे. स्वत्वाचा विलय करणे.' हा अर्थ आहे.)

**श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।**

**शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥**

काही योगिजन आपल्या कान, नाक, डोळे इत्यादी सर्व इंद्रियांचे संयमरूपी अग्नीमधे हवन करतात. म्हणजे सर्व इंद्रियांना योग्य मर्यादेमधे आपापले व्यवहार करायला देतात. हा इंद्रियांचे संयमन करण्याचा प्रकार आहे.

काही योगीजन सर्व इंद्रियांचे जे विषय आहेत त्यांना इंद्रियरूपी अग्नीमधे हवन करतात. म्हणजे बोलणे - पाहणे - ऐकणे - वास घेणे इत्यादी उपभोग, त्यांना संपूर्णपणे सोडून देतात. हा इंद्रियांचे दमन करण्याचा प्रकार आहे.

**सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**

**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥**

काही योगिजन आपल्या फक्त इंद्रियांचेच नव्हेत तर पंचप्राणांचे व्यापारही बंद ठेवून, ज्ञानाने प्रकाशित झालेल्या आत्मसंयमनरूपी अग्नीमधे त्यांचे हवन करतात. हा अष्टांग योगामधील शेवटच्या पायरीवर पोहोचणे आणि तेथे स्थिर होणे म्हणजे,
पूर्ण समाधी लावून, त्याच अवस्थेत आत्मानंदामधे स्थिर होण्याचा प्रकार आहे.

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञाः योगयज्ञास्तथापरे ।**

**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥**

काही पुरुष द्रव्यरूप यज्ञ करीत असतात. म्हणजे विविध प्रकारे दानधर्म करतात.

काही पुरुष तपोरूप यज्ञ करीत असतात. म्हणजे तपश्चर्या करतात. विशिष्ट दैवताची, विशिष्ट पद्धतीने सतत आराधना करतात.

काही पुरुष योगरूप यज्ञ करीत असतात. म्हणजे पातंजलयोगामधे सांगितलेल्या प्राणायामादी साधना यथाशक्ती यथामती करतात.

काही पुरुष स्वाध्यायरूप ज्ञानयज्ञ करीत असतात. म्हणजे सतत शिकत राहून निरनिराळ्या विषयांचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात.

**अपाने जुह्वति प्राणम् प्राणेऽपानन् तथापरे ।**

**प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायमपरायणाः ॥ २९ ॥**

काही पुरुष प्राणायामाच्याठायी अत्यंत निष्ठा बाळगून, प्राण आणि अपान वायूच्या गतीचा निरोध करून, प्राणाचे अपानात तर दुसरे काही अपानाचे प्राणात हवन करतात. हा पण प्राणायाम साधनेचा प्रकार आहे.

**अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।**

**सर्वेऽप्येते यज्ञविदः यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥**

काही पुरुष आपल्या आहाराचे नियमन करून, प्राणायामाविषयी तत्पर राहून प्राणाचे प्राणातच हवन करतात.

हे सर्व योगीजन यज्ञ जाणणारे आणि यज्ञाच्या योगे क्षीणपाप म्हणजे, सर्व पापांचा नाश झालेले असतात.

**यज्ञशिष्टामृतभुजः यान्ति ब्रह्म सनातनम् ।**

**नायम् लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥**

अशा प्रकारे विविध प्रकारे यज्ञ करून, त्यानंतर जे शिल्लक राहते त्या अमृताचा अनुभव घेणारे हे सर्व योगीजन, सनातन परब्रह्म परमात्म्याला प्राप्त करून घेतात. अर्जुनाऽऽ! कोणत्याही प्रकारचे यज्ञ न करणाऱ्या पुरुषाला हा मनुष्यलोकही सुखदायक होत नाही तर परलोक सुखकारक कसा होईल? किती प्रकारचे कर्मयज्ञ सांगितले आहेत पहा. प्रकार कितीही असले तरी महत्त्वाची गोष्ट ही की त्या सर्व मार्गांचे अंतिम ध्येय **' ब्रह्मप्राप्ती!'** म्हणजे **' आत्मज्ञानप्राप्ती!'** हेच आहे.

**एवम् बहुविधा यज्ञाः वितता ब्रह्मणो मुखे ।**

**कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवम् ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥**

ह्याप्रमाणे अनेकविध यज्ञ ब्रह्ममुखामधेच होत असतात असे वेदवाणीत विस्ताराने सांगितलेले आहे. हे सर्व प्रकारचे यज्ञ मन, इंद्रियें

आणि शरीर ह्यांच्या क्रियांनीच म्हणजे कर्माद्वारेच उत्पन्न होतात हे समजून घे. तुला हे ज्ञान झाले आणि त्याप्रमाणे अनुकरण केलेस म्हणजे तू कर्मबंधापासून मुक्त होशील.

**श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परन्तप ।**
**सर्व कर्माखिलम् पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।। ३३ ।।**

अर्जुनाऽऽ! द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ. कारण सर्व प्रकारच्या सर्व कर्मांचे पर्यवसान ज्ञानात होत असते.
द्रव्यमय यज्ञ महत्त्वाचा आहेच. त्यामुळे सर्व समाजाचे भरण पोषण होऊ शकते.
एखाद्याने केलेले दान हे योग्य ठिकाणी, योग्य वेळी आणि उचित पात्रता असणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला मिळाले तर ते सत्कारणी लागते. अंतिमतः त्याचा सर्व समाजाला उपयोग होतो. त्यायोगे समाजाचा उत्कर्ष घडून यायला मदत होते.
जीवनामधे, आपण कोणताही द्रव्यमय यज्ञ म्हणजे कोणत्याही प्रकाराने दान-धर्म करतो, तो अंतिमतः परमेश्वरप्राप्तीसाठीच करीत असतो. परंतु परमेश्वराच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय, कोणालाही त्याची प्राप्ती होऊ शकणार नाही. तसे ज्ञान होणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही प्रकारच्या यज्ञाचे आचरण केले तरी त्या यज्ञाच्याद्वारे परमेश्वराचे ज्ञान होणे आवश्यक असते. महत्त्वाचे असते. अनिवार्य असते. म्हणून कर्माचे द्वारा परमेश्वराच्या मूळ स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन, त्या ज्ञानाला साजेल - शोभेल असे आपले वर्तन सदैव ठेवूनच, त्याची प्राप्ती करून घ्यावी लागते. ह्या मार्गाला **ज्ञानयज्ञ** असे म्हटलेले आहे.
आता ज्ञानमार्गाचे साधक, ‘ एकदा ज्ञान प्राप्त झाले म्हणजे त्यानंतर कर्मे करणे सोडून द्यायचे ’ असा त्याचा अर्थ काढतील.
पण ते बरोबर नाही. उलट ज्ञानप्राप्तीनंतर ज्ञानी माणसाची जबाबदारी अधिक वाढते.
‘ स्वतःसाठी नाही तरी लोकसंग्रहासाठी, सर्व समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी, समाजाची उन्नती घडवून आणण्यासाठी,’ ज्ञानी माणसाने सर्व कर्मे केलीच पाहिजेत.
आपली सर्व कर्मे समत्वबुद्धीने आणि फलाशा सोडून करणारा असल्यामुळे, त्याला कर्मबंधन पडणार नाही आणि हा ज्ञानयज्ञ मुक्तिदायक होईल. सर्व बंधनातून मोकळे करणारा आणि साधकाला मोक्षाकडे नेणारा होईल.

**तत् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानम् ज्ञानिनः तत्वदर्शिनः ।। ३४ ।।**
**यत् ज्ञात्वा न पुनर्मोहम् एवम् यास्यसि पांडव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ।। ३५ ।।**

अर्जुनाऽऽ! ज्यांना ज्ञानाचा सक्षात्कार झालेला आहे, ज्ञान प्राप्त झालेले आहे, अशा ज्ञानी माणसांच्याकडे जाऊन हे ज्ञान समजून घे! त्यांना मनापासून नमस्कार कर! त्यांची सेवा कर! त्यांना निष्कपटपणे, सरळपणे आणि नम्रपणे प्रश्न विचार!
म्हणजे ते ज्ञानी महात्मे तुला ह्या तत्वज्ञानाचा उपदेश करतील. ते ज्ञान प्राप्त झाल्यावर तू पुन्हा अशा प्रकारच्या मोहात पडणार नाहीस. सर्व प्राणिमात्र, सर्व भूते ही अगोदर तुझ्या स्वतःचे ठिकाणीच आहेत असे आणि त्यानंतर ती माझ्याही ठिकाणी आहेत असे तुला दिसून येईल.

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।**
**सर्वम् ज्ञानप्लवेनैव वृजिनम् सन्तरिष्यसि ।। ३६ ।।**
**यथैधांसि समिद्धोऽग्निः भस्मसात् कुरुतेऽर्जुन ।**
**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा ।। ३७ ।।**

अर्जुनाऽऽ! अरे, जरी तू सर्व पापी लोकांच्यापेक्षाही अधिक पाप करणारा, महापापी असलास, तरीही ह्या ज्ञाननौकेने सगळा पापांचा सागर पार करून त्यापलीकडे जाशील आणि अखेरीस मुक्त होशील. प्रज्वलित केलेला अग्नी जसा, त्याच्या आवाक्यात येणारी सर्व काष्ठे जाळून टाकतो, त्यांची राख करून टाकतो, त्याच प्रमाणे हा ज्ञानरूप अग्नी माणसाच्या सर्व कर्मांचे आणि त्यांच्या शुभ किंवा अशुभ बंधनांचे भस्म करून टाकतो. त्याचे प्रत्येक **कर्म** हे, अत्यंत सहजपणे **अकर्म** होते.

**‘ वाल्याकोळयाचे उदाहरण फार प्रसिद्ध आहे. ’**

अरण्यामधे वाटचाल करणाऱ्या माणसाना लुबाडणे, त्याना ठार मारणे हाच त्याचा व्यवसाय होता. तसे करूनच तो आपले आणि आपल्या कुटुंबाचे भरण पोषण करीत होता. म्हणजे तो किती पापी होता बघा.
अशा महापापी माणसालाही त्याच्या पूर्वसंचितामुळे आणि बलवत्तर दैवयोगामुळे, एक अत्यंत ज्ञानी माणूस भेटला.
हा त्याला मारायलाच निघाला होता. परंतु त्या ज्ञानी माणसाने ह्याला थांबवला. थोडावेळ थांबायला सांगितले.
एक प्रश्न विचारून त्याचे उत्तर द्यायला सांगितले.

आता ‘ ह्याने आपली मारायला उगारलेली कुऱ्हाड खाली करून थांबणे, त्याने विचारलेला प्रश्न ऐकणे, त्यावर विचार करणे आणि आपल्याला उत्तर माहीत नाही हे लक्षात आल्यावर, स्वत:च्या घरी जाऊन आपल्या बायकोकडे व मुलांचेकडे चौकशी करणे ’ हे शक्य होते का? मुळीच नाही. तसे घडणे अगदी अशक्य होते. ह्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही.

पण तसे घडलेऽऽ! घडून आलेऽऽ! ही गोष्ट मात्र खरी. त्यानंतर पुढे काय झाले ते आपणा सर्वांनाच माहीत आहे.

त्या ज्ञानी माणसाने, ह्या पापी माणसामधे, कसा काय आणला देव जाणे, पण इतका बदल घडवून आणला, इतका बदल घडवून आणला, की ह्याची सर्व महापापे जळून भस्म झाली. हा महापापी, त्याच - एकाच - जन्मामधे महाज्ञानी झाला. भविष्यवेत्ता झाला. त्याने एक महाकाव्य रचले. त्याचे ते काव्यरूप भविष्य खरे झाले. आज साडेसात हजार वर्षांपेक्षा जास्त काळ होऊन गेलेला आहे. आजही सगळे जग त्याचे ते काव्य वाचते आहे. त्याला आणि त्याच्या काव्याच्या नायकाला अत्यंत आदराने नमस्कार करते आहे.

**कूजन्तम् राम रामेति मधुरम् मधुराक्षरम् ।**

**आरुह्य कविताशाखाम् वंदे वाल्मिकि कोकिलम् ।।**

अर्थ — ( वाङ्मयरूपी वृक्षाच्या ) कवितारूपी फांदीवर बसून, श्रीरामाच्या मधुर नांवाच्या मधुर अक्षरांचे, गोड आवाजात उच्चारण करणाऱ्या, **वाल्मिकी** रूपी कोकिळ पक्ष्याला मी नमस्कार करतो.

ज्ञानी माणसाचा सहवास आणि त्याने दिलेले ज्ञान, काय करू शकते, कसा परिणाम करू शकते, ह्याचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे. ज्ञानी माणूस हा परिसासारखा असतो. परिसाचा सहवास लाभला म्हणजे लोखंडाचे सोनेच होते. दुसरे काहीही होत नाही. होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे, ज्ञानी माणसाच्या सहवासाने, एखाद्या सामान्य माणसामधे तसेच वाईट माणसामधेही आश्चर्यकारक परिवर्तन घडून येते. असो.

**न हि ज्ञानेन सदृशम् पवित्रमिह विद्यते ।**

**तत् स्वयम् योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ।। ३८ ।।**

ज्ञानासारखे पवित्र आणि पवित्र करणारे असे ह्यालोकी दुसरे काहीही नाही.

बऱ्याच मोठ्या कालावधीच्या साधनेने ज्यास कर्मयोग सिद्ध झाला आहे असा माणूस, ते ज्ञान आपोआप स्वत:च आपल्या ठायी प्राप्त करून घेतो. खरोखरच ज्ञानाच्या तोडीचे दुसरे काहीही नाही.

ज्याप्रमाणे सूर्यासारखा तेजस्वी कोण? तर सूर्यच! दुसरा कोणीही नाही!

ज्याप्रमाणे चंद्रासारखा शीतल कोण? तर चंद्रच! दुसरा कोणीही नाही!

ज्याप्रमाणे अग्नीसारखा दाहक कोण? तर अग्नीच! दुसरा कोणीही नाही!

ज्याप्रमाणे मनासारखे चपळ कोण? तर मनच! दुसरे कोणीही नाही!

ज्याप्रमाणे अमृतासारखे अमरत्व देणारे कोण? तर अमृतच! दुसरे काहीही नाही!

ज्ञानाच्या बाबतीतही तीच गोष्ट आहे.

ज्ञानासारखे पवित्र असणारे व पवित्र करणारे कोण? तर ज्ञानच! दुसरे काहीही नाही.

**श्रद्धावान् लभते ज्ञानम् तत्परः संयतेंद्रियः ।**

**ज्ञानम् लब्ध्वा पराम शान्तिम् अचिरेणाधिगच्छति ।। ३९ ।।**

जो जितेंद्रिय, तत्पर व श्रद्धाळू असा पुरुष ज्ञान मिळविण्याच्या पाठी लागतो, त्यालाही ते ज्ञान प्राप्त होते आणि ज्ञानप्राप्ती होताक्षणीच त्याला परम शांती प्राप्त होते. मग दुसरे काही मिळविण्याची गरजच राहात नाही. जी माणसे तशी नसतात, ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करीत नाहीत, त्यांचे काय होते ते पुढील श्लोकांत सांगितले आहे.

**अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।**

**नायम् लोकोऽस्ति न परः न सुखम् संशयात्मनः ।। ४० ।।**

पण ज्याला स्वत:ला ज्ञान नाही आणि श्रद्धाही नाही असा अविवेकी व संशयी मनुष्य परमार्थापासून भ्रष्ट होतो आणि नाश पावतो. संशयी माणसाला हा लोक नाही तसाच परलोकही नाही आणि सुखही नाही.

**योगसंन्यस्तकर्माणम् ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।**

**आत्मवन्तन् न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।। ४१ ।।**

अर्जुनाऽऽ! ज्याने कर्मयोगाच्या आश्रयाने, आपली सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण केली आणि

ज्ञान आणि विवेक ह्यांच्या योगाने ज्याचे सर्व संशय नाहीसे झाले अशा आत्मज्ञानी पुरुषाला कर्मे बंधनकारक होत नाहीत.

**तस्मात् अज्ञानसम्भूतम् हृत्स्थम् ज्ञानासिनात्मनः ।**

**छित्वैनम् संशयम् योगम् आतिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥**

म्हणून हे भारताऽऽ! हे अर्जुनाऽऽ! आपल्या मनात अज्ञानाने उत्पन्न झालेला हा संशय ज्ञानरूप तलवारीने छाटून टाकून, कर्मयोगाचा आश्रय कर आणि **युद्धाला उभा रहा.**

**येथे चवथा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे कर्मयोग आणि ज्ञानयोग ह्या दोनही विषयांचे विवेचन केलेले आहे.

निष्काम बुद्धीने कर्मे केली म्हणजे त्यांचे बंधन पडत नसल्यामुळे ती मोक्ष मार्गाला अडथळा ठरत नाहीत. तसेच कर्मयोगाच्या आश्रयाने अंतिमत: जे परमेश्वरविषयक ज्ञान प्राप्त होते, त्याने मनामधले सर्व संशय नाहीसे होऊन मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो.

म्हणून ' केवळ ज्ञानयोग किंवा केवळ कर्मयोग न स्वीकारता दोघांचा आश्रय घेऊन, आपले कर्तव्यकर्म पार पाडण्यासाठी, **तू युद्ध कर!**' असे सांगितले आहे.

येथे अर्जुनाच्या मनामधे परत शंका आलेली आहे. त्याला योग्य असे कारणही आहे. ज्ञानमार्गाची अनेक प्रकारे स्तुती करून झाल्यावरही, श्रीकृष्ण त्याला युद्धाला उभे रहायला सांगतो आहे. गीता सांगण्यामागचा तोच हेतू आहे.

ह्यावेळी माझ्या मनामधे एक काल्पनिक प्रसंग उभा राहिला आहे तो तुम्हाला सांगतो.

अशी कल्पना करा की, **' गीतारूपी लग्नमंडप '** सजवलेला आहे. **' अर्जुनरूपी वधू '** हातात वरमाला घेऊन उभी आहे.

तिला आपला जीवनसाथी निवडायचा आहे. **' भगवान श्रीकृष्णरूपी पिता '** तिच्या बाजूला उभा आहे.

मंडपामधे, विवाहाच्या इच्छेने अनेक तरुण पुरुष आलेले आहेत. ते सगळे कीर्तिवान आहेत. गुणवान आहेत.

सुप्रसिद्ध आहेत. सुविख्यात आहेत. ते सगळे एकमेकांचे स्नेही आहेत. मित्र आहेत.

**' ज्ञानयोग, राजयोग, भक्तियोग, कर्मयोग, ध्यानयोग, पुरुषोत्तमयोग, ज्ञानविज्ञानयोग, मोक्षसंन्यासयोग, गुणत्रयविभागयोग '** अशी त्यांची नांवे आहेत.

सगळे आपापल्या परीने श्रेष्ठच आहेत. आपापल्या जागी सर्वोच्च आहेत. त्याविषयी कोणतीही शंका नाही.

परंतु, त्या सगळ्यांना पाहून वधूचा गोंधळ उडालेला आहे.

**' आपला पती म्हणून कोणाला निवडायचे?'** ह्याचा निर्णय तिला घेता येत नाही.

ती आपल्या पित्याला अनेक शंका विचारते आहे. त्याचे मार्गदर्शन घेते आहे.

वधुपिता, गोंधळून गेलेल्या आपल्या मुलीला समजावण्याचा प्रयत्न करतो आहे. तिला वारंवार एकच गोष्ट सांगतो आहे.

'' मुलीऽऽ! येथे जमलेले हे सगळे तरुण प्रतिष्ठित आहेत, सुंदर आहेत, आदरणीय आहेत, महत्त्वाचे आहेत.

परंतु तुझ्यासाठी **कर्मयोग** हाच योग्य जोडीदार आहे. त्याच्या गळ्यामधे वरमाला घालण्यातच तुझे हित आहे.

त्याला वरणे हे तुझ्यासाठी, केवळ ह्यालोकीच नाही तर परलोकीही, कल्याणकारक आहे.

म्हणून तू त्याच्या बरोबरच विवाह कर आणि सुखी हो! माझे ऐक!''

वधूच्या मनातला गोंधळ पूर्वीपेक्षा कमी झालेला असला तरी पूर्णपणे शमलेला नाही.

तिचा आपल्या पित्यावर पूर्ण विश्वास आहे. श्रद्धा आहे. प्रेम आहे.

तरीही अंतिम निर्णय घेताना, तिच्या मनामधे अनेक शंका येत आहेत.

तिचा गोंधळ होतो आहे. अंतिम निर्णय घेता येत नाही आहे.

तो गोंधळ नाहीसा होऊन, योग्य निर्णय घेतला जाणे अत्यंत आवश्यक आहे.

त्यासाठीच तिचा पिता आवश्यक ते सर्व प्रयत्न करतो आहे. असो.

आता पुढील अध्यायामधे अर्जुन काय विचारतो आणि त्याला श्रीकृष्ण काय उत्तर देतो, ते ऐकूया!

अस्तु!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**

**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८ - ७८ ॥**

<u>**अध्याय पाचवा**</u>

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या पाचव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे श्रीकृष्णाने कर्मयोगाची प्राचीन परंपरा कशी आहे ते सांगितले.

पुढे अर्जुनाच्या प्रश्नावरून त्याने ‘ तो खरा कोण आहे? ह्या नाशवंत अशा मृत्युलोकामधे जन्माला का येतो? कसा येतो? तसे करण्यामागचे कारण काय आहे? जन्म घेण्यामागचा हेतू साध्य झाल्यावर तो काय करतो?’ हे सांगितले.

येथे पुनर्जन्म ह्या संकल्पनेचे अत्यंत स्पष्टपणे समर्थन केलेले आहे.

त्या नंतर त्याने, कर्म - अकर्म - विकर्म ह्यांचे विवेचन केले. कर्माची गती गहन आहे, गूढ आहे असे सांगितले.

परमेश्वर अनादि, अनंत, अविनाशी, निराकार, निर्गुण असा आहे. तो एकच असून, सर्वत्र तोच भरून राहिलेला आहे. असे असूनही हे सत्य जाणत नसल्यामुळे किंवा जाणूनही मान्य होत नसल्यामुळे, अनेक लोक कोणत्यातरी फळाच्या इच्छेने, अनेक देवदेवतांची विविध प्रकारे विधिपूर्वक उपासना करीत राहतात. परंतु त्यांना जे फळ प्राप्त होते ते केवळ त्यांच्या कर्मामुळेच प्राप्त होते. इतर कशामुळेही प्राप्त होत नाही. इतर कोणामुळेही प्राप्त होत नाही हे सांगितले.

त्या नंतर कर्म हाच यज्ञ असून आपले विहित कर्म करणे म्हणजे यज्ञ करणेच होय असे प्रतिपादन करून त्याचे निरनिराळे लाक्षणिक प्रकार सांगितले आणि त्यामधे सर्वश्रेष्ठ यज्ञ कोणता तेही सांगितले आहे.

परमेश्वराच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय, कोणालाही त्याची प्राप्ती होणार नाही.

सर्व प्रकारच्या सर्व कर्माचे पर्यवसान अखेरीला ज्ञानात होत असते. म्हणून निष्कामकर्माचे द्वारा परमेश्वराच्या मूळ स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन, त्या ज्ञानाला अनुसरून, सदैव त्याला साजेल, शोभेल असे आपले वर्तन ठेवूनच, त्याची प्राप्ती करून घ्यावी लागते.

ह्या मार्गाला ज्ञानयज्ञ असे म्हटलेले आहे आणि ज्ञानमार्गाची अनेक रितीने प्रशंसा केली आहे. ज्ञानाचे अपार महत्त्व, ज्ञानाची महती सांगितली आहे. अशा प्रकारे कर्मयोग आणि ज्ञानयोग ह्या दोनही विषयांचे विवेचन करून शेवटी, ‘ केवळ ज्ञानयोग किंवा केवळ कर्मयोग न स्वीकारता, दोघांचा आश्रय घेऊन, आपले कर्तव्यकर्म पार पाडण्यासाठी, तू <u>**युद्धाला उभा रहा!**</u>’ असे सांगितले आहे.

येथे अर्जुनाच्या मनामधे परत शंका निर्माण झाली.

दुसरा, तिसरा व चवथा, ह्या तीनही अध्यायांमधे ज्ञानयोग आणि कर्मयोग ह्यांचे सविस्तर विवेचन करून अर्जुनाला, <u>**‘ तू कर्मयोगाचे आचरण कर! ’**</u> असे सांगितलेले असले तरीही, <u>**‘ कर्मापेक्षा बुद्धी श्रेष्ठ! ज्ञान श्रेष्ठ!’**</u> असे वारंवार सांगण्यात आलेले आहे.

त्यामुळे ह्या दोन मार्गांपैकी, ‘ आपल्यासाठी श्रेयस्कर, आपले हित साधणारा आणि आपले इह-परलोकी कल्याण करणारा असा मार्ग कोणता?’  ह्या विषयी निश्चित निर्णय करता येत नसल्यामुळे परत एकदा गोंधळाची स्थिती निर्माण झालेली आहे.

तिसऱ्या अध्यायाच्या सुरवातीलाही अशीच परिस्थिती निर्माण झालेली होती. पण त्यामागचे प्रमुख कारण, अर्जुनाला स्वजनांच्या विषयी वाटणारा मोह हे होते. आतापर्यंत त्याच्यावरील मोह आणि विषाद ह्यांचा प्रभाव बराच कमी झाला आहे. परंतु अजूनही तो प्रभाव पूर्णपणे नाहीसा झालेला नाही. म्हणून येथे अर्जुनाने आपल्या शंकेचे निराकरण करून घेण्यासाठी थेट प्रश्न विचारला आहे.

<u>गीतेच्या पाचव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे.</u>

तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**संन्यासङ् कर्मणाङ् कृष्ण पुनर्योगञ् च शंससि ।**

**यत् श्रेय एतयोरेकम् तन् मे ब्रूहि सुनिश्चितम् ।। १ ।।**

हे श्रीकृष्णा! तू एकदा कर्मसंन्यासाची तर एकदा कर्मयोगाची प्रशंसा करीत आहेस. तसे न करता, ह्या दोहोंपैकी माझ्यासाठी जे अधिक श्रेयस्कर, अधिक हितकारक आणि अधिक कल्याणकारक असे असेल तेच निश्चितपणे मला सांग.

हा प्रश्न विचारताना अर्जुनाने श्रीकृष्णाला ह्या विषयावरचे, त्याचे अंतिम मत विचारले आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**

**तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ।। २ ।।**

अर्जुनाऽऽ! कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोनही मार्ग मोक्ष प्राप्त करून देणारे आहेत.

परंतु त्या दोघांच्यापैकी, कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग श्रेष्ठ आहे.
त्याला श्रीकृष्णाने अत्यंत स्पष्ट आणि स्वच्छ असे उत्तर दिलेले आहे. शब्दांची कितीही ओढाताण केली तरीही, ह्या विधानामधून दुसरा कोणताही अर्थ काढता येणार नाही.
येथून पुढे ' कर्मसंन्यास ' हा शब्द ज्ञानयोगासाठीच वापरलेला आहे हे आपण सर्वांनी लक्षात घ्यावे, असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.
सांख्ययोगी म्हणजेच ज्ञानयोगी जसे वर्तन करतो तसेच वर्तन कर्मयोगीही करू शकतो. ज्ञानयोग्यांच्या विचारसरणीचे पालन कर्मयोगीदेखील कसे करू शकतो, ते आता विस्ताराने सांगायला सुरवात होते आहे. असो.
कर्म न करण्यापेक्षा, कर्म करणे हे चांगले आणि काहीतरी मिळविण्याच्या हेतूने कर्म करण्यापेक्षा, कोणत्याही फळाची आशा न बाळगता, स्वधर्मानुसार आपले विहित कर्म करणे हे अधिक चांगले असते. असे सांगण्यामागचे कारण म्हणजे, संन्यासयोगाचे म्हणजेच ज्ञानयोगाचे आचरण करणे अत्यंत कठीण असते. त्यासाठी अगोदर माणसाला ' **आत्मज्ञान** ' प्राप्त झालेले असले पाहिजे.
तो **ज्ञानी** असावा लागतो. **ब्रह्मनिष्ठ** असावा लागतो. तशी पात्रता असणे हेच अत्यंत कठीण आहे.
फार फार दुर्मिळ आहे. असा ज्ञानवान मनुष्य ते ज्ञान सिद्ध होण्यासाठी कर्मसंन्यास घेतो.
ज्ञानयोगाचा मार्ग स्वीकारून त्यायोगे अंतिमत: मोक्ष प्राप्त करून घेतो.
त्यालाही कर्म करावेच लागते आणि त्याचे प्रत्येक कर्म हे ' **निष्काम कर्मच** ' असते. परंतु, **त्याचे कर्म हे ज्ञानोत्तर कर्म असते.**
कर्मयोगाची गोष्ट याच्या उलट आहे. मनुष्य ज्ञानी असला किंवा ज्ञानी नसला तरीही, आपले कर्म करीत असताना तो फलाची आशा सोडून द्यायचा प्रयत्न करु शकतो. निस्वार्थीपणाने आपले कर्तव्य पार पाडायचा प्रयत्न करू शकतो. असे करीत असताना एक वेळ अशी येते की, ' त्याला **आत्मज्ञान** प्राप्त होते. तो आपोआप **ब्रह्मनिष्ठ** होतो.' त्यानंतरही तो आयुष्याच्या अंतापर्यंत आपले विहित कर्म करीतच राहतो आणि त्यायोगे अंतिमत: मोक्ष प्राप्त करून घेतो. **त्याचे ज्ञान हे कर्मोत्तर ज्ञान असते.**
हे जर ढोबळमानाने, सर्वसाधारण व्यावहारिक भाषेत सांगायचे झाले तर,
एखादा उच्च शिक्षित तरुण आपल्या कारकिर्दीची सुरवात उच्च पदापासून करतो.
त्याच्या पात्रतेनुसार त्याची पहिली नेमणूक एखाद्या उच्च पदावरच होते. **त्याला ज्ञानोत्तर कर्म करणारा म्हणता येईल.**
तर एखादा कमी शिकलेला तरुण, एखाद्या सामान्य पदावर अनेक वर्षे काम करून, अनुभवाने ज्ञान प्राप्त करून घेऊन त्यायोगे उच्च पदावर पोहोचतो. त्याच्या पात्रतेनुसार त्याची पहिली नेमणूक एखाद्या सामान्य पदावरच होते.
**त्याला कर्मोत्तर ज्ञान मिळविणारा म्हणता येईल.**
त्यामुळे तुलनात्मक दृष्टीने, निष्काम कर्मयोग हा आचरण्यास ज्ञानयोगाहून सुलभ आहे, सोपा आहे आणि म्हणूनच श्रेष्ठ आहे असे सांगितले आहे.
संन्यास घेणे सोपे आहे का? कोणालाही सहजपणे संन्यास घेता येईल का?
समजा एखाद्या माणसाने विचारपूर्वक संन्यास घेतला, तरी त्याला आयुष्याच्या अंतापर्यंत संन्यासाचे निष्ठेने पालन करता येईल का?
मुळामधे संन्यासयोगाचे आचरण फार कठीण आहे. सनातन वैदिक धर्मामधे, मानवी जीवनात, वयोमानानुसार आचरण करण्यासाठी चार आश्रम सांगितलेले आहेत. **ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम** हे ते आश्रम आहेत.
प्रत्येक आश्रमाचा धर्म स्पष्टपणे सांगितलेला आहे. तसेच ह्या अनुक्रमाला अपवादही सांगितलेले आहेत.
म्हणजे ब्रह्मचर्याश्रमानंतर पुढचे दोन आश्रम वगळून सरळ संन्यासाश्रमामधे प्रवेश करता येतो. तसेच गृहस्थाश्रमानंतर त्यापुढचा वानप्रस्थाश्रम वगळून सरळ संन्यासाश्रमामधे प्रवेश करता येतो. परंतु एकदा संन्यासाश्रमामधे प्रवेश केल्यावर मात्र, उलट प्रक्रिया करता येत नाही. म्हणजे एकदा संन्यास घेतल्यावर काही काळाने परत वानप्रस्थाश्रम अथवा गृहस्थाश्रम स्वीकारता येत नाही. धर्मशास्त्राची तशी परवानगी नाही. गीतेमधे ज्ञानयोगाविषयी जे भाष्य केलेले आहे ते अशा प्रकारच्या अपवादांना उद्देशून केलेले आहे असे मला वाटते.
' आपले विहित कर्म करण्यास अत्यंत सक्षम असणाऱ्या अशा माणसांनी, कोणत्याही कारणामुळे का होईना, आपल्या कर्तव्याचे पालन न करता, स्वधर्मानुसार विहितकर्म करायचे टाळून, कर्मसंन्यास घ्यावा की नाही?' ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या हेतूनेच सगळी चर्चा केलेली आहे. येथे एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. ती म्हणजे चार आश्रमांमधे संन्यासाश्रम हा सर्वात शेवटचा आहे.
पहिल्या तीनही आश्रमांचे पालन करून आणि जगाचा सर्वार्थाने अनुभव घेऊन झाल्यावर, त्यानंतर आचरावयाचा आश्रम आहे.
संन्यास घेण्यासाठी, मग तो अनुक्रमाने घेतलेला असो किंवा नसो, अगोदर फार मोठी तयारी करावी लागते.
त्याविषयीचे नियम फारच कडक आहेत आणि ते सर्वार्थाने पाळावे लागतात.
हल्ली **' झटपट संन्यास!'** देणाऱ्या किंवा **' अंशत: संन्यास!'** देणाऱ्या अथवा **' आपल्या घरी नेहमीप्रमाणे राहण्याची अनुमती असलेला संन्यास!'** देणाऱ्या संस्था निघालेल्या आहेत असे माझ्या वाचनात आले आहे.

आपणा सर्वांनाही कदाचित् ते माहीत असेल.
पेपरमधे ' आमचे येथे उपवासाचे शंभर पदार्थ मिळतील!!!' अशा जाहिराती असतात ना, तशातलाच हा प्रकार असतो.
तसली जाहिरात वाचताना आपल्याला, ' जर काहीतरी खातच रहायचे असेल तर मग उपवास करायचाच कशाला?' असा प्रश्न पडतो. त्याचप्रमाणे ह्या बाबतीतही विचार करताना आपल्याला ' जर संन्यासधर्माचे नियम काटेकोरपणे पाळायचेच नसतील तर मग संन्यास घ्यायचाच कशाला?' असा प्रश्न पडतो. पण त्याचे उत्तर कोणाकडेही नसते. असो.
सनातन वैदिक धर्माने जे नियम सांगितलेले आहेत, त्यानुसार काय काय करावे लागते त्याची यादी फार मोठी आहे आणि मुख्य म्हणजे त्यामधे कोणतीही पळवाट नाही, कोणताही शॉर्टकट नाही आणि कोणतीही सवलत नाही हे निश्चित.
१) माणसाच्या मनामधे संन्यास घेण्याची इच्छा ही अत्यंत नैसर्गिकपणे निर्माण व्हायला हवी.
सगळयाचा कंटाळा आल्यामुळे, वीट आल्यामुळे, आपण ठरविलेल्या कार्यामधे अनेकवेळा अपयशाचा सामना करावा लागून उद्विग्नता आल्यामुळे किंवा आपल्याला कोणीही विचारीत नाही, मान देत नाही, आपले ऐकत नाही म्हणून हताश होऊन, निराश झाल्यामुळे जर एखाद्याने संन्यास घेतला, तर तो फार दिवस टिकणार नाही. संन्यासधर्माचे पालन करता येणार नाही. म्हणजेच संन्यास हा, स्वत:वर किंवा इतरांवर, जबरदस्तीने लादलेला असून चालत नाही. **' मनाला वाटले!'** म्हणून संन्यास घेता येत नाही. संन्यास देणाऱ्याची, संन्यास घेणाऱ्याविषयी सर्व दृष्टीने पूर्णपणे खात्री पटावी लागते. तरच संन्यास दिला जातो.
२) कोणालाही संन्यास घेण्यासाठी, आपल्या पत्नीची अगर पतीची, पूर्वपरवानगी  मिळवावीच लागते. विवाह झालेला नसेल तर आपल्या आई वडिलांची पूर्वपरवानगी मिळवावीच लागते. तसे करणे अत्त्यावश्यक आहे. त्याशिवाय संन्यास दिला जात नाही.
३) आपल्या मालकीच्या संपूर्ण स्थावर आणि जंगम मालमत्तेवरील स्वत:चा अधिकार संपूर्णपणे सोडून द्यावा लागतो. कोणावरही तसे करायची सक्ती करून चालत नाही. ज्याचा त्याने, पूर्ण विचारांती - स्वत:हून - स्वत:च्या इच्छेने, तसा निर्णय घेणे व अंमलात आणणे अपेक्षित असते.
४) आपली पत्नी, मुले, नातवंडे, इतर सर्व नातेवाईक आणि मित्रवर्ग ह्यांचेबरोबर असलेले सर्व प्रकारचे संबंध स्वेच्छेने, संपूर्णपणे सोडून द्यावे लागतात.
५) आपली दिनचर्या, आपल्या आवडी निवडी, आपण नियमीतपणे घेत असलेले उपभोग, सर्व प्रकारची करमणूक, ह्यांचा स्वेच्छेने, संपूर्णपणे त्याग करावा लागतो.
६) केवळ आपल्या स्वत:च्याच नाही, तर इतरांच्या घरामधेही राहणे स्वेच्छेने, सोडून द्यावे लागते. शक्यतोवर कुठेही गोतावळयामधे राहणे टाळावे लागते.
७) ज्येष्ठ संन्याश्यांच्या परवानगीने, त्यांचे बरोबर राहून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी, खडतर म्हणता येईल अशी, साधना करावी लागते.
८) ' आत्मज्ञान करून घेणे, झालेले आत्मज्ञान सिद्ध करणे व त्यायोगे परमेश्वराची प्राप्ती करून घेऊन मोक्ष मिळविणे.' ही एकमेव इच्छा सोडून, अन्य सर्व प्रकारच्या इच्छा - आकांक्षा - मोह - माया इत्यादींचा संपूर्णपणे त्याग करावा लागतो.
९) किंबहुना ज्याला आत्मज्ञान म्हणजेच आत्मबोध प्राप्त झालेला आहे असा ज्ञानवान साधकच संन्यासयोगाचे पालन करण्यास पात्र असतो. त्याची तशी योग्यता असते. त्यालाच तो अधिकार असतो. ज्याची अशी योग्यता असेल, अधिकार असेल आणि मनाची पूर्ण तयारी असेल, त्यालाच संन्यास दिला जातो. अन्यथा दिला जात नाही. कारण —
एकदा संन्यास घेतला म्हणजे परतीच्या सर्व वाटा बंद होतात. मागे फिरता येत नाही.
वरील सर्व गोष्टी म्हणजे, एखाद्याने संन्यास घेण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता मिळविण्यासाठी केलेला प्रयास आहे. संन्यास घेण्याची पूर्वतयारी आहे. त्यामधे यश येणे फार कठीण असते. अनेक वर्षांची साधनाही वाया जाऊ शकते. आपल्या प्रिय व्यक्तीचा, नात्यांचा, मालमत्तेचा अगर सामाजिक मानमरातबाचा त्याग करणे फार फार कठीण असते.
अहोऽऽ, इतरांचे जाऊद्या. पण रस्त्यावरल्या एखाद्या भिक्षेकऱ्यालाही आपल्या भिक्षा मागायला बसण्याच्या जागेचा, हातातल्या भिक्षापात्राचा आणि अंगावरल्या जीर्ण कपड्यांचा मोह असतो, प्रेम असते आणि तो मोह सुटता सुटत नाही. त्यासाठी तो झगडायला, भांडायला आणि हाणामाऱ्या करायला नेहमीच तयार असतो. असो.
हे सगळे झाले संन्यास घेण्याच्या पूर्वतयारी विषयी. प्रत्यक्ष संन्यास घेताना काय करायचे असते ते ही समजून घेऊया.
१०) प्रत्यक्ष संन्यास घेताना, आपले नांव, गाव, शिक्षण, समाजामधील आपले पद आणि पत इत्यादी सर्व गोष्टींचे विधिपूर्वक विसर्जन करावे लागते. त्यांचा त्याग करावा लागतो. आपणच स्वत:चे प्रतिकात्मक अंत्यसंस्कार करावे लागतात. इतकेच नाही तर स्वत:चे श्राद्धदेखील स्वत:लाच करावे लागते. आपले पूर्वायुष्य पूर्णपणे पुसून टाकून, एक नवीन नांव स्वीकारून पुढील आयुष्य जगावे लागते. त्यानंतर आपल्या पूर्वायुष्याची कोणतीही बरी-वाईट आठवण येणे आणि त्यामुळे मन विकारवश होणे, कधीही अपेक्षित नसते.

तसे होऊन चालत नाही. त्यामुळे त्याच्या संन्यासधर्माला बाधा येते. असे करणे कुणा येऱ्या - गबाळ्याचे काम नाही. त्यासाठी फार मोठी मानसिक शक्ती असावी लागते.

माणसाने एकदा संन्यास घेतल्यावर, त्यानंतर कसे वागायचे असते, ते महाभारतातील शांतिपर्वात, शरशैय्येवर पडलेल्या भीष्मांनी, युधिष्ठिराला सविस्तरपणे सांगितले आहे. त्यातला प्रत्येक शब्द फार महत्त्वाचा आहे. आचार्य भीष्म म्हणतात की,

' धर्मराजाऽऽ! आता तुला संन्यासाश्रमाचा धर्म सांगतो तो ऐक.

संन्यास घेतल्यावर ' **आत्मनिग्रही व जितेंद्रिय** ' अशा पुरुषाने ज्या ठिकाणी सूर्यास्त होईल त्या ठिकाणी शयन करावे.

( येथे संन्यास घेण्यासाठी आत्मनिग्रही व जितेंद्रिय असणे अत्त्यावश्यक आहे. ती संन्याशाची पात्रता मानलेली आहे. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.)

त्याने सर्व अभिलाषांचा त्याग करावा. घरदार करू नये. कशाचीही अपेक्षा करू नये. सर्व गोष्टी समान मानाव्या. भोगांचा त्याग करावा. विकार सोडून द्यावेत. सतत मनन व चिंतन करावे. नेहमी सर्वांशी सदयतेने वागावे.

स्वत: अन्न शिजवू नये. कोणी आणून दिल्यास ते खावे. जेवढे मिळेल तेवढ्यावरच उपजीविका करावी. काही मिळाले नाही तर ज्या ठिकाणी सर्वांचे भोजन झालेले आहे व धूर येत नाही तेथे भिक्षा मागावी. गरजेपेक्षा जास्त मागू नये. समजा मिळाले तरी घेऊ नये. न मिळाले तर पाणी पिऊन रहावे. दुसऱ्या संन्याशाजवळ भिक्षा मागू नये. रसपूर्ण व रुचिपूर्ण भोजन करू नये.

कोणत्याही गावांत राहू नये. एकांतस्थळ, ओसाड घर, अरण्य, वृक्षतळ, नदीकाठ अशा ठिकाणीच संचार करावा.

वर्षाकालाचा अपवाद वगळता, एका जागी एकच दिवस रहावे. जवळ कोणतेही सामान बाळगू नये.

ज्ञानाव्यतिरिक्त कसलाही संग्रह करू नये. मित्राबरोबर राहू नये.

जलात उतरून स्नान करू नये. पाणी वर काढून स्नान करावे. अन्न व वस्त्र ह्या शिवाय तिसरी गोष्ट स्वीकारू नये.

आपण होऊन कोणालाही उपदेश करू नये. कोणी विचारल्यास योग्य असेल तेवढेच सांगावे. अती बोलणे टाळावे.

आपला भूतकाळ पुसून टाकावा. गत जीवनाविषयी आठवण करू नये. कशाचाही शोक करू नये. कोणाचाही शोक करू नये.

प्राण आपले शरीर सोडून जाईपर्यंत शक्य असेल ते, इतराना उपयोगी पडेल असे कार्य सतत करीत रहावे.

( बघा! संन्याशाने ' कार्य करू नये!' असे सांगत नाहीत तर नेहमी शक्य होईल ते **' कार्य करीतच रहावे!'** असे सांगत आहेत.)

अशा प्रकारे निष्ठेने संन्यासाश्रम स्वीकारलेला मनुष्य अंतकाळी मोक्षाची प्राप्ती करून घेतो.'

आता ह्या सर्व गोष्टी करणे किती कठीण आहे त्याचा आपण स्वत:शीच विचार करून पहा. ' इतकी उच्च प्रतीची योग्यता प्राप्त करून घेणे आणि त्यानंतर संन्यास घेऊन मरेपर्यंत त्याचे पालन करणे.' किती जणांना शक्य होईल बरे?

दुसरे म्हणजे असे केल्यानंतरही ' पूर्ण कर्मसंन्यास ' करता येत नाहीच. तसे करणे शक्यही नाही आणि अपेक्षितही नाही.

कारण शरीरधारणेसाठी आवश्यक अशी कर्मे तर आपोआप होतच असतात.

त्याशिवाय संन्यासधर्माच्या पालनासाठी आवश्यक अशी जी कर्मे सांगितलेली आहेत ती करावीच लागतात.

आपल्या देशामधे आजपर्यंत होऊन गेलेल्या आणि आजही कार्यरत असलेल्या अशा, संन्यासयोगाचे निष्ठापूर्वक पालन करणाऱ्यांची यादी फार मोठी आहे. त्यांच्याकडे पाहिल्यावर, त्यांच्या चरित्राचा अभ्यास केल्यावर, ' ज्ञानयोगी कसे असतात? ते कशा प्रकारे जगतात? सर्व समाजाच्या उद्धारासाठी काय काय करतात? आपल्या जीवनामधे किती महान कार्य करून दाखवतात?' ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे, आपल्याला सहजपणे मिळतात. माझे वाचन फार कमी आहे. विशेष अभ्यासही झालेला नाही.

परंतु मी जे काही वाचले, जो काही थोडाफार अभ्यास केला आणि त्यातले जे काही समजले त्यावरून मला असे वाटते की,

' आदिशंकराचार्य, समर्थ रामदासस्वामी आणि स्वामी विवेकानंद ह्या तीन व्यक्ती म्हणजे संन्यासयोग्यांचे मानदंड होऊन गेले.'

ते तिघेही अद्वितीयच होते. ज्ञानयोगीच होते. जन्मजात आत्मज्ञान प्राप्त झालेले होते. त्यांनी आपल्या जीवनामधे, संन्यासधर्माचे पूर्णपणे पालन करूनही, अफाट कार्य केले. त्यांचे ते सगळे कार्य हे **' ज्ञानोत्तर कर्म!'** होते.

त्यांच्यापैकी कोणाही एकाने केले तसे आणि तेवढे कार्य करायला आपल्यासारख्या सामान्य माणसाला किती जन्म घ्यावे लागतील बरे? पण अशी माणसे अत्यंत दुर्मिळ असतात. शतका शतकांमधे एकदाच जन्मतात. आदिशंकराचार्यांच्या नंतर आठशे वर्षांनी समर्थ रामदास होऊन गेले आणि त्यांच्या नंतर दोनशे वर्षांनी स्वामी विवेकानंद होऊन गेले.

१) **आदिशंकराचार्यांनी** वयाच्या बत्तिसाव्या वर्षी समाधी घेतली.

वडिलांचे छत्र फार लवकर हरपले. त्यांच्या आईच्या इच्छेने, पाचव्या वर्षी त्यांची मुंज झाली. त्यानंतरची तीन वर्षे ते गुरुगृही राहिले. इतर विद्यार्थ्यांना जे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कमीतकमी १२ वर्षे लागत ते सर्व शिक्षण त्यांनी तीन वर्षांत पूर्ण केले.

तेलगु व संस्कृत भाषा, चारही वेद, उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारत आणि भगवद्गीता हे सर्वकाही शिकले.

त्यांची ग्रहणशक्ती, पठणशक्ती, मननशक्ती आणि तर्कशक्ती अफाट होती. एकदा ऐकल्यावर किंवा वाचल्यावर कोणतीही गोष्ट त्यांना

आत्मगत होत असे. दुसऱ्यांदा सांगायला लागतच नसे. वयाच्या आठव्या वर्षी ते उत्तम काव्य करू शकत होते, प्रवचन करू शकत होते, व्याख्यान देऊ शकत होते. आठव्या वर्षी शिक्षण पूर्ण झाल्यावर ते घरी परत गेले.

थोड्याच दिवसानी, आपल्या आईची परवानगी घेऊन, त्यांनी संन्यास घेतला. पुढे बावीस वर्षे ते सगळा भारतवर्ष पायी फिरले.

चार दिशांच्या चारही टोकांना पीठस्थापना केली. सनातन हिंदूधर्माचे पुनरुत्थान केले. वैदिक धर्माची विस्कटलेली घडी व्यवस्थितपणे बसविली. आपले उत्तराधिकारी नेमले. नंतर परत आपल्या, आजारी असलेल्या आईकडे आले. तिची सेवा केली.

तिचे निधन झाल्यावर पुढे सर्व अंत्यसंस्कार पार पाडले आणि परत आपल्या कार्याला लागले.

त्यांनी अखेरीस **' केदारनाथ '** येथे समाधी घेतली. ( इ.स. ७८८ ते इ.स. ८२० )

त्यांना **' मी कोण आहे?'** हा प्रश्न पडलेला होता आणि त्या प्रश्नाचे त्यांनी दिलेले उत्तर **' आत्मषटकम् '** म्हणून प्रसिद्ध आहे.

अतिशय अर्थपूर्ण आणि रसाळ स्तोत्र आहे. ते स्तोत्र म्हणायला लागले की, आपले मन आपोआप शांत व्हायला लागते.

स्थिर व्हायला लागते. आपल्या मनावरील विकारांचा प्रभाव कमी व्हायला लागतो.

**मनोबुद्ध्यहंकार चित्तानि नाहम् । न च श्रोत्र जिह्वे न च घ्राण नेत्रे ।**

**न च व्योम भूमिः न तेजो न वायुः । चिदानंद रूपःशिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — मन - बुद्धी - अहंकार आणि चित्त म्हणजे मी नव्हे. श्रोत्रेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय किंवा चक्षुरिंद्रिय म्हणजे मी नव्हे. आकाश, पृथ्वी, तेज आणि वायू म्हणजे मी नव्हे. मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

**न च प्राणसंज्ञः न वै पंच वायुः । न वा सप्तधातुः न वा पंचकोषः ।**

**न वाक् पाणिपादौ न चोपस्थपायू । चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — शरीरामधे संचार करणारा प्राणवायू म्हणजे मी नव्हे. शरीरात असलेले पंचप्राण म्हणजे मी नव्हे. शरीरातील सप्त धातू किंवा पंचकोष म्हणजे मी नव्हे. शरीराची पांच कर्मेंद्रिये म्हणजे मी नव्हे. मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

**न मे द्वेष रागौ न मे लोभ मोहौ । मदो नैव मे नैव मात्सर्यभावः ।**

**न धर्मो न चार्थो न कामो न मोक्षः । चिदानंद रूपःशिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — मला कोणाचाही द्वेष, राग, लोभ, आसक्ती, गर्व अथवा मत्सर नाही. मला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या पुरुषार्थांचीही इच्छा उरलेली नाही. मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

**न पुण्यम् न पापम् न सौख्यम् न दुःखम् । न मंत्रो न तीर्थम् न वेदा न यज्ञाः ।**

**अहं भोजनम् नैव भोज्यम् न भोक्ता । चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — मी पुण्य नाही व पापही नाही. सुख नाही व दु:खही नाही. मला मंत्र, तीर्थ, वेद आणि यज्ञ इत्यादींची आवश्यकता नाही. मी भोजन नाही. भोज्य नाही. भोक्ताही नाही. मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

**न मे मृत्युशंका न मे जातिभेदः । पिता नैव मे नैव माता न जन्म ।**

**न बंधुः न मित्रम् गुरू नैव शिष्यः । चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — मला मृत्यूचे भय नाही. जातिभेद उरला नाही. मला कोणी माता - पिता नाही आणि जन्मही नाही. मला कोणी बंधू, मित्र, गुरू आणि शिष्यही नाही. मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

**अहम् निर्विकल्पो निराकार रूपो । विभुर्व्याप्त सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ।**

**सदा मे समत्वम् न मुक्तिः न बंधः । चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।**

अर्थ — मी निर्विकल्प ( भेदातीत ), निर्विकार व निराकार आहे. मी सर्वव्यापी, सर्वस्वरूप व सर्व ठिकाणी आहे. मी सर्व इंद्रियांना व्यापून राहिलो आहे. मी सर्वकाळी एकरूप आहे. मला संसाराचे बंधनही नाही आणि मुक्तीही नाही.
मी चिदानंदरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

येथे ब्रह्मज्ञानाचा, आत्मज्ञानाचा परमोच्च आविष्कार झालेला दिसून येतो. आता ह्यावर आणखी काय बोलायचे?

हे स्तोत्र म्हणताना देखील आपले अष्टसात्त्विक भाव उचंबळून येतात.

म्हणणाऱ्याला स्वत:चा विसर पडतो आणि मनाची विलक्षण शांती अनुभवता येते. असो.

२) **समर्थ रामदास स्वामीं**च्या कार्याविषयी आपल्या सर्वांना माहिती आहेच.

वयाच्या आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली. त्या वयातही, ते **' सर्व विश्वाच्या कल्याणाची '** चिंता करीत होते.

बाराव्या वर्षी त्यांची आई आणि ज्येष्ठ बंधू, त्यांचे लग्न लावायला निघाले. लग्नाच्या मांडवामधून ते पळाले.

नंतरची बारा वर्षे पंचवटीस राहून तपश्चर्या केली. त्यानंतरची बारा वर्षे ते सगळा भारतवर्ष पायी फिरले.

तो काळ म्हणजे देशाच्या इतिहासातला अतिशय वाईट काळ होता. हा सर्व देश, आपला हा हिंदुस्थान, परकीयांचा गुलाम झालेला होता. सर्व देशभर भ्रमण करून त्यांनी समाजाचा आणि परिस्थितीचा अभ्यास केला.
मूळ दुखणे समजून घेतले. त्यावर करावयाचा उपायही शोधला. त्याच काळामधे त्यांनी विधिवत् संन्यास घेतला.
वयाच्या छत्तिसाव्या वर्षी ते महाराष्ट्रामधे कृष्णातीरी परत आले. तेव्हा शिवाजी महाराज चवदा वर्षांचे होते. पुढचे सगळे आयुष्य त्यांनी समाजकारण केले. शिवाजी महाराजांच्या राजकारणाला सर्व प्रकारे सहाय्य केले.
सज्जनगड हा शिवाजी महाराजांचा लष्करी किल्ला होता आणि त्यांच्या परवानगीने समर्थ तेथे रहात होते.
शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांना राज्याभिषेक झाला. त्यानंतरही समर्थ तेथेच रहात होते.
त्यांनी वयाच्या ७४ व्या वर्षी प्रायोपवेशन करून **सज्जनगडावर** देह ठेवला. ( इ.स. १६०८ ते इ.स. १६८२ )
समर्थ रामदासांनाही **' मी कोण आहे?'** हा प्रश्न पडलेला होता आणि त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी एका श्लोकामधे दिलेले आहे.
फार सुंदर श्लोक आहे. ते म्हणतात की,

**मला जन्म नाही मला मृत्यु नाही । मला वासना हेत काहींच नाही ।**
**मला पाहता मीच मद्रूप जालो । विवेकें विचारेंचि सर्वें विरालो ।।**

ह्यावर काहीही सांगणे शक्य नाही. काहीही सांगायची आवश्यकताच नाही.
**' चिदानंद रूप: शिवोऽहम् शिवोऽहम् '** चे हे मराठमोळे रूप आहे.
समर्थांनी समाज परिवर्तनाची फार मोठी चळवळ उभी केली. गुलामगिरीने गलितगात्र झालेल्या समाजामधे नवचैतन्य निर्माण करण्यासाठी फार मोठी ग्रंथ निर्मिती केली. सर्व सामान्य माणसाला पडणाऱ्या सर्व प्रश्नांची निश्चित उत्तरे दिली.
काय करावे आणि काय करू नये ह्याविषयी यथायोग्य मार्गदर्शन केले.
त्यांनी रचलेले मनाचे श्लोक म्हणजे शुद्ध बावन्नकसी सोन्याची लगड आहे. मनाचा इतका सखोल विचार दुसऱ्या कोणीही केलेला नाही. तसेच त्याला योग्य मार्गावर आणण्यासाठी करायचे इतके उपायही कोणीही सांगितलेले नाहीत.
आचार्य विनोबा भावे तर, ' मनाचे श्लोक म्हणजे **मनोपनिषद** आहे.' असे म्हणत.
३) **स्वामी विवेकानंद** हे तर जगप्रसिद्ध व्यक्तिमत्व आहे. ते एकोणचाळीस वर्षे जगले.
बालपणापासूनच ते अत्यंत बुद्धिमान आणि कमालीचे चिकित्सक होते. त्यांच्या जीवनावर त्यांच्या आईचा फार मोठा प्रभाव होता.
आपल्या आईची, ' आयुष्यभर अंतर्बाह्य शुद्ध रहा. आत्मसन्मानाला जप आणि इतरांच्या सन्मानालाही जप. सर्व मर्यादा पाळत जा.' ही शिकवण त्यांनी अखेरपर्यंत पाळली.
वयाच्या अठराव्या वर्षी त्यांची **श्रीरामकृष्ण परमहंस** ह्यांच्या बरोबर पहिली भेट झाली.
त्यावेळी नरेंद्रनाथाने ( विवेकानंदांचे पूर्वाश्रमीचे नांव ) रामकृष्णांना विचारले की,
' आपला देवावर विश्वास आहे काय?'
' होय.'
' आपण देव पाहिला आहे काय?'
' होय.'
' आपण ते सिद्ध करू शकाल काय?'
' होय.'
' कसे सिद्ध कराल?'
' कारण मी तुला आत्ता इथे माझ्या समोर जसा पाहतो आहे, त्यापेक्षाही अधिक स्पष्टपणे आणि स्वच्छपणे देवाला पाहिले आहे.
तू त्याला पाहू इच्छितोस काय?'
' हो. आपण मला परमेश्वर दाखवू शकाल?'
' निश्चित! मी सांगेन त्याप्रमाणे वागशील तर मी तुलाही तो दाखवू शकेन.'
ह्या भेटीने त्यांचे आयुष्य बदलले. कालांतराने त्यांनी श्रीरामकृष्णांचे शिष्यत्व पत्करले. त्यांना पाच वर्षे गुरूचा सहवास लाभला.
इ.स. १८८६ च्या ऑगस्ट महिन्यात रामकृष्णांचे निधन झाले.
त्यानंतर काही महिन्यातच त्यांनी आणि इतर आठ अनुयायांनी विधिवत् संन्यास घेतला आणि पुढील पंधरा वर्षांमधे सगळा दैदिप्यमान इतिहास घडला. ह्या काळामधे त्यांनी पाच वर्षे भारत भ्रमण केले. नंतर इ.स. १८९३ साली ते जपान, चीन, कॅनडा ह्या देशांना भेट देऊन शिकागोला सर्वधर्मपरिषदेला गेले. तेथे त्यांचे अमेरिकेमधील पहिले आणि अत्यंत गाजलेले भाषण झाले.

त्यानंतर त्यांनी अमेरिका आणि इंग्लंड येथे अनेक व्याख्याने दिली. इ.स. १८९७ साली ते भारतात परत आले.
श्रीरामकृष्ण मठाची स्थापना केली. मठाचे कार्य सर्व भारतात पसरविले. त्यांचे विचार आणि व्याख्याने ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले आणि त्याद्वारे भारतीय तरुणांचा शैक्षणिक, अध्यात्मिक आणि नैतिक विकास करण्याची मोठी चळवळ सुरू झाली.
नंतर इ.स. १८९९ आणि इ.स. १९०० ह्या काळात त्यांनी दुसरा परदेश दौरा केला.
इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स ह्या देशांमधे अनेक व्याख्याने दिली. तो प्रवास पूर्ण करून ते भारतात परत आले.
४ जुलै १९०२ रोजी रात्री नऊ वाजता, ध्यानाला बसले असताना, दहा मिनिटानी, ध्यानावस्थेतच त्यांचे निधन झाले.
ही त्यांनी घेतलेली **' महासमाधी!'** होती. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या त्यांच्या अनुयायांनी,
' स्वामीजींच्या नाकामधून आणि डोळ्यांमधून थोडा रक्तस्राव झाला होता आणि ध्यानमधे असताना त्यांच्या **ब्रह्मरंध्रामधून** ( मस्तकाचा मध्य म्हणजेच ताळू ) प्राण गेले.' अशी नोंद करून ठेवली आहे.
मठाच्या डॉक्टरांनी आपल्या वैद्यकीय अहवालामधे, ' स्वामीजींच्या मेंदूमधील रक्तवाहिनी फुटल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.' असे जाहीर केले. परंतु त्यामागील कारण ते सांगू शकले नाहीत.
स्वामीजींनी मात्र ' मी चाळीस वर्षांचा होणार नाही.' असे अगोदरच सांगितले होते आणि ते सत्य ठरले.
( इ.स. १८६३ ते इ.स. १९०२ )
स्वामी विवेकानंदांनाही **' मी कोण आहे?'** हा प्रश्न पडलेला होता आणि त्यांनीही त्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे.
त्यांना जी अनुभूती झाली ती, हिंदुस्थानातल्या सर्व तरुणांना कार्यप्रवण करण्यासाठी, त्यांनी सतत सांगितली आहे. ते म्हणतात की,
**" Come up, O lions, and shake off the delusion that you are sheep ;**
**you are souls, immortal, spirits free, blest and eternal ; you are not matter, you are not bodies, matter is your servant, not you the servant of matter.''**
अर्थ — अहो धैर्यशाली तरुणांनो ऽऽ, ' आपण दुर्बल आहोत ' ही अत्यंत चुकीची समजूत झटकून टाका. ह्या भ्रांतीमधून बाहेर पडा आणि उभे रहा! तुम्ही अनादि - अनंत - अमर आणि आनंदमय असे दिव्य तत्त्व आहात! लक्षात ठेवा की, तुम्ही केवळ जड भौतिक वस्तू नाही आहात! केवळ शरीर नाही आहात! तुम्ही भौतिक वस्तूचे नोकर नसून मालक आहात!
तुम्ही दुर्बल नाहीत! सबल आहात!''
**' चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् '** चे हे इंग्रजीत केलेले रुपांतर आहे.
तिघांचा काल वेगवेगळा आहे, भाषा वेगवेगळी आहे. सांगण्याची शैली वेगळी आहे. पण मतितार्थ एकच आहे.
त्यांचे कार्य पाहिल्यावर आश्चर्यचकित व्हायला होते. त्यांनी तिघांनीही अमर्याद वाङ्मय निर्माण केले.
असे साहित्य निर्माण केले की, ते आजही वाचकांना उर्जा पुरविते. विहित कर्म करायला प्रेरणा देते. त्यांनी कधीही कर्मत्याग केला नाही. उलट सर्व समाजाला **' निष्काम कर्म कसे करावे?'** ते शिकविले. त्याप्रमाणे स्वतः आचरण करून दाखविले.
सांगायचे इतकेच की, कर्मसंन्यासाच्या तुलनेत कर्मयोग श्रेष्ठ आहे. इष्ट आहे. सुलभ आहे आणि आचरणीय आहे. असो.

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।**
**निर्द्वन्द्वोहि महाबाहो सुखम् बंधात् प्रमुच्यते ।। ३ ।।**
**साङ्ख्ययोगौ पृथक् बालाः प्रवदन्ति न पंडिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यक् उभयोर्विन्दते फलम् ।। ४ ।।**
**यत् साङ्ख्यैः प्राप्यते स्थानम् तत् योगैरपि गम्यते ।**
**एकम् साङ्ख्यञ् च योगञ् च यः पश्यति स पश्यति ।। ५ ।।**

हे महाबाहो अर्जुना ! जो कोणाचाही द्वेष करीत नाही आणि कशाचीही इच्छा करीत नाही तो पुरुष कर्मे करूनही नित्य संन्यासीच समजायचा. कारण द्वंद्वापासून मुक्त झालेला तो अनायासेच सर्व कर्मबंधांपासून मुक्त होतो. संन्यासयोग आणि कर्मयोग हे भिन्न आहेत असे मूर्ख लोक म्हणतात. पंडीत तसे म्हणत नाहीत. कोणताही एक मार्ग चांगल्या तऱ्हेने आचरल्यास दोघांचेही फल मिळते. ज्या मोक्षस्थानी संन्यासयोगी पोहोचतात तेथेच कर्मयोगीही पोहोचतात. हे दोनही मार्ग एकच आहेत असे ज्याने पाहिले त्यानेच खरे तत्त्व ओळखले असे समज.
अशी कल्पना करा! जे घडून गेले आहे ते विपरीत असले तरीही त्याची आठवण न करणारा, त्यामुळे झालेल्या लाभ किंवा हानी विषयी विचार करून आनंदित किंवा दुःखी न होणारा आणि त्यासाठी इतरांना दोषी ठरवून त्यांचा द्वेष न करणारा,
**' मी!'** आणि **' माझे!'** अशा अहंकाराला जराही थारा न देणारा आणि आपल्या मनामधे कोणत्याही प्रकारे किल्मिष येऊ न देता,

मनाला सदैव स्थिर ठेवणारा असा जो पुरुष असेल, तो कर्म करीत असला तरीही संन्यासीच असणार.
त्याला आपल्या घराचा, मुलाबाळांचा, आप्तेष्टांचा त्याग करून प्रत्यक्ष संन्यास घ्यायची काय गरज आहे?
आसक्तीचे मूळ कारण असलेले मन हे त्याच्या पूर्णपणे ताब्यात असल्यामुळे नि:संग झालेले असते.
त्यामधील **' मी! आणि माझे!'** ही भावना नाहीशी होऊन, तिची जागा **' हे परमेश्वरा, तूं! आणि तुझे!'** ह्या भावनेने घेतलेली असते. तो जे काही कर्म करीत असतो ते **' इदं न मम!'** म्हणजे **' हे माझे नाही!'** ह्या भावनेनेच करीत असतो.
केवळ कर्तव्य म्हणून करीत असतो. त्यामुळे त्याला कर्माचे बंधन पडणारच नाही. इतकेच नाही तर इच्छा नसली तरीही, त्याला सदैव शाश्वत सुखाचीच प्राप्ती होणार यात संशय नाही. संन्यासयोगाचे आचरण करणाऱ्यालाही अंतिमत: शाश्वत सुखाचीच प्राप्ती होते.
म्हणजेच जरी मार्ग वेगवेगळे दिसत असले तरी, दोघांना शेवटी जेथे पोहोचायचे आहे ते ठिकाण एकच आहे.
त्यामुळे आपापल्या आवडीनुसार आणि योग्यतेनुसार कोणत्याही मार्गाने गेले तरी शेवटी प्रवास एकाच ठिकाणी संपणार.
म्हणून ज्ञानी माणसे ' हे दोन्ही मार्ग एकच आहेत.' असे म्हणतात आणि त्यांनाच खरे तत्त्व समजलेले असते.
समजा की एखादा माणूस आहे. त्याच्या संपर्कामधे येणारी इतर माणसे त्याला वेगवेगळ्या नांवानी हाक मारतात.
त्याला कोणी ' **पुत्र** ' म्हणतो तर कोणी ' **बंधू** ' म्हणतो. कोणी ' **पती** ' म्हणतो तर कोणी ' **पिता** ' म्हणतो.
कोणी ' **काका** ' म्हणतो तर कोणी ' **मामा** ' म्हणतो. कोणी ' **गुरुजी** ' म्हणतो तर कोणी ' **मालक** ' म्हणतो.
कोणी आणखी काहीतरी म्हणतो. त्याच्याशी ज्याचा जसा संबंध असतो, त्याप्रमाणे हाक मारण्यात येते. पण सगळे त्यालाच बोलावीत असतात. ही सगळी नांवे वेगवेगळी दिसत असली तरी माणूस तोच असतो. एकच असतो.
कोणत्याही नांवाने बोलाविले तरी हाक मारणाऱ्याच्या समोर तोच येतो. हाक मारणारा अखेर त्याच्याकडेच पोहोचतो.
येथेही तसाच प्रकार आहे. कोणत्याही मार्गाने गेले तरी पोहोचायचे ठिकाण वेगळे नाही.
एकच आहे आणि ते ठिकाण ' **मोक्ष** ' हेच आहे. म्हणून केवळ नांवामुळे भासणारा वेगळेपणा बाजूला केला, तर संन्यासयोग आणि कर्मयोग हे दोन्ही मार्ग एकाच ठिकाणी पोहोचणारे आहेत, म्हणून एकच आहेत.

**संन्यासस्तु महाबाहो दु:खमाप्तुमयोगत: ।**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ।। ६ ।।**
**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रिय: ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ।। ७ ।।**

हे अर्जुना ! संन्यास जरी झाला तरी तो कर्माशिवाय प्राप्त होणे कठीण आहे. पण जो मनुष्य कर्मयोगयुक्त झाला तो परब्रह्म परमात्म्याला फार लवकर प्राप्त करून घेतो. जो योगयुक्त झाला, ज्याचें अंत:करण शुद्ध आहे, ज्याने आपले मन व इंद्रिये जिंकली आणि सर्व भूतांचा आत्मा हाच ज्याचा आत्मा झाला, तो सर्व कर्मे करीत असतानाही अलिप्त राहतो.
कर्म करणे कोणालाही आणि कधीही टाळता येत नाही. अगदी शुद्ध संन्यासी झाला, ज्ञानयोगी झाला, तरी त्यालाही शरीरधर्माचे आणि संन्यासधर्माचे पालन करण्यासाठी आवश्यक अशी कर्मे करावीच लागतात. ती टाळता येत नाहीत. संपूर्ण कर्मसंन्यास घेताच येत नाही.
त्यापेक्षा जो अंत:करणाने शुद्ध झाला आहे, ज्याने आपल्या मनावर आणि इंद्रियांवर पूर्णपणे ताबा मिळविलेला आहे, जो सर्व भूतमात्रांमधे परमेश्वराचे अस्तित्व सदैव पाहतो आणि जो आपले विहित कर्म निरपेक्षपणे, फलाशा न बाळगता, केवळ कर्तव्य म्हणून करीत असतो, त्याला मोक्षप्राप्ती लवकर होण्याची शक्यता असते.
त्यासाठीच आपली सर्वसाधारण कर्मेदेखील कशा प्रकारे करावीत ते पुढील तीन श्लोकांत सांगितलेले आहे.

**नैव किञ्चित् करोमीति युक्तो मन्येत तत्ववित् ।**
**पश्यन्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ।। ८ ।।**
**प्रलपन्विसृजन्गृण्हन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।**
**इंद्रियाणिंद्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ।। ९ ।।**
**ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गम् त्यक्त्वा करोति य: ।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।। १० ।।**

योगयुक्त तत्त्ववेत्या पुरुषाने - मी काहीच करीत नाही - असे समजावे. पाहताना, ऐकताना, स्पर्श करताना, वास घेताना, खाताना, चालताना, निजताना, श्वासोच्छ्वास करताना, बोलताना, त्याग करताना, देताना, घेताना, डोळ्यांच्या पापण्या उघडताना व मिटतानाही केवळ इंद्रिये आपापल्या विषयांचे ठायी वर्तत आहेत असे समजून वागावे. जो पुरुष सर्व कर्मे, परमेश्वराचे ठिकाणी अर्पण करून व आसक्ती सोडून करतो, तो पाण्यामधील कमलपत्राप्रमाणे पापापासून अलिप्त राहतो.

आपल्या समजत नाही पण, ज्यासाठी विवेक बुद्धीचा फारसा वापर करायला लागत नाही, अशी किती प्रकारची कर्मे आपल्या कळत, नकळत घडून येत असतात पहा!

म्हणजे काहीही न करण्याचा निश्चय केलेला माणूस देखील ही सगळी कर्मे, जन्म झाल्यापासून ते मरण येईपर्यंत, सतत करीतच असतो.

' पाहणे, ऐकणे, स्पर्श करणे, वास घेणे, खाणे, चालणे, झोपणे, श्वास घेणे व सोडणे, बोलणे, मलमूत्र विसर्जन करणे, काही तरी घेणे, काहीतरी देणे, डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप करणे.' ही सामान्य कर्मे सदैव चाललेलीच असतात.

जर ही कर्मे देखील, ' मी करीत नाही तर सर्व इंद्रिये आपापल्या विषयांना अनुसरून वागत आहेत.' असे एखाद्याने मानले, तर तो सर्व कर्मांच्यापासून सदैव अलिप्तच राहणार. कोणत्याही प्रकारची आसक्ती नसल्यामुळे, कोणताही विशिष्ट हेतू नसल्यामुळे, त्याला ह्या सामान्य कर्मांचेही बंधन पडणार नाही हे उघड आहे.

समजा एखादा मनुष्य झोपला आहे. गाढ झोपेत त्याला स्वप्न पडते. त्यामधे तो अनेक गोष्टी करतो. त्यांचा अनुभव घेतो.

पण तो जेव्हा जागा होतो, तेव्हा स्वप्न नाहीसे झालेले असते. मग तो स्वत:शीच विचार करतो की, ' मगाशी स्वप्नामधे मी जे काही करीत होतो, ते काही खरे नव्हते आणि माझा त्याच्याशी काहीही संबंध नव्हता. ते केवळ एक स्वप्न होते. एक आभास होता. आपल्या मनाचे खेळ चाललेले होते.' स्वप्नातल्या अनुभवाकडे पाहण्याची ही जी दृष्टी आहे, तीच दृष्टी ह्या जगामधे प्रत्यक्ष वावरताना आणि सर्व व्यवहार करीत असतानाही बाळगता आली तर त्याला, ' केवळ परमेश्वर हेच एकमात्र सत्य असून, हे सर्व जग मिथ्या आहे. खोटे आहे. एक आभास आहे. हे सगळे दृष्य म्हणजे मनाचे आणि इंद्रियांचे खेळ चाललेले आहेत.' ह्या सांख्यमताचा अनुभव घेता येऊ शकतो.

**कायेन मनसा बुद्ध्या कैवलैरिंद्रियैरपि ।**
**योगिन: कर्म कुर्वन्ति सङ्गम् त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ।। ११ ।।**
**युक्त: कर्मफलन् त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।**
**अयुक्त: कामकारेण फले सक्तो निबध्यते ।। १२ ।।**

म्हणून जे कर्मयोगी असतात, ते कोणताही अहंकार न बाळगता, केवळ शरीराने, मनाने, बुद्धीने आणि केवळ इंद्रियांनीही करावयाची सर्व कर्मे, आसक्ती सोडून, फळाची आशा न बाळगता, केवळ आत्मशुद्धीसाठी करीत असतात.

असा कर्मयोगी पुरुष, कर्मफल त्यागून, परमेश्वरप्राप्तीरूपी पूर्ण शांती मिळवितो.

याउलट जे सकाम पुरुष असतात ते वासनेच्या आहारी जाऊन, त्यायोगे फलाच्या ठायी आसक्त होऊन, विविध कर्मे करीत असतात. त्यामुळे असे पुरुष आपल्या कर्माच्या पापपुण्याने नेहमीच बांधले जातात.

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखम् वशी ।**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।। १३ ।।**

येथे मानवी देहाला नगरीची उपमा दिलेली आहे. ह्या नगरीला नऊ दरवाजे आहेत असे म्हटलेले आहे.

**' दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुदद्वार आणि मूत्रद्वार.'** हे ते नऊ दरवाजे होत.

ज्याने आपली इंद्रिये पूर्णपणे ताब्यात आणली आहेत असा पुरुष, सर्व कर्मांचा मनाने संन्यास घेऊन, नऊ द्वारांच्या ह्या देहरूपी नगरामधे, आपण स्वत: काहीही न करिता किंवा काहीही न करविता, आनंदाने स्थित होऊन राहतो.

आता पुढील दोन श्लोकांमधे एक फार महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. ही गोष्ट प्रत्येकाने लक्षात ठेवली पाहिजे.

**न कर्तृत्वन् न कर्माणि लोकस्य सृजति प्रभु: ।**
**न कर्मफलसंयोगम् स्वभावस्तु प्रवर्तते ।। १४ ।।**
**नादत्ते कस्यचित् पापम् न चैव सुकृतम् विभु: ।**
**अज्ञानेनाऽवृतम् ज्ञानम् तेन मुह्यन्ति जन्तव: ।। १५ ।।**

परमेश्वर लोकांचे कर्तृत्व, त्यांची कर्मे व कर्मफले निर्माण करीत नाही. सर्व काही प्रकृतीच करीत असते. सर्वव्यापी परमात्मा कोणाचेही पाप किंवा पुण्य ग्रहण करीत नाही. ज्ञानावर अज्ञानाचे पांघरूण पडलेले असल्यामुळे मायेने प्राणी मोह पावतात.

आपली सर्वांची एक समान समजूत असते आणि त्यामागील कारण, माणसाचा अहंकार हेच असते.

कोणताही मनुष्य असूदे. कसाही असूदे. सर्वसाधारणपणे त्याच्या आयुष्यामधे जर काही चांगले झाले, तर ते सगळे, ' माझ्या प्रयत्नांमुळे आणि कर्तृत्वामुळे ' झाले असे म्हणतो. पण जर काही वाईट झाले, तर ते मात्र ' परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे ' झाले असेच म्हणतो.

हे कसे शक्य आहे?

चांगले किंवा वाईट हे दोन्ही स्वत:च्या कर्तृत्वामुळेच होते असे तरी म्हणावे किंवा चांगले किंवा वाईट हे दोन्ही परमेश्वराच्या

इच्छेप्रमाणेच होते असे तरी म्हणावे. तरच त्याला काही अर्थ असेल. अर्थात असे म्हणणेही बरोबर नाही.
माणसाचे कर्तृत्व, त्याने केलेले प्रत्येक कर्म व त्याचे फळ ही त्याची स्वत:चीच निर्मिती असते. जर माणसाची कर्मे आणि त्यांचे फळ परमेश्वरच निर्माण करीत असेल तर मग शास्त्रामधे सांगितलेले विधिनिषेध आणि सद्सद्विवेक ह्या दोन्ही गोष्टी अर्थहीन होतील. माणसाला असलेल्या निवडीच्या स्वातंत्र्यालाही काहीच अर्थ राहणार नाही.
मग मनुष्य कर्मबंधनामधून कधीही सुटू शकणार नाही आणि त्याच्या मुक्तीचा कोणताही मार्ग उरणारच नाही.
माणसाकडून जे काही बरे वाईट कर्म होत असते, ते **सत्व, रज आणि तम** हे तीन गुण, **राग, द्वेष, लोभ, मोह, मद, मत्सर** इत्यादी विकार आणि अगोदर केलेल्या कर्मांचे संस्कार ह्यामुळेच होत असते. ह्यालाच त्याचा **स्वभाव** असे म्हणतात.
अशा प्रकारे, मनुष्याने आपल्या अहंकाराच्या आधीन होऊन केलेले वर्तन आणि त्यामुळे निर्माण होणारे पाप किंवा पुण्य परमेश्वर कसे घेईल? ते ज्याचे त्यालाच भोगावे लागणार.
ब्रह्मविद्याशास्त्रामध्ये **( Theosophy )** कर्मविपाकप्रक्रियेचा सिद्धांत सांगितलेला आहे. **( Law of Karma )**
तो सिद्धांत न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाइतकाच खरा आणि अचूक आहे. **( Law of Gravity )**
कर्माचा सिद्धांत असे सांगतो की,

**‘ प्राण्याला त्याच्या प्रत्येक कर्माचे फळ भोगावे लागते.**
**कोणत्याही कर्माचे योग्य ते फळ देऊनच शमन होते.**
**केलेल्या कर्माचे फळ निश्चित मिळते.**
**न केलेल्या कर्माचे फळ मिळत नाही.**
**चांगल्या कर्मांचे फळ नेहमी चांगलेच मिळते.**
**वाईट कर्मांचे फळ नेहमी वाईटच मिळते.**
**अगोदर कर्म घडते आणि त्यानंतर त्या कर्माचे फळ मिळते.**
**जो कर्म करतो त्यालाच त्या कर्माचे फळ मिळते.**
**कर्मफळ भोगल्याशिवाय कोणाचीही सुटका होत नाही.’**

ब्रह्मविद्येमधे कर्माविषयी बरीच माहिती सांगितलेली आहे. त्यामधील काही मुद्दे पुढीलप्रमाणे सांगितलेले आहेत.
“ आपल्या सर्व कृत्यांना आणि त्यांच्या बऱ्यावाईट परिणामांना आपणच जबाबदार असतो.
म्हणून आपल्या त्रासासाठी, दु:खासाठी, यातनांसाठी, वेदनांसाठी इतरांना जबाबदार धरून, त्यांना दोष देणे गैर आहे.
आपल्या कृत्यांची आणि त्यांच्या परिणामांची जबाबदारी फक्त आपलीच आहे. ती जबाबदारी आपल्यालाच घ्यायला हवी. झटकून टाकता येणार नाही. प्रत्येक नवा जन्म घेण्याआधी आपणच विशिष्ट परिस्थिती आणि विशिष्ट घटनांची निवड करीत असतो आणि त्यायोगे त्या आयुष्यामधे विशिष्ट ज्ञान प्राप्त करवून घेत असतो.
अगदी ‘ आपला जन्म कोठे व्हावा?, आपले आई वडील कोण असावेत?, इतर नातेवाईक कोण असावेत?’ ह्या गोष्टीही आपणच ठरवीत असतो. परंतु हे सत्य आपल्याला माहीत नसल्यामुळे, आयुष्य जगत असताना घडणाऱ्या अनुकूल गोष्टी आपल्याला, **‘ बक्षीस! ’** वाटतात आणि प्रतिकूल गोष्टी **‘ शिक्षा! ’** वाटतात.
आपल्या प्रत्येक कर्मावर आपले पूर्ण नियंत्रण असते. एखादे कर्म करणे किंवा न करणे हे आपल्या इच्छेवरच अवलंबून असते. परंतु ती इच्छा ही सुरू असलेल्या जन्मातीलच असेल असे सांगता येत नाही. अगोदरच्या जन्मातीलही असू शकेल.
फक्त त्याची जाणीव नसल्यामुळे आपण कर्माकडे नकारात्मक दृष्टिकोनातून पाहतो.
आपल्या बाबतीत जे काही घडते, त्यावर आपला ताबा नसतो असे समजतो.
आपला वैय्यक्तिक स्वभाव आपले कर्मच घडवतो आणि त्या स्वभावानुसारच आपली पुढील कर्मे घडून येत असतात.
ही सगळी प्रक्रिया मोक्ष मिळेपर्यंत चालूच राहते.”
हे सर्व मुद्दे, ‘ परमेश्वर लोकांचे कर्तृत्व, त्यांची कर्मे व कर्मफले निर्माण करीत नाही. तसेच कोणाचेही पाप किंवा पुण्य ग्रहण करीत नाही. ’ ह्या विधानाचे समर्थनच करतात. असो.

**ज्ञानेन तु तदज्ञानम् येषान् नाशितमात्मनः ।**
**तेषामादित्यवत् ज्ञानम् प्रकाशयति तत् परम् ।। १६ ।।**
**तद् बुद्धयस्तदात्मानः तन्निष्ठास्तत्परायणाः ।**
**गच्छन्त्यपुनरावृत्तिम् ज्ञाननिर्धूतकल्मषाः ।। १७ ।।**

परंतु ज्यांचे हे अज्ञान आत्मज्ञानाने नष्ट झाले, त्यांचे ते ज्ञान सूर्याप्रमाणे परमार्थतत्त्व प्रकाशित करते आणि त्या परमार्थतत्त्वातच ज्यांची बुद्धी रंगली, तेथेच ज्यांचे अंत:करण रमले, एकनिष्ठ व तत्परायण झाले, त्यांचे पाप ज्ञानाने नि:शेष धुतले जाऊन ते पुन्हा जन्मास येत नाहीत.

इतकी वर्षे होऊन गेली. पण सूर्याने अजून अंधाराला पाहिलेले नाही.

त्याला **निशा** किंवा **रजनी**, कधीही आणि कुठेही, दिसतच नाहीत. काळोख कसा असतो ते त्याला माहीत नाही.

कारण तो आला म्हणजे सर्वत्र प्रकाश पसरतो. त्याचा उदय होणे म्हणजेच अंधाराचा अभाव असणे होय आणि त्याचा अस्त होणे म्हणजेच अंधाराचा अभाव नसणे होय.

आत्मज्ञानाच्या बाबतीतही अशीच गोष्ट आहे. म्हणून आत्मज्ञानाला सूर्याची उपमा दिलेली आहे. आत्मज्ञानाचा उदय झाल्यावर माणसाच्या सर्व प्रकारच्या अज्ञानाचा अस्त होतो. जो आत्मज्ञानाशी सर्वार्थाने एकनिष्ठ राहतो, आत्मज्ञानाच्या रंगामधे रंगून जातो, त्याचे सर्वप्रकारचे पाप नाहीसे होते आणि त्याची जन्म मरणाच्या चक्रामधून कायमची सुटका होते.

**विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाके च पंडिता: समदर्शिन: ।। १८ ।।**
**इहैव तैर्जित: सर्ग: येषाम् साम्ये स्थितम् मन: ।**
**निर्दोषम् हि समम् ब्रह्म तस्मात् ब्रह्मणि ते स्थिता: ।। १९ ।।**

जे ज्ञानी झाले त्यांची दृष्टी विद्या व विनययुक्त ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाल ह्या सर्वांच्या ठिकाणी समान असते.

ह्याप्रमाणे ज्यांचे मन साम्यावस्थेत स्थिर झाले ते मरणाची वाट न पाहताच मृत्युलोक जिंकतात.

कारण ब्रह्म हे निर्दोष व सम आहे म्हणून ते पुरुष येथल्या येथेच ब्रह्मभूत झालेले असतात.

ज्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले त्यांचा विषमभाव म्हणजेच भेदभाव करण्याची बुद्धी पूर्णपणे नाहीशी होते. सर्व विश्वामधे एक परमात्मा सोडून इतर कोणाचीही सत्ता चालत नाही, ह्याची खात्री पटल्यामुळे, त्यांच्या मनामधे सर्व प्राणिमात्रांचे विषयी समान भावना उत्पन्न होते. ते कोणालाही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानत नाहीत. इतकेच नाही तर जेथे व्यावहारिक विषमता अनिवार्य असते तेथेही समत्व बुद्धीनेच पाहतात. ह्याचे उदाहरण सांगायचे झाले तर पुढील प्रमाणे सांगता येईल.

आपल्या शरीराला अनेक अवयव आहेत आणि त्यांचे प्रत्येकाचे कार्य वेगवेगळे आहे.

एका अवयवाचे काम दुसऱ्या अवयवाकडून करवून घेता येत नाही. ज्याचे जे काम असते तेच आणि त्यालाच करावे लागते.

जिभेला दिसू शकत नाही. कानांना बोलता येत नाही. डोळ्यांना ऐकायला येत नाही.

पायांना पदार्थाची चव कळत नाही. हातांना वास घेता येत नाही आणि नाकाला चालता येत नाही.

तरीही आपल्याला सर्व अवयवांविषयी सारखेच ममत्व असते. अमुक एक अवयव श्रेष्ठ म्हणून आवडता असणे आणि अमुक एक अवयव कनिष्ठ म्हणून नावडता असणे, असा भेदभाव कोणीही करीत नाही.

कोणालाही तसे करता येत नाही. करता येणारही नाही.

त्याचप्रमाणे आत्मज्ञानी माणूस, विविध प्राणिमात्रांमधे व्यावहारिक भेद असूनही, सर्व विश्वाकडे समत्व बुद्धीनेच पाहत असतो. अशी साम्यावस्था प्राप्त झाल्यावर तो सहजपणे परमेश्वररूप झाल्यासारखाच असतो. कारण परमेश्वराला कोणीही प्रिय किंवा अप्रिय नसतो. सगळे प्राणिमात्र त्यानेच निर्माण केलेले असतात. त्यामुळे त्याला सगळे सारखेच असतात.

**न प्रहृषेत् प्रियम् प्राप्य नोद्विजेत् प्राप्य चाप्रियम् ।**
**स्थिरबुद्धिरसंमूढ: ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित: ।। २० ।।**
**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत् सुखम् ।**
**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ।। २१ ।।**

प्रिय प्राप्त झाले असता आनंदून जाऊ नये आणि अप्रिय प्राप्त झाले असता खिन्नही होऊ नये. याप्रमाणे ज्याची बुद्धी स्थिर आणि जो मोह पावत नाही तोच ब्रह्मवेत्ता ब्रह्माचे ठायी स्थिर असतो. विषयोपभोगात ज्याचे मन आसक्त नाही त्या पुरुषालाच आत्म्यामधे जे काही सुख आहे ते मिळते आणि ब्रह्माशी युक्त झालेला असा तो पुरुष अक्षय सुखाचा आणि अक्षय आनंदाचा अनुभव घेतो.

जी गोष्ट मानवी शरीर, मन आणि बुद्धी ह्यांना अनुकूल असते तिला आपण **प्रिय** म्हणतो. ह्याउलट जी गोष्ट मानवी शरीर, मन आणि बुद्धी ह्यांना प्रतिकूल असते तिला आपण **अप्रिय** म्हणतो. ह्यापैकी प्रिय गोष्ट घडली असता जो आनंदित होत नाही आणि अप्रिय गोष्ट घडली तरीही दु:ख करीत नाही, त्याची बुद्धी स्थिर झालेली असते.

आपल्या पाच ज्ञानेंद्रियांचे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे जे विषय आहेत, त्यांना **बाह्यस्पर्श** म्हणतात.

आपण सगळे त्यांचा उपभोग सदैव घेतच असतो. खरे म्हणजे अशा भोगांमधे खरे सुख नसते तर केवळ सुखाचा आभास असतो. त्याच्या तुलनेमधे वैराग्याचे सुख मोठे असते आणि परमेश्वराविषयीच्या चिंतनामधे रममाण होण्यामधे जे सुख असते ते सर्वोत्तम असते. हे जो जाणतो तो पुरुष इंद्रिये आणि त्यांच्या द्वारे उपभोगायच्या बाह्य सुखाच्या बाबतीत नेहमी उदासीन असतो.

त्यालाच **अनासक्त** असे म्हणतात. अशा पुरुषालाच उपरती होऊन तो परमेश्वराच्या ध्यानामधे स्थिर होतो आणि त्यालाच परमानंद प्राप्त होतो. पराकोटीचा आनंद प्राप्त होतो. त्याला होणाऱ्या आनंदाला कसलीही सीमा नसते. कसलीही मर्यादा नसते.

तो अक्षय अशा आत्मसुखाचा प्रत्यक्ष अनुभव घेतो.

**ये हि संस्पर्शजा भोगाः दुःखयोनय एव ते ।**

**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥**

**शक्नोतिहैव यः सोढुम् प्राक् शरीरविमोक्षणात् ।**

**कामक्रोधोद्भवम् वेगम् स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥**

हे कौंतेया ! बाह्य पदार्थांच्या संयोगामुळेच उत्पन्न होणारे जे भोग त्यांस आदि व अंत असल्यामुळे ते दुःखाचेच कारण होत असतात म्हणून ज्ञानी पुरुष त्यांच्यामधे रमत नाही. जो शरीराचा नाश होण्यापूर्वीच कामक्रोधापासून उठणारा आवेग सहन करण्यास समर्थ होतो तोच मुक्त आणि तोच खरा सुखी पुरुष होय.

आपण इंद्रियांच्या द्वारे विषयांचा जो उपभोग घेतो, तो आपल्याला सुखकारक वाटतो.

म्हणूनच आपण विषयांचा परत परत उपभोग घेऊ इच्छितो.

असे असले तरीही ते सर्व भोग अनित्य म्हणजे थोड्या काळासाठीच असतात आणि शेवटी दुःखालाच कारण होत असतात.

पंच पक्वांनांचे सुग्रास भोजन पोटभर जेवले, म्हणजे आनंद होतो, समाधान मिळते, जेवणाऱ्याला तृप्त झाल्यासारखे वाटते.

परंतु ते समाधान त्या दिवसापुरतेच असते. दुसरा दिवस उजाडला की त्या सुखाची फक्त आठवण शिल्लक राहते.

ती आठवणच माणसाला उत्तेजित करायला लागते. अस्वस्थ करायला लागते.

' आजही कालच्यासारखेच जेवायला मिळावे.' अशी इच्छा निर्माण व्हायला लागते.

मग त्यासाठी धडपड करायला सुरवात होते. असे वारंवार घडत राहते.

विषयांना सुखकारक समजल्यामुळे त्यांना भोगण्याची इच्छा म्हणजेच कामना वाढीस लागते आणि त्यापुढील क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर ह्या विकारांची साखळी कार्यरत झाल्यामुळे परिणामी दुःखाचीच प्राप्ती होते.

सर्वसाधारणपणे पुरुषांच्यासाठी स्त्री, स्त्रियांच्यासाठी पुरुष आणि दोघांच्यासाठी घरदार, धनदौलत, पुत्र व कन्या, मानमरातब, प्रतिष्ठा इत्यादी गोष्टींच्या विषयी जन्मजात आसक्ती असते.

ही आसक्ती पूर्ण करण्याच्या प्रयत्नामधे सगळे आयुष्य संपून जाते. तरीही आसक्ती संपतच नाही. उलट वाढतच असते.

विशेष म्हणजे माणूस जेव्हा इतरांना आपल्यापेक्षा जास्त सुखात असलेले पाहतो, जास्त उपभोग घेत असलेले पाहतो, जास्त मौज, मजा, चैन करीत असलेले पाहतो, तेव्हा तो इतरांचा फारच मत्सर करायला लागतो.

आपल्याकडे असलेल्या गोष्टींचा उपभोग घ्यायचे विसरतो. समजा उपभोग घेतला तरीही त्याला त्यायोगे आनंद होत नाही.

समाधान मिळत नाही. तो आपल्याकडे नसलेल्या गोष्टींचाच विचार करीत राहून फार दुःखी होतो.

म्हणून ज्ञानी पुरुष त्यांच्या बाबतीत उदासीन असतात. तटस्थ राहतात.

जो मनुष्य ह्या कामक्रोधादि विकारांचे आवेग आणि त्यांची तीव्रता सहन करू शकतो, तोच खरा मुक्त आणि सुखी असतो.

**योऽन्तः सुखोऽन्तरारामः तथान्तर्ज्योतिरेव यः ।**

**स योगी ब्रह्मनिर्वाणम् ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥**

**लभन्ते ब्रह्मनिर्वाणम् ऋषयः क्षीणकल्मषाः ।**

**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥**

**कामक्रोधवियुक्तानाम् यतीनाम् यतचेतसाम् ।**

**अमितो ब्रह्मनिर्वाणम् वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥**

ह्याप्रमाणे जो अंतःकरणात सुखी झाला, जो अंतरातच आराम पावू लागला आणि ज्याला हा अंतर्प्रकाश मिळाला, तो योगी ब्रह्मरूप होतो आणि त्याला ब्रह्मनिर्वाणपद प्राप्त होते.

ज्यांची द्वंद्वबुद्धी सुटली, पापे नाहीशी झाली आणि जे आत्मसंयमाने सर्व भूतांचे हित करण्यातच रत झाले त्यांना हा ब्रह्मनिर्वाणरूप मोक्ष मिळत असतो.

कामक्रोधविरहीत, आत्मसंयमी व आत्मज्ञानसंपन्न असे जे यती, त्यांना सभोवताली ठेवल्याप्रमाणे म्हणजे बसल्या जागीच ब्रह्मनिर्वाणरूप मोक्ष मिळतो.
ब्रह्मनिर्वाणप्राप्ती ही मनुष्याची सर्वोच्च आणि अत्यंत विशेष, अत्यंत दुर्मिळ अशी अवस्था मानलेली आहे.
ज्ञानयोगी असला काय किंवा कर्मयोगी असला काय, ही अवस्था प्राप्त होण्यासाठी अनेक पूर्व जन्मांमधे तसेच ह्या जन्मामधे देखील साधना घडावी लागते. दोनही मार्गांचा शेवट एकच आहे.
अशा पुरुषाच्यासाठी दहाही दिशांमधे सर्वत्र केवळ नित्य आणि निरंतर असा एकमेव परमात्माच भरून राहिलेला असतो.
त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचीही, कोणत्याही प्रकारे सत्ता नसते.
असा ज्ञानरूपी प्रकाशाचा उदय झाल्यामुळे त्याच्या अंत:करणामधे थोडाही दोष नसतो. थोडेही पाप नसते.
त्याची द्वैत भावना पूर्णपणे नाहीशी झालेली असते.
त्याच्या मन आणि इंद्रियांचे इतस्तत: भरकटणे पूर्णपणे थांबलेले असते.
त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तो अत्यंत सुखामधे असतो. सदैव निखळ शांतीचा आणि समाधानाचा अनुभव घेत असतो.
केवळ कर्तव्य म्हणून तो फलाशाविरहित कर्म करीत असतो.
इतरांचे कल्याण करण्याच्या हेतूनेच कर्म करीत असतो. त्याला परमात्म्याचा साक्षात्कार झालेला असतो.
परमेश्वर आपल्याहून वेगळा नाही. तो आपल्यामधेच आहे ह्याचा सुस्पष्ट अनुभव आल्यामुळे, त्याला आपले आयुष्य जगत असतानाच, जिवंतपणीच मोक्षप्राप्त होतो. मोक्ष मिळावा म्हणून मरण येण्याची वाट पहावी लागत नाही. असो.
यापुढील तीन श्लोकांमधे ज्ञानी मनुष्य आपल्या मनाचे, बुद्धीचे आणि इंद्रियांचे नियमन कसे करतो, त्याविषयी थोडी माहिती सांगितली आहे. पुढील अध्यायामधे ज्या आत्मसंयमनाची किंवा ध्यानयोगाची सविस्तर चर्चा केलेली आहे, त्याची सुरवात येथे झालेली आहे.

**स्पर्शान् कृत्वा बहिर्बाह्यान् चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो: ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ।। २७ ।।**
**यतेंद्रियमनोबुद्धि: मुनिर्मोक्षपरायण: ।**
**विगतेच्छाभयक्रोध: य: सदा मुक्त एव स: ।। २८ ।।**
**भोक्तारम् यज्ञतपसाम् सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदम् सर्व भूतानाम् ज्ञात्वा माम् शान्तिमृच्छति ।। २९ ।।**

मोक्षाची उत्कट इच्छा करणारा, बाह्य विषयांना बाहेरच सोडून, दृष्टी भुवयांच्यामधे राखून आणि नाकातून वाहणारे प्राण आणि अपान सम करून, ज्याने इंद्रिये, मन व बुद्धी यांचे संयमन केले आणि जो इच्छा, भय व क्रोधविरहीत झाला तो मोक्षपरायण मुनी सदासर्वदा मुक्तच आहे. सर्व यज्ञ व तप यांचा भोक्ता, सर्व लोकांच्या ईश्वरांचाही ईश्वर आणि सर्व भूतांचा सखा असा जो मी, त्या मला याप्रमाणे जो ओळखतो तो माझा भक्त अक्षय शांती पावतो.
माणसाचे मन हे अत्यंत चंचल असते. ते एका जागी स्थिर रहातच नाही.
सारखे भटकत असते आणि आपली भटकण्याची सवय सोडू इच्छित नाही.
त्याला स्थिर ठेवायचा प्रयत्न करायला गेले तर ते आपल्यालाच फरफटत घेऊन जाते.
सर्व इंद्रिये मनाकडूनच नियंत्रित केली जात असल्यामुळे, ती देखील त्याला हवे तेव्हा, हव्या त्या विषयाकडे आकर्षित होतात.
त्यामुळे आपली बुद्धी देखील एका निश्चयावर स्थिर होऊ शकत नाही. ह्याचा अनुभव आपण सगळे नेहमीच घेत असतो.
मनाला ताब्यात ठेवणे खरोखरच महाकर्मकठीण आहे. त्यासाठी साधकाला फार फार प्रयत्न करीत राहवे लागते.
विवेक आणि वैराग्य ह्यांच्या जोरावर, सर्व बाह्य विषयांना आपल्या मनामधून बाहेर काढणे आणि मनाला त्यांचे स्मरण होऊ न देणे साधता आले पाहिजे.
डोळ्यांनी जे दिसेल ते सगळे पहात राहिले, कानांनी सगळे ऐकत राहिले, नाकाने सर्व प्रकारचे गंध घेत राहिले,
जिभेने नाना प्रकारच्या चवी घेत राहिले, तर आपल्या मनावर ताबा मिळविणे कधीही शक्य होणार नाही.
त्यासाठीच आपली दृष्टी भुवयांच्यामधे स्थिर करून त्यानंतर आपल्या श्वास आणि उच्छ्वास ह्यांच्याकडे लक्ष केंद्रित करून,
त्यायोगे इंद्रिये, मन आणि बुद्धीचे नियंत्रण करण्याच्या मार्गाचा उल्लेख केलेला आहे.
अशा प्रकारे ज्याने संयमन केले आणि जो कोणतीही इच्छा, भीती आणि राग ह्यांच्यापासून अलिप्त झाला,
तो पुरुष सदैव मुक्तच असतो. त्या माझ्या भक्ताला अपरंपार शांती प्राप्त होते. असे श्रीकृष्ण भगवान सांगत आहेत.
आपल्या श्वासाचा आणि आपल्या मनाचा फार जवळचा संबंध असतो बरे का!

ते एकमेकांचे फार जवळचे सहकारी आहेत. अगदी जीवश्च - कंठश्च मित्र आहेत.
त्या दोघांच्यापैकी **पहिला** ठीक आहे. पण **दुसरा** नाठाळ आहे.
**पहिला** आपल्याला समजतो, जाणवतो आणि कोठे असतो ते माहीत असते.
त्याचे नियमन करता येऊ शकते. काही काळ का होईना, थांबवता येऊ शकते.
त्याची गती कमी किंवा जास्त करता येऊ शकते.
पण **दुसरा** मात्र आपल्याला समजतच नाही. त्याचा ठावठिकाणा लागत नाही.
कसा आहे ते दिसत नाही. कोठे आहे ते कळत नाही.
तोच आपल्या साडे पाच, सहा फुट उंच देहाला सारखा नाचवितो.
सदैव बळजबरी करीत असतो. त्याला हवे असेल तेव्हा, हवे असेल तेथे, आणि हवे असेल तसेच वागायला भाग पाडतो.
पण जर आपण **पहिल्या** ची मदत घेतली तर, आपण **दुसऱ्या** ला समजावू शकतो.
थांबवू शकतो, वळवू शकतो, एकाजागी बसायला लावू शकतो. असो.

**येथे पांचवा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे कर्मसंन्यास आणि कर्मयोग ह्यांच्या विषयीचा अंतिम निर्णय दिलेला आहे.
आता अर्जुनाच्या शंकेचे पूर्णपणे निरसन झालेले आहे. त्याने यापुढे हा प्रश्न परत विचारलेला नाही.
ह्या दोनही मार्गांचे यथायोग्य आचरण करता यावे म्हणून माणसाने अगोदर आपल्या पाच ज्ञानेंद्रियांना, आपल्या मनाला आणि बुद्धीला स्वत:च्या नियंत्रणात आणणे अत्यंत आवश्यक असते.
त्यासाठी काय करायला पाहिजे ते सांगायला सुरवात केली.
पुढील अध्यायामधे इंद्रियांचे मनाचे आणि बुद्धीचे संयमन करण्यासाठी भगवान कोणते उपाय सांगतात ते पाहूया.
अस्तु!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। १८ - ७८ ।।**

## अध्याय सहावा

### — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या सहाव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे अर्जुनाने ' कर्मसंन्यास आणि कर्मयोग ह्या दोघांच्यापैकी माझ्यासाठी अधिक कल्याणकारक काय आहे?' असे विचारल्यावरून, श्रीकृष्णाने स्वत:चे निश्चित असे अंतिम मत सांगितले. निष्काम कर्मयोग हा कर्मसंन्यासाच्या तुलनेत आचरण्यास सोपा आहे आणि म्हणूनच श्रेष्ठ आहे असे सांगितले.

कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे वरवर वेगवेगळे भासत असले तरी तत्त्वत: ते एकच आहेत.

त्यांचे अंतिम ध्येय एकच म्हणजे मोक्षप्राप्ती हेच आहे. एकाच माणसाला वेगवेगळे लोक वेगवेगळ्या नांवानी हाक मारतात तसाच हा प्रकार आहे. नांवे वेगवेगळी असली तरीही माणूस तोच असतो. हाक मारणारा त्याच्याच जवळ जातो, हे सांगितले.

शिवाय संन्यासी झाला तरी त्याला कर्म करणे चुकत नाही. जो जिवंत आहे अशा कोणाही माणसाकडून कळत किंवा नकळत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, नाना प्रकारची कर्मे सतत घडून येत असतात. जर ही वस्तुस्थिती आहे तर मग आत्मज्ञान प्राप्त झालेले असूनही, ब्रह्मनिष्ठ असूनही, संन्यासयोगी म्हणजेच ज्ञानयोगी आपले प्राप्त कर्म कशा प्रकारे करीत राहतो आणि अंतिमत: त्याला कशाप्रकारे मोक्ष प्राप्ती होते ते सांगितले.

याउलट कोणताही सामान्य माणूस आपले कर्म करीत असताना, त्याच्या फलाचा त्याग करण्याचा सतत प्रयत्न करीत राहिला, आपले कर्तव्य निस्वार्थीपणाने पार पाडायला लागला, प्रत्येक कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करायला लागला, तर शेवटी त्यालाही आत्मज्ञान प्राप्त होऊन तो आपोआपच ब्रह्मनिष्ठ होतो आणि अंतिमत: त्याला देखील ज्ञानयोग्याच्या प्रमाणेच मोक्ष प्राप्ती होते हे सांगितले.

ह्या दोनही मार्गाच्या यथायोग्य आचरणासाठी, माणसाने अगोदर आपल्या इंद्रियांना, मनाला आणि बुद्धीला स्वत:च्या नियंत्रणात आणणे, स्वत:च्या ताब्यात ठेवणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी काय करायला पाहिजे ते सांगायला सुरवात केली.

आता त्या उपायांचे सविस्तर विवेचन करायला सुरवात होते आहे.

सहाव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे.

तो अर्जुनाला सांगतो आहे की,

**श्रीभगवानुवाच :**

**अनाश्रित: कर्मफलम् कार्यङ् कर्म करोति य: ।**

**स सन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रिय: ।। १ ।।**

**यम् संन्यासमिति प्राहु: योगन् तम् विद्धि पांडव ।**

**न ह्यसंन्यस्तसङ्कल्प: योगी भवति कश्चन ।। २ ।।**

कर्मफलाला आश्रय न देता म्हणजेच कर्मफलाची इच्छा न धरता, जो शास्त्राप्रमाणे करावयास योग्य असे कर्म करतो तोच खरा संन्यासी व योगी आहे. अग्निहोत्रादिक कर्मे सोडून देणारा किंवा कोणतेही कर्म न करता स्वस्थ बसणारा संन्यासीही नाही व योगीही नाही.

हे पांडवा ! ज्याला संन्यास असे म्हणतात तोच कर्मयोग असे समज. कारण संकल्पाचा त्याग न करणारा कोणीही पुरुष कर्मयोगी होत नाही.

आपण मागील सर्व अध्यायांमधे सारखे सारखे ऐकत आलो आहोत की, **' कर्मफलाचा त्याग करायचा! '**

पण म्हणजे नक्की काय करायचे? कशा कशाचा त्याग करायचा?

एखादे काम करून झाल्यावर, त्याचा मोबदला न घेणे, तशी अपेक्षाही न ठेवणे, हे पुरेसे नाही काय?

हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर समजून घेणेही गरजेचे आहे.

कारण भगवान पुढे जे काही उपाय करायला सांगणार आहेत, ते ज्या हेतूने करायचे आहेत, त्याची माहिती करून घ्यायलाच हवी.

' एखादे काम करून झाल्यावर त्याचा मोबदला न घेणे ' हा कर्मफलत्यागाचा एक भाग झाला.

परंतु पूर्ण कर्मफलत्याग अजून बाकी आहे. त्यासाठी अजून बरेच काही करायला हवे. बरेच काही सोडायला हवे.

आपण एक उदाहरण घेऊया. एक माणूस, दुसऱ्या एका माणसाविषयी, तिसऱ्या एका माणसाला सांगतो आहे की,

' तो चांगला माणूस आहे. मला फार आवडतो. त्याच्यावर वाईट परिस्थिती आली.

मला ते समजल्यावर फार वाईट वाटले. त्याची दया आली. मी लगेच त्याच्याकडे गेलो. त्याचे बरोबर बोललो.

चौकशी केली. काय करायला हवे ते समजून घेतले. त्याप्रमाणे सर्व गोष्टी केल्या आणि त्याला अडचणीमधून बाहेर काढला.
मी त्याच्याकडून एक पैसा पण घेतला नाही. तो माझा चांगला मित्र आहे!
आमची बऱ्याच वर्षांची मैत्री आहे, म्हणून त्याला मदत केली बरं का!'
वरील माहिती सांगणारा माणूस स्वभावाने चांगलाच असला पाहिजे. मनाने प्रेमळ असला पाहिजे.
इतरांच्या उपयोगी पडणारा असला पाहिजे. त्याशिवाय तो अशी मदत करणार नाही. त्याने मित्राकडून काहीही घेतले नाही.
काहीही मागितले नाही. कसलीही अपेक्षा बाळगली नाही. निरपेक्षपणे मदत केली. आपल्या मित्राकडून मोबदला घेतला नाही.
त्याने कर्मफलाचा त्याग नक्कीच केला. पण पूर्ण त्याग केलेला नाही. असे कशावरून म्हणायचे?
आपण त्याने सांगितलेली माहिती परत एकदा ऐकूया.
' तो **मला** आवडतो. तो **माझा** मित्र आहे. **मला** फार वाईट वाटले. **मला** त्याची दया आली. **मी** त्याच्याकडे गेलो.
**मी** त्याला अडचणीतून बाहेर काढला. **मी** त्याला मदत केली. **मी** त्याच्याकडून एक पैसापण घेतला नाही.'
येथे दया आहे. करुणा आहे. दु:ख आहे. तळमळ आहे. सौजन्य आहे. मित्राला मदत करायची इच्छा आहे. प्रामाणिकपणा आहे.
याशिवाय **' मी - माझा - मला - माझ्यामुळे '** अशी भावनाही ठासून भरलेली आहे.
नुसती भरलेली नाही तर भरून बाहेर सांडते आहे.
म्हणजेच सांगणाऱ्याच्या मनामधे अहंकार, आसक्ती, अभिमान, करुणा, दु:ख व देहाभिमान इत्यादी वासना आहेतच, शिवाय उपकार केल्याची सुप्त भावनाही आहे. भविष्यामधे त्याचा उपयोग करून घेता येईल अशी आशाही आहे.
ही गोष्ट तो ज्याला सांगतो आहे, त्याच्या तोंडून स्वत:ची स्तुती ऐकायची इच्छाही आहे.
**' कर्मफलामधे ह्या सर्व गोष्टी येतात.'** ह्या सगळ्याचा पूर्णपणे त्याग करता येणे अपेक्षित आहे.
तसे व्हायला हवे आणि त्यानंतरही **' इदं न मम!'** ही भावनाच शिल्लक राहिली पाहिजे.
' हे मी केलेले नाही. माझे कर्तृत्व नाही. हे परमेश्वराने माझ्याकडून करवून घेतले. तोच कर्ता करविता आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे.' हाच विचार मनामधे सतत आला पाहिजे. तरच **' कर्मफलाचा त्याग पूर्णपणे घडून आला.'** असे म्हणता येईल.
**' घडून आला '** असेच म्हणायचे. त्याला विशेष कारण आहे.
' कर्मफलाचा त्याग पूर्णपणे **केला.**' असे म्हटले तर त्यामधेही कर्त्याचा अहंकार डोकावतो. **' मी केला.'** ही अहंकाराची भावना दिसून येते आणि त्यामुळे निष्काम कर्माच्या संकल्पनेला बाधा येते. कर्म सकाम होते. आता ह्या सगळ्याचा नीट विचार करा.
म्हणजे मग, ' कर्मफलाचा पूर्ण त्याग करणे!' किती कठीण आहे ते आपल्या लक्षात येईल. कर्मयोगाचे आचरण करणे कठीणच आहे, परंतु नित्याच्या प्रयासाने आणि साधनेने ते जमू शकते. स्वत:च्या विचारांमधे बदल घडवून आणता येतो.
पुढे एक वेळ अशी येते की तो माणसाचा सहज स्वभाव होतो. सहज प्रवृत्ती होते. सगळे काही आपोआप घडत राहते.
त्यासाठी ठरवून काही करायला लागत नाही.
किंबहुना कर्मफलाचा त्याग सदैव केला जात असूनही, नेहमीच केला जात असूनही, कर्त्याला त्याची जाणीवही नसते. असो.
**साधना कशासाठी करायची?** -- स्वत:कडून निष्काम कर्म घडून येण्यासाठी.
**साधना कशाची करायची?** -- आपल्या इंद्रियांना, मनाला आणि बुद्धीला नियंत्रणात आणण्याची. त्यातही मन सर्वात महत्त्वाचे.
कारण बुद्धीचा निर्णय मनाला मान्य झाल्यावर, मनाच्या द्वारेच अमलात आणला जातो.
तसेच सर्व इंद्रिये ही मनाच्या नियंत्रणातच असतात. मनाच्या आदेशाप्रमाणेच कार्य करतात.
म्हणून आपल्या मनावर ताबा मिळविणे अत्यावश्यक, अत्यंत महत्त्वाचे आणि अतिशय कठीण आहे.

**साधना कशी करायची? कधी करायची? कुठे करायची?**

**समजा साधकाला योग्यप्रकारे साधना करता आली नाही किंवा काही कारणांमुळे साधना अर्धवट राहिली तर मग पुढे काय होईल?**

आपण ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे समजून घ्यायचा प्रयत्न करूया.
त्या साधनेलाच **आत्मसंयमयोग!, ध्यानयोग!, राजयोग!, अष्टांगयोग!** किंवा **पातंजलयोग!'** असे म्हणतात.
नांव कोणतेही दिले तरी चालेल. कारण त्यांचे अंतिम ध्येय एकच आहे.
' निष्काम कर्म करण्यासाठी स्वत:ची इंद्रिये, मन आणि बुद्धी ह्यांच्यावर पूर्ण ताबा मिळविणे.' हेच आहे. असो.

**आरुरुक्षोर्मुनेर्योगम् कर्म कारणमुच्यते ।**
**योगारूढस्य तस्यैव शम: कारणमुच्यते ।। ३ ।।**

**यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।**

**सर्वसङ्कल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ।। ४ ।।**

जो योगसिद्धी प्राप्त करू इच्छितो त्याला निष्कामकर्म हे साधन सांगितलेले आहे. तोच पुरुष योगारूढ झाला म्हणजे त्यास पुढे समत्वबुद्धी स्थिर राखण्यासाठी शांती हेच साधन होते असे म्हणतात. जेव्हा तो इंद्रियांच्या विषयांचे ठायी व कर्माचे ठायी आसक्त न होता, सर्व संकल्पांचा त्याग करतो तेव्हाच त्याला योगारूढ म्हणजे योग साध्य झालेला असे म्हणतात.

साधकाने प्रामाणिकपणे प्रयत्न करायला सुरवात केली तरच कर्मयोगाचे यथायोग्य असे आचरण घडू शकते.

त्यासाठी विशिष्ट पद्धतीने साधना करावी लागते. साधना करण्यासाठी घरदार सोडून वनवासी व्हायची गरज नाही.

नेहमीप्रमाणे समाजामधे राहून व सर्व व्यवहार सांभाळूनच साधना करता येते.

सनातन धर्मशास्त्रामधे त्यासाठी चार पायऱ्या सांगितलेल्या आहेत.

येथे कर्त्याला आपले कर्म उत्तम प्रकारे करता येत असणेच अपेक्षित आहे आणि आवश्यकही आहे.

अहो ऽऽ, स्वत:ला पोहायला येत नसताना, पोहायचे ज्ञान नसताना, साधना नसताना, जर एखाद्या बुडणाऱ्याला वाचविण्यासाठी म्हणून पाण्यामधे उडी मारली तर त्याचा काय उपयोग आहे? तसे करणे अपेक्षित नाही. असो.

अगोदर कर्म न करण्याचा विचार सोडून देऊन, सकाम का होईना, पण कर्म करायला सुरवात करणे.

ही कर्मयोगमार्गाची ' पहिली पायरी ' आहे.

नंतर कोणत्यातरी इच्छेने किंवा अपेक्षेने कर्म करायचे टाळून त्याऐवजी निरपेक्षपणे कर्म करणे.

ही कर्मयोगमार्गाची ' दुसरी पायरी ' आहे.

त्यानंतर आप - परभावाचा त्याग करून आणि सर्व प्रकारचा अहंकार सोडून देऊन केवळ स्वधर्म पालनाच्या हेतूने, केवळ कर्तव्य म्हणून, विहित कर्म करणे. ही कर्मयोगमार्गाची ' तिसरी पायरी ' आहे.

आणि अखेरीस **' इदं न मम!'** ह्याच भावनेशी स्थिर होणे, दृढमूल होणे, एकरूप होणे.

ही कर्मयोगमार्गाची ' चवथी पायरी ' आहे.

म्हणून सुरवातीला निष्काम कर्म हे साधन असते असे सांगितलेले आहे.

कालांतराने मन पूर्णपणे नियंत्रणात आल्यामुळे शांत होते. सर्व इच्छा-आकांक्षा नाहीशा होतात. सर्व भूतमात्रांविषयी समत्वबुद्धी उत्पन्न होते. मग सर्वांच्या बरोबर समान दृष्टीने पाहणे आणि समान भावनेने व्यवहार करणे हे आपोआपच घडून यायला लागते.

तसे ठरवून करावे लागत नाही. ह्यालाच निष्काम कर्मयोग सिद्ध झाला असे म्हणतात.

एकदा कर्मयोग सिद्ध झाला म्हणजे ही मनाची शांतीच, सर्वभूती असलेला समभाव, कोणत्याही परिस्थितीमधे स्थिर राहण्यासाठीचे साधन होते. अशा अवस्थेला पोहोचलेल्या माणसाला **योगारूढ** म्हणजे कर्मयोगावर स्वार झालेला असे म्हणतात.

ह्यापुढील दोन श्लोक अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामधे माणसाने आत्मोद्धारासाठी करावयाच्या प्रयत्नाविषयी म्हणजेच,

**' स्वावलंबन, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा आणि प्रयत्नशीलता.'** ह्या विषयांवर उत्कृष्ट भाष्य केलेले आहे.

यथायोग्य मार्गदर्शन केलेले आहे. आपण सर्वांनी त्यावर विचार केला पाहिजे असे मला मनापासून वाटते.

**उद्धरेदात्मनाऽत्मानम् नात्मानमवसादयेत् ।**

**आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः ।। ५ ।।**

**बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।**

**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ।। ६ ।।**

मनुष्याने आपण होऊन आपला उद्धार करावा. आपणच स्वत:ला कधीही खचवू नये आणि नाश करून घेऊ नये. प्रत्येक मनुष्य हा आपणच आपला बंधू किंवा आपणच आपला शत्रू म्हटला आहे. ज्याने आपणच आपल्याला, म्हणजे आपले मन, इंद्रिये आणि शरीर ह्यांना, जिंकले आणि स्वत:ला नीटपणे ओळखले तो स्वत:चा बंधू होतो. पण ज्याने तसे केलेले नाही, जो स्वत:ला नीटपणे ओळखत नाही तो स्वत:बरोबर शत्रूप्रमाणे वैर करतो.

**मुळामधे मनुष्याचा जन्म हा अत्यंत दुर्मिळ असतो.**

चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या फेऱ्यानंतर जीवाला मनुष्य योनीत जन्म मिळतो अशी ब्रह्मविद्याशास्त्राची मान्यता आहे.

मानवयोनी ही अशी एकमेव योनी आहे की जी विचार करू शकते. योग्य काय - अयोग्य काय, नैतिक काय - अनैतिक काय, पाप काय - पुण्य काय, ते ठरवू शकते. त्याप्रमाणे निर्णय घेऊन आपले वर्तन बदलू शकते.

आयुष्य जगत असताना पापसंचय कमी करून पुण्यसंचय वाढवू शकते.

मुक्ती म्हणजे जीवाची जन्म-मरणाच्या चक्रामधून सुटका होणे होय.
तसे घडून येण्यासाठी जी साधना करावी लागते, ती साधना माणूसच करू शकतो.
मुक्ती ही फक्त मानव योनीतच मिळविता येते. देव आणि राक्षस, यक्ष आणि गंधर्व ह्या योनींमधेही मुक्ती मिळत नाही.
म्हणूनच **' मानवजन्म हा अत्यंत दुर्लभ आहे.'** असे म्हटले जाते.
ब्रह्मविद्या असे सांगते की, कोणाही माणसाच्या मनामधे ज्यावेळी —
' आपण का जन्माला आलो? आपल्या जन्माचे आणि मृत्यूचे रहस्य कोणते? आपल्या जन्म परंपरेचे अंतिम ध्येय काय आहे?'
हे विचार सतत यायला लागतात आणि त्या दिशेने शोध घ्यायला सुरवात होते, त्यावेळी तो माणूस निवृत्तिमार्गाला लागला असे समजावे. चालू जन्मामधील, असे घडून येण्याच्या आधीचा सर्व काळ आणि मागील सर्व जन्म हे प्रवृत्तिमार्गावर चालण्यात गेलेले असतात. त्याचा हा जन्म परिवर्तनासाठी वापरला जातो आणि ह्याच्या पुढील सर्व जन्म हे त्याच्या निवृत्तिमार्गावरील विकासाच्या उपयोगी पडतात. अर्थात साधना ही ज्याची त्यालाच करावी लागते. एकाने केलेली साधना दुसऱ्याला उपयोगी होऊ शकत नाही.
व्यावहारिक बाजूने विचार केला तरीही, ' सत्कर्म करायचे की दुष्कर्म करायचे,' ह्याविषयी इतरानी कितीही सांगितले, कितीही योग्य असे मार्गदर्शन केले तरीही, शेवटी निर्णय हा ज्याचा त्यालाच घ्यावा लागतो.
कोणत्याही बाबतीत आपली बुद्धी जो निर्णय देते, तो ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये ह्यांच्याकडून, मनाच्या द्वारेच अमलात आणला जातो.
परंतु आपले मनच जर विकारांनी ग्रासलेले असेल तर ते बुद्धीचा निर्णय कधीही मानत नाही आणि विपरीत ते घडवून आणते.
पापी माणसाचे अंत:करणही त्याला ' पाप करू नकोस.' असेच सांगत असते.
तसेच पाप करून झाल्यावर, अपराध करून झाल्यावर, त्यालाही आपल्या कर्माचा पश्चात्ताप होत असतो. पण त्याच्या मनावर काम - क्रोध - लोभ - मोह - मद - मत्सर ह्या विकारांनी पूर्णपणे ताबा मिळविलेला असतो. त्याचे मन त्याच्या ताब्यात न राहता त्याच्यावर स्वामित्व गाजवीत असते. त्यामुळेच त्याच्याकडून पापांची मालिका घडत राहते.
' माणसाचे मन हे उत्तम नोकर आहे. परंतु त्याच बरोबर ते अत्यंत क्रूर मालकही आहे.' असे शास्त्रांनी सांगितलेले आहे. हे विधान सर्वांनी नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे. स्वत:च्या मनाला, आपला मालक होऊ देऊ नये.
उलट त्याला आपला नोकर करायचा प्रयत्न सदैव करीत रहावे. म्हणजेच त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा.
त्याला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करावा. त्याला योग्य दिशेला वळवायचा प्रयत्न करावा.
आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. कदाचित् आपण सर्वांनी तिचा, कधी ना कधी, अनुभव घेतलेला असू शकेल.
एखाद्या अट्टल चोरालाही, ' आपल्या मुलानेही चोरी करावी. त्यानेही आपल्याप्रमाणे अट्टल चोर व्हावे.' असे कधीही वाटत नाही.
त्याचा मुलगा खोटे बोलला, गैरवर्तन करायला लागला, अयोग्य प्रकारे वागला, तर तो देखील मुलाला रागावतो. शिक्षा करतो.
त्याने गैरवर्तन करू नये म्हणून शक्यते सर्व प्रयत्न करीत राहतो.
एखाद्या दुराचारी माणसालाही, महापापी माणसालाही, —
' आपल्या मुलांनी पाप करू नये. अपराध करू नये. चोरी करू नये. वाईट मार्गाला जाऊ नये. उलट, त्यांनी सदाचारी व्हावे.
प्रामाणिकपणे जगावे. सन्मानाने जगावे. लोकांनी त्यांना सज्जन म्हणूनच ओळखावे.' असेच वाटत असते.
ही वस्तुस्थिती आहे आणि हीच माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. मनामधे काम म्हणजेच कामना उत्पन्न होऊन, आपला प्रभाव दाखवायला सुरवात करण्या अगोदरची अवस्था आहे.
तिसऱ्या अध्यायामधे अर्जुनाने हा प्रश्न विचारलेला आहे.
' हे कृष्णा! माणूस स्वत:ची इच्छा नसतानाही जणू काही बलात्कार केल्याप्रमाणे, कुणीतरी जबरदस्ती केल्याप्रमाणे पापाचे आचरण का करतो?'
श्रीकृष्णाने त्याच्या प्रश्नाचे काय उत्तर दिले, ते आपण मागे पाहिलेले आहे.
काम म्हणजे कामना म्हणजेच इच्छा असणे वाईट नाही. किंबहुना माणसाला एका मर्यादेपर्यंत कामना असणे गरजेचे आहे.
कोणाही सर्वसामान्य माणसाला, ह्या कामनेमुळेच एखादे कर्म करण्याची प्रेरणा मिळते.
परंतु कामनांचा अतिरेक झाला म्हणजे मग सगळी गडबड होते.
भूक लागल्यावर काहीतरी खायची इच्छा होणे हे योग्य आहे. शरीरधारणेसाठी आवश्यकही आहे.
परंतु, भूक लागलेली नसताना, पोट भरलेले असताना आणि अजिबात गरज नसताना, सतत काहीतरी खात राहण्याची इच्छा होणे हे अयोग्य आहे. शरीरासाठी हानिकारक आहे. हा कामनेचा अतिरेक आहे. कामनांच्या अतिरेकाचे परिणाम निश्चितपणे वाईटच होतात.
कामना पूर्ण झाल्या तर अल्प काळ टिकणारा आनंद आणि त्यामुळे सुखावणारा अहंकार, कामना पूर्ण नाही झाल्या तर दु:ख आणि त्यामुळे इतरांचा मत्सर वाटायला लागणे, आपल्या कामना ज्यांच्यामुळे पूर्ण झाल्या नाहीत त्यांचा क्रोध येणे, त्यांचा सूड घेण्याची

भावना प्रबळ होणे, अशी एक साखळी निर्माण व्हायला सुरवात होते आणि ती कधी संपतच नाही.

माणसाच्या इच्छा - आकांक्षांना अंत नसतो. खास करून आपल्या जवळ नसलेल्या गोष्टीची आसक्ती प्रबळ होते. जवळ असलेल्या गोष्टीत समाधान वाटत नाही. जे जवळ आहे त्याचा उपभोग घेणे बाजूला राहते आणि जे जवळ नाही ते कसे प्राप्त करून घेता येईल ह्याचाच विचार करणे सुरू होते. त्यासाठी शक्य त्या सर्व मार्गांचा अवलंब करणे सुरू होते.

अनेकदा योग्य आणि अयोग्य, सत्य आणि असत्य, नैतिक आणि अनैतिक ह्याचा विचारही बाजूला पडतो. विवेक बाळगला जात नाही. हातून अयोग्य आणि अनैतिक गोष्टी घडून येतात व त्यांचे समर्थनही केले जाते. आपण जे काही केले ते बरोबरच केले असे वाटायला लागते. स्वत:मधे असलेले दोष हे स्वत:चे गुणच आहेत अशी समजूत व्हायला लागते.

ह्याविषयी समर्थ रामदासांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे. ते म्हणतात की,

**सकळ अवगुणांमध्ये अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।**

**मोठे पाप करंटपण । चुकेना की ।।**

एकदा हे चक्र सुरू झाले म्हणजे मग ते फिरतच राहते. कधीही थांबत नाही.

ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच सनातन धर्माने एक सूचना केली आहे.

**' जे कर्म करायचा विचार मनामधे आला असताना किंवा करीत असताना किंवा करून झाल्यावर, आपल्याला स्वत:चीच लाज वाटायला लागण्याची शक्यता असेल असे कर्म म्हणजेच असे कृत्य कधीही करू नये.'**

म्हणून स्वत:चा उद्धार करण्यासाठी, उत्कर्ष घडवून आणण्यासाठी प्रत्येकाने काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत आणि त्या आचरणात आणण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. तसे करणे आध्यात्मिक दृष्टीनेही आवश्यक आहे आणि व्यावहारिक दृष्टीनेही आवश्यक आहे. लक्षात असूद्या की, ' उच्च ध्येय, मग ते आध्यात्मिक असो किंवा व्यावहारिक असो, हे **कारण** आहे. सतत प्रयत्न करणे, कष्ट करणे हे **कार्य** आहे आणि ध्येयप्राप्ती व त्यायोगे मिळणारे सुख हा **परिणाम** आहे.'

स्वत:विषयी अतिविश्वास असणे जसे अयोग्य आहे तसेच स्वत:विषयी अविश्वास असणेही अयोग्यच आहे.

**अहंगंड** आणि **न्यूनगंड** हे दोन्हीही सारखेच त्रासदायक आहेत. त्यांना नेहमी दूर करावे. तसे करणेच माणसाच्या हिताचे ठरते.

आपल्या मनाशी एखादे उच्च ध्येय बाळगून, ते साध्य व्हावे म्हणून सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

त्यामधूनच ज्ञानप्राप्ती होते आणि ज्ञानामुळेच आत्मविश्वासही प्राप्त होतो. आत्मविश्वास हा सर्वात महत्त्वाचा असतो.

ज्याचा स्वत:वर विश्वास नाही त्याला काहीही साध्य करता येणार नाही. म्हणून माणसाने आपल्या मनाच्या सकारात्मक शक्तीचा पुरेपूर वापर केला पाहिजे. आपल्या मनाशी कोणते ना कोणते उत्तुंग आणि विशाल असे ध्येय बाळगले पाहिजे. त्या दिशेने सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे. यश किंवा अपयशाची भीती न बाळगता सतत परिश्रम करीत राहिले पाहिजे.

प्रयत्न करूनही एखाद्या कार्यामधे अपयश येणे हा अपराध नाही.

परंतु मनाशी कोणतेही ध्येय न बाळगणे हा फार मोठा अपराध आहे.

तसे करणे म्हणजे स्वत:च स्वत:ला खाली पाडून घेण्यासारखे आहे, अधोगतीला नेण्यासारखे आहे.

' माझ्या नशिबात असेल ते होईल.' असे म्हणून स्वस्थ बसणे किंवा, ' कोणीतरी येईल आणि मला मदत करील.' असे म्हणून, त्या **' कोणाचीतरी '** वाट पाहात राहणे चूक आहे. नेहमी स्वत:च प्रयत्न करीत रहावे. प्रयत्न करीत राहणे हेच माणसाच्या हातात असते. जर आपण नीट विचार केला आणि नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर कधीही अपयश येणार नाही.

परंतु जर प्रयत्न केलेच नाहीत किंवा योग्य दिशेने प्रयत्न केले नाहीत तर अपयशच येते.

मग जर अपयश आले तर ते नशिबावर का ढकलायचे बरे?

ज्याप्रमाणे यशाचे श्रेय आपण घेतो त्याचप्रमाणे अपयशाचे श्रेयही आपणच घ्यायला पाहिजे.

जो स्वत: प्रयत्न करीत राहतो, स्वत:च स्वत:ला मदत करीत राहतो, त्याला देवही मदत करतो. आनंदाने मदतीचा हात पुढे करतो.

**God helps them those who help themselves.** हे विधान प्रसिद्ध आहे.

जो तसे करीत नाही त्याला देवही मदत करीत नाही.

ह्याविषयी महाभारतामधील शांतिपर्वामधे युधिष्ठिराने, मृत्यूची वाट पाहात शरशैय्येवर पडलेल्या भीष्मांना एक प्रश्न विचारलेला आहे. तो विचारतो आहे की, ' पितामह ऽऽ! दैव आणि मानवाचा प्रयत्न ह्या दोघांत अधिक श्रेष्ठ काय आहे? ह्याविषयी आपण मला सविस्तरपणे सांगा.' त्याच्या ह्या प्रश्नाला भीष्माचार्यांनी दिलेले उत्तर सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

राजर्षी भीष्म काय म्हणतात ते नीट ऐका. ते म्हणतात की,

' राजा ऽऽ! बीजाशिवाय काहीही निर्माण होत नाही. बीजापासूनच बीजाची निर्मिती होते आणि बीजापासूनच फळही निर्माण होते.

शेतकरी शेतात ज्या तऱ्हेचे बी पेरतो, त्याच तऱ्हेच फळ त्याला मिळते.
ज्याप्रमाणे बी पेरल्याशिवाय शेत निष्फळ ठरते, त्याचप्रमाणे मानवाच्या प्रयत्नाशिवाय दैवालाही यश लाभत नाही.
पुरुषाच्या प्रयत्नाला क्षेत्र म्हणतात आणि दैवाला बीज म्हणतात. क्षेत्र आणि बीज ह्यांच्या योग्य अशा संयोगामुळेच पिकाची भरभराट होते. तसे घडले नाही तर पीक येणारच नाही. चांगल्या किंवा वाईट कृत्याचे फळ स्वतः कर्त्यालाच मिळालेले जगात प्रत्यक्ष दिसून येते. चांगल्या कर्मामुळे सुखाची प्राप्ती होते तर वाईट कर्मामुळे दु:खाची प्राप्ती होते.
माणसाला त्याने आचरलेल्या कर्माचेच फळ उपभोगायला मिळते. न केलेल्या कर्माचे फळ कधीही उपभोगायला मिळत नाही.
कर्म करणाऱ्यालाच सर्वत्र ऐश्वर्याचा आणि स्थैर्याचा लाभ होतो. कर्म न करणाऱ्याचा अध:पात होतो.
कर्म न करणाऱ्याला, केवळ दैवामुळे, कसलीही प्राप्ती होत नाही.
संपत्ती, मित्रगण, उच्चकुळाबरोबर येणारी समृद्धी व वैभव ह्याही गोष्टी प्रयत्न न करणाऱ्यांना उपभोगासाठी मिळणे कठीण आहेत.
पौरुषहीनाकडे, कार्य न करणाऱ्याकडे, क्रियाशील व शौर्यसंपन्न नसणाऱ्याकडे आणि तप न करणाऱ्याकडे संपत्ती टिकून रहात नाही.
**त्रिभुवनांची निर्मिती करणारा भगवान् विष्णूसुद्धा स्वतः समुद्रात तप करतो.**
स्वत:च्या कर्माचे फळ जर मानवाला मिळणार नसेल तर सर्वच गोष्टी निष्फळ होतील.
सर्व लोक केवळ दैवाकडे नजर ठेवून निश्चितपणे निष्क्रीय होतील.
मानवी कर्म न करता जो केवळ दैवाचीच कास धरतो त्याला कष्टच होतात.
मानवाने प्रयत्न केल्यावर तो दैवालाच अनुकूल होतो. प्रयत्न न करता दैव कोणालाही, कधीही, काहीही देत नाही.
दैवाचे कार्य सतत चालूच असते त्यामुळे दैव नसतेच असे कोणालाही म्हणता येणार नाही.
परंतू दैवाचे जे कार्य चालू असते ते देखील कर्मामुळेच निर्माण होते.
दैवयोगाने एखाद्याला प्रयत्न न करताच संपत्ती, समृद्धी व वैभव प्राप्त झाल्याचे दिसून येते.
परंतू ते देखील त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या अनेक जन्मांच्या कर्मसंचिताचेच फळ असते हेच सत्य आहे.
आपणच आपले बंधू म्हणजे सहाय्यक असतो आणि आपणच आपले शत्रूही असतो.
जे काही पुण्य किंवा पाप आपण करतो ते पाहणारेही आपणच असतो. त्यामधूनच दैवाचे कार्य सातत्याने चालू राहते.
आपण केलेले बरे-वाईट कर्म ह्यालोकी आणि परलोकीही सतत आपल्या बरोबरच राहते.
पाच इंद्रियांनी केलेले कर्म केव्हाही नाश पावत नाही. ती पाच इंद्रिये आणि सहावा आत्माही ते कर्म पहात असतो.
त्याची बरी-वाईट फळेही आपल्याला भोगावीच लागतात. त्याशिवाय कोणाचीही सुटका होत नाही.
कोणीही माणूस इतरांना फसवू शकतो. परंतू स्वत:लाच फसवू शकत नाही.
राजा ऽऽ! जगामधे केवळ पुण्यकर्मामुळेच सर्व गोष्टी साध्य होतात.
पुण्यकर्मे करणाऱ्या मानवाची भेट झाल्यावर दैव तरी त्याचे काय वाईट करणार?
ह्याउलट पापी मानवाची भेट झाल्यावर दैव तरी त्याचे काय भले करणार?
या जगामध्ये पापी माणसाला अत्यंत दुर्लभ अशा सर्व गोष्टी प्राप्त झाल्या तरीही, अमर्याद लोभ आणि मोहामुळे, तो त्यांना गमावून बसतो. अशा माणसाचा नाश त्याचे दैव घडवून आणीत नाही तर त्याचे कर्मच घडवून आणते.
कर्माशी संयोग झाल्यावर दैवाचाही योग्य विकास होतो आणि त्याचप्रमाणे कर्माचा नाश झाला तर दैवाचाही क्षय होतो.
कर्मशील माणसाला मिळालेल्या सर्व गोष्टींचा उपभोग घेता येतो. परंतु कर्महीन माणसाला सर्व गोष्टी मिळाल्या तरीही तो त्यांचा उपभोग घेऊ शकत नाही. कर्महीन माणसाला इहलोकात फळ मिळत नाहीच आणि परलोकातही मिळत नाही.
अयोग्य मार्गाला जाणाऱ्या माणसाला दैव त्यापासून दूर नेऊ शकत नाही. म्हणूनच दैव सामर्थ्यवान नसते.
ते नेहमी श्रेष्ठ कर्माच्या मागोमाग जाते. योग्य रितीने केलेला मानवी प्रयत्न, दैवाला ठिकठिकाणी हवे तसे घेऊन जातो.
म्हणून माणसाने सतत प्रयत्नशील असावे.
आपल्या कर्माने आणि शास्त्राने स्वत:चा उत्कर्ष घडवून आणावा आणि स्वर्गाची प्राप्ती करून घ्यावी.'
हे उत्तर म्हणजे वरील दोन श्लोकांचे गद्यामधे केलेले विस्तृत विवेचनच आहे.
ह्यावर अधिक काही बोलणे शक्य नाही आणि तशी गरजही नाही. असो.

**जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।**
**शीतोष्णसुखदु:खेषु तथा मानापमानयोः ।। ७ ।।**
**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ।। ८ ।।**

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ।**

**साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ।। ९ ।।**

ज्याने आपले अंत:करण जिंकले व ज्याला शांती प्राप्त झाली त्याचा परमात्मा शीतोष्ण, सुखदु:ख आणि मानापमान ह्यांच्या ठिकाणी सम राहतो. ज्याचा आत्मा ज्ञानाने व विज्ञानाने तृप्त झाला, ज्याने आपली इंद्रिये जिंकली, जो मुळास जाऊन पोहोचला आणि माती, दगड व सोने सारखेच मानू लागला त्या योगी पुरुषासच युक्त म्हणजे सिद्धावस्थेस पोहोचलेला असे म्हणतात. सुहृद, मित्र, शत्रू , उदासीन, मध्यस्थ, द्वेष करण्यास योग्य असा व आपले बंधुबांधव यांच्या ठायी आणि साधूंच्या व दुष्टांच्या ठायीही ज्याची बुद्धी सम झाली तोच पुरुष विशेष योग्यतेचा आहे असे म्हणायचे.

सातव्या श्लोकामधे **परमात्मा** असा शब्द आलेला आहे. तो परमेश्वराला उद्देशून आलेला नसून, आत्म्याला उद्देशूनच वापरलेला आहे. खरे म्हणजे परमात्मा हा जीवात्म्याहून निराळ्या स्वरूपाचा पदार्थ नसतो.

देहामधे असलेला जीवात्मा हा जरी परमेश्वराचा अंश असला तरीही, तो शरीर - इंद्रिये - मन - अहंकार ह्यांनी बद्ध झालेला असल्यामुळे सर्व प्रकारच्या उपाधींमधे गुंतून गेलेला असतो. जेव्हा साधकाकडून त्याचे शरीर, इंद्रिये आणि मन ह्यांच्यावर ताबा मिळवून त्याद्वारे सर्व उपाधींवर विजय मिळविला जातो, तेव्हा तोच जीवात्मा प्रसन्न होऊन परत आपल्या मूळ स्वरूपासारखाच होतो. असो.

**योगी युञ्जीत सततम् आत्मानम् रहसि स्थित: ।**

**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह: ।। १० ।।**

जो योगी आहे त्याने एकांतात एकटे राहून, चित्त व आत्मा आवरून, कोणतीही वासना न ठेवता, पाश सोडून सतत आपल्या योगाभ्यासास लागावे.

निष्काम कर्म करण्यासाठी माणसाने स्वत:ची इंद्रिये, मन आणि बुद्धी ह्यांच्यावर पूर्ण ताबा मिळविणे अत्यावश्यक आहे.

तसेच अगोदर त्यासाठी योग्य अशी साधना करावी लागते.

आता ती साधना कशी करायची त्याविषयीचे मार्गदर्शन करायला सुरवात होते आहे.

येथे एक गोष्ट महत्त्वाची आहे. ती म्हणजे, येथे ध्यानयोग हे साध्य म्हणून सांगितलेले नसून साधन म्हणून सांगितलेले आहे. निष्काम कर्मयोग हेच साध्य असून, त्यासाठी आवश्यक असणारी साम्यबुद्धी प्राप्त करून घेण्यासाठी, केवळ एक साधन म्हणून पातंजलयोग वर्णिलेला आहे. अर्जुनाने आपले विहित कर्म करायचे सोडून, उरलेले आयुष्य ध्यानयोगाच्या साधनेत घालवावे असा श्रीकृष्णाचा हेतू नाही.

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मन: ।**

**नात्युच्छ्रितन् नातिनीचम् चैलाजिनकुशोत्तरम् ।। ११ ।।**

**तत्रैकाग्रम् मन: कृत्वा यतचित्तेंद्रियक्रिय: ।**

**उपविश्यासने युञ्ज्यात् योगमात्मविशुद्धये ।। १२ ।।**

शुद्ध भूमीवर दर्भासन घालून, त्यावर मृगाचे कातडे आणि त्याच्याही वर वस्त्र घातलेले, फार उंच नाही आणि फार सखलही नाही असे आपले आसन स्थिर मांडून, तेथे चित्त व इंद्रियांचे व्यापार आवरून धरून आणि मन एकाग्र करून, आत्मशुद्धीसाठी आसनावर बसून योगाचा अभ्यास करावा.

जेथे ध्यान - धारणेच्या अभ्यासासाठी बसायचे आहे ती जागा कशी असली पाहिजे? आणि —

स्थिरपणे बसण्यासाठी त्या जागेवर आसन कशाप्रकारचे असले पाहिजे? ह्या दोन मुद्यांचे स्पष्टिकरण येथे दिलेले आहे.

**<u>ज्ञानेश्वरी</u>** मधे ह्याविषयी सविस्तर माहिती सांगताना ज्ञानेश्वर महाराजांनी **३८** ओव्या रचलेल्या आहेत.

त्या ओव्या वाचताना आपल्याला ती जागा दिसायला लागते. तिची शुद्धता आणि पवित्रता जाणवायला लागते.

‘ आसन रचण्यापूर्वी त्या जागेवर आपले मन स्थिर राहते की नाही ते पहावे आणि राहात असेल तरच तेथे आसन लावावे.’ अशी त्यांनी केलेली आग्रहाची सूचनाही समजते. त्या जागेवर रचलेले आसन कसे असेल त्याचीही कल्पना करता येते.

तशा जागेच्या केवळ कल्पनेनेही मनाला आनंद होतो. काही काळासाठी का होईना, पण आपले मन स्वच्छ होते.

शुद्ध होते. पवित्र होते. परंतु येथे माझ्या मनामधे एक प्रश्न निर्माण होतो.

आज आपण सगळे जेथे राहतो आणि ज्या परिस्थितीमधे राहतो तेथे, ध्यान - धारणेला बसण्यासाठी कोणालाही अशी जागा मिळणे शक्य आहे काय?

म्हणजे एखाद्या आडवाटेच्या खेडेगावामधे कदाचित मिळू शकेल. पण शहरामधे मिळणे जवळ जवळ अशक्य आहे.

अहो ऽऽ, आपल्याच घरामधे, ‘ आता पाच मिनिटें शांत बसूया.’ असे ठरविले तरीही ते शक्य होत नाही.

तेवढ्यात काहीतरी होतेच. कोणीतरी येतो, कुकरची शिट्टी वाजते, दरवाज्याची बेल वाजते, टेलीफोन वाजतो, मोबाईल वाजतो.
अगदी पहाटे चार वाजता ब्राह्म मुहूर्तावर उठले तरीही रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांचा आवाज येतोच.
ते टाळता येतच नाही. ह्या सर्व गोष्टी आपल्या हातात नसतात. आपल्याला थांबवता येत नाहीत.
मग आपण करायचे काय? ध्यानसाधनेला कुठे बसायचे? ह्याचे उत्तर एकच आहे. ते म्हणजे, ' आपणच दिवसभरातली त्यातल्या त्यात कमी आवाज होणारी वेळ आणि आपल्याच घरातली स्वत:ला त्यातल्या त्यात अनुकूल वाटणारी, सुखावह वाटणारी, इतरांना वावरताना आपला अडथळा न होणारी आणि शक्यतो देवपूजेच्या जागेजवळ असणारी अशी जागा निश्चित करायची आणि तेथे साधी चादर पसरून, त्यावर स्वत:ला सुखावह असेल त्या स्थितीत बसायचे.' आता जागा ठरवली आणि तेथे चादर पसरली.
पण चादरीवर साधना करायला कसे बसायचे? साधी मांडी घालून बसलेले चालेल का?
ते पुढच्या श्लोकामधे सांगितले आहे आणि ते फार महत्त्वाचे आहे.

**समङ् कायशिरोग्रीवम् धारयन्नचलम् स्थिर: ।**
**सम्प्रेक्ष्य नासिकाग्रम् स्वम् दिशश्चानवलोकयन् ।। १३ ।।**

पाठ, डोके व मान ही उभी सरळ रेषेत निश्चल धारण करून, स्थिर होऊन, सभोवार न बघता, आपल्या नाकाच्या शेंड्यावर नजर ठेवून, —
बसताना कोणत्या आसनामधे बसायचे ते सांगितलेले नाही. परंतु कसे बसायचे ते सांगितलेले आहे. जे सहज घालता येईल, जे सुखावह असेल, ज्याने शरीराला वेदना होणार नाहीत आणि स्थिरपणे दीर्घ काळ बसता येईल, असे कोणतेही आसन चालेल.
असे आसन घालून बसताना ' **काय** म्हणजे कंबरेपासून खांद्यापर्यंतचा भाग, **ग्रीव** म्हणजे मान आणि **शिर** म्हणजे मस्तक हे तीनही भाग, **समम्** म्हणजे उभ्या सरळ रेषेत ठेवून स्थिर व्हायचे. त्यानंतर **स्वम्** म्हणजे स्वत:च्या, **नासिकाग्रम्** म्हणजे नाकाच्या शेंड्यावर, **संप्रेक्ष्य** म्हणजे दृष्टी ठेवून बसायचे. **दिश:** म्हणजे इतरत्र किंवा इकडे तिकडे, **अनवलोकयन्** म्हणजे पहायचे नाही.'
असे बसता येण्यासाठीही साधना करावी लागते. नाही तर ते शक्य होणार नाही.
परंतु योग्य गुरूच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे प्रयत्न करीत राहिले तर काही काळाने स्थिर आसनामधे बसता येऊ शकते.
ही झाली शरीराची अवस्था. आता मनाची अवस्था कशी असावी ते पुढे सांगितले आहे.

**प्रशान्तात्मा विगतभी: ब्रह्मचारिव्रते स्थित: ।**
**मन: संयम्य मच्चित्त: युक्त आसीत मत्पर: ।। १४ ।।**
**युञ्जन्नेवम् सदाऽऽत्मानम् योगी नियत मानस: ।**
**शान्तिन् निर्वाणपरमाम् मत्संस्थामधिगच्छति ।। १५ ।।**

भीती न बाळगता, शांत अंत:करणाने, ब्रह्मचर्यव्रत पाळून व मनाचे संयमन करून, चित्त माझ्याच ठिकाणी लावून, मत्परायण होऊन बसावे. ह्याप्रमाणे सदा आपला योगाभ्यास चालू ठेवल्याने आणि आपल्या मनाला ताब्यात ठेवल्याने, योग्यास माझ्या ठायी असणारी व शेवटी माझ्या स्वरुपात लय करवून देणारी शांती प्राप्त होते.
ब्रह्मचारी व्रताचे पालन करणाऱ्या, कोणत्याही प्रकारचे भय न बाळगणाऱ्या, अंत:करण शांत असणाऱ्या अशा योग्याने आपल्या मनाला आवरून, माझ्या ठिकाणी लावून, माझ्यामधेच संतुष्ट होऊन रहावे.
मनाची अशी भयमुक्त, शांत आणि संयमी अवस्था येण्यासाठीच साधना करावी लागते. ह्या साधनेला कालमर्यादा नाही.
ही बाब पूर्णपणे व्यक्तिसापेक्ष असते. प्रत्येक माणसाच्या प्रकृतिस्वभावावर अवलंबून असते आणि माणसागणिक बदलते.
ज्ञानेश्वर महाराजांना वयाच्या सोळा - सतराव्या वर्षी संपूर्ण अष्टांगयोग साध्य झालेला होता.
ते महायोगीच होते ह्यामधे संशय नाही. परंतु त्यामागे, मागील अनेक जन्मांत घडलेल्या साधनेचा आधार होता.
एके ठिकाणी त्यांनीच तसे सांगितलेले आहे.

**बाळछंदो बावीस जन्में । तोडिली भवाब्धीची कर्में ।।**

त्यांना देखील अगोदरचे बावीस जन्म साधना केल्यानंतर, तप केल्यानंतर, पुढचा तेविसावा जन्म ' **संत ज्ञानेश्वर** ' म्हणून मिळाला असावा. जरा विचार करा —
वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी **ज्ञानेश्वरी** ची रचना करायला सुरवात केली.
वयाच्या एकोणिसाव्या वर्षी **ज्ञानेश्वरी** पूर्ण केली.
त्यानंतर निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून **अमृतानुभव** ह्या ग्रंथाची रचना केली.
**चांगदेवपासष्टी** आणि इतर अनेक **अभंगांची** रचना केली. आणि —

वयाच्या बाविसाव्या वर्षी आळंदीला **संजीवन समाधी** घेतली.

मानवी जीवनामधील असे एकही क्षेत्र नाही किंवा असा एकही अनुभव नाही की जो ज्ञानेश्वरीमधे आलेला नाही.

एक एक मुद्दा पटवून सांगताना, त्यांनी एकापाठोपाठ एक सलग दहादहा - बाराबारा उदाहरणे दिली आहेत.

अनेक सुंदर सुंदर आणि यथायोग्य उपमा दिलेल्या आहेत. त्यासुद्धा अगदी आपल्या रोजच्या व्यवहारातल्या, साध्या सोप्या, कोणालाही लगेच पटतील अशाच उपमा दिलेल्या आहेत. कमाल आहे! खरोखर कमाल आहे!

त्याविषयी विचार करायला लागले तर आपली बुद्धी काम करीत नाहीशी होते.

त्यांची भाषासुद्धा किती गोड आहे! किती रसाळ आहे! किती लडिवाळ आहे! जुने मराठी असल्यामुळे, बरेच वेळा ओव्यांचा अर्थ कळत नाही. परंतु ओव्या म्हणताना जिभेला आणि ऐकताना कानांना विलक्षण गोडवा जाणवतो.

त्यांनी काव्यामधे अनेक ठिकाणी उकाराचा मुक्तपणे उपयोग केलेला आहे. त्यामुळेही ओव्यांच्या गोडीत वाढ होते.

उदाहरण म्हणून सर्वांना माहीत असलेली पुढील एकच ओवी पाहूया.

**देवा तूंचि गणेशु । सकलमतिप्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ॥ १ - २ ॥**

येथे पहिल्या तीनही पादांचा शेवट उकाराने होतो आहे. तो जर अकाराने केला आणि —

**देवा तूंचि गणेश । सकलमतिप्रकाश ।**
**म्हणे निवृत्तिदास । अवधारिजो जी ॥**

असे म्हटले तर अर्थ तोच राहतो पण ओवीची गोडी कमी होते. आपण तसे म्हणून पहा म्हणजे आपल्यालाही ते समजेल.

ज्ञानेश्वरीमधे अशा अनेक म्हणजे दोन हजाराहून अधिक ओव्या आहेत.

इतक्या लहान वयामधे इतके अगाध ज्ञान कोठून आले? कसे काय आले?

खरोखरच **' संत ज्ञानेश्वर आणि त्यांची ज्ञानेश्वरी '** म्हणजे सर्वकालीन चमत्कार आहे. **( All Time Miracle.)**

सांगायचा मुद्दा इतकाच की साधकाने यथाशक्ती अभ्यास करीत राहिले पाहिजे. प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

मनाला ताब्यात आणणे फार कठीण आहे. समजा ताब्यात आणले तरी त्याला सतत ताब्यात ठेवणे त्याहून कठीण आहे.

त्यामुळे ते शक्य होईल की नाही? झाले तर कधी होईल? त्यासाठी किती काळ लागेल?

ह्याविषयी निश्चितपणे काहीही सांगता येणार नाही.

ह्या दोन श्लोकावरती भाष्य करताना ज्ञानेश्वर महाराजांनी **१३४** ओव्या रचलेल्या आहेत.

त्या ओव्या मी अनेक वेळा वाचल्या. मला ओव्यांचा अर्थ समजला नाही.

मग **' परमपूज्य गुरुवर्य प्राध्यापक सोनोपंत ऊर्फ मामासाहेब दांडेकर '** ह्यांनी संपादित केलेली ' **सार्थ ज्ञानेश्वरी.**' वाचायला सुरवात केली. तीमधे त्यांनी प्रत्येक ओवीचा अर्थ स्पष्ट करून सांगितलेला आहे.

त्यामुळे ओव्यांचा शब्दशः अर्थ समजला परंतु अर्थाचे आकलन झाले नाही. विशेष म्हणजे —

**' कुंडलिनी जागृत होत असताना आणि ती जागृत झाल्यानंतर सुषुम्नामार्गाने हृदयात अनाहत चक्रात येऊन, चैतन्याला आपले तेज अर्पण करून लय पावते.'** तोपर्यंत जे काही होते त्याविषयी आणि त्यानंतर साधकावर त्याचे जे परिणाम होतात त्याविषयी, पुसटशी कल्पना करणेही शक्य झालेले नाही. अजूनही झालेले नाही.

कितीही विचार केला, चिंतन केले, मनन केले तरीही त्याचा उपयोग होत नाही.

मी कोरडाच राहतो. तहानलेलाच राहतो. भुकेलेलाच राहतो.

ते समजण्याची माझी पात्रता नाही, माझी तितकी योग्यता नाही हेच खरे.

हे म्हणजे पहिल्या इयत्तेतल्या मुलाने, बारावीचा धडा वाचण्यासारखे होत आहे.

ज्ञानदेवांनी जे सांगितले आहे ते समजलेले, त्याचे आकलन झालेले, इतकेच नाही तर कदाचित् त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले असे अनेक योगीजन आजही आपल्या समाजामधे असतील. **त्या सर्वांना माझा नमस्कार असो!**

पण मग आपण सामान्य माणसानी काय करायचे?

ध्यानयोगाची साधना करायची की नाही? निदान प्रयत्न तरी करीत रहायचे की नाही?

ह्याचे उत्तरही त्यांनीच दिलेले आहे. ( अध्याय १८ - ओव्या १७०७ ते १७२२ )

अर्थात ' ज्ञानेश्वरीची रचना करून त्याद्वारे मूळ संस्कृत भाषेत असलेल्या गीतेचा अर्थ मराठी भाषेमधे आणणे.' ह्या संदर्भामधे त्यांनी त्या ओव्या सांगितलेल्या आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. मग ते उत्तर म्हणजे त्यांचा अंगभूत विनय आहे असेच जाणवते.

**राजहंसाचे चालणे । भूतळी जालिया शाहाणे ।**
**आणिके काय कोणे । चालवेचिना ।। १८ - १७१३ ।।**

अर्थ — अहो ऽऽ, राजहंसाचे चालणे जगामधे सर्वात उत्तम ठरले, डौलदार ठरले, आकर्षक ठरले, म्हणून ह्या पृथ्वीवर इतर कोणी चालायचेच नाही काय?

चालायचे तर! जसे जमेल तसे चालायचे! जितके जमेल तितके चालायचे! प्रयत्न करायला काय हरकत आहे?
पडायला झाले तर परत उभे रहायचे! परत प्रयत्न सुरू करायचे. तो अधिकार तर प्रत्येकालाच आहे.

**उद्धरेदात्मनाऽत्मानम् नात्मानमवसादयेत् ।**

आपला उद्धार आपणच करून घ्यायचा. नाउमेद व्हायचे नाही. मनाशी तेच ध्येय बाळगून प्रामाणिकपणे प्रयत्न करीत राहायचे.
सतत प्रयत्न करीत राहायचे. त्यामधे कमी पडायचे नाही. असो.
आता महायोगी ज्ञानेश्वर महाराजांना नमस्कार करून, आपण मूळ श्लोकाकडे वळूया!
अशा प्रकारे साधना करीत राहून जो योगी आपल्या मनाला ताब्यात ठेवतो, त्याला माझ्या ठिकाणी असणारी आणि अखेरीस माझ्याशीच एकरूप करणारी परम शांती प्राप्त होते.
पातंजलयोगामधे म्हणजेच अष्टांगयोगामधे साधनेच्या आठ पायऱ्या सांगितलेल्या आहेत.
**' यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी '** ह्या त्या आठ पायऱ्या होत.
प्रत्येक पायरीवर चढण्यासाठी आणि तेथे स्थिर राहण्यासाठी, काय करायचे तेही सांगितलेले आहे.
महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या पायऱ्या क्रमानेच चढायच्या आहेत.
**यम** म्हणजे समाजामधे वावरताना पाळायची बंधने.
**नियम** म्हणजे स्वत:च्या जीवनामधे व्यक्तिगत विकास होण्यासाठी पाळायची बंधने.
**आसन** म्हणजे शरीराची विशिष्ट प्रकारची स्थिती.
**प्राणायाम** म्हणजे श्वास आणि उच्छवासाच्या क्रियेमधील अंतराचे नियमन करणे.
ह्या पहिल्या चार पायऱ्यांना **' बहिरंग योग '** असे म्हणतात आणि त्याचा अभ्यास प्रामुख्याने शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी केला जातो. तसेच ह्या पायऱ्या म्हणजे पुढील पायऱ्या चढण्यासाठी करायची पूर्वतयारी आहे.
यापुढील चार पायऱ्यांना **' अंतरंग योग '** असे म्हणतात आणि त्याचा अभ्यास आध्यात्मिक प्रगतीसाठी केला जातो.
**प्रत्याहार** म्हणजे आपली सर्व इंद्रिये, त्यांच्या विषयांपासून विलग करणे.
**धारणा** म्हणजे आपले मन एकाच विशिष्ट विषयावर केंद्रित करणे आणि तेथेच स्थिर करणे. मनाला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे जाऊ न देणे. परंतु —
**ध्यान** म्हणजे नक्की काय बरे? मला माहीत नाही.
**समाधी** म्हणजे नक्की काय बरे? मला माहीत नाही.
आतापर्यंत बरेच वाचन केले. अनेक अनुभवी व्यक्तींच्या बरोबर चर्चा केल्या. त्यांचे मार्गदर्शनही मिळाले.
यथाशक्ती अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न केला. पण फारसे यश आलेले नाही. ध्यान ही सातवी पायरी आहे.
समाधी ही ध्यानाच्या पुढची म्हणजे आठवी पायरी आहे. अष्टांगयोगामधील शेवटची पायरी आहे.
त्यामुळे त्याविषयी तर बोलायलाच नको.
आजपर्यंत अनेक योग्यांनी, तज्ञांनी आणि ज्ञानी माणसांनी आपापल्या अनुभवाप्रमाणे ध्यानाचा अर्थ सांगितलेला आहे.
वेगवेगळ्या व्याख्याही केलेल्या आहेत. परंतु अखेरीस त्यांनीही स्पष्टपणे सांगून ठेवलेले आहे की,
**' ध्यानाची परिपूर्ण व्याख्या करणे अजून कोणालाही शक्य झालेले नाही.'**
ध्यानाविषयीच्या माझ्या वाचनात आलेली काही विधाने पुढील प्रमाणे —
१) ' मी ब्रह्म आहे!' असे अखंड चिंतन करणे म्हणजे ध्यान.
२) राग, लोभ, मोह, मद, मत्सर आणि भय ह्या विकारांचा संपूर्णपणे अभाव होणे, नाश होणे म्हणजे ध्यान.
३) ज्या ठिकाणी धारणा केलेली असेल त्या ठिकाणी एकरूप होणे, अनुभव घेणे, प्रत्ययाची एकतानता साधणे म्हणजे ध्यान.
४) ' ध्येय वस्तूच्या ठिकाणी तद्रूपतेचा प्रत्यय घेणे.' हेच एकमेव लक्ष्य असलेला बुद्धीचा सलग प्रवाह म्हणजे ध्यान.
५) ध्येय विषय सोडून दुसऱ्या कोणत्याही पदार्थाला न जाणणे, सदैव केवळ ध्येय विषयच पहात राहणे, त्याचेच स्मरण, मनन व चिंतन करणे म्हणजे ध्यान.

६) ज्या वस्तूवर चित्ताची धारणा केलेली असेल तेथेच त्याची एकतानता होऊन ती दीर्घकाळ टिकून राहणे म्हणजे ध्यान.
७) मनाला स्वत:च्या अस्तित्वाचा पूर्णपणे विसर पडणे म्हणजे ध्यान.
८) सर्व प्रकारच्या आसक्तीचा, अगदी स्वत:विषयीच्या आसक्तीचाही, संपूर्णपणे लय होणे म्हणजे ध्यान.
९) ध्यान हे एक महातत्त्व आहे. त्याचे अवतरण होते. त्याला जबरदस्तीने आणता येत नाही. माणसाला परमेश्वरावर ' कृपा करण्याची सक्ती ' करता येत नाही. तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाच्या मुखामधे, कोणतीही शक्यता नसताना आणि अपेक्षाही नसताना, अचानकपणे थंडगार, मधुर पाण्याची धार पडावी, त्याप्रमाणेच ध्यानाचे अनपेक्षितपणे अवतरण होते.
१०) ध्यान म्हणजे परतत्त्वाचा स्पर्श आहे. **( Divine Touch )** तो सगळ्यांना होत नाही. त्यासाठी सतत साधना करावी लागते, पूर्वसुकृतही असावे लागते आणि बलवत्तर दैवयोगही असावा लागतो.
११) आपले मन आणि आपला श्वास हे परस्परांचे जिवलग मित्र आहेत. तसेच ध्यान आणि मौन हे सुद्धा परस्परांचे जिवलग मित्र आहेत. मनावर ताबा मिळवायचा असेल तर अगोदर आपल्या श्वासावर ताबा मिळवायची साधना करावी. तसेच ध्यान लागावे असे वाटत असेल तर, केवळ वाणीनेच नाही तर मनानेही, मौन पाळायची साधना करावी. इतरांचे बरोबर बोलणे टाळावेच पण शक्य होईतोवर स्वत:शी बोलणेही टाळावे.
१२) ओंकाराचा **( ॐ )** जप हा ध्यानासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्याच्याशी पूर्णपणे एकरूप होऊन जप करायची साधना केली, तर नकळत ध्यान लागते.
१३) पाणी आणि बर्फ ह्यांच्यामधे जो फरक आहे तोच फरक ज्ञान आणि ध्यान ह्यांच्यामधे आहे. जे सैल व अनेकाग्र असते ते ज्ञान. जे घट्ट व एकाग्र असते ते ध्यान. ज्ञानाला घनता आली म्हणजे ध्यान होते.
१४) ध्यान ही जादू नाही. ध्यान हा साधकाच्या अंतर्बाह्य शुचितेचा सहज परिणाम आहे. अत्यंत नैसर्गिकपणे घडून येणारा आणि घडून आल्यावरच समजणारा असा परिणाम आहे.
१५) कोणाही गुरूला ध्यानाची पद्धत शिकवता येते, परंतु ध्यान हे शिकवता येत नाही. ते संपूर्णपणे व्यक्तिगतच असते. जर पात्रता असेल तरच ध्यान लागेल. म्हणून आपली पात्रता वाढविण्यासाठीच सतत साधना करायची असते.
१६) स्वत:चा शोध घेणे, स्वत्वाचा शोध घेणे, सत्याचा शोध घेणे, हेच ध्यानाचे प्रयोजन आहे. त्यासाठी अगोदर ध्यानावर श्रद्धा असली पाहिजे आणि त्याच ध्येयाच्या प्राप्तीसाठी सतत अभ्यास केला पाहिजे.
१७) प्राणायाम म्हणजे ध्यानाचे अवतरण होण्यासाठी करावयाचा उपाय आहे. आपल्या श्वासोच्छ्वासावर ताबा मिळविता आला तर आपले मन आपोआप ताब्यात येते. त्याची चंचलता कमी होत होत नाहीशी होते. आणि मग ध्यान लागायला सुरवात होते.
१८) आपल्या बाहेरच्या दिशेने ध्यान सगळेच करतात. त्यातच गुंतून जातात आणि त्याचे यथायोग्य असे परिणामही भोगतात. आपल्या आतल्या दिशेने ध्यान करता आले पाहिजे. त्यासाठीच साधना करायची असते.
१९) आपल्या डोळ्यांना बाहेर जेवढे जग दिसते. त्यापेक्षा कितीतरी मोठे जग आपल्या आत अस्तित्वात आहे. त्याची आपल्याला कल्पनाही नसते. ध्यान हा त्या जगामधे प्रवेश करायचा दरवाजा आहे. जेव्हा पुरेशी साधना घडते तेव्हा साधकासाठी तो दरवाजा आपोआप उघडतो.
२०) ध्यान लागणे हा साधकासाठी आनंदयोग आहे. तो घडवून आणता येत नाही तर घडून येतो. ध्यानामुळे जीवनामधे सर्व प्रकारचा संयम येतो. अंतरीक दु:ख कमी व्हायला लागते आणि अंतरीक आनंद वाढायला लागतो.
२१) आपल्या अंतरात्म्याचे स्वरूप ध्यानानेच जाणता येते. प्रत्यक्ष अनुभवास येऊ शकते. त्यासाठी योग्य ती साधना मात्र सतत केली पाहिजे.
२२) ज्याप्रमाणे तेजाबाने अशुद्ध सोने शुद्ध बनते, त्याच प्रमाणे ध्यानाने आपल्या मनाचे संपूर्ण शुद्धिकरण होते. ध्यानाचा अंतिम परिणाम आत्मदर्शन हाच आहे.
२३) मनामधील आणि बुद्धीमधील सर्व दोष नष्ट करून, ते अत्यंत शुद्ध, शांत आणि परमेश्वराशी एकरूप करण्यासाठी ध्यान हे एक मुख्य, समर्थ आणि परिपूर्ण साधन आहे.

वरील सर्व विधाने बरोबर आहेत की नाहीत ह्याविषयी मी काय सांगणार? माझी तेवढी योग्यता नाही. पात्रता नाही. खरेच नाही.
परंतु एक गोष्ट खात्रीने सांगतो. ती म्हणजे, काही काही वेळा त्या विधानांमधील काही गोष्टींचा अनुभव, अल्पकाळ का होईना, पण मलाही आलेला आहे. अजूनही येतो. पण ठरवून घेता येत नाही.
' आता ध्यान लावायचे.' असे ठरवून, एखाद्या विशिष्ट आसनामधे कितीही वेळ बसलो तरीही ध्यान लावता येत नाही. त्यामुळे फक्त वेळ वाया जातो. दुसरे काहीही होत नाही.
परंतु तसे ठरविलेले नसताना कधीतरी आपोआप अनुभव येतो. उदाहरणादाखल एक प्रसंग सांगतो.

काही वर्षांपूर्वी, सोमवार - दिनांक ३ नोव्हेंबर २००३ रोजी, कन्याकुमारी येथे विवेकानंद शीलास्मारक पहायला गेलो होतो.
त्या स्मारकाला विशेष असा इतिहास आहे. ते आपल्या देशाचे, दक्षिण दिशेचे टोक आहे.
स्वामी विवेकानंदांनी त्या खडकावर बसून सतत तीन दिवस आणि तीन रात्री, काहीही न खातापिता, ध्यानधारणा केली आणि तेथेच त्यांना साक्षात्कार झाला. **‘ मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा!’** ह्या चिरंतन सत्याचे ज्ञान झाले.
ती जागा पवित्र आहे. तेथे **‘ हिंदी महासागर, अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर’** हे तीन सागर एकमेकांना भेटतात.
त्यांच्या लाटांचा घनगंभीर असा नाद सतत ऐकायला येतो आणि आपल्या मनावर त्या नादाचा खोलवर परिणाम होतो.
तेथे सकाळी सूर्योदयही दिसतो आणि तेथेच संध्याकाळी सूर्यास्तही दिसतो. असो.
स्वामीजींच्या भव्य पुतळ्याचे दर्शन घेऊन झाल्यावर, ध्यान मंडप पहायला गेलो. आत जाऊन शांतपणे डोळे मिटून बसलो.
मनामधे स्वामी विवेकानंदांचे स्मरण चाललेले होते. काही क्षणामधे माझे भान हरपले. मन पूर्णपणे निर्विकार झाले. सगळे विचार थांबले.
ती अवस्था जास्तीत जास्त दोन मिनिटे राहिली असेल. जेव्हा भानावर आलो, तेव्हा मला जो आनंद झाला त्याचे वर्णन मी शब्दांनी करू शकत नाही. कधी करू शकणारही नाही. ती सांगता येईल अशी गोष्टच नव्हती.
आत्ता हे लिहीत असताना मला दोन ओळी सुचल्या आहेत. त्या सांगण्याचा अनिवार मोह होतो आहे आणि मला स्वत:ला आवरता येत नाही म्हणून सांगतो.

**अपूर्व सुंदर, अतिशय सुंदर, कैसे सांगु जे अनुभविले ।**
**शब्द न येती ओठांवरती, अवचित माझे मी पण सरले ।।**

अतिशय सुंदर! फारच छान! एकमेव अशी! ती केवळ अनुभवायचीच गोष्ट होती.
नंतर विचार करताना माझ्या असे लक्षात आले की,
**‘ अहो भाग्यम्! मगाशी आपले ध्यान लागले होते! अचानक लागले! अनपेक्षितपणे लागले! आपल्याला स्वत:ला विसरायला झाले! स्थलकालाचे भानही राहिले नव्हते! सर्व जाणीव नाहीशी झाली होती!’**
खरोखरच, ध्यान हे ठरवून लावता येत असेल असे मला वाटत नाही.
कारण तसे ठरविणे हा देखील एक विचारच आहे आणि तोच ध्यानाच्या सहज प्रक्रियेमधील अडथळाही आहे.
ह्या विषयाचा यथाशक्ती अभ्यास करायला लागल्यावर पुढे कधीतरी, **‘ ध्यान लावता येत नाही. ध्यान लागते.’** हे विधान माझ्या वाचनात आले आणि ते तात्काळ पटलेही. असो.
साधकाची, ध्यानाच्या दिशेने जाणारी प्रक्रिया पुढील प्रमाणे असावी असे मला वाटते.
१) योग्य आसनाद्वारे शरीराला स्थिर करणे.
२) नंतर प्राणायामाच्या साधनेने श्वासावर ताबा मिळवणे व त्या द्वारे मनावर ताबा मिळवायचा प्रयत्न करणे.
३) मनामधे येणारे असंख्य विचार त्रयस्थपणे पाहणे, तटस्थपणे पाहणे.
४) दोन विचारांमधील अंतर वाढवायचा प्रयत्न करीत राहणे.
५) विचारांची एकूण संख्या कमी करायचा प्रयत्न करीत राहणे.
६) कालांतराने इतर सर्व विचारांचे शमन करून, मनाला कोणत्यातरी एका आणि एकमेव विचारामधेच स्थिर करण्याचा प्रयत्न करीत राहणे.
७) अखेरीस केवळ परमेश्वराच्या विचारामधेच गुंतून जाणे. एकमात्र ईश्वरच सत्य असून बाकीचे सर्व काही मिथ्या आहे हे समजल्यामुळे केवळ त्याचेच चिंतन, मनन, भजन आणि पूजन घडून येणे.
मनाची अशी अवस्था झाली म्हणजे मग अचानकपणे ध्यान नांवाच्या विलक्षण अशा महायोगाचे अवतरण होत असावे.
जेव्हा अशी अवस्था हाच मनाचा स्थायीभाव होतो, मन अशाच अवस्थेत रहायला लागते आणि तेथेच स्थिर होते तेव्हा साधकाला, परमेश्वराच्या ठिकाणी असणारी आणि अखेरीस परमेश्वराशीच एकरूप करणारी परम शांती प्राप्त होत असावी.
आता त्यासाठी किती साधना करावी लागेल, किती काळ करावी लागेल आणि साधना करूनही यश मिळेल की नाही, ते कसे बरे सांगता येईल? भगवंतांनी त्याचे उत्तरही पुढे दिलेले आहे. आपल्या सर्वांना आश्वस्थ केले आहे.
मला एक गोष्ट मात्र निश्चितपणे जाणवलेली आहे. त्याविषयी माझ्या मनामधे कोणतीही शंका नाही.
ती गोष्ट म्हणजे, ‘ आपल्या दोन डोळ्यांना दिसणाऱ्या बाहेरील जगापेक्षा, आपल्या आत असलेले जग फार मोठे आहे. त्याचा शोध घ्यायचा प्रयत्न केला पाहिजे. सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे.’
**The longest journey is the journey within.** हे विधान सत्य आहे.

प्रवास फार मोठा आहे. दीर्घ काळ चालणारा आहे. त्यामुळे मुक्कामाला कधी पोहोचता येईल ते सांगता येणार नाही.
परंतु तो प्रवास आनंदाने भरलेला आहे. सगळा मार्ग आनंदाने परिपूर्ण आहे. तसा आनंद इतरत्र कोठेही अनुभवायला मिळणे शक्य नाही आणि तो मार्ग आपल्याला, कधी ना कधी मुक्कामाला घेऊन जाईलच.
कारण मुक्ती प्राप्त करून घेण्याचा तोच एकमेव मार्ग आहे.
आपण सर्वांनी त्या मार्गावर चालण्याचा यथाशक्ती, यथामती प्रयत्न करीत राहावे, असे माझे आग्रहाचे सांगणे आहे. असो.

**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति नचैकान्तमनश्नतः ।**
**न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥**
**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दु:खहा ॥ १७ ॥**

हे अर्जुना ! अतिशय खाणाऱ्यास किंवा मुळीच काही न खाणाऱ्यास, अति झोपाळूस किंवा अति जागरण करणाऱ्यास योग सिद्ध होत नाही. ज्याचा आहारविहार माफक, कर्माचरण बेताचे आणि झोप व जाग्रण परिमित असते त्याला हा योग, सर्व दु:खांचे हरण करणारा म्हणजेच सुखावह होतो.
आपले आयुष्य जगत असताना सर्व गोष्टी कराव्यात. परंतु प्रत्येक गोष्ट करीत असताना काही मर्यादा पाळलीच पाहिजे.
मर्यादा पाळली नाही तर शरीरावर आणि मनावर विपरीत परिणाम घडून येतात.
आवश्यक तेवढी झोप घेतली तर थकवा नाहीसा होऊन शरीर ताजेतवाने होते.
मनामधे काम करण्यासाठी आवश्यक असा उत्साह निर्माण होतो.
पण जर आवश्यक नसताना लोळत पडले तर आळस निर्माण होतो. काम करायची इच्छा नाहीशी होते.
आयुष्यातला अमूल्य वेळ वाया जातो.
त्याचप्रमाणे जर आवश्यक तेवढी झोप घेतली नाही तर थकवा वाढतो. शरीर शिथिल होऊन काम करण्याचा उत्साह नाहीसा होतो आणि शरीरामधे अनेक रोग निर्माण होतात. त्यांचा सामना करावा लागतो. त्रास सहन करावा लागतो.
तीच गोष्ट खाण्यापिण्याची. आपल्या वयाला आणि करीत असलेल्या श्रमांना अनुसरून योग्य प्रकारचे खानपान, योग्य प्रमाणामधे केले तर ते शरीराला उपकारक ठरते. परंतु जर खाणेपिणे पूर्णपणे वर्ज्य केले किंवा आवश्यकता नसताना सारखे खातपीत राहिले तर त्यामुळे शरीराचे अतोनात नुकसान होते.
जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल असे सांगतो की,
‘ जगामधे खायला न मिळाल्यामुळे जितकी माणसे मरतात, त्यापेक्षा कितीतरी अधिक माणसे अती खाण्यामुळे निरनिराळ्या रोगांची शिकार होऊन मरतात.’
फिरणे, शरीराची निगा राखणे, काम करणे आणि बोलण्याविषयीही तेच. कशाचाही अतिरेक नसावा. जरा शांतपणे विचार करा.
आपण दिवसभरामधे जितके बोलतो, तितके बोलायची गरज असते का?
त्यापैकी निम्मे बोलणे बंद केले तरी आपले काहीही अडणार नाही.
उलट आपली बरीचशी वाया जाणारी शक्ती वाचेल आणि तिचा विधायक कामासाठी उपयोग करता येऊ शकेल.
शिवाय अती बोलणे किंवा अजिबात न बोलणे हे गैरसमजाला आणि वादाला कारण होऊ शकते.
म्हणून आवश्यक तेवढेच बोलावे, अचूक बोलावे, शब्दांचा योग्य वापर करावा.
अती बोलणे किंवा अजिबात न बोलणे दोन्हीही टाळावे. तसेच अती श्रम करणे किंवा अजिबात श्रम न करणे दोन्हीही वाईट.
कशाचाही अतिरेक हा वाईटच असतो.
सर्व काही योग्य प्रमाणामधे करणे हे आध्यात्मिक दृष्टीने आणि व्यावहारिक दृष्टीनेही उपकारक असते.

**यदा विनियतञ् चित्तम् आत्मन्येवावतिष्ठते ।**
**नि:स्पृहः सर्वकामेभ्यः युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥**
**यथा दीपो निवातस्थः नेङ्गते सोपमा स्मृता ।**
**योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ १९ ॥**

आवरून धरलेले मन जेव्हा आत्म्याच्याच ठिकाणी स्थिर होते आणि कोणत्याही उपभोगाची इच्छा रहात नाही तेव्हा तो योगयुक्त झाला असे म्हणतात. निवांत जागी ठेवलेल्या दिव्याची ज्योत जशी निश्चल राहते, तीच उपमा आपल्या योगाभ्यासात आणि त्याद्वारे परमात्म्याच्या ध्यानात मग्न झालेल्या योग्याच्या चित्तास दिलेली आहे.

येथे मनाला दीपज्योतीची यथार्थ उपमा दिलेली आहे.
दिव्याची म्हणजे निरांजनाची ज्योत सहसा स्थिर रहात नाही. हवेच्या सूक्ष्मशा हालचालीचाही तिच्यावर लगेच परिणाम होतो आणि ती विचलित होते. हलायला लागते. परंतु जेव्हा वायूचे चलनवलन पूर्णपणे थांबते, हवा स्थिर होते, तेव्हा ज्योतही पूर्णपणे स्थिरावते, स्तब्ध होते, अचल होते. त्यावेळचे तिचे दर्शन, पाहणाऱ्यास निखळ शांतीची जाणीव करून देते.
माणसाच्या मनाची अवस्थाही अगदी तशीच असते. सर्व साधारणपणे ते स्थिर राहातच नाही. राहू शकतच नाही. परंतु जेव्हा साधनेच्या योगाने त्याला आवर घातला जातो, ताब्यामधे आणले जाते आणि विचारांची आवर्तने निर्माण होणे थांबते, त्यावेळेला ते परमेश्वराचे ठिकाणी संपूर्णपणे स्थिरावते. एकाग्र होते. इतरत्र कोठेही भरकटत नाही.
मनाची हीच एकाग्रता आपल्याला व्यवहारामधेही अनुभवता येते. **' सुईमधे दोरा ओवताना'** आपल्या मनाची अवस्था कशी असते? किंवा **' हातामधे तेलाने भरलेली वाटी घेऊन देवळाच्या पायऱ्या चढत असताना '** थोड्या वेळासाठी आपले मन कसे असते? ते केवळ सुई आणि दोऱ्यामधेच किंवा वाटीमधे काठोकाठ भरलेल्या तेलामधेच गुंतून जाते. त्यालाच मनाची एकाग्रता असे म्हणतात.

**यत्रोपरमते चित्तम् निरुद्धम् योगसेवया ।**
**यत्र चैवात्मनाऽऽत्मानम् पश्यन्नात्मनि तुष्यति ।। २० ।।**
**सुखमात्यन्तिकम् यत् तत् बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।**
**वेत्ति यत्र न चैवायम् स्थितश्चलति तत्वतः ।। २१ ।।**
**यम् लब्ध्वा चापरम् लाभम् मन्यते नाधिकन् ततः ।**
**यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ।। २२ ।।**
**तम् विद्यात् दुःखसंयोग वियोगम् योगसञ्ज्ञितम् ।**
**स निश्चयेन योक्तव्यः योगोऽनिर्विण्णचेतसा ।। २३ ।।**

योगानुष्ठानाने निरोध होऊन चित्त ज्या ठिकाणी रममाण होते आणि जेथे आपण आत्म्याला पाहून आत्म्यातच संतुष्ट होऊन राहतो, जेथे केवळ बुद्धिगम्य व इंद्रियांना अगोचर अशा आत्यंतिक सुखाचा त्याला अनुभव येतो आणि जेथे तो एकदा स्थिरावला म्हणजे केव्हाही ढळत नाही, तसेच जी स्थिती प्राप्त झाली म्हणजे त्यापेक्षा दुसरा कोणताही लाभ अधिक वाटत नाही आणि जेथे स्थिरावला म्हणजे कितीही मोठे दुःख असले तरी ते त्याला तेथून चाळवू शकत नाही, तिलाच योग या नांवाची स्थिती समजतात आणि हा योग न कंटाळता निश्चयाने आचरला पाहिजे.
वरील चार श्लोक म्हणजे एक सलग वाक्यच असून ते चार श्लोकात विभागलेले आहे.
पहिल्या तीन श्लोकामधे जी लक्षणे सांगितलेली आहेत ती साधकाची ध्यानयोग सिद्ध झाल्यानंतरची अवस्था आहे. ती अवस्था प्राप्त करवून घेण्यासाठीच सतत साधना केली पाहिजे असे चवथ्या श्लोकात सांगितले आहे.
कित्येक विद्वान व्यक्तींनी सांगितलेले आहे की, ' ही अवस्था म्हणजे समाधीची लक्षणेच आहेत. पातंजलयोगातील जे महत्त्वाचे सूत्र, **योगः चित्तवृत्तिनिरोधः ।** ( चित्तवृत्तींचा सर्व प्रकारे निरोध करणे म्हणजेच योग.), त्याची पूर्णावस्था म्हणजे समाधी.'
हे श्लोक ध्यानयोगाची साधना करण्यासाठी प्रेरणा देणारेच आहेत.
अर्थात निष्काम कर्म करण्यासाठी मनाची स्थिरता आणि समता प्राप्त करवून घेण्याचा ध्यानयोग हा एक मार्ग आहे. एकमेव मार्ग नाही. हीच अवस्था ज्ञानयोग आणि भक्तियोग ह्यांच्या योगानेही प्राप्त होऊ शकते. सतत तशी साधना मात्र करीत राहिले पाहिजे. असो.
आता यापुढील तीन श्लोकांमधे समाधी कशी लावावी त्याविषयी सविस्तरपणे सांगितलेले आहे.

**सङ्कल्पप्रभवान् कामान् त्यक्त्वा सर्वानशेषतः ।**
**मनसैवेंद्रियग्रामम् विनियम्य समन्ततः ।। २४ ।।**
**शनैः शनैरुपरमेत् बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थम् मनः कृत्वा न किञ्चिदपि चिंतयेत् ।। २५ ।।**
**यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् ।**
**ततस्ततो नियम्यैतत् आत्मन्येव वशन् नयेत् ।। २६ ।।**

संकल्पापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व वासनांचा निःशेष त्याग करून आणि सर्व इंद्रियांचे मनानेच सर्व बाजूंनी नियमन करून, धैर्ययुक्त बुद्धीने हळूहळू शांत होत जावे आणि मन आत्म्याच्या ठिकाणी स्थिर करून कोणताही विचार मनात येऊ देऊ नये, अशा रितीने चित्त एकाग्र करीत असताना चंचल व अस्थिर मन ज्या ज्या बाजूंनी बाहेर भरकटायला लागेल, त्या त्या बाजूंनी निरोध करून ते

आत्म्याच्याच ताब्यात आणावे.
ह्या वर्णनाला समांतर, अधिक विस्तृत आणि सर्वार्थाने साजेल असे दुसरे वर्णन कठोपनिषदामधे आलेले आहे.
**' कठोपनिषद् '** हे फारच सुंदर उपनिषद् आहे. त्यामधे यमधर्म आणि मानव ह्या दोघांच्यामधील अमृत तत्वाविषयीचा संवाद आलेला आहे. मृत्यूचा देव असलेला **यमराज**, त्याच्याकडे अतिथी म्हणून आलेल्या निष्पाप बालक **नचिकेताला**, त्यानेच हट्ट धरल्यामुळे, आत्मस्वरुपाचे ज्ञान देतो आहे. यथायोग्य उपमांचा छान वापर केलेला आहे. अतिशय सुंदर उपमा दिलेल्या आहेत.
नीट लक्ष देऊन ऐका.

**आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।**
**बुद्धिं तु सा रथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ।। कठ. ३ - ३ ।।**

अर्थ – आपले शरीर रथ असून आत्मा हा रथी म्हणजे रथाचा मालक आहे. आपली बुद्धि सारथी असून मन हा लगाम आहे.

**इन्द्रियाणि हयानाहुः विषयांस्तेषु गोचरान् ।**
**आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ।। कठ. ३ - ४ ।।**

अर्थ – आपली इंद्रिये घोडे असून शब्दस्पर्शादि विषय त्यांचे मार्ग आहेत. इंद्रिये आणि मन ह्यांसह आत्मा त्यांचा भोक्ता आहे असे ज्ञानी पुरुष सांगतात.

**यस्त्वविज्ञानवान्भवति अयुक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः ।। कठ. ३ - ५ ।।**

अर्थ – ज्याप्रमाणे वाईट घोडे लौकिक सारथ्याच्या ताब्यात राहात नाहीत, त्याचप्रमाणे ज्याचा बुद्धिरूपी सारथी अकुशल असून ज्याचे मन आवरलेले नसते, त्याची इंद्रिये त्याच्या आधीन राहात नाहीत.

**यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ।। कठ. ३ - ६ ।।**

अर्थ – ज्याप्रमाणे चांगले घोडे लौकिक सारथ्याच्या ताब्यात राहातात, त्याचप्रमाणे ज्याचा बुद्धिरूपी सारथी कुशल असून ज्याचे मन आवरलेले असते, त्याची इंद्रिये त्याच्या आधीन राहातात.

**यस्त्वविज्ञानवान्भवति अमनस्कः सदाऽशुचिः ।**
**न स तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति ।। कठ. ३ - ७ ।।**

अर्थ – ज्याची बुद्धि कुशल नाही, ज्याचे मन आवरलेले नाही, जो सदा अपवित्र असतो त्याला आत्म्याचे परमपद प्राप्त होत नाही. त्याला संसारातच अडकून पडावे लागते.

**यस्तुविज्ञानवान्भवति समनस्कः सदा शुचिः ।**
**स तु तत्पदमाप्नोति यस्माद् भूयो न जायते ।। कठ. ३ - ८ ।।**

अर्थ – ज्याची बुद्धि कुशल आहे, ज्याचे मन आवरलेले आहे, जो सदा पवित्र असतो त्याला आत्म्याचे परमपद प्राप्त होते. तो संसारात पुन्हा अडकत नाही.

**विज्ञानसारथिर्यस्तु मनः प्रग्रहवान् नरः ।**
**सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमम् पदम् ।। कठ. ३ - ९ ।।**

अर्थ – ज्याच्या शरीररूपी रथावर विवेकयुक्त बुद्धि सारथ्य करते आणि ज्याने मनाचा लगाम आवरून धरला आहे, असा पुरुष संसाराच्या पलीकडे असलेल्या परमात्म्याच्या परमपदास जातो.

रथाच्या मालकाला इच्छित स्थानी पोहोचविण्यासाठी, सारथ्याला आपला रथ योग्य मार्गाने नेत असताना, जे प्रयत्न करावे लागतात, तसेच प्रयत्न येथे ध्यानयोगाच्या साधकालाही करावे लागतात. असो.
ज्यांना कोणत्याही विषयावर आपले मन पूर्णपणे केंद्रित करायची सवय असेल, एखाद्या विषयामधे पूर्णपणे गुंतून जाता येत असेल आणि इतर सर्व काही विसरता येत असेल, त्यांना वरील श्लोकांचा आशय लगेच समजून येईल.
अशा प्रकारे योगाभ्यासाने आपले मन पूर्णपणे ताब्यात आणले, मनाचे नियमन केले,
मनाला स्थिर केले आणि त्यायोगे ध्यानयोगाची पूर्णावस्था प्राप्त झाली,
म्हणजे मग त्याचे जे फळ मिळते त्याविषयी यापुढे सांगितलेले आहे.

**प्रशान्तमनसम् ह्येनम् योगिनम् सुखमुत्तमम् ।**
**उपैति शान्तरजसम् ब्रह्मभूतमकल्मषम् ।। २७ ।।**
**युञ्जन्नेवम् सदाऽऽत्मानम् योगी विगतकल्मषः ।**
**सुखेन ब्रह्मसंस्पर्शम् अत्यन्तम् सुखमश्नुते ।। २८ ।।**
**सर्वभूतस्थमात्मानम् सर्वभूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ।। २९ ।।**
**यो माम् पश्यति सर्वत्र सर्वञ् च मयि पश्यति ।**
**तस्याहम् न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ।। ३० ।।**
**सर्वभूतस्थितम् यो माम् भजत्येकत्वमास्थितः ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ।। ३१ ।।**
**आत्मौपम्येन सर्वत्र समम् पश्यति योऽर्जुन ।**
**सुखम् वा यदि वा दुःखम् स योगी परमो मतः ।। ३२ ।।**

या प्रकारे शांतचित्त, रजोविरहित, निष्पाप व ब्रह्मभूत झालेल्या योग्याला उत्तम सुख प्राप्त होते. याप्रमाणे सतत आपला योगाभ्यास करणारा योगी सर्व पापापासून सुटून, ब्रह्मसंयोगापासून प्राप्त होणाऱ्या अत्यंत सुखाचा, सुखाने उपभोग घेतो. ज्याचा आत्मा योगयुक्त झाला, त्याची दृष्टी सम होऊन, सर्व भूतांचे ठायी आपण व आपल्या ठायी सर्व भूते आहेत असे त्याला दिसू लागते. मीच सर्व ठिकाणी आहे असे जो पाहतो आणि माझ्या ठिकाणीच सर्व आहे अशी ज्याची दृष्टी झाली, त्याला मी कधी अंतरत नाही व तोही मला कधी अंतरत नाही. एकत्वबुद्धी मनात ठेवून, सर्व भूतात असणाऱ्या मला जो भजतो, तो योगी सर्वप्रकारे वागत असतानाही माझ्यामधेच असतो. हे अर्जुना ! सुख असो वा दुःख असो, आपल्याप्रमाणे इतरांना अशा दृष्टीने जो सर्वत्र सारखे पाहू लागला तो योगी उत्कृष्ट मानिला जातो.

२९ व्या श्लोकामधे ‘ आत्मा ’ हा शब्द आलेला आहे. तो अव्यक्त म्हणजे अध्यात्मिक दृष्टीने आलेला आहे.
त्यापुढील श्लोकामधे ‘ मी ’ हा शब्द आलेला आहे. तो व्यक्त म्हणजे भक्तीच्या दृष्टीने आलेला आहे.
असे असले तरी दोघांचा अर्थ एकच आहे. येथे योग्याच्या मनाची अवस्था कशी असते ते सांगितले आहे.
हे आदर्श योग्याचे वर्णन आहे. हल्ली **‘ आदर्श ’** हा शब्द बदनाम झालेला आहे.
कृपया आपण तो नवीन अर्थ विसरून जावा आणि अगोदरचा, मूळचा, खरा अर्थ ध्यानात ठेवावा अशी मी विनंती करतो.
मागे दुसऱ्या अध्यायामधे सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणेही अशीच आहेत.
योगी इतका निर्भय कसा काय असू शकतो? त्याला कधीही कशाचीही भिती का वाटत नाही?
त्याला सरकारी सुरक्षा नसते. स्वतःची खाजगी सुरक्षा व्यवस्था नसते.
त्याच्या भोवती हातात झेंडे घेऊन घोषणा देणाऱ्या समर्थकांचा गराडा नसतो.
तो स्वतः किंवा त्याचे काका, मामा, भाऊ, दादा वगैरे कोणीही राजकारणी, सहकार सम्राट, पुढारी, नगरसेवक, आमदार, खासदार किंवा मंत्री नसतात. तरीही तो पूर्णपणे भयमुक्त होऊन, सर्वत्र संचार कसा करू शकतो?
तो सदैव आत्मानंदामधे बुडून गेलेला असतो. त्याला कोणाकडूनही कसलीच अपेक्षा नसते. त्याला कोणी मित्रही नसतो आणि शत्रूही नसतो. सगळे सारखेच असतात. त्याच्या ह्या सहज प्रवृत्तीचे खरे कारण काय असते?
मध्यंतरी एक अर्थपूर्ण श्लोक माझ्या वाचनामधे आला. त्यामधे वरील सर्व प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे. तो श्लोक पुढील प्रमाणे आहे.

**धैर्यं यस्य पिता, क्षमा च जननी, शांतिश्चिरं गेहिनी ।**
**सत्यं सूनुरयं, दया च भगिनी, भ्राता मनःसंयमः ।।**
**शय्या भूमितलं, दिशोऽपि वसनं, ज्ञानामृतं भोजनम् ।**
**एते यस्य कुटुंबिनो, वद सखे, कस्मात् भयं योगिनः ।।**

अर्थ — **धैर्य** हाच ज्याचा पिता, **क्षमा** हीच ज्याची आई, **कायमची शांती** हीच ज्याची गृहिणी, **सत्य** हाच ज्याचा पुत्र, **दया** हीच ज्याची बहीण, **मनावरचा ताबा** हाच ज्याचा भाऊ, **सपाट जमीन** हीच ज्याची शय्या, **दिशा** हेच ज्याचे वस्त्र आणि **ज्ञानरूपी अमृत** हेच ज्याचे भोजन, असे ज्याच्या कुटुंबाचे सदस्य असतील तर मित्रा मला सांग की, ‘ त्या योग्याला कशांपासून भय असणार?’

किती समर्पक उत्तर दिले आहे ना! ह्यापेक्षा अधिक काय बोलता येईल? असो.
श्रीकृष्ण जे काही सांगतो आहे ते अर्जुन लक्षपूर्वक ऐकतो आहे बरे का! एकाग्र होऊन ऐकतो आहे. त्यावर विचार करतो आहे.
म्हणून त्याच्या मनामधे शंका आली. अगदी योग्य शंका आली. आपल्यापैकी प्रत्येकाला तीच शंका असते.
तिचे निरसन कधीही होत नाही. तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**योऽयम् योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहन् न पश्यामि चञ्चलत्वात् स्थितिम् स्थिराम् ।। ३३ ।।**
**चञ्चलम् हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहन् निग्रहम् मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।। ३४ ।।**

हे मधुसूदना ! साम्यबुद्धीने प्राप्त होणारा जो हा योग तुम्ही सांगितला तो, मनाच्या चंचलतेमुळे, कायम टिकेल असे मला दिसत नाही. कारण हे कृष्णा ! मन हे चंचल, दांडगे, बलिष्ठ व दृढ म्हणजे वळवण्यास कठीण आहे. याचा निग्रह करणे हे मला, वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणेच, अत्यंत दुष्कर दिसते.
खरंच! माणसाचे **' मन '** म्हणजे काय आहे? कसे आहे? कुठे आहे? त्याचा आकार कसा आहे? केवढा आहे? रंगरूप कसे आहे? मला **मन** ह्या वस्तूविषयी काहीही माहिती नाही.
**मन** नांवाची वस्तू कोणालाही, कधीही आणि कुठेही दिसत नाही. आजपर्यंत कोणीही आपल्या मनाला पाहिलेले नाही.
ते द्रवरूप आहे, घनरूप आहे की वायुरूप आहे ते देखील माहीत नाही. त्याच्या विषयी काहीही सांगता येत नाही.
परंतु माणसाला मन आहे हे सत्य आहे आणि प्रत्येकाला त्याचा सतत अनुभव येत असतो हे देखील सत्य आहे.
मन अत्यंत शक्तिवान आहे. अत्यंत चपळ आहे. नाठाळ आहे. उनाड आहे. थांब म्हटले तर थांबत नाही.
ऐक म्हटले तर ऐकत नाही. चुचकारले तर कधीकधी थोडावेळ थांबते आणि परत पळायला लागते.
त्याच्या भटकण्याला स्थलकालाची मर्यादा नाही. सदैव कुठे ना कुठे तरी फिरत असते. आपल्या मानेवर, एखाद्या समंधासारखे कायम बसलेले असते. रवी जशी दह्याला घुसळून, प्रक्षुब्ध करून, त्याचे अस्तित्व नष्ट करून टाकते, त्याचप्रमाणे मन शरीराला आणि सर्व इंद्रियांना घुसळून काढते. प्रक्षुब्ध करते. त्यांचा पूर्णपणे ताबा घेते. त्यांच्यावर स्वामित्व गाजवायला लागते.
आपली बुद्धी त्याला थांबवायचा प्रयत्न करीत असते.
' अरे, जरा थांब! असे करू नकोस. ते चांगले नाही,' असे सारखे सांगत असते.
पण ते हट्टी मन बुद्धीचे जराही ऐकत नाही. एवढ्या मोठ्या देहाला हवे तेथे फरफटत घेऊन जाते. करू नये ते करायला लावते.
नको ते करवून घेतल्यावर, त्याविषयी आनंद किंवा दु:खपण तेच करते.
ते रागही करते आणि प्रेमही करते. तिरस्कारही करते आणि लोभही करते.
ते भ्याडही असते आणि धैर्यवानही असते. त्यागीही असते आणि भोगीही असते.
ते आसक्तही असते आणि विरक्तही असते. त्याची गती विलक्षण असते.
ते अणू एवढे अतिसूक्ष्मही असते आणि आकाशा एवढे अतिविशालही असते.
एका क्षणी ते समुद्राच्या तळाशी असेल तर दुसऱ्या क्षणी पर्वताच्या शिखरावर जाईल.
कधी काय करील, कसे वागेल, ते सांगताच येत नाही. अशा बेभरवशी मनाला ध्यानयोगाच्या सहाय्याने आवर घालायचा कितीही प्रयत्न केला तरी ते शक्य होईल काय? साधकाला आपल्या मनाला आवर घालणे कितपत जमेल?
जमले तरी किती काळ जमेल? महिना, दोन महिने? एक वर्ष? दोन वर्षे ?
जर काही दिवसानंतर परत ते मूळ पदावरच येणार असेल तर मग प्रयत्न करून काय उपयोग होणार?
श्रीकृष्ण अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे उत्तर देतो आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**असंशयम् महाबाहो मनो दुर्निग्रहञ् चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।। ३५ ।।**
**असंयतात्मना योगः दुष्प्राप इति मे मतिः ।**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ।। ३६ ।।**

हे महाबाहो अर्जुना ! मन हे चंचल असून त्याला आवरणे फार कठीण आहे, याबद्दल काहीच शंका नाही.

पण हे कौंतेया ! नित्य अभ्यासाने आणि वैराग्याने ते स्वाधीन ठेवता येते. अंत:करण ज्याच्या ताब्यात नाही त्याला योग प्राप्त होणे कठीण असे माझे मत आहे. पण अंत:करण ताब्यात आणून प्रयत्न करीत गेल्यास उपायाने योग प्राप्त होणे शक्य आहे.
मनाची एक गोष्ट मात्र चांगली आहे बरं का! त्याला एखाद्या विषयाची गोडी लागली म्हणजे मग ते त्याच विषयामधे रमते.
तेथून, त्याचे दुसऱ्या विषयाकडे धावणे कमी व्हायला लागते. आता तो विषय चांगला असेल की वाईट ते सांगता येत नाही.
किंबहुना त्याला वाईट विषयाची गोडी लागायची शक्यताच जास्त असते.
आपण जर प्रयत्न सुरू केले, साधना करायला सुरवात केली, मनाला चुचकारून, कुरवाळून, शांत करून, समजावून, आग्रह करून, कोणत्यातरी चांगल्या विषयाकडे वळविले, विशेष करून परमेश्वराकडे वळविले तर ते तिथे स्थिर होऊ शकते.
काहीकाळ का होईना! पण तेथे रमते. हे काम फार कठीण आहे. खडतर आहे. पण अशक्य नाही.
सतत साधना मात्र करीत राहावे लागते. मनाला सतत गोंजारावेच लागते. कडकपणे हाताळून चालत नाही.
त्याला उपदेश करताना समर्थ रामदासांनीसुद्धा गोड हाक मारली आहे.
**' मना ऽऽ सज्जना ऽऽ!'** मनाला ते सज्जन म्हणत आहेत, चांगले म्हणत आहेत.
समर्थांनी मनाचा जितका सखोल अभ्यास केलेला आहे, तितका दुसऱ्या कोणीही केलेला नाही. कोणी केला असेल तर निदान मला तरी माहीत नाही. अगदी आधुनिक मानसशास्त्रज्ञांनीही इतका अभ्यास केला असेल असे वाटत नाही.
एखाद्या खोडकर, खट्याळ मुलाला त्याची आई कशी समजावते ते आठवा.
' माझा बाळ शहाणा आहे! गुणी आहे! बाळा ऽऽ, इकडे ये! माझ्याजवळ बस!' असेच म्हणते.
मग ते मूलही तिच्या जवळ येऊन बसते. तसाच हा प्रकार आहे. हा गुणी बाळ आपल्या आईच्या जवळ बसतो खरा, पण किती वेळ? थोडा वेळच बसतो. नंतर परत पळायला लागतो. खोड्या करायला सुरवात करतो.
मनाची कथाही तशीच आहे. आपण भले कितीही प्रयत्न केले, चुचकारले, समजावले, तरीही ते किती वेळ आपले ऐकेल?
थोडा वेळ थांबेल. परत भटकायला लागेल. आपल्या हातून निसटून जाईल. मग परत नव्याने प्रयत्न करायला लागायचे.
हे असे किती काळ चालायचे? त्याला काही मर्यादा आहे की नाही?
माणसाचे आयुष्य मर्यादित आहे. जास्तीत जास्त शंभर वर्षे.
तेवढ्या काळामधे मनाला आवर घालण्याचे प्रयत्न करणे जमले नाही तर?
प्रयत्न करणे जमले पण दीर्घकाळ प्रयत्न करणे जमले नाही तर?
समजा की दीर्घकाळ प्रयत्न करूनही, मनावर ताबा मिळवता आला नाही तर?
आयुष्य तर संपून जाईल, साधकाला मरण येईल. मग पुढे काय होईल?
पुष्कळ प्रयत्न केला पण ध्यानयोग जमलाच नाही. ध्यानयोग न जमल्यामुळे मन ताब्यात आलेच नाही.
मन ताब्यात आले नाही म्हणून निष्काम कर्मयोगही घडला नाही. त्यामुळे अखेरीस परमेश्वराची प्राप्तीही झाली नाही.
आता त्या साधकाचे काय होईल? तो अधोगतीला तर जाणार नाही ना? त्याचे वाटोळे तर होणार नाही ना?
त्याचा नाश तर होणार नाही ना? हीच शंका अर्जुनाच्याही मनामधे आली. म्हणून त्याने परत प्रश्न विचारला आहे.

**अर्जुन उवाच :**

**अयति: श्रद्धयोपेत: योगात् चलितमानस: ।**
**अप्राप्य योग संसिद्धिङ् काम् गतिङ् कृष्ण गच्छति ।। ३७ ।।**
**कच्चिन्नोभयविभ्रष्ट: छिन्नाभ्रमिव नश्यति ।**
**अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मण: पथि ।। ३८ ।।**
**एतन्मे संशयङ् कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषत: ।**
**त्वदन्य: संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ।। ३९ ।।**

हे कृष्णा ! श्रद्धा आहे पण प्रकृतिस्वभावामुळे पुरेसे संयमन होत नाही, प्रयत्न कमी पडतात म्हणून ज्याचे मन योगापासून चळले, तो पुरुष योगसिद्धी न पावता कोणत्या गतीला जातो? हे महाबाहो श्रीकृष्णा ! मोहग्रस्त होऊन ब्रह्मप्राप्तीच्या मार्गात स्थिर न झाल्याने दोन्हीकडून भ्रष्ट झालेला तो पुरुष, फुटलेल्या ढगाप्रमाणे मधल्यामधे नाश तर पावत नाही ना? हे कृष्णा ! माझा हा संशय तुम्हीच दूर केला पाहिजे. या संशयाचे निरसन करणारा तुमच्यावाचून दुसरा कोणी मिळणे शक्य नाही.
अर्जुनाची श्रीकृष्णावर किती दृढ श्रद्धा आहे पहा! कोणालाही हेवा वाटावा अशी प्रगाढ आणि आत्यंतिक श्रद्धा आहे ही.
' श्रीकृष्णा ऽऽ! माझ्या प्रश्नाचे खरे उत्तर तू आणि फक्त तूच देऊ शकशील. तुझ्या वाचून दुसऱ्या कोणालाही ते शक्य होणार नाही.'

जरा स्वत:लाच प्रश्न विचारून बघा बरे? आपली कुठे तरी, कोणावर तरी, कधी तरी, इतकी घट्ट श्रद्धा असते का?
आपले श्रद्धास्थान रोजच्या रोज बदलत असते. आपण आठवड्यातल्या प्रत्येक दिवशी वेगळ्या देवाला नमस्कार करतो.
सणवार असेल त्यादिवशी वेगळ्या देवाला नमस्कार करतो. तीर्थक्षेत्री गेल्यावर त्या त्या देवतेवर श्रद्धा बाळगतो.
अर्जुनाचे तसे नाही. कोणत्याही क्षणी, कोणत्याही स्थानी, कोणत्याही परिस्थितीत, त्याचे श्रद्धास्थान एक आणि एकच आणि एकमेव असा **' गोपालकृष्ण.'** दुसरे कोणीही नाही. **' श्रीकृष्ण - श्रीकृष्ण आणि केवळ श्रीकृष्णच.'**
' माझे जे काही करायचे असेल ते श्रीकृष्णच करील. तोच माझे सर्वकाही आहे. मी त्याला प्रिय आहे म्हणूनच तो माझी सदैव काळजी घेत असतो. आता त्याची जशी इच्छा असेल तेच होईल आणि तसेच होईल.' **' श्रद्धेची पूर्णावस्था '** म्हणतात ती हीच असावी असे मला वाटते. भक्ताची अशी दृढ श्रद्धा असल्यावर, भगवान् तरी गप्प कसा राहील? तो तर ' भक्ताभिमानी ' म्हणून प्रसिद्धच आहे. त्याला श्रीकृष्णाने जे उत्तर दिले आहे ते आपल्या सर्वांना आश्वस्थ करणारे आहे. आपले नैराश्य घालवून टाकणारे आहे.
आपला उत्साह वाढविणारे आहे. आपल्याला सतत साधना करीत रहायला प्रवृत्त करणारे आहे. उत्तेजन देणारे आहे.
म्हणूनच ते फार फार महत्त्वाचे आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।**
**न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिन् तात गच्छति ।। ४० ।।**
**प्राप्य पुण्यकृताम् लोकान् उषित्वा शाश्वतिः समाः ।**
**शुचीनाम् श्रीमताङ् गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।। ४१ ।।**
**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।**
**एतद्धि दुर्लभतरम् लोके जन्म यदिदृशम् ।। ४२ ।।**
**तत्र तम् बुद्धिसंयोगम् लभते पौवदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ।। ४३ ।।**
**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ।। ४४ ।।**
**प्रयत्नात् यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।**
**अनेकजन्मसंसिद्धः ततो याति पराङ् गतिम् ।। ४५ ।।**
**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्मात् योगी भवार्जुन ।। ४६ ।।**
**योगिनामपि सर्वेषाम् मद्गतेनांतरात्मना ।**
**श्रद्धावान् भजते यो माम् स मे युक्ततमो मतः ।। ४७ ।।**

हे पार्था ! इहलोकी काय किंवा परलोकी काय, अशा पुरुषाचा कधीच विनाश होत नाही. कारण कल्याणकारक कर्मे करणाऱ्या कोणत्याही पुरुषाला दुर्गती मिळत नाही. पुण्यकर्मे करणाऱ्या पुरुषांना मिळणाऱ्या स्वर्गादि लोकांस पोहोचून, तेथे पुष्कळ वर्षे राहून मग हा योगभ्रष्ट पुरुष शुचिर्भूत श्रीमान लोकांच्या घरी जन्म घेतो. किंवा बुद्धिमान अशा योग्याच्याच कुळात जन्म पावतो. अशा प्रकारचे जन्म ते ह्या लोकी फार दुर्लभ होत. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या जन्मामधे, पूर्वजन्मातला तो बुद्धिसंस्कार त्याला प्राप्त होतो. आणि हे कुरुनंदना ! तो त्याहून अधिक योगसिद्धी मिळवण्यासाठी प्रयत्न करतो. पूर्वजन्मीच्या त्याच्या त्या अभ्यासानेच, स्वत:ची इच्छा नसली तरीही तो पूर्ण सिद्धीकडे ओढला जातो. ज्याला योगाचे ज्ञान व्हावे अशी इच्छा झाली, तो देखील शब्दब्रह्माच्या पलीकडे जातो. याप्रमाणे प्रयत्नाने उद्योग करता करता पापापासून शुद्ध होऊन योगी अनेक जन्मानंतर सिद्धी पावून अखेर उत्तम गतीस पोहोचतो. तपस्वी लोकांपेक्षा योगी श्रेष्ठ, ज्ञानी पुरुषांपेक्षाही श्रेष्ठ आणि सकाम कर्म करणाऱ्यांच्यापेक्षाही श्रेष्ठ समजतात. म्हणून हे अर्जुना ! तू योगी हो. तथापि सर्व योग्यांमधेही जो माझ्या ठिकाणी अंत:करण ठेवून श्रद्धेने मला भजतो त्यालाच मी सर्वात उत्तम योगी समजतो.
किती महत्त्वाची विधाने केली आहेत पहा. **सत्कर्म करणारा कोणीही माणूस कधीही अधोगतीला जात नाही.**
कोणाही साधकाला ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग किंवा भक्तियोगाची साधना काही अडचणींमुळे योग्यप्रकारे करता आली नाही किंवा कोणत्याही कारणाने अपूर्ण राहिली आणि मरण आले, तरीही तो अधोगतीला जात नाही.
मरणसमयी साधक, साधनारूपी जिन्याच्या ज्या पायरीवर असतो, तेथपर्यंतचे संस्कार त्याच्या बरोबरच असतात आणि पुढील जन्म अशा

सुयोग्य जागी येतो की, तो त्यापुढील साधनेकडे ओढला जातो. अधिकाधिक प्रयत्न करतो. ही प्रक्रिया अनेक जन्मांमधे चालत राहते आणि अंतिमत: त्याला मोक्ष प्राप्ती अवश्य होते.
आपल्याला ती एकूण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहता येणे शक्य नसले तरीही कधीकधी तिची झलक मात्र दिसते आणि आपण आश्चर्यचकित होतो. केवळ आपल्या भारतीय समाजामधेच नाही तर, सर्व जगभरामधे, लहान वयामधेच अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आपण आजही पाहतो. त्यांच्याकडे इतके ज्ञान, इतकी समज, इतके कौशल्य कोठून आले ते आपल्याला समजत नाही. आपण केवळ टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक करतो.
आदिशंकराचार्यांपासून, आचार्य विनोबा भाव्यांच्यापर्यंत जे जे ज्ञानवान, चारित्र्यवान, कर्तृत्ववान आणि आयुष्याच्या अंतापर्यंत स्वधर्मानुसार विहित कर्म करीत राहिलेले असे महात्मे होऊन गेले, त्यांचा आपल्याला माहीत असलेला किंवा दिसलेला अथवा आपण प्रत्यक्ष अनुभवलेला जन्म हा पहिला असणे शक्य नाही. त्यांना प्राप्त झालेले बुद्धिमत्ता, प्रतिभा, चातुर्य, जिद्द, नेतृत्व इत्यादी गुण, हे मागील अनेक जन्मांच्या संस्कारांचेच फळ असते. ही गोष्ट केवळ अध्यात्मिक क्षेत्रामधील व्यक्तीनाच लागू आहे असे नाही.
जीवनाच्या राजकीय, सामाजिक, लष्करी, संगीत, वैज्ञानिक, बौद्धिक, क्रीडा, कला इत्यादी सर्वच क्षेत्रामधे लहान वयामधे उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आपण सर्वांनी पाहिलेल्या आहेत. त्या सर्वांचे कर्तृत्व हे मागील अनेक जन्माच्या साधनेचे आणि संस्काराचेच फळ असणार ह्याविषयी माझ्या मनामधे तरी शंका नाही.
तात्पर्य काय तर आध्यात्मिक दृष्टीने किंवा व्यावहारिक दृष्टीनेही, जर कोणाला स्वत:चा उद्धार व्हावा असे वाटत असेल, उत्कर्ष व्हावा असे वाटत असेल, तर माणसाने स्वत:च प्रयत्न केले पाहिजेत. साधना केली पाहिजे. स्वत:ची बुद्धी, मन आणि इंद्रिये ह्यांना योग्य मार्गावर ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे. अपयश येईल ह्या भीतीने साधना न करणे योग्य नाही.
मनाची एकाग्रता ही सर्वात महत्त्वाची आहे. अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय कोणतेही कार्य घडणे शक्य नाही. तिला पर्याय नाही. व्यावहारीक बाब असो किंवा पारमार्थिक बाब असो, मनाची एकाग्रता असल्याशिवाय यश प्राप्त होणे अशक्य आहे.
अगदी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्याकडेही मनाची एकाग्रता असेल तरच त्याला योग्यप्रकारे अभ्यास करता येतो. विषयाचे आकलन चांगल्या रितीने होते आणि परिक्षेमधे उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होता येते. त्याच्या भावी जीवनाचा पाया पक्का होतो. असो.

**येथे सहावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे ध्यानयोगाचे सविस्तर विवेचन केलेले आहे.
ध्यानयोगाच्या साधनेने आपले मन आणि इंद्रियांचे संयमन कसे करायचे, त्यांना योग्य वळण कसे लावायचे ते सांगितले. ध्यानयोग सिद्ध झालेल्या आणि पूर्णावस्थेला पोहोचलेल्या साधकाची अवस्था कशी होते तेही सांगितले. इंद्रियनिग्रह करून निष्काम कर्म करणारा योगी, हा तपस्वी किंवा ज्ञानी किंवा सकाम कर्म करणाऱ्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असतो म्हणून तूं योगी म्हणजेच **कर्मयोगी** हो असे अर्जुनाला सांगितले. इतके सांगून झाल्यावर अखेरीस ' जो माझ्या ठिकाणी अंत:करण ठेवून श्रद्धेने मला भजतो त्यालाच मी सर्वांत उत्तम योगी समजतो.' असे सांगितले.
काही विद्वानांनी,' गीतेच्या पहिल्या सहा अध्यायांत कर्मयोगाचे प्रतिपादन केलेले आहे, दुसऱ्या सहा म्हणजे अध्याय सात ते बारा ह्या अध्यायांत भक्तियोगाचे प्रतिपादन केलेले आहे आणि तिसऱ्या सहा म्हणजे अध्याय तेरा ते अठरा ह्या अध्यायांत ज्ञानयोगाचे प्रतिपादन केलेले आहे.' असे मत मांडलेले आहे. त्यासाठी यथायोग्य युक्तिवादही केला आहे. हा वादाचा विषय आहे. ह्यावर अनेक युक्तिवाद आणि प्रतिवाद केले गेलेले आहेत. परंतु हे मत तत्त्वत: खरे वाटत नाही. मुख्य म्हणजे गीतेच्या कोणत्याही अध्यायामधे, कोणत्याही विषयाचे विवेचन असले तरीही त्यामागे श्रीकृष्णाचा मूळ हेतू स्पष्ट आहे. ' युद्ध करायचे नाकारणाऱ्या अर्जुनाला युद्धासाठी परत उभे करणे!' हाच मुख्य आणि एकमेव हेतू आहे. त्यामुळे निष्काम कर्मयोग हाच गीतोपदेशाचा मुख्य विषय असून, इतर सर्व विषय हे त्याच्या समर्थनासाठीच आलेले असणार, ही गोष्ट आपण सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे असे मला प्रामाणिकपणे वाटते.
ह्या अध्यायामधे ज्याचे विवेचन केलेले आहे तो पातंजलयोग अगर ध्यानयोग हा देखील, आपल्या मन आणि इंद्रियांवर ताबा मिळवून, त्यायोगे निष्काम कर्मयोगाचे यथायोग्य आचरण करता यावे यासाठीच सांगण्यात आलेला आहे. त्यामुळे गीतेचे असे तीन विभाग करणे मला तरी योग्य वाटत नाही. असे असले तरीही यापुढे **' गीतोपदेशरूपी गंगेचा प्रवाह '** ध्यानयोगाकडून, ज्ञान-विज्ञान, ईश्वर शरणभाव आणि त्या मधले सातत्य ह्या मार्गाने, भक्तियोगाकडे वळायला सुरवात होणार आहे ही गोष्ट सत्य आहे.
आता पुढील अध्यायामधे भगवान ज्ञान आणि विज्ञान म्हणजे काय, त्याची एकूण व्याप्ती किती तसेच ह्या विश्वाच्या रचनेचे रहस्य काय आहे, ह्याविषयी काय काय सांगतात ते पाहूया! अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

# अध्याय सातवा

## — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या सातव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे श्रीकृष्णाने, माणसाला निष्काम कर्मयोगाचे यथायोग्य आचरण करता येण्यासाठी ध्यानयोग महत्त्वाचा आहे असे सांगितले. ध्यानयोगाच्या साधनेने आपले मन आणि इंद्रियांचे संयमन कसे करायचे, त्यांना योग्य वळण कसे लावायचे ते सांगितले. ध्यानयोग सिद्ध झालेल्या आणि पूर्णावस्थेला पोहोचलेल्या साधकाची अवस्था कशी होते तेही सांगितले.

त्यानंतर अर्जुनाच्या प्रश्नावरून, मन हे चंचल असून त्याला आपल्या ताब्यात ठेवणे, त्याचा निग्रह करणे अत्यंत कठीण असले तरी अशक्य नाही. नित्य अभ्यासाने आणि वैराग्याने ते स्वाधीन ठेवता येते असे सांगितले.

तसेच ज्याची साधना अर्धवट राहिली अशा साधकाला, मृत्यूनंतर कोणती गती मिळते त्याविषयीही सविस्तरपणे सांगितले.

त्यानंतर, ' इंद्रियनिग्रह करून निष्काम कर्म करणारा योगी हा तपस्वी किंवा ज्ञानी किंवा सकाम कर्म करणाऱ्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असतो, म्हणून तू योगी म्हणजेच **कर्मयोगी** हो.' असे सांगून, अखेरीस ' जो माझ्या ठिकाणी अंत:करण ठेवून श्रद्धेने मला भजतो त्यालाच मी सर्वात उत्तम योगी समजतो ' असे सांगितले.

आपले विहित कर्म सातत्याने करीत राहायचे आणि तसे करीत असताना मन मात्र परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करायचे.

लीन करायचे, एकरूप करायचे, एकरस करायचे, एकसंध करायचे आणि अत्यंत श्रद्धेने व भक्तिभावाने सतत त्याचेच चिंतन, मनन, भजन, पूजन करीत रहायचे. मनाची अशी अवस्था झाली पाहिजे की, एका परमेश्वराखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयामधे थोडीही आसक्ती उरता कामा नये. आपले कर्तव्य देखील परमेश्वरार्पण बुद्धीनेच केले गेले पाहिजे. परमेश्वराच्या विस्मरणाची किंवा वियोगाची कल्पनाही सहन होता कामा नये आणि कधी तशी वेळ आलीच तर, पाण्याबाहेर काढलेला मासा जसा जिवाच्या आकांताने तडफडतो, तशी मनाची तडफड व्हायला पाहिजे. जगण्यासाठी श्वासोच्छवास जितका आवश्यक असतो, तितकेच परमेश्वराचे भजन पूजन करणे आवश्यक झाले पाहिजे. त्याशिवाय जगणे अशक्य व्हायला हवे. असे झाले म्हणजे मग ध्यानयोग सिद्ध झाला असे म्हणता येईल. असा योगी सर्वोत्तमाला म्हणजेच परमेश्वराला प्रिय होतो असे म्हणता येईल.

परंतु, जोपर्यंत भगवंताचे स्वरूप, त्याचे गुण, त्याचा प्रभाव, त्याची व्याप्ती, त्याची शक्ती, त्याचा विस्तार ह्या विषयीची संपूर्ण माहिती होत नाही आणि त्याचे भजन कसे करायचे ते समजून येत नाही तोपर्यंत आपल्या मनाकडून त्याचे अखंडपणे, निरंतर भजन होणे कठीण आहे. **' भगवान् '** ह्या शब्दाला विशेष अर्थ आहे. सनातन धर्मशास्त्राने सांगितलेला तो अर्थ आपण समजून घेऊया.

**भग** आणि **वान्** ह्या दोन शब्दांचा संधी होऊन **भगवान्** हा शब्द झाला आहे.

**' भग '** ह्याचा अर्थ सहा प्रकारचे **अलौकिक** म्हणजे इतरत्र कोठेही पहायला न मिळणारे आणि **अमर्याद** म्हणजे ज्याला कोणतीही मर्यादा नाही असे सामर्थ्य किंवा ऐश्वर्य आणि **' वान् '** म्हणजे युक्त असणे किंवा स्वत:जवळ बाळगून असणे.

सहा प्रकारचे ऐश्वर्य कोणते? ते पुढील प्रमाणे सांगितलेले आहे.

१) समग्र विश्वाची सतत, उत्पत्ती - स्थिती - लय करण्याचे सामर्थ्य.

२) जीवाला जन्म, मृत्यू आणि त्याच्या कर्मानुसार फळ देण्याचे सामर्थ्य.

३) सर्व प्रकारचे वैभव, संपत्ती, सत्ता आणि सन्मान ह्यांचे भांडार किंवा आश्रयस्थान.

४) परम वैराग्याचे भांडार किंवा आश्रयस्थान.

५) सर्व प्रभावी आणि अत्यंत गूढ अशी माया रचण्याचे सामर्थ्य.

६) जीवाला त्या गूढ मायेच्या सागरातून तारून नेण्याचे सामर्थ्य. अमर्याद तारकत्व.

ह्या सहा प्रकारच्या सामर्थ्यांनी किंवा ऐश्वर्यांनी जो युक्त आहे तो **' भगवान् '** होय.

गीतेमध्ये कोठेही **' श्रीकृष्ण उवाच –'** असे म्हटलेले नाही. त्याचे अव्यक्त असलेले परमात्म स्वरूप आणि त्याचे सर्वोच्च सामर्थ्य, अत्यंत आदराने आणि विनयाने दर्शविण्यासाठी, **' श्रीभगवान् उवाच –'** असे शब्द वापरलेले आहेत.

श्रीकृष्णाच्या अगोदर परमेश्वराचे सात अवतार होऊन गेले आणि त्याच्या नंतर नववा अवतारही ( गौतम बुद्ध ) होऊन गेला आहे. त्या सर्व अवतारांच्यापैकी कोणीही आपले दैवी सामर्थ्य प्रगट केलेले नाही. किंबहुना ' मी परमेश्वराचा अवतार आहे.' असे कोणीही सांगितलेले नाही. कदाचित त्यांना स्वत:ला ते माहीतही नसेल. तशी शक्यता आहे.

परंतु श्रीकृष्णाला मात्र **' तो परमेश्वराचा अवतार आहे.'** हे माहीत होते.

त्याचे पूर्वी होऊन गेलेले सर्व जन्म त्याला आठवत होते. कारणपरत्वे तो तसे स्पष्टपणे सांगत होता.
प्रसंगानुरूप आपले दैवी सामर्थ्य प्रगटही करीत होता.
तो सर्वगुणमंडित, सर्व सामर्थ्यवान, अद्वितीय आणि एकमेव पुरुष होता.
त्याला समकालीन असलेल्या सर्व लोकांना त्याचे दैवी सामर्थ्य सतत जाणवत होते.
म्हणूनच त्याला **' पूर्णावतार '** मानले गेले आहे. अत्यंत आदराने **' भगवान् '** म्हटले गेलेले आहे.
आता ह्यापुढे श्रीकृष्ण भगवान् आपले स्वरूप, आपले गुण, आपला प्रभाव ह्याविषयी सांगायला सुरवात करीत आहेत.
ज्ञान आणि विज्ञान म्हणजे काय?, परमेश्वराची अपरा आणि परा प्रकृती आणि त्यांचे परिणाम कोणते?
ह्याविषयी समजावून सांगणार आहेत. सातव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे.
तो अर्जुनाला सांगतो आहे की,

**श्रीभगवानुवाच :**
**मय्यासक्तमनाः पार्थ योगम् युञ्जन्मदाश्रयः ।**
**असंशयम् समग्रम् माम् यथा ज्ञास्यसि तत् छृणु ॥ १ ॥**
**ज्ञानन् तेऽहम् सविज्ञानम् इदम् वक्ष्याम्यशेषतः ।**
**यत् ज्ञात्वा नेह भूयोऽन्यत् ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥**
**मनुष्याणाम् सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानाम् कश्चिन् माम् वेत्ति तत्वतः ॥ ३ ॥**

हे पार्था ! माझ्या ठिकाणी चित्त ठेवून व माझाच आश्रय करून कर्मयोग आचरीत असता तुला माझे यथार्थ ज्ञान होईल ते ऐक. विज्ञानासहित हे ज्ञान मी तुला पूर्णपणे सांगतो. ते ज्ञान जाणले असता या लोकी पुन्हा दुसरे काहीही जाणावयाचे शिल्लक रहात नाही. हजारो मनुष्यांमधे एखादाच सिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि प्रयत्न करणाऱ्या ह्या अनेक सिद्ध पुरुषांपैकी एखाद्यासच माझे खरे ज्ञान होते.
जरी येथे, सिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक साधकांनाही **' सिद्ध पुरुष '** म्हटले असले तरीही पुढे लगेच,
' त्यांच्यापैकी एखाद्यालाच माझे खरे ज्ञान प्राप्त होते.' असे सांगितलेले आहे.
म्हणून, ' ज्यांची साधना पूर्ण होऊन भगवंताचे यथार्थ ज्ञान प्राप्त होते,' तेच सिद्ध पुरुष होत. साक्षात्कारी पुरुष होत. असाच अर्थ घ्यायला हवा. बाकीचे सगळे **साधकच** असतात. ते आपापल्या परीने आणि आपापल्या मार्गाने, यथाशक्ती यथामती, सदैव साधना करीत राहतात. ही गोष्ट कायमची लक्षात ठेवली पाहिजे. अहोऽऽ, माऊंट एव्हरेस्टच्या शिखरावर जाण्याच्या हेतूने हजारो लोक प्रयत्न करीत असतात. परंतु त्यांच्यातला एखादाच शिखरावर पोहोचतो. त्यातलाच हा प्रकार आहे.

**भूमिरापोऽनलो वायुः खम् मनो बुद्धिरेवच ।**
**अहंकार इतीयम् मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥**
**अपरेयमितस्त्वन्याम् प्रकृतिम् विद्धि मे पराम् ।**
**जीवभूताम् महाबाहो ययेदम् धार्यते जगत् ॥ ५ ॥**
**एतद्योनीनि भूतानि सर्वाणित्युपधारय ।**
**अहम् कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥**
**मत्तः परतरन् नान्यत् किंचिदस्ति धनंजय ।**
**मयि सर्वमिदम् प्रोतम् सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥**

पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू , आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार मिळून आठ प्रकारे विभागलेली ही माझी प्रकृती आहे. हे महाबाहो अर्जुना ! ही खालच्या प्रतीची प्रकृती झाली. ह्या शिवाय माझी, जिने ह्या जगाचे धारण होते अशी, श्रेष्ठ प्रतीची जीवस्वरूपी दुसरी प्रकृती आहे असे समज. ह्या दोहोंपासून सर्व भूते उत्पन्न होतात असे समज. मीच ह्या सर्व जगताचे मूळ व शेवट आहे. हे धनंजया! माझ्याहून पलीकडचे असे दुसरे काहीही नाही. दोऱ्यात अनेक मणी ओवावे त्याप्रमाणे माझ्या ठायी हे सर्व ओवलेले आहे.

**एकाच परमेश्वराची दोन प्रकारची प्रकृती आहे.**

पहिली प्रकृती ही **' अपरा '** म्हणजे जड म्हणजेच तुलनात्मक दृष्टीने कनिष्ठ आहे.
पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते, तसेच मन, बुद्धी आणि अहंकार हे ह्या पहिल्या प्रकृतीचे आठ विभाग

आहेत. ही स्वभावत: चेतनाहीन आहे. तिला स्वत:ला एकटीला कशाचीही निर्मिती करता येत नाही.
तिलाच **' अष्टधा प्रकृती '** असेही म्हणतात.
ह्या शिवाय दुसऱ्या प्रकारची प्रकृती ही **' परा '** म्हणजे चैतन्यरूप म्हणजेच सर्वार्थाने श्रेष्ठ आहे.
ही अनादि आहे, अनंत आहे, अखंड आहे, अजर आहे, अमर आहे, अविनाशी आहे. असे असले तरीही, तिला देखील एकटीला कशाचीही निर्मिती करता येत नाही. जेव्हा तिचा पहिल्या प्रकृतीशी संयोग होतो तेव्हाच जड प्रकृती सजीव होते. सचेतन होते. पंचमहाभूते क्रियाशील होतात. मन क्रियाशील होते. बुद्धी क्रियाशील होते. अहंकार क्रियाशील होतो. त्यानंतरच सर्व ब्रह्मांडाचा विशिष्ट कालावधीत, विशिष्ट क्रमाने आणि विशिष्ट पद्धतीने विस्तार होतो.
तिलाच **पुरुष** किंवा **जीव** किंवा **आत्मा** किंवा **ब्रह्म** असे म्हणतात.
ह्याला समांतर असे व्यवहारातील उदाहरण सांगायचे म्हणजे विजेचा प्रवाह.
वीज ही अस्तित्वात असली तरीही, जोपर्यंत धन आणि ऋण टोके एकमेकांना जोडली जात नाहीत, तोपर्यंत विद्युत प्रवाह क्रियाशील होऊ शकत नाही. आपल्याला त्याचे परिणाम दिसू शकत नाहीत. हे जसे घडते, त्याच प्रमाणे —
प्रकृती आणि पुरुष ह्यांचा संयोग घडून येतो तेव्हाच सर्व विश्वाची निर्मिती घडून येते.
ह्या निर्मितीमधे सर्व चल आणि अचल, सजीव आणि निर्जीव वस्तुमात्र समाविष्ट होतात. खरे सांगायचे म्हणजे, आपल्या दृष्टीला एखादा पदार्थ सजीव किंवा निर्जीव वाटत असला तरीही, **निर्जीव** असा पदार्थ अस्तित्वातच नसतो. अगदी एखाद्या दगडाचा विचार केला तरीही तो अणूंचाच बनलेला असतो आणि त्या अणूंमधेसुद्धा, **इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन आणि प्रोटॉन** हे रेणू कार्यरत असतात. त्यांना अत्यल्प का होईना, वस्तुमान असते. **( अपरा प्रकृती.)**
अणूची ही रचना सर्व वस्तुमात्रांमधे सारखीच असते आणि त्या सूक्ष्म पातळीवर पदार्थ नांवाची गोष्ट अस्तित्वातच नसते.
तेथे केवळ चैतन्य क्रियाशील असते. **( परा प्रकृती.) ( Attraction, Repulsion and Binding Energy.)**
आकर्षित करणारी म्हणजेच जवळ ओढणारी, अपसरण करणारी म्हणजेच दूर ढकलणारी आणि बंधक म्हणजेच एकत्र बांधून ठेवणारी अशी तीन प्रकारची ऊर्जा तेथे सतत कार्य करीत असते. ती ऊर्जा रेणूंना विशिष्ट प्रकारचे कार्य करायला प्रवृत्त करते म्हणूनच अणूला त्याचे अस्तित्व प्राप्त होते. अणूला **' अणू - रूप '** प्राप्त होते. जेव्हा चैतन्य क्रियाहीन होते तेव्हा अणूचे अस्तित्व आपोआप नाहीसे होते. म्हणून **' परा प्रकृती '** हीच सर्व जगताचा आधार आहे असे सांगितलेले आहे.
तीच सर्व विश्वाची निर्मिती करणारी आहे आणि शेवट करणारीही आहे. ती एकमेव आहे. तिच्या अलीकडे व पलीकडे दुसरे काहीही नाही. ज्याप्रमाणे माळेमधील सर्व मण्यांचा आधार दोराच असतो, दोरा नसला तर मणी एकत्र राहू शकणार नाहीत, त्याचप्रमाणे **परा** प्रकृतीच्या आधारानेच, कनिष्ठ अशा **अपरा** प्रकृतीच्या द्वारे, सकल विश्व अस्तित्वात आले आहे.
**ज्ञान** आणि **विज्ञान** ह्या दोन शब्दांचा अर्थ वेगवेगळा आहे.
**ज्ञान** म्हणजे काय? आणि **विज्ञान** म्हणजे काय? ते नीट समजून घ्या.
**परा** प्रकृतीशी संयोग झाल्यावर, **अपरा** प्रकृतीमधून विविध नाशवंत पदार्थ कसे निर्माण होतात? त्यांचे गुणधर्म कोणकोणते असतात? त्यांच्या क्रिया - प्रतिक्रिया कशा घडून येतात? आणि अखेरीस ते कसे नाश पावतात?
ह्या विषयीची समग्र माहिती म्हणजेच **' विज्ञान '** होय.
आपल्याला शाळा - कॉलेजामधे शिकवली जाणारी भौतिक जगाविषयीची सर्व माहिती, जगामधली सर्व भौतिक शास्त्रे आणि जगाविषयी अनुभवाने प्राप्त होणारी सगळी माहिती म्हणजे विज्ञान आहे. हे जे विज्ञान आहे, ते सारखे बदलत असते.
त्याविषयी संशोधन नेहमीच चाललेले असते. त्यामुळे सतत नवीन माहिती मिळत असते.
परिणामी अगोदरची माहिती अपूर्ण किंवा खोटी ठरते. ती बदलावी किंवा वगळावी लागते.
म्हणूनच पंचवीस वर्षांपूर्वीचा डॉक्टर किंवा इंजिनिअर, आजच्या डॉक्टर किंवा इंजिनिअरच्या तुलनेत मागासलेला ठरतो.
तसेच आजच्या डॉक्टर किंवा इंजिनिअरच्या तुलनेत, पंचवीस वर्षानंतरचा भावी काळांतला डॉक्टर किंवा इंजिनिअर पुढारलेला असेल.
सर्व भौतिक शास्त्रांच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. असो.
विश्वामधे अस्तित्वात असलेल्या सर्व विनाशी पदार्थांच्यामधे, एकच अविनाशी शक्ती भरून राहिलेली आहे. तिच्या आधारानेच सर्व विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय होत असतो. हे सत्य समजणे, आणि ह्या सत्याची अनुभूती येणे म्हणजेच **' ज्ञान '** होय.
ज्ञान आणि विज्ञान ह्यांच्यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी आपण एक उदाहरण विचारामधे घेऊया.
भूमितीशास्त्र आपल्याला चांगलेच माहीत आहे. **( Geometry )**
त्यामधे, कागदावर पेन्सिलीच्या सहाय्याने काढता येणाऱ्या निरनिराळ्या आकारांच्या अचूक व्याख्या सांगितलेल्या आहेत.

आपण त्या तपासून पाहू शकतो आणि वैज्ञानिक कसोटीवर त्या सिद्ध करता येतात. त्यातील काही व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

१) रेषा म्हणजे काय? **( What is a line?)**

**( It is a geometric figure formed by a given point moving along a fixed direction and the reverse direction.)**

अर्थ – एका ज्ञात **' बिंदू '** च्या, पुढे किंवा मागे हालचाल करण्यामुळे, तयार होणारा भौमितिक मार्ग **( बिंदुपथ )** किंवा आकृती म्हणजे रेषा होय.

२) सरळ रेषा म्हणजे काय? **( What is a straight line?)**

**( It is the shortest distance between two given points.)**

अर्थ – दोन ज्ञात **' बिंदू '** मधील कमीतकमी अंतराला सरळ रेषा असे म्हणतात.

३) समांतर रेषा म्हणजे काय? **( What is a parallel line?)**

**( It is the locus of a given point, from a given line, at a fixed distance.)**

अर्थ – एका ज्ञात **' बिंदू '** चा, एका ज्ञात रेषेपासून, ठराविक अंतरावरून फिरण्याचा मार्ग **( बिंदुपथ )** म्हणजे समांतर रेषा होय.

४) वर्तुळ म्हणजे काय? **( What is a circle?)**

**( It is the locus of a given point, from another given point at a fixed distance.)**

अर्थ – एका ज्ञात **' बिंदू '** चा, दुसऱ्या ज्ञात **' बिंदू '** पासून, ठराविक अंतरावरून फिरण्याचा मार्ग **( बिंदुपथ )** म्हणजे वर्तुळ होय.

किती शास्त्रशुद्ध आणि अचूक व्याख्या केलेल्या आहेत पहा.

ह्यापैकी प्रत्येक व्याख्येमधे बिंदूचा संदर्भ घेतलेला आहे. ह्या बिंदूपासूनच वक्र रेषा, सरळ रेषा, वर्तुळ, दीर्घवर्तुळ, कोन, त्रिकोण, चौकोन, बहुभुजाकृती आणि एकूणच सगळ्या भूमितीशास्त्राची निर्मिती झाली आहे.

आपल्याला दिसणारा किंवा कदाचित् फक्त कल्पना करता येईल असा कोणताही आकार, कागदावर काढून व्यक्त करण्यासाठी बिंदूचा आधार घ्यावाच लागतो. भूमितीशास्त्राची सुरवातच **' बिंदू '** ने होते. मग ह्या बिंदूची व्याख्या काय आहे?

५) **बिंदू** म्हणजे काय? **( What is a point ?)**

**( Point is the basic term of geometry, which exsists without any dimension and have no properties. It just specifies an exact location, which can be identified by, either a number or a letter.)**

अर्थ – बिंदू म्हणजे भूमिती शास्त्रामधील अशी एक मूलभूत संज्ञा की, ' जी अस्तित्वात आहे आणि एखादे ठिकाण अचूकपणे दर्शवते. पण जिला लांबी, रुंदी, उंची किंवा खोली असले कोणतेही माप नाही, जिला कोणताही गुणधर्म नाही आणि जिचा, एखादे नांव देऊन, फक्त उल्लेख करता येतो.'

अरे ऽऽ? हा काय प्रकार आहे? असे कसे काय शक्य आहे?

जी दिसत नाही, जी मोजता येणार नाही, जी दाखवता येणार नाही, जिला कसलेही माप नाही,

जिला आधुनिक विज्ञान **' वस्तू किंवा गोष्ट '** म्हणायलाही तयार नाही, अशी एखादी संज्ञा आहे असे कसे म्हणता येईल?

हा वेडेपणा नाही काय? ही अंधश्रद्धा नाही काय? **नाही! हा वेडेपणा नाही! ही अंधश्रद्धा नाही!**

आपल्याला दिसत नसला, दाखविता येत नसला, तरीही बिंदू अस्तित्वात आहे असे मानावेच लागते! तसे मानले नाही तर भूमितीचा प्रवास सुरूच होऊ शकत नाही.

'' भूमितीशास्त्रामधे एका **' बिंदू '** च्या सहाय्याने विविध आकार कसे निर्माण होतात?, त्यांचे गुणधर्म कोणकोणते असतात?, आणि एकमेकांचे बरोबर त्यांच्या क्रिया - प्रतिक्रिया कशा घडून येतात?, '' ह्या विषयीच्या सविस्तर, समग्र आणि संपूर्ण माहितीला **विज्ञान** असे म्हणता येईल. आणि —

'' भूमितीशास्त्रामधे अस्तित्वात असलेल्या सर्व आकारांच्यामधे, एकच अविनाशी बिंदू भरून राहिलेला आहे. त्याच्या आधारानेच सर्व भूमिति शास्त्राची उत्पत्ती होते, '' हे समजणे, आणि ह्याची अनुभूती येणे ह्याला **ज्ञान** म्हणता येईल. असो.

आता पदार्थांचा जो मुख्य गुणधर्म असतो आणि ज्या गुणधर्मामुळेच तो पदार्थ तसा ओळखला जातो,

तो गुणधर्म **' मी '** म्हणजेच परमेश्वर आहे **( परा प्रकृती )** असे सांगायला सुरवात होते आहे.

**रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययो: ।**
**प्रणव: सर्ववेदेषु शब्द: खे पौरुषन् नृषु ॥ ८ ॥**
**पुण्यो गन्ध: पृथिव्याञ् च तेजश्चास्मि विभावसौ ।**
**जीवनम् सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥**
**बीजम् माम् सर्वभूतानाम् विद्धि पार्थ सनातनम् ।**
**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥**
**बलम् बलवताम् चाहम् कामरागविवर्जितम् ।**
**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥**
**ये चैव सात्विका भावा: राजसास्तामसाश्च ये ।**
**मत्त एवेति तान् विद्धि न त्वहन् तेषु ते मयि ॥ १२ ॥**

हे कौंतेया ! पाण्यामधे रस मी, चंद्रसूर्यांमधली प्रभा मी, सर्व वेदांमधला ओंकार मी, आकाशात शब्द मी आणि सर्व पुरुषांतील पौरुषत्व मी आहे. पृथ्वीमधे पवित्र सुगंध मी, अग्नीमधील तेज मी आहे. सर्व भूतमात्रातील जीवनशक्ती मी आणि तपस्व्यांमधील तप मी आहे. हे पार्था ! सर्व भूतांचे सनातन बीज मी आहे असे समज. बुद्धिमान लोकांची बुद्धी मी आणि तेजस्वी पुरुषांचे तेजही मीच आहे. बलवानांचे आसक्ती व कामनारहित असे जे सामर्थ्य ते मी आहे आणि हे अर्जुना! सर्व भूतमात्रामधे धर्मानुकूल असा काम मीच आहे. जे काही सात्त्विक, राजस किंवा तामस भाव आहेत ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न होतात.
पण **‘ ते ’** माझ्यात आहेत, **‘ मी ’** त्यांच्यात नाही.

पाण्याचा मुख्य गुणधर्म म्हणजे पाण्याचा **प्रवाहीपणा. ( Fluidity.)** प्रवाहीपणा नसेल तर पाणी हे पाणी राहणारच नाही.
सूर्याचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्याचा **तेजस्वी प्रकाश** आणि चंद्राचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्याचा **शीतल प्रकाश.**
तशा प्रकारचा प्रकाश नसेल तर त्यांना चंद्र - सूर्य कोण म्हणेल?
सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ती आकाशापासून सुरू झाली अशी शास्त्रांची मान्यता आहे.
आकाशाचा एकमेव गुणधर्म म्हणजे **शब्द.** तीच आकाशाची ओळख आहे.
पंचमहाभूतांच्यापैकी पहिले, शब्द हा एकच गुणधर्म असलेले आकाश उत्पन्न झाल्यावर त्याचे अस्तित्व त्याच्या निर्मात्याला म्हणजेच परमेश्वराला जाणवण्यासाठी पहिला शब्दोच्चार निर्माण झाला. हा पहिला शब्द म्हणजेच ॐ, म्हणजेच **ओंकार**. अशी मान्यता आहे. म्हणूनच ओंकार हा **आदिशब्द** किंवा **आदिनाद** म्हणून मानला गेला आहे. **शब्दब्रह्म** म्हणून मानला गेला आहे. **नादब्रह्म** म्हणून मानला गेला आहे. ह्या ओंकारापासूनच पुढे सर्व ब्रह्मांडाची रचना झाली. ओंकार हा चारही वेदांचे उगमस्थान आहे.
पुरुषाचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्याचे **पौरुषत्व.** ज्याच्यामधे पौरुषत्व नाही त्याला पुरुष कोण म्हणेल?
पृथ्वीचा मुख्य गुणधर्म म्हणजे तिचा **गंध.** तिचा मूळचा अंगभूत असा गंध.
कोणतीही भेसळ झालेली नसलेल्या शुद्ध मातीचा पवित्र असा **सुगंध.**
अग्नीचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्याचे **तेज.** तेज नाहीसे झाले म्हणजे अग्नी विझला. अग्नी नाहीसा झाला आणि केवळ राख उरली.
तपस्वी माणसाचा मुख्य गुणधर्म म्हणजे त्याची **तपश्चर्या.** शुद्ध हेतूने केलेली तपश्चर्या. तपहीन माणसाला तपस्वी म्हणत नाहीत.
सर्व भूतमात्रामधील मुख्य गुणधर्म म्हणजे त्यांच्यामधे असलेली **जीवनशक्ती.** ही जीवनशक्ती म्हणजेच **चैतन्य.**
एकदा का चैतन्य नाहीसे झाले म्हणजे मग जीवन संपले. भूतमात्रांचे अस्तित्वच संपले.
जे कधीही नष्ट होत नाही आणि प्राचीन असूनही नवीन, अद्ययावत् **( Latest )** असेच असते, त्याला **‘ सनातन ’** असे म्हणतात.
**बीजा** मधूनच वृक्ष निर्माण होतो. बीज म्हणजे बी नसेल तर वृक्षाचे असणेही अशक्य आहे. परमेश्वर हाच सर्व भूतांचे उगमस्थान आहे. सर्व भूतमात्राचा निर्माता, पालनकर्ता आणि आधार तसेच नाश करणाराही तोच आहे. म्हणून तोच सर्व भूतांचे **‘ सनातन बीज ’** आहे.
बुद्धिमान माणसाचा मुख्य गुण म्हणजे त्याची **शुद्ध बुद्धी.**
ज्याच्याकडे विशेष अशी बुद्धिमत्ता असते त्यालाच **बुद्धिमान** असे म्हणतात.
तेजस्वी माणसाचा मुख्य गुण म्हणजे त्याच्या मुखावरील अपूर्व असे, विशेष असे आणि प्रभावशाली असे **तेज.**
कोणत्याही तेजहीन माणसाला तेजस्वी म्हणत नाहीत.
बलवान माणसाचा मुख्य गुण म्हणजे त्याचे ठिकाणी असलेले **शुद्ध बल.**

विकाररहित बल. सर्व प्रकारच्या वासनांच्यापासून मुक्त असलेले बल.
सर्व भूतांच्या ठायी असलेला, धर्माला धरून असलेला, नीतीला धरून असलेला **' काम '** हा समाजाच्या स्थैर्यासाठी व सातत्यासाठी आवश्यक असतो. **( Stability & Continuity of the Society.)**
**' सत्व, रज आणि तम '** ह्या तीन गुणांच्या योगाने व्यक्त होणारे सर्व प्रकारचे जे इष्ट किंवा अनिष्ट भाव आहेत, त्यांची उत्पत्ती, विस्तार आणि विकास हा अपरा प्रकृतीच्या द्वारेच होत असला तरीही ती सुद्धा परमेश्वराचीच शक्ती आहे.
दुसरे म्हणजे अपरा प्रकृतीच्या द्वारे होणारी उत्पत्ती, विस्तार आणि संहार हा अखेरीस परा प्रकृतीच्या संयोगानेच होऊ शकतो. म्हणून ते सर्व भावही परमेश्वराचीच निर्मिती आहे असे सांगितलेले आहे. असे असले तरीही, सर्व गुण हे परमेश्वराचीच निर्मिती असली तरीही, स्वतः परब्रह्म परमात्मा हा गुणातीत आहे. सर्व गुणांना अंतर्बाह्य व्यापूनही, त्यांच्या पलीकडला आहे. म्हणूनच,
**' मी त्यांच्यामधे आहे परंतु ते माझ्यामधे नाहीत.'** असे विधान केलेले आहे. ह्या अगोदर ज्ञान आणि विज्ञान ह्यांचा अर्थ समजून घेताना आपण भूमितीशास्त्रामधील **' बिंदू '** ही संज्ञा पाहिली आहे.
ह्या विधानाच्या संदर्भामधे ते एक समर्पक असे उदाहरण आहे.
१) भूमितीशास्त्रामधे उत्पन्न होऊ शकणाऱ्या सर्व आकारांना निर्माण करणारा आणि आधार देणारा बिंदूच असतो. तरीही तो सर्व आकारांच्याहून वेगळाच असतो. सर्व आकारांमधे बिंदू असतात परंतु बिंदूमधे कोणताही आकार नसतो. बिंदूचे अस्तित्व आकारांच्यावर अवलंबून नसते. आकार असले काय किंवा नसले काय, बिंदू मात्र सदैव असतोच.
आपण आणखी काही उदाहरणे पाहूया. ती उदाहरणे अचूक नाहीत, परिपूर्ण नाहीत.
तरीही वरील विधानाचा अर्थ समजून घेण्यासाठी उपयोगी पडतील.
२) आकाशामधे उत्पन्न होणाऱ्या आणि मुक्तपणे विहार करणाऱ्या ढगांचा निर्माता आणि आधार आकाशच आहे. तरीही आकाश ढगांच्याहून वेगळे आहे. आकाशामधे ढग असतात परंतु ढगांमधे आकाश नसते. त्याचे अस्तित्व ढगांवर अवलंबून नसते.
ढग असले काय किंवा नसले काय, आकाश मात्र सदैव असतेच.
३) समुद्रामधे उत्पन्न होणाऱ्या लाटांना निर्माण करणारा आणि आधार देणारा समुद्रच असतो. तरीही समुद्र लाटांच्याहून वेगळाच असतो. समुद्रामधे लाटा असतात परंतु लाटांमधे समुद्र नसतो. त्याचे अस्तित्व लाटांवर अवलंबून नसते.
लाटा असल्या काय किंवा नसल्या काय, समुद्र मात्र सदैव असतोच.
४) कोळ्याचे जाळे सर्वांनी पाहिले असेल. ते जाळे निर्माण करणारा आणि त्याला आधार देणारा कोळीच असतो. तरीही कोळी जाळ्याहून वेगळा असतो. तो जाळ्यामधे नसतो. त्याचे अस्तित्व जाळ्यावर अवलंबून नसते. जाळे असले काय किंवा नसले काय, कोळी मात्र असतोच. तो आधी एकटाच असतो. स्वतःमधून जाळे निर्माण करतो. त्या जाळ्यामधे काही काळ राहतो. नंतर ते जाळे मोडून टाकतो आणि पुन्हा एकटाच उरतो.
५) पाण्याने भरून वाहणारा मातीचा माठ पाहिला तर त्याच्या आत बाहेर सगळीकडे पाणी दिसून येते. तरीही पाणी माठाहून वेगळे असते. माठामधे पाणी असते. त्याचा संपूर्ण देह पाण्याने व्यापलेला असतो. परंतु पाण्यामधे माठ नसतो. माठाने पाणी व्यापलेले नसते.
माठ असला काय किंवा नसला काय, पाणी मात्र सदैव असतेच.
त्याचप्रमाणे दोरा हाच माळेची निर्मिती करणारा आणि सर्व मण्यांना आधार देणारा असतो.
त्याच्या आधाराने सर्व मणी एकत्र राहतात. पाहणाऱ्याला दोरा दिसतच नाही. मणीच दिसतात. परंतु दोऱ्यामधे मणी ओवलेले असूनही, दोरा मण्यांच्याहून वेगळा असतो. मण्यांमधे दोरा नसतो आणि तो मण्यांच्या आधाराने राहातही नसतो.
मणी असले काय किंवा नसले काय, दोरा मात्र असतो. असो.

**त्रिभिर्गुणमयैर्भावैः एभिः सर्वमिदञ् जगत् ।**
**मोहितन् नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ।। १३ ।।**
**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।**
**मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतान् तरन्ति ते ।। १४ ।।**
**न माम् दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नरधमाः ।**
**माययापहृतज्ञानाः आसुरम्  भावमाश्रिताः ।। १५ ।।**

त्रिगुणात्मक भावांनी मोहीत होऊन हे सर्व जग, त्यांच्या पलीकडचा जो मी, त्या मला जाणत नाही. त्रिगुणात्मक अशी ही माझी दिव्य माया दुस्तर आहे. म्हणून जे मलाच शरण येतात ते ह्या मायेला तरून जातात. मायेने ज्यांचे ज्ञान नष्ट केले, ते मूढ व दुष्कर्मी नराधम, आसुरी बुद्धीत पडून मला शरण येत नाहीत.

परा प्रकृतीच्या संयोगाने, आधाराने आणि सहकार्यानेच, अपरा प्रकृतीद्वारे सर्व विश्वाची निर्मिती होत असली, तरीही नंतर अपरा प्रकृती म्हणजेच **' माया '** इतकी बलवान होते, इतकी प्रभावशाली होते, इतकी शिरजोर होते की, ती आपल्या निर्मात्याला म्हणजेच **' पुरुषाला '** सर्व बाजूनी झाकून टाकते. सर्व प्रकारे बांधून ठेवते. सर्वस्वी आपल्या नादाला लावते.
त्याचे असणेच संशयास्पद करून टाकते. पुरुष म्हणजेच **' जीवात्मा '** देखील तिच्यामधे स्वत:ला गुंतवून घेतो.
स्वत:चे अस्तित्व विसरतो. स्वत:ला सदैव तिच्याचद्वारे आणि तिच्यामधेच पहायला लागतो.
**' आपण म्हणजे तीच आहोत.'** असे समजायला लागतो.
' माझे हात! माझे पाय! माझे डोळे! माझे कान! माझे नाक! माझे मन! माझी बुद्धी! माझी आई! माझे वडील! माझे भाऊ! माझ्या बहिणी! माझी बायको! माझी मुलगी! माझा जावयी! माझे नातू!' असे म्हणायला लागतो.
त्यांच्यामधे गुरफटून जातो. परंतु जर त्याला कोणी असा प्रश्न विचारला की,
' बाबारेऽऽ, हे सगळे तुझे आहे असे म्हणतोस, म्हणजे तू ह्या सगळ्याहून वेगळा आहेस असा अर्थ होतो. हे सगळे म्हणजे तू नाहीस. तर मग तू कोण आहेस? तुझी ओळख काय आहे? जरा नीट सांगतोस का?' तर लगेच, —
' अरेच्चा! हा काय प्रश्न झाला? अहोऽऽ, मी **माधव दीक्षित**. ठाण्याला राहतो.
तुम्ही माझ्या घरी आलेले आहात. विसरलात की काय?' असेच उत्तर देतो.
माझे एक सोडून द्या. मी म्हणजे कोणतेही विशेष गुण नसलेला, विशेष बुद्धिमत्ता नसलेला असा, एक सर्वसामान्य माणूस आहे.
पण कोणीही माणूस, कितीही विद्वान असला, सुशिक्षित असला, सज्जन असला, प्रामाणिक असला, धार्मिक वृत्तीचा असला, देवपूजा करीत असला, सदैव इतरांना मदत करीत असला, तरीही कोणीही स्वत:ला ह्या सगळ्यापासून वेगळे मानू शकत नाही.
वेगळे करू शकत नाही. उलट त्यामधे अधिकाधिक अडकत जातो.
ह्या बाबतीत एक मुद्दा नेहमीच मांडला जातो आणि तो योग्यही आहे.
जोपर्यंत आपल्याला ह्या जगामधे, समाजामधे रहायचे आहे, वावरायचे आहे, तोपर्यंत प्रत्येक ठिकाणी स्वत:ची ओळख सांगावीच लागते. **( Self Identification.)** त्याशिवाय कोणालाही, कधीही, कोणताही व्यवहार करता येणार नाही.
हे सत्य नाकारता येणार नाही. परंतु आपण स्वत:ची म्हणून जी ओळख सांगतो, ती आपल्या शरिराची ओळख असते.
आपल्या देहाची ओळख असते. आपल्या व्यक्तिमत्वाची ओळख असते. आपल्या दृष्य अस्तित्वाची ओळख असते.
जरा विचार करा. तात्त्विक दृष्टीने पाहिले तर, —
**' श्रीयुत माधव गणेश दीक्षित.'** हे नांव माझ्या देहाचेच आहे. माझे नाही. हा देह म्हणजे मी नाही. मी ह्या देहामधे राहत असलो तरीही देहाहून निराळा आहे. ' ह्याची जाणीव मनामधे असणे अपेक्षित आहे.
' ह्या जगाच्या पाठीवर सहाशे कोटी मानवी शरिरे राहात आहेत आणि माझे शरीर हे त्यातलेच एक आहे.' अशी जाणीव ठेवली, म्हणजे मग ह्या देहाचे फाजील लाड करणे, नाही नाही ते चोचले पुरविणे आणि त्याची अवाजवी काळजी करणे आपोआप कमी होते. त्याच्या इच्छा, आकांक्षा, राग, लोभ, सुख, दु:ख, अहंकार, मानापमान इत्यादी बंधनामधून वेगळे व्हायची पूर्व तयारी करणे सुरू होते.
पण असा विचार कोण करतो? लाखामधे एखादा माणूस कदाचित करीत असेल.
पण तो अपवाद आहे आणि अपवादानेच नियम सिद्ध होत असतो. हीच तर खरी गंमत आहे आणि तीच खरी अडचणही आहे.
**' मी!, माझे!, मला!, माझ्यासाठी!, माझ्यामुळे!, माझ्याशिवाय!'** जन्म झाल्यापासून मरेपर्यंत हे सगळे चालू राहते.
ह्या चक्रामधून बाहेर पडता येत नाही. जिला **' माया '** म्हणून ओळखतात ती हीच आहे आणि ही खरोखरच अत्यंत प्रभावशाली आहे. ही माणसाचे सगळे ज्ञान गोठवून टाकते. त्याला अक्रिय करून टाकते. तो म्हणजे जणू काही एखादी लाकडी बाहुली असल्याप्रमाणे, त्याला सारखी नाचवीत राहते. म्हणून माया ही दुस्तर आहे, पार करण्यास, ओलांडून जाण्यास फार कठीण आहे असे म्हणतात. त्याच्यावर भागवतपुराणामधे एक आणि एकमेव उपाय सांगितलेला आहे.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।।**

' परमेश्वराला अनन्य भावाने शरण जाणे. सतत त्याच्या गुणांचे वर्णन ऐकणे. ते इतरांना सतत सांगणे. सतत त्याचेच नांव घेत राहणे. त्याच्या चरणी लीन होणे. त्याचेच पूजन करीत राहणे. त्याला नमस्कार करणे. मनापासून त्याचा दास होणे.
त्याच्या कार्यामधे स्वत:ला झोकून देणे. त्याला आपला जिवाभावाचा मित्र मानणे. आणि अशा प्रकारे साधना केल्यावर, सरते शेवटी तो आणि आपण वेगळे नसून एकच आहोत ह्याची खात्री पटणे. तशी अनुभूती येणे.' हाच तो एकमेव उपाय आहे.
समर्थ रामदास स्वामींनी दासबोधामधे सांगितलेली **' नवविधा भक्ती.'** हीच आहे.

ह्यालाच भगवंताची अनन्य भक्ती असे म्हणतात. ह्यालाच <u>**भक्तियोग**</u> असे म्हणतात.
येथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते. ती म्हणजे, —
हा उपाय करीत असताना, साधना करीत असताना, **कर्मत्याग** कधीही करायचा नाही. तसे करणे अपेक्षित नाही आणि योग्यही नाही.
जगामधे वावरताना आपले नांव, गाव, पत्ता, शिक्षण, कर्तृत्व, नातेसंबंध, ऋणानुबंध, ओळखीपाळखी वगैरे सगळे काही,
नीति - अनीतीच्या मर्यादा पाळून, गरजेनुसार इतरांना सांगत राहायचे. ते आवश्यक आहेच.
परंतु त्याच बरोबर स्वत:चे शरीर आणि त्याला चिकटून असलेल्या सर्व कामना, भावना आणि वासनांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व द्यायचे नाही. त्यांच्यामधे गुंतून रहायचे नाही. अडकून पडायचे नाही.
‘ मी म्हणजे शरीर नसून सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा एक अंश आहे. हे शरीर म्हणजे माझे <u>**साध्य**</u> नाही. तर परमेश्वरप्राप्तीसाठी, परमेश्वरानेच दिलेले एक <u>**साधन**</u> आहे.’ हे कधीही विसरायचे नाही.
आपण करीत असलेले प्रत्येक कर्म म्हणजे परमेश्वराची पूजा आहे असे समजायचे.
आपली कर्मरूपी फुले त्या सर्वसाक्षी परमेश्वराला सतत अर्पण करीत रहायचे.
त्याला अर्पण करायचे प्रत्येक फूल हे ताजे, चांगले आणि टवटवीत असले पाहिजे.
भगवंताच्या पूजेसाठी कोमेजलेली किंवा खराब फुले वाहून चालणार नाही.
म्हणजे आपले प्रत्येक कर्म हे चांगलेच असले पाहिजे, सत्कर्मच असले पाहिजे हे ओघाने आलेच.
फळाची आशा न ठेवता, आपले विहित कर्म उत्तम प्रकारे करीत रहायचे. तसे करणेच अपेक्षित आहे आणि आवश्यकही आहे. असो.

**चतुर्विधा भजन्ते माम् जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।। १६ ।।**
**तेषाम् ज्ञानी नित्ययुक्तः एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थम् अहं स च मम प्रियः ।। १७ ।।**
**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**
**आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमाम् गतिम् ।। १८ ।।**
**बहूनाञ् जन्मनामन्ते ज्ञानवान् माम् प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।। १९ ।।**

हे भरतश्रेष्ठा अर्जुना ! संकटात सापडलेले, ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगणारे, काम्य वासना मनात ठेवणारे आणि निष्काम बुद्धीने भक्ती करणारे ज्ञानी असे चार प्रकारचे लोक माझी भक्ती करतात. ह्यापैकी अनन्यभावे माझी भक्ती करणारा आणि नेहमीच निष्काम बुद्धीने वागणारा असा जो ज्ञानी, त्याची योग्यता विशेष होय. ज्ञान्याला मी अत्यंत प्रिय असतो व ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे. हे सर्वच भक्त चांगले होत पण त्यातल्या त्यात ज्ञानी म्हणजे मीच असे माझे मत आहे. कारण तो ज्ञानी स्थिरबुद्धी होऊन, अतिउत्तम गती जो मी, त्या माझ्याच ठायी स्थिरावलेला असतो. अनेक जन्मानंतर ‘ जे काही आहे ते वासुदेवच आहे!’ असे अनुभवास येऊन, ज्ञानवान् पुरुष मला येऊन मिळतो. असा महात्मा अत्यंत दुर्मिळ असतो.
साधारणपणे जगामधे सगळीकडे चार प्रकारचे भक्त दिसून येतात.
**आर्त**, **जिज्ञासु**, **अर्थार्थी** आणि **ज्ञानी** हे भक्तांचे चार प्रकार सांगितलेले आहेत.
त्यामधील पहिल्या तीन प्रकारचे भक्त आपण सगळे नेहमीच पाहात असतो.
परंतु चवथ्या प्रकारचा म्हणजे **ज्ञानी** भक्त दुर्मिळ असतो.
<u>**आर्त भक्ती**</u> म्हणजे, ‘ एखादे संकट समोर उभे राहिल्यावर, अडचणीत सापडल्यावर, भयभीत झाल्यामुळे, दु:खित झाल्यामुळे, देवाची आठवण करून त्याला हाका मारणे.’ होय. संकटे ही शारिरीक, मानसिक, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय अशी अनेक प्रकारची असू शकतात. ह्यांपैकी व्यक्तिगत जीवनासाठी पहिली चार संकटे विचारात घ्यायला हवीत.
कारण सामाजिक आणि राष्ट्रीय संकटे ही, सर्व समाजाने एकत्र येऊन आणि यथोचित असा प्रतिकार करूनच परतवावी लागतात. त्या बाबतीत, एक व्यक्ती, स्वत:च्या विशेष उल्लेखनीय अशा पराक्रमाच्या उदाहरणाद्वारे, समाजामधे चेतना निर्माण करू शकते.
परंतु एका मर्यादेपलीकडे व्यक्तिगत प्रयत्नांचा उपयोग होऊ शकत नाही.
त्यासाठी सर्व समाजालाच एकवटून यथायोग्य कृती करावी लागते. असो.
इतर वेळी येत असेल की नाही ते सांगता येणार नाही. परंतु समजा कधी नाही आली तरी,
<u>**संकटात सापडल्यावर माणसाला देवाची हमखास आठवण येते.**</u>

म्हणूनच कुंतीने देवाकडे मागितलेले मागणे फार प्रसिद्ध झालेले आहे. श्रीकृष्णाने, पांडवांच्या बाजूने कौरवांचे बरोबर केलेली शिष्टाई असफल झाली. त्यानंतर हस्तिनापुराहून पांडवांच्याकडे परत जाताना श्रीकृष्णाने तिला विचारले की,

' आत्तेऽऽ, सांग, मी तुला काय देऊ? तुला माझ्याकडून काय हवे आहे?'

' कृष्णाऽऽ, तू मला सदैव दु:ख दे. अनेक प्रकारची संकटे दे.'

' असे काय मागणे मागते आहेस? शांत होऊन, नीट विचार करून काय ते माग.'

तेव्हां कुंतीमातेने त्याला काय उत्तर दिले आहे ते नीट ऐका. ती म्हणाली की,

' अरेऽऽ, मी जेव्हा संकटामधे सापडलेली असते, दु:खी असते, तेव्हा मला सारखी तुझीच आठवण येते. मी सारखे तुझेच नांव घेते आणि तुलाच हाका मारीत असते. सुखामधे असताना तसे होत नाही. म्हणून तू मला दु:खच दे.' असो.

पांडुराजाच्या सहवासाचा काळ सोडला तर, कुंतीचे सर्व आयुष्य हे दु:खातच गेलेले आहे.

अत्यंत सुंदर, अत्यंत बुद्धिमान, अत्यंत मानी आणि अत्यंत प्रेमळ अशी ती राजमाता सदैव संकटांचाच सामना करीत होती.

अगदी युधिष्ठिर सम्राट झाल्यावरही ती सुखात नव्हती. त्यावेळीही तिला कर्णाच्या मृत्यूचे दु:ख बोचत होतेच.

अखेरीस पाचही मुलगे ' जाऊ नको.' असे सांगत असतानाही, सेवाधर्माचे पालन करण्यासाठी, ती धृतराष्ट्र आणि गांधारीच्या बरोबर वनामधे रहायला गेली. काही काळानंतर तिला, तेथे पेटलेल्या वणव्यामधे, धृतराष्ट्र आणि गांधारीच्या बरोबर जळून मृत्यू आला.

वैद्यकशास्त्र असे सांगते की, **' आगीत जळून आलेला मृत्यू हा सर्वांत जास्त वेदनादायक असतो.'**

त्या यातनामय अंतकाळीही, तिच्या मुखामधे श्रीकृष्णाचेच नांव आले असेल ह्यामधे संशय असण्याचे कारण नाही. असो.

**जिज्ञासु भक्ती** म्हणजे, ' परमेश्वर म्हणजे नक्की कोण आहे? कसा आहे? कोठे असतो? कसा राहतो? काय करतो? त्याचा प्रभाव कसा आहे? सामर्थ्य कसे आहे?' ह्याविषयी मनामधे कुतुहल निर्माण झाल्यामुळे, उत्सुक होऊन त्याच्याविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी, वाचन - मनन - चिंतन - पठण - पूजन इत्यादींच्या द्वारे सतत प्रयत्न करीत राहणे ' होय.

**अर्थार्थी भक्ती** म्हणजे, ' स्त्री, संतती, धनदौलत, शरीरस्वास्थ्य, प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार, प्रसिद्धी, मानमरातब, इत्यादी इहलोकीचे नाना प्रकारचे भोग, त्याचप्रमाणे परलोकीचे विविध भोग, स्वर्गप्राप्ती, इत्यादींची अभिलाषा बाळगून, त्यांच्या प्राप्तीच्या उद्देशाने व्रतवैकल्ये, जपतप, यज्ञयाग, नवस इत्यादींच्या द्वारे देवाचे पूजन करून, सतत प्रयत्न करीत राहणे ' होय.

देवाकडून काहीतरी मिळावे, आपल्याला जे हवे आहे ते अपेक्षित वेळी त्याने द्यावे म्हणून अगोदर त्याला काहीतरी द्यायचे, त्याची स्तुती करायची आणि आपले काम झाल्यावर आणखीन काहीतरी देण्याचे वचन द्यायचे, असे आपण सगळेच करीत असतो.

ह्यालाच व्यावहारिक भाषेत **' मस्का मारणे!'** असे म्हणतात.

**ज्ञानी भक्ती** म्हणजे, ' परमात्मतत्त्वाचे संपूर्ण ज्ञान झालेले आहे. परमेश्वराची प्राप्ती झालेली आहे. सर्व प्रकारच्या आशा आकांक्षा नाहीशा झालेल्या आहेत. कोणतीही वासना उरलेली नाही. काहीही मिळवायची इच्छा राहिलेली नाही.

सर्व बंधनामधून मोकळा झालेला आहे. तरीही केवळ सहज प्रवृत्ती, सहज स्वभाव म्हणून परमेश्वराचे भजन पूजन सतत करीत राहणे ' होय. तसे ठरवून करावे लागतच नाही. मुद्दाम देवळामधे जाऊन देवाच्या मूर्तीला हार घालायची, दिवा लावायची, नमस्कार करायची गरजच राहात नाही. **' सर्व समाज म्हणजे परमेश्वराचेच रूप आहे.'** अशी दृढ श्रद्धा असल्यामुळे, त्याच्याकडून अत्यंत नैसर्गिकपणे **निष्काम कर्म** घडून येत असते आणि त्याला त्याची जाणीवही नसते.

**' जे जे देखिजे भूत, ते ते मानिजे भगवंत '** ह्या मानसिक अवस्थेला पोहोचून तेथे स्थिर झाल्यावर द्वैत नाहीसे होऊन, सर्वत्र केवळ परमेश्वरच दिसतो. सर्व समाज हा परमेश्वराचेच रूप आहे असे वाटायला लागते. मग त्याला स्वत:लाच शंका यायला लागते. प्रश्न पडायला लागतो.

**गोडपणे जैसा गूळ । तैसा देव जाला सकळ ।**
**आता भजो कोणेपरी । देव सबाह्य अंतरी ।।**

अर्थ — ज्याप्रमाणे गुळाच्या आत बाहेर सगळीकडे गोडपणाच भरलेला असतो, त्याचप्रमाणे सर्व जगताच्या आत बाहेर सगळीकडे एक परमेश्वरच भरलेला दिसतो आहे, तर मग मी कोणाची पूजा करू?

चारही प्रकारचे भक्त चांगलेच असतात. परंतु जर त्यांच्यामधे तुलना करायची झाली तर ज्ञानी भक्त हा विशेष योग्यतेचा असतो.

कारण तो परमेश्वराशी एकरूप झालेला असतो. एकरस झालेला असतो. तो परमेश्वराहून वेगळा उरतच नाही.

सर्व समाज त्याच्याकडे त्याच दृष्टीने पाहतो आणि त्यालाच आपला आदर्श मानतो.

**कामस्तैस्तैर्हृतज्ञाना: प्रपद्यन्तेऽन्यदेवता: ।**
**तम् तम् नियममास्थाय प्रकृत्या नियता: स्वया ।। २० ।।**

**यो यो याम् यान् तनुम् भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलाम् श्रद्धाम् तामेव विदधाम्यहम् ।। २१ ।।**
**स तया श्रद्धया युक्तः तस्याराधनमीहते ।**
**लभते च ततः कामान् मयैव विहितान्हि तान् ।। २२ ।।**
**अन्तवत्तु फलन् तेषाम् तद् भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ।। २३ ।।**

आपापल्या प्रकृतिनियमाप्रमाणे त्या त्या कामवासनांनी वेडावलेले लोक, उपासनेचा तो तो नियम पाळून, अन्य देवताना भजतात. जो जो भक्त ज्या ज्या देवतेची श्रद्धेने उपासना करू इच्छितो, त्याची तीच श्रद्धा मी स्थिर करतो. मग त्या श्रद्धेने युक्त होऊन, तो त्या देवतेची आराधना करू लागतो आणि मग मीच निर्मिलेली ती कामफले त्याला प्राप्त होतात. पण ह्या अल्पबुद्धी लोकांना मिळणारे हे फल नाशिवंत असते. देवांचे भजन करणारे देवांकडे जातात आणि माझे भक्त माझ्याकडे येतात.

मागील अनेक जन्मामध्ये केल्या गेलेल्या कर्माच्या संस्कारांचा संचय झालेला असतो.

ह्या जन्मामधेही तो आपल्या बरोबरच असतो आणि त्यानुसारच आपले एकूण व्यक्तिमत्व बनते. त्यालाच माणसाचा **' स्वभाव '** असे म्हणतात. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा असतो आणि त्या स्वभावानुसार निरनिराळ्या इच्छा, आकांक्षा इत्यादी उत्पन्न होतात.

नंतर ज्या ज्या देवदेवतांच्या कृपेने आपल्या आकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता आहे असे वाटते, त्या देवदेवतांची उपासना करणे सुरू होते. आपल्याकडे ३३ कोटी देव आहेत आणि त्यांची उपासना करणारी माणसेही अनेक आहेत.

देव देवतांना तोटा नाही आणि भक्तांनाही तोटा नाही.

भक्त आपल्या इष्ट देवतांचे श्रद्धेने भजनपूजन, व्रतवैकल्ये, उपवास, यज्ञ, जपतप करतात आणि फळप्राप्ती झाल्यावर,

' माझ्या इष्ट देवतांनी प्रसन्न होऊन मला इच्छित फल दिले.' असे समजतात.

खरे म्हणजे ते फळ देवता देत नसतात तर आपल्या कर्माद्वारेच प्राप्त होत असते.

दुसरे म्हणजे सर्व देवदेवतांची उत्पत्ती - स्थिती - लय ही परमेश्वरापासूनच होत असते.

म्हणजे देवदेवतांचे पूजन हे पर्यायाने परमेश्वराचेच पूजन असते. म्हणजेच जे काही फळ मिळते ते जर खरोखरच कोणी देत असला तर परमेश्वरच देतो. ही गोष्ट आपल्या सगळ्यांना कळते पण वळत नाही. म्हणूनच आठवड्याच्या प्रत्येक वारी, वेगवेगळ्या देवळांमधे लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. भक्तजन चार चार तास रांगेत उभे राहतात. असो.

क्षणभर ' देवता फळ देतात.' असे मानले तरीही, ती सर्व कर्मफले अनित्य असतात. अस्थिर असतात. मर्यादित असतात. काही काळासाठीच प्राप्त होतात. अगदी स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने केलेले यज्ञयाग देखील मरणानंतर, काही काळासाठीच फळ देतात. त्या नंतर परत मनुष्ययोनीमधे जन्माला यावेच लागते. जन्ममृत्यूच्या चक्रामधे परत परत फिरावेच लागते.

म्हणून अशा प्रकारची उपासना करणाऱ्यांना **' अल्पबुद्धी '** म्हटले आहे.

अर्थात, अशा प्रकारे उपासना करीत राहिले असता, ' बुद्धी शुद्ध होते, स्थिर होते आणि अखेरीस एकमेव आणि नित्य अशा परमेश्वराचे ज्ञान मिळविण्याची इच्छा होते.' हा लाभ अपरोक्ष असला तरी देखील महत्त्वाचा आहे हे नाकारता येणार नाही.

म्हणून ' असल्या अनित्य फलांच्या मागे न लागता **ज्ञानी भक्त** होऊन मोक्ष प्राप्तीची इच्छा बाळगावी.' असे सांगितलेले आहे.

**' माझे भक्त माझ्याकडे येतात.'** ह्या विधानामागचा हेतू तोच आहे.

आता अल्पबुद्धी लोक अन्य देवतांचे पूजन करतात, त्यामागचे कारण सांगत आहेत.

**अव्यक्तम् व्यक्तिमापन्नम् मन्यते मामबुद्धयः ।**
**परम् भावमजानन्तः ममाव्ययमनुत्तमम् ।। २४ ।।**
**नाहम् प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।**
**मूढोऽयन् नाभीजानाति लोको मामजमव्ययम् ।। २५ ।।**

मूढ लोक माझे अविनाशी, अव्यय व उत्तम रूप न जाणता, अव्यक्त अशा मलाच व्यक्त झालेला मानतात. आपल्या योगमायेने आच्छादित असल्यामुळे मी सर्वांना प्रत्यक्ष दिसत नाही. मी जन्मरहित व अविनाशी आहे हे मूढ लोक जाणत नाहीत.

परमेश्वरी तत्त्व हे अपरा प्रकृतीच्या पलीकडले आहे. अनादि आहे. अनंत आहे. अव्यक्त आहे. अक्षर आहे. अविनाशी आहे.

असा हा अव्यक्त परमेश्वर ज्यावेळी, काही विशिष्ट कार्यासाठी स्वतःच्या इच्छेनुसार, ह्या अलौकिक आणि विलक्षण अशा अपरा प्रकृतीने म्हणजेच मायेच्या आवरणाने झाकला जातो त्यावेळी तो व्यक्त होतो. आपल्याला कोणत्यातरी रुपाने दिसायला लागतो. त्याचे सर्व व्यवहार निसर्ग नियमांना धरूनच व्हायला लागतात.

नियोजित कार्य पूर्ण झाल्यावर, स्वत:च्या इच्छेनुसार, तो मायेचे आवरण दूर करून परत अव्यक्त होतो. आपल्याला दिसेनासा होतो. आपल्या दृष्टीला त्याचे जन्माला येणे दिसते आणि अखेरीस त्याचे मरणही दिसते. त्याचे विलक्षण प्रभावी व्यक्तिमत्व दिसते. त्याचे विलक्षण कर्तृत्व पाहून आपण आश्चर्यचकित होतो. त्याच्या विषयी आदर व्यक्त करतो. त्याला नमस्कार करतो. स्वत:समोर त्याचा आदर्श ठेवून तसे वागायचा प्रयत्न करायला लागतो.

असे असले तरी त्याचे जन्मणे, खाणेपिणे, चालणे, बोलणे, रागावणे, प्रेम करणे, शोक करणे, मरण पावणे, हे सगळे सामान्य माणसाप्रमाणेच घडून येताना दिसते. त्यामुळे त्याच्या बरोबर वावरणारी, त्याच्याच पिढीतली इतर माणसे त्याला आपल्या सारखाच आणि आपल्यापैकीच एक मानायला लागतात.

काही सन्माननीय असे **अपवाद** सोडले तर त्याला परमेश्वर मानण्याचा विचारही कोणाच्या मनामधे येत नाही.

आपले अव्यक्त रूप सोडून व्यक्त रूप धारण करणे आणि विहित कार्य पूर्ण करून परत अव्यक्त होण्याची ही युक्ती आणि सामर्थ्य म्हणजेच **योग** होय. हिलाच परमेश्वराची **योगमाया** किंवा लीला असे म्हणतात.

पण हे रहस्य जाणत नसल्यामुळे सर्वसामान्य माणसे परमेश्वराच्या अवतारी रूपाला स्वत:सारखेच समजतात.

त्याचे अविनाशी रूप न जाणता त्याला जन्म आणि मृत्यूने बद्ध असलेला समजतात.

**वेदाहम् समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।**

**भविष्याणि च भूतानि माम् तु वेद न कश्चन ॥ २६ ॥**

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत ।**

**सर्वभूतानि सम्मोहम् सर्गे यान्ति परंतप ॥ २७ ॥**

**येषान् त्वन्तगतम् पापम् जनानाम् पुण्यकर्मणाम् ।**

**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ताः भजन्ते माम् दृढव्रताः ॥ २८ ॥**

हे अर्जुना ! पूर्वी झालेली, आज असलेली व भविष्यकाळी होणारी सर्व भूते मी जाणतो. पण मला कोणीही जाणत नाही. कारण, हे भारता ! इंद्रियांच्या इच्छा व द्वेष यांच्यापासून उद्भवणाऱ्या द्वंद्वांच्या मोहाने, सर्व भूते या सृष्टीत भ्रम पावत असतात. पण या पुण्यकर्मी लोकांचे पाप संपले, ते द्वंद्वांच्या मोहातून सुटून व दृढनिश्चयी होऊन माझी भक्ती करतात.

खरे म्हणजे परमेश्वर **कालातीत** म्हणजे काळाच्याही पलीकडला आणि केवळ **ज्ञानस्वरूप** असल्यामुळे त्याच्या ठिकाणी भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असा भेद असणे शक्य नाही. परंतु व्यवहारामधे बोलताना तसा संदर्भ घ्यावा लागत असल्यामुळे, विषय स्पष्ट करून सांगताना **' अतीत - वर्तमान - भविष्य '** हे शब्द आलेले आहेत.

परमेश्वरापासून काहीही लपून रहात नाही हेच खरे. त्याच बरोबर मायेच्या प्रभावामुळे, सर्व प्रकारच्या द्वंद्वानी भ्रमित झालेले लोक परमेश्वराला जाणत नाहीत, तसा प्रयत्नही करीत नाहीत हे पण खरे.

ह्याला अपवाद केवळ **ज्ञानी** भक्तांचा असतो. त्यांच्या बाबतीत परमेश्वराशिवाय दुसऱ्या कशाला अस्तित्वच नसल्यामुळे, भगवंताची भक्ती ही सहज प्रवृत्ती होऊन जाते.

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।**

**ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नम् अध्यात्मङ् कर्म चाखिलम् ॥ २९ ॥**

**साधिभूताधिदैवम् माम् साधियज्ञञ् च ये विदुः ।**

**प्रयाणकालेऽपि च माम् ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥**

ह्याप्रमाणे जे माझा आश्रय करून, पुनर्जन्माच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी प्रयत्न करतात, ते ब्रह्म, अध्यात्म आणि सर्व कर्म म्हणजे काय ते जाणतात. जे अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ यांच्यासह मला जाणतात, ते युक्तचित्त असलेले पुरुष मरणसमयी देखील मला जाणतात. आपल्या सहज प्रवृत्तीला अनुसरून वागणारे ज्ञानी भक्त, सदैव परमेश्वराच्या आश्रयानेच राहतात. त्याचेच भजन - पूजन करीत राहतात. जन्म आणि मृत्यूच्या चक्रामधून बाहेर पडण्यासाठी प्रयत्नशील राहतात. जन्मभर असा प्रयास करीत राहिल्यामुळे अंतकाळी देखील त्यांच्या बुद्धी आणि मनामधे भगवंताचेच चिंतन चाललेले असते. त्यांच्या मुखावाटे देखील भगवंताचेच नांव उच्चारले जाते.

' मरणसमयी मनुष्याच्या मनामधे ज्या वासना असतात, जे भाव असतात आणि जशी बुद्धी असते, त्यानुसार त्याला पुढील जन्म मिळतो.' असा सनातन धर्मशास्त्राचा सिद्धांत आहे.

त्याच बरोबर असेही सांगितलेले आहे की, ' मनुष्य आपल्या आयुष्यामधे जे जे करतो, जसा वागतो, ज्या प्रकारच्या वासना आणि भावना बाळगतो, त्याच भावना आणि वासना, अंतकाळी देखील मनामधे प्रबळपणे यायला लागतात.'

त्यामुळे आयुष्यभर मनाला येईल तसे वागले असता, केवळ अंतकाळी परमेश्वराचे नांव आठवणे आणि मुखावाटे घेतले जाणे अशक्य आहे. त्यासाठी जन्मभर साधना करीत रहावे लागते. भगवंताचे भजन, पूजन, मनन, चिंतन सतत करीत राहावे लागते. तर आणि तरच अंतकाळी मुखामधे त्याचे नांव येणे शक्य आहे.

म्हणून शेवटच्या श्लोकामधील **' अंतकाळी देखील '** हे दोन शब्द फार फार महत्त्वाचे आहेत. अधिक विचार करण्यासारखे आहेत. पुढील अध्यायामधे ह्याविषयी अधिक विस्ताराने सांगितलेले आहे.

जे साधक परमेश्वराचा आश्रय घेऊन मोक्ष प्राप्तीसाठी सतत प्रयत्न करतात, ते पुण्यकर्म करणारे अनन्य भक्त —

' ब्रह्म म्हणजे काय ते जाणतात. अध्यात्म म्हणजे काय ते जाणतात. कर्म म्हणजे काय ते जाणतात. अधिभूत म्हणजे काय ते जाणतात. अधिदैव म्हणजे काय ते जाणतात. अधियज्ञ म्हणजे काय ते जाणतात. इतकेच नाही तर, हे सर्व काही जाणत असल्यामुळेच ते प्रत्यक्ष परब्रह्म परमात्मा परमेश्वरालाही जाणतात.' अंतकाळी देखील परमेश्वराचेच स्मरण होत असल्यामुळे आणि मुखामधे परमेश्वराचेच नांव येत असल्यामुळे, शेवटी त्यांना परमेश्वराची प्राप्ती होते.

**येथे सातवा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे ज्ञान आणि विज्ञान, अपरा प्रकृती आणि परा प्रकृती, सर्व विश्व परमेश्वरापासूनच उत्पन्न झालेले असूनही तो विश्वापासून वेगळा कसा आहे आणि वस्तुमात्रांमधे त्याचे अस्तित्व कशा प्रकारे आहे, ह्या विषयी विवेचन केले.

नंतर भक्तांचे प्रकार सांगून त्यापैकी कोणता भक्त श्रेष्ठ असतो ते आणि तो श्रेष्ठ का असतो, त्याची कारणे सांगितली.

त्यापुढे लोक विविध देव देवतांचे पूजन करीत असतात त्यामागील कारणे स्पष्ट करून, त्यामुळे प्राप्त होणारे फळ हे अनित्य असते, थोड्या काळासाठी असते. ते भोगून झाल्यावर परत ह्या मृत्युलोकामधे जन्म घ्यावाच लागतो हे सांगितले.

त्याऐवजी परमेश्वराची अनन्य भक्ती, त्याचे भजन, पूजन हे मोक्ष प्राप्त करून देत असल्यामुळे तेच कसे श्रेष्ठ आहे तेही सांगितले.

परमेश्वराच्या योगमायेच्या प्रभावामुळे भ्रमित होऊन, सामान्य लोक त्याचे खरे स्वरूप ओळखू शकत नाहीत. त्याला आपल्यासारखाच सामान्य समजतात आणि त्याच प्रमाणे त्याचे बरोबर सर्व व्यवहार करतात.

परंतु ज्ञानी भक्त मात्र आयुष्य जगत असताना आणि अंतकाळीही परमेश्वराला कसे ओळखतात ते स्पष्ट करून सांगितले.

अध्यायाचा समारोप करताना शेवटच्या दोन श्लोकांमधे काही विशेष शब्दांचा वापर केलेला आहे. आपण वाचत असताना ते शब्द सोपे वाटतात.

परंतु त्यांचा यथायोग्य अर्थ समजणे तितके सोपे नाही.

**' ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ '** हे ते शब्द होत. काय आहे ह्या शब्दांचा अर्थ?

अर्जुन हा अत्यंत बुद्धिमान मनुष्य होता हे खरे असले, तरीही सर्वज्ञानी नव्हता.

तो देखील तुमच्या - माझ्या सारखा एक **मनुष्यच** होता.

त्यालाही काही गोष्टी लगेच समजत नव्हत्या. बराच वेळ विचार करूनही समजत नव्हत्या.

पण त्याचे सुदैव असे की, गुरुदेव त्याच्या समोर बसलेलेच होते. त्याच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायला समर्थ होते.

म्हणून तो आपल्या मनामधील शंका, आपल्या गुरुदेवांना तात्काळ विचारीत होता.

त्यांना आपल्या प्रश्नाचे उत्तर द्यायला सांगू शकत होता. तसा आग्रह करू शकत होता. हट्ट करू शकत होता.

त्यामुळेच त्याच्या मनामधील सर्व शंका, कुशंका, संशय आणि गोंधळ हळूहळू नाहीसा होत होता.

तो आपल्या, **' युद्ध न करण्याच्या निर्णयावर '** पुनर्विचार करायला प्रवृत्त होत होता.

जे अपेक्षित होते ते घडून यायला सुरवात झाली होती.

त्यामुळेच आपल्यासारख्या सामान्यजनांनाही फार मोठा लाभ झालेला आहे.

ही गोष्ट ध्यानात असूद्या.

आता पुढील अध्यायामधे अर्जुन कोणता प्रश्न विचारतो आणि श्रीकृष्ण त्याचे काय उत्तर देतो ते पाहूया.

अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## अध्याय आठवा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या आठव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे श्रीकृष्णाने, ' ज्ञान आणि विज्ञान म्हणजे काय, अपरा प्रकृती आणि परा प्रकृती म्हणजे काय ' ते सांगितले. सर्व विश्व परमेश्वरापासूनच उत्पन्न झालेले असूनही तो विश्वापासून वेगळा असून, सर्व वस्तुमात्रामधे त्याचे अस्तित्व कशा प्रकारे आहे, ह्या विषयी सांगितले. नंतर भक्तांचे प्रकार सांगून त्यापैकी कोणता भक्त श्रेष्ठ असतो ते आणि तो श्रेष्ठ का असतो, त्याची कारणे सांगितली.

अनेक लोक, आपापल्या श्रद्धेप्रमाणे विविध देव देवतांचे पूजन करीत असतात. त्यामागील कारणे स्पष्ट करून, त्यामुळे प्राप्त होणारे फळ हे अनित्य असते आणि ते भोगून झाल्यावर परत ह्या मृत्युलोकामधे जन्म घ्यावाच लागतो हे सांगितले.

त्याऐवजी अनादि - अनंत अशा परमेश्वराची भक्ती, त्याचेच भजन - पूजन केले असता, माणसाची जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होऊन, अखेरीस त्याला मोक्ष प्राप्ती होते. त्यामुळे, तीच भक्ती कशी श्रेष्ठ आहे तेही सांगितले.

योगमायेने भ्रमित झाल्यामुळे, सामान्य लोक परमेश्वराचे खरे स्वरूप ओळखू शकत नाहीत. परंतु ज्ञानी भक्त मात्र ' आपले आयुष्य जगत असताना परमेश्वराला कसे ओळखतात आणि अंतकाळीही त्याचेच मनन, चिंतन आणि नामस्मरण कसे करतात,' ते स्पष्ट करून सांगितले. अध्यायाचा समारोप करताना शेवटच्या दोन श्लोकांमधे काही विशेष शब्दांचा वापर केलेला आहे.

विचार करूनही त्यांचा अर्थ न समजल्यामुळे परत अर्जुनाच्या मनामधे अनेक प्रश्न यायला लागले आहेत.

' परमेश्वराचा आश्रय घेऊन मोक्ष प्राप्तीसाठी सतत प्रयत्न करणारे अनन्य भक्त —

**ब्रह्म, अध्यात्म आणि कर्म, तसेच अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ** यांच्यासह मला जाणतात, ते युक्तचित्त असलेले पुरुष मरणसमयी देखील मला जाणतात.'

म्हणजे ते नक्की काय जाणतात? तो परत गोंधळून गेला आहे. पण त्यामागे, ' स्वजनांच्या विषयीची आसक्ती आणि करुणा ' हे कारण नाही. आता ते कारण उरलेले नाही. असो.

गीतेच्या आठव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे.

तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**किम् तद्ब्रह्म किमध्यात्मम् किम् कर्म पुरुषोत्तम ।**

**अधिभूतञ् च किम् प्रोक्तम् अधिदैवङ् किमुच्यते ।। १ ।।**

**अधियज्ञः कथङ् कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**

**प्रयाणकाले च कथम् ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ।। २ ।।**

हे पुरुषोत्तमा ! ते **ब्रह्म** म्हणजे काय? **अध्यात्म** म्हणजे काय? **कर्म** म्हणजे काय? **अधिभूत** कशाला म्हणायचे? आणि **अधिदैव** कशाला म्हणतात? **अधियज्ञ** कसा असतो? हे मधुसूदना! ह्या देहामधे कोण आहे? **( अधिदेह )** आणि इंद्रियनिग्रह करणारे अंतकाळी तुम्हाला कसे ओळखतात?

हा अर्जुन किती प्रश्न विचारतो आहे? आत्ताच्या आत्ता, इथे त्याने आठ प्रश्न विचारले आहेत.

इतकेच नाही तर त्यातला एक प्रश्न तर स्वतःहून विचारला आहे. **( अधिदेह )**

श्रीकृष्णाने बोलायला सुरवात केली तेव्हापासून मागील अध्यायापर्यंत त्याने अकरा प्रश्न विचारले आहेत.

त्यात अजून ह्या आठ प्रश्नांची भर.

' अरे ऽऽ? अर्जुना ऽऽ, तुझे हे काय चाललय काय? प्रसंग कोणता आहे? जागा कोणती आहे? वेळ कोणती आहे?

तुला काही भान आहे की नाही? हे आचार्य द्रोणांचे गुरुकूल आहे का?

एका प्रश्नाचे उत्तर दिले की लगेच दुसरा प्रश्न विचारतो आहेस. हे सगळे पुरे झाले. तुझ्या उरलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी नंतर केव्हातरी देईन. आत्ता मला काहीही विचारू नकोस. मी सांगतो आहे ते कर. हातात धनुष्य घे आणि युद्धाला उभा रहा बघू!'

समजा श्रीकृष्णाच्या जागी आपल्यासारखा कोणीही असता, तर तो वैतागला असता आणि असेच म्हणाला असता की नाही? खरं सांगा.

**पण श्रीकृष्ण तसे म्हणाला नाही. अर्जुनावर रागावला नाही. चिडला नाही.**

अतिशय शांत राहिला आणि शांतपणाने त्याच्या प्रश्नांची उत्तरे द्यायला लागला.
तो अर्जुनाच्या प्रत्येक प्रश्नाचे यथायोग्य उत्तर देतो आहे. त्यामागे काय कारण असेल?
' युद्ध सुरू होण्याच्या अगोदरच हा महारथी मोहग्रस्त झाला आहे. त्याने आपले धनुष्य बाजूला ठेवले आहे आणि तो युद्ध करण्यास नकार देतो आहे. त्याची ही अशी अवस्था, येथून पुढे परत कितीही वेळा होऊ शकेल.
तसे झाले तर मग हे युद्ध सुरू होईल की नाही ते सांगता येणार नाही. समजा सुरू झाले तरीही, कौरवांचा संपूर्ण पराभव होईपर्यंत हा लढू शकणार नाही. परिणामी हे युद्ध पूर्णत्वास जाईल का तेही सांगता येणार नाही.
म्हणून ह्याला जे काही विचारायचे आहे, ते आत्ताच विचारू दे. त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे, सर्व शंका फिटेपर्यंत, आत्ताच देणे योग्य होईल. तसे केले म्हणजे मग अशी ही विपरीत परिस्थिती परत कधीही येणार नाही.
हे युद्ध पूर्णत्वास जाईल आणि अगोदर **विनाशायच दुष्कृताम्** आणि त्यानंतर मग **परित्राणाय साधूनाम्** ही दोन्ही कार्ये पूर्ण होतील.
विचार! अर्जुना, तुला जे काही विचारायचे असेल ते आत्ताच विचार. मी उत्तर देतो!'
**' हेच कारण असेल आणि त्याने असाच विचार केला असेल.'** असे मला प्रामाणिकपणे वाटते.
हाच तर श्रीकृष्ण आणि आपल्यातला मुख्य फरक आहे. कोणत्याही परिस्थितीमधे त्याचे मन शांत असते. समतोल असते. स्थिर असते.
म्हणूनच त्याला **' हृषिकेश.'** म्हणतात. **हृषिक** आणि **ईश** ह्या दोन शब्दांचा संधी होऊन **हृषिकेश** हा शब्द झालेला आहे.
हृषिक म्हणजे इंद्रिये आणि ईश म्हणजे स्वामी. ज्याचा आपल्या इंद्रियांवर पूर्णपणे ताबा आहे, जो आपल्या इंद्रियांचा मालक आहे, स्वामी आहे, तो हृषिकेश. त्याच्या हजार नांवांपैकी एखादे नांव धारण करणारी अनेक माणसे असतात.
पण त्या नांवामधला अर्थ किती जणांच्या ठिकाणी व्यक्त झालेला दिसून येतो?
इतरांचे कशाला सांगू? माझे नांव देखील **' माधव '** आहे. पण ते माझ्या वडिलांनी ठेवले म्हणून आहे.
विष्णू सहस्रनाम स्तोत्रामधे हे नांव तीनदा आलेले आहे बरं का! ( श्लोक क्रमांक ८, १८ आणि ७८ )
शिवाय संध्येच्या पंचवीस नावांपैकी तिसरे नांव हेच आहे.
ह्या नांवाचे तीन अर्थ सांगितलेले आहेत. पहिला अर्थ **' देवी लक्ष्मीचा पती.'**
दुसरा अर्थ **' विद्यादेवतेचा स्वामी.'** आणि तिसरा अर्थ **' मधुवंशामधे उत्पन्न झालेला.'**
आता ह्या अर्थांना व्यक्त करील असे माझ्याकडे काहीतरी आहे का? काहीही नाही.
मी केवळ नामधारीच आहे. बाकी त्याला काहीही अर्थ नाही. असो.
अर्जुनाचा प्रश्न विचारून झाला. आता भगवान प्रत्येक प्रश्नाचे सविस्तर उत्तर द्यायला सुरवात करीत आहेत.

**श्रीभगवानुवाच :**

**अक्षरम् ब्रह्म परमम् स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**
**भूतभावोद्भवकरः विसर्गः कर्मसंज्ञितः ।। ३ ।।**
**अधिभूतम् क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।**
**अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृताम् वर ।। ४ ।।**

सर्वाहून परम आणि कधीही नाश न पावणारे असे तत्त्व म्हणजे **ब्रह्म** होय.
प्रत्येक वस्तूचा स्वतःचा असा जो मूळ भाव असतो त्यास **अध्यात्म** असे म्हणतात.
ब्रह्मापासून सर्व भूतमात्रांची उत्पत्ती करणारा जो सृष्टीचा व्यवहार चालतो त्याला **कर्म** असे म्हणतात.
उत्पन्न झालेल्या सर्व भूतांची नाशवंत अशी जी स्थिती ते **अधिभूत** होय.
ह्या भूतांमधे सचेतन असा जो अधिष्ठाता असतो त्याला **अधिदैव** असे म्हणतात.
ज्याला सर्व यज्ञांचा अधिपति म्हणतात ( **अधियज्ञ** ), तो मीच ह्या देहाचे ठायी आहे. ( **अधिदेह** )
शब्द दिसायला सोपे आहेत. परंतु त्यांचा अर्थ समजायला फार कठीण आहे. आपण प्रयत्न करूया.
**' ब्रह्म '** आणि **' कर्म '** हे दोन शब्द सोडले तर बाकीच्या सर्व शब्दांमधे, मूळ शब्दाला **' अधि '** जोडलेला आहे.
जसे, **अधि** आत्म, **अधि** भूत, **अधि** दैव, **अधि** यज्ञ, **अधि** देह, इत्यादी.
**अधि** म्हणजे **' त्याच्या ठिकाणी असणारे.'** भगवान् सांगत आहेत की,
' सर्व ज्ञात - अज्ञात विश्वाच्या पलीकडले, त्याला निर्माण करणारे परंतु त्याच्या आवाक्यात न येणारे असे **( परम )**, कधीही नाश न पावणारे, सर्व वस्तुमात्रांचा नाश झाल्यावरही अस्तित्वात असणारे असे **( अक्षर )** मूलतत्व म्हणजे **ब्रह्म**. होय.'

ब्रह्म ही संकल्पना फारच गुंतागुंतीची आहे. त्याच्याविषयी तपास करणे, पुरावे गोळा करणे, पुराव्यांची योग्यप्रकारे मांडणी करून काही निष्कर्ष काढणे अशक्य आहे. कारण ते माणसाच्या सर्व इंद्रियांच्या, मनाच्या आणि बुद्धीच्या पलीकडले आहे.
म्हणूनच ते वेदांच्या, उपनिषदांच्या आणि सर्व शास्त्रांच्या आवाक्याबाहेरचे आहे.
सर्वकाही सांगून झाल्यावर वेदही **' नेति - नेति '** म्हणतात. म्हणजे —
' नाही हो ऽऽ. आतापर्यंत आम्ही जे सांगितले ना ऽऽ, ब्रह्म तसे नाही. ते त्याच्या पलीकडचे आहे. आम्हाला त्याचे यथायोग्य वर्णन करता येत नाही. आमचे शब्दसामर्थ्य अपुरे पडते. आम्हाला त्याचा पार लागतच नाही म्हणून आम्ही त्याला **' अपार '** म्हणतो. तसेच म्हणावे लागते. त्याचे वर्णन करायचे झाले तर, ते **सकारात्मक** करता येतच नाही. नेहमीच **नकारात्मकच** करावे लागते. म्हणजे आम्हाला, ' **ते कसे आहे** ते सांगता येत नाही म्हणून **ते कसे नाही आहे** तेच सांगत राहावे लागते.' असे म्हणतात.
जिच्यापासून सर्व विश्व उत्पन्न झाले त्या **ब्रह्म** ह्या संकल्पनेची, सनातन धर्मशास्त्राने केलेली व्याख्या पण काहीशी अशीच आहे.
**ब्रह्म** म्हणजे अशी एक संकल्पना की, जिच्याविषयी काहीही सांगता येत नाही.
जी अस्तित्वात आहे पण दिसत नाही आणि दिसत नाही म्हणून दाखवता येणार नाही. जिला कसलेही माप नाही, म्हणून मोजता येणार नाही. जिला कोणतेही गुणधर्म नाहीत. म्हणून तिला **वस्तू** किंवा **गोष्ट** किंवा **पदार्थ** असे म्हणता येणार नाही.
जी **अतिसूक्ष्म** ही आहे आणि **अतिविशाल** ही आहे. जी **वस्तुमानरहित** ही आहे आणि **वस्तुमानसहित** ही आहे.
जी **आकारमान** ही आहे आणि **आकारहीन** ही आहे. जी **व्यक्त** ही आहे आणि **अव्यक्त** ही आहे.
जी **सर्व** म्हणजे सगळे काही आहे, **सर्वगत** म्हणजे सर्वांच्यामधे आहे आणि **सर्वातीत** म्हणजे सगळ्यापलीकडली देखील आहे.
जी सर्व विश्व निर्माण करूनही, विश्वाहून वेगळी आहे. स्वतंत्र आहे.
जी **अनादि** म्हणजे जिला सुरवात नाही अशी आहे. जी **अनंत** म्हणजे जिला शेवट नाही अशी आहे.
जी **अजर** म्हणजे जिला वृद्धावस्था नाही अशी आहे. जी **अमर** म्हणजे जिला मृत्यू नाही अशी आहे.
जी **अक्षय** म्हणजे जिला क्षय नाही अशी आहे. जी **अक्षर** म्हणजे जिची झीज होत नाही अशी आहे.
जी **अचल** म्हणजे कधीही न हलणारी म्हणजेच स्थिर आहे. जी **अच्युत** म्हणजे आपल्या स्थानापासून खाली न येणारी आहे.
जी **अढळ** म्हणजे कधीही न ढळणारी आहे.
जी सर्वात शक्तिमान, सर्वव्यापक आणि सर्वसमावेशक अशी आहे. जी कोणत्याही विज्ञानाच्या सहाय्याने जाणून घेता येणार नाही. कारण ती मानवी इंद्रिये, मन आणि बुद्धीच्या आवाक्यापलीकडची आहे.
अशी एक **अनाकलनीय, आश्चर्यकारक, अद्वितीय** संकल्पना म्हणजे **' ब्रह्म '** होय.
ह्यालाच **' परब्रह्म '** असे म्हणतात. येथे एक गोष्ट समजून घेणे गरजेचे आहे. ती ही की, ' **ब्रह्म** म्हणजे **ब्रह्मदेव** नाही.'
ब्रह्मदेव हा परब्रह्माचा, विश्वनिर्मितीच्या हेतूने झालेला, एक आविष्कार आहे.
विश्व निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवालाही आदि आणि अंत आहेत. फक्त त्याचे आयुष्य माणसांच्या तुलनेत फार फार दीर्घ आहे. मोठे आहे. हा विषय, ह्याच अध्यायामधे, पुढे येणारच आहे. त्यावेळी त्याचा जास्त विचार करूया.
आता ह्याविषयी समर्थ रामदास स्वामी काय सांगतात ते पाहूया.
**दासबोधा**च्या नवव्या दशकाच्या पहिल्या समासामधे, श्रोत्याने विचारलेल्या परब्रह्मा विषयीच्या प्रश्नांना, ते उत्तर देत आहेत. त्यामधे ते, परब्रह्म कसे नाही तेच सांगत आहेत पण निराळ्या पद्धतीने सांगत आहेत. नीट ऐका.

**निराकार म्हणिजे आकार नाही । निराधार म्हणिजे आधार नाही ।**
**निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाही । परब्रह्मासी ।।**
**निरामय म्हणिजे जळमये नाही । निराभास म्हणिजे भासचि नाही ।**
**निरावेव म्हणिजे अवेव नाही । परब्रह्मासी ।।**
**नि:प्रपंच म्हणिजे प्रपंच नाही । नि:कळंक म्हणिजे कळंक नाही ।**
**निरोपाधी म्हणिजे उपाधी नाही । परब्रह्मासी ।।**
**निरोपम्य म्हणिजे उपमा नाही । निरालंब म्हणिजे अवलंबन नाही ।**
**निरापेक्षा म्हणिजे अपेक्षा नाही । परब्रह्मासी ।।**
**निरंजन म्हणिजे जनचि नाही । निरंतर म्हणिजे अंतर नाही ।**
**निर्गुण म्हणिजे गुणचि नाही । परब्रह्मासी ।।**

**नि:संग म्हणिजे संगचि नाही । निर्मळ म्हणिजे मळचि नाही ।**
**निश्चळ म्हणिजे चळण नाही । परब्रह्मासी ।।**
**निशब्द म्हणिजे शब्दचि नाही । निर्दोष म्हणिजे दोषचि नाही ।**
**निवृत्ती म्हणिजे वृत्तीच नाही । परब्रह्मासी ।।**
**निष्काम म्हणिजे कामचि नाही । निर्लेप म्हणिजे लेपचि नाही ।**
**निष्कर्म म्हणिजे कर्मचि नाही । परब्रह्मासी ।।**
**अनाम्य म्हणिजे नामचि नाही । अजन्मा म्हणिजे जन्मचि नाही ।**
**अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाही । परब्रह्म तें ।।**
**अगणीत म्हणिजे गणीत नाही । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्यता नाही ।**
**अक्षय म्हणिजे क्षयचि नाही । परब्रह्मासी ।।**
**अरूप म्हणिजे रूपचि नाही । अलक्ष म्हणिजे लक्षत नाही ।**
**अनंत म्हणिजे अंतचि नाही । परब्रह्मासी ।।**
**अपार म्हणिजे पारचि नाही । अढळ म्हणिजे ढळचि नाही ।**
**अतर्क्य म्हणिजे तर्कत नाही । परब्रह्म तें ।।**
**अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाही । अदृष्य म्हणिजे दृष्यचि नाही ।**
**अच्युत म्हणिजे चेवत नाही । परब्रह्म तें ।।**
**अछेद्य म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना ।**
**अक्लेद्य म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ।।**
**परब्रह्म म्हणिजे सकळांपरते । तयास पाहता आपणचि तें ।**
**हे कळे अनुभवमतें । सद्गुरु केलिया ।।**

‘ परब्रह्म हे सर्वांत सूक्ष्म, सर्वांहून पलीकडचे, सर्वश्रेष्ठ व अधिष्ठानरूप आहे. ते जाणावयाचा प्रयत्न करावा तर ते आपणच आहोत असे समजते. पण जर श्रीगुरुकृपा झाली तर त्याला केवळ सिद्धांताचे स्वरूप न राहता, अनुभवाचे स्वरूप येऊ शकते.
किंबहुना ती केवळ अनुभवायचीच संकल्पना आहे. ज्याप्रमाणे —
‘ जेथे मडके असते तेथे माती असतेच. जर मातीच नसेल तर मडके कसे असेल?’ हे विधान सत्य आहे त्याचप्रमाणे,
‘ जेथे जग दिसते तेथे त्याचे अधिष्ठान म्हणजे ब्रह्म असतेच. जर अधिष्ठानच नसेल तर हे जग कसे असेल?’ हे विधानही सत्य आहे. दृष्यासह सर्व ब्रह्मच आहे आणि दृष्य दूर केल्यावर जे उरते ते देखील विमल ब्रह्मच आहे.
ज्या ब्रह्मस्वरूपामधे प्रकृती आणि पुरुष हे उरतच नाहीत, तेथे कोणताही विशेष असणारच नाही. म्हणून त्याचे वर्णन करताच येत नाही.
तेथे शब्दांचे सामर्थ्य संपते. श्रुतिसुद्धा ‘ हे ब्रह्म नाही. हे ब्रह्म नाही.’ असे म्हणून मौन धरतात.
म्हणून ब्रह्म आणि माया ह्या तत्त्वांचे स्वरूप जाणून घेऊन त्यामधून मायेला वगळून, जीवाने ( आपण ) ब्रह्माला ( आपणाला ) ऐक्यभावाने अनुभवावे ( पहावे ). त्यासाठीच प्रयास केले, साधना केली म्हणजे ब्रह्मानुभव येतो.’
ह्यावर आणखी काय सांगता येईल? मला तरी काहीही सांगता येणार नाही.
म्हणून आपण मौन पाळणेच पसंत करून, **समर्थ रामदासांना** नमस्कार करूया.
पुढे जाण्यापूर्वी, राहवत नाही म्हणून, आपल्याला एक गोष्ट सांगतो.
आयुष्यामधे एकदा तरी संपूर्ण **‘ दासबोध ’** वाचा. त्याचा अर्थ समजून घ्या.
**दासबोध म्हणजे एक स्वच्छ आरसा आहे.** तो आपल्याला ‘ आपण खरे कसे आहोत?’ ते स्पष्टपणे दाखवतो.
काहीही न लपविता अत्यंत स्वच्छपणे दाखवतो. आपण एकदा वाचायला सुरवात केलीत ना, म्हणजे मग आपल्यालाही ते जाणवेल. आपणही माझ्याशी सहमत व्हाल. असो.
**अध्यात्म** म्हणजे, ‘ प्रत्येक वस्तुमात्राचे जे सूक्ष्म स्वरूप असते ते किंवा जो मूळचा भाव असतो तो ’ होय.
त्यालाच स्वभाव असे म्हणतात. **‘ स्वो भाव: इति स्वभाव:।’** आपला मूळ भाव म्हणजेच आपला स्वभाव.
व्यावहारिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही दृष्टींनी हे खरे आहे.
म्हणतात ना, ‘ कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच.’

कडूपणा हा कारल्याचा स्वभाव आहे. तिखटपणा हा मिरचीचा स्वभाव आहे. खारटपणा हा मिठाचा स्वभाव आहे.
आंबटपणा हा लिंबाचा स्वभाव आहे. तेजस्वीपणा हा सूर्याचा स्वभाव आहे. शीतलता हा चंद्राचा स्वभाव आहे.
प्रवाहीपणा हा पाण्याचा स्वभाव आहे. जाळून टाकणे हा अग्नीचा स्वभाव आहे.
भूक लागल्यावर, इतर प्राण्यांचे मांस खाणे हा वाघाचा स्वभाव आहे. कितीही भुकेला असला तरी वाघ कधीही गवत खाणार नाही.
तसेच भूक लागल्यावर, गवत खाणे हा गायीचा स्वभाव आहे. कितीही भुकेली असली तरी गाय कधीही मांस खाणार नाही.
कितीही प्रयत्न केला तरी, मूळ स्वभाव कधीही बदलत नाही. बदलता येत नाही.
तीच वस्तूची खरी ओळख असते. त्याविषयीचे ज्ञान म्हणजेच **अध्यात्म** असे म्हणता येईल. हा झाला व्यावहारिक दृष्टिकोन. आणि —
अपरा प्रकृती आणि परा प्रकृती ह्यांच्या संयोगाने विश्व निर्माण होते.
प्राणिमात्रांचा स्थूलदेह, मन आणि बुद्धी आणि त्यांचे सतत चालणारे व्यवहार म्हणजे **अपरा** प्रकृती आणि —
स्थूलदेहामधे असलेले चैतन्य म्हणजेच जीव किंवा जीवात्मा म्हणजे **परा** प्रकृती. ह्यालाच **' सूक्ष्मदेह '** असे म्हणतात.
त्या सूक्ष्म देहाविषयीचे ज्ञान म्हणजेच **अध्यात्म** असे म्हणता येईल. हा झाला पारमार्थिक दृष्टिकोन.
**कर्म** म्हणजे, ' एकमेव अशा परब्रह्मापासून सर्व विश्वाची निर्मिती होणे, ते काही काळ टिकून राहाणे आणि अखेरीस परत परब्रह्मामधेच विलीन होऊन जाणे, असा सतत चाललेला, सृष्टीचा व्यवहार ' होय. ह्याच्याशी सुसंगत आणि व्यावहारिक दृष्टीने मान्य होईल असा दुसरा अर्थ म्हणजे, ' कर्त्याला, **फळ देणारी** अशी कोणतीही कृती म्हणजे **कर्म.**'
**अधिभूत** म्हणजे, ' जे पंचमहाभूतांच्या संयोगाने तयार होते आणि प्रत्यक्ष दिसायला लागते, पंचमहाभूतांचा वियोग झाला असता जे दिसेनासे होते, नाहीसे होते, ते नामरूपात्मक शरीर ' होय.
**अधिदैव** म्हणजे, ' जे ह्या नामरूपात्मक शरीरामधे वास्तव्य करून, प्रकृतीने निर्माण केलेले सर्व भोग भोगत असते ते चैतन्य अथवा पुरुषतत्त्व.' होय. ह्यालाच व्यवहारामधे **जीव** असे म्हणतात. हाच नामरूपात्मक देहाचा स्वामी आहे आणि देहरूपी घरामधे राहतो.
वास्तविक हा परमात्माच आहे. परंतु अपरा प्रकृतीने पूर्णपणे वेढला गेल्यामुळे, आपले खरे स्वरूप विसरून नामरूपात्मक देहामधेच गुंतून जातो आणि सर्व प्रकारच्या सुख दु:खांचा अनुभव घेत राहतो.
**अधियज्ञ** म्हणजे,' शरीरामधे राहून सर्व यज्ञांचा म्हणजेच सर्व कर्मांचा कर्ता, करविता आणि भोक्ता असूनही त्यांपासून अलिप्त होऊ शकतो, शरीरभावाला आणि त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या अहंकारादिक सर्व विकारांना नाहीसे करू शकतो तो परमात्मा' होय.
ह्यालाच शरीरामधे असलेला सूक्ष्मदेह किंवा **अधिदेह** असे म्हणतात.
खरे पाहता अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ आणि अधिदेह ह्या सगळ्या संकल्पना परब्रह्म परमात्म्या विषयीच्याच आहेत.
परंतु मायेच्या किंवा अविद्येच्या योगाने झाकल्या गेल्यामुळे त्या वेगवेगळ्या भासतात. आपण काही उदाहरणे पाहूया.
आपल्याला पाण्यामधे सूर्याचे प्रतिबिंब पडले दिसते. आकाशात तळपणाऱ्या सूर्याहून ते वेगळे आहे असे वाटते. पाण्याच्या हालचालीच्या योगाने, ते सुद्धा हलते. वेडेवाकडे होते. त्याचा आकार बदलताना दिसतो. कधीकधी ते दिसेनासेही होते. पण ते काहीही खरे नसते. सगळा केवळ भास असतो. जर पाणी नाहीसे झाले तर त्या बरोबर प्रतिबिंब नाहीसे होते.
तरीही सूर्य मात्र आपल्या जागी तसाच स्थिर असलेला दिसतो. मग ' आपल्याला भास होत होता,' असे समजून येते.
आपण आरशामधे पाहात असतो, तेव्हां आपल्याला स्वत:चे प्रतिबिंब दिसते. ते आपल्याहून वेगळे आहे असे जाणवत राहते.
जर आरसा काढून टाकला तर प्रतिबिंब दिसेनासे होते आणि आपण एकटेच उरतो. मग ' आपल्याला भास होत होता,' हे समजते.
त्याचप्रमाणे मायेने वेढला गेल्यामुळे, परब्रह्माचे अंशरूप असलेल्या आत्म्याला सृष्टीच्या आरशामधे, त्याचेच प्रतिबिंब दिसायला लागते.
**' तो आणि परमात्मा वेगवेगळे आहेत! '** असा भास होत असतो.
अज्ञान नाहीसे झाले तर सृष्टीरूपी आरसाही नाहीसा होतो आणि प्रतिबिंबही नाहीसे होऊन, केवळ परब्रह्म परमात्माच उरतो.

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**य: प्रयाति स मद्भावम् याति नास्त्यत्र संशय: ।। ५ ।।**
**यम् यम् वापि स्मरन्भावम् त्यजत्यन्ते कलेवरम् ।**
**तन् तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावित: ।। ६ ।।**

आणि जो अंतकाळी माझेच स्मरण करीत देह सोडतो तो माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो ह्यामधे संशय नाही. किंवा, हे कौंतेया !
जन्मभर त्यातच रंगून गेल्यामुळे, मनुष्य ज्या ज्या भावाचे स्मरण करीत देह सोडतो, त्या त्या भावालाच तो प्राप्त होतो.
**माणसाचे जगणे म्हणजे नक्की काय आहे बरे?** हा फार गहन प्रश्न आहे.

अनेक ज्ञानीजनांनी आपापल्या परीने ह्या प्रश्नाचे उत्तर द्यायचा प्रयत्न केला आहे. आजही करीत आहेत आणि यापुढेही करीत राहतील. ह्याविषयी अनेक विद्वान व्यक्तींचे विचार ऐकल्यावर, त्यांच्या ग्रंथांचे वाचन करून त्यावर चिंतन केल्यावर आणि इतरांचे बरोबर चर्चा करून झाल्यावर, आता मला काय वाटते ते सांगतो.

माणसाचे संपूर्ण आयुष्य म्हणजे **' विद्यार्थीदशा '** आहे. दीर्घ काळ चालणारी एक **' शिक्षणप्रक्रिया '** आहे.

आपले जगणे म्हणजे एक प्रदीर्घ **' शिक्षण सत्र '** आहे. हा मृत्युलोक म्हणजे हे जग, ही एक नामांकित **' शाळा '** आहे.

माणसाचे **' प्रारब्ध '** म्हणजेच मागील अनेक जन्मांमधे त्याने केलेले कर्म म्हणजे,

ह्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी दिलेले **' डोनेशन '** आहे. एकदा जन्म झाला म्हणजे शाळेचा **पहिला तास** सुरू होतो.

पहिला धडा **' टाहो फोडण्याचा '**. आपण जोराने रडायला शिकतो.

मूल रडले म्हणजे सगळे आनंदित होतात. नाही रडले तर चिंताक्रांत होतात. त्याला सक्तीने रडायला लावतात.

रडणे शिकलेच पाहिजे. रडता आलेच पाहिजे. रडणे म्हणजे इतरांना आपले अस्तित्व दाखवून देण्यासाठी उपयोगी पडणारी कृती.

हसणाऱ्याकडे सगळे बघतीलच असे सांगता येत नाही. कदाचित् दुर्लक्षही करतील. पण रडणाऱ्याकडे प्रत्येकाचे लक्ष जातेच.

प्रत्येकजण रडणाऱ्याकडे लक्ष देतोच. म्हणूनच ह्या कृतीचा वापर, या ना त्या कारणाने, पुढे आयुष्यभर केला जातो.

नंतर आयुष्यभर प्रत्येकजण सारखा काही ना काही शिकतच असतो. परंतु —

कोणाही माणसाच्या आयुष्यामधला शेवटला तास म्हणजे **अंतकाळ.**

सर्वात महत्त्वाचा तास. कारण त्यानंतर शाळा संपते. मे महिन्याची उन्हाळी सुट्टी सुरू होते.

निकाल चांगला लागला आणि पास झाला तर ठीक. नाही तर ह्याच शाळेत परत ॲडमिशन घ्यावीच लागते.

त्याच वर्गात परत बसावे लागते. त्याला पर्याय नाही. पळवाट नाही. येथे कोणतेही रिझर्व्हेशन असत नाही.

राखीव जागा ठेवल्या जात नाहीत. कोणाचाही वशिला लावता येत नाही. चिरीमिरी देऊन सटकता येत नाही. असो.

**मृत्यू** हा माणसाच्या आयुष्याच्या शाळेतला **' शेवटचा तास '** आहे. त्यात सहभागी होणारे दोघेच असतात.

एक विद्यार्थी आणि दुसरा त्याचा शिक्षक. **विद्यार्थी** म्हणजे माणूस स्वत: आणि **शिक्षक** म्हणजे **यमराज!**

कोणाही तिसऱ्याला सहभागी होता येत नाही. ह्या आयुष्याचा अखेरचा तासही आपल्याला आयुष्यरूपी अभ्यासक्रमातला शेवटचा धडा शिकवतो. **' मरण म्हणजे काय आणि ते कसे येते!'** हे शिकवतो.

काय गंमत आहे बघा! ह्या शेवटच्या धड्याची उजळणी कोणालाही करता येत नाही. तशी संधीच मिळत नाही.

एकदा धडा शिकून झाला, मरण आले, म्हणजे त्या नंतर तुम्ही त्याविषयी कोणाशीही काहीही बोलू शकत नाही.

त्या नंतरही शिक्षण चालूच असते. फरक इतकाच की, ते आत्ताच्या ह्या शरीराशिवाय चाललेले असते.

पण तो विषय वेगळा आहे. फार मोठा आणि गहन असा विषय आहे. आत्ता ह्या ठिकाणी त्याविषयी काही बोलणे योग्य नाही.

योग आला आणि शक्य झाले तर परत केव्हांतरी बोलूया! असो.

देवाने जर मृत्यूची योजना केलीच नसती तर हे सगळे जग दु:खाचे आगर झाले असते. माणसाचे जगणे फारच भयानक झाले असते. थोडावेळ अशी कल्पना करा की, ---

' **एकशे दहा वर्षे** वयाचे आपण, आपल्या **वीस वर्षे** वयाच्या, **नातवाच्या नातवाला** परिक्षेत कमी मार्क मिळाले म्हणून, रागावतो आहोत. पण तो आपले काहीही ऐकत नाही. अभ्यास करीत नाही. वाईट मित्रांच्या नादाने नकोत ते उद्योग करतो.

त्याचा बाप आणि आजोबा त्याला नेहमी पाठीशी घालतात. त्याची आई आणि आजी त्याला काहीच बोलत नाहीत.

लक्षच देत नाहीत. म्हणून त्यांचाही राग येतो आहे. पण तसे बोलता येत नाही.

आपल्याच नातवाला आणि पणतवाला काय बोलणार? त्यांना हे कळायला नको?

खाण्यापिण्याचे लाड ठीक आहेत हो ऽऽ. पण भलते लाड कशाला करायचे?

वेळच्यावेळी अभ्यास केलाच पाहिजे. मित्रांच्या बरोबर टवाळक्या करून कसे चालेल?

आत्ता अभ्यासात हयगय केली तर पुढे आयुष्याचे वाटोळेच होणार. दुसरे काय होणार?' **किंवा –**

' आपण आपले **दोनशे वीस वर्षे** वयाचे, **' आजोबांचे आजोबा '** पाय घसरून पडले आणि त्यांचे हाड मोडले म्हणून, चिंताग्रस्त झालो आहोत. आता त्यांना कुठे ॲडमिट करायचे त्याचा विचार करतो आहोत.

पण त्यांचा मुलगा आणि नातू काहीच बोलत नाहीत. त्यांचे परस्परांचे संबंध ठीक नाहीत म्हणून लक्षच देत नाहीत.

त्यामुळे त्यांचा राग येतो आहे, पण तसे बोलून दाखविता येत नाही.

आपल्याच आजोबाना आणि पणजोबाना काय बोलणार? काही बोललो तर चिडतात. लगेच आरडाओरड करायला लागतात.

' आता तू, कालचा पोरगा, आम्हाला अक्कल शिकव.' असे म्हणतात. ह्याला काय अर्थ आहे?
मी हे सगळे कशासाठी सांगतो आहे? अहो ऽऽ, असतील तुमची भांडणे. असतील मतभेद. भांडणे कोणाच्यात नसतात?
पण ती लक्षात ठेवण्याची ही वेळ आहे का? त्यांना हे कळायला नको काय? इतके आयुष्य जगले आहेत त्याचा उपयोग काय?'

**नुसत्या कल्पनेनेही घाम फुटतो की नाही?**

हे फक्त सरळ नाते सांगितले आहे. ह्यामधे दहा पिढ्यांचे चुलत, आत्ते आणि मामे नातेवाईक, व्याही - विहिणी, सासवा - सुना, नणंदा - जावा इत्यादी मंडळी आणि त्यांचे रागलोभ मिळवल्यावर काय काय सहन करावे लागेल त्याचा विचार करा.
आपल्या डोक्याचा पार भुगा होऊन जाईल. काय करायचे तेच समजणार नाही. सुखेनैव जगता येणार नाही आणि मरताही येणार नाही.
जीव द्यायचीपण सोय नाही. तसा प्रयत्न केला तर शारिरीक वेदनांना तोंड देत जगावेच लागेल. कारण मृत्यू नाहीच आहे.
आपण फक्त जगत रहायचे. आला दिवस ढकलत रहायचे. जगण्याचा कंटाळा आला असला तरीही जगायचे.
नको असले तरीही जगायचे. कारण दुसरा कोणताही मार्ग नाही.

**असे होऊ नये म्हणून परमेश्वराने मृत्यूची योजना केलेली आहे.**

मृत्यू हा माणसाचा शत्रू नसून जवळचा मित्र आहे. मृत्यूचे अनेक फायदे आहेत.
१) मृत्यू पापी माणसाला पाप करण्यापासून परावृत्त करतो.
२) मृत्यू पुण्यवान माणसाला अधिक पुण्यवान व्हायला प्रवृत्त करतो.
३) मृत्यू माणसाचा अहंकार जमीनदोस्त करून टाकतो.
४) मृत्यू माणसामधील सर्व प्रकारचे भेद नष्ट करून टाकतो.
५) मृत्यू जीवनातला तोच तोचपणा संपवून टाकतो.
६) मृत्यू निरुपयोगी आणि बंधनरूप शरीरातून सुटका करतो.
७) मृत्यू भूतकालावर विस्मृतीचा पडदा टाकतो.
८) मृत्यू जीवात्म्याला पुनर्जन्माद्वारे नवीन शरीर देऊन, अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देतो. उत्कर्षाची नवीन संधी देतो.
९) मृत्यू आत्म्याची अमरता प्रत्ययास आणून देतो.

बघा मरणाचे किती फायदे आहेत ते. आता सांगा बघू, **' मृत्यू चांगला की वाईट?'**
म्हणून मरणावर नेहमीच प्रेम करावे. त्याला घाबरून पळायचा प्रयत्न करू नये.
देवाने **विस्मृतीची** आणि **अज्ञानाची** योजना करून माणसावर फार मोठे उपकार केलेले आहेत.
माणसाला फार मोठे वरदान दिलेले आहे.

**मागल्या जन्मी आपण कोण होतो? काय करीत होतो? कसे मेलो?**

ह्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला माहिती नसतात. ह्याचे कारण **विस्मरण** हेच आहे.

**पुढील जन्मी आपण कोण असू? काय करू? कसे मरू?**

ह्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला माहिती नसतात. ह्याचे कारण **अज्ञान** हेच आहे.
ह्या दोनही गोष्टी देवाने संपूर्णपणे गुप्त आणि फक्त आपल्याच हातात ठेवल्या आहेत. त्यामधे कोणीही ढवळाढवळ करू शकत नाही.
ही फारच चांगली गोष्ट आहे. उत्तम गोष्ट आहे. देवाने आपल्यावर फार मोठी दया केलेली आहे.
मरणाला सगळेच घाबरतात. त्याचेपासून दूर पळायला बघतात. त्याला टाळायला बघतात.
पण मरण कोणालाही आणि कधीही टळत नाही. टाळता येत नाही.
मनुष्य आयुष्यभर जे जे करतो, जसा जसा वागतो त्याचे संस्कार त्याच्या मनावर आणि बुद्धीवर सतत होत असतात आणि ते चिरस्थायी असतात. **H. M. V.** च्या जुन्या **' Long Play Record '** सारखे असतात. ते कधीही पुसले जात नाहीत. बदलत नाहीत. बदलता येत नाहीत. आपण कधीही, कुठेही, केव्हाही आणि कशीही ऐका. एका गाण्याच्या रेकॉर्ड मधून सदैव तेच गाणे, त्याच आवाजात आणि तशाच पद्धतीने गायलेले ऐकायला येणार. ती रेकॉर्ड नष्ट होई पर्यंत, कधीही दुसरे गाणे ऐकू येणार नाही. ते अशक्य आहे. कारण त्या रेकॉर्डवर, तिच्या जन्मापासून त्याच गाण्याचे संस्कार झालेले असतात. इथेही तसेच होत असते.
प्रसंग कोणताही असो, परिस्थिती कशीही असो, शारिरीक अवस्था कशीही असो, आयुष्यभराचे ते संस्कार आपला प्रभाव दाखवतात.
अगदी मरणाचे वेळी देखील कोणत्याही माणसाच्या मनामधे, त्याच्यावर असलेल्या संस्कारांना अनुसरूनच विचार येत राहतात.
दुसरे कोणतेही विचार येऊच शकत नाहीत. ते अशक्य आहे. आपल्याला रोजच्या व्यवहारमधेही ते दिसून येते.
१) व्यसनी माणूस सदैव व्यसनाचाच विचार करणार. त्याला ज्या पदार्थाचे व्यसन असेल तो पदार्थ मिळविण्याचाच प्रयत्न करणार.

त्याशिवाय त्याला चैन पडणारच नाही. दुसरे काहीही रुचणारच नाही.
२) गाण्याचा नाद असलेला माणूस, सदैव गाण्याविषयीच विचार करणार. गाणेच ऐकणार. गाण्याविषयीच बोलणार. दुसरे कोणतेही साधन त्याला रुचणार नाही.
३) अनैतिक मार्गाने पैसे मिळविणारा भ्रष्टाचारी माणूस, सदैव त्या मार्गाचाच विचार करणार. कोणत्याही कार्यामधे, ' कोणाला मॅनेज करून किती डल्ला मारता येईल!' ह्याचाच विचार करणार. कार्याची वाट लागली तरी त्याला पर्वा नसते.
४) ज्याचे आपल्या कुटुंबावर अतिशय प्रेम आहे, माया आहे असा मनुष्य, सदैव आपल्या कुटुंबाचीच काळजी करणार, चिंता करणार. कुटुंबियांच्या उत्कर्षासाठी, सुखासाठी आणि समाधानासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करीत राहणार.
५) आपल्या विद्यार्थ्यांच्यावर सुसंस्कार करणारा, त्यांना उत्तम शिक्षण देऊन पुढे समाजामधे वावरण्यास सक्षम करणारा असा शिक्षक, सदैव आपल्या विद्यार्थ्यांचीच काळजी करणार, चिंता करणार. त्यांच्या उत्कर्षासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत राहणार.
थोडक्यात सांगायचे म्हणजे माणसाने आयुष्यभर केलेल्या कर्मांचा एकत्रित संस्कार, त्याच्या अंतकाळीही आपला प्रभाव गाजवतो.
मृत्युसमयीदेखील माणसाकडून तसेच चिंतन घडून येते. दुराचारी माणसाच्या मनामधे, अंतकाळी सद्‌विचार येणे, कधीही शक्य नाही.
त्यामुळे तो त्याच भावाला प्राप्त होणार, त्याला तशीच गती मिळणार हे निश्चित.
सदाचारी माणसाच्या मनामधे, अंतकाळी वाईट विचार येणे, कधीही शक्य नाही.
त्यामुळे तो त्याच भावाला प्राप्त होणार, त्याला तशीच गती मिळणार हे देखील निश्चित.
ही **काळया दगडावरची पांढरी रेघ** आहे असे समजले तरी चालेल.
आयुष्यभर कोणताही विधिनिषेध न पाळता, कसेही स्वैराचारी वर्तन करून, सतत पापकर्मे करून, जगत राहायचे आणि तसे जगत असताना, ' अंतकाळ जवळ आला म्हणजे परमेश्वराच्या नांवाचा जप करू. ते सोपे आहे आणि सहज शक्य आहे.' असे म्हणणारा मनुष्य स्वत:चीच फसवणूक करीत असतो. स्वत:लाच फसवीत असतो. तसे कधीही घडून येणार नाही. घडू शकणार नाही.
अंतकाळी मुखामधे परमेश्वराचे नांव यायला हवे असेल तर त्यासाठी आयुष्यभर **साधना** करावी लागते.

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।**
**मय्यार्पितमनोबुद्धिः मामेवैष्यस्यसंशयम् ।। ७ ।।**
**अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।**
**परमम् पुरुषम् दिव्यम् याति पार्थानुचिन्तयन् ।। ८ ।।**

म्हणून नेहमीच माझे स्मरण करीत जा आणि युद्ध कर. माझ्या ठायी मन व बुद्धी अर्पण केलीस म्हणजे मलाच येऊन मिळशील ह्यात संशय नाही. हे पार्था ! चित्त दुसरीकडे जाऊ न देता अभ्यासाच्या योगाने दिव्य परमपुरुषाचे ध्यान करीत राहणारा मनुष्य त्याच पुरुषास प्राप्त होतो.
आयुष्यभर सचोटीने आणि प्रामाणिकपणे वागावे लागते. सदैव सत्कर्मच करीत राहावे लागते. स्वार्थ बाजूला ठेवावा लागतो.
ईश्वर आहे! ईश्वराचे अस्तित्व आहे! हे मान्य करून त्याची भक्ती करावी लागते.
त्याला मनापासून शरण जावे लागते. अनन्यभावे शरण जावे लागते. कर्ता करविता तोच आहे ह्याविषयी दृढ श्रद्धा बाळगून, आपण करीत असलेले प्रत्येक कर्म त्यालाच अर्पण करावे लागते. देवाला कुणी शिळी, खराब झालेली, कुजकी फुले वाहतात का? नाही ना! मग आपले कर्म देवाला अर्पण करायचे असल्यामुळे ते सत्कर्मच असेल, कुकर्म नसेल, चांगले कर्मच असेल, वाईट कर्म नसेल, ह्याची काळजी घ्यायला नको का? घ्यायलाच हवी! म्हणजे आपले विहित कर्म निष्ठेने आणि अत्यंत प्रामाणिकपणे करीत रहावे लागते.
कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता केवळ कर्तव्य भावनेने कर्म करीत रहायचे.
कर्म करीत असताना आपले मन आणि बुद्धी परमेश्वराला अर्पण करायची आणि सदैव त्याचेच स्मरण करायचे. त्याचेच चिंतन करायचे. म्हणजे मग परमेश्वरप्राप्ती झाल्याशिवाय राहात नाही. कर्मयोगी जर असा अंतरबाह्य प्रेमाने आणि भक्तीने लीन झाला, तर परमेश्वर तरी कृपा केल्याशिवाय कसा बरे राहील?
**' ये यथा माम् प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ।'** असे भगवंतानेच सांगितलेले आहे.
त्यानेच दिलेले वचन पाळल्याशिवाय, तो राहणारच नाही. असो.

**कविम् पुराणम् अनुशासितारम्**
**अणोरणीयाम्समनुस्मरेद्यः ।**
**सर्वस्य धातारमचिन्त्यरूपम्**
**आदित्यवर्णन् तमसः परस्तात् ।। ९ ।।**

**प्रयाणकाले मनसाचलेन**

**भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।**

**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्**

**स तम् परम् पुरुषमुपैति दिव्यम् ।। १० ।।**

**यदक्षरम् वेदविदो वदन्ति**

**विशन्ति यद्यतयो वितरागा: ।**

**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यम् चरन्ति**

**तत्ते पदम् सङ्ग्रहेण प्रवक्ष्ये ।। ११ ।।**

सर्वज्ञ, पुरातन, शास्ता, अणूपेक्षाही लहान, सर्वांचा आधार, अचिंत्य स्वरूप आणि सूर्याप्रमाणे दैदिप्यमान अशा पुरुषाचे स्मरण जो मनुष्य अंतकाली, योगसामर्थ्याने व भक्तीने युक्त होऊन, मन स्थिर करून आणि प्राण दोन्ही भुवयांच्यामध्ये नीट ठेवून करील, तो मनुष्य त्याच दिव्य परमपुरुषाप्रत जाऊन पोहोचतो. वेदवेत्ते जे अक्षर आहे असे म्हणतात, आसक्तिरहित होऊन यती ज्यात प्रवेश करतात आणि ज्याची इच्छा करून ब्रह्मचर्य व्रताचे आचरण करतात ते परमपद तुला संक्षेपाने सांगतो.

ह्या तीन श्लोकांच्यापैकी नववा आणि दहावा श्लोक म्हणजे एक सलग वाक्य आहे.

त्यामधे ज्या दैदिप्यमान पुरुषाचे वर्णन केलेले आहे, तो पुरुष म्हणजे अगोदर तिसऱ्या श्लोकामधे वर्णन केलेले,

‘ सर्वाहून परम आणि कधीही नाश न पावणारे असे ’ ब्रह्मतत्त्व म्हणजेच परब्रह्म आहे.

अंतकाळी त्या पुरुषाचे म्हणजेच परब्रह्माचे स्मरण करणे सोपे नाही.

त्यासाठी आयुष्यभर स्वधर्माला अनुसरून, फळाची अपेक्षा न ठेवता, आपले विहित कर्म करीत राहणे आवश्यक आहे.

हाच **कर्मयोग** आहे.

तसे करीत असताना परमेश्वराचे चिंतन आणि मनन करीत राहून, त्याला जाणण्याचा सतत प्रयत्न करीत राहणे आवश्यक आहे.

तसे केल्याशिवाय अंतकाळी त्याचे स्मरण करणे कोणालाही शक्य होणार नाही. हाच **ज्ञानयोग** आहे.

पुढे त्याचे स्मरण कसे करायचे आहे ते ही सांगितले आहे.

योगसामर्थ्याने आपले मन पूर्णपणे आवरून, स्थिर करून, शांत करून आणि प्राण दोन्ही भुवयांच्यामधे नीट ठेवून करायचे.

त्यासाठी ध्यानयोगाची म्हणजेच पातंजलयोगाची साधना आयुष्यभर करायला हवी. हाच **राजयोग** आहे.

आणि तसे स्मरण करीत असताना आपले मन परमेश्वराविषयीच्या श्रद्धेने, भक्तीने आणि प्रेमाने युक्त असणे आवश्यक आहे.

ओतप्रोत भरून जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आयुष्यभर भगवंताची भक्ती केली पाहिजे. हाच **भक्तियोग** आहे.

म्हणजेच ज्या साधकाच्या अंतकाळी, ‘ कर्मयोग, ज्ञानयोग, राजयोग आणि भक्तियोग ’ ह्या चारही योगांचा यथायोग्य संगम होऊन, मन आणि बुद्धीमधे केवळ परमेश्वराचे चिंतन आणि मुखामधे केवळ त्याचेच नाम येते, तो भक्त, त्याच परब्रह्म परमात्म्याला जाऊन मिळतो.

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।**

**मूर्ध्न्याधायात्मन: प्राणम् आस्थितो योगधारणाम् ।। १२ ।।**

**ॐ इत्येकाक्षरम् ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**

**य: प्रयाति त्यजन्देहम् स याति परमाङ् गतिम् ।। १३ ।।**

सर्व इंद्रियांच्या द्वारांना आवरून आणि मनाचा हृदयात निरोध करून, आपला प्राण मस्तकात नेऊन समाधीयोगात स्थिर झालेला ॐ ह्या एकाक्षरब्रह्माचा जप करीत, जो माझे स्मरण करीत देह सोडून जातो त्याला उत्तम गती मिळते.

ओंकाराविषयी म्हणजेच **ॐ** विषयी काय बोलू?

**ॐ** हा एकाक्षर मंत्र आहे आणि तो सिद्धमंत्र आहे.

अकार, उकार, मकार ह्या तीन आणि अनुस्वाराची अर्धी, अशा एकूण साडेतीन मात्रांचा मंत्र आहे.

त्याची दीक्षा द्यावी किंवा घ्यावी लागतच नाही. त्याचा उच्चार करणाऱ्याचा, तो स्वत:च गुरू होतो.

ओंकाराचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. त्याचा उच्चार कसा होतो पहा.

**ओ** हा उच्चार कंठातून ओठांच्या सर्वांत लहान वर्तुळावाटे येतो आणि **म** हा उच्चार ओठ बंद केल्यावर कंठातून नाकावाटे येतो.

ह्या दोन उच्चारांच्यामधे **‘ कंठव्य, तालव्य, दंतव्य आणि ओष्ठव्य ’** अशी सगळी शब्दसृष्टी सामावलेली आहे.

म्हणूनच त्याला **‘ शब्दब्रह्म ’** म्हणतात.

स्वरांच्या संबंधात सांगायचे म्हणजे संगीताचे अधिष्ठान **नाद** आहे. ओंकार हा **आदिनाद** आहे.
त्याच्या उच्चाराने नादाचे आद्यन्त स्वरूप व्यक्त होते. अनाहत म्हणजे अव्यक्त आणि आहत म्हणजे व्यक्त नादाची प्रचीति येते.
म्हणूनच त्याला **' नादब्रह्म '** म्हणतात.
त्याचा उच्चार कोणत्याही वेळी आणि कोणत्याही स्वरात केला तरी तो अत्यंत आनंददायकच होतो.
प्रत्येकाने आपली शक्ती ओळखून त्याप्रमाणे उच्चार करावा.
श्रद्धेने आणि भक्तीने ओंकाराचा केवळ उच्चार करायला सुरवात केली तर लगेच बुद्धीची आणि मनाची अंतर्बाह्य शुद्धी व्हायला लागते. मन शांत व्हायला लागते. मनामधे आनंदाच्या लहरी उसळायला लागतात. उच्चार करणाऱ्याला, स्वत:ला तसे जाणवायला लागते.
हे सगळे आपल्या रोजच्या आयुष्यात अनुभवता येते. आपल्यापैकी अनेकांना तसा अनुभव आलेलाही असेल.
ज्याना आलेला नसेल त्यांनी उद्यापासून रोज, श्रद्धेने आणि भक्तीने, ओंकाराचा उच्चार करायला सुरवात करावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे. त्यांनाही तसाच अनुभव येईल ह्याविषयी मला खात्री आहे.
आपण प्रयत्न करून पहा. मी तसा अनुभव नेहमीच घेत आलेलो आहे, आजही घेतो आहे आणि यापुढेही घेत राहीन.
ओंकार हा **परीस** आहे. त्याच्या जवळ जाणाऱ्याचे, आपल्या वाणीने त्याला स्पर्श करणाऱ्याचे सोनेच होणार.
दुसरे काहीही होणार नाही. होऊ शकणारच नाही.
आता कल्पना करा की, ज्याने आयुष्यभर साधना केली आहे अशा कोणाही साधकाचा अंतकाळ जवळ आला आहे.
अशा वेळी, त्याच्या मनामधे आणि बुद्धीमधे केवळ परमेश्वराचेच चिंतन चाललेले आहे. ह्या नाशवंत शरीराचे भान नाहीसे झाले आहे. एका भगवंताशिवाय दुसरा कोणताही विचार मनात येत नसून, त्याच्या पायाजवळ जाण्यासाठी, त्याच्याशी एकरूप होण्यासाठी उतावीळ झालेला आहे. आणि अशा अवस्थेमधे जर त्याच्या मुखामधून, जो **नादब्रह्म** आहे आणि **शब्दब्रह्म** ही आहे, अशा त्या परमपवित्र ओंकाराचा उच्चार, अत्यंत नैसर्गिकपणे होऊ लागला, तर त्याचा काय परिणाम होईल बरे?
मोक्ष — मोक्ष आणि केवळ मोक्षच मिळेल. दुसरे काहीही होणार नाही.
अहो ऽऽ! मुखामधे **अमृत** असल्यावर, **अमरत्व** येणार हे सांगायला कशाला हवे?
तो अमृताचा **' स्वभाव '** आहे. म्हणूनच त्याला अमृत असे म्हणतात. असो.

**अनन्यचेता: सततम् यो माम् स्मरति नित्यशः ।**
**तस्याहम् सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ।। १४ ।।**
**मामुपेत्य पुनर्जन्म दु:खालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिम् परमाम् गताः ।। १५ ।।**
**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ।। १६ ।।**

हे पार्था ! अनन्यभावाने सदासर्वदा जो माझे स्मरण करतो त्या योग्यास माझी प्राप्ती सुलभ रीतीने होते. मला येऊन मिळाल्यावर परमसिद्धी प्राप्त झालेल्या त्या महात्म्याला दु:खरूप व अशाश्वत असा पुनर्जन्म प्राप्त होत नाही. हे अर्जुना ! ब्रह्मलोकासह जे लोक आहेत तेथून ह्या लोकी परत फिरणे भाग आहे. पण हे कौंतेया! मला येऊन मिळाले म्हणजे पुनर्जन्म नाही.
आपल्या आईपासून विलग झालेला एक लहान मुलगा सारखा तिला हाका मारतो आहे.
तिचा विरह सहन न झाल्यामुळे रडतो आहे, सारखा तिलाच शोधतो आहे.
अशा वेळी त्याची आई त्याच्याकडे धावत येते की नाही? त्याला आपल्या उराशी कवटाळते की नाही? तो परत कुठेतरी हरवू नये म्हणून त्याचा हात घट्ट धरून ठेवते की नाही? ती **आई** आहे ना! तिलाही आपल्या मुलाचा विरह सहन होत नाही.
मग परमेश्वर तरी दुसरे काय करणार सांगा बरे? तोच आपली आई आहे ना? आपला बाप आहे ना? आपण त्याला काय म्हणतो?

**त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ।**

कधीतरी मला, ह्या प्रसिद्ध आरतीचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या ओळी सुचल्या. ऐका —

**तुम्ही माता, तुम्ही पिता । तुम्ही बंधू, तुम्ही सखा हो ।।**
**तुम्ही विद्या, तुम्ही कर्म । तुम्ही माझे, देव धर्म ।।**
**देव धर्म, देव धर्म । तुम्ही माता, तुम्ही पिता ।।**

आरती ही ' करून टाकण्याची किंवा उरकण्याची ' गोष्ट नाही.
आरती ह्या शब्दाचा अर्थ **' परमेश्वराला आर्तपणे मारलेली हाक'** किंवा **' परमेश्वराचा उत्कटपणे, मनापासून केलेला धावा.'**
असा आहे. आरती त्या भावनेनेच केली गेली पाहिजे. तरच तिला अर्थ आहे.
जिच्यामधे समर्पणाची भावना नाही, आर्तता नाही, उत्कट भक्ती नाही, तिला आरती म्हणता येणार नाही.
तसे करणे म्हणजे परमेश्वराची अवहेलना करण्यासारखेच आहे. कृती महत्त्वाची नसते. तिच्या मागची भावना महत्त्वाची असते.
म्हणूनच, एकच कृती कधी चांगली किंवा कधी वाईट होते.
अनेक घरांमधे गणपती अथर्वशीर्षाचे सहस्त्रावर्तन करतात. पण कसे करतात पहा.
वाघ मागे लागल्यासारखे भराभर म्हणत सुटतात. आपण काय म्हणत आहोत, ते त्यांना स्वत:लाच कळत नाही.
त्यामुळे ते श्रीगणपतीला कळण्याचा प्रश्नच येत नाही. कसे तरी करून एकदाची हजाराची संख्या गाठायची आणि मोकळे व्हायचे.
ह्याला भक्ती म्हणता येईल का? आपण जरा विचार करा.
' एकापाठोपाठ एक अशी हजार वेळा माझी स्तुती करा!' असे श्रीगणेशाने कधी तरी सांगितले आहे काय?
ह्या सगळ्या आपल्याच कल्पना आहेत आणि आपणच त्या गणपतीवर लादतो. आपली भावनाशून्य बडबड त्याला जबरदस्तीने ऐकायला लावतो. अशा प्रकारच्या भक्तीने परमेश्वर प्रसन्न होईल? मुळीच होणार नाही.
प्रसन्न होणे, दर्शन देणे आणि कृपा करणे सोडूनच द्या. तो आपल्याकडे ढुंकूनही पाहणार नाही.
पण जर आपण श्रीगजाननाच्या समोर बसून, अत्यंत **श्रद्धायुक्त अंत:करणाने**, अथर्वशीर्ष एकदाच म्हटले, तरी त्याला ते आवडेल.
तो प्रसन्न होईल. जर त्याला प्रामाणिकपणे, तळमळीने, मनापासून साद घातली तर तो अवश्य प्रतिसाद देईल.
आपल्या उद्धारासाठी धावून येईल. **कविवर्य मोरोपंतांनी**, परमेश्वराला कशी कळवळून हाक मारली आहे पहा.
त्यांनी श्रीरामाची प्रार्थना रचलेली आहे. ते काय म्हणतात ते नीट ऐका.

**श्रीरामा! तूं स्वामी असशी माझ्या शिरावरी जागा ।**
**अम्हास तुझिया पायावाचुन निर्भय नसे दुजी जागा ।। १ ।।**
**श्रीरामा! नाम तुझे माझ्या वदनांत सर्वदा राहो ।**
**साहो मन भोगातें, गृहचिंतेतें न हे कधी वाहो ।। २।।**
**संतांचा संग घडो, कीर्ति तुझी सर्वदा पडो कानीं ।**
**आवडि फार धरावी श्रीरामा तव गुणांचिया गानीं ।। ३ ।।**
**एकांतीं त्वन्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें ।**
**संकट वारुनि द्यावें हे मज वरदान जानकी कांतें ।। ४ ।।**

अशी हाक मारल्यावर **परब्रह्म परमात्मा परमेश्वर** तरी उद्धार केल्याशिवाय कसा राहील?
अशा अनन्य भक्ताला तो आपल्या जवळच ठेवील. कधीही दूर लोटणार नाही. जन्म मरणाच्या चक्रामधे अडकू देणारच नाही.
ब्रह्मदेवासहित इतर कोणीही देव किंवा देवता झाल्या तरी, त्या थोडा काळ आश्रय देतील, हात धरतील, मदत करतील, आपापल्या घरामधे रहायला देतील. खायला प्यायला देतील, नाना प्रकारे उपभोग घ्यायला देतील. परंतु त्यानंतर परत जन्म मरणाच्या चक्रामधे फिरावेच लागेल. त्याला कारण आहे. ते म्हणजे, ब्रह्मदेवासहित सर्व देव देवता नाशवंत असून त्यांनाही जन्म आणि मरण आहेच.
जे स्वत:च जन्म मरणाच्या चक्रात फिरत आहेत, ते दुसऱ्याला त्या चक्रामधून कसे काय बाहेर काढू शकतील बरे? ते शक्य नाही.
जो स्वत: अजन्मा, अनादि, अनंत, अजर, अमर असा आहे, त्यालाच आपल्या भक्ताला जन्म मरणाच्या चक्रामधून बाहेर काढणे शक्य होईल. ह्या विषयीची अधिक माहिती पुढे सांगितली आहे.

**सहस्त्रयुगपर्यन्तम् अहर्यद्ब्रह्मणो विदु: ।**
**रात्रिम् युगसहस्त्रान्ताम् तेऽहोरात्रविदो जना: ।। १७ ।।**
**अव्यक्ताद्व्यक्तय: सर्वा: प्रभवन्त्यहरागमे ।**
**रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसञ्ज्ञके ।। १८ ।।**
**भूतग्राम: स एवायम् भूत्वा भूत्वा प्रलीयते ।**
**रात्र्यागमेऽवश: पार्थ प्रभवत्यहरागमे ।। १९ ।।**

अहोरात्र म्हणजे काय हे जाणणारे पुरुष, ब्रह्मदेवाचा जो एक दिवस आहे तो, कृत, त्रेता, द्वापार व कली ह्या चार युगांचे एक महायुग,

अशा हजार महायुगांचा असतो आणि तितक्याच महायुगांची एक रात्र असते असे समजतात.
ब्रह्मदेवाचा हा दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त पदार्थ निर्माण होतात आणि रात्र सुरू झाली म्हणजे त्याच अव्यक्तात लय पावतात. हे पार्था ! भूतांचा तोच हा समुदाय ह्याप्रमाणे पुन:पुन्हा जन्मून, स्वत:ची इच्छा असो किंवा नसो, रात्र सुरू झाली की लय पावतो आणि दिवस सुरू झाला की पुन्हा जन्म पावतो.
काळ हा खरोखरच अनादि - अनंत असाच आहे.
काळ किती सूक्ष्म आहे ते आपल्याला समजू शकत नाही. तसेच काळ किती मोठा आहे तेही आपल्याला समजू शकत नाही.
आपण पृथ्वीवर राहतो म्हणून आपला काळ आणि दिशा संपूर्णपणे पृथ्वी, चंद्र आणि सूर्य ह्यांच्या गतीवर अवलंबून असतात आणि त्यावरूनच आपण मिनिटे, तास, दिवस, रात्र, आठवडा, पक्ष, महिना, वर्ष इत्यादी ठरवतो.
समजा, जर आपण आपल्या सूर्यमालेच्या बाहेर दूरवर गेलो, तर तेथे काळ आणि दिशा ह्या संकल्पनांना अस्तित्व असेल काय? तेथे भूतकाळ आणि भविष्यकाळ म्हणजे काय असेल बरे? काही सांगता येत नाही.
हे सर्व काही फार गूढ आहे असेच वाटते. तरीही प्राचीन शास्त्रकारांनी आणि जाणकारांनी, आपल्या सारख्या सामान्य माणसांना **' काळ '** ही संकल्पना, निदान पृथ्वीसापेक्ष का होईना, समजावी म्हणून काही परिमाण ठरवलेले आहे.
त्याविषयीची सविस्तर माहिती लिहून ठेवलेली आहे. ती माहिती वाचून, त्यावर चिंतन करायला लागल्यावर आपली बुद्धी काम करेनाशी होते. आपल्याला गोंधळून जायला होते. काळाचा यथोचित अंदाज करता न आल्यामुळे आपण थक्क होतो.
ती माहिती मी आपल्याला क्रमवार सांगतो. नीट लक्ष देऊन ऐका आणि शक्य झाले तर समजून घ्यायचा प्रयत्न करा.
ज्याचे आणखी विभाजन होऊ शकत नाही आणि ज्याचा इतर कशाही बरोबर संयोग झालेला नाही तो **' परमाणू.'**
दोन परमाणूंचा मिळून होतो तो **' अणू.'** असे तीन अणू मिळून जो होतो तो **' त्रसरेणू.'**
असे तीन त्रसरेणू एकापुढे एक ठेवले तर जेवढे अंतर होईल, ते अंतर ओलांडून जायला सूर्यप्रकाशाला जेवढा वेळ लागेल तेवढ्या वेळाला म्हणतात **' तृटी.'** सूर्यप्रकाशाची गती एका सेकंदाला ३ लक्ष किलोमीटर एवढी असते हे ध्यानात घ्या.
( हे काळाचे सूक्ष्मतम माप सांगितलेले आहे. ह्याचा १/३ किंवा २/३ भाग मोजताच येणार नाही असेही सांगितलेले आहे. आपण त्याची कल्पनाही करू शकत नाही. )
अशा १०० तृटी एवढा वेळ म्हणजे एक **' वेध.'** तीन वेधांचा होतो एक **' लव.'**
तीन लवांचा होतो एक **' निमिष.'** काळाचे हे माप आपल्याला समजू शकते.
( डोळ्यांची पापणी एकदा मिटून परत उघडायला जेवढा वेळ लागतो तेवढा वेळ म्हणजे एक निमिष हे लक्षांत घ्यावे.)
तीन निमिषांचा होतो एक **' क्षण.'** पाच क्षणांची होते एक **' काष्ठा.'**
पंधरा काष्ठांचा होतो एक **' लघू.'** पंधरा लघूंची होते एक **' नाडिका.'**
दोन नाडिकांचा होतो एक **' मुहूर्त.'** तीन मुहूर्तांचा होतो एक **' प्रहर.'**
( यालाच **याम** असेही म्हणतात. याम किंवा प्रहर म्हणजे दिवसाचा किंवा रात्रीचा चौथा भाग म्हणजेच तीन तासांचा काळ. )
चार प्रहरांचा होतो **' दिवस.'** चार प्रहरांची होते **' रात्र.'** म्हणजे आठ प्रहरांचा होतो एक **' पूर्ण दिवस.'**
( आजचा सूर्योदय ते उद्याचा सूर्योदय म्हणजेच एक दिवस आणि एक रात्र मिळून आपला एक पूर्ण दिवस होतो. )
सात पूर्ण दिवसांचा होतो एक **' आठवडा.'** दोन आठवड्यांचा होतो एक **' पक्ष.'**
दोन पक्षांचा होतो एक **' मास किंवा महिना.'** ( एक **शुक्लपक्ष** आणि एक **कृष्णपक्ष** मिळून एक मानवी महिना होतो.)
दोन महिन्यांचा होतो एक **' ऋतू.'** तीन ऋतूंचे होते एक **' अयन.'**
दोन अयनांचे होते एक **' वर्ष.'** ( एक **दक्षिणायन** आणि एक **उत्तरायण** मिळून एक मानवी वर्ष होते. )
ही मानवी वर्षाची गणना लक्षात ठेवून आपल्याला पुढे जायचे आहे.
आपला **शुक्ल** पक्ष म्हणजे **' पितरांचा एक दिवस '** असतो. आपला **कृष्ण** पक्ष म्हणजे **' पितरांची एक रात्र '** असते.
म्हणजे आपला एक **महिना** म्हणजे **' पितरांचा एक पूर्ण दिवस '** होतो.
आपले ३६५ महिने ( ३०.४१ वर्षे ) म्हणजे **' पितरांचे एक पूर्ण वर्ष '** होते.
आपले **उत्तरायणा**चे सहा महिने म्हणजे **' देवांचा एक दिवस '** असतो.
आपले **दक्षिणायना**चे सहा महिने म्हणजे **' देवांची एक रात्र '** असते.
म्हणजे आपले एक वर्ष म्हणजे **' देवांचा एक पूर्ण दिवस '** होतो. आपली ३६५ वर्षे म्हणजे **' देवांचे एक पूर्ण वर्ष '** होते.

( गोंधळलात की काय? थांबा जरा! अजून बरेच काही ऐकायचे आहे. )
आता परत आपल्या एका वर्षाचा ( एका मानवी वर्षाचा ) संदर्भ घेऊया. तर —
अशी ४,३२,००० वर्षे ( चार लक्ष बत्तीस हजार ) म्हणजे एक **' कलियुग.'**
अशी ८,६४,००० वर्षे ( आठ लक्ष चौसष्ट हजार ) म्हणजे एक **' द्वापारयुग.'**
अशी १२,९६,००० वर्षें ( बारा लक्ष शहाण्णव हजार ) म्हणजे एक **' त्रेतायुग.'**
अशी १७,२८,००० वर्षें ( सतरा लक्ष अठ्ठावीस हजार ) म्हणजे एक **'सत्ययुग.'**
( कलियुगाच्या **दुप्पट** द्वापारयुग, कलियुगाच्या **तिप्पट** त्रेतायुग आणि कलियुगाच्या **चौपट** सत्ययुग असा हिशोब आहे.)
अशा प्रकारे ४३,२०,००० मानवी वर्षें ( त्रेचाळीस लक्ष वीस हजार ) म्हणजे एक **' चतुर्युग.'** पूर्ण होते.
ह्यालाच **' महायुग '** असे म्हणतात. ( काही समजते आहे काय?)
अशा एक हजार महायुगांचा काळ गेला म्हणजे **' ब्रह्मदेवाचा एक दिवस.'** होतो.
अशा एक हजार महायुगांचा काळ गेला म्हणजे **' ब्रह्मदेवाची एक रात्र.'** होते.
ह्याचा अर्थ हा की, असा दोन हजार महायुगांचा काळ गेला म्हणजे **' ब्रह्मदेवाचा एक पूर्ण दिवस.'** होतो.
सारांश, ८,६४,००,००,००० मानवी वर्षे ( आठ अब्ज चौसष्ट कोटी ) म्हणजे **' ब्रह्मदेवाचा एक पूर्ण दिवस.'** होतो.
( काही अंदाज करता येतो आहे काय?)
अशा ३६५ दिवसांचा काळ गेला म्हणजे ब्रह्मदेवाचे एक **' वर्ष. '** होते.
३,५,४३,६०,००,००,००० मानवी वर्षे ( तीन निखर्व, पाच खर्व, त्रेचाळीस अब्ज, साठ कोटी ) म्हणजे ब्रह्मदेवाचे एक **' वर्ष. '**
( काही समजते आहे काय? )

**ब्रह्मदेवाचे आयुष्य अशी शंभर वर्षे.**

३,५,४,३,६०,००,००,००,००० मानवी वर्षे. ( तीन शंकू, पाच महापद्म, चार निखर्व, तीन खर्व, साठ अब्ज मानवी वर्षे.)
म्हणजेच **' तीन लक्ष चौपन्न हजार तीनशे साठ अब्ज.'** मानवी वर्षे.
एवढा काळ गेला म्हणजे ब्रह्मदेवाचे आयुष्य संपते. त्याचा अंत होतो.
हे सगळे ऐकून थकला असाल ना. पण जरा थांबा. खरी कमाल पुढे आहे.
ब्रह्मदेवाचे संपूर्ण आयुष्य जगून पूर्ण होते, तेव्हा काय होते सांगू का?
त्या अनादि, अनंत, अमर, अव्यक्त, अमूर्त अशा **' परब्रह्म परमात्म्या '** चे एक **' निमिष.'** होते. म्हणजे नक्की काय होते बरे?
तर **' परब्रह्म परमात्म्या '** च्या डोळ्यांची पापणी एकदा मिटून परत उघडते. आता हे सगळे वाचल्यावर जरा विचार करा की,
' खरंच आपल्या असण्याला काही किंमत आहे का? आपल्या अहंकाराला, गर्वाला, आपल्या घमेंडखोर स्वभावाला काही अर्थ आहे का? आपल्या जास्तीत जास्त शंभर वर्षांच्या जगण्याला काय किंमत आहे? आपण काहीही केले, कितीही साधना केली, कितीही प्रयत्न केले तरी आपल्याला ह्या जन्ममरणाच्या चक्रामधून खरोखर बाहेर पडता येईल का?'
पण श्रीकृष्ण तर तसे निश्चितपणे सांगतो आहे. नि:संदिग्धपणे सांगतो आहे आणि तो सांगतो आहे म्हणजे ते खरेच असणार.
त्यासाठी आवश्यक ती साधना करता यावी म्हणून तर आपल्याला अत्यंत दुर्लभ असा मानवी जन्म मिळालेला आहे.
तशी साधना फक्त मानव योनीतच करता येते. दुसऱ्या कोणत्याही योनीमधे ते शक्य नाही.
एका दृष्टीने म्हणायचे झाले तर आपल्या जगण्याला काडीचीही किंमत नाही. पण नीट विचार केला तर फार मोठी किंमत आहे.
आता परमेश्वराने दिलेल्या ह्या बहुमोल संधीचा फायदा घ्यायचा की नाही? उपयोग करायचा की नाही?
हे आपले आपणच ठरवायला हवे. असो.

**परस्तस्मात्तु भावोऽन्य: व्यक्तोऽव्यक्तात्सनातन: ।**
**य: स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ।। २० ।।**
**अव्यक्तोऽक्षर इत्युक्त: तमाहु: परमाङ् गतिम् ।**
**यम् प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमम् मम ।। २१ ।।**
**पुरुष: स पर: पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।**
**यस्यान्त:स्थानि भूतानि येन सर्वमिदन् ततम् ।। २२ ।।**

पण ह्या अव्यक्तापलीकडचा दुसरा जो सनातन अव्यक्त पदार्थ, जो सर्व भूते नाहीशी झाली तरीही नाहीसा होत नाही, ज्या अव्यक्ताला

अक्षर असे म्हणतात, त्यालाच अखेरची गती म्हटले आहे. ज्याला जाऊन पोहोचले असता परत जन्म प्राप्त होत नाही, असे माझे परमस्थानही तेच होय.

हे पार्था ! ज्याचे आत सर्व भूते आहेत व ज्याने हे सर्व व्यापले आहे तो श्रेष्ठ पुरुष, अनन्य भक्तीने लाभणारा आहे.

माणसाच्या तुलनेने, सर्व विश्व निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाचे आयुष्य फार फार मोठ्या कालावधीचे आहे. प्रदीर्घ आहे. आपण त्याची कल्पनाही करू शकत नाही. असे असले तरीही त्याच्या जीवनालाही मर्यादा आहे. त्यालाही शेवट आहे. मरण आहे. अंत आहे. कारण तो देखील कोणीतरी निर्माण केलेला आहे. त्याचा जन्म होतो. त्याला कोणीतरी जन्माला घालतो. आणि —

**' जो जन्मला त्याला मृत्यू येतोच आणि जो मरण पावला त्याला परत जन्म येतोच.'** स्वत: भगवंतानेच दुसऱ्या अध्यायात २७ व्या श्लोकामधे तसे सांगितलेले आहे. ह्या नियमाला कोणताही अपवाद नाही. अगदी ब्रह्मदेवही नाही. त्याच बरोबर —

जो सदैव आहे, सर्वत्र आहे आणि सर्वातीत म्हणजे सर्वांच्या पलीकडचा, कशावरही अवलंबून नसलेला असा एकमेव आहे.

जो सर्वांचा निर्माता आहे, पालनकर्ताही आहे आणि विनाश करणाराही आहे.

ज्याला आदि नाही म्हणजे जो कधी जन्माला आलेलाच नाही म्हणून ज्याचा अंत होणे कधीही शक्य नाही.

ज्याचा अभाव असणे अशक्य आहे. असा जो कोणी आहे, त्यालाच **' परब्रह्म परमात्मा '** म्हणतात.

ब्रह्मदेव हा परब्रह्म परमात्म्याचा, विश्वनिर्मितीच्या हेतूने झालेला, एक आविष्कार आहे.

म्हणूनच त्याला अव्यक्त ब्रह्मदेवाच्याही पलीकडचा, **सनातन** म्हणजे प्राचीन असूनही सदैव नवीनच असणारा, **अक्षय** म्हणजे क्षय नाही असा, **अक्षर** म्हणजे झीज न होणारा, **अजर** म्हणजे वृद्धावस्था नसलेला, **अढळ** म्हणजे कधीही न ढळणारा, **अच्युत** म्हणजे खाली न घसरणारा आणि प्राणिमात्रांची अखेरची गती **( Last Destination )** असे म्हटलेले आहे.

त्याची प्राप्ती झाली तर मग जन्म मरणाच्या चक्रामधून सुटका होणार हे वेगळे सांगायची गरज नाही. तसेच होणार हे निश्चित.

अहो ऽऽ, रोजच्या व्यवहारामधे तसेच होत नाही का? एकदा का **महाराजा** ची मर्जी संपादन केली म्हणजे मग इतर मंत्रीगणांच्या मदतीची गरज भासत नाही. सगळे आपोआपच मनासारखे घडून येते.

**यत्र काले त्वनावृत्तिम् आवृत्तिञ् चैव योगिन: ।**
**प्रयाता यान्ति तङ् कालम् वक्ष्यामि भरतर्षभ ।। २३ ।।**
**अग्निर्ज्योतिरह: शुक्ल: षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जना: ।। २४ ।।**
**धूमो रात्रिस्तथा कृष्ण: षण्मासा दक्षिणायनम् ।**
**तत्र चांद्रमसञ् ज्योति: योगी प्राप्य निवर्तते ।। २५ ।।**
**शुक्लकृष्णे गती ह्येते जगत: शाश्वते मते ।**
**एकया यात्यनावृत्तिम् अन्ययावर्तते पुन: ।। २६ ।।**

आता हे भरतश्रेष्ठा ! योगी ज्या काळी मेले असता परत जन्मास येत नाहीत आणि ज्या काळी मेले असता परत जन्मास येतात तो काळ तुला सांगतो. अग्नि, ज्वाळा, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायणाचे सहा महिने ह्यात मेलेले ब्रह्मवेत्ते लोक ब्रह्माला प्राप्त होतात. धूर, रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायनाचे सहा महिने ह्यात मेलेले चंद्रलोकास जाऊन पुण्यांश संपल्यावर परत जन्माला येतात. ह्याप्रमाणे प्रकाशमय व अंध:कारमय अशा जगताच्या दोन शाश्वत गती मानलेल्या आहेत. एका गतीने गेले म्हणजे परत फिरणे नाही व दुसऱ्या गतीने गेले म्हणजे परत फिरणे आहे.

आजच्या हिशोबाप्रमाणे, सर्वसाधारणपणे डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापासून ते जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंतच्या कालावधीत सूर्य उत्तर गोलार्धात असतो म्हणून त्या कालास **' उत्तरायण '** म्हणतात.

ह्यालाच **' देवयान '** असे म्हणतात. तसेच हिला **' शुक्लगती '** असेही म्हणतात.

तसेच जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापासून ते डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंतच्या कालावधीत सूर्य दक्षिण गोलार्धात असतो म्हणून त्या कालास **' दक्षिणायन '** म्हणतात.

ह्यालाच **' पितृयाण '** असे म्हणतात. तसेच हिला **' कृष्णगती '** असेही म्हणतात.

सनातन धर्मशास्त्र असे सांगते की, ' उत्तरायणाच्या काळात, शुक्लपक्षामधे, दिवसा म्हणजे सूर्योदय ते सूर्यास्ताच्या कालावधीमधे, सूर्य आपल्या पूर्ण तेजाने तळपत असताना, जर मृत्यू आला तर मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो. तो परत जन्माला येत नाही.' आणि —
' दक्षिणायनाच्या काळात, कृष्णपक्षामधे, रात्रीच्या अंधारात म्हणजे सूर्यास्त ते सूर्योदयाच्या कालावधीमधे, सूर्य आकाशामधे नसताना,

जर मृत्यू आला तर मनुष्याला मोक्ष प्राप्त होत नाही. तो परत जन्माला येतो.'
असे का आहे? ह्या प्रश्नाचे उत्तर मला माहीत नाही. मुळात मरण हे कोणाच्याही हातात नसते.
ते कधीही, कुठेही आणि कोणत्याही अवस्थेमधे येऊ शकते. ' आपण कधी मरणार? ' हे कोणालाही माहीत नसते.
एखाद्या विशिष्ट वेळी, ठरवून, कोणालाही मरता येत नाही. अगदी आत्महत्त्या करायचे ठरविले तरीही विशिष्ट वेळी मरता येत नाही.
**भीष्माचार्यांच्या सारखी इच्छामरणी व्यक्ती एखादीच असते.**
**' मार्गशीर्ष कृष्ण तृतीयेला'**, महाभारतीय युद्धाच्या दहाव्या दिवशी संध्याकाळी, रणांगणात शिखंडीच्या मागे लपलेल्या अर्जुनाच्या हातून, ते बाणांच्या शय्येवर पडले. एकशे पंचावन्न वर्षे वयाच्या, अद्वितीय महारथ्याच्या सर्व शरिराची चाळण झालेली होती.
जागोजागी बाण लागलेले होते. रक्तस्राव होत होता. जमिनीवर रक्ताचे थारोळेच झाले असणार. वारंवार ग्लानी येत होती.
वेदनांना तर सीमाच नव्हती. त्यांना किती यातना झाल्या असतील देव जाणे. आपण नुसती कल्पना केली तरी अंगाचा थरकाप होतो.
तशा विपरीत अवस्थेतही त्यांनी प्राणत्याग केला नाही. आपला प्राण धरून ठेवला.
किती दिवस? सत्तावन्न दिवस. **' माघ शुक्ल चतुर्दशी '** पर्यंत. त्या कालावधीत ते सतत श्रीकृष्णाचे चिंतन करीत होते.
त्यांच्या सभोवती अनेक ऋषीमुनी बसून राहात असत. इतकेच नाही तर तशा अवस्थेत, शेवटच्या पाच दिवसामधे,
स्वत: श्रीकृष्णाने केलेल्या विनंतीला मान देऊन आणि त्याच्या संमतीने, त्यांनी युधिष्ठिराला जो उपदेश केला, तो अजरामर झाला आहे. शांतिपर्वाचे तीनशे दहा अध्याय आणि अनुशासन पर्वाचे एकशे सदुसष्ट अध्याय म्हणजे एकूण चारशे सत्याहत्तर अध्याय त्या महान उपदेशानेच भरलेले आहेत.
अनुशासन पर्वाचा शेवटचा एकशे अडुसष्टावा अध्याय हा राजर्षी भीष्मांच्या प्राणत्यागाचा आणि त्यांच्या अंत्यसंस्कारांचा आहे.
म्हणूनच आदिपर्वाच्या पहिल्याच अध्यायामधे महाभारताचे वर्णन करताना त्याला, ' ज्याची मुळे जमिनीमधे खोलवर गेलेली आहेत अशा एखाद्या विशाल वृक्षाची उपमा दिलेली असून, शांतिपर्व म्हणजे त्या वृक्षाचे **महान फळ** आहे.' असे म्हटलेले आहे.
माघ शुक्ल चतुर्दशीच्या दिवशी, सूर्यास्तानंतरची ती अठ्ठावन्नावी रात्र संपल्यावर, **' माघ शुक्ल पौर्णिमेला '** सकाळी सूर्योदयकाली त्यांनी, समोर उभ्या असलेल्या श्रीकृष्णाचे मुखकमल पहात आणि वाणीने ओंकाराचा उच्चार करीत, प्राणत्याग केला.
मागे बाराव्या व तेराव्या श्लोकामधे जे सांगितले आहे त्याचे शब्दश: पालन केले.
**' कर्मयोग – ज्ञानयोग – राजयोग – भक्तियोग '** ह्या चारही योगांच्या समतोल आचरणाची ही पूर्णावस्थाच म्हणावी लागेल.
कमाल आहे! खरोखरच कमाल आहे! आजपर्यंत माझ्या वाचनामधे, भीष्माचार्यांच्यासारखा दुसरा माणूस आलेला नाही.
तसा कोणी होऊन गेला असेल तर निदान मला तरी माहीत नाही. **त्यांना माझा शिरसाष्टांग नमस्कार.** असो.
पण मग तुमच्या माझ्या सारख्या सामान्य माणसांचे काय?
अगदी नियमित साधना करणारा साधक असला तरी त्याची मरणघटिका कशी असेल ते कसे सांगणार?
मरणाचा काळ आणि वेळ ह्यांचा विचार थोडावेळ बाजूला ठेवूया. पण माणसाच्या शारिरीक अवस्थेचे काय सांगणार?
मरणाचे वेळी शरीरातील त्रिदोष जर बळावले तर इच्छा असूनही, आयुष्यभर साधना केलेली असूनही, परमेश्वराचे चिंतन आणि त्याच्या नांवाचे उच्चारण घडून येणे शक्यच होणार नाही.
आसन्नमरण व्यक्ती खोकत तरी असेल ( **कफ** ), शरीराला झटके देत असेल ( **वात** ) किंवा उलटी ( **पित्त** ) तरी करीत असेल.
एक कुतुहल म्हणून मी ह्या विषयाचा यथाशक्ती अभ्यास करीत असतो. आजपर्यंत जमेल तसे थोडेफार वाचनही केले आहे.
ब्रह्मविद्याशास्त्रामधे **( Theosophy )** ' मृत्यू आणि त्यानंतर ' ह्या विषयाला फार महत्त्व आहे.
त्याविषयी सर्व जगभर संशोधन व अभ्यास चाललेला असतो. त्यामधे ' नैसर्गिकपणे मरण येताना नक्की काय होते?' ह्याविषयी सखोल संशोधन केलेले आहे. त्या संशोधनाचा सारांश सांगायचा झाला तर तो पुढील प्रमाणे सांगता येईल.
' कोणताही माणूस मरण स्वीकारायला कधीही तयार होत नाही. सर्वसाधारणपणे जीवात्मा शरीर सोडायला तयार नसतो.
मरण समयी, शरीराला चिकटून रहायच्या धडपडीत, जीवात्मा निद्रिस्त तरी होतो किंवा बेशुद्ध पडतो. त्याच अवस्थेत तो देह सोडतो.
पूर्णपणे शुद्धीत आणि जागृत असलेला जीवात्मा, आनंदाने देह सोडून गेल्याचे उदाहरण अत्यंत दुर्मिळ असते. दुर्लभ असते.
कोणाही माणसाचा ज्यावेळी प्रत्यक्ष मरणाचा क्षण येतो, त्यापूर्वीचे काही क्षण हे त्या माणसासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.
त्यावेळी घुंगरांचे किंवा घंटांचे किंवा एखाद्या वाद्याचे किंवा तशाच प्रकारचे विविध आवाज ऐकू यायला लागतात.
ते आवाज फारच तीव्र असतात आणि बराच वेळ ऐकू येतात. त्या आवाजामुळे मस्तक बधीर होऊन ग्लानी येते.
देहापासून, म्हणजे देहाच्या प्रत्येक पेशीपासून, प्राणांची फारकत होत असताना असा आवाज होत असावा.
हा नाद म्हणजे **' पेशींचा आक्रोश '** असावा असे सांगितलेले आहे.

ह्या ग्लानीत असताना घशामधून विशिष्ट प्रकारचा आवाज येऊ लागतो. ह्या आवाजालाच **' शेवटची घरघर '** लागणे म्हणतात. अशी घरघर चालू असताना मधेच अचानकपणे एक क्षण असा येतो की त्यावेळी,
**' वीज गेल्यामुळे दिवा विझल्यासारखे '** किंवा **' ऐकू येत असलेला मोठा आवाज अचानक बंद होण्यासारखे '**
काही तरी घडते. त्याच क्षणी मानेची थोडी हालचाल होऊन ती एका बाजूला वळून पडते. ह्यालाच **' मान टाकली.'** असे म्हणतात. ही मरणानंतरची बेशुद्धावस्था असते. ही अवस्था किती काळ टिकेल ते निश्चित सांगता येत नाही.
परंतु बरेच संशोधन केल्यावर असे समजले आहे की, ही अवस्था सामान्यत: दोन ते तीन तास असते.
ह्या वेळेत माणसाचा प्राण सर्व शरीरापासून संपूर्णपणे मोकळा होतो. त्या नंतर शरीराचे **' प्रेत '** होते. **( Dead Body )**
शरीराच्या विघटनाची प्रक्रिया सुरू होते. त्यालाच वैद्यकीय परिभाषेत, मृत शरिराचे **कुजणे, फुगणे, ताठरणे, जड होणे, आखडणे** इत्यादी म्हणतात.' असे सर्वसाधारण मरणाच्या बाबतीत सांगितलेले आहे.
जर अपघाताने मरण आले, हत्त्या केली गेली किंवा आत्महत्त्या केल्याने मरण आले, तर त्यावेळी माणसाची मनस्थिती फारच बिघडलेली असते. त्यामुळे परमेश्वराचे चिंतन करणे व त्याच्या नांवाचा उच्चार करणे अशक्यच असेल.
तात्पर्य काय तर, मरणाचा काळ, वेळ आणि त्या वेळची शारिरीक व मानसिक अवस्था ह्यापैकी काहीही आपल्या हातात नसते. शुक्लगती आणि कृष्णगती ह्यांचा उल्लेख आणि मृत व्यक्तीवर होणारे त्यांचे परिणाम हे केवळ दोन्ही गतींचे यथायोग्य ज्ञान व्हावे म्हणूनच केला असावा असे मला वाटते. नाही तर साधना करणे आणि त्यायोगे मोक्ष प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणे ह्याला काहीही अर्थ उरणार नाही. सतत प्रयत्न करणे आपल्या हातात असते आणि आपण केवळ तेच करू शकतो.
कोणत्याही योगमार्गाने साधना करून, कोणीही साधक ज्यावेळी अध्यात्मिक विकासाची सर्वोच्च पातळी गाठेल त्यावेळी —
**' कर्मविपाक प्रक्रियेप्रमाणे '** त्याच्या मरणाचा मोक्षप्राप्तीला अनुकूल असा काळ, वेळ आणि शारिरीक व मानसिक अवस्था आपोआप साधली जाईल. तसे होत नाही तोपर्यंत जन्म मरणाच्या चक्रामधून सुटका होणे शक्य नाही.
पुण्यकर्माच्या बळाने अगदी ब्रह्मलोकापर्यंत कोणत्याही लोकी जाता आले तरीही पुण्य कर्माचे फळ भोगून झाल्यावर परत जन्माला येणे क्रमप्राप्त आहे.

**नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन ।**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ।। २७ ।।**
**वेदेषु यज्ञेषु तप:सु चैव दानेषु यत्पुण्यफलम् प्रदिष्टम् ।**
**अत्येति तत्सर्वमिदम् विदित्वा योगी परम् स्थानमुपैति चाद्यम् ।। २८ ।।**

हे पार्था ! ह्या दोनही गती जाणणारा कोणताही योगी मोह पावत नाही. म्हणून अर्जुना ! तू सर्वकाल योगयुक्त हो. हे तत्त्व जाणले म्हणजे वेदांमधे, यज्ञांमधे, तपामधे आणि दानामधे जे पुण्यफल सांगितले आहे, योगी ते सर्व मागे टाकतो आणि त्याच्या पलीकडच्या आद्यस्थानाला जाऊन पोहोचतो.
जसे दुष्कर्माच्या बंधनामधून सुटण्यासाठी त्यांची फळे भोगावी लागतात तसेच यज्ञयागादी सत्कर्माच्या बंधनामधून सुटण्यासाठी त्यांचीही फळे भोगावी लागतात. फलाशेने केलेले कोणतेही बरे-वाईट कर्म हे बंधनकारकच असते.
बेडी ही लोखंडाची असली काय किंवा सोन्याची असली काय, बंधनकारकच आहे.
पिंजरा सोन्याचा असला, खायची - प्यायची चंगळ असली, तरीही तो तुरुंगच आहे. स्वातंत्र्याच्या मार्गातला अडथळाच आहे.
त्याग, दान, सेवा इत्यादी सद्गुणांच्या योगानेही माणसाचा अहंकार बळावण्याची शक्यता असते आणि त्याचे देखील विपरीत परिणाम होऊ शकतात. परंतु निष्काम कर्मयोगाचे आचरण करीत राहिले असता, कोणत्याही वासनेमधे अडकले जायची शक्यता समूळ नाहीशी होते. त्यामुळे कोणत्याही कर्माचे बंधन पडत नाही आणि खऱ्या अर्थाने परमेश्वराच्या भक्तीमधे गुंतून जाणे शक्य होते.
म्हणूनच निष्काम कर्मयोग हा सर्वश्रेष्ठ असे वारंवार सांगितलेले आहे.

**येथे आठवा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायात ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ आणि अधिदेह म्हणजे ह्या देहामधे राहणारा कोण आहे ह्याविषयी माहिती सांगितली आहे.
नंतर अंतकाली केलेल्या परमेश्वराच्या चिंतनाने, तसेच ॐ काराचे समाधिपूर्वक, म्हणजेच ॐ काराशी एकरूप होऊन केवळ त्याचेच ध्यान केल्याने, मुखाने केवळ त्याचेच उच्चारण केल्याने मोक्ष मिळतो असे सांगितले.
माणसाच्या यज्ञयागादि कर्मांनी त्याला स्वर्गलोक, वरुणलोक, सूर्यलोक इतकेच काय पण प्रत्यक्ष ब्रह्मलोक जरी प्राप्त झाला तरी पुण्यांश संपल्यावर परत इहलोकी जन्म घ्यावाच लागतो. म्हणून ते सर्व लोक अनित्य असून, केवळ परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानानेच जन्म मरणाच्या

चक्रामधून सुटका होऊन जीवाचा पुनर्जन्म नाहीसा होत असल्यामुळे ते ज्ञान सर्वात श्रेष्ठ व नित्य आहे असे सांगितले.
ब्रह्मदेवाचे दिवस आणि रात्र व त्यावेळी घडून येणाऱ्या, अव्यक्तापासून सर्व सृष्टीची उत्पत्ती आणि अव्यक्तामधेच होणारा तिचा लय ह्या विषयी सांगून पुढे, ह्या सर्व अव्यक्ताच्याही पलीकडे असणारा अव्यक्त आणि अक्षर असा पुरुष म्हणजेच परब्रह्म परमात्मा हा भक्तिमार्गाने प्राप्त होऊ शकतो आणि एकदा त्याची प्राप्ती झाल्यावर जीवाला पुनर्जन्म येत नाही, त्याला मोक्ष मिळतो असे सांगितले.
शुक्लगती म्हणजेच देवयान मार्ग आणि कृष्णगती म्हणजेच पितृयाण मार्ग ह्यांची माहिती देऊन त्यांचे परिणामही सांगितले.
अखेरीस या दोनही मार्गांचे तत्त्व जाणणाऱ्या योग्याला प्राप्त होणारे फळ उत्तम असल्यामुळे त्याप्रमाणे वागण्याचा आग्रह केला.
सातव्या अध्यायामधील दुसऱ्या श्लोकामधे, श्रीकृष्णाने विज्ञानासहित ज्ञान सांगतो असे म्हणून त्याविषयी बोलायला सुरवात केली.
काही वर्णन करून झाले. काही ज्ञानही सांगून झाले. परंतु अध्यायाच्या अखेरीस **' ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ, अधिदेह आणि मरणसमयीचे परमेश्वरचिंतन.'** ह्या विषयांचा उल्लेख झाला.
त्यांचा यथायोग्य अर्थ न समजल्यामुळे नंतर अर्जुनाने त्याविषयीच प्रश्न विचारले.
त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन, यथायोग्य विवेचन करण्यामधेच सगळा आठवा अध्याय पूर्ण झाला.
त्यामुळे सातव्या अध्यायात सुरू झालेला विज्ञानासहित ज्ञानाचा विषय अपूर्ण राहिला.
तोच विषय आता पुढील अध्यायामधे परत सुरू होतो आहे.
परमेश्वर कसा आहे? त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे?
सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे आणि तरीही त्यापासून तो कसा वेगळा आहे?
ह्याचे विवेचन करायला सुरवात होते आहे.
आता **' गीतोपदेशरूपी गंगेचा प्रवाह '** ज्ञान-विज्ञान, ईश्वर शरणभाव आणि त्यामधले सातत्य ह्या मार्गाने, भक्तियोगाकडे वळतो आहे. पुढचे चार अध्याय ह्याच विषयाचे विवेचन चालणार आहे.
परंतु असे असले तरीही ते सगळे ज्ञान आणि सगळे विवेचन हे,
' निष्काम कर्मयोगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्याच्या समर्थनासाठीच ' करण्यात आलेले आहे.
ही गोष्ट आपण सर्वांनी ध्यानात घ्यावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.
आता पुढच्या अध्यायामधे श्रीकृष्ण भगवान काय सांगतात ते आपण पाहूया.
अस्तु!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

# अध्याय नववा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या नवव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना श्रीकृष्णाने ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ आणि अधिदेह म्हणजे ह्या देहामधे राहणारा कोण आहे ह्याविषयी माहिती सांगितली.

अंतकाली केलेल्या परमेश्वराच्या चिंतनाने, तसेच ॐ काराचे समाधिपूर्वक, म्हणजेच त्याच्याशी एकरूप होऊन केवळ त्याचेच, ध्यान केल्याने मोक्ष मिळतो हे सांगितले. पण त्याच बरोबर मनुष्य आयुष्यभर जे करतो, जसा वागतो, जसा विचार करतो, त्याच आचार - विचारांचा प्रभाव मरणकाळीही त्याच्यावर असतो त्यामुळे तेच आणि तसेच विचार अंतकाळीही येत राहतात आणि त्याला अनुसरूनच पुढील गती प्राप्त होते. आयुष्यामधे कोणताही विधिनिषेध न पाळता कसेही वागलेल्या माणसाला अंतकाळी परमेश्वराचे चिंतन करता येणे शक्य नाही, हे देखील सांगितले.

माणसाच्या यज्ञयागादि कर्मांनी त्याला स्वर्गलोक, वरुणलोक, सूर्यलोक इतकेच काय पण प्रत्यक्ष ब्रह्मलोक जरी प्राप्त झाला तरी पुण्यांश संपल्यावर परत इहलोकी जन्म घ्यावाच लागतो म्हणून ते सर्व अनित्य असून, केवळ परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानानेच जन्म मरणाच्या चक्रामधून सुटका होऊन जीवाचा पुनर्जन्म नाहीसा होत असल्यामुळे ते ज्ञान सर्वांत श्रेष्ठ व नित्य आहे असे सांगितले.

ब्रह्मदेवाचे दिवस आणि रात्र व त्यावेळी घडून येणाऱ्या, अव्यक्तापासून सर्व सृष्टीची उत्पत्ती आणि अव्यक्तामधेच होणारा तिचा लय ह्या गोष्टी सांगितल्या. ह्या सर्व अव्यक्ताच्याही पलीकडे असणारा अनादि, अनंत, अजर आणि अक्षर असा पुरुष म्हणजेच परमात्मा हा भक्तिमार्गाने प्राप्त होऊ शकतो आणि एकदा त्याची प्राप्ती झाल्यावर जीवाला पुनर्जन्म येत नाही. त्याला मोक्ष मिळतो असे सांगितले.

शुक्लगती म्हणजेच देवयान मार्ग आणि कृष्णगती म्हणजेच पितृयाण मार्ग ह्या दोन गतींचे वर्णन करून, त्यांचे परिणामही सांगितले. या दोनही मार्गांचे तत्त्व जाणणाऱ्या योग्याला प्राप्त होणारे फळ उत्तम असल्यामुळे त्याप्रमाणे वागण्याचा आग्रह केला.

गीतेच्या अध्यायांच्या अनुक्रमाचा विचार केला तर आतापर्यंत ‘ विषादयोग, सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानासह कर्मयोग, संन्यासयोग, ध्यानयोग, प्रकृतीचे स्वरूप, भक्तांचे चार प्रकार, अक्षरब्रह्मयोग ’ इत्यादी विषय आले आणि आता भक्तियोगाचा विषय सुरू झाला.

ह्या अध्यायापासून बाराव्या अध्यायापर्यंत भक्तियोग हाच विषय प्रतिपादिलेला आहे.

अर्थात भक्तियोगाच्या सर्व विवेचनाच्या मागे **‘ अर्जुनाला स्वधर्मानुसार विहित कर्तव्य करायला प्रवृत्त करणे.’** हाच एकमेव हेतू असून ते कर्मयोगाच्या समर्थनासाठीच केलेले आहे.

त्यामुळे ह्या संपूर्ण विवेचनाला **‘ कर्मयोगप्रधान भक्तियोग!’** असेही म्हणता येईल असे मला वाटते. असो.

खरे म्हणजे ह्या विषयाच्या विवेचनाला सातव्या अध्यायातच सुरवात झाली होती.

श्रीकृष्णाने ‘ तुला विज्ञानासहित ज्ञान ’ सांगतो असे म्हणून त्याविषयी बोलायला सुरवात केली होती.

परंतु अध्यायाच्या अखेरीस ‘ ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ, अधिदेह आणि मरणसमयीचे परमेश्वरचिंतन.’ ह्या विषयांचा उल्लेख झाला. त्यांचा यथायोग्य अर्थ न समजल्यामुळे अर्जुनाने त्याविषयीच प्रश्न विचारले.

त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन, यथायोग्य विवेचन करण्यामधेच सगळा आठवा अध्याय संपला.

त्यामुळे सातव्या अध्यायात सुरू झालेला विज्ञानासहित ज्ञानाचा विषय अपूर्ण राहिला.

तोच विषय आता परत सविस्तरपणे सांगण्यात येतो आहे. असो.

हा नववा अध्याय विशेष आहे. अनेक विद्वान व अधिकारी पुरुषांचा आवडता आहे.

अनेक पूजनीय व आदरणीय व्यक्तींनी ह्या अध्यायाची महती स्पष्टपणे सांगितलेली आहे.

उदाहरण म्हणून **ज्ञानेश्वर महाराजांनी** काय म्हटले आहे ते आपण पाहूया.

ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायाच्या सुरवातीलाच ह्या नवव्या अध्यायाचे महत्त्व सांगणाऱ्या ओव्या आल्या आहेत.

त्यामधे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की,

**आतां शब्दब्रह्मीं असंख्याके । जेतुला कांहीं अभिप्राय पिके ।**
**तेतुला महाभारतें एकें । लक्षें जोडे ।। ३० ।।**
**आतां अठरापर्वी भारतीं । ते लाभे कृष्णार्जुनवाचोक्तीं ।**
**आणि जो अभिप्रावो सातेंशतीं । तो एकलाचि नवमी ।। ३१ ।।**

**म्हणोनि नवमींचिया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावया ।**
**बिहाला मी वायां । गर्व कां करूं ॥ ३२ ॥**
**हे ऐसे अध्याय गीतेचे । परि अनिर्वाच्य नवमाचें ।**
**तो अनुवादलों हें तुमचें । सामर्थ्य प्रभू ॥ ३५ ॥**
**परि हें असो एथ ऐसें । रामरावण झुंजिन्नले कैसें ।**
**रामरावण जैसें । मीनले समरीं ॥ ३८ ॥**
**तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें । तें नवमीचियाचि ऐसें मी म्हणे ।**
**या निवाडा तत्वज्ञु जाणे । जया गीतार्थु हातीं ॥ ३९ ॥**

अर्थ — सर्व वेदामधे जेवढा म्हणून अर्थ प्राप्त होतो, तेवढा सर्व अर्थ एकलक्ष श्लोकांच्या महाभारत ग्रंथामधे सापडतो. आता भारताच्या अठरा पर्वांमधे जो काही अभिप्राय आहे, तो कृष्णार्जुनांच्या संवादामधे ( गीतेत ) प्राप्त होतो आणि गीतेच्या सातशे श्लोकांमधे जो अभिप्राय आहे, तो एकट्या नवव्या अध्यायात आहे. म्हणून नवव्या अध्यायातील मतलब पूर्ण झाला असे दाखविणारा लेखनसीमेचा शिक्का, त्यावर एकदम द्यावयास भ्यालेला जो मी, तो, नवव्या अध्यायातील अभिप्राय पूर्णपणे सांगितला असा व्यर्थ अभिमान कशाकरिता धरू?

( कारण अठरा अध्याय हे एकाच गीतेचे असले तरीही त्यांचे परिणाम निरनिराळे आहेत. काही अध्याय अधिष्ठान ब्रह्मस्वरूपाला जाणून त्याचे वर्णन करतात; काही अध्याय त्या त्या ठिकाणीच ‘ तू ब्रह्म आहेस!’ अशी जाणीव करून देतात; काही अध्याय जाणावयास गेले असता, जाणण्याच्या धर्मासह जाणणारा हरपून जातो. )

असे गीतेचे ( अठरा ) अध्याय आहेत. परंतु नववा अध्याय शब्दांनी सांगण्याच्या पलीकडचा आहे. तो देखील मी स्पष्ट करून सांगितला. महाराज, ही सर्व शक्ती आपली आहे.

( मी जो अजाण, त्या माझ्याकडून, बोलण्याच्या पलीकडे असलेला नवव्या अध्यायाचा अभिप्राय तुम्ही बोलविला ).

येथे असे आहे की, राम आणि रावण हे एकमेकांशी कसे लढले हे सांगावयाचे असेल तर ‘ युद्धांत ते एकमेकास राम-रावणासारखे भिडले!’ असेच सांगावे लागते. त्याप्रमाणे ‘ श्रीकृष्णाने नवव्या अध्यायात केलेला उपदेश कसा आहे? म्हणून विचाराल, तर तो नवव्या अध्यायासारखाच आहे!’ असे माझे म्हणणे आहे. ज्याला गीतेच्या अर्थाचे आकलन झालेले आहे अशा कोणाही तत्त्ववेत्त्याला, मी केलेला हा निर्णय पटेल.’

म्हणजे नववा अध्याय अतुलनीय आहे. एकमेव आहे. अद्वितीय आहे. त्याची तुलना फक्त त्याच्या बरोबरच करता येऊ शकेल. इतर कशाच्याही बरोबर करता येऊ शकणार नाही. असे म्हणतात की, जेव्हा ज्ञानेश्वर महाराजांनी संजीवन समाधी घेतली त्यावेळी, समाधिस्थ होत असताना ते नववा अध्यायच म्हणत होते.

**आचार्य विनोबा भावे** ह्यांची गीतेवरील प्रवचने प्रसिद्ध आहेत.

त्यांची **गीताई** जशी प्रसिद्ध आहे तशीच आणि तितकीच गीतेवरील प्रवचनेसुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यामधे आचार्य ह्या नवव्या अध्यायाविषयी सांगतात की, ‘ मी येथे जे सांगतो आहे ते, कोणास उपदेश करावा ह्या हेतूने नाही. लाभाची इच्छा असणाऱ्यास त्यापासून अवश्य लाभ होईल. परंतु गीता सांगताना माझी हरिनामाची भावना असते. आपण रामनाम घेत असल्याचीच भावना असते. माझ्या ह्या बोलण्याचा नवव्या अध्यायाशी संबंध आहे. हरिनामाची अपूर्व थोरवी ह्या नवव्या अध्यायात सांगितलेली आहे.

हा अध्याय गीतेच्या मध्यावर उभा आहे. महाभारताच्या मध्यावर गीता आणि गीतेच्या मध्यावर हा नववा अध्याय असा विलक्षण योगायोग आहे. अनेक कारणांमुळे ह्या अध्यायाला पावनत्व आलेले आहे.

ह्या अध्यायाच्या केवळ स्मरणाने माझे डोळे भरून येतात व हृदय उचंबळून येते. जी वस्तू भगवंतानी अर्जुनास सांगितली, ती अपूर्व वस्तू शब्दांनी सांगण्यासारखी नव्हतीच. परंतु व्यासांनी ती संस्कृत भाषेत प्रकट केली. गुह्य अशा वस्तूला वाणीचे रूप दिले. केवळ भारतीयांवरच नाही तर एकूणच सर्व मानवजातीवर त्यांनी हा उपकार केलेला आहे.

अध्यायाच्या आरंभीच श्रीकृष्ण सांगतात की ही जी अपूर्व वस्तू आहे ( **राजविद्या** ), ती प्रत्यक्ष अनुभवण्याची गोष्ट आहे. ( **प्रत्यक्षावगम** ). ह्या मर्त्यलोकीच्या जीवनातील गोडी प्रत्यक्ष अनुभवास आणून देणारी राजविद्या भगवान आपणा सर्वांसाठी उघडी करून ठेवीत आहेत. सुलभ करून ठेवीत आहेत. याचि देही याचि डोळा अनुभवास येणारे फळ, जिवंतपणी अनुभवास येणाऱ्या गोष्टी सांगत आहेत. परमेश्वराचे गुलाम होऊन राहण्यातली गोडी या अध्यायात आहे.’

मुळामधे ज्ञानयोग आणि राजयोग समजायला फार कठीण आहेत. परमेश्वराच्या अव्यक्तरूपाची उपासना सगळ्यांना जमण्यासारखी नाही. परमेश्वराचे जे स्वरूप आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना कधीही दिसत नाही, त्याची कल्पना करणे, सतत त्याचेच मनन, चिंतन

व ध्यान करीत राहणे आणि त्याची अनुभूती घेणे, फार फार कठीण आहे. त्यासाठी साधकाच्या अंगी फार मोठी योग्यता असावी लागते आणि त्यानंतरही खडतर म्हणता येईल अशी साधना करावी लागते. त्याला पर्याय नाही. शॉर्टकट नाही. ही अडचण लक्षात घेऊन, ज्यायोगे सर्वसामान्य माणसांना परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे सोपे होईल असा राजमार्ग सांगायला सुरवात होते आहे. परमेश्वराच्या व्यक्तरूपाची उपासना कशी करायची ते सांगायला सुरवात होते आहे.

नवव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे. तो अर्जुनाला सांगतो आहे की,

**श्रीभगवानुवाच :**

**इदन् तु ते गुह्यतमम् प्रवक्ष्याम्यनसूयवे ।**

**ज्ञानम् विज्ञानसहितम् यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।। १ ।।**

**राजविद्या राजगुह्यम् पवित्रमिदमुत्तमम् ।**

**प्रत्यक्षावगमन् धर्म्यम् सुसुखङ् कर्तुमव्ययम् ।। २ ।।**

तू दोषदृष्टीने पाहणारा नसल्यामुळे, आता गुह्यातले गुह्य असे विज्ञानासहित ज्ञान मी तुला सांगतो. ते जाणल्याने तू पापापासून मुक्त होशील. हे ज्ञान सर्व गुह्यात व सर्व विद्यामध्ये श्रेष्ठ, पवित्र, उत्तम, प्रत्यक्ष बोध होणारे, आचरण्यास सोपे, अव्यय आणि धर्म्य आहे.

**अनसूयवे** - दोषदृष्टीरहित. दोषदृष्टी नसलेला. ' अर्जुनाऽऽ! तू **दोषदृष्टीने** पाहणारा नाहीस म्हणून,' हे विधान फार महत्त्वाचे आहे. अर्जुन कसा आहे पहा. त्याच्या मनामधे असूया नाही. ईर्षा नाही. तो मनाने निर्मळ आहे. निष्पाप आहे.

हे श्रीकृष्ण स्वत: सांगतो आहे म्हणजे ते सत्य आहे आणि अर्जुन तसा आहे म्हणूनच तो त्याला गोपनीय असे ज्ञान सांगणार आहे. अर्जुन खरोखरच **नरोत्तम** होता. महाभारतामधे अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ, आदरणीय, वंदनीय आणि पूजनीय अशा व्यक्तींनी, अर्जुनाच्या अंगी असलेल्या अनेक गुणांचा उल्लेख अनेक वेळा केलेला आहे. तो जवळजवळ सर्वांनाच प्रिय होता.

श्रीकृष्णाला तर तो अत्यंत प्रिय होता. जणूकाही तो श्रीकृष्णाचा बहिश्चर प्राणच होता.

अशा अर्जुनाला तो जे ज्ञान सांगणार आहे ते कसे आहे? त्याविषयी त्यानेच वापरलेल्या शब्दांचे अर्थ समजून घेऊया.

**गुह्यतम** – सनातन धर्मशास्त्रामधे अनेक विषय हे गुप्त ठेवण्यायोग्य मानलेले आहेत. त्या सर्व विषयांमधे अनादि, अनंत व अविनाशी असे परमेश्वररूपी मूलतत्त्व, त्याचे गुण, त्याचा प्रभाव, त्याचे महत्त्व आणि त्याला संपूर्णपणे शरण का व कसे जायचे इत्यादी विषयीची माहिती ही सर्वात गुप्त ठेवण्यायोग्य मानलेली आहे.

**ज्ञान** – सृष्टीमधे आपल्याला जे अगणित प्रकारचे अनेक नाशवंत पदार्थ दिसून येतात, त्या सर्वामधे एकच अविनाशी परमेश्वर अंतर्बाह्य भरून राहिला आहे ह्या सत्याचे आकलन होणे म्हणजे ज्ञान होय.

**विज्ञान** – एकाच अविनाशी परमेश्वरापासून विविध नाशवंत पदार्थ कसे उत्पन्न होतात, त्यांचे गुणधर्म कोणते असतात, त्यांच्या क्रिया - प्रतिक्रिया कशा होत असतात आणि काही काळ अस्तित्वात राहिल्यानंतर त्यांचा क्षय कसा होतो म्हणजे ते कसे नाश पावतात ह्याचे आकलन होणे म्हणजे विज्ञान होय.

**मोक्ष्यसे** – मुक्त होशील. **अशुभात्** – दु:खरूप संसारामधून. **राजविद्या** – सर्व विद्यामधे श्रेष्ठ अशी विद्या.

**राजगुह्य** – सर्व गुह्यामधे श्रेष्ठ असे गुह्य. **पवित्रम्** – अतिशय पवित्र. **उत्तमम्** – अत्युत्तम.

**प्रत्यक्षावगमम्** – प्रत्यक्ष फळ देणारे. **धर्म्यम्** – धर्माने युक्त. **सुसुखम्** – अतिशय सोपे, सुखकारक, सुगम.

**अव्ययम्** – अविनाशी. कधीही नाश न पावणारे.

असे ज्ञान मी तुला सांगतो. ते जाणल्याने तू सर्व अशुभापासून म्हणजेच सर्व प्रकारच्या दु:खापासून आणि जन्म मरणरूप संसार बंधनामधून मुक्त होशील. इतके सांगितल्या नंतर लगेच विषयाला सुरवात केलेली नाही.

ह्या ज्ञानावर ज्यांची श्रद्धा नाही, विश्वास नाही आणि त्याच्या सत्यतेविषयी मनामधे संशय असल्यामुळे जे यथायोग्य असे आचरण करीत नाहीत, अशा माणसाना कोणते फळ प्राप्त होते, त्यांना कोणती गती प्राप्त होते, ते ही पुढच्या श्लोकामधे स्पष्टपणे सांगितले आहे. शंकेला थोडीही जागा ठेवलेली नाही.

**अश्रद्दधाना: पुरुषा: धर्मस्यास्य परंतप ।**

**अप्राप्यमाम् निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ।। ३ ।।**

हे शत्रूला ताप देणाऱ्या अर्जुनाऽऽ! या धर्मावर श्रद्धा न ठेवणारे पुरुष, मला येऊन न मिळता, जन्म - मृत्युयुक्त संसाराच्या मार्गावर परत परत येत राहतात. म्हणजेच त्यांना मुक्ती मिळत नाही. मोक्ष प्राप्त होत नाही.

**' पुनरपि जननम् पुनरपि मरणम्, पुनरपि जननी जठरे शयनम् ।'** ह्या चक्रामधेच फिरत राहतात. त्यामधून त्यांची सुटका होऊ

शकत नाही. कारण एक परब्रह्म परमात्मा हाच अनादी - अनंत असून बाकी सर्व काही नाशवंत आहे.
प्रत्येक गोष्टीला उत्पत्ति, स्थिती आणि लय आहेच आहे.
यापूर्वी चवथ्या अध्यायामधे अर्जुनाच्या प्रश्नावरून, परमेश्वर आपल्या मायेने दिव्य जन्म का घेतो, केव्हा घेतो व कसे घेतो ह्या विषयी सांगताना ( श्लोक ६ ते ९ ), तसेच सातव्या अध्यायामधे ( श्लोक ४ ते १५ ) आणि आठव्या अध्यायामधे (श्लोक २० ते २२ ), क्षर म्हणजे नाश पावणारे आणि अक्षर म्हणजे नाश न पावणारे ह्या विषयीचे विचार सांगताना परमेश्वरी सामर्थ्याची थोडीफार माहिती सांगण्यात आलेली आहे. परंतु आता प्रत्यक्ष विषयाला सुरवात होते आहे.
परमेश्वर स्वत:च त्याची अगाध करणी, सविस्तरपणे स्पष्ट करून सांगतो आहे.

**मया ततमिदम् सर्वम् जगदव्यक्तमूर्तिना ।**
**मत्स्थानि सर्वभूतानि न चाहम् तेष्ववस्थितः ॥ ४ ॥**
**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।**
**भूतभृन्न च भूतस्थः ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥**

मी आपल्या अव्यक्त स्वरूपाने हे सर्व जग व्यापले आहे. माझ्या ठायी सर्व भूते आहेत, मी त्यांच्या ठायी नाही. आणि माझ्या ठायी सर्व भूतेही नाहीत ! पहा, माझी दैवी करणी, माझे योगसामर्थ्य ! भूते उत्पन्न करणारा माझा आत्मा भूते धारण करूनही भूतांत नाही.
येथे **‘ इदम् सर्वम् जगत् ’** ह्याचा अर्थ ‘ आपल्याला दिसणारे आणि न दिसणारे हे सर्व विश्व आणि त्यामधे असलेल्या सर्व प्रकारच्या ज्ञात व अज्ञात, चल व अचल, सजीव आणि निर्जीव, व्यक्त आणि अव्यक्त वस्तू.’ असा समजला पाहिजे.
तसेच **‘ योग!’** ह्याचा अर्थ ‘अव्यक्ताचे व्यक्त तसेच व्यक्ताचे अव्यक्त बनण्याचे ’ आणि ‘ व्यक्त असूनही अव्यक्त राहण्याचे तसेच अव्यक्त असूनही व्यक्त होण्याचे ’ अलौकिक सामर्थ्य, असा केला पाहिजे.
**‘ योग ह्या शब्दाची ही अजून एक व्याख्या आहे.’** असे समजायला हरकत नाही.
कारण परमेश्वर हा निर्गुण, निराकारही आहे आणि सगुण, साकारही आहे.
ज्याप्रमाणे एका बिंदूमधून अनेक प्रकारचे आकार निर्माण होतात, ज्याप्रमाणे एका बी मधून मोठा वृक्ष निर्माण होतो, त्याचप्रमाणे एका परमात्म तत्त्वापासून सर्व विश्व निर्माण होते. विश्वनिर्मितीचे आणि लयाचे हे सामर्थ्य म्हणजेच परमेश्वराची अद्‌भुत अशी **माया** होय.
त्या सामर्थ्यानेच जगाचा सर्व व्यवहार अनादि कालापासून चालत आला आहे आणि यापुढेही अनंतकालापर्यंत चालत राहणार आहे.
हे सर्व कसे घडते? ह्याविषयी आपल्याला काहीही बोलता येत नाही.
म्हणूनच परमेश्वराच्या विश्व निर्मितीच्या सामर्थ्याविषयी सांगताना, **‘ तो विश्वाच्या रूपाने व्यक्त झाला!’** असेही म्हटले जाते.
तसेच परमेश्वराच्या विश्वाचा नाश करण्याच्या सामर्थ्याविषयी सांगताना, **‘ तो परत आपल्या मूळच्या अव्यक्त स्वरुपात आला!’** असेही म्हटले जाते.

**यथाकाशस्थितो नित्यम् वायुः सर्वत्रगो महान् ।**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥**
**सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिम् यान्ति मामिकाम् ।**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥**
**प्रकृतिम् स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।**
**भूतग्राममिमङ् कृत्स्नम् अवशम् प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥**

आकाशापसून उत्पन्न होऊन सर्वत्र वावरणारा महान वायु ज्याप्रमाणे आकाशातच राहतो, त्याप्रमाणे सर्व भूते माझ्यातच राहतात असे समज. हे कौंतेया! कल्पांती सर्व भूते माझ्या प्रकृतीस येऊन मिळतात आणि कल्पारंभी मीच त्यांना पुन्हा निर्माण करतो. मी आपल्या प्रकृतीला हाती धरून, त्या प्रकृतीच्या ताब्यात गेल्यामुळे परतंत्र झालेला, हा भूतांचा सर्व समुदाय वारंवार निर्माण करतो.
कोणतीही घटना घडून येते, तेव्हा ती घडवून आणणारा कोणीतरी असतोच. कर्त्यावाचून कर्म घडणे अशक्य आहे.
तसेच कोणत्याही कर्माची पूर्तता करणारा, जो कोणी असतो तो, त्या कर्माला पूर्णपणे जबाबदार असतो. उत्तरदायी असतो.
म्हणून तो कर्माहून आणि त्या कर्माच्या परिणामाहून वेगळाच असतो.
तो जरी कर्म करीत असला आणि त्या कर्माचे परिणाम त्यालाच भोगावे लागणार असले तरीही, तो त्या कर्माचा भाग होऊ शकत नाही.
कारण तसे झाले तर तो स्वत:च कर्म होईल. कर्ता राहणारच नाही. येथे आपण एक साधे, सरळ आणि सोपे उदाहरण पाहूया.
**‘ मी पाणी प्यायलो.’** हे विधान समजून घ्या. येथे **मी** ह्या कर्त्याने, पाणी पिण्याचे **कर्म** केले आहे.

त्याने ते कर्म चार भागात केले आहे.
१) पाणी प्यावे असे ठरविणे. २) माठातले पाणी पेल्यामधे घेणे. ३) पेल्यातले पाणी पिणे. आणि ४) त्यानंतर तसे सांगणे.
हे ते चार भाग होत. पाणी प्यायचे ठरविणे, पाणी घेणे, पाणी पिणे आणि नंतर तसे सांगणे ह्या चारही क्रिया करताना, तो त्या संपूर्ण प्रक्रियेहून वेगळाच राहिला आहे. म्हणूनच क्रिया करून झाल्यावरही तो आहे. नाहीसा झालेला नाही.
त्या कर्माचे **‘ तहान भागणे ’** हे फळ भोगतो आहे. त्याने कर्म केले असूनही तो कर्माहून वेगळा आहे. त्याचप्रमाणे —
कल्पारंभी सर्व भूतांना निर्माण करणे, काही काळ त्यांचे अस्तित्व टिकवणे आणि कल्पांती त्यांचा विलय करणे, हे कर्म वारंवार करीत असूनही, सातत्याने करीत असूनही, परमात्मा त्या सर्वांच्याहून वेगळाच असतो. सर्व भूते त्याच्यावर अवलंबून असूनही, तो मात्र त्यांच्यात नाही. त्यांच्यावर अवलंबून नाही.
माठामधे पाणी आहे परंतु पाण्यामधे माठ नाही. माठ नसला तर पाणी असणार नाही पण पाणी नसले तरीही माठ असणार.
त्याचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून नाही. त्याचप्रमाणे परब्रह्म परमात्मा सदा सर्वदा स्वतंत्रच आहे.
आता प्रश्न राहिला तो ह्या विराट कर्माच्या फळाचा. विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती आणि विलयाच्या कर्माचे फळ त्याला मिळते की नाही? तो त्या कर्माने बद्ध होतो की नाही? होत नसेल तर का होत नाही? त्याविषयीचे उत्तर पुढील दोन श्लोकांत सांगितले आहे.

**न च माम् तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।**
**उदासीनवदासीनम् असक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥**
**मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥**

पण हे धनंजया! ह्या सृष्टी निर्माण करण्याच्या कर्मात माझी आसक्ती नसून मी उदासीन रहात असल्यामुळे, ती कर्मे मला बंधनकारक होत नाहीत. मी अध्यक्ष होऊन प्रकृतीकडून सर्व चराचर सृष्टी निर्माण करवितो. त्यामुळेच हे कौंतेया ! जगाची ही घडामोड चाललेली आहे.
सूर्य रोज सकाळी नित्य नेमाने उगवतो. त्याच्या प्रकाशामधे सर्व जग आपापले व्यवहार करीत असते. आपापल्या स्वभावानुसार प्रत्येक प्राणिमात्र बरे-वाईट वर्तन करीत असतो. ह्यामधे एखाद्या मुंगीपासून ते सिंहापर्यंत, एखाद्या झोपडीत राहणाऱ्या गरीब माणसापासून ते सर्व सोयीनी युक्त अशा मोठ्या प्रासादामधे राहणाऱ्या धनवान माणसापर्यंत, एखाद्या छोट्याशा खेडेगावापासून ते सामर्थ्यवान, बलवान, अत्याधुनिक शस्त्रास्त्रानी सज्ज आणि धनवान अशा राष्ट्रापर्यंत सर्व काही समाविष्ट झालेले असते.
आता ही सगळी मंडळी जे काही पाप अथवा पुण्य करतात त्याला सूर्य जबाबदार असतो काय? नाही. कधीही नाही. ह्या प्रश्नाचे हेच योग्य उत्तर आहे. इतरांच्या कर्माना आणि त्यांच्या परिणामाला सूर्य जबाबदार नसतो.
तो त्याचे, **‘ सर्व जगाला प्रकाश देण्याचे ’** कर्म निरपेक्षपणे सतत करीत असतो.
मी ‘ काहींना प्रकाश देईन आणि काहींना देणार नाही ’ असा भेदभाव करीत नसतो आणि इतरांनी त्या प्रकाशाचा वापर कसा करावा ते देखील सांगत नसतो.
आपल्या घरामधे विजेवर चालणाऱ्या ट्यूबलाईटचेही तसेच आहे. रात्रीच्या अंधारामधे ती आपल्याला प्रकाश देते.
त्या प्रकाशामधे घरातली माणसे वावरत असतात. कोणी अभ्यास करतो, कोणी स्वयंपाक करतो, कोणी खेळतो, कोणी इतरांशी भांडत बसतो, कोणी ध्यानधारणा करतो, कोणी वाचन करतो तर कोणी झोपतो. ह्या सगळ्या घटनांशी ट्यूबलाईटचा काहीही संबंध नसतो.
ती केवळ प्रकाश देत असते. कोणताही भेदभाव न करता सर्वांना प्रकाश देत असते. आपल्या प्रकाशामधे काय काय चालले आहे, ह्याची तिला जाणीवही नसते.
हे कशाला? आपल्या ह्या भारत देशाचा विषय घ्या.
आपल्या देशाच्या शासनाचा सर्व कारभार महामहीम **‘ राष्ट्रपतींच्या ’** नांवाने चालवला जातो.
ह्या शासन व्यवस्थेमधे देशाच्या ‘ पंतप्रधानाच्या पासून ते एखाद्या गावाच्या ग्रामपंचायतीतील तलाठ्यापर्यंत ’ सगळे समाविष्ट असतात. कोणीही कोणतेही शासकीय काम करीत असताना ते राष्ट्रपतींच्या नांवानेच करीत असतो.
**( On behalf of the President of India )**
आता, ही सगळी मंडळी जी बरीवाईट कृत्ये करतात, ज्या भानगडी करतात, घोटाळे करतात, भूखंड गिळतात, भ्रष्टाचार करतात, अन्याय करतात, अत्याचार करतात आणि सगळी पापे करूनही, सतत सत्तेवर राहून मिरवीत असतात, त्याला **भारताचे राष्ट्रपती** जबाबदार नसतात. ते स्वतः काहीच करीत नाहीत तर शासन व्यवस्थाच सर्व काही करीत असते.
फक्त ती जे काही करते ते, **‘ राष्ट्रपतींच्या नांवाने ’** करीत असते.

राष्ट्रपतींच्यासाठी सगळे भारतवासी सारखेच असतात. सगळे ह्या देशाचे नागरीकच असतात. त्यांना कोणीही आवडता किंवा नावडता नसतो. प्रिय किंवा अप्रिय नसतो. निदान राष्ट्रपतीपदावरील व्यक्तीने तसेच असणे अपेक्षित असते.
राष्ट्रपतीपदावरील व्यक्ती बदलत असतात. परंतु ' **राष्ट्रपतीपद** ' हे सदैव स्थिर असते.
**( Office of the President of India )**
त्याचप्रमाणे राज्यकर्ते आणि नोकरशहा बदलत असतात. परंतु शासनव्यवस्था आणि नोकरशाही ही सदैव स्थिर असते.
**( Administration and Bureaucracy of India )**
येथे शासनव्यवस्था म्हणजे **प्रकृती** आहे आणि राष्ट्रपती म्हणजे **पुरुष** म्हणजेच परमात्मा आहे असे समजा.
त्यायोगे **' मयाध्यक्षेण प्रकृति:सूयते सचराचरम् । '** ह्या विधानाचा अर्थ कळायला मदत होईल असे मला वाटते.
आपल्याला कदाचित् माझे हे बोलणे ऐकून राग आला असेल.
' हा सारखा वाईट गोष्टींचाच उल्लेख करतो. देशामधे घडणाऱ्या चांगल्या गोष्टींच्याविषयी बोलतच नाही. आपल्या देशामधे चांगल्या गोष्टी घडतच नाहीत काय? देशामधे चांगली माणसे नाहीच आहेत काय?' असेही वाटत असेल.
पण काय करू? जे रोजच्या रोज घडते आहे, दिसते आहे ते सांगावेच लागते.
आजही ह्या देशामधे चारित्र्यवान, गुणवान, कर्तृत्ववान आणि आदर्श अशी अनेक माणसे आहेत आणि ती यथाशक्ती कार्य करीत आहेत. आपल्या देशामधे चांगल्या माणसाना कधीही तोटा नव्हता, आजही तोटा नाही आणि यापुढेही कधीही तोटा असणार नाही.
किंबहुना, ' जगाचे हे सगळे रहाटगाडगे चांगल्या माणसांच्या मुळेच चालले आहे. वाईट माणसांच्यामुळे चाललेले नाही.' हे सत्य आहे. परंतु सध्या फार विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे.
पापी लोक शिरजोर झालेले आहेत. सत्ताधीश झालेले आहेत.
ह्या देशाच्या नाड्या त्यांच्याच हातात गेल्या आहेत आणि त्या आपणच दिलेल्या आहेत.
त्यांच्यासमोर सज्जनांचे काहीही चालत नाही. चांगली माणसे आरडाओरड करण्यापलीकडे काहीही करू शकत नाहीत.
त्यांचे कोणीही ऐकत नाही. भ्रष्ट सत्ताधाऱ्यांचे कोणीही काहीही वाकडे करू शकत नाही. त्यांना कशाचीही भीती राहिलेली नाही.
कोणताही अपराध करून त्यामधून सहीसलामत सुटून जाण्याचे तंत्र त्यांनी आत्मसात् केलेले आहे.
फारच आरडाओरड झाली तर चौकशी करण्यासाठी समित्या नेमतात. वर्षानुवर्षे चौकशी चालत राहते. चौकशी कधी संपतच नाही.
समजा संपली तरी त्या चौकशीमधून काय बाहेर आले ते आपल्याला कळत नाही.
त्यानंतर पुढे अपराध करणाऱ्यावर कोणतीही कारवाई होत नाही. विशेष म्हणजे, हीच मंडळी शुद्ध चारित्र्याविषयी सतत बोलत असतात. इतरांना सतत उपदेश करीत असतात. जनतेने कसे वागायला पाहिजे ते सांगत असतात.
परंतु त्यांना, स्वत:च्या वर्तनाविषयी प्रश्न विचारलेला चालत नाही.
कोणी विचारला तर लगेच ' हे राजकीय षडयंत्र आहे!' असे म्हणून मोकळे होतात.
आदरणीय **अण्णा हजारेंच्या** आंदोलनामुळे जनतेला माहितीचा अधिकार मिळाला. त्यामुळे ह्यांचे घोटाळे बाहेर तरी येत आहेत.
नाहीतर काहीच कळले नसते. आता तर माहिती मिळवून, उघड करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हत्त्या केल्या जात आहेत.
ही परिस्थिती पाहून मनाला फार यातना होतात. फार वाईट वाटते.
देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून सर्वस्वाचा होम करणारे देशभक्त त्यांचे कार्य करून गेले. आता त्यांचे नांव फक्त स्वार्थ साधण्यासाठीच घेतले जाते. आज ते असते तर देशाची अवस्था पाहून त्यांना काय वाटले असते?
आपला हा देश एकेकाळी सर्व जगामधे, **सुवर्णभूमी** म्हणून सुविख्यात होता. त्या ह्या भारतवर्षाची आज काय अवस्था झाली आहे?
**' आज जर शिवाजी महाराज हयात असते तर त्यांनी ह्या पाप्यांचे काय केले असते? '**
जरा स्वत:च्या मनाला प्रश्न विचारा आणि काय उत्तर मिळते पहा.
' ते चौकशी समित्या नेमीत बसले असते काय? श्वेतपत्रिका काढीत बसले असते काय?
कोर्टात केस करायला गेले असते काय? राज्यपालांच्याकडे आणि राष्ट्रपतींच्याकडे निवेदने देत बसले असते काय?'
नाही. कधीही नाही. त्यांनी ह्यापैकी काहीही केले नसते. आपल्या तलवारीनेच, ह्या सर्वांचा यथायोग्य समाचार घेतला असता.
आपण थोडा विचार करा, म्हणजे आपल्याला आपोआप उत्तर मिळेल.
गोऱ्या इंग्रजांनी ह्या देशाची दीडशे वर्षात जेवढी लूट केली, त्याच्या कितीतरी पटीने जास्त लूट, त्याच्या अर्ध्याहूनही कमी वेळात, आपणच निवडून दिलेल्या, आपल्याच राज्यकर्त्यांनी केली आहे. अजूनही करीत आहेत आणि यापुढेही करीत राहतील.
' जोपर्यंत ह्या देशाची जनता जागी होत नाही, त्यांच्या विरोधात आक्रमक होत नाही, त्यांना सत्तेवरून खाली खेचत नाही, हाकलून देत नाही, त्यांना शासन करीत नाही,' तोपर्यंत ते भ्रष्टाचार करीतच राहतील. देशाला लुटतच राहतील.

जनतेला जगणे अशक्य करतील. असो.

**अवजानन्ति माम् मूढा मानुषीन् तनुमाश्रितम् ।**

**परम् भावमजानन्तः मम भूतमहेश्वरम् ।। ११ ।।**

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।**

**राक्षसीमासुरीम् चैव प्रकृतिम् मोहिनीम् श्रिताः ।। १२ ।।**

सर्व भूतांचा मोठा ईश्वर, असे माझे जे परमस्वरूप, ते न जाणणारे मूर्ख लोक मला मनुष्यदेहधारी समजून तुच्छ समजतात. त्यांच्या आशा व्यर्थ, कर्मे फुकट, ज्ञान वांझोटे आणि चित्त भ्रष्ट असून त्यांनी राक्षसी व आसुरी स्वभावच धारण केलेला असतो.

हा झाला ह्या श्लोकांचा सरळ अर्थ. ह्याला आध्यात्मिक अर्थ म्हणता येईल.

परंतु ह्या श्लोकांमधे दुसराही अर्थ सामावलेला आहे असे मला वाटते.

**स्वामी विवेकानंदांनी** सर्व देशवासियांना एक महत्त्वाचा संदेश दिलेला आहे. ते म्हणतात की,

‘ केवळ तीर्थक्षेत्रांना जाऊन तेथे ईश्वराचे दर्शन घेण्याने काहीही साध्य होणार नाही. त्याऐवजी सर्व मानवजातीची सेवा कशा प्रकारे करता येईल ह्याचा विचार करा आणि त्याप्रमाणे आचरण करा. आपले दीन, दु:खी आणि दुर्बल देशबांधव म्हणजे त्या ईश्वराचीच अनंत रूपे आहेत. त्यांची सेवा करणे म्हणजे परमेश्वराचीच सेवा करणे आहे. परमेश्वराची पूजा करण्यासारखेच आहे.’

हाच विचार महाकवी **ग. दि. माडगुळकर** ह्यांनी, श्रीरामाच्या तोंडून, योग्य शब्दांचा वापर करून, अत्यंत रसाळपणे सांगितला आहे. ( गीतरामायण – ५१ )

आपल्या प्रजाजनांचा रोष ओढवू नये म्हणून रामाने, रावणाच्या कैदेतून मुक्त झालेल्या, सीतेचा त्याग केला.

तिला मुक्त करून, हवे तिथे जायला सांगितले. ते ऐकल्यावर सीतेने अग्निदिव्य केले. अग्नीमधे प्रवेश केला.

परंतु ती पतिव्रता अत्यंत शुद्ध चारित्र्याची, निष्पाप आणि निष्कलंक असल्यामुळे, स्वत: अग्निदेव तिला घेऊन चितेबाहेर आला.

रामाला अतिशय आनंद झाला. त्याने अग्निदेवाला नमस्कार केला.

‘ रामा, तुझी पत्नी सीता ही निष्पाप आणि पवित्र आहे, तू तिचा स्वीकार कर.’

अशी आज्ञा करणाऱ्या अग्निदेवाला नमस्कार करून, **प्रभू रामचंद्र** हात जोडून नम्रपणे काय सांगतात ते नीट ऐका.

आदर्श राजा कसा असला पाहिजे?

त्याचे स्वत:चे चारित्र्य कसे असले पाहिजे?

त्याने आपल्या प्रजाजनांच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहिले पाहिजे?

त्याने आपल्या प्रजाजनांच्या बरोबर कसे वागले पाहिजे?

त्यांची कशा प्रकारे काळजी घेतली पाहिजे? ह्याविषयी ते सांगत आहेत.

त्यांचे सांगणे म्हणजे राजधर्माविषयीचे उत्कृष्ट भाष्य आहे. आपण ते समजून घ्या.

**ज्ञात काय नव्हते मजसी हिचे शुद्ध शील?**
**लोककोप उपजवितो कां कधी लोकपाल?**
**लोकमान्यता ही शक्ती लोकनायकांची ।।**
**अयोध्येस जर मी नेतो अशी जानकीतें,**
**विषयलुब्ध मजसी म्हणती लोक लोकनेते ।**
**गमावून बसतो माझ्या प्रीत मी प्रजेची ।।**
**प्रजा रंजवीतो सौख्यें तोच एक राजा,**
**हेच तत्व मजसी सांगे राजधर्म माझा ।**
**प्रजा हीच कोटी रूपें मला ईश्वराची ।।**
**प्राणही प्रसंगी देणे प्रजासुखासाठी,**
**हीच ठाम श्रद्धा माझ्या वसे नित्य पोटी ।**
**मिठी सोडवूं मी धजलो, म्हणुन मैथिलीची ।।**

एक आदर्श राजा, आपल्या प्रजाजनांना परमेश्वर मानून, त्यांची कशी सेवा करीत होता ते पहा. **हीच भारतीय संस्कृती आहे.** आणि मराठा सैन्याच्या तळावरील सर्व सरदारांना, अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना —

**' सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणे.**
**रयतेस काडीचा आजार द्यायची गरज नाही.**
**आपल्या राहत्या जागेहून बाहेर पाय घालायची गरज नाही.**
**ज्याला जे पाहिजे, ते त्याने बाजारात जाऊन रास विकत आणावे.**
**कोणावरही जुलुम अगर जबरदस्ती अगर कलागती करावयाची गरज नाही.**
**येणेप्रमाणे वर्तणूक करता ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, ज्यावर बदनामी येईल, तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा? जास्ती केल्यास वेगळा सोडणार नाही, हे बरे म्हणून वर्तणूक करणे.'**
अशी सक्त ताकीद देणारे **छत्रपती शिवाजी महाराज** ह्याच संस्कृतीचे पाईक होते. असो.
आता विवेकानंदांच्या अजरामर संदेशाप्रमाणे परमेश्वर म्हणजे,
**' आपला देश, आपला समाज, आपले देशबांधव.'** असे समजूया आणि त्यानंतर जरा अधिक खोलात जाऊन विचार करूया.
' जो राज्यकर्ता, आपल्या प्रजारूपी परमेश्वराची काळजी घेत नाही, आपल्या प्रजेचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी झटत नाही, प्रजेला सुखाने जगू देत नाही, उलट प्रजेला तुच्छ समजतो, मूर्ख समजतो, नादान समजतो, दर पाच वर्षांनी मतपत्रिकेवर शिक्का मारायला रांगेत उभी राहणारी मेंढरे समजतो, स्वार्थासाठी तिचा सतत वापर करतो, तो राज्य करायला लायक नसतो. कितीही विद्वान असला तरीही, त्याचे ज्ञान असून नसल्यासारखेच असते. त्याची बुद्धी भ्रष्ट झालेली असते. त्याचे प्रत्येक कर्म हे विकर्मच असते आणि त्याचा स्वभाव हा वाईटच असतो, राक्षसीच असतो, आसुरीच असतो. तो पापीच असतो.'
हा ह्या श्लोकांच्यामधे सामावलेला दुसरा अर्थ आहे. ह्याला व्यावहारिक अर्थ म्हणता येईल. असो.
आता आपण मूळ अर्थाकडे जाऊया. ' सर्व भूतांचा मोठा ईश्वर, असे माझे जे परमस्वरूप, ते न जाणणारे मूर्ख लोक मला मनुष्यदेहधारी समजून तुच्छ समजतात. त्यांच्या आशा व्यर्थ, कर्मे फुकट, ज्ञान वांझोटे आणि चित्त भ्रष्ट असून त्यांनी राक्षसी व आसुरी स्वभावच धारण केलेला असतो.'
ह्याच आसुरी स्वभावाविषयी पुढे, सोळाव्या अध्यायात, सविस्तरपणे सांगितलेले आहे.
आता जे महात्मे सर्व भूतमात्रामधील परमेश्वराचे अस्तित्व जाणतात, मानतात आणि सतत त्याची अनुभूती घेतात, त्यांचे वर्तन कसे असते? ते कसे वागतात? त्याविषयी सांगितले आहे.

**महात्मानस्तु माम् पार्थ दैवीम् प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।। १३ ।।**
**सततङ् कीर्तयन्तो माम् यतन्तश्च दृढव्रताः ।**
**नमस्यन्तश्च माम् भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।। १४ ।।**
**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ।। १५ ।।**

परंतु हे पार्था ! दैवी प्रकृतीचा आश्रय करून राहिलेले महात्मे, सर्व भूतांचे आदिस्थान जो मी त्या मला ओळखून, अनन्यभाव होऊन माझे भजन करतात. आणि यत्नशील, दृढव्रत व योगयुक्त होऊन सतत माझे कीर्तन व वंदन करून भक्तीने माझी उपासना करतात. तसेच दुसरे कित्येक सर्वतोमुख असलेल्या माझे एकत्वाने, पृथक्त्वाने किंवा नाना प्रकारांनी, ज्ञानयज्ञाने पूजन करून उपासना करतात.
ह्या महात्म्यांच्यामधे जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधील प्रामाणिक माणसांचा समावेश होतो.
ऋषी, मुनी, योगीजन, राज्यकर्ते, समाजसेवक, शिक्षक, सैनिक, डॉक्टर्स, अभियंते, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, शेतकरी, संशोधक इत्यादी सर्वजण समाविष्ट होतात. इतकेच नाही तर आपले विहित कर्म, कर्तव्य म्हणून, अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि उत्तम प्रकारे पार पाडणारा प्रत्येक माणूस समाविष्ट होतो. परमेश्वराची उपासना करण्यासाठी, एखाद्या देवळात जाऊन, तेल माळ वाहून, तेथेच भजन पूजन केले पाहिजे असे नाही. जे आपले कर्तव्य आहे ते, ' ह्यामधून मला काय मिळेल?' ह्याचा विचार न करता, फलाशा न ठेवता, सदैव प्रामाणिकपणे पार पाडणे म्हणजे समाजरूपी परमेश्वराची उपासना करण्यासारखेच आहे. त्याला वंदन करणेच आहे.
त्याचे भजन, पूजन आणि कीर्तन करण्यासारखेच आहे. ते भगवंतालाही प्रियच आहे. नव्हे, नव्हे! भगवंताला तेच प्रिय आहे.
तो अर्जुनाला, **' अरण्यामधे जाऊन तपश्चर्या करायला '** सांगत नाही किंवा,
**' कपाळाला टिळा लावून आणि गळयात माळ घालून, त्याचे भजन, पूजन आणि कीर्तन करायला '** सांगत नाही. तर ' सदैव त्याचे स्मरण करून, आपले प्रत्येक कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडायला ' सांगतो आहे. निष्काम कर्म करायला सांगतो आहे.

**अहम् क्रतुरहम् यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।**

**मंत्रोऽहमहमेवाज्यम् अहमाग्निरहम् हुतम् ॥ १६ ॥**

श्रौतयज्ञ मी, स्मार्तयज्ञ मी, श्राद्धात पितराना अर्पण केलेले अन्न मी, वनस्पतींपासून उत्पन्न झालेले अन्न मी, मंत्र मी, तूप मी, अग्नि मी आणि अग्नीमधे दिलेल्या आहुती सुद्धा मीच आहे.

ह्या श्लोकामधे बरेच शब्द एकत्र आलेले आहेत. **क्रतु, यज्ञ, स्वधा, औषध, मंत्र, आज्य, अग्नि** आणि **आहुती** हे ते शब्द होत. ह्यामधील इतर सर्व शब्दांचा अर्थ समजला परंतु **क्रतु** ह्या शब्दाचा अर्थ मला समजला नाही.

लोकमान्य टिळकांच्या **गीतारहस्यामधे** पाहिले. त्यामधे त्यांनी ह्या शब्दावर बरेच भाष्य केलेले आहे. त्याचा सारांश सांगायचा म्हणजे ' क्रतु आणि यज्ञ हे दोन शब्द मुळामधे समानार्थीच आहेत. परंतु यज्ञ ह्या शब्दाचा अर्थ पुढे व्यापक झाला आणि देवपूजा, वैश्वदेव, अतिथिसंतर्पण, प्राणायाम, जप इत्यादी कर्मांसही यज्ञ ही संज्ञा प्राप्त झाली. त्याप्रमाणे क्रतु ह्या शब्दाचा अर्थ मात्र वाढत गेला नाही. श्रौतधर्मात अश्वमेधासारख्या यज्ञांच्या संकल्पनांना क्रतु हा शब्द लाविलेला आहे. त्यानुसार क्रतु म्हणजे श्रौतयज्ञ म्हणजेच विशिष्ट संकल्प करून त्यासाठी आवश्यक ती सिद्धता करणे असाच अर्थ कायम राहिला.'

आपल्या ह्या विधानाच्या समर्थनासाठी त्यांनी आदिशंकराचार्यांच्या **शांकरभाष्याचा** संदर्भ दिला आहे.

**ज्ञानेश्वरी** पाहिली. त्यामधे **क्रतु** चा अर्थ सांगताना ज्ञानेश्वर महाराजांनी, —

' वेद जी जी कर्मे करावयास सांगतो, त्या **कर्मांचे विधानरूप** म्हणजे क्रतु आणि त्या विधानरूप कर्मांपासून अंगे व उपांगे यांसहित जी सर्व क्रिया केली जाते ती क्रिया म्हणजे यज्ञ.' असे सांगितलेले आहे.

आचार्य विनोबा भाव्यांची **गीताई** पाहिली. त्यामधे त्यांनी **क्रतु** चा अर्थ सांगताना —

' मी चि **संकल्प** मी यज्ञ स्वावलंबन अन्न मी ।' असे रूपांतर केलेले आहे.

इतर अनेक संदर्भ तपासले. विश्वकोषही पाहिला. क्रतु ह्या शब्दाचा अर्थ काय आहे ते पाहण्याचा प्रयत्न केला.

त्याचे तीन अर्थ सांगितलेले आढळून आले. पहिला अर्थ ' त्याग ' असा आहे. दुसरा अर्थ ते एका ऋषीचे ' नांव ' आहे आणि तिसरा अर्थ ' वर्चस्व सिद्ध करण्याचा संकल्प करणे व त्यासाठी यथायोग्य तयारी करणे.' असा आहे.

ह्या सगळ्याचा एकत्रितपणे विचार केल्यावर, मला काय वाटते ते सांगतो.

' एखादे ध्येय ठरविणे आणि ते ध्येय प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी करणे.' म्हणजे **क्रतु** होय.

' त्यानंतर प्रत्यक्ष कृती करून, आवश्यक ते सर्व प्रयत्न करून, यथायोग्य मार्गांचा वापर करून, आपले नियोजित ध्येय प्राप्त करणे.' म्हणजे **यज्ञ** होय. यज्ञ करीत असताना, मग तो रूढार्थाने केलेला यज्ञ असो किंवा आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी, देशाच्या उत्कर्षासाठी अथवा स्वधर्मपालनाच्या हेतूने केलेला कर्मरूप यज्ञ असो, अनेक प्रकारच्या आहुत्या द्याव्याच लागतात.

**( स्वाहा, स्वधा व हुतम् )**

ते ध्येयच आहुत्या घेणारे असते आणि त्यामधे इंधन म्हणून अनेक गोष्टी, अनेक वस्तू आणि अनेक इच्छा आकांक्षा वापराव्या लागतात.

**( अग्नी, औषध, आज्य )**

यथायोग्य शब्दांचा वापर करून, सर्व सहकाऱ्यांना आणि अनुयायांना, कर्म करण्याची प्रेरणा द्यावी लागते. उत्तेजन द्यावे लागते. कर्म करण्यासाठी प्रवृत्त करावे लागते. ( **मंत्र** ) तसेच स्वतःच्या कृतीने इतरांच्यासमोर उदाहरण ठेवून त्याद्वारे त्यांना प्रेरणा द्यावी लागते. आणि तशी प्रेरणा देणारा असाही कोणीतरी असावाच लागतो. ( **ऋत्विज** )

ह्या सगळ्या गोष्टी म्हणजे, कोणत्याही यज्ञकर्माचा अविभाज्य भागच आहे. कोणतेही यज्ञकर्म करण्याच्या पायऱ्याच आहेत. त्याशिवाय यज्ञ पूर्ण होऊ शकणार नाही. सफल होणार नाही. असो.

**शिवाजी महाराजांनी** वयाच्या सोळाव्या वर्षी ' हिंदवी स्वराज्याची स्थापना करणे.' हे आपले ध्येय ठरविले. **( क्रतु )**

त्यानंतर ' ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक ती तयारी आणि कृती ' ते एकत्रितपणेच करीत राहिले. सहकारी मिळत गेले. त्यांना प्रोत्साहन देणे, स्वतःच्या शौर्याच्या आणि धैर्याच्या उदाहरणाने, इतरांना कृती करण्यासाठी प्रवृत्त करणे आणि ध्येयाच्या आड येणाऱ्या विरोधकांचा नाश करणे, हे तर सतत चालले होते. राज्याभिषेक होईपर्यंत, जवळजवळ प्रत्येक मोहिमेमधे, रणभूमीवर ते स्वतः सर्वात पुढे असत. नेहमी पहिली कृती तेच करीत असत. आपल्या सैन्याला लढायला सांगून, स्वतः मात्र महालामधे बसून ऐषोआराम करणाऱ्यांपैकी ते नव्हते. **( यज्ञ )**

त्यांचे जीवन म्हणजे **महायज्ञच** होता. पुढील काळामधे किती **आहुत्या** दिल्या गेल्या, किती **इंधन** खर्ची पडले, किती **मंत्र** म्हटले गेले आणि ते मंत्र म्हणणारे **ऋत्विज** कोण कोण होते, त्याची गणती करता येत नाही. त्यांच्या निधनानंतरही यज्ञ चालूच होता.

त्यांच्या दोन पुत्रांची आहुती पडली. परंतु यज्ञ थांबला नाही. चालूच राहिला. **महापापी औरंगजेब** ह्या महाराष्ट्राच्या मातीत गाडला जाईपर्यंत आणि त्याही पुढे मराठी सत्तेचा भगवा ध्वज अटकेपार फडके पर्यंत तो महायज्ञ चालूच राहिला. असो.

अर्वाचीन भारताच्या इतिहासामधे **लोकमान्य टिळकांचे** स्थान ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यामधे, लोकमान्य टिळक म्हणजे **' भारतीय असंतोषाचे जनक '** **( Father of Indian unrest.)** अशीच नोंद आहे. असो.

**' स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवीनच!'**

**( Independence is my birth right and I shall have it! )**

हे प्रसिद्ध विधान त्यांचेच आहे. ते आपल्याला माहीत असेलच. ह्या विधानाच्या बाबतीतही बराच मतभेद आहे.
अनेक विद्वानांच्या सांगण्याप्रमाणे लोकमान्यांचे ते विधान –

**' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवीनच!'**

**( Home rule is my birth right and I shall have it! )** असे आहे.

**Independence** म्हणजे **स्वातंत्र्य.** आणि **Home rule** म्हणजे **स्वराज्य.**

दोन्ही शब्द समानार्थी नाहीत. त्यांचा अर्थ वेगळा आहे हे खरे आहे.
स्वातंत्र्य हा **जहाल** शब्द आहे आणि त्याच्या तुलनेत, स्वराज्य हा शब्द **मवाळ** आहे.
स्वातंत्र्यामधे स्वराज्याचा संपूर्णपणे समावेश होतो. स्वराज्य हा स्वातंत्र्याचा एक अध्याहृत असा भाग आहे.
पण स्वराज्यामधे संपूर्ण स्वातंत्र्याचा समावेश होत नाही तर मर्यादित स्वातंत्र्याचा समावेश होतो.
असे असले तरीही, दोन्हीपैकी कोणतेही विधान केलेले असले तरीही, त्याचे महत्त्व कमी होत नाही.
**' स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,'** असे असो अथवा **' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,'** असे असो, तो विधानाचा पूर्वार्ध आहे आणि महत्त्वाचाही आहे. कारण त्यावेळच्या परिस्थितीत स्वातंत्र्य तर सोडून द्या, पण मर्यादित स्वातंत्र्याची म्हणजेच स्वराज्याची मागणी करणे हा देखील घोर **अपराधच** होता.

( सन १८१८ मधे पेशवाई बुडाली आणि हिंदुस्थानावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यानंतर ती सत्ता उलथवून लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. सन १८२७ मधला **उमाजी नाईकां**चा उठाव, सन १८३९ मधले **भाऊ खरे व इतरांच्या** पुढाकाराने कोळी बांधवांनी केलेले बंड, सन १८५७ चे **राष्ट्रव्यापी स्वातंत्र्ययुद्ध,** आणि सन १८७९ मधले आद्य क्रांतिकारक **वासुदेव बळवंत फडके** ह्यांनी केलेले बंड, हे इतिहासाला माहीत असलेले आणि ठळकपणे नमूद केले गेलेले चार प्रमुख प्रयत्न होत.
ह्या सर्व घटनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे, ' स्वराज्याची मागणी ही, संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीची पूर्वतयारी आहे.' हे इंग्रज सरकारासही माहीत होते, ह्याविषयी शंकाच नाही. त्यामुळे कोणत्याही राजकीय मागणीकडे ते संशयानेच पहात असे आणि शक्य ते सर्व उपाय करून संबंधितांची पाळेमुळे खणून काढीत असे. )

परंतु विधानाचा उत्तरार्ध त्याहून महत्त्वाचा आहे. फार फार महत्त्वाचा आहे. **' आणि तो मी मिळवीनच!'** ह्या उत्तरार्धामधे प्रबळ इच्छाशक्ती आहे आणि ती पूर्ण करण्याचा निर्धार आहे. **( Determination )** कोणत्याही परिस्थितीत, पडेल ती किंमत मोजून, ठरविलेले ध्येय प्राप्त करण्याचा दृढनिश्चय आहे. **( क्रतु )**

लोकमान्य टिळकांचे जीवनसुद्धा एक **महायज्ञच** होता. त्यामधे त्यांचे सर्व आयुष्य खर्ची पडले. त्यांना आपल्या हयातीत यज्ञ पूर्ण झालेला, सफल झालेला पहायला मिळाला नाही. परंतु त्यांच्या निधनानंतरही यज्ञ चालूच राहिला. असो.

येथे मला आणखी एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते आहे. लोकमान्य टिळकांनी ' गीतारहस्य अर्थात कर्मयोगशास्त्र.' हा अद्वितीय ग्रंथ मंडालेच्या तुरुंगामधे काळ्यापाण्याची शिक्षा भोगत असताना लिहिला. त्यांचे स्वत:चे जीवन म्हणजे, त्या ग्रंथामधे त्यांनी जी कर्मयोगाची शिकवण दिली आहे, तिचे उत्तम उदाहरण आहे. त्यांचे सगळे जीवन म्हणजे निष्काम कर्मयोगाचे आचरण आहे.
म्हणजे त्यांची शिकवण आणि त्यांचे चरित्र ह्यामधे जराही अंतर नाही.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांची** कथाही तशीच आहे.

इतिहासामधे त्यांची **' क्रांतिकारकांचे मुकुटमणी '** अशी नोंद आहे आणि ती त्रिवार सत्य आहे.

चापेकर बंधूंच्या बलिदानानंतर त्यांनी आपल्या कुलदेवतेसमोर प्रतिज्ञा केली.
' माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत मारीत चापेकरांच्या प्रमाणे मरेन किंवा शिवरायांच्याप्रमाणे विजयी होऊन देशाला स्वतंत्र करीन.' **( क्रतु )**
त्यांच्या दृष्टीला स्वातंत्र्यदेवता कशी दिसत होती ते त्यांच्याच शब्दांमधे ऐका.

**मोक्ष मुक्ति ही तुझींच रूपें तुलाच वेदांती,**
**स्वतंत्रते भगवति ! योगिजन परब्रह्म वदती ।**
**जें जें उत्तम उदात्त उन्नत महन् मधुर तें तें,**
**स्वतंत्रते भगवति ! सर्व तव सहचारी होतें ।**
**वंदे ! त्वाम् अहम् यशोयुताम् वंदे ।।**

भारतीय स्वातंत्र्याच्या **यज्ञा**मधे, त्यांनी कशा कशाची आहुती दिली ते ही ऐका —

त्वत् स्थंडिली ढकलिले **प्रिय मित्रसंघा** ।
केले स्वयें दहन **यौवन देहभोगा** ।
त्वत् स्थंडिली ढकलली **गृह वित्तमत्ता** ।
दावानलांत **वहिनी नव पुत्र कांता** ।
त्वत् स्थंडिली अतुल धैर्य **वरिष्ठ बंधू** ।
केला हवी परम कारुण पुण्यसिंधू ।।
त्वत् स्थंडिलावरी बळी **प्रिय बाळ** झाला ।
त्वत् स्थंडिली बघ अता **मम देह** ठेला ।
**हे काय बंधु असतो जरि सात आम्ही ।**
**त्वत् स्थंडिलीच दिधले असते परी मी ।।**

वीर सावरकरांचे जीवन म्हणजे एक **महायज्ञ** होता.

त्याविषयी अधिक काहीही सांगायची गरज नाही. आपणा सर्वांना ते माहीत असेलच. केवळ दैवयोगानेच त्यांना, आपला देश स्वतंत्र झालेला पहायला मिळाला. ह्याविषयी त्यांनी स्वत: काय सांगितलेले आहे, ते त्यांच्याच शब्दांमधे ऐका.

'' हा योगायोग आहे. कधीकधी असे योगायोग घडत असतात. फाशीचे खांब अक्षरश: गदागदा हलवले. फाशीचा दोर मानेभोवती अडकवून घ्यायला सिद्ध झालो. **पण नाही मेलो!**

ब्रिटिशांच्या राजवटीत खटला झाला. ते मला फाशी देतील असेच वाटले होते. पण नाही दिली!

फाशी नाही दिली! **म्हणून नाही मेलो!** परंतु त्यांनी फाशीपेक्षाही कठीण अशी पन्नास वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा दिली!

यमयातना भोगण्यासाठीच म्हणून जेव्हा मी अंदमानात गेलो तेव्हा, ' आपल्याला येथून जिवंतपणे परत जाता येईल.' असे कधीही वाटले नव्हते. ' आपले प्रेत अंदमानच्या मातीत किंवा समुद्रात कुठेतरी पडेल आणि तेथील भूचरांची - जलचरांची भूक भागवील.' असेच वाटत होते. **पण नाही मेलो!**

मला माझी मातृभूमी, हा माझा देश, हा माझा हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पहायला मिळेल, असेही कधीच वाटले नव्हते.

**पण पाहिला!** तीन चतुर्थांश का होईना! हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहिला!

उरलेला एक चतुर्थांश देश ह्या आणि पुढे येणाऱ्या पिढ्यांनी स्वतंत्र करावा! ''

सावरकर हे **' राजमान्य राजश्री!'** कधीही नव्हते. इंग्रजांच्या राज्यात नव्हतेच, पण स्वातंत्र्यानंतर स्वकीयांच्या राज्यातही नव्हते.

ते **' जनमान्य जनश्री!'** होते असे मला नेहमीच वाटते. ह्या देशाच्या जनतेने त्यांच्यावर अलोट प्रेम केले. सदैव त्यांचा सन्मान केला.

इंग्रजांनी त्यांची सर्व मालमत्ता जप्त केली होती. स्वतंत्र भारताच्या सरकारनेही ती परत दिली नाही. परंतु त्याविषयी ते तटस्थच राहिले.

' मला ती मालमत्ता नको आहे. तेथे जो कोणी रहात असेल त्याने तिचा सुखेनैव उपभोग घ्यावा.' असेच म्हणाले.

स्वत: अद्वितीय असे कार्य करूनही, त्याविषयी देखील, ते आयुष्याच्या अखेरपर्यंत तटस्थ राहिले.

कारण त्यांनी निष्काम कर्मयोगाचे आचरण केले होते. स्वार्थ साधण्यासाठी काहीही केलेले नव्हते. त्यांनीच असे सांगितलेले आहे की,

**की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने,**
**लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने ।**
**जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे,**
**बुद्ध्याचि वाण धरिले करी हे सतीचे ।**

**क्रतु** ह्या शब्दाचा मला जाणवलेला अर्थ स्पष्ट करण्यासाठी ही तीन उदाहरणे सांगितली.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यामधे अशी अनेक उदाहरणे आहेत.

अनेक महान स्त्री - पुरुषांनी त्या क्रतु आणि यज्ञामधे भाग घेऊन आहुती दिलेली आहे. ते सगळे म्हणजे परमेश्वराचीच रूपे होत. **त्यांना माझा नमस्कार असो.** बोलण्याच्या ओघामधे जर माझ्याकडून थोडे विषयांतर झाले असेल तर आपण मला क्षमा करावी अशी मी आपणा सर्वांना विनंती करतो. असो.

**पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ।**

**वेद्यम् पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ।। १७ ।।**

**गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणम् सुहृत् ।**

**प्रभवः प्रलयः स्थानम् निधानम् बिजमव्ययम् ।। १८ ।।**

**तपाम्यहमहम् वर्षम् निगृह्णाम्युत्सृजामि च ।**

**अमृतञ् चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ।। १९ ।।**

ह्या जगताचा पिता, माता, आधार, आजोबा मी. जे काही पवित्र किंवा जाणून घेण्यासारखे आहे ते आणि ॐकार, ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेदपण मीच. सर्वांची गती, सर्वांचा पोषक, प्रभू , साक्षी, निवास, शरण, सखा, उत्पत्ति, प्रलय, स्थिती, निधान आणि अव्यय बीजही मीच. मी ऊन पाडितो, पाऊस आखडितो आणि सोडतो. हे अर्जुना ! अमृत व मृत्यु तसेच सत्य आणि असत्यही मीच आहे. येथे परमेश्वराच्या एकूण स्वरूपाचे वर्णन आलेले आहे.

वरवर पाहिले असता ते परमेश्वराच्या विभूती सांगितल्यासारखे वाटते. परंतु त्यामागे विभूती सांगण्याचा हेतू नाही तर, जगामधील नाशवंत अशा यच्चयावत् वस्तुमात्राचा आणि अविनाशी अशा परमेश्वराचा संबंध कसा आहे ते सांगितले आहे.

सत् आणि असत्, मृत्यू आणि अमृत, उत्पत्ती आणि विनाश, चांगले आणि वाईट इत्यादी सर्व काही परमेश्वरापासूनच निर्माण होत असते. म्हणून ती सगळी परमेश्वराचीच विविध रूपे आहेत असाच अर्थ होतो.

आता सर्व विश्व ही परमेश्वराचीच निर्मिती असल्यामुळे, त्यानेच निर्माण केलेल्या ब्रह्मदेवासहित सर्व देव देवतांची विविध मार्गांनी उपासना करणे म्हणजे अंतिमतः त्याचीच उपासना करण्यासारखे आहे. परंतु हे सत्य कळत नसल्यामुळे म्हणा किंवा कळत असूनही वळत नसल्यामुळे म्हणा, फळाची आशा बाळगून, वेगवेगळया देवदेवतांची वेगवेगळया मार्गाने उपासना करणाऱ्यांना, नाशवंत फळाचीच प्राप्ती होते. मोक्षप्राप्ती होत नाही. परिणामी ते जन्ममृत्यूच्या चक्रामधे वारंवार फिरत राहतात.

हाच विषय पुढील दोन श्लोकांमधे आणि त्यानंतरही आणखीन तीन श्लोकांमधे विस्ताराने सांगितला आहे.

**त्रैविद्या माम् सोमपाः पूतपापा**

**यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिम् प्रार्थयन्ते ।**

**ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकम्**

**अश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ।। २० ।।**

**ते तम् भुक्त्वा स्वर्गलोकम् विशालम्**

**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकम् विशन्ति ।**

**एवम् त्रयीधर्ममनुप्रपन्नाः**

**गतागतं कामकामा लभन्ते ।। २१ ।।**

तीनही वेदातील ( ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद ) सकाम कर्म करणारे, सोमरस पिणारे व निष्पाप असे पुरुष, माझे यज्ञाने पूजन करून स्वर्गाच्या प्राप्तीची इच्छा करतात.

ते इंद्रलोकाला पोहोचून स्वर्गात देवांचे अनेक दिव्यभोग भोगतात आणि त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याचा क्षय झाल्यावर, पुन्हा जन्म घेऊन मृत्युलोकी येतात. याप्रकारे तीनही वेदातील यज्ञयागादी श्रौतधर्म पाळणाऱ्या व काम्य उपभोगांची इच्छा ठेवणाऱ्या लोकांस स्वर्गाच्या येरझारा प्राप्त होतात.

**स्वर्ग आणि नरक म्हणजे नक्की काय आहेत?**

पुराणांमधे नरकाचे विस्ताराने वर्णन केलेले आहे. नरकांचे विविध प्रकार, तसेच कोणत्या अपराधामुळे कोणत्या नरकात जावे लागते आणि तेथे काय काय सहन करावे लागते ते सांगितलेले आहे.

पापांचे फळ भोगून झाल्यावर परत मृत्युलोकी यावेच लागते असेही सांगितले आहे.

स्वर्गलोकाचा उल्लेख पुराणांमधे आहे परंतु स्वर्गाचे वर्णन मात्र फारसे वाचायला मिळाले नाही.

इतरही अनेक ग्रंथ वाचले. त्यांतही काही सापडले नाही. ह्याला एकच अपवाद निघाला. तो म्हणजे **ज्ञानेश्वरी.**

ज्ञानेश्वरीचा नववा अध्याय वाचत असतानाच अनपेक्षितपणे ' **स्वर्ग कसा आहे?**' त्याविषयी वाचायला मिळाले आणि अतिशय आनंद झाला. ज्ञानेश्वरीमधे स्वर्गाचे फार सुंदर आणि बहारदार वर्णन केलेले आहे.

ते वाचताना, ज्ञानदेवांची कल्पनाशक्ती किती उच्च पातळीची होती आणि कल्पनेचा विस्तार करण्याचे सामर्थ्य किती मोठे होते, त्याची आपल्याला थोडी कल्पना येते. आपल्या दृष्टीपुढे स्वर्गलोकाचे एक उत्तम शब्दचित्र साकारले जाते.

क्षणभर ' आपण स्वर्गलोकामधे फिरतो आहोत.' असे वाटायला लागते. ते वर्णन खरोखरच ऐकण्यासारखे आहे. ज्ञानदेव म्हणतात की,

**जेथ अमरत्व हेचि सिंहासन । ऐरावतासारिखें वाहन ।**
**राजधानीभुवन । अमरावती ।।**
**जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें ।**
**जियें गावीं खिल्लारें । कामधेनूंचीं ।।**
**जेथ वोळगे देव पाइका । सैंध चिंतामणीचिया भूमिका ।**
**विनोदवनवाटिका । सुरतरूंचिया ।।**
**गंधर्वगान गाणीं । जेथ रंभेऐशिया नाचणी ।**
**उर्वशी मुख्य विलासिनी । अंतौरिया ।।**
**मदन वोळगे शेजारें । जेथ चंद्र शिंपे सांबरें ।**
**पवना ऐसें म्हणियारें । धांवणें जेथ ।।**
**पैं बृहस्पति आपण । ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण ।**
**ताटियेचे सुरगण । विकार जेथें ।।**
**लोकपाळ रांगेचे । राउत जिये पदींचे ।**
**उच्चै:श्रवा खांचे । खोलणिये ।।**
**हें बहु असो जे ऐसे । भोग इंद्रियसुखांसरिसे ।**
**ते भोगिजती जंव असे । पुण्यलेशु ।।**

अर्थ – ज्या स्वर्गात न मरणे हेच सिंहासन आहे, ऐरावत हत्तीसारखे वाहन आहे, अमरावतीनगर ही राजधानी आहे, अणिमा आणि लघिमा इत्यादि महासिद्धींची भांडारे आहेत, अमृताची कोठारे आहेत व कामधेनूंचे कळप आहेत, ज्या स्वर्गात देवसमुदाय चाकर होऊन सेवा करतात, जिकडे तिकडे चिंतामणी नांवाच्या रत्नाच्या जमिनी आहेत व जेथे करमणुकीकरिता कल्पवृक्षांचे बगिचे आहेत, जेथे गंधर्वांचे गायन हेच गाणे आहे, जेथे रंभेसारख्या नाचणाऱ्या अप्सरा आहेत आणि विलास करण्यासाठी असलेल्या स्त्रियांची मुख्य उर्वशी आहे. जेथे शय्यागृहात मूर्तिमंत मदन सेवाचाकरी करतात, ज्या ठिकाणी प्रत्यक्ष चंद्र सडासंमार्जन करतो व वाऱ्यासारखा चपळ जासूद सांगितलेले काम करायला तयार असतो. जेथे कल्याण इच्छिणारे व आशिर्वाद देणारे ब्राह्मण आहेत व पंगतीला देवांचे समुदाय आहेत. ज्या ठिकाणचे घोडेस्वार हे लोकपालांच्या बरोबरीचे आहेत, जेथे उच्चै:श्रवा नांवाचा इंद्राचा घोडा पुढे चालतो, असे इंद्राच्या सुखांसारखे ते भोग, यज्ञकर्त्याच्या पदरात जोपर्यंत पुण्याचा अंश असतो तोपर्यंत, भोगावयास मिळतात.

असे स्थान संपूर्ण पृथ्वीवर कुठे तरी आहे काय? असले तर एकदा डोळे भरून पहायची इच्छा आहे.

आपणापैकी कोणाला माहिती असेल तर कृपया मला सांगा.

तर स्वर्ग म्हणजे काय आहे? आणि नरक म्हणजे काय आहे? ते दोन्ही म्हणजे विशिष्ट प्रदेश आहेत काय?

ह्या मृत्युलोकाच्या खाली नरक आहे आणि वर स्वर्ग आहे अशी आपली सर्वांची समजूत असते.

आपल्यावर तसेच संस्कार केले गेलेले आहेत. जो सतत अनेक प्रकारे पापकर्मे करतो आणि त्यामुळेच ज्याचे अध:पतन होते, तो मृत्यूनंतर नरकात जातो आणि तेथे अगोदर केलेल्या सर्व पापकर्माचे फळ म्हणून अनेक यातना भोगतो.

पापकर्माची फळे भोगून झाली म्हणजे परत ह्या मृत्युलोकी जन्म घेतो.

जो सतत अनेक प्रकारे यज्ञयागादि पुण्यकर्मे करतो आणि त्यामुळेच ज्याचे उत्थान होते, उन्नती होते, तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो आणि तेथे अगोदर केलेल्या सर्व पुण्यकर्माचे फळ म्हणून अनेक प्रकारचे दिव्य भोग भोगतो.

पुण्यकर्माची फळे भोगून झाली म्हणजे परत ह्या मृत्युलोकी जन्म घेतो.

म्हणजे पापी असो अगर पुण्यवान असो, आपल्या कर्माची फळे भोगून झाल्यावर परत जन्माला येणे निश्चित आहे.

ते टळत नाही. कोणालाही टाळता येत नाही.

ज्ञानेश्वर महाराजांनी तर, ' वासनेने युक्त असलेले पुण्य म्हणजे पापच असते.' असे म्हटले आहे.

**स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे ।**

**मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ।। ९ - ३१६ ।।**

अर्थ – पुण्यरूप पापाने स्वर्गाला जाणे होते आणि पापरूप पापाने नरकाला जाणे होते. ह्या खेरीज, ज्याने माझी प्राप्ती होते तेच शुद्ध पुण्य होय.

ह्याविषयी काही विद्वानांनी आणखी एक विचार सांगितलेला आहे. हा विचार व्यावहारिक दृष्टीने बरोबर आहे असे मला वाटते.

'' **नरक, स्वर्ग** आणि **मोक्ष** ह्या काही विशिष्ट जागा नाहीत! भौगोलिक प्रदेश नाहीत!

त्या मनाच्या विशिष्ट अवस्था आहेत! त्या येथेच, ह्या मृत्युलोकीच अनुभवास येतात! प्रत्येकाला अनुभवाव्या लागतात!

जिवंतपणीच अनुभवाव्या लागतात! त्यासाठी प्रत्यक्ष मरण यायची गरज नाही!

जगाच्या दृष्टीने अत्यंत गरीब, विपन्नावस्थेत जगणारा माणूस मनाने आनंदी, समाधानी व शांत असू शकतो!

कोणत्याही ठिकाणी, जमिनीवर, दगडाची उशी असली तरीही त्याला शांतपणे झोप लागते! **तो स्वर्गाचा अनुभव घेत असतो!**

याउलट, जगाच्या दृष्टीने अत्यंत श्रीमंत, सर्व सुखोपभोगामधे आकंठ बुडालेला माणूस मनाने अत्यंत दु:खी, असमाधानी व अशांत असू शकतो! महालामधल्या गाद्यागिर्द्यांवर लोळत पडलेला असतो! पण त्याला झोप लागत नाही! नाना प्रकारची औषधे घेऊनही उपयोग होत नाही! त्याला त्याची पापकर्मे बोचत असतात. चिंता - विवंचना जाळत असतात. **तो नरकाचा अनुभव घेत असतो!**

ज्याचा अहंकार नाहीसा झाला असेल, मीपणा नाहीसा झाला असेल, गर्व नाहीसा झाला असेल, सर्व वासनांचे पूर्णपणे शमन झाले असेल, जो सगळीकडे सम बुद्धीने पाहू शकत असेल, सर्वांचे बरोबर ज्याचे वर्तन समानच असेल,

**तो सदैव मोक्षाचा अनुभव घेत असतो!**

माणूस जोपर्यंत ' **मम** ' म्हणजे **माझे** असे मानतो, म्हणतो आणि त्यासाठीच कर्म करतो, मग त्याची कृती हे पाप असो किंवा पुण्य असो, तोपर्यंत तो अशाश्वताकडेच जात असतो.

माणूस जेव्हा ' **न मम** ' म्हणजे **माझे नाही** असे मानायला लागतो, म्हणतो आणि ते लक्षात ठेवूनच कर्म करतो, तेव्हा तो शाश्वताकडे जायला सुरवात करतो. त्याचे हातून पापही घडत नाही आणि पुण्यही घडत नाही.

आपल्याला जे दिसते ते सर्व **' असत् किंवा अशाश्वत '** असते. ते सर्व काळाच्या आधीन असते. त्याला शेवट आहे.

अंत आहे. विनाश आहे. त्यापासून मिळणारे सुख सुद्धा अल्पकालीन व अशाश्वतच असते. त्यामधे अडकून राहणे हे परिणामी दु:खदायकच आहे. त्या उलट आपल्याला जे दिसत नाही ते **' सत् किंवा शाश्वत '** असते. ते काळाच्या आधीन नसते. त्याला शेवट नाही. अंत नाही. विनाश नाही. त्यापासून मिळणारे सुख अनंतकालीन व शाश्वतच असते.

त्यामधे अडकून राहणे हे परिणामी सुखदायक आणि आनंददायक आहे.''

म्हणून एका परब्रह्म परमात्म्याचेच मनन, चिंतन, यजन, याजन, भजन, पूजन सतत करणे फार फार महत्त्वाचे आहे.

**अनन्याश्चिन्तयन्तो माम् ये जना: पर्युपासते ।**

**तेषान् नित्याभियुक्तानाम् योगक्षेमम् वहाम्यहम् ।। २२ ।।**

जे लोक अनन्यभावाने माझे चिंतन करून मला भजतात त्या योगयुक्त पुरुषांचा योगक्षेम मी चालवीत असतो.

अशा प्रकारे जो साधक भगवद्भक्तीमधे बुडून गेलेला असतो, त्याचा योगक्षेम स्वत: भगवानच चालवतो.

त्याची सर्व प्रकारे काळजी घेतो. **अनन्य** म्हणजे ' दुसरा कोणीही नाही! केवळ तो आणि तोच!'

अर्जुनाची भक्ती अशी आहे म्हणूनच श्रीकृष्ण त्याचे रक्षण करतो आहे. **योगक्षेम** हा शब्दही महत्त्वाचा आहे. त्याचा अर्थ नीट समजून घ्या. जे नाही आहे ते मिळवणे म्हणजे ' **योग** ' आणि जे आहे त्याचे रक्षण करणे म्हणजे ' **क्षेम** '.

पांडवांच्याकडे काहीच राहिलेले नव्हते. त्यांचे सगळे काही लुबाडले गेले होते. ते त्यांना परत मिळवून देण्यासाठी, रणांगणावर त्यांच्या बाजूने युद्धासाठी उभे असलेले एक लक्ष पन्नास हजार हत्ती आणि सहा लक्ष पंचवीस हजार घोडे ह्यांनी युक्त असे **सात अक्षौहिणी** सैन्य ( अंदाजे चोवीस लक्ष पन्नास हजार सैनिक ), हे **' श्रीकृष्ण, द्रुपदराजा आणि विराटराजा '** ह्या तिघांनी मिळून उभे केलेले होते. अशा प्रकारे सैन्य मिळवणे, त्याची सर्व प्रकारे तयारी करणे आणि ठरलेल्या दिवशी रणांगणावर सिद्ध करणे म्हणजेच **योग** आहे आणि तो पांडवांचे **क्षेम** साधण्यासाठीच आहे. त्यापासून इतर कोणालाही कोणताही लाभ होणार नाही.

**' योग ह्या शब्दाची ही एक नवीन व्याख्या आहे.'** असे समजायला हरकत नाही.

**येऽप्यन्यदेवता भक्ताः यजन्ते श्रद्धयान्विताः ।**

**तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥**

**अहम् हि सर्वयज्ञानाम् भोक्ता च प्रभुरेव च ।**

**न तु मामभिजानन्ति तत्वेनातश्च्यवन्ति ते ॥ २४ ॥**

**यान्ति देवव्रता देवान् पितृन्यान्ति पितृव्रताः ।**

**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपिमाम् ॥ २५ ॥**

हे कौंतेया ! श्रद्धेने युक्त होऊन, दुसऱ्या देवतांचे भक्त बनून जे पूजन करतात, तेही विधिपूर्वक नसले तरी पर्यायाने माझेच पूजन करतात. कारण सर्व यज्ञांचा भोक्ता व स्वामी मीच आहे. पण ते मला तत्त्वतः जाणत नाहीत म्हणून घसरतात व पुनर्जन्म पावतात. देवांचे व्रत करणारे देवांस, पितरांचे व्रत करणारे पितरांस, इतर भूतांची पूजा करणारे त्या भूतांस आणि माझे पूजन करणारे मला येऊन मिळतात.

भक्ती महत्त्वाची असून तिचा विषय असलेली देवता कोणती हे गौण आहे.

भिन्न भिन्न देवतांची भक्ती करण्याचा विधी वेगवेगळा असला, उपासना करण्याची पद्धत वेगवेगळी असली तरीही, ती उपासना आणि भक्ती एकाच परमेश्वराची होते. ह्या सत्याचे ज्ञान न झाल्यामुळे किंवा ज्ञान होऊनही त्यावर विश्वास न बसल्यामुळे,

जे साधक विविध देवदेवतांची उपासना करतात, त्यांची जन्ममृत्यूच्या चक्रामधून सुटका होण्याची शक्यता नाहीशी होते.

म्हणजेच त्यांची मोक्षाची वाट चुकते. ह्याचा परिणाम असा होतो की, प्रत्येकाच्या उपासनेचे फळ हे ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणे आणि उपासनेच्या व भक्तीच्या तीव्रतेनुसार कमी जास्त योग्यतेचे मिळते आणि ते फळ भोगून झाल्यावर पुन्हा जन्म घ्यावाच लागतो.

केवळ एका परब्रह्म परमात्म्याची अनन्य भावाने भक्ती करणारा साधकच अखेरीस जन्ममृत्यूच्या चक्रामधून सुटतो आणि त्या परमेश्वराला जाऊन मिळतो. त्याला मोक्ष प्राप्ती होते. वरील तीन श्लोकांचा हाच भावार्थ आहे.

बाकी ह्या विषयीचे विवेचन ह्या अगोदर करून झालेले आहे.

त्याविषयी परत काही सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. असो.

**पत्रम् पुष्पम् फलम् तोयम् यो मे भक्त्या प्रयच्छति ।**

**तदहम् भक्त्युपहृतम् अश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥**

एखादे पान, फूल, फळ किंवा थोडे पाणीही जो मला भक्तीने अर्पण करतो, त्या शुद्ध बुद्धीच्या निष्काम पुरुषाची ती प्रेमाची भेट मी आनंदाने सेवन करतो.

हा श्लोक फार महत्त्वाचा आहे. सर्वांनी त्याचा अर्थ समजून घेऊन सदैव लक्षात ठेवला पाहिजे असा आहे.

परमेश्वर आपल्याकडे कधीही काहीही मागत नाही. खरच काहीही मागत नाही. आपल्यावर कृपा करण्यासाठी कोणत्याही अटी घालत नाही. वाटाघाटी करीत नाही. त्याला आपल्याकडून केवळ शुद्ध भक्तीचीच अपेक्षा असते. केवळ शुद्ध प्रेमाचीच अपेक्षा असते.

तशी भक्ती आणि प्रेम असले म्हणजे मग आपण जे काही अर्पण करू त्याने तो संतुष्ट होतो.

काहीही न देता केवळ मनोभावे नमस्कार केला तरीही पुरेसा असतो.

कारण परमेश्वराला आपल्याकडून अनन्य भक्ती आणि मनापासून केलेले प्रेम, ह्या शिवाय दुसरे काहीही नको असते.

मला एक गोष्ट सांगा, ' आपल्याकडे आपले स्वतःचे म्हणावे असे काय असते हो?' काहीही नाही.

आत्ता ह्या क्षणी, येथे, ' मी आपणा सर्वांना पाहतो आहे, आपल्याशी बोलतो आहे, आपण माझे बोलणे ऐकून घ्यावे अशी अपेक्षा करतो आहे,' ते सुद्धा त्याच्या कृपेमुळेच करू शकतो आहे. तो माझ्या शरीरामधे, माझ्या अंतरंगात राहतो आहे म्हणूनच करू शकतो आहे. तो ह्या शरीरामधून निघून गेला तर मग राहिले काय? केवळ माझे निर्जीव शरीर राहील. प्रेत राहील.

ते सुद्धा थोड्या वेळासाठीच. एकदा तो निघून गेला म्हणजे मग सगळे संबंधित लोक, उरलेल्या प्रेताला लवकरात लवकर नष्ट करायच्या मागेच लागतील. प्रत्येक माणसाच्या बाबतीत हेच सत्य आहे. प्रत्येकाची हीच नियती आहे.

' देवाला काहीतरी द्या म्हणजे तो तुम्हाला काहीतरी देईल. जितके जास्त द्याल तितके जास्त परत मिळेल. तुमचे कल्याण होईल. नाही दिलेत तर त्याचा कोप होईल. तुमचे वाटोळे होईल.' असे सांगणारा कोणीही असला तरी तो आपल्याला फसवीत असतो असेच समजावे. हे सगळे आपल्या मनाचेच खेळ असतात. भ्रामक कल्पना असतात.

आणि मुळामधे मनाचे तसे खेळ असतात, तशा कल्पना असतात, म्हणूनच आपण कोणाही सांगणाऱ्याचे काहीही ऐकत असतो. तसे वागत असतो. त्याच्या नादी लागत असतो. त्याच्याविषयी आंधळेपणाने श्रद्धा बाळगतो.

शिर्डीचे **साईबाबा** आयुष्यभर अंगावर कफनी घालूनच वावरले. सगळे आयुष्य तसेच जगले आणि तसेच समाधिस्थ झाले.

त्यांनी कोणाकडूनही, कधीही, कशाचीही अपेक्षा केली नाही.
मग त्यांच्या पुतळ्याला सोन्याचा मुगुट, सोन्याचे अलंकार, सोन्याचे सिंहासन, सोन्याची ताटे आणि वाट्या कशासाठी वाहायच्या? त्याचा आपल्या एकूण समाजाला काय उपयोग आहे?
शिर्डीमधील साईसंस्थानाच्या खजिन्यात सतत जमा होणाऱ्या अशा संपत्तीचा, विश्वस्थ मंडळी ( जी राजकारणीही असतात ) कसा वापर करतात हे माहीत असूनही, दानी व्यक्ती असे का करतात? आपल्या धनाचा अशा प्रकारे अपव्यय का होऊ देतात?
साईबाबांच्या भक्ती आणि प्रेमापोटी, चार चार तास रांगेत उभे राहिल्यानंतरही, आपल्याला शांतपणे त्यांचे दर्शन घेता येत नाही. मनोभावे नमस्कार करता येत नाही. भराभरा कसेतरी हात जोडून, वाघ मागे लागला असल्यासारखे बाहेर जावेच लागते. नाही गेलात तर ढकलून बाहेर काढण्यात येते. परत त्यातही वर्गवारी आहेच.
तुम्ही ' संस्थानाला किती पैसे देणार ' आहात त्यावरती तुम्हाला ' साईबाबांचे दर्शन कसे घेता येईल ' ते ठरते.
तेथे सगळा बाजार झालेला आहे. मी सुमारे चौदा वर्षापूर्वी तेथे जाऊन हा सगळा अनुभव घेतलेला आहे.
मला तर ' पुजाऱ्यांच्या आणि तथाकथित स्वयंसेवकांच्या गराड्यात सापडलेले **साईबाबा** ' फारच केविलवाणे वाटत होते. हताश झाल्यासारखे वाटत होते. निराश झाल्यासारखे वाटत होते. समोर उभ्या असलेल्या आपल्या सर्व भक्तजनांना,

**' माझ्या प्रिय भक्तांनो, मला ह्यांच्या तावडीतून सोडवा हो ऽऽ.'**

अशी विनवणी करीत असल्यासारखे दिसत होते. त्यांना हे नक्कीच आवडत नसणार. पटत नसणार. पण ते तरी काय करतील? जे काही करायचे ते त्यांच्या भक्तजनांनीच केले पाहिजे.
माझे आपणा सर्वांना नम्रपणे सांगणे आहे की, असे कधीही करू नका.
आपण केलेल्या दानाचा समाजाला खरोखरच उपयोग होईल ह्याकडे लक्ष द्या.
' जो प्रामाणिक आहे, चांगल्या स्वभावाचा आहे, कष्ट करणारा आहे, काहीतरी चांगले काम करू इच्छितो आहे आणि ज्याला खरोखरच गरज आहे, त्याला यथाशक्ती मदत करा. अवश्य मदत करा. निरपेक्षपणे मदत करा. आपले कर्तव्य समजून मदत करा. आणि थेट मदत करा. म्हणजे ज्याला गरज आहे त्यालाच सरळ मदत करा. त्यामुळे तुमचा मदत करण्यामागचा, मूळ हेतू निश्चितपणे साध्य होईल.' तसे करणे म्हणजे साईबाबांच्या रूपातील परमेश्वराची पूजा करणेच आहे.
त्यामुळे साईबाबा निश्चितपणे आनंदित होतील. त्यांनाही आपल्या प्रेमाचे भरते येईल.
ते आपल्या अशा पूजेचा अत्यंत आनंदाने स्वीकार करतील. आपल्यावर प्रसन्न होतील. आपल्याला अनेक उत्तम आशिर्वादही देतील.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।। २७ ।।**
**शुभाशुभफलैरेवम् मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।**
**संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ।। २८ ।।**

हे कौंतेया ! तू जे करतोस, जे खातोस, जे हवन करतोस, जे दान करतोस, जे तप करतोस ते सर्व मला अर्पण करीत जा. अशा प्रकारे वागल्याने, कर्मे करूनही त्यांच्या बंधनातून तुझी सुटका होईल आणि कर्मफलाच्या संन्यासाने मुक्त झालेला तू माझ्याकडेच येऊन पोहोचशील.

**यत्करोषि –** ह्या शब्दामधे वर्ण, आश्रम, धर्म, कुटुंब, समाज, देश इत्यादी लोकव्यवहार सांभाळताना केलेली सर्व कर्मे तसेच परमेश्वराचे भजन, पूजन, मनन, चिंतन, ध्यान इत्यादी सर्व प्रकारची कर्मे अंतर्भूत होतात.

**यदश्नासि –** ह्या शब्दामधे आपल्या शरीराचा निर्वाह करण्यासाठी खाणे, पिणे, फिरणे, झोपणे, शारीरिक श्रम करणे इत्यादी सर्व प्रकारची कर्मे अंतर्भूत होतात.

**यज्जुहोषि –** ह्या शब्दामधे वेदानी सांगितलेले सर्व प्रकारचे यज्ञ, यजन, याजन, हवन इत्यादी सर्व प्रकारची शास्त्रानुसार केलेली कर्मे अंतर्भूत होतात.

**यत् ददासि –** ह्या शब्दामधे दान आणि त्यासंबंधी देश - काल - पात्र इत्यादींना अनुसरून करायची सर्व प्रकारची कर्मे अंतर्भूत होतात.

**यत्तपस्यसि –** ह्या शब्दामधे कायिक - वाचिक - मानसिक तप करण्याच्या हेतूने केलेली सर्व प्रकारची कर्मे अंतर्भूत होतात.
वरील सर्व प्रकारची कर्मे करताना, ' हे सर्वकाही मी करीत नसून, परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे घडून येत आहे. तो माझ्याकडून, त्याला जे करायचे आहे ते, सर्वकाही करवून घेतो आहे. माझे काहीच नाही. सर्व काही त्याचेच आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. माझ्या हातून जे काही घडून येत आहे ते, त्यालाच अर्पण करतो आहे. त्याने स्वीकार करावा.' अशीच भावना असली पाहिजे. अशी भावना बाळगून

केलेले कर्म हे निष्काम कर्मच होते. त्यामुळे त्या कर्माचे बंधन पडायचा प्रश्नच येणार नाही. जो साधक आयुष्यभर अशाच प्रकारे सतत कर्मे करीत राहील, तो सदैव मुक्तच राहणार आणि अखेरीस त्याला मोक्ष प्राप्ती होणार हे वेगळे सांगायला नको.

**समोऽहम् सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**

**ये भजन्ति तु माम् भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।। २९ ।।**

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**

**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।। ३० ।।**

**क्षिप्रम् भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिन् निगच्छति ।**

**कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ।। ३१ ।।**

मी सर्व भूतांना सारखा आहे. मला कोणीही अप्रिय नाही किंवा प्रियही नाही. तरीही, जे माझे भक्तीने भजन करतात ते माझ्यामधे व मी त्यांच्यामधे असतो. मोठा दुराचारी का असेना, जर तो मला अनन्यभावाने भजत असेल तर तो साधूच समजला पाहिजे. कारण त्याच्या बुद्धीचा चांगला निश्चय झालेला असतो. तो लवकरच धर्मात्मा होतो व नित्य शांती पावतो. हे कौंतेया ! तू असे निश्चित समज की, माझा भक्त कधीही नाश पावत नाही.

आई वडिलांना त्यांची सगळी लेकरे सारखीच असतात. ते सर्वांच्यावर सतत प्रेम करतात. त्यांची काळजी घेतात.

त्यांना खायला - प्यायला देतात. त्यांचे संगोपन करतात. संस्कार करतात. वाढवतात. जगामधे वावरायला सक्षम करतात.

वेळप्रसंगी शिक्षाही करतात. त्यांच्यासाठी कोणतेही मूल नावडते असूच शकत नाही.

असे असले तरीही जे मूल त्यांच्यावर सर्वात जास्त प्रेम करीत असेल, त्यांचा आदर करीत असेल, सन्मान करीत असेल, त्यांचे सांगणे ऐकत असेल आणि त्याप्रमाणे वागत असेल, ते मूल त्यांना इतर मुलांच्या तुलनेत जरा जास्त आवडत असते की नाही?

तुम्ही स्वतःच्या संदर्भामधे विचार करून पहा. म्हणजे तुम्हाला ह्या प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळेल.

तीच गोष्ट परमेश्वराच्या बाबतीतही सत्य आहे. आपले माता, पिता, बंधू, सखा, आजी, आजोबा वगैरे सगळे काही तोच आहे. म्हणून त्याला आपण सगळे एकसारखेच असणार आणि तरीही आपल्यापैकी अनन्य भावाने भक्ती करणारा असा जो कोणी असेल तो त्याला जरा अधिक प्रिय असणार. इतकेच नाही तर एखादा महापापी माणूस असला, तरीही तो सुद्धा पाप करायचे सोडून देऊन, मुक्ती मिळविण्यास पात्र व्हावा असेच त्याला वाटत असणार.

मग दैववशात् कर्मविपाक प्रक्रियेनुसार कोणत्यातरी जन्मामधे, कधीतरी त्याला उपरती झाली आणि तो सन्मार्गाविषयी विचार करायला लागला, त्या मार्गाला जाण्याचे प्रयत्न करायला लागला म्हणजे तो आपोआपच परमेश्वराचे चिंतन करायला लागतो. भजन - पूजन करायला लागतो. त्याच्या आचार आणि विचारामधे परिवर्तन घडायला लागते. तो अंतर्बाह्य शुद्ध व्हायला लागतो. मग त्याचा नाश होण्याचा प्रश्नच येत नाही. तो मुक्तच होणार.

महापापी वाल्याकोळ्यामधे परिवर्तन झाल्यावर तो वाल्मिकी झाला की नाही? इतिहासात अजरामर झाला की नाही? असो.

**माम् हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**

**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति पराङ् गतिम् ।। ३२ ।।**

**किम् पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**

**अनित्यमसुखम् लोकम् इमम् प्राप्य भजस्व माम् ।। ३३ ।।**

कारण, हे पार्था ! माझा आश्रय करून स्त्रिया, वैश्य व शूद्र किंवा जे पापयोनीचे असतील ते देखील परमगती पावतात. तर मग जे, पुण्यवान् ब्राह्मण तसेच क्षत्रिय, माझे भक्त असतील त्यांची गोष्टच कशाला पाहिजे? तू ह्या अनित्य व दुःखकारक मृत्युलोकी जन्मला आहेस म्हणून माझेच भजन कर.

म्हणून धर्म कोणताही असू दे! जात कोणतीही असू दे! पंथ कोणताही असू दे! ते महत्त्वाचे नाही. कारण ते कोणाच्याही हातात नसते. ते तर प्रत्येकाच्या पूर्व संचितावर अवलंबून असते. आपले पूर्वसंचित कोणालाही पुसून टाकता येत नाही किंवा बदलता येत नाही आणि ते भोगल्याशिवाय त्यामधून सुटका होऊ शकत नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, ' माणूस परमेश्वराची आठवण ठेवतो की नाही? त्याचे मनन, चिंतन करतो की नाही? त्याचे भजन पूजन करतो की नाही? आपले कर्तव्य निरपेक्षपणे, यथाशक्ती आणि यथामती पार पाडतो की नाही?' तसे करणे महत्त्वाचे आहे आणि आवश्यकही आहे. जन्म मरणाच्या चक्रामधून सुटण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही असे स्वतः परमेश्वरच सांगतो आहे ना! मग आपण सगळ्यानी सतत तसेच वागले पाहिजे.

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी माम् नमस्कुरु ।**

**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानम् मत्परायणः ।। ३४ ।।**

माझ्या ठिकाणी मन ठेव, माझा भक्त हो, माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर. ह्याप्रमाणे मत्परायण होऊन आपला योग चालविलास म्हणजे मलाच येऊन मिळशील.

**लहान मुलाला, आपल्या आई शिवाय चैन पडत नाही.**

तिच्या शिवाय बाकी सर्व काही व्यर्थ असते. असून नसल्यासारखेच असते. ती समोर असली तरच सर्व काही गोड लागते. नसली तर सर्व काही विषवत् वाटते. नकोसे वाटते.

**पाण्याबाहेर काढलेला मासा कशासाठी तडफडतो?**

त्याला लवकरात लवकर पाण्याकडे परत जायचे असते. पाण्याशिवाय तो जगूच शकत नाही.

**पाण्यात बुडणारा माणूस कशासाठी तडफडतो?**

त्याला लवकरात लवकर पाण्याबाहेर पडायचे असते. मोठा श्वास घ्यायचा असतो. हवेशिवाय तो जगूच शकत नाही.

आपली परमेश्वराविषयीची भावना ही ' त्या लहान मुलासारखीच अथवा पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखीच अथवा पाण्यात बुडणाऱ्या माणसासारखीच ' असायला हवी. एका परमेश्वराशिवाय सगळे काही व्यर्थ वाटायला लागले पाहिजे.

त्याच्या प्राप्तीसाठी आपल्या शरीराची, मनाची आणि बुद्धीची तडफड व्हायला हवी.

त्याच्या वाचून जगणे हे मरणासारखेच वाटायला लागले पाहिजे. ईश्वरप्राप्तीची आत्यंतिक तळमळ लागली पाहिजे.

जो अनन्य भावाने निरपेक्षपणे सतत परमेश्वराची भक्ती करीत असतो. ज्याला दुसरे काहीही नको असते, केवळ ईश्वरच हवा असतो, त्याला ईश्वर अवश्य दिसतो. स्वत:च्या अस्तित्वाची स्पष्ट जाणीव करून देतो. आपणहून कृपा करतो. त्याच्या जवळ पक्षपात नाही. थोडाही लहरीपणा नाही. त्याची कृपा सर्वांच्यावर असते आणि एकसारखीच असते.

ज्याचे अंत:करण इतर सर्व गोष्टींच्या मधून निवृत्त होऊन केवळ ईश्वरासाठी तळमळायला लागते, आत्मदर्शनासाठी तळमळायला लागते, बेचैन होते, त्यालाच ईश्वराचे दर्शन होते, आणि तसे दर्शन झाले म्हणजे मग कसलीही शंका शिल्लक राहात नाही! सर्व चिंता नाहीशा होतात! मग सगळी भीती नष्ट होते! हातून आपोआप निष्काम कर्म घडून येत राहाते. मग शिल्लक राहतो, तो फक्त आनंद. केवळ आनंद. निखळ आनंद. आनंदाच्या शुद्ध स्वरुपाचा प्रत्यक्ष अनुभव येतो!

असे झाले म्हणजे मग, **'आनंदाचे डोही, आनंद तरंग । आनंद ते अंग, आनंदाचे ।'** ह्याचा खरा अर्थ काय ते समजेल! त्या अर्थाचा प्रत्यक्ष अनुभव येईल. तो अनुभव घेऊन आपले जीवन धन्य होईल! कृतार्थ होईल! सार्थकी लागेल!

श्रीकृष्णाच्या ' अर्जुना ऽऽ! ह्याप्रमाणे मत्परायण होऊन आपला योग चालविलास म्हणजे तू मलाच येऊन मिळशील.' ह्या वाक्याचा असा अर्थ आहे. येथे मला आपल्याला दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगायच्या आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे गीतेचे वाचन अथवा पठण करीत असताना, ह्या नवव्या अध्यायाचा, हा शेवटचा श्लोक एकापाठोपाठ तीन वेळा म्हणायची पद्धत आहे. कारण त्यामधे भगवंताने आपल्या सर्वांना अत्यंत महत्त्वाचा असा संदेश दिला आहे.

हाच श्लोक, थोड्या फरकाने, अठराव्या अध्यायाच्या अखेरीस परत आलेला आहे. त्यावेळी त्याच्यावर अधिक चर्चा करूया. असो.

दुसरी गोष्ट म्हणजे ' हा अध्याय गीतेच्या मध्यावर आहे ' असे आचार्य विनोबांनी सांगितले आहे. परंतु ह्यापुढील दहावा अध्याय सुद्धा गीतेच्या मध्यावरच आहे असे मला वाटते. त्यामागचे कारण काय ते मी आपल्याला सांगतो. आपण त्यावर विचार करा.

गीता ही **सम अध्यायी** म्हणजे अठरा अध्यायांची आहे. त्यामुळे नऊ आणि दहा हे दोन्ही अध्याय गीतेच्या मध्यावरच आहेत. नववा अध्याय म्हणजे गीतेच्या पूर्वार्धाची अखेर आहे आणि दहावा अध्याय म्हणजे गीतेच्या उत्तरार्धाची सुरवात आहे. असो.

**येथे नववा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

येथे अर्धी गीता सांगून झाली आहे.

ह्या अध्यायामधे सातव्या अध्यायात सुरू झालेला ' विज्ञानासहित ज्ञानाचा ' विषय सांगून झालेला आहे.

परब्रह्म परमात्मा परमेश्वर कसा आहे? त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे?

सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे आणि तरीही त्यापासून तो कसा वेगळा आहे? ते सविस्तर सांगून झाले.

काय काय केले असता तो प्राप्त होतो? कोणाला प्राप्त होऊ शकतो आणि कोणाला होऊ शकत नाही? त्याची भक्ती करायची म्हणजे काय करायचे? कशा प्रकारे करायचे? तेही सांगून झाले.

आता पुढील अध्यायामधे भगवान पुढे काय सांगतात ते आपण पाहूया.

अस्तु!!!!!!!!

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## अध्याय दहावा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या दहाव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
मागील अध्यायामधे, ' विज्ञानासहित ज्ञानाचा ' विषय सांगून झालेला आहे.
परब्रह्म परमात्मा परमेश्वर कसा आहे? त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे?
सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे आणि तरीही त्यापासून तो कसा वेगळा आहे, ते सविस्तर सांगून झाले.
त्याला प्राप्त करून घेण्याचे उपाय कोणते? काय काय केले असता तो प्राप्त होतो?
तो कोणाला प्राप्त होऊ शकतो आणि कोणाला होऊ शकत नाही? त्याच्या व्यक्त स्वरूपाची उपासना करायची म्हणजे काय करायचे? त्याच्या व्यक्त स्वरूपाची भक्ती कशी करायची? ते ही सविस्तरपणे सांगून झाले.
परमेश्वरप्राप्तीच्या राजमार्गाचे वर्णन आणि विवेचन ह्या अध्यायातही पुढे चालले आहे. परमेश्वराची शक्ती आणि तिचा प्रभाव अगम्य का असतो आणि त्या शक्तीची व्याप्ती कोठपर्यंत पसरलेली आहे, त्याविषयी सांगायला सुरवात होते आहे.
दहाव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे. तो अर्जुनाला सांगतो आहे की,

**श्रीभगवानुवाच :**
**भूय एव महाबाहो शृणु मे परमम् वच : ।**
**यत्तेऽहम् प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।। १ ।।**

हे महाबाहो ! माझ्या भाषणाने संतुष्ट होणाऱ्या तुला, मी आणखी एक उत्तम गोष्ट, तुझ्या हितार्थ सांगतो आहे ती ऐक.
**प्रीयमाणाय** — माझ्याविषयी आत्यंतिक प्रेम असणारा.
गीतेमधे अर्जुनाला हाक मारताना, श्रीकृष्णाने अनेक उत्तमोत्तम विशेषणे वापरलेली आहेत आणि ती सगळी विशेषणे सत्य आहेत म्हणूनच वापरलेली आहेत. अर्जुन होताच तसा. त्याचे श्रीकृष्णावर खरोखरच कमालीचे प्रेम होते. भक्ती होती, निष्ठा होती.
त्याची इच्छा म्हणजे अर्जुनासाठी शेवटचा शब्द होता. ह्या वेळचे त्याचे ' स्वजनांच्या विषयीच्या मोहाने ग्रासले जाणे.' हा अपवाद होता. आणि तरीही तो श्रीकृष्णाचे बोलणे पूर्णपणे एकाग्र होऊन, लक्षपूर्वक ऐकतो आहे. त्यावर विचार करतो आहे.
त्याच्या मनामधे आलेल्या सर्व शंका विचारून, त्यांचे उत्तर द्यायला सांगतो आहे.
जो शिष्य गुरूच्या मुखामधून निघालेला प्रत्येक शब्द लक्षपूर्वक ऐकत असेल, त्यावर विचार करीत असेल, आपल्या शंका विचारीत असेल आणि गुरूच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असेल, त्यासाठी सतत साधना करीत असेल, तो गुरूलाही अत्यंत प्रिय असणार, त्याचा आवडता असणार, लाडका असणार ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही.
ती एक नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. भगवान शंकर, द्रोणाचार्य, कृपाचार्य इत्यादी अनेकांची, शिष्य म्हणून अर्जुनाविषयी अशीच भावना होती. तो **' शिष्योत्तम '** होता. महाभारतात ह्याविषयीच्या अनेक नोंदी आहेत. श्रीकृष्णाचा तर तो अत्यंत - अत्यंत आवडता होता. जणूकाही त्याचा **' बहिश्चर प्राण '** होता असे म्हटले तरीही चालेल. असो.

**न मे विदु: सुरगणा: प्रभवम् न महर्षय: ।**
**अहमादिर्हि देवानाम् महर्षीणाञ् च सर्वश: ।। २ ।।**
**यो मामजमनादिञ् च वेत्ति लोकमहेश्वरम् ।**
**असंमूढ: स मर्त्येषु सर्वपापै: प्रमुच्यते ।। ३ ।।**

माझी उत्पत्ती देवगणांना आणि महर्षींनाही कळत नाही. कारण देवांचे आणि महर्षींचे सर्व प्रकारे मीच आदिकरण आहे. मी सर्व लोकांचा मोठा ईश्वर असून मला जन्म व आदि नाही असे जो जाणतो तोच, मनुष्यांमधील ज्ञानवान पुरुष, मोहविरहित होऊन सर्व पापापासून मुक्त होतो.
**प्रभवम्** ह्या शब्दाचा अर्थ उत्पत्ती असा आहे.
परंतु येथे **' अनादि '** म्हणजे ज्याला सुरवात नाही, **' अनंत '** म्हणजे ज्याला शेवट नाही आणि **' अजन्मा '** म्हणजे ज्याला जन्म नाही, अशा परमेश्वराच्या बाबतीत तो अर्थ योग्य होणार नाही. मूळारंभी हे विश्व अस्तित्वातच नव्हते.
तेव्हा परब्रह्म परमात्मा एकटाच होता. त्याच्या शिवाय, दुसरे म्हणता येईल असे, काहीही नव्हते.
त्याला जेव्हां ' एकाचे अनेक होण्याची ' इच्छा झाली, त्यानंतर त्याच्या शक्तीने आणि आधारानेच सगळे विश्व अस्तित्वात आले.

म्हणून, ह्या सर्व विश्वाची निर्मिती, पालन आणि विनाश करण्यासाठी परमेश्वर जे निरनिराळे अवतार घेत असतो आणि वेगवेगळ्या हेतूने, वेगवेगळ्या कालामधे, वेगवेगळ्या रूपामधे प्रगट होत असतो, ती त्याची —

**' अव्यक्ताचे व्यक्त होण्याची क्षमता अथवा लीला,'** म्हणजेच **प्रभवम्** होय. असाच अर्थ समजणे सुसंगत ठरेल. योग्य ठरेल.

**सुरगणाः** म्हणजे सर्व देवदेवतांचे समुदाय.

ह्या समुदायांमधे ' रुद्र, वसु, आदित्य, प्रजापति, मरुद्गण, अश्विनीकुमार, इंद्र ' इत्यादी सगळे देवगण समाविष्ट होतात.

**महर्षयः** म्हणजे विख्यात असे महर्षी. ऋषी अनेक आहेत. त्यांच्यामधे पुढील पातळी गाठलेले असे जे पुरुष ते **महर्षी.**

हे ही अनेक आहेत. अशा सर्व महर्षींच्यामध्येही महत्त्वाचे आणि मुख्य असे सात महर्षी आहेत. त्यांच्यापासूनच प्रजेचा विस्तार, उत्कर्ष झाला आणि धर्मव्यवस्था यथायोग्यपणे कार्यरत झाली अशी सनातन धर्मशास्त्राची मान्यता आहे.

आपण **ऋषी, मुनी, सिद्ध, महर्षी** इत्यादी संज्ञांचा उल्लेख बरेच वेळा ऐकला आहे.

ह्या संज्ञांचा नक्की अर्थ काय असेल? ह्यासारख्या संबोधनांना विशेष अर्थ असतो.

मी तो अर्थ समजून घेण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला, शक्य झाले तितके वाचन केले, वेगवेगळे संदर्भ पाहिले, इतरांचे बरोबर चर्चा केली. पण अजूनही मला निश्चित अर्थ समजलेला नाही. माझा अजूनही गोंधळ होतो.

तरीही अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. तो अर्थ बरोबर असेलच असा माझा दावा नाही. माझा तेवढा अधिकारही नाही.

केवळ, ह्या विषयी मला काय वाटते ते सांगतो.

**साधक** — मोक्षप्राप्तीच्या हेतूने, निवडलेल्या कोणत्याही विशिष्ट मार्गाने, अत्यंत प्रामाणिकपणे सतत प्रयत्न करणारा असा प्रत्येक मनुष्य.

**सिद्ध** — मोक्षप्राप्तीच्या मार्गामधे दीर्घकाळ वाटचाल करून, साधना केल्यामुळे इहलौकिक आणि पारलौकिक अशा विविध सिद्धी प्राप्त झालेला, तसेच धर्म, ज्ञान, ऐश्वर्य आणि वैराग्य इत्यादी गुणांनी परिपूर्ण असलेला मनुष्य.

**योगी** — अष्टांगयोग, हठयोग इत्यादींची साधना करून त्यामधे प्रभुत्व मिळविलेला, सिद्धी प्राप्त करून घेतलेला असा मनुष्य. आपल्या शरीरावर आणि मनावर पूर्णपणे ताबा मिळविलेला असा मनुष्य.

**ऋषी** — एका प्राण्याच्या आत्म्याचे इतर प्राण्यांच्या आत्म्यांच्याबरोबर, तसेच परमात्म्याबरोबर जे संबंध आहेत ते शोधणारा, आध्यात्मिक नियमांचा शोध लावणारा, वैदिक मंत्रांची रचना करणारा आणि त्यावर अधिकारवाणीने भाष्य करणारा असा विद्या संपन्न, ज्ञान संपन्न मनुष्य.

**महर्षी** — दीर्घायु, मंत्रकर्ता, ऐश्वर्यवान, विद्या संपन्न, ज्ञान संपन्न, दिव्यदृष्टीने युक्त, परमेश्वराचा साक्षात्कार करून देऊ शकणारा आणि गोत्र चालवू शकणारा असा, अष्ट गुणांनी परिपूर्ण असणारा मनुष्य. ही ऋषी ह्या संज्ञेच्या पुढची पायरी आहे. पुढची पातळी आहे. **( महानतम ऋषी इति महर्षयः। )**

**मुनी** — स्थूल आणि सूक्ष्म जगतामधील विविध सिद्धी प्राप्त झालेला असा सिद्ध पुरुष. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर ह्यांच्यापासून संपूर्णपणे मुक्त झालेला असा, परमेश्वराच्या स्वरूपाचे आणि वेदशास्त्रांचे सतत मनन करणारा मनुष्य.

**देवर्षी** — देवलोकामधे वास्तव्य करू शकणे, भूत, वर्तमान आणि भविष्य ह्या तीनही काळांचे ज्ञान असणे, सदैव केवळ सत्य बोलणे, केवळ स्वतःच्या इच्छेनेच जगाशी संबंधित असणे, आपल्या ज्ञान, तपश्चर्या, पराक्रम इत्यादींच्या योगाने सर्व जगामधे प्रसिद्ध असणे, मंत्रांचा उद्गाता असणे, प्राप्त झालेल्या सिद्धींच्यायोगे सर्व लोकांत भ्रमण करू शकणे, इत्यादी गुणांनी युक्त असलेला असा मनुष्य.

**राजर्षी** — स्वतः राजपदावर असूनही, उत्तम पद्धतीने राज्यकारभार करीत असूनही, स्वतः न्यायाने आणि नीतीने वागत असूनही, प्रजेचे सर्वतोपरी पालन करीत असूनही, मनाने राजपदापासून पूर्णपणे मुक्त असलेला, सर्व विकारांवर विजय मिळविलेला, विकारांच्या आधीन न होणारा आणि केवळ कर्तव्य म्हणून राज्य करीत असलेला असा राजा.

**ब्रह्मर्षी** — धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रामधील सर्वोच्च पातळी. ज्याला ब्रह्मज्ञान झालेले आहे म्हणजेच ज्याने ब्रह्म म्हणजे काय ते पूर्णपणे जाणले आहे आणि प्रत्यक्ष अनुभविले आहे असा मनुष्य. स्वतःच ब्रह्मरूप असलेला, ज्याच्यामधे ब्रह्मतत्त्वाचे यथायोग्य प्रगटीकरण झाले आहे असे म्हणता येईल असा मनुष्य.

ह्या सगळ्या शब्दांचे अर्थ समजून घेणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्यामुळे, यापुढील श्लोकांमधे ज्या विभूति सांगितलेल्या आहेत, त्यांचे **माहात्म्य आणि महत्त्व** समजून घ्यायला मदत होईल. असो.

चार अब्ज बत्तीस कोटी मानवी वर्षे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. ह्यालाच **' कल्प '** असे म्हणतात.

ब्रह्मदेवाच्या एका दिवसामधे, म्हणजेच एका कल्पामधे, चौदा मनू होतात.

म्हणजे अंदाजे तीस कोटी, सदुसष्ट लक्ष, वीस हजार मानवी वर्षे म्हणजे एक **मन्वंतर** होते असे म्हणतात.
हे गणित फारच गुंतागुंतीचे आहे. अनेक वेळा वाचून झाल्यावरही माझा गोंधळच होत होता. म्हणून मी तो प्रयत्न थांबविला.
तसेच प्रत्येक मन्वंतरामधले मनू, देवगण आणि सप्तर्षी निरनिराळे असतात, असेही सांगितलेले आहे.
हे सर्व मनू, देवगण आणि महर्षीच, त्यांना नेमून दिलेल्या विविध कार्यक्षेत्रानुसार, सर्व विश्वाच्या निर्मितीचे कार्य सतत करीत असतात.
परंतु त्यांनाही परमेश्वराच्या उत्पत्तीविषयी काहीही सांगता येत नाही. त्यांनाही ते माहीत नसते. ह्याचे कारण उघड आहे.
आपले आई-वडील केव्हा जन्माला आले हे कोणालाही निश्चितपणाने सांगता येणार नाही.
अगदी आजच्या काळामधे प्रत्येकाला अधिकृतपणे **<u>जन्माचा दाखला</u>** मिळत असला **( Birth Certificate )** तरीही सांगता येणार नाही. एखादा माणूस जेव्हा जन्माला येतो, तेव्हा त्याची मुले तेथे हजर असतात का? नसतात.
कारण त्यावेळी ती अस्तित्वातच नसतात. त्यांचा जन्म झालेलाच नसतो.
काही काळाने जेव्हा तो माणूस मोठा होतो आणि आपल्या मुलांना जन्माला घालतो, तेव्हाच ती अस्तित्वात येतात.
त्यामुळे आपल्या वडिलांचा जन्म पाहणे आणि त्याविषयी अधिकृतपणे बोलणे कोणालाही शक्य होणार नाही.
फार तर, त्यांच्या जन्माच्या दाखल्याचा आधार घेऊन, काही अंदाज करता येऊ शकेल इतकेच काय ते.
तो अंदाज बरोबर असेलच असे सांगता येणार नाही. तशीच गोष्ट येथेही आहे.
सर्व देवगण आणि ऋषीगण ह्यांना परमेश्वरानेच जन्माला घातले असल्यामुळे खुद्द परमेश्वराच्या उत्पत्तीविषयी ते काय सांगणार?
ते **<u>' नेती नेती '</u>** असेच म्हणणार आणि मौनच पाळणार.
**देवमासा** कितीही मोठा असला आणि पाण्यामधे वेगाने हालचाली करीत मुक्तपणे सर्वत्र संचार करीत असला तरी,
' समुद्र केव्हा निर्माण झाला आणि त्याचा विस्तार किती आहे,' ह्याविषयी तो काहीही सांगू शकणार नाही.
**गरुड** कितीही मोठा असला आणि आकाशात अत्यंत वेगाने उडू शकत असला तरी,
' आकाश केव्हा निर्माण झाले आणि त्याचा विस्तार कोठपर्यंत झालेला आहे,' हे तो सांगू शकणार नाही.
येथेही तसाच प्रकार आहे. परमेश्वराचे स्वरूप जाणणे खरोखरच फार कठीण आहे.
असे असले तरीही, जो साधक आपल्या शरीर, इंद्रिये आणि मनावर पूर्णपणे ताबा मिळवून ऐहिक भोगांच्याविषयी उदासीन राहतो, त्यांच्या संयोगाने आनंदित होत नाही आणि वियोगाने दु:खितही होत नाही, साधनेच्या योगाने आत्मज्ञान प्राप्त करून घेतो, परब्रह्म परमात्मा हा **<u>' अनादि, अनंत, अजर, अमर '</u>** असाच आहे असे जाणून त्यावर दृढ विश्वास ठेवतो आणि सर्व भूतमात्रांचे ठायी त्यालाच पाहतो, सर्वांचे बरोबर समत्वबुद्धीने वागतो, तो नेहमी आपले प्रत्येक कर्म कर्तव्य म्हणूनच करीत राहतो.
कधीही कोणत्याही प्रकारे पाप करीत नाही. करू शकत नाही. ह्याचा परिणाम असा होतो की, तो सर्व पापांच्यापासून मुक्त होतो.

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यन् दमः शमः ।**
**सुखम् दुःखम् भवोऽभावः भयं चाभयमेव च ।। ४ ।।**
**अहिंसा समता तुष्टिः तपो दानम् यशोऽयशः ।**
**भवन्ति भावा भूतानाम् मत्त एव पृथग्विधाः ।। ५ ।।**

बुद्धी, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुख, दु:ख, उद्भव, विनाश, तसेच भय आणि अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अपयश इत्यादी - प्राण्यांचे अनेक प्रकारचे भाव माझ्यापासूनच होतात.
हे दोन श्लोक म्हणजे एकच वाक्य आहे. येथे सर्व प्राणिमात्रांचे जे वेगवेगळे भाव **( स्वभाव )** सांगितलेले आहेत, ते फार महत्त्वाचे आहेत. कारण वेगवेगळ्या प्राणिमात्रांच्यामधे, त्यांच्या प्रकृतीला अनुसरून, हेच भाव कमीजास्त प्रमाणामधे दिसून येत असतात. आपण त्यांचा अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करूया.

**<u>बुद्धी</u>** — कर्तव्य आणि अकर्तव्य, योग्य आणि अयोग्य, नैतिक आणि अनैतिक ह्याविषयी विचारपूर्वक निर्णय करण्याची प्रवृत्ती आणि क्षमता.

**<u>ज्ञान</u>** — विश्वामधे अस्तित्वात असलेल्या सर्व नाशवंत पदार्थांच्यामधे, एकच अविनाशी शक्ती भरून राहिलेली आहे आणि तिच्या आधारानेच सर्व विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय होत असतो, हे समजणे आणि ह्याची अनुभूती येणे.

**<u>असंमोह</u>** — सर्व इंद्रियजनित भोग हे क्षणिक, अनित्य आणि अंतिमत: दु:खकारक असतात हे समजून त्यांच्याविषयी मोहित न होणे. उदासीन राहणे.

**<u>क्षमा</u>** — इतरांच्याकडून झालेल्या अपराधांविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करणे. त्यांना शासन करण्याची शक्ती असूनही तसे न करणे. त्यांचा राग अथवा तिरस्कार न करता, त्यांना सुधारण्याची संधी देणे.

**सत्य** – इंद्रिय आणि मनाच्याद्वारे, जी गोष्ट जशी पाहिली, ऐकली आणि अनुभवली असेल, ती इतरांना समजावण्याच्या हेतूने योग्य शब्दांचा वापर करून, कोणताही बदल न करता, जशीच्या तशीच सांगणे.

**दम** – आपल्या सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवणे आणि त्यांचे यथायोग्य नियमन करणे.

**शम** – आपल्या मनाला ताब्यात ठेवणे. तसा निग्रह करून मनाचे नियमन करणे.

**सुख** – प्रिय वस्तूच्या किंवा प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि हवीशी वाटणारी अशी अनुकूल संवेदना.

**दु:ख** – अप्रिय वस्तूच्या किंवा प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि नकोशी वाटणारी अशी प्रतिकूल संवेदना.

**उद्भव** – उत्पन्न होणे. अस्तित्वात येणे.

**विनाश** – नष्ट होणे. नाहीसे होणे. अंत होणे.

**भय** – कोणत्याही प्रकारची हानी किंवा नुकसान झाले असता किंवा होऊ घातले असता, तसेच मृत्यूच्या विचाराने, मनामधे उत्पन्न होणारा भाव.

**अभय** – विश्वामधे सर्वत्र एकच अविनाशी परमात्मा भरून राहिला आहे ह्याचा प्रत्यय आल्यामुळे अथवा अन्य कोणत्यातरी कारणाने, भीतीचा अभाव होणे.

**अहिंसा** – कधीही कोणालाही, शारिरीक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारांनी इजा न करणे. तसा विचारही न करणे.

**समता** – सर्व भूतमात्रांच्याकडे समदृष्टीने पाहणे आणि सारखेपणानेच वागणे.

**संतोष** – असलेल्या परिस्थितीत आनंदी राहणे. समाधानी राहणे. अहंकार नसणे. अट्टाहास नसणे. मी पणा नसणे.

**तप** – एखादे निश्चित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारे, कोणत्याही परिस्थितीत, आटोकाट प्रयत्न करीत राहणे.

**दान** – जे आपण स्वत: कष्ट करून मिळविलेले आहे ते इतरांच्या कल्याणासाठी, कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता, जाहिरात न करता, निरपेक्षपणे देणे.

**यश** – ठरविलेले कार्य योग्य मार्गाने, योग्य प्रकारे पार पाडणे आणि त्या योगे कार्यामागील हेतु साध्य होणे.

**अपयश** – ठरविलेले कार्य योग्य मार्गाने, योग्य प्रकारे पार पाडता न येणे आणि त्या योगे कार्यामागील हेतु साध्य न होणे.

हे सर्व प्रकारचे भाव परब्रह्म परमात्म्यापासूनच, त्याच्या सत्तेने, इच्छेने, सहाय्याने आणि शक्तीनेच निर्माण होत असतात. ह्या सर्व भावांच्या चौकटीत आणि त्यांच्या आधारानेच सर्व प्राणिमात्र आपापले व्यवहार करतात.

**महर्षय: सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।**
**मद्भावा मानसा जाता: येषां लोक इमा: प्रजा: ।। ६ ।।**
**एताम् विभूतिञ् योगञ् च मम यो वेत्ति तत्वत: ।**
**सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशय: ।। ७ ।।**

सात महर्षी, त्यापूर्वीचे चार, तसेच ज्यांच्यापासून ह्या लोकात ही प्रजा निर्माण झाली ते चौदा मनु हे माझेच मानस भाव होत.
माझा हा विस्तार आणि तो करण्याचे सामर्थ्य ह्यामधील तत्त्व जो जाणतो त्याला स्थिर योग प्राप्त होतो ह्यात संशय नाही.
वरील सहाव्या श्लोकाच्या अर्थाविषयी विविध मते मांडली गेलेली आहेत.
सात महर्षी कोणते? त्यापूर्वीचे चार कोण? महर्षी की मनु? महर्षी असतील तर कोणते? मनु असतील तर कोणते?
जर चारच मनु परमेश्वराचे मानस भाव असतील तर मग उरलेल्या दहा मनूंची काय व्यवस्था लावायची?
ते परमेश्वराचे मानस भाव नाहीत काय? येथे परमेश्वराचे एकूण मानस भाव किती? सात, अकरा की पंचवीस?
वेगवेगळ्या ग्रंथांमधे, ह्या प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे वाचायला मिळतात.
खुद्द ज्ञानेश्वरीमधे, सृष्टीची सगळी घडामोड व्यवस्थितपणे चालावी म्हणून परमेश्वराने, ' कश्यपादि सात ऋषी आणि चौदा मनूंच्यापैकी पहिले चार मनु असे अकराजण ' निर्माण केले आणि नंतर त्या अकराजणांनी अष्ट लोकपाल आणि विविध लोक निर्माण केले, असे सांगितलेले आहे. हे विधान अनेक विद्वानांना मान्य नाही. वाचताना माझा फार गोंधळ व्हायला लागला.
काही एक निष्कर्ष काढणे अशक्य झाले. माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाचे दुसरे काय होणार म्हणा!
तरीही बहुमताने जे प्रतिपादन केले गेले आहे ते पुढे देत आहे.
सध्या जे मन्वंतर चालू आहे, त्याचे नांव **' वैवस्वत मन्वंतर '** असे आहे.
जेव्हा भगवंतांनी अर्जुनाला गीता सांगितली तेव्हा देखील हेच मन्वंतर चालू होते.

ह्या मन्वंतरामधले जे सात महर्षी सांगितलेले आहेत, त्यांची नांवे महाभारताच्या शांतिपर्वामधील नारायणीयोपाख्यानात दिलेली आहेत.
ती नांवे **' मरीचि, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ '** ही आहेत.
त्यांच्या पूर्वीचे चार महर्षी कोणते ह्याविषयी बराच वाद आहे.
तरीही, ' कल्प सुरू होण्यापूर्वी जे पहिले चार महर्षी निर्माण झाले आणि ज्यांच्या पासून पुढे कल्पामधील पहिले म्हणजे **स्वायंभुव मन्वंतर** सुरू झाले, ते त्यांच्या पूर्वीचे चार होत. **' सनक, सनन्दन, सनातन आणि सनत्कुमार '** ही त्या महर्षींची नांवे आहेत.' हे विधान आणि नांवे बहुतेक विद्वानांना मान्य आहेत.
सध्या जो **कल्प** चालू आहे त्यामधील चौदा मनूंची नांवे सांगितलेली आहेत. ती नांवे —
**' स्वायम्भुव, स्वारोचिष, औत्तमी, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, दक्षसावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि व इंद्रसावर्णि '** अशी आहेत.
ह्यांपैकी पहिले सहा मनु होऊन गेलेले असून, सध्या सातवा **' वैवस्वत '** मनु चालू आहे. ह्यापुढील सात मनु अजून व्हायचे आहेत.
ते झाल्यावर सध्याचा कल्प म्हणजेच ब्रह्मदेवाचा **दिवस** पूर्ण होईल आणि त्याची **रात्र** सुरू होईल. असो.
तात्पर्य सांगायचे म्हणजे, हे **सात महर्षी**, त्यापूर्वीचे **चार महर्षी** आणि **चौदा मनू** हे परमेश्वरापासूनच निर्माण झालेले आहेत आणि त्यांच्यापासूनच पुढे लोकपाल, विविध लोक आणि सर्व प्रजा निर्माण झालेली आहे.
परमेश्वराची ही शक्ती जो तत्त्वत: जाणतो आणि मानतो, तो परमेश्वराचा परम भक्त होतो, अनन्य भक्त होतो, अविचल भक्त होतो, भक्तियोगाचे दृढ आचरण करतो.

**अहम् सर्वस्य प्रभवः मत्तः सर्वम् प्रवर्तते ।**
**इति मत्वा भजन्ते माम् बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥**
**मच्चित्ता मद्गतप्राणाः बोधयन्तः परस्परम् ।**
**कथयन्तश्च माम् नित्यम् तुष्यन्ति च रमन्ति च ॥ ९ ॥**
**तेषाम् सततयुक्तानाम् भजताम् प्रीतिपूर्वकम् ।**
**ददामि बुद्धियोगन् तम् येन मामुपयान्ति ते ॥ १० ॥**
**तेषामेवानुकंपार्थम् अहमज्ञानजन् तमः ।**
**नाशयाम्यात्मभावस्थः ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥**

मीच सर्वांचे उत्पत्तिस्थान असून माझ्यापासूनच सर्व जगत कर्म करीत आहे हे जाणून शहाणे पुरुष भावयुक्त होऊन मला भजत असतात. माझ्या ठिकाणी चित्त लावून व माझ्या ठायी प्राण ठेवून, एकमेकाला बोध करीत व माझ्या कथा सांगत त्यातच रममाण असतात. याप्रमाणे नेहमी समाधानाने राहून, प्रीतिपूर्वक मला भजणाऱ्या लोकांस, ते मलाच येऊन पोहोचतील असा समत्व बुद्धीचा योग मीच देत असतो आणि त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठीच मी त्यांच्या अंत:करणात शिरून, तेजस्वी अशा ज्ञानदीपाने अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करतो.
विज्ञान असे सांगते की, ' महास्फोट होण्यापूर्वी काहीही अस्तित्वात नव्हते.'
**( Before the Big Bang, nothing was existing. OR in other words, only nothing was existing. )**
फक्त अनाकलनीय अशी प्रचंड उर्जा, अत्यंत अनाकलनीय स्वरूपात होती.
कदाचित तेच विश्व निर्मितीचे मूलद्रव्य **( Raw material )** असू शकेल.
यापुढे जाऊन विज्ञान असे सांगते की, महास्फोटानंतर त्या मूलद्रव्याचा किंवा उर्जाशक्तीचा एका विशिष्ट पद्धतीने, योग्य नियोजनाने आणि क्रमाक्रमाने विस्तार होत आलेला असून यापुढेही एका विशिष्ट पातळीपर्यंत असाच विस्तार होत राहील.
**( Perfectly Planned Expansion )**
त्या विस्ताराचा क्रम सोडून, नियोजन सोडून आणि पद्धत बदलून अनाहुतपणे, उपटसुंभासारखे मधेच काहीतरी निर्माण झालेले नाही आणि होणारही नाही. सर्व ब्रह्मांडाचे व्यवहार विशिष्ट नियमांचे काटेकोरपणे पालन करून, विशिष्ट पद्धतीने आणि विशिष्ट वेळेत, गेली अब्जावधी वर्षे बिनचूकपणे चाललेले आहेत. ह्याचा अर्थ ते घडवून आणणारा कोणीतरी आहे आणि तो माणसाच्या तुलनेत अपरिमित सामर्थ्यशाली आहे ह्यामधे संशय नाही. त्यालाच **ईश्वर** असे मानतात.
अगदी जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञसुद्धा परमेश्वराचे अस्तित्व मान्य करतात.

आपापल्या परीने त्याचा शोध घ्यायचा सतत प्रयत्न करीत असतात.
त्यांना **' परमेश्वराचा शोध घ्यायची ही जिज्ञासा, प्रेरणा आणि बुद्धिमत्ता '** त्यांच्या अंतरंगामधे असलेला परमेश्वरच देत असतो.
ते देवळात किंवा चर्चमधे अथवा मशिदीत जाऊन वंदन, पूजन, भजन, अर्चन करीत नसतीलही कदाचित्. असल्या बाह्य उपचारांवर त्यांचा जराही विश्वास नसेल. परंतु ते आयुष्यभर जे काही करीत असतात ती भक्तीच असते.
परमेश्वराविषयी कुतुहल वाटल्यामुळे आणि त्याला जाणून घ्यायची तीव्र इच्छा निर्माण झाल्यामुळे, कोणत्या ना कोणत्या स्वरूपामधे, सतत त्याचेच मनन, चिंतन, अध्ययन करीत असतात.
मागे सातव्या अध्यायामधे श्रीकृष्णाने सांगितलेल्या, **' आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी '** अशा चार प्रकारच्या भक्तांच्यापैकी **जिज्ञासु भक्त** म्हणजे हीच बुद्धिमान आणि विद्वान शास्त्रज्ञ मंडळी होत.
मार्ग आधुनिक विज्ञानाचा असला तरीही, त्याचे अंतिम ध्येय हे विश्वाच्या निर्मितीच्या मूळ कारणाचा शोध घेणे हेच आहे.
त्यालाच **ज्ञान** असे म्हणतात आणि ते मूळ कारण शोधण्याचा प्रयत्न करीत असताना, जे विविध शोध लागतात किंवा लावले जातात त्यांना **विज्ञान** असे म्हणतात. असो.
श्रीकृष्णाच्याकडून हे सगळे ऐकल्यावर अर्जुनाला परत प्रश्न पडायला लागले.
ह्यापूर्वी अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ, ज्ञानी आणि मान्यवर अशा व्यक्तींच्या तोंडून त्याने श्रीकृष्णाविषयी अशाच प्रकारचे वर्णन ऐकलेले होते. परंतु त्याचा त्यावर फारसा विश्वास नव्हता. श्रीकृष्ण हा आपला बंधू, मित्र, हितचिंतक आणि मार्गदर्शक आहे असेच तो समजत होता. पुढील अध्यायात ह्याची कबुली त्याने अत्यंत स्पष्टपणे दिलेली आहे. असो.
' आपल्याला जो माणूस मनापासून आवडतो, त्याचे वर्णन इतरांच्यापुढे करताना, सर्वांच्याकडूनच जरा अतिरेक केला जातो.
त्याच्यामधे असलेले आणि नसलेले असे अनेक गुण चिकटविले जातात आणि त्यांचे फार प्रभावीपणे वर्णन केले जाते.'
तो मनुष्य स्वभाव आहे. आपल्या घरातलेच एक साधे सोपे उदाहरण घ्या.
येथे बसलेल्यांच्यापैकी, बहुसंख्य आजोबा जेव्हा आपल्या लाडक्या नातवाविषयी अथवा नातीविषयी बोलायला लागतात तेव्हा,
' ते काय बोलतात? कसे कौतुकाने बोलतात? किती अतिशयोक्ती करतात? बोलत असताना त्यांचे डोळे कसे चमकतात आणि त्यांच्या चेहऱ्यावर कसा आनंद पसरतो?' ते जरा आठवून पहा आणि त्यानंतर खरे सांगा.
' आपला नातू कसाही असला तरीही, आजोबाला त्याच्यामधे गोपालकृष्णच दिसायला लागतो की नाही? त्याच्या प्रत्येक गोष्टीचे कौतुक वाटते की नाही? जगामधले सगळे गुण त्याच्यामधे एकवटलेले आहेत असेच वाटते की नाही? त्याच्या विषयी काय बोलू आणि काय नको असेच होऊन जाते की नाही?' आणि हे सगळे सहजपणे आपोआप घडून येते. ठरवून करावे लागत नाही. कोणाही माणसाला आपल्या नातवंडांच्या इतके, दुसरे काहीही प्रिय असेल असे मला तरी वाटत नाही. बहुदा नसावे.
नाही, नाहीऽऽ! अहो ऽऽ, त्यांच्याइतके दुसरे काहीही प्रिय नसतेच.
श्रीकृष्ण होऊन गेला त्याला पाच हजाराहून जास्त वर्षे होऊन गेली आहेत.
त्याच्या अवतार समाप्तीनंतर, सुमारे २५० पिढ्या होऊन गेलेल्या आहेत.
आपल्यापैकी कोणीही त्याला पाहिलेले नाही. त्याच्या बरोबर बोललेले नाही.
तरी आजही, आपल्या मनावर त्याचा विलक्षण प्रभाव आहे आणि तो कायम आहे. त्याच्यावरचे प्रेम कायम आहे. आपुलकी कायम आहे. आदर कायम आहे. किंबहुना जे जे आनंददायक आहे, मंगल आहे, नीतिमान आहे आणि कल्याणकारक आहे ते ते सगळे श्रीकृष्णच आहे अशीच आपली भावना असते. आजही त्याची जनमानसावर असलेली पकड विलक्षण आहे.
त्याच्या विषयी कल्पना करतानाही आपण आनंदित होतो. आपल्याला त्याचे सर्व काही गोड वाटते. मधुर वाटते. आनंददायक वाटते.
वैष्णव पंथियांच्या भक्तिमार्गामधे **' मधुराभक्ती '** नांवाचा एक प्रकार आहे.
तो फारच प्रसिद्ध झालेला असा मार्ग आहे आणि अनुयायांची संख्याही मोठी आहे.
त्या पंथाचे अग्रणी **श्रीमद्वल्लभाचार्य** ह्यांनी देखील श्रीकृष्णाला प्रत्यक्ष पाहिलेले नव्हते.
त्याचे बरोबर ते कधीही प्रत्यक्षपणे बोललेले नव्हते. असे म्हणतात की एकदा ध्यानावस्थेत असताना त्यांना श्रीकृष्णाचे दर्शन घडले.
त्याच्या प्रत्येक हालचालीकडे पाहात असताना, तशा ध्यानावस्थेतही, ते अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन डोलायला लागले.
त्यावेळी त्यांना श्रीकृष्ण कसा दिसला त्याचे वर्णन करण्यासाठी त्यांनी एक सुंदर स्तोत्र रचले.
**' श्री मधुराष्टकम् '** ह्या नांवाचे ते स्तोत्र फार प्रसिद्ध आहे. त्यामधे त्यांनी,
**' श्रीकृष्णाची प्रत्येक गोष्ट उत्तम आहे, छान आहे, गोड आहे.'** हे सांगताना, **मधुर** हा शब्द ५६ वेळा वापरला आहे.
आठ कडव्यांचे ते स्तोत्र फारच रसाळ आहे. गोड आहे.

अर्थ समजून घेऊन म्हणताना, विलक्षण आनंद होतो.
आपण आनंदसागरामधे डुंबत असल्यासारखे वाटायला लागते.
आपल्या दृष्टीपुढे **' श्रीकृष्ण कसा होता?'** त्याचे संपूर्ण शब्दचित्रच उभे राहते.
आचार्य काय सांगत आहेत ते नीट लक्ष देऊन ऐका!

**अधरम् मधुरम् वदनम् मधुरम् ।**
**नयनम् मधुरम् हसितम् मधुरम् ।**
**हृदयम् मधुरम् गमनम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ १ ॥**

अर्थ – त्याचे **ओठ** गोड आहेत, त्याचे **मुखकमल** गोड आहे. त्याचे **नेत्र** गोड आहेत, त्याचे **हसणे** गोड आहे. त्याचे **हृदय** ( अंतःकरण ) गोड आहे, त्याचे **जाणे** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**वचनम् मधुरम् चरितम् मधुरम् ।**
**वसनम् मधुरम् वलितम् मधुरम् ।**
**चलितम् मधुरम् भ्रमितम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ २ ॥**

अर्थ – त्याचे **बोलणे** गोड आहे, त्याचे **चरित्र** गोड आहे. त्याचे **वस्त्र** गोड आहे, त्याचे **वळणे** गोड आहे. त्याचे **चालणे** गोड आहे, त्याचे **भ्रमण करणे** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**वेणुः मधुरो रेणुः मधुरः ।**
**पाणिः मधुरः पादौ मधुरौ ।**
**नृत्यम् मधुरम् सख्यम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ३ ॥**

अर्थ – त्याचे **मुरली वादन** गोड आहे, त्याच्या चरणांवरील **धुळीचा कण** गोड आहे. त्याचे **हात** गोड आहेत, त्याचे **पाय** गोड आहेत. त्याचे **नाचणे** गोड आहे, त्याची **मैत्री** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**गीतम् मधुरम् पीतम् मधुरम् ।**
**भुक्तम् मधुरम् सुप्तम् मधुरम् ।**
**रूपम् मधुरम् तिलकम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ४ ॥**

अर्थ – त्याचे **गायन** गोड आहे, त्याचे **पिणे** ( जलपान ) गोड आहे. त्याचे **भोजन** गोड आहे, त्याचे **झोपणे** गोड आहे. त्याचे **रूप** गोड आहे, त्याच्या कपाळावरचा **टिळा** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**करणम् मधुरम् तरणम् मधुरम् ।**
**हरणम् मधुरम् स्मरणम् मधुरम् ।**
**वमितम् मधुरम् शमितम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ५ ॥**

अर्थ – त्याचे **कार्य** गोड आहे, त्याचे **पोहणे** गोड आहे. त्याचे **हरण** म्हणजे आकर्षणशक्ती गोड आहे, त्याचे **स्मरण** गोड आहे. त्याचे **उद्गार** गोड आहेत, त्याची **शांती** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**गुंजा मधुरा माला मधुरा ।**
**यमुना मधुरा वीची मधुरा ।**
**सलिलम् मधुरम् कमलम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ६ ॥**

अर्थ – त्याचे **गुंजन** ( गुणगुणणे ) गोड आहे, त्याच्या गळ्यातली **माळ** गोड आहे. त्याची **यमुना नदी** गोड आहे, तिच्यावरील **तरंग** गोड आहेत. तिचे **जल** गोड आहे, त्यामधे उगवलेली **कमळे** गोड आहेत. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**गोपी मधुरा लीला मधुरा ।**
**युक्तम् मधुरम् भुक्तम् मधुरम् ।**
**इष्टम् मधुरम् शिष्टम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ७ ॥**

अर्थ – त्याच्या **गोपिका** गोड आहेत, त्याच्या **लीला** गोड आहेत. त्याचा **संयोग** गोड आहे, त्याचा **वियोग** गोड आहे. त्याचे **निरीक्षण** गोड आहे, त्याचे **वागणे** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

**गोपा मधुरा गावो मधुरा ।**
**यष्टिः मधुरा सृष्टिः मधुरा ।**
**दलितम् मधुरम् फलितम् मधुरम् ।**
**मधुराधिपतेरखिलम् मधुरम् ॥ ८ ॥**

अर्थ – त्याचे **गोपगण** गोड आहेत, त्याच्या **गायी** गोड आहेत. त्याच्या हातातली **काठी** गोड आहे, त्याची **सृष्टीची रचना** गोड आहे. त्याचे **दुष्टांचे निर्दालन करणे** गोड आहे, त्याचे **भक्तीचे फळ देणे** गोड आहे. मधुराभक्तीचा अधिपती असलेल्या श्रीकृष्णाचे सर्व काही अत्यंत गोड आहे.

साध्वी मीराबाईने देखिल श्रीकृष्णाला प्रत्यक्ष पाहिलेले नव्हते. तरीही तिची श्रीकृष्णावर अपार भक्ती होती. प्रेम होते.
ती श्रीकृष्णालाच आपला पती मानत होती. त्यासाठी तिने आपल्या खऱ्या पतीचा व सगळ्या राजवैभवाचाही त्याग केला.
आज आपल्याला कदाचित् तिचे वागणे म्हणजे वेडेपणा वाटत असेल.
परंतु आयुष्यभर तसे वागणे फार फार कठीण आहे. अशक्य आहे.
तिच्या सगळ्या इच्छा, आकांक्षा, कामना, वासना, यातना, वेदना, अर्चना, साधना ह्या श्रीकृष्णाच्या ठिकाणी एकरूप झालेल्या होत्या.
तिचे श्रीकृष्णावरील प्रेम म्हणजे म्हणजे केवळ प्रेमासाठी प्रेम होय! ती ' **वासनारहित प्रेमभावनेची** ' अखेरची पातळी होती.
गोकुळातल्या राधेच्या प्रेमा सारखी. राधेचे प्रेमही त्याच पातळीला पोहोचलेले होते.

**प्रेमाची तिसरी पायरी म्हणजे राधेचे प्रेम.** ती काय म्हणायची ते ऐका.

' माझे त्याच्यावर प्रेम आहे. मी फक्त त्याच्यावरच प्रेम करते. त्याला भेटल्याला फार वर्षे झाली. गोकुळामधून गेल्यानंतर आजपर्यंत तो मला कधी भेटलाही नाही. त्याचे माझ्यावर प्रेम आहे की नाही ते मला माहीत नाही. ते जाणून घ्यायची माझी इच्छा नाही. मला तशी आवश्यकताही वाटत नाही. तो मला भेटो अगर न भेटो, माझ्यावर प्रेम करीत असो किंवा नसो, अगदी माझा तिरस्कार करीत असला तरीही मी मात्र त्याच्यावर फक्त प्रेमच करीत राहीन आणि फक्त त्याच्यावरच प्रेम करीत राहीन. मी त्याची कुणी असो किंवा नसो, तो माझे सर्वस्व आहे. माझा प्राण आहे. मरेपर्यंत मी त्याच्यावर पराकोटीचे प्रेम करीतच राहीन.'

ही प्रेमाची अंतिम अवस्था आहे. **प्रेमाची पूर्णावस्था आहे.** असो.
मीराबाईने आपल्या एका भजनामधे श्रीकृष्णाचे फारच सुरेख वर्णन केलेले आहे.

**म्हारो प्रणाम, बाँकेबिहारी जी, म्हारो प्रणाम ॥**
**मोर मुगुट माथ्यां, तिलक बिराजा ।**
**कुंडल झलका करी जी, म्हारो प्रणाम ॥ १ ॥**
**अधर मधुर धर, बन्सी बजावा ।**
**रीझ रिझावा, ब्रिजनारी जी, म्हारो प्रणाम ॥ २ ॥**

**क्या कहूँ देख्या, मोह्या मीरा ।**

**मोहन गिरीवरधारी जी, म्हारो प्रणाम ।। ३ ।।**

आता जरा विचार करा. जर गेल्या हजारो वर्षांपासून आजपर्यंत आपल्या सर्वांची अशीच स्थिती आहे, तर मग जेव्हा श्रीकृष्ण प्रत्यक्ष शरीराने अस्तित्वात होता आणि समाजामधे वावरत होता, सर्व व्यवहार करीत होता आणि आवश्यकतेनुसार इतरांच्याबरोबर त्याच्याकडून विविध क्रिया प्रतिक्रिया घडत होत्या, त्यावेळी त्याचा किती मोठा प्रभाव असेल बरे?

त्यात श्रीकृष्ण हा फारच सुंदर होता. त्याला **मदनाचा पुतळा** म्हणणेही पुरेसे होणार नाही इतका सुंदर होता.

' दिसणे, असणे, बोलणे, चालणे, वागणे ' इत्यादी सर्वच बाबतीत तो अत्यंत प्रभावशाली होता.

**( Most Impressive personality )**

अगदी त्याच्या लहानपणापासून, त्याला नुसते पाहिले तरीही, पाहणारा त्याच्याकडे आकर्षित होत असे आणि नकळत त्याच्यावर प्रेम करायला लागत असे. त्याला अनुकूल, त्याच्या इच्छेप्रमाणे, त्याला हवे असेल तसे वागायला लागत असे.

ही गोष्ट महाभारतामधे अनेक वेळा अत्यंत स्पष्टपणे नमूद केली गेलेली आहे.

उदाहरणादाखल महाभारताच्या महायुद्धमधील एक गोष्ट सांगतो.

महारथी कर्ण हा अर्जुनाचा सर्वात मोठा शत्रू होता. तुल्यबळच नाही तर प्रबळ शत्रू होता.

तो अर्जुनाचा नेहमीच पराकोटीचा तिरस्कार करीत असे. किंबहुना ' युद्धामधे अर्जुनाला मारणे,' हेच त्याचे ध्येय होते.

त्यासाठी एक अत्यंत प्रभावी असे अस्त्र त्याने खुद्द इंद्राकडून मिळविले होते. त्या अस्त्राची विशेषता ही होती की,

' ज्याच्या विनाशाची इच्छा धरून, कर्ण त्या अस्त्राचा प्रयोग करील, त्याचा वध करूनच ते अस्त्र शांत होणार होते.' म्हणजे कर्ण अर्जुनाला निश्चितपणे मारू शकणार होता. त्याविषयी शंकाच नव्हती. तरीही कर्ण अर्जुनाला मारू शकला नाही.

त्यामागचे कारण काय होते? युद्धाच्या अकराव्या दिवशी सकाळी, कर्ण युद्ध करायला रणांगणावर आला. त्यानंतर जेव्हा जेव्हा तो अर्जुनासमोर येत असे, तेव्हा तेव्हा त्याला अर्जुनाच्या अगोदर, **' त्याचा रथ हाकणारा श्रीकृष्ण '** दिसत असे.

त्याच्याकडे स्मितहास्य करीत, प्रेमपूर्वक पाहताना दिसत असे. एकदा श्रीकृष्णाचे दर्शन झाले, म्हणजे मग कर्णाला काय होत असे ते माहीत नाही. परंतु त्याच्या मनामधली अर्जुनाच्या वधाची इच्छा नाहीशी होत असावी.

हातामधे प्रभावी अस्त्र असूनही आणि अर्जुन समोर असूनही, त्याने त्या अस्त्राचा वापर केलाच नाही. तो त्याच्या जवळ असलेली दुसरी सगळी शस्त्रास्त्रे वापरायचा आणि अर्जुन त्याचा यशस्वीपणे प्रतिकार करायचा. अर्जुनही त्याच्या जवळ असलेली सगळी शस्त्रास्त्रे वापरायचा आणि कर्ण त्याचा यशस्वीपणे प्रतिकार करायचा. हा प्रकार सतत चालू होता.

अखेरीस युद्धाच्या चौदाव्या रात्री जेव्हा घटोत्कच कौरवांना भारी पडायला लागला, अदृष्य होऊन मायावी युद्ध करायला लागला, कौरव सैन्याची अपरिमित हानी करायला लागला, तेव्हा कौरव सेनेने कळकळीने विनवणी केल्यावर महारथी कर्णाने,

**' घटोत्कचाच्या विनाशाची इच्छा धरून '** त्या अस्त्राचा प्रयोग केला आणि त्या अस्त्राने मायावी घटोत्कचाला शोधून काढून मारले.

असे का झाले? कर्णाने ते अस्त्र अर्जुनावर का वापरले नाही?

घटोत्कच मारला गेल्यानंतर, सात्यकीने हाच प्रश्न श्रीकृष्णाला विचारला. त्याचे उत्तर देताना, स्वत: श्रीकृष्णानेच सांगितले आहे की,

' कर्ण माझ्यासमोर आला की मी त्याच्या मनाचा ताबा घेत असे. माझ्या दर्शनाने प्रभावित झाल्यामुळे, तो त्याच्याकडे असलेल्या प्रभावी अस्त्राचा वापर, अर्जुनावर करीत नसे. करू शकत नसे.'

अशा प्रकारे त्याच्या विलक्षण व्यक्तिमत्वाचा प्रभाव प्रत्येकावरच पडत असे.

त्यामुळे त्याचे शत्रू त्याचा द्वेषच करणार हे गृहीत धरून त्यांना वगळले, तर त्याच्याविषयी बोलताना, बोलणारा कोणीही असला तरीही, सर्वसाधारणपणे सर्वांच्या बाबतीत, **' आनंदाचे भरते येणे, कंठ दाटून येणे, मुखामधून शब्द न फुटणे, डोळयांमधून अश्रू वाहणे.'** इत्यादी गोष्टी नेहमीच घडून येत असत. बोलणारे ज्ञानी ऋषिमुनी असोत, राजे महाराजे असोत, तापसी असोत, वानप्रस्थाश्रमी असोत, गृहस्थाश्रमी असोत अथवा सामान्यजन असोत, श्रीकृष्णाच्या विषयी बोलत असताना, प्रत्येकाची भावना एकसारखीच असायची. कोणत्यातरी अलौकिक, अद्वितीय, अप्रतिम आणि विलक्षण प्रभावी व्यक्तीचे वर्णन करीत असल्यासारखीच असायची.

प्रत्येकाचा अनुभव तसाच होता. त्यामुळे अर्जुनालाही, अनेकांच्या तोंडून नेहमी असे वर्णन ऐकायची सवय झालेली असणार.

त्याचा विश्वास नव्हता तरीही ऐकावे लागत असणार.

परंतु आता स्वत: श्रीकृष्णच, आपल्या सामर्थ्याविषयी, तसे सांगत होता. त्यामुळे तो जे काही सांगतो आहे ते सत्य आहे की नाही? ह्याविषयी प्रश्न नव्हता. ते सत्यच होते आणि अर्जुनालाही ते मान्य होते. पण प्रश्न वेगळेच होते.

जर सगळे विश्व तोच आहे तर मग त्याला ओळखायचे कसे? तोच आहे असे मानून कोणाला नमस्कार करायचा?

कोणाचे स्मरण करायचे? आपला आदर्श म्हणून कोणाकडे पहायचे? कोणाचे अनुकरण करायचे?

हेच खरे प्रश्न होते आणि त्यांचे उत्तर मिळणे अपेक्षित होते.

**अर्जुन उवाच :**

**परम् ब्रह्म परम् धाम पवित्रम् परमम् भवान् ।**
**पुरुषम् शाश्वतन् दिव्यम् आदिदेवमजम् विभुम् ।। १२ ।।**
**आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।**
**असितो देवलो व्यासः स्वयम् चैव ब्रवीषि मे ।। १३ ।।**
**सर्वमेतदृतम् मन्ये यन्माम् वदसि केशव ।**
**न हि ते भगवन्व्यक्तिम् विदुर्देवा न दानवाः ।। १४ ।।**
**स्वयमेवात्मनात्मानम् वेत्थ त्वम् पुरुषोत्तम ।**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ।। १५ ।।**

तुम्हीच परम ब्रह्म, श्रेष्ठ स्थान व परम पवित्र आहात. दिव्य व शाश्वत पुरुष, आदिदेव, अजन्मा, सर्वव्यापी असे तुम्हाला सर्व ऋषी, देवर्षी नारद, असित, देवल आणि व्यासही म्हणतात. आणि स्वतः तुम्हीही मला तेच सांगता. हे केशवा! तुम्ही मला हे जे सांगता ते सर्व मी सत्य मानतो. हे भगवन्! तुमचें मूळ देवांना माहीत नाही आणि दैत्यांनाही माहीत नाही. हे सर्व भूते उत्पन्न करणाऱ्या भूतेशा! देवदेवा जगत्पते! पुरुषोत्तमा! तुम्ही स्वतःच स्वतःला जाणत आहात.

येथे अर्जुनाने कोणकोणती विशेषणे वापरली आहेत पहा.

**परं ब्रह्म** — निर्गुण परमात्मा. **परं धाम** — लौकिकार्थाने निर्गुण परमात्म्याच्या वास्तव्याचे ठिकाण.

**परम पवित्र** — पावित्र्याची परिसीमा. **दिव्य पुरुष** — सर्वच दृष्टीने विशेष प्रभावी असलेला.

**शाश्वत** — सनातन. एकाच वेळी प्राचीन आणि अर्वाचीनही असणारा असा.

**आदिदेव** — ज्याला ईश्वर मानून, देवही ज्याचे पूजन करतात असा.

**अजम्** — ज्याला जन्म नाही असा. **विभुम्** — जो सदासर्वदा सर्वव्यापी आहे असा.

**केशव** — ब्रह्मा - विष्णू - महेश हे तिघेही ज्याची रूपे आहेत तो. **पुरुषोत्तम** — सर्वात उत्तम पुरुष. सर्वश्रेष्ठ पुरुष.

**भूतभावन** — सर्व भूतमात्रांना निर्माण करणारा. **भूतेश** — सर्व भूतमात्रांचा ईश्वर.

**देवदेव** — देवांचाही देव असलेला. **जगत्पते** — सर्व जगाचा स्वामी असलेला.

ज्याच्या ठिकाणी हे सर्व काही एकवटलेले आहे तो भगवान् श्रीकृष्ण स्वतः त्याच्या सामर्थ्याविषयी, प्रभावाविषयी आणि अगम्यतेविषयी सांगतो आहे. काही प्रमाणात, हा विषय चवथ्या अध्यायापासून मधून मधून आलेला आहे.

परंतु येथे त्याचे स्पष्टपणे आणि पूर्णपणे प्रतिपादन केलेले आहे. त्याच्यावर आत्यंतिक श्रद्धा, भक्ती आणि विश्वास असणाऱ्या अर्जुनाला ते पूर्णपणे मान्य आहे. तो जे जे सांगतो ते ते सर्व काही सत्य आहे अशी त्याची श्रद्धा आहे.

परंतु त्याने प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. सर्व विश्व हे परमेश्वराचेच स्वरूप आहे असे म्हटले म्हणजे, ह्या विश्वामधील प्रत्येक वस्तुमात्र ही त्याचीच विभूति आहे असाच निष्कर्ष निघतो.

ज्यांचे स्मरण हे दुःखदायक आहे, भीतीदायक आहे, तिरस्करणीय आहे, क्रोधकारक आहे, किळस वाटणारे आहे, नकोसे वाटणारे आहे अशा वस्तू आणि व्यक्तीही त्याच्याच विभूति आहेत असाच निष्कर्ष निघतो.

मग तसे मानून, त्यांचे स्मरण करून, त्यांना आदर्श मानून, त्यांना नमस्कार करून, त्यांचे अनुकरण करणे हे कोणत्याही माणसासाठी अहितकारकच असणार. त्यांचे स्मरण करण्याने काय साध्य होणार?

अथवा ज्यांचे स्मरण हे काहीही न वाटणारे, कोणतीही भावना उत्पन्न न करणारे, अत्यंत सामान्य, असे आहे अशा वस्तू आणि व्यक्तीही त्याच्याच विभूति आहेत असाच निष्कर्ष निघतो. मग तसे मानणे आणि त्यांचे स्मरण करणे हे कोणासाठीही अहितकारक होणारे नसले तरीही आनंददायक, लाभदायक, उत्कर्षकारक, उन्नतीदायक, असेही होऊ शकणार नाही.

मग त्यांचे स्मरण करण्याने काय साध्य होणार?

त्यामुळे ज्या वस्तुमात्रांचे ठिकाणी ' तेज, बल, बुद्धिमत्ता, ऐश्वर्य, त्याग, शौर्य, औदार्य, करुणा ' इत्यादी गुणांचा विशेष आविष्कार दिसून येतो, त्यांनाच सर्व विश्वामधल्या विशेष विभूति किंवा **दिव्य विभूति** म्हणता येईल.

मग तसे मानून, त्यांचे स्मरण करून, त्यांना आदर्श मानून, त्यांना नमस्कार करून, त्यांचे अनुकरण करणे कोणत्याही माणसासाठी आनंददायक, लाभदायक, हितकारक, उन्नतीकारक आणि कल्याणकारक असेच ठरणार.

ह्याविषयी कोणताही संशय घेण्याचे कारण नाही. विभूतींच्याविषयी प्रश्न विचारण्यामागे अर्जुनाचा तोच हेतू आहे.

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**याभिर्विभूतिभिर्लोकान् इमान् त्वम् व्याप्य तिष्ठसि ।। १६ ।।**
**कथम् विद्यामहम् योगिन् त्वाम् सदा परिचिन्तयन् ।**
**केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ।। १७ ।।**
**विस्तरेणात्मनो योगम् विभूतिञ् च जनार्दन ।**
**भूयः कथय तृप्तिर्हि श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम् ।। १८ ।।**

म्हणून तुमच्या ज्या दिव्य विभूति आहेत आणि ज्यांच्या योगे तुम्ही हे सर्व लोक व्यापून राहिला आहात त्या आपणच मला पूर्णपणे सांगा. हे योगेश्वरा! सदा तुमचे चिंतन करीत असताना, मी तुम्हाला कसे ओळखावे? हे भगवंता! कोणकोणत्या पदार्थांमधे मी तुमचे चिंतन करावे? हे जनार्दना! आपली विभूति व योग पुन्हा मला विस्ताराने सांगा.
कारण तुमचे अमृतमय भाषण ऐकताना माझी तृप्ती होत नाही.
हे कृष्णा ऽऽ! हे सर्व विश्व तूच आहेस हे सत्य असले तरीही तसे मानल्यावर मला तुझे चिंतन करता येणारच नाही.
ज्यांचा मी अत्यंत तिरस्कार करतो असे माझे शत्रू सुद्धा तुझेच रूप आहेत. तरीही त्यांचे स्मरण केल्यावर माझ्या मनामधे केवळ क्रोध उसळून येतो. मग मी त्यांचे स्मरण कशाला करू? त्याने मला कोणता लाभ होणार? आणि तुझी प्राप्ती तरी कशी होणार? म्हणून तसे व्हायलाच नको. त्यापेक्षा ज्यांना पाहिले असता मला केवळ तुझेच स्मरण होईल, तूच माझ्या डोळ्यांसमोर येशील आणि मी तुझ्या चिंतनामधे रंगून जाईन अशा विभूति तू मला सांग.
ज्यांना आदर्श मानून त्यांचे अनुकरण करायची इच्छा माझ्या मनामधे सहजपणे निर्माण होईल अशा तुझ्या दिव्य विभूतिंच्याविषयी तू मला सांग. ज्यांचे स्मरण केल्यावर, चिंतन केल्यावर, मनन केल्यावर, माझा ह्या लोकी आणि परलोकीही उत्कर्ष होईल, उन्नती होईल अशा दिव्य विभूति तू मला सांग. ह्या अगोदर तू तुझ्या काही विभूति सांगितलेल्या आहेस. परंतु आता परत एकदा विस्तारपूर्वक सांग.
हे जनार्दना ऽऽ! मला तुझे बोलणे फार आवडते. सारखे ऐकत रहावे असे वाटते.
मला तसे का वाटते ते तुला कळणार नाही. कारण तुझे बोलणे ऐकणारा मी आहे आणि माझ्याशी बोलणारा, मला उपदेश करणारा तू आहेस. त्यामुळे तुझ्या बोलण्याचा प्रभाव तुला कसा कळणार? तो केवळ मलाच कळणार.
सूर्याला **' तो किती तेजस्वी आहे? '** ते माहीत नसते. चंद्राला **' तो किती शीतल आहे? '** ते माहीत नसते.
गंगेला **' ती किती पवित्र आहे? '** ते माहीत नसते. अमृताला **' ते किती मधुर आहे? '** ते माहीत नसते.
ते इतरांनाच माहिती असणार. तसाच हा प्रकार आहे. तुझे बोलणे ऐकून माझे समाधान होतच नाही.
तू सारखे बोलत रहावे आणि मी सारखे ऐकत रहावे असेच वाटते. त्याला मी काय करणार?
असा सत् शिष्य भेटल्यावर, गुरूदेव त्याच्यावर प्रसन्न झाल्यावाचून कसे राहतील?
त्याच्या प्रश्नाचे यथायोग्य उत्तर दिल्यावाचून कसे राहतील?

**श्रीभगवानुवाच :**
**हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे ।। १९ ।।**

हे कुरुश्रेष्ठा अर्जुना ऽऽ! तुझ्या प्रश्नाचे उत्तर देणे फार कठीण आहे. अरे ऽऽ! –
सूर्याला आपली किरणे मोजून दाखवता येतील का? सागराला आपल्या लाटा मोजून दाखवता येतील का?
पूर्ण वाढलेल्या विशाल वृक्षाला त्याची पाने मोजून दाखवता येतील का?
निरभ्र आकाशामध्ये रात्रीच्या वेळी दिसणारी नक्षत्रे मोजून दाखवता येतील का?
ते जाऊदे. तुला, तुझ्या अंगावर किती केस आहेत ते सांगता येईल का? नाही येणार ना ऽऽ! तुझा हा प्रश्नही तशाच प्रकारचा आहे.
माझ्या विस्ताराला खरोखरच अंत नाही. मी हे सर्व जग व्यापून राहिलो आहे. तू ज्या दिव्य विभूतींच्या बद्दल विचारतो आहेस त्या देखील अगणित आहेत. त्याबद्दल आता तुला काय सांगू ऽ? कोणाकोणाची नांवे घेऊ ऽ?
तरीही माझ्या ज्या अनंत दिव्य विभूति आहेत त्यापैकी महत्त्वाच्या अशा काही विभूति तुला सांगतो. नीट लक्ष देऊन ऐक.
आता पुढे जाण्यापूर्वी, आपल्याला व्यावहारिक जगातली एक गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे.
त्यायोगे आपल्याला **' दिव्य विभूति '** ह्या संकल्पनेची थोडीशी कल्पना येईल असे मला वाटते. आता आपण असा विचार करा की, जगभर व्यवसाय करीत असलेली एक प्रसिद्ध संस्था आहे. **( Organization )**

अनेक देशांमधे तिचे मोठे कारखाने आहेत. कचेऱ्या आहेत. **(Plants / Offices)**
आता त्या संस्थेचा कारभार चालविणारी मोठी यंत्रणाही असते हे उघड आहे.
त्या संस्थेचे कोणीतरी मालक / चालक / पालक असतात. **( Proprietor / Owner / Partners / Share Holders )**
त्यामधे वेगवेगळ्या उत्पादनांची निर्मिती सतत होत असते. **( Manufacturing )**
वेगवेगळ्या उत्पादनांच्या संशोधनाचे व आरेखनाचे काम करणारी विशेष यंत्रणा असते.
**( Research / Design / Development )**
उत्पादनांच्या निर्मितीची योजना आखणारी, त्यांचा क्रम ठरविणारी विशेष यंत्रणा असते.
**( Production / Process / Method Planning )**
त्यासाठी लागणारा कच्चा माल सतत पुरवला जातो. **( Purchase )**
कारखान्यात आलेला कच्चा माल योग्य दर्जाचा आहे की नाही? त्याचप्रमाणे — कारखान्यामधून तयार झालेला माल योग्य दर्जाचा आहे की नाही? ते तपासण्यासाठी विशेष यंत्रणा असते. **( Inspection & Quality Control )**
तयार झालेल्या उत्पादनांची जाहिरात केली जाते आणि त्यायोगे उत्पादने बाजारामधे सतत विकली जातात.
**( Marketing & Sales )**
कारखान्याच्या सर्व व्यवहाराचा हिशोब ठेवणारी यंत्रणा असते. **( Accounts )**
उत्पादन प्रक्रिया सुरू होण्यासाठी आणि पुढे सतत चालू राहण्यासाठी लागणारे अनुभवी मनुष्यबळ मिळविण्यासाठी एक वेगळी यंत्रणा असते. **( Human Resource Development )**
कारखान्यात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी, गुणवत्ता आणि कार्यक्षमता इत्यादींची नोंद ठेवण्यासाठी एक वेगळी अशी यंत्रणा असते. **( Administration & Personnel )**
ह्या वेगवेगळ्या यंत्रणा मालकांच्या आदेशानुसारच आपापले काम करीत असतात. तरीही एकूण कामामधे सुसूत्रता असावी म्हणून प्रत्येक यंत्रणेला एक प्रमुख व्यवस्थापक असतो. **( General Manager )**
हे सगळे प्रमुख व्यवस्थापक, मालकांचेच प्रतिनिधी असतात. त्यांच्याबरोबर व्यवहार करणे म्हणजे मालकांच्या बरोबर व्यवहार करणेच असते. मालकांनी त्या सर्वांना काही ठराविक जबाबदाऱ्या वाटून दिलेल्या असतात. **( Responsibilities )**
आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक असे विशेष अधिकारही त्यांना देण्यात आलेले असतात. **( Authorities )**
मालक, कारखान्याच्या बाबतीतले आपले सर्व व्यवहार त्यांच्यामार्फतच करतात.
त्यांच्या हाताखाली अनेक अधिकारी आणि कर्मचारी काम करीत असतात. **( Managers /Officers / Staff Members )**
ते मालकांना हवी असलेली, आवश्यक असेल ती सर्व माहिती पुरवितात. **( Information through proper channel),**
चर्चा करतात **( Discussion )** आणि त्यानंतर मालकांनी दिलेले आदेश जसेच्या तसे अंमलात आणतात.
**( Implementation of Decisions )**
ह्या सर्व व्यवस्थेच्या द्वारे संस्थेचा कारभार योग्य प्रकारे दीर्घकाळ चालत राहतो.
त्या सस्थेमधे लक्षावधी कर्मचारी आपापले काम करीत असतात.
प्रत्येक कर्मचारी, अगदी सफाई कामगार देखील, हा अंतिमत: मालकांचा प्रतिनिधीच असतो. त्यांचेच रूप असतो.
त्याला कोणतेही विशेष अधिकार नसले तरीही मालक त्याच्याच द्वारे, त्यांनीच ठरविलेले, विशिष्ट कार्य करीत असतात.
परंतु त्या संस्थेमधील सर्वोच्च अधिकारीवर्ग हा मालकांचा विशेष प्रतिनिधी असतो. त्यांचे विशेष रूप असतो.
त्यांच्याकडे विशेष गुण असतात. त्यांना विशेष अधिकार असतात. त्यांचा इतर सर्व कर्मचाऱ्यांवर विशेष प्रभाव असतो.
मालक त्यांच्याच द्वारे महत्त्वाची अशी विशेष कार्ये करीत असतात. आता —
जर ती संस्था **' अनंत पटीने '** मोठी केली तर, त्या संस्थेचा कारभार चालविण्याची पद्धतही **' अनंत पटीने '** मोठी होईल.
म्हणजे कर्मचाऱ्यांची संख्यादेखील अनंत होईल आणि सर्वोच्च अधिकारीवर्गाची संख्यादेखील अनंत होईल.
अनादिकालापासून सुरू असलेला आणि अनंतकालापर्यंत सुरू राहणारा असा, विशिष्ट पद्धतीने, अचूकपणे आणि सातत्याने चालणारा, अखिल विश्वाचा व्यवहारही तसाच असणार आणि तो व्यवहार चालविणारी संस्थादेखील तशीच असणार.
त्या संस्थेचाही कोणीतरी मालक / चालक / पालक असणार. **(परब्रह्म परमात्मा )**
त्या मालक / चालक / पालकाचा, सर्व साधारण प्रतिनिधी मानता येईल असा कर्मचारीवर्गही असणार. **( विभूति )**
तसेच त्या मालक / चालक / पालकाचा, विशेष प्रतिनिधी मानता येईल असा, विशेष गुण असलेला, विशेष अधिकार असलेला,

विशेष जबाबदारी असलेला आणि विशेष प्रभाव असलेला सर्वोच्च अधिकारीवर्गही असणार. **( दिव्य विभूति )**
त्या संस्थेचा एकूण कर्मचारीवर्ग हा अनंत आहे, अगणित आहे आणि संस्थेचे सर्वोच्च अधिकारीही अनंत आहेत. अगणित आहेत.
आता जर भगवान त्या सगळ्यांची नांवे आठवून सांगायला लागले तर मग —
**‘ युद्ध केव्हा सुरू करणार? आणि दुष्टांचा विनाश केव्हा होणार?’**
तरीही अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नामुळे, आता त्यामधीलही काही मुख्य मुख्य नांवे सांगायला सुरवात होते आहे.

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।**
**अहमादिश्च मध्यञ् च भूतानामन्त एव च ।। २० ।।**

हे गुडाकेशा ! सर्व भूतांच्या अंतरी असणारा **आत्मा** मी आहे आणि सर्व भूतांचा **आदि**, **मध्य** व **अंत** ही मीच आहे.
**‘ आत्मा, आत्मन्, परा प्रकृती, क्षेत्रज्ञ, प्राण, जीवात्मा, जीव** ’ ही सगळी वेगवेगळी नांवे एकाच संकल्पनेसाठी वापरली जातात. आजपर्यंत कोणीही, कधीही, कोणत्याही प्राण्याचा जीव पाहिलेला नाही.
तरीही जीव असतो आणि जेव्हा तो शरीर सोडून जातो, तेव्हा प्राणी मरतो हे सत्य आपल्या सर्वांनाच माहीत आहे.
आधुनिक विज्ञान त्यालाच, शरीरामधील **अत्यावश्यक ऊर्जा ( Vital Energy.)** असे म्हणते. नांव कोणतेही दिले तरी त्याने काहीही फरक पडत नाही. येथे त्यालाच **सर्वांच्या अंतरात स्थित असलेला आत्मा** असे म्हटलेले आहे.
एकच व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या वेषामधे, वेगवेगळे व्यवहार करताना दिसली तर पाहणाऱ्याला त्या वेगवेगळ्या व्यक्ती आहेत असे वाटायला लागते. परंतु वस्तुस्थिती तशी नसते. ती व्यक्ती एकच असते.
एकच अभिनेता वेगवेगळ्या नाटकांमधे वेगवेगळ्या भूमिका वठवीत असतो आणि दर वेळी त्या त्या भूमिकांना अनुरूप अशी वेषभूषा आणि रंगभूषा करतो. त्यामुळे पाहणाऱ्याला त्या वेगवेगळ्या व्यक्ती आहेत असे वाटायला लागते.
परंतु भूमिका वेगवेगळ्या असल्या तरीही अभिनेता एकच असतो.
त्याचप्रमाणे आपल्याला सर्व प्राणिमात्र वेगवेगळे दिसत असले, त्यांच्या क्रिया आणि प्रतिक्रिया वेगवेगळ्या दिसत असल्या, तरीही त्यांच्या आत असलेले आत्मतत्त्व एकच असते. एकमेव असते. **( One & Only.)**
म्हणूनच सर्व वस्तुमात्र म्हणजे **‘ परमेश्वराचीच विविध रूपे ’** आहेत.
कोणत्याही देहधारी वस्तुमात्रामधे जेव्हा जीव प्रवेश करतो तेव्हा जगणे सुरू होते. त्याचे अस्तित्व निर्माण होते. व्यक्त होते. **( आदि )**
जोपर्यंत देहामधे जीव वास्तव्य करीत असतो तोपर्यंत जगणे चालू राहते. अस्तित्व टिकून राहते. व्यक्त होत राहते. **( मध्य )**
आणि जेव्हा जीव देहाला सोडून जातो तेव्हा जगणे थांबते. अस्तित्व नाहीसे होते. अव्यक्त होते. **( अंत )**
म्हणूनच सर्व भूतांचा **‘ आदि, मध्य आणि अंत ’** एकमात्र **परमेश्वरच** आहे.
प्राणिमात्रांच्या असण्याचे आणि नसण्याचे कारण तोच आहे.

**आदित्यानामहम् विष्णुः ज्योतिषाम् रविरन्शुमान् ।**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणाम् अहं शशी ।। २१ ।।**

आदित्यांपैकी **विष्णू** मी, तेजस्व्यांमधे **सूर्य** मी, मरुतांमधे **मरीचि** मी आणि नक्षत्रांमधे **चंद्र** मी आहे.
दक्ष प्रजापतीला तेरा कन्या होत्या. त्यांमधे **अदिती** ही सर्वांत मोठी. तिला बारा पुत्र झाले.
ते ‘ अदितीचे पुत्र.’ म्हणून त्यांना **आदित्य** असे म्हणतात. महाभारताच्या आदिपर्वामधे त्यांची नांवे दिलेली आहेत.
**‘ धाता, मित्र, अर्यमा, शक्र, वरुण, अंश, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वष्टा आणि विष्णू ’** ही ती नांवे होत.
म्हणजे बारा भावांच्यामधे **विष्णू** हा सर्वात लहान आहे. परंतु तो गुण, कीर्ती, अधिकार, प्रभाव इत्यादी बाबतीत सर्वात श्रेष्ठ आहे.
त्याच्या तोडीचा दुसरा कोणीही नाही. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
प्रकाशाचे आणि तेजाचे उगमस्थान म्हणता येईल अशांच्यामध्ये **( ज्योतिषाम् )**, किरणांनी युक्त असलेला, शोभून दिसणारा **( अंशुमान् )** आणि सर्वात तेजस्वी असलेला असा **रवि** म्हणजेच **सूर्य** आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
( हे विधान पृथ्वीसापेक्ष आहे. रोजच्या व्यवहारामधे, आपल्या डोळ्यांना जे दिसते त्याच्या मर्यादेत राहूनच ह्या विधानाचा विचार करायला हवा.)
**मरुत** म्हणजे वायु. काही ठिकाणी ह्या वायुदेवता एकोणपन्नास सांगितलेल्या आहेत. तर काही ठिकाणी सात सांगितलेल्या आहेत.
परंतु त्याविषयी मतभेद आहेत. वेगवेगळ्या पुराणांमधे वेगवेगळी नांवे सांगितलेली आहेत.
विशेष म्हणजे त्या नांवांमधे **मरीचि** हे नांव कुठेही दिलेले नाही. मग त्या शब्दाचा अर्थ काय असेल? बराच शोध घेतला.

त्यामधेही मतभेद सापडले. तरीही बहुमताने असे सांगितले आहे की, ‘ मरीचि हे वायुदेवतांच्यापैकी एखाद्याचे नांव नसून, सकल वायुदेवतांच्या सामर्थ्याला, त्यांच्यामधील शक्तीला ‘ **मरीचि** ’ असे म्हटले असावे.’ मला हे मत योग्य वाटले. मान्य करता येण्यासारखे वाटले. सारांश म्हणजे, सर्व मरुद्गणांच्या ठिकाणी असलेले सामर्थ्य म्हणजे **परमेश्वरच** आहे. म्हणून त्या सामर्थ्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

ब्रह्मदेवाचा दक्ष नांवाचा एक मानसपुत्र सांगितलेला आहे आणि त्यालाही प्रजापती असेच म्हटलेले आहे. आता हा ‘ दक्ष प्रजापती ’ आणि वर सांगितलेला अदितीचा पिता असलेला ‘ दक्ष प्रजापती ’ एकच आहेत की वेगळे आहेत ते मला माहीत नाही.

एकूणच रामायण, महाभारत आणि पुराणांच्यामधे, एकाच नांवाच्या अनेक व्यक्ती सतत दिसून येतात. तसेच एकाच नांवाची व्यक्ती फार दीर्घ काळ येत राहते. **विश्वामित्र** हे ऋषी ऋग्वेदामधे आहेत, रामायणातही आहेत, महाभारतातही आहेत आणि पुराणांमधेही आहेत. कदाचित ती विशिष्ट पदांची नांवे असू शकतील. **‘ भारताचे राष्ट्रपती ’** हे पद आहे. त्या पदावरील व्यक्ती बदलतात परंतु पद कायम असते. म्हणूनच भारताचे राष्ट्रपती सन १९५० मधेही होते, सन २०१२ मधेही आहेत आणि सन २०७५ मधेही असतील. त्याचप्रमाणे वसिष्ठ - विश्वामित्र - दक्षप्रजापती - बृहस्पती - जमदग्नी - इंद्र - नारद इत्यादी सगळी पदे असावीत. पदावरील व्यक्ती आणि त्यांचा काळ बदलत असेल परंतु पदे स्थिर असतील असे मला वाटते. असो.

तर, दक्ष प्रजापतीला पन्नास कन्या होत्या. त्यांपैकी **अश्विनी, भरणी, कृत्तिका** इत्यादी सत्तावीस कन्यांचा विवाह त्याने चंद्रदेवाशी लावून दिला. ह्या कन्यका म्हणजेच सत्तावीस नक्षत्रे होत. ह्या सर्व नक्षत्रांचा स्वामी चंद्रदेव आहे. **( शशी )**

शिवाय **चंद्र** हा अतिशय सुंदर, दर्शनीय, शीतल, आनंददायक आणि शांत असा आहे. नक्षत्रांमधे त्याच्या तोडीचा दुसरा कोणीही नाही. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटलेले आहे.

**वेदानाम् सामवेदोऽस्मि देवानाम् अस्मि वासवः ।**
**इंद्रियाणाम् मनश्चास्मि भूतानाम् अस्मि चेतना ।। २२ ।।**

वेदांमधे **सामवेद** मी, देवांमधे **इंद्र** मी, इंद्रियांमधे **मन** मी आणि भूतांच्याठायी असलेली **चेतना** मी आहे.

चार वेदांच्यातला ऋग्वेद हा पहिला आहे. तसेच सामवेदामधे, ऋग्वेदामधील अनेक ऋचांचा समावेश केलेला आहे. असे असले तरीही सामवेद हा संगीतमय आहे. तो गायचा वेद आहे. सुर, ताल आणि लय ह्यांचे बंधन पाळून म्हटला जाणारा वेद आहे. भक्तिमार्गामधे परमेश्वराच्या, गद्यामधून केलेल्या स्तुतीपेक्षा, पद्यातून केलेल्या स्तुतीला महत्त्व दिलेले आहे. गायनाच्या द्वारे केलेल्या स्तुतीला महत्त्व दिलेले आहे. सगळी स्तोत्रे ही पद्यच आहेत, ती गायचीच असतात आणि तशी म्हटल्यावर त्यांचा विशेष परिणाम होतो हे सर्वांनाच माहिती आहे. प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा स्वरांच्या मोहात पडतो. त्याने स्वत:च मुनिवर नारदांना सुस्पष्टपणे सांगितले आहे की —

**नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।।**

अर्थ — हे नारदा, मी वैकुंठात नसतो आणि योग्यांच्या हृदयामधेपण नसतो. माझे भक्त जेथे गायन करीत असतात, भजन करीत असतात तेथेच मी असतो.

म्हणून सामवेदाला **परमेश्वराची विभूति** म्हटलेले आहे.

सर्व देवांच्यामध्ये, त्यांचा राजा असलेला, सर्वशक्तिमान असा जो **इंद्रदेव,** त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटलेले आहे.

प्रत्येकाला डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये आणि हात, पाय, गुदद्वार, मूत्रद्वार आणि जीभ ही पाच कर्मेंद्रिये आहेत. त्यामधे जीभेला चवीचे ज्ञानही होते आणि ती चावलेला घास गिळणे, बोलणे इत्यादी कर्मेही करते म्हणून तिला ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय असे दोन्ही म्हटलेले आहे. तसेच आपले मन हे देखील ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय असे दोन्ही आहे. त्याशिवाय त्याची विशेषता अशी आहे की, ते इतर सर्व इंद्रियांचे नियमन करते. त्यांना आपल्या ताब्यात ठेवते. त्यांना विशिष्ट कार्य करायला लावते. वेळप्रसंगी एखादे कार्य सक्तीने करायला भाग पाडू शकते. दुसरे म्हणजे, आपल्या बुद्धीने केलेला निर्णय हा सर्व इंद्रियांच्याकडून, मनाच्याद्वारेच अमलात आणला जातो. बुद्धीचा निर्णय मनाला मान्य झाला नाही तर तो अमलात येऊ शकत नाही. मनाला जे हवे असेल तेच घडून येते. मन तसे स्वतंत्रच असते. म्हणून मनाला **परमेश्वराची विभूति** म्हटलेले आहे.

सर्व प्राणिमात्रांच्याकडे हालचाल करण्याची शक्ती असते. इतर पदार्थांचा अनुभव घेण्याची आणि त्यायोगे विविध सुखदु:खांचा उपभोग घेण्याची शक्ती असते. त्या शक्तीच्यायोगे सर्वजण आपापले व्यवहार करीत असतात.

तरीही ही शक्ती म्हणजे **आत्मा** नाही. आत्म्याहून निराळी आहे. विशेष आहे.
शरीरामधे आत्मा आहे म्हणूनच जीवन आहे हे सत्य आहे. परंतु जर शरीरामधे ही शक्ती नसेल तर, जिवंत असूनही कोणताही प्राणी हालचाल करू शकणार नाही. आपले नियमित व्यवहार करू शकणार नाही. ही गोष्ट देखील सत्य आहे.
बेशुद्ध पडलेल्या माणसाच्या शरीरामधे जीव असतो परंतु तो काहीही करू शकत नाही. कोणतीही हालचाल करू शकत नाही. पाहू अथवा बोलू शकत नाही. विकलांग माणसाच्या शरीरामधेही जीव असतो, परंतु तो इतरांच्या मदतीवाचून काहीही करू शकत नाही.
दीर्घ काळ बेशुद्धीत असलेल्या माणसाच्या शरीरामधेही जीव असतो. **( COMA )** परंतु तो काहीही करू शकत नाही.
केवळ त्याचा श्वास चालू असतो इतकेच. बाकी तो असून नसल्यासारखाच असतो. त्या शक्तीलाच **चेतना** असे म्हटलेले आहे आणि त्या चेतनेला **परमेश्वराची विभूति** म्हटलेले आहे.

**रुद्राणाम् शङ्करश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।**
**वसूनाम् पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ।। २३ ।।**

रुद्रांमधे **शंकर** मी, यक्ष राक्षसांच्यामधे **कुबेर** मी, वसूंच्यामधे **अग्नि** मी आणि पर्वतांच्यामधे **मेरू** पर्वत मी आहे.
रुद्रांची संख्या अकरा आहे असे सांगितलेले असून त्यांची नांवेही दिलेली आहेत.
**' हर, बहुरूप, त्र्यम्बक, अपराजित, वृषाकपि, शंभु, कपर्दी, रैवत, मृगव्याध, शर्व आणि कपाली '** ही ती नांवे आहेत.
ह्यांच्यापैकी शंभु म्हणजेच **शंकर** हा सर्वात प्रभावी, कल्याणस्वरूप आणि कल्याण करू शकणारा असा आहे.
त्याच्या तोडीचा दुसरा कोणीही नाही. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**यक्ष** आणि **राक्षस** ह्या योनींचा विस्तारही फार मोठा आहे. त्या योनींमधेही शूर, बुद्धिवान, ज्ञानवान, चारित्र्यवान अशा अनेक उल्लेखनीय व्यक्ती होऊन गेलेल्या आहेत. राक्षस म्हणजे क्रूर, वाईट, अत्याचार करणारे अशी आपली समजूत असते.
ती संपूर्णपणे खरी नाही. त्यांच्यामधेही आदर्श व्यक्ती होऊन गेल्या आहेत.
**वित्त** म्हणजे संपत्ती, ऐश्वर्य, धनदौलत, मालमत्ता इत्यादी. **ईश** म्हणजे स्वामी किंवा मालक. **वित्तेश** म्हणजे विश्वातील सर्व संपत्तीचा स्वामी म्हणजेच **कुबेर.** हा यक्ष / राक्षस योनीमधलाच आहे. परंतु बुद्धिवान, ज्ञानवान आणि चारित्र्यवान आहे.
शिवाय सर्व ज्ञात आणि अज्ञात संपत्तीचा स्वामीही आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
वसूंची संख्या आठ आहे असे सांगितलेले असून त्यांची नांवेही दिलेली आहेत.
**' धर, ध्रुव, सोम, अहः, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास '** ही ती नांवे होत.
ह्यांच्यामधील **अनल** म्हणजेच **अग्नी** हा मुख्य असून त्यालाच **पावक** असेही म्हणतात.
कोणत्याही यज्ञामधे देवदेवतांना दिलेली आहुती त्यांच्याकडे पोहोचविण्याचे काम हाच करतो. त्याच्या ह्या विशेष कार्यामुळे त्याला **' परमेश्वराचे मुख '** म्हणतात. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**मेरु** पर्वताला सुमेरु असेही म्हणतात. त्याचे मंदराचल असे आणखी एक नांव आहे.
असे म्हणतात की, हा पर्वत पृथ्वीवरील सात द्वीपांच्या बरोबर मध्यभागी असून, तो **' सोने आणि विविध रत्ने '** ह्यांचे भांडार आहे.
परंतु तो चल आहे. आपले स्थान बदलत असतो. एका जागी स्थिर राहत नाही. अन्य पर्वतांच्या तुलनेने त्याची शिखरे सर्वात उंच आहेत. त्यामुळेच, समुद्रमंथनाच्या वेळेला त्याचा उपयोग समुद्राला घुसळण्यासाठी रवीसारखा करण्यात आला होता.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**पुरोधसाञ् च मुख्यम् माम् विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।**
**सेनानीनाम् अहम् स्कन्दः सरसाम् अस्मि सागरः ।। २४ ।।**

हे पार्था ! पुरोहितांच्यामधे मुख्य असलेला **बृहस्पती** मी, सेनानयकांच्यामधे **स्कंद** मी आणि जलाशयांच्यामधे **समुद्र** मी आहे.
**बृहस्पती** हा सर्व देवतांचा मुख्य पुरोहित आणि देवराज इंद्राचा गुरू आहे. तो अत्यंत बुद्धिमान, ज्ञानवान् व चतुर असून जगामधील सर्व पुरोहितांच्यामधे मुख्य आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**सेनानी** म्हणजे सेनापती. रणांगणावर युद्ध करायला उभ्या असलेल्या सेनेचा प्रमुख. **स्कंद** हा देवसेनेचा सेनापती आहे.
तो शंकराचा ज्येष्ठ पुत्र असून श्रीगणेशाचा मोठा भाऊ आहे. त्याला कार्तिकेय असेही म्हणतात.
त्याला सहा तोंडे आणि बारा हात असल्यामुळे षडानन असेही आणखी एक नांव आहे.
( जसे गज म्हणजे हत्तीचे मुख असलेला तो गजानन, तसेच सहा मुखें असलेला तो षडानन. )
तो रणांगणावर आला म्हणजे त्याला शत्रूच्या सेनेचे आणि व्यूहरचनेचे, सहा बाजूंनी अचूक ज्ञान होत असे.

( पुढील बाजूने, मागील बाजूने, डाव्या बाजूने, उजव्या बाजूने, वरून आणि खालून अशा सहा बाजूंनी )
शत्रूला काहीही कळू न देता, विचित्र व्यूहरचना करून आणि अनपेक्षित पद्धतीने चाली खेळून, शत्रूचा नाश करण्यामधे तो अत्यंत निष्णात होता असे त्याचे वर्णन केलेले आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**सरसाम्** म्हणजे जलाशय. पाण्याचा साठा असलेली ठिकाणे. सर्वांत मोठा जलाशय म्हणजे **सागर** अथवा **समुद्र.**
पृथ्वीवरील सत्तर टक्के जागा ही समुद्रानेच व्यापलेली आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**महर्षीणाम् भृगुरहम् गिरामस्म्येकमक्षरम् ।**
**यज्ञानाञ् जपयज्ञोऽस्मि स्थावराणाम् हिमालयः ॥ २५ ॥**

महर्षींच्यामधे **भृगु** मी, वाणी किंवा वचनांच्यामधे **ॐ**कार मी, यज्ञांच्यामधे **जपयज्ञ** मी आणि स्थिर राहणाऱ्या पदार्थांच्यामधे **हिमालय** मी आहे.

प्रत्येक कल्पामधे वेगवेगळे महर्षी होऊन गेलेले आहेत. त्यामुळे महर्षी अनेक आहेत.
ह्या अगोदरच्या दुसऱ्या श्लोकामधे ' महर्षी कोणाला म्हणायचे?' ह्याविषयी माहिती आलेली आहे.
तसेच सहाव्या श्लोकामधे ( **महर्षयः सप्त पूर्वे चत्वारः)** एकूण अकरा महर्षींची नांवे आलेली असून त्यांना परमेश्वराचे मानस भाव असे म्हटलेले आहे. तरीही त्यांच्यापैकी कोणालाही **विभूति** म्हटलेले नाही. ही महत्त्वाची गोष्ट आहे असे मला वाटते.
आतापर्यंत जे जे महर्षी होऊन गेले, त्यांच्यामधे हे **भृगु** महर्षी सर्वात प्रभावी, अत्यंत तेजस्वी, महाज्ञानी, भविष्यवेत्ते आणि निःसीम भगवद्भक्त होते. ज्योतिष शास्त्राचा मानदंड म्हणून मान्यता असलेल्या **भृगुसंहिते** ची रचना त्यांनीच केलेली आहे.
म्हणूनच त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

अर्थ व्यक्त करणाऱ्या कोणत्याही शब्दाला वाणी असे म्हणतात. **( गीः )** असे जेवढे म्हणून शब्द आहेत त्यामधे एका अक्षराचा बनलेला **( एकम् अक्षरम् )** साडेतीन मात्रांचा **ओंकार ( ॐ )** सर्वश्रेष्ठ आहे.
तो **आदिनाद** आहे. तो **आदिशब्द** आहे. तो **शब्दब्रह्म** आहे. **नादब्रह्म** आहे.
तो स्वतः **नाम** ही आहे आणि **नामी** ही आहे. म्हणजे तो त्याचेच नांव आहे आणि तोच त्याचे नांव आहे. जे नांव उच्चारायचे ते आणि ते नांव ज्याचे आहे तो परब्रह्म परमात्माही तोच आहे. म्हणून तो **जाप्य** आहे. म्हणजे तो सतत जप करण्यास योग्य आहे.
त्याचा सतत उच्चार करीत राहिल्याने माणसाच्या मनाची आणि बुद्धीची शुद्धी **( अंतरशुद्धी )** आपोआप व्हायला लागते.
तशी शुद्धी व्हायला एकदा सुरवात झाली म्हणजे मग आचारशुद्धी, विचारशुद्धी, व्यवहारशुद्धी, शरीरशुद्धी, कल्पनाशुद्धी, इत्यादी बाह्यशुद्धीही आपोआप घडून यायला लागतात. आपल्या अंतरंगामधे डोकावून पाहण्याची प्रबळ इच्छा व्हायला लागते. स्वतःचाच शोध घ्यायचा नाद लागतो. सत्याचा शोध घ्यायची अनिवार्य प्रेरणा होते. तसे केल्यावाचून राहता येतच नाही.
त्या दिशेने साधकाचा प्रवास सुरू होतो. जसजशी ही अंतरबाह्यशुद्धी व्हायला लागते तसतसा साधक आध्यात्मिक दृष्टीने बलवान व्हायला लागतो. त्याला आंतरीक शक्ती प्राप्त व्हायला लागते. त्याची मानसिक शक्ती वाढायला लागते. त्याला कशाचीही भिती वाटेनाशी होते. ' जे शुद्ध असते ते बलवान असते. म्हणून **सत्य** हे बलवान असते.' हा निसर्गाचा नियम आहे.
**( Any thing which is pure is strong, and so is truth.)**
**ओंकार** म्हणजे सत्याचा उत्कर्ष आहे. सत्याची परिसीमा आहे. किंबहुना ओंकार स्वतःच सत्यरूप आहे.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**यज्ञ** अनेक प्रकारचे आहेत. आपले विहित कर्म करणे म्हणजेही यज्ञ करणेच आहे.
ह्या अगोदर चवथ्या अध्यायामधे, ' सकामकर्मरूप यज्ञ, निष्कामकर्मरूप यज्ञ, इंद्रियांचे दमनरूप यज्ञ, इंद्रियांचे नियमनरूप यज्ञ, अष्टांगयोगसाधनारूप यज्ञ, दानरूप यज्ञ, तपोरूप यज्ञ, स्वाध्यायरूप ज्ञानयज्ञ, प्राणायामसाधनारूप यज्ञ, आहाराचे नियमनरूप यज्ञ,' इत्यादी यज्ञाचे निरनिराळे प्रकार सांगण्यात आलेले आहेत. ह्या सर्व प्रकारच्या यज्ञांचे काही विशिष्ट नियम असतात.
काही विशिष्ठ क्रिया असतात, उपचार असतात. काही विशिष्ट पद्धत असते. म्हणून अशा यज्ञाना **' विधि - यज्ञ '** असे म्हणतात.
परंतु **जपयज्ञ** हा इतर सर्व यज्ञांच्यापेक्षा वेगळा आहे आणि विशेष आहे. जपयज्ञ म्हणजे सतत जप करणे.
म्हणजेच ' सतत परमेश्वराचे नांव घेत राहणे, त्याचे स्मरण करीत राहणे.' त्यासाठी कोणत्याही विधीची आवश्यकता नसते.
हातात जपाची माळ, कपाळावर टिळा, वगैरे सोपस्कारांची आवश्यकता नसते. विशिष्ट स्थळ, काळ, वेळ, मुहूर्त इत्यादींचीही आवश्यकता नसते. कोणत्याही वेळी आणि कुठेही, अगदी रस्त्याने चालत असतानाही, जप करता येतो.
जपयज्ञामधे हिंसेचा अभाव आहे. तो पूर्णपणे अहिंसक यज्ञ आहे.

‘ इतर कोणत्याही यज्ञापेक्षा **जपयज्ञ** हा श्रेष्ठ आहे आणि जपयज्ञामधेही मानसजप हा सर्वश्रेष्ठ आहे.’ अशी सनातन धर्मशास्त्राची मान्यता आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**स्थावर** म्हणजे स्थिर असणारा आणि स्थिर राहणारा. सर्व पर्वत हे स्थिर असतात.

**हिमालय** हा सर्व पर्वतांचा राजा आहे. सर्वात उत्तम असा पर्वत आहे. त्याचे शरीर म्हणजे परम पवित्र अशी तपोभूमी आहे. भगवान नारायण आणि नर ह्या दोघांनी हिमालयावर दीर्घकाळ तपश्चर्या केलेली आहे. तो मनुष्याला मुक्तिमार्गावर सहाय्य करणारा आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**अश्वत्थ: सर्ववृक्षाणाम् देवर्षीणाञ् च नारद: ।**
**गन्धर्वाणाञ् चित्ररथ: सिद्धानाङ् कपिलो मुनि: ॥ २६ ॥**

वृक्षांच्यामधे **पिंपळ** मी, देवर्षींच्यामधे **नारद** मी, गंधर्वांच्यामधे **चित्ररथ** मी आणि सिद्धांच्यामधे **कपिलमुनी** मी आहे.

**अश्वत्थ** म्हणजे पिंपळाचे झाड. वृक्ष अनेक आहेत आणि ते सगळे महत्त्वाचे आहेत. निसर्गाचे चक्र सुरळीतपणे चालू राहण्यासाठी, आपापल्या परीने, सगळेच वृक्ष फार उपयोगी आहेत, आवश्यक आहेत हे आपण नेहमीच पहातो व अनुभवीत असतो.

सतत सुगंधाची उधळण करणारे असे चंदनासारखे वृक्ष आहेत.

विविध रंगांची आणि आकारांची सुवासिक फुले देणारे वृक्ष आहेत.

गोड, आंबट, तुरट, इत्यादी विविध चवी असणारी रसाळ फळे देणारे वृक्ष आहेत.

ज्यांची पाने, खोड आणि मुळे औषधासाठी वापरण्यात येतात असे वृक्ष आहेत.

आपल्या रोजच्या वापरासाठी लागणाऱ्या अनेक वस्तू ज्यांच्या खोडापासून तयार केल्या जातात असे अनेक वृक्ष आहेत.

पाण्यात राहूनही वर्षानुवर्षे टिकून राहणारे, खराब न होणारे असे लाकूड देणारे वृक्षही आहेत. पण त्यांच्यापैकी कोणालाही **विभूति** म्हटलेले नाही. ही महत्वाची गोष्ट आहे आणि त्यामागे विशेष कारण आहे.

हिंदू पुराणानुसार पिंपळ हा अत्यंत पवित्र वृक्ष आहे. ‘ त्याची मुळे स्वर्गलोकांत असून मृत्युलोकामधे विस्तार झालेला आहे ’ अशी मान्यता आहे. पुढे पंधराव्या अध्यायात ह्याविषयीची अधिक माहिती येणार आहे.

तो स्थलकाळाच्या पलीकडे असलेल्या जीवनाचे रूप आहे. त्यालाच **बोधीवृक्ष** म्हणजे ‘ बोध करून देणारा वृक्ष.’ असे नांव आहे. गौतम बुद्धांना ह्याच्याच खाली बसून ध्यानधारणा करीत असताना ज्ञान प्राप्ती झाली आहे.

यज्ञकर्मामधे ज्या समिधा वापरल्या जातात त्या पिंपळाच्या वाळलेल्या फांद्यांच्याच असतात.

म्हणून पिंपळाच्या झाडाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**देवर्षी** अनेक आहेत. परंतु **नारद** म्हणजे त्यांचा मानदंड आहेत. त्रैलोक्यामधे सर्वत्र संचार करीत असणारे, मुखाने सतत परमेश्वराचे नांव घेत राहणारे, सतत परमेश्वराचेच स्मरण, भजन, पूजन, चिंतन, मनन करीत राहणारे, सतत परमेश्वराच्या गुणांचे आणि पराक्रमाचे वर्णन म्हणजेच **कीर्तन** करीत राहणारे असे नारदमुनी हे **‘ आद्य कीर्तनकार ’** आहेत. त्यांच्या विषयी आणि त्यांच्या कीर्तनकलेवरील प्रभुत्वाविषयी असलेला आदर व्यक्त करण्यासाठी, ज्या स्थानी उभे राहून कीर्तन केले जाते, त्या स्थानाला **‘ नारदपीठ ’** असे नांव दिले गेले आहे. नारदपीठावर उभे राहून कीर्तन करणारा मनुष्य हा चारित्र्यवान, गुणवान, बुद्धिवान, नीतिवान आणि अंतर्बाह्य शुचिर्भूत असणे अपेक्षित असते. हे नांव आजही प्रचारात आहे. ‘ भक्तियोगाची पूर्णावस्था ’ म्हणजे नारदमुनी.

म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**गंधर्व** ही देवयोनीमधील एक शाखा आहे. आपण सर्वसाधारणपणे गंधर्व म्हणजे, ‘ संगीतकलेचे ज्ञान असणारा आणि उत्तम गाणारा.’ असे समजतो. परंतु संगीत म्हणजे केवळ गायन नाही. **‘ गायन, वादन आणि नृत्य ’** ह्या तीनही स्वतंत्र कलांचे परम ऐक्य दर्शविणाऱ्या परिपूर्ण अशा कलेला संगीत असे नांव आहे. त्यामुळे गायन, वादन, नृत्य आणि अभिनय ( अभिनय हा नृत्यामधे अंतर्भूत आहे ) ह्या चारही कलांचे ज्ञान असलेला, त्यांवर प्रभुत्व असलेला असा जो, तो गंधर्व.

देवलोकामधील सर्वात सुंदर, रूपवान आणि गुणवान अशी ही मंडळी स्वर्गामधे सर्वांचे मनोरंजन करीत असतात असे म्हणतात. ह्यांच्यात **मर्त्य** आणि **दिव्य** असे दोन प्रकार आहेत. ज्या मनुष्याला, त्याच्या पुण्यबलाने मृत्यूनंतर गंधर्वलोक प्राप्त होतो तो **‘ मर्त्यगंधर्व ’** आणि ज्याला कल्पारंभापासूनच गंधर्वयोनी प्राप्त झालेली आहे तो **‘ दिव्यगंधर्व ’.**

ह्या सर्व गंधर्व मंडळींच्यामधे **चित्ररथ** हा दिव्यगंधर्व असून, तो संगीतशास्त्रामधे पूर्णज्ञानी, अत्यंत निष्णात आणि सर्वोत्तम सादरीकरण करणारा **( Best Performer.)** आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**सिद्ध** अनेक आहेत. परंतु त्यामधे **कपिलाचार्य** हे सर्वश्रेष्ठ आहेत. ह्या सकल क्षर म्हणजे स्थूल आणि अक्षर म्हणजे सूक्ष्म सृष्टीचा

योग्य पद्धतीने सखोल विचार करणारी अशी **' न्यायशास्त्र, सांख्यशास्त्र आणि वेदांतसूत्रे '** ही तीन प्राचीन शास्त्रे आहेत.
त्यापैकी सांख्यशास्त्राचे प्रणेते कपिलाचार्य आहेत. म्हणूनच सांख्यशास्त्राला **' कपिलसांख्यशास्त्र '** असेच नांव दिलेले आहे.
यापूर्वी दुसऱ्या अध्यायामधे, अर्जुनाने विनंती केल्यानंतर ११ ते ३९ ह्या श्लोकांमधे, ' सांख्यनिष्ठेचा विचार केला तरीही तुझे आताचे वागणे योग्य नाही.' असे सांगताना श्रीकृष्णाने कपिलाचार्यांच्या सांख्यशास्त्राचाच उहापोह केलेला आहे.
म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**उच्चै:श्रवसमश्वानाम् विद्धि माममृतोद्भवम् ।**
**ऐरावतङ् गजेंद्राणाम् नराणाञ् च नराधिपम् ।। २७ ।।**

घोड्यांच्यामधे अमृतमंथनाच्या वेळी निघालेला **उच्चै:श्रवा** मी, हत्तींच्यामधे **ऐरावत** मी आणि मनुष्यांच्या मधे त्यांचा **राजा** मी आहे.
**अश्व** म्हणजे घोडा. सर्व चतुष्पाद प्राण्यांच्यामधे घोडा हा विशेष प्राणी आहे.
त्याच्यापेक्षा रुबाबदार दिसणारे, त्याच्यापेक्षा शक्तिवान, त्याच्यापेक्षा चपळ असे प्राणी आहेत.
परंतु तो **' रुबाबदारपणा, शक्ती, ऊर्जा, चापल्य, कार्यक्षमता,'** इत्यादी गुणांचा मानदंड आहे. कोणत्याही यंत्राची कार्यक्षमता मोजताना ती घोड्याच्या शक्तीच्या तुलनेतच, **' अश्वशक्ती '** मधेच मोजली जाते. **( Horse Power )**
जेव्हा देव आणि दैत्यांनी एकत्र होऊन समुद्रमंथन केले, तेव्हा त्यामधून बाहेर निघालेल्या चौदा रत्नांमधे **उच्चै:श्रवा** नांवाच्या अश्वाचा समावेश होता अशी मान्यता आहे. हा उच्चै:श्रवा सर्व अश्वांच्यामधे श्रेष्ठ आहे. कार्यक्षम आहे. सर्वोत्तम आहे.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**गज** म्हणजे हत्ती. हत्तीला शारिरीक शक्तीचे प्रतिक मानलेले आहे. त्यांच्यामधेही बलानुसार श्रेणी आहेत. सर्वांत बलवान असलेल्या हत्तीला **गजराज** किंवा **गजेंद्र** असे म्हणतात. पूर्वीच्या काळी हत्तीला राज्याच्या सामर्थ्याचे प्रतिक आणि भूषण मानीत असत.
ज्या राजाचे गजदल मोठे तो अधिक सामर्थ्यवान आणि संपन्न मानला जात असे.
समुद्रामधून बाहेर निघालेल्या चौदा रत्नांमधे **ऐरावत** नांवाच्या हत्तीचाही समावेश होता अशी मान्यता आहे.
हा ऐरावत हत्ती रंगाने पांढराशुभ्र असून, देवराज इंद्राचे वाहन आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**नर** ह्या शब्दाचा अर्थ **पुरुष** असा आहे. परंतु ह्या ठिकाणी तसा अर्थ घेणे योग्य ठरणार नाही. येथे नर म्हणजे **मनुष्यप्राणी** असा अर्थ घेतला पाहिजे. म्हणजे त्यामधे **स्त्रिया आणि पुरुष** ह्या दोघांचाही समावेश होईल. असो.
अनेक व्यक्ती एकत्र आल्या, एकमेकांच्या सहकार्याने राहायला लागल्या म्हणजे एक **कुटुंब** बनते.
अनेक कुटुंबे एकत्र आली, एकमेकांच्या सहकार्याने राहायला लागली म्हणजे एक **समाज** बनतो. अनेक समाज एकत्र आले, एकमेकांच्या सहकार्याने राहायला लागले म्हणजे मग, ते सगळे समाज आणि त्यांनी व्यापलेली भूमी ह्या दोघांचे मिळून **राज्य** बनते.
**राज्य** ही एक भौगोलिक संज्ञा आहे. राज्याला भौगोलिक मर्यादा असतात. राज्य हे नकाशा काढून प्रत्यक्ष दाखविता येते.
मोजमाप करून दाखविता येते. त्याच्या सीमा निश्चितपणे सांगता व दाखवता येतात.
ह्या राज्यामधे राहणारे अधिकृत नागरीक म्हणजे **प्रजा.**
ही प्रजा ज्याला **ईश्वरासारखा** मानते, ज्याचा **आदर** करते, ज्याच्यावर **प्रेम** करते, ज्याच्याविषयी **अभिमान** बाळगते, ज्याला ठरल्याप्रमाणे नियमीतपणे **करभार** देते, ज्याचा **सर्वोच्च अधिकार** मनापासून मान्य करते आणि स्वीकारते, ज्याच्या प्रत्येक **आज्ञेचे कसोशीने पालन** करते, आपल्या अडचणीच्या काळात ज्याच्याकडून **मदतीची** अपेक्षा करते, अशी व्यक्ती म्हणजेच, सामान्यपणे सर्वांच्या आदरास व अभिमानास पात्र असलेली, सर्वाना मान्य असलेली, सर्वोच्च अधिकार असलेली आणि समाजाच्या बऱ्यावाईट अवस्थेला संपूर्णपणे जबाबदार असलेली व्यक्ती म्हणजे **राजा!** राजा हा प्रजेसाठी परमेश्वररूप असतो. परमेश्वराचे प्रतिकच असतो.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**आयुधानाम् अहम् वज्रम् धेनूनामस्मि कामधुक् ।**
**प्रजनश्चास्मि कंदर्प: सर्पाणामस्मि वासुकि: ।। २८ ।।**

आयुधांच्यामधे **वज्र** मी, गायींच्यामधे **कामधेनू** मी, प्रजोत्पादन करणारा **काम** मी आणि सर्पांच्यामधे **वासुकी** मी आहे.
**आयुध** म्हणजे विविध प्रकारची शस्त्रे आणि अस्त्रे.
युद्धामधे रणांगणावर शत्रूबरोबर समोरासमोर लढताना म्हणजेच द्वंद्वयुद्ध करताना **( Combat )** वापरायच्या आयुधांना शस्त्रे असे म्हणतात. धनुष्यबाण, तलवार, भाला, बर्ची, कट्यार, त्रिशूळ, मुसळ, गदा इत्यादी **शस्त्रे** होत.

जेव्हां शत्रूच्या सैन्याचा फार मोठ्या प्रमाणावर विनाश घडवून आणायचा असेल **( Mass Distruction )** किंवा अजिंक्य अशा डोईजड होत चाललेल्या शत्रूला ठार मारायचे असेल त्यावेळी वापरायच्या आयुधांना **अस्त्रे** असे म्हणतात.
महाभारतीय महायुद्धामधे अनेक अस्त्रांचे सविस्तर वर्णन आलेले आहे.
त्या अस्त्रांच्या वापराने ' आगी लावणे, शत्रूसैन्य सरसकट जाळून टाकणे, पाऊस पाडणे, धुळीचे वादळ निर्माण करणे, शत्रूसैन्याला बेशुद्ध पाडणे किंवा संमोहित करणे, वेगाने वाहणारे वारे निर्माण करणे, अमानुष योध्याला शोधून त्याचा वध करणे, एकदा सोडलेल्या अस्त्रामधून अनेक बाण सतत सुटत राहणे आणि त्यांच्या योगे विविध लक्ष्यांचा भेद होत राहणे, एकदा सोडलेले अस्त्र अनेक ठिकाणी जाऊन त्याचे स्फोट होत राहणे.' इत्यादी अनेक कार्ये रणांगणावर घडवून आणता येत असत. तसे सुस्पष्ट उल्लेख अनेकदा आलेले आहेत. त्यांचे वर्णनही आलेले आहे.
आजच्या आधुनिक युद्धामध्ये नियमितपणे वापरल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या बॉंब, अग्निबाण इत्यादींच्या वापराने, वर सांगितलेल्या सर्व गोष्टी अक्षरश: घडवून आणता येतात हे आपणा सर्वांनाच माहिती आहे.
अणुबॉंबने झालेला विध्वंस दोन वेळा दिसलेला आहे आणि तो इतका भयंकर होता की अणुबॉंबचा परत वापर करायची माणसाची हिंमतच होत नाही. नुसत्याच पोकळ धमक्या दिल्या जातात. एखाद्या माथेफिरू अतिरेक्याच्या हातूनच तसा वापर होऊ शकेल.
ह्या आजच्या अस्त्रांचे तंत्र आणि शास्त्र आपल्याला माहीत आहे. पण त्यावेळच्या अस्त्रांचे तंत्र आणि मंत्र आपल्याला आज माहीत नाहीत. तरीही, अस्त्रप्रयोगानंतर होणाऱ्या परिणामांचे वर्णन वाचल्यानंतर मात्र वाचकाला, **' असे झाले असू शकेल!'** इतके निश्चितपणे समजता येईल. असो.
तर आयुधे अनेक आहेत. परंतु सर्व आयुधांमधे, दधिची ऋषींच्या अस्थींच्यापासून निर्माण केलेले, ' **वज्र** ' हे सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम आणि अत्यंत परिणामकारक असे आयुध आहे. पुराणांमधे अशी माहिती दिलेली आहे की,
' वज्र हे जमिनीवर, हवेमधे आणि पाण्यामधे, असे तीनही ठिकाणी वापरता येते. ते कधीही निकामी होत नाही. त्याचा प्रयोग कधीही असफल होत नाही. त्याचा प्रतिकार करू शकेल असे दुसरे कोणतेही अस्त्र नाही. त्यामधे प्रत्यक्ष भगवान विष्णूचे तेज विराजमान आहे.' वज्र हे देवराज इंद्राच्या हातात असते अशी मान्यता आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**धेनू** म्हणजे गाय. सनातन धर्मशास्त्राप्रमाणे गाय ही पवित्र मानलेली आहे आणि तिला देवतेचा दर्जा दिलेला आहे.
सर्व गायींच्यामधे, स्वर्गामधे निवास करणारी आणि तिच्या समोर उभे राहून ज्याची ज्याची इच्छा करावी ते ते देणारी अशी, **कामधेनू** ही सर्वात पवित्र आहे. म्हणून तिला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**प्रजन:** म्हणजे प्राणिमात्रांची उत्पत्ती. त्या उत्पत्तीचे कारण, सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी कामभावना उत्पन्न करणारा असा **' कंदर्प '** म्हणजेच **कामदेव** हा आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**सर्प** म्हणजे साप. सर्पयोनीमधे, त्यांचा राजा असलेला, अत्यंत बलवान असलेला आणि परमेश्वराचा अनन्य भक्त असलेला असा **वासुकी** नांवाचा सर्प सर्वश्रेष्ठ आहे. समुद्रमंथनाच्या वेळी **' मेरू पर्वतरूपी रवीला, वेढे घालून गोल गोल फिरविण्यासाठी '** एखाद्या बळकट दोरीसारखा, त्याचा उपयोग करण्यात आला होता. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**अनन्तश्चास्मि नागानाम् वरुणो यादसामहम् ।**
**पितृणाम् अर्यमा चास्मि यम: संयमतामहम् ।। २९ ।।**

नागांच्यामधे **अनंत** मी, जलचरांच्यामधे त्यांचा अधिपती **वरुण** मी, पितरांच्यामधे **अर्यमा** मी आणि नियमन करणाऱ्यांच्यामधे **यम** मी आहे.
**नाग** योनीमधे, त्यांचा राजा असलेला **' अनंत '** म्हणजेच **शेष** नाग हा सर्वात बलवान आहे. त्याला हजार तोंडे ( फणा ) असून तो अत्यंत भक्तिभावाने, भगवान् विष्णूची शैय्या बनलेला आहे. त्याने आपल्या हजार फणा पसरवून, विश्रांती घेत असलेल्या भगवंताच्या मस्तकावर छत्र धरलेले आहे. त्याशिवाय तो भगवंताच्या प्रत्येक अवतारामधे सहभागी होण्यासाठी, स्वत:ही अवतार घेतो आणि परमेश्वराच्या नियोजित अवतारकार्यामधे सर्वतोपरी मदत करतो अशी मान्यता आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**यादसाम्** म्हणजे सर्व जलचर आणि सर्व जलदेवता. **' वरुणदेव '** हा त्यांचा अधिपती आहे. तो लोकपालही आहे आणि परमेश्वराचा भक्तही आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**पितृणाम्** म्हणजे पितरांच्यामधे. शिवपुराणामधे सात पितृगण सांगितलेले आहेत.
**' कव्यवाह, अनल, सोम, यम, अर्यमा, अग्निष्वात्त आणि बर्हिषद् '** ही त्यांची नांवे आहेत.
त्यांच्यामधे **' अर्यमा '** नांवाचे पितृगण सर्वश्रेष्ठ आहेत. म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**संयमताम्** म्हणजे नियमन करणारे, न्याय करणारे, शासन करणारे अधिकारी.

हे असे अधिकारी, नक्की काय काय करतात? तर सर्व विश्वामधील प्रत्येक प्राण्याच्या सर्व कर्मांचा हिशोब ठेवतात. **( Record ),** त्याचा झाडा घेतात **( Audit )** आणि प्रत्येकाने आपल्या आयुष्यामधे केलेल्या पाप आणि पुण्यानुसार उत्पन्न होणारी बरी - वाईट फळे भोगायला लावतात. **( Cross Examination and Judgement )**

हे अनेक आहेत. परंतु, त्यांच्यामधे **' यमराज '** सर्वात श्रेष्ठ आणि शक्तिवान आहे.

तो कोणावरही आणि कधीही, अन्याय करीत नाही. त्याची प्रत्येक कृती, प्रत्येक न्यायनिवाडा हा धर्माला धरून, हितकारक, कल्याणप्रद आणि पापनाशक असाच असतो. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**प्रह्लादश्चास्मि दैत्यानाम् कालः कलयतामहम् ।**

**मृगाणाञ् च मृगेन्द्रोऽहम् वैनतेयश्च पक्षिणाम् ।। ३० ।।**

दैत्यांच्यामधे **प्रल्हाद** मी, ग्रासणाऱ्यांच्यामधे **काल** मी, पशूंच्यामधे **सिंह** मी आणि पक्षांच्यामधे **गरुड** मी आहे.

**दैत्य** म्हणजे दानव म्हणजे असुर म्हणजेच राक्षस. जे **सुर** म्हणजे देव नाहीत ते **असुर.**

राक्षस म्हणजे क्रूर, वाईट, अत्याचार करणारे अशी आपली समजूत असते. ती खरी आहे. परंतु त्यांच्यामधेही आदर्श व्यक्ती होऊन गेल्या आहेत. अनेक बुद्धिवान, ज्ञानवान, चारित्र्यवान अशा व्यक्ती होऊन गेलेल्या आहेत. त्या सर्वांच्यामधे, दैत्यराज हिरण्यकशिपूचा पुत्र **' प्रह्लाद '** हा सर्वश्रेष्ठ असा महान विष्णुभक्त आहे. दशावतारांच्यापैकी चवथा **नरसिंहावतार** हा त्याचे रक्षण करण्यासाठीच झालेला आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**कलयताम्** म्हणजे गणना करण्याची, मोजमापाची साधने. गणितशास्त्राचा, गणनेचा मुख्य आधार.

काळ - काम - वेग **( Time – Work – Speed )** ही तीन मूलभूत तत्वे म्हणजे गणितशास्त्राचा **( Mathematics )** पाया आहे. तसेच ह्या तीन तत्त्वांच्यामधे **' काळ '** हा मुख्य आहे. काम आणि वेग हे दोन्हीही कालसापेक्षच असतात.

ते काळाशी निगडीत असतात. त्यांचे मोजमाप घेण्यासाठी, गणना करण्यासाठी, काळाचा आधार घ्यावाच लागतो.

काळ मोजण्यासाठी वापरायची ' तृटी, वेध, लव, निमिष, क्षण, सेकंद, मिनिट, तास, प्रहर, दिवस, आठवडा, पंधरवडा, महिना, वर्ष.' इत्यादी मापे आहेत. मागे आठव्या अध्यायामधे आपण काळ ह्या संकल्पनेविषयी सविस्तर चर्चा केलेली आहे. त्यामुळे आता त्याविषयी काही सांगण्याची आवश्यकता नाही.

**कलयताम्** ह्या शब्दाचा आणखी एक अर्थ सांगितलेला आहे. तो म्हणजे ग्रासणारा, झिजवून क्षीण करणारा आणि नष्ट करणारा.

ह्या कार्यामधे काळाइतका प्रभावशाली दुसरा कोणीही नाही. काळ कोणालाही सोडत नाही. सर्व प्राणिमात्र काळाच्या ओघामधे नष्ट होतातच. त्याला कोणाचाही अपवाद नाही. एका परब्रह्म परमात्म्याला सोडून दुसरे कोणीही अमर नाही.

म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**मृगाणाम्** म्हणजे पशुवर्गातले सर्व जीवमात्र. पाठीचा कणा जमिनीला समांतर असणारे आणि सदैव त्या अवस्थेतच वावरणारे असे चार पायांचे प्राणी. त्या सर्व प्राण्यांचा राजा असलेला असा **' सिंह '** सर्वात बलवान, तेजस्वी, रुबाबदार, शूर आणि आक्रमक आहे.

म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**पक्षिणाम्** म्हणजे पक्षीवर्गातले सर्व जीवमात्र. दोन पाय आणि दोन पंख असलेले, आकाशामधे उडणारे असे सर्व जीवमात्र. त्यांच्यामधे **वैनतेय** ( विनितेचा पुत्र ) असलेला **' गरुड '** हा सर्वात मोठा, शक्तिवान, पराक्रमी आणि अतिशय वेगाने उडणारा असा आहे.

शिवाय तो भगवान् विष्णूचे वाहन आहे. त्याचा अनन्य भक्त आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।**

**झषाणाम् मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ।। ३१ ।।**

वेगवानांच्यामधे वायु मी, शस्त्रधाऱ्यांच्यामधे राम मी, जलचरांच्यामधे मगर मी आहे. नद्यांच्यामधे भागिरथी - गंगा मी,

**पवताम्** म्हणजे वेगाने वाहणारे. एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जलद गतीने भ्रमण करणारे. त्यांच्यामधे पवन म्हणजे **' वायू '** अत्यंत गतिमान आहे. बलवान आहे. अत्यंत चपळ आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**शस्त्रभृताम्** म्हणजे हातात शस्त्र धारण करणारे आणि त्याचा यशस्वीपणे वापर करणारे योद्धे.

ह्यांच्यामधे **' अयोध्येचा राजा, रघुकुलदीपक, दशरथनंदन, सीतापती, महाबली हनुमंत ज्याचा दास आहे तो, एकपत्नी - एकवचनी - एकबाणी '** असा राजाधिराज प्रभू **' रामचंद्र '** हा **सर्वश्रेष्ठ** आहे. **आदर्श** आहे.

**सर्वोत्तम** आहे. तो परब्रह्म परमात्म्याचा सातवा अवतारही आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**झषाणाम्** म्हणजे मत्स्य योनीतील पाण्यामधे राहणारे सर्व जीवमात्र. सर्व प्रकारचे जलचर.
ह्यांच्यामधे उभयचर असलेला, म्हणजेच पाण्यात आणि जमिनीवर अशा दोन्ही ठिकाणी राहू शकणारा असा **' मगर '** सर्वांत बलवान आहे. स्वभावत:च अत्यंत आक्रमक आहे. **( Aggressive )** म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**स्रोतसाम्** म्हणजे पाण्याचे सर्व प्रवाह म्हणजेच सर्व नद्या. ह्यांच्यामधे जाह्नवी म्हणजेच परमपवित्र **' गंगा नदी '** सर्वश्रेष्ठ आहे.
ती सुरनदी म्हणजे देवलोकींची नदी आहे. तिला महादेव शंकरांने आपल्या मस्तकावर धारण केलेली आहे. तिच्या पवित्र अशा जलामधे स्नान केले असता सर्व पापे नाहीशी होतात अशी मान्यता आहे. म्हणून तिला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**सर्गाणामादिरन्तश्च मध्यम् चैवाहमर्जुन ।**
**अध्यात्मविद्या विद्यानाम् वाद: प्रवदतामहम् ।। ३२ ।।**

हे अर्जुना ! सर्व सृष्टीचा आदि, अंत व मध्यही मी, विद्यांच्यामधे अध्यात्मविद्या मी आहे. परस्परांत वादविवाद करणाऱ्यांचा वादविषय मी आहे.
**सर्गाणाम्** म्हणजे सर्व चल आणि अचल विश्व. अखिल विश्वामधे कोणत्याही स्वरुपामधे जे जे आहे, ते ते सर्वकाही म्हणजेच **' संपूर्ण चराचर सृष्टी '** होय. तिचा **' आदि, अंत आणि मध्य '** केवळ परमेश्वरच आहे.
ह्या अगोदर विसाव्या श्लोकामधे, सर्व भूतांचा ' आदि, मध्य आणि अंत ' एकमात्र परमेश्वरच आहे, असे सांगितले आहे.
ते सचेतन भूतांच्या संदर्भात सांगितलेले आहे. येथे मात्र तसेच विधान सर्व चराचर सृष्टीच्या संदर्भामधे केलेले आहे.
**विद्यानाम्** म्हणजे सर्व ज्ञात अथवा अज्ञात विद्या. ह्या सर्व विद्यांच्यामधे आत्म्याशी संबंधित असलेली **अध्यात्मविद्या** म्हणजेच ब्रह्मविद्या ही सर्वश्रेष्ठ आहे. **अधि** आणि **आत्म** ह्या दोन शब्दांच्या संयोगाने **अध्यात्म** हा शब्द बनलेला आहे.
आत्म म्हणजे **' आत्मा अथवा आत्मतत्त्व '** आणि अधि म्हणजे **' त्याच्या ठिकाणी असणारे.'**
ही विद्या **' आत्मा आणि परमात्मा '** ह्यांच्याशी संबंधित असून, आत्मतत्त्वा विषयीचे ज्ञान प्रकाशित करते. त्यावर प्रकाश टाकते.
तिचा सतत अभ्यास केल्याने अंतत: माणसाला परब्रह्म परमात्म्याचा साक्षात्कार घडतो. त्याचे जगाविषयीचे अज्ञान नाहीसे होते. प्रकृतीचे सर्व बंध तुटतात आणि मोक्षप्राप्तीच्या मार्गावर प्रगती होते. इतर कोणत्याही विद्येने असे घडून येत नाही.
म्हणून तिला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**प्रवदताम्** म्हणजे एकमेकांशी विवाद करणारे. शास्त्रामधे तीन प्रकारचे विवाद सांगितलेले आहेत.
**' जल्प, वितंड आणि वाद.'** ही त्यांची नांवे आहेत.
**जल्प** विवाद म्हणजे योग्य काय आणि अयोग्य काय ह्यांचे भान न राखता आपल्या मताचे समर्थन आणि इतरांच्या मताचे खंडन करणे.
**वितंड** विवाद म्हणजे कोणताही सारासार विचार न करता, सतत इतरांचे मत चुकीचे आहे असेच सांगत राहणे. केवळ विरोधासाठी विरोध करणे.
**वाद** विवाद म्हणजे सत्य काय ते समजून घेण्याच्या हेतूने, शुद्ध बुद्धीने आणि स्वच्छ मनाने केलेली चर्चा.
ह्यांपैकी जल्पविवाद आणि वितंडविवाद ह्या दोन प्रकारच्या विवादांमुळे उभय पक्षांमधे ' राग, द्वेष, गर्व आणि हिंसा ' इत्यादींची निर्मिती होऊ शकते. परस्पर संबंधामधे वितुष्ट येऊ शकते. म्हणून ते त्याज्य आहेत असे सांगितलेले आहे.
**वाद** विवादाने मात्र तसे होत नाही. त्यायोगे सत्य काय ते समजण्यास आणि कल्याण साधण्यास मदत होते. परस्पर संबंधामधे सुधारणा होते. त्यामुळे जेव्हा खरोखरच आवश्यकता असेल तेव्हाच, परस्पर संमतीने वादविवाद करावा असे सांगितलेले आहे.
म्हणून वादविवादाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**अक्षराणाम् अकारोऽस्मि द्वन्द्व: सामासिकस्य च ।**
**अहमेवाक्षय: काल: धाताऽहम् विश्वतोमुख: ।। ३३ ।।**

अक्षरांच्यामधे अकार मी, समासांच्यामधे द्वंद्व समास मी आहे. अक्षय काल मी, चारही बाजूंना तोंडे असलेला धाता म्हणजे ब्रह्मदेवही मीच आहे.
**अक्षराणाम्** म्हणजे सर्व अक्षरे. त्यांच्यापैकी **अकार** म्हणजे **' अ '** हे अक्षर सर्वात महत्त्वाचे आहे. **अ** च्या बाराखडीमधे, अकाराच्या मागोमाग येणारी जी अकरा अक्षरे आहेत, **( आ, अि, अी, अु, अू, अे, अै, ओ, औ, अं** आणि **अ:)** ती अकाराचीच वेगवेगळी रूपे आहेत. **( बाराखडी )** त्यांनाच **मुळाक्षरे** म्हणतात. ह्या सर्व मुळाक्षरांचे मूळ अकारच आहे.
त्यांना लिहिताना आणि त्यांचा उच्चार करताना आपल्याला ही गोष्ट आपोआप समजून येते. हे सगळे **स्वर** आहेत.
त्यानंतर येणारी **क** ते **ज्ञ** ही छत्तीस **व्यंजने** असून, त्या त्या व्यंजनामधे अकार मिसळला म्हणजे तयार होतात.

त्यांच्या बाराखड्याही अकाराच्या विविध रूपांच्या सहाय्यानेच तयार होतात. सारांश काय तर अकाराला वगळायचे ठरविले तर आपल्याला बोलताच येणार नाही. पायमोडक्या व्यंजनांचे केवळ निरर्थक असे आवाज काढत रहावे लागेल.
संगीतशास्त्रामधे **षडज्** म्हणजे **सा** हा स्वर इतर सर्व स्वरांचा जन्मदाता आहे. त्याला वगळून कोणत्याही रागाची रचना करता येत नाही. त्याचप्रमाणे **अकार** हा सर्व अक्षरांचा जन्मदाता आहे. पिता आहे. त्याच्या आधाराशिवाय कोणालाही काहीही बोलता येणार नाही. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**सामासिकस्य** म्हणजे व्याकरणातील समास. समास म्हणजे दोन स्वतंत्र शब्दांचे एकत्र येणे.
संस्कृत व्याकरणामधे चार प्रकारचे समास सांगितलेले आहेत. **' अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीहि आणि द्वंद्व '** ही त्यांची नांवे आहेत. **' कर्मधारय आणि द्विगु '** हे दोन्ही प्रकारचे समास **तत्पुरुष** समासामधेच येतात.
ह्या सर्व समासांच्यामधे अर्थाच्या दृष्टीने दोनही मूळ शब्दांना सारखेच महत्व असलेला असा **' द्वंद्व समास '** हा इतरांच्याहून श्रेष्ठ मानला जातो. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**अक्षयः कालः** म्हणजे काळाचाही काळ. **महाकाळ.**
शास्त्रामधे एकूण तीन प्रकारचे काळ सांगितलेले आहेत. पहिला **' समयवाचक काळ.'** हा काळ स्थूल आहे.
आपण सगळे ह्याच काळाची गणना करीत असतो. सेकंदापासून वर्षापर्यंतची गणना, तसेच काल **( भूत )**, आज **( वर्तमान )** आणि उद्या **( भविष्य )** ह्या सगळ्या संज्ञा स्थूलकाळामधे येतात. हा काल सापेक्ष असतो.
म्हणजे ' **आज** हा उद्याचा **काल** आहे आणि **परवा** हा उद्याचा **उद्या** आहे.'
तसेच ' **आज** हा कालचा **उद्या** आहे आणि **परवा** हा कालचा **काल** आहे.'
ह्या काळालाच समयवाचक काळ असे म्हणतात. थोडाफार का होईना पण, आपण ह्याचा अनुभव घेऊ शकतो.
आपल्याला जरी आपल्या शंभर ते सव्वाशे वर्षांच्या आयुष्याच्या तुलनेत हा काळ अनादि - अनंत वाटत असला तरीही त्याला शेवट आहे. क्षय आहे. अंत आहे. वर्षे संपतात. दशवर्षे संपतात. शतवर्षे संपतात. सहस्रवर्षे संपतात. लक्षवर्षे संपतात. युगे संपतात. महायुगे संपतात. कल्पे संपतात. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचे आयुष्यही संपते. ह्या सर्व काळाला शेवट आहे. कधी ना कधी त्याचा अंत होतोच.
दुसरा **' प्रकृतीरूप काळ.'** हा काळ सूक्ष्म आहे. आपल्याला हा काळ समजू शकत नाही.
कारण ह्या काळामधे सृष्टी अस्तित्वातच नसते. सर्व सृष्टीचा लय झालेला असतो. ब्रह्मदेवाचे आयुष्य संपल्यावर महाप्रलय होतो. अपरा प्रकृती नाहीशी होते आणि एक अनाकलनीय अशी अवस्था येते. हिलाच ' प्रकृतीची साम्यावस्था ' असे म्हणतात.
ह्यावेळी परा प्रकृतीदेखील क्रियाशील रहात नाही. ती सुद्धा निष्क्रिय होते.
ह्या महाप्रलयाच्या वेळेपासून, परत एकदा विश्वनिर्मितीची प्रक्रिया सुरू व्हायच्या वेळेपर्यंत जो काळ जातो त्या काळाला प्रकृतीरूप काळ असे म्हणतात. तो समयवाचक काळापेक्षा मोठा असतो असे सांगितलेले आहे.
तरीही त्यालाही शेवट आहे. क्षय आहे. कधी ना कधी त्याचा अंत होतोच. त्याचा अंत झाल्याशिवाय विश्वनिर्मितीची प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही. आपण त्याचा अनुभव घेऊ शकत नाही. केवळ त्याची कल्पना करू शकतो.
त्याच्या विषयी काहीतरी अंदाज करू शकतो इतकेच.
तिसरा **' शाश्वत काळ.'** हा काळ अगम्य आहे. अतिसूक्ष्म आहे. अनाकलनीय आहे. आपण त्याचा अनुभव घेऊ शकत नाही. त्याचा अंदाजही करू शकत नाही. त्याची कल्पनाही करू शकत नाही. त्याच्या विषयी कोणालाही काहीही सांगता येणार नाही.
पहिला समयवाचक काळ आणि दुसरा प्रकृतीरूप काळ ज्याच्यामधे सारखे येत आणि जात असतात, त्याला **' शाश्वत काळ '** असे म्हणतात. हाच काळाचाही काळ आहे. हाच **' महाकाळ '** आहे. म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
ह्या अगोदर तिसाव्या श्लोकामधे काळाचा उल्लेख ' गणना करणाऱ्यांच्यामधे तसेच ग्रासणाऱ्यांच्यामधे सर्वश्रेष्ठ.' असा आलेला आहे. तो येथल्या तिघांच्यापैकी पहिल्या ' समयवाचक काळाच्या ' संदर्भात सांगितलेला आहे. ही गोष्ट महत्त्वाची आहे.
**धाता** म्हणजे धारण करणारा. **विश्वतोमुखः** म्हणजे चारही बाजूंनी तोंडे असलेला. सर्व विश्वाला निर्माण करणारा, धारण करणारा आणि चारही दिशांना तोंडे असलेला असा जो **' ब्रह्मदेव ',** त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
येथे **विश्वतोमुखः** ह्या शब्दाचा अर्थ विराटस्वरूप असाही केला जातो. परंतु तो बरोबर नाही असे मला वाटते.
कारण पुढील अध्यायामधे अर्जुनाला दिसलेले विराटस्वरूप म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म परमात्म्याचे मूळचे खरे स्वरूप आहे.
मग तो स्वत:लाच स्वत:ची विभूती कसे म्हणू शकेल? तसे मानले तर मग, ' विराटस्वरूप ही देखील विभूती आहे आणि परब्रह्म परमात्म्याचे मूळ स्वरूप त्याहीपेक्षा वेगळे आहे.' असा अर्थ होईल. असो.

**मृत्युः सर्वहरश्चाहम् उद्भवश्च भविष्यताम् ।**

**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणाम् स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥**

सर्वांचा क्षय करणारा आणि पुढे भविष्यकाली जन्मास येणाऱ्यांचे उत्पत्तिस्थान असलेला मृत्यू मीच आहे. स्त्रियांच्यामधे कीर्ति, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृति व क्षमा मी,

**सर्वहरः** म्हणजे सर्वांचा नाश करणारा. सर्वकाही नष्ट करणारा. म्हणजेच **मृत्यू.**

**भविष्यताम्** म्हणजे भविष्यकाळात उत्पन्न होणारे. **उद्भवः** म्हणजे उत्पत्तीचा हेतू.

**मृत्यू ऽऽऽ!** ह्याला कोण ओळखत नाही बरे? सगळे चांगलेच ओळखतात.

**हा आपल्या सर्वांचा सर्वांत जवळचा आणि सर्वांत चांगला मित्र आहे.**

असे असूनही त्याला सगळे घाबरतात. त्याच्यापासून दूर पळायला बघतात. त्याच्याविषयी विचार करीत नाहीतच पण त्याचे नांवही घेऊ इच्छित नाहीत. तरीही तो आपल्याला विसरत नाही. दुर्लक्ष करीत नाही. सोडून देत नाही.

एकदा वेळ भरली की जेथे असाल तेथून, जसे असाल तसे, बरोबर उचलतो.

त्याला सगळ्यांचे त्या वेळचे पत्ते आणि ठिकाण बरोबर माहीत असते.

तो कधीही ठरलेल्या वेळेच्या अगोदर येत नाही तसेच उशिरानेही येत नाही.

त्याच्याकडे कल्पनातीत वेगाने पळणारे आणि अत्यंत कार्यक्षम असे वाहन आहे.

ते वाहन कधीही बिघडत नाही आणि त्याचे इंधनही संपत नाही. कधीच नादुरुस्त होत नसल्यामुळे, त्याच्या दुरुस्तीचा प्रश्नच येत नाही.

नगण्य अशा भिक्षेकऱ्यापासून ते अग्रगण्य अशा राष्ट्रप्रमुखापर्यंत, एखाद्या मातीच्या ढेकळापासून ते ग्रह, तारे, आकाशगंगा, विश्वापर्यंत, आपल्या डोळ्यांना दिसूही न शकणाऱ्या जीवजंतूपासून ते ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना शेवट आहे. मरण आहे.

मृत्यू कोणालाही टाळता येत नाही. चुकवता येत नाही. प्रत्येकाचा अंत होतोच.

त्याच्याकडे कोणाचाही वशिला चालत नाही. त्याला लाच देऊन सटकता येत नाही. कोणत्याही शस्त्राने त्याचा प्रतिकार करता येत नाही आणि हात जोडून विनवणीही करता येत नाही. काहीतरी कारण सांगून वेळ काढता येत नाही. **( Time pass )**

**मृत्यू हा अत्यंत निःपक्षपाती आहे. तो सर्वांना सारखेच वागवितो.**

**दासबोधा**च्या तिसऱ्या दशकाच्या नवव्या समासामधे, **समर्थ रामदास स्वामींनी** मृत्यूविषयी अप्रतीम असे भाष्य केले आहे.

त्या समासाचे नांव **' मृत्युनिरूपण '** असेच आहे. मृत्यूचे सामर्थ्य किती आहे? त्याचा प्रभाव किती आहे?

त्याचा आवाका किती मोठा आहे? ह्याचे विवरण त्यामधे केलेले आहे.

आपण सर्वांनी तो समास एकदा नीट वाचून पहावा आणि त्याचा अर्थ समजून घ्यावा, असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

आजपर्यंत आपल्या देशामधे अनेक संतमहंत होऊन गेले. आजही अनेक संतमहंत कार्यरत आहेत. परंतु, मानवी जीवनाचा, व्यावहारिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही बाजूनी, समर्थांच्या इतका सर्वांगीण व सखोल अभ्यास दुसऱ्या कोणीही केलेला नाही असे मला नेहमीच वाटते. असो.

मृत्यू हा अचानक येतो. आपण केव्हा मरणार आहोत ते कुणालाही माहीत नसते. **ह्यातच मृत्यूचे खरे सौंदर्य दडलेले आहे.**

माणसाला जे जे म्हणून हवे हवेसे वाटते त्यातले काहीही बरोबर नेता येत नाही.

कारण प्रेतवस्त्राला खिसा नसतो. **( कफनको जेब नही होती है । )**

माणसाला जे जे म्हणून नको नकोसे वाटते तेच बरोबर न्यावे लागते. कारण त्याच्यासाठी खिसा असावा लागत नाही. खिश्याची आवश्यकताच नसते. आयुष्यभर केलेले कर्म स्वतःहून आपल्या मागोमाग येते. सर्व कर्मांची फळे भोगावीच लागतात. त्यामधून कोणाचीही सुटका नाही. मृत्यू हेच जीवनाचे अंतिम सत्य आहे. असे असले तरीही, त्याच्या येण्यामागेही एक विशेष असे कारण आहे.

**मृत्यू हा उदार आहे. सहृदय आहे. प्रेमळ आहे. कृपावंत आहे.**

तो सर्वांना उत्कर्षाची संधी देतो. केवळ त्याच्यामुळेच आपल्याला नवीन संधी मिळते.

मृत्यू येतो म्हणूनच आपल्याला ह्या जन्ममृत्यूच्या चक्रामधून मुक्ती मिळविण्यासाठी नव्याने प्रयत्न करायची संधी प्राप्त होते.

**मृत्यू** हा जीवात्म्याला, त्याचा कर्मक्षय व्हावा आणि ऋणमुक्ती घडून यावी ह्या हेतूने, दुसरे नवीन शरीर प्राप्त होण्यासाठी, अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देतो. म्हणजे **विनाशाचा** कर्ता आणि विनाशानंतर होणाऱ्या **निर्मितीचे** कारण तोच आहे.

म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**नारीणाम्** म्हणजे स्त्रियांच्यापैकी. सर्व स्त्रियांच्यामधे येथे सांगितलेली दहा नांवे अशी आहेत की जी, नामवाचकही आहेत आणि गुणवाचकही आहेत. म्हणजे ती नांवे स्त्रियांचे ' विशेषनाम ' तर आहेतच आणि त्याशिवाय ' विशेषगुण ' ही आहेत.

आपण ते गुण कोणते आहेत हे थोडक्यात पाहूया.
**कीर्ति:** म्हणजे सद्‌गुणांच्या योगाने मिळणारी, नेहमी वाढत जाणारी आणि दीर्घकाळ टिकून राहणारी प्रसिद्धी.
**श्री:** म्हणजे स्वकष्टाने प्राप्त झालेले, सन्मार्गाने मिळविलेले आणि औदार्याची जोड असलेले सर्व प्रकारचे ऐश्वर्य.
**वाक्** म्हणजे वाणी. न्यायाच्या सुखासनावर बसून, सदैव विवेकाच्या वाटेने चालणारी, जे सत्य असेल आणि योग्य असेल ते बोलण्याची शक्ती.
**स्मृति:** म्हणजे कोणतीही गोष्ट पाहिल्यावर ती पूर्णपणे स्मरणात साठविण्याची शक्ती आणि योग्यवेळी तिची आठवण होण्याची शक्ती.
**मेधा** म्हणजे स्वहिताला अनुकूल अशी, अध्यात्माची जोड असलेली, आकलनशक्ती आणि त्यापुढे नवनिर्मितीचा आविष्कार करण्याची शक्ती.
**धृति:** म्हणजे सारासार विचार करून, एकदा बुद्धीने योग्य निर्णय घेतल्यावर, तो सतत टिकवून ठेवणारी मनाची धारणशक्ती. मनाचा दृढनिश्चय करून, कोणत्याही परिस्थितीत त्याप्रमाणे वागण्याची शक्ती.
**क्षमा** म्हणजे अपराध्याला शासन करण्याचा अधिकार आणि शक्ती असूनही तसे न करता, त्याला सुधारण्याची संधी देणारी शक्ती.
ह्या नांवांच्यामधे किती मोठा अर्थ भरलेला आहे ते समजून घ्या. ज्याच्या ठिकाणी हे गुण असतील त्याला पाहिल्यावर, आपले हात आपोआप जोडले जातील की नाही? म्हणून ह्या सर्व नांवांना आणि विशेष गुणांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**बृहत्साम तथा साम्नाम् गायत्री छन्दसामहम् ।**
**मासानाम् मार्गशीर्षोऽहम् ऋतूनाङ् कुसुमाकर: ॥ ३५ ॥**

गावयाच्या वैदिक स्तोत्रांच्यामधे बृहत्साम मी आणि सर्व छंदांच्यामधे गायत्री छंद मीच आहे. महिन्यांच्यामधे मार्गशीर्ष महिना मी, ऋतूंच्यामधे वसंत ऋतू मी,
**साम्नाम्** म्हणजे गायन करण्यायोग्य अशा श्रुती म्हणजेच वेद.
चारही वेदांच्यामधे सामवेद हा सुर, ताल आणि लय ह्यांचे बंधन पाळून गायला जाणारा वेद आहे. म्हणून मागे बाविसाव्या श्लोकात त्याला **विभूती** म्हटलेले आहे. तर अशा सामवेदामधेही इंद्रदेवाची स्तुती करणारी जी **' बृहत्साम '** नांवाची स्तोत्रे **( ऋचा )** आहेत, ती अत्यंत श्रवणीय आहेत. त्यामुळेच त्यांना श्रेष्ठत्व प्राप्त झालेले आहे. म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**छंदसाम्** म्हणजे काव्यरचना करण्यासाठी वापरण्यात येणारे विविध छंद.
वेदांमधे असलेल्या छंदोबद्ध ऋचांमधे **गायत्री** छंद हा विशेष मानलेला आहे.
**गायत्री** ही एक देवताही आहे. ती **' ब्रह्मदेवाची अर्धांगिनी '** ( पत्नी ) आहे. तसेच **गायत्री** हा एक प्रसिद्ध मंत्रही आहे.
ऋग्वेदाच्या ' तिसऱ्या मंडलाच्या बासष्ठाव्या सूक्तामधील दहावी ऋचा ' म्हणजेच प्रसिद्ध गायत्री मंत्र होय.
ओंकाराच्या इतकाच गायत्री मंत्रही महत्त्वाचा आहे. सामर्थ्यशाली आहे. प्रेरणादायक आहे. कल्याणकारक आहे.
मुलाची मुंज लागल्यावर, त्याला गायत्रीमंत्राची दीक्षा दिली जाते. परमपवित्र अशा गायत्रीमंत्राचे नियमितपणे पठण केले असता फार मोठी आंतरीक ऊर्जा आणि प्रेरणा मिळते अशी मान्यता आहे. तो मंत्र पुढील प्रमाणे आहे.

**ॐ तत् सवितु: वरेण्यं भर्ग: देवस्य धीमहि । धिय: य: न: प्रचोदयात् ॥**

अर्थ — सर्वांचे पालन करणाऱ्या सविता सूर्यदेवाचे ते श्रेष्ठ तेज आम्ही जाणतो. त्या तेजाचे सतत ध्यान करतो. हा भृगु कुलोत्पन्न सविता सूर्य, आमच्या बुद्धीला उत्तम प्रकारे प्रेरणा देवो.
ह्या मंत्रामधे, आधुनिक विज्ञानालाही मान्य होईल असा, गहन अर्थ भरलेला आहे.
**डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी** नांवाच्या विद्वान व्यक्तीने, सुमारे पंधरा वर्षे परिश्रम करून, संपूर्ण ऋग्वेदाचे मराठीमधे भाषांतर केलेले आहे. त्यांच्या **' ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद.'** ह्या ग्रंथामधे पवित्र अशा गायत्रीमंत्राचा अर्थ सविस्तरपणे सांगितलेला आहे. आपण तो अवश्य वाचून पहावा अशी माझी विनंती आहे.
श्रुति ( वेद ), स्मृति ( उपनिषदे ), पुराणे आणि इतिहासामधे अनेक वेळा, अनेक ठिकाणी, गायत्रीचा महिमा सांगण्यात आलेला आहे.

**अभिष्टं लोकमाप्नोति प्राप्नुयात् काममीप्सितम् ।**
**गायत्री वेदजननी गायत्री पापनाशिनी ॥**
**गायत्र्या: परमं नास्ति दिवि चेह च पावनम् ।**
**हस्तत्राणप्रदा देवी पततां नरकार्णवे ॥**

अर्थ – गायत्रीदेवीची उपासना करणाऱ्या मनुष्याला उत्तम लोक आणि इच्छित भोग प्राप्त होतात. गायत्रीदेवी ही सर्व वेदांची जननी असून सर्व पापांचा नाश करणारी आहे. स्वर्गलोक आणि पृथ्वीवर गायत्रीसारखी, पवित्र करणारी दुसरी गोष्ट नाही. नरकसागरामधे पडणाऱ्याला, गायत्रीदेवी आपल्या हातांचा आधार देऊन वाचविते.

**नास्ति गंगासमं तीर्थे न देवः केशवात् परः ।**

**गायत्र्यास्तु परं जप्यं न भूतं न भविष्यति ।।**

अर्थ – गंगेच्यासारखे तीर्थ झाले नाही, भगवान विष्णूसारखा देव झाला नाही आणि गायत्रीसारखा जप करण्यायोग्य मंत्र यापूर्वी झाला नाही आणि यापुढेही होणार नाही.

म्हणून छंदरूप, देवतारूप आणि मंत्ररूप गायत्रीला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**मासानाम्** म्हणजे महिन्यांच्यापैकी आणि **ऋतूनाम्** म्हणजे ऋतूंच्यापैकी.

बारा महिन्यांच्यामधे **' मार्गशीर्ष '** महिना आणि सहा ऋतूंच्यामधे **' वसंत '** ऋतू ह्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

महाभारतीय महायुद्ध **' कार्तिक कृष्ण अमावास्येला '** सुरू झाले.

त्या दिवशी **चित्रा नक्षत्र** होते आणि त्यावेळी **' वसंत '** ऋतू होता. त्याच्या पुढच्या दिवशी **' मार्गशीर्ष '** महिना सुरू झाला.

आजच्या काळात वर्षाची सुरवात ही **चैत्र** महिन्याने होते. परंतु महाभारताच्या काळामधे वर्षाची सुरवात ही **मार्गशीर्ष** महिन्यापासून होत होती. म्हणजे त्यावेळच्या गणनेनुसार, **' नवीन वर्षाचा पहिला महिना '** सुरू झाला.

तसेच त्यावेळच्या गणनेनुसार, **' वसंत ऋतूचा दुसरा महिना मार्गशीर्ष '** होता.

म्हणजेच त्यावेळी **कार्तिक आणि मार्गशीर्ष** ह्या दोन महिन्यांमधे **वसंत** ऋतू होता.

आजच्या काळामधे **चैत्र आणि वैशाख** ह्या दोन महिन्यांमधे **वसंत** ऋतू असतो.

शास्त्र असे सांगते की, ' ऋतुचक्र सतत बदलत असते. ते पुढे सरकत असते.'

साधारणपणे दर नऊशे वर्षांनी ऋतू एक महिन्याने पुढे सरकतात. तसेच असा बदल घडून येण्यासाठी सुमारे चाळीस वर्षांचा काळ लागतो. श्रीकृष्ण १२५ वर्षे जगला अशी मान्यता आहे.

त्याच्या अवतार समाप्तीच्या वेळी, **' प्रमादी संवत्सर, चैत्र शुद्ध प्रतिपदा, अश्विनी नक्षत्र आणि शुक्रवार होता.'**

ज्या दिवशी भगवान श्रीकृष्ण निजधामास गेला, त्याचा अवतार संपला त्याच दिवशी —

**' द्वापारयुग संपले आणि कलीयुग सुरू झाले. कालचक्र आणि ऋतुचक्र बदलले.'** अशी मान्यता आहे.

म्हणजे वसंत ऋतू हा **' मार्गशीर्ष आणि पौष.'** ह्या दोन महिन्यांमधे झाला.

आता त्यापुढील, पौष - माघ, माघ - फाल्गुन, फाल्गुन - चैत्र आणि चैत्र - वैशाख हा बदल आणि त्यासाठी लागलेला एकूण कालावधी ह्याविषयी विचार केला तर, **' महाभारतीय युद्धाला किती वर्षे होऊन गेली?'** ह्या विषयी काही अंदाज करता येऊ शकतो. कालनिर्णयावर संशोधन करून आपले विचार मांडताना, अनेक विद्वानांनी ह्या मुद्द्यावर सखोल आणि सविस्तर विवेचन केलेले आहे. मला ते शक्य होणार नाही. कारण मी एक सर्वसामान्य माणूस आहे. त्यामुळे अधिकारवाणीने काहीही बोलू शकत नाही. मी ह्या ठिकाणी त्याचा फक्त उल्लेख करतो आहे. हे थोडे विषयांतर होत आहे ह्याची मला कल्पना आहे. पण बरेच वेळा समजत असूनही, मला मोह आवरता येत नाही त्याला काय करू? आपण सर्वांनी मला क्षमा करावी ही नम्र विनंती. असो.

**द्युतञ् छलयताम् अस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।**

**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्वम् सत्ववतामहम् ।। ३६ ।।**

फसविणाऱ्यांच्यामधे द्यूत मी आहे. तेजस्वी पुरुषांचे तेज मी, विजयी पुरुषांचा विजय मी, निश्चयी पुरुषांचा निश्चय मी आणि सात्त्विक पुरुषांचे सत्त्व मीच आहे.

**छलयताम्** म्हणजे कपट करणे, कारस्थान करणे, फसवणूक करणे, लुबाडणे. ह्या सगळ्या गोष्टी हल्ली सगळीकडे प्रमाणाबाहेर वाढलेल्या दिसून येतात. टीव्हीवर दाखवण्यात येणाऱ्या मालिकांमधे तर सतत तेच दाखवीत असतात. प्रत्येक व्यक्तिरेखा इतरांच्या विरोधात कट - कारस्थानेच करीत असते. अत्याचार करीत असते. त्यामधेही स्त्री व्यक्तिरेखा आघाडीवर असतात. चॅनेलवाले त्यांचा **TRP** वाढविण्यासाठी तसे करतात असे सांगितले जाते. परंतु त्याचा समाजावर काय परिणाम होऊ शकतो? ह्याचा कोणीही विचार करीत नाही. असो.

तर फसविण्याच्या हेतूने केल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींमधे **द्यूत** म्हणजेच सर्व प्रकारचा जुगार हा अत्यंत धोकादायक आहे.

म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

येथे कदाचित् आपल्याला प्रश्न पडेल की, ' अत्यंत धोकादायक, तिरस्करणीय, वाईट आणि त्याज्य अशा गोष्टीला, परमेश्वराची विभूति का म्हटले आहे?'
विश्वामधे उत्तम, मध्यम आणि नीच अशा तीनही प्रकारचे वस्तुमात्र ही परमेश्वराचीच अभिव्यक्ती आहे. परमेश्वराच्या इच्छेने आणि प्रेरणेनेच ते आपापले व्यवहार करीत असतात. सज्जन आणि दुर्जन, नैतिक आणि अनैतिक, वाईट आणि चांगले, प्रकृती आणि विकृती इत्यादी सर्व प्रकारच्या प्रवृत्ती ह्या अखेरीस परब्रह्म परमात्म्यापासूनच निर्माण होत असतात.
म्हणूनच सर्व प्रकारच्या वस्तुमात्रांचा विभूती म्हणून उल्लेख होणे क्रमप्राप्त आहे. तसा उल्लेख करण्यामागे, आपल्याला त्या सर्वांची यथायोग्य अशी माहिती व्हावी आणि ती ध्यानात ठेवूनच आपला व्यवहार होत रहावा, हाच हेतू असावा असे मला प्रामाणिकपणे वाटते. ह्या अगोदर **' सिंह, मगर, नाग, सर्प '** इत्यादींचाही विभूती म्हणून उल्लेख झालेला आहे.
ह्याचा अर्थ, माणसाने त्यांच्याशी सलगी करावी असा होत नाही. त्यांच्यापासून आपल्याला जपूनच राहिले पाहिजे.
जरी **' अग्नी '** ही परमेश्वराची विभूती असली तरीही, अग्नीशी सलगी करणे हे धोकादायकच असते. अग्नीमधे मधे उडी मारणे म्हणजे आत्मनाश करणेच होईल. म्हणून त्याचे गुणधर्म समजून घेऊन, त्याच्यापासून दूरच राहिले पाहिजे.
एका विशिष्ट मर्यादेत सांभाळूनच राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचा जुगार हा निंद्य आणि त्याज्य मानून त्याच्यापासून दूरच राहिले पाहिजे. त्याच्या आहारी जाणे योग्य ठरणार नाही.
दुसरी गोष्ट म्हणजे, वाईट व्यक्ती आणि वाईट प्रवृत्ती ह्यांच्यावर विजय मिळवायचा असेल तर, चांगल्या सज्जन व्यक्तीला त्यांची संपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. तशी माहिती कशासाठी असायला हवी?
त्यांच्या नादी लागून, त्यांच्या आहारी जाऊन, त्यांच्यासारखे वागण्यासाठी नाही तर, त्यांना नष्ट करण्यासाठी, नेस्तनाबूत करण्यासाठी, योग्य अशी व्यूह रचना करता यावी म्हणून. त्याशिवाय सज्जनाला यश मिळविता येणार नाही.
अहो ऽऽ! अफजलखानाच्या वृत्ती - प्रवृत्तीचा अभ्यास केला नसता, त्याची शारिरीक शक्ती, शौर्य आणि धाडसी स्वभाव ह्याविषयी आणि त्याच बरोबर त्याचा अहंकार, गर्व आणि अतिआत्मविश्वास ह्याविषयी काहीच माहिती मिळविली नसती आणि त्याला अनुसरून व्यूहरचना केली नसती तर, शिवाजी महाराज अफजलखानाला मारू शकले असते का? त्याच्या सैन्याला पळवून लावू शकले असते का? स्वत: श्रीकृष्णाने कौरवांच्या सर्व सेनानायकांच्या वृत्ती - प्रवृत्तींचा अभ्यास केला नसता आणि त्यानुसार वेळोवेळी यथायोग्य अशी व्यूहरचना केली नसती तर, महायुद्धामधे पांडवांना विजय मिळाला असता का? असो.
**तेजस्विनाम्** म्हणजे तेजस्वी पुरुष. प्रभावशाली पुरुष. त्या पुरुषांचे **तेज** महत्त्वाचे. त्यांचा प्रभाव महत्त्वाचा.
म्हणून त्या तेजाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**जयः** म्हणजे विजयी पुरुष. विजयी पुरुषाचा विजय महत्त्वाचा. म्हणून त्या विजयाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**व्यवसायः** म्हणजे निश्चयी पुरुष. निश्चयी पुरुषाचा निश्चय महत्त्वाचा.
म्हणून त्याच्या निश्चयात्मक बुद्धीला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**सत्ववताम्** म्हणजे सात्विक पुरुष. सात्विक पुरुषाचा सात्विक भाव महत्त्वाचा.
म्हणून त्या सात्विक भावाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**' माणसाचे तेज आणि त्याचा प्रभाव, विजय मिळविणे, बुद्धीचा निश्चय करून त्याप्रमाणे वागणे आणि सात्त्विक भाव '**
हे चारही गुण परमेश्वराच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहेत, सहाय्यक आहेत. हे लक्षात ठेवले पाहिजे.

**वृष्णीनाम् वासुदेवोऽस्मि पांडवानान् धनंजयः ।**
**मुनीनामप्यहम् व्यासः कवीना मुशना कविः ।। ३७ ।।**

यादवांच्यामधे वासुदेव कृष्ण मी, पांडवांच्यामधे धनंजय मी, मुनींच्यामधे व्यासमुनी मी आणि कवींच्यामधे शुक्राचार्य मीच आहे.
**वृष्णीनाम्** म्हणजे वृष्णि कुलामधे. यादव वंशामधे अनेक कुले होती. त्या कुलांमधे, **' वृष्णि '** नांवाचे एक कुल होते.
त्या कुलामधे, **वासुदेव** म्हणजे वसुदेवाचा पुत्र म्हणजेच श्रीकृष्ण स्वत:, सर्वश्रेष्ठ होता. सर्वच दृष्टीने सर्वोत्तम पुरुष होता.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
येथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षांत घ्यायला हवी. भगवान श्रीकृष्ण ' स्वत:च - स्वत:ला - स्वत:ची ' विभूती म्हणतो आहे.
वाक्य ऐकायला थोडे विचित्र वाटते आहे. पण ते सत्य आहे.
ह्यातील पहिले दोन स्वत: म्हणजे अर्जुनाला सांगणारा आणि अवतार ( विभूती ) हे दोन्ही श्रीकृष्णच आहेत.
परंतु **तिसरा स्वत:** म्हणजे **' अवतार घेणारा '** परब्रह्म परमात्मा आहे. तो श्रीकृष्णाचाही बोलविता धनी आहे.
ह्या अगोदर चवथ्या अध्यायामधे, सहा, सात आणि आठ ह्या तीन श्लोकांमधे, परब्रह्म परमात्म्याच्या निरनिराळ्या अवतारांचे प्रयोजन

सांगण्यात आलेले आहे. तेथेही अर्जुनाला तसे सांगणारा स्वत: श्रीकृष्णच आहे. परंतु त्याचा बोलविता धनी परब्रह्म परमात्माच आहे.
**पांडवानाम्** म्हणजे पांडवांच्यामधे. पांडुराजाचे पुत्र ते पांडव. पाच पांडवांच्यामधे धनंजय म्हणजे अर्जुन हा सर्वात उत्तम होता.
तो अत्यंत शूर, धैर्यशाली आणि आदर्श असा पुरुष तर होताच, पण त्याशिवाय तो श्रीकृष्णाचा परम मित्र, सहाय्यक आणि अनन्य भक्त होता. श्रीकृष्ण त्याला स्वत:हून वेगळा समजतच नव्हता. जणूकाही तो श्रीकृष्णाचा बहिश्चर प्राणच होता.
म्हणून त्याला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**मुनीनाम्** म्हणजे मुनींच्यामधे. मुनी अनेक आहेत परंतु त्यांच्यामधे **व्यास** हे श्रेष्ठ.
त्यांनी वेदांचा अभ्यास करून त्यांचे विभाग केले. पुराणे, महाभारत आणि इतर अनेक शास्त्रे इत्यादींची रचना केली.
ते महाज्ञानी आणि सर्वगुणसंपन्न होते. त्यांना भगवान व्यास असेही म्हणत असत. म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**कवीनाम्** म्हणजे कवींच्यामधे. **कवी** ह्या शब्दाला फार मोठा अर्थ आहे.
उत्तम कविता करणारा, उत्तम गीतरचना करणारा तो कवी अशी आपली समजूत असते. पण ती खरी नाही.
कवी म्हणजे भविष्यकाळाचा वेध घेणारा, भविष्यामधे डोकावून पाहू शकणारा असा अत्यंत बुद्धिमान आणि विद्वान पुरुष.
**‘ जे न देखे रवी, ते देखे तो कवी.’** हे विधान अत्यंत प्रसिद्ध आहे. सर्व कवींच्यामधे **उशना** म्हणजे दैत्यगुरू **शुक्राचार्य** हे श्रेष्ठ. ते सर्व विद्यांचे विशारद होते. नीतिशास्त्राचे रचनाकार होते. भविष्यकाळाचा वेध घेणारे होते आणि संजीवनी विद्येचे म्हणजे ‘ मेलेल्या प्राण्याला परत जिवंत करण्याच्या शास्त्राचे ’ जाणकार होते. म्हणून त्यांना **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.

**दण्डो दमयताम् अस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।**
**मौनञ् चैवास्मि गुह्यानाम् ज्ञानम् ज्ञानवतामहम् ।। ३८ ।।**

शासन किंवा दमन करणाऱ्यांचा दंड मी, विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीति किंवा मसलत मी आहे, गुप्त ठेवावयाच्या भावांमधे मौन आणि ज्ञानवंतांचे ज्ञानही मीच आहे.
**दमयताम्** म्हणजे दमन करणारे. येथे अधिकाराचा योग्य वापर करून, अपराध्यांचे दमन करणे असा अर्थ घ्यायला पाहिजे.
तर अशा न्यायपूर्वक दमन करणाऱ्यांचा **दंड** म्हणजे ‘ दमन करायची शक्ती ’ महत्त्वाची.
म्हणून त्या शक्तीला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**जिगीषताम्** म्हणजे जिंकण्याची इच्छा करणारे, यशप्राप्तीची इच्छा करणारे पुरुष. अशा पुरुषांची विजय प्राप्त करून देणारी, न्यायाला धरून असणारी अशी, **नीती** महत्त्वाची. म्हणून तशा त्या नीतीला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**गुह्यानाम्** म्हणजे गुप्त ठेवण्यास योग्य अशा भावांची गुप्तता राखणारे, त्यांचे रक्षण करणारे मार्ग.
अशा मार्गांपैकी **मौन** म्हणजे ‘ न बोलणे ’ सर्वोत्तम. जी गोष्ट गुप्त ठेवायची असेल तिच्याविषयी कोणाजवळही काहीही न बोलणे हेच उत्तम. म्हणून मौनाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
**ज्ञानवताम्** म्हणजे परमेश्वराच्या स्वरूपाचा साक्षात्कार झालेले असे ज्ञानी पुरुष.
ज्ञानी पुरुषांचे ते ईश्वरी तत्त्वाचे ज्ञान म्हणजेच **तत्त्वज्ञान** महत्त्वाचे. म्हणून त्या तत्त्वज्ञानाला **परमेश्वराची विभूति** म्हटले आहे.
येथपर्यंत मुख्य मुख्य अशा ब्याऐंशी विभूति सांगून झाल्या आहेत. आता पुढील श्लोकांमधे, जेथून विभूति सांगायला सुरवात झाली तेथे, म्हणजेच सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी परत जायचे आहे. ह्यालाच संगीतशास्त्रामधे **‘ समेवर येणे ’** असे म्हणतात.
ह्यालाच कीर्तनशास्त्रामधे **‘ हरिदासाची कथा मूळ पदावर येणे ’** असे म्हणतात.

**यच्चापि सर्वभूतानाम् बीजन् तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान् मया भूतम् चराचरम् ।। ३९ ।।**
**नान्तोऽस्ति मम दिव्यानाम् विभूतीनाम् परन्तप ।**
**एष तूद्देशत: प्रोक्त: विभूतेर्विस्तरो मया ।। ४० ।।**

हे अर्जुना ! सर्व भूतांच्या उत्पत्तीचे कारण मीच आहे. माझ्या खेरीज असू शकेल असे एकही भूत नाही.
हे परंतपा ! माझ्या दिव्य विभूतींना अंत नाही. हा विस्तार केवळ संक्षेपाने सांगितला आहे.
**सर्वभूतानाम्** म्हणजे सर्व भूतमात्रे. **बीजम्** म्हणजे बी. कोणत्याही वृक्षाचे बीज हे त्या वृक्षाच्या तुलनेत फारच लहान असते.
परंतु त्या बीजापासूनच संपूर्ण वृक्षाचा विस्तार होतो. आजच्या संगणकीय परिभाषेत सांगायचे म्हणजे,
वृक्षाच्या विस्ताराची सर्व आज्ञावली **( Program )** त्या एका बी मधे अचूकपणे नोंदविलेली असते आणि त्याप्रमाणेच ठराविक वेळामधे, ठराविक पद्धतीने, वृक्षाचा विस्तार होत असतो. ह्या सर्व विश्वाचा विस्तार हा एकमात्र **‘ परब्रह्म परमात्म्या ’** पासूनच होत

असल्यामुळे त्याला सर्व भूतांचे **बीज** म्हणजेच उत्पत्तीचे कारण म्हटलेले आहे. ही अखेरची विभूति सांगितली आहे.
सातव्या अध्यायामधील दहाव्या श्लोकात सांगितलेले **' सनातन बीज '** आणि नवव्या अध्यायामधील अठराव्या श्लोकात सांगितलेले **' अव्यय बीज '** ते हेच. परब्रह्म परमात्म्याच्या इच्छेवाचून अस्तित्वात आलेले आणि त्याच्याशी संबंधित नसलेले असे काहीही नाही. हेच त्रिवार सत्य आहे. कोणीही झाला, अगदी भगवान् श्रीकृष्ण झाला तरीही, तो परमेश्वराच्या सर्व दिव्य विभूतींची गणना कशी करू शकेल? ते शक्य नाही. असो.

**यद्यद्विभूतिमत्सत्त्वम् श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वम् मम तेजोंऽशसम्भवम् ।। ४१ ।।**

जी जी वस्तू वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनी युक्त आहे ती ती माझ्या तेजाच्या अंशापासूनच उत्पन्न झाली आहे असे समज.
अर्जुना ऽऽ! हे सगळे लक्षात ठेवण्यापेक्षा तू असे का करीत नाहीस? असे बघ की,
ज्या ज्या पुरुषाच्या ठिकाणी तू कोणत्याही प्रकारचे **ऐश्वर्य** पाहशील, **दया** पाहशील, **करुणा** पाहशील, **बुद्धिमत्ता** पाहशील, **ज्ञान** पाहशील, **तेज** पाहशील, **शौर्य** पाहशील, **धैर्य** पाहशील, **तप** पाहशील, **शुद्ध चारित्र्य** पाहशील, **नीतिमत्ता** पाहशील, **चातुर्य** पाहशील, **सत्-असत् विवेक** पाहशील, **लोकमान्यता** पाहशील, तो सत्ताधीश असो किंवा नसो, त्याची इच्छा ही सर्वांना आज्ञेसारखीच प्रमाण असते आणि सर्व लोक त्याच्या आज्ञेचे सदैव पालन करतात असे पाहशील, **' ते सर्व माझेच अंश आहेत '** असे समज. त्यांच्या ठिकाणी मीच आहे असे समजून, त्यांचे अनुकरण कर.

**अथवा बहुनैतेन किम् ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदङ् कृत्स्नम् एकांशेन स्थितो जगत् ।। ४२ ।।**

अथवा हे अर्जुना ! तुला हा पसारा जाणून काय करायचे आहे? मी आपल्या एकाच अंशाने हे सर्व जग व्यापून राहिलो आहे.
आता ह्याविषयी अधिक बोलून तरी त्याचा काय उपयोग?
अरे, मी आपल्या एकाच अंशाने हे सर्व विश्व अंतर्बाह्य व्यापलेले आहे. त्यामुळे आता कोणतीही भेदाची भावना मनात न बाळगता, समत्व बुद्धीने मलाच सर्व ठिकाणी पहा ऽऽ! विचारांचा सर्व गोंधळ बाजूला सारून, आपले कर्तव्य करण्याचा निश्चय करून,
**' युद्धासाठी उभा रहा ऽऽ!'**

**येथे दहावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

अर्जुन किती भाग्यवान होता हो! त्याचा अद्वितीय असा गुरू समोर आहे आणि त्याच्या प्रत्येक प्रश्नाचे यथायोग्य उत्तर देतो आहे. त्या दोघांचे हे बोलणे ऐकून, ' ह्या दोघांना स्थळ, काळ, वेळ आणि प्रसंग ह्यांचा विसर पडला आहे की काय?' अशी शंका येते. पण काय करणार? गुरू आणि शिष्य दोघेही अद्वितीय. दोघेही एकमेकांचे आवडते.
त्यातही गुरुदेवांना शिष्य फारच प्रिय. इतका प्रिय की, ते शिष्याला स्वत:हून वेगळा मानतच नाहीत. तसे त्यांनी अनेक वेळा स्पष्टपणे सांगितलेले आहे. उदाहरणादाखल वनपर्वामधील एक श्लोक सांगतो तो ऐका.

**नरस्त्वमसि दुर्धर्ष हरिर्नारायणो ह्यहम् ।**
**काले लोकमिमं प्राप्तौ नरनारायणावृषी ।**
**अनन्य: पार्थ मत्तस्त्वं त्वत्तश्चाहं तथैव च ।। वनपर्व ।।**

अर्थ – अर्जुना ऽऽ, तू भगवान नर आहेस आणि मी हरि नारायण आहे. एके काळी आपण दोघे नर आणि नारायण ऋषी होऊन ह्या लोकी आलो होतो. म्हणून तू माझ्या पासून वेगळा नाहीस आणि मी ही तुझ्यापासून वेगळा नाही.
येथे देखील भगवान स्वत:ला आणि त्याला परमात्म्याची विभूती म्हणत आहेत.
एकमेकांशी इतकी एकरूप झालेली दुसरी गुरुशिष्याची जोडी निदान मला तरी माहीत नाही. त्या दोघांना माझा शिरसाष्टांग नमस्कार! पण मग शिष्य तरी कशाला थांबतो आहे? त्याचे प्रश्न विचारणे चालूच आहे. आता तर त्याच्या डोक्यामधे एक अफलातून विचार आलेला आहे. एक विलक्षण कल्पना आलेली आहे. ती कल्पना गुरुजींच्या समोर मांडण्यासाठी तो उतावीळ झाला आहे.
आता पुढील अध्यायामधे अर्जुन कोणता प्रश्न विचारतो आणि श्रीकृष्ण त्याचे काय उत्तर देतो ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## अध्याय अकरावा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या अकराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायामधे, श्रीकृष्णाने, अव्यक्त अशा परब्रह्म परमात्म्याची व्यक्त होण्याची क्षमता म्हणजेच प्रभाव हा अगम्य का असतो? तसेच त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे? आणि सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे, ह्या विषयी विस्ताराने सांगितले. नंतर अर्जुनाच्या प्रश्नावरून सर्व विश्वामधे कार्यरत असलेल्या **दिव्य विभूति** सांगायला सुरवात झाली.

दिव्य अशा विभूति अगणित असल्यामुळे त्या, सर्वच्या सर्व, सांगणे शक्य होणार नाही असे सांगून, प्रमुख म्हणता येतील अशा त्याऐंशी विभूति सांगितल्या. त्यानंतर ज्या ज्या पुरुषांच्या अथवा स्त्रियांच्या ठिकाणी,

**' ऐश्वर्य, दया, करुणा, बुद्धिमत्ता, ज्ञान, तेज, शौर्य, धैर्य, तप, शुद्ध चारित्र्य, नीतिमत्ता, चातुर्य, सत्-असत् विवेक, लोकमान्यता, '** इत्यादी गुणांच्यापैकी एक अथवा अनेक गुण प्रकर्षाने दिसून येतील, त्या त्या सर्व व्यक्ती म्हणजे परमेश्वराची विशेष अभिव्यक्ती आहेत असे समजून, त्यांच्या ठिकाणी परमेश्वराचे स्मरण करून, त्यांचेच अनुकरण करण्यास सांगितले.

अखेरीस, मी आपल्या एकाच अंशाने हे सर्व विश्व अंतर्बाह्य व्यापलेले आहे. त्यामुळे आता समत्व बुद्धीने मलाच सर्व ठिकाणी पहा आणि आपले कर्तव्य पार पाडण्याचा निश्चय करून, **युद्धासाठी उभा रहा ऽऽ!** असे सांगितले.

श्रीकृष्णाचा प्रत्येक शब्द, अर्जुन लक्ष देऊन, एकाग्र चित्ताने ऐकतो आहे आणि त्यावर विचार करतो आहे. आता त्याचे मन शांत झाले आहे. श्रीकृष्णाच्या सामर्थ्याविषयी आणि प्रभावाविषयी त्याच्या मनामधे कोणतीही शंका उरलेली नाही.

उरली आहे ती केवळ भक्ती! दृढ विश्वास! आणि प्रीतीची भावना!

पण तशा अवस्थेतही विचारांची आवर्तने चाललेलीच होती बरं का! स्वत:ला तो अत्यंत भाग्यवान पुरुष समजत होता.

नव्हे! नव्हे ऽ! खरोखरच तो अत्यंत भाग्यवान पुरुष होता. त्याच्या सारखा सुदैवी पुरुष तोच. दुसरा कोणीही नाही.

ज्याच्या प्राप्तीसाठी, आयुष्यभर साधना करणारी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ माणसे देखील तळमळत असतात, आतुरतेने वाट पहात राहतात, तो परमात्मा ह्याच्या समोर जिवलग मित्राच्या रूपामधे उभा आहे. ह्याचा हितचिंतक झाला आहे. ह्याचा गुरूदेव झाला आहे.

ह्याने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे सविस्तर उत्तर देतो आहे. काहीही लपवून न ठेवता, मोकळेपणाने जे सत्य आहे तेच सांगतो आहे. त्याने आजपर्यंत जी गोष्ट कधीही कोणालाही सांगितली नाही, ती गूढ अशी गोष्ट अर्जुनाला स्वत:हून अगदी सहजपणे सांगितली.

सर्व आयुष्यभर केलेल्या अपरिमित साधनेच्या योगाने देवर्षी नारदांनी, मुनिवर व्यासांनी आणि इतर पूजनीय अशा ऋषी-मुनींनी, भीष्म आजोबांनी व आचार्य द्रोणांनी जे गुपित जाणले, ते गुपित त्याने अर्जुनाला अगदी सहजपणे सांगितले.

तो मुनिवर **नारदांना** आणि **व्यासांना** त्याची विभूति म्हणाला.

पण **भीष्माचार्यांना** आणि **द्रोणाचार्यांना** तो स्वत:ची विभूति म्हणाला नाही.

प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावर, ते दोघे शस्त्र धारण करून रणांगणात युद्धासाठी उभे राहिले तेव्हा, त्यांचा पराभव करू शकेल असा कोणीही मानव अथवा दानव तेथे अस्तित्वात नव्हता. पाचही पांडवांनी एकत्र होऊन, भीष्माचार्यांना किंवा द्रोणाचार्यांना एकटे गाठून, त्यांचे बरोबर युद्ध केले असते तरीही ते शक्य झाले नसते.

इतकेच नाही तर युद्धाच्या पहिल्या दहा दिवसांच्या कालावधीत, भीष्माचार्यांच्या अतुलनीय पराक्रमाने संतप्त झालेल्या श्रीकृष्णाला, तिसऱ्या दिवशी आणि नवव्या दिवशी, असे दोन वेळा आपली प्रतिज्ञा विसरून, हातात शस्त्र घेऊन त्यांच्यावर धावून जावे लागले. त्यावेळी त्याला भीष्मवधाच्या इच्छेपासून परावृत्त करून, परत आपल्या रथावर आणण्याचे काम अर्जुनालाच करावे लागले.

पण जरी ते दोघे शरीराने कौरवांच्या बाजूने लढत होते तरीही, मनाने मात्र पांडवांच्या बाजूलाच होते.

त्यांच्या मनामधे पांडवांच्याविषयी अतोनात प्रेम होते.

युद्ध सुरू होण्यापूर्वी **' मी पाचही पांडवांना कधीही मारणार नाही!'** असे भीष्मांनी दुर्योधनाला स्पष्टपणे सांगितलेले होते.

तसेच **' अर्जुन मला प्रिय आहे! मी त्याला कधीही मारणार नाही!'** असे आचार्य द्रोणांनीही स्पष्टपणे सांगितलेले होते.

त्यामुळेच पुढे झालेल्या महायुद्धामधे पांडव जिवंत राहिले हे लक्षात घ्या.

इतकेच नाही तर वेळ आल्यावर, त्या दोघांनी युधिष्ठिराला स्वत:च्या वधाचा उपायही सांगितला आणि तोच उपाय करून पांडवांनी दोघांचा वध केला. तरीही त्या दोघांना श्रीकृष्ण स्वत:ची विभूति म्हणालेला नाही.

पण **अर्जुनाला** मात्र स्वत:ची विभूति म्हणाला. त्याचे काय कारण असेल?

अर्जुनाचा युद्ध करण्याचा उत्साह वाढविण्यासाठी म्हणाला असेल का?
त्याच्या मनामधला उलट सुलट विचारांचा गोंधळ पूर्णपणे नाहीसा करण्यासाठी म्हणाला असेल का?
त्याला धीर देण्यासाठी म्हणाला असेल का? ती शक्यता नाकारता येत नाही. त्या परिस्थितीमधे तसे सांगणे योग्यच होते.
परंतु तो स्वत:लाही **' विभूती '** असे म्हणाला. म्हणजे त्याने अर्जुनाला स्वत:प्रमाणेच मानले आहे आणि स्वत:ला देखील अर्जुनासारखेच मानले आहे.
नीट लक्ष देऊन ऐका --- **वृष्णीनाम् वासुदेवोऽस्मि —** यादवांच्यामधे वसुदेवाचा पुत्र म्हणजे **कृष्ण** मी आहे.
भगवान श्रीकृष्ण **' स्वत:च - स्वत:लाच - स्वत:चीच '** विभूति म्हणतो आहे.
वाक्य ऐकायला थोडे विचित्र वाटते आहे. पण तो तसेच म्हणाला आहे हे खरे.
हा काय प्रकार आहे? अर्जुनाच्या मनामधे हाच प्रश्न आलेला आहे.
आपण अध्यायांचा क्रम नीट समजून घेऊया आणि त्यावर विचार करूया.
**नवव्या** अध्यायामधे श्रीकृष्णाने स्वत:चे म्हणजेच परमेश्वराचे महात्म्य सांगितले.
परमेश्वराचे महात्म्य त्याच्याच कडून ऐकल्यावर, अर्जुनाला त्याच्या विभूतींची माहिती करवून घेण्याची इच्छा झाली.
**दहाव्या** अध्यायामधे त्याने त्याविषयी प्रश्न विचारल्यावर, श्रीकृष्णाने त्याला आपल्या मुख्य मुख्य विभूति सांगितल्या.
त्यामधे आदित्य, वेद, देवगण, इंद्रिये, रुद्र, यक्ष, राक्षस, वसू, पर्वत, जलाशय, मानव, योद्धे, सेनापती, वृक्ष, गंधर्व, पशू, पक्षी, नाग, साप, जलचर, नद्या, महिने, ऋतू, ऋषी, मुनी, कवी इत्यादी सर्व प्रकारच्या विभूति सांगितल्या.
त्याशिवाय व्यक्तिमात्रांच्यामधे जो विशेष गुणधर्म असतो आणि ज्या गुणधर्मामुळे व्यक्ती तशी ओळखली जाते, अशा अनेक भावात्मक विभूति सांगितल्या. त्यांची संख्या सर्वात जास्त आहे. बघा हं —
बुद्धिवंतांची **बुद्धी** तोच आहे. बलवंतांचे **बल** तोच आहे. तपस्व्यांचे **तप** तोच आहे. तेजस्वी पुरुषांचे **तेज** तोच आहे.
ज्ञानी पुरुषांचे **ज्ञान** तोच आहे. सात्विक पुरुषांचे **सत्व** तोच आहे. पराक्रमी पुरुषांचा **पराक्रम** तोच आहे.
नीतिवान पुरुषांची **नीती** तोच आहे. कीर्तिवान पुरुषांची **कीर्ती** तोच आहे. ऐश्वर्यवान माणसाचे **ऐश्वर्य** तोच आहे.
निश्चयी माणसाचा **निश्चय** तोच आहे. धैर्यवान माणसाचे **धैर्य** तोच आहे. प्रतिभावान माणसाची **प्रतिभा** तोच आहे.
क्षमाशील माणसाची **क्षमा** करण्याची शक्ती तोच आहे. इत्यादी —
ह्या जगामध्ये असलेली प्रत्येक गोष्ट त्याच्याच आधीन आहे असे तो स्वत:च सांगतो आहे आणि म्हणूनच ते सत्य आहे ह्याविषयी तिळमात्र संशय नाही. शंका येण्याचे काहीच कारण नाही. अर्जुनासाठी तर नाहीच नाही. त्याची परमेश्वराच्या विभूति जाणून घ्यायची इच्छा पूर्ण झाली आहे. तरीही त्याला एक प्रश्न पडलाच. तो स्वत:शीच विचार करायला लागला.
' अरे? मगाशी बोलताना, **' मी त्याची विभूती आहे '** असे तो म्हणाला.
म्हणजे त्याने मला स्वत:सारखेच मानले आहे. मग मी त्याच्यासारखा का नाही? माझा गोंधळ का होतो?
मला त्याच्याप्रमाणे अलिप्त राहून, त्रयस्थपणे आणि तटस्थपणाने, विचार का करता येत नाही? तो असे का बरे म्हणाला असेल?
कदाचित् मला प्रोत्साहन देण्यासाठीच म्हणाला असेल. मी युद्धासाठी तयार व्हावे ह्या हेतूनेच म्हणाला असेल.
पण तो स्वत:लादेखील **विभूति** म्हणाला आहे. ह्याचा अर्थ काय? आत्ता माझ्यासमोर उभा असलेला, माझ्याशी बोलत असलेला आणि मला दिसत असलेला हा माझा जिवलग मित्र, हितचिंतक आणि मार्गदर्शक जर विभूति असेल, तर मग —
**' तो मूळचा खरा कसा असेल? त्याचे ते रूप कसे असेल? मला त्याचे खरे स्वरूप पहायला मिळेल का?'**
ह्या प्रश्नामधूनच अकरावा अध्याय सुरू झालेला आहे.
**हा अकरावा अध्याय सर्वांत महत्वाचा आहे. गीतेचा कळसाध्याय आहे.**
गीतारूपी मंदिराचा कळस आहे. हा अध्याय सर्वात परिणामकारक असा आहे, सर्वोत्तम आहे, सर्वश्रेष्ठ आहे असे मला नेहमीच वाटते.
अध्यायाच्या अखेरीस अर्जुन अंतर्बाह्य ढवळून निघाला आहे. पार बदलून गेला आहे.
त्याच्या सर्व शंकाकुशंकांचे पूर्णपणे निराकरण झाले आहे. त्याला शंका उरल्याच नाहीत. तो श्रीकृष्णाशी एकरूप झाला आहे.
श्रीकृष्ण भगवान जे सांगेल तेच करायचे असा त्याचा दृढनिश्चय झाला आहे.
असे बघा की, एखाद्या प्रभावी वक्त्याने आपल्या भाषणामधे, —
' वाघ दिसतो कसा? चालतो कसा? बसतो कसा? धावतो कसा? डरकाळी फोडतो कसा? सावजावर झेप घेतो कसा? कितीही वजनदार शिकार खेचून नेतो कसा?'
ह्याचे समर्पक शब्दांनी कितीही उत्तम प्रकारे वर्णन केले तरीही, ऐकणाऱ्यावर त्याचा मर्यादित परिणाम होईल.

तो वक्त्याच्या शब्दसामर्थ्याला वाखाणेल. दाद देईल. पण जर तोच वाघ प्रत्यक्ष समोर आला तर काय होईल?
त्या वाघाच्या डरकाळीने आणि त्याच्या सर्व हालचालींच्या प्रत्यक्ष दर्शनाने होणारा परिणाम हा, वर्णन ऐकून होणाऱ्या परिणामापेक्षा कितीतरी मोठा, खोलवर आणि चिरस्थायी असेल नाही का?
तशा प्रत्यक्ष दर्शनाने पाहणारा गर्भगळित होईल. भीतीने थरथर कापायला लागेल. त्याची पाचावर धारण बसेल. त्याचे धाबे दणाणेल. तो गलितगात्र होईल. प्राणभयाने ओरडायला लागेल. पळायला लागेल. त्या वाघापासून लपायचा प्रयत्न करील. ते शक्य झाले नाही तर रडायला लागेल. नीट विचार करा. असेच होईल की नाही? अर्जुनाचे तसेच झाले आहे. ते सगळे पुढे येणारच आहे.
आपण अर्जुनाइतके भाग्यवान नाही म्हणून आपण फक्त ऐकायचे आणि कल्पना करायची इतकेच.
**ज्ञानेश्वर महाराज,** ज्ञानेश्वरीच्या अकराव्या अध्यायात काय म्हणतात ते नीट ऐका,

**आतां यावरी एकादशी । कथा आहे दोन्ही रसीं ।**

' हा अध्याय म्हणजे **शांत** आणि **अद्‌भुत** ह्या दोन रसांनी भरलेली कथा आहे.'

**जेथ शांताचिया घरा । अद्‌भुत आला आहे पाहुणेरा ।**
**आणि येरांही रसां पांतिकरां । जाहला मानु ।।**

अर्थ – या अध्यायांत शांत रसाच्या घरी अद्‌भुत रस हा पाहुणचारास आला आहे आणि इतर रसांनाही या दोन रसांच्या पंगतीचा मान मिळाला आहे. ते ह्या ठिकाणी, एखाद्या लग्नसमारंभातल्या वऱ्हाड्यांच्या सारखे आले आहेत.
त्यापुढे ह्या अध्यायाविषयी आणखीन काय सांगतात तेही ऐका. ते म्हणतात की,
' याप्रमाणे येथे नवरसांचे मूर्तिमंत स्वरूप भराला आले आहे आणि त्यायोगे जगाला श्रवणसुखाचे राज्य प्राप्त झाले आहे.
खरोखरच ह्या अध्यायात मोक्ष स्पष्ट झालेला आहे. हा अकरावा अध्याय देवांचे खास विश्रांतीचे ठिकाणच आहे.
ज्याप्रमाणे प्रयाग क्षेत्रामधे गंगा व यमुना या दोन नद्यांच्या ओघांचा संगम झाला आहे, त्याचप्रमाणे या अध्यायांत शांत व अद्‌भुत या दोन रसांचा मिलाफ होऊन, अकरावा अध्याय हा प्रयाग क्षेत्रच बनला आहे. अथवा —
ज्याप्रमाणे प्रयाग क्षेत्रामधे गंगा व यमुना या दोन नद्यांचे ओघ प्रकट दिसतात व त्या दोन ओघांच्यामधे जशी सरस्वती नदी गुप्त आहे, त्याचप्रमाणे या अध्यायांत शांत व अद्‌भुत हे दोन रस स्पष्ट दिसणारे आहेत आणि या दोन रसांमधे गीता ही गुप्त सरस्वतीच आहे.
बापहो, ही योग्य त्रिवेणी सर्वांना प्राप्त झाली आहे. म्हणून या त्रिवेणीसंगमांत, हवे त्याने आस्तिक्य बुद्धीने स्नान करून, जसे प्रयाग क्षेत्रामधे माधवाचे दर्शन घेतात तसे येथे विश्वरूप माधवाचे दर्शन घ्यावे.'
कसे वर्णन केले आहे ते पहा. कशी सुगम शब्दरचना केली आहे पहा. कशा सुंदर उपमा दिल्या आहेत पहा. कमाल आहे.
खरोखरच कमाल आहे. ज्ञानदेवांच्यासारखे तेच. दुसरे कोणीही नाही. किती दिव्य प्रतिभा लाभली होती त्यांना!
आपण त्यांना अत्यंत आदरपूर्वक नमस्कार करूया. असो.
अकराव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे. तो श्रीकृष्णाला सांगतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**मदनुग्रहाय परमम् गुह्यमध्यात्मसञ्ज्ञितम् ।**
**यत्वयोक्तम् वचस्तेन मोहोऽयम् विगतो मम ।। १ ।।**
**भवाप्ययौ हि भूतानाम् श्रुतौ विस्तरशो मया ।**
**त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ।। २ ।।**

माझ्यावर अनुग्रह करण्यासाठी अध्यात्म विषयक जी परम गुह्य गोष्ट तुम्ही सांगितली त्याने माझा हा मोह नाहीसा झाला.
तसेच हे कमलपत्राक्षा ! भूतांची उत्पत्ती व लय आणि तुमचे अक्षय माहात्म्यही तुमच्याकडून मी सविस्तर ऐकले.
' हे मधुसूदना ऽ! माझ्यावर कृपा करण्याच्या हेतूने सांगितलेली, ही अत्यंत गूढ असलेली गोष्ट, तुझ्या मुखातून ऐकल्यावर मी धन्य झालो आहे. सर्व भूतांची उत्पत्ती, स्थिती आणि लय तसेच तुझे अक्षय असे माहात्म्य तुझ्याकडूनच ऐकल्यावर माझा मोह नाहीसा झाला आहे. खरोखरच मला वेडाचा झटका आल्यासारखेच झाले होते.
वास्तविक मी कोणीही नसतानाही, स्वत:ला **महावीर अर्जुन** समजत होतो.
हे सर्व कौरव आणि पांडवही कोणीही नसतानाही, त्यांना आपले आप्तेष्ट आणि बंधुबांधव समजत होतो.
येथे रणांगणावर युद्धामधे मी त्यांना मारीन आणि ते मरतील किंवा ते मला मारतील आणि मी मरेन, असेच समजत होतो.
त्यांच्या मरणाच्या आणि त्यापुढील वियोगाच्या कल्पनेने व्याकूळ झालो होतो. परंतु हा सर्व तुझाच पसारा आहे हे ज्ञान नव्हते.
त्यामुळेच ह्या मोहरूपी महापुरात मी संपूर्णपणे बुडालो होतो. त्यामधून तूच मला बाहेर काढले आहेस. तुझे अनंत उपकार झाले.

त्या उपकारांचे विषयी काहीही बोलणे माझ्या शक्तीच्या पलीकडे आहे. तसे काही बोलायची आवश्यकताही नाही.

**असे असले तरीही माझ्या मनामध्ये एक इच्छा निर्माण झाली आहे.**

अत्यंत तीव्र अशी इच्छा निर्माण झाली आहे आणि ती इच्छा तुझ्या वाचून दुसरा कोणीही पूर्ण करू शकणार नाही.'

श्रीकृष्ण देखील आनंदित झाला. त्याच्या प्रयत्नाला यश येत होते. रुग्णाची प्रकृती पहिल्यापेक्षा बरीच सुधारली होती.

पण अजूनही त्याला काहीतरी विचारायचे होतेच. काहीतरी सांगायचे होते.

श्रीकृष्णाने आपले प्रभावी नेत्र त्याच्यावर रोखून, स्मितहास्य करीत प्रतिप्रश्न केला.

' कोणती इच्छा ऽ? काय असेल ते स्पष्टपणे सांग! जे हवे असेल ते माग! तू मला अत्यंत प्रिय आहेस आणि मी सदैव तुझ्या कल्याणाचीच इच्छा करीत असतो. तुलाही ते माहीत आहे. संकोच करू नकोस! मोकळेपणाने सांग.'

आता गुरुजींनी परवानगी दिल्यावर शिष्य कशाला थांबतोय! आणि मिळालेल्या संधीचा फायदा नाही घेतलान् तर तो अर्जुन कसला?

**एवमेतद्यथाऽऽत्थ त्वम् आत्मानम् परमेश्वर ।**

**द्रष्टुमिच्छामि ते रूपम् ऐश्वरम् पुरुषोत्तम ।। ३ ।।**

**मन्यसे यदि तच्छक्यम् मया द्रष्टुमिति प्रभो ।**

**योगेश्वर ततो मे त्वम् दर्शयात्मानमव्ययम् ।। ४ ।।**

आता हे परमेश्वरा ! तुम्ही आपले हे जसे वर्णन केले तशा प्रकारचे तुमचे ईश्वरी स्वरूप हे पुरुषोत्तमा ! मी प्रत्यक्ष पाहू इच्छितो.

हे प्रभो ! तशा प्रकारचे रूप मी पाहणे शक्य आहे असे जर तुम्हांला वाटत असेल, तर हे योगेश्वरा ! तुम्ही आपले अव्यय रूप मला दाखवा.

' कृष्णा ऽ! आत्ताच तू स्वत:चा उल्लेख तुझीच विभूति म्हणून केलास.

म्हणजे ह्याचा अर्थ, माझ्यासमोर उभा असलेल्या आणि माझ्या डोळ्यांना सुखदायक वाटणाऱ्या अशा प्रिय मित्राचे, मला होत असलेले दर्शन खरे नाही. त्याच्या मूळ स्वरूपाहून वेगळे आहे, असा होतो.

हे पुरुषोत्तमा ऽ! तुझे ते मूळ स्वरूप कसे आहे? कोणत्या आकाराचे आहे? कोणत्या रंगाचे आहे? किती मोठे आहे? किंवा किती लहान आहे? हे सर्व पाहण्याची मला तीव्र इच्छा झाली आहे.

ज्या स्वरूपामधून सृष्टीचा हा सर्व पसारा उत्पन्न होतो! तू ज्या स्वरूपाला **' मी ऽऽ'** असे म्हणतोस!

जेथून तू निरनिराळी रूपे घेऊन वारंवार जन्म घेतोस! ज्याचे वर्णन करण्याचा वेद आणि उपनिषदे प्रयत्न करतात आणि तसे प्रयत्न करता करता अखेरीस थकून जातात. **' नेति! नेति!'** म्हणतात.

**' नाही ऽ! परमेश्वर असा नाही ऽ! आम्हाला त्याचे यथार्थ वर्णन करताच येत नाही ऽ!'** असेच म्हणतात!

ज्याची अनुभूती यावी अशी सर्व ऋषी, मुनी, योगी आणि संत इच्छा करतात आणि त्यासाठीच आयुष्यभर प्रयत्न करीत असतात!

ते तुझे मूळचे दिव्य स्वरूप प्रत्यक्ष पाहण्यासाठी मी फार उत्कंठित झालो आहे ऽ! कमालीचा उतावीळ झालो आहे ऽ!

तू मला आपले ते रूप दाखव! ' तुझी इच्छा काय आहे?' असे तू मला प्रेमाने विचारलेस म्हणून मी तुला माझी इच्छा सांगतो आहे. राग मानू नकोस! तुझे ते अमानवीय, अचिंतनीय आणि अनाकलनीय रूप पाहण्याची जर माझी योग्यता नसेल तर तसे स्पष्टपणे सांग! पण जर माझी योग्यता असेल आणि ते रूप पाहणे मला शक्य आहे असे तुला वाटत असेल तर हे योगेश्वरा ऽ! हे परमेश्वरा ऽ! हे परमात्म्या ऽ! **अक्षय असे स्वत:चे मूळ रूप तू मला दाखव!**

ही माझी विनंती आहे असे समज, आग्रह आहे असे समज किंवा तुझ्या भक्ताचा हट्ट आहे असे समज.

हे देवाधिदेवा ऽ! मला तुझे विश्वरूप दाखव! त्या दर्शनाने मी धन्य होईन! कृतार्थ होईन! कृतकृत्य होईन!

माझ्या जगण्याचे सार्थक होईल अशी माझी श्रद्धा आहे! माझा विश्वास आहे!

कृपा करून माझ्यावर प्रसन्न हो आणि माझा हा हट्ट पुरव!'

**महाराष्ट्रकवि मोरोपंतांनी** अर्जुनाचा असा हट्ट किती रसाळपणे सांगितला आहे ते ऐका.

त्यांच्या **आर्यागीते** मधे ह्या दोन श्लोकांना समआर्या दिलेल्या आहेत.

**यापरि बोलसि जैसें इच्छितसें पाहयासि रूप तसें ।**
**पाहो इच्छितसें मी तूझें द्रृश्य स्वरूप अद्भुतसें ।।**
**योग्य असें कीं तुज मी, पहावयाला मनांत भावावें ।**
**मग योगेशा मजला, अव्यय ईशस्वरूप दावावें ।।**

शिष्याने आपली इच्छा सांगितली. जे मागायचे होते ते मागितले.

शिष्य सांगतो आहे की, ‘ गुरुजी ऽ! आतापर्यंत तुम्ही मला जे सांगितलेत ते मी ऐकले. आता मला तुमचे ते स्वरूप प्रत्यक्ष दाखवा.’ आता गुरुजींची पाळी आली. गुरुजी पण तोडीस तोड होते बरं का! **जगद्‌गुरूच ते!**

त्यातही तसे मागणे मागणारा त्यांचा अत्यंत प्रिय सखा आहे. जिवलग मित्र आहे. अनन्य भक्त आहे व सर्वोत्तम शिष्य आहे.

येथे गुरू शिष्याच्या आधीन झाला आहे. त्याला शिष्याचे वेड लागल्यासारखे झाले आहे. अर्जुन जे जे सांगेल ते ते करायला श्रीकृष्ण सिद्ध होतो आहे. त्याचे सगळे हट्ट, सगळे लाड अगदी मनापासून, तातडीने पुरवितो आहे.

लहान बालकाने हट्ट करावा आणि आईने तो लगेच पुरवावा, तसाच हा प्रकार आहे.

येथे देव आणि त्याचा भक्त पूर्णपणे एकरूप झालेले आहेत. किंबहुना, त्या दोघांच्यामधे कोण कोणाचा भक्त आहे तेच कळेनासे झाले आहे. **अर्जुन श्रीकृष्णाचा भक्त** आहे की **श्रीकृष्ण अर्जुनाचा भक्त** आहे?

ह्याविषयी नक्की काही सांगता येत नाही. खरंच सांगता येत नाही. असो.

त्याची ती इच्छा ऐकल्यावर श्रीकृष्ण अत्यंत आनंदित झाला. जे रूप त्याने आजपर्यंत कुणालाही दाखविले नाही ते **दिव्यरूप** तो आपल्या प्रिय मित्राला, सख्याला, भक्ताला, सुहृदाला आणि शिष्याला दाखवायला तयार झाला.

लहानपणी एकदा **‘ लोणी चोरून खाल्ल्याचा ’** आरोप झाला होता. त्यावेळी यशोदामातेला, आपले तोंड उघडून, त्याने त्या रूपाची चुणुक दाखविली होती. पण तिला बिचारीला त्याचा अर्थ कळला नाही. ती घाबरली. आपल्या पुत्रावर कुणीतरी चेटुक किंवा करणी केली असेल अशा समजुतीने तिने त्याची दृष्ट काढली. पुढे कितीतरी दिवस ती त्याला एकट्याला सोडतच नव्हती. त्याचे रक्षण करण्याच्या हेतूने त्याच्या बरोबरच राहायची.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी कौरवांच्या राजसभेमध्ये **‘ पांडवांचा दूत म्हणून ’** वाटाघाटी करायला गेला होता.

तेव्हा अप्रिय असा प्रसंग आल्यावर, संतप्त होऊन, तेथे उपस्थित असलेल्या सर्वांना, त्याने परत एकदा तशीच चुणुक दाखविली. त्यावेळीही काही ठराविक व्यक्ती सोडल्यास, इतर बहुतेक उपस्थितांना त्याचा अर्थ कळला नाही.

‘ हा गवळ्याचा पोर लबाड, मायावी आणि चेटक्या आहे ऽ! काहीतरी चेटुक किंवा भानामतीची करणी करून त्याने आमची सर्वांची फसवणूक केली आणि निघून गेला!’ अशीच प्रतिक्रिया व्यक्त झाली होती.

त्या दोन्ही प्रसंगांची आठवण होऊन त्याला हसू आले. पण आजची गोष्ट वेगळी होती.

त्याच्याच मुखाने त्याचे महात्म्य आणि त्याच्या अनेक महत्वाच्या विभूती ऐकल्यावर, अर्जुनाने कुतुहलाने त्याला विनंती केली होती. भक्तिभावाने, श्रद्धेने आणि विश्वासाने मागणे मागितले होते. तशा प्रत्यक्ष दर्शनाच्या योगाने, अर्जुनाच्या मनावर त्याच्या बोलण्यामुळे झालेला परिणाम अत्यंत दृढ होणार होता. वज्रलेप होणार होता.

तो सर्व माया, ममता आणि मोह त्यागून युद्धाला उभा राहणार होता. अन्यायी कौरवांना आणि त्यांच्या समर्थकांना शासन करण्याच्या कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणार होता. **श्रीकृष्णाला तेच तर व्हायला हवे होते.**

त्यासाठीच तर तो इतका वेळ प्रयत्न करीत होता. तो अत्यंत प्रेमाने आणि आनंदाने बोलायला लागला.

अर्जुनाची मागणी मान्य करून त्याचा हट्ट पुरवायचे ठरवून तो म्हणाला,

**श्रीभगवानुवाच :**

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।**

**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ।। ५ ।।**

**पश्यादित्यान्वसून् रुद्रान् अश्विनौ मरुतस्तथा ।**

**बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ।। ६ ।।**

हे पार्था! माझी अनेक प्रकारची आणि अनेक रंगांची व आकारांची ही शेकडो अथवा हजारो दिव्यरूपे पहा. हे आदित्य, वसू, रुद्र, अश्विनीकुमार तसेच मरुद्गण पहा. हे भारता ! पूर्वी कधीही न पाहिलेली अनेक आश्चर्ये पहा.

‘ हे अर्जुना ऽऽ! अत्यंत दुर्मिळ अशी गोष्ट तू मागतो आहेस ऽ! ही गोष्ट आजवर कोणीही संपूर्णपणे पाहिलेली नाही.

मला अत्यंत जवळचे असूनही, माझी माता देवकी, पिता वसुदेव, ज्येष्ठ बंधू बलराम, पत्नी रुक्मिणी, पुत्र प्रद्युम्न, भगिनी सुभद्रा, प्रिय मित्र सुदामन् ह्यांच्यापैकी एकालाही, ते भाग्य लाभलेले नाही. परंतु तुला मात्र ते भाग्य लाभणार आहे.

दिव्य असे जे माझे मूळ स्वरूप, ते आज ह्या ठिकाणी मी तुला दाखवतो.

पार्था ऽऽ! माझ्या ह्या स्वरूपामध्ये सर्व सृष्टीची उत्पत्ती होत असताना पहा ऽऽ! माझ्या ठिकाणी स्थित असलेले सर्व विश्व पहा! त्याची संपूर्ण स्थिती पहा ऽऽ! आणि माझ्याच ठिकाणी होत असलेला त्याचा लय पहा ऽऽ! विनाश पहा ऽऽ!

आता ह्या ठिकाणी तू माझी अनेक प्रकारची आणि अनेक रंगांची तसेच अनेक आकारांची अगणित दिव्यरूपे पहा ऽऽ!

आदित्य, वसू, रुद्र, अश्विनीकुमार तसेच सर्व मरुद्गण पहा ऽऽ!
यापूर्वी कधीही न पाहिलेली अनेक आश्चर्ये पहा ऽऽ!

**इहैकस्थञ् जगत्कृत्स्नम् पश्याद्य सचराचरम् ।**
**मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥**
**न तु माम् शक्यसे द्रष्टुम् अनेनैव स्वचक्षुषा ।**
**दिव्यम् ददामि ते चक्षू: पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥**

हे गुडाकेशा ! आज येथे एकत्र झालेले सर्व चराचर जग आणि दुसरेही जे काही तुला पाहण्याची इच्छा असेल ते सर्व माझ्या ह्या देहात पाहून घे. परंतू तुझ्या याच दृष्टीने मला तू पाहू शकणार नाहीस. म्हणून मी तुला दिव्य दृष्टी देतो.
तिने माझे हे ईश्वरी योगसामर्थ्य पहा.
हे अर्जुना ऽऽ, आज येथे एकत्र झालेले सर्व चराचर जग पहा ऽऽ! आणि त्याच्या शिवाय दुसरेही जे काही तुला पाहण्याची इच्छा असेल ते सर्व माझ्या ह्या देहात पाहून घे ऽऽ! परंतु तुझ्या ह्या मानवी दृष्टीने तू माझे स्वरूप पाहू शकणार नाहीस.
म्हणून मी तुला, मला पाहण्यास समर्थ असणारी अशी, दिव्य दृष्टी देतो. त्या दृष्टीच्या सहाय्याने, पहावयास अत्यंत दुर्मिळ असे, माझे ईश्वरी योगसामर्थ्य पहा. अर्जुना ऽऽ! **तथास्तु!** हे धनंजया ऽऽ! **तथास्तु!!** हे महाबाहो ऽऽ! **तथास्तु!!!**'
**तत्** म्हणजे तसे आणि **अस्तु** म्हणजे होवो. **तथास्तु** म्हणजे **तसेच होवो!**
अर्जुनाने मागणे मागितले आहे आणि श्रीकृष्ण भगवान् त्याचे मागणे पूर्ण करणार आहेत. त्याला **विश्वरूप** दाखविणार आहेत.
**हे विधान वर्तमानकाळरूप भूतकाळाचे आहे.** मला असे का वाटते ते सांगतो.
दैवयोग असा की संजयालाही ते रूप पहायला मिळाले आहे. व्यासमुनींनी त्याला दिव्यदृष्टी दिलेली होतीच. त्या अलौकिक दृष्टीच्या योगाने, त्याला युद्धाच्या पहिल्या दिवशी जे दिसले, ते तो युद्धाच्या दहाव्या दिवशी सायंकाळी धृतराष्ट्राला सांगतो आहे.
तो धृतराष्ट्राला समोर प्रत्यक्ष घडत असलेली घटना सांगत नाही आहे, तर दहा दिवस अगोदर घडून गेलेली घटना सांगतो आहे हे लक्षात ठेवा. असे असले तरीही त्याला त्यावेळी जे दिसले, त्याच्या आठवणीने आत्ताही त्याच्या भावना उचंबळून येत आहेत.
तो आश्चर्यचकित झालेला आहे. जणू काही त्याला ' ते रूप आपण आत्ताच पाहतो आहोत, ' असेच वाटते आहे.
म्हणून तो जरी भूतकाळ सांगत असला तरीही आपल्याला त्यामधे वर्तमानकाळाचा भास होतो.
त्यामुळे येथे भूतकाळ आणि वर्तमानकाळाचे एक चमत्कारिक मिश्रण झाले आहे असे वाटत राहते.
**गीतेच्या केवळ ह्याच अध्यायामधे, असा भास सतत होत राहतो.** इतर कोणत्याही अध्यायामधे तसा भास होत नाही.
ह्या मागील कारण सांगायचे झाले तर, मुळामधे विश्वरूप हे कालातीतच आहे.
त्यामुळे त्याच्या ठिकाणी भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ ह्या संज्ञांना काही अर्थच उरत नाही, हेच सत्य आहे. म्हणून त्याचे वर्णन वाचत असताना किंवा ऐकत असताना, वाचणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला आपण ते रूप प्रत्यक्ष बघत असल्याचा भास होतो.
**अर्जुनाला कसे दिसले असेल ते विश्वरूप?** ते रूप प्रत्यक्ष बघणारे दोघेच होते. अर्जुन आणि संजय.
यापुढे त्या दोघांनीही, त्यांना जे दिसले त्याचे वर्णन आपापल्या परीने केले आहे.
अनेक हात, अनेक पाय, अनेक मस्तके, अनेक चेहरे, अनेक डोळे, अनेक शस्त्रे, अनेक भावभावना, इत्यादींनी युक्त असलेले ते विश्वरुप! ज्यामधे सर्व त्रैलोक्य सामावलेले आहे असे ते विश्वरुप!
**उत्पत्ती, स्थिती** आणि **लय** ह्यांचे स्पष्ट दर्शन घडविणारे असे ते विश्वरूप! दर्शन होण्यास अत्यंत दुर्मिळ असे ते विश्वरूप!
दर्शन झाल्यावरही पाहण्यास अत्यंत दु:सह असे ते विश्वरूप! पाहणाऱ्याला भयभीत करणारे, त्याचा अहंकार नष्ट करणारे आणि त्याच्या स्वत:च्या क्षुद्रपणाची सुस्पष्ट जाणीव करवून देणारे असे ते विश्वरूप! खरंच, कसे दिसले असेल ते कल्पनातीत असे विश्वरूप?
आपण त्याची कल्पना करण्याचा प्रयत्न करूया का? तसे करणे शक्य होईल की नाही ते मला माहीत नाही.
पण आपण त्या दिशेने विचार करायचा निदान प्रयत्न तरी करूया!
**मुळामधे पाहणे ह्या क्रियेची सुरवात कशी होते?** असे पहा की, —
लहान बालकाची दृष्टी, त्याच्या नकळतच, अवतीभवती असणाऱ्या सर्व गोष्टी पाहण्याचा प्रयत्न करीत असते. त्याचे कान आजूबाजूला होणारे कोणतेही नाद ऐकण्याचा प्रयत्न करीत असतात. हातभर अंतरापासून सुरवात होते आणि त्याचा विकास होत होत, दूरवर असलेले दृष्य पाहण्याची किंवा दूरवरून येणारा नाद ऐकण्याची क्षमता प्राप्त होते.
परंतु समज आलेल्या, पाहणे व ऐकणे ह्या क्रिया समजून, उमजून आणि विशिष्ट हेतूने करू शकणाऱ्या माणसाच्या पाहण्याच्या क्रियेचा सर्वसाधारण क्रम कसा असू शकेल? सुरवात अर्थातच स्वत:पासून होत असेल!

स्वत:चेच हात, पाय इत्यादी अवयव पाहणे ही पाहण्याच्या क्रियेची सुरवात आहे असे म्हणायला हरकत नसावी.
त्यानंतर इतरांच्याकडे पाहणे सुरू होत असेल.
आपण ह्या स्वत:चे शरीर पाहण्याला **स्व - रूपदर्शन** असे म्हणूया.
त्यानंतर समोर असलेली एखादी वस्तू किंवा व्यक्ती प्रत्यक्ष पाहणे म्हणजे **वस्तुदर्शन** अथवा **व्यक्तिदर्शन** असे म्हणता येईल.
त्यानंतर काही वस्तू किंवा व्यक्ती एकत्रितपणे प्रत्यक्ष पाहणे म्हणजे **समूहदर्शन** असे म्हणता येईल.
त्यानंतर अनेक वस्तू आणि व्यक्ती एकत्रितपणे प्रत्यक्ष पाहणे म्हणजे **समाजदर्शन** असे म्हणता येईल.
आणि सरते शेवटी अगणित वस्तू आणि व्यक्ती स्थळाचे, काळाचे व अवकाशाचे बंधन नाहीसे करून एकत्रितपणे प्रत्यक्ष पाहणे म्हणजे **विश्वरूपदर्शन** असे म्हणता येईल.
आता ह्या सर्व क्रियांचा आपण जरा विस्ताराने विचार करूया!
समोर असलेले मातीचे मडके पाहणे, त्याचा आकार, उंची आणि रंग पाहणे, तसेच पाहून झाल्यावर लक्षात ठेवणे हे झाले **वस्तुदर्शन.**
एखाद्या ठिकाणी एकावर एक रचून ठेवलेली मडक्यांची रास थोडेसे दूर उभे राहून पाहणे, त्यांचे प्रत्येकाचे आकार, उंची आणि रंग पाहणे, तसेच ती सर्व मडकी एकमेकांना स्पर्श करून ठेवल्यामुळे दिसणारी एक सर्वस्वी निराळीच, एकत्रित अशी आकृती पाहून लक्षात ठेवणे हे झाले **समूहदर्शन.**
समोर आलेल्या व्यक्तीला पाहणे, त्याची शरीरयष्टी, त्याचे कपडे आणि देहबोली, त्याचा चेहरा व त्यावरील हावभाव पाहणे, त्याचे बोलणे, बोलण्याचा स्वर आणि शब्दांचे उच्चारण करण्याची लकब ऐकून लक्षात ठेवणे हे झाले **व्यक्तिदर्शन.**
एखाद्या कार्यक्रमासाठी कोणत्यातरी सभागृहामधे एकत्र जमलेल्या काही लोकांना पाहणे आणि त्यांचे शक्य होईल तितके निरीक्षण करून लक्षात ठेवणे हे झाले **समूहदर्शन.**
एखाद्या सार्वजनिक ठिकाणी, सभेसाठी लाखोंच्या संख्येने एकत्र आलेला समुदाय व्यासपीठावर उभे राहून पाहणे, त्यांच्या वेषभूषा, हालचाली इत्यादींचे निरीक्षण करणे, त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या घोषणा ऐकून लक्षात ठेवणे हे झाले **समाजदर्शन.**
ह्या सर्व प्रकारांचे दर्शन आपण सगळेच नेहमीच घेत असतो. त्यासाठी आपल्याला निसर्गाने दिलेली दृष्टी पुरेशी असते. त्यामधे विशेष म्हणता येईल असे काहीही नसते.
परंतू शेवटच्या प्रकारचे दर्शन हे फारच निराळे, गुंतागुंतीचे, कल्पना करण्यासही फार कठीण आणि पाहण्यास जवळजवळ अशक्य असे आहे. तसे का आहे बरे? विचार करण्यासाठी आपण एक वाक्य घेऊया!
<u>‘ समोर असलेली सर्व मडकी ही मातीपासून बनलेली आहेत आणि माती हेच सर्व मडक्यांचे मूलतत्त्व आहे ’</u> हे एक वाक्य आहे.
ह्या वाक्याचा अर्थ असा आहे की, ‘ सर्व मडक्यांच्या आकारामधे मातीच आहे. कोणतेही एक किंवा सर्व मडकी फुटली, मोडली किंवा कोणत्याही मार्गाने त्यांचा आकार नष्ट झाला तर शेवटी माती आणि फक्त मातीच शिल्लक राहील. दुसरे काहीही उरणार नाही.’
आता ही संकल्पना समजण्यासाठी दोन गोष्टी पाहणे आवश्यक आहे.
त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे मडक्याच्या दृष्य आकारापासून माती वेगळी आहे हे समजून घेणे आणि तसे पाहण्याचे शिक्षण स्वत:च्या डोळ्यांना देणे. दुसरी गोष्ट म्हणजे मातीतच वेगवेगळ्या आकाराची मडकी अस्तित्वात आहेत हे समजून घेणे आणि तसे पाहण्याचे शिक्षण स्वत:च्या डोळ्यांना देणे.
ह्यातली पहिली गोष्ट तुलनात्मक दृष्टीने सोपी आहे व प्रयत्न केल्यास ती पाहणे आपल्या डोळ्यांना शक्य आहे.
मातीला मिळालेला मडक्याचा आकार ही पंचमहाभूतांमधील, आकाश तत्त्वाचीच किमया आहे. **( Space )** तसेच दोन मडक्यांचे स्वतंत्र अस्तित्व हे त्या दोघांच्यामधे असलेल्या मोकळ्या जागेमुळे म्हणजेच अवकाशामुळेच शक्य झाले आहे. **( Space )**
मातीने व्यापलेले मडक्याच्या आकाराचे आकाश, त्याच्या आतमधे असलेली पोकळी किंवा अवकाश आणि दोन मडक्यांच्या मधे अस्तित्वात असलेली पोकळी किंवा अवकाश हे आपल्याला प्रत्यक्ष दिसू शकते.
ह्या तीनही गोष्टी जर नाहीशा झाल्या तर मडके नष्ट होऊन मातीच उरेल हे आपल्याला, विचार केल्यास, समजू शकते.
तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर ते तसे सोपे आहे. परंतू दुसरी गोष्ट जाणणे फार कठीण आहे. मुळामधे समजणेच फार कठीण आहे. प्रत्यक्ष दिसण्याची गोष्ट तर असंभव म्हणावी लागेल. त्यासाठी विशेष दृष्टीची नि:संशय आवश्यकता आहे.
मातीमधे वेगवेगळ्या आकाराची मडकी पाहणे म्हणजे एखाद्या मूलतत्त्वामधून शक्य असलेला सर्व प्रकारचा विस्तार पाहणे.
अगोदर अनेक मडकी पाहून त्यानंतर, त्यांच्या बाहेर अस्तित्वात असलेले अवकाश संपूर्णपणे वगळणे किंवा नाहीसे करणे.
ज्या क्षणी ही गोष्ट शक्य होईल त्या क्षणी सर्व मडकी एका परिमितीमधे एकत्र आलेली दिसतील. ती सर्व सलगपणे दिसायला लागतील. मातीच्या पार्श्वभूमीवर सर्व मडक्यांचे स्वत:चे आकार संपूर्णपणे दिसतील. परंतू ते स्वतंत्र नसतील तर एकमेकांत गुंतलेले

असतील. एक मडके हलवायचे म्हटले तर सगळीच मडकी हलतील. त्या परिमितीमधे ते दृष्य एकाचवेळी स्पष्टपणे दिसायला लागेल. परिमिती जर अनंत आकारमानाची असेल तर पाहणाऱ्याला त्या दृष्याची सुरवात कोठे झाली आहे व शेवट कोठे झाला आहे ते समजू शकणारच नाही. त्याच्या दृष्टीला ते दृष्य अनंत, अमर्याद, अपरिमित व अद्वितीय असेच दिसेल.
ही विशेष दृष्टीच असेल आणि हे दृष्य म्हणजे मडक्यांचे विश्वरूपच असेल.

**आपण हे दृष्य म्हणजे पहिली पायरी आहे असे समजूया.**

आता आपण अशी कल्पना करूया की, एखाद्या मोठ्या दिवाणखान्यामधे मेणाच्या अनेक प्रकारच्या आणि आकारांच्या पुतळयांचे प्रदर्शन भरले आहे. माणसांचे, पशूंचे आणि पक्षांचे हजारो पुतळे मांडलेले आहेत. सर्व पुतळे वेगवेगळे दिसतात कारण त्यांच्यामधे एकमेकांपासून विशिष्ट अंतर राखलेले आहे.
आता जर हे पुतळे सरमिसळ करुन एकमेकांना चिकटवून ठेवले तर त्यांच्या मधील अंतर म्हणजे अवकाश अत्यंत कमी होईल आणि सर्व पुतळे पहिल्यापेक्षा फारच कमी जागेमधे सामावले जातील.
ह्या अवस्थेतही प्रत्येक पुतळयाला स्वतंत्र अस्तित्व असेल कारण त्यांच्यामधे अत्यल्प का होईना पण अवकाश आहे.
हे दृष्य पाहणाऱ्याला गर्दीच्या वेळेचा लोकल ट्रेनचा दुसऱ्या वर्गाचा डबा आठवेल.
तेथे माणसांना चिकटलेली माणसे, त्यातच बॅगा, जेवणाचे डबे, मोबाईल फोन वगैरे सर्वकाही असते. पण कमीतकमी का असेना, अवकाश असते आणि म्हणूनच प्रत्येक गोष्टीला स्वतंत्र अस्तित्व असते.
आता असे समजा! त्या पुतळयांच्या निर्मात्याला इच्छा झाली की, ‘ हे सर्व पुतळे दाबून एकत्र करावे, एकजीव करावे, एकसंध करावे.’ आणि त्याने तसे केले तर काय होईल?
त्या सर्व पुतळयांमधील अवकाशही संपूर्णपणे नाहीसे होईल. ते सर्व पुतळे मिळून एकच एक मेणाचा पुतळा तयार होईल.
त्यामधे सर्व पुतळयांचे स्वतःचे आकार काही प्रमाणात दिसतील परंतू ते स्वतंत्र नसतील तर एकमेकांशी सांधले गेलेले असतील आणि सुसंगत नसतील. म्हणजे एकाच्या डोक्याला दुसऱ्याचे धड, तिसऱ्याचे हात, चवथ्याचे पाय, पाचव्याची शेपटी अशी अवस्था असेल. त्यातही सर्व अवयवांची स्थाने योग्य असतीलच असे सांगता येणार नाही. पोटावर शेपटी किंवा छातीवर चोच किंवा मानेवर डोळे दिसू शकतील. तसेच परिमिती एकच असल्यामुळे सगळाच गोंधळ असेल.
जर ती परिमिती अनंत असेल तर त्या पुतळयाची सुरवात कोठून झाली आहे व शेवट कोठे झाला आहे ते कळणारच नाही.

**आपण हे दृष्य म्हणजे दुसरी पायरी आहे असे समजूया.**

आता आपण असे समजूया की, त्या पुतळयांच्या निर्मात्याने सर्व पुतळे एकत्र, एकसंध, एकजीव करण्यासाठी त्यांना एका विशिष्ट वर्तुळाच्या बाहेर आणि आकाराने त्याच्यापेक्षा मोठ्या असलेल्या अशा दुसऱ्या समकेंद्री **( Concentric )** वर्तुळाच्या आत एकमेकास चिकटवून उभे केले आणि त्यांच्यामधे असलेले अवकाश जर पारदर्शक अशा पदार्थानेच भरून काढले, तर त्या सर्व पुतळयांच्या मधील अवकाश संपूर्णपणे नाहीसे होईल. ते सर्व पुतळे मिळून एकच एक मेणाचा पुतळा तयार होईल.
त्यामधे मेणाच्या पार्श्वभूमीवर सर्व पुतळयांचे स्वतःचे आकार, मुळामधे जसे असतील तसेच, संपूर्णपणे दिसतील.
तसेच त्यांचे अंगभूत असलेले सर्व गुणदोष सर्वार्थाने व्यक्त होतील. शिवाय ते सुसंगतही असतील. त्यांच्यामधे कोणत्याही प्रकारचा गोंधळ नसेल. परंतु ते स्वतंत्र नसतील तर एकमेकांशी सांधले गेलेले असतील.
त्या पुतळयाची सुरवात कोठून झाली आहे व शेवट कोठे झाला आहे ते कळणारच नाही.
ह्याचे कारण स्पष्ट आहे आणि समजायला सोपे आहे. कोणताही पुतळा पहिला मानला तर त्याच्या अगोदरही वेगळा पुतळा दिसेल आणि कोणताही पुतळा शेवटचा मानला तर त्याच्या नंतरही वेगळा पुतळा दिसेल.
म्हणून, ह्या अवस्थेमधे त्या वर्तुळाच्या केंद्रस्थानी **( Centre )** असलेल्या कोणाही पाहणाऱ्याच्या दृष्टीला ते दृष्य अनंत, अमर्याद, अपरिमित व अद्वितीय असेच दिसेल. त्याशिवाय जर त्या दृष्याला वर्तुळाकार फिरणारी, खालीवर हलणारी आणि पुढेमागे सरकणारी गती असेल, तर ते दृष्य विलक्षण प्रत्यय देईल.
एका प्रकाराने, ही विशेष दृष्टीच असेल आणि हे दृष्य म्हणजे पाहणाऱ्यासाठी, विविध पुतळयांचे विश्वरूपच असेल.

**आपण हे दृष्य म्हणजे तिसरी पायरी आहे असे समजूया.**

वर वर्णन केलेल्या तीनही दृष्यांमधे काही तृटी आहेत. काही मर्यादा आहेत.
पहिल्या आणि दुसऱ्या दृष्यामधे पाहणाऱ्याची दृष्टी जोपर्यंत दृष्यावरच स्थिर केलेली आहे तोपर्यंत ते दृष्य अनंत, अमर्याद, अपरिमित व अद्वितीय असेच दिसेल. ज्यावेळी पाहणारा आपली दृष्टी हलवून इतरत्र नेईल किंवा डोळे मिटून घेईल, त्याक्षणी त्याला ते दृष्य दिसेनासे होईल. त्याऐवजी इतर कोणते तरी दृष्य दिसायला लागेल किंवा काहीच दिसणार नाही.
तिसऱ्या दृष्यामधे पाहणाऱ्याच्या सभोवताली तेच दृष्य दिसत राहील. काही प्रमाणात प्रभाव पडण्याजोगी हालचालही दिसेल.

त्यामुळे जास्त परिणाम साधला जाईल. पण येथेही पाहणाऱ्याची दृष्टी जोपर्यंत सभोवतालच्या दृष्यावरच स्थिर केलेली आहे तोपर्यंत ते दृष्य अनंत, अमर्याद, अपरिमित व अद्वितीय असेच दिसेल. ज्यावेळी पाहणारा आपली दृष्टी हलवून वर किंवा खाली नेईल किंवा डोळे मिटून घेईल, त्याक्षणी ते दृष्य दिसेनासे होईल. त्याऐवजी इतर कोणते तरी दृष्य दिसायला लागेल किंवा काहीच दिसणार नाही.
दुसरी गोष्ट म्हणजे त्या तीनही दृष्यांमधे फक्त वर्तमानकाळ अस्तित्वात आहे. आत्ता तेथे जे आहे तेच दिसते आहे.
तेथे भूतकाळ आणि भविष्यकाळ अस्तित्वात नाहीत. त्यांचा ह्या दृष्यांशी काही संबंधच नाही.
तिसरी गोष्ट म्हणजे अगोदरच्या दोन दृष्यांमधील पात्रे म्हणजे मडकी किंवा पुतळे निर्जीव आहेत.
ते स्वत: हालचाली करीत नाहीत, आवाज करीत नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव बदलत नाहीत. कधीही, कोणतीही क्रिया-प्रतिक्रिया करीत नाहीत. त्यामुळे परिणाम मर्यादित प्रमाणात असतील.
तिसऱ्या दृष्यामधील पुतळयांच्या पुढेमागे, खालीवर आणि वर्तुळाकार फिरण्याच्या, हालचाली होत असतील. त्यामुळे त्याचे परिणाम, अगोदरच्या दोन दृष्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात झाले, तरीही मर्यादितच असतील.
आता ह्या तीनही पायऱ्यांची संकल्पना आणि त्यांचे विवेचन मनामधे ठेवून आपण पुढील कल्पना करण्याचा प्रयत्न करूया!
ज्याप्रमाणे अवकाशाची **( Space )** संकल्पना नाहीशी केली, त्याचप्रमाणे जर कालाची **( Time )** संकल्पनाही नाहीशी केली तर?
तेथे भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ **( Past, Present & Future )** असे काहीही अस्तित्वामधे राहणारच नाही.
तीनही काळातील घडून गेलेल्या, घडत असलेल्या आणि घडणार असलेल्या सर्व घटना ह्या स्वतंत्रपणे, संमिश्रपणे किंवा सरमिसळ होऊन एकाच वेळी, एकाच ठिकाणी एकत्रितपणे दिसायला लागतील. उदाहरणार्थ सांगायचे झाले तर, ---
१) ' दोनशे वर्षांपूर्वीचा माणूस, आज जिवंत असलेल्या हत्तीवर बसून, पाचशे वर्षांनंतर अस्तित्वात येणाऱ्या हरिणाची शिकार करताना दिसायला लागेल.' पाहणाऱ्याला असलेल्या कालज्ञानामुळे आणि तो स्वत: वर्तमानकालात असल्याच्या जाणिवेमुळेच त्याला पूर्वी जन्मलेला माणूस, आज जिवंत असलेल्या हत्तीवर बसून, भविष्यामधे होणाऱ्या हरिणाला मारतो आहे असे जाणवण्याची शक्यता असू शकेल. आपल्या समोर तसे प्रत्यक्ष घडत असल्याची जाणीव होतांना दिसून येईल.
<u>परंतु काळ अस्तित्वातच नसल्यावर, कालज्ञानच नसल्यावर, तो प्रश्नच राहणार नाही.</u>
' भविष्यातले जंगल, त्यावेळच्या वनस्पती, इतर पशुपक्षी, त्यांचे वेगवेगळे आवाज, हरिणाची मरणाच्या भितीने होणारी पळापळ, हत्तीची लगबग, त्याच्या पाठीवर बसलेल्या माणसाचा नेम धरून भाला फेकताना ताठरलेला चेहरा ' वगैरे सर्व क्रिया आणि प्रतिक्रियांचा अंतर्भाव असलेले असे जिवंत दृष्य दिसेल. त्यावेळी शिकार करणारा मनुष्य मरण पावलेला असणे आणि पळणारे हरिण जन्मालाच आलेले नसणे ह्या विचारांना काहीही अर्थ असणार नाही.
२) कोट्यावधी वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेले महाकाय व क्रूर डायनॉसॉरस, हजारो वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेले महाकाय असे केसाळ हत्ती, आज अस्तित्वात असणाऱ्या विशालकाय मगरी, शार्क व देवमासे आणि लाखो वर्षांनंतर अस्तित्वात येणारे वेगळे व विचित्र प्राणी एकाच वेळी आपापल्या स्वभावाप्रमाणे क्रिया-प्रतिक्रिया करतांना दिसून येतील.
३) अंतरिक्षामधे पूर्वी कधीतरी झालेला महास्फोट, ताऱ्यांचे स्फोट, आजचे सर्व ग्रहगोल व आकाशगंगा आणि पुढे कधीतरी अस्तित्वात येणारे सर्व विश्व एकाच वेळी किंवा एकापाठोपाठ एक दिसायला लागेल.
४) सर्वशक्तिमान परमेश्वराचे सर्व अवतार, तसेच त्याच्या अनंत विभूती एकाच ठिकाणी, एकाचवेळी किंवा एकापाठोपाठ एक दिसू लागतील.
५) एकाच ठिकाणी महाराज पृथ्वीराज चौहान, महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, थोरले बाजीराव पेशवे, तात्या टोपे, झाशीची राणी इत्यादी सर्व व्यक्तिमत्वे त्यांच्या सर्व वैशिष्ट्यांसह क्रियाशील असल्याचे पाहता येईल. त्यांचे हात, पाय, मस्तक व त्यावरील शिरस्त्राण, चेहऱ्यावरले हावभाव, त्यांच्या हातात असलेली नाना प्रकारची शस्त्रे, त्यांची वस्त्रे आणि त्यांवरील नाना प्रकारचे अलंकार, त्यांच्या पायामधे घातलेली निरनिराळी पादत्राणे इत्यादी सर्व गोष्टींचे प्रत्यक्ष दर्शन घडेल.
६) कश्यप, वशिष्ठ, विश्वामित्र, वाल्मिकी, व्यास, शुक्राचार्य, दुर्वास इत्यादी प्राचीन ऋषीमुनींच्या बरोबरच शंकराचार्य, भास्कराचार्य, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी अर्वाचीन संतमहंतसुद्धा आपल्या सर्व वैशिष्ट्यांसह एकाचवेळी दिसून येतील.
७) पूर्वी होऊन गेलेली, आज असलेली आणि पुढे उत्पन्न होणारी भयंकर, भयानक, भीषण, विदृप, ओंगळवाणी, किळसवाणी, अभद्र अशी सर्व प्रकारची व्यक्तिमत्वे त्यांच्या कुरूप वैशिष्ट्यांसह एकाचवेळी दिसू लागतील.
८) पूर्वी होऊन गेलेला आणि भविष्यात होणार असलेला सर्वनाशही एकाच वेळी दिसायला लागेल. ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्ती, नामांकित योद्धे, पापी आणि पुण्यवान् माणसे, सर्व प्रकारचे पशू, पक्षी आणि जलचर इत्यादी सर्वांचा मृत्यू होत असताना दिसून येईल. मृत्यू घडून येण्याचे प्रकार, मृत्यूचे कारण, त्यातील भयानकता, यातना आणि मरणाऱ्यांची अंतकाळी होणारी भीषण अवस्था प्रत्यक्ष

दिसून येईल.
जर अशा सर्व प्रकारचे दर्शन, ' एकाच ठिकाणी, एकाच वेळी अथवा एका पाठोपाठ एक असे, सर्व वैशिष्ट्यांसह, क्रियाशीलपणे व सजीवपणे प्रत्यक्ष झाले,' तर त्या सर्वसमावेशक अशा रूपाला अनेक हात, अनेक पाय, अनेक मस्तके, अनेक चेहरे, अनेक अलंकार, अनेक शस्त्रे आणि अस्त्रे असतील. त्यामधे सृजनकारी, पालनकारी आणि विनाशकारी अशा अनेक क्रियाप्रतिक्रियांची मालिकाच घडून येताना दिसून येईल. जे जे पहायची इच्छा होईल ते ते दिसायला लागेल. त्या दृष्याला कोणत्याही प्रकारची मर्यादा असणार नाही. त्याची सुरवात कोठून झाली आणि शेवट कोठे झाला ते समजणारच नाही.

**जर असे दृष्य सर्व बाजूंनी दिसले तर काय होईल?**

म्हणजे असे समजूया की पाहणारा एका मोठ्या चेंडूच्या केंद्रस्थानी **( Centre )** उभा आहे.
' तो तेथे आहे आणि चेंडूपासून संपूर्णपणे वेगळा आहे. त्याच्या आणि चेंडूच्या अंतर्गत पृष्ठभागामधे, सर्व बाजूंनी चेंडूच्या त्रिज्येएवढे अवकाश आहे.' ह्याची त्याला पूर्णपणे जाणीव आहे.
आता जर त्या संपूर्ण पृष्ठभागावर आधी वर्णन केल्याप्रमाणे स्थल-काल-अवकाशाची संकल्पना नसलेली त्रिमिती दृष्ये दिसायला लागली तर पाहणाऱ्याची अवस्था कशी होईल?
त्याने त्याच्या सभोवार, खाली, वरती, कोठेही पाहिले तरी त्याला तेच दृष्य सतत दिसत राहील. जे पहायची इच्छा होईल ते सतत दिसत राहील. शिवाय ते दृष्य त्याच्या मनावर, बुद्धीवर आणि एकूण व्यक्तिमत्वावर इतका जबरदस्त परिणाम करील की त्याने डोळे मिटले तरीही ते दृष्य दिसायचे थांबणार नाही. दृष्य दाखवणारा जोपर्यंत ते दाखवायचे बंद करीत नाही आणि पाहणाऱ्याला दिलेली विशेष दृष्टी किंवा दिव्यदृष्टी काढून घेत नाही तोपर्यंत ते दृष्य दिसतच राहील.
ते चित्रविचित्र दृष्य पाहून, पाहणारा कुणीही असला तरी तो भयभीतच होईल. सुरवातीला आश्चर्य, संभ्रम, आनंद इत्यादी भावना उद्‌भवतील, पण त्या काही काळच टिकतील. भीतीची भावनाच सर्वात प्रबळ असेल आणि ती मात्र बराच काळ टिकेल.
ते दृष्य दिसेनासे झाल्यानंतर, काही काळ जाऊ दिल्या नंतरच, थोड्या वेळाने पाहणाऱ्याची मनस्थिती पूर्वपदावर येईल.

**असेच काहीसे, विश्वरूपदर्शन दाखवताना व पाहताना झाले असेल का?**

अर्जुनाने ते दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केल्यावर श्रीकृष्ण त्याला म्हणाला की —
' हे पार्था, तू माझी अनेक प्रकारची, अनेक आकारांची, अनेक रंगांची अनेक दिव्य रूपे प्रत्यक्ष पहा! पूर्वी कधीही न पाहिलेली अनेक आश्चर्ये पहा! माझ्यामधे सामावलेले सर्व चराचर, सर्व देवदेवता, सर्व ऋषीमुनी व सिद्धपुरुष, एकत्रितपणे पहा! इतकेच नव्हे तर हे अर्जुना, भूत-वर्तमान-भविष्य ह्यामधील जे काही आणि जसे पाहण्याची इच्छा असेल ते सर्वकाही माझ्या देहात पाहून घे! माझे ईश्वरी सामर्थ्य पहा! पण माझे हे रूप तुला तुझ्या डोळ्यांनी पाहता येणार नाही म्हणून मी तुला दिव्यदृष्टी देतो!' असे म्हणून त्याने अर्जुनाला **दिव्यदृष्टी** दिली. म्हणजे काय केले असेल?
त्याच्या मनामधली **' स्थल-काल-अवकाशाची संकल्पना '** काही वेळासाठी नाहीशी केली असेल?
केवळ ' अर्जुन स्वत: अस्तित्वात असून सभोवताली पाहत असलेल्या त्या अद्‌भूत दृष्यापासून वेगळा आहे ' एवढ्यापुरतीच जाणीव शिल्लक ठेवली असेल? त्याच्या मनामधे चालू असलेला इतर सर्व प्रकारचा गोंधळ थांबवून ठेवला असेल?
आणि त्यानंतर त्याच्या सर्व बाजूंनी, स्वत:चा, सामान्य बुद्धीच्या पलीकडचा असा आविष्कार संपूर्णपणे व्यक्त केला असेल?
तो प्रकार काहीसा, एखाद्या संपूर्ण गोलाकार **( Spherical )** घुमटाकृती पडद्यावर, आत बसलेल्या माणसाला, त्रिमिती चित्रपट **( 3D Movie )** दिसण्यासारखा झाला असेल असे मला वाटते. अखेरीस दिसलेले ते अक्राळ-विक्राळ रूप पाहून, आपल्या सर्व शत्रूंना आणि मित्रांना, त्या आगीचे लोळ बाहेर फेकणाऱ्या, भयानक मुखामधे शिरताना आणि विकराल दाढांच्याखाली चिरडून मरताना पाहिल्यावर अर्जुन भयग्रस्त होऊन विचारतो की, **' हे प्रभो, तुम्ही कोण आहात?'**
विश्वरूपाचा विचार करताना माझ्या मनामध्ये असेच दृष्य यायला लागते. कितीही विचार केला तरीही ह्यापेक्षा निराळे, वेगळे आणि अधिक तर्कशुद्ध असे दुसरे कोणतेही दृष्य येत नाही.
तसेच अर्जुनाला **उत्पत्ती, स्थिती** आणि **लय** ह्यांचे स्पष्ट दर्शन, एका पाठोपाठ एक अशा क्रमानेच झाले असावे असेच वाटते.
संपूर्ण विश्वाच्या उत्पत्ती विषयी आजवर अनेक अंदाज व्यक्त केले गेलेले आहेत.
त्यापैकी **' महास्फोटा मधून विश्वनिर्मिती '** चा अंदाज **( Big Bang Theory )** जवळ जवळ सर्व मान्य आहे.
म्हणून अर्जुनालाही विश्वाच्या उत्पत्तीचे दर्शन त्याच प्रकारे घडले असावे असेच वाटते.
अर्थात हे माझ्यासारख्या एका सर्वसामान्य माणसाचे मत आहे. मला त्याचे समर्थन करता येणार नाही.
कोणत्याही प्रकारचे पुरावे देता येणार नाहीत. आपण सर्वांनी ही गोष्ट समजून घ्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. असो.

**संजय उवाच :**

**एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः ।**

**दर्शयामास पार्थाय परमम् रूपमैश्वरम् ।। ९ ।।**

हे राजा धृतराष्ट्रा ! ह्याप्रमाणे बोलल्यावर मग, योगांचा मोठा ईश्वर जो हरी त्याने अर्जुनाला आपले विश्वरूप दाखविले.
संजय श्रीकृष्णाला उद्देशून काय म्हणाला आहे ते पहा.
तो श्रीकृष्णाला **महायोगेश्वर** आणि **हरिः** म्हणाला आहे.

**महायोगेश्वर** म्हणजे ' सर्व महायोगांचा तसेच सर्व महायोग्यांचा ईश्वर.' आणि **हरिः** म्हणजे सर्व पापांचा नाश करणारा. अशा त्या श्रीकृष्णाने अर्जुनाला आपले **परमम्** म्हणजे मूलभूत आणि अंतिम असे दोनही प्रकारचे, **( Elementary & Ultimate )** **ऐश्वरम्** म्हणजे वैभवशाली, तेजस्वी, श्रेष्ठ, उत्कृष्ट, सर्वोत्तम असे, **( Glorious )** **रूपम्** म्हणजे एकत्रित दिव्य स्वरूप म्हणजेच विश्वरूप **( Divine Form )** दाखविले.

हे शब्द संजयाचा मनोभाव व्यक्त करतात. त्याला हे समजून आलेले आहे की —
' श्रीकृष्ण हा कोणी साधारण, सर्वसामान्य मनुष्य नाही. तो साक्षात् परमेश्वरच आहे. त्याने जे दिव्यस्वरूप दाखविले ते दाखविणे, त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही शक्य नाही.'
पण राजा धृतराष्ट्राला सांगताना तो, ' अर्जुनाची विनंती मान्य करून, श्रीकृष्णाने त्याला आपले दिव्य रूप दाखविले,' असे सांगतो आहे. आता यापुढील तीन श्लोकांमधे त्याने जे पाहिले, त्याचे वर्णन करतो आहे.

**अनेकवक्त्रनयनम् अनेकाद्भुतदर्शनम् ।**

**अनेकदिव्याभरणम् दिव्यानेकोद्यतायुधम् ।। १० ।।**

**दिव्यमाल्याम्बरधरम् दिव्यगन्धानुलेपनम् ।**

**सर्वाश्चर्यमयम् देवम् अनन्तम् विश्वतोमुखम् ।। ११ ।।**

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।**

**यदि भाः सदृशी सा स्यात् भासस्तस्य महात्मनः ।। १२ ।।**

त्या विश्वरूपाला अनेक तोंडे व डोळे असून त्यांत अनेक अद्भुत देखावे दिसत होते. त्यावर अनेक प्रकारचे दिव्य अलंकार असून अनेक प्रकारची दिव्य आयुधे उभारलेली होती. त्या अनंत, सर्वतोमुख व सर्व आश्चर्यांनी भरलेल्या देवाला दिव्य सुगंधाची उटी लावलेली होती व त्याने दिव्य वस्त्रे व पुष्पे धारण केलेली होती. आकाशात एक हजार सूर्यांची प्रभा जर एकदम पसरेल, तर ती त्या महात्म्याच्या कांतीसारखी काहीशी दिसेल.
त्याला जे दिसले ते तो सांगतो आहे. सविस्तरपणे सांगत नाही तर थोडक्यात सांगतो आहे. कदाचित त्याचे शब्दसामर्थ्य कमी पडले असावे. तरीही केवळ एकच गोष्ट त्याने अत्यंत प्रभावीपणे सांगितलेली आहे असे मला वाटते.
' हे राजन्! आकाशामधे जर हजारो सूर्य एकाच वेळी उगवले तर त्यावेळी त्यांचे एकत्रितपणे जेवढे तेज दिसायला लागेल ते, काहीसे विश्वरूपाच्या तेजासारखे दिसेल.' **काहीसे** बरे का! **तसेच** नाही! कारण उघड आहे.
त्या दिव्यरूपामधे अगणित सूर्य, चंद्र आणि तारे सामावलेले आहेत. त्या सर्वांच्या एकत्रित तेजाच्या तुलनेत, हजारो सूर्यांचे तेज म्हणजे काहीच नाही. असे असले तरीही त्याने दिलेली उपमा योग्यच आहे.
अहोऽऽ! सूर्योदयानंतरचा अर्धा तास आणि सूर्यास्तापूर्वीचा अर्धा तास सोडला तर आपण दिवसभर, एकाच सूर्याकडे क्षणभरही पाहू शकत नाही. तसा प्रयत्न करायला गेलो तर ताबडतोब आपले डोळे मिटतात. दिपून जातात. डोळ्यांसमोर केवळ तेजोगोलच येतो आणि आपल्याला काहीही दिसेनासे होते. थोडा वेळ गेल्या नंतर हळूहळू आपल्याला नेहमी सारखे दिसायला लागते.
त्यामुळे **' एकाचवेळी हजारो सूर्यांचे उगवणे,'** ही मानवी कल्पनाशक्तीची कमाल मर्यादाच म्हणावी लागेल आणि ज्याच्या तुलनेत ती कल्पनाही फिकी पडेल, निस्तेज भासेल, असे विलक्षण तेज पाहण्यासाठी दिव्यदृष्टीच असावी लागेल नाही का?
तरच ते विश्वरूप पाहणे शक्य होईल. असो.

**तत्रैकस्थञ् जगत्कृत्स्नम् प्रविभक्तमनेकधा ।**

**अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ।। १३ ।।**

**ततः स विस्मयाविष्टः हृष्टरोमा धनंजयः ।**

**प्रणम्य शिरसा देवम् कृताञ्जलिरभाषत ।। १४ ।।**

देवाधिदेवाच्या ह्या शरिरात नानाप्रकारे विभागलेले सर्व जग एकत्र झाले आहे असे अर्जुनाच्या दृष्टीस पडले. मग आश्चर्याने थक्क झालेल्या त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि मस्तक लववून नमस्कार करून व हात जोडून तो अर्जुन देवाला म्हणाला की, अर्जुनाने मात्र त्याला दिसलेल्या विश्वरूपाचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

त्याविषयी मी यथाशक्ती यथामती विचार केला. त्याने ज्या क्रमाने आणि ज्या प्रकारे वर्णन केले आहे त्यावरही विचार केला.

तो अगोदर आश्चर्याने थक्क झालेला आहे. नंतर आश्चर्याच्या बरोबरीने आनंदितही झालेला आहे.

त्यानंतर आश्चर्य आणि आनंदाची भावना नाहीशी होऊन तो भयभीत झाला आहे. पार गोंधळून गेला आहे.

भीतीने तो थरथर कापतो आहे. स्वत:च्या नगण्य अशा अस्तित्वाची त्याला स्पष्टपणे जाणीव झाली आहे.

मनाच्या त्या दिङ्मूढ अवस्थेमधे त्याने प्रश्न विचारला आहे.

त्याच्या प्रश्नाचे आश्वासक असे उत्तर मिळाल्यावर अखेरीस त्याचे अष्टसात्त्विक भाव जागे झाले आहेत.

पराकोटीचा भक्तिभाव जागा झाला आहे. परमेश्वराच्या अपरंपार सामर्थ्याची प्रचिती आली आहे.

तो परमेश्वराची स्तुती करतो आहे. आपले दिव्यरूप आवरून घ्यायला सांगतो आहे.

आपले पूर्वीचे, नेहमी पहायची सवय असलेले, असे रूप दाखवायला सांगतो आहे.

ह्या सगळ्या क्रमाचा सखोल आणि सविस्तर विचार केला.

त्यानंतर माझ्या अल्पबुद्धीला जे जाणवले, जे भासले, जसे वाटले आणि ज्याचे कल्पनाचित्र माझ्या मन:चक्षूंच्यापुढे उभे राहिले, त्याचे वर्णन करायचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. आपण ते ऐकून त्यावर विचार करावा ही नम्र विनंती.

श्रीकृष्ण अत्यानंदाने त्याला म्हणाला, ' अर्जुना ऽऽ! मी तुला, मला पाहण्यास समर्थ असणारी अशी दिव्य दृष्टी देतो. त्या दृष्टीच्या सहाय्याने, पहावयास अत्यंत दुर्मिळ असे, माझे ईश्वरी योगसामर्थ्य पहा.' असे म्हणून त्याने आपला उजवा हात अर्जुनाच्या मस्तकावर ठेवला आणि स्वत:जवळ असलेली आवश्यक ती ऊर्जा अर्जुनाकडे प्रक्षेपित केली.

क्षणभराने त्याच्या मस्तकावरला आपला हात काढून घेऊन तो स्मितहास्य करीत अर्जुनाकडे पहायला लागला. हसायला लागला.

हा कृत्रिम निद्रेचा, मोहनिद्रेसारखा ( **Hypnotism** ) अथवा मूर्छनविद्येचा, मोहिनीप्रयोगासारखा **( Mesmerism )** आपल्याला अज्ञात असा, एखादा प्रगत प्रकार असावा असे मला वाटते. ( **Advanced Technique** )

कारण तशा प्रकारच्या कृत्रिम निद्रेमधे अथवा मूर्छनेत गेलेला मनुष्य, त्याला तशा अवस्थेत नेणाऱ्या व्यक्तीच्या आधीन होतो.

तो जसे वर्णन करील तसे त्याला प्रत्यक्ष दिसायला लागते आणि तो जे जे सांगेल ते ते करायला लागतो.

येथे देखील तसाच प्रकार घडविला गेला असावा. अर्जुनाची **' स्थल, काल, अवकाश '** ह्यांची जाणीवच थांबली असेल.

बुद्धी आणि मन ह्यांच्या क्रिया प्रतिक्रिया क्षीण झाल्या असतील.

केवळ त्याची विचार करण्याची आणि ते विचार व्यक्त करण्याची शक्ती काही प्रमाणामधे कार्यरत राहिली असेल.

अर्जुन तशा अवस्थेमधे गेल्यानंतर मग त्याच्या सर्व बाजूंनी, सामान्य बुद्धीच्या पलीकडचा असा दिव्य स्वरूपाचा आविष्कार, दृष्य स्वरूपात व्यक्त केला गेला असेल. स्वत: योगेश्वर असलेल्या श्रीकृष्णाला तसे करणे सहज शक्य होते.

असे का समजायचे? कशावरून समजायचे? तर त्यामागेसुद्धा यथायोग्य असे कारण आहे.

तशाच स्वरूपाचे आणखी एक उल्लेखनीय असे उदाहरण महाभारतात आलेले आहे.

पुढे युद्ध सुरू झाले तेव्हा, **' जयद्रथाला अर्जुनाच्या हातून मारविताना '** त्याने तसाच प्रकार, पण जरा वेगळ्या पद्धतीने म्हणजे एकाच वेळी अनेकांवर केलेला आहे.

महाभारतातील द्रोणपर्वातर्गत जयद्रथवधपर्वाच्या १४६ व्या अध्यायामधे त्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. ज्यांना कुतुहल असेल त्यांनी, तो अध्याय वाचून पहावा. त्या प्रसंगाचे वर्णन करताना संजय धृतराष्ट्राला सांगतो आहे की,

' त्यावेळी जयद्रथाच्या सभोवताली असलेल्या आणि त्याचे अर्जुनापासून रक्षण करीत असलेल्या सर्व योध्यांना अचानकपणे आणि अत्यंत सहजपणे **' अंधार होऊन सूर्यास्त झाला आहे.'** असेच वाटले.

त्यामुळे सूर्याकडे न पाहताच, ' आता अर्जुनाचा अंत निश्चित झालाऽऽ!' असे समजून ते आनंदित झाले. त्यांचे लक्ष विचलीत झाले. आपल्या हातातली शस्त्रे सैल सोडून ते गर्जना करायला लागले. विजयाच्या घोषणा द्यायला लागले. त्याचा परिणाम म्हणून, संपूर्ण दिवस सांभाळले गेलेले, जयद्रथाचे संरक्षक कवच नाहीसे झाले.

केवळ जयद्रथालाच तसे न वाटता, **' अजून सूर्यास्त व्हायचा आहे.'** हे सत्य जाणवत असल्यामुळे, तो एकटाच आपले मस्तक वळवून, मान उंच करून, मावळतीला चाललेल्या सूर्याकडे एकसारखा पहात होता.

त्यामुळेच तो अर्जुनाला स्पष्टपणे दिसला आणि त्यानंतर श्रीकृष्णाने केलेल्या सूचनेनुसार त्याचे मस्तक, आपल्या बाणांनी आकाशात उडवीत नेता आले.' असो.

अर्जुन त्याच्याकडे स्थिर नजरेने एकटक पहात होता. एखाद्या पाण्याने भरलेल्या मडक्यामधील पाणी वाहून जावे त्याप्रमाणे, त्याला आपण आतून रिक्त होत असल्यासारखे वाटायला लागले. पूर्णपणे रिकामे होत असल्यासारखे वाटायला लागले.
आपले शरीरही विरघळून जात असल्यासारखे वाटायला लागले. त्याची स्वत:च्या शरीराची जाणीवही नाहीशी व्हायला लागली होती. हसणारा श्रीकृष्ण आपल्यापासून दूर जात असल्यासारखे वाटायला लागले. तरीही त्याचे ते हास्य मात्र स्पष्टपणे ऐकू येत होते.
( ही त्या **दिव्यदृष्टीच्या** प्रक्रियेची सुरवात किंवा प्राथमिक अवस्था म्हणता येईल.)
अचानक त्याला, ' सगळे रणांगण आणि तेथे जमलेले दोन्ही बाजूंचे सर्व सैन्य आपल्या भोवती फिरायला लागले आहे,' असे वाटायला लागले. ती गती वाढू लागली. आता आपल्याला भोवळ येईल की काय असे वाटून त्याने दोन्ही डोळे घट्ट मिटून घेतले. काही वेळाने ते फिरणे थांबले असल्याची स्पष्ट जाणीव झाल्यावर त्याने हळूहळू डोळे उघडले. समोरचा सर्व देखावा नाहीसा झाला होता. अगोदर ऐकू येत होते ते श्रीकृष्णाचे हसणेही थांबले होते. तो डोळे मोठे करून सभोवताली पहायला लागला.
परंतु कशाचीही जाणीव होत नव्हती. त्याच्या स्वत:च्या शरीराच्या अस्तित्वाची जाणीवही क्षीण झाली होती. फक्त मानसिक जाणीव होत होती. ती सुद्धा फार मर्यादित स्वरुपातच होत होती. सगळीकडे अंधार दाटला होता. काहीही दिसत नव्हते.
गोंधळलेल्या अवस्थेत तो स्वत:शीच विचार करायला लागला.
' अरे ऽऽ, येथे जमलेले सर्व सैन्य कोठे गेले ऽ? सगळे रणांगण कोठे गेले ऽ? माझा रथ कोठे गेला ऽ? श्रीकृष्ण कोठे गेला? एवढे मोठे आकाश होते ते कोठे गेले? वरती आणि खाली काहीही दिसत नाही. सर्व दिशा तरी कोठे गेल्या?
हा दिवस आहे की रात्र आहे? मी कोठे आहे तेच कळत नाही! किंबहुना मी आहे असेही दिसत नाही!
माझ्या मनाचे सामर्थ्य क्षीण झाले आहे. बुद्धीचे निर्णय करणे नाहीसे झाले आहे. फक्त, येथे मी आहे आणि जे दिसते आहे त्या विचित्र दृष्यापासून वेगळा आहे, इतकेच जाणवते आहे. बाकी सगळीकडे अमर्याद पोकळी आहे आणि तिला अंत नाही असेच वाटते आहे. इतर कसलीही जाणीव होत नाही. हे काय झाले आहे ऽऽ?'
दिङ्मूढ होऊन तो आपल्या अवती भोवती पहायचा प्रयत्न करायला लागला, पण काहीही दिसत नव्हते. तो पार गोंधळून गेला. सगळीकडे केवळ काळोख आणि काळोखच भरून राहिला होता. अचानकपणे सभोवतालच्या अंधारात चेतना निर्माण व्हायला लागली. अंधार हलायला लागला. हलण्याची गती वाढायला लागली तशी त्याला, त्या हालचालीची स्पष्ट जाणीव व्हायला लागली.
आपण अंधाररूपी सागरामधे बुडालो आहोत आणि त्या सागराच्या पोटामध्ये निर्माण होणाऱ्या शक्तिशाली लाटांच्यामुळे इतस्तत: फेकले जात आहोत, असे वाटायला लागले. महापुरामधे, भूमीतून मुळासकट उखडल्या गेलेल्या आणि प्रचंड भोवऱ्यात सापडलेल्या एखाद्या निराधार वटवृक्षाप्रमाणे गरागरा फिरतो आहोत असे वाटू लागले.
ते वरखाली हेलकावे खाणे आणि भरकटणे असह्य झाल्यामुळे त्याने डोळे मिटले खरे, पण त्याचा काहीही उपयोग होत नव्हता. त्याच्या सभोवताली बाहेर अंधार होताच आणि आतही अंधारच होता. सगळीच अनाकलनीय अशी अवस्था झाली.
त्या अवस्थेमध्ये किती काळ गेला हे ही त्याला समजत नव्हते. काही वेळाने ती विचित्र हालचाल थांबली.
भानावर येऊन त्याने डोळे उघडले. त्याला नाद ऐकू यायला लागला. ( तो नाद म्हणजे **आदिनाद** असावा. **ओंकार नाद** असावा. )
सुरवातीला मंद असलेल्या त्या नादाची तीव्रता हळूहळू वाढू लागली. त्या नादाचे अनेक प्रतिध्वनी ऐकू यायला लागले.
सर्व बाजूंनी निर्माण होत असलेला तो ध्वनी स्पष्टपणे ऐकायला येत होता आणि त्याच्या कानाला सुखद वाटत होता.
आश्वासक वाटत होता. दिलासा देणारा वाटत होता. त्याच्या मनावर आलेला ताण हळूहळू कमी झाला.
हलकेच, एखादा पडदा बाजूला व्हावा त्याप्रमाणे, त्याच्या भोवतालचा अंधार नाहीसा झाला आणि त्याजागी फिकट निळया रंगाचा मंद प्रकाश दिसायला लागला. सर्व बाजूंना पसरलेला तो अंधुकसा प्रकाश पाहिल्यावर, त्याला श्रीकृष्णाच्या नीलवर्णाची आठवण झाली.
' कृष्णाच्या प्रभावी व्यक्तिमत्वामधे, त्याच्या नीलवर्णाचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळेच तो मला नेहमीच आकाशासारखा विशाल वाटतो. त्याचे हसणे निळया आकाशात अचानकपणे चमकलेल्या विजेसारखे वाटते. मला त्याचा नेहमीच आधार वाटतो.
पण आता ह्या अशा परिस्थितीत मला एकट्याला सोडून तो गेला तरी कुठे ऽऽ?'
त्याच्या मनामध्ये असे विचार येत असतानाच, ऐकू येणाऱ्या नादाची तीव्रता वाढायला लागली आणि नीलप्रकाश हलतो आहे असे वाटायला लागले. सारा आसमंत वर्तुळाकार फिरायला लागल्यासारखे वाटू लागले.
त्या देखाव्यापासून तो स्वत: मात्र अलिप्त होता. कधी उलट दिशेने तर कधी सुलट दिशेने सुरू असलेले ते फिरणे तो स्थिर राहूनच पहात होता. सगळीकडे तेच दृष्य दिसत होते. गती कमालीची वाढली. कल्पनातीत वाढली. आतापर्यंत ऐकू येणारा नाद मात्र हळूहळू कमी व्हायला लागला. ऐकू येईनासा झाला. एक नीरव शांतता जाणवायला लागली.
' कानावर पडणारा तो नाद थांबला आहे की मलाच ऐकू येईनासे झाले आहे? हे काय चालले आहे ऽऽ? काहीच कळत नाही.'
**इतक्यात त्याने एक महाप्रचंड आणि महाशक्तिशाली असा स्फोट होताना पाहिला.**

त्या स्फोटामधून सर्व बाजूंना आगीचे लोळ पसरलेले पाहिले. लाल, निळया आणि शेंदरी रंगाच्या ज्वाळा उसळताना पाहिल्या.
सर्वत्र पिवळसर लाल रंगाचा प्रकाश पसरायला लागला. त्या प्रकाशात त्याला जे दृष्य दिसले त्यामुळे तो आश्चर्यचकित झाला.
गोंधळलेल्या अवस्थेत, अत्यंत कुतुहलाने ते दृष्य पहात राहिला.
स्फोटाच्या केंद्रबिंदूमधून फार मोठ्या आकारमानाचे अत्यंत तप्त असे अनेक गोलक इतस्तत: फेकले जात होते. ते सर्व गोलक केंद्रबिंदूभोवती वर्तुळाकार गतीने फिरायला लागले होते. त्याचवेळी ते स्वत: भोवतीही फिरत असताना दिसत होते.
त्यांचेही स्फोट होऊ लागले. त्यांच्यामधूनही तप्त असे अनेक गोलक बाहेर फेकले जाऊ लागले.
ते गोलकही आपले उगम स्थान असलेल्या तप्त अशा गोलकाभोवती, वर्तुळाकार गतीने प्रदक्षिणा घालताना दिसत होते आणि त्याचवेळी ते स्वत: भोवतीही अत्यंत वेगाने फिरत असताना दिसत होते.
एकदा सुरू झालेली स्फोटांची ही मालिका अखंडपणे चाललेली दिसत होती.
अगणित तारे आणि ग्रह निर्माण होताना दिसत होते. सर्व गोलक, मुख्य केंद्राच्या मध्यापासून कल्पनातीत गतीने दूर जाताना दिसत होते. त्यांचा हा प्रवास सर्व बाजूंना होताना दिसत होता. त्या विस्ताराला मर्यादा नव्हत्या. कोणतेही बंधन नव्हते. अंत नव्हता.
मध्येच अनेक गोलक एकमेकांवर आपटून नष्ट होत होते किंवा त्यांचा मिळून एकच एक गोलक तयार होत होता.
काही ठिकाणी विचित्र अशी विवरे दिसत होती. त्यांच्या जवळून जाणारा प्रत्येक गोलक अगर कोणतीही वस्तू, ती विवरे गिळंकृत करीत होती. त्यांच्या शक्तीच्या प्रभावक्षेत्रामधून सुटणाऱ्या गोलकांची दिशा आणि गती बदलत होती परंतू प्रवास चालूच रहात होता.
पुढे त्यांचेही स्फोट होत होते. तुकडे तुकडे होऊन तेही नष्ट होत असलेले दिसत होते.
काही ठिकाणी तशीच विचित्र पण वेगळी विवरे दिसत होती. त्यांच्यामधून अनेक गोलक अत्यंत वेगाने बाहेर फेकले जाताना दिसत होते. त्यांचे आकार आणि रंग बदललेले दिसून येत होते. ते इतर गोलकांना नष्ट करीत होते आणि स्वत:ही नष्ट होत होते.
त्यांची तप्त राख आसमंतात पसरून दिसेनाशी होत होती.
त्या विस्ताराने सर्व बाजू व्यापलेल्या दिसत होत्या आणि तरीही विस्तार होणे सुरूच होते.
ते दृष्य पाहिल्यावर त्याच्या मनामधे विचार आला की —
‘ अरे ऽऽ, हे तर सर्व विश्व निर्माण होताना दिसून येते आहे. त्रैलोक्याच्या निर्मितीची प्रक्रिया अत्यंत वेगाने घडून येताना दिसते आहे. ह्या गतीची तुलना कशाच्याही बरोबर करता येणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी तसे करणे शक्य होणार नाही.’
अशाप्रकारे सर्व सृष्टीची सतत होत असलेली उत्पत्ती, स्थिती आणि विनाश प्रत्यक्ष पाहिल्यावर अर्जुनाचे मन आनंदाने भरून आले.
कल्पनेच्या पलीकडे असलेले अद्भूत असे दृष्य तो पहात होता. अनादि काळापासून चालत आलेला विश्वाच्या निर्मितीचा व्यवहार, आपल्या सर्व बाजूंना एकत्रितपणे घडताना पाहिल्यावर, त्याने समाधानाने डोळे मिटून घेतले.
श्रीकृष्ण हा अत्यंत सामर्थ्यशाली आहे आणि तो आपला पाठिराखा आहे ह्याचा त्याला आनंद होत होता.
त्या आनंदात तो रममाण झाला होता.

**<u>इतक्यात त्याच्या मिटल्या डोळयांना अत्यंत प्रखर असा प्रकाश जाणवला.</u>**

आजपर्यंत त्याने प्रकाशाची इतकी प्रखरता कधीही अनुभवली नव्हती. मनामध्ये इच्छा होऊनही त्याला डोळे उघडणे शक्य होत नव्हते.
तरीही महत् प्रयासाने त्याने आपले डोळे उघडून समोर पाहिले. त्याच्या सभोवताली केवळ तेजच पसरलेले होते.
तेजाचे असंख्य कण, विलक्षण गतीमान होऊन सर्व बाजूंना फिरत होते. जेथे पहावे तेथे तसेच तेज:कण दिसत होते.
‘ ह्या विलक्षण तेजाच्या प्रभावाने आपली जळून राख होईल की काय?’ अशी शंका त्याच्या मनामध्ये येऊन गेली.
थोड्या वेळाने त्याची दृष्टी, प्रकाशाला सरावून, स्थिर झाली आणि त्याला समोरचे दृष्य स्पष्टपणे दिसायला लागले.
त्याच्या सर्व बाजूंना एक विलक्षण आकृती दिसत होती. त्या आकृतीला कोणताही आकार नव्हता.
अगोदर त्याने ताऱ्यांचे आणि ग्रहांचे जे विश्व पाहिले होते, तशी अगणित विश्वे त्या भव्य आकृतीच्या अंतरंगामध्ये फिरताना दिसत होती.
अगणित तारे आणि ग्रहगोलांचे समुदाय, कल्पनातीत गतीने सर्वत्र भ्रमण करीत होते. त्यांची उत्पत्ती, स्थिती आणि विनाश तर सतत घडून येताना दिसत होता.
हे सर्व जिच्यामधे घडून येत होते ती आकृती कशी आहे? केवढी आहे? तिचा आकार कसा आहे? विस्तार केवढा आहे?
ते समजतच नव्हते. तिची सुरवात कोठून झाली आहे ते कळत नव्हते आणि शेवट कोठे झाला आहे तेही दिसत नव्हते.
सर्वत्र केवळ तेजच पसरलेले जाणवत होते. आपल्या भोवती निखळ तेजाची रास पसरलेली आहे ह्याची जाणीव होऊन अर्जुन अवाक् झाला. आश्चर्यचकित होऊन आपल्याशीच विचार करायला लागला.
‘ मी हे काय पाहतो आहे ऽ? अरे देवा ऽऽ! काय हे तेज ऽऽ!! ह्या तेजाची बरोबरी कोण बरे करू शकेल? कोणीही करू शकणार नाही. त्याची तीव्रता तर अतुलनीय आहे. केवळ अद्भुत आहे. कारण ह्या आकृतीमध्ये अगणित सूर्य सामावलेले दिसत आहेत.

तेजाने आपल्या सर्वांगावर, तेजाचेच उत्तरीय धारण केले आहे असे वाटते आहे! तेजाने, तेजाला, तेजाचेच स्नान घातले आहे असे वाटते आहे! ह्या महातेजाच्या महासागरामधे सर्व काही बुडून गेले आहे असेच वाटते आहे!
ह्या अद्वितीय अशा रूपाकडे सतत पाहणे फारच कठीण आहे. अशक्य आहे.
जे दिव्य दृष्टीनेही पाहता येत नाही आणि ज्ञान दृष्टीनेही पाहता येत नाही अशा ह्या तेजाने डोळे दिपून गेल्यामुळे काहीच दिसत नाही. ह्या तेजाला आणि त्याच्या व्यापकतेला खरोखर मर्यादाच नाही.'
असा विचार करून त्याने आपली दृष्टी एका बाजूला वळविली. तेथेही त्याला तेच दृष्य दिसत होते.
दुसऱ्या बाजूलाही तोच प्रकार दिसत होता. वर, खाली, मागे, पुढे, कोठेही पाहिले तरी तेच दृष्य दिसून येत होते.
सरते शेवटी, आणखी काय काय दिसत असेल तर ते पाहण्याच्या हेतूने, त्याने समोरच पहायला सुरवात केली. काही काळाने त्याची दृष्टी स्थिरावली. डोळ्यांना ते दिव्य तेज पाहण्याचा सराव झाला. त्याच्या दृष्टीला समोरचे दृष्य पाहण्याची क्षमता प्राप्त झाली.
तेव्हा त्याला सर्व देवांचे वेगवेगळे समुदाय आणि त्यांचे वास्तव्य असलेला स्वर्ग-लोक दिसला. स्वर्गाची राजधानी अमरावती दिसली. ऐरावत हत्ती दिसला. उचैःश्रवा घोडा दिसला. यक्ष, गंधर्व आणि अप्सरांचे समुदाय दिसले. सिंहासनावर स्थिर झालेला आणि हातात वज्र धारण केलेला असा देवराज इंद्रही दिसला. आपल्या पित्याला पाहून अर्जुन अतिशय आनंदित झाला आणि त्याने त्याला अत्यंत आदराने नमस्कार केला. परंतु देवराज इंद्र मात्र आपल्या पुत्राकडे पाहातही नव्हता.
त्यानंतर त्याने आपली दृष्टी खालच्या बाजूला वळविल्यावर —
त्याला तेथे सर्व सर्पांचे समुदाय आणि नागांच्या समुदायांसह सातही पाताळ लोक दिसले.
हजार मस्तके असलेला नागराज शेष दिसला. सर्पराज वासुकीचेही दर्शन झाले.
तेथील, विविध व्यवहार करीत असलेले, अनेक चित्रविचित्र योनींमधले प्राणिमात्र आपापल्या वैशिष्ट्यांसह दिसून आले.
आणखी थोडे बाजूला पाहिले असता, त्याला सत्य-लोक आणि त्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या ब्रह्मदेवांचे दर्शन झाले.
त्यांची चारही मुखे शुद्ध सुवर्णाप्रमाणे चमकत होती. त्यांच्या शरीरामध्येच पंचमहाभूतांच्या कड्या आणि एकेका भूतसृष्टीमधील सर्व प्राणीसमुदाय दिसून आले. त्यांच्या सभोवताली असलेले महर्षीगण आणि ब्रह्मर्षीगण त्यांचे स्तवन करताना दिसत होते.
आणखी एका जागी पाहिल्यावर, त्याला कैलास पर्वत आणि त्यावर माता पार्वतीसह विराजमान झालेले भगवान शंकर दिसले.
त्यांच्या मस्तकावर चंद्र विराजमान होता आणि तेथूनच गंगामाता प्रवाहित होत असलेली दिसत होती. गळ्यामधे सर्पमाला दिसत होती आणि हातामधे त्रिशूलही धारण केलेला दिसला. त्यांच्या आजूबाजूला सर्व रुद्रगण आपापल्या आयुधांसहित उभे असलेले दिसत होते.
दुसऱ्या एका जागी दृष्टी वळविल्यावर, त्याला तेथे माता लक्ष्मीसह भगवान विष्णू दिसले. नीलवर्ण असलेल्या, विलक्षण तेजस्वी, तरीही अत्यंत शांत व प्रसन्न मुद्रा असलेल्या आणि स्मितहास्य करणाऱ्या अशा त्या देवाधिदेवाच्या मस्तकावर नागराज शेषाने छत्र धरलेले होते आणि माता लक्ष्मी त्यांचे पायांशी स्थिर झालेली दिसली.
आणखी वेगळ्या जागी पाहिल्यावर, त्याला परमेश्वराचे स्तवन करीत असलेले सप्तऋषी, सिद्धगण, मुनीगण आणि त्यांचे समुदाय दिसू लागले. त्यांच्यापैकी कोणी यज्ञ करताना, कोणी तप करताना, कोणी ध्यान धारणा करताना, कोणी हात जोडून मंत्रांचे उच्चारण करताना दिसत होते.
त्याने आपली दृष्टी वर वळवली. तेव्हा तेथे विख्यात गंधर्व, यक्ष इत्यादींचे समुदाय दिसू लागले. ते सगळे परमेश्वराच्या स्तुतीपर गीतांचे गायन करीत असलेले दिसत होते. विविध प्रकारची वाद्ये वाजवीत होते. नर्तन करीत होते.
अशाप्रकारे तो वर खाली आजूबाजूला जेथे जेथे पहात होता, तेथे तेथे त्याला वेगवेगळे लोक आणि त्यांच्यामध्ये वास्तव्य करणारे सर्वच्या सर्व प्राणिमात्र दिसून येत होते. त्यांच्या विविध आकारांना, विविध प्रकारांना, नाना वर्णांना आणि आश्चर्यकारक क्रिया-प्रतिक्रियांना अंत नव्हता. सतत आश्चर्याचे धक्के बसत होते. जेथे पहावे तेथे तेच दृष्य. दृष्यांच्या मालिकांना अंतच नव्हता. त्याचप्रमाणे त्याच्या कुतुहलालाही अंत नव्हता. जिज्ञासा वाढतच चालली होती. त्या विशाल आकृतीची सुरवात कोठे झाली आहे आणि शेवट कोठे झालेला आहे ते शोधण्याचा त्याने बराच प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही. तेथे **' आदि, मध्य आणि अंत '** अस्तित्वातच नव्हते तर त्याला दिसणार कसे? ते तीनही शब्द निरर्थक ठरले होते. व्यर्थ ठरले होते.

**' ह्या विश्वरूप आकृतीचा चेहरा आहे तरी कसा ऽऽ?'**

असा विचार त्याच्या मनामध्ये आला आणि लगेच त्याला, त्याच्या समोर अनेक मस्तके दिसायला लागली. त्यांच्या वरील दिव्य मुकुट, दिव्य कर्णकुंडले आणि गळ्यामध्ये धारण केलेले दिव्य अलंकार दिसायला लागले. मस्तकांची विविधता पाहून तो चकित झाला.
काही मस्तके माणसांच्या मस्तकांसारखी दिसत होती. काही पशूंच्या मस्तकांसारखी तर काही पक्षांच्या मस्तकांसारखी दिसत होती.
काही मस्तकांच्यामध्ये अनेक योनींचा संयोग झाला आहे असे वाटत होते. पण ती कोणत्या योनीची आहेत ते समजत नव्हते.
जेवढी मस्तके तेवढेच चेहरे. जेथे पहावे तेथे त्याला अगणित चेहरे दिसत होते.

त्यामधील अनेक चेहरे अत्यंत सुंदर होते. सौंदर्याची कमाल मर्यादा म्हणता येतील इतके सुंदर होते.
त्यांच्या दर्शनानेच मनामध्ये आनंदाच्या लहरी उसळून येत होत्या.
अनेक चेहरे अत्यंत ऊग्र आणि संतप्त झालेले वाटत होते. त्यांच्यापैकी अनेकांच्या मुखामधून आगीचे आणि धुराचे लोट बाहेर पडत होते. त्यांच्या आतील धारदार दात आणि दाढा कराकरा वाजत होत्या.
अनेक चेहरे अत्यंत कुरुप आणि किळसवाणे दिसत होते. ते ओंगळवाणे दर्शन नकोच असे वाटण्याइतके विद्रूप दिसत होते.
अनेक चेहरे अत्यंत भयानक दिसत होते. भयंकर दिसत होते. नुसत्या दर्शनानेच पाहणाऱ्याच्या जिवाचा थरकाप व्हावा इतके भयानक दिसत होते.
अनेक चेहरे अतिशय पवित्र, शांत आणि सौम्य दिसत होते. अनेक चेहरे आनंदित झाल्यासारखे, आनंदाने हसत असल्यासारखे दिसत होते. अनेक चेहरे अत्यंत दु:खी असल्यासारखे, अन्यायाने त्रस्त झाल्यासारखे वाटत होते. अनेक चेहरे चिंतन आणि मनन करण्यात मग्न असल्यासारखे दिसत होते. अनेक चेहरे मुखाने मंत्रघोष करताना, ईश्वराचे भजन - पूजन करताना दिसत होते.
अनेक चेहरे उदास झाल्यासारखे, हताश आणि निराश झाल्यासारखे दिसत होते. अनेक चेहरे अलिप्त आणि तटस्थ असल्यासारखे वाटत होते. अनेक चेहरे कपटी, कारस्थानी व धूर्तपणाचा अर्क असल्यासारखे दिसत होते. अनेक चेहरे अत्यंत गोंधळून गेलेले आणि साशंक असल्यासारखे दिसत होते. जितकी मस्तके तितके चेहरे! मस्तकांना अंत नव्हता आणि चेहऱ्यांनाही नव्हता.

**<u>तो कुतुहलाने आकृतीचे नेत्र पाहू लागला.</u>**

अनेक नेत्र प्रफुल्लित झालेल्या कमळासारखे रेखीव आणि प्रमाणबद्ध होते.
अनेक नेत्र मत्स्याकार होते तर अनेक वर्तुळाकार होते. अनेक नेत्र अर्धवट मिटल्यासारखे दिसत होते.
अनेक नेत्र जणू काही दुसरे सूर्यच म्हणता येतील इतके तेजस्वी होते. अनेक नेत्र चंद्राप्रमाणे सौम्य, शांत आणि शीतल होते.
अनेक नेत्र चेहऱ्यामध्ये खोलवर लपले असल्यासारखे दिसत होते. अनेक नेत्र चेहऱ्याच्या बाहेर आल्यासारखे, बटबटीत दिसत होते. हिरवट आणि पिंगट वर्णाचे अनेक नेत्र धोकादायक आणि घातक वाटत होते.
त्यांच्यावरील जाड आणि वक्र भुवया, जणू काही सर्व जगाला कवेत घ्यायला निघाल्या असल्यासारख्या दिसत होत्या.
अनेक नेत्रांमधून अश्रू वहात असल्याचे दिसत होते. पण त्या अश्रुपातामधेही फरक असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते.
काही अश्रूंचे उगमस्थान आनंदाचे, काहींचे दु:खाचे, काहींचे प्रेमाचे, काहींचे अपार वात्सल्याचे, काहींचे अन्यायाचे, काहींचे संतापाचे, काहींचे सूडाचे, काहींचे त्यागाचे तर काहींचे ब्रह्मानंदाच्या प्राप्तीचे होते.
त्या अनेक मस्तकांच्या, चेहऱ्यांच्या आणि डोळ्यांच्या अनेक प्रकारच्या हालचाली आणि त्यामधून व्यक्त होणारे भाव पाहून अर्जुन थक्क झाला. त्याची सर्व जाणीव अद्वितीय अशा विश्वरूपाने संपूर्णपणे व्यापून टाकली.
तो जरी त्या विश्वरूपापासून वेगळा होता तरीही त्याला, ' आपण त्या रूपाचा एक अंश आहोत, ' असेच वाटू लागले होते.
**<u>' ह्या आकृतीचे हात कोठे आहेत?'</u>** असा विचार मनामध्ये यायचा अवकाश, लगेच त्याला अगणित हात दिसायला लागले.
त्यांच्यावर नाना प्रकारचे दिव्य अलंकार घातलेले दिसत होते. सर्व हातांना आणि शरीराला पांढरीशुभ्र सुगंधी उटी लावलेली होती.
अनेक हात उगारलेल्या अवस्थेत होते आणि त्यांनी नाना प्रकारची दिव्य व तेजस्वी अशी शस्त्रे आणि अस्त्रे धारण केलेली दिसत होती. दुसरे अनेक हात शुभ-आशीर्वाद देत असल्यासारखे भासत होते.
अनेक हातांच्या मुठी वळलेल्या होत्या आणि ते हात ' कोणत्याही क्षणी प्राणांतिक प्रहार करण्यास सिद्ध आहेत.' असेच दिसून येत होते. अनेक हात आधारभूत असल्यासारखे, आधार देत असल्यासारखे दिसत होते.
अनेक हातांच्या नाना प्रकारच्या मुद्रा केलेल्या दिसत होत्या. हातांना अंत नव्हता.

**<u>पुढे तो, विश्वरूपाचे चरण कसे आहेत ते पहायला लागला.</u>**

अनेक चरणांवरही तेजस्वी असे दिव्य अलंकार घातलेले दिसले.
अनेक चरण सरळ सौम्य आणि शांत दिसत होते तर अनेक चरण वेगवेगळ्या आसनावस्थेत असल्यासारखे भासत होते.
अनेक चरण नृत्याचे पदन्यास करीत असतांना दिसत होते तर अनेक चरण हे जणू काही प्रलयकाळचे तांडव करीत असल्यासारखे दिसत होते. अनेक चरण पशुचरणांच्यासारखे दिसत होते तर अनेक पक्षीचरणांच्यासारखे भासत होते.
त्यांची तीक्ष्ण आणि धारदार अशी नखे चमकून उठत होती.
त्यापैकी काही उड्डाण करायच्या तयारीत असल्यासारखे दिसत होते तर काही आपल्या सावजावर झेप टाकण्याच्या पवित्र्यात असल्यासारखे भासत होते. अशा प्रकारे जे काही मनामध्ये येत होते, ते सर्व त्याला, त्या विश्वरूपामध्ये प्रत्यक्ष दिसत होते. आपल्या सर्वच्या सर्व वैशिष्ट्यांसहित दिसत होते. त्याच्या मनामध्ये विचारांच्या लाटा उसळून येत होत्या आणि उत्तर तर मिळतच नव्हते. होते ते फक्त प्रश्न! प्रश्न!! आणि प्रश्नच!!! प्रश्नांना अंत नव्हता. तो पार गोंधळून गेला.

**' देव उभा आहे ऽऽ की बसलेला आहे ऽऽ? एका जागी स्थिर आहे ऽऽ की नाही ऽऽ? तो नक्की कुठे आहे? वरती आहे की खाली आहे? पुढे आहे की मागे आहे? डावीकडे आहे की उजवीकडे? काहीच कळत नाही.**

उभा म्हणावे तर त्याचे अनेक चरण तो बसला असल्यासारखे दिसत आहेत.

बसलेला म्हणावे तर अनेक चरण तो उभा असल्यासारखेच दिसत आहेत.

कदाचित् तो झोपलेल्या अवस्थेतही असेल! आपल्यालाच समजत नसेल!

त्याच्या सर्वांगाला लावलेल्या दिव्य उटीचा सुगंध अवर्णनीय असा आहे. अंगावरले अलंकार अत्यंत तेजस्वी आणि अद्वितीय असेच आहेत. येथे सामावलेले नाही असे एकही वस्तुमात्र अस्तित्वातच नसेल. येथे जे आहे तेच सर्वत्र आहे आणि येथे जे नाही ते इतर कोठेही असणे शक्य नाही! म्हणजे सर्व काही तोच आहे आणि त्याच्याशिवाय दुसरे काहीही नाही.

**मी किती भाग्यवान आहे बरे ऽ!** परमेश्वराच्या कृपेने त्याचे विश्वरूप आज मला प्रत्यक्ष पहायला मिळाले.

ज्याला आदि, मध्य किंवा अंत नाही ऽ! जो स्वभावत:च अनंत आहे ऽ! ज्याने हे सर्व त्रैलोक्य व्यापलेले आहे ऽ!

चंद्र आणि सूर्य हेच ज्याचे नेत्र आहेत ऽ! ज्याच्या पौरुषाला आणि पराक्रमाला कोणत्याही मर्यादा नाहीत ऽ!

जो दुष्टांचे निर्दालन करून धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी वारंवार जन्म घेतो ऽ!

तो परमेश्वर माझ्यावर प्रसन्न झाला आहे आणि आपले मूळ स्वरूप दाखवितो आहे.' अर्जुन आश्चर्यचकित झाला आहे.

थक्क झाला आहे. आनंदित झाला आहे. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. नेत्रांमधून आनंदाश्रू गळत आहेत.

तो ज्याला आपल्यासारखाच एक समजत होता, आपला बंधू, मित्र आणि मार्गदर्शक समजत होता, तो श्रीकृष्ण मूलत: कसा आहे ते आज त्याला प्रत्यक्ष पहायला मिळाले आहे. आता काय बोलावे? कसे बोलावे? ते त्याला कळत नाही आहे.

योग्य शब्द सुचत नाही आहेत. तरीही तो जेथे तोंड करून पहात होता, तेथेच त्याने आपले मस्तक वाकवून नमस्कार केला आणि हात जोडून तो बोलायला लागला.

**अर्जुन उवाच :**

**पश्यामि देवान्स्तव देव देहे सर्वान्स्तथा भूतविशेषसङ्घान् ।**
**ब्रह्माणमीशङ् कमलासनस्थम् ऋषीन्श्च सर्वानुरगान्श्च दिव्यान् ।। १५ ।।**
**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रम् पश्यामि त्वाम् सर्वतोऽनन्तरूपम् ।**
**नान्तम् न मध्यम् न पुनस्तवादिम् पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ।। १६ ।।**
**किरीटिनङ् गदिनञ् चक्रिणञ् च तेजोराशिम् सर्वतो दीप्तिमन्तम् ।**
**पश्यामि त्वाम् दुर्निरीक्ष्यम् समन्ताद् दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ।। १७ ।।**
**त्वमक्षरम् परमम् वेदितव्यम् त्वमस्य विश्वस्य परम् निधानम् ।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वम् पुरुषो मतो मे ।। १८ ।।**
**अनादिमध्यान्तमनन्तवीर्यम् अनन्तबाहुम् शशिसूर्यनेत्रम् ।**
**पश्यामि त्वाम् दीप्तहुताशवक्त्रम् स्वतेजसा विश्वमिदन् तपन्तम् ।। १९ ।।**

हे देवा ! तुमच्या ह्या देहात सर्व देव आणि नानाप्रकारच्या भूतांचे समुदाय, तसेच कमलासनावर बसलेला सर्व देवांचा स्वामी ब्रह्मदेव, सर्व ऋषी आणि सर्व दिव्य सर्पही मला दिसत आहेत. अनेक बाहू , अनेक उदरे, अनेक तोंडे व अनेक नेत्र असणाऱ्या अनंतरूपी तुम्हालाच मी चोहोकडे पाहतो आहे. पण हे विश्वेश्वरा, हे विश्वरूपा! तुमचा अंत, मध्य किंवा आदीही मला दिसत नाही. किरीट, गदा व चक्र धारण करणारे, चोहोकडे प्रभा फाकलेले, तेज:पुंज, रखरखीत, अग्नि व सूर्याप्रमाणे दैदिप्यमान, डोळ्यांनी पाहण्यासही अशक्य आणि अपरंपार भरलेले असे तुम्हीच मला जिकडे तिकडे दिसत आहात. तुम्हीच अखेरचे ज्ञेय, अक्षर म्हणजे ब्रह्म, तुम्हीच ह्या विश्वाचे शेवटचे आधार, तुम्हीच अव्यय असून शाश्वत धर्माचे रक्षक आणि सनातन पुरुष आहात असे मला वाटते. आदि, मध्य किंवा अंतरहित असून ज्याला अनंत बाहू आहेत, चंद्र व सूर्य हे ज्याचे डोळे आणि पेटलेला अग्नि हे ज्याचे तोंड, असे अनंत शक्तिमान् असलेले तुम्हीच आपल्या तेजाने ह्या सर्व जगाला तापवीत आहात असे मी पाहतो आहे.

**' हे भगवंता ऽऽ! मी पामर तुमचे वर्णन कसे करू?**

तुम्ही वर्णन करण्याच्या पलीकडले आहात, अलौकिक आहात, अद्वितीय आहात. कोणाही मानवाच्या, दानवाच्या आणि देवाच्या बुद्धीच्या पलीकडले आहात. तुमच्या ह्या देहामधे मी सर्व काही प्रत्यक्ष पाहतो आहे.

तुमच्या ह्या रूपाची सुरवात कोठून झाली आहे, मध्य कोठे आहे आणि शेवट कोठे झाला आहे तेच कळत नाही.

तुम्ही बसला आहात की उभे आहात तेही समजत नाही.

तुमची मस्तके, तुमची शरीरे, तुमचे हात-पाय हे अत्यंत तेजस्वी आहेत. अगणित आहेत.
त्यांची संख्या किती आहे ते कोणालाही सांगता येणार नाही.
तुमचे अनेक नेत्र सूर्याप्रमाणे तेजस्वी आहेत. तशा तेजाने ते तापदायक भासतात.
तुमचे रूप, तुमचे तेज, तुमचे सामर्थ्य, तुमचा प्रभाव, तुमची मुखमंडले, तुमचे नेत्र, तुमचे हात-पाय इत्यादी सर्व अवयव, तुमची विविधता आणि एकता केवळ अद्वितीय अशीच आहे. जेथे पहावे तेथे केवळ तुम्हीच दिसत आहात.
जेथे तुम्ही नाहीत अशी एकही जागा मला दिसत नाही. शोधूनही सापडत नाही.
तुम्हीच सर्वकाही आहात आणि सर्वकाही तुमच्यामधेच सामावलेले आहे. ज्यांची कधी कल्पनाही केली नव्हती असे अनंत प्राणिमात्र मी पाहतो आहे. त्यांचे चित्रविचित्र आकार, रूप, रंग आणि त्यांचा ध्वनी ऐकल्यावर, त्यांना पशू म्हणावे की पक्षी म्हणावे? जलचर म्हणावे की भूचर म्हणावे? तेच कळत नाही. ते कोणत्या योनीतले जीव आहेत? ते देखील समजत नाही.
तुमच्या एका एका बोटामधेही अगणित सूर्य, चंद्र आणि तारका वेगाने भ्रमण करीत असताना दिसत आहेत.
त्यांची उत्पत्ती आणि विनाश सतत घडून येताना दिसतो आहे. तुमच्या देहामधे अशी अगणित विश्वे मी सर्वत्र पाहतो आहे.
त्यांची गणती करताच येणार नाही. तुमच्या अनेक मुखांमधून प्रलयकाळच्या अग्नीचे नर्तन चाललेले दिसत आहे.
त्या मुखांमधून ज्वाळांचे लोट उठत आहेत. एखाद्या यज्ञकुंडासारखी दिसणारी ती मुखे सर्व जगाला ताप देत आहेत. सर्व काही जाळून नष्ट करायला निघाली आहेत असेच वाटते आहे.'
अर्जुन हे सर्व काही प्रत्यक्ष बघतो आहे आणि त्याला तेथे जे काही दिसते आहे तेच सांगतो आहे बरं का! थापा मारीत नाही आहे.
ते शक्यही नाही. त्याक्षणी तो अशा अवस्थेत आहे की, त्याची इच्छा असली तरीही, ठरवूनही असत्य बोलूच शकणार नाही.
तशी शक्यताच नाही. मुख्य म्हणजे तो हे सगळे ज्याला सांगतो आहे, तो सर्वज्ञानी आहे. सर्व काही संपूर्णपणे जाणणारा आहे.
त्याच्या समोर असत्य बोलणे, खोटी स्तुती करणे, कोणालाही शक्य नाही. त्यामुळे अर्जुनाचे ते सांगणे म्हणजे,
अचाट कल्पनाशक्तीच्या योगाने निर्माण केलेली एखादी विचित्र, अविश्वसनीय व चमत्कारिक गोष्ट नाही. **( Fantasy )**
एखादी कल्पना नाही. आपण हे नीट समजून घ्यायला हवे. असो.

**द्यावापृथिव्योरिदमन्तरम् हि व्याप्तन् त्वयैकेन दिशश्च सर्वा: ।**
**दृष्ट्वाद्भुतम् रूपमुग्रन् तवेदम् लोकत्रयम् प्रव्यथितम् महात्मन् ।। २० ।।**
**अमी हि त्वाम् सुरसङ्घा विशन्ति केचिद्भीता: प्राञ्जलयो गृणन्ति ।**
**स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घा:स्तुवन्ति त्वाम् स्तुतिभि: पुष्कलाभि:।।२१।।**
**रुद्रादित्या वसवो ये च साध्या: विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।**
**गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा: वीक्षन्ते त्वाम् विस्मिताश्चैव सर्वे ।। २२ ।।**

कारण आकाश व पृथ्वी ह्यामधील हे सर्व अंतर आणि सर्व दिशा तुम्ही एकट्याने व्यापून टाकल्या आहेत. तुमचे हे अद्भुत व उग्र रूप पाहून हे महात्मन् ! त्रैलोक्याची भितीने गाळण उडाली आहे. हे पहा, सर्व देवांचे समुदाय तुमचे ठायी प्रवेश करीत आहेत आणि कित्येक जण भयभीत होऊन हात जोडून प्रार्थना करीत आहेत. आणि स्वस्ति – स्वस्ति असे म्हणून अनेक प्रकारच्या स्तोत्रांनी महर्षी व सिद्धगण तुमचे स्तवन करीत आहेत. रुद्र व आदित्य, वसू आणि साध्यगण, विश्वदेव, दोन्ही अश्विनीकुमार व मरुद्गण, पितरांचा समुदाय आणि गंधर्व, यक्ष, राक्षस व सिद्ध ह्यांचे मेळे हे सर्वच विस्मित होऊन तुमच्याकडे पहात आहेत.
खरे म्हणजे आकाश, पृथ्वी आणि दिशा ह्या गोष्टी अस्तित्वातच नाहीत. त्यांना तुम्हीच व्यापून टाकले आहे.
मला तरी तसेच वाटते आहे. तुमचे हे एकूण रूप पाहून आणि भीतिदायक अशी अगणित मुखे पाहून सर्व विश्व भयग्रस्त झालेले दिसते आहे. ह्या रूपाची प्रखरता सहन होण्या पलीकडची आहे. मी स्वर्गलोकामधे वास्तव्य करीत असताना अनेक देव समुदाय पाहिले होते. ते सर्व देवगण तुमच्या ह्या विराटरूपामधे सद्भावनेने लीन होऊन प्रवेश करीत आहेत. तसेच त्यांच्यातले अनेकजण, भयभीत होऊन, आत्मकल्याण व्हावे म्हणून, हात जोडून तुमची प्रार्थना करीत असताना दिसत आहेत.
**सिद्धगण, योगीजन, ऋषीगण, मुनीगण, महर्षी, देवर्षी, राजर्षी, ब्रह्मर्षी** ह्यांचे समुदाय, सर्व विश्वाच्या कल्याणाची आशा धरून, त्यासाठी मोठ्या श्रद्धेने आणि प्रेमाने अनेक उत्तमोत्तम स्तोत्रांनी आपले स्तवन करीत तुम्हाला शांत होण्यासाठी, प्रसन्न होण्यासाठी आवाहन करताना दिसत आहेत.
अकरा **रुद्र**, बारा **आदित्य**, आठ **वसू**, बारा **साध्यदेवता** ( साध्यगण ), दहा **विश्वदेव**, दोन **अश्विनीकुमार**, एकोणपन्नास **मरुद्गण** आणि सात **पितृदेवता** ( पितृगण ), तसेच **गंधर्व**, **यक्ष**, **राक्षस** इत्यादींचे समुदाय चकित होऊन, अत्यंत आश्चर्याने आपल्याकडे पाहात आहेत. ( दहाव्या अध्यायामधे अर्जुनाला परमेश्वराच्या विभूती सांगताना ह्या सर्वांचा उल्लेख करण्यात आलेला आहे आणि आता

येथे त्यांचे प्रत्यक्ष दर्शन झाले आहे.)
आतापर्यंत अर्जुनाला त्या विश्वरूपामधे सर्वकाही स्पष्टपणे दिसले आहे. तो आश्चर्यांच्या महासागरामध्ये बुडालेला असून, त्याला ब्रह्मानंद प्राप्त झाला आहे. त्याचे अंत:करण अद्वितीय अशा विश्वरूपामधे विरघळून गेले आहे. आनंदाच्या लहरींनी उचंबळून यायला लागले आहे. तो अजूनही त्या रूपाकडेच पाहतो आहे. एकटक पाहतो आहे.
पण आता त्याला, त्यामधे बदल होत असलेला दिसायला लागला आहे. त्याचे मूळचे तेज अधिकाधिक उग्र व्हायला लागलेले आहे. अनेक मुखांच्यापैकी, ज्यांच्यामधून आगीच्या ज्वाळा बाहेर येत होत्या, ती मुखे आकाराने वाढू लागली. सर्व बाजूंना तीच मुखे दिसायला लागली. संतप्त होत असलेली दिसायला लागली. गतिमान होत असलेली दिसायला लागली.
ते दृष्य पाहून त्याचे डोळे आपोआप मिटले गेले.

**इतक्यात त्याच्या कानांना रणवाद्यांचा कल्लोळ ऐकू आला.**

सर्व बाजूंनी शंखनादाचा मोठा आवाज ऐकू यायला लागला. सैनिकांच्या आरोळ्या ऐकू यायला लागल्या. शस्त्रांचे खणखणाट ऐकू यायला लागले. हत्तींचे चित्कार, घोड्यांचे खिंकाळणे, रथांच्या चाकांचा घरघराट, शस्त्रांचे मोठे मोठे गाडे जागोजागी हलविताना होणारा करकराट, सैनिकांच्या घोषणा, वीरांच्या गर्जना, दंड थोपटण्याचे आणि मोठ्याने बोलण्याचे आवाज ह्या सर्वांचा संमिश्र असा, एकत्रित असा ध्वनी सर्वत्र ऐकायला येऊ लागला. क्षणाक्षणाला तो नाद वाढतच होता.
त्याने डोळे उघडून पाहिले आणि जे दिसले त्यामुळे भयभीत झाला.
त्याच्या समोर एकच एक, काजळालाही लाजवील असा, अत्यंत भेसूर, क्रूर, भयानक आणि आक्रमक असा, काळा-कभिन्न चेहरा दिसत होता. त्या चेहऱ्याचे दोन्ही नेत्र रक्तासारखे लालबुंद दिसत होते. गरागरा फिरत सर्व बाजूंना पहात होते.
त्यांच्या वरील जाड भुवया कमालीच्या ताणल्या गेलेल्या दिसत होत्या. नेत्रांमधून उष्ण वाफा येतांना दिसत होत्या.
त्याचे उघडे मुख कमालीचे पसरलेले दिसत होते. त्याचा आकार अनाकलनीय होता. जेथे पहावे तेथे तेच मुख दिसत होते.
त्यामधे असलेल्या अतिशय तीक्ष्ण टोकांच्या अनेक दाढा आणि धारदार असे दात स्पष्टपणे दिसत होते.
त्या मुखामधून, एखाद्या धडाडून पेटलेल्या यज्ञकुंडातील ज्वालांप्रमाणे, उंच ज्वाला बाहेर पडत होत्या. नाक आणि कानांमधून धुराचे लोट बाहेर पडत होते. दातांच्या आणि दाढांच्या खाली सापडलेले सर्व काही रगडण्यासाठी, चावून नष्ट करण्यासाठी त्याच्या भयंकर जबड्याची हालचाल होत होती. त्याच्या तावडीतून निसटून जाणे कोणालाही शक्य होत नव्हते.
कोणाचीही सुटका होण्याचा संभव नव्हता. ते केवळ अशक्य होते.
ज्याप्रमाणे पतंगांचे थवे, पेटलेल्या आगीमध्ये झेप घेतात, त्याचप्रमाणे कौरवांचे आणि पांडवांचे सगळे सैन्य त्या मुखाकडे धाव घेत होते. ज्याप्रमाणे शक्तिशाली लोहचुंबक, लोखंडाच्या कणांना आपल्याकडे खेचून घेतो, त्याचप्रमाणे सर्व सैनिक, त्यांची शस्त्रे, त्यांचे रथ, अश्व, हत्ती इत्यादी सगळे काही, जेथे असतील तेथून त्या भयंकर मुखाकडे खेचले जात होते.
घोडे खिंकाळत होते, हत्ती चित्कारत होते, रथ खडखडाट करीत होते आणि अखेरीस, कुणीतरी खेचून नेत असल्याप्रमाणे त्या भयानक अशा महामुखात प्रवेश करीत होते.
दात आणि दाढांच्यामध्ये सापडून त्या सर्वांचे तुकडे तुकडे उडत होते. उसळत्या ज्वाळांमध्ये सगळे वीर योद्धे, सगळे महारथी जळून जात होते. त्यांच्या शरीरामधून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. हात, पाय तुटले जात होते. मस्तके रगडली जात होती. त्यांची छाती आणि उदर फाटून विदीर्ण होत होते. त्यांची आतडी बाहेर पडून त्या मुखाच्या ओठावरून लोंबत होती आणि मुखामधून लवलवणारी जीभ ओठांवरून फिरून त्यांना परत आत खेचत होती.
मूर्तिमंत सूड असल्यासारखा भासणारा तो चेहरा अधिकाधिक उग्र होत होता. संतप्त होत होता. आक्रमक होत होता.
वृद्धिंगत होत होता. त्याची मांसाची भूक आणि रक्ताची तहान भागतच नव्हती. अनेक बळी घेतल्यावरही सतत वाढतच होती.
जणू काही संपूर्ण जगाचा घास घेतल्याशिवाय तो थांबणारच नव्हता. शांत होणारच नव्हता.
प्रलयकाळाच्या सर्वनाशक अग्नीचे आश्रयस्थानच असलेले ते भयानक मुख पाहून अर्जुन अंतर्बाह्य हादरून गेला.
त्याचे मन आणि बुद्धी सैरभैर व्हायला लागली. भीतीच्या भावनेने त्याचा पूर्णपणे ताबा घेतला. त्याच्या सर्वांगाला कंप सुटला.
कधीही, कोणापुढेही न वाकणारा, न भिणारा आणि सिंहासारखा आक्रमक असलेला वीरवर अर्जुन, प्राणभयाने अत्यंत व्याकूळ झाला. हतबल झाला. समोर जे दिसते आहे ते पाहण्या व्यतिरिक्त तो दुसरे काहीही करू शकत नव्हता.
तसेच प्रयत्न करूनही, त्याला ते दृष्य पाहणे टाळताही येत नव्हते. दृष्टी कोठेही वळवली तरीही, सगळीकडे तेच दृष्य दिसत होते. पहायचे नाही असे ठरवून डोळे बंद करून घेतले तरीही ते दृष्य दिसतच होते आणि दुसरे काहीही न दिसता केवळ तेच दृष्य दिसत होते. सर्व देवगण, सिद्धगण, महर्षी आणि ऋषिमुनी हतबल होऊन, भयग्रस्त होऊन, हात जोडून त्या भयानक रूपाची प्रार्थना करताना दिसत होते. त्याला शांत होण्यासाठी, प्रसन्न होण्यासाठी आवाहन करताना दिसत होते.

‘ आता सर्व जगाचा अंत जवळ आला आहे असे वाटू लागले आहे ऽ!
जेथे पहावे तेथे जाऊन भिडलेले हे भयंकर, अक्राळ विक्राळ महामुख सर्वांचा विनाश करणार असे दिसते आहे ऽ!
त्याच्या अक्राळ विक्राळ दात-दाढांनी आणि त्या मधून उसळणाऱ्या अग्निज्वालांनी कोणीही जिवंत राहणार नाही असेच वाटते आहे ऽ!
मुखामध्ये सर्वत्र रक्त, मांस, वसा आणि अस्थींचा सडा पडलेला दिसतो आहे. अर्धवट कापले गेलेले, तुटले गेलेले, चिरडले गेलेले हे सर्व शूर वीर सैनिक, आगीत जळून, तडफडत आहेत. मरत आहेत.
एका पाठोपाठ एक योद्धे, फरफटत ओढून नेल्यासारखे, बोलावून नेल्यासारखे, त्या ज्वाळांनी धडाडणाऱ्या महामुखांत प्रवेश करीत आहेत. केवळ कौरवांचेच नव्हेत तर आम्हा पांडवांच्या बाजूने लढायला उभे असलेलेही अगणित योद्धे जळून जात आहेत.
मरत आहेत. अरे देवा ऽऽ! परमेश्वरा ऽऽ, हे काय चालले आहे? मी हे काय पाहतो आहे?
हा **राजपुत्र उत्तर** दिसतोय! ह्याच्या शरीराच्या चिंधड्या उडालेल्या दिसत आहेत.
हे **भीष्म आजोबा!** ह्यांचे शरीर जखमांनी विदीर्ण झालेले दिसते आहे!
हे **आचार्य द्रोण!** ह्यांचे केवळ तुटून पडलेले मस्तकच दिसत आहे.
हा सूतपुत्र **कर्ण!** ह्याचेही मस्तक धडापासून विलग झालेले दिसत आहे!
हे **मद्रराज शल्यमामा!** ह्यांची छाती फाटून गेलेली दिसत आहे!
हे **द्रुपद महाराज!** आगीने जळत आहेत! त्यांचा चेहरा पिळवटून निघाला आहे!
हे **विराट महाराज!** जळून भस्मसात् होत आहेत! वेदना सहन न झाल्यामुळे आक्रोश करीत लोळत असल्याचे दिसत आहे.
हा **जयद्रथ!** ह्याचे केवळ शरीरच तडफडताना दिसत आहे! मस्तक दिसतच नाही!
हा **विकर्ण!** हा **जलसंध!** हा **सुबाहु!** हा **दृढवर्मा!** हे सगळे जळताना दिसत आहेत. केवळ हेच नाहीत तर दुरात्मा, पापी आणि नीच दुर्योधनाचे इतर सर्व **बंधू** सुद्धा मरताना दिसून येत आहेत! त्यांचा काहीही अपराध नसताना मरत आहेत.
हा पापी **गांधारनरेश शकुनी** दिसतोय! ह्याचे उदर फाटलेले असून आतडी बाहेर लोंबताना दिसत आहेत!
द्यूताचे प्रसंगी फासे फेकणारे त्याचे हात निर्जीव झालेले दिसून येत आहेत आणि नेत्रही कवड्यांच्या सारखे निष्प्राण दिसत आहेत.
हा **घटोत्कच!** तोंड वासून पडलेला दिसतो आहे! ह्याचे सर्वांग जळते आहे!
हा **राजा कुंतिभोज!** ह्याचे सर्व अवयव तुटलेले दिसत असून आगीने वेढला गेलेला दिसतो आहे! वेदनेने तडफडताना दिसतो आहे!
हा **राजा भगदत्त** दिसतो आहे! ह्याच्या चिंधड्या उडालेल्या दिसत आहेत!
हे काय पहायची वेळ आली आहे? अजून काय काय पहावे लागणार आहे?
हा पापी **दु:शासन** दिसतोय! ह्याचा हात तुटलेला आहे, छाती फुटलेली आहे आणि रक्ताचे लोट वहात आहेत!
हा महापापी **दुर्योधन!** हा तडफडताना आणि वेदनांनी आक्रोश करताना दिसत आहे.
हा **धृष्टद्युम्न** दिसतो आहे! पांचालीचा हा प्रिय बंधू, एखाद्या यज्ञामधे बळी दिलेल्या पशू सारखा मरून पडलेला आहे!
हा प्रिय **अभिमन्यू!** हा **प्रतिविंध्य!** हा **सुतसोम!** हा **श्रुतकर्मा!** हा **शतानिक!** हा **श्रुतसेन!**
हे सगळे आमचे पुत्र. सर्वच्या सर्व मरून पडलेले दिसत आहेत. अरे देवा ऽऽ!
सर्वच्या सर्व वीर योद्धे मरत आहेत. जळून भस्मसात् होत आहेत. कौरवांचे आणि आमचेही ऽ! त्यांची कसली खूणही शिल्लक राहिलेली दिसत नाही. सगळीकडे मृत्यूचे नर्तन चाललेले दिसून येत आहे.
कोणाची म्हणून नांवे घ्यायची ऽ आणि किती गणती करायची ऽऽ? ह्या सर्वांना वाचविणारा कोणी आहे का ऽऽ?
नाही ऽऽऽ! कोणीही नाही ऽऽ! ह्यांची सगळी शस्त्रे आणि अस्त्रे काहीही उपयोगाची नाहीत. ती ह्यांचे रक्षण करूच शकत नाहीत. उलट ह्यांच्या बरोबर ती पण नष्ट होत आहेत. खरोखरच माझेच चुकले. मला नको ती इच्छा झाली. स्वत:ला आवरता आले नाही. मीच कुतुहलाने श्रीकृष्णाला त्याचे खरे रूप दाखवायला सांगितले.
आता जे दिसते आहे ते पहायची वेळ कोणावरही, कधीही येऊ नये असेच आहे. पण आता तेच पहावे लागते आहे.
ह्यापेक्षा अधिक दुर्दैव ते कोणते? अधिक दु:ख ते कोणते? अधिक वेदना त्या कोणत्या? अधिक यातना त्या कोणत्या?
हे सगळे माहीत नव्हते तेच योग्य होते. मी हे काय मागून बसलो?
हे मला मिळालेले वरदान नाही. हा तर घोर शापच आहे आणि तो मीच मागून घेतलेला आहे.
आता मी काय करू? कुठे जाऊ? कसा जाऊ? मला कोण सहाय्य करील? हा सर्वनाश कोण बरे थांबवील?
आता मला येथे कशाचीही शाश्वती वाटत नाही. कोणाचीही शाश्वती वाटत नाही.

रणांगणावर युद्धासाठी जमलेल्यांच्यापैकी कोणी तरी जिवंत राहील काय ऽऽ? मला तरी तसे वाटत नाही ऽऽ!
म्हणजे आम्ही पाचही बंधू सुद्धा ऽऽ? म्हणजे प्रिय पांचाली ऽ ?? ती विधवा ऽऽ ??? अरे बापरे ऽऽ! —
**असे झाले तर मग कुठला विजय! कोणते राज्य! कसला राज्याभिषेक!**
ह्यापेक्षा वनवास आणि अज्ञातवास संपल्यानंतरही, प्रगट न होता वनातच राहिलो असतो तर बरे झाले असते.
**हे कुंतीमाते ऽऽऽ! — परमेश्वरा ऽऽऽ!!!'**
त्या कल्पनेने अर्जुन थरथरा कांपायला लागला. गलितगात्र झाला. कमालीचा भयभीत झाला.
अगोदर आप्तेष्टांच्या वधाच्या कल्पनेने तो अत्यंत दु:खी झाला होता.
पण आता तर त्याला सर्व आप्तेष्ट मृत्युमुखामधे जाताना, जळून मरत असताना, प्रत्यक्ष दिसत होते. ते दृष्य तो पाहूही शकत नव्हता आणि थांबवूही शकत नव्हता. अखेरीस मनाच्या तशा विपरीत अवस्थेतच, जेथे त्याचे तोंड होते त्याच दिशेला त्याने साष्टांग नमस्कार केला आणि कापऱ्या आवाजात बोलायला सुरवात केली.

**रूपम् महत्ते बहुवक्त्रनेत्रम् महाबाहो बहुबाहूरुपादम् ।**
**बहूदरम् बहुदंष्ट्राकरालम् दृष्ट्वा लोका: प्रव्यथितास्तथाहम् ।। २३ ।।**
**नभ:स्पृशन् दीप्तमनेकवर्णम् व्यात्ताननन् दीप्तविशालनेत्रम् ।**
**दृष्ट्वा हि त्वाम् प्रव्यथितान्तरात्मा धृतिन् न विंदामि शमञ् च विष्णो ।।२४।।**
**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।**
**दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ।। २५ ।।**
**अमी च त्वाम् धृतराष्ट्रस्य पुत्रा: सर्वे सहैवावनिपालसङ्घै: ।**
**भीष्मो द्रोण: सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यै: ।। २६ ।।**
**वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।**
**केचिद्विलग्ना दशनान्तरेषु सन्दृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गै: ।। २७ ।।**
**यथा नदीनाम् बहवोऽम्बुवेगा: समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।**
**तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ।। २८ ।।**
**यथा प्रदीप्तञ् ज्वलनम् पतङ्गा विशन्ति नाशाय समृद्धवेगा: ।**
**तथैव नाशाय विशन्ति लोका: तवापि वक्त्राणि समृद्धवेगा: ।। २९ ।।**
**लेलिह्यसे ग्रसमान: समन्तात् लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भि: ।**
**तेजोभिरापूर्य जगत्समग्रम् भासस्तवोग्रा: प्रतपन्ति विष्णो ।। ३० ।।**
**आख्याहि मे को भवानुग्ररूप: नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।**
**विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यम् न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ।। ३१ ।।**

हे महाबाहो ! तुमचे हे अवाढव्य, अनेक तोंडांचे, अनेक डोळ्यांचे, अनेक बाहूंचे, अनेक मांड्यांचे, अनेक उदरांचे व अनेक दाढांच्यामुळे विक्राळ दिसणारे रूप पाहून सर्व लोकांना व मलाही भिती उत्पन्न झाली आहे. आकाशाला जाऊन भिडलेले, तेजस्वी, अनेक रंगांचे, जबडा पसरलेले आणि मोठ्या व प्रदीप्त डोळ्यांनी युक्त अशा तुम्हाला पाहून, अंतरात्मा व्याकूळ झाल्याने, हे विष्णो ! माझा धीर सुटला असून शांतीही नाहिशी झाली आहे. आणि दाढांनी विक्राळ व प्रलयकाळच्या अग्निसारखी तुमची ही तोंडे पाहूनच, मला दिशा कळत नाहीत आणि समाधानही वाटत नाही. हे जगन्निवासा देवदेवा ! प्रसन्न व्हा ! हे पहा ! राजांच्या गणांसह धृतराष्ट्राचे सर्व पुत्र, भीष्म, द्रोण तसाच हा सूतपुत्र कर्ण आमच्या बाजूच्याही मुख्य मुख्य योध्यांसह, तुमच्या विक्राळ दाढांच्या ह्या भयंकर तोंडात भराभर शिरत आहेत; व काही दातांमध्ये सापडून डोक्याचा चुराडा झालेले नजरेस येत आहेत. नद्यांच्या पाण्याचे अनेक लोट ज्याप्रमाणे समुद्राकडेच धांव घेतात, तसे मनुष्यलोकांतील हे वीर, तुमच्या प्रज्वलित मुखात शिरत आहेत. ज्याप्रमाणे पेटलेल्या अग्निमधे मरण्यासाठी पतंग मोठ्या वेगाने उड्या टाकतात, त्याप्रमाणेच तुमच्याही जबड्यात हे लोक मरण्यासाठी मोठ्या वेगाने शिरत आहेत. हे विष्णो! आसमंतात सर्व लोकांना आपल्या जाज्वल्य मुखाने ग्रासून टाकीत तुम्ही जिभा चाटत आहात. तेजाने सर्व जग व्यापून तुमची उग्र प्रभा चोहोकडे तळपत आहे. हे उग्ररूप धारण करणारे तुम्ही कोण आहात? हे देवश्रेष्ठा! तुम्हाला नमस्कार करतो! प्रसन्न व्हा! तुम्ही आदिपुरुष कोण हे जाणून घेण्याची मला इच्छा आहे. कारण तुमची ही करणी मला समजत नाही.
अर्जुन कोणते शब्द वापरतो आहे ते नीट समजून घ्या.

**विष्णो** — सर्वव्यापी, शुद्ध सत्त्वमूर्ती. **देवेश** — सर्व देवांचाही देव, केवळ प्रकाशस्वरूप.
**जगन्निवास** — सर्व विश्वाचे आश्रयस्थान. **नभःस्पृशन्** — आकाशाला स्पर्श करणारे, सर्व आकाशाला व्यापून राहिलेले.
**दीप्तमनेकवर्णम्** — अनेक रंगांनी युक्त असलेले, दैदिप्यमान असे. **व्यात्ताननम्** — अमर्याद पसरलेले मुख.
**कालानलसन्निभानि** — प्रलयकाळच्या सर्वसंहारक अग्नीसारखे प्रज्वलित. **धृतराष्ट्रस्य पुत्राः** — धृतराष्ट्राचे सगळे पुत्र.
**अस्मदीयैः अपि** — आमच्या बाजूचे. **योधमुख्यैः सह** — प्रमुख योद्ध्यांसह सगळे.
**ते दंष्ट्राकरालानि** — दाढांनी युक्त असे विकराल. **भयानकानि वक्त्राणि** — भयानक अशा मुखामधे.
**दशनान्तरेषु विलग्नाः** — दातांच्या फटीमधे अडकलेले. **ग्रसमानः समन्तात्** — सर्व बाजूंनी ग्रास करीत.
**लेलिह्यसे** — वारंवार चाटत गिळत आहात. **समग्रम् जगत्** — संपूर्ण जगाला.
**प्रतपन्ति** — संतप्त करीत आहात. तापवीत आहात. ताप देत आहात. **उग्ररूपः** — उग्ररूप असणारे.
**भवान् कः** — आपण कोण आहात? **न प्रजानामि** — मला कळत नाही. **तव प्रवृत्तिम्** — तुमची ही प्रवृत्ती.
त्याच्या कल्पनेपलीकडचे दृष्य पाहून तो हतबल झाला आहे.
**‘ हे परमेश्वरा ऽऽ! हे मी काय पाहतो आहे?**
तुमचे हे घोर रूप पाहून मला तर भीतीने कापरे भरले आहे ऽ! मला काहीही सुचत नाही ऽ! बोलताही येत नाही ऽ!
नद्यांच्या पाण्याचे अनेक ओघ ज्याप्रमाणे समुद्राकडे धाव घेतात त्याचप्रमाणे येथे जमलेले हे मनुष्यलोकातील सर्व वीरपुरुष, कौरवांचा आणि पांडवांचा पक्ष घेऊन त्यांच्या बाजूने निकराने लढायला निघालेले हे सर्व योद्धे, तुमच्या प्रज्वलित अशा मुखामध्ये शिरून जळून मरत आहेत. आपापल्या शस्त्रास्त्रांसह नष्ट होत आहेत. त्यांची नाव-निशाणी सुद्धा शिल्लक रहात नाही आहे.
आता मी तुम्हाला काय सांगू? तुमची ही सर्व करणी मला खरोखरच कळत नाही ऽ! समजत नाही ऽ!
आज येथे, तुमच्या क्रोधापासून कोणीही वाचणार नाही. जिवंत राहणार नाही.
**‘ आम्ही पाच बंधू तरी जिवंत राहू की नाही ’** ह्याचीही मला शंका वाटते आहे. मी सैरभैर झालो आहे.
मनामधे, यापूर्वी कधीही न आलेले असे, अत्यंत विपरीत असे विचार येत आहेत. माझे मन थाऱ्यावर नाही.
**हे काय चालले आहे? तुम्ही हे सगळे मला कशासाठी दाखवीत आहात?**
त्यामागे तुमचा काय हेतू आहे? यापुढे तुम्ही काय करणार आहात?
मी तुम्हाला ‘ तुमचे मूळचे स्वरूप दाखवा ’ असे म्हणालो. ते तुम्ही दाखविलेत. त्या दर्शनाने मी भरून पावलो. धन्य झालो. कृतार्थ झालो. पण आता जे पाहतो आहे ते अत्यंत विपरीत आहे. त्याने मी कमालीचा घाबरून गेलो आहे.
भीतीच्या सागरामधे बुडून गेलो आहे. मला कशाचीही शाश्वती राहिलेली नाही. आपल्या तेजाने तुम्ही सर्व विश्वाला तप्त करीत आहात आणि तो ताप सहन करणे कोणालाही शक्य होत नाही. भीतीने सर्वांची गाळण उडालेली दिसते आहे. सर्व देवगण, सिद्धगण, महर्षी आणि ऋषिमुनी हतबल होऊन, भयभीत होऊन हात जोडून तुमचे स्तवन करीत आहेत. प्रार्थना करीत आहेत.
म्हणून मी तुम्हाला परत एकदा नमस्कार करतो आहे ऽ! हे देवश्रेष्ठा ऽ! शांत व्हा ऽ! माझ्यावर प्रसन्न व्हा ऽऽ! कृपा करा ऽऽ!
मला सांगा की तुम्ही कोण आहात ऽ? येथे काय करायला प्रवृत्त झाला आहात ऽऽ?
त्याला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. स्पष्ट उत्तर मिळाले. आश्वस्थ करणारे उत्तर मिळाले. त्याच्या भयाचा नाश करणारे असे उत्तर मिळाले. घुमणाऱ्या शंखनादासारखा घनगंभीर आणि स्पष्ट असा आवाज ऐकू येऊ लागला.
**श्रीभगवानुवाच :**
**कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धः लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ।**
**ऋतेऽपि त्वाम् न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ।। ३२ ।।**
**तस्मात्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यम् समृद्धम् ।**
**मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रम् भव सव्यसाचिन् ।। ३३ ।।**
**द्रोणञ् च भीष्मञ् च जयद्रथञ् च कर्णन् तथाऽन्यानपि योधवीरान् ।**
**मया हतान्स्त्वम् जहि मा व्यथिष्ठाः युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ।।३४ ।।**
मी लोकांचा क्षय करणारा व वृद्धिंगत झालेला काळ आहे आणि येथे लोकांचा संहार करण्यास निघालो आहे.
तू नसलास तरीही सैन्यांतून उभे असलेले हे सर्व योद्धे नाहीसे होणार आहेत. ( मरणार आहेत.)
म्हणून तू ऊठ ! यश मिळव आणि शत्रूंना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे. मी यांना पूर्वीच मारलेले आहे.

हे सव्यसाची अर्जुना ! म्हणून आता तू निमित्तासाठी पुढे हो. द्रोण, भीष्म, जयद्रथ आणि कर्ण, तसेच दुसरेही वीरयोद्धे मी पूर्वीच मारलेले आहेत; त्यांना तू मार ! घाबरू नकोस ! लढ ! युद्ध कर! ह्या युद्धात तूं शत्रूला जिंकणार आहेस.

**‘ पार्था ऽऽ! मी अक्षय असा काळ आहे.**

आज ह्या ठिकाणी सर्व लोकांचा क्षय करण्यासाठीच वृद्धिंगत झालो आहे.

येथे जमलेल्या दोन्ही बाजूंच्या सर्व सैनिकांचा संहार करण्यास निघालो आहे. तू असलास अथवा नसलास तरीही,

कोणत्याही कारणाने युद्ध केलेस अथवा केले नाहीस तरीही, उभय सैन्यांतून उभे असलेले हे सर्व योद्धे मरणार आहेत हे निश्चित!

प्रत्येक प्राणी आपापल्या कर्मानेच जगत असतो आणि कर्मानेच मरत असतो ऽ! प्रत्येकाला स्वत:च्या कर्माचे फळ भोगावेच लागते ऽ!

त्यामधून कोणाचीही सुटका होऊ शकत नाही. आपापल्या पराक्रमाचा आणि सामर्थ्याचा अहंकार असलेले हे सर्व रथी महारथी आता लवकरच नाहीसे होणार आहेत. ह्या विषयी संशय नाही. म्हणून तू ऊठ ऽ! युद्धाला उभा रहा ऽऽ!

यश मिळव आणि आपल्या शत्रूंना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे ऽ!

ज्या वेळी तू ह्या सगळ्यांना, माझ्या मुखामधे प्रवेश करून जळून मरताना पाहिलेस, त्याचवेळी ते मेलेले आहेत.

मी त्यांना अगोदरच मारलेले आहे. हे सव्यसाची अर्जुना ऽऽ! आता तू केवळ निमित्तासाठी पुढे हो ऽऽऽ!

द्रोण, भीष्म, जयद्रथ आणि कर्ण, तसेच दुसरेही वीरयोद्धे मी मारलेलेच आहेत! त्यांची जराही भीती बाळगू नकोस! नसता शोक करू नकोस! चिंता करू नकोस! जरी हे सगळे राजे गर्वाने उन्मत्त झालेले असले, अहंकाराने आंधळे झाले असले, आपापल्या सैन्याचे समुदाय एकत्र करून येथे गर्जना करीत असले, त्यांचे गजदल आणि रथदल यमराजाच्याही वरचढ असल्याच्या वल्गना करीत असले, आम्ही स्वत:च्या बाहुबलाने आणि शौर्याने तुम्हा पांडवांना मारून टाकू असे छातीवर हात मारून सांगत असले तरीही घाबरू नकोस!

त्यांना तू प्रत्यक्षपणे मार ऽ! लढ ऽऽ! लढाईत तू शत्रूला जिंकणार आहेस ऽऽ!

आपल्या मनामधे कोणत्याही विपरीत शंकेला थारा देऊ नकोस ऽऽ! तुम्हा पाच भावांना मी मारलेले नाही ऽऽ!

तुम्ही पांडव मला प्रिय आहात. शुद्ध बुद्धीचे आहात, शुद्ध चारित्र्याचे आहात आणि माझे अनन्य भक्त आहात ऽऽ!

म्हणून मी तुम्हाला मारणार नाही. मनामधे तसा विचारही आणू नकोस ऽऽ!

युद्धाच्या अखेरी तुम्ही पांचही बंधू जिवंत राहाल ऽऽ!

पतिव्रता पांचाली अखंड सौभाग्यवतीच राहील ऽऽऽ!

विजयी झालेल्या तुम्हा पांडवांना पाहून, माता कुंती धन्य होईल ऽऽऽ!

**ऊठ ऽऽ! युद्ध कर आणि विजयी हो ऽऽऽ!’**

हे आश्वस्थ करणारे भाषण कानावर पडल्यावर, भयभीत झालेल्या अर्जुनाचा कंठ दाटून आला आणि त्याच्या डोळ्यांमधून अश्रू वाहू लागले. ते आनंदाश्रू होते की दु:खाश्रू होते? आता त्याविषयी काय सांगणार?

तो स्वत: आणि त्याचे चारही बंधू जिवंत राहणार असल्याचा आनंद होता?

प्रिय पांचालीला पतिविरहामुळे शोक करावा लागणार नसल्याचा आनंद होता?

कुंतीमातेला पुत्रवियोगामुळे आक्रोश करावा लागणार नसल्याचा आनंद होता? की —

सर्व बंधु-बांधव, पितामह आणि गुरुदेव, आप्तेष्ट आणि हितचिंतक मरणार असल्याचे दु:ख होते? गांधारीमातेला तिचे शंभर पुत्र मरण पावल्याचे ऐकावे लागून उरलेले आयुष्य निपुत्रिक अवस्थेतच जगावे लागणार असल्याचे दु:ख होते?

ह्याविषयी त्याचे त्यालाच, काहीच कळत नव्हते! त्याच्या मनामधे आनंद आणि दु:ख ह्या दोनही भावनांचे विचित्र मिश्रण झाले होते. काही बोलण्याचा प्रयत्न करावा तर कंठ भरून येत होता. मुखामधून शब्द बाहेर येतच नव्हते.

सुखाचा म्हणा किंवा दु:खाचा म्हणा, आवेग थांबविताच येत नव्हता. त्यामुळे मुखावाटे केवळ हुंदकेच बाहेर येत होते.

**तो फक्त रडत होता! ढसाढसा रडत होता! मुक्तपणे रडत होता!**

**संजय उवाच :**

**एतच्छ्रुत्वा वचनम् केशवस्य कृताञ्जलिर्वेपमान: किरीटी ।**

**नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णम् सगद्गदम् भीतभीत: प्रणम्य ।। ३५ ।।**

केशवाचे हे भाषण ऐकून अत्यंत भयभीत होऊन, कंठ दाटून येऊन, कांपत कांपत, हात जोडीत नमस्कार करून, अर्जुन श्रीकृष्णाला परत असे म्हणाला की,

काही वेळाने भावनांचा आवेग ओसरल्यावर त्याचे रडणे थांबले खरे, पण तरीही त्याचे शरीर कंप पावत होते.

त्याला गलितगात्र झाल्यासारखे वाटत होते. त्याची भीती जराही कमी झाली नव्हती.

फक्त तो स्वत: आणि त्याचे चार बंधू मरणार नसल्याचे आश्वासन मिळाल्यामुळे, थोडा सावरला होता इतकेच काय ते.
पण सर्वांगाला सुटलेला कंप काही कमी होत नव्हता. समोर दिसत असलेले मृत्यूचे तांडव चाललेलेच होते.
हत्ती, घोडे आणि रथांच्यासह सर्व सैन्य त्या महामुखामधे शिरून मरतच होते.
अत्यंत भयभीत झालेला अर्जुन त्याच अवस्थेमध्ये, आपले दोन्ही हात जोडून नमस्कार करीत परत बोलायला लागला.

**अर्जुन उवाच :**

**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।**
**रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यान्ति च सिद्धसङ्घाः ।। ३६ ।।**
**कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।**
**अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरम् सदसत्तत्परम् यत् ।। ३७ ।।**
**त्वमादिदेवः पुरुषः पुराणः त्वमस्य विश्वस्य परम् निधानम् ।**
**वेत्ताऽसि वेद्यञ् च परम् च धाम त्वया ततम् विश्वमनन्तरूप ।। ३८ ।।**

हे हृषीकेशा ! सर्व जग तुमच्या गुणसंकीर्तनाने आनंदते व त्यांत अनुरक्त असते. राक्षसही तुम्हांला भिऊन दाही दिशांस पळून जातात आणि सिद्ध पुरुषांचे मेळे तुम्हालाच नमस्कार करतात हे सर्व योग्यच होय. हे महात्मन् ! ब्रह्मदेवाचेही आदिकारण व त्यापेक्षाही श्रेष्ठ जे तुम्ही, त्या तुम्हांला ते का बरे वंदन करणार नाहीत? हे अनंता ! देवदेवा ! हे जगन्निवासा ! सत् व असत् असून ह्या दोहोंच्याही पलीकडचे जे अक्षर ते तुम्हीच आहात. तुम्हीच आदिदेव, तुम्हीच पुरातन पुरुष, तुम्हीच ह्या जगताचे परम आधार, तुम्हीच ज्ञाते व ज्ञेय, तुम्हीच श्रेष्ठ स्थान आहात आणि हे अनंतरूपा ! तुम्हीच हे सगळे विश्व व्यापले आहे.
हे हृषीकेशा ऽऽ! हे भगवंता ऽऽ! तुमचे हे भयानक रूप पाहून सर्व राक्षसगण आणि असुरगण दहाही वाटांनी पळत सुटले असल्याचे मी पाहतो आहे. त्यांची पार दुर्दशा उडाली आहे.
एकदा सूर्याचा उदय झाला म्हणजे मग अंधार कितीही घोर असला, दाट असला, घट्ट असला, तरी तो टिकून राहूच शकत नाही. त्याला नाहीसे व्हावेच लागते. आपले तोंड काळे करावेच लागते. येथे तसाच प्रकार दिसतो आहे.
विश्वामधे जे जे दुष्ट प्रवृत्तीचे प्राणिमात्र आहेत, मग ते कोणत्याही योनीतले असले तरीही, त्यांच्यासाठी तुम्ही साक्षात् मृत्यूच आहात. ते पण असे दुर्दैवी की, तुम्हाला शरण यायचे सोडून, दुष्ट वासनांचा त्याग करून सन्मार्गाने वागायचे सोडून, तुमच्यापासून दूर पळून जायचा प्रयत्न करीत आहेत. पण ते पळून जाणार कुठे? सर्व काही तुम्हीच तर आहात. जिथे तुम्ही नाही अशी एकही जागा त्यांना सापडणे शक्य नाही. पण त्यांना हे सत्य कळत नाही. समजत नाही.
याउलट विश्वामधे जे जे सुष्ट प्रवृत्तीचे, सज्जन असे प्राणिमात्र आहेत, मग ते कोणत्याही योनीतले असले तरीही, ते तुम्हाला नमस्कार करतात, तुमचे पूजन करतात, चिंतन करतात, मनन करतात. त्यांचे असे करणे योग्यच आहे.
अहो ऽऽ, तुम्हाला नमस्कार करायचा नाही तर मग कोणाला करायचा?
**महात्मन्** म्हणजे सर्व प्राणिमात्रांच्यामधे स्थित असलेले महान आत्मतत्त्व तुम्हीच आहात.
**अनंत** म्हणजे ज्याला अंत नाही असे आणि **अक्षर** म्हणजे ज्याला झीज नाही असे एकमेव तुम्हीच आहात.
हे सर्व विश्व तुमच्यामधूनच निर्माण होते. तुमच्यामधूनच त्याचा विस्तार होतो. तुमच्याच आधाराने ते स्थिर राहते आणि त्याचा अंतही तुमच्यामधेच होत असतो. प्रत्यक्ष ब्रह्मदेवही तुमच्या इच्छेने, तुमच्यामधूनच निर्माण झालेला आहे. तुम्हीच त्याचे जन्मदाते आहात. त्यामुळे त्याच्यासह सर्व प्राणीमात्रांसाठी वंदनीय असे, पूजनीय असे, मननीय असे, चिंतनीय असे, आदरणीय असे एकमेव तुम्हीच आहात ह्यात आश्चर्य ते काय?
हे परमेश्वरा ऽऽ, प्रकृती आणि पुरुष ह्या दोघांचेही मूळ आपणच आहात. आपले गुण आणि सामर्थ्य अमर्याद आहे. आपण अविनाशी आहात. जे सत् म्हणून आहे, जे असत् म्हणून आहे आणि जे त्या दोघांच्याही पलीकडले असे आहे ते सर्व काही तुम्हीच आहात. सर्व जगाचा उगम आणि शेवट तुमच्यामधेच होतो. सर्व जगाला आधारभूत अशी जी माया तिलाही आपणच आधार आहात.
ज्याला अनंत रूपे आहेत, त्या आपले यथार्थ वर्णन कोणाला बरे करता येईल? कसे बरे करता येईल?

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वम् प्रपितामहश्च ।**
**नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।। ३९ ।।**
**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।**
**अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वम् सर्वम् समाप्नोषि ततोऽसि सर्वः ।। ४० ।।**

वायु, यम, अग्नि, वरुण, चंद्र, प्रजापति म्हणजे ब्रह्मदेव आणि पणजोबाही तुम्हीच आहात. तुम्हाला हजार वेळा नमस्कार असो आणि परत आणखीही तुम्हालाच नमस्कार असो. तुम्हाला पुढून आणि पाठीमागून नमस्कार असो. हे सर्वात्मका ! सर्वच बाजूंनी तुम्हाला नमस्कार असो. तुमचे वीर्य अनंत व तुमचा पराक्रम अतुल असून, सर्वांना पुरे पडत असल्यामुळे तुम्हीच ' सर्व ' आहात.
हे भगवंता ऽऽ, तुम्हीच वायुदेव आहात आणि सर्व जगाचे शासन करणारा यमदेवही तुम्हीच आहात.
अग्नी, वरुण, चंद्र, प्रजापती हे सर्व काही तुम्हीच आहात. हे जगाच्या नाथा ऽऽ, ज्याला रूप आहे अथवा नाही, ज्याला आकार आहे अथवा नाही, ज्याला रंग आहे अथवा नाही, ज्याला रस आहे अथवा नाही, ज्याला गंध आहे अथवा नाही असे सर्व काही तुम्हीच आहात. म्हणून मी तुम्हाला अनन्य भावाने नमस्कार करतो.
हे प्रभो तुम्हाला माझा **नमस्कार** असो! शिरसाष्टांग **नमस्कार** असो! हे प्रभो, तुम्हाला माझा हजारो वेळा **नमस्कार** असो आणि त्यानंतरही मी परत तुम्हालाच **नमस्कार** करतो आहे. वारंवार **नमस्कार** करतो आहे.
आता अर्जुनाची अवस्था कशी झाली आहे पहा. तो आश्वस्थ झालेला असला तरीही अस्वस्थ आहे. भयभीत झालेला आहे.
त्याला आपण काय करावे? काय सांगावे? काय बोलावे? तेच कळत नाही.
समोर जे काही दिसते आहे त्यामुळे शांत राहणेही शक्य होत नाही आणि देवाची स्तुती करण्यासाठी योग्य शब्दही आठवत नाहीत. म्हणून जे जे दिसते आहे त्याला तो **नमस्कार** करतो आहे.
हे प्रभो तुम्हाला **नमस्कार** असो! तुम्हाला **नमस्कार** असो! तुम्हाला **नमस्कार** असो! तो वारंवार असेच म्हणतो आहे. परमेश्वराच्या पायाशी एकसारखा नतमस्तक होतो आहे.
**नमस्ते! नमस्ते! नमस्ते!** याहून दुसरी स्तुती त्याला आठवेनाशी झाली आहे आणि काहीही न बोलता गप्प राहणेही जमण्यासारखे नाही. त्यामुळे त्याच्या नमस्कार करण्यामधे अनेक भावना व्यक्त होत आहेत.
परमानंदाने आणि त्याच बरोबर आत्यंतिक भीतीच्या भावनेने, समर्पणाच्या भावनेने, भक्तिभावनेने व प्रेमभावनेने तो आपल्या मुखाने **' नमस्ते! नमस्ते! नमस्ते! '** चा गजर करतो आहे. **आपल्या सनातन धर्मामधे नमस्काराला फार महत्त्व दिलेले आहे.**
आशिर्वादापेक्षाही नमस्कार महत्त्वाचा आहे असे सांगितलेले आहे. नमस्काराच्या क्रियेची, आशिर्वाद ही सहज प्रतिक्रिया आहे. नमस्कारामध्ये नम्रतेची, लीनतेची आणि समर्पणाची भावना आहे. आशिर्वादामध्ये रक्षणकर्त्याची भावना आहे.
नमस्कार करणारा हा ज्याला नमस्कार करतो त्याला, आपल्या साध्या व सोप्या कृतीने, बंधनात अडकवतो. त्याच्यावर आपल्या रक्षणाची जबाबदारी टाकतो. त्यासाठी अट इतकीच की नमस्कार हा मनापासून व अत्यंत प्रामाणिकपणे केलेला असला पाहिजे.
त्यामधे खोटेपणाचा अंशही असता कामा नये. ही अट पाळली तर, केवळ नमस्कार केल्यानेच, करणाऱ्याचे अर्धे रक्षण होते.
उरलेले अर्धे रक्षण त्याला आशिर्वाद देणाऱ्याला करावे लागते. तो स्वतःहूनच करतो. त्याशिवाय त्याची सुटका होत नाही.
असा हा साधा, सरळ व सोपा मार्ग फार महत्त्वाचा आणि अत्यंत परिणामकारक आहे.
त्यावेळी त्याठिकाणी दुसरे काहीही करता येण्यासारखे नाही म्हणून अर्जुन त्याच मार्गाचे अवलंबन करीत आहे.
त्याचे नांवच **अर्जुन** आहे. त्याचे **अनघ** असेही एक नांव आहे.
**अर्जुन** म्हणजे सरळ स्वभावाचा. सरळ मार्गाने चालणारा. प्रामाणिक असा.
**अनघ** म्हणजे निष्पाप. ज्याच्या विचारामधे आणि आचारामधे जराही पाप नाही असा.
असा तो महारथी वीरवर अर्जुन, परमेश्वराचे विश्वरूप पाहून गोंधळूनच गेलेला आहे.
खरे म्हणजे त्या विश्वरूपाच्या ठिकाणी आदि, मध्य, अंत, पुढे, मागे, डावीकडे, उजवीकडे, वरती, खाली, आंत, बाहेर ह्या शब्दांना काहीही अर्थ राहिलेला नाही. तरीही मनुष्य योनीच्या मर्यादेला अनुसरून व तशी कल्पना करून तो परत परत नमस्कार करतो आहे. परमेश्वराने शांत व्हावे, प्रसन्न व्हावे म्हणून एकसारखा प्रार्थना करतो आहे.
हे देवा ऽऽ, तुम्हाला **पुढून नमस्कार** असो! तुम्हाला **पाठीमागून नमस्कार** असो!
इतकेच नाही तर तुमचे वीर्य अनंत आहे, तुमचा पराक्रम अतुलनीय आहे आणि तुम्ही सर्वांना सर्व प्रकारे पुरे पडत असल्यामुळे सर्व काही तुम्हीच आहात म्हणून हे सर्वात्मका ऽऽ, हे सर्वेश्वरा ऽऽ, तुम्हाला माझा **सर्व बाजूंनी नमस्कार** असो.
तुमचे हे अगाध सामर्थ्य मला आताच पहायला मिळाले आहे.
इतके दिवस मला तुमचा सहवास लाभला. परंतु ही गोष्ट काही समजली नाही.
आजपर्यंत तुमच्या सामर्थ्याची आणि प्रभावाची जाणीव झालीच नाही.
**सखेति मत्वा प्रसभम् यदुक्तम् हे कृष्ण हे यादव हे सखेति ।**
**अजानता महिमानम् तवेदम् मया प्रमादात्प्रणयेन वापि ।। ४१ ।।**

**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।**

**एकोऽथवाऽप्यच्युत तत्समक्षम् तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ।। ४२ ।।**

तुमचा हा महिमा न ओळखता, मित्र समजून ' अरे कृष्णा ऽऽ! अरे यादवा ऽऽ! अरे मित्रा ऽऽ!' असे चुकीने असो अथवा सलगीने असो, मर्यादा सोडून जे काही बोललो असेन आणि हे अच्युता ! आहारविहारात किंवा निजण्याबसण्यात, एकट्याला किंवा चारचौघात, मी थट्टेने तुमचा जो काही अपमान केला असेल त्याची मला क्षमा करावी असे तुम्हा अप्रमेयांजवळ, माझे मागणे आहे.

मी पण असा निर्बुद्ध की तुम्हाला केवळ माझा भाऊच समजत राहिलो.

इतर अनेक आप्त संबंधीयांच्या सारखाच, माझा आणखी एक आप्त समजून, अगदी सहजपणे तुमच्या बरोबर तसेच वर्तन केले.

तुम्हाला हाक मारताना नेहमीच, **' अरे श्रीकृष्णा ऽ, अरे यादवा ऽ, अरे मित्रा ऽ, अरे सख्या ऽ, अरे गोपाळा ऽ'** अशीच सलगी केली. इतर सामान्य माणसाच्या बरोबर बोलताना शोभतील असेच शब्द वापरून तुमच्या बरोबर हास्यविनोद करीत होतो.

आम्ही पांडवांनी तुमच्याकडून नाही नाही ती कामे करून घेतली. त्याची आठवण आली तरीही मला स्वत:ची लाज वाटायला लागते.

आजवर तुमच्या बाबतीत आमच्याकडून नकळत घडलेल्या अपराधांच्या जाणिवेने मन विषण्ण होते आहे.

आता कोणकोणते अपराध सांगायचे?

हे भगवंता ऽऽ, राजसूय यज्ञाचे वेळी तुम्ही, तेथे आलेल्या पाहुण्यांचे पाय धुण्याचे काम स्वीकारून ते आनंदाने केलेत.

त्यावेळी तुम्ही आमच्या घरची उष्टी, खरकटीही काढलीत. खरे म्हणजे तेव्हा आम्ही तुम्हाला थांबवायला हवे होते.

पण आमच्याकडून तसे झाले नाही. मी तुम्हाला आमच्यासारखाच एक समजत होतो.

वनवास आणि अज्ञातवास संपल्यावर आम्ही तुम्हाला, आमचा दूत म्हणून, कौरवांच्याकडे वाटाघाटी करण्यासाठी पाठविले.

तडजोड करण्यासाठी पाठविले. तेथे कौरवांच्या राजसभेत दुष्ट दुर्योधनाकडून, तुम्हाला अपमान सहन करावा लागला.

आमच्यावरील प्रेमापोटी तो अपमानही तुम्ही सहन केलात.

इतकेच नाही तर आत्ताही ह्या युद्धाच्या प्रसंगी, मी तुम्हाला माझा सारथी केले आहे.

खरे म्हणजे तुमच्या शेजारीही उभा राहण्याची योग्यता नसलेला असा जो मी, तो तुमच्या पाठी उभा राहून, तुम्हाला आज्ञा करीत आहे.

तुम्ही आमच्या घरी आल्यावर अथवा आम्ही तुमच्या घरी आल्यावर, आम्हा पाच भावांना तुम्ही नेहमीच मान देत होता. आमच्याशी प्रेमाने वागत होता. परंतु मी मात्र तुमच्यावर रुसून बसत होतो. वाद घालीत होतो. हट्ट करीत होतो. तुमच्यापुढे पाठ करून बसत होतो. आवडलेली प्रत्येक गोष्ट मिळावी म्हणून तुमच्याशी भांडत होतो. तुमचे काहीही ऐकत नव्हतो. उलट सर्वज्ञ अशा तुम्हालाच शहाणपणाच्या गोष्टी सांगत होतो. तुमच्या आसनावर हक्काने तुमच्या शेजारीच बसत होतो. तुमच्या बिछान्यावर झोपत होतो. तुम्हाला आमची कामे करायला सांगत होतो. विविध खेळ खेळताना भांडण करून हातघाईवर येत होतो.

हे सर्व अपराध असे आहेत की ज्यांना कधीही क्षमा करता येणार नाही.

परंतु हे देवा ऽऽ, मी तुमची शपथ घेऊन सांगतो की हे अपराध माझ्या हातून अज्ञानामुळे नकळत झाले. अतिपरिचयामुळे असल्या बऱ्याच गोष्टी अनेक वेळा घडल्या. आता काय काय म्हणून सांगावे? मी अनंत अपराध केलेले आहेत.

म्हणून हे प्रभो ऽऽ, तुमच्या समक्ष अथवा तुमच्या पश्चात्, ज्या अनेक वाईट गोष्टी माझ्या हातून घडल्या असतील,

त्याचप्रमाणे प्रेमभावनेने अथवा चुकीने, तुम्हाला न पटणारी अशी जी अशोभनीय अशी वाक्ये माझ्याकडून बोलली गेली असतील, त्यासाठी मला आपण उदार अंत:करणाने क्षमा करावी.

हे देवा ऽऽ, तुम्ही क्षमावान् स्वभावाचे आहात. तुम्हाला शरण आलेल्याला तुम्ही कधीही अंतर देत नाही. म्हणून मी आपली विनवणी करीत आहे. मी आपल्याला संपूर्णपणे शरण आलेलो आहे. माझ्या सर्व अपराधांच्यासाठी आपण मला क्षमा करा.

**पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।**

**न त्वत्समोऽस्त्यभ्यधिक: कुतोऽन्य: लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ।। ४३ ।।**

**तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायम् प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।**

**पितेव पुत्रस्य सखेव सख्यु: प्रिय: प्रियायार्हसि देव सोढुम् ।। ४४ ।।**

तुम्हीच ह्या चराचर जगताचे पिता असून पूज्य व गुरूंचेही गुरू आहात. सर्व त्रैलोक्यात तुमच्या बरोबरीचा कोणीही नाही, मग अधिक कोठून असणार? ह्यासाठी स्तुत्य व समर्थ अशा तुमची - प्रसन्न व्हा - म्हणून शरीर वाकवून, नमस्कार करून मी प्रार्थना करीत आहे. पिता ज्याप्रमाणे आपल्या पुत्राचे किंवा सखा ज्याप्रमाणे आपल्या सख्याचे किंवा पती आपल्या पत्नीचे अपराध माफ करतो, त्याचप्रमाणे हे देवा ऽ! तुम्ही माझे सर्व अपराध माफ करावे.

हे सर्व विश्व तुमच्याच इच्छेने आणि तुमच्या पासूनच निर्माण झालेले आहे. त्यामुळे तुम्हीच सर्व जगाचे पिता आहात.

सर्व जगाला वंदनीय आहात. ह्या सर्व विश्वामधे सर्वश्रेष्ठ असे केवळ तुम्हीच आहात. तुमच्याशी बरोबरी करू शकेल असा कोणीही नाही. त्यामुळेच, कोणीही असला तरी तो तुमच्यापेक्षा वरचढ कसा असू शकेल? तुमचे वर्णन कसे करावे तेच मला समजत नाही.
हे परमेश्वरा ऽऽ, मला एक गोष्ट सांगा की, मुलगा कसाही असला, कसाही वागला तरी त्याचा पिता त्याचे सर्व अपराध सहन करतो की नाही? त्याच्या भवितव्याविषयी काळजी करतो की नाही? त्याला यथायोग्य मदत करतो की नाही?
कोणतीही आई, आपल्या मुलाने केलेले सर्व अपराध पोटात घालून, त्याच्यावर सदैव प्रेमच करते की नाही? सर्व प्रकारे त्याची काळजी घेते की नाही? आपल्या मित्राकडून अपमान झाला तरीही, जो खरा मित्र आहे तो, त्याविषयी मनामधे राग बाळगतो काय? तो आपल्या प्रिय मित्राला क्षमा करतो की नाही? आपल्या प्रिय पत्नीच्या कडून काही अपराध घडले, तरीही पती ते सर्व अपराध उदार अंत:करणाने सहन करतो की नाही? तिला क्षमा करतो की नाही?
त्याचप्रमाणे आपण उदार होऊन, माझ्या अगणित अपराधांची क्षमा करावी. ही विनंती करण्याची योग्यता तरी माझ्या अंगी कोठे आहे? असे असले तरीही माझ्यासाठी आपणच सर्व काही आहात, म्हणून मनामधील दु:ख मी तुम्हालाच सांगतो आहे.
वारंवार नमस्कार करून क्षमा मागतो आहे.

**अदृष्टपूर्वम् हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितम् मनो मे ।**
**तदेव मे दर्शय देव रूपम् प्रसीद देवेश जगन्निवास ।। ४५ ।।**
**किरीटिनङ् गदिनञ् चक्रहस्तम् इच्छामि त्वाम् द्रष्टुमहम् तथैव ।**
**तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्त्रबाहो भव विश्वमूर्ते ।। ४६ ।।**

यापूर्वी कधीही न पाहिलेले असे तुझे रूप पाहून मला हर्ष झाला आहे व भयाने माझे मन व्याकूळ झाले आहे. हे जगन्निवासा देवाधिदेवा ! प्रसन्न व्हा आणि आपले ते पूर्वीचे स्वरूप दाखवा. मस्तकावर किरीट व हातात गदा धारण करणारे, चक्र धारण करणारे असे पूर्वीप्रमाणेच मी तुम्हाला पाहू इच्छितो. म्हणून हे सहस्त्रबाहो ऽऽ! हे विश्वमूर्ते ऽऽ! त्या चतुर्भुज रूपानेच प्रकट व्हा!
' मला तुझे मूळचे स्वरूप दाखव.' असा मी हट्ट केला आणि आपण तो तात्काळ पुरविलात.
जे वेदांनाही अगम्य आहे, प्रत्यक्ष ब्रह्मदेव आणि शंकरांनीही जे पाहिलेले नाही, जे पाहण्यासाठी सर्व देव उत्सुक असतात, ज्याचा ध्यास घेऊन ऋषिगण, मुनिगण, योगीजन आणि तपस्वी पुरुष, आयुष्यभर साधना करीत असतात, असे हे आपले विश्वरूप मी प्रत्यक्ष पाहिले. जे पूर्वी कधीही पाहिले अथवा ज्याविषयी कधी काही ऐकले नाही, ते हे आपले विश्वरूप तुम्ही माझ्या डोळ्यांना प्रत्यक्ष दाखविलेत. त्यामुळे हे देवा ऽऽ, सुरवातीला माझे मन आनंदित झाले. आश्चर्याने मंत्रमुग्ध झाले.
पण नंतर जे काही पाहिले आणि आताही जे पाहतो आहे, त्यामुळे माझ्या मनामधे आपल्या ह्या विश्वरूपाविषयी कमालीचे भय उत्पन्न झाले आहे. मी पूर्णपणे भयग्रस्त झालो असून मला कशाचीही शाश्वती वाटेनाशी झाली आहे.
माझे मन थाऱ्यावर नाही आणि बुद्धीही काम करेनाशी झाली आहे. आता मला आपले हे रूप कोणत्याही प्रकारे आनंद देत नाही.
आपल्या ह्या रूपाला हजारो मुखे आहेत. हजारो हात आहेत. हजारो पाय आहेत.
मला जर काही बोलावेसे वाटले तर आपल्या कोणत्या मुखाबरोबर बोलायचे?
आपल्याविषयी वाटणारा आदर व्यक्त करायचा झाला अथवा स्नेहभाव व्यक्त करायचा झाला तर मग मी, आपल्या कोणत्या हाताला स्पर्श करायचा? आपल्या ह्या अनंत आकाराच्या भव्य शरीराला आलिंगन तरी कसे द्यायचे?
जर नमस्कार करायचा झाला तर आपल्या कोणत्या पायावर मस्तक ठेवायचे?
ह्या प्रश्नांचे उत्तर काय आहे ते मला तरी माहीत नाही.
त्यामुळे मी आपल्या बरोबर मोकळेपणाने बोलू शकणार नाही, हितगूज करू शकणार नाही, प्रेमभराने आलिंगन देऊ शकणार नाही आणि आपला सहवास उपभोगू शकणार नाही.
त्या उलट, हे देवांच्या देवा ऽऽ, हे परमेश्वरा ऽऽ, तुमचे नेहमीचे रूप हेच माझ्यासाठी आनंदाचे घर आहे! प्रेमाची परिपूर्णता आहे! सुखाचे निधान आहे! विश्रांतीचे स्थान आहे! सर्व शास्त्रांच्या आणि योगशास्त्राच्या अभ्यासाचे अंतिम फळ तेच आहे.
सर्व प्रकारच्या यज्ञयागाचे आणि सर्व प्रकारच्या दानधर्माचे अंतिम फळ तेच आहे.
सर्व तीर्थयात्रांचे, व्रतवैकल्यांचे आणि जप - तपांचे अंतिम फळ तेच आहे.
मला आपले ते, मस्तकावर मुकुट धारण केलेले आणि हातांमधे चक्र आणि गदा धारण केलेले असे, मनमोहक रूप पहायचीच सवय आहे आणि त्या रूपाचीच विलक्षण आवड आहे. ते रूप माझ्या आत्यंतिक प्रेमाचा विषय आहे.
त्या रूपाचा नीलवर्ण हा, अत्यंत आनंददायक आहे. त्याचे दर्शन हे, पाहणाऱ्यासाठी अत्यंत सुखकारक आहे.
त्याचे हास्य हे, अमृताचा वर्षाव करणारे आहे. त्याचा स्पर्श हा, सर्व प्रकारच्या वेदनांचा नाश करणारा आहे.
त्याचे आलिंगन हे, अष्टसात्त्विकभाव जागे करणारे आहे. त्याचे बोलणे हे, ऐकणाऱ्याला धीर देणारे आहे. आश्वस्थ करणारे आहे.

आणखी काय सांगू? त्या रूपाचे वर्णन करावे तितके थोडेच आहे.

**माझ्यासाठी ते रूप म्हणजे प्रत्यक्ष मोक्षाचे निधानच आहे.**

आता मी माझ्या प्रिय मित्राचे, सख्याचे, हितचिंतकाचे, मार्गदर्शकाचे आणि माझा भक्कम आधार असलेल्या अशा श्रीकृष्णाचे, ते अत्यंत आकर्षक रूप पाहण्यास उतावीळ झालो आहे. त्या सगुण कृष्णमूर्तीशिवाय इतर काही पाहणे माझ्या डोळ्यांना आवडत नाही.

जर ते नयनमनोहर रूप पहायला मिळाले नाही तर मग त्यांना इतर कशाचीही काहीही किंमत वाटणार नाही.

म्हणून हे देवाधिदेवा ऽऽ, आता माझ्यावर प्रसन्न व्हा! आपले हे हजारो मुखांचे आणि हजारो हातांचे विश्वरूप आवरून घ्या!

माझ्यावर कृपा करा आणि आपले पूर्वीचेच चतुर्भुज रूप धारण करा!

मी आपल्याला शरण आलो आहे! वारंवार नमस्कार करीत आहे! आपली विनवणी करीत आहे!

माझा विश्वरूप दर्शनाचा हट्ट, आपण माझ्यावरील आत्यंतिक प्रेमापायी, जसा पुरविलात, तसाच माझा हा हट्ट देखील पुरवावा.

**<u>मला माझ्या श्रीकृष्णाला परत पाहू द्या.</u>**

अर्जुन श्रीकृष्णाला परत पाहू इच्छितो आहे. परंतु विश्वरूपाकडे मागणे मागताना काय मागतो आहे ते लक्षात घ्या.

**तदेव मे दर्शय देवरूपम् प्रसीद देवेश जगन्निवास ॥**

**तत् एव** — तेच **मे दर्शय** — मला दाखवा **देवरूपम्** — देवरूप ( विष्णुरूप )

**प्रसीद** — प्रसन्न व्हा **देवेश** — हे देवांच्याही देवा **जगन्निवास** — जगाचे आश्रयस्थान असलेल्या

‘ जगाचे आश्रयस्थान असलेल्या देवेशा, माझ्यावर प्रसन्न व्हा आणि तेच तुमचे देवरूप ( विष्णुरूप ) मला दाखवा. ’

**किरीटिनङ् गदिनञ् चक्रहस्तम् इच्छामि त्वाम् द्रष्टुमहम् तथैव ।**

**किरीटिनम्** — मस्तकावर मुकुट धारण केलेले असे **गदिनम् चक्रहस्तम्** — हातामधे गदा व चक्र घेतलेले अशा

**इच्छामि** — इच्छा करतो **त्वाम् द्रष्टुम्** — तुम्हाला पाहण्याची **अहम्** — मी

**तथा एव** ( अत:) — त्याचप्रमाणे ( म्हणून )

‘ मस्तकावर मुकुट धारण केलेले, तसेच हातामधे गदा व चक्र घेतलेले अशा तुम्हाला पाहण्याची मी इच्छा करतो आहे, म्हणून — ’

**तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥**

**तेन एव** — त्याच **रूपेण** — रूपामधे **चतुर्भुजेन** — चार हात असलेल्या

**सहस्रबाहो** — हजारो हात असलेल्या **भव** — तुम्ही प्रकट व्हा. **विश्वमूर्ते** — विश्वस्वरूपा

‘ हजारो हात असलेल्या विश्वस्वरूपा, चार हात असलेल्या त्याच रूपामधे, तुम्ही प्रकट व्हा.’ असे मागणे मागतो आहे.

**<u>हे रूप श्रीकृष्णाचे नाही.</u>**

श्रीकृष्ण हा मानवी अवतार असल्यामुळे त्याला माणसांच्याप्रमाणे दोनच हात होते.

दुसरे म्हणजे त्याने हे महायुद्ध सुरू होण्याअगोदरच सर्वांच्या पुढे जाहीरपणे,

**‘ न धरी शस्त्र करी मी, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार!’**

अशी प्रतिज्ञा केलेली होती. त्यामुळे त्याच्या हातांमधे चक्र अथवा गदा असे कोणतेही शस्त्र नव्हते तर अर्जुनाच्या रथाच्या घोड्यांचे लगाम आणि चाबुक होते.

चार हात आणि त्यांनी धारण केलेले शंख, चक्र, गदा आणि पद्म हे रूप भगवान विष्णूंचेच आहे.

म्हणजे अर्जुन, ‘ हजार हातांचे विश्वरूप आवरून, अगोदर चतुर्भुज रूप दाखवा आणि त्यानंतर मग द्विभुज मानवी रूप दाखवा.’ असे सांगतो आहे. ह्याचे काय कारण असेल? ह्याविषयी मला काय वाटते ते सांगतो.

विश्वरूपाकडे पाहत असताना सुरवातीला अर्जुनाला जी अगणित रूपे दिसली त्यांमध्ये **<u>‘ भगवान विष्णूंचे दर्शन ’</u>** त्याला सर्वाधिक आवडले असावे. कारण ते श्रीकृष्णाच्या रूपाशी मिळते जुळते होते. श्रीकृष्णाची आठवण करून देणारे होते.

इतर रूपांची गोष्ट सोडून द्या पण ब्रह्मदेव किंवा भगवान शंकर ह्यांचे दर्शनही श्रीकृष्णाच्या रूपाशी जुळणारे नव्हते.

सुरवातीला विश्वरूपामधे काय काय दिसते आहे ते सांगताना, पंधराव्या श्लोकामधे त्याने, **<u>ब्रह्माणम्</u>** आणि **<u>ईशम्</u>** ह्या दोन संबोधनांचा वापर करून ब्रह्मदेवांचा आणि भगवान शंकरांचा उल्लेख केला आहे.

पण त्यानंतर लगेच सतराव्या श्लोकामधे भगवान विष्णूंचा उल्लेख करतांना त्याने, **<u>किरीटिनम् , गदिनम् , चक्रिणम् , तेजोराशिम्</u>** आणि **<u>दीप्तिमन्तम्</u>** अशा पाच विशेषणांचा वापर केलेला आहे.

पुढे अत्यंत घाबरलेल्या अवस्थेतही, भयंकर अशा विश्वरूपाची प्रार्थना करताना, विष्णुरूप दिसत नसतानाही, त्याने अत्यंत आर्तपणे,

कशी हाक मारली आहे पहा. चोविसाव्या श्लोकामधे ' **धृतिन् न विंदामि शमञ् च विष्णो ।।**' आणि —
तिसाव्या श्लोकामधे ' **भासस्तवोग्रा: प्रतपन्ति विष्णो ।।**' अशी हाक मारली आहे.

**' विष्णू '** ह्या नांवानेच स्पष्टपणे हाक मारली आहे. महाभारत आणि पुराणांमधे श्रीकृष्ण हा भगवान विष्णूंचाच अवतार आहे असे सांगितलेले असून सनातन धर्मशास्त्राची देखील तशीच मान्यता आहे. हे सगळे संदर्भ लक्षांत घेतले असता, विश्वरुप आवरून घ्यायला सांगताना, ' अगोदर अगणित हातांच्या **विश्वरूपाच्या** जागी, चार हातांचे देवरूप म्हणजेच **विष्णुरूप** आणि त्यानंतर, दोन हातांचे मानवी म्हणजेच **कृष्णरूप**.' असे त्याचे मागणे योग्यच वाटते. इतकेच नाही तर पुढे तसेच आणि त्याच क्रमाने झाले आहे. असो.

**श्रीभगवानुवाच :**

**मया प्रसन्नेन तवार्जुनेदम् रूपम् परम् दर्शितमात्मयोगात् ।**
**तेजोमयम् विश्वमनन्तमाद्यम् यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ।। ४७ ।।**
**न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै: न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रै: ।**
**एवंरूप: शक्य अहम् नृलोके द्रष्टुम् त्वदन्येन कुरुप्रवीर ।। ४८ ।।**
**मा ते व्यथा मा च विमूढभाव: दृष्ट्वा रूपम् घोरमीदृङ्ममेदम् ।**
**व्यपेतभी: प्रीतमना: पुनस्त्वम् तदेव मे रूपमिदम् प्रपश्य ।। ४९ ।।**

हे अर्जुना ! तुझ्यावर प्रसन्न होऊन, तुझ्याशिवाय दुसऱ्याने पूर्वी न पाहिलेले, हे तेजोमय, अनंत, आद्य व परम विश्वरूप माझ्या योगसामर्थ्याने मी तुला दाखविले. हे रूप तुझ्यावाचून इतर कोणीही पूर्वी कधी पाहिलेले नाही. हे कुरुवीरश्रेष्ठा ! वेदाने, यज्ञाने, स्वाध्यायाने, दानाने, कर्माने किंवा उग्र तपानेही, माझे ह्या प्रकारचे स्वरूप, तुझ्या खेरीज दुसऱ्या कोणासही, ह्या मनुष्यलोकी पहायला मिळणे शक्य नाही. माझे असले हे घोर रूप पाहून तुझ्या चित्ताला व्यथा होऊ देऊ नको किंवा गांगरल्यासारखाही होऊ नको. भीती सोडून देऊन, संतुष्ट मनाने पुन्हा तेच हे माझे स्वरूप तू पहा.

त्याची ती भयभीत अवस्था पाहून श्रीकृष्ण भगवान् म्हणाले की, —

अर्जुना ऽऽ, असा घाबरतोस कशाला? अरे, **हेच माझे खरे स्वरूप आहे.**

ह्या स्वरूपाशिवाय, सर्वांना दिसणारी अशी इतर सर्व रूपे येथूनच निर्माण होतात.

त्यामुळे माझ्या ह्या मूळ स्वरूपाला कोणतीही मर्यादा नाही, सुरवातही नाही व शेवटही नाही. हे केवळ ज्ञानतेजाचेच बनलेले आहे आणि सर्व विश्व म्हणजे ह्याचाच आविष्कार आहे.

तुझ्यावर प्रसन्न होऊन, यापूर्वी कोणीही कधीही न ऐकलेले अथवा न पाहिलेले असे हे रूप मी तुला दाखविले. आजपर्यंत असे कधीही झालेले नाही. माझ्या योगशक्तीचा प्रभाव आणि दिव्यदृष्टीची प्राप्ती, ह्या दोनही गोष्टी एकत्र आल्यामुळेच तुला ते पाहणे शक्य झाले. अन्यथा हे दर्शन, इतर कोणत्याही साधनांनी, घडणे शक्य नाही. त्या मागचे कारण तू नीट समजून घे.

हा मनुष्यलोक म्हणजेच मृत्युलोक सोडून इतर सर्व लोक हे प्रामुख्याने कर्मफळ भोगण्याचीच ठिकाणे आहेत.

त्यामुळे इतर कोणत्याही लोकामधे ज्याप्रमाणे मुक्ती मिळू शकत नाही, त्याचप्रमाणे असे दर्शन होणेही शक्य नाही.

तसेच ह्या मानवयोनीमधेही, वेदांचे अध्ययन, विविध यज्ञ, स्वाध्याय, विविध प्रकारचे दान, उग्र तप, विविध कर्मे, इत्यादींच्यापैकी कोणत्याही मार्गाचे अवलंबन केले तरीही असे दर्शन घडणे शक्य नाही. केवळ तुलाच तसे दर्शन घडले आहे.

म्हणून तू स्वत:ला अत्यंत सुदैवी समज. माझ्या ह्या विश्वरूपाची भीती बाळगू नकोस आणि त्याच्या शिवाय दुसरे काहीही अधिक चांगले आहे असे मानू नकोस. सदैव ह्या विश्वरूपाच्या ठिकाणीच एकाग्र हो. त्याचेच मनन कर. चिंतन कर.

अंत:करणाने तसे करीत असताना, जर आवश्यकता भासत असेल तर आपल्या बाह्यमनाने, माझ्या चतुर्भुज अथवा द्विभुज अशा सगुणमूर्तीचा उपभोग घे. तिचे दर्शन घेऊन, भजन, पूजन, यजन, याजन, मनन, चिंतन करीत जा.

**परंतु तुझ्या श्रद्धेला ह्या स्वरूपापासून दुसरीकडे कोठेही जाऊ देऊ नकोस.**

ह्या रूपाविषयी वाटणाऱ्या भयाचा त्याग कर आणि ह्या रूपाचे ठिकाणीच अनन्य भक्ती बाळग. अभंग अशी श्रद्धा ठेव.

माझे तुला हेच सांगणे आहे. आता तुला माझे पूर्वीचे रूप पहायची इच्छा झाली आहे.

म्हणून प्रथम भयरहित हो आणि अतिशय भक्तीने व प्रेमाने माझे चतुर्भुज रूप पहा.

**संजय उवाच :**

**इत्यर्जुनम् वासुदेवस्तथोक्त्वा स्वकम् रूपम् दर्शयामास भूय: ।**
**आश्वासयामास च भीतमेनम् भूत्वा पुन: सौम्यवपुर्महात्मा ।। ५० ।।**

असे भाषण करून वासुदेवांनी अर्जुनाला पुन्हा आपले पूर्वीचे स्वरूप दाखवले आणि तो भ्याला आहे असे पाहून पुन्हा सौम्य रूप धारण करून त्या महात्म्याने अर्जुनाला धीर दिला.
येथे संजय राजा धृतराष्ट्राला काय सांगतो आहे ते नीट समजून घ्या. तो म्हणतो आहे की, हे महाराजा ऽऽ, इतके बोलून झाल्यावर मग
**' वासुदेवांनी अर्जुनाला पुन्हा आपले पूर्वीचे चतुर्भुज रूप दाखविले.'**
आणि तरीही तो भ्यालेलाच आहे असे पाहून त्यानंतर —
**' पुन्हा सौम्यरूप धारण करून त्या महात्म्याने अर्जुनाला धीर दिला.'**
म्हणजे त्याला चतुर्भुज विष्णुरूप हे देखील कृष्णरूपापेक्षा उग्रच वाटले आहे. असो.
अर्जुन समोरच पहात होता. समोर दिसत असलेला देखावा न दिसावा म्हणून त्याने आपले डोळे मिटून घेतले. पण त्याचा काही उपयोगच नव्हता. मृत्यूचे तांडव चाललेलेच होते.
हळूहळू ते दृष्य विरळ व्हायला लागले आणि सर्वत्र प्रखर तेज जाणवायला लागले. त्याने डोळे उघडून समोर पाहिले.
तेथे त्याला, ' मस्तकावर मुकुट धारण केलेल्या आणि हातांमधे शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण केलेल्या ' भगवान श्रीविष्णूंचे दर्शन झाले. त्याने त्या तेजस्वी अशा श्रीमूर्तीला मनोभावे नमस्कार केला.
परंतु तिचे प्रखर तेज पाहणे शक्य न झाल्यामुळे, त्याने आपली दृष्टी दुसरीकडे वळवली.
त्याच्या समोरचा सर्व देखावा हळूहळू विरळ होऊ लागला आणि सर्व बाजूंना धुके दाटून येत असल्यासारखे जाणवायला लागले. वर, खाली, मागे, पुढे, आजूबाजूला सगळीकडे दाट धुके दिसायला लागले. एकाएकी ते धुके आपल्या भोवती फिरायला लागले आहे असे वाटायला लागले. ती गती वाढू लागली. आता आपल्याला भोवळ येईल की काय असे वाटून त्याने दोन्ही डोळे घट्ट मिटून घेतले. काही वेळाने ते फिरणे थांबल्याची स्पष्ट जाणीव झाल्यावर त्याने हळूहळू डोळे उघडले.
समोरचा सर्व देखावा नाहीसा झाला होता. त्याला आपल्या शरीराची, मनाची आणि बुद्धीची सर्व जाणीव होऊ लागली.
रणभूमी तशीच होती! युद्धासाठी सज्ज झालेले सर्व सैन्य तसेच उभे होते! त्याचा रथ ही तसाच उभा होता! आणि —
समोर प्रिय श्रीकृष्णही हसत उभा होता! त्याने आपल्या दोन्ही हातांमध्ये श्रीकृष्णाचा हात घट्ट धरला आणि त्यावर मस्तक टेकले.
हळूहळू त्याच्या अंगाचा कंप थांबला. चित्तवृत्ती सावध आणि सक्षम झाल्या.
त्याच्या जिवात जीव आला. आपण जिवंत असल्याची खात्री पटली.
**अर्जुन उवाच :**
**दृष्ट्वेदम् मानुषम् रूपम् तव सौम्यञ् जनार्दन ।**
**इदानिमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिम् गतः ॥ ५१ ॥**
हे जनार्दना ! तुमचे हे सौम्य व मनुष्यदेहधारी रूप पाहून, आता मन ठिकाणावर येऊन मी पूर्ववत सावध झालो आहे.
अतिशय आनंदाने श्रीकृष्णाकडे पहात अर्जुन म्हणाला,
' हे जनार्दना ऽऽ! तुमचे हे नेहमीचे सौम्य रूप पाहिल्यावर आता माझे मन शांत झाले आहे. ठिकाणावर आले आहे. मी पूर्ववत सावध झालो आहे. आपण मला दाखविलेल्या त्या विश्वरूपाच्या सागरामध्ये मी गटांगळ्या खात होतो ऽऽ!
माझी सर्व इंद्रिये मृतप्राय झाली होती ऽऽ! माझी वाचा बंद पडत आली होती ऽऽ! माझ्या बुद्धीला ज्ञानाचा विसर पडला होता ऽऽ! परंतू आता तुमच्या कृपेने आणि तुमच्या दर्शनाने मी किनाऱ्याला लागलो आहे. माझा जगण्याविषयीचा संशय नाहीसा झाला आहे.'
**श्रीभगवानुवाच :**
**सुदुर्दर्शमिदम् रूपम् दृष्टवानसि यन्मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यन् दर्शनकाङ्क्षिणः ॥ ५२ ॥**
**नाहम् वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।**
**शक्य एवंविधो द्रष्टुम् दृष्टवानसि माम् यथा ॥ ५३ ॥**
**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवम्विधोऽर्जुन ।**
**ज्ञातुम् द्रष्टुञ् च तत्वेन प्रवेष्टुञ् च परन्तप ॥ ५४ ॥**
**मत्कर्मकृन्मत्परमः मद्भक्तः सङ्गवर्जितः ।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥**
माझे जे हे रूप तू पाहिलेस, ते पाहण्यास मिळणे फार कठीण आहे. देवसुद्धा हे रूप पाहण्याची नेहमी इच्छा करीत असतात.
तू जसे मला पाहिलेस तसे वेदांनी, तपाने, दानाने किंवा यज्ञानेही कोणी मला पाहणे शक्य नाही.

हे अर्जुना ! केवळ अनन्य भक्तीनेच, ह्याप्रमाणे माझे ज्ञान होणे, मला पाहणे, आणि हे परंतपा ! माझ्याठायी तत्त्वाने प्रवेश करणे शक्य आहे. सर्व कर्मे माझी म्हणजे परमेश्वराची होत ह्या बुद्धीने कर्म करणारा, मत्परायण, संगविरहीत आणि सर्व भूतांचे ठायी निर्वैर असा जो माझा भक्त, तो मलाच येऊन मिळतो.

श्रीकृष्णांनी अत्यंत स्नेहपूर्वक दृष्टीने त्याच्याकडे पाहिले आणि निरतिशय प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरविला.

अर्जुन त्यांच्याकडेच पाहात होता. त्याच्या मुखावाटे शब्द येतच नव्हते. त्याची ती नि:शब्द अशी अवस्था पाहून भगवान स्वत:च बोलायला लागले. त्याची समजूत काढायला लागले.

' अर्जुना ऽऽ, मी आपल्या योगशक्तीच्या सामर्थ्याने तुला जे विराट असे विश्वरूप आणि चतुर्भुज रूप दाखविले, ते या अगोदर तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही पाहिलेले नव्हते. विश्वरूपाची तर गोष्टच सोडून दे, पण माझे चतुर्भुज रूपही पहायला मिळणे अतिशय दुर्लभ आहे. सर्व देव देवताही त्याच्या दर्शनाची इच्छा करीत असतात. वेदाध्ययन, तप, दान, यज्ञयाग इत्यादी प्रकारच्या कोणत्याही साधनेने ते शक्य नाही.'

अर्जुन म्हणाला, ' हे कृष्णा, जर अशा कोणत्याही मार्गाने तुमचे दर्शन होणे शक्य नसेल, तर मग त्यासाठी एखादा मार्ग आहे की नाही? दुसऱ्या कोणत्या उपायाने, तुमच्या चतुर्भुज रूपाचे दर्शन होऊ शकेल?'

बघा! भगवंताच्या पाहण्याने आणि स्पर्शाने काय जादू केली आहे. अर्जुन नॉर्मल झाला आहे. त्याची भीती निघून गेली आहे.

असे कशावरून? अहो ऽऽ, तो नेहमीसारखा प्रश्न विचारायला लागला आहे नाही का?

त्याचा अर्थ तोच आहे. गुरुजीही नेहमीप्रमाणे त्याच्या प्रश्नाला उत्तर द्यायला लागले आहेत.

अर्जुना ऽऽ, त्यासाठी एकच मार्ग आहे. एकमेव मार्ग आहे.

' अनन्य भावाने सदैव माझी भक्ती करणे. सतत माझेच चिंतन करणे. मनन करणे. पूजन करणे. आपले प्रत्येक कर्म म्हणजे माझी पूजा करण्यासारखेच आहे असे समजून ते मलाच अर्पण करणे.' हाच तो मार्ग आहे.

त्या एकमेव मार्गाने, मला तत्त्वत: जाणणे, प्रत्यक्ष पाहणे आणि माझ्याशी एकरूप होणे शक्य आहे.' शेवटच्या श्लोकामधे

**' अनन्य भक्ती म्हणजे काय? '** आणि **' अनन्य भक्त कोणाला म्हणायचे? '** त्याविषयी सांगितलेले आहे.

**मत्कर्मकृत्** — स्वार्थ, आसक्ति आणि ममता सोडून, सर्व काही परमेश्वराचेच आहे आणि मी केवळ निमित्तमात्र आहे असे समजून, फळाची आशा न बाळगता, निष्काम बुद्धीने आपले कर्तव्यकर्म पार पाडणारा आणि ते परमेश्वरालाच अर्पण करणारा.

**मत्परम:** — परमेश्वराला आपले सर्वस्व मानणारा. त्यालाच परम आश्रयस्थान, परम गती, सर्वोत्तम, सर्वांचा आधार, सर्वशक्तिमान, शरण जाण्यास योग्य असा एकमेव, असा मानून त्याच्यावर संपूर्णपणे विश्वास ठेवणारा.

**मद्भक्त:** — परमेश्वराशी एकरूप होऊन, सदैव त्याच्या नाम, रूप, गुण, प्रभाव आणि लीला इत्यादींचे श्रवण, कीर्तन, मनन, चिंतन इत्यादी करीत राहणारा. तसे केल्याशिवाय क्षणभरही चैन न पडणारा.

**सङ्गवर्जित:** — आपले शरीर, पत्नी, पुत्र, कन्या, कुटुंब, घर, संपत्ती, प्रतिष्ठा, इत्यादी सर्व गोष्टींच्या विषयी थोडीही आसक्ती नसणारा, केवळ परमेश्वराच्या विषयीच आसक्ती बाळगून त्याच्यावरच प्रेम करणारा.

**निर्वैर: सर्वभूतेषु** — सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी एका परमेश्वरालाच पाहणारा आणि त्यामुळेच कोणाच्याही बाबतीत किंचितही वैरभाव न बाळगणारा.

' अर्जुना, असा जो पुरुष असतो, तो मलाच येऊन मिळतो. मलाच प्राप्त करून घेतो.'

**येथे अकरावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

नवव्या अध्यायामधे परमेश्वराचे महात्म्य सागून झाले.

दहाव्या अध्यायामधे अर्जुनाने विचारल्यामुळे, परमेश्वराच्या अगणित विभूतींच्यापैकी मुख्य मुख्य अशा विभूति सांगून झाल्या.

आणि ह्या अकराव्या अध्यायामधे अर्जुनाचे कुतुहल शमविण्यासाठी परमेश्वराचे मूळचे स्वरूप म्हणजेच विश्वरूप दाखवून झाले.

ह्या अध्यायानंतरचा अर्जुन हा, ह्या अध्यायापूर्वीच्या अर्जुनाहून फारच वेगळा आहे.

त्याने जे काही पाहिले, त्यामुळे तो अंतर्बाह्य बदलून गेला आहे. आता त्याच्या मनामधे विषाद उरलेला नाही. दु:ख उरलेले नाही. कोणताही गोंधळ उरलेला नाही. स्वजनांच्या विषयीची अवाजवी आसक्ती उरलेली नाही.

' श्रीकृष्ण भगवान् जे करायला सांगतील तेच करायचे.' असा निश्चय झालेला आहे.

ह्याविषयी विचार करताना कधी कधी मला असे वाटते की,

' ह्या अध्यायानंतर जर श्रीकृष्णांनी अर्जुनाला इतर काहीही न सांगता, सरळ अठराव्या अध्यायातल्या बहात्तराव्या श्लोकातला प्रश्न विचारला असता, तरीही अर्जुनाने त्र्याहात्तराव्या श्लोकातलेच उत्तर दिले असते आणि —

परत रथावर चढून, आपल्या जागी उभा राहून, हातामधे आपले धनुष्य घेऊन, प्रत्यंचा ताणून टणत्कार केला असता आणि — युद्धाला सुरवात करण्याच्या हेतूने आपला शंख फुंकून गर्जना केली असती.'
मग कदाचित् पुढचे सात अध्याय सांगावेच लागले नसते.
गीतेचे मूळ स्वरूप व अध्यायांची संख्या किती होती? हा एक मोठा गहन आणि वादाचा प्रश्न आहे.
आपण ह्या गीता प्रवचनांचा समारोप करताना त्याविषयी अधिक चर्चा करूया. असो.
अजूनही अर्जुनाचे विचारचक्र चालूच आहे बरं का!
आता पुढील अध्यायामधे अर्जुन कोणता प्रश्न विचारतो आणि श्रीकृष्ण त्याचे काय उत्तर देतो ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## <u>अध्याय बारावा</u>

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या बाराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
मागील अध्यायामधे, अर्जुनाच्या मनामधे कुतुहल निर्माण झाल्यामुळे त्याने श्रीकृष्णाला **' आपले मूळ स्वरूप '** दाखवायला सांगितले.
श्रीकृष्णानेही, त्यावेळची अपवादात्मक व असाधारण अशी परिस्थिती लक्षात घेऊन, त्याचे मागणे मान्य केले.
**( Exceptional & Unusual Situation )**, अगोदर अर्जुनाला, ते स्वरूप पाहण्यासाठी आवश्यक असलेली दिव्यदृष्टी दिली आणि नंतर आपले मूळ स्वरूप म्हणजेच विराटस्वरूप अथवा **विश्वरूप** दाखविले.
त्या दर्शनाचा अर्जुनावर कसा कसा परिणाम होत गेला ते ही आपण पाहिले. तो अगोदर आश्चर्याने थक्क झाला. नंतर आश्चर्याच्या बरोबरीने आनंदितही झाला. त्यानंतर आश्चर्य आणि आनंदाची भावना नाहीशी होऊन तो भयभीत झाला. पार गोंधळून गेला.
स्वत:च्या नगण्य अशा अस्तित्वाची त्याला स्पष्टपणे जाणीव झाली.
तो इतका घाबरला की त्याच्या मनामधे स्वत:च्या जीविताविषयीही शंका उत्पन्न झाली. त्याला ' आपण **विश्वरूप दर्शनाचे** मागणे मागण्यात फार मोठी चूक केली आहे ' असे वाटायला लागले. भीतीने तो थरथर कापायला लागला.
मनाच्या त्या दिङ्मूढ अवस्थेमधे त्याने प्रश्न विचारला.
त्याच्या प्रश्नाचे आश्वासक असे उत्तर मिळाल्यावर, आनंद आणि दु:ख ह्या दोन्ही भावनांचा एकाच वेळी उद्रेक झाल्यामुळे, तो मुक्तपणे रडायला लागला. त्यानंतर, मूळचाच सात्त्विक वृत्तीचा असलेल्या त्याचे, अष्टसात्त्विक भाव जागे झाले.
पराकोटीचा भक्तिभाव जागा झाला आणि तो परमेश्वराची स्तुती करायला लागला. नकळत घडून आलेल्या अपराधांच्या स्मरणाने, परमेश्वराची क्षमा मागायला लागला. इतके करून झाल्यावरही, त्याला त्या विश्वरूपाचे दर्शन नकोसे वाटायला लागले.
त्यापेक्षा आपल्या प्रिय मित्राचे नेहमीचेच दर्शन फार चांगले आहे असे वाटायला लागले.
मग त्याने परमेश्वराला, परत ' तेच रूप धारण करण्याची ' विनंती केली. त्याच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.
त्याला अत्यंत प्रिय असलेल्या श्रीकृष्णाच्या नेहमीच्या द्विभुज रूपाचे दर्शन झाले. त्याच्या जिवात जीव आला. तो हळूहळू सावरला.
श्रीकृष्णाच्या अद्वितीय अशा सामर्थ्याविषयी त्याची खात्री पटली.
नंतर श्रीकृष्णाने त्याला विश्वरूपाचे माहात्म्य आणि महत्त्व स्पष्ट करून सांगितले.
' माझ्या ह्या विश्वरूपाची भीती बाळगू नकोस आणि त्याच्या शिवाय दुसरे काहीही अधिक चांगले आहे असे मानू नकोस. सदैव ह्या विश्वरूपाच्या ठिकाणीच एकाग्र हो. त्याचेच स्मरण कर. मनन कर. चिंतन कर. पूजन कर. त्यानंतरही, अंत:करणाने तसे करीत असताना, जर आवश्यकता भासत असेल तर आपल्या बाह्यमनाने, माझ्या चतुर्भुज अथवा द्विभुज अशा सगुणमूर्तीचा उपभोग घे. तिचे दर्शन घेऊन, भजन, पूजन, यजन, याजन, मनन, चिंतन करीत जा. परंतु तुझ्या श्रद्धेला ह्या विराटस्वरूपापासून दुसरीकडे कोठेही जाऊ देऊ नकोस. ह्या विराट रूपाविषयी वाटणाऱ्या भयाचा त्याग कर आणि ह्याचे ठिकाणीच अनन्य भक्ती बाळग.' असे सांगितले. असो.
**सहाव्या** अध्यायामधे मनाला आवर घालून, **एकाग्रता** प्राप्त करून घेण्याचा उपाय सांगितला.
' निष्काम कर्मयोगाचे यथायोग्य आचरण करण्यासाठी ' साधन म्हणून ध्यानयोग सांगितला. ( निर्गुण उपासना )
**सातव्या** अध्यायामधे मनाची ती एकाग्रता, **परमेश्वराकडे** कशी **वळवायची** ते सांगितले. ( सगुण उपासना )
तसे करून भगवंताने गीतोपदेशरूपी गंगेचा प्रवाह, भक्तियोगाकडे वळवायला सुरवात केली.
**आठव्या** अध्यायामधे, परमेश्वराकडे वळविलेल्या एकाग्रतेमधे **स्थैर्य** कसे आणायचे, **सातत्य** कसे राखायचे ते सांगितले.
( निर्गुण उपासना )
**नवव्या** अध्यायामधे, परमेश्वराची भक्ती संपूर्ण **समर्पणाच्या भावनेने** कशी करायची ते सांगितले. ( सगुण उपासना )
**दहाव्या** अध्यायामधे, परमेश्वराची विविध रूपे कशी जाणायची, पायरी पायरीने कशी समजून घ्यायची, **' सर्व विश्वामधे तोच एक भरून राहिलेला आहे,'** हे सत्य कसे पचनी पाडायचे ते सांगितले. ( सगुण उपासना )
**अकराव्या** अध्यायामधे, **' एकाच परमेश्वरामधे सर्व विश्व सामावलेले आहे.'** ह्याचा प्रत्यक्ष अनुभव दिला. विश्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शन घडवून, त्या विराट रूपाचे ठिकाणीच अनन्य भक्ती बाळगावी, श्रद्धा ठेवावी असे सांगितले. ( निर्गुण उपासना )
त्या अद्वितीय, अलौकिक, अमानवीय आणि सर्वसमावेशक अशा विराटरूपाच्या अक्राळ विक्राळ दर्शनाने भयग्रस्त झालेला अर्जुन, आता पूर्णपणे सावरला आहे. आता त्याच्या विचारांचे चक्र परत फिरायला लागले आहे.

' कोणालाही कोणत्याही मार्गाने, **निर्गुण - निराकार - अव्यक्त** अशा परमेश्वराच्या विश्वरूपाचे दर्शन घडणे शक्य नाही. मी अत्यंत सुदैवी असल्यामुळे, केवळ मलाच ते दर्शन घडले आहे. मगाशी त्याने स्वतःच तसे सांगितले आहे. त्याच्या **चतुर्भुज रूपाचे** दर्शनही अत्यंत दुर्लभ आहे असेही तो म्हणाला. एक अनन्य भक्तीचा मार्ग सोडून इतर कोणत्याही मार्गाने, ते दर्शन होणेही शक्य नाही. केवळ भक्तिमार्गानेच ' परमेश्वराला तत्त्वतः जाणणे, प्रत्यक्ष पाहणे आणि त्याच्याशी एकरूप होणे शक्य आहे,' असे श्रीकृष्ण स्वतःच सांगतो आहे. तो स्वतःच तसे सांगतो आहे म्हणजे ते सत्यच आहे ह्यामधे शंका नाही.

पण ह्याचा अर्थ त्याचे भक्तही दोन प्रकारचे असणार.

त्याच्या **निर्गुण - निराकार - अव्यक्त** अशा स्वरूपाच्या ठिकाणी अनन्य श्रद्धा बाळगणारा, ज्याचे दर्शन घडणे कधीही शक्य नाही अशा स्वरूपावरच प्रेम करणारा, एकाग्र होऊन सतत त्या रूपाचेच चिंतन करणारा, त्याचीच भक्ती करणारा, त्याचेच मानसपूजन करणारा, असा एक प्रकारचा भक्त आणि ——

त्याच्या निर्गुण निराकार अशा स्वरूपाविषयी कोणतेही ज्ञान नसलेला, त्याविषयी काहीही माहिती नसलेला, किंबहुना कल्पनाही नसलेला, त्याचा विचारही करू न शकणारा असा, परमेश्वराच्या **सगुण - साकार - व्यक्त** अशा रूपाच्या ठिकाणी श्रद्धा बाळगणारा, त्यावरच प्रेम करणारा, त्याचेच चिंतन करणारा, त्याचीच अनन्य भक्ती आणि पूजन करणारा असा, दुसऱ्या प्रकारचा भक्त.

दोघेही त्याचेच भक्त आहेत. पण मग त्या दोघांपैकी महत्त्वाचा कोण?

त्याचा अधिक आवडता भक्त कोणता? त्याला कोणता भक्त प्रिय आहे?'

ह्या अगोदर सातव्या अध्यायामधे, भक्तांचे चार प्रकार सांगण्यात आलेले आहेत.

**' आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी** आणि **ज्ञानी '** हे ते चार प्रकार होत. ह्यामधील पहिले तीन भक्त हे सगुणभक्तच असतात.

चवथ्या प्रकारचा भक्त हा सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही प्रकारचा असू शकतो.

' असा भक्त अत्यंत दुर्मिळ असतो आणि हाच भक्त विशेष योग्यतेचा असून तो परमेश्वराला अधिक प्रिय असतो.' असेही सांगण्यात आले आहे. हे विधान **' निष्काम कर्मयोगाच्या '** संदर्भातच केलेले आहे.

ही गोष्ट आपण सर्वांनी लक्षात ठेवावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

ह्या अगोदर **कर्मा**च्या बाबतीतही अशीच परिस्थिती झालेली होती. रात्रंदिवस केवळ कर्तव्य म्हणून, फलाची अपेक्षा न बाळगता, सतत कर्म करीत असूनही, कोणतेही कर्म करीत नसलेला असा एक **कर्मयोगी** आणि —

कधीही कोणतेही कर्म करीत नसूनही, सदैव सर्व कर्मे, सतत करीत राहणारा असा दुसरा **ज्ञानयोगी**.

दोघेही योगीच आहेत. त्या दोघांचे अंतिम ध्येय एकच आहे. जर ह्या दोघांची तुलना केली तर ह्या दोघांच्यामधे महत्त्वाचा कोण? मुख्य म्हणजे, ' कर्मयोग आणि ज्ञानयोग ह्या दोन मार्गांच्यापैकी, आपल्यासाठी निश्चितपणे कल्याणकारक असा मार्ग कोणता?' असा प्रश्न अर्जुनाला पडला होता. पाचव्या अध्यायामधे त्याने हाच प्रश्न विचारला होता. प्रश्नाचे उत्तर देताना श्रीकृष्णाने,

' दोन्ही मार्ग उत्तमच असून त्यांचे अंतिम ध्येय एकच आहे. परंतु, **ज्ञानयोग** हा आचरण करण्यासाठी कठीण असून त्याच्या तुलनेने, **कर्मयोग** हा आचरण करण्यासाठी सुलभ आहे, सोपा आहे म्हणून श्रेष्ठ आहे.' असे स्पष्टपणे सांगितले आहे.

आताही तसाच प्रश्न पडलेला आहे. पण तो **भक्ती**च्या संदर्भात पडलेला आहे.

ह्या अगोदर दोन, पाच, सहा आणि आठ ह्या चार अध्यायांमधे अनेक वेळा निर्गुण उपासनेचे महत्त्व सांगितलेले आहे.

तसेच सात, नऊ आणि दहा ह्या तीन अध्यायांमधे अनेक वेळा सगुण उपासनेचे महत्त्व विशेष करून सांगितलेले आहे.

म्हणजे दोनही प्रकारच्या उपासना सारख्याच महत्त्वाच्या आहेत आणि त्यांचे अंतिम लक्ष्य **मोक्ष** हेच आहे.

पण प्रश्न आहे तो सुलभतेचा आणि सहजतेचा. ' कोणाही सर्वसामान्य माणसाला जर परमेश्वराची भक्ती करायची असेल तर त्याला सहजपणे आचरता येऊ शकेल असा मार्ग कोणता?' हा खरा प्रश्न आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे, **निर्गुण भक्तीयोग** आणि **सगुण भक्तीयोग** ह्या दोन मार्गांपैकी उत्तम मार्ग कोणता? आणि —

अशा दोन प्रकारच्या भक्तांमधे श्रेष्ठ भक्त कोणता?

बाराव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे. तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की —

**अर्जुन उवाच :**

**एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।**

**ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ।। १ ।।**

याप्रमाणे नेहमी योगयुक्त होऊन जे भक्त तुमची आणि जे भक्त ब्रह्माची उपासना करतात, त्यापैकी उत्तम योगवेत्ते कोण?

ह्या श्लोकामधे **योग** ह्या शब्दाचा अर्थ **भक्तियोग** असाच आहे.
तसेच **उपासना** ह्या शब्दाचा अर्थ **' भक्तिमार्गाला अनुसरून केलेली साधना,'** असा आहे.
कारण साधनेचा मार्ग बदलला म्हणजे उपासनेचे स्वरूपही बदलते.
श्रीकृष्णा ऽऽ!, मानवी डोळ्यांना सहजपणे सतत दिसू शकेल, अशा तुझ्या सगुण आणि साकार स्वरूपाची, प्रत्यक्ष वंदन, पूजन, भजन करून, ते साजिरे-गोजिरे असे रूप मनामधे साठवीत, सतत त्याचीच उपासना करीत राहणारे असे एका प्रकारचे भक्त आणि --- मानवी डोळ्यांना कधीही दिसू शकणार नाही, अशा निर्गुण आणि निराकार स्वरूपाची मनामधे कल्पना करून, सतत त्याचीच उपासना करीत राहणारे असे दुसऱ्या प्रकारचे भक्त, ह्या दोघांच्यामधे उत्तम भक्त कोणता?
येथे अर्जुनाने थेट प्रश्न विचारला आहे. पाचव्या अध्यायामधे देखील अर्जुनाने,
' कर्मसंन्यास म्हणजेच सांख्ययोग आणि कर्मयोग ह्या दोन मार्गांपैकी माझ्यासाठी उत्तम मार्ग कोणता?' असा थेट प्रश्न विचारला होता.
कारण त्या अगोदर वेळोवेळी, सांख्ययोग आणि कर्मयोग ह्या दोनही मार्गांचे महत्त्व सांगितले गेले होते.
त्यावेळी अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे अत्यंत स्पष्ट असे उत्तर मिळाले होते.
आताही हा प्रश्न विचारण्यामागे तसेच कारण आहे. ह्या अगोदर वेळोवेळी, निर्गुण उपासना आणि सगुण उपासना ह्या दोनही मार्गांचे महत्त्व सांगितले गेले आहे. आता श्रीकृष्ण भगवान त्याच्या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

**श्रीभगवानुवाच :**
**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥**

माझ्या ठिकाणी मन ठेऊन, नेहमी युक्तचित्त होऊन, परम श्रद्धेने जे माझी उपासना करतात ते माझ्या मते सर्वात उत्तम योगी होत.
हा श्लोक वाचताना, मला नेहमीच, ही **' आदर्श भक्तीची '** व्याख्या आहे असे वाटते.
त्याचप्रमाणे ही **' आदर्श भक्ताची '** व्याख्या आहे, असेही वाटते.
येथे सांगितलेली भक्ती ही **सगुणभक्ती** आहे. परमेश्वराच्या, सहजपणे दिसू शकणाऱ्या अशा, दृष्य स्वरूपाची भक्ती आहे.
**मयि** — माझ्या ठिकाणी. **आवेश्य मनः** — मनाला एकाग्र करून.
**नित्ययुक्ताः** — सतत माझ्या ध्यानाने युक्त होऊन. ( सतत माझेच ध्यान करून.)
**श्रद्धया परया उपेताः** — अतिशय श्रेष्ठ अशा श्रद्धेने युक्त होऊन.
**ये** — जे. ( भक्तजन ) **माम्** — मला. ( परमेश्वराच्या सगुणरूपाला ) **उपासते** — भजतात.
' माझ्या ठिकाणी मनाला एकाग्र करून, सतत माझ्याच ध्यानात राहून, अतिशय श्रेष्ठ अशा श्रद्धेने युक्त होऊन, जे मला भजतात, ते सर्वात उत्तम भक्त होत.'
**शेवटी भक्ती म्हणजे तरी काय आहे हो?** ' भक्ती कोणावर आहे?' हा विषय थोडावेळ बाजूला ठेवूया. कारण भक्तीचेही **' मातृभक्ती, पितृभक्ती, गुरुभक्ती, समाजभक्ती, देशभक्ती, राष्ट्रभक्ती '** असे अनेक प्रकार सांगितलेले आहेत आणि आपापल्या परीने ते श्रेष्ठच आहेत.
तसेच भक्तीची ' **श्रद्धा** ( आदर ), **प्रीती** ( प्रेम ), **विरह** ( अभावाची जाणीव ), **तदियता** ( लाभ होणे ), **सरूपता** ( समानता ) व **एकरूपता** ( एकरूप होणे ) ' अशी विविध रूपे सांगितलेली आहेत.
दृष्य स्वरूप कोणतेही असले तरीही अंतिमतः त्याचे परिवर्तन निखळ भक्तीमधे होणेच अपेक्षित असते.
असे असले तरीही मूळ प्रश्न शिल्लक राहतोच. भक्ती कशाला म्हणायचे? भक्त कोणाला म्हणायचे?
काय केले असता अथवा घडले असता माणसाकडून भक्ती घडून येते?
परमेश्वराचा सर्वश्रेष्ठ भक्त म्हणून सार्वत्रिक मान्यता असलेल्या **देवर्षी नारदांनी**, भक्तिसूत्रामधे भक्तीचे विवरण करताना, स्पष्टपणे सांगून ठेवलेले आहे की,

**' सा तु अस्मिन् परमप्रेमरूपा ।'**

भगवंताविषयी गाढ प्रेम, पराकोटीचे प्रेम, निरपेक्ष प्रेम, अनन्य प्रेम, म्हणजे भक्ती.
एकदा अशा भक्तीचा लाभ झाला म्हणजे माणूस कायमचा तृप्त होतो.
मग तो कोणाचाही तिरस्कार करीत नाही. सर्वांवर सदैव प्रेमच करतो.

**' सा न कामयमाना निरोधरूपत्वात् ।'**

ह्या दिव्य प्रेमाच्या योगे पार्थीव अशा, उपभोग्य अशा वस्तूंचा लाभ करून घेता येणे शक्य नाही.
कारण भोगवासना शिल्लक असेपर्यंत मनामधे असले अपार्थिव प्रेम निर्माण होणे शक्य नाही. ते अशक्य आहे.

**<u>सा तु कर्मज्ञानयोगेभ्य: अपि अधिकतरा ।</u>**

**<u>स्वयंफलरूपता इति ब्रह्मकुमारा: ।</u>**

भक्ती ही कर्मयोग, ज्ञानयोग आणि राजयोग ह्या तिघांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण ह्या तिघांच्या योगाने एखादे फळ प्राप्त करून घ्यायचे असते. **( मोक्षप्राप्ती )**
याउलट भक्ती ही स्वत:च फलस्वरूप आहे. भक्तीचे साधनही तीच आहे आणि भक्तीचे साध्यही तीच आहे.
केवळ भक्तीसाठीच भक्ती! निष्काम अशी भक्ती! निरपेक्ष अशी भक्ती! अनन्यभावे घडलेली भक्ती! एकरूप होऊन घडलेली भक्ती! अशी भक्ती, असे प्रेम हे केवळ परमेश्वराचे विषयीच शक्य आहे.
कारण परमेश्वर हा अनादि - अनंत - अजर - अमर - अचल - अच्युत असा आहे!
त्याच्यासारखा दुसरा कोणीही नाही! तो एकमेव आहे! म्हणूनच सर्वश्रेष्ठ आहे!
**पार्थीव** म्हणजे जिला **<u>आदि</u>** म्हणजे सुरवात आणि **<u>अंत</u>** म्हणजे शेवट आहे अशी कोणतीही वस्तू. ह्यामधे आपण जे जे डोळयांनी प्रत्यक्ष पाहू शकतो, जगामधे वावरत असताना आणि आपले व्यवहार करीत असताना आपल्याला जे जे दिसते अथवा भासते ते ते सर्व काही येते. त्या सर्व गोष्टींना मर्यादा असल्यामुळे त्यांच्याविषयी वाटणारे प्रेम, स्नेह, आसक्ती आणि भक्ती मर्यादितच असणार, ते सर्वकाही मर्यादित कालावधीसाठीच असणार आणि त्यामधे सतत बदल होत राहणार हे नक्की. तसेच प्रत्येकाचा स्वभाव भिन्न असतो. त्यामुळे एका माणसाला अत्यंत आदरणीय व पूजनीय वाटणारी व्यक्ती, प्राणी, पक्षी अथवा मूर्ती, ही दुसऱ्या माणसाला कदाचित् अत्यंत तिरस्करणीय व निंदनीयही वाटू शकते.
पित्याचे आपल्या पुत्रावरील अथवा कन्येवरील प्रेम हे पार्थीव आहे. मातेचे आपल्या पुत्रावरील अथवा कन्येवरील प्रेम हे पार्थीव आहे.
भावाचे आपल्या भावावरील अथवा बहिणीवरील प्रेम हे पार्थीव आहे.
बहिणीचे आपल्या भावावरील अथवा बहिणीवरील प्रेम हे पार्थीव आहे.
प्रियकराचे आपल्या प्रेयसीवरील प्रेम हे पार्थीव आहे. प्रेयसीचे आपल्या प्रियकरावरील प्रेम हे पार्थीव आहे.
पतीचे आपल्या पत्नीवरील प्रेम हे पार्थीव आहे. पत्नीचे आपल्या पतीवरील प्रेम हे पार्थीव आहे.
गुरूचे आपल्या शिष्यावरील प्रेम हे पार्थीव आहे. शिष्याचे आपल्या गुरूवरील प्रेम हे पार्थीव आहे.
जिवलग मित्रांचे अथवा जिवलग मैत्रिणींचे परस्परांवरील प्रेम हे पार्थीव आहे.
कारण ह्या सर्वांना आदि आणि अंत आहे. सुरवात आणि शेवट आहे.
म्हणूनच त्यांच्यावरील प्रेमालाही सुरवात आणि शेवट आहे. त्याला मर्यादा आहे आणि त्यामधे बदलही आहे.
त्यांच्या विषयी आज वाटत असलेले प्रेम कालही वाटत होते असे सांगता येत नाही.
त्याचप्रमाणे आज वाटत असलेले प्रेम उद्याही वाटेलच ह्याची खात्री देता येत नाही.
कदाचित् वाटेलही अथवा कदाचित् वाटणारही नाही. त्यामधे कदाचित् वाढही होऊ शकेल अथवा कदाचित् ते कमीही होऊ शकेल.
आपल्या समाजाविषयी आणि आपल्या देशाविषयी वाटणारे प्रेम हे देखील पार्थीवच म्हणावे लागेल. कारण समाज अथवा देशालाही सुरवात आणि शेवट आहे. परंतु माणसाच्या आयुष्याच्या तुलनेत समाजाचे आणि देशाचे आयुष्य फार मोठे असते.
माणसांच्या अनेक पिढ्या येतात आणि जातात, तरीही समाज आणि देश अस्तित्वात असतात.
म्हणून त्याविषयी काही बोलणे योग्य ठरणार नाही.
**<u>राष्ट्र</u>** ही तर एक संकल्पना आहे. एक तीव्र अशी भावना आहे.
**<u>' राज्य अथवा देश हे शरीर आहे तर राष्ट्र हा त्या शरीराचा आत्मा आहे.'</u>**
म्हणूनच **राज्यभक्ती** अथवा **देशभक्ती** ही **सगुणभक्ती** आहे आणि **राष्ट्रभक्ती** ही **निर्गुणभक्ती** आहे असे मला वाटते.
**<u>राज्य</u>** अथवा **<u>देश</u>** प्रत्यक्षपणे अस्तित्वामधे असतो. तो दाखवताही येतो. त्याच्या भौगोलिक सीमा दाखविता येतात, मोजता येतात आणि तपासून पाहता येतात. तसेच त्या कालपरत्वे बदलत असतात. बदलता येतात. बदलू शकतात.
**<u>राष्ट्र</u>** ही धारणा आहे. **<u>राष्ट्रीयत्व</u>** ही मनोधारणा आहे. राष्ट्रीयत्वाला भौगोलिक सीमा नसतात. ते मोजमाप करून दाखविता येत नाही. त्याच्या सीमा ठरविता येत नाहीत. ते सदैव, त्या देशाच्या नागरिकांच्या मनामधे अस्तित्वात असते. कोटी कोटी प्रजाजनांच्या मनामधे चिरंजीव झालेले असते. **राज्य** असले अथवा नसले तरीही **राष्ट्र** हे असतेच. **राष्ट्रभावना** ही असतेच.
ती भावनाच देशाच्या उभारणीला, राज्याच्या उभारणीला कारण ठरते.

जोपर्यंत राष्ट्रभक्ती अस्तित्वात असते तोपर्यंत राज्याचे अथवा देशाचे पुनर्निमाण होऊ शकते.
ह्या विधानाला इतिहास साक्षी आहे. असे पहा की —
भगवान **<u>गौतम बुद्धाचा</u>** जन्मकाळ, इसवी सनापूर्वी ४०० वर्षे हा आहे. त्याने बौद्ध धर्माची स्थापना केली. सर्वत्र प्रसार केला.
त्यापूर्वीचे आणि त्याकाळचे सर्व राजे महाराजे युद्धशास्त्रामधे निपुण होते.
सम्राट चंद्रगुप्त मौर्य आणि त्याच्या नंतर त्याचा पुत्र सम्राट बिंदुसार ह्या दोघांनी संपूर्ण भारतवर्षाचे एकछत्री असे, अत्यंत बलवान असे, एकसंध असे स्वतंत्र राष्ट्र केले.
सम्राट चंद्रगुप्त मौर्य इसवी सनापूर्वी २९८ ह्या वर्षी वारला. सम्राट बिंदुसार इसवी सनापूर्वी २७३ ह्या वर्षी वारला.
त्यानंतर त्याचा पुत्र अशोक हा सम्राट झाला. हा आपल्या पूर्वायुष्यामधे त्याचे वडील आणि आजोबा ह्यांच्याप्रमाणेच अत्यंत शूर आणि सनातन वैदिक धर्माभिमानी होता. असे म्हणतात की, कलिंगच्या भीषण युद्धानंतर, पश्चात्ताप झालेल्या, अत्यंत दु:खी झालेल्या, सम्राट अशोकाने उत्तरायुष्यामधे बौद्ध धर्माचा स्वीकार केला. सम्राट अशोक इसवी सनापूर्वी २३२ ह्या वर्षी वारला.
त्याने आयुष्याची शेवटची पंचवीस वर्षे आपल्या साम्राज्यामधे बौद्धधर्माचा प्रसार केला.
वैदिक धर्माचारांना अपराध ठरविले. त्यासाठी अनेक कठोर कायदे केले.
इतरही राजांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करावा म्हणून प्रयत्न केले. त्यामुळे बऱ्याच राज्यांमधे बौद्ध धर्माचा प्रसार झाला.
त्यांच्याकडून **<u>अहिंसा</u>** ह्या तत्त्वाचा अवलंब केला जायला लागला.
म्हणजे त्या अगोदर हिंदुस्थानाला अहिंसा तत्त्वाची माहीत नव्हती अशातला भाग नाही.
परंतु त्या तत्वाचा वापर हा तारतम्याने, विचारपूर्वक केला जात होता.
ही अहिंसा मात्र अतिरेकी होती. अहिंसेचा अतिरेक होता. असो.
परिणामी सर्वत्र शांती नांदायला लागली. सुबत्ता तर आधीपासूनच होतीच. ह्या नंतरच्या काळामधे सर्व शास्त्रांची आणि कलांची फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. हिंदुस्थानाचे मानदंड म्हणता येतील अशा अनेक गोष्टींची निर्मिती झाली.
**<u>शिल्पकला, चित्रकला</u>** आणि **<u>वस्त्रकला</u>** ह्या तर सर्वोच्च पातळीला पोहोचल्या.
त्याच बरोबर क्षात्रवृत्तीचा लोप व्हायला सुरवात झाली. अहिंसेचा अतिरेक व्हायला सुरवात झाली. धर्मभोळेपणा वाढायला लागला.
राष्ट्राचे संरक्षण ह्या अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष व्हायला सुरवात झाली.
कोणी शत्रूच नव्हते तर सैन्य, शस्त्रे इत्यादी कशाला पाहिजे? परिणामी सर्व हिंदुस्थानाची क्षात्रवृत्ती, लढायची वृत्ती आणि युद्धकौशल्य पार लयास गेले. हिंदुस्थान हे अत्यंत पुढारलेले, विकसित, श्रीमंत आणि संपूर्णपणे स्वतंत्र असलेले परंतु, संरक्षण व्यवस्थेचा अभाव असलेले असे राष्ट्र झाले. भगवान गौतम बुद्धाच्या नंतरचा सुमारे हजार वर्षांचा काळ असा गेला. हे म्हणजे,
**‘ <u>उत्तम आटीव बासुंदीने भरलेले चांदीचे पात्र, झाकून न ठेवता, राखण करण्याची कोणतीही व्यवस्था न करता, उघड्यावरच ठेवून दिल्यासारखे</u> ’** झाले.
भगवान गौतम बुद्धाच्या नंतर चारशे वर्षांनी **<u>येशू ख्रिस्ताचा</u>** जन्म झाला. त्याने ख्रिश्चन धर्माची स्थापना केली.
येशू ख्रिस्ताचा जन्म म्हणजेच इसवी सनाची सुरवात. पुढील काही शतकांमधे ख्रिश्चन धर्माचा प्रसार सर्व युरोपभर झाला.
**<u>महम्मद पैगंबराचा</u>** जन्म इसवी सनाच्या सहाव्या शतकामधे झाला. ( इ. स. ५७० ) त्याने इस्लाम धर्माची स्थापना केली.
म्हणजेच, गौतम बुद्धाचा जन्म आणि महम्मद पैगंबराचा जन्म ह्यामधे सुमारे १,००० वर्षांचा प्रदीर्घ काळ गेलेला आहे.
महम्मद पैगंबराच्या मृत्यूनंतर ( इ. स. ६३२ ) सुमारे शंभर ते सव्वाशे वर्षे, इस्लाम धर्म अरबस्थानामधे स्थिर होण्यात गेली.
त्यानंतर त्यांनी <u>‘ आक्रमण करून दुसऱ्यांची भूमी पादाक्रांत करणे व जबरदस्तीने धर्मप्रसार करणे ’</u> सुरू केले.
ख्रिश्चन धर्माचा प्रसारही अशाच पद्धतीने केला गेला.
सर्व जगामधे **<u>सुवर्णभूमी</u>** म्हणून प्रसिद्ध असलेल्या ह्या हिंदुस्थानावर, साधारणपणे आठव्या शतकाच्या मध्यावर,
म्हणजेच इ. स. ७५० नंतर, पाप्यांची दृष्टी पडली.
चोरांना चोरी करण्यासाठी दाही दिशा मोकळ्याच असतात. जेथे हात मारता येऊ शकेल त्या प्रत्येक जागेवर ते जाणारच.
कारण त्यांच्याजवळ गमावण्यासारखे काहीच नसते. ती भीती इतरांनाच असते.
ज्यांच्याजवळ **<u>‘ गमावण्यासारखे काहीतरी असते ’</u>** त्यांनाच भीती असते.
हळूहळू हे सगळे चोर - लुटारू - दरोडेखोर, खैबर खिंडीच्या मार्गाने, आक्रमण करायला लागले आणि पुढे सतत आक्रमण करीतच राहिले. त्यांचा पहिला बळी ठरला तो म्हणजे **<u>गांधार देश.</u>** हा देश म्हणजेच सध्याचा **<u>अफगाणिस्तान!</u>**
महाभारतातल्या **शकुनी** मामाचे राज्य! **गांधारीचे** माहेर! **धृतराष्ट्राचे** सासर! आणि **दुर्योधनाचे** आजोळ!

ज्याप्रमाणे अजगर आपल्या भक्ष्याला हळूहळू गिळायला सुरवात करतो, त्याप्रमाणे आक्रमकांनी ह्या देशाला गिळायला सुरवात केली. त्याकाळीही अनेक राजे महाराजे होते. त्यांनी शत्रूचा यथाशक्ती प्रतिकार केला.
पण ते आक्रमकांना रोखू शकले नाहीत. त्यांना पळवून लावू शकले नाहीत. त्यांच्या आक्रमणाला पायबंद घालू शकले नाहीत. ह्याचा परिणाम म्हणून हा सगळा देश हळूहळू गुलामीच्या पाशामधे फसत गेला. अडकत गेला. पारतंत्र्यामधे जखडला गेला. सुमारे हजार ते अकराशे वर्षे इस्लामी राज्यकर्त्यांचा काळ आणि दीडशे वर्षे ख्रिश्चन राज्यकर्त्यांचा काळ, अशी जवळजवळ बाराशे वर्षे हा हिंदुस्थान परकीयांचा गुलाम होता. त्या कालावधीत मुसलमानी व इंग्रज राज्यकर्त्यांनी काय काय केले ते वाचताना आजही अपरंपार यातना होतात. वेदना होतात. डोळ्यांमधे अश्रु उभे राहतात.
त्यांनी आपल्या कितीतरी प्राचीन ग्रंथसंपदेची अक्षरशः होळी केली. कितीतरी ठिकाणांची मूळची नांवेच बदलली.
कितीतरी उत्तमोत्तम वास्तू आणि श्रद्धास्थानें फोडून टाकली. विद्रूप केली. त्यांचे मशिदींमधे आणि प्रार्थनास्थळांमधे रूपांतर केले. त्यासाठी असत्य आणि संपूर्णपणे खोट्या कथा रचून त्यांचा प्रचार व प्रसार केला.
' बळजबरीने धर्मांतर करायला लावणे, हिंदू धर्माविषयी व भारतीय संस्कृतीविषयी अभिमान व प्रेम शिल्लक राहणारच नाही ह्यासाठी शक्य त्या सर्व मार्गांचा अवलंब करणे, जेत्यांची संस्कृती आणि धर्मच कसा महान आहे हे जितांच्या मनावर सतत बिंबविणे, ह्या गोष्टी तर धार्मिक कर्तव्य म्हणून केल्या. ' त्या कालावधीमधे ह्या देशाचे सर्वच बाबतीत जेवढे नुकसान झाले, तेवढे नुकसान त्यापूर्वी कधीही झालेले नाही. ह्या देशाच्या इतिहासामधे त्या कालखंडाची, **' अत्यंत दुःखद कालखंड!'** अशीच नोंद झालेली आहे.
**हिंदूंचा देश** , **हिंदूंचे राज्य** तर जवळजवळ नष्टच झाले होते. जिथे कुठे थोडेफार अस्तित्वामधे होते ते असून नसल्यासारखेच होते. निस्तेज झाले होते. हतबल झाले होते. हतवीर्य झाले होते.
पण **हिंदूंचे राष्ट्र** मात्र जिवंत होते. त्याला १०,००० वर्षांची प्रदीर्घ अशी परंपरा होती.
ते नुसते जिवंतच नव्हते तर ते सकल हिंदुजनांच्या मनामधे, राष्ट्रभावनेच्या रूपाने, सळसळत होते. त्यांना सतत उत्तेजित करीत होते. प्रतिकार करण्याची प्रेरणा देत होते. आवाहन करीत होते. मार्ग दाखवीत होते. त्या **हिंदूराष्ट्रानेच** परकीय शत्रूंचा प्रतिकार केला. शक्य त्या मार्गाने, शक्य त्या साधनांचा वापर करून, शक्य होईल तेथे प्रतिकार केला. त्यासाठी, प्रसंगी आपल्या सर्वस्वाची आहुती दिली. त्याचा परिणाम झाला आणि जगाच्या नकाशावर हा **हिंदूंचा देश**, हे **हिंदूंचे राज्य,** काही प्रमाणात का होईना, परत प्रस्थापित झाले. असे म्हणतात की, आजचे हिंदुराज्य हे त्या मूळ हिंदुराज्याच्या तुलनेत अर्धेच आहे. त्याही पुढची दुःखद व वेदनादायक गोष्ट म्हणजे त्याचे नांवही ' **हिंदुस्थान!'** असे नसून **' इंडिया!'** किंवा **' भारत!'** असे आहे.
ह्याच राष्ट्रभावनेचे दुसरे उदाहरण म्हणजे ज्यू धर्मियांचा देश **इस्त्रायल**.
**ज्यू राष्ट्राने** सुमारे दोन हजार वर्षांपेक्षा जास्त काळ, प्रदीर्घ म्हणता येईल असा लढा देऊनच **ज्यूंच्या देशाची**, म्हणजेच इस्त्रायलची निर्मिती केली आहे. आज तो देश, चारही बाजूंना शत्रुराष्ट्रे असूनही त्यांच्यावर वचक ठेवून, त्यांना धाकात ठेवून, ताठ मानेने उभा आहे. बोलण्याच्या ओघामधे हे थोडे विषयांतर झाले आहे. मला ते समजते आहे. पण काही काही विषय असे असतात की बोलल्यावाचून राहवत नाही. त्याबद्दल आपण मला क्षमा करा. असो. आता आपण मूळ विषयाकडे वळूया.
पार्थीव प्रेमाला मर्यादा असते आणि त्यामधे बदलही होत असतो. ते स्थिर असू शकत नाही. त्यामधे वाढ होऊ शकते अथवा ते कमीही होऊ शकते. त्याचे परिवर्तन भक्तीमधे होत नाही. तसे झालेले दिसून येत नाही.
म्हणूनच माता - पिता - स्त्री - पुत्र - कन्या - बंधु - भगिनी इत्यादिकांच्या विषयीची आसक्ती किंवा प्रेम ह्यांना भक्ती म्हणता येणार नाही. त्या बाबतीत सर्वांचा अनुभव तसाच असतो. एकसारखाच असतो.
येथे आपण आपल्यासारख्या सर्व सामान्य माणसांच्या आयुष्यामधे, नेहमीच घडणाऱ्या अगदी सामान्य अशा घटनांचा विचार करूया.
१) प्रत्येक माणसासाठी त्याचे पहिले प्रेम म्हणजे **आई.** ह्याला कोणीही अपवाद नाही.
एका ठराविक काळामधे, प्रत्येकाला त्याची आई म्हणजे सर्वस्व असते. तिच्या वाचून दुसरे काहीच नको असते. ती असली तरच इतर सगळ्या गोष्टींना अर्थ असतो. मनामधे सतत तिचाच विचार येत असतो. जर ती दिसली नाही तर जीव कासावीस होतो. कशातही गोडी वाटेनाशी होते. मग जिवाच्या आकांताने रडायला सुरवात होते. तिला शोधायला सुरवात होते. बऱ्याच वेळाने ती दिसली म्हणजे सहजपणे तिच्याकडे जाणे घडून येते. ती देखील बाळाला सहजपणे जवळ घेऊन शांत करते.
हे प्रेम उत्कट असले तरीही **पार्थीव** असते. विविध कारणांच्यामुळे, कालांतराने त्यामधे बदल होऊ शकतो.
२) पुढे मोठा झाल्यावर त्याला अथवा तिला, दुसऱ्या कोणा स्त्री अथवा पुरुषाविषयी प्रेम वाटायला लागते.
तिचा अथवा त्याचा सहवास हवाहवासा वाटायला लागतो. मनामधे सतत तोच विचार यायला लागतो. त्यावाचून दुसरे काहीही नकोसे वाटायला लागते. भेटीसाठी, सहवासासाठी मनाची तडफड सुरू होते. ह्याची परिणती विवाहात होते.

हे प्रेम उत्कट असले तरीही **पार्थीव** असते. विविध कारणांच्यामुळे कालांतराने त्यामधे बदल होऊ शकतो.
( ह्यावेळी आपल्या आईची आठवण येणे कमी होते. तिच्याविषयी वाटणारे प्रेम पूर्वीसारखे घट्ट राहात नाही. गाढ राहात नाही. म्हणजेच काय तर, पहिले प्रेम तुलनात्मक दृष्टीने, कमी व्हायला लागते.)
३) आणखी काही काळाने मुले झाल्यावर त्यांच्याविषयी प्रेम वाटायला लागते.
त्यांचा सहवास हवाहवासा वाटायला लागतो. जबाबदारीची जाणीव झाल्यामुळे त्यांची काळजी करणे आणि काळजी घेणे सुरू होते. मनामधे सतत त्यांचाच विचार यायला लागतो. ती दिसली नाहीत तर बेचैन व्हायला लागते. अस्वस्थ व्हायला होते.
त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करायला सुरवात होते. स्वत:च्या इच्छांना आणि आवडी-निवडींना, अनेक वेळा बाजूला सारले जाते. आपली मुले म्हणजेच आपले सर्वस्व अशी अवस्था येते.
हे प्रेम उत्कट असले तरीही **पार्थीव** असते. विविध कारणांच्यामुळे कालांतराने त्यामधे बदल होऊ शकतो.
( ह्यावेळी आपल्या पत्नी अथवा पतीविषयी वाटणारे प्रेम पूर्वीसारखे घट्ट राहात नाही. गाढ राहात नाही. म्हणजेच काय तर, पहिले प्रेम हे तुलनात्मक दृष्टीने, कमी व्हायला लागते.)
४) पुढे मुले मोठी होतात. त्यांचेही विवाह होतात. त्यांनाही मुले होतात. म्हणजेच आपल्याला नातू अथवा नात होते.
नातवंडे म्हणजे दुधावरची साय असते. आपण आयुष्यभर केलेल्या सगळ्या कष्टांचा बोनस असतो.
मग त्यांच्याविषयी प्रेम वाटायला लागते. त्यांचा सहवास हवाहवासा वाटायला लागतो. मनामधे सतत त्यांचाच विचार यायला लागतो. ती दिसली नाहीत तर चुकल्या चुकल्यासारखे वाटायला लागते. ती जवळपास असल्याचा भास व्हायला लागतो.
इतकेच नाही तर त्यांनी न मारलेली हाकही ऐकू यायला लागते.
ह्या ठिकाणी एक अशी विशेष गोष्ट आहे, जी पहिल्या तीनही ठिकाणी नसते.
नातवंडांच्या विषयी वाटणारे प्रेम म्हणजे केवळ प्रेमासाठी प्रेम! निरपेक्ष असे प्रेम! निखळ असे प्रेम! शुद्ध असे प्रेम!
हे प्रेम नारदांनी सांगितलेल्या भक्तीच्या व्याख्येची आठवण करून देते.
येथे, आपल्या नातवंडांवर मनापासून प्रेम करणारे, असे जे आजी आजोबा असतील, त्यांनाच माझ्या सांगण्या मधला अर्थ समजला असेल. अहो ऽऽ, ते नातेच तसे असते. आपला नातू कसाही असूदे. नात कशीही असूदे.
दुसरे कोणतेही नाते त्या नात्याच्या जवळपासही जाऊ शकत नाही. त्यांच्याशिवाय अथवा त्यांना वगळून, दुसरा विचार करताच येत नाही. आपल्या आणि आपल्या नातवंडांच्यामधे **<u>सरूपता</u>** निर्माण होते. त्यांच्यामधे आपण आपले बालपण पहायला लागतो.
अनेक जुन्या गोष्टींची आठवण यायला लागते. तसे झाले म्हणजे मग,
<u>‘ ती आपल्यासारखीच आहेत आणि आपणही त्यांच्यासारखेच आहोत,’</u> असेच वाटायला लागते.
लहानपणी आपल्याला जो त्रास सहन करावा लागला, तो त्रास त्यांना कधीही सहन करायला लागू नये असेच वाटायला लागते.
त्यांना जे हवे असेल ते मिळाले म्हणजे ते आपल्यालाच मिळाल्याचा आनंद होतो. त्यांच्या बरोबर जवळजवळ एकरूप व्हायला होते.
<u>‘ जवळ जवळ एकरूप ’</u> अशासाठी म्हणतो आहे की हे प्रेम, इतर सर्व नातेसंबंधांमधील प्रेमाच्या तुलनेत, सर्वात उत्कट असले, सर्वात उत्तम असले तरीही, अखेरीस ते ही **पार्थीवच** असते. कालांतराने त्यामधे बदल होऊ शकतो.
काय काय होते ते सांगतो. नीट ऐका.
नातू हसायला लागला की आजोबालाही हसायला येते. नातू रडायला लागला की आजोबालाही रडायला येते.
नातवाला घास भरवताना, खरे म्हणजे आजोबा स्वत:च जेवत असतो. नातू जेवला की आजोबाचे पोट भरते.
मग त्याला स्वत:ला जेवायची फारशी गरज भासत नाही. त्याचे जेवणे म्हणजे केवळ एक उपचार होतो.
नातू आजारी पडला म्हणजे आजोबालाही आजारपण येते. नातू बरा झाला म्हणजे आजोबाही बरा होतो.
नातवाने एखादी चूक केली म्हणजे आजोबाला आपलीच चूक झाल्यासारखे वाटते.
आपल्या नातवाला ओरडताना, खरे म्हणजे आजोबा स्वत:लाच ओरडत असतो.
सुरवातीचे काही दिवस शाळेत जाताना, <u>‘ आजोबा ऽऽ, मला शाळेत जायचे नाही!’</u> असे म्हणून नातू रडायला लागला म्हणजे त्याला समजावताना आजोबाची दयनीय अवस्था होते. काय करावे ते कळत नाही. तो शाळेमधून घरी परत येईपर्यंत चैन पडत नाही.
शाळेमधे नातवाची परीक्षा असली म्हणजे आजोबाला टेन्शन येते. त्याला आपलीच परीक्षा आहे असे वाटायला लागते.
नातवाला शिकवता शिकवता आजोबाही अभ्यास करतो. तो स्वत:च शिकतो.
जर शाळेमधे कधीतरी नातवाला शिक्षा झाली तर, आजोबाला स्वत:लाच शिक्षा झाल्यासारखे वाटते. फार मानसिक त्रास होतो.
जर शाळेमधे कधीतरी नातवाला बक्षीस मिळाले तर, आजोबाला स्वत:लाच बक्षीस मिळाल्यासारखे वाटते. फार आनंद होतो.
नातवाने मागितलेली गोष्ट आजोबा त्याला लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करतो. सहसा नाही म्हणत नाही. नाही म्हणूच शकत नाही.

ह्या सगळ्या सांगण्यामधे, जराही अतिशयोक्ती केलेली नाही. आजपर्यंत हा सगळा अनुभव मी दोन वेळा घेतलेला आहे. अजूनही घेतो आहे. कारण मला दोन नातू आहेत आणि दिवसामधला सर्वात जास्त वेळ मी त्या दोघांच्या बरोबरच असतो. मला त्यांच्याशिवाय चैन पडत नाही. तसेच त्यांनाही माझ्याशिवाय चैन पडत नाही.
मी, १९७६ साली पहिल्याने गीता वाचायला सुरवात केली. एकदा गीता वाचल्यावर परत वाचावी असे वाटायला लागले. तिचा अर्थ समजून घ्यावा असे वाटायला लागले. तिच्याविषयी कोणीकोणी काय काय सांगितले आहे ते वाचून पहावे असे वाटायला लागले. नंतर हीच प्रक्रिया चालू झाली, चालू राहिली आणि आजही चालूच आहे.
गीतेमधील अनेक विधानांचा शब्दश: अर्थ समजला तरीही, प्रत्येकाला त्या अर्थाचा अनुभव घेता येईलच असे सांगता येत नाही. त्या बाबतीत मी सुदैवी आहे. जेव्हा मला पहिल्या नातवाचा सहवास मिळायला सुरवात झाली, तेव्हापासून काही विधानांच्या अर्थाची अनुभूती यायला लागली. त्यानंतर पाच वर्षांनी दुसऱ्या नातवाचा सहवास मिळायला सुरवात झाली आणि तशा अनुभूतीत भरच पडली. आजही पडते आहे आणि यापुढेही भर पडत राहणार आहे.
**' श्रीकृष्णार्पणमस्तु! इदन् न मम! मा फलेशु कदाचन!**
**श्रद्धावान् लभते ज्ञानम्! मन्मना भव मद्भक्तो मद्याजी माम् नमस्कुरु!'** इत्यादी म्हणजे काय? त्याचा अनुभव यायला लागला. दोन नातवांच्या रूपाने, श्रीकृष्ण भगवान आपल्यामधे बदल घडवून आणतो आहे असे जाणवले. माझ्या मनाला आणि बुद्धीला दैवी स्पर्श होतो आहे असे जाणवले. **( Divine Touch )**
दोघाना गीता शिकवताना तर फारच आनंद व्हायला लागला. त्यांना शिकवता शिकवता, मीच परत परत गीता वाचायला लागलो. गीता म्हणायला लागलो. गीतेचा अभ्यास करायला लागलो. गीता शिकायला लागलो. मग त्या अगोदर कुठेही न वाचलेला आणि न समजलेला अर्थ जाणवायला लागला.
स्वत: विषयीचा विचार करणे कमी झाले आणि त्यांचा विचार करणे सर्वात महत्त्वाचे वाटायला लागले. त्यांचे कल्याण व्हावे म्हणून त्यांच्यावर चांगले संस्कार करावेसे वाटायला लागले. मुख्य म्हणजे हे सगळे सहजपणे घडले. अगोदर ठरवून काहीही घडलेले नाही.
**' नातवंडे '** ह्या विषयावर बोलावे तेवढे कमीच आहे. असो.
अगोदरच्या तीनही बाबतीत कशाचीतरी अपेक्षा असते. **( Expectation )** काहीतरी हवे असते म्हणूनच काहीतरी द्यायची तयारी असते. **( Give & Take )** तशी तयारी, नकळत असो अथवा समजून उमजून होत असो, तयारी होते हे खरे.
पण नातवंडांच्या बाबतीत तसे नसते. सर्वकाही अगदी सहजपणे घडून येत असते. त्यांच्याकडून आपल्याला कशाचीही अपेक्षा नसते. खरोखरच नसते. केवळ ' त्यांचे संगोपन जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे व्हावे. त्यांना त्यांचे लहानपण उपभोगायला मिळावे, त्यांनी आनंदाने जगावे, चांगल्या प्रकारे अभ्यास करावा, ज्ञान प्राप्त करून घ्यावे आणि त्यांचे कल्याण व्हावे.' हीच इच्छा असते.
आपले सर्व प्रकारचे प्रयत्न नेहमीच त्या दिशेनेच चाललेले असतात.
पण नातू मोठा झाला, त्याचे मित्रमंडळ वाढले, आवड - नावड बदलली म्हणजे मग आजोबाचे बोलणे त्याला त्रासदायक वाटायला लागते. तो नकळत आजोबाला दुरावायला लागतो. इतरही विविध कारणांच्यामुळे कालांतराने त्यामधे बदल होऊ शकतो.
त्यासाठी आपली मानसिक तयारी झालेली नसते म्हणून आपल्याला मनस्ताप होतो. आपली चिडचिड व्हायला लागते.
उगाचच वाईट वाटायला लागते. त्याचा राग यायला लागतो. आपण त्याला ओरडायला लागतो.
तात्पर्य काय तर, **पार्थीव** प्रेम हे स्थिर असू शकत नाही. स्थिर राहू शकत नाही.
त्या प्रेमाच्या विषयाला आदि आणि अंत असतो म्हणूनच त्यावरील प्रेमालाही आदि आणि अंत असतो हेच निर्विवाद सत्य आहे.
त्याउलट परमेश्वराविषयीचे प्रेम हे **अपार्थीव** आहे आणि म्हणूनच ते स्थिर आहे.
कारण परमेश्वर हा अनादि - अनंत - अजर - अमर - अचल - अच्युत असा आहे! त्याच्यासारखा दुसरा कोणीही नाही!
तो एकमेव आहे! म्हणूनच सर्वश्रेष्ठ आहे! त्यामुळेच त्याच्या विषयीचे प्रेम व भक्ती देखील एकमेव आहे. मोक्षदायक आहे.
सर्वश्रेष्ठ आहे. त्यालाच **अनुरक्ति** असे म्हणतात. ह्या शब्दाचा अर्थ समजून घ्या.
**अनु** म्हणजे पश्चात् किंवा नंतर आणि **रक्ति** म्हणजे आसक्ती. ' भगवंताच्या स्वरूपाचे आणि त्याच्या प्रभावाचे यथायोग्य ज्ञान झाल्यानंतर, त्याच्या विषयी निर्माण होणारी आसक्ती ' म्हणजे अनुरक्ति.
वरील सर्व विवेचनाचा सारांश सागायचा झाला तर, साधारण पूजाअर्चा करण्यापासून सुरवात करून, शेवटी त्या क्रियेचे पर्यवसान परमेश्वराविषयीच्या गाढ, शुद्ध आणि अनन्य प्रेमामधे होईपर्यंत केले जाणारे, भजन, पूजन, श्रवण, कीर्तन, मनन, चिंतन, नामस्मरण, इत्यादी सर्व प्रयत्न, सर्व साधना, सर्व उपासना म्हणजे भक्ती होय.
दुसरे म्हणजे **सगुणभक्तियोग** हा, इतर कोणत्याही योगमार्गापेक्षा तुलनात्मक दृष्टीने, परमेश्वरप्राप्तीचा सोपा, सरळ आणि अत्यंत

स्वाभाविक असा मार्ग आहे. मुख्य म्हणजे, इतर कोणाकडूनही कसलीही अपेक्षाच नसल्यामुळे, कशाचाही त्याग करायची, मन आणि इंद्रियांचे नियमन करायची, घरदार सोडून अरण्यात जायची आणि तेथे राहून दीर्घकाळ विशेष कष्ट सहन करीत राहायची आवश्यकता नसते. ज्या स्वरूपामधे परमेश्वराची उपासना केली जाते, त्या स्वरूपामधेच निर्गुण व निराकार परमेश्वराला पहायचा प्रयास केला जातो. त्याला जाणणे, त्याच्या निकट जाणे आणि त्याची प्राप्ती होणे, हीच एकमेव इच्छा उरते.

त्याशिवाय दुसरी कोणतीही इच्छा शिल्लक राहात नाही. साधक जी उपासना करीत असतो, त्याच्याकडून जे काही घडून येत असते आणि सतत घडत राहते, तेही साधकाच्या नकळत, अगदी सहजपणे घडून येते. त्याला त्याची जाणीवही नसते. असो.

**ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।**

**सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥**

**संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।**

**ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥**

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।**

**अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥**

पण जे, प्रत्यक्ष दाखवता न येणारे, अव्यक्त, सर्वव्यापी, अचिंत्य, अचल, नित्य व सर्वांच्या बुडाशी असणाऱ्या ब्रह्माची उपासना, सर्व इंद्रिये आवरून व सर्वत्र समबुद्धी ठेवणारे होऊन करतात, ते सर्व भूतांच्या हितात गढलेले लोक देखील मलाच येऊन मिळतात. पण त्यांचे चित्त अव्यक्ताचे ठिकाणी आसक्त असल्यामुळे त्यांना क्लेश अधिक पडतात. कारण अव्यक्तोपासनेचा मार्ग हा कष्टाने सिद्ध होतो.

वरील तीन श्लोकांमधे सांगितलेली भक्ती ही **निर्गुणभक्ती** आहे. ह्या मार्गाने उपासना करणारे साधकही अखेरीस परमेश्वरालाच जाऊन मिळतात. परंतु हा निर्गुणभक्तीचा मार्ग, सगुणभक्तीच्या तुलनेने, अधिक कष्टकारक व क्लेशदायक आहे असे सांगितले आहे.

माझ्या मनामधे एक प्रश्न नेहमीच येतो आणि त्याचे उत्तर मिळत नाही.

परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपाची भक्ती करणे, त्यावर प्रेम करणे, त्याचे चिंतन करणे, त्याची उपासना करणे खरोखर शक्य आहे काय? ज्यांनी परमेश्वराच्या निर्गुण रूपाची भक्ती केलेली आहे आणि त्या मार्गाने मोक्ष प्राप्त करून घेतलेला आहे, असे ऋषी, मुनी, संत, महंत प्राचीन काळी आणि अर्वाचीन काळी होऊन गेलेले आहेत. आपल्या उपनिषदांमधे आणि पुराणांमधे त्यांचे सविस्तर उल्लेखही आलेले आहेत. समाजामधे आजही तशी भक्ती करणारे अनेक आदरणीय सत्पुरुष असतील. **त्यांना माझा नमस्कार असो.**

त्यामुळे निर्गुणभक्ती हा उपासनेचा एक मार्ग आहे आणि तशी भक्ती करणे शक्य आहे ह्याविषयी संशय नाही. तसा संशय घेण्याची माझी योग्यताही नाही. आपल्याला एखादी गोष्ट समजत नाही, आचरणात आणता येत नाही आणि तिची प्रचीती घेता येत नाही, म्हणून ' ती गोष्ट असणे शक्यच नाही,' असे म्हणणे योग्य नाही. तसे करणे म्हणजे लबाडी आहे, ढोंग आहे, खोटे बोलणे आहे.

त्याऐवजी ' आपण असमर्थ आहोत,' असे मोकळेपणाने मान्य करणेच योग्य होईल. मी तेच करतो आहे.

माझे अपयश आपल्याला सांगू इच्छितो आहे. आजपर्यंत मला निर्गुणभक्ती करणे जमलेले नाही.

अनेक वेळा प्रयत्न करूनही ते शक्य झालेले नाही आणि कितीही प्रयत्न केले, विचार केला, चिंतन केले, मनन केले, तरीही मला ते शक्य होईल असे वाटत नाही.

अहो ऽऽ, जे दिसतच नाही, ज्याचा ठावठिकाणाच माहीत नाही, ज्याच्याविषयी तर्क करता येत नाही, कल्पनाही करता येत नाही, जे मन आणि बुद्धी ह्यांच्या आवाक्यात येऊ शकतच नाही, त्याचे चिंतन, मनन आणि उपासना कशी करायची?

निराकार व निर्गुण परमेश्वराचे चिंतन करायचे ठरवून एकाजागी डोळे मिटून बसलो तरीही तसे करता येत नाही. तसे होत नाही.

लगेच श्रीगणपतीची मूर्ती दिसायला लागते. ओंकाराचा आकार दिसायला लागतो. निरांजनाची ज्योत दिसायला लागते.

एकच एक तेजस्वी बिंदू दिसायला लागतो. अनाकलनीय अशा विविध आकृत्या दिसायला लागतात.

समुद्राच्या लाटा दिसायला लागतात. फुलांची रास दिसायला लागते. प्रकाश किरणे दिसायला लागतात व मावळायलाही लागतात. ह्यापैकी काहीही दिसते, पण काहीतरी दिसतेच. पाटी कोरी रहातच नाही.

जेव्हा कधी **ध्यानाचा** अनुभव येतो त्यावेळी, स्वतःचे अस्तित्वच उरत नाही. मन निर्विकार होते. सर्व विचार नाहीसे होतात.

कशाचीही जाणीव शिल्लक राहात नाही. आपण भानावरच नसल्याने चिंतन, मनन वगैरे काहीही घडतच नाही.

आता ह्याला काय करायचे? निर्गुण परमेश्वराचे चिंतन कसे करायचे?

काहीही म्हटले तरी अखेरीस आपण सगळे **मनुष्यप्राणी** आहोत. माणसे आहोत.

त्यामुळेच एक माणूस म्हणून असलेल्या सर्व शारिरीक, मानसिक आणि बौद्धिक मर्यादांनी घट्ट बांधले गेलेलो आहोत हे निश्चित आहे.

प्रत्येकाची शक्ती किती आणि त्याची धाव कोठपर्यंत हे देखील निश्चित आहे.
परमेश्वराच्या स्वरूपाचा, त्याच्या दर्शनाचा आणि त्याच्या प्रभावाचा विचार करताना, आपण तो मानवी रूपामधूनच करू शकतो आणि नेहमी तसाच विचार करतो. परमेश्वराकडून आपल्याला फार मोठ्या कल्पनाशक्तीचे वरदान मिळाले असल्यामुळे, आपण त्या मानवी रूपामधे अनेक बदलांची कल्पना करू शकतो. अगदी विचित्र किंवा चमत्कारिक वाटावेत असे बदलही करू शकतो.
त्यापुढे जाऊन तोच विचार आपण एखाद्या वृक्षाच्या रूपामधे, प्राण्याच्या रूपामधे, पक्ष्याच्या रूपामधे, जलचराच्या रूपामधे किंवा उभयचराच्या रूपामधेही करू शकतो. कारण त्यांना आपण नेहमी पाहात असतो. त्यांचा अनुभवही घेत असतो.
परिणामी त्याही पुढे जाऊन, आपण त्यांच्या समिश्ररूपाची कल्पनाही करू शकतो.
आधुनिक शास्त्रज्ञांचे म्हणणे असे आहे की, —
‘ सुमारे चाळीस हजार वर्षांपूर्वी पृथ्वीवर मनुष्यप्राणी म्हणजेच आद्यमानव जन्मास आला. त्या आद्यमानवामधे आणि माकडामधे फारच थोडा फरक होता. तो दोन पायांवर ताठपणे उभा राहून चालू शकत होता. त्याला आपल्या हाताचा अंगठा इतर चार बोटांच्याजवळ नेता येत होता आणि अंगठ्याचा वापर करून एखादी वस्तू उचलता येत होती.’
म्हणजे त्या आद्य माणसाला ‘ अत्यंत मर्यादित बुद्धि ’ होती. कल्पनाशक्ती तर जवळ जवळ नव्हतीच ’ असेच म्हणावे लागेल.
ज्यावेळी मनुष्यप्राणी अगदी प्राथमिक अवस्थेत होता, इतर प्राण्यांच्यासारखा कळपाने गुहेमधे रहात होता, वस्त्र म्हणून झाडाच्या पानांचा वापर करीत होता, त्याचा बौद्धिक आणि मानसिक विकास झालेला नव्हता, त्यावेळी त्याचे कार्यक्षेत्रही अत्यंत मर्यादित होते. त्याला ‘ दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीची केवळ भीतीच वाटत असणार आणि तो तिच्यापासून आपले रक्षण करायचा प्रयत्न करीत असणार.’ हे नक्की. मग संकट आले असता ‘ शक्य झाले तर प्रतिकार करण्याचा प्रयत्न करणे, दगडाने अथवा काठीने मारणे, ते जमले नाही तर तेथून पळून जाणे व गुहेमधे लपून राहणे,’ हेच उपाय करीत असणार.
कालांतराने ह्या उपायांच्या जोडीनेच, आत्मरक्षणाचा दुसरा एक उपाय, आणखी एक वेगळा मार्ग म्हणून, —
‘ ज्याची भीती वाटते त्याच्या पुढे वाकण्याची, आडवे पडून लोटांगण घालण्याची ( **नमस्कार** ), त्याची प्रार्थना करण्याची, त्याला मान देण्याची, त्याची मनधरणी करण्याची, त्याची विनवणी करण्याची ’ पद्धत सुरू झाली असावी.
डोक्यावर पसरलेल्या एवढ्या मोठ्या **आकाशाची** भीती वाटते! कधी अंगावर कोसळेल ते सांगता येत नाही!
तर मग त्याची पूजा करा! ते वरती दिसते आहे!
**घोंगावणाऱ्या वादळाची** भीती वाटते! आपल्याला वेगाने फरफटत नेऊन कोठे फेकून देईल ते सांगता येत नाही!
तर मग त्याची पूजा करा! ते समोर दिसते आहे!
**ताप देणाऱ्या सूर्याची** भीती वाटते! तर मग त्याची पूजा करा! तो वरती दिसतो आहे!
**जाळणाऱ्या अग्नीची** भीती वाटते! तर मग त्याची पूजा करा! तो समोर दिसतो आहे!
**कोसळणाऱ्या पावसाची** भीती वाटते! तर मग त्याची पूजा करा! तो दिसतो आहे!
**उंचच्या उंच पर्वताची** भीती वाटते! तर मग त्याची पूजा करा! तो समोर दिसतो आहे!
**खोल खोल दरीची** भीती वाटते! तर मग तिची पूजा करा! ती समोर दिसते आहे!
**हिंस्त्र जनावरांची** भीती वाटते! कधी अंगावर येऊन, तीक्ष्ण नखांनी आणि दातांनी फाडून खातील ते सांगता येत नाही!
तर मग त्यांची पूजा करा! ती समोर दिसत आहेत!
आकाशामधे **उडणाऱ्या पक्ष्यांची** भीती वाटते! कधी झडप घालून उचलून नेतील ते सांगता येत नाही!
तर मग त्यांची पूजा करा! ते समोर दिसत आहेत!
**नाग - साप - विंचू** इत्यादींची भीती वाटते! कुठे तरी लपून बसलेले असतात! चावले तर आपण मरणार हे नक्की!
तर मग त्यांची पूजा करा! ते समोर दिसत आहेत!
**‘ बाबांनो ऽऽ! तुम्ही फार मोठे आहात! बलवान आहात! तुम्हाला नमस्कार! आमच्यावर कृपा करा! आम्हाला मारू नका! आमचे रक्षण करा!**’ असे म्हणून पूजा केल्यावर, नमस्कार केल्यावर ते सगळे शांत होतील.
आपल्याला मारणार नाहीत. त्रास देणार नाहीत. म्हणजेच पर्यायाने आपले रक्षण करतील. हीच भावना असणार आणि हाच हेतू असणार.
पुढे माणसाचा मानसिक आणि बौद्धिक विकास होत गेल्यावर इतर प्राणी व पक्ष्यांची भीती कमी होत गेली असेल. त्यांचा स्वत:साठी उपयोग करून घेता यायला लागल्यामुळे त्यांच्या विषयीच्या भावनेतही बदल होत गेला असणार.
तरीही पंचमहाभूतांची भीती मात्र कायम होती म्हणून त्यांच्याविषयीची भावना तशीच राहिली असणार.
**ह्याच भावनेचे विकसित रूप आपल्याला वेदांमधे पहायला मिळते.**

सनातन वैदिक हिंदू धर्मशास्त्राची अशी मान्यता आहे की —
' सर्व जगामधले पहिले अक्षर वाङ्मय म्हणून सुविख्यात असलेल्या चार वेदांच्यापैकी पहिला असलेला, **ऋग्वेद** हा सुमारे पंधरा हजार वर्षांपूर्वी रचला गेलेला आहे. ऋग्वेदाच्या रचनेची सुरवात त्यापूर्वी निदान हजार वर्षे तरी झाली असावी.'
म्हणजेच आद्यमानवाला, विकासाच्या त्या पातळीला यायला सुमारे चोवीस हजार वर्षे लागली असावीत असा अंदाज करता येतो.
ऋग्वेदामधे असलेले ' ज्ञान आणि विज्ञान ', तसेच त्यामधे पडलेले त्यावेळच्या एकूण समाजजीवनाचे प्रतिबिंब, ह्यांचा विचार केला असता, ' त्या काळी भारतीय संस्कृती बऱ्याच प्रगत अवस्थेत होती. तसेच त्या काळचा एकूण मानवी समाज हा विकसित झालेला होता,' असेच म्हणावे लागेल. वेदांचे संशोधक असे म्हणतात की,
' आज आपल्याला माहीत असलेल्या जवळजवळ सर्व विज्ञानाचे उल्लेख ऋग्वेदामधे आलेले आहेत.'
' त्यातील मंत्रांचा अर्थ काय? ते मंत्र का म्हणायचे? कधी म्हणायचे? कोठे म्हणायचे? कशासाठी म्हणायचे? कशा पद्धतीने म्हणायचे?' ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम आजही चाललेले आहे आणि यापुढेही चालूच राहील.
ऋग्वेदामध दहा मंडले असून, मंत्रांची एकूण संख्या १०,५५२ इतकी आहे.
त्यामधील जवळजवळ पस्तीस टक्के मंत्र म्हणजे ' पंचमहाभूतांची स्तुती आणि प्रार्थना ' आहेत.
तसेच त्यामागे त्यांनी सकल मानवजातीचे, रक्षण, पोषण, विकसन आणि विस्तरण करावे हाच हेतू आहे असे वाटते.
ह्याचे एक उदाहरण म्हणून आपण ' **पहिल्या मंडलातल्या पहिल्या सूक्तातला पहिला मंत्र '** पाहूया!
ऋग्वेद पठणाची सुरवात ह्या मंत्राने होते.

**अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवं ऋत्विजं होतारं रत्नधातमं ।। ऋ.१ -१ -१ ।।**

अर्थ — ' स्वत: पुढे होऊन मानवजातीचे कल्याण करणाऱ्या, यज्ञाचा स्वामी असलेल्या, यज्ञाचे नेतृत्व करणाऱ्या, यज्ञासाठी देवांना आवाहन करणाऱ्या, रत्नभूषणे धारण करणाऱ्या अग्नीची मी स्तुतीपूर्वक पूजा करीत आहे.'
हा झाला ह्या मंत्राच्या अर्थाचा भाग. त्याशिवाय मला आपल्याला अजून एक महत्त्वाची गोष्ट सांगावी असे वाटते आहे.
हा मंत्र सर्व जगामधील **' पहिल्या अक्षर वाङ्मयातला पहिला मंत्र '** आहे.
ह्या एकाच मंत्रामधे भाषाशास्त्रामधील जवळजवळ सर्व प्रमुख स्वर आणि व्यंजनांचा समावेश केला गेलेला आहे.
तसेच ह्या मंत्रामधे जोडाक्षरांच्या संकल्पनेचाही उपयोग केला गेलेला आहे.
म्हणून हा मंत्र **' जगामधील सर्व भाषांचे उगमस्थान आहे.**' अशी मान्यता आहे. असो.
सांगायचा मूळ मुद्दा हा आहे की देवाविषयी कल्पना करताना माणसाने, परमेश्वराचे विशेष असे सामर्थ्य आणि सर्वव्यापित्व विचारात घेऊन, त्याला जे प्रत्यक्ष दिसते ते आणि ज्याची कल्पना करता येते ते, ह्या दोघांचा वापर करून परमेश्वराला,
' एकापेक्षा जास्त तोंडे, दोनापेक्षा जास्त हात, मनुष्यदेहावर हत्तीचे किंवा सिंहाचे मस्तक, गरुडाचे किंवा घोड्याचे मस्तक, माकडाचे किंवा अस्वलाचे मस्तक व शेपटी, पशुदेहावर मानवी मस्तक ' इत्यादी रूपे दिली असावीत. कालांतराने, ती सगळी रूपेच **परमेश्वराचे स्वरूप** मानली जायला लागली असावीत आणि सर्व समाजाची **श्रद्धास्थानें** बनली असावीत असे वाटते.
ह्या कल्पना करताना उत्क्रांतीच्या क्रमाचाही विचार केला गेला असावा. म्हणूनच —
परमेश्वराचा पहिला अवतार हा जलचराचा आहे. ( **मत्स्यावतार** )
परमेश्वराचा दुसरा अवतार हा उभयचराचा आहे. ( **कूर्मावतार** )
परमेश्वराचा तिसरा अवतार हा भूचराचा म्हणजेच पशूचा आहे. ( **वराहावतार** )
परमेश्वराचा चवथा अवतार हा मानव आणि पशूचा मिश्रावतार आहे. **(नृसिंहावतार)**
परमेश्वराचा पाचवा अवतार हा ' लघुरूप आणि विशालरूप ' ह्यांचे मिश्रण असलेला मानवी अवतार आहे. ( **वामनावतार** )
त्यानंतरचे चारही अवतार हे संपूर्ण मानवी स्वरुपातले आहेत. ( **परशुरामावतार, श्रीरामावतार, श्रीकृष्णावतार व बौद्धावतार** )
मागील अध्यायामधे आपण परमेश्वराचे जे विराटरूप अथवा विश्वरूप पाहिले ते स्वरूप म्हणजे **'मानवी कल्पनाशक्तीची परिसीमा'** आहे असे मला वाटते. कारण त्या स्वरूपामधे, ' माणूस ज्याची कल्पना करू शकेल ' असे सर्व काही संपूर्णपणे सामावलेले आहे.
जे त्या स्वरूपामधे नाही असे काहीही नाही. माणसाला, त्याहूनही श्रेष्ठ अशा स्वरूपाची कल्पना करता येणे केवळ अशक्य आहे.
तरीही त्या कल्पनातीत स्वरूपाचा पाया **' मानवीरूप '** हाच आहे.
कारण **' समोर जे दिसले आणि जसे दिसले '** त्याचे सविस्तर वर्णन करणारे **संजय** आणि **अर्जुन** हे दोघेही मानवच आहेत.
इतकेच नाही तर ज्याने अर्जुनाला ते विराटरूप दाखविले आहे तो परब्रह्म परमात्मा, अर्जुनासमोर एका मानवाच्या रूपामधेच उभा आहे.
जोपर्यंत आपण मनुष्य आहोत तोपर्यंत, परमेश्वराला मनुष्यासारखाच समजणार.

त्याहून अन्य कोणत्याही भावाने धारणा करणे आपल्याला शक्य होणार नाही.
जरा विचार केला तर, इतर प्राणिमात्रांच्या बाबतीतही हेच सत्य आहे असे जाणवते.
अशी कल्पना करा की, सिंहाला बोलता येते आहे आणि त्याला देवाची पूजा करायची आहे म्हणून तो एखाद्या गुहेत चालला आहे. जर त्याला विचारले की, ' बाबारे, तू ज्याची पूजा करणार आहेस तो देव कसा आहे? कसा दिसतो?' तर तो काय सांगेल बरे? जरा विचार करा. त्याची परमेश्वराच्या रूपाविषयीची कल्पना ही, त्याच्या स्वत:च्या रूपावर आधारलेलीच असणार.
सिंहरूप हाच त्या कल्पनेचा पाया असणार. तो सांगेल की —
' देव हा एखाद्या प्रचंड सिंहासारखा आहे! फार मोठ्या आकारमानाच्या सिंहासारखा आहे! त्याला अनेक तोंडे आहेत. अनेक तीक्ष्ण दात व दाढा आहेत. अनेक पाय आहेत आणि त्यांना फार मोठी, टोकदार नखे आहेत. त्याला नुसते पाहिल्यावरही भीतीने कापरे भरते. इतर कोणताही प्राणी त्याला मारू शकणार नाही. पण तो मात्र इतका शक्तिवान आहे की कोणालाही कधीही मारू शकेल!' ह्याचप्रमाणे एखाद्या रेड्याला परमेश्वर हा प्रचंड रेड्यासारखाच वाटेल. एखाद्या गरुडाला परमेश्वर हा प्रचंड गरुडासारखाच वाटेल.
एखाद्या माशीला परमेश्वर हा प्रचंड माशीसारखाच वाटेल. एखाद्या वटवृक्षाला परमेश्वर हा प्रचंड वटवृक्षासारखाच वाटेल.
तात्पर्य काय तर, आपल्याला परमेश्वराचे दर्शन मानवी रूपामधेच होणे शक्य आहे आणि त्याला त्याच रूपामधे पाहून नंतर त्याची उपासना करणे क्रमप्राप्त आहे.
आपल्या धर्मामधे देवांची संख्या फार मोठी आहे आणि प्रत्येक देवाचे भक्तही फार मोठ्या संख्येने आहेत.
प्रत्येकजण आपापल्या श्रद्धेनुसार देवाची मूर्ती निवडतो आणि तिला नमस्कार करून, सतत तिचीच उपासना करीत राहतो.
कोणालाही, परमेश्वराच्या निर्गुण रूपाचे यथार्थ वर्णन करताच येत नाही. त्याविषयी वेदांनाही गप्प बसावे लागते. मौन पाळावे लागते. त्यांनाही **' परमेश्वर कसा आहे '** ते सांगता येत नाही. त्यामुळे ते, **' परमेश्वर कसा नाही '** त्याविषयीच सांगत राहतात आणि बरेच काही सांगून झाल्यावर **' नेति - नेति '** असेच म्हणतात. नि:शब्द होतात. अबोल होतात.
निर्गुण परमेश्वराच्या म्हणजेच परब्रह्माच्या ठिकाणी मनाला प्रवेश करता येत नाही.
परब्रह्म हे मानवी बुद्धीला, मनाला आणि पाच ज्ञानेंद्रियांना कळू शकत नाही.
परब्रह्म हे आकारहीन असल्यामुळे ध्यानाचा विषय होऊ शकत नाही.
परब्रह्म हे अतर्क्य असल्यामुळे त्याच्याविषयी कोणताही तर्क करता येत नाही.
परब्रह्म हे सर्व काली, सर्व स्थली, सर्व रूपांनी सदैव असते त्यामुळे त्याचे यथायोग्य चिंतनही करता येत नाही.
परब्रह्म हे नाही असे म्हणता येत नाही तसेच ते आहे असेही म्हणता येत नाही.
म्हणून त्याविषयी कल्पनाही करता येत नाही आणि त्याच्या प्राप्तीची साधनेही संभवत नाहीत. जी अव्यक्त आहे, अचिंत्य आहे, अनंत आहे, अशा संकल्पनेचा विचार करणे, चिंतन करणे, मनन करणे आणि उपासना करणे अत्यंत कठीण आहे.
तसा प्रयत्न करायचे ठरविले तरी सुरवात कोठून करायची आणि कशी करायची तेही समजत नाही. सगळा गोंधळ उडून जातो.
म्हणूनच निर्गुण भक्तीचा मार्ग खरोखरच फार फार कठीण आहे आणि तो मार्ग सर्वसामान्य माणसांना आचरता येण्यासारखा निश्चितच नाही. ह्या निर्गुण भक्तिमार्गाविषयी **ज्ञानेश्वर महाराज** काय सांगतात ते ऐका.
बाराव्या अध्यायाच्या पाचव्या श्लोकावर त्यांनी सोळा ओव्या रचलेल्या आहेत. ( ओवी क्रमांक ६० ते ७५ )
त्या ओव्यांचा सारांश सांगायचा म्हणजे, —
' सगुणाच्या भक्तीस डावलून, निर्गुण, निराकार आणि निराश्रय असूनही, सर्व प्राण्यांचे मूर्तिमंत हितच असे जे ब्रह्म, त्या ब्रह्माची प्राप्ती होण्याकरिता ज्या योग्यांनी त्या ठिकाणी आसक्ति धरलेली असते, त्यांस कामक्रोधांचे अनेक उपद्रव उद्भवतात व निराकाराबरोबर शरीर लढवावे लागते. जणू काही तहानेने तहानच प्यावी, भुकेने भूकच खावी व रात्रंदिवस वावांनी वारा मोजावा, थंडी नेसावी, ऊन पांघरावे आणि पावसाच्या घरात असावे. जेथे जागणे हेच निजणे, इंद्रियांचा निरोध करणे हेच विषयांचे प्रशस्त भोगणे असते आणि झाडांशी मैत्री करून बोलावे लागते. फार काय सांगावे?
अर्जुना, हे म्हणजे नवऱ्यावाचून नित्य नवा अग्निप्रवेश करणेच आहे. मरणा बरोबर नित्य नवी लढाई करणे आहे. याप्रमाणे ह्या योगाचे दु:ख मृत्यूहून तीक्ष्ण आहे. कढत विष पिववेल काय? किंवा डोंगर गिळताना मुख फाटणार नाही काय?
जेव्हा भुकेल्या माणसावर लोखंडाचे चणे खाण्याचा प्रसंग येतो, तेव्हा ते त्याचे पोट भरणे म्हणावे की त्याचा प्राणांशी वियोग म्हणावा? बाहूंनी समुद्र तरून जाणे शक्य आहे काय? आकाशात पायाने चालणे घडेल काय?
म्हणून अर्जुना, ज्याप्रमाणे पांगळ्याला वायूशी स्पर्धा करता येणार नाही त्याप्रमाणे शरीरधारी जीवांची निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी गती नाही. असे असूनही जर ते जीव, धैर्य करून निर्गुणाचा पिच्छा पुरवतील तर त्यांना दु:खच प्राप्त होईल.'
ह्यावर अधिक काहीही बोलण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

ह्या सगळ्या विवेचनाचे तात्पर्य सांगायचे झाले तर असे म्हणावे लागेल की, निर्गुणभक्तीच्या मार्गाचे आचरण करणे अत्यंत कठीण आहे. क्लेशदायक आहे. दु:खकारक आहे. त्यासाठी साधकाकडे विशेष योग्यता असावी लागते.
म्हणून ते फारच थोड्या साधकांना जमू शकेल. इतरांना जमणार नाही.
त्याच्या तुलनेमधे **सगुणभक्ती**च्या मार्गाचे आचरण करणे हे सुलभ, सहजसाध्य आणि सुखकारक आहे.
त्यासाठी कोणतीही विशेष योग्यता असण्याची गरज नाही. ते सर्व सामान्य साधकांनाही जमण्यासारखे आहे.
म्हणूनच निर्गुणभक्तीच्या मार्गापेक्षा सगुणभक्तीचा मार्ग उत्तम आणि तो मार्ग अनुसरणारा साधकही उत्तम.
आता सगुणभक्तीने उपासना करणाऱ्या साधकांचे वर्णन करायला सुरवात होते आहे

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥**
**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥**
**मय्येव मन आधस्त्व मयि बुद्धिं निवेशय ।**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥**

पण जे माझे ठायी सर्व कर्मे अर्पण करून, मत्परायण होऊन, अनन्य योगाने माझे ध्यान करून मला भजतात, त्या माझ्यामधे चित्त गुंतलेल्या लोकांचा, उशीर न लावता, हे पार्था ! मी ह्या मृत्युमय संसारातून उद्धार करतो. म्हणून माझ्याच ठायी मन ठेव आणि बुद्धी स्थिर कर म्हणजे तू पुढे माझ्या ठायीच निवास करशील ह्यात संशय नाही.
परमेश्वराच्या सगुणरूपाची भक्ती कशी करायला हवी? कशा प्रकारे करायला हवी?
पहिली पायरी म्हणजे साधकाच्या मनामधे परमेश्वराविषयी आदरभाव असला पाहिजे. परमेश्वराविषयी प्रेम असले पाहिजे. परमेश्वरावर श्रद्धा असली पाहिजे. ज्याच्याविषयी आपल्याला आदर वाटतो, प्रेम वाटते, त्याच्यावरच आपली श्रद्धा असू शकते आणि आपल्याला त्याचीच भक्ती करता येते. ज्याच्याविषयी आपल्याला आदर वाटत नाही, प्रेम वाटत नाही, त्याच्यावर आपली श्रद्धा असणे शक्य नाही आणि आपल्याला त्याची भक्ती करता येणेही शक्य नाही. आदराची आणि श्रद्धेची तीव्रता जितकी जास्त तितकी भक्तीची तीव्रताही वाढते.
आपण जिला श्रद्धा म्हणतो ती श्रद्धा म्हणजे तरी काय असते? श्रद्धा ह्या शब्दाचे अनेक अर्थ सांगितलेले आहेत.
त्यांचा सारांश सांगायचा तर, श्रद्धा म्हणजे ‘ पूज्यभाव, निष्ठा, विश्वास आणि दृढभावना ’ ह्यांचे सुयोग्य मिश्रण.
एक अगदी साधे सोपे, सर्वांना माहीत असलेले असे उदाहरण सांगायचे झाले तर,
‘ आपण आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जातो. आपल्याला काय होते आहे त्याची माहिती देतो. डॉक्टर आपल्याला तपासतो. औषध देतो. दुसऱ्या गोळ्या लिहून देतो. आपण फार्मसीत जाऊन त्या गोळ्या घेतो. नंतर, ते औषध आणि गोळ्या, डॉक्टरने सांगितेल्या वेळीच नेमाने घेतो.’ आपण असे का करतो? कसे काय करू शकतो?
आपल्याला जे काही होत असते ते माहीत असते पण त्या मागचे कारण माहीत नसते. आपल्याला औषधाविषयीचे काहीही ज्ञान नसते. म्हणून आपण, परिचय असो अथवा नसो, डॉक्टरकडे जातो. त्याने सांगितलेल्या सर्व तपासण्याही करून घेतो. कशाला?
‘ डॉक्टर उच्चशिक्षित आहे. त्याचे रोगनिदान अचूक असते. तो योग्य उपचार करून पेशंटना लवकरात लवकर बरे करतो अशी त्याची ख्याती आहे. त्याच्याकडे पेशंटची रांग लागलेली असते.’ हे खरे असले तरीही, त्याने दिलेल्या औषधाने आपण बरे होऊ असे कशावरून? कदाचित् आपला आजार बरा होईल किंवा बरा न होता उलट वाढूही शकेल.
शक्याशक्यतेच्या सिद्धांतानुसार **( Law of probability )** बरे होणे आणि बरे न होणे ह्या दोन्ही शक्यता ५० - ५० टक्के असतात.
आजपर्यंत त्याने हजारो रुग्णांना बरे केले आहे हे खरे असले तरीही ते, आपल्यावरील उपचारासाठी त्याच्याकडे जाण्याचे योग्य असे कारण होऊ शकत नाही. तरीही आपण मात्र त्याच्याकडेच जातो. का जातो? कसे काय जातो?
कारण आपली त्या डॉक्टरवरती **निष्ठा** असते. **विश्वास** असतो. आपल्याला त्याच्या विषयी **आदर** वाटतो.
त्याने दिलेल्या औषधाने आपण नक्की बरे होऊ अशी **दृढभावना** असते. काही लोक ह्याला **‘ अनुमान ’** असे नाव देतात.
‘ पूर्वानुभवाच्या योगाने काढलेला निष्कर्ष ’ असे म्हणतात. धर्मशास्त्रामधे ह्यालाच **श्रद्धा** असे म्हणतात. कारण अनुमान अथवा निष्कर्ष हा सुद्धा मुळामधे बुद्धिगम्य कार्यकारणात्मक नसून श्रद्धात्मकच असतो. बुद्धीला श्रद्धेची जोड असावीच लागते. त्याशिवाय व्यवहार चालू शकत नाहीत. बुद्धी ही, ह्या श्रद्धा, प्रेम, निष्ठा इत्यादी मनोवृत्तींना आळा घालण्याचा प्रयत्न करते. श्रद्धेचे परिवर्तन अंधश्रद्धेत होऊ नये, प्रेमाचे परिवर्तन आंधळया प्रेमामधे होऊ नये, निष्ठेचे परिवर्तन आंधळया निष्ठेमधे होऊ नये म्हणून प्रयत्न करते.

आपल्या बुद्धीने बऱ्यावाईटाचा कोणताही निर्णय दिला तरी त्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी ही आपल्या मनाकडूनच होत असते. आपल्या मनोवृत्तींच्या द्वारेच होत असते. म्हणूनच बुद्धिगम्य ज्ञानाचे प्रत्यक्ष आचरण घडून येण्यासाठी त्या ज्ञानाला, ' श्रद्धा, दया, वात्सल्य, कर्तव्य, प्रेम ' इत्यादी मनोवृत्तींचे सहाय्य असावे लागते. ह्या मनोवृत्तींच्या वाचून केवळ बुद्धिगम्य ज्ञान कोणालाही उपयोगी पडू शकत नाही. खरे सांगायचे तर जगाचे सर्व व्यवहार, ह्या नैसर्गिक मनोवृत्तींनीच चालतात.

**' आपली आई नेहमी आपली काळजी घेईल. आपल्यावर माया करील. ती कधीही आपले अहित करणार नाही.**
**आपले वडील नेहमी आपल्या कल्याणासाठीच प्रयत्न करतील. त्यासाठी आवश्यक ते सर्व काही करतील.**
**आपले गुरुजन आपल्याला कधीही अयोग्य मार्गाला लावणार नाहीत. ते आपल्यावर चांगले संस्कारच करतील.'**

ह्या सगळ्या श्रद्धाच आहेत. त्यामुळेच आपण ते सांगतील तेच बरोबर समजून तसेच वागायचा प्रयत्न करीत असतो.
अहो ऽऽ, बाकीचे सगळे सोडून द्या! **' उद्या सकाळी आपण जागे होऊन नेहमीप्रमाणे सर्व व्यवहार करणार आहोत.'**
ही श्रद्धा असते म्हणूनच आपण सगळे रात्री शांतपणे झोपू शकतो.
तशी श्रद्धा नसेल तर आपल्यापैकी किती लोक रात्री झोपू शकतील?
लोकमान्य टिळकांच्या **गीतारहस्या** मधे भक्तिमार्ग नांवाचे एक प्रकरण आहे.
त्यामधे त्यांनी ' श्रद्धा आणि बुद्धी ह्यांच्या परस्पर सापेक्षतेविषयी ' फार सुंदर विवेचन केलेले आहे. आपण सर्वांनी ते वाचून पहावे असे माझे आपल्याला आग्रहाचे सांगणे आहे. त्यातील अनेक विधाने खरोखर विचार करण्यासारखी आहेत. ते सांगतात की —
' उद्या सकाळी सूर्य पुन्हा उगवेल हा सिद्धांत घ्या. ह्या सिद्धांतातील ज्ञान अत्यंत निश्चित आहे असे आपण समजतो. कारण आपण व आपल्या पूर्वजांनी हा क्रम आतापर्यंत अबाधितपणे पाहिला आहे म्हणून. पण जरा खोलवर विचार केला तर तुम्ही आणि तुमच्या पूर्वजांनी आतापर्यंत दररोज सकाळी सूर्य उगवतांना पाहिला असला तरीही, ' उद्या सकाळी सूर्य उगवण्याचे ' ते कारण होऊ शकत नाही. किंवा रोज तुमच्या पाहण्यासाठी किंवा पाहण्यामुळेही सूर्य उगवत नाही.
सूर्योदय होण्याची कारणे निराळीच आहेत, असे दिसून येईल. **तर मग उद्या सूर्य उगवेल कशावरून?** एखाद्या वस्तूचा क्रम दीर्घकालपर्यंत एकसारखा अबाधित आहे, म्हणून तो क्रम पुढेही नित्य तसाच राहील असे मानणे ही एक श्रद्धाच आहे.
' राम्याला साखर गोड लागते म्हणून सोम्यालाही ती गोडच लागली पाहिजे.' असे समजणे ही देखील एक श्रद्धाच आहे.
' कितीही वाढल्या तरीही एकमेकांस कधीच न मिळणाऱ्या दोन रेषा असू शकतात.' हे भूमितीशास्त्रातील समांतर रेषांचे तत्त्व लक्षात येण्यास सर्व प्रत्यक्ष अनुभवाच्यापुढे श्रद्धेनेच जावे लागते.
' बे पंचे दहा ऐवजी सात का होत नाहीत? किंवा एकावर आणखी एकाचा आकडा मांडला तर दोन न होता अकरा का होतात?' ह्याचे कारण फारच थोड्या लोकांना माहीत असते. तरीही हे खरे मानूनच जगाचा व्यवहार चालला आहे. हिलाच श्रद्धा असे म्हणतात. हिमालय पर्वताची उंची किती लोकांनी खरोखर मोजली आहे? तरीही ' हिमालयाची उंची किती?' असे विचारल्यास त्याविषयी भूगोलाच्या शालेय पुस्तकातून पाठ केलेला आकडा चटकन सांगितला जातो.
तर्कशास्त्रामधे ह्यालाच **' आप्तवचनप्रमाण '** असे म्हणतात. आप्त म्हणजे विश्वसनीय पुरुष. त्याचे वचन प्रमाण मानणे म्हणजेच विश्वासार्ह मानणे आणि त्याप्रमाणे वागणे. ह्यालाच श्रद्धा असे म्हणतात.' असो.
' ह्या सर्व विश्वाचा व्यवहार, अनादि काळापासून, अचूकपणे चालविणारी विलक्षण अशी शक्ती अस्तित्वात आहे. आपल्याला ती दिसत नसली, तिला कोणताही आकार, रूप आणि रंग नसला तरीही ती शक्ती आहे.' असे मानणे म्हणजेच परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपावर विश्वास ठेवणे, त्याच्या सामर्थ्याविषयी आदर बाळगणे, त्याच्या इच्छेनुसारच सर्व काही घडून येत असते, आपण केवळ नाममात्र आहोत, त्याच्या हातातील बाहुली आहोत, त्याच्या इच्छेमुळेच अस्तित्वात आहोत आणि तोच आपले कल्याण करील अशी दृढभावना मनामधे सतत बाळगणे होय. हिलाच **श्रद्धा** असे म्हणतात.
एकदा का ही श्रद्धा निर्माण झाली म्हणजे मग दुसऱ्या पायरीचा विचार करणे सुरू होते.
परमेश्वराचे निर्गुण स्वरूप आपल्याला समजत नाही, त्याचे आकलन होत नाही, त्याचे मनन, चिंतन, भजन, पूजन इत्यादी करता येत नाही, म्हणून त्याच्या सगुण रूपाची कल्पना करायची. कोणत्या ना कोणत्या रूपामधे त्याला पहायचे आणि त्या रूपामधील त्याची उपासना करायला सुरवात करायची. आपले विहित कर्म करीत असताना ते त्यालाच अर्पण करायचे.
सतत त्याचेच चिंतन करीत रहायचे. त्याचेच भजन पूजन करीत रहायचे. त्याच्याच नांवाचा जप करीत रहायचे.
त्यालाच नमस्कार करीत रहायचे. त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीविषयी आसक्ती बाळगायची नाही.
सतत त्याचाच विचार करीत रहायचे आणि हे सगळे सतत करीत रहायचे. जन्मभर करीत रहायचे.
असे घडून आले म्हणजे मग परमेश्वरही आपल्याला अंतर देत नाही. स्वत:पासून दूर ठेवत नाही. आपली सर्वप्रकारे काळजी घेतो.

कृपादृष्टी ठेवतो. आपला योगक्षेम चालवितो. आपला उद्धार करतो. ह्या जन्म मृत्यूच्या चक्रामधून मुक्त करतो.
परंतु, आपले मन परमेश्वराच्या ठिकाणी सदैव स्थिर करणे आणि सतत त्याचीच उपासना करणे फार कठीण आहे.
ते सर्वांना शक्य होईल असे सांगता येणार नाही. मग सामान्य माणसांनी काय करायचे?

**अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।**
**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ।। ९ ।।**

आता ह्याप्रमाणे माझ्या ठायी चित्त चांगल्या प्रकारे स्थिर ठेवणे तुला जमत नसेल तर हे धनंजया ! अभ्यासाच्या सहाय्याने पुन्हा पुन्हा प्रयत्न करून, माझी प्राप्ती करून घेण्याची उमेद राख.
अभ्यास करायचा म्हणजे नक्की काय करायचे?
आपल्या मनाला आवर घालण्याचा सतत प्रयत्न करणे. त्याला समजावून, चुचकारून, परमेश्वराचे ठिकाणी स्थिर करायचा प्रयत्न करणे. त्यासाठी मनाचा जीवश्च कंठश्च मित्र असलेल्या श्वासाची मदत घेणे. अगोदर त्याला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत राहणे. मुख्य म्हणजे असे प्रयत्न सतत करीत राहणे. अपयश आले तरीही नाउमेद न होता, परत परत करीत राहणे.
' एक ना एक दिवस आपल्या प्रयत्नांना यश येईल. आपल्याला परमेश्वराची प्राप्ती निश्चित होईल,' अशी श्रद्धा बाळगून सतत प्रयत्न करीत राहणे. सहाव्या अध्यायामधे, ' चंचल मनाला ताब्यात आणण्यासाठी काय करायचे?' ह्याविषयी सर्व काही सविस्तरपणे सांगितलेले आहे आणि येथे तेच अपेक्षित आहे.
पण जर तसा अभ्यास करणेही जमले नाही तर मग काय करायचे?

**अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।**
**मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ।। १० ।।**

अभ्यास करण्यासही तू असमर्थ असशील तर माझ्या प्राप्तीसाठी शास्त्रात सांगितलेली <u>ज्ञान - ध्यान - भजन - पूजन</u> इत्यादी कर्मे करीत जा. ही कर्मे माझ्या प्राप्तीसाठी केल्यानेही तू सिद्धी पावशील.
ह्यालाच **' सगुणभक्तियोग '** असे म्हणतात. ह्यालाच **' नवविधा भक्ती '** असेही म्हणतात. भक्तीच्या नऊ पायऱ्या म्हणजे

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।।**

**<u>परमेश्वराला अनन्य भावाने शरण जाणे.</u>**

अनन्य म्हणजे, ' दुसरा कोणीही नाही. तो आणि फक्त तोच एकमेव.'

**<u>श्रवणम्</u>** — सतत परमेश्वराच्या गुणांचे वर्णन ऐकणे. त्याची कीर्ती ऐकणे. त्याचा पराक्रम, त्याचा प्रभाव, त्याचे माहात्म्य ह्याविषयी ऐकणे.

**<u>कीर्तनम्</u>** — आपण ऐकलेले परमेश्वराचे गुण, कीर्ती, पराक्रम, प्रभाव आणि माहात्म्य इतरांना, सविस्तरपणे वर्णन करून, सतत सांगणे.

**<u>स्मरणम्</u>** — सतत परमेश्वराचीच आठवण करीत राहणे. त्याचेच नांव घेत राहणे.

**<u>पादसेवनम्</u>** — त्याच्या चरणी लीन होणे. त्याच्या पायांवर स्वतःला समर्पित करणे.

**<u>अर्चनम्</u>** — त्याचेच पूजन करीत राहणे. केवळ शरीरानेच नाही तर मनानेही सतत त्याचेच पूजन करीत राहणे.
शास्त्रामधे <u>' मानसपूजन म्हणजे सर्वश्रेष्ठ पूजन आहे,'</u> असे सांगितलेले आहे. औपचारिक पूजेपेक्षा, मानसपूजा करणे फार कठीण आहे.

**<u>वंदनम्</u>** — सतत त्यालाच नमस्कार करणे. त्याच्या पायांवर मस्तक ठेवणे.
इतकेच नाही तर, दहाव्या अध्यायाच्या एकेचाळीसाव्या श्लोकामधे भगवंतांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणे,
' ज्या ज्या पुरुषाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे **ऐश्वर्य** दिसेल, **दया** दिसेल, **करुणा** दिसेल, **बुद्धिमत्ता** दिसेल, **ज्ञान** दिसेल, **तेज** दिसेल, **शौर्य** दिसेल, **धैर्य** दिसेल, **तप** दिसेल, **शुद्ध चारित्र्य** दिसेल, **नीतिमत्ता** दिसेल, **चातुर्य** दिसेल, **सत्-असत् विवेक** दिसेल, **लोकमान्यता** दिसेल, ते सर्व परमेश्वराचेच अंश आहेत असे समजून, त्यांच्या ठिकाणी परमेश्वरच आहे असे समजून, त्यांना नमस्कार करून, त्यांचे अनुकरण करणे.'
ह्या नमस्काराची एक विशेष अशी गोष्ट आहे. त्यामुळे सनातन धर्मशास्त्रामधे, नमस्काराला फार महत्त्व दिलेले आहे.
<u>' आशीर्वादापेक्षाही नमस्कार महत्त्वाचा आहे.'</u> असे सांगितलेले आहे. नमस्काराच्या क्रियेची, आशीर्वाद ही सहज प्रतिक्रिया आहे.
नमस्कारामध्ये नम्रतेची, लीनतेची आणि समर्पणाची भावना आहे. आशीर्वादामध्ये रक्षणकर्त्याची भावना आहे.
नमस्कार करणारा हा आपल्या साध्या व सोप्या कृतीने, ज्याला नमस्कार करतो त्याला, बंधनात अडकवतो.

त्याच्यावर सहजपणे आपली जबाबदारी टाकतो. अट इतकीच असते की, ' नमस्कार हा मनापासून, श्रद्धापूर्वक आणि अत्यंत प्रामाणिकपणे केलेला असला पाहिजे. त्यामधे जराही खोटेपणा अथवा लबाडी असता कामा नये.'
ही अत्त्यावश्यक अशी गोष्ट आहे. ही अट पाळली तर, केवळ नमस्कार केल्यानेच, तो करणाऱ्याचे अर्धे रक्षण होते.
उरलेले अर्धे रक्षण त्याला आशीर्वाद देणाऱ्याला करावे लागते. तो स्वत:हूनच करतो. त्याशिवाय त्याची सुटका होत नाही.

**दास्यम्** — मनापासून परमेश्वराचा दास होणे. त्याच्या कार्यामधे स्वत:ला झोकून देणे. आपल्या वाट्याला आलेले प्रत्येक कर्म करीत असताना, मी त्याचीच सेवा करीत आहे असे समजून, कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपले विहित कर्म उत्तम प्रकारे पार पाडणे. आपले सर्वस्व परमेश्वराला अर्पण करणे.

**सख्यम्** — ही भक्तीची फार मधुर अवस्था आहे. येथे भक्त आपले दासपण विसरत नाही पण त्याच्या आणि परमेश्वराच्यामधे कोणताही आडपडदा रहात नाही. त्यामुळे भक्त अधिकच लीन आणि निष्काम होतो. तो आपले दासपण विसरला नाही तरी परमेश्वर आपले स्वामित्व विसरतो आणि दासाला मित्रत्वाने पाहतो. त्यामुळे त्याला परकेपणा उरत नाही आणि मोठेपणाही उरत नाही. परिणामी दासालाही संकोच उरत नाही आणि भीतीही उरत नाही.

**आत्मनिवेदनम्** — येथे परमेश्वराची अगोदरच्या आठ प्रकारांनी अनन्य भक्ती सतत घडून आल्यामुळे, भक्ताचे मन तदाकार होऊन परमेश्वराच्या अंतरंगामधे शिरते. त्याला परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होते. सरते शेवटी परमेश्वर आणि आपण वेगळे नसून एकच आहोत ह्याची खात्री पटते. तशी अनुभूती येते.

आपल्यापैकी ज्यांना भक्तियोगाच्या ह्या नऊ पायऱ्यांच्या विषयी अधिक माहिती करून घ्यायची असेल त्यांनी, समर्थ रामदास स्वामींच्या **दासबोधा** मधील चवथा दशक वाचून पहावा. त्यामधे सगुणभक्तियोगाविषयी समग्र, सखोल, सविस्तर आणि संपूर्ण विवेचन केलेले आहे. त्यामधे सांगितलेले नाही असे, भक्तियोगाविषयीचे एकही विधान, दुसऱ्या कोणाला सांगता येईल असे निदान मला तरी वाटत नाही. खरोखर, **समर्थ रामदास हे अद्वितीय होते. एकमेव होते.** असो.
येथे प्रश्न पडतो की अशा प्रकारे सगुणभक्ती करणे, प्रत्येकाला शक्य होईल का?
म्हणजे सगुणभक्तीला सुरवात करता येईल पण त्यामधे सातत्य ठेवून शेवटच्या पायरीवर पोहोचेपर्यंत साधना करीत राहणे किती जणांना जमू शकेल? त्याविषयी निश्चित असे काही सांगता येत नाही.
म्हणजे असे पहा की, परमेश्वराच्या प्राप्तीसाठी कोणत्याही प्रकारची साधना करायची झाली तर तिचा,
**' परमेश्वराविषयी श्रद्धा बाळगणे.'** हा पाया आहे. ही श्रद्धा निर्माण झाली म्हणजे मग त्यापुढील विचार करायचा.
परमेश्वराचे निर्गुण स्वरूप आपल्याला समजत नाही, त्याचे आकलन होत नाही, म्हणून त्याच्या सगुण रूपाची कल्पना करायची.
कोणत्या ना कोणत्या रूपामधे त्याला पहायचे आणि त्या रूपामधील त्याची उपासना करायला सुरवात करायची.
परंतु, आपले मन परमेश्वराच्या ठिकाणी सदैव स्थिर करणे आणि सतत त्याचीच उपासना करणे फार कठीण आहे.
तसे करणे सर्वांना शक्य होईल का?
जर तसे करणे शक्य होत नसेल, तर मग आपल्या मनाला आवर घालण्याचा सतत प्रयत्न करणे, त्याला परमेश्वराचे ठिकाणी स्थिर करायचा प्रयत्न करणे आणि उपासना करीत राहणे. पण तेही सोपे नाही. अत्यंत चंचल असलेल्या मनाला आवर घालणे ही गोष्ट फार फार कठीण आहे. तसे करणे सर्वांना शक्य होईल का?
जर तसे करणे शक्य होत नसेल तर मग, तुलनेने त्याहून सोपा मार्ग म्हणजे, **' भजन, पूजन, स्मरण, मनन, चिंतन, वंदन,'** इत्यादी मार्गांनी परमेश्वराची भक्ती करीत रहायचे. त्याचे दास्य मनापासून स्वीकारायचे. त्याच्याच नांवाचा जप करीत रहायचे.
त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीविषयी आसक्ती बाळगायची नाही. हे सगळे सतत करीत रहायचे. जन्मभर करीत रहायचे.
म्हणजे कधी ना कधी परमेश्वराची प्राप्ती होऊ शकेल. तशी शक्यता निर्माण होईल.
पण जर तसे करणेही शक्य होत नसेल तर मग काय करायचे?
देवाची भक्ती तर सगळेच करीत असतात. नियमीतपणे देवळात जातात. देवाला तेल माळ अर्पण करतात. त्याच्यापुढे प्रसाद ठेवतात.
त्याच्या पायांवर मस्तक टेकवून नमस्कार करतात. त्याची मनोभावे प्रार्थनाही करतात.
पण हे सगळे, **आर्तभक्त** म्हणजे ' एखाद्या संकटामधे सापडल्यामुळे किंवा आपल्यावर संकट येऊच नये अशी इच्छा असल्यामुळे ' देवदर्शनाला येणारे तरी असतात किंवा **अर्थार्थीभक्त** म्हणजे ' काही तरी हवे आहे म्हणून किंवा आयुष्यभर सारखे काहीतरी मिळत रहावे म्हणून' देवदर्शनाला येणारे तरी असतात. ते ह्या भक्तिमार्गाच्या पहिल्या तीन पायऱ्यांवरच वावरत असतात.
( श्रवणम्, कीर्तनम्, स्मरणम् ) त्यांना त्यापुढे जाणे शक्य होत नाही.
**जिज्ञासू**भक्त म्हणजे ' परमेश्वराविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेण्याची मनोमन इच्छा असल्यामुळे ' देवदर्शनाला येणारे असे फार कमी

असतात.
**ज्ञानी**भक्त म्हणजे ‘ केवळ भक्तीसाठी भक्ती करणारे, निरपेक्षपणे भक्ती करणारे ’ असे भक्त तर शोधावेच लागतील.
येथे कोणालाही नांवे ठेवण्याचा माझा हेतू नाही, ह्याची सर्वांनी नोंद घ्यावी.
मी आपल्याला केवळ वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. असो.
तर मग अशा परिस्थितीत आपल्या सारख्या सामान्य माणसांनी काय करायचे? परमेश्वराची प्राप्ती कशी करून घ्यायची?

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥**
**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनंतरम् ॥ १२ ॥**

पण हे करण्यासही तू असमर्थ असशील तर कर्मयोगाचा आश्रय करून, हळूहळू चित्त आवरून अखेर सर्व कर्मफलांचा त्याग कर. कारण अभ्यासापेक्षा ज्ञान अधिक चांगले, ज्ञानापेक्षा ध्यान अधिक योग्यतेचे, ध्यानापेक्षा कर्मफलाचा त्याग श्रेष्ठ असून त्यापासून पुढे लगेच शान्ती प्राप्त होते.
हे दोन श्लोक अत्यंत महत्त्वाचे आहेत असे मला नेहमीच वाटते. कारण ह्या अगोदर, परमेश्वरप्राप्तीसाठी करायचे विविध उपाय सांगितलेले आहेत. पहिला आणि मूलभूत उपाय म्हणजे परमेश्वराविषयी श्रद्धा बाळगणे.
इतर कोणताही उपाय करण्यासाठी परमेश्वरावर श्रद्धा असणे अत्यंत आवश्यक आहे.
त्याच्या सगुण रूपाची कल्पना करणे आणि त्या रूपामधील त्याची उपासना करायला सुरवात करणे. मनाला परमेश्वराचे ठिकाणी स्थिर करायचा प्रयत्न करणे. त्यासाठी आपल्या मनाला आवर घालण्याचा सतत प्रयत्न करणे.
ज्ञान, ध्यान, भजन, पूजन, स्मरण, वंदन, चिंतन ह्या मार्गांनी उपासना करीत राहणे.
हे सर्व उपाय आचरणामधे आणणे जर शक्य होत नसेल तर मग काय करायचे?
ते ह्या दोन श्लोकांमधे अत्यंत स्पष्टपणे सांगितलेले आहे. भगवान सांगत आहेत की —
‘ आपले कर्तव्य अत्यंत प्रामाणिकपणे करीत रहायचे. आपल्या वाट्याला आलेले प्रत्येक कर्म जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे पार पाडायचे. त्याच्या फळाची अपेक्षा न बाळगता पार पाडायचे. कर्म करीत असताना सतत परमेश्वराचे स्मरण, मनन आणि चिंतन करीत रहायचे. आपण आपल्या कर्मरूपी फुलांनी, त्याचीच पूजा करीत आहोत असे समजायचे.
कर्ता करविता तोच आहे, तोच आपल्याकडून कर्म करून घेतो आहे आणि त्याच्या इच्छेप्रमाणेच सर्व काही घडत आहे ह्यावर दृढ विश्वास बाळगायचा. कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता, किंबहुना फळाचा विचारही न करता कर्म करायचे.
कर्म करून झाल्यावर **‘ इदं न मम ’** असेच समजायचे. ‘ हे माझे नाही, परमेश्वराचेच आहे. हे मी केलेले नाही,
परमेश्वराने माझ्याकडून करवून घेतले आहे.’ असे म्हणून, आपल्या हातून घडून आलेले कर्म त्याच्या फलासहित,
त्यालाच अर्पण करायचे. **‘ श्रीकृष्णार्पणमस्तु!’**
आपले प्रत्येक कर्म परमेश्वरालाच अर्पण करायचे असल्यामुळे ते वाईट कर्म नसावे तर चांगले कर्म असावे हे ओघाने येतेच.
म्हणून कर्म कितीही छोटे असो अथवा मोठे असो, कर्म कितीही लहान असो अथवा महान असो, ते सत्कर्मच असले पाहिजे ह्याची काळजी घेतलीच पाहिजे. वाईट कर्म करणे तर सोडाच पण तसा विचार करणेही कटाक्षाने टाळलेच पाहिजे.’
इतर कोणत्याही मार्गापेक्षा हा मार्ग तुलनेने सुलभ आहे. ह्यालाच **निष्काम कर्मयोग** म्हणतात.
ह्याचे निष्ठापूर्वक आचरण करीत असताना इतर सर्व गोष्टी आपोआप साधल्या जातात.
मन परमेश्वराचे ठिकाणी स्थिर होते. त्याची उपासना सहजपणे घडून येते. त्याची भक्तीपण अगदी सहजपणे घडून येते.
त्याचे मनन, चिंतन, स्मरण, वंदन, ध्यान आणि पूजन इत्यादी सतत होत राहिल्यामुळे सरते शेवटी परमेश्वराविषयीचे समग्र ज्ञानही प्राप्त होते आणि साधक त्यालाच जाऊन मिळतो. जन्म - मरणाच्या रहाटगाडग्यातून कायमचा मोकळा होतो.
स्वतः परमेश्वर त्याचा उद्धार करतो. त्याला मुक्त करतो. त्याला मोक्ष देतो.
नवव्या अध्यायापासून भक्तियोग सांगायला सुरवात झाली आणि ह्या अध्यायामधे भक्तियोगाचा समारोप झालेला आहे.
असे असले तरीही सगळा भक्तियोग हा निष्काम कर्मयोगाच्या समर्थनासाठीच सांगितलेला आहे. अर्जुनाला कर्तव्यपालनासाठी म्हणजेच युद्ध करण्यास सिद्ध होण्यासाठीच सांगितलेला आहे. ही गोष्ट ह्या दोन श्लोकांमधे आपल्याला प्रकर्षाने जाणवते.
‘ अर्जुना ऽऽ, बाकी सर्व बाजूला राहूदे! तू आपले कर्तव्य कसोशीने पार पाड. तुझ्या क्षात्रधर्मानुसार जे कर्म करणे आवश्यक आहे, ते न करण्याचा विचारही करू नकोस. उलट ते कर्म करणे म्हणजे परमेश्वराची पूजा करणेच आहे असे समज.

त्याचे कोणकोणते परिणाम होतील आणि फळ काय मिळेल ह्याची चिंता करू नकोस. केवळ आपले कर्तव्य म्हणून कर्म कर. केवळ कर्मासाठीच कर्म कर. निष्काम कर्म कर म्हणजे तू मला प्रिय होशील आणि मलाच येऊन मिळशील.'

परमेश्वराला त्याचे सगळे भक्त प्रियच असतात. तो भक्ताभिमानी असल्यामुळे आपल्या सर्व भक्तांचा परामर्ष घेतो. काळजी घेतो. योगक्षेम वाहतो. त्यांना कधीही विसरत नाही. अंतर देत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत नाही.

असे असले तरीही काही भक्त त्याला विशेष प्रिय असतात. असे भक्त कोणते? ते कसे असतात? त्यांचे आचरण कसे असते? आता यापुढे त्याविषयी सांगायला सुरवात होते आहे.

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥**
**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।**
**मय्यार्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥**

येथे कोणकोणते शब्द वापरले आहेत पहा आणि त्यांचा अर्थ समजून घ्या.

**अद्वेष्टा** — द्वेषभावना नसलेला. **मैत्रः** — स्वार्थरहित प्रेम करणारा. **करुणः** — दयाळू.

**निर्ममः निरहंकारः** — ममतारहित. अहंकाररहित. **समदुःखसुखः क्षमी** — सुख आणि दुःखाच्या बाबतीत सम. क्षमाशील.

**संतुष्टः सततं** — जे असेल त्यामधे सदैव संतुष्ट राहणारा. **यतात्मा** — मन आणि इंद्रियांसह शरीराला ताब्यात ठेवणारा.

**दृढनिश्चयः** — परमेश्वराचे ठिकाणी दृढ निश्चय असलेला.

**मयि अर्पित मनः बुद्धिः** — माझ्या ठिकाणी मन व बुद्धी अर्पण केलेला.

' अर्जुना ऽऽ, असा भक्त मला प्रिय असतो.'

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥**
**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।**
**सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥**

**यस्मात्** — ज्याच्यामुळे. **लोकः** — कोणत्याही जीवाला. **न उद्विजते** — उद्वेग वाटत नाही, उद्विग्न होत नाही.

**लोकात्** — कोणत्याही जीवामुळे. **हर्षः अमर्षः भयः उद्वेगैः मुक्तः** — आनंद, मत्सर, भय व उद्वेगरहित.

**अनपेक्षः** — आकांक्षारहित. **शुचिः दक्षः** – अंतर्बाह्य शुद्ध असलेला. सतर्क, चतुर.

**उदासीनः** — निःपक्षपाती. **गतव्यथः** — दुःखापासून मुक्त असलेला.

**सर्वारंभपरित्यागी** — मन, वाणी व शरीर ह्यांच्या द्वारे होणाऱ्या सर्व कर्मांच्या कर्तेपणाचा अभिमान सोडणारा.

' अर्जुना ऽऽ, असा भक्त मला प्रिय असतो.'

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रिय ॥ १७ ॥**

**न हृष्यति** — आनंदित न होणारा. **न द्वेष्टि** — कोणाचाही द्वेष न करणारा.

**न शोचति** — शोक न करणारा. **न काङ्क्षति** — कशाचीही अपेक्षा न बाळगणारा. कामनारहित.

**शुभः अशुभः परित्यागी** — कर्माच्या शुभ अथवा अशुभ पळाचा त्याग करणारा.

' अर्जुना ऽऽ, असा भक्त मला प्रिय असतो.'

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥**

**शत्रौ च मित्रे च** — शत्रू आणि मित्र ह्यांच्या ठिकाणी तसेच,

**मानापमानयोः** — मान अथवा अपमानाच्या प्रसंगी.

**शीतोष्णसुखदुःखेषु** — थंडी किंवा उष्णता, सुख किंवा दुःख ह्यांच्या बाबतीत.

**समः** — सम असतो. स्थिर असतो. **संगविवर्जितः** — आसक्तिरहित.

' अर्जुना ऽऽ, असा भक्त मला प्रिय असतो.'

**तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।**

**अनिकेत: स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नर: ॥ १९ ॥**

**तुल्यनिंदास्तुति:** — निंदा आणि स्तुती ह्यांना समान मानणारा.

**मौनी** — मौन बाळगणारा. परमेश्वराच्या स्वरूपाचे मनन करणारा, चिंतन करणारा.

**संतुष्ट:** — समाधान मानणारा. **येनकेनचित्** — कोणत्याही परिस्थितीमधे.

**अनिकेत:** — आपल्या राहण्याच्या ठिकाणातही ममता नसलेला. **स्थिरमति:** — चित्त सदैव स्थिर असलेला.

‘ अर्जुना ऽऽ, असा भक्त मला प्रिय असतो.’

जवळजवळ तीस लक्षणे सांगितलेली आहेत व ही लक्षणे ज्याच्या ठिकाणी आहेत **‘ तो माझा भक्त मला प्रिय आहे.’** असे सांगितलेले आहे.

मागे दुसऱ्या अध्यायामधे ‘ स्थितप्रज्ञाची लक्षणे ’ सांगितलेली आहेत. जरा ती लक्षणे आठवून पहा.

त्यामधे वर सांगितलेली सर्व लक्षणे आलेली आहेत. ती लक्षणे, ज्याचा **ज्ञानयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

ही लक्षणे, ज्याचा **भक्तियोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

सहाव्या अध्यायमधे, ज्याचा **राजयोग** म्हणजेच पातंजलयोग सिद्ध झाला आहे अशा माणसाची लक्षणे सांगितलेली आहेत.

ती लक्षणेही आठवून पहा. अशीच आहेत.

तसेच, ज्याचा **कर्मयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची लक्षणे देखील अशीच असतात, असे वारंवार सांगितलेले आहे.

तात्पर्य काय तर, ‘ **ज्ञानयोगी, कर्मयोगी, राजयोगी** आणि **भक्तियोगी** ह्या चौघांच्यामधे अंतिमत: काहीही फरक रहात नाही.’

सर्वांचे अंतिम ध्येय एकच म्हणजे, ‘ **मोक्ष** ’ हेच असल्यामुळे, साधनेचा मार्ग वेगवेगळा असला तरीही अंतिम अवस्था तशीच आहे. एकच आहे. प्रश्न आहे तो सुलभतेचा.

त्या दृष्टीने विचार केला असता, **‘ निष्काम कर्मयोग ’** हा इतर सर्व मार्गांच्या तुलनेने सुलभ आहे.

सर्वसामान्य माणसालाही आचरता येण्यासारखा आहे असे मला मनापासून वाटते. असो.

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।**

**श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रिया: ॥ २० ॥**

वर सांगितलेला हा अमृततुल्य धर्म मत्परायण होऊन श्रद्धेने जे आचरतात, ते भक्त मला अत्यंत प्रिय होतात.

**धर्म्यामृतम्** — धर्मरूप अमृत, धर्ममय अमृत.

**श्रद्दधाना:** — सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान अशा परमेश्वराच्या कोणत्याही सगुणरूपामधे, त्याच्या गुणांना, प्रभावाला, ऐश्वर्याला आणि सामर्थ्याला सदैव पाहतो आणि त्यावर आदराने विश्वास ठेवतो, असा पुरुष.

**मत्परमा:** — परमेश्वर हा अत्यंत प्रेमळ आहे, अत्यंत दयाळू आहे, तोच आपले सर्वस्व आहे, अखेरचा आधार आहे आणि शेवटचे आश्रयस्थान आहे असे मानून त्याच्या प्राप्तीसाठी तत्परतेने प्रयत्न करीत असलेला पुरुष.

या अगोदर जी लक्षणे सांगितलेली आहेत, ती सिद्ध पुरुषांच्यामधे म्हणजे ज्यांना परमेश्वराचे समग्र ज्ञान झालेले आहे, अनुभूती आलेली आहे, दर्शन घडलेले आहे, अशा पुरुषांच्या ठिकाणी असतातच. त्यामधे काही विशेष नाही.

परंतु, ज्या साधकांना परमेश्वराचे समग्र ज्ञान झालेले नाही, अनुभूती आलेली नाही व दर्शन घडलेले नाही. तरीही जे परमेश्वरावर अढळ विश्वास ठेवून, श्रद्धा बाळगून, त्याला तन - मन - धन अर्पण करून, अनन्य भक्तिभावाने सदैव त्याचेच भजन, पूजन, चिंतन, मनन, स्मरण करीत राहतात, केवळ त्याच्याच प्राप्तीसाठी प्रेमपूर्वक प्रयत्न करीत राहतात, साधना करीत राहतात, आपले कर्तव्य निष्काम भावनेने पार पडत राहतात, असे साधकही परमेश्वराला अत्यंत अत्यंत प्रिय असतात, ह्याविषयी कोणताही संशय नाही.

**येथे बारावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

**नवव्या** अध्यायामधे परमेश्वराचे महात्म्य सांगून झाले.

**दहाव्या** अध्यायामधे अर्जुनाने विचारल्यामुळे, परमेश्वराच्या अगणित विभूतींच्यापैकी मुख्य मुख्य अशा विभूती सांगून झाल्या.

**अकराव्या** अध्यायामधे अर्जुनाचे कुतुहल शमविण्यासाठी परमेश्वराचे मूळचे स्वरूप म्हणजेच विश्वरूप दाखवून झाले.

ह्या बाराव्या अध्यायामधे निर्गुणभक्तीच्या तुलनेत सगुणभक्ती करणे सुलभ, सहज जमण्यासारखे आणि सुखकारक असल्यामुळे सगुणभक्ती ही उत्तम असून सगुणभक्त मला अधिक प्रिय आहे असे सांगितले.

परमेश्वराची भक्ती कशी करायची? कशा प्रकारे करायची? त्यासाठी कोणकोणते मार्ग अनुसरायचे?

एखादा मार्ग अनुसरणे शक्य होत नसेल तर मग काय करायचे? त्याहून सुलभ असा दुसरा मार्ग कोणता आहे?
ह्या सर्व प्रश्नांचे सविस्तर उत्तर देऊन झाल्यावर, इतर सर्व गोष्टी सोडून, केवळ — **निष्काम कर्मयोगाचे** आचरण करायला सांगितले. त्यामुळेच, सर्व गोष्टींचा विचार केला असता, गेल्या चार अध्यायांमधे सलगपणे सांगितलेल्या ह्या संपूर्ण विवेचनाला **' कर्मयोगप्रधान भक्तियोग!'** म्हटले पाहिजे असे मला वाटते. असो.

अखेरीस परमेश्वराला कोणता भक्त प्रिय आहे ह्या विषयी सांगताना सगुणभक्ताची सर्व लक्षणे सांगितली.

येथे एक महत्त्वाची गोष्ट परत एकदा सांगावा असे वाटते आहे.

' आदर्श ज्ञानयोग्याची, आदर्श कर्मयोग्याची, आदर्श ध्यानयोग्याची आणि आदर्श भक्तियोग्याची जी लक्षणे सांगितली आहेत ती एकसारखीच आहेत. मार्ग कोणताही असो, सर्व योग्यांची अंतिम अवस्था सारखीच असते. ह्या सर्व मार्गांचे अंतिम लक्ष्य एकच आहे. **मोक्षप्राप्ती** हेच आहे. ज्याला जो मार्ग रुचेल, पटेल आणि आचरता येण्यासारखा असेल, त्याने तो मार्ग आचरणात आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत रहावे. साधना करीत रहावे.'

हाच ह्या सर्व विवेचनाचा मतितार्थ आहे. असो.

येथे भक्तियोग ह्या विषयाचे विवेचन पूर्ण झाले आहे.

आता पुढील अध्यायामधे भगवान काय सांगतात ते पाहूया.

अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

# अध्याय तेरावा

## — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या तेराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे. मागील अध्यायामधे भक्तियोगाचे विवेचन पूर्ण झाले आहे. सातव्या अध्यायामधील दुसऱ्या श्लोकामधे, श्रीकृष्णाने **विज्ञानासहित ज्ञान** सांगतो असे म्हणून त्याविषयी बोलायला सुरवात केली. काही वर्णन करून झाले. काही ज्ञानही सांगून झाले. परंतु अध्यायाच्या अखेरीस,

' ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ, अधिदेह आणि मरणसमयीचे परमेश्वरचिंतन,' ह्या विषयांचा उल्लेख झाला. त्यांचा यथायोग्य अर्थ न समजल्यामुळे नंतर अर्जुनाने त्याविषयीच प्रश्न विचारले. त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन, यथायोग्य विवेचन करण्यामधेच सगळा आठवा अध्याय पूर्ण झाला. त्यानंतर नवव्या अध्यायामधे विज्ञानासहित ज्ञानाचा विषय परत सुरू झाला. ज्ञान-विज्ञान, ईश्वर शरणभाव आणि त्या मधले सातत्य ह्यांचे विवेचन करून झाल्यावर भक्तियोगाचे विवेचन सुरू झाले. ते मागील अध्यायामधे पूर्ण झाले. आपण जर आतापर्यंत झालेल्या संभाषणाचा विचार केला तर —

**पहिल्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे धृतराष्ट्राचा प्रश्न आहे.

त्यामुळेच संजय युद्धाचे प्रसंगी घडलेल्या घटना क्रमवार सांगायला लागला आहे.

**दुसऱ्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे संजयाचे समालोचन चाललेले आहे.

त्याला मागील अध्यायामधील अर्जुनाची स्वजन आसक्ती आणि त्याचाच परिणाम म्हणून झालेल्या दु:खाचा संदर्भ आहे.

**तिसऱ्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे अर्जुनाने विचारलेला प्रश्न आहे.

त्या प्रश्नामुळे कर्मयोगाचे विवेचन सुरू झाले आहे.

**चवथ्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे श्रीकृष्णाचे कर्मयोगासंबंधीचे विवेचन चाललेले आहे. त्याला मागील अध्यायामधील अर्जुनाच्या प्रश्नाचा संदर्भ आहे.

**पाचव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे अर्जुनाचा प्रश्न आहे.

त्या प्रश्नामुळे ज्ञानयोग आणि कर्मयोग ह्यांची तुलना सुरू झाली आहे.

**सहाव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे श्रीकृष्णाचे ध्यानयोगासंबंधीचे विवेचन सुरू झालेले आहे. त्याला मागील अध्यायाचा संदर्भ आहे.

**सातव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे श्रीकृष्णाचे विज्ञानासहित ज्ञानासंबंधीचे विवेचन सुरू झालेले आहे. त्याला मागील अध्यायाचा संदर्भ आहे.

**आठव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे अर्जुनाचा प्रश्न आहे. त्या प्रश्नामुळे थोडेसे विषयांतर होऊन, ब्रह्म - अध्यात्म - कर्म - अधिभूत - अधिदैव - अधियज्ञ इत्यादींचे विवेचन सुरू झाले आहे.

**नवव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे श्रीकृष्णाचे, विज्ञानासहित ज्ञानासंबंधीचे विवेचन परत सुरू झालेले आहे. त्याला मागील सातव्या अध्यायाचा संदर्भ आहे.

**दहाव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे श्रीकृष्णाचे विज्ञानासहित ज्ञानासंबंधीचे विवेचन पुढे चाललेले आहे. त्याला मागील अध्यायाचा संदर्भ आहे.

**अकराव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे अर्जुनाचा प्रश्न आहे.

त्या प्रश्नामुळे विश्वरूप दर्शनाचा विलक्षण असा योग आलेला आहे.

**बाराव्या** अध्यायाचा पहिला श्लोक म्हणजे अर्जुनाचा प्रश्न आहे.

त्या प्रश्नामुळे निर्गुणभक्ती आणि सगुणभक्ती ह्यांची तुलना सुरू झाली आहे.

म्हणजे आठव्या अध्यायामधील थोडेसे विषयांतर सोडले तर, सर्व बारा अध्यायांचा एकंदर क्रम सुसंगत असून, त्या अध्यायांमधील विवेचनाचा प्रवाह सलगपणे चाललेला आहे. तसेच त्यामधे ज्ञानयोग, कर्मयोग, राजयोग आणि भक्तियोग ह्या चारही विषयांचे सविस्तर विवेचन करून झालेले आहे. बाराव्या अध्यायाच्या अखेरीस अर्जुनाचा विषादही नाहीसा झालेला आहे.

त्यानंतर अचानकपणे ह्या अध्यायाला सुरवात झालेली आहे.

अचानकपणे अशासाठी म्हणतो आहे की, येथे अर्जुनाने कोणताही प्रश्न विचारलेला नाही.

बहुतेक तो अगोदर सांगितलेल्या भक्तियोगाविषयीच विचार करीत असावा.
तरीही भगवान श्रीकृष्ण आपण होऊन बोलायला सुरवात करीत आहेत.
एक वेगळाच विषय सुरू होतो आहे आणि तो सुसंगत वाटत नाही. प्रत्येक वेळी गीता वाचताना निदान मला तरी तसेच वाटते.
मग त्यामागचे कारण शोधायचा प्रयत्न सुरू केला. अनेक विद्वानांच्या ग्रंथांचे वाचन केले. त्यावर चर्चा केल्या. शंका विचारल्या.
संदर्भ शोधायचा प्रयत्न केला. ह्या विषयी फारसे काही हाती लागलेच नाही. निरनिराळी मते, सूचना आणि शेरे मात्र वाचायला आणि ऐकायला मिळाले. त्यांच्यावरही विचार केला. पण यथायोग्य आणि बुद्धीला पटेल असे उत्तर मिळालेच नाही.
येथे आपल्या माहितीसाठी मी वाचलेल्या एका ग्रंथाविषयी थोडे सांगतो.
**' मूळ गीतेचा शोध '** नांवाचा, **डॉ. ग. श्री. खैर – ( M. A. PhD.)** ह्या विद्वान गृहस्थांचा ग्रंथ १९६७ साली प्रकाशित झाला आहे. त्यांनी गीतेचा इतक्या वेगवेगळ्या दृष्टीकोनामधून अभ्यास केला आहे की विचारता सोय नाही.
ह्या विषयाचा अनेक वर्षे सखोल अभ्यास करून मग आपली मते मांडली आहेत. चर्चेसाठी त्यांनी जे मुद्दे घेतलेले आहेत ते आपल्यासारख्या सामान्य माणसांच्या लक्षातही येणार नाहीत असे आहेत. उदाहरणार्थ सांगायचे झाले तर —
१) गीतेमधे अनेक विषयांची सतत होणारी पुनरावृत्ती.
२) गीतेची सतत बदलणारी परिभाषा.
३) अध्यायांचा प्रारंभ आणि समाप्ती ह्यांच्यामधील विषयांचा फरक.
४) काही अध्यायांमधील श्लोकांचा विस्कळीत क्रम.
५) गीतेमधील परस्पर विरोधी मतांचे प्रतिपादन.
६) शब्दांचे निरनिराळ्या संदर्भात बदलणारे अर्थ.
७) अनहंकाराची आणि निर्ममत्वाची वारंवार स्तुती करणाऱ्या परमेश्वराच्या तोंडी असलेली अहंकारयुक्त भाषा.
८) परमेश्वराचा उल्लेख काही ठिकाणी प्रथमपुरुषी ( मी, मला, माझ्याशी इत्यादी ) आणि काही ठिकाणी तृतियपुरुषी ( तो, त्याला, त्याच्याशी इत्यादी ) असणे.
९) काही अध्याय सुसंगत आणि काही अध्याय विसंगत असणे.
इत्यादी मुद्यांवर त्यांनी सविस्तर चर्चा केलेली आहे.
**' गीतेचा असाही अभ्यास करता येऊ शकतो '** हे मला माहीतच नव्हते. तसेच एखाद्या ग्रंथाचा नि:पक्षपातीपणे अभ्यास कसा करावा ह्याचा वस्तुपाठ पहायला मिळाला. ग्रंथ वाचून आनंद झाला. **येथे मी त्यांना आदरपूर्वक नमस्कार करतो.**
इच्छा असल्यास आपणही तो ग्रंथ वाचून पहावा असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.
त्यायोगे आपल्या गीताविषयक ज्ञानामधे बरीच भर पडेल. असो.
मला पडलेला प्रश्न हाच की, अर्जुनाने काहीही विचारले नसल्यामुळे, सरळ अठराव्या अध्यायातल्या बहात्तराव्या श्लोकातला प्रश्न विचारून, त्याचे अपेक्षित उत्तर मिळाल्यावर मग आपल्या विवेचनाचा समारोप करून, त्याला —
' अर्जुना ऽऽ, आता तू परत गांडीव धारण कर आणि रथावरील आपल्या जागेवर उभा रहा. आपण युद्धाला सुरवात करूया.' असे सांगण्याच्या ऐवजी, **श्रीकृष्ण भगवान** एका वेगळ्याच विषयाला सुरवात करतात. ती कशासाठी?
ज्ञानेश्वरीचा तेरावा अध्याय वाचला. विस्ताराच्या दृष्टीने विचार केला तर हा अध्याय दुसऱ्या क्रमांकावर आहे.
पहिला क्रमांक अर्थातच अठराव्या अध्यायाचा. तेराव्या अध्यायाच्या ३४ श्लोकांवर ११६९ ओव्या रचलेल्या आहेत.
त्यातही, सातव्या आणि अकराव्या श्लोकांवर तर भाष्याचा अतिरेक केलेला आहे. ह्या दोन श्लोकांच्यासाठी ५७७ ओव्या रचलेल्या आहेत. म्हणजे ह्या दोन श्लोकांनी अर्धा अध्याय व्यापलेला आहे. अनेक उपमांची पुनरावृत्ती केलेली आहे.
उदाहरणादाखल सांगायचे तर सातव्या श्लोकावर ३२८ ओव्या रचलेल्या आहेत.
त्यामधील अहिंसा आणि गुरुभक्ती ह्या दोन विषयांवरील ओव्या वाचताना तर कंटाळा यायला लागतो.
' ज्ञानोबा ऽऽ, अहो हे पुरे झाले! आता पुढे चला की ऽऽ!' असे म्हणावेसे वाटते. ज्ञानदेवांनाही त्याची जाणीव होती.
परंतु बोलण्याच्या ओघात ते स्वत:ला आवरू शकलेले नाहीत.
म्हणून विवेचन करीत असताना त्यांनी, ' मर्यादा सोडून, विस्ताराचा अतिरेक केल्याबद्दल ' श्रोत्यांची क्षमाही मागितली आहे.
**अहिंसक** मनुष्य आणि **गुरुभक्त** शिष्य, ह्यांची त्यांनी जी लक्षणे सांगितली आहेत, ती एखाद्याने जशीच्या तशी आचरणात आणायचे ठरविले तर त्याला ज्ञान प्राप्त करताच येणार नाही आणि जिवंतही राहता येणार नाही.
आपण त्या ओव्या वाचून पहा आणि त्यांचा अर्थ समजून घ्या म्हणजे आपल्याही तसेच वाटेल.
सांगायचा मुद्दा हा की, अती म्हणता येईल इतके विवेचन करूनही, त्यामधे ह्या प्रश्नाचे विषयी काहीही सांगितलेले नाही.

आचार्य विनोबांचे तेराव्या अध्यायाचे प्रवचन वाचले. त्यामधे ह्या अध्यायाविषयी त्यांनी जे सांगितले आहे, त्याचा सारांश त्यांच्याच शब्दात ऐका.

' गीतेमधे **स्वधर्मा** वर जोर दिलेला आहे. ह्या स्वधर्माचरणाला गीता **कर्म** असे म्हणते. स्वधर्माचरणरूप कर्माभोवती, रक्षणासाठी पुष्कळ वस्तू उभ्या केलेल्या आहेत. अनेक विकर्मे रचलेली आहेत. स्वधर्माचरण सजविण्यासाठी, ते साजरे सुंदर करण्यासाठी, ते सफल करण्यासाठी, ज्या ज्या मदतीची अपेक्षा असेल ती ती सर्व मदत देणे गरजेचे आहे. त्यासाठीच आतापर्यंत आपण पुष्कळ वस्तू पाहिल्या. त्यातील बऱ्याचशा वस्तू भक्तीच्या स्वरूपाच्या होत्या.

आज ह्या तेराव्या अध्यायात जी वस्तू पहायची आहे ती विचारस्वरूप आहे. कर्म करणे व त्याचे फळ टाकणे ही वस्तू केवळ असामान्य आहे. म्हणूनच गीतेतील कर्मयोग आचरणारा असा, ' संपूर्ण कर्मयोगी ' लाखांत एखादाच असतो.

आतापर्यंत ' कर्म करावे व त्याचे फळ टाकावे ' हेच पृथक्करण मांडलेले आहे. त्याला उपयोगी पडणारे असे दुसरे महान पृथक्करण म्हणजे ' देह आणि आत्मा ' यांचे. हे पृथक्करण ह्या तेराव्या अध्यायात केलेले आहे. फळाचे टरफल काढून आतील गर चाखायचा. नारळ फोडून आतील पांढरेशुभ्र खोबरे खायचे. फणसाचे काटेरी चारखंड टाकून आतील रसाळ गरे खायचे.

ह्याचा अर्थ असा की स्वतःकडे पहायचे असो किंवा दुसऱ्याकडे पहायचे असो, प्रत्येक वस्तूचे बाह्यरूप आणि आतील गाभा ह्यांचे पृथक्करण करायचे. प्रत्येक वस्तूचे ' बाह्य देह आणि आतील आत्मा ' ह्याप्रमाणे दुहेरी रूप आहे. स्वधर्माचरणरूप कर्मामधेही अगदी असेच आहे. बाह्य फळ म्हणजे कर्माचा देह आहे आणि त्याने होणारी चित्तशुद्धी म्हणजे कर्माचा आत्मा आहे. दरएक ठिकाणी देह अलग करावा आणि आत्म्याची पूजा करावी. हेच पृथक्करण, विचारासाठी म्हणून, तेराव्या अध्यायात मांडले आहे.'

आचार्यांनी विचार चांगल्या प्रकारे मांडलेले आहेत. कोणालाही पटतील अशा प्रकारे सांगितलेले आहेत.

परंतु त्यांनीही ह्या प्रश्नाचे विषयी काहीही सांगितलेले नाही.

अशा प्रकारे शोध चालू असताना, एक दिवस ह्या प्रश्नाविषयी सविस्तर विवेचन वाचायला मिळाले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्यांना **' गुरूणाम् गुरू '** म्हणजे **' गुरूंचेही गुरू '** असे म्हटलेले आहे, त्या लोकमान्य टिळकांच्या **गीतारहस्यामधे** ह्याविषयीचे त्यांचे मत आणि संबंधित इतर बरीच माहिती वाचायला मिळाली. तिचा सारांश पुढील प्रमाणे —

' **क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार** गीतेमधे कसा आला हे कित्येकांस कळत नाही. ( मी सुद्धा त्यांच्यापैकीच एक आहे. )

त्यामुळे त्यांचा गोंधळ होतो. वास्तविक त्यामागचे कारण स्पष्ट आहे.

सातव्या अध्यायामधे जे **ज्ञानविज्ञान** सांगण्यास सुरवात केली त्याचे निरूपण अजून पूर्ण झालेले नाही. परमेश्वराचे पूर्ण ज्ञान होण्यासाठी बाह्यसृष्टीच्या **क्षर - अक्षर** ह्या विचाराबरोबरच मनुष्याचे शरीर आणि आत्मा ह्यांचाही विचार करावा लागतो.

ह्यालाच **क्षेत्र** ( शरीर ) आणि **क्षेत्रज्ञ** ( आत्मा ) असे म्हणतात.

जड प्रकृतीपासून सर्व पदार्थ निर्माण होतात असे जरी कळले तरीही, ' प्रकृतीच्या कोणत्या गुणामुळे तो विस्तार होतो व त्याचा क्रम कसा आहे?' हे सांगितल्याखेरीज ज्ञानविज्ञानाचे निरूपण पूर्ण होत नाही. म्हणून तेराव्या अध्यायामधे प्रथम **क्षेत्र - क्षेत्रज्ञ** विचार सांगून, त्यानंतर पुढील चार अध्यायांमधे गुणत्रयविभाग सांगून झाल्यावर, अखेरीस शेवटच्या अठराव्या अध्यायामधे एकंदर सर्व विषयाचा उपसंहार केलेला आहे. कर्मयोगामधे प्रधान असणारी साम्यबुद्धी प्राप्त होण्यासाठी, अगोदर परमेश्वराच्या सर्वव्यापी स्वरूपाचे ज्ञान झाले पाहिजे. मग ते व्यक्ताच्या उपासनेने होवो अथवा अव्यक्ताच्या उपासनेने होवो. कारण त्यामधे सुलभतेखेरीज दुसरा भेद नाही.

हाच ह्या सर्व निरूपणाचा अर्थ असून, सातव्या अध्यायापासून ते सतराव्या अध्यायापर्यंत जे जे विषय आले आहेत, ते सर्व विषय म्हणजे मूलतः **' ज्ञानविज्ञानच '** आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. सारांश काय तर, कर्मयोगसिध्यर्थ ज्या ज्ञान - विज्ञानाच्या निरूपणास सातव्या अध्यायात सुरवात झाली, त्याचीच पूर्तता तिसऱ्या षडध्यायीत केलेली आहे. ( अध्याय तेरा ते अठरा ) एकमात्र परमेश्वरच सर्व ब्रह्मांड अथवा क्षराक्षर सृष्टी व्यापून राहिलेला आहे ह्याचा अर्जुनाला, विश्वरूपदर्शनाच्या योगाने, प्रत्यक्ष अनुभव आणून दिल्यावर, हाच परमेश्वर ब्रह्मांडाप्रमाणेच पिंडातही म्हणजे मनुष्याच्या शरीरामधे अथवा **क्षेत्रा** मधे आत्मा ह्या रूपाने रहात असून, त्या आत्म्याचे म्हणजेच **क्षेत्रज्ञा** चे जे ज्ञान तेच परमात्म्याचे ज्ञान होय असा क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार तेराव्या अध्यायात सांगितलेला आहे.'

**( जे पिंडी तेच ब्रह्मांडी** आणि **जे ब्रह्मांडी तेच पिंडी )** तेराव्या अध्यायाविषयीचे हे त्यांचे मत झाले.

त्याशिवाय त्यांनी काही महत्त्वाची माहिती दिलेली आहे.

' गीतेच्या कित्येक प्रतींत तेराव्या अध्यायाच्या आरंभी एक श्लोक दिलेला असतो.

**अर्जुन उवाच —**

**प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्रं क्षेत्रज्ञमेव च ।**

**एतद्वेदितुमिच्छामी ज्ञानं ज्ञेयं च केशव ।। – ।।**

अर्थ — अर्जुन म्हणाला, ' मला प्रकृति, पुरुष, क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान व ज्ञेय म्हणजे काय ते जाणण्याची इच्छा आहे म्हणून आपण मला ते सांगा.'

पण क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार गीतेमधे कसा आला हे न कळल्यामुळे, आपल्या समजुतीनुसार त्याची योग्य संगती लावण्याच्या हेतूने, कोणीतरी हा श्लोक येथे मागाहून, ' घुसडून दिलेला असावा ' असे स्पष्ट दिसून येते. **त्यामुळे टीकाकार हा श्लोक प्रक्षिप्त मानतात.**
त्याशिवाय, तसे न केल्यास गीतेतील श्लोकांची संख्याही सातशेपेक्षा एक अधिक होते. म्हणून आम्ही देखील हा श्लोक प्रक्षिप्त मानतो.'

वर दिलेला अर्जुनाचा श्लोक मी केवळ त्यांच्याच ग्रंथामधे वाचला. आजपर्यंत इतर कोणत्याही ग्रंथामधे तो श्लोक किंवा त्यावरील भाष्य वाचलेले नाही. इतकेच नाही तर त्याचा साधा उल्लेखही वाचलेला नाही. तरीही ह्या सर्व विवेचनाद्वारे,
' ह्या अध्यायाचा संदर्भ सातव्या अध्यायाचे बरोबरच आहे. मात्र तो आठव्या अध्यायाच्या संदर्भाप्रमाणे स्पष्टपणे दिसत नाही इतकेच.' असे ते सांगतात.

परंतु मला ह्याविषयी अजूनही शंका वाटते आहे. त्याचे कारण सांगतो. आपण त्यावर विचार करावा ही नम्र विनंती आहे.
हा गीतोपदेशाचा प्रसंग, श्रीकृष्ण आणि अर्जुन आपल्या राजवाड्यामधे एकमेकांच्या बरोबर शांतपणे चर्चा करीत बसलेले असताना आलेला नाही, अथवा हे एखाद्या देवळामधे चाललेले श्रीकृष्णाचे प्रवचनही नाही. ही गोष्ट आपण लक्षात घ्या.

**प्रसंग युद्धाचा आहे.** दोन्ही बाजूंची सैन्ये समोरासमोर उभी आहेत. शंख फुंकून झालेले आहेत आणि आता एकमेकांना कधी भिडायचे ह्याचीच सगळे वाट पहात आहेत. त्या सर्वांच्या मधे, दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी हे सगळे चाललेले आहे.
त्यामुळे अर्जुनाला लवकरात लवकर युद्धासाठी परत उभा करणे हे श्रीकृष्णासाठी अत्यंत महत्त्वाचे काम आहे आणि तो इतका वेळ तेच काम करतो आहे.

अकराव्या अध्यायामधे अर्जुनाने जे काही पाहिले, त्यामुळे तो अंतर्बाह्य बदलून गेला आहे. त्याच्या मनामधे विषाद उरलेला नाही. दु:ख उरलेले नाही. कोणताही गोंधळ उरलेला नाही. स्वजनांच्या विषयीची अवाजवी आसक्ती उरलेली नाही.
**' आता यापुढे श्रीकृष्ण करायला सांगेल तेच करायचे. '** असा त्याचा निश्चय झालेला आहे. तरीही त्याने केवळ कुतुहलापोटी अजून एक प्रश्न विचारला आणि त्याचे उत्तर देण्यासाठी म्हणून श्रीकृष्णाने बारावा अध्याय सांगितला.
अर्जुनाला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. आता त्याचे प्रश्न संपले आहेत. तो, त्याच्याकडून अपेक्षित असलेली, कृती करण्याच्या मनस्थितीत आलेला आहे. मग तर्कशास्त्राच्या आधाराने आता काय व्हायला हवे?
आत्ता ह्या क्षणी आपण श्रीकृष्णाच्या जागी आहोत असे समजून मग विचार करा. मग आपण काय केले असते बरे? दुसरे काहीही नाही ' अर्जुनाला हातात गांडीव घेऊन, आपल्या जागेवर युद्धासाठी उभे रहायला सांगितले असते आणि एक मोठ्या अडचणीचे निवारण झाल्याच्या आनंदाने, घोड्यांचे लगाम हातात घेऊन, आपल्या जागेवर बसलो असतो.' होय की नाही?
निदान मी तरी असेच केले असते. तसे न करता, अर्जुनाने कोणताही प्रश्न विचारलेला नसताना, स्वत:हून मागील सातव्या अध्यायातला संदर्भ घेऊन, एका वेगळयाच विषयावर बोलायला सुरवात करायची आणि त्यामधे रणभूमीवर आणखी काही वेळ घालवायचा.
आणि हे सगळे कोण करतो आहे? एक महान नेता, अत्यंत बुद्धिमान, रणज्ञ, उत्तम मनोवैज्ञानिक, उत्तम राजनीतिज्ञ, उत्तम कूटनीतिज्ञ, उत्तम मार्गदर्शक आणि उत्तम वक्ता म्हणून जो सुविख्यात आहे, तो **' भगवान श्रीकृष्ण '** करतो आहे.
हे पटण्यासारखे आहे काय? आपल्याला पटते काय?
ज्याने ' पुढे प्रत्यक्ष युद्धाच्या अठरा दिवसांमधे, संधी मिळाल्यावर शत्रुपक्षाच्या महारथ्यांना मारताना, कोणालाही एक क्षणही वाया घालवू दिलेला नाही. तात्काळ कृती करायची आज्ञा करून, संबंधित योद्ध्यांना तशी कृती करायला लावली आहे,' तो भगवान श्रीकृष्ण, स्वत: असा वेळकाढूपणा **( Time pass )** करेल का? अगोदरच रणांगणावर ताटकळत उभ्या असलेल्या सर्व सैन्याला, आणखी काही काळ ताटकळत ठेवील काय? मला तरी ते शक्य वाटत नाही. त्याविषयी शंका वाटते. पण गीतेमधे तर तेरावा अध्याय आहे आणि तो देखील अर्थपूर्ण व महत्त्वाचाच आहे. वर उल्लेखिलेली शंका जर बाजूला केली तर मग कसलीच अडचण उरत नाही.
विशेष म्हणजे **परम पूजनीय लोकमान्य टिळकांनी,** अधिकार वाणीने त्यावर भाष्यही केलेले आहे. त्यांच्या समोर मी कोण आहे? कोणीही नाही. त्यांच्या पायाजवळ उभे राहण्याचीही पात्रता नसलेला माझ्यासारखा एक सामान्य मनुष्य यापुढे काय बोलणार?
काहीतरी बोलायचा प्रयत्न केला तरीही ते शक्य होणार नाही म्हणून, आता मी काहीही न बोलणेच शहाणपणाचे होईल.
माझ्या मनामधे जे विचार आले ते आपल्यासमोर मोकळेपणाने सांगितले.
आपल्याला ते पटले नसतील तरी त्याबद्दल आपण माझ्यावर रागावू नका.
एका अज्ञानी माणसाची वायफळ बडबड समजून तिच्याकडे दुर्लक्ष करा आणि मला क्षमा करा.
आपणा सर्वांच्याकडे एवढेच मागणे मागतो. असो.

तात्पर्य काय तर, सातवा अध्याय हा **ज्ञान - विज्ञान, क्षर - अक्षर** आणि **क्षेत्र - क्षेत्रज्ञ** ह्या तीनही विषयांचे उगमस्थान आहे. त्यापैकी पहिल्या दोन विषयांचे विवेचन यापूर्वी झालेले आहे आणि तिसऱ्या विषयाचे विवेचन करायला ह्या अध्यायात सुरवात होते आहे, असे म्हणायला हरकत नसावी. असो. आता आपण मूळ विषयाकडे वळूया.

तेराव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे. तो अर्जुनाला सांगतो आहे की, —

**श्रीभगवानुवाच :**

**इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**

**एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ।। १ ।।**

हे कौंतेया ! ह्या शरीरालाच क्षेत्र असे म्हटलेले आहे. हे शरीर जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ असे ह्या शास्त्रातील ज्ञाते पुरुष म्हणतात.

क्षेत्र ह्या शब्दाचा मूळ अर्थ ' शेत ' असा आहे. **क्षेत्र** म्हणजे **शेत.**

पण शेत म्हणजे तरी काय? शेत कशाला म्हणायचे?

' जे मुळामधे अचेतन असते, जे अस्तित्वात येते, जे दिसते, जे मोजता येते, ज्याचे ज्ञान होऊ शकते, ज्यामधे वाढ अथवा घट होऊ शकते, ज्याची नांगरणी करता येते, मशागत करता येते, ज्यामधे खत मिसळून त्याला कसदार व सुपीक करता येते, ज्यामधून पीक घेता येते, काही काळाने जे क्षीण होते, रोगग्रस्त होते, पडीक होते आणि अखेरीस नष्ट होते.' त्याला शेत असे म्हणतात.

क्षेत्रज्ञ ह्या शब्दाचा मूळ अर्थ ' शेताला जाणणारा ' असा आहे.

मग शेताला जाणणारा कोण? **क्षेत्रज्ञ** कोणाला म्हणायचे?

' जो शेताचा मालक असतो, ज्याला त्याचे संपूर्ण ज्ञान असते, जो त्याची योग्य प्रकारे निगा राखून, काळजी घेऊन, मशागत करून, त्यामधून पीक घेऊ शकतो ' त्याला शेतकरी असे म्हणतात. तोच त्या शेताला संपूर्णपणे जाणणारा **क्षेत्रज्ञ** असतो.

येथे शरीराला क्षेत्र म्हटलेले आहे आणि त्याला जो जाणणारा आहे त्याला क्षेत्रज्ञ म्हटलेले आहे. शेताचे जे गुणधर्म वरती सांगितलेले आहेत ते सगळेच्या सगळे शरीराला लागू होतात. जरा विचार करून पहा.

केवळ माणसाचेच नाही तर कोणत्याही प्राणिमात्राचे शरीर हे कसे असते?

शरीर मुळामधे अचेतन असते. ते स्वतःहून कोणतीही हालचाल करू शकत नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकत नाही. कोणतेही काम करू शकत नाही. शरीर हे जन्माला येते त्याच वेळी अस्तित्वात येते. ते आपल्याला दिसते.

त्यामधे वाढ होत असते. त्याचा आकार सारखा बदलत असतो आणि तो मोजता येतो. त्याचे सविस्तर वर्णन करता येते.

त्याची निगा राखता येते. चांगल्या संस्कारांच्याद्वारे त्याची मशागत करता येते. त्याचा उपयोग करून चांगले अथवा वाईट कर्म करता येते आणि त्या कर्माचे यथोचित फळ मिळविता येते. ते विकारी असते. त्याची अवस्था बालपण, तरुणपण, प्रौढपण, म्हातारपण इत्यादी रूपांमधे सतत बदलत असते. त्यामधे अनेक प्रकारचे रोग होतात. ते क्षीण होत जाते आणि अखेरीस नष्ट होते.

म्हणजे आपले शरीर हे **क्षेत्र** आहे. किंबहुना ज्या ज्या वस्तूला उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या अवस्थांमधून जावे लागते, त्या सर्व वस्तूंना **क्षेत्र** असे म्हणता येते. त्यामधे सूक्ष्म जीवजंतूंच्यापासून ते अंतरिक्षामधे वावरणाऱ्या ग्रह आणि ताऱ्यांच्यापर्यंत सर्वकाही समाविष्ट होते. कारण ह्या सर्वांना आदि आणि अंत असतो. याप्रमाणे आपले शरीर हे **क्षेत्र** आहे हे निश्चित केल्यावर मग त्याच्यापुढे — हे क्षेत्र किंवा हे शेत कोणाचे आहे? त्याचा मालक कोण आहे? त्याला संपूर्णपणे जाणणारा कोण आहे? हे प्रश्न सहजपणे उपस्थित होतात. ह्या शेताची संपूर्ण माहिती असलेला, ह्याची निगा राखणारा, काळजी घेणारा, मशागत करणारा आणि ह्यामधून पीक घेणारा असा **क्षेत्रज्ञ** कोण आहे?

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।**

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।। २ ।।**

हे भारता ! सर्व क्षेत्रांमधे क्षेत्रज्ञसुद्धा मीच आहे असे समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे जे ज्ञान तेच माझे ज्ञान मानलेले आहे.

**भारत ऽऽ!** अर्जुनाला हाक मारताना श्रीकृष्ण कोणता शब्द वापरतो आहे पहा.

**भा** म्हणजे **' प्रकाश '** आणि **रत** म्हणजे **' रममाण होणे.'**

ज्ञान हे प्रकाशमय आहे. प्रकाशरूप आहे आणि अर्जुन हा ज्ञानामधे रममाण होणारा, रत होणारा आहे म्हणजेच **ज्ञानी** आहे. म्हणून त्याला उद्देशून भारत हे विशेषण वापरलेले आहे. गीतेमधे अर्जुनासाठी एकवीस विशेषणे वापरण्यात आलेली आहेत. त्यापैकी बहुतेक शब्दांना विशेष अर्थ आहे. त्याचे अर्जुन हे नांव देखील विशेष असे आहे.

म्हणजे ते विशेषनामही आहे आणि विशेषणही आहे. **अर्जुन** म्हणजे **' सरळ स्वभावाचा.'**

ज्याच्या मनामधे कोणतेही कपट नाही असा जो माणूस, तो अर्जुन. असो.
ह्या शरीररूपी क्षेत्राचा मालक, त्याला संपूर्णपणे जाणणारा, त्याची काळजी घेणारा, मशागत करणारा आणि कर्मरूप बीजांची पेरणी करणारा असा क्षेत्रज्ञ म्हणजे स्वत: **परमेश्वर.**
आपल्या डोळयांना दिसणारे अथवा न दिसणारे हे सर्व विश्व, त्याच्या पासूनच निर्माण झालेले आहे, त्याच्या आधारानेच अस्तित्वात आहे आणि अखेरीस त्याच्यामधेच विलीन होणार आहे. म्हणून तो ' क्षेत्राला संपूर्णपणे जाणणारा एकमेव असा **क्षेत्रज्ञ.** '
चौऱ्याऐंशी लक्ष योनी आहेत. अगणित प्राणिमात्र आहेत. ती सगळीच क्षेत्रे आहेत. तरीही त्यामधे राहणारा क्षेत्रज्ञ मात्र एकच आहे.
**परब्रह्म - परमात्मा - परमेश्वर!** आपल्या शरीराच्या व मनाच्या एकूण व्यापाराचे निरिक्षण करून, त्यानंतर —
**' ते निर्माण कसे होते? स्वभावत: अचेतन असूनही हालचाल कसे करते? त्यामधे क्रिया प्रतिक्रिया कशा होतात? त्याचे नियमन कसे केले जाते?'**, ह्याचा सखोल विचार करून, त्यावरून शरीरामधे अस्तित्वात असलेले चैतन्य म्हणजेच आत्मतत्व कसे निष्पन्न होते ते जाणणे ह्या सर्व प्रक्रियेला क्षेत्र - क्षेत्रज्ञ विचार असे म्हणतात आणि क्षेत्र - क्षेत्रज्ञाविषयीच्या ह्या ज्ञानालाच परमेश्वराच्या विषयीचे ज्ञान असे म्हणतात. ह्यावर सर्वसाधारणपणे एकमत आहे.

**तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारी यतश्च यत् ।**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रृणु ॥ ३ ॥**
**ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधै: पृथक् ।**
**ब्रह्मसूत्रपदैश्चेव हेतुमद्भिर्विनिश्चितै: ॥ ४ ॥**

क्षेत्र म्हणजे काय, ते कशा प्रकारचे आहे, त्याचे विकार कोणते आणि त्यातही कशापासून काय होते, तसेच क्षेत्रज्ञ कोण व त्याचा प्रभाव काय हे मी संक्षेपाने सांगतो ऐक. अनेक प्रकारे, विविध छंदांनी, अनेक ऋषींनी आणि कार्यकारणरूप हेतू दाखवून पूर्ण निश्चित केलेल्या ब्रह्मसूत्रांतील पदांनी, हा विषय सांगितलेला आहे.
क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यांच्याविषयी अनेक विद्वानांनी आपापली मते मांडलेली आहेत.
अनेक संप्रदायांची आपापल्या निष्ठेनुसार वेगवेगळी श्रद्धा असते आणि त्यानुसार ह्या संकल्पनांचा अर्थ लावला जातो.
प्रत्येक संप्रदाय आपल्या मतांचे समर्थन करताना इतरांचा प्रतिवाद करीत राहतो. त्यामुळे त्यांच्यामधे सतत वादविवाद होत असतात.

**१) निरीश्वरवादी —**

प्राण्याच्या मृत्यूनंतर देहामधून बाहेर पडणारा **' आत्मा '** म्हणून काहीही नसते. देहाहून वेगळा असा आत्मा नांवाचा पदार्थ अस्तित्वात नसतो. आत्म्याला स्वतंत्र अस्तित्वच नाही. चैतन्याने युक्त असलेला देह हाच आत्मा आहे. देहभिन्न आत्मा कधीही नसतो.
देहरूप आत्माच असतो. **क्षेत्रही तोच आणि क्षेत्रज्ञही तोच.** तो देहाबरोबरच जन्मतो आणि देहाबरोबरच नष्ट होतो.
सर्व विश्व हे चार महाभूतांचेच बनलेले आहे. पृथ्वी, आप, तेज आणि वायू! ही चारही महाभूते प्रत्यक्ष अनुभवास येतात.
पण आकाश हे महाभूत प्रत्यक्ष अनुभवास येत नाही. म्हणून ते अस्तित्वातच नाही. चार महाभूतांचे विघटन झाले म्हणजे चैतन्याचा आपोआप नाश होतो. तेथेच देहरूप आत्मा संपून जातो. त्यामुळे पुनर्जन्माविषयीची समजूत खोटी आहे.

**२) जीववादी —**

शरीर हे संपूर्णपणे जीवाचेच असते. त्याच्याहून वेगळे नसते. तो असला तरच शरीर असते आणि तो नसला तर शरीर नसते.
म्हणून शरीररूपी क्षेत्राचा जीव हाच क्षेत्रज्ञ आहे. शरीरामधील पाच वायू, मन, पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये हे त्याचे सेवक आहेत. ह्यांचे द्वारे, तो शेतीची सर्व कामे करवून घेत असतो.
जर त्याने विषयरूपी शेतामधे कुकर्मरूपी बीज पेरले तर, पापाचे अचाट पीक येते आणि मग जीव हा अनेक जन्म दु:ख भोगतो.
अथवा जर त्याने विषयरूपी शेतामधे सत्कर्मरूपी बीज पेरले तर, पुण्याचे अफाट पीक येते आणि मग जीव हा अनेक जन्म सुख भोगतो.

**३) प्रकृतिवादी —**

सांख्यशास्त्र जिचे वर्णन करते, ती अनादि अशी जी प्रकृति, तिचे हे शरीररूपी क्षेत्र म्हणजे वतन आहे.
हे क्षेत्र वाहण्याच्या कामी मुख्य खटपट करणारे जे सत्त्व - रज - तम हे तीन गुण, ते तिच्याच पोटी उत्पन्न झालेले आहेत.
ह्या तिघांच्याकडून ती सर्व कामे करवून घेत असते.
रजोगुण पेरणी करतो. सत्त्वगुण रक्षण करतो आणि तमोगुण कापणी करतो.
त्यानंतर तमोगुण महत् तत्त्वाचे खळे तयार करतो आणि त्यामधे काळ मळणी करतो.
त्यावेळी सर्व सृष्टी अल्पकाळ लय पावते. ( ब्रह्मदेवाची रात्र होते )

**४) <u>संकल्पवादी</u> —**

शून्य असे जे ब्रह्म, त्या ब्रह्मरूपी शयनगृहामधे, बलवान असा संकल्प निद्रा घेत होता. तो एकाएकी जागा झाला.
त्याने **<u>' एकाचे अनेक '</u>** होण्याची इच्छा केल्याबरोबर त्याला त्रिभुवनरूपी ठेवा प्राप्त झाला.
तो ठेवा त्याच्यामुळेच व्यक्तदशेला आला. त्यानेच महाभूतरूपी पडीक जमीन, योग्य प्रकारच्या मशागतीने सारखी करून,
अंडज - स्वेदज - जारज - उद्भिज इत्यादी प्राणिवर्गाच्या चार हद्दी कायम केल्या.
एक दुसऱ्याच्या हद्दीत जाऊ शकणार नाही अशी व्यवस्था केली.
यानंतर प्रारंभास वेगवेगळ्या पंचमहाभूतांच्या मिश्रणाच्या योगाने वेगवेगळी शरीरे तयार केली.
मनुष्यशरीररूपी शेताच्या दोन बाजूस कर्म आणि अकर्माच्या दगडांचे बांध घालून, निकस अशा माळरानाची सुपीक जमीन तयार केली.
तेथे येण्याजाण्याकरिता त्यानेच जन्ममृत्युरूपी भुयार तयार केले.
मग या संकल्पाने, आपले आयुष्य आहे तेथपर्यंत अहंकाराबरोबर एकरूपता केली आणि भेदबुद्धीकडून चराचरांची लागवड करविली.
म्हणून तो संकल्पच ह्या शरीररूपी क्षेत्राचा मालक आहे. तोच क्षेत्रज्ञ आहे.

**५) <u>स्वभाववादी</u> —**

सर्व विश्वाची निर्मिती ही निसर्गत:च घडून येत असते. तो निसर्गाचा स्वभाव आहे.
प्रत्येक चल अथवा अचल वस्तुमात्राचा स्वभाव हेच जगताचे कारण आहे.
मोराचे रंगीबेरंगी असणे हा त्याचा स्वभाव आहे. कोकिळांना मधुर कंठ असणे हा त्यांचा स्वभाव आहे.
अग्नी उष्ण असतो. पाणी थंड असते. वारा समस्पर्श असतो. हे त्यांचे स्वभाव आहेत.
जर तुम्हाला हे मान्य नसेल तर मग जरा उत्तर द्या पाहू? पोकळीत ताऱ्यांच्या समूहास कोणी धारण केले?
आकाशाचे छत कोणी व कधी उभारविले? वाऱ्याने नेहमी हिंडत असावे ही कोणाची आज्ञा आहे?
आकाशात मेघांमधे पाणी कोणी भरले? पावसाच्या धारा कोण करतो? समुद्र कोण भरतो? शरीरावरील केसांची पेरणी कोण करतो?
हे सगळे त्यांचे त्यांचे स्वभावच आहेत आणि त्यानुसार सगळे घडून येत असते. वस्तूचे स्वत:पासून स्वत:सारखेच सतत निर्माण होणे हा देखील स्वभावच आहे. त्याप्रमाणे क्षेत्र हे स्वभावत:च झाले असून, कोणाचेही वतन नाही.
याला जो नीटनेटके जपतो त्यालाच हे उपभोगायला मिळते व इतरांना मिळत नाही.

**६) <u>काळवादी</u> —**

तुम्ही सगळे म्हणता तसे जर खरोखरच असेल तर, एका प्रश्नाचे उत्तर द्या पाहू.
या शरीररूपी क्षेत्राचा उपभोग एकटा काळच कसा काय घेतो? कारण तोच ह्या शरीररूपी क्षेत्राचा मालक आहे. तोच खरा क्षेत्रज्ञ आहे.
ह्या काळाचा अनिवार तडाखा तुम्ही सतत पहात असता आणि तो तुम्हालाही बसतो.
तरीही तुम्हा स्वमताभिमानी लोकांचा आपापल्या मतावरच भर असतो.
काळाच्या इतका सामर्थ्यवान दुसरा कोण आहे बरे? ह्या शरीराचे काय घेऊन बसला आहात?
सगळ्या त्रैलोक्याचे आकारमान काळाच्या पंजामधे धरले गेलेले आहे. तो क्षणार्धात होत्याचे नव्हते करून टाकतो.
सगळी पृथ्वी, तिच्या खाली असलेले सगळे पाताळलोक, तिच्या वर असलेले सगळे लोक, सगळे लोकपाल, सगळे देव, दानव, यक्ष, किन्नर इतकेच नाही तर प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या वास्तव्याचा जो सत्यलोक, त्यासकट सगळ्यांना नाहीसे करून टाकतो.
त्याच्या प्रभावामुळे सर्वच्या सर्व योनी जन्म आणि मृत्यूच्या चक्रामधे फिरत राहतात. म्हणून सर्वत्र काळाचीच सत्ता आहे आणि तोच ह्या सगळ्याचा उपभोग घेणारा आहे. हेच बोलणे खरे आहे. सत्य आहे.
बाकी सर्व काही बोलणे म्हणजे व्यर्थ बडबड करणे आहे. त्याला काहीही अर्थ नाही.
आपल्या माहितीसाठी ही काही मते सांगितली. अजूनही अशी अनेकविध मते असतील.
विशेष म्हणजे ह्यामधील कोणतेही मत सहजासहजी उडवून लावता येण्यासारखे नाही.
उलट वाचताना आपल्याला, त्या मतामधे तथ्य आहे असेच वाटायला लागते. असे हे क्षेत्राविषयीचे वाद आहेत.
आता यापुढील दोन श्लोकांमधे भगवान आपल्याला क्षेत्र म्हणजे नक्की काय ते स्पष्ट करून सांगणार आहेत. नीट लक्षपूर्वक ऐका.

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ।। ५ ।।**
**इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ।। ६ ।।**

पाच महाभूते, अहंकार, बुद्धी आणि प्रकृति, तसेच दहा इंद्रिये व एक मन आणि पाच इंद्रियांचे पाच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, संघात, चेतना आणि धैर्य ह्या तत्त्वांच्या समुदायास सविकार क्षेत्र म्हटले आहे.

आपले शरीर म्हणजे अनेक लहान मोठ्या भागांना **( Spare Parts )** एकत्र जोडून **( Assembly )** तयार केलेले एक यंत्र आहे **( Machine ).** त्यामधील काही भाग आपल्याला दिसतात तर काही भाग दिसत नाहीत.

ह्या यंत्रालाच क्षेत्र असे म्हटलेले आहे. मग असा प्रश्न पडतो की —

हे शरीररूपी क्षेत्र कसे आहे? हे कशापासून निर्माण झालेले आहे? ह्याला निर्माण करताना कशाकशाचा वापर केला गेलेला आहे? आता आपण तेच समजून घ्यायचा प्रयत्न करूया.

**' आकाश, वायू, तेज, आप** आणि **पृथ्वी '** ही पाच महाभूते आहेत.

ह्यांचे विशिष्ट गुणधर्म आहेत आणि विशेष म्हणजे ते गुणधर्म परस्पर विरोधी आहेत.

१) **आकाश** हे पहिले. सर्वात मोठे. शब्द हा त्याचा एकमेव गुणधर्म. कोणतीही वस्तू अस्तित्वात येण्यासाठी जी जागा **( Space )** लागते ती म्हणजे आकाश. ते दिसत नाही परंतु असते आणि त्यामुळेच सगळे विश्व अस्तित्वात येऊ शकते.

२) **वायू** हे दुसरे. शब्द आणि स्पर्श हे त्याचे दोन गुणधर्म. हे पण दिसत नाही तरीही असते आणि त्यामुळेच सर्व प्राणिमात्र जिवंत राहून आपापले व्यवहार करू शकतात.

३) **तेज** हे तिसरे. शब्द, स्पर्श आणि रूप हे त्याचे तीन गुणधर्म. हे दिसते आणि आपले प्रताप दाखवीत असते.

४) **आप** म्हणजे पाणी चवथे. शब्द, स्पर्श, रूप आणि रस हे त्याचे चार गुणधर्म. हे दिसते व आपले प्रताप दाखवीत असते.

५) **पृथ्वी** म्हणजे जमीन अथवा शेत अथवा माती हे पाचवे. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे त्याचे पाच गुणधर्म.

हे दिसते आणि आपले प्रताप दाखवीत असते.

ह्या पाच महाभूतांचे एकमेकांशी अजिबात पटत नाही. सतत एकमेकांना नष्ट करायला बघत असतात. ह्यांच्यामधे एकच समान गोष्ट आहे. ती म्हणजे त्यांचा स्वभाव. **' वळले तर सूत नाही तर भूत.'** असा प्रकार असतो.

तरीही ती एकत्र येतात आणि एकमेकांशी जुळवून घेत एकत्रपणे काम करतात. आपल्या **स्थूल** शरीरामधे त्यांचे अस्तित्व कुठे असते, तसेच **सूक्ष्म** शरीरामधे त्यांचा आविष्कार कसा होतो त्याविषयीही सांगितलेले आहे.

स्थूल शरीरामधील अस्थि, मांस, त्वचा, रक्तवाहिन्या आणि केस म्हणजे **पृथ्वीतत्त्व** आहे.

सूक्ष्म शरीरामधील शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पाच अनुभव म्हणजे **पृथ्वीतत्त्वा** चा आविष्कार आहे.

स्थूल शरीरामधील वीर्य, रक्त, लाळ, मूत्र आणि घाम म्हणजे **जलतत्त्व** आहे.

सूक्ष्म शरीरामधील हात, पाय, शिश्न, गुद आणि जीभ ही पाच कर्मेंद्रिये म्हणजे **जलतत्त्वा** चा आविष्कार आहे.

स्थूल शरीरामधील भूक, तहान, आळस, झोप आणि मैथुन म्हणजे **तेजतत्त्व** आहे.

सूक्ष्म शरीरामधील डोळे, नाक, कान, त्वचा आणि जीभ ही पाच ज्ञानेंद्रिये म्हणजे **तेजतत्त्वा** चा आविष्कार आहे.

स्थूल शरीरामधील चलनवलन, प्रसारण, निरोधन आणि आकुंचन म्हणजे **वायुतत्त्व** आहे.

सूक्ष्म शरीरामधील प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे पाच प्राण म्हणजे **वायुतत्त्वा** चा आविष्कार आहे.

स्थूल शरीरामधील काम, क्रोध, शोक, मोह आणि भय म्हणजे **आकाशतत्त्व** आहे.

सूक्ष्म शरीरामधील अंत:करण, मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार म्हणजे **आकाशतत्त्वा** चा आविष्कार आहे.

६) **अहंकार** — ज्यावेळी ह्या पंचमहाभूतांचा संयोग होतो त्यावेळी स्थूलदेहाचा आकार व्यक्त होतो आणि त्या स्थूलदेहाच्या द्वारे सूक्ष्मदेह क्रियाशील होतो. अशा वेळी **अहम्** म्हणजे **' मी '** पणाची जाणीव व्हायला सुरवात होते.
त्या जाणिवेलाच **अहंकार** असे म्हणतात. **' मी, माझे, मला, माझ्यामुळे, माझ्यासाठी, माझ्यासह '** ही सगळी अहंकाराचीच विविध रूपे आहेत. ह्या अहंकाराची एक विशेष गोष्ट आहे. तो सर्वसामान्य माणसाच्या मागे फारसा लागत नाही. लागला तरी मर्यादित प्रमाणात राहतो. पण जेव्हा माणूस मोठा होतो, सुशिक्षित होतो, विद्वान होतो, धनवान होतो, शक्तिवान होतो, सामर्थ्यवान होतो, सत्ताधीश होतो, त्यावेळेला ह्या अहंकारामधे अमर्याद वाढ होते. अहंकार एखाद्या समंधासारखा त्याच्या मानेवर स्वार होतो. त्याला नाही नाही ते करायला भाग पाडतो. इतकेच नाही तर सद्‌गुणी, चारित्र्यवान आणि स्वार्थत्यागी माणसालाही अहंकार घेरून टाकतो. त्याला इतस्तत: नाचवायला लागतो. किंबहुना, सद्‌गुणांचा आणि त्यागी वृत्तीचा अहंकार हा जास्त तीव्र असतो.

७) **बुद्धी** — कर्तव्य आणि अकर्तव्य, योग्य आणि अयोग्य, नैतिक आणि अनैतिक ह्याविषयी विचारपूर्वक निर्णय करण्याची प्रवृत्ती

आणि क्षमता म्हणजे बुद्धी. कोणतेही कर्म आणि त्याचे सुखदु:खादी परिणाम ह्यांच्याविषयी निर्णय करणारी, पाप आणि पुण्य, शुद्ध आणि अशुद्ध, चांगले आणि वाईट याविषयी विचारपूर्वक निवड करणारी, जिच्या सहाय्यानेच विषयांची परीक्षा केली जाते तिला **बुद्धी** असे म्हणतात.

८) **अव्यक्त** — मागे सातव्या अध्यायामधे, प्रकृती ही दोन प्रकारची असते असे सांगण्यात आलेले आहे. पहिली अपरा प्रकृती आणि दुसरी परा प्रकृती. पहिली प्रकृती ही अपरा म्हणजे जड म्हणजेच तुलनात्मक दृष्टीने कनिष्ठ आहे. दुसरी प्रकृती ही परा म्हणजे चैतन्यरूप म्हणजेच सर्वार्थाने श्रेष्ठ आहे. ती अनादि आहे, अनंत आहे, अखंड आहे, अजर आहे, अमर आहे, अविनाशी आहे. ह्या दोनही प्रकृतींना एकटे राहून स्वतंत्रपणे कशाचीही निर्मिती करता येत नाही. जेव्हा परा प्रकृतीचा अपरा प्रकृतीशी संयोग होतो, तेव्हाच जड प्रकृती सजीव होते. सचेतन होते. पंचमहाभूते, मन आणि बुद्धी क्रियाशील होते. अहंकार क्रियाशील होतो. त्या परा प्रकृतीलाच **अव्यक्त** असे म्हणतात.

**इंद्रिये** ही दोन प्रकारची आहेत. पाच **ज्ञानेंद्रिये** आणि पाच **कर्मेंद्रिये.**

९) **डोळे**, १०) **नाक**, ११) **कान**, १२) **त्वचा** आणि १३) **जीभ** ही पाच ज्ञानेंद्रिये आहेत. ह्यापैकी जीभ हे कर्मेंद्रियही आहे.

१४) **हात**, १५) **पाय**, १६) **उपस्थ**, १७) **गुद** आणि १८) **जीभ** ही पाच कर्मेंद्रिये आहेत. जीभ हे ज्ञानेंद्रियही आहे.

१९) **मन** — ज्याप्रमाणे आपली जीभ हे ज्ञानेंद्रियही आहे आणि कर्मेंद्रियही आहे, तसेच आपले मन हे देखील ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय असे दोन्ही आहे. त्याशिवाय त्याची विशेषता अशी आहे की, ते इतर सर्व इंद्रियांचे नियमन करते. त्यांना आपल्या ताब्यात ठेवते. त्यांना विशिष्ट कार्य करायला लावते. वेळप्रसंगी एखादे कार्य सक्तीने करायला भाग पाडू शकते. दुसरे म्हणजे, आपल्या बुद्धीने केलेला निर्णय हा सर्व इंद्रियांच्याकडून, मनाच्याद्वारेच अमलात आणला जातो. बुद्धीचा निर्णय मनाला मान्य झाला नाही तर तो अमलात येऊ शकत नाही. मनाला जे हवे असेल तेच घडून येते. मन तसे स्वतंत्रच असते.

**मन ही एक विचित्र अशी संकल्पना आहे.**

आजपर्यंत कोणीही आपल्या मनाला पाहिलेले नाही. ते कसे आहे ते देखील माहीत नाही.
ते आपल्या शरीरामधे कोठे असते त्या विषयी काहीही सांगता येत नाही.
परंतु माणसाला मन आहे हे नक्की आणि प्रत्येकाला त्याचा सतत अनुभव येत असतो हे देखील सत्य आहे.
मन अत्यंत शक्तिवान आहे. अत्यंत चपळ आहे. नाठाळ आहे. उनाड आहे. थांब म्हटले तर थांबत नाही.
ऐक म्हटले तर ऐकत नाही. त्याच्या भटकण्याला स्थलकालाची मर्यादा नाही. सदैव कुठे ना कुठे तरी फिरत असते.
आपल्या मानेवर, एखाद्या समंधासारखे कायम बसलेले असते. एवढ्या मोठ्या देहाला हवे तेथे फरफटत घेऊन जाते.
करू नये ते करायला लावते. नको ते करवून घेतल्यावर, त्याविषयी आनंद किंवा दु:खपण तेच करते.
ते रागही करते आणि प्रेमही करते. तिरस्कारही करते आणि लोभही करते. ते भ्याडही असते आणि धैर्यवानही असते.
त्यागीही असते आणि भोगीही असते. ते आसक्तही असते आणि विरक्तही असते. त्याची गती विलक्षण असते.
ते अणू एवढे अतिसूक्ष्मही असते आणि आकाशा एवढे अतिविशालही असते.
एका क्षणी ते समुद्राच्या तळाशी असेल तर दुसऱ्या क्षणी पर्वताच्या शिखरावर जाईल.
कधी काय करील, कसे वागेल, ते सांगताच येत नाही. त्याला आवर घालणे महाकर्मकठीण आहे. मी मी म्हणणारे पराभूत होतात. तसे करणे लाखांमधे एखाद्यालाच शक्य होते. इतरांना शक्य होत नाही. जी नाही असे म्हणता येत नाही आणि दाखवताही येत नाही अशी एक वस्तू म्हणा, पदार्थ म्हणा किंवा संकल्पना म्हणा, तिला **मन** असे म्हणतात.

**विषय** — जशी इंद्रिये दोन प्रकारची आहेत तसेच त्यांचे विषयही दोन प्रकारचे आहेत.
ज्ञानेंद्रियांचे विषय वेगळे आणि कर्मेंद्रियांचे विषय वेगळे.

२०) **शब्द** हा कानांचा विषय आहे. २१) **स्पर्श** हा त्वचेचा विषय आहे. २२) **रूप** हा डोळ्यांचा विषय आहे.

२३) **रस** हा जिभेचा विषय आहे. २४) **गंध** हा नाकाचा विषय आहे.

असे हे पाच ज्ञानेंद्रियांचे पाच प्रकारचे विषय आहेत.

२५) **तोंडाने स्वर, व्यंजन, अक्षरे, शब्दांचा उच्चार करणे** हा जिभेचा विषय आहे.

२६) **घेण्याची व देण्याची क्रिया करणे** हा हातांचा विषय आहे.

२७) **चालणे, धावणे, चढणे, उतरणे, उठणे, बसणे** हा पायांचा विषय आहे.

२८) **मूत्राचा त्याग करणे** हा उपस्थाचा विषय आहे. २९) **मळाचा त्याग करणे** हा गुदाचा विषय आहे.

असे हे पाच कर्मेंद्रियांचे पाच प्रकारचे विषय आहेत

३०) **इच्छा** — मागे **भोगलेल्या** किंवा **उपभोगलेल्या** गोष्टींच्या आठवणींनी एक वृत्ती जागी होते. ती सकारात्मक असू शकते किंवा नकारात्मकही असू शकते. शरीराला आणि मनाला दु:ख देणाऱ्या, वेदना देणाऱ्या, अपमानित करणाऱ्या अशा यातना भोगल्यानंतर त्यांच्या आठवणीही नकोशा वाटतात. त्याविषयी कोणीही काहीही बोलू नये, किंबहुना तो विषयच काढू नये असे वाटते. ही झाली नकारात्मक वृत्ती.

शरिराला आणि मनाला सुख देणाऱ्या, आनंद देणाऱ्या अशा गोष्टी उपभोगल्यानंतर त्यांच्या आठवणींनी आनंद होतो. त्याविषयी इतरांच्या बरोबर बोलावे, आपले अनुभव सांगावे असे वाटते. त्या गोष्टींचा परत परत उपभोग घ्यावा असे वाटते. ही झाली सकारात्मक वृत्ती.

एकदा ही वृत्ती जागी झाली म्हणजे तिची पूर्तता करण्यासाठी मन एकसारखे प्रयास करायला लागते. चोहीकडे धावायला लागते. बुद्धीचे ऐकेनासे होते. ह्या वृत्तीला **इच्छा** असे म्हणतात.

३१) **द्वेष** — ज्यावेळी इच्छा केल्याप्रमाणे, इंद्रियांना इच्छित विषय प्राप्त होत नाही, त्यामधे काहीतरी विघ्न येते, कोणीतरी विघ्न आणतो आणि इच्छा पूर्ण होणार नाही अशी परिस्थिती निर्माण होते, त्यावेळी उत्पन्न होणारी जी वृत्ती तिला **द्वेष** असे म्हणतात. द्वेष हा व्यक्तिविषयक, वस्तूविषयक अथवा परिस्थितीविषयक असू शकतो.

३२) **सुख** — प्रिय वस्तूच्या, प्रिय विषयाच्या किंवा प्रिय प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि हवीशी वाटणारी अशी जी अनुकूल संवेदना असते तिला **सुख** असे म्हणतात.

३३) **दु:ख** — अप्रिय वस्तूच्या, अप्रिय विषयाच्या किंवा अप्रिय प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि नकोशी वाटणारी अशी जी प्रतिकूल संवेदना असते तिला **दु:ख** असे म्हणतात.

३४) **चेतना** — सर्व प्राणिमात्रांच्याकडे हालचाल करण्याची शक्ती असते. त्या शक्तीच्यायोगे सर्वजण आपापले व्यवहार करीत असतात. ही शक्ती आत्म्याहून निराळी आहे. विशेष आहे. शरीरामधे जीवात्मा आहे म्हणूनच जीवन आहे हे सत्य आहे. परंतु जर शरीरामधे ही विशेष अशी शक्ती नसेल तर, जिवंत असूनही कोणताही प्राणी हालचाल करू शकणार नाही. आपले नियमित व्यवहार करू शकणार नाही. ही गोष्ट देखील सत्य आहे.

बेशुद्ध पडलेल्या माणसाच्या शरीरामधे जीव असतो, परंतु तो काहीही करू शकत नाही. कोणतीही हालचाल करू शकत नाही. पाहू अथवा बोलू शकत नाही.

विकलांग माणसाच्या शरीरामधेही जीव असतो, परंतु तो स्वत: एखादी क्रिया करण्यास समर्थ नसतो. इतरांच्या मदतीवाचून काहीही करू शकत नाही.

दीर्घ काळ बेशुद्धीत असलेल्या **( Coma )** माणसाच्या शरीरामधेही जीव असतो परंतु तो काहीही करू शकत नाही. केवळ त्याचा श्वास चालू असतो इतकेच. बाकी तो असून नसल्यासारखाच असतो.

असंग, साक्षीभूत अशा आत्म्याची, जड अशा देहामधे जी अभिव्यक्ती आहे, जी सर्व शरीरामधे सदैव जागृत असते आणि जड देहाला उत्तेजित करते, जिच्यामुळे मन आणि बुद्धी प्रसन्न असतात, कार्यक्षम असतात, तिला **चेतना** असे म्हणतात.

३५) **धृति** — वर सांगितलेली ही जी तत्वे आहेत त्यांचे स्वभाव एकमेकांशी मिळते जुळते नाहीत तर भिन्न आहेत. पंचमहाभूतांचे तर एकमेकांशी वैरच आहे.

**पृथ्वी** स्वत:मधेच बदल घडवून, त्याद्वारे तिच्यावर वास्तव्य करणाऱ्या सर्व प्राणिमात्रांना नष्ट करू शकते आप, तेज आणि वायू ह्यांना अटकाव करू शकते. अडथळे निर्माण करू शकते.

**आप** म्हणजे पाणी पृथ्वीचा विनाश करते.

पाण्याला **तेज** म्हणजे अग्नी ताप देतो आणि आटवून टाकतो. या उलट संधी मिळाली तर पाणी अग्नीला नष्ट करते.

अग्नीला **वायू** म्हणजे वारा नष्ट करतो. विझवून टाकतो. या उलट संधी मिळाली तर वाऱ्यामुळे अग्नी अत्यंत वेगाने पसरू शकतो.

वाऱ्याला **आकाश** म्हणजे अवकाश गिळून टाकते. अवकाश हे इतर चारही महाभूतांना स्वभावत:च नाहीसे करते. असे असूनही ती पंचमहाभूते एकत्र येतात. आपापसांतले वादविवाद सोडून एकमेकांना मदत करतात. एकमेकांचे पोषण करतात. त्यांच्या बरोबर इतर सगळी तत्वे देखिल एकत्र येतात. गुण्यागोविंदाने नांदतात आणि देहाच्या रूपाने व्यक्त होतात. हे कार्य ज्या एका वृत्तीने होते, तसेच ती वृत्ती सतत सांभाळूण ठेवणे, विचलीत होऊ न देणे, हे ज्या एका

धैर्याने होते त्याला **धृति** असे म्हणतात.

३६) **संघात** — येथपर्यंत सांगितलेल्या पस्तीस तत्त्वांचा **( Spare Parts )** एकत्र आलेला आणि जिवाभावाने एकत्र असणारा जो समुदाय **( Assembly )**, त्या एकसंध समुदायाला **संघात** असे म्हणतात आणि त्यालाच शरीररूपी सविकारी क्षेत्रामधील अखेरचे तत्व म्हटले आहे.

ह्या सगळ्याचा सारांश सांगायचा तर, ' आपले शरीर म्हणजे ह्या छत्तीस तत्त्वांचा समुदाय आहे आणि त्या समुदायालाच **' क्षेत्र '** असे म्हटलेले आहे. आता ह्या क्षेत्राला जाणणारा जो क्षेत्रज्ञ, त्याविषयीचे ज्ञान म्हणजे काय? कोणत्या ज्ञानाला क्षेत्रज्ञाविषयीचे ज्ञान म्हणायचे? असा प्रश्न पडतो. ह्याचे उत्तर, **' त्या ज्ञानाच्या प्राप्तीचे मनुष्याच्या स्वभावावर जे परिणाम घडून येतात '** त्यांचे वर्णन करून, त्याद्वारेच देण्यात आलेले आहे. तसे करण्यामागे विशेष असे कारण आहे असे मला वाटते.

क्षेत्रज्ञाचे ज्ञान होणे ह्याचा अर्थ, त्याविषयी केवळ बुद्धीने जाणणे असा नाही.

त्या ज्ञानाचा माणसाच्या एकूण देहस्वभावावर परिणाम झाला पाहिजे आणि तो परिणाम त्याच्या आचरणाद्वारे दिसून आला पाहिजे. तसे झाले नाही तर ते ज्ञान अपूर्ण आहे असाच निष्कर्ष काढावा लागेल.

जर **' इतरांनी आपल्याबरोबर चांगल्या प्रकारे वागावे '** असे वाटत असेल तर —

**' अगोदर आपण इतरांच्याबरोबर चांगल्या प्रकारे वागले पाहिजे,'** हे माहीत असले तरीही, जोपर्यंत आपण त्याप्रमाणे वागत नाही आणि इतरांना तसे जाणवत नाही, तोपर्यंत आपल्याला खरोखरच ते ज्ञान झाले आहे असे म्हणता येत नाही. आपले वर्तन हेच त्या ज्ञानाच्या अस्तित्वाचा पुरावा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे क्षेत्रज्ञ असा जो परमेश्वर त्याचे यथार्थ वर्णन करता येतच नाही.

परब्रह्म परमात्मा म्हणजे, भाषण करायचा, प्रवचन करायचा अथवा चर्चा करायचा विषय होऊच शकत नाही.

तो केवळ अनुभवायचा विषय आहे. रोजच्या व्यवहारातले एखादे उदाहरण सांगायचे झाले तर,

**' पूर्णपणे पिकलेला, रसाळ हापूसचा आंबा किती गोड असतो? '** हे भाषण करून किंवा चर्चा करून सांगता येणार नाही आणि समजा कोणी तसा प्रयत्न केला तरी ऐकणाऱ्याला ते समजणारही नाही.

त्याऐवजी जर एकदा आंबा खाऊन पाहिला आणि त्याच्या गोडीचा अनुभव घेतला तर मग शब्दांची गरजच उरणार नाही.

खाणाऱ्याचा चेहराच बोलायला लागेल आणि त्या गोडीचे प्रतीक होईल.

येथेही तसाच प्रकार आहे. परमेश्वर कसा आहे? हा स्वत: अनुभवायचा विषय आहे. इतरांनी घेतलेल्या अनुभवाचा, आपल्याला काहीही उपयोग होत नाही. आपली आपण प्रचिती घ्यायचा विषय आहे. तशी प्रचिती आली म्हणजे मग, त्या माणसाच्या एकूण स्वभावावर, त्याच्या वागण्यावर आणि चालण्या बोलण्यावर तिचा परिणाम सहजपणे दिसून यायला लागतो.

तो इतरांनाही जाणवतो आणि त्यांना त्या माणसामधे, **' परमात्म्याचे प्रतिबिंब '** दिसायला लागते.

मग ' त्याला शरीररूपी क्षेत्रामधे असलेल्या क्षेत्रज्ञाचे म्हणजेच परब्रह्म परमात्म्याचे यथार्थ ज्ञान झालेले आहे.' असाच निष्कर्ष निघतो.

पुढील पाच श्लोकांमधे परमेश्वराचे यथार्थ ज्ञान झाल्यावर माणसाच्या देहस्वभावावर कोणकोणते परिणाम होतात ते सांगितले आहेत.

**अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ।। ७ ।।**

मान नसणे, दंभ नसणे, अहिंसा, क्षमा, सरळपणा, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, स्थैर्य आणि मनोनिग्रह;

**अमानित्वम्** — स्वत:ची योग्यता असूनही, कोणाकडूनही कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानाची अपेक्षा नसणे. आपला मोठेपणा, आपली बुद्धिमत्ता, आपली पूजनीयता जाणून कोणी नमस्कार केला तर तोही नकोसा वाटणे. प्रसिद्धी ही एखाद्या संकटासारखी वाटणे आणि तिला दूर करणे. आदरसत्कारापासून दूर राहणे.

**अदंभित्वम्** — आपण केलेले तप, दान, स्वाध्याय आणि पुण्यकर्म ह्यांचा वाणीने अथवा देहबोलीने कधीही उच्चार न करणे. त्याविषयी कोणत्याही प्रकारे गर्व न बाळगणे आणि त्यामुळे इतरांना तुच्छ न लेखणे. इतरांच्यावर केलेले उपकार लगेच विसरून जाणे. त्यांच्या परतफेडीची अपेक्षा न बाळगणे.

**अहिंसा** — कधीही कोणालाही, शारिरीक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारांनी इजा न करणे. तसा विचारही न करणे.

**क्षांतिः** — इतरांच्याकडून झालेल्या अपराधांविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करणे. त्यांना शासन करण्याची शक्ती असूनही, तसे न करणे. त्यांचा राग अथवा तिरस्कार न करता, त्यांना सुधारण्याची संधी देणे. मान आणि अपमान, स्तुती आणि निंदा, अपेक्षित आणि अनपेक्षित, सुख आणि दु:ख, ह्यांना सारखेपणाने सहन करणे.

**आर्जवम्** — मनाने, वाणीने आणि शरीराने अत्यंत सरळपणे वागणे. कधीही, कुठेही संशयास्पद वर्तन न करणे. कोणत्याही प्रकारे कपट अथवा कारस्थान न करणे. सर्वांच्या बरोबर, आपपरभाव न बाळगता, एकसारखेच वागणे. क्षूद्रबुद्धीने न वागणे.

**आचार्योपासनम्** — आपल्याला जो विद्यादान करतो, उपदेश करतो आणि सन्मार्गाने चालण्यासाठी मार्गदर्शन करतो तो आपला **आचार्य** म्हणजेच **गुरू.** धर्मशास्त्रामधे गुरूला प्रत्यक्ष परमेश्वराचेच स्थान देण्यात आलेले आहे. अशा गुरुदेवांच्या जवळ राहणे ( गुरुकुलामधे राहणे ) त्यांना नमस्कार करणे, त्यांची मनोभावे सेवा करणे, त्यांच्या सर्व आज्ञांचे तंतोतंत पालन करणे, सदैव त्यांना अनुकूल असे वर्तन करणे आणि त्यांना सुखकारक होणे.

**शौचम्** — शरीर आणि मन ह्यांची शुद्धता पाळणे. आहार, विहार, आचार आणि शरीर ह्यांची शुद्धी म्हणजे **बाह्यशुद्धी.** विचारांची शुद्धी, काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर इत्यादींचा नाश होऊन अंत:करण संपूर्णपणे शुद्ध होणे म्हणजे **अंतरशुद्धी.** कोणत्याही मनोविकाराने अथवा विषयांच्या संबंधाने वृत्ती लिप्त न होणे आणि विकार न बळावणे. सदैव अंतरबाह्य शुद्धता पाळणे.

**स्थैर्यम्** — कोणतीही मानसिक पीडा, निराशा, म्हातारपण, रोग, निंदा, अपमान, दारिद्र्य इत्यादींचा सामना करायची वेळ आली तरीही विचलित न होणे. सगळ्याला शांतपणे आणि धैर्याने सामोरे जाणे. मनामधे चंचलता न येणे, विचारांची स्थिरता न बिघडणे आणि आपला स्वधर्म आणि स्वकर्तव्य ह्यांचे निष्ठेने पालन करणे.

**आत्मविनिग्रह:** — पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये ह्यांच्यासह शरीर आणि मन ह्यांना वश करणे. आपल्या ताब्यात ठेवणे आणि विकारांच्या आधीन होऊ न देणे. त्यांना योग्य वळण लावणे. योग्य मार्गावर वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे.

**इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।**
**जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम् ।। ८ ।।**

इंद्रियांच्या विषयांचे ठायी विरक्ती, अहंकार नसणे आणि जन्म, मृत्यु, जरा, व्याधी व दु:ख हे आपल्या मागे लागलेले दोष आहेत अशी बुद्धी असणे;

**वैराग्यम्** — इहलौकिक आणि पारलौकिक अशा सर्व भोगांच्या विषयी संपूर्णपणे उदासीन असणे, दहा इंद्रिये आणि मन ह्यांच्याद्वारे उपभोग घेण्याचे असे जे जे विषय आहेत ते सगळे दु:खाचेच कारण आहेत हे ज्ञान झाल्यामुळे त्यांच्यापासून दूर राहणे.

**अनहंकार:** — कोणत्याही प्रकारचा अहंभाव नसणे. **' मी '** पणा नसणे. ' माझ्या कडून जे काही घडते आहे ते परमेश्वराच्या इच्छेनुसार घडत असून, तोच माझ्याकडून सर्व काही करवून घेतो आहे,' ह्या सत्याचे ज्ञान असल्यामुळे आपले शरीर, इंद्रिये, मन आणि बुद्धी ह्यांच्या विषयीचा अभिमान नाहीसा होणे.

**जन्ममृत्युजराव्याधीदु:खदोषानुदर्शनम्** —

**जन्म** — कोणत्याही प्राण्याचे **' जन्माला येणे '** ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. ती एकूण प्रक्रिया अत्यंत क्लेशदायक, यातनामय आणि अमंगल अशीच आहे. ज्याला आपण आयुष्यभर कुरवाळत असतो, सांभाळत असतो, रक्षण करायचा प्रयत्न करीत असतो, ज्याचा सदैव गर्व बाळगत असतो, ज्याला नाना प्रकारे सजवीत असतो आणि सगळीकडे मिरवीत असतो, त्या देहाच्या इतके अपवित्र दुसरे काहीही नाही. हे त्रिवार सत्य आहे. आपला देह म्हणजे घाणीचे आगरच आहे. शरीरामधे, जिथे घाण नाही, अशी एकही जागा सांगता येणार नाही. शोधूनही सापडणार नाही. अहो ऽऽ, ज्याची उत्पत्तीच अशुद्ध आणि अमंगल पदार्थांच्यापासून झालेली आहे, ते शुद्ध आणि मंगल कसे असेल? त्याला कितीही वेळा आंघोळ घातली, पावडर लावली, रंगरंगोटी केली, सुवासिक अत्तर चोपडले तरी त्याचा काहीही उपयोग नाही. ते जसे असते तसेच राहते.

**मृत्यू** — जन्माला आल्यापासून मरेपर्यंतचा प्रवास म्हणजे **जीवन.** हा प्रवास संपणे म्हणजे मृत्यू. **' मरणाची '** गोष्ट देखील तशीच असते. मृत्युची चाहूल लागली म्हणजे अपरंपार वेदना होतात. ज्या शरीराला सदैव जपत आलो, ज्याची काळजी घेतली आणि ज्याच्यावर सर्वांत जास्त माया केली त्याला, इच्छा नसताना, सोडून जाणे हे अत्यंत क्लेशदायक होते. आयुष्यामधे जे जे मिळविले आणि ज्याविषयी गर्व बाळगला ते सर्व काही, आपल्या मनाविरुद्ध, जबरदस्तीने सोडून जाणे हे यातना देणारे आणि निराशाजनक असते. अनेक शारिरीक पीडा सहन कराव्या लागतात. सर्व आप्तेष्ट, जिवलग, पत्नी, मुलेबाळे, मित्र आणि सहकारी ह्यांना शोक करतांना पाहून, त्यांचे रडणे ऐकून अपरंपार दु:ख होते. ते टाळता येत नाही.

**जरा** — बालपण संपते, तारुण्य नाहीसे होते आणि प्रौढपणही ओसरते, त्यानंतर जे उरते ते म्हणजे **जरा** अथवा म्हातारपण. ' म्हातारपण ' म्हणजे तर साक्षात् यातना असतात. सगळी इंद्रिये शिथिल होतात. शक्तिहीन होतात. अंथरुणात पडून राहिलेले असताना, इच्छा असली तरीही उठून बसता येत नाही, उभे राहता येत नाही, चालता येत नाही. कुणाची तरी मदत घेतल्याशिवाय काहीही करता येत नाही. ह्या सगळ्याचा अनुभव आल्यावर जगणे नकोसे वाटते. तरीही मरायची तयारी नसते. मनामधे इच्छा, आकांक्षा, कामना, वासना ह्यांच्या लाटा उसळतच राहतात. पण त्यांची पूर्तता करणे अशक्य होते. आपण इतरांच्यासाठी त्रासदायक होऊन बसतो आणि ते समजत असूनही काहीही करू शकत नाही. हे केवळ शरीराच्या

दुबळेपणाचे परिणाम आहेत. म्हातारपणाचे परिणाम आहेत. त्यामधे जर एखादा अथवा अनेक रोग झालेले असतील तर मग बघायलाच नको.

**व्याधी** — व्याधी म्हणजे शरीरावर आणि मनावर होणारे विविध रोगांचे आक्रमण. हे आयुष्यभर अधूनमधून होतच असते आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या सर्व यातनाही भोगाव्या लागतात. त्यामधून कोणाचीही सुटका नाही.
शरीरामधून प्रगटणारे रोग म्हणजे **आध्यात्मिक व्याधी** होत. बाह्य कारणांच्यामुळे शरीराला होणारे रोग म्हणजे **आधिभौतिक व्याधी** होत आणि स्वत:च्या शुभाशुभ कर्मामुळे मृत्यूच्या नंतर जे स्वर्ग - नरक इत्यादी भोग भोगावे लागतात, यमयातना भोगाव्या लागतात ते सर्व भोग म्हणजे **आधिदैविक व्याधी** होत.

**दु:ख** — अप्रिय वस्तूच्या किंवा प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि नकोशी वाटणारी अशी प्रतिकूल संवेदना म्हणजे दु:ख. हे सदैव आपल्या पाठीशी लागलेले असते. कोणालाही टाळता येत नाही. ह्याचा अभाव असणे म्हणजे सुख असे आपण समजतो. कित्येक वेळा आपण आपल्या कर्मानेच दु:ख ओढवून घेत असतो. आपल्याकडे जे असते त्यामधे समाधान नसते. त्याऐवजी आपल्याकडे जे नसते त्याविषयी आसक्ती असते. ते मिळविण्याच्या नादात, आपल्याकडे जे असते त्याचा उपभोग घेणे राहून जाते. त्याचे सुखही प्राप्त होत नाही.

**दोषानुदर्शन** — वरील पाचही गोष्टी म्हणजे आपल्याच पूर्वसंचिताची फळे असतात. हे आपल्या मागे लागलेले हे दोष आहेत असे जाणणे, त्यावर विचार करणे व त्या दोषांपासून मुक्त होण्यासाठी सतत प्रयत्न करणे.

मानवी शरीर हे प्रत्यक्षात कसे आहे त्याविषयी, **ज्ञानेश्वर महाराजांनी** ज्ञानेश्वरीच्या आठव्या अध्यायामधल्या, अकरा ओव्यांमधे ( ओव्या १४० ते १५० ) वर्णन केलेले आहे. ते काय सांगतात ते नीट ऐका.

' हे शरीर म्हणजे दु:खरूप वृक्षांची बाग आहे. अध्यात्मादि तीन तापरूपी विस्तवाची शेगडी आहे.
मृत्युरूपी कावळ्यास उतरवून टाकलेला बळी आहे. हे दैन्य प्रसवणारे आहे, मरणाला पोसणारे आहे व सर्व दु:खांचे भांडवल आहे.
हे दुष्ट बुद्धीचे उत्पत्तिस्थान आहे व वाईट क्रियांचे फळ आहे. हे मूर्तिमंत अविवेकच आहे, संसाराची बैठक आहे.
विकाररूपी झाडांची बाग आहे. हे सर्व रोगांचे ताट आहे आणि मृत्यूचे खाऊन राहिलेले अन्न आहे.
हे मूर्तिमंत आशा आहे, जन्म व मृत्यूची वाहती वाट आहे. हे भ्रमाने भरलेले आणि संशयाने ओतलेले आहे.
हे वेश्येच्या स्नेहाप्रमाणे दिखाऊ आहे आणि विषयांचा अनुभव आणून देणारे सुपूजित यंत्रच आहे. हे राक्षसीची दिखाऊ कळकळ आहे.
हे निवालेल्या विषाचा घोट आहे. हे सावाचे सोंग घेतलेल्या चोराचा मिळविलेला विश्वास आहे.
हे रक्तपित्याचे आलिंगन आहे आणि हटकून मारणाऱ्या सापाचा मऊपणा आहे. हे पारध्याचे स्वाभाविक गायन आहे.
हे शत्रूचा पाहुणचार आहे. हे दुष्ट लोकांचा सन्मान आहे आणि सर्व अनर्थाचा समुद्र आहे. हे स्वप्नात पाहिलेले स्वप्न आहे.
मृगजळाच्या पाण्याने बहरास आलेले रान आहे. हे धुराच्या कणांनी बनविलेले आकाश आहे.
मानवी शरीर हे असे अनर्थकारक व खोटे आहे. ह्याच्यामधे अनेक दोष असून, ह्याच्या पासून अतिशय दु:ख प्राप्त होते.'
किती वस्तुनिष्ठ वर्णन केले आहे पहा. आपले शरीर तंतोतंत असेच आहे.

याही पुढे जाऊन अजून एक अत्यंत महत्वाचा संदर्भ सांगतो. जर आपल्याला **' जन्म, मृत्यू, जरा, व्याधी आणि दु:ख '** ह्या पाचही दोषांच्या विषयी सविस्तरपणे जाणून घ्यायचे असेल, तर आपण समर्थ रामदासस्वामींच्या **श्रीदासबोधा** मधील **सगुणपरीक्षा** नांवाचा तिसरा दशक संपूर्ण वाचावा असे माझे आग्रहाचे सांगणे आहे. त्यामधे सत्य परिस्थितीचे अत्यंत स्पष्टपणे वर्णन केलेले आहे.

पहिल्या समासाचे नांव आहे — **' जन्मदु:खनिरूपण.'** दोन ते पाच ह्या चार समासांचे नांव आहे — **' सगुणपरीक्षा.'**
सहाव्या समासाचे नांव आहे — **' आध्यात्मिक ताप.'** सातव्या समासाचे नांव आहे — **' आधिभौतिक ताप.'**
आठव्या समासाचे नांव आहे — **' आधिदैविक ताप.'** नवव्या समासाचे नांव आहे — **' मृत्युनिरूपण.'** आणि —
दहाव्या समासाचे नांव आहे — **' वैराग्यनिरूपण.'**

ह्या दहा समासांमधे **जन्ममृत्युजराव्याधीदु:ख** ह्यांचे संपूर्ण वर्णन केलेले आहे.
माणसाचा जन्म कसा होतो? त्यानंतर म्हातारपण येईपर्यंतचा प्रवास कसा होतो? म्हातारपणी कशी अवस्था होते?
मरायची तयारी नसते तरीही मृत्यू बलात्कार केल्याप्रमाणे कशी झडप घालतो? कसे होत्याचे नव्हते करून टाकतो? आणि —
ह्या सगळ्या प्रवासामधे केवळ जिवंत असतानाच नाही तर त्या नंतरही आपल्या चांगल्या वाईट कर्मांच्या योगाने कोणकोणत्या व्याधींचे आक्रमण सहन करावे लागते? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आणि त्यामधील सगळी दु:खे, सगळ्या यातना, सगळ्या वेदना आणि सगळे दोष स्पष्टपणे सांगितलेले आहेत. ते वाचत असताना, ' आपण जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आणि त्या नंतरही काय काय घडते, काय काय भोगावे लागते,' त्याचा चित्रपट पाहतो आहोत असेच वाटते.

मनामधे आपोआप वैराग्याची भावना प्रवेश करते. विरक्तीचा विचार यायला लागतो.

**' ह्यामधून सुटका करून घेण्याचा काही मार्ग आहे की नाही?**

**जन्ममरणाच्या चक्रामधून बाहेर पडण्याचा काही उपाय आहे की नाही?** आणि **उपाय असला, तर तो कोणता?'**

ते सांगण्यासाठीच त्यापुढील **नवविधाभक्तीचा** चवथा दशक सांगण्यात आलेला आहे.

विशेष गोष्ट म्हणजे मोक्षप्राप्तीचा तो मार्ग, ज्याला अमंगल म्हटलेले आहे त्या मानवी शरीरामधे राहूनच आचरायचा आहे.

त्याला दुसरा कोणताही पर्याय नाही. कितीही वाईट असले, तरीही शरीर हेच एकमेव साधन आहे.

ह्या शरीरामधे राहूनच त्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी साधना करता येते. **' काट्याने काटा काढणे '** म्हणतात ते हेच.

मुळामधे मनुष्याचा जन्म हा अत्यंत दुर्मिळ असतो. चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या फेऱ्या नंतर जीवाला मनुष्य योनीत जन्म मिळतो अशी ब्रह्मविद्याशास्त्राची मान्यता आहे. मानवयोनी ही अशी एकमेव योनी आहे की जी विचार करू शकते.

योग्य काय - अयोग्य काय, नैतिक काय - अनैतिक काय, पाप काय - पुण्य काय, ते ठरवू शकते. त्याप्रमाणे निर्णय घेऊन आपले वर्तन बदलू शकते. आयुष्य जगत असताना पापसंचय कमी करून पुण्यसंचय वाढवू शकते.

मुक्ती म्हणजे जीवाची जन्म-मरणाच्या चक्रामधून सुटका होणे होय. तसे घडून येण्यासाठी जी साधना करावी लागते, ती साधना माणूसच करू शकतो. मुक्ती ही फक्त मानव योनीतच मिळविता येते. इतर कोणत्याही योनीमधे मुक्ती मिळत नाही.

म्हणूनच **' मानवजन्म हा अत्यंत दुर्लभ आहे.'** असे म्हटले जाते.

ह्याचे भान ठेवूनच, समर्थांनी दासबोधामधेच, पहिल्या दशका मधील दहाव्या समासात, नरदेहाची अपरंपार स्तुती करून त्याचे महत्त्वही सांगितलेले आहे. येथे एक गोष्ट लक्षात ठेवा. ती म्हणजे, त्यांनी मानवी शरीरामधील दोषांचे वर्णन नंतर केले आहे.

तसे करण्यापूर्वी त्याच मानवी शरीराचे, अत्यंत प्रभावीपणे स्तवन केलेले आहे. त्या समासाचे नांव **' नरदेहस्तवन '** असेच आहे.

विस्तारभयास्तव त्यामधील काही निवडक ओव्या सांगतो, त्या ऐका —

**धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।**
**जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ।।**
**या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।**
**मुख्य सारासारविचारे । बहुत सुटले ।।**
**या नरदेहाचेनि संमंधें । बहुत पावले उत्तम पदें ।**
**अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ।।**
**पशुदेही नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती ।**
**म्हणोनी नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ।।**
**म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमधे वरिष्ठ ।**
**जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचे ।।**
**देहा परमार्थी लाविले । तरीच याचे सार्थक जाले ।**
**नाही तर हे वेर्थचि गेले । नाना आघाते मृत्युपंथे ।।**

खरोखर समर्थ रामदासस्वामी हे अद्वितीय पुरुष होते. त्यांच्यासारखे तेच एकमेव. त्यांना फार उच्च दर्जाची प्रतिभा लाभली होती. त्याच बरोबर स्वत:च्या बाबतीतही ते तटस्थ होते.

सगळा दासबोध सांगून झाल्यावरही, विसाव्या दशकाच्या दहाव्या समासामधे अखेरीस, ते सांगतात की —

**ग्रंथाचे करावे स्तवन । स्तवनाचे काय प्रयोजन ।**
**येथे प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ।। ३३ ।।**

' श्रोतेहो ऽऽ, तुम्ही ह्या ग्रंथाची स्तुती करा. पण स्तुती करायचे कारणच काय आहे? येथे अनुभव घेणे मुख्य आहे.

( मी जे सांगितले आहे त्याचा ) स्वत: अनुभव घ्या आणि प्रत्यक्ष प्रचीती आल्यावरच त्यावर विश्वास ठेवा. '

( उगाच भ्रमून जाऊ नका. आंधळी श्रद्धा बाळगू नका.) त्यांना जाऊन आता ३३० वर्षे झाली आहेत. पण आजही त्यांचे ग्रंथ अभ्यासले जातात. जनसामान्यांना यथायोग्य मार्गदर्शन करतात. असो.

**असक्तिरनभिष्वंग: पुत्रदारगृहादिषु ।**
**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।। ९ ।।**

अनासक्ति, बायका, मुले व घर इत्यादिकांत ममत्व नसणे, इष्ट किंवा अनिष्ट प्राप्त झाले तरी नेहमी चित्ताची एकसारखी वृत्ती असणे,

**पुत्रदारगृहादिषु** — पुत्र, कन्या, पत्नी, घर ( राहण्याचे ठिकाण ) आणि संपत्ती इत्यादीच्या विषयी.

**असक्तिः** — आसक्तीचा अभाव. तसेच कर्मफलाच्या ठिकाणी आसक्तीचा अभाव.

**अनभिष्वङ्गः** — ममता नसणे. **इष्टानिष्टोपपत्तिषु** — प्रिय अथवा अप्रिय ह्यांची प्राप्ती झाली असता.

**नित्यम् समचित्तत्वम्** — चित्त नेहमीच समतोल राहणे. निर्विकार राहणे.

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥**

माझ्या ठायीं अनन्यभावाने न ढळणारी भक्ती, एकांत जागी राहणे, सामान्य विषयासक्त मनुष्यांच्या समुदायांत मिसळण्याची आवड नसणे,

**अव्यभिचारिणी भक्तिः** — एकमात्र परमेश्वर हाच आपले सर्वस्व आहे. आपले माता, पिता, बंधु आणि भगिनी, गुरू, योग्य मार्ग दाखविणारा हितचिंतक वगैरे सर्व काही तोच आहे. त्याच्याशिवाय आपला दुसरा कोणीही नाही. ह्याच भावनेने परमेश्वराच्याविषयी अनन्य भक्ती असणे. निखळ भक्ती असणे. निरपेक्ष भक्ती असणे आणि त्याच भावनेने सदैव, परमेश्वराचे भजन, पूजन, मनन, चिंतन करीत राहणे.

**विविक्तदेशसेवित्वम्** — ज्या जागी राहिल्यावर शरीर, मन आणि बुद्धी प्रसन्न राहील, जेथील वातावरण शुद्ध आणि पवित्र असेल, जेथे माणसांचा फारसा वावर नसेल, कोलाहल नसेल, विशेष म्हणजे जेथे राहिल्यावर, ज्ञानप्राप्तीसाठी आणि मोक्षप्राप्तीसाठी, सर्व प्रकारे साधना करायची इच्छा होऊन ती वाढीस लागेल, अशा ठिकाणी म्हणजेच देवालय, पवित्र नदीचा किनारा, पर्वतामधील गुहा, पवित्र वन इत्यादी ठिकाणी वास्तव्य करायला आवडणे. तशा ठिकाणीच राहणे.

**जनसंसदि अरतिः** — विषयासक्त म्हणजे सर्व विषयांचा अमर्याद उपभोग घेण्यामधे गुंतलेले आणि प्रमादी म्हणजे नीती - अनीतीचा विवेक न बाळगता वाटेल तसे वागणारे, अशा लोकांच्या समुदायामधे राहण्याची आवड नसणे. त्याविषयी गोडी नसणे. शक्यतोवर त्यांच्यापासून अलिप्त राहणे.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥**

अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धी होणे व तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतांचे परिशीलन करणे ह्यास ज्ञान म्हटलेले आहे. ह्याशिवाय जे दुसरे ते अज्ञान होय.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वम्** — आत्मतत्त्वाविषयीचे संपूर्ण ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान होय. ज्या ज्ञानाच्या योगाने आत्मा आणि अनात्मा ह्यामधील फरक समजतो ते अध्यात्मज्ञान. केवळ आत्मतत्त्व हेच नित्य, अविकारी, अविनाशी, अजर, अमर असे असून त्याच्या व्यतिरिक्त इतर सर्व गोष्टी ह्या अनात्मा आहेत. त्यांचा आत्मतत्त्वाच्या बरोबर काहीही संबंध नाही. हे जाणणे म्हणजेच अध्यात्मज्ञान होणे असून त्यामधे स्थिर होऊन, आत्मतत्त्वाचे निरंतर मनन आणि चिंतन करणे.

**तत्त्वज्ञानार्थदर्शनम्** — तत्त्वज्ञान म्हणजे मूलतत्त्वाचे ज्ञान. सर्व विश्वाच्या निर्मितीचे जे मूलतत्त्व आहे, त्या परब्रह्म परमात्म्याचे ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान होय. त्या परमात्म्याला सर्वत्र पाहणे आणि त्याच्या अस्तित्वाचा, सर्वत्र समबुद्धीने पाहून, सतत अनुभव घेत राहणे.

ज्याचे ठिकाणी हे परिणाम प्रकर्षाने दिसून येत असतील, त्याला परब्रह्म परमात्म्याचे, म्हणजेच परमेश्वराचे यथार्थ ज्ञान प्राप्त झालेले आहे असे समजावे. कारण परमेश्वरविषयक ज्ञानाचे हे आणि हेच परिणाम आहेत. ह्या खेरीज इतर कोणतेही परिणाम असू शकणार नाहीत. ह्या परिणामांच्या विरुद्ध असे जे परिणाम आहेत ते सर्व परब्रह्म परमात्म्याचे विषयक ज्ञानाचा अभाव असल्यामुळेच दिसून येतात. म्हणूनच त्याला अज्ञान असे म्हटलेले आहे.

हे विरुद्ध परिणाम कोणते असतात त्याचीही माहिती असायला हवी.

'' प्रतिष्ठेकरिताच जगणे, मान सन्मानासाठी आसुसलेला असणे, सत्काराच्या योगाने आनंदित होणे, आपल्या कार्याचा गर्व बाळगणे, आपल्या ज्ञानाचा पसारा घालणे, आपण केलेल्या पुण्यकर्मांची जाहिरात करणे, कीर्तीसाठी हपापलेला असणे,
आपल्या वर्तनाने इतरांना दुःख देणे, इतरांना वेदना होतील असे बोलणे, इतरांना फसविणे, सर्व प्रकारे हिंसा करणे,
इच्छित वस्तूच्या प्राप्तीने आनंदित होणे आणि हानीने दुःखित होणे, स्तुतीने हुरळून जाणे, निंदेने दुःखित होणे,

विकारांचा आवेग सहन न होणे, विचार आणि आचार ह्यांच्यामधे अंतर असणे, गोड बोलून घात करणे, गुरुभक्तीचा कंटाळा करणे, गुरूंचा अपमान करणे, विहित कर्म न करणे, आतून आणि बाहेरून अपवित्र असणे, पापकर्म करण्याची लाज न वाटणे, पुण्यकर्माविषयी उदासीन असणे, सत्ता, अधिकार व धनदौलतीची आसक्ती असणे, स्वार्थाकरिता निश्चयापासून ढळणे, दु:खाने आणि भयाने ग्रस्त व त्रस्त होणे, निषिद्ध कर्म करणे, स्वधर्माला झुगारणे, घेतलेले व्रत पूर्ण न करणे, कुळाचार न मानणे, कुळधर्माचे पालन न करणे, विषयांच्या ठिकाणी आसक्ती असणे, विषयांचा उपभोग घेता येण्यासाठीच कष्ट करणे, सदैव काम्य कर्मे करणे, देह म्हणजेच मी आहे अथवा देह म्हणजे मीच आहे असे समजणे, इतरांचे चांगले झालेले सहन न होणे, इतरांचा द्वेष करणे, निंदा करणे, '' इत्यादी इत्यादी.
हे सर्व परिणाम दिसून येण्याचे कारण परमेश्वरविषयक अज्ञान हेच आहे.
म्हणून ज्याचे ठिकाणी हे परिणाम प्रकर्षाने दिसून येत असतील, त्याला ज्ञानप्राप्ती झालेली नाही असेच समजले पाहिजे. असो.
या पुढील सहा श्लोकांमधे परब्रह्म कसे आहे त्याविषयी सांगितलेले आहे.

**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।**
**अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ।। १२ ।।**
**सर्वत: पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।**
**सर्वत: श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।। १३ ।।**
**सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।**
**असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ।। १४ ।।**
**बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च ।**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ।। १५ ।।**
**अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।**
**भूतभर्तृ च यज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ।। १६ ।।**
**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमस: परमुच्यते ।**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ।। १७ ।।**

आता जे जाणल्याने मोक्ष मिळतो ते तुला सांगतो. ते अनादि सर्वांच्या पलीकडले ब्रह्म होय. त्याला सत् म्हणत नाहीत आणि असत् ही म्हणत नाहीत. त्याला सर्व बाजूंनी हातपाय आहेत; सर्व बाजूंनी मस्तके, तोंडे व डोळे आहेत; सर्व बाजूंनी कान आहेत आणि तेच ह्या लोकी सर्व व्यापून राहिले आहे. त्यात इंद्रियांच्या सर्व गुणांचा आभास होणारा असून त्याला कोणतेच इंद्रिय नाही. ते सर्वांपासून विलग असूनही सर्वांचे धारण करणारे आणि निर्गुण असूनही गुणांचा उपभोग घेणारे आहे. ते सर्व भूतांच्या आत व बाहेरही आहे, अचर आहे व चरही आहे, सूक्ष्म असल्यामुळे सहजपणे न कळणारे आणि दूर असूनही जवळ आहे. ते तत्त्वत: अखंड असूनही सर्व भूतमात्रात जणू काही नाना प्रकाराने विभागून राहिले आहे व सर्व भूतांना धारण करणारे, ग्रासणारे, उत्पन्न करणारेही तेच समजले पाहिजे. त्यालाच तेजाचेही तेज व अंधकारापलीकडचे म्हणतात. ज्ञान, जे जाणावयाचे ते व ज्ञानानेच कळणारेही तेच असून, सर्वांच्या हृदयात तेच अधिष्ठित झालेले आहे.
आधुनिक विज्ञानाचा मूलभूत नियम काय सांगतो माहिती आहे काय?
' जे शास्त्रशुद्ध पुराव्यानिशी सिद्ध करता येऊ शकते, तेच सत्य आहे आणि जे पुराव्यानिशी सिद्ध करता येऊ शकत नाही, ते असत्य आहे. एखादी वस्तू डोळ्यांना दिसणे, कानांना तिचा आवाज ऐकू येणे, नाकाला तिचा विशिष्ट वास येणे, जिभेला तिची चव घेता येणे, तिला स्पर्श करून हाताळता येणे, तिचे सर्व गुणधर्म जाणता येणे आणि प्रयोगशाळेत तपासून पाहता येणे, तिचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणे, हे सगळे त्या वस्तूच्या अस्तित्वाचे पुरावे आहेत. अशा प्रकारे पुरावे देता येत नसतील तर ती वस्तू अस्तित्वात नाही हेच सत्य आहे. जी गोष्ट प्रत्यक्ष दिसत नाही आणि जिचा अनुभव घेता येत नाही, ती वस्तू आहे असे म्हणणे हा वेडेपणा आहे. अंधश्रद्धा आहे.'
म्हणून जे विज्ञानवादी असतात ते सहसा **' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वर '** ह्या संकल्पनांवर विश्वास ठेवीत नाहीत.
मग ते परब्रह्म म्हणजे काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न तरी कशाला करतील?
त्यांना, तसे करणे म्हणजे ' आपला वेळ वाया घालविण्यासारखे आहे.' असेच वाटणार.
**' परमेश्वर आहे की नाही?'** हा फार मोठा वादाचा प्रश्न आहे.
दोन्ही बाजूंचे मोठ्या प्रमाणावर समर्थकही आहेत आणि विरोधकही आहेत. खरे म्हणजे सर्वांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.
ती म्हणजे, **' आपण सगळे मर्यादित जीवन जगणारे मानव प्राणी आहोत. '**

ह्या अथांग विश्वामधे, आपल्याला माहिती नसलेल्या, कल्पना नसलेल्या, इतकेच नाही तर जाणीवही नसलेल्या, अशा अनेक गोष्टी अस्तित्वात आहेत. त्यामुळे कोणीही झाला तरीही, आपल्या मर्यादित आयुष्यामधे विश्वामधील सर्वच्या सर्व वस्तुमात्रांचा अनुभव घेऊ शकत नाही. आयुष्यभर संशोधन करीत राहिलेले बहुसंख्य खगोल शास्त्रज्ञ काय सांगतात ते ऐका.

' विश्वाच्या पसाऱ्याचे आपल्याला आजपर्यंत जे ज्ञान प्राप्त झालेले आहे ते एकूण विश्वाच्या दोन टक्केही नाही. आपल्याला अठ्ठ्याणव टक्के विश्वाची माहितीच नाही.'

गुरुत्वाकर्षणाचा जगप्रसिद्ध सिद्धांत शोधून काढणारा शास्त्रज्ञ **सर आयझॅक न्यूटन** पुढे काही काळानंतर काय म्हणाला तेही नीट लक्षपूर्वक ऐका.

' गुरुत्वाकर्षण शक्ती प्रत्येक पदार्थामधे आहे. त्यामुळेच दोन वस्तू एकमेकांच्याकडे आकर्षिल्या जातात. परंतु त्या शक्तीचे रहस्य काय आहे ते मला उलगडता आलेले नाही. ती गुरुत्वाकर्षण शक्ती आली कोठून ते मला माहीत नाही.'

विश्वामधे अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्याच्याविषयी सबळ पुरावा देता येत नाही.

ज्यांचे अस्तित्व संशयातीतपणे सिद्ध करताच येत नाही. तरीही आधुनिक विज्ञान त्या गोष्टी आहेत असे मानते.

उदाहरण सांगायचे झाले तर —

१) भूमितीशास्त्राची सुरवात ज्याच्या पासून होते तो **बिंदू** आपल्याला दिसत नाही. दाखवता येत नाही. तरीही तो असतो असे मानलेले आहे.

२) अंतरिक्षामधे **कृष्णविवर ( Black Hole )** नांवाची एक गोष्ट असते असे म्हणतात. ते कोणालाही, कुठेही दिसत नसले आणि दाखवता येत नसले तरीही, ' अंतराळामधे कृष्णविवर असते आणि त्याच्या आवाक्यात येणारी कोणतीही दृष्य अथवा अदृष्य गोष्ट, अगदी प्रकाशाचे किरण देखील गिळून टाकते.' असे मानलेले आहे.

३) तो प्रत्यक्ष होत असताना कोणीही पाहिलेला नाही, त्याची छायाचित्रे घेतलेली नाहीत, त्याविषयी कोणताही पुरावा देता येत नाही. तरीही ' हे सर्व विश्व एका महास्फोटामधून निर्माण झालेले आहे,' अशी मान्यता आहे.

**( Tremendous explosion started the expansion of the universe. This explosion is known as the Big Bang.)**

४) काहीही निर्माण करण्यासाठी, कोणतातरी कच्चा माल हा लागतोच. **( Raw material )** त्याशिवाय कशाचीही निर्मिती होणे शक्य नाही. तरीही ' महास्फोट होण्यापूर्वी काहीही अस्तित्वात नव्हते.' अशी मान्यता आहे.

**( It is presumed that before the bigbang, there was nothing in existence. What exisisted prior to this event is completely unknown and is a matter of pure speculation. )**

५) कोणताही पुरावा देता येत नाही. सिद्ध करता येत नाही, तरीही —

' संपूर्ण विश्व हे अखंड, एकसंध आणि अविभाज्य आहे. त्याचे तुकडे करता येत नाहीत. भाग पाडता येत नाहीत. म्हणून विश्वाच्या प्रत्येक तथाकथित भागाला संपूर्ण विश्वाइतकेच महत्त्व आहे आणि अस्तित्वही आहे,' अशी मान्यता आहे.

६) एखादा पदार्थ एकाचवेळी दिसणारा आणि न दिसणारा असा असतो काय?

**( Visible and Invisible at the same time.)** तर नसतो. तरीही —

' प्रकाश हा कणरूपाने स्थलकालामधे भौतिकरूपात आपले अस्तित्व प्रकट करतो आणि त्याच वेळी तरंगरूपाने अदृष्य बनतो आणि आपले स्थलकालाच्या पलीकडील अस्तित्व प्रकट करतो,' अशी मान्यता आहे.

७) ' अणूच्या सूक्ष्म पातळीवर स्थल - कालाचे वस्तुनिष्ठ जग अस्तित्वात नसते. तेथे पदार्थ अथवा वस्तू म्हणता येईल असे काहीही अस्तित्वात नसते. सर्व काही एक सारखेच असते. समान असते,' अशी मान्यता आहे.

आपल्या रोजच्या व्यवहारामधे अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या अस्तित्वामधे असतात पण आपल्याला सहजासहजी दिसत नाहीत. आपल्याला त्याविषयी माहिती असते म्हणून काही प्रयत्न करून त्या पाहता येतात. मिळविता येतात. उदाहरणार्थ—

१) समुद्रामधे रत्ने, मोती, हिरे, माणके, तेल, वायू इत्यादींच्या रूपाने अगणित संपत्ती आहे. पण आपल्याला ती सहजासहजी दिसत नाही आणि तिच्या विषयी काही माहीतही नसते. ती संपत्ती मिळविण्यासाठी सतत शोध घ्यावा लागतो आणि फार मोठ्या प्रमाणावर परिश्रम करावे लागतात.

२) जमिनीत खोलवर गाडले गेलेले धन सामान्यपणे कधीच दिसत नाही. जमिनीत असलेले ते धन मिळविण्यासाठी सतत शोध घ्यावा लागतो. फार मोठ्या प्रमाणात खोदकाम करावे लागते. त्यासाठी प्रयास करावे लागतात.

३) दुधामधे असलेले तूप कधीही दिसत नाही. दुधातले तूप दिसण्यासाठी, दुधाला विरजण लावणे, नंतर तयार झालेले दही घुसळून

ताक करणे, ताकावर तरंगणारे लोणी वेगळे करणे, ते लोणी कढवणे आणि पुढे थंड झाल्यावर गाळून तूप वेगळे करणे. इत्यादी सर्व काही करावे लागते.

४) लाकडामधे असलेला अग्नी कधीही दिसत नाही. तो अग्नी दिसण्यासाठी, लाकडे एकमेकांवर बराच काळ घासत रहावे लागते.

५) बीजामधे असलेला मोठा वृक्ष कधीही दिसत नाही. बीजामधे असलेला वृक्ष दिसण्यासाठी ते बीज मातीत गाडावे लागते, त्याला खत, पाणी घालणे, त्याची निगा राखणे वगैरे सगळे अनेक वर्षे करावे लागते.

अशा प्रकारे ' काय करायला हवे ते माहिती असणे आणि त्याप्रमाणे सतत प्रयत्न करणे,' म्हणजेच **साधना** करणे होय.

काय करायला हवे ते माहीतच नसेल, तर मग साधना करता येणारच नाही आणि प्रत्यक्ष अनुभवही घेता येणार नाही.

कोणत्याही प्राण्याचे जिवंत असणे किंवा नसणे ज्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असते तो **प्राण** किंवा **जीव** कधीही दिसत नाही. दाखवता येत नाही. प्रयोगशाळेमधे नेऊन तपासून पाहता येत नाही. पण तो नसला तर चालत्या बोलत्या माणसाचे प्रेत होते हे सत्य आहे.

तिलाच आधुनिक विज्ञान, **' मानवी शरीरामधील अत्यावश्यक ऊर्जा.**' असे म्हणते.

**( Vital energy within human body.)**

आपल्या माहितीसाठी अजून एक गोष्ट सांगतो. काही वर्षांपूर्वी माझ्या वाचनामधे एक विलक्षण विधान आले.

कोणत्या ग्रंथामधे आणि कधी वाचले? ते आठवत नाही. पण वाचले हे निश्चित.

**'' ॥ दशमिति विश्वाः ॥ ''** हे ते विधान आहे.

अर्थ :— सर्व विश्व हे दहा मितींनी बनलेले आहे. **( Ten Dimensions )**

ह्या दहा मिती म्हणजे ही दहा प्रकारची मापे कोणती? त्यांचा संदर्भबिंदू कोणता? त्यांची पातळी कोणती?

ती अधिक प्रकारची **( Positive )** की उणे प्रकारची? **( Negative )**

मला ह्यातले काहीही माहिती नाही. पण म्हणून हे विधानच चुकीचे आहे असे म्हणणे योग्य आहे का? पृथ्वीवर माणूस अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत किती तरी मोठा काळ निघून गेला आहे. ह्या काळामधे आपल्याला तीन मिती माहीत झाल्या आहेत.

**' लांबी, रुंदी** आणि **उंची** किंवा **खोली '** ह्या त्या तीन मिती आहेत. **( Length, Width and Height or Depth )**

आता ' काल!' **( Time )** ही चवथी मिती आहे असा एक सिद्धांत मांडला जात आहे. त्याविषयी अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम चालू आहे. म्हणजे अजून सहा मितींची आपल्याला माहितीच नाही. अंदाज पुष्कळ केले जातात.

पण केवळ अंदाज! अशा परिस्थितीत केवळ आपल्याला माहिती नाही म्हणून हे विधानच चुकीचे आहे असे म्हणणे बरोबर नाही.

आज ' विंबल्डन येथे चाललेला टेनिसचा सामना, त्याच वेळी मुंबईत आपल्या घरात बसून, तसाच्या तसा प्रत्यक्ष पाहता येतो,' हे सगळ्यांना माहीत आहे. पण शंभर वर्षांपूर्वी ह्या विधानावर कोणीही विश्वास ठेवला नसता.

आपण जेथे जगतो आहोत, आपल्या पाच ज्ञानेंद्रियांच्या आणि पाच कर्मेंद्रियांच्या मदतीने जे पाहतो आहोत आणि अनुभवतो आहोत, ते हे जग तीन मितींचे आहे. आज आपल्याला हे विधान पटते. खरे आहे असे वाटते. आपण त्यावर विश्वासही ठेवतो.

जर भविष्यामधे डार्विनच्या उत्क्रांतीवादानुसार, मानवी शरीराला एखादे नवीन, सहावे ज्ञानेंद्रिय मिळाले तर कदाचित्, त्यावेळच्या माणसांना हेच जग फार वेगळे दिसायला लागेल. आपण कल्पनाही करू शकणार नाही अशा प्रकारचे दिसेल नाही का?

कितीही बुद्धिमान असला तरीही, माणूस हा देखील परमेश्वराने निर्माण केलेला एक प्राणीच आहे.

त्याच्या ज्ञानाला, बुद्धीला आणि कल्पनाशक्तीला मर्यादा आहेत आणि विश्व हे अमर्याद आहे.

ते किती विस्तारलेले आहे आणि त्याचा अजून किती विस्तार होणार आहे, ह्या विषयी कोणालाही निश्चितपणे काहीही सांगता येत नाही.

म्हणून कोणीही अती आत्मविश्वास बाळगून, ' मला ज्याचा अनुभव घेता येत नाही तो अनुभव इतर कोणालाही घेता येणे शक्य नाही! तसे कोणी म्हणत असेल तर ते असत्य आहे!' असे म्हणण्याचे धाडस करू नये.

एखादे कार्य घडून येण्यासाठी काहीतरी कारण असावेच लागते. कोणतेही कार्य हे एखाद्या विशिष्ट कारणाशिवाय होत नाही.

तसेच त्यासाठी कोणीतरी कर्ता असावाच लागतो. हे सत्य आधुनिक विज्ञानालाही मान्य आहे.

तर मग ' सर्व ब्रह्मांडाचे व्यवहार विशिष्ट नियमांचे काटेकोरपणे पालन करून, विशिष्ट पद्धतीने आणि विशिष्ट वेळेत, गेली अब्जावधी वर्षे बिनचूकपणे चाललेले आहेत. ह्याचा अर्थ ते घडवून आणणारा कोणीतरी आहे आणि तो माणसाच्या तुलनेत अपरिमित सामर्थ्यशाली आहे,' असे कोणी म्हटले तर त्याविषयी संशय का व्यक्त करायचा? शंकाकुशंका का विचारायच्या?

तर्कशास्त्राचा आधार का घ्यायचा नाही?

जर, सतत दिसणाऱ्या, नाशिवंत अशा ह्या विश्वाविषयीसुद्धा, आपल्याला अत्यल्प ज्ञान आहे, तर मग सगळीकडे असूनही, कोणालाही कधीही न दिसणाऱ्या अशा, हे सर्व विश्व निर्माण करणाऱ्या, त्याचे पालनही करणाऱ्या आणि त्याचा विनाशही करणाऱ्या अशा, त्या कर्त्याविषयी आपण काय बोलणार? त्यालाच **ईश्वर** असे म्हणतात. **परमेश्वर** असे म्हणतात.

त्यालाच **परमात्मा** असे म्हणतात. **परब्रह्म** असे म्हणतात. नांव काहीही द्या अथवा देऊ नका. त्याने काहीही फरक पडत नाही. आपल्या मानण्या न मानण्यावर तो अवलंबून नाही आहे. उलट त्याच्या इच्छेवरच आपले सर्वांचे अस्तित्व अवलंबून आहे हेच सत्य आहे. त्रिवार सत्य आहे. त्याचे वर्णन कसे केले आहे ते नीट ऐका.

१) ते आहे असेही म्हणता येत नाही आणि नाही असेही म्हणता येत नाही. त्याला सुरवातही नाही आणि शेवटही नाही.

२) त्याला अगणित ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये आहेत. तरीही त्याला एकही ज्ञानेंद्रिय अथवा कर्मेंद्रिय नाही.

३) ते निर्गुणही आहे आणि सर्व गुणांचा उपभोग घेणारेही आहे.

४) ते अचलही आहे आणि चलही आहे.

५) ते अत्यंत सूक्ष्म आहे आणि अत्यंत स्थूलही आहे.

६) ते अखंड असूनही सर्व भूतमात्रांमधे विभागलेले आहे.

७) ते सर्वांपासून वेगळे असूनही सर्वांना उत्पन्न करणारे, सर्वांचे धारण करणारे आणि सर्वांचा विनाश करणारे असे आहे.

८) सर्व विश्वाच्या अलीकडे, विश्वामधे आणि विश्वाच्या पलीकडेही तेच भरून राहिले आहे. त्याच्या शिवाय दुसरे काहीही नाही.

९) ते सर्व प्रकारच्या तेजांचे उत्पत्तिस्थान असून अज्ञान आणि अंधकार ह्यांचा नाश करणारे आहे.

ते स्वत:च **( ज्ञान )**, जे जाणण्यायोग्य आहे ते **( ज्ञेय )** आणि ज्ञानानेच कळणारे **( ज्ञानगम्य )** असे सर्व काही तेच असून, सर्वांच्या अंत:करणात तेच स्थिर आहे. त्या परब्रह्माचे सविस्तर वर्णन ह्याअगोदर अनेकवेळा आलेले आहे.

त्यामुळे येथे त्याविषयी काही बोलण्याची आवश्यकता नाही. असो.

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।**

**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ।। १८ ।।**

ह्याप्रमाणे क्षेत्र, ज्ञान व ज्ञेय म्हणजे काय हे संक्षेपाने सांगितले. हे जाणले म्हणजे माझा भक्त माझ्या स्वरूपाला येऊन मिळतो.

आतापर्यंत, **' क्षेत्र म्हणजे काय? क्षेत्रज्ञ म्हणजे कोण? ज्ञान म्हणजे काय?** आणि **अज्ञान म्हणजे काय?'** ह्या चारही प्रश्नांचे सविस्तर उत्तर देऊन झालेले आहे.

हे परमेश्वराच्या विषयीचे संपूर्ण ज्ञान आहे आणि ज्या अर्थी हा क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार म्हणजेच परमेश्वराचे ज्ञान आहे, तर मग ज्याला हे ज्ञान प्राप्त होईल त्याला मोक्षरूप फळाची प्राप्ती होणार हे निश्चित.

येथे ज्याला क्षेत्र असे म्हटलेले आहे ते प्रकृतीचे कनिष्ठ स्वरूप म्हणजेच **अपरा प्रकृती** असते.

तसेच येथे ज्याला क्षेत्रज्ञ असे म्हटलेले आहे ते प्रकृतीचे वरिष्ठ स्वरूप म्हणजेच **परा प्रकृती** असते. त्यालाच **पुरुष** असेही म्हणतात. ह्या दोघांच्या संयोगानेच सर्व भूतमात्रे उत्पन्न होतात असे सातव्या अध्यायामधे स्पष्टपणे आणि विस्ताराने सांगितलेले आहे.

येथे एक विशेष गोष्ट म्हणजे **सांख्यशास्त्र** आणि **वेदांतशास्त्र** ह्यांच्यामधे असलेला, थोडासा परंतु महत्त्वाचा, भेद सांगणे गरजेचे आहे.

सांख्यशास्त्राप्रमाणे, ' प्रकृती आणि पुरुष हे दोघे अनादि आहेत. इतकेच नाही तर ते स्वयंभू म्हणजे स्वत:च, स्वत:च्या इच्छेनेच, अस्तित्वात आलेले आणि स्वतंत्र म्हणजे एकमेकांवर अवलंबून नसलेले आहेत.' ह्यालाच सांख्यांचे **द्वैत** असे म्हणतात.

वेदान्तशास्त्राप्रमाणे, ' प्रकृती आणि पुरुष हे दोघे अनादि आहेत. परंतु प्रकृती ही पुरुषापासूनच ( परमेश्वर अथवा आत्मतत्त्व ) उत्पन्न झालेली असल्यामुळे ती स्वयंभूही नाही आणि स्वतंत्रही नाही.' ह्यालाच वेदान्त्यांचे **अद्वैत** असे म्हणतात.

हा एक भेद सोडला तर पुरुष आणि प्रकृती ह्यांचे परस्पर संबंध दोघांनाही मान्य आहेत.

किंबहुना **' क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ '** ह्यांचे **' प्रकृती आणि पुरुष '** हे एक प्रकारे रूपांतरच आहे असे म्हणायला हरकत नाही.

परंतु पुरुषापासून उत्पन्न झालेली असूनही, प्रकृती त्याच्यावर सतत कुरघोडी करते. त्याच्यावर सत्ता गाजवते. त्याला बांधून ठेवते.

हे म्हणजे **' मुलांनी आपल्या बापावर '** कुरघोडी करण्यासारखे आहे.

बापही त्याच्यामधे पूर्णपणे गुंतलेला असल्यामुळे, त्यांना हवे तसे वागायला लागतो.

त्यांच्या सुखदु:खांना आपले सुखदु:ख मानायला लागतो आणि त्यांच्या योगाने आनंदित अथवा दु:खित होत राहतो. असो.

आता यापुढे, आतापर्यंत सांगितलेला वेदान्त्यांचा क्षेत्र - क्षेत्रज्ञ विचार, सांख्यांच्या परिभाषेत प्रकृति - पुरुष विवेक ह्या रूपामधे सांगायला सुरवात होते आहे.

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।**

**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ।। १९ ।।**

प्रकृती व पुरुष ही दोन्हीही अनादि असे समज आणि विकार व गुण हे सर्व प्रकृतीपासून उद्भवतात असे जाण.

ज्ञानेश्वर महाराजांनी, ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात, **पुरुष आणि प्रकृती** ह्यांना **शरीर** आणि त्याची **सावली** ह्यांची उपमा दिलेली

आहे. शरीर असल्याशिवाय सावली असणे शक्य नाही. कारण शरीर हे खरे असून त्याची सावली आभासिक आहे.
सावली नसली तरी शरीर हे असतेच. त्याचप्रमाणे पुरुष असल्याशिवाय प्रकृतीचा विस्तार होणे आणि तिचा प्रभाव दिसणे शक्य नाही.
कारण पुरुष हा खरा असून प्रकृतीचा सर्व विस्तार, सर्व गुण, सर्व विकार आणि त्यांचा प्रभाव हा आभास आहे.
आरशामधे एखाद्या वस्तूचे प्रतिबिंब दिसते आणि ते खरे आहे असेच वाटते.
पण जर आरसा फुटला तर केवळ प्रतिबिंब नाहीसे होते. मूळ वस्तू तशीच्या तशी असते. ती नाहीशी होत नाही.
त्याचप्रमाणे प्रकृतीचा आभास नाहीसा झाला तरी पुरुष नाहीसा होत नाही. तो सदैव असतोच. केवळ त्याची अवस्था बदलते.
प्रकृतीच्याद्वारे व्यक्त झालेला असतो, तो परत अव्यक्त होतो. आपल्या मूळ नैसर्गिक रूपामधे स्थिर होतो.

**कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ।। २० ।।**
**पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान्गुणान् ।**
**कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ।। २१ ।।**

कार्य म्हणजे देह व करण म्हणजे इंद्रिये ह्यांच्या कर्तृत्वास प्रकृती कारण आहे असे म्हणतात आणि कर्ता नसूनही, सुखदुःखाचा उपभोग घेण्यास पुरुष कारण आहे असे म्हटले आहे. कारण पुरुष प्रकृतीमधे अधिष्ठित झाला म्हणजे प्रकृतीच्या गुणांचा तो उपभोग घेतो आणि तो गुणांचा संयोग पुरुषाला बऱ्यावाईट योनीत जन्म घेण्यास कारण होतो.
पंचमहाभूते, अहंकार आणि बुद्धी ही कारणे. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, त्यांचे पाच विषय आणि मन ह्यांचे कडून सतत घडून येणाऱ्या सर्व क्रिया म्हणजे कार्य ह्या सगळ्याला मूळ प्रकृतीच कारण आहे. ह्या सगळ्यांची उत्पत्ती प्रकृतीपासूनच होत असते.
असे असले तरीही, ह्या सगळ्यांच्या योगाने ज्या सुख, दुःख, वेदना, यातना, आशा, निराशा, राग, लोभ, मोह, मद, मत्सर इत्यादी संवेदना निर्माण होतात त्या मात्र पुरुषालाच भोगाव्या लागतात. तो कर्ता नसूनही भोगाव्या लागतात.
त्याला तसेच विशेष असे कारण आहे.
मुळामधे निर्गुण आणि निराकार असलेल्या पुरुषाचा जेव्हा प्रकृतीशी संबंध येतो, तिच्यामधे प्रवेश करतो आणि तिच्यामधे स्थिर होतो, त्यावेळी पुरुषाच्या संयोगाने, आधाराने आणि सहकार्यानेच, प्रकृतीद्वारे जड शरीराची निर्मिती होते.
एकदा शरीराची निर्मिती झाली म्हणजे मग प्रकृती इतकी बलवान होते, इतकी प्रभावशाली होते, इतकी शिरजोर होते की, ती आपल्या निर्मात्याला म्हणजेच **' पुरुषाला '** सर्व बाजूंनी झाकून टाकते. सर्व प्रकारे बांधून ठेवते. सर्वस्वी आपल्या नादाला लावते.
त्याचे असणेच संशयास्पद करून टाकते. हिलाच **' माया '** असे म्हणतात.
ही खरोखरच अत्यंत प्रभावशाली आहे. कमालीची प्रभावशाली आहे. ही माणसाचे सगळे ज्ञान गोठवून टाकते. त्याला अक्रिय करून टाकते. जणू काही एखादी कळसूत्री बाहुली असल्याप्रमाणे, त्याला सारखी नाचवीत राहते. म्हणून माया ही दुस्तर आहे असे म्हणतात.
तिला पार करणे, तिला ओलांडून जाणे आणि तिच्या पाशामधून सुटका होणे फार कठीण आहे असे म्हणतात.
पुरुष म्हणजेच **' जीवात्मा '** देखील तिच्यामधे स्वतःला गुंतवून घेतो. इतका गुंतून जातो, की तो स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वच विसरतो.
प्रकृतीला त्यानेच निर्माण केले आहे, क्रियाशील केले आहे, हे सत्य पार विसरून जातो. स्वतःला सदैव तिच्याचद्वारे आणि तिच्यामधेच पहायला लागतो. **' आपण म्हणजे तीच आहोत आणि ती म्हणजे आपणच आहोत '** असे समजायला लागतो.
तिच्याशी एकरूप होऊन जातो. एकरस होऊन जातो. तिच्या सर्व गुणदोषांचा उपभोग घ्यायला लागतो आणि स्वतःला हरवून बसतो.
त्याचाच परिणाम म्हणून त्याला नानाविध योनींमधे वारंवार जन्म घ्यावा लागतो आणि वारंवार मरणाला सामोरे जावे लागते.
कारण जो जन्माला येतो त्याला मृत्यू निश्चित आहे. भगवंतांनीच दुसऱ्या अध्यायामधे तसे सांगितलेले आहे आणि व्यवहारामधेही आपल्याला त्या सत्याचा सतत अनुभव येतच असतो. म्हणजे जीवात्मा प्रत्यक्ष मरत नाही. कारण तो अनादि, अनंत, अजर आणि अमर आहे. परंतु त्याला मरण काळाचा अनुभव घ्यावाच लागतो. प्रकृती म्हणजेच क्षेत्र म्हणजेच शरीर त्याला सोडू इच्छीत नाही.
तसेच आपण कोण आहोत ह्याचा विसर पडल्यामुळे, तो ही प्रकृतीला म्हणजेच क्षेत्राला म्हणजेच शरीराला सोडू इच्छीत नाही.
त्यामुळे त्याची कमालीची तडफड होते. त्या वेदनांना सामोरे जावे लागते आणि हा प्रकार सतत सहन करावा लागतो.
वारंवार अनुभवावा लागतो.

**उपद्रष्टाऽनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ।। २२ ।।**
**य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयो भिजायते ।। २३ ।।**

हा जो, प्रकृतीच्या गुणांना जवळून पाहणारा, अनुमोदन देणारा, भर घालणारा आणि उपभोग घेणारा त्यालाच ह्या देहातील परपुरुष, महेश्वर आणि परमात्मा असे म्हणतात. पुरुष निर्गुण आणि प्रकृतीच काय ती गुणासह, याप्रमाणे जो जाणतो तो कसाही वागत असला तरी त्याला पुनर्जन्म घडत नाही.

**उपद्रष्टा** — केवळ साक्षीरूप असलेला. केवळ जवळून पाहणारा. **अनुमन्ता** — अनुमती देणारा. संमती देणारा.

**भर्ता** — सर्वांचे धारण - भरण - पोषण करणारा. भर घालणारा. **भोक्ता** — जीवरूपाने दु:ख भोगणारा अथवा सुख उपभोगणारा.

**महेश्वर** — देवांचाही देव असलेला.

ही सर्व विशेषणे शरीरामधे स्थित असलेल्या **पुरुषाला** म्हणजेच **क्षेत्रज्ञाला** म्हणजेच **जीवात्म्याला** उद्देशून वापरण्यात आलेली आहेत.
जरी तो शरीरात असला आणि शरीराला क्रियाशील करीत असला, तरीही तो शरीर नसतो.
शरीराहून वेगळा असतो तरीही शरीरधर्माने बांधला जातो.
त्यामधे पूर्णपणे गुंतून जातो. ' आपण खरे कोण आहोत?' ह्याचा त्याला विसर पडतो.
झोपलेल्या माणसाला नाना प्रकारची स्वप्ने पडतात. तो त्या स्वप्नांचा भागच बनतो. त्यामधे पूर्णपणे गुंतून जातो आणि बऱ्या वाईट संवेदनांचा अनुभव घ्यायला लागतो. मग तो झोपेतच आनंदित होतो आणि हसतो, दु:खी होतो आणि रडतो, भीतीने घाबरून जातो, थरथर कापतो, किंचाळतो, कुणाला तरी हाका मारतो.
ज्या क्षणी त्याला जाग येते, त्या क्षणी स्वप्न नाहीसे होते. मग तो स्वत:शीच विचार करायला लागतो.
' मगाशी मी जे पाहिले ते खरे वाटत होते. तरीही ते खरे नव्हते. तो केवळ भासच होता. मी ते पाहात होतो. त्यामधे सहभागी झालो होतो. त्याच्यामधे पूर्णपणे गुंतून गेलो होतो. म्हणूनच आनंद, दु:ख, भय, असहाय्यता वगैरे सगळे काही अनुभवीत होतो. वास्तविक मी त्याच्याहून वेगळा आहे. ते मला पडलेले केवळ एक स्वप्नच होते.'
त्यानंतर तो ते स्वप्न विसरून जातो. त्याला स्वत्वाची जाणीव होते आणि तो परत आपल्या कामाला लागतो.
तो माणूस म्हणजे **पुरुष** आणि त्याला पडलेले स्वप्न म्हणजे **प्रकृती**चा खेळ आहे असे समजा.
तो **परा** प्रकृती आहे आणि ते स्वप्न **अपरा** प्रकृती आहे असे समजा.
**जीवात्मा** आणि **शरीर** ह्या दोघांच्यामधेही असाच संबंध असतो.
हे सत्य जो जाणतो, तो जरी शरीराच्या सहाय्यानेच सर्व प्रकारची कर्मे करीत असला, तरीही त्याच्या मोहात पडत नाही.
नाशिवंत अशा शरीराची आवश्यक तेवढी काळजी घेत असला तरी त्याच्या विषयी आसक्ती बाळगत नाही.
त्याचे अनावश्यक आणि अवाजवी चोचले पुरवीत नाही.

**' हे शरीर म्हणजे आपल्याला काही काळ राहण्यासाठी मिळालेले घर आहे.**
**ह्या घराची काळजी घेत असलो तरीही हे घर आपले नाही. कधी ना कधी तरी सोडावे लागणारच आहे.'**

ह्या सत्याची जाणीव असल्यामुळे,
त्याला सुख, दु:ख, आशा, निराशा, राग, लोभ, मोह, मत्सर इत्यादी शारिरीक व मानसिक संवेदनांना तटस्थपणे सामोरे जाता येते.
ह्या शरीराचा वियोग आणि विनाशही त्रयस्थपणे स्वीकारता येतो.
कधीही कोणाकडूनही कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, वाट्याला आलेले विहित कर्म पार पाडीत राहिल्यामुळे, अनेक प्रकारची कर्मे करूनही त्यांचे बंधन पडत नाही आणि म्हणूनच कर्मफळ भोगण्यासाठी परत येणारा जन्मही संभवत नाही.

**ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेण चापरे ।। २४ ।।**
**अन्ये त्वेवमजानन्त: श्रुत्वान्येभ्य उपासते ।**
**तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणा: ।। २५ ।।**

काही लोक आपण होऊनच आपल्याठायी ध्यानाने आत्म्याला पाहतात, काही सांख्ययोगाने आणि काही कर्मयोगाने पाहतात.
परंतु ज्यांना ह्याप्रमाणे ज्ञान होत नाही असे कित्येक, दुसऱ्याचे सांगणे ऐकून श्रद्धेने परमेश्वराचे भजन करतात. ऐकलेली गोष्ट प्रमाण मानणारे हे पुरुषही मृत्यू तरून पलीकडे जातात.
सनातन वैदिक धर्मशास्त्रामधे परमेश्वर प्राप्तीसाठी अनेक मार्ग सांगण्यात आलेले आहेत.
त्या सर्व मार्गांचे अंतिम फळ एकच आहे. प्रत्येकाने आपापल्या आवडीनुसार आणि शक्तीनुसार योग्य वाटेल तो मार्ग अनुसरावा.
त्या मार्गावर अत्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणे वाटचाल करावी. सतत साधना करावी.
म्हणजे केव्हा ना केव्हा, मोक्षरूपी फळाची प्राप्ती होईल ह्यामधे संशय नाही.

**यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमम् ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ।। २६ ।।**
**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ।**
**विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ।। २७ ।।**
**समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।**
**न हिनस्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।। २८ ।।**

हे भरतश्रेष्ठा ! स्थावर किंवा जंगम अशी जी कोणतीही वस्तू निर्माण होते, ती क्षेत्र व क्षेत्रज्ञ ह्यांच्या संयोगापासूनच होते हे जाण. सर्व भूतांचे ठायी सारखाच राहणारा व सर्व भूते नाहीशी झाली तरी ज्याचा नाश होत नाही अशा परमेश्वराला ज्याने पाहिले त्यानेच खरे तत्त्व ओळखले असे समज. ईश्वर सर्वत्र सारखाच भरलेला आहे हे जाणून जो पुरुष आपला आपणच चांगल्या मार्गाला लागतो, तो त्यामुळे उत्तम गतीस पोहोचतो.

' वाऱ्याशी संबंध आल्याशिवाय, पाण्यावर लाटा येऊ शकत नाहीत. पावसाच्या पाण्याने भिजल्याशिवाय, जमिनीमधून अंकुर उगवू शकत नाहीत. रवीने घुसळले गेल्याशिवाय, ताकामधून लोणी बाहेर येऊ शकत नाही.

त्याप्रमाणेच क्षेत्रज्ञाशी संयोग झाल्याशिवाय क्षेत्र अस्तित्वात येऊ शकत नाही.

ते क्रियाशील होऊ शकत नाही आणि त्याचा विस्तारही होऊ शकत नाही.

अनेक कारणांच्यायोगे लांब, वाकडी, वाटोळी अशा वेगवेगळ्या आकारांची दुधीभोपळ्याची फळे दिसत असली, तरीही ती एकाच वेलीपासून उत्पन्न होतात.

बोरीचे लाकुड सरळ असो अथवा वाकडे असो, सलग असो अथवा तुटलेले असो, ते बोरीच्या झाडापासूनच उत्पन्न झालेले असते.

निखाऱ्यापासून उडणाऱ्या अनेक ठिणग्या दिसत असल्या तरी त्या एकाच अग्नीपासून उत्पन्न होतात. त्यांची उष्णता एकसारखीच असते.

वर्षाकाली कोसळणाऱ्या पावसाच्या धारा, सर्व आकाशभर दिसत असल्या तरी त्या पाण्याच्याच असतात. त्यांमधील पाणी एकसारखेच असते.

अलंकार निरनिराळे असले तरी ते एका सोन्यापासूनच बनतात. त्यांचे आकार आणि प्रकार वेगवेगळे दिसत असले तरीही त्यांमधील सोन्याचा कस सारखाच असतो.

घागरीमधे असलेले आकाश आणि एखाद्या घरामधे असलेले आकाश हे एकच असते. आकार वेगवेगळे दिसत असले तरीही ते आकार ज्याच्यामधे आणि ज्याच्यामुळे अस्तित्वात आहेत, ते आकाशतत्त्व एकच असते.

त्याचप्रमाणे भूतांचे समुदाय जरी वेगवेगळे दिसत असले तरीही त्यांना व्यापून असणारी वस्तू एकच आहे.

ती वस्तू म्हणजेच परमात्मा होय. त्या परमेश्वराला जो जाणतो तो डोळस ज्ञानी असतो.

सर्व भूतमात्रांमधे एकच परमेश्वर भरून राहिलेला आहे हे सत्य जाणून जो पुरुष सर्वांच्याकडे समबुद्धीने पाहतो आणि समानतेने व्यवहार करीत सन्मार्गाने वाटचाल करतो, तो सद्गतीलाच पोहोचतो.'

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।**
**यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ।। २९ ।।**
**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ।। ३० ।।**

सर्व कर्मे सर्व प्रकारे केवळ प्रकृतीकडूनच केली जातात आणि आत्मा हा काहीही न करणारा आहे हे ज्याने जाणले त्यानेच खरे तत्व ओळखले असे समज. जेव्हा सर्व भूतांतील नानात्व एकत्वाने दिसू लागेल, आणि ह्या एकत्वापासूनच सर्व विस्तार झाला आहे असे दिसू लागेल तेव्हा ब्रह्म प्राप्त होते.

' घरामधे माणसे राहतात, ती घरात वावरतात, त्यांना जे हवे ते करीत असतात.

पण ज्या घरामधे ती राहतात, ते घर मात्र काहीही करीत नसते.

मैदानात खांब उभा असतो. त्याच्या आधाराने अनेक जण अनेक प्रकारचे खेळ खेळत असतात.

पण तो खांब मात्र काहीही करीत नसतो.

त्याचप्रमाणे आत्म्याच्या प्रकाशाने आणि आधाराने, प्रकृती नाना प्रकारच्या कर्मांचा आरंभ करून, त्रिगुणांनी खेळत असते.

पण आत्मा स्वतः काहीही करीत नसतो.

हे ज्याने जाणले त्यानेच अकर्त्या आत्म्याला खरोखर जाणले असे समजायचे.

पाण्यावर जशा लाटा दिसतात, सूर्यमंडलावर किरणे दिसतात, देहाला वेगवेगळे अवयव दिसतात, मनामधे जशा वेगवेगळ्या कल्पना येतात, अग्नीच्या ठिकाणी अगणित ठिणग्या दिसतात, त्याचप्रमाणे —
सर्व भूतांचे, सर्व वस्तुमात्रांचे जे जे आकार दिसतात, ते सगळे एका परब्रह्माचेच भूताकार आहेत हे ज्यावेळेला खरोखरच अनुभवास येईल त्यावेळी ब्रह्मरूप संपत्तीचे जहाजच मिळेल. मग डोळ्यांना जिकडे तिकडे ब्रह्मच दिसेल आणि अमर्याद सुखाची प्राप्ती होईल.'
वरील पाच श्लोकांचे जे स्पष्टिकरण सांगितले, ते मी सांगत नाही आहे बरं का!
ज्ञानेश्वर महाराजांनी ४३ ओव्यांमधे जे सांगितले आहे, त्याचा हा सारांश आहे.
किती सोपी उदाहरणे दिली आहेत नाही?
कुणालाही सहज समजतील आणि पटतील अशी उदाहरणे आहेत आणि ती ही अतिशय रसाळपणे सांगितलेली आहेत.
**' कठिणात कठीण असा विषय सोप्यात सोपा करून कसा सांगावा '**, त्याचे हे प्रात्यक्षिकच आहे,
असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.
**म्हणून ते ज्ञानेश्वर!** ज्ञानाचे आणि ज्ञान्यांचे ईश्वर!
**म्हणून ते ज्ञानदेव!** ज्ञानाचे आणि ज्ञान्यांचे देव!
**म्हणून ते ज्ञानराज!** ज्ञानाचे आणि ज्ञान्यांचे राजे!
त्यांच्याविषयी विचार करायला लागले म्हणजे आपली बुद्धी काम करेनाशी होते.
काय बोलावे तेच कळत नाही. **आपण त्यांना अत्यंत आदराने नमस्कार करूया!**
येथे आपल्याला अजून एक गोष्ट सांगावी असे वाटते आहे.
जरी ज्ञानेश्वरी मराठीत असली तरीही समजायला फार कठीण आहे.
कारण ते जुने मराठी आहे. अनेक शब्दांचे अर्थच कळत नाहीत. मलाही अर्थ कळत नव्हता. सगळा गोंधळ उडत होता.
मग, **गुरुवर्य प्राध्यापक शंकर वामन ऊर्फ सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर** ह्यांनी संपादित केलेली, **' सार्थ ज्ञानेश्वरी.'**
वाचायला सुरवात केली. त्यांच्या कृपेने प्रत्येक ओवीचा अर्थ कळायला लागला.
संदर्भ कळायला लागले. ओव्यांमधील रिकाम्या जागांचेही अर्थ कळायला लागले.
मनामधे वेगवेगळ्या कल्पना यायला लागल्या. विलक्षण आनंद व्हायला लागला. समाधान मिळायला लागले.
**येथे मी त्यांनाही आदरपूर्वक नमस्कार करतो.**

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।**
**शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ।। ३१ ।।**
**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ।। ३२ ।।**
**यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ।। ३३ ।।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ।। ३४ ।।**

हे कौंतेया ! अनादि व निर्गुण असल्यामुळे हा अव्यय परमात्मा शरीरात राहूनही काही करत नाही व त्याला कोणत्याही कर्माचा लेप लागत नाही. ज्याप्रमाणे आकाश चोहोकडे भरलेले असूनही सूक्ष्म असल्यामुळे त्याला कशाचाही लेप लागत नाही, त्याचप्रमाणे आत्मा देहामधे सर्वत्र रहात असूनही त्याला कशाचाही लेप लागत नाही.
हे भारता ! ज्याप्रमाणे एकटा सूर्य हे सर्व जग प्रकाशित करतो, त्याप्रमाणे क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्राला म्हणजे शरिराला प्रकाशित करतो.
याप्रमाणे ज्ञानरूपी डोळ्यांनी, क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांमधील भेद आणि सर्व भूतांच्या मूलभूत प्रकृतीचा मोक्ष ज्यांनी जाणला ते परब्रह्माप्रत जातात.
कमळाचे पान सदैव पाण्यातच असते तरीही ते पाण्यापासून वेगळे असते.
पाण्याच्या हालचालीप्रमाणे हलत असते तरीही त्याला पाण्याचा लेप लागत नाही.
त्याचप्रमाणे ज्याला सुरवात नाही, ज्याला शेवटही नाही, ज्याला कोणताही आकार नाही, कोणताही विकार नाही,
कोणताही गुण नाही आणि दोषही नाही, असा तो परब्रह्म परमात्मा शरीरामधे केवळ साक्षीरूपानेच राहत असतो.
प्रकृतीचे सगळे खेळ पाहात असतो. पण तो स्वतः काहीही करत नसतो.

सर्व वस्तुमात्रांना अस्तित्वात येण्यासाठी आवश्यक ती जागा देणारे आकाश तत्त्व हे सगळीकडे भरून राहिलेले असूनही डोळ्यांना दिसत नाही. आपल्याला जाणवतही नाही. कारण ते सगळ्या वस्तुमात्रांच्या पासून वेगळेच असते.
सगळ्या जगाचे सर्व व्यवहार हे एका सूर्यनारायणाच्या प्रकाशाच्या योगानेच चाललेले असतात.
तरीही तो सगळ्यांच्यापासून वेगळाच असतो.
त्याचप्रमाणे आपल्या शरीररूपी क्षेत्राला, जीवात्मारूपी क्षेत्रज्ञच अस्तित्वामधे आणतो, क्रियाशील करतो आणि त्याचा विस्तारही करतो.
ज्याला ह्या सत्याचे ज्ञान होते, तो आपले आयुष्य जगत असतानाही सदैव मुक्तच असतो आणि मृत्यूनंतरही मुक्तच होतो.
जन्म आणि मृत्यूच्या चक्रापासून वेगळा होतो. आपल्या मूळ स्वरूपामधे सामावून जातो. त्याला मोक्षप्राप्ती होते.

**येथे तेरावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

**क्षेत्र - क्षेत्रज्ञ** ह्या संकल्पनेचे विवेचन सोडले तर ह्या अध्यायामधे आलेले सर्व विचार आणि विवेचन ह्या अगोदरच्या अध्यायांमधे सविस्तरपणे आलेले आहे. ह्या अध्यायामधे त्यांची पुनरावृत्तीच झालेली आहे.
त्यामुळे माझ्या मनामधे असलेला, **' हा अध्याय भगवंतांनी कशासाठी सांगितला?'** हा मूळ प्रश्न अजूनही कायम आहे.
आणि त्याचे माझ्या बुद्धीला पटेल असे उत्तर अजूनही मिळालेले नाही.
हे मी आपल्याला, **' आदरणीय लोकमान्य टिळकांची क्षमा मागून '** सांगू इच्छितो आहे.
तसेच ह्यापुढील चारही अध्यायांचा उगम ह्या अध्यायात असल्यामुळे त्या वेळीही हाच प्रश्न पडणार आहे.
परंतु मी यापुढे त्याचा उल्लेखही करणार नाही.
असे असले तरीही, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही तरीही श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे माहात्म्य आणि महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही.
या अगोदर कधी झालेले नाही आणि यापुढेही कधी होणारही नाही.

**' भगवद्‌गीता आपल्या सर्वांची माउली आहे. आई आहे. ती आपल्याला जीवनामधे सदैव आधार देणार आहे, मार्गदर्शन करीतच राहणार आहे.'**

हे आपण सर्वांनी सदैव लक्षांत ठेवावे हीच नम्र विनंती. असो.
आता पुढील अध्यायामधे भगवान काय सांगतात ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

# <u>अध्याय चौदावा</u>

## — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या चौदाव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
मागील अध्यायामधे भगवान श्रीकृष्णांनी स्वत:हून, **‘ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ’** ह्या दोन संकल्पनांच्या विषयी माहिती सांगायला सुरवात केली. ‘ क्षेत्र म्हणजे काय? क्षेत्रज्ञ म्हणजे कोण? ज्ञान म्हणजे काय? आणि अज्ञान म्हणजे काय?’ ह्या चारही प्रश्नांचे सविस्तर विवेचन केले. त्यानंतर तोच क्षेत्र - क्षेत्रज्ञ विचार, सांख्यांच्या परिभाषेत म्हणजेच **‘ प्रकृति - पुरुष विवेक ’** ह्या रूपामधे सागायला सुरवात केली. पुरुषापासून निर्माण झालेली, त्याच्या संयोगानेच क्रियाशील झालेली, प्रकृती त्याच्यावरच कशी कुरघोडी करते? त्याला कशी घट्ट बांधून ठेवते? त्याच्यावर कशी अमर्याद सत्ता गाजवते? तो म्हणजे जणू काही एखादी कळसूत्री बाहुली असल्याप्रमाणे, त्याला कशी नाचवीत राहते? सर्वस्वी आपल्या नादाला लावून त्याचे असणेच कसे संशयास्पद करून टाकते? पुरुषही, तिच्याहून निराळा असूनही, तिच्यामधे कसा गुंतून जातो? स्वत: कर्ता नसूनही, सुखदु:खादी संवेदनांचा अनुभव घेत राहतो आणि जन्म मृत्यूच्या चक्रामधे कसा फिरत राहतो? ह्या सर्व प्रश्नांच्या विषयी सविस्तरपणे सांगितले.
अखेरीस, ‘ आपल्या शरीररूपी क्षेत्राला, जीवात्मारूपी क्षेत्रज्ञच अस्तित्वामधे आणतो, क्रियाशील करतो आणि त्याचा विस्तारही करतो, ह्या सत्याचे ज्ञान ज्याला होते, तो आपले आयुष्य जगत असतांनाही सदैव मुक्तच असतो आणि मृत्यूनंतरही मुक्तच होतो. जन्म आणि मृत्यूच्या चक्रापासून वेगळा होतो. आपल्या मूळ स्वरूपामधे सामावून जातो. त्याला मोक्षप्राप्ती होते.’ असे सांगितले.
सातव्या अध्यायामधे **ज्ञान - विज्ञान** सांगण्यास सुरवात झालेली आहे.
**ज्ञान** म्हणजे काय? आणि **विज्ञान** म्हणजे काय? ते सांगून झाले.
त्यानंतर परमेश्वराविषयीचे ज्ञान सांगताना ते आतापर्यंत, बाह्य जगताच्याविषयीचा, **‘ क्षर - अक्षर ’** विचार,
शरीर आणि आत्मा ह्यांच्या विषयीचा, वेदांत शास्त्राचा **‘ क्षेत्र - क्षेत्रज्ञ ’** विचार, आणि सांख्य शास्त्राचा **‘ प्रकृति - पुरुष ’** विचार, अशा एकूण तीनही प्रकारांनी, सविस्तरपणे सांगून झालेले आहे.
प्राणिमात्रांचे ठिकाणी दिसून येणारे सर्व विकार व गुणदोष हे प्रकृतीपासून उद्भवतात.
पुरुष निर्गुण व निराकार असतो आणि प्रकृती ही सगुण व साकार असते. पुरुष प्रकृतीमधे अधिष्ठित झाला म्हणजे तो प्रकृतीच्या सर्व गुणांचा उपभोग घेतो आणि गुणांचा तो संयोगच पुरुषाला बऱ्यावाईट योनीत जन्म घेण्यास कारण होतो.
त्यामुळे तीन मुख्य आणि महत्त्वाच्या गुणांचे विवेचन हा <u>क्षेत्र - क्षेत्रज्ञ</u> विचाराचाच एक भाग आहे, असेच म्हटले पाहिजे.
परंतु केवळ मानवी शरीरच नाही तर सर्व चल आणि अचल सृष्टीचा पसारा हा प्रकृतीच्या तीन गुणांच्या योगानेच घडून येत असतो. त्यामुळे त्या गुणांचे विवेचन हा <u>क्षर - अक्षर</u> विचाराचाही एक भाग होऊ शकतो.
ज्यांच्या प्रभावामुळे माणसामधील सर्व गुण आणि दोष व्यक्त होऊ लागतात, त्या तीन गुणांचे स्वरूप कसे आहे? ते जीवात्म्याला शरीरामधे कसे जखडून ठेवतात? त्यांचे कोणकोणते परिणाम होतात? आणि कोणते फळ मिळते?
ह्या सर्व प्रश्नांशी संबंधित विषयाच्या चर्चेला आता सुरवात होते आहे. म्हणूनच,
‘ ह्या विषयाची सुरवात मागील अध्यायामधे झालेली असून आता, ह्या अध्यायामधे त्याचा पुढील विस्तार होतो आहे,’ असेच म्हणावे लागेल. येथेही अर्जुनाने कोणताही प्रश्न विचारलेला नाही, तरीही श्रीकृष्ण भगवान् स्वत:च बोलायला सुरवात करीत आहे.
<u>चौदाव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे.</u> तो अर्जुनाला सांगतो आहे की —

**श्रीभगवानुवाच :**

**परं भूय: प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।**
**यज्ज्ञात्वा मुनय: सर्वे परां सिद्धिमितो गता: ।। १ ।।**
**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागता: ।**
**सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ।। २ ।।**

आणखी पुन: ज्ञानातले उत्तम ज्ञान सांगतो. ते जाणल्याने सर्व मुनींना या लोकामधून परम सिद्धी प्राप्त झाली आहे. या ज्ञानाचा आश्रय करून माझ्याशी एकरूपता पावलेले, सृष्टीच्या उत्पत्तिकालीही जन्मत नाहीत आणि प्रलयकालीही व्यथा पावत नाहीत.
आता श्रीकृष्ण भगवान जे काही ज्ञान सांगणार आहेत ते कसे आहे पहा.
**ज्ञानानाम् उत्तमम्** — सर्व ज्ञानामध्येही अतिशय उत्तम. ( अत्युत्तम )

**परम् ज्ञानम्** — सर्वश्रेष्ठ असे ज्ञान. **भूयः प्रवक्ष्यामि** — मी पुन्हा सांगेन.
**मुनयः** — ईश्वराच्या मूळ स्वरूपाचे आणि वेदशास्त्रांचे सतत मनन करणारा पुरुष. **इतः** — ह्या संसारामधून मुक्त होऊन.
**पराम् सिद्धिम्** — सर्वश्रेष्ठ अशी सिद्धी. ( मोक्ष ) **गताः** — प्राप्त करून घेतलेली आहे.

श्रुति - स्मृति - पुराणे आणि सर्व शास्त्रे ह्यांच्यामधे वेगवेगळे विषय समजावून सांगण्यासाठी जी माहिती आणि उपदेशात्मक वचने आलेली आहेत त्याला येथे **ज्ञान** असे म्हटलेले आहे. ह्या सर्व ज्ञानामधील, प्रकृती आणि पुरुष ह्यांच्या वास्तविक स्वरूपाची माहिती देणारे आणि जीवात्म्याला प्रकृतीच्या बंधनामधून सोडवून, कायमचे मुक्त करणारे असे जे ज्ञान, त्याला **सर्वोत्तम ज्ञान** असे म्हटलेले आहे. ते ज्ञान प्राप्त झाल्यामुळे सर्व मुनिजनांनी मोक्षाची प्राप्ती करून घेतलेली आहे.

इतकेच नाही तर ज्यांनी ज्यांनी हे ज्ञान प्राप्त करून घेतले आहे, ह्या ज्ञानाचा आश्रय घेतलेला आहे, ते परत परत जन्माला येतच नाहीत. त्यामुळे सृष्टीच्या अंतकाळीही त्यांचे व्याकूळ होणे, हताश होणे, निराश होणे संभवत नाही.

**मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् ।**
**संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥**
**सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवन्ति याः ।**
**तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥**

हे भारता ! प्रकृती ही माझीच योनी असून मी त्या ठिकाणी गर्भ ठेवतो. नंतर त्यापासून सर्व भूते उत्पन्न होऊ लागतात. हे कौंतेया ! सर्व प्रकारच्या योनीत ज्या ज्या मूर्ती जन्मास येतात त्यांची, प्रकृती ही योनी असून मी बीजदाता पिता आहे.

येथे **' महद्ब्रह्म '** हा एक विशेष शब्द वापरलेला आहे.

सर्व विश्वाची कारणरूप अशी जी मूळ प्रकृती आहे, जी जड म्हणजेच तुलनात्मक दृष्टीने कनिष्ठ आहे, जिला **' अपरा प्रकृती '** अथवा **' अष्टधा प्रकृती '** अथवा **' क्षेत्र '** असेही म्हणतात, तिचाच उल्लेख ह्या शब्दाने करण्यात आलेला आहे.

तसेच तिला **' महद्योनिः '** असेही म्हटलेले आहे. कारण तीच सर्व भूतमात्रांच्या उत्पत्तीचे स्थान आहे.

ह्याच स्थानी सर्व प्रकारच्या चेतनांच्या समुदायरूपी बीजाची स्थापना केली जाते.

ती स्थापना करणारी जी दुसऱ्या प्रकारची मूळ प्रकृती आहे, जी सर्वार्थाने श्रेष्ठ आहे, जिला **' परा प्रकृती '** अथवा **' पुरुष '** अथवा **' क्षेत्रज्ञ '** असेही म्हणतात, ती म्हणजेच **' परब्रह्म '** किंवा **' परमेश्वर.'**

म्हणजेच सर्व विश्वामधे जितकी म्हणून स्थूल अथवा सूक्ष्म शरीरे अस्तित्वात आहेत, ती सगळी प्रकृतीपासूनच बनलेली आहेत आणि त्या सर्वांच्यामधे जी चेतना आहे, अत्यावश्यक अशी जी ऊर्जा आहे, ती म्हणजे पुरुष आहे.

दोघांच्या संयोगानेच सर्व शरीरधारी जीवसृष्टी निर्माण होते. म्हणून, प्रकृतीला सर्व प्राणिमात्रांची **' माता '** आणि पुरुषाला सर्व प्राणिमात्रांचा **' पिता '** असे म्हटलेले आहे.

**सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।**
**निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥**

हे महाबाहो ! प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सत्व, रज व तम हे गुण देहात राहणाऱ्या निर्विकार अशा आत्म्यास बांधून टाकतात.

हा श्लोक फार महत्त्वाचा आहे.

त्याचा अर्थ नीट समजून घेतल्याशिवाय पुढील विवेचन समजणे कठीण आहे.

म्हणून येथे थोडा जास्त, सखोल असा, विचार केला पाहिजे असे मला वाटते.

ह्या विषयाचा विचार करणारे, पहिले आणि सर्वांत प्राचीन शास्त्र म्हणजे सांख्यशास्त्र अशी मान्यता आहे. त्या शास्त्राचे प्रणेते कपिलाचार्य आहेत. म्हणूनच सांख्यशास्त्राला **' कपिलसांख्यशास्त्र '** असेच नांव दिलेले आहे.

भगवद्गीतेमधेही सांख्यशास्त्राचा अनेकवेळा विचार केला गेलेला आहे.

हे शास्त्र आणि त्यामधील विचार इतके महत्त्वाचे आहेत की, थोड्याफार फरकाने तेच विचार इतर शास्त्रे, पुराणे आणि इतिहासामधेही आढळून येतात. म्हणूनच शांतिपर्वामधे स्वत: भीष्माचार्यांनी युधिष्ठिराला,

' ह्या जगातले सर्व ज्ञान हे सांख्यांच्यापासूनच निघालेले आहे असे म्हटले तरी चालेल.' असे सांगितले आहे.

ह्या शास्त्राचे काही मूलभूत नियम आहेत आणि ते फार महत्त्वाचे आहेत.

त्यांपैकी ह्या विषयाशी संबंधित असे जे नियम आहेत ते काय सांगतात ते ऐका.

१) ह्या जगामधे नवीन असे काहीही उत्पन्न होत नाही. कारण जे पूर्वी नव्हतेच, त्यापासून दुसरे काहीतरी उत्पन्न होणे शक्य नाही.

हाच नियम दुसऱ्या अध्यायांतील सोळाव्या श्लोकामधे सांगितलेला आहे.

**नासतो विद्यते भावः नाभावो विद्यते सतः ।**

अर्थ — जे नाही ते आहे असे होत नाही आणि जे आहे ते नाही असे होत नाही.

२) कोणत्याही वस्तूमधे जे गुण दिसून येतात ते, ती वस्तू ज्यापासून उत्पन्न झालेली असते त्या कारणात असावेच लागतात. सूक्ष्मरूपाने तरी असलेच पाहिजेत. त्याशिवाय गुणांचे सातत्य राहू शकणार नाही.

असे पहा की, जमिनीत नारळाचे बीज लावले तर त्यामधून उत्पन्न होणाऱ्या झाडाला नेहमी नारळच येतात. कधीही आंबे येत नाहीत. पेरू येत नाहीत. चिकू येत नाहीत. ह्याचे कारण काय?

जर काहीही नसताना म्हणजेच शून्यापासून काहीतरी उत्पन्न होऊ शकले असते, तर मग नारळाच्या बीजामधून उत्पन्न होणाऱ्या झाडाला आंब्याची, पेरूची अथवा चिकूची फळे येऊ शकली पाहिजेत.

तसे कधीही होताना दिसत नाही. आपल्याला दिसत नसली तरीही, नारळाच्या एका बीजामधे जी द्रव्ये किंवा जे गुण असतात, त्यांनीच जमिनीमधून आणि हवेमधून दुसरी काही द्रव्ये किंवा गुण आकर्षून घेतल्यामुळे, बीजाला वृक्षाचे रूप प्राप्त होते आणि नारळ येतात. प्राणिमात्रांचे बाबतीतही हीच गोष्ट घडताना दिसून येते.

वाघिणीच्या पोटी, वाघाचा किंवा वाघिणीचाच जन्म होतो. तिच्या उदरामधून कधीही हत्ती अथवा रेडा किंवा उंट जन्माला येत नाही. मानवी स्त्रीच्या पोटी, मानवी पुरुष अथवा स्त्रीचाच जन्म होतो.

तिच्या उदरामधून कधीही माकड अथवा अजगर किंवा मासा जन्माला येत नाही.

म्हणजेच कोणत्याही वस्तूचे गुणधर्म हे ती वस्तू ज्याच्यापासून निर्माण झालेली असते त्या कारणामधे कोणत्यातरी रूपामधे असलेच पाहिजेत. आपल्याला दिसत नसले तरीही, सूक्ष्मरूपाने तरी, असलेच पाहिजेत.

३) कोणत्याही वस्तूमधील जडद्रव्ये व कर्म करण्याची शक्ती म्हणजेच ऊर्जा ह्या दोनही गोष्टी कायम असतात. त्यांचे रूपांतर होते, स्वरूप बदलते पण त्या नष्ट होत नाहीत.

ही गोष्ट आपण प्रत्यक्ष पाहू शकतो. तिचा अनुभव घेऊ शकतो. ह्याचे उदाहरण सांगायचे झाले तर,

लाकडाचा ओंडका जाळला असता, तो **ओंडका** ह्या स्वरूपात दिसेनासा होतो. तरीही तो संपूर्णपणे नष्ट होत नाही.

त्याचे सूक्ष्म रेणू हे **' राख, उष्णता, धूर, प्रकाश आणि गंध '** इत्यादी विविध रूपांमधे अस्तित्वात असतात.

हे नियम विचारात घेतले तर मग, सर्व विश्व ज्या एका महास्फोटामधून निर्माण झालेले आहे, तो महास्फोट होण्यापूर्वी **' काहीही अस्तित्वात नव्हते.'** हे मत चुकीचे ठरते.

जर काहीच नसेल तर स्फोट कशाचा होणार? कशामुळे होणार? आणि कसा होणार?

स्फोट होण्यासाठीसुद्धा, इंधन म्हणून काहीतरी असलेच पाहिजे. तसेच त्या काहीतरीने पेट घेण्यासाठी म्हणून, आगही असलीच पाहिजे. म्हणून ' सृष्टी उत्पन्न होण्याची एकूण प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी कोणतातरी पदार्थ अस्तित्वात असणार आणि सर्व सृष्टीमधे आपल्याला जे वेगवेगळे गुण दिसून येतात ते सर्व गुण त्या मूळ पदार्थातही असणार.' असेच म्हणावे लागते. त्याचप्रमाणे —

' सृष्टीमधे दिसून येणारी नाना प्रकारची रूपे, आकार आणि रंग हे देखील मूळचे नसून, कायम स्वरूपी नसून, सर्व वस्तूंमधील मूलद्रव्य हे एकच आहे.' असेच म्हणावे लागते. हाच **सांख्यांचा सिद्धांत** आहे.

सर्व पदार्थांच्या मधील हे जे मूलद्रव्य, त्यालाच ते **प्रकृती** असे म्हणतात. तसेच ह्या प्रकृतीपासून पुढे निर्माण झालेल्या, होत असलेल्या आणि होणाऱ्या सर्व पदार्थांना **विकृती** किंवा **' प्रकृतीचे विकार '** असे म्हणतात. त्यानंतर, ज्याच्या संयोगाने, प्रेरणेने आणि अनुमतीने ह्या सगळ्यांची निर्मिती झाली आहे, होते आहे आणि होणार आहे, त्याला **पुरुष** असे म्हणतात.

ह्या विकारांच्यामुळेच, विश्वामधील नानाविध प्राणिमात्र आणि पदार्थमात्रांमधे निरनिराळे असे, अनेकविध गुण दिसून येतात. ह्या सर्व गुणांचे निरीक्षण करून, सखोल अभ्यास करून, सांख्यांनी त्याचे तीन वर्ग किंवा गट पाडले आणि त्यांना —

**' सत्व, रज आणि तम '** ही नांवे दिली आहेत. किंबहुना, **' हे तीन गुण म्हणजेच प्रकृती आहे. '** असे त्यांचे सांगणे आहे.

प्रत्येक वस्तुमात्रामधे हे तीनही गुण असतातच. केवळ सत्वगुण, केवळ रजोगुण किंवा केवळ तमोगुण असलेली वस्तू नसते.

ज्यावेळी ह्या तीनही गुणांचा जोर सारखा असतो, त्यावेळी त्या अवस्थेला **' प्रकृतीची साम्यावस्था '** असे म्हणतात.

ज्यावेळी हे तीन गुण कमीजास्त व्हायला लागतात त्यावेळी वस्तुमात्रांच्या व प्राणिमात्रांच्या उत्पत्तीला आणि त्यांच्या व्यवहारांना प्रारंभ होतो. एखाद्या पदार्थाच्या ठिकाणी ज्या गुणाचा जोर जास्त असेल, त्याच्याकडून इतर दोन गुण दाबले जातात. कमजोर होतात. त्यांचा जोर कमी असल्यामुळे ते पाहणाऱ्याच्या दृष्टीस पडत नाहीत. जाणवत नाहीत. अनुभवास येत नाहीत. त्यामुळे तो पदार्थ अथवा ती वस्तू अगर प्राणी प्रबलतम असलेल्या गुणाचा ठरतो आणि त्याच नांवाने म्हणजेच, ' **सात्विक** अथवा **राजस** किंवा **तामस** '

म्हणून ओळखला जातो.
येथे सत्व, रज आणि तम हे तीनही गुण म्हणून सांगितले असले तरीही, ते स्वतः, काम - क्रोध - लोभ इत्यादींच्यासारखा, विशिष्ट असा गुण नाहीत. ते विविध गुणांचे गट आहेत. त्यांच्यामधे अनेक गुण समाविष्ट होतात आणि आपापला प्रभाव दाखवतात.
त्या सर्व गुणांचा एकत्रित प्रभाव, पदार्थ कोणत्या गटाचा आहे ते सांगतो. हे ध्यानात ठेवले पाहिजे.
ही गोष्ट आपल्याला सर्वसाधारण व्यावहारिक उदाहरणाने सांगायचा प्रयत्न करतो.
असे समजा की, एका जोडप्याने एकमेकांच्या सहकार्याने, एक मोठे घर उभे केलेले आहे.
म्हणजे **' लग्न झाल्यानंतर, नवऱ्याच्या सहकार्याने, प्रेरणेने आणि संमतीने, बायकोने ते घर उभे केले आहे.'** म्हणून त्या घरामधे बायकोच क्रियाशील असून, तिचे वर्चस्व आहे. नवरा हा शांतपणे राहतो आहे. जे घडते आहे ते पाहतो आहे.
त्यांना तीन मुलगे आहेत. तिघेही आईचे लाडके आहेत. त्यामुळे ती त्यांना सतत पाठिंबा देतच असते.
वडील मात्र त्यांच्यापासून अलिप्त आहेत. ते त्यांना पाठिंबाही देत नाहीत आणि विरोधही करीत नाहीत.
हे तिघे भाऊ, आपापल्या परिवारासह त्या घरात रहात आहेत. एकत्रच रहात आहेत. एकमेकांना सहकार्यही करीत आहेत.
घराचे व्यवहार चालवीत आहेत. त्याच बरोबर, त्या घराचा एकूण व्यवहार आपल्याच इच्छेनुसार चालावा म्हणून, प्रत्येक जण इतर दोघांच्यावर कुरघोडी करायच्या प्रयत्नात आहे.
घर आपल्या नांवाने ओळखले जावे म्हणून, घरावर ताबा मिळवायचा आणि घराचा कर्ता पुरुष व्हायचा सतत प्रयत्न करीत आहेत.
तिघांच्याही बाबतीत, कधी यशाचा तर कधी अपयशाचा हा खेळ चाललेलाच आहे.
हे तिघे बंधू जे काही उपद्व्याप करीत असतात त्याचे परिणाम, स्वतः काहीही केलेले नसतानाही, वडिलांना भोगावे लागतात. त्यांचे गुण अथवा दोष हीच वडिलांची ओळख होते आणि त्याप्रमाणे समाजामधे त्यांना अकारण चांगलेपणा अथवा वाईटपणा दिला जातो.
सन्मान अथवा अपमान केला जातो. असो.
आता वरील उदाहरणातले ते जोडपे म्हणजे **' प्रकृती आणि पुरुष '** समजा. त्यांनी उभे केलेले मोठे घर म्हणजे **' शरीर '** असे समजा. म्हणजेच ' पुरुषाच्या संयोगाने, प्रेरणेने आणि संमतीने, प्रकृतीने घर उभे केले आहे.' म्हणून त्या घरामधे प्रकृतीच क्रियाशील असून, तिचे वर्चस्व आहे.
पुरुष हा अकर्ता आहे. शांतपणे राहतो आहे. जे घडते आहे ते पाहतो आहे.
त्यांचे तीन मुलगे म्हणजे, **' सत्व, रज आणि तम '** हे तीन गुण, असे समजा.
तिघेही आईचे लाडके आहेत. त्यामुळे ती त्यांना सतत पाठिंबा देतच असते.
हे तिघे भाऊ, आपापल्या परिवारासह त्या घरात रहात आहेत. एकत्रच रहात आहेत. एकमेकांना सहकार्यही करीत आहेत. घराचे व्यवहार चालवीत आहेत. त्याच बरोबर, त्या घराचा एकूण व्यवहार आपल्याच इच्छेनुसार चालावा म्हणून, प्रत्येक जण इतर दोघांच्यावर कुरघोडी करायच्या प्रयत्नात आहे.
घर आपल्या नांवाने ओळखले जावे म्हणून, घरावर ताबा मिळवायचा आणि घराचा कर्ता पुरुष व्हायचा सतत प्रयत्न करीत आहेत.
तिघांच्याही बाबतीत, कधी यशाचा तर कधी अपयशाचा हा खेळ चाललेलाच आहे.
हे तिघे बंधू जे काही उपद्व्याप करीत असतात त्याचे परिणाम, स्वतः काहीही केलेले नसतानाही, पुरुषाला भोगावे लागतात.
त्यांचे गुण अथवा दोष हीच पुरुषाची ओळख होते. असो.
जेव्हा त्रिगुणात्मक प्रकृती आणि निर्गुण पुरुषाचा संयोग होतो, तेव्हां काय काय होते? त्याविषयी देखील शास्त्रांमधे सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. त्याचा सारांश सांगायचा झाला तर तो पुढील प्रमाणे सांगता येईल.
' प्रथम सत्त्वगुणाच्या योगाने **बुद्धितत्व** निर्माण होते. ते रजोगुणाने भारले गेल्यावर, त्याच्या पासून **मन** निर्माण होते.
मनाची सहचारिणी असलेली ममता, **अहंकार** निर्माण करते. त्या अहंकाराच्या योगे **पंचमहाभूते** व्यक्त होतात.
**पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि त्यांचे विषय** ह्यांचा अंतर्भाव, स्वभावतःच पंचमहाभूतांमधे होत असल्यामुळे, ती पंचमहाभूतांच्या बरोबरच आकारास येतात. अशा प्रकारे, त्रिगुणांचाच तयार झालेला **गर्भपिंड** व्यक्त होतो आणि त्यानंतर त्या गर्भपिंडामधे **जीव** प्रवेश करतो. त्यानंतर जीवाने गर्भपिंडामधे प्रवेश केल्यावर मग —
**' अंडज, स्वेदज, उद्भिज आणि जारज '** ह्या चार प्रकारांना अनुसरून गर्भपिंडाचा आकार व्यक्त व्हायला सुरवात होते.
आप आणि वायू ह्यांचे आधिक्य झाले म्हणजे **अंडज** उत्पन्न होतो. **( पक्षी )**
आप आणि तेज ह्यांचे आधिक्य झाले म्हणजे **स्वेदज** उत्पन्न होतो. **( जलचर )**
आप आणि पृथ्वी ह्यांचे आधिक्य झाले म्हणजे **उद्भिज** उत्पन्न होतो. **( वनस्पती )**

जेव्हा सर्व पंचमहाभूते आपापसामधे संपूर्णपणे सहकार्य करतात तेव्हा **जारज** उत्पन्न होतो. **( मनुष्य आणि पशू )**
ह्याप्रमाणे, त्रिगुणात्मक प्रकृती सर्व जगताला जन्म देते आणि त्यानंतर आपला प्रभाव कमालीचा वाढवते.
जो स्वभावत: निर्गुण, निराकार आणि निर्विकार आहे, त्या पुरुषाला सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांनी म्हणजे त्या त्या गटामधे समाविष्ट असलेल्या अनेक गुणांनी बांधून टाकते. यापुढील तीन श्लोकांमधे सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण माणसाला कोणकोणत्या मार्गाने, कशा प्रकारे बांधून ठेवतात ते सांगितले आहे. आपण त्यांचा विचार करूया.

**तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।**
**सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ।। ६ ।।**

हे निष्पाप अर्जुना ! त्यापैकी निर्मल असल्यामुळे प्रकाश पाडणारा व निर्दोष असा जो सत्त्वगुण, तो सुख आणि ज्ञान ह्यांच्या संगाने प्राण्यास बांधून टाकतो.

**निर्मलत्वात्** — मळरहित, स्वच्छ, शुद्ध असलेला. **प्रकाशकम्** — प्रकाश पाडणारा, प्रकाश पसरवणारा.
**अनामयम्** — निरोगी. सुदृढ. कोणतेही विकार नसलेला. विकाररहित.

सत्त्वगुण कसा आहे पहा. स्वच्छ, शुद्ध, मळरहित, विकाररहित आणि सर्वत्र प्रकाश पसरवणारा आहे. तरीही तो माणसाला सुख आणि ज्ञान ह्या दोन पाशांनी करकचून बांधून टाकतो. त्यामधून सुटका करून घेणे फारच कठीण होते. कसे ते पहा.
सत्त्वगुण वरचढ झाला म्हणजे मनुष्य सात्त्विक होतो. त्याचे अष्ट सात्त्विक भाव विकसित होतात.
ही फार चांगली गोष्ट आहे ह्या विषयी संशय नाही. परंतु त्याच वेळी त्याला, त्याच्या नकळत, सात्त्विकतेचा गर्व व्हायला सुरवात होते.
आपल्या जवळ असलेल्या ज्ञानाचा गर्व व्हायला सुरवात होते. आपल्या निस्वार्थी कर्माचरणाचा गर्व व्हायला सुरवात होते.
आपल्या हातून घडणाऱ्या समाजसेवेचा गर्व व्हायला सुरवात होते. आपल्या शुद्ध आणि निष्कलंक अशा चारित्र्याचा गर्व व्हायला सुरवात होते. समाजाकडून मिळणाऱ्या आदर आणि मानसन्मानाचा गर्व व्हायला सुरवात होते.
‘ माझ्यापाशी सर्व शास्त्रांचे ज्ञान आहे! निष्कलंक, निर्मळ व शुद्ध चारित्र्य आहे! मी निष्काम कर्मयोग आचरणात आणतो!
म्हणूनच मला समाजामधे मान मिळतो! माझ्याविषयी सगळे आदरभाव व्यक्त करतात! मला आदर्श व्यक्ती समजतात!
हे सगळे माझ्या कर्तृत्वाचे परिणाम आहेत! मी भाग्यवान आहे! सुखी आहे! स्वर्गलोक माझ्या मुठीत आहे!
माझ्यासारखा दुसरा कोण आहे बरे? कोणीही नाही!’ हे सगळे विचार म्हणजे, सत्त्वगुणाच्या अहंकाराचेच परिणाम आहेत.
कशाचाही अहंकार हा वाईटच असतो. त्यातही सत्त्वगुणाचा अहंकार हा तर अधिक तीव्र असतो.
त्यामुळे इतरांच्याकडे बघण्याची दृष्टी बदलते. दूषित होते. आपण सोडून इतर सगळे तुच्छ आहेत असे वाटायला लागते.
परिणामी माणसाला ज्ञान आणि सुख ह्यांचेच बंधन पडते आणि ते बंधनच मोक्षप्राप्तीच्या मार्गामधील मोठा अडथळा ठरते.
बेडी सोन्याची असली तरीही ती बेडीच असते. एका जागी जखडून ठेवतेच. माणसाचे स्वातंत्र्य नाहीसे करतेच. असो.

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ।। ७ ।।**

रजोगुणाचा स्वभाव रंगविण्याचा असून तृष्णा व आसक्ती ही त्यापासून उत्पन्न होतात. तो प्राण्याला कर्मे करण्याच्या प्रवृत्तिरूप संगाने बांधून टाकतो.

**तृष्णासंगसमुद्भवम्** — कामना म्हणजेच इच्छा आणि आसक्ती ह्यांच्यापासून उत्पन्न झालेला आहे असा.
येथे थोडा गोंधळ व्हायची शक्यता आहे. वरती ‘ तृष्णा व आसक्ती ही रजोगुणापासून उत्पन्न होतात ’ असे सांगितलेले आहे आणि आता ‘ तृष्णा व आसक्ती ह्यांच्यापासून रजोगुण उत्पन्न होतो ’ असा अर्थ सांगितलेला आहे. हे दोन्ही अर्थ बरोबर आहेत.
रजोगुणाचा आणि तृष्णा व आसक्ती ह्यांचा परस्पर संबंध हा **‘ वृक्ष आणि त्याचे बीज ’** किंवा **‘ कोंबडी आणि तिचे अंडे ’** ह्यांच्यासारखा आहे. अगोदर बीज की वृक्ष? अगोदर अंडे की कोंबडी? ह्याचे उत्तर देता येत नाही.
रजोगुण म्हणजे बीज आहे आणि कामना व आसक्ती हा वृक्ष आहे असे समजा.
बीजापासून वृक्ष निर्माण होत असला तरीही बीजाची उत्पत्ती ही वृक्षापासूनच होते.
म्हणजेच बीज हे वृक्षाचे कारणही आहे आणि कार्यही आहे. तसेच वृक्ष हे बीजाचे कारणही आहे आणि कार्यही आहे.
रजोगुण म्हणजे अंडे आहे आणि कामना व आसक्ती ही कोंबडी आहे असे समजा.
अंड्यापासून कोंबडी निर्माण होत असली तरीही अंड्याची उत्पत्ती ही कोंबडीपासूनच होते.
म्हणजेच अंडे हे कोंबडीचे कारणही आहे आणि कार्यही आहे. तसेच कोंबडी हे अंड्याचे कारणही आहे आणि कार्यही आहे.
**कर्मसंगेन** — कर्म आणि त्याचे फळ ह्यांच्या बरोबर सतत संबंध ठेवणे. ‘ अमुक एक काम मी केले आहे. मला ह्या कामाचे अमुक

फळ मिळालेच पाहिजे.' असे मानणे आणि त्याचा सतत उल्लेख करीत राहणे.

जो गुण माणसाला वेगवेगळ्या विषयांमधे रंगवतो, त्याचे रंजन करतो आणि त्या विषयांमधे गुंतवून टाकतो, त्याला रजोगुण असे म्हटलेले आहे. रजोगुण वरचढ झाला म्हणजे मनुष्य कामना, इच्छा, आकांक्षा, लोभ, मोह, मद आणि अहंकार ह्यांच्या आहारी जातो. त्याला सदैव काहीतरी मिळवायचे असते. नेहमी कशाचीतरी अभिलाषा असते.

त्याचे प्रत्येक कर्म हे **सकाम** असते म्हणजे ' काहीतरी मिळवण्याच्या हेतूनेच ' केले जाते.

कितीही मिळाले तरी समाधान होत नाही. आणखी काहीतरी हवेच असते. त्यासाठी सर्वप्रकारे, सतत प्रयत्न करणे चालूच असते. जे हवे आहे ते मिळाले नाही म्हणजे मग प्रतिक्रिया म्हणून राग येणे, दु:ख होणे, इतरांचा मत्सर वाटणे इत्यादी गोष्टी घडतात. त्यामुळे आपल्या जवळ असलेल्या गोष्टीचा उपभोग घ्यायचेही राहून जाते. त्याचा आनंदही मिळवता येत नाही.

ह्याचाच परिणाम म्हणजे ' अशांतता, अस्वस्थता, अस्थिरता आणि असमाधान.'

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनंसर्वदेहिनाम् ।**

**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ।। ८ ।।**

तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न होऊन सर्व प्राण्यांना मोह घालणारा आहे असे समज. तो प्रमाद, आळस व निद्रा ह्यांनी त्याला बांधून टाकतो.

**अज्ञानजम्** — अज्ञानापासून उत्पन्न झाला आहे असा.

येथेही वरीलप्रमाणे गोंधळ व्हायची शक्यता आहे. कारण येथे ' तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न झालेला आहे.' असे सांगितलेले आहे आणि पुढील सतराव्या श्लोकामधे ' अज्ञानाची उत्पत्ती ही तमोगुणापासून होते.' असे सांगितलेले आहे. हे दोन्ही अर्थ बरोबर आहेत. तमोगुण आणि अज्ञान ह्यांचा परस्पर संबंध हा **' वृक्ष आणि त्याचे बीज '** अथवा **' कोंबडी आणि तिचे अंडे '** ह्यांच्यासारखाच आहे. दोघेही एकमेकांचे कारणही आहेत आणि कार्यही आहेत.

**प्रमाद** — शास्त्रानुरूप कर्तव्यपालन करायचे टाळणे. रोजची आवश्यक अशी व्यावहारिक कर्मे करण्याचीही इच्छा नसणे आणि करू नयेत त्या गोष्टी करीत राहणे.

**आलस्य** — मुळामधे काम करायची इच्छा नसणे. कोणतेही काम शक्यतोवर टाळण्याचा प्रयत्न करणे. आपले काम दुसऱ्यावर ढकलणे. तसे शक्य झाले नाही तर ते काम कसेतरी उरकून टाकणे.

**निद्राभि:** — सतत निरुत्साही वाटणे. झोपून राहण्याची गोडी असणे. झोप येत नसली तरीही अंथरुणात लोळत पडून राहणे. अशा माणसाला पाहिले असता, पाहणाऱ्याला ' आपणही काहीही न करता असेच लोळत पडावे.' असे वाटायला लागण्याची शक्यता असते.

मुळामधे ज्ञानाचा अभाव असणे आणि त्याच बरोबर काम करायची इच्छाच नसणे, अंगामधे आळस आणि झोपाळूपणा भरलेला असणे इत्यादी तीन गुण एकत्र आले म्हणजे त्या माणसाचे काय होत असेल ते सांगायची गरज नाही. आपण सगळेच ते चांगले जाणतो.

**सत्वं सुखे संजयति रज: कर्मणि भारत ।**

**ज्ञानमावृत्य तु तम: प्रमादे संजयत्युत ।। ९ ।।**

सत्त्व गुण सुखाचे ठायी आसक्ति उत्पन्न करतो. रजोगुण कर्माचे ठायी आसक्ति उत्पन्न करतो. पण हे भारता ! तमोगुण हा ज्ञानावर पांघरूण घालून प्रमाद म्हणजे कर्तव्यमूढतेच्या ठायी आसक्ति उत्पन्न करतो.

येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी हे तीनही गुण असतात आणि एकत्रच राहतात. ' अमुक एकाच्या ठिकाणी अमुक एक गुण अस्तित्वातच नाही.' असे कधीही होत नाही. त्यांच्यापैकी कोणता गुण प्रबळ आहे? त्यावरून तो मनुष्य **सात्विक** वृत्तीचा आहे की **राजस** वृत्तीचा आहे की **तामस** वृत्तीचा आहे ते ठरते.

**रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।**

**रज: सत्त्वं तमश्चैव तम: सत्त्वं रजस्तथा ।। १० ।।**

रज व तम यांचा पाडाव करून सत्त्व वरचढ होत असते. त्याचप्रमाणे सत्त्व व तम यांचा पाडाव करून रज वरचढ होत असते. आणि सत्त्व व रज यांचा पाडाव करून तम वरचढ होत असते.

**अभिभूय** — खाली दडपून टाकणे. पाडाव करणे.

येथे **' पाडाव करणे.'** ह्याचा अर्थ समूळ नष्ट करणे असा नाही. तर त्यांचे अस्तित्व नगण्य करणे. त्यांना प्रभावहीन करणे. दाबून ठेवणे असा आहे. हा वरचढ ठरणारा गुण नेहमी एकच नसतो आणि स्थिरही नसतो. तो प्रसंगाप्रमाणे बदलत असतो. बदलू शकतो. त्यामुळेच एकाच माणसाच्या वागण्यामधे, वेगवेगळ्या प्रसंगी, गुणांचा प्रभाव बदललेला दिसतो.

प्रसंगानुरुप कधी कमी तर कधी जास्त झालेला दिसून येतो.

एखादा **सात्त्विक** मनुष्य कधीकधी मोहाला बळी पडलेला दिसून येतो.

एखादा **राजस** मनुष्य कधीकधी कामाचा आळस करताना दिसून येतो.

एखादा **तामस** मनुष्य कधीकधी झपाटून काम करताना दिसून येतो. ह्याची अनेक उदाहरणे देता येतील.

रामायणामधले **रावणाचे** उदाहरण घ्या. **सीताहरण** हा त्याचा अक्षम्य अपराध होता ह्याविषयी शंकाच नाही.

अमर्याद कामवासना हाच त्याचा मोठा अवगुण होता.

पण त्याच बरोबर रावण हा त्याच्या प्रजेसाठी आदर्श राजा होता. आपल्या प्रजेवर त्याने कधीही कोणत्याही प्रकारे अन्याय केला नाही. तो मातृभक्त होता. वेदज्ञ होता. ब्रह्मज्ञानी होता. भगवान् शंकराचा भक्त होता. सर्व प्रकारचे युद्ध करण्यात पारंगत होता.

अत्यंत बलशाली, शूर व धाडसी होता. तो संगीतज्ञ होता.

त्याच्या नावाचा संदर्भ असलेले **' रावणहता '** नांवाचे तंतुवाद्य आजही वाजविले जाते.

असा हा महाबली रावण जेव्हा पहिल्यावेळी रणांगणांत युद्धाला आला, त्यावेळी श्रीरामाला तो कसा दिसला ते त्याने स्वत: बिभीषणाला वर्णन करून सांगितले आहे. श्रीवाल्मिकी रामायणामधे युद्धकांडाच्या एकोणसाठाव्या सर्गामधील पुढील पाच श्लोक ---

' रावण कसा होता? त्याचा प्रभाव कसा होता? तो शत्रूला कसा दिसत होता? ' ते समजून घेण्यासाठी पुरेसे आहेत.

**प्रत्युवाच ततो रामो बिभीषणमरिंदम: ।**
**अहो दीप्तमहातेजा रावणो राक्षसेश्वर: ।। २६ ।।**
**आदित्य इव दुष्प्रेक्ष्यो रश्मिभिर्भाति रावण: ।**
**न व्यक्तं लक्षये ह्यस्य रूपं तेज:समावृतम् ।। २७ ।।**
**देवदानववीराणां वपुर्नैवंविधं भवेत् ।**
**यादृशं राक्षसेन्द्रस्य वपुरेतद् विराजते ।। २८ ।।**
**सर्वे पर्वतसंकाशा: सर्वे पर्वतयोधिन: ।**
**सर्वे दीप्तायुधधरा योधास्तस्य महात्मन: ।। २९ ।।**
**विभति रक्षोराजोऽसौ प्रदीप्तैर्भीमदर्शनै: ।**
**भूतै: परिवृतस्तीक्ष्णैर्देहवद्भिरिवान्तक: ।। ३० ।।**

अर्थ — तेव्हा शत्रुदमन श्रीराम बिभीषणाला होकार देत म्हणाले, ' अहो ऽऽऽ! राक्षसराज रावण तर महातेजस्वी आणि दैदिप्यमान आहे असे दिसते. तो आपल्या प्रभेने सूर्यासारखाच झळकतो आहे. इतका शोभतो आहे की त्याच्याकडे पाहणेही कठीण होत आहे. तेजोमंडलाने व्याप्त झाल्यामुळे ह्याचे रूप मला स्पष्टपणे दिसत नाही. ह्याच्या सारखे सुशोभित शरीर तर देव आणि दानववीरांचे देखील नसेल. ह्याचे सगळेच योद्धे पर्वतप्राय असून, पर्वतांनी युद्ध करणारे आहेत आणि सर्वांनी चमकदार शस्त्रास्त्रे धारण केलेली आहेत. दीप्तिमान, भयंकर आणि उग्र अशा राक्षसांनी घेरलेला हा रावण, भूतांनी घेरलेल्या यमराजासारखाच भासतो आहे.'

रावण असा होता. म्हणूनच त्याचा मृत्यू झाल्यावर, त्याच्या अंगी असलेल्या गुणांची स्वत: श्रीरामचंद्रांनी अत्यंत मनमोकळेपणाने स्तुती केली आणि बिभीषणाला, अत्यंत सन्मानाने त्याचे अंत्यसंस्कार करण्याची आज्ञा केली.

महाभारतामधले **दुर्योधनाचे** उदाहरण घ्या. त्याचे पांडवांच्या विषयीचे वागणे हे निंदनीय होते ह्यात मतभेद व्हायचे कारण नाही.

द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग तर अत्यंत निंदनीयच होता. त्याचा सर्वात मोठा अपराध होता.

पण त्याला काही कारणे होती आणि त्यामधेही तथ्य होते हे लक्षात घेतले पाहिजे.

धृतराष्ट्र आणि दुर्योधन हे दोघेही अभिषिक्त राजे नव्हते. महाराज पांडूला जसा रीतसर राज्याभिषेक झालेला होता, तसा धृतराष्ट्राला झालेला नव्हता. स्वत: वनामधे जाताना पांडूने आपले राज्य त्याला सांभाळायला सांगितले होते.

कुंती आणि माद्रीसह तो वनांत गेला आणि तेथून हस्तिनापुराला परत आलाच नाही.

म्हणजे धृतराष्ट्र हा राज्याचा **काळजीवाहू राजा** होता. **( Care Taker )**

त्यामुळे त्याच्या वतीने राज्यकारभार करणारा दुर्योधनही राज्याचा **काळजीवाहू राजाच** होता. **( Care Taker )**

असे असूनही तो अत्यंत न्यायाने राज्यकारभार करीत होता. आपल्या एकाही प्रजाजनावर त्याने स्वत: कधीही अन्याय केला नाही आणि इतर कोणाकडूनही अन्याय होऊ दिला नाही. त्याची सर्व प्रजा सुखी होती.

दुर्योधन हा त्याच्या राष्ट्रासाठी एक न्यायी, कर्तव्यतत्पर आणि चांगला शासक होता.
त्याचे वैर केवळ पांडवांच्याबरोबरच होते आणि एकदा राज्याचे विभाजन झाल्यानंतर त्याच्या दृष्टीने पांडव हे परके होते.
नातेसंबंधी असले तरीही परराष्ट्रीयच होते. त्यांच्याबरोबर असलेले वैर हा कौरवांच्यासाठी एक परराष्ट्रीय प्रश्न होता.
त्यामुळे पुढे ज्या ज्या घटना घडल्या त्या अयोग्य असल्या तरीही तो, कौरवांच्या सत्तेच्या एकूण परराष्ट्रीय धोरणाचाच परिणाम होता.
ते धोरण धृतराष्ट्राच्या संमतीने आणि पाठिंब्याने दुर्योधन, दु:शासन, शकुनी आणि कर्ण हे चौघेच ठरवीत होते.
तरीही, त्या धोरणाला इतर ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मंडळींचा, मनाविरुद्ध असला तरीही, पाठिंबा होता. मूक संमती होती.
ते धोरण आणि त्यानुसार केलेले वर्तन चुकीचेच होते. अयोग्यच होते. हे सत्य असले तरीही, असे वर्तन एकट्या दुर्योधनानेच केले आहे असे नाही. जेव्हापासून **' राजसत्ता! - राजा! - प्रजा!'** हे त्रिकुट निर्माण झाले तेव्हापासूनच, —
कोणत्याही बऱ्यावाईट मार्गाने दुसऱ्याचे राज्य त्याच्याकडून हिरावून घेण्याचा प्रकारही चालू झालेला आहे. गेली हजारो वर्षे असेच चाललेले आहे. कोणाही राजाची **' राज्याची, भूमीची आणि सत्तेची '** तहान कधीही भागत नाही.
उलट बळ जितके अधिक असेल तितकी ही तहान पण वाढतच जाते.
कोणत्याही प्रकारची राजसत्ता ह्याला अपवाद नाही. क्वचित् कोठे सापडलीच तर तो खरोखर अपवादच असेल.
महर्षी **विश्वामित्राचे** उदाहरण घ्या. तो स्वकर्तृत्वाने महर्षीपदाला पोहोचलेला होता.
**महर्षी** म्हणजे दीर्घायु, मंत्रकर्ता, ऐश्वर्यवान, विद्या संपन्न, ज्ञान संपन्न, दिव्यदृष्टीने युक्त, परमेश्वराचा साक्षात्कार करून देऊ शकणारा आणि गोत्र चालवू शकणारा असा अष्ट गुणांनी परिपूर्ण असणारा असा मनुष्य.
ही ऋषी ह्या संज्ञेच्या पुढची पायरी आहे. पुढची पातळी आहे. **( महानतम ऋषी इति महर्षय:। )** तरीही —
कण्वमुनींची मानसकन्या शकुंतला हिचा जन्म ' महर्षी विश्वामित्राचा तपोभंग आणि त्यानंतर त्याचे मेनकेला पाहून झालेले अध:पतन '
ह्यामधूनच झालेला आहे. अहो ऽऽ, इतरांचे सोडून देऊया. खुद्द महाभारतकार व्यासमुनींच्या जन्माचे कारण देखील —
' **पराशर मुनी** ने मत्स्यगंधेला पाहिल्यावर केलेले अनैतिक वर्तन ' हेच आहे.
पराशर हे मुनी होते. स्वकर्तृत्वाने त्या पदाला पोहोचले होते. **मुनी** म्हणजे स्थूल आणि सूक्ष्म जगतामधील विविध सिद्धी प्राप्त झालेला असा सिद्ध पुरुष. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर ह्यांच्यापासून संपूर्णपणे मुक्त झालेला असा मनुष्य. परमेश्वराच्या स्वरूपाचे आणि वेदशास्त्रांचे सतत मनन करणारा मनुष्य. तरीही एका प्रसंगी त्यांचे अध:पतन झालेच.
तात्पर्य काय तर, प्रत्येक माणसाच्या ठिकाणी हे तीनही गुण असतात आणि त्यांचा प्रभाव हा कमीजास्त होत असतो.
त्यामुळे एखादा माणूस हा संपूर्णपणे वाईट आहे असे म्हणता येत नाही तसेच एखादा माणूस हा संपूर्णपणे चांगला आहे असेही म्हणता येत नाही. कोणताही माणूस हा चांगुलपणा आणि वाईटपणा ह्यांचे मिश्रणच असतो.
त्यांच्यापैकी कोण अधिक प्रभावशाली आहे ते महत्त्वाचे. त्यावरूनच माणसाचे व्यक्तिमत्त्व ठरते.

**सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।**
**ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ।। ११ ।।**
**लोभ: प्रवृत्तिरारंभ: कर्मणामशम: स्पृहा ।**
**रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ।। १२ ।।**
**अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।**
**तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनंदनं ।। १३ ।।**

ह्या देहाच्या सर्व द्वारात जेव्हा प्रकाश म्हणजे निर्मल ज्ञान उत्पन्न होते तेव्हा सत्वगुण वाढला आहे असे समजावे.
रजोगुण वाढला म्हणजे लोभ, कर्माकडे प्रवृत्ती व त्याचा आरंभ, अतृप्ति व इच्छा ही उत्पन्न होतात. आणि
तमोगुण वाढला म्हणजे अंधार, काही करू नये असे वाटणे, कर्तव्याचा विसर आणि मोह हे देखील उत्पन्न होतात.
मुळामधे एखाद्या माणसाची एखादी कृती ही त्याचा सद्‌गुण आहे की दुर्गुण आहे हे सुद्धा सापेक्ष असते.
म्हणून त्याचा निर्णय करणे सोपे नाही.
श्रीमद्‌भागवतामधे माणसामधे असलेल्या ह्या तीनही गुणांचा उत्कर्ष अथवा अपकर्ष होण्याची दहा कारणे सांगितलेली आहेत.

**आगमोऽप: प्रजा देश: काल: कर्म च जन्म च ।**
**ध्यानं मंत्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतव: ।। ११ - १३ - ४ ।।**

अर्थ — शास्त्र, जल, संतान, देश, काल, कर्म, जन्मयोनि, चिंतन, मंत्र आणि संस्कार ह्या दहा कारणांमुळे माणसाच्या गुणावगुणांमधे वाढ होते.

म्हणजेच ही दहा कारणे ज्या गुणांनी युक्त असतील, त्यानुसार कार्य घडून येते. माणसाच्या वर्तनावरून, त्याच्यामधे कोणता गुण वाढला आहे ते समजू शकते. एक गोष्ट मात्र धर्मशास्त्राने वारंवार सांगितलेली आहे.

**' सत्त्वगुणाचा उत्कर्ष हा केवळ मनुष्य योनीमधेच होऊ शकतो.'**

तसेच सत्त्वगुणाचा उत्कर्ष होत असताना त्यायोगे निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या बंधनामधून मुक्त होण्याचे प्रयत्नही करता येतात. म्हणून केवळ मनुष्य जन्मामधेच जीवाला मोक्ष प्राप्ती होऊ शकते. इतर कोणत्याही योनीमधे जीवाला मोक्ष प्राप्ती होऊ शकत नाही.

**सत्त्वगुण** वाढला असता स्वधर्माचे आचरण करण्याची इच्छा होते. आपले कर्तव्यकर्म निरपेक्षपणे पार पाडण्याची इच्छा होते. फळाची इच्छा नसल्यामुळे घडून आलेल्या कर्माचे बंधन पडत नाही. त्यामुळे ज्ञान उत्पन्न होते. अंत:करणामधे त्याचा प्रकाश पसरतो आणि त्या ज्ञानप्रकाशाच्या योगाने सर्व प्रकारचे संशय नाहीसे होऊन आत्मसाक्षात्कार होण्याची शक्यता निर्माण होते.

**रजोगुण** वाढला असता मन अनेक प्रकारचे संकल्प विकल्प करायला लागते. त्या विषयांचे सतत चिंतन केल्यामुळे असह्य अशी कामना उत्पन्न होते. कामनांच्या आधीन झालेल्या माणसाचे मन ताब्यात राहात नाही आणि तो कळून सवरून, परिणामी केवळ दु:खदायक अशीही कामे करीत राहतो.

**तमोगुण** वाढला असता आळस, निद्रा आणि कर्म न करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. ह्या नकारात्मक वृत्तीमुळे जे आपले कर्तव्यकर्म आहे, ते ही केले जात नाही आणि अनावश्यक, अयोग्य, अवाजवी आणि अक्षम्य अशा गोष्टी सतत केल्या जातात.

ह्यामधे सर्व प्रकारची अनैतिक कृत्येही समाविष्ट होतात.

ह्या तीनही गुणांच्या प्रभावाचे अंतिम परिणाम कोणते होतात ते यापुढील श्लोकांमधे सविस्तरपणे सांगितलेले आहे.

**यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।**
**तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ।। १४ ।।**
**रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ।**
**तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ।। १५ ।।**

सत्त्वगुणाचा उत्कर्ष झाला असता प्राणी मरण पावला तर उत्तम तत्त्वे जाणणाऱ्याचे म्हणजे देवादिकांचे स्वर्गादिलोक त्याला प्राप्त होतात. रजोगुणाचे प्राबल्य असता मरण पावला तर कर्मात आसक्त झालेल्यांत जन्म घेतो. आणि तमोगुणाचे प्राबल्य असता मरण पावला तर पशुपक्ष्यादि मूढ योनीत जन्म घेतो.

येथे **' मरणसमयी '** तीन गुणांच्या पैकी ज्या गुणाचे प्राबल्य असेल त्याप्रमाणे मनुष्याला पुढील जन्म प्राप्त होतो असे सांगितलेले आहे. ह्या विधानावर वाद होऊ शकतो.

कारण ह्याचा अर्थ, ' जर मरणसमयी प्रबळ असणारा गुणच त्यापुढील फळ देणार असेल तर मग, आयुष्यभर कसेही वागले तरी चालेल. काहीही केले तरी चालेल. केवळ अंतकाळी सत्त्वगुणाला अनुसरून कर्म केले म्हणजे झाले. मग स्वर्गलोकाची प्राप्ती होणार हे निश्चित आहे.' असाही होऊ शकतो.

मुळामधे ' आपल्याला कधी मरण येणार ' हे कोणालाही माहीत नसते.

बहुतेक वेळा मृत्यू हा अचानकपणेच येतो. पूर्व सूचना न देताच जीवनाचा खेळ संपवितो.

त्यावेळेला माणसाचे शरीर, इंद्रिये, मन आणि बुद्धी कोणत्या अवस्थेत असतील ते सांगता येत नाही.

त्यामुळे त्यावेळी ठरवून काही करणे जवळजवळ अशक्य आहे. मग काय होऊ शकेल?

आयुष्याचा सर्वाधिक काळ ज्या गुणाचे प्राबल्य राहिले असेल, जो गुण माणसाचा **' स्वभाव '** झालेला असेल आणि त्यावरूनच माणसाची ओळख होत असेल, तोच गुण उसळून वर येणार आणि त्यानुसारच अंतिम कर्म घडून येणार हे निश्चित.

आयुष्यभर दुष्कर्म करणारा माणूस शेवटचे कर्म देखील तसेच करणार.

आयुष्यभर सत्कर्म करणारा माणूस शेवटचे कर्म देखील तसेच करणार.

आयुष्यभर कर्म करायचे टाळणारा, आळसामधे बुडून गेलेला आणि नकारात्मक वृत्ती असलेला माणूस शेवटी देखील तसेच करणार. कारण कोणत्याही माणसाचा स्वभाव बदलत नाही. बदलता येत नाही.

जन्मभराचे संस्कार बदलत नाहीत. ते अंतकाळीही जसेच्यातसेच राहतात. असो.

**कर्मण: सुकृतस्याहु: सात्त्विकं निर्मलं फलम् ।**
**रजसस्तु फलं दु:खमज्ञानं तमस: फलम् ।। १६ ।।**
**सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।**
**प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ।। १७ ।।**

**उर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।**

**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ १८ ॥**

पुण्याकर्माचे फल निर्मल व सात्त्विक, पण राजस कर्माचे फल दुःख आणि तामस कर्माचे फल अज्ञान होय असे म्हटले आहे. सत्त्वापासून ज्ञान तर रजोगुणापासून केवळ लोभ उत्पन्न होतो. तमोगुणापासून प्रमाद व मोहच नव्हे तर अज्ञानही उत्पन्न होते. सात्त्विक पुरुष वरच्या लोकास जातात. राजस मनुष्यलोकी राहतात आणि कनिष्ठ गुणवृत्तीचे तामस खालच्या लोकास म्हणजेच अधोगतीस जातात.

सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते. त्यामुळे निष्काम कर्म घडून येते. पुण्यकर्म घडून येते.

त्याचे फळ उत्तम असल्यामुळे, सात्त्विक पुरुष मरणानंतर ऊर्ध्वगतीला म्हणजे स्वर्गलोकाला जातात.

रजोगुणापासून लोभ उत्पन्न होतो. त्यामुळे सकाम कर्म घडून येते. ते पुण्यकर्म असेल असे सांगता येत नाही.

त्याचे फळ दुःख हेच असल्यामुळे, राजस पुरुष मरणानंतर परत मनुष्य लोकीच जन्माला येतात.

तमोगुणापासून अज्ञान उत्पन्न होते. त्यामुळे मोह म्हणजेच पराकोटीची आसक्ती आणि त्यायोगे प्रमाद म्हणजेच अपराध घडून येतात. त्याचे फळ अज्ञान हेच असल्यामुळे, तामस पुरुष मरणानंतर अधोगतीला म्हणजे नरकलोकाला जातात.

**सत्त्वगुण** म्हणजे पूर्ण ज्ञान, पूर्ण जाणीव आणि पूर्णपणे शुद्धकर्म. निष्काम कर्म.

**रजोगुण** म्हणजे थोडे ज्ञान व थोडे अज्ञान, थोडी जाणीव व थोडी नेणीव, थोडे शुद्ध कर्म व थोडे अशुद्ध कर्म, थोडे निष्काम कर्म व थोडे सकाम कर्म ह्यांचे मिश्रण.

**तमोगुण** म्हणजे पूर्ण अज्ञान, पूर्ण नेणीव आणि कर्माचा अभाव.

म्हणजेच, ' तमोगुण हा कनिष्ठ, रजोगुण हा मध्यम आणि सत्त्वगुण हा उत्तम आहे ' असे सांगितलेले आहे.

असे असले तरीही, आपण एक महत्त्वाची गोष्ट समजून घ्या. हे तीनही गुण माणसाला जन्ममृत्यूच्या चक्रामधून सोडवू शकत नाहीत. आत्मसाक्षात्कार करवून देऊ शकत नाहीत. मोक्ष मिळवून देऊ शकत नाहीत.

अगदी सत्वगुणाने स्वर्ग प्राप्ती झाली तरीही, तेथे पुण्यकर्मांचे फळ उपभोगून झाल्यावर, परत मनुष्य लोकी जन्माला यावेच लागते. त्यामधून सुटका होत नाही.

**नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।**

**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥**

**गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।**

**जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥**

द्रष्टा पुरुष प्रकृतीच्या गुणाखेरीज दुसरा कोणी कर्ता नाही असे जेव्हा जाणतो व तिन्ही गुणांच्या पलीकडले तत्त्व ओळखतो, तेव्हा तो माझ्या स्वरुपाला पोहोचतो. देहधारी मनुष्य देहोत्पत्तीस कारण झालेल्या ह्या तिन्ही गुणांच्या पलीकडे जाऊन जन्म, मृत्यु, जरा ह्यांच्या दुःखापासून मुक्त होऊन मोक्षाचा अनुभव घेतो.

म्हणून आत्मसाक्षात्काच्या दिशेने वाटचाल करताना साधकाने चार पायऱ्या पार करायला पाहिजेत असे धर्मशास्त्राचे सांगणे आहे. त्या पायऱ्या कोणत्या आहे ते देखील सांगितलेले आहे.

**१) अगोदर तमोगुणाला निष्प्रभ करून टाकणे.**

ह्यासाठी सतत परिश्रम करायची सवय लावून घेतली पाहिजे. आपल्या शरीराचा सतत वापर केला पाहिजे. सतत शारिरीक श्रम केले पाहिजेत. ह्या एकाच उपायाने आपले शरीर स्वस्थ राहते. कार्यक्षम राहते. निरोगी राहते. शरीराचा वापर केला नाही तर ते निकामी होते. रोगी होते. निस्तेज होते. काहीही काम न करण्यापेक्षा काहीतरी काम करणे चांगले. त्यामुळे बुद्धी तीव्र व सतेज व्हायला मदत होते. त्यामधूनच विचारपूर्वक काम करायला सुरवात होते. शरीर थकल्यामुळे रात्री गाढ झोप लागते. झोप पूर्ण झाल्यामुळे जाग आल्यावर ताजेतवाने वाटते. उत्साहित व्हायला होते. आळस नाहीसा होतो.

**२) त्यानंतर रजोगुणाला निष्प्रभ करून टाकणे.**

ह्यासाठी स्वधर्माचे सतत चिंतन केले पाहिजे. स्वधर्म हा शोधावा लागत नाही. तो स्वाभाविक असतो. स्वधर्माचेच पालन केले पाहिजे. आपली शक्ती नाना प्रकारच्या उद्योगामधे वाया न घालविता, ती एकत्र करून एकाच कार्यात सुव्यवस्थितपणे गुंतवली पाहिजे. त्यामुळे चित्त एकाग्र होते. चंचलपणा नाहीसा होतो. सदैव काहीतरी मिळवायची इच्छा नाहीशी होते. ' एक ना धड आणि भाराभर चिंध्या.' असा प्रकार नाहीसा होऊन त्याजागी ठरविलेले कार्य उत्तम प्रकारे पार पाडण्याची इच्छा निर्माण होते. त्यामधूनच पुढे निरपेक्षपणे काम करायची प्रेरणा निर्माण होते.

**३) सत्त्वगुण प्रबळ होत असतांना त्याच्या परिणामांच्या विषयी सतर्क राहणे. सजग राहणे.**

तमोगुण आणि रजोगुण निष्प्रभ व्हायला लागले म्हणजे मग सत्त्वगुण आपोआप प्रबळ व्हायला लागतो.
आपल्या हातून सदैव स्वधर्माचे पालन व्हायला लागते. निरपेक्षपणे इतरांची सेवा घडून यायला लागते.
निष्काम कर्मयोग हा स्वभाव होतो. इतरांचा विचार करणे अत्यंत स्वाभाविकपणे घडायला लागते. स्वार्थ शिल्लक रहात नाही.
मुख्य म्हणजे हे सगळे ठरवून करावे लागत नाही. आपोआप घडून येते. परंतु त्याच वेळी सात्त्विकतेचा गर्व व्हायला सुरवात होते.
आपल्या निस्वार्थी कर्माचरणाचा, आपल्या समाजसेवेचा, आपल्या शुद्ध आणि निष्कलंक अशा चारित्र्याचा गर्व व्हायला सुरवात होते.
समाजाकडून मिळणाऱ्या आदर आणि मानसन्मानाचा गर्व व्हायला सुरवात होते. हे सगळे अहंकाराचेच परिणाम आहेत.
अहंकाराने सत्त्वगुण दूषित होतो. दूषित होऊ शकतो. ह्यालाच **वृत्तिरूप सत्त्वगुण** म्हणतात.
अभिमान असणे चांगले असते. पण अहंकार हा वाईटच असतो. त्यातही सत्वगुणाचा अहंकार हा तर अधिक तीव्र असतो.
त्यामुळे इतरांच्याकडे बघण्याची दृष्टी बदलते. दूषित होते. आपण सोडून इतर सगळे तुच्छ आहेत असे वाटायला लागते.
असे व्हायला लागले म्हणजे त्या गर्वापासून, अहंकारापासून सुटका करून घेण्यासाठी —

**४) शुद्ध सत्त्वगुणाने वृत्तिरूप सत्त्वगुणाचाही त्याग करणे.**

ह्यासाठी सत्त्वगुण आपल्याठायी स्थिर करायचा. सिद्ध करायचा. त्याला आपला स्वभावच करायचा.
म्हणजे मग त्याचा गर्व, अहंकार इत्यादी होणे टळते. एखादी चांगली गोष्ट केली तर आपल्याला तिचा अभिमान वाटतो कारण ती गोष्ट सहजपणे झालेली नसते. ठरवून केलेली असते. परंतु, जेव्हा ज्ञान प्राप्त करून घेणे, सत्कर्म करणे, निष्काम कर्म करणे, निरपेक्षपणे सेवा करणे हे स्वाभाविकपणे होते, तेव्हा त्याचा अभिमान वाटत नाही. अहंकार होत नाही. गर्व होत नाही.
ह्याची अनेक उदाहरणे देता येतील.
**आकाश** सर्व वस्तुमात्रांना अस्तित्वामधे येण्यासाठी अवकाश देते, जागा देते.
तरीही त्याला त्याचा गर्व नसतो. कारण तोच त्याचा स्वभाव असतो.
**वायू** सर्व प्राणिमात्रांना जिवंत ठेवतो. जगण्यासाठी सतत सहाय्य करतो.
तरीही त्याला त्याचा गर्व नसतो. कारण तोच त्याचा स्वभाव असतो.
**सूर्य** सगळ्या जगाला प्रकाश देतो. ऊर्जा देतो. कर्म करायला प्रवृत्त करतो.
तरीही त्याला त्याचा गर्व नसतो. कारण तोच त्याचा स्वभाव असतो.
**पाणी** सर्व प्राणिमात्रांची तहान भागविते. सर्व जलचरांना आश्रय देते.
तरीही त्याला त्याचा गर्व नसतो. कारण तोच त्याचा स्वभाव असतो.
**पृथ्वी** सर्व वस्तुमात्रांचा भार सतत सहन करते. त्यांचे भरण - पोषण करते.
तरीही तिला त्याचा गर्व नसतो. कारण तोच तिचा स्वभाव असतो.
**वनस्पती** आपल्याला सतत उपयोगी पडतात. विविध प्रकारची पाने, फुले, फळे, मुळे, लाकडे इत्यादी अनेक गोष्टी देत असतात.
तरीही त्यांना त्याचा गर्व नसतो. कारण तोच त्यांचा स्वभाव असतो.
हे सगळे सहजपणे घडत असते. निरपेक्षपणे घडत असते आणि सतत घडत असते.
ह्यालाच **शुद्ध सत्त्वगुण** म्हणतात. ह्या चार पायऱ्या ओलांडल्यावर साधकाला, त्यापलीकडे असलेल्या अनादि अनंत अशा **' परब्रह्म परमात्मा परमेश्वराचे '** ज्ञान होते. त्याचे मन तदाकार होऊन परमेश्वराच्या अंतरंगामधे शिरते. परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होते.
सरते शेवटी परमेश्वर आणि आपण वेगळे नसून एकच आहोत ह्याची खात्री पटते. तशी अनुभूती येते.
परमेश्वराशी एकरूप व्हायला होते. असे झाल्यावर शरीराला फारसे महत्त्व उरत नाही.
शरीर असले तरी त्याचा उपद्रव होत नाही आणि नसले तरी त्याची उणीव भासत नाही. हे सगळे कर्मविपाक प्रक्रियेनुसार घडून येते.
**ह्यालाच आत्मसाक्षात्कार असे म्हणतात. ह्यालाच मोक्ष असे म्हणतात.**

श्रीकृष्णाचे बोलणे, अर्जुन इतकावेळ शांतपणे ऐकतो आहे. त्यावर विचार करतो आहे. चिंतन करतो आहे. मनन करतो आहे.
बराच वेळ त्याने एकही प्रश्न विचारलेला नाही. आता मात्र अर्जुनाच्या मनामधे परत एक शंका आली आहे. तो विचारतो आहे की,

**अर्जुन उवाच :**

**कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ।। २१ ।।**

हे प्रभो ! पुरुष कोणत्या लक्षणांनी ह्या तीन गुणांच्या पलीकडे जातो असे म्हणायचे? त्याचा आचार कसा? तो या तीन गुणांच्या

पलीकडे कसा जातो?

इतका वेळ त्याने ऐकण्याचेच काम केले. एकही प्रश्न विचारलेला नाही आणि आता मात्र एकदम तीन प्रश्न विचारले आहेत. त्यातील पहिले दोन प्रश्न एकमेकांशी संलग्न आहेत. **त्रिगुणातीत** पुरुषाची लक्षणे कोणती आणि त्याचे आचरण कसे असते? अर्जुनाने असाच प्रश्न आतापर्यंत दोन वेळा विचारलेला आहे.

दुसऱ्या अध्यायामधे **स्थितप्रज्ञ** पुरुषाबद्दल विचारला आहे आणि बाराव्या अध्यायामधे **भक्तिमान्** पुरुषाबद्दल विचारला आहे. त्या दोन प्रश्नांचे उत्तर एकत्रितपणे द्यायला सुरवात होते आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।**

**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ।। २२ ।।**

**उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।**

**गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ।। २३ ।।**

**समदु:खसुख: स्वस्थ: समलोष्टाष्मकांचन: ।**

**तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुति: ।। २४ ।।**

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्य मित्रारिपक्षयो: ।**

**सर्वारंभपरित्यागी गुणातीत: स उच्यते ।। २५ ।।**

प्रकाश, प्रवृत्ती आणि मोह ह्या गुणांनी कार्ये किंवा फले प्राप्त झाली तरी त्यांचा जो द्वेष करीत नाही आणि प्राप्त न झाली तरी त्यांची आकांक्षा ठेवीत नाही; जो कर्माबद्दल उदासीन असतो, सत्त्व, रज व तम हे गुण ज्याला चाळवू शकत नाहीत, गुण आपापले काम करीत आहेत एवढेच मानून स्थिर राहतो, ज्याला सुख व दु:ख सारखेच, माती, दगड व सोने सारखेच; प्रिय व अप्रिय, निंदा व स्तुती ही समान, जो आपल्या ठिकाणीच स्थिर झाला; सदा धैर्याने युक्त; ज्याला मान व अपमान, मित्र व शत्रू एकसारखे आणि ज्याचे सर्व काम्य उद्योग सुटले, त्या पुरुषास गुणातीत असे म्हणतात.

ही सगळी लक्षणे ऐकलीत ना! मग आता जरा नीट आठवून पहा.

येथे सांगितलेली **त्रिगुणातीत पुरुषाची** लक्षणे आणि आचार विचार, दुसऱ्या अध्यायामधे सांगितलेली **स्थितप्रज्ञ पुरुषाची** लक्षणे आणि आचार विचार, बाराव्या अध्यायामधे सांगितलेली **भक्तिमान पुरुषाची** लक्षणे आणि आचार विचार,

हे एकसारखेच आहेत की नाहीत? तंतोतंत जुळणारे आहेत की नाहीत?

इतकेच नाही तर अजून एक गोष्ट सांगतो. त्यावरही जरा विचार करा.

सहाव्या अध्यायामधे भगवंतांनी, **योगयुक्त पुरुषाची** लक्षणे आणि आचार विचार सांगितलेले आहेत. ते सुद्धा असेच आहेत.

ह्या अगोदर अनेकवेळा, **कर्मयोगी पुरुषाची** लक्षणे आणि आचार विचार, सांगण्यात आलेले आहेत. ते सुद्धा असेच आहेत.

ह्याचा निष्कर्ष हाच की, ' मार्ग कोणताही असो, अंतिम ध्येय एकच आहे.' ज्याला जो मार्ग आवडेल, मान्य असेल आणि आचरण करणे शक्य होईल, त्या मार्गाने त्याने साधना करावी. केव्हा ना केव्हा तरी त्याला आत्मसाक्षात्कार होईल. मोक्षप्राप्ती होईल. ह्या विषयी कोणताही संशय नाही.

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**

**स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ।। २६ ।।**

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।**

**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ।। २७ ।।**

आणि जो एकनिष्ठ भक्तियोगाने माझी सेवा करतो, तो या तीन गुणांच्या पलीकडे जाऊन ब्रह्मभूतावस्था प्राप्त करून घेण्यास समर्थ होतो. कारण मीच अमृत व अव्यय ब्रह्माचे, शाश्वत धर्माचे व परमावधीच्या सुखाचे अखेरचे स्थान आहे.

येथे सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगितलेली आहे.

मनुष्य सत्त्वगुणी बनला. त्याने अहंकार जिंकला. फलाची आसक्तीही सोडली.

तरीही ती अवस्था कायमची राहीलच असे सांगता येत नाही. मधून मधून रजोगुणाचे आणि तमोगुणाचे आक्रमण होत राहणारच. ते प्रबळ व्हायचा प्रयत्न करीतच राहतील. ह्या आक्रमणापासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी आत्मज्ञान करून घेणे हा एकमेव मार्ग आहे. त्यासाठी परमेश्वराची कृपा व्हायला हवी. ती व्हावी म्हणून अगोदर स्वत:ला परमेश्वराच्या कृपेसाठी पात्र केले पाहिजे.

योग्यता मिळवली पाहिजे. तशी योग्यता येण्यासाठी परमेश्वराची **अनन्यभक्ती** केली पाहिजे.

**माम् अव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते** — मला अव्यभिचारी भक्तियोगाने निरंतर भजतो.

भक्तिमार्गामधे **अव्यभिचारी भक्ती** ही सर्वश्रेष्ठ भक्ती आहे. किंबहुना ती **भक्तियोगाची पूर्णावस्था** आहे असे सांगितलेले आहे.
केवळ परमेश्वर हाच सत्य आहे. केवळ परमेश्वर हाच सर्वश्रेष्ठ आहे. केवळ परमेश्वर हाच शरण जाण्यास योग्य आहे.
केवळ परमेश्वर हाच आश्रय आहे. केवळ परमेश्वर हाच आधार आहे. केवळ परमेश्वर हाच प्रेम करण्यास योग्य आहे.
केवळ परमेश्वर हाच चिंतन आणि मनन करण्यास योग्य आहे. केवळ परमेश्वर हाच भजन आणि पूजन करण्यास योग्य आहे.
केवळ परमेश्वर हाच समर्पण आणि दास्य करण्यास योग्य आहे.
तोच आपला स्वामी आहे. मालक आहे. पालक आहे. चालक आहे.
तोच आपला हितचिंतक आहे. तोच आपली अखेरची गती आहे.
आपले मातापिता, बंधुभगिनी, पत्नी, पुत्र, कन्या इत्यादी सर्वकाही तोच आहे. तोच आपले सर्वस्व आहे.
त्याच्या व्यतिरिक्त जे काही दिसते, ते सर्व खोटे आहे.
ही सर्व विधाने जाणून घेणे, मान्य करणे, त्यांचा मनोमन स्वीकार करणे आणि त्यांना अनुसरून परमेश्वराची निरपेक्षपणाने, निस्वार्थीपणाने, कोणताही अभिमान न बाळगता, भक्ती करीत राहणे. केवळ भक्तीसाठीच भक्ती करीत राहणे.
मुखाने सतत त्याचेच नांव घेत राहणे, हाता - पायांनी सतत त्याचेच कार्य करीत राहणे आणि मनोभावे त्याचाच दासानुदास होणे म्हणजे **अव्यभिचारी भक्तियोगाचे** आचरण करणे.
असा भक्त भेटल्यावर, असा दास भेटल्यावर, **भगवान** तरी कसा दूर राहील? तो तर **भक्ताभिमानी** आहे. **दासाभिमानी** आहे.
**भक्तवत्सल** आहे. भक्त त्याच्या दिशेने एक पाऊल पुढे आला तर तो भक्ताच्या दिशेने दहा पावले पुढे येतो.
अशी त्याची ख्याती आहे. मग तो तरी दुसरे काय करणार? तो आपल्या भक्ताची काळजी घेणारच. त्याचा योगक्षेम वाहणारच.
त्याच्याकडे धावत जाऊन, त्याचा हात धरून, आधार देणारच. त्याला त्रिगुणांच्या पलीकडे नेऊन, आपल्या ठिकाणी आश्रय देणारच.
त्याला आपल्याशी एकरूप करणार. आपल्यासारखाच करणार.
मग **समर्थाचा सेवक** झालेला, **सर्वोत्तमाचा दास** झालेला तो भक्त धन्य होणार. **' जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा! '**
त्याला परमावधीचे सुख प्राप्त होणार हे निश्चित. हे परमावधीचे सुख म्हणजेच **मोक्षप्राप्ती** होय.

**येथे चौदावा अध्याय समाप्त झालेला आहे.**

ह्या अध्यायामधे प्रकृती आणि पुरुषापासून विश्वाची उत्पत्ती होते असे सांगितले.
प्रकृतीचे तीन गुण कोणते आणि त्यांचे परिणाम कोणते ते सांगितले.
त्रिगुणांचा प्रभाव कसा असतो आणि ते प्राणिमात्रांच्यावर कसे वर्चस्व गाजवतात ते सांगून, त्यांच्यापासून सुटका करून घेण्याचा मार्ग कोणता ते ही सांगितले.
त्रिगुणांच्या पलीकडे गेलेल्या म्हणजेच त्रिगुणातीत अशा पुरुषाची लक्षणे व आचार कसे असतात ते सांगून, अखेरीस ती अवस्था स्थिर रहावी म्हणून, सदैव परमेश्वराची **अनन्य भक्ती**, **अव्यभिचारी भक्ती** करीत रहायला सांगितले.
आता पुढील अध्यायामधे भगवान् काय सांगतात ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## अध्याय पंधरावा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या पंधराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
मागील अध्यायामधे प्रकृती आणि पुरुषापासून विश्वाची उत्पत्ती होते असे सांगितले.
प्रकृतीचे तीन गुण कोणते आणि त्यांचे परिणाम कोणते ते सांगितले.
त्रिगुणांचा एकूण प्रभाव कसा असतो आणि ते प्राणिमात्रांच्यावर कोणकोणत्या प्रकारे वर्चस्व गाजवतात ते सांगून, त्यांच्यापासून सुटका करून घेण्याचा परिणामकारक असा मार्ग कोणता ते ही सांगितले.
त्रिगुणांच्या पलीकडे गेलेल्या म्हणजेच त्रिगुणातीत अशा पुरुषाची लक्षणे व आचार कसे असतात ते सांगून, अखेरीस ती अवस्था स्थिर रहावी म्हणून, सदैव परमेश्वराची अव्यभिचारी भक्ती करीत रहायला सांगितले.
त्यानंतर हा अध्याय सुरू झालेला आहे. ह्या अध्यायाविषयी बोलताना, सुरवातीलाच **आचार्य विनोबा भाव्यांनी,**
‘ दुसऱ्या अध्यायापासून ते चौदाव्या अध्यायापर्यंत जीवन जगण्याविषयी जे जे सिद्धांत सांगितले, जे जे शास्त्र सांगितले, त्यांची परिपूर्णता ह्या पंधराव्या अध्यायामधे झालेली आहे.’ असे सांगितलेले आहे.
हे विधान फार महत्त्वाचे आहे. ते पुढे काय सांगतात ते नीट लक्ष देऊन ऐका.
‘‘ एका अर्थाने आपण गीतेच्या टोकाला आलो आहोत. ह्या अध्यायामधे परमार्थ पूर्ण झालेला आहे.
मनुष्याला **परमार्थाचे भान** करून देणे हेच वेदांचे काम आहे. तेच काम ह्या पंधराव्या अध्यायात केलेले आहे.
म्हणून या अध्यायाला **वेदांचे सार** असेही मोठ्या गौरवाने म्हणतात.
**तेराव्या** अध्यायात ‘ देहापासून आत्मा अलग करण्याची ’ आवश्यकता सांगितली.
पुढे **चौदाव्या** अध्यायात, त्यासाठीच ‘ अगोदर रजोगुण आणि तमोगुण ह्यांना निष्प्रभ करून सत्त्वगुणाचा विकास करायचा आणि त्याच्या फळाचा त्याग करायचा, त्याच्या विषयीची आसक्तीही जिंकायची. अशा रितीने सतत प्रयत्न करायचे.’ असे सांगितले.
त्यापुढे जाऊन, हे प्रयत्न पूर्णपणे फलद्रूप होण्यासाठी आत्मज्ञानाची आवश्यकता असून, आत्मज्ञान प्राप्त होणे हे परमेश्वराच्या अनन्य भक्तीशिवाय शक्य नाही.’’ असे नि:संदिग्धपणे सांगितले.
इतके सांगून झाल्यावर भक्तिमार्ग हा प्रयत्नमार्गापेक्षा काही निराळा नसतो असे सुचविण्यासाठी, ह्या अध्यायाचा आरंभ करताना सुरवातीलाच, संसाराला एका विलक्षण अशा **महान वृक्षाची** उपमा दिलेली आहे.’ असो.
ही जी महान वृक्षाची कल्पना आहे, ती केवळ सनातन वैदिक धर्मातच नाही तर इतर प्राचीन धर्मांमधेही आढळून येते असे अनेक विद्वानांनी सांगितलेले आहे.
प्राचीन युरोपीय भाषांमधे तिचा उल्लेख **विश्ववृक्ष** अथवा **जगद्वृक्ष** ह्या नांवांनीच करीत असत असे म्हणतात.
वेदांमधे आणि उपनिषदांमधे ही कल्पना अनेक वेळा वापरली गेलेली आहे.
**ऋग्वेदा**मधे अनेक ठिकाणी महान **ब्रह्मवृक्षाचे** वर्णन आलेले आहे. उदाहरणार्थ —

**अबुध्ने राजा वरुण: वनस्य ऊर्ध्वं स्तूपं ददते पूत दक्ष: ।**
**नीचीना: स्थु: उपरि बुध्न: एषां अस्मे अन्त:निहिता: केतव: स्यु: ।।**
**( ऋग्वेद १ - २४ - ७ )**

अर्थ — पवित्र कार्यात आपल्या शक्तीचा उपयोग करणाऱ्या राजा वरुणाने, वनांचा आणि जलाचा आधार असा जो सूर्य, त्याला अंतरिक्षात आधाररहित अवस्थेत ठेवून दिलेले आहे. त्याच्या फांद्या ( सूर्यकिरणे ) खाली पृथ्वीवर पसरल्या आहेत. पण त्यांचे मूळ असलेला सूर्य मात्र वर अंतरिक्षामधे पोकळीत भ्रमण करीत आहे.
( येथे सूर्याला मूळ आणि त्याच्या किरणांना फांद्या असे म्हटलेले आहे.)

**यस्मिन् वृक्षे मधु अद: सुपर्णा: नि विशन्ते सुवते च अधि विश्वे**
**तस्य इत् आहु: पिप्पलं स्वादु अग्रे तत् न उन्नशत् य: पितरं न वेद ।।**
**( ऋग्वेद १ - १६४ - २२ )**

अर्थ — या प्रकृतिरूप वृक्षावर मध खाणारे पंखधारी पक्षी ( जीवात्मे ) राहतात. ह्या वृक्षाच्या वरच्या टोकाला मधुर फळे लागलेली

आहेत. पण जो आपल्या पितरांना ( जन्मदात्याला ) ओळखत नाही त्याला ही मधुर फळे खायला मिळत नाहीत.
( येथे प्रकृतिरूप वृक्षाचा पितर म्हणजे त्याचे मूळ कारण असलेला परमात्मा होय. )

**तं नाकं अर्यः अ गृभीत शोचिषं रुशत् पिप्पलं मरुतः वि धूनुथ ।**

**( ऋग्वेद ५ - ५४ - १२ )**

अर्थ — हे पूजनीय वायुदेवतांनो! तुम्ही आकाशाला शोभा देणाऱ्या पिंपळाच्या वृक्षाला विशेष रितीने हलवून पृथ्वीवर पर्जन्यवृष्टी करवता.

**यस्मिन् वृक्षे सुपलाशे दैवैः सं पिबते यमः ।**
**अत्र नः विश्पतिः पिता पुराणान् अनु वेनति ।।**

**( ऋग्वेद १० - १३५ - १ )**

अर्थ — हिरव्या गार पानांनी सुशोभित झालेल्या ज्या सुपलाश वृक्षावर, देव आणि पितरांच्या बरोबर बसून, यम सोमप्राशन करीत असतो, त्याच वृक्षावर माझा प्रजापती पिता, आपल्या पूर्वजांबरोबर तेच भोग पुन्हा उपभोगू इच्छित आहे.

इतर वेदांमधेही हीच महान **<u>ब्रह्मवृक्ष</u>** अथवा **<u>ब्रह्मवनाची</u>** कल्पना, कुठे औदुंबर वृक्ष, कुठे अश्वत्थवृक्ष तर कुठे वटवृक्षाच्या स्वरूपामधे आलेली आहे.

**श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्रा**मधे भगवान् विष्णूंच्या हजार नावांच्या मधील चार नांवे वृक्षांचीच आहेत.

श्लोक क्रमांक ५९ मधले ५५५ वे नांव —

**<u>वृक्षः</u>** — भक्तांचा कल्पवृक्ष. संसाररूपी वृक्ष हे ज्याचे रूप आहे असा.

तसेच श्लोक क्रमांक ८८ मधली ८२२, ८२३ आणि ८२४ ही तीन नांवे —

**<u>न्यग्रोधः – वटवृक्षरूप. वडाचे झाड.</u>** **<u>उदुंबरः – औदुंबररूप. उंबराचे झाड.</u>** आणि

**<u>अश्वत्थः – अश्वत्थरूप. पिंपळाचे झाड.</u>** अशी आहेत.

**<u>अश्वत्थ</u>** ह्या शब्दाचा अर्थ **<u>' उद्यापर्यंत न राहणारा'</u>** किंवा **<u>'उद्यापर्यंत न टिकणारा '</u>** असाही दिलेला आहे.

**कठोपनिषदा**मधील सहाव्या अध्यायातल्या पहिल्या श्लोकामधे ही कल्पना पिंपळाच्या झाडाच्या स्वरूपामधे आलेली आहे.

**ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः**
**तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते ।**
**तस्मिंल्लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन ।। १ ।।**
**एतद् वै तत् ।**

अर्थ — ह्या विश्वरूपी सनातन अश्वत्थवृक्षाचे मूळ वर ब्रह्माचे ठिकाणी आहे. त्याच्या शाखा खाली आहेत. ह्या वृक्षाचे जे मूळ तेच शुद्ध ब्रह्म होय. तेच सनातन तत्त्व आहे असे ज्ञानी सांगतात. सर्व लोक त्याच्याच आश्रयाने राहतात. त्याच्या पलीकडे काहीही नाही. नचिकेताने विचारलेले तत्त्व हेच होय.

ह्या अगोदर दहाव्या अध्यायामधे भगवंतांनी आपल्या विभूती सांगताना,

**<u>' अश्वत्थः सर्व वृक्षाणांम् '</u>** म्हणजे **<u>' सर्व वृक्षांच्यामधे पिंपळ मी आहे.'</u>** असे सांगितलेले आहे.

सारांश काय तर ' सनातन धर्मशास्त्रामधे सर्व वृक्षांना आदरणीय मानण्यात आलेले आहे आणि त्यांमधेही **<u>पिंपळाच्या झाडाला</u>** विशेष महत्त्वाचे असे स्थान देण्यात आलेले आहे.'

वेगवेगळी झाडे तर आपण नेहमीच बघत असतो. त्यांच्या फळांचा, फुलांचा आणि पानांचा उपभोग घेत असतो.
त्यांचा सर्व प्रकारे उपयोग करून घेतो. इतकेच नाही तर त्यांच्यावर अत्त्याचारही करतो आणि त्यांचा दुरुपयोगही करीत असतो.
परंतु आपल्याला झाडांच्याविषयी फारच थोडे ज्ञान असते. निदान मला तरी त्या विषयी फारशी माहिति नव्हती.
ह्या अध्यायाच्या सुरवातीला एका अद्भुत वृक्षाची उपमा आलेली आहे.
तिच्या विषयी विचार करीत असताना, मनामधे एकूणच वृक्षयोनी आणि विविध वृक्षांच्या विषयी अधिक माहिती मिळविण्याची इच्छा झाली. त्या दिशेने प्रयत्न सुरू झाले. जशी जशी माहिति वाचायला लागलो तसा तसा आश्चर्यचकित झालो.
ह्या जगामधे इतक्या विविध प्रकारचे वृक्ष प्रत्यक्ष अस्तित्वात आहेत की बोलता सोय नाही.
त्यांची वैशिष्ट्ये वाचताना, त्यावर आपला विश्वास बसत नाही. ते माणसाच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेले वृक्ष असावेत असेच वाटते.
परंतु ती सगळी माहिती जगभरातल्या वनांचा व वृक्षांचा शोध घेत असलेल्या वनसंशोधकांनी **( Forest Researcher )**

प्रयत्नपूर्वक मिळविलेली असून, त्यांचे फोटो, त्यांचे स्थान आणि त्यांच्या विषयीची सर्व माहिती सविस्तरपणे दिलेली असल्यामुळे आपल्याला ती नाकारता येत नाही. अविश्वास दाखवता येत नाही.

खरोखरच आपली बुद्धी काम करेनाशी होते. आपण केवळ आश्चर्याने फोटोकडे बघत राहतो.

पृथ्वीच्या पाठीवर अनेक भव्य आणि उत्कृष्ट असे वृक्ष अस्तित्वात आहेत.

त्यांच्याविषयी वाचलेली थोडीफार माहिती सांगतो. नीट लक्ष देऊन ऐका.

१) **दोन पायांचा वृक्ष. ( Two legged Tree.)** — हा वृक्ष आपल्यासारखा चालत नाही. एकाच जागी उभा असतो. पण त्याला दोन पाय आहेत.

२) **चार पायांचा वृक्ष. ( Four legged Tree.)** — हा वृक्ष चतुष्पाद प्राण्यासारखा चालत नाही. जागेवरच उभा असतो. पण त्याला चार पाय आहेत.

३) **शिडीच्या आकाराचा वृक्ष. ( Ladder Tree.)** — ह्याचा आकार एखाद्या शिडीसारखाच आहे. त्यावर शिडीसारखे चढून उतरता येते. शिडीच्या वरच्या बाजूला फांद्या आणि पाने असून खालच्या बाजूला मुळे जमिनीत गेलेली आहेत.

४) **टोपलीच्या आकाराचा वृक्ष. ( Basket Tree.)** — ह्याचे खोड आतून पोकळ असून, आकार एखाद्या बांबूपासून बनविलेल्या टोपलीसारखा आहे. त्याच्या खोडाला असलेल्या शंकरपाळयाच्या आकाराच्या भोकांमधून आपण आत जाऊ शकतो आणि बाहेर येऊ शकतो. त्यावर आतून किंवा बाहेरून वर चढून खाली उतरताही येते.

५) **ओणवा वृक्ष. ( Sweeping Tree.)** — ह्याचा आकार असा आहे की, लांबून पाहिले असता तो कंबरेत वाकून, आपल्याच फांद्यांनी आणि पानांनी जमिनीवरचा कचरा काढतो आहे असे वाटते.

६) **नाचणारे वृक्ष. ( Dancing Tree.)** — हे दोन प्रकारचे आहेत.

पहिल्या प्रकारामधे एकच झाड आहे. त्याचा आकार पाहिल्यावर, एखादी मुलगी आनंदित होऊन नाच करते आहे असे वाटते.

दुसऱ्या प्रकारामधे झाडांचे बेट येते. तेथे शेकडो झाडे आहेत. त्यांचे आकार पाहिल्यावर, ती सगळी झाडे एकत्र येऊन समूह नृत्य करीत आहेत असे वाटते.

७) **किटलीच्या आकाराचा वृक्ष. ( Teapot Tree.)** — ह्याचा आकार हुबेहुब एखाद्या चहाच्या किटली सारखा आहे.

८) **सिलिंडरच्या आकाराचा वृक्ष. ( Cylinder Tree.)** — ह्याचा आकार हुबेहुब, स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडर सारखा आहे.

९) **खोडामधे दुपदरी रस्ता बाळगून असणारा वृक्ष. ( Chandelier Tree.)**

ह्याचे खोड इतके मोठे आहे की त्यामधून एकच वेळी दोन वाहने ये जा करू शकतील इतका मोठा बोगदा तयार करण्यात आलेला आहे. हा बोगदा माणसाने केलेला आहे. तरीही उरलेल्या खोडाच्या आधाराने तो जिवंत आहे. उभा आहे.

१०) **पाणी साठवणारा वृक्ष. ( Baobab Tree.)** — ह्याच्या खोडाचा व्यास सुमारे ३५ फूट असतो आणि उंची १०० फूट असते. त्याच्या वरती फांद्या आणि पाने असतात. हा आपल्या खोडामधे पाण्याचा प्रचंड साठा करतो. ( अंदाजे १,२०,००० लीटर )

११) **स्वत:चा मालक असलेला वृक्ष. ( Tree That Owns Itself.)** — हा वाळवंटामधे असलेला, एकाकी अवस्थेत असलेला, स्वत:पासूनच परत परत उत्पन्न होणारा, स्वत:च स्वत:चा पिता आणि पुत्र असणारा असा वृक्ष आहे. ह्याची मुळे वालुकामय जमिनीमधे पाण्याचा साठा सापडेपर्यंत खोल जातात. ( अंदाजे १२५ फूट खोल.) आणि वाळवंटातल्या विपरीत हवामानाला सतत तोंड देत, त्याचा सामना करीत, स्वत:ला जगवतात.

१२) **महावृक्ष. ( Mega Tree.) ( The Casndelabra Tree.)** — ह्याच्या खोडाला लागून फुटलेल्या फांद्या फार मोठ्या असतात आणि त्यांच्यावर एखाद्या सामान्य झाडाच्या आकाराच्या उपफांद्या असतात. त्यांचे सर्वांचे वजन हा सहजपणे पेलवून धरतो.

१३) **जीवन वृक्ष. ( The Tree of life.)** — ह्याचा बुंधा सुमारे २०० फूट व्यासाचा असून त्यावर अनेक प्राण्यांचे आकार स्पष्टपणे दिसून येतात. ते आकार माणसाने कोरलेले नाहीत तर निसर्गत:च आहेत.

१४) **समुद्राच्या तळाशी असलेले जंगल. ( Underwater Forest.)** — अनेक चौरस मैल जागा व्यापलेल्या ह्या जंगलामधे, खारट पाण्यातच उत्पन्न होणारे आणि जगणारे विविध प्रकारचे जलवृक्ष आहेत.

१५) **अश्वत्थ वृक्ष. ( Sri Maha Bodhi Tree.) ( Banyan Tree.)** — ह्याचे मुख्य खोड कोणते ते ओळखताच येत नाही. हा सर्व बाजूंनी आपल्याच पारंब्यांनी झाकला गेलेला आहे. सुमारे तीन एकर इतक्या प्रचंड विस्ताराचा हा अश्वत्थवृक्ष म्हणजेच पिंपळाचे झाड आहे. येथे ‘ पिंपळाच्या झाडाला पारंब्या कशा फुटल्या? ’ हा ही एक प्रश्न पडतो.

ह्याला **‘ लेकुरवाळा वृक्ष ’** असेही म्हणतात. **( Banyan tree with children.)**

१६) **गूढवृक्ष ( Mysterious Trees.)** — अनेक वृक्ष असे आहेत की, त्यांना पाहताना एखादा भयानक प्राणी अथवा एखादे पिशाच्च पाहिल्यासारखे वाटते.

१७) **जोडवृक्ष ( Dual Trees.)** — हे वृक्ष एकमेकांना विळखा घालतच वाढतात. त्यांच्याकडे पाहिल्यावर ते एकमेकांच्या बरोबर मारामारी करीत आहेत अथवा एकमेकांच्या बरोबर प्रेमालाप करीत आहेत असे वाटते.

१८) अनेक वृक्ष **चमत्कारिक, गंमतीदार** आणि **समजायला कठीण** आहेत. **( Funny Trees.)** — त्यांच्याकडे पाहिल्यावर निरनिराळे प्राणी जमिनीवर उभे अथवा बसलेले आहेत असेच वाटते. पाहणाऱ्याची फसगत होते आणि ते लक्षात आल्यावर सहजपणे हसू येते.

ही झाली विशेष अशा वृक्षांची विशेष माहिती. आता सर्वसाधारण माहिती ऐका.

जगामधे सर्वात उंच वृक्ष हा सुमारे ३७५ फूट उंच आहे.

जगामधे सर्वात वयस्कर वृक्ष हा अंदाजे ४,७०० वर्षांचा आहे.

जगामधे सर्वात मोठे खोड असलेल्या झाडाचा जमिनीवरचा परीघ २०० फूट आहे.

अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन जगामधला सर्वात मोठा वृक्ष ठरविण्यात आलेला आहे. कोणतीही एकच गोष्ट विचारात घेतली तर ह्याच्याहून मोठे वृक्ष आहेत. परंतु ह्याची निवड सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करूनच केलेली आहे.

नांव — **General Sherman** – Biggest Tree in the world.

वय — अंदाजे २,३०० ते २,७०० वर्षे.

जमिनीवरील उंची — सुमारे २७५ फूट.

खोडाचा जमिनीलगतचा व्यास — सुमारे ३७ फूट.

खोडाचा जमिनीलगतचा परीघ — सुमारे ११६ फूट.

मुख्य खोडाचे घनफळ — अंदाजे ५२,५०० घनफूट.

मुख्य खोडाचे वजन — अंदाजे १३८५ मेट्रिक टन.

वृक्षाच्या सर्वात मोठ्या फांदीचा व्यास — सुमारे ७ फूट.

वृक्षाचे एकूण वजन — अंदाजे ६००० मेट्रिक टन.

ह्याची वाढ फार जलद गतीने होते. दर वर्षी साधारणपणे ६० फूट उंचीच्या झाडाच्या खोडा इतक्या लाकडाची भर पडत असते. तरीही ह्याच्या एकूण आकारमानात फार फरक पडत नाही. कदाचित त्याची वर्षभरात होणारी घटही बरीच असावी.

म्हणूनच ‘ <u>हा जगामधला सर्वात मोठा, सर्वात वयस्क आणि सर्वात जलद गतीने वाढणारा वृक्ष आहे</u> ’ अशी मान्यता आहे.

हे सगळे वृक्ष इतक्या दुर्गम प्रदेशामधे आहेत की, ते आपल्या सारख्या सामान्य माणसांना पहायला मिळणे फारच कठीण आहे. आपल्यापैकी ज्यांना इच्छा असेल त्यांनी इंटरनेटवर जाऊन शोध घ्यावा. त्यांना ही सगळी माहिती सविस्तरपणे वाचायला आणि पहायला मिळेल. गौतम बुद्धांनी वृक्षयोनी विषयी फार महत्त्वाचे विधान केलेले आहे. ते म्हणतात की,

‘ वृक्ष हा निसर्गामधील अत्यंत आश्चर्यकारक असा, अवयवांनी युक्त असलेला परिपूर्ण जीव आहे. तो सर्व जीवमात्रांना निवारा देतो. आसरा देतो. आधार देतो. अन्न देतो. त्यांचे रक्षण करतो. इतकेच नाही तर, जे त्याच्यावर कुऱ्हाड चालवतात, त्याला नष्ट करतात, त्यांनाही सावली देतो.’

सर्व सजीव प्राण्यांचे अस्तित्व हे प्रामुख्याने वृक्षांच्यावरच अवलंबून असते.

निसर्गाच्या जीवन - चक्रामधे समतोल साधण्याचे काम वृक्षच करतात. असो.

एवढी सगळी चर्चा करून झाली. माझ्या ह्या अवांतर बोलण्याचा आपल्याला कंटाळा आला नसेल अशी आशा करतो.

आला असेल तर आपण मला क्षमा करा. आता आपण मूळ विषयाकडे जाऊया.

ह्या अध्यायाच्या सुरवातीला एका अद्‌भुत वृक्षाची उपमा आलेली आहे. ती खरोखरच विलक्षण आहे.

आपल्याला जगामधे दिसणाऱ्या सर्व प्रकारच्या वृक्षांपेक्षा फारच अद्‌भुत आहे. चमत्कारिक आहे. समजायला कठीण आहे.

कारण आपल्याला दिसणारे सर्व वृक्ष कसेही दिसत असले तरी त्यांची मुळे खाली जमिनीतच गेलेली असतात आणि त्यांचा विस्तार वरती आकाशाच्या दिशेनेच झालेला असतो. ह्याला कोणताही अपवाद नाही. सनातन धर्मशास्त्रामधे जिला —

**‘ <u>प्रकृति आणि पुरुष यांचा संयोग, प्रकृतीची टांकसाळ, सृजनशक्तिचा पिंगा, प्रकृतीचा पसारा, प्रकृतीचा आभास, पुरुषाला पडलेले स्वप्न, मृगजळ</u> ’** इत्यादी अनेक प्रकारांनी उल्लेखिलेले आहे, ती **मायाच** येथे वृक्षरूपाने वर्णिलेली आहे.

तसेच माया जशी असत्य, अविश्वसनीय आणि केवळ आभास मात्र आहे, त्याचप्रमाणे त्या वृक्षाचे स्वरूपही अविश्वसनीय वाटावे असेच सांगितलेले आहे.

गीतेमधे आलेले महान वृक्षाचे वर्णन हे कठोपनिषदातील अश्वत्थवृक्षाच्या वर्णनावरूनच आलेले आहे, असे अनेक विद्वान अभ्यासकांचे मत आहे. असो.

येथेही अर्जुनाने कोणताही प्रश्न विचारलेला नाही, तरीही श्रीकृष्ण स्वत:च बोलायला सुरवात करीत आहे.

पंधराव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे. तो अर्जुनाला सांगतो आहे की, —

**श्रीभगवानुवाच :**

**ऊर्ध्वमूलमध:शाखम् अश्वत्थम् प्राहुरव्ययम् ।**

**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तम् वेद स वेदवित् ॥ १ ॥**

मूळ वर व शाखा खाली असून जो अव्यय म्हणजे कधीही नाश न पावणारा, वेद ही ज्याची पाने असे ज्या अश्वत्थवृक्षाचे वर्णन करतात, तो वृक्ष ज्याने जाणला तो पुरुष खरा वेदवेत्ता होय.

**ऊर्ध्वमूलम्** — वरती मूळ असलेला. **अध:शाखम्** — खाली फांद्या असलेला.

**अश्वत्थम्** — पिंपळाचा वृक्ष. **प्राहु:** – म्हणतात. **अव्ययम्** — अविनाशी.

संसारवृक्ष कसा आहे ते पहा. चक्क उलटा आहे.

त्याचे मूळ वरती आहे आणि फांद्या, पारंब्या, पाने, फुले व फळांचा विस्तार खाली झालेला आहे. चारही वेद म्हणजे त्याची पाने असे म्हटलेले आहे.

**संसारवृक्षाचा** हा सर्व विस्तार कशाचा आहे? तर —

त्रिगुणात्मक अशी जी **प्रकृती**, तिचाच विस्तार आहे. छत्तीस तत्त्वांचा समुदाय असलेले जे **क्षेत्र**, त्या क्षेत्राचाच विस्तार आहे.

उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या तीनही अवस्थांमधून सतत जाणारे जे **क्षर**, त्या क्षराचाच विस्तार आहे.

आणि असा महाप्रचंड विस्तार ज्या मूलतत्त्वाच्या पासून होतो, ते मूळ म्हणजेच —

**पुरुष** अथवा **क्षेत्रज्ञ** किंवा **अक्षर** असा ' **परब्रह्म परमात्मा परमेश्वर** ' आहे.

मग त्या संसारवृक्षाला **अव्ययम्** म्हणजे अविनाशी असे का म्हटले असेल बरे? त्याला कारण आहे.

ह्या संसारवृक्षाची उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या तीनही अवस्था अशा प्रकारे घडून येत असतात की त्याविषयी तर्क करता येत नाही. किंबहुना, प्राणिमात्रांचे आयुष्य तुलनेने फारच थोडे असल्यामुळे एका मर्यादेच्या पलीकडे, तीनही अवस्थांचे सततचे येणे जाणे कळतच नाही. ह्याचे व्यवहारातले उदाहरण सांगायचे झाले तर ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) आपण विहिरीतले पाणी सतत उपसत असतो आणि आपल्या कामासाठी वापरत असतो. तरीही विहिरीतले पाणी कमी होत नाही. कारण विहिरीच्या आतमधे खोलवर उघडलेले झरे, सतत पाण्याची भर घालतच असतात. परिणामी विहिरीतील पाण्याचा एकूण साठा वाढलेला अथवा कमी झालेला दिसत नाही.

२) सूर्याच्या उष्णतेने, समुद्रामधल्या पाण्याची सतत वाफ होत असते तरीही तो आटलेला दिसत नाही. कारण त्याला येऊन मिळणाऱ्या नद्या पाण्याची भर घालीतच असतात. परिणामी समुद्र आहे तसाच दिसतो.

३) समुद्राच्या पाण्यावर लाटा येतात आणि नाहीशा होतात. परंतु त्या एकामागोमाग एक अशा सतत येतच असतात त्यामुळे त्यांचे नाहीसे होणे कळत नाही.

म्हणूनच हा संसारवृक्ष अविनाशी नसूनही, तो अविनाशी आहे असे वाटते.

ह्याला **अव्ययम्** म्हणायच्या अगोदर **अश्वत्थम्** असेही म्हटलेले आहे. अश्वत्थ म्हणजे पिंपळाचा वृक्ष.

परंतु अश्वत्थ ह्या शब्दाचा दुसरा अर्थ **' उद्यापर्यंत न राहणारा '** किंवा **' उद्यापर्यंत न टिकणारा '** म्हणजेच **' नाशवंत '** असाही आहे. त्यामुळे प्रकृतीच्याकडून सतत होत असलेला संसारवृक्षाचा विस्तार नाशवंतच आहे. त्याला सुरवात आणि शेवट आहे. खऱ्या अर्थाने अविनाशी केवळ परमेश्वरच असतो. असो.

नाना प्रकारचे लोक, त्यामधे असलेले नाना प्रकारचे चल आणि अचल, स्थावर आणि जंगम वस्तुमात्र आणि प्राणिमात्र ह्या सर्वांचा समावेश असलेला, चौऱ्याऐंशी लक्ष योनींचा, हा महाप्रचंड असा विस्तार झालेला आहे.

ह्या विस्ताराचा आवाका इतका मोठा आहे की त्याने दाही दिशा व्यापलेल्या आहेत.

त्याची सुरवात कोठून झाली आहे? त्याचा मध्य कोठे आहे? आणि त्याचा शेवट कोठे झाला आहे? ते कोणालाही दिसत नाही आणि समजतही नाही. असे असले तरीही त्याचा उगम हा अनादि, अनंत, अव्यक्त, अजर, अमर आणि सर्वातीत अशा मूलतत्त्वापासूनच झालेला आहे ह्याविषयी शंका नाही.

आता त्याचे मूळ वरती असून त्याचा विस्तार खालच्या दिशेने झालेला आहे असे कां सांगितले असेल?

ह्याचे आपल्या तर्कबुद्धीला पटेल असे उत्तरही आहे. ह्या प्रश्नाचे उत्तर शोधायला, अठरा महापुराणे मदत करतात.
एकूणच सर्व सृष्टीच्या रचने विषयी वेगवेगळया पुराणांमधे सविस्तर माहिती सांगितलेली आहे.
त्या माहितीमधे बराच फरक दिसून येत असला तरीही, —
' आपण राहतो त्या पृथ्वीच्या वरील बाजूस पुण्यकर्मांनी प्राप्त होणारे पुण्यलोक आहेत आणि पृथ्वीच्या खालच्या बाजूस पाताळलोक आहेत आणि त्याही खाली पापकर्मांनी प्राप्त होणारे नरकलोक आहेत ' ह्या विषयी सर्व पुराणांचे एकमत आहे.
सर्व प्राणी पृथ्वीवर जेथपर्यंत पायी जाऊ शकतात त्याला **' भूलोक '** म्हणतात. माणसांच्यासाठी हा लोक सर्वात महत्त्वाचा.
कारण आपण सगळे पृथ्वीवरच राहतो आणि जे काही वर अथवा खाली असेल, ते पृथ्वीसापेक्षच आहे.
म्हणूनच ह्याला **' मध्यलोक '** असेही म्हणतात.
जेव्हा हे विधान केले गेले असेल तेव्हा कदाचित् माणसाजवळ ' समुद्रावरून किंवा आकाशामधून मार्गक्रमणा करायचे ' ज्ञान नसावे.
म्हणून फक्त पृथ्वीवरील जमिनीचाच उल्लेख करण्यात आला असेल.
तरीही ह्या **' भूलोकाचा '** म्हणजेच पृथ्वीवरील जमिनीचा विस्तार किती आहे त्याविषयी आधुनिक विज्ञान काय सांगते आहे ते ऐका.
एकूण पृथ्वीचा पृष्ठभाग ५१० दशलक्ष चौरस किलोमीटर आहे.
त्यापैकी एकाहत्तर टक्के म्हणजे सुमारे ३६१ दशलक्ष चौरस किलोमीटर पृष्ठभाग पाण्याने व्यापलेला आहे आणि उरलेला एकोणतीस टक्के म्हणजे सुमारे १४९ दशलक्ष चौरस किलोमीटर पृष्ठभाग म्हणजे जमीन आहे. असो.
आपण सगळे जेथे राहतो तो पहिला **भूलोक**.
त्याच्यावर असलेला दुसरा लोक म्हणजे **भुवर्लोक** होय. त्याच्यावर असलेला तिसरा लोक म्हणजे **स्वर्गलोक** होय.
ह्या तीन लोकांना मिळून **कृतक त्रैलोक्य** असे म्हणतात.
शास्त्रांमधे आणि पुराणांमधे ज्या त्रैलोक्याचा नेहमीच उल्लेख केलेला आहे ते हेच.
म्हणजे, सृष्टीच्या एकूण पसाऱ्यामधे त्रैलोक्य सुद्धा किती लहान आहे बघा!
हे त्रैलोक्य अनित्य आहे, नाशवंत आहे, कृतक आहे असे म्हणतात.
त्याच्या वरचा म्हणजे चवथा लोक **महर्लोक** होय. हा नाशवंत आहे पण ह्याचा सर्वनाश होत नाही.
हा **कृतक** म्हणजे नाशवंत लोक आणि **अकृतक** म्हणजे अविनाशी लोक ह्यांच्या मधला लोक आहे. **( Buffer Zone.)**
त्याच्या वरचा म्हणजे पाचवा लोक **जनलोक** होय.
त्याच्या वरचा म्हणजे सहावा लोक **तपोलोक** होय. त्याच्या वरचा म्हणजे सातवा लोक **सत्यलोक** अथवा **ब्रह्मलोक** होय.
ह्या तीन लोकांना मिळून **अकृतक त्रैलोक्य** असे म्हणतात.
हे तीन लोक नित्य आहेत, अविनाशी आहेत, अकृतक आहेत असे म्हणतात. पण ते खरे नसावे.
कारण गीतेच्या आठव्या अध्यायांतील सोळाव्या श्लोकामधे, ' ब्रह्मलोकासह जे जे लोक आहेत तेथून, पुण्याचा साठा संपल्यावर, जीवाला ह्या मृत्युलोकी परत फिरणे भाग आहे. पण हे कौंतेया! मला येऊन मिळाले म्हणजे पुनर्जन्म नाही,' असे भगवंतानेच सांगितले आहे. त्यामागचे कारण काय? तर, ' स्वत: **ब्रह्मदेवही** अमर नाही. त्यालाही आदि, मध्य आणि अंत आहे.' असो.
ह्या शिवाय **' नैऋत्यलोक, वरुणलोक, वायूलोक, कुबेरलोक, ईशानलोक, चंद्रलोक, बुधलोक, शुक्रलोक, मंगळलोक, बृहस्पतीलोक, शनीलोक, सप्तर्षिलोक, ध्रुवलोक, गोलोक '** इत्यादी अनेक लोक सांगितलेले आहेत.
त्यांचा क्रमही वेगवेगळा सांगितलेला आहे. पण ते सगळे लोक सत्यलोकाच्या खालीच आहेत असे सांगितलेले आहे. असो.
ह्या सात लोकांच्या वर आठवा आणि नववा असे दोन लोक आहेत.
ते नक्की कोणते ह्या विषयी शैव संप्रदाय आणि वैष्णव संप्रदाय ह्यांच्यामधे वाद आहेत. मूलभूत असे मतभेद आहेत.
वैष्णव संप्रदायाचे अनुयायी आठव्या लोकाला **शिवलोक** असे म्हणतात.
आणि त्याच्यावर असलेल्या नवव्या लोकास **वैकुंठ** असे म्हणतात. त्यांच्या दृष्टीने **भगवान विष्णू** हा सर्वोच्च स्थानावर आहे.
ह्या उलट शैव संप्रदायाचे अनुयायी आठव्या लोकास **वैकुंठ** असे म्हणतात.
आणि त्याच्यावर असलेल्या नवव्या लोकास **शिवलोक** असे म्हणतात. त्यांच्या दृष्टीने **भगवान शिव** हा सर्वोच्च स्थानावर आहे.
हा वाद विकोपास जाऊन दोन्ही संप्रदायांमधे तेढ निर्माण होऊ नये म्हणून,
**' भगवान शिव म्हणजेच भगवान विष्णू आहे '** आणि **' भगवान विष्णू म्हणजेच भगवान शिव आहे '** आणि
**' ते दोघे वेगळे नाहीत एकच आहेत. एकाच परब्रह्माचे अवतार आहेत,'**

असे म्हणून दोघांनी एकमेकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.
ह्या दोन लोकांच्यावर असलेला जो दहावा लोक आहे तो अंतिम लोक आहे.
' जेथे पोहोचल्यावर जीवाला **मोक्षप्राप्ती** होते.' असे म्हणतात तेच हे स्थान. **' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराचे '** स्थान होय.
गीतेमधे ज्याला उद्देशून, **' माझे स्थान! - अव्यय स्थान! - परम गती! - परम शांती! - निर्वाणपद! - उत्तम गती! - आद्य स्थान! - परब्रह्म! - अखेरचे स्थान!'** इत्यादी विशेषणे अनेक वेळा वापरलेली आहेत तेच हे स्थान आहे.
संसारवृक्षाचे मूळ जेथे उत्पन्न होते आणि रुजते, तेच हे स्थान आहे. असो.
भूलोकाच्या खाली सात पाताल आहेत. **अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल** आणि **पाताल** अशी त्यांची नांवे सांगितली आहेत आणि ते ह्याच क्रमाने एका खाली एक आहेत असेही सांगितलेले आहे. ( म्हणजे भूलोकाच्याखाली पहिला अतल आणि शेवटचा पाताल.) ह्यांचे वर्णन विविध पुराणांनी वेगवेगळे केलेले आहे. काही पुराणांच्या मते,
' तेथे नितांत अंधार आणि प्राण्यांना रहण्यास कठीण अशी परिस्थिती असते,' तर काही पुराणांच्या मते,
' ते स्वर्गाइतकेच सुंदर आणि उपभोगांनी युक्त आहेत. किंबहुना ते स्वर्गापेक्षा जरा अधिकच सुंदर आहेत.'
म्हणूनच ह्या सात पाताळांना **' विवरस्वर्ग '** अथवा **' बिलस्वर्ग '** असेही म्हटलेले आहे. ह्या सात पातालांच्या खाली नरक आहेत.
' पापी माणसांना यातना देण्यासाठी निर्माण केलेले निरनिराळे तुरुंग ' म्हणजे नरक.
ह्यांची संख्या वेगवेगळी सांगितलेली आहे. पण बहुसंख्य पुराणांच्या मते ती अठ्ठावीस आहे.
त्यांची नांवे दिलेली असून, ते अनुक्रमाने एका खाली एक आहेत असे सांगितलेले आहे. त्यांचे सविस्तर वर्णनही केलेले आहे.
पण येथे ते सगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ह्यापैकी प्रत्येक लोकाचा विस्तार लक्षावधी योजने आहे असे सांगितलेले आहे.
एक **योजन** म्हणजे किती मैल ह्याचा शोध घ्यायचा प्रयत्न केला. त्यामधून काही अंदाज आला.
एक योजन म्हणजे सुमारे आठ मैल अंतर. परंतु, ' लक्षावधी योजने म्हणजे नक्की किती क्षेत्रफळाचा प्रदेश ?'
ह्या प्रश्नाचे उत्तर मला अजूनही मिळालेले नाही. असो.
कमीतकमी अठ्ठावीस नरक. त्यावर सात पाताल. त्यावर आपण राहतो तो भूलोक. त्यावर आठ लोक आहेत.
त्याशिवाय अधेमधे इतर चौदा लोक आहेत असेही सांगितलेले आहे. म्हणजे संसारवृक्षाचा विस्तार कमीतकमी अठ्ठावन्न लोकांत झालेला आहे अशी मान्यता आहे. हा एकूण विस्तार किती मोठा असेल ते सांगता येणार नाही.
येथे बसलेल्यांच्यापैकी, अनेक श्रोते स्वभावतः नास्तिक असू शकतील. त्यांचा वेद, शास्त्रे आणि पुराणांवर फारसा विश्वास नसेल.
त्यांच्या मते पुराणे म्हणजे **' भाकड कथांचा संग्रह '** असू शकतो. उपनिषदे म्हणजे **' दिशाभूल करणारे साहित्य '** असू शकतात. वेद म्हणजे काही बुद्धिमान माणसांच्या **' अविश्वसनीय कल्पना '** असू शकतात.
त्यांच्या ह्या मतांचा आदर करून, आपण थोडा वेळ सर्व वेद, शास्त्रे आणि पुराणे बाजूला ठेवूया.
स्वर्ग, पाताल, नरक असे काहीही अस्तित्वात असणे शक्य नाही. ह्या गोष्टी म्हणजे केवळ कल्पना विलास आहे. काही विशिष्ट हेतू बाळगून पसरवलेल्या अफवा आहेत असे समजून, विश्वाच्या एकूण पसाऱ्याविषयी आधुनिक विज्ञान काय सांगते ते पाहूया.
त्यावरती अविश्वास दाखवण्याचे काहीच कारण नाही.
सगळे आयुष्य अंतराळ संशोधनामधे घालवलेले जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ सांगतात की —
' आपण पृथ्वीवर राहतो. म्हणून ती आपल्यापासून शून्य किलो मीटर अंतरावर आहे. म्हणून अंतराळाचा वेध घेताना, संशोधन करताना, आपल्याला सगळ्या गोष्टी पृथ्वीच्या संदर्भातच पाहिल्या पाहिजेत.'
१) सूर्य आपल्यापासून १४,९६,००,००० किलोमीटर अंतरावर आहे. ( १४ कोटी ९६ लक्ष किलोमीटर )
२) आपल्या सर्वात जवळ असलेला चंद्र आपल्यापासून ३,८४,४०० किलोमीटर अंतरावर आहे.
( ३ लक्ष ८४ हजार ४०० किलोमिटर )
३) आपल्या अलिकडे असलेला शुक्र ग्रह आपल्यापासून ४,१४,००,००० किलोमीटर अंतरावर आहे.
( ४ कोटी १४ लक्ष किलोमीटर )
४) आपल्या पलीकडे असलेला मंगळ ग्रह आपल्यापासून ७,८३,००,००० किलोमीटर अंतरावर आहे.
( ७ कोटी ८३ लक्ष किलोमीटर )
५) सूर्यमालिकेमधील सर्वात शेवटी असलेला नेपच्यून ग्रह आपल्यापासून ४,३५,०४,००,००० किलोमीटर अंतरावर आहे.
( ४ अब्ज ३५ कोटी ४ लक्ष किलोमीटर )
( येथून पुढे आपल्या सूर्यमालेच्या बाहेरच्या क्षेत्राचा विचार करायचा आहे. आता अंतर मोजायचे एक नवीन माप सुरू होते आहे बरे

का! कारण यापुढील अंतर हे किलोमीटर मधे मोजता येणे अशक्य आहे.)
प्रकाश किरणाचा वेग दर सेकंदाला तीन लक्ष किलोमीटर इतका असतो. ही माणसाला माहीत असलेली सर्वोच्च गती आहे.
ह्या अंतराला **एक प्रकाश सेकंद ( One Light Second )** असे म्हणतात.
प्रकाश किरण एका मिनिटामधे जेवढे अंतर पार करतात, त्या अंतराला **एक प्रकाश मिनिट ( One Light Minute )** असे म्हणतात.
प्रकाश किरण एका वर्षामधे जेवढे अंतर पार करतात, त्या अंतराला **एक प्रकाश वर्ष ( One Light Year )** असे म्हणतात.
एक प्रकाशवर्ष अंतर म्हणजे अंदाजे ९,४६,०८० कोटी किलोमीटर अंतर.
६) आकाशगंगेमधे **' आपल्या जवळचे '** म्हणता येतील असे दहा तारे आहेत. त्यांच्यापैकी —
आपल्यापासून सर्वात जवळ असलेला तारा, अंदाजे ४.२२ प्रकाशवर्षे दूर आहे. ह्याचा अर्थ असा की, ' प्रकाश किरणांच्या वेगाने प्रवास केला तर त्या ताऱ्यावर पोहोचायला अंदाजे ४.२२ वर्षे लागतील.' असे आढळून आलेले आहे.
आपल्यापासून सर्वात दूर असलेला तारा अंदाजे १०.५० प्रकाशवर्षे दूर आहे. ह्याचा अर्थ असा की, ' प्रकाश किरणांच्या वेगाने प्रवास केला तर त्या ताऱ्यावर पोहोचायला अंदाजे १०.५० वर्षे लागतील.' असे आढळून आलेले आहे.
७) आपला सूर्य हा आपल्या आकाशगंगेच्या मध्यापासून अंदाजे २८,००० प्रकाशवर्षे अंतरावर आहे.
८) आपला सूर्य हा आपल्या आकाशगंगेच्या कडेपासून अंदाजे २२,००० प्रकाशवर्षे अंतरावर आहे.
९) आपली जी आकाशगंगा आहे तिला मिल्की वे गॅलॅक्सी असे म्हणतात. **( Milky Way Galaxy.)**
ती सर्पिलाकार आहे. **( Spiral Galaxy.)** तिचा व्यास सतत बदलत असतो.
तिचा व्यास कमीत कमी एक लक्ष प्रकाशवर्षे ( १,००,००० ) आणि जास्तीत जास्त एक लक्ष वीस हजार प्रकाशवर्षे ( १,२०,००० ) इतका होत असतो, असा अंदाज केलेला आहे.
१०) आकाशगंगेची खोली अथवा जाडी अंदाजे १,००० प्रकाशवर्षे इतकी आहे.
११) आकाशगंगेमधे अंदाजे १०० अब्ज तारे आहेत.
१२) विश्वामधे आपल्या आकाशगंगेसारख्या, अब्जावधी आकाशगंगा असू शकतील.
त्यांचा एकूण विस्तार किती असेल त्याचा अंदाजही करता येत नाही.
१३) असे विश्व हे एकच आहे काय? एकमेव आहे काय? ह्या विषयीसुद्धा निश्चित असे काहीच सांगता येत नाही.
कदाचित अशी अनेक विश्वे असू शकतील. हा केवळ एक अंदाज आहे.
१४) विश्वाच्या पसाऱ्याचे आपल्याला आजपर्यंत जे ज्ञान प्राप्त झालेले आहे ते एकूण विश्वाच्या दोन टक्केही नाही.
आपल्याला अठ्ठ्याणव टक्के विश्वाची माहितीच नाही.
म्हणजे विश्वाचा एकूण विस्तार खरोखर किती आहे त्या विषयी त्यांनाही निश्चित असे काहीच सांगता येत नाही.
म्हणूनच सगळे शास्त्रज्ञ ' अजून संशोधन करीत राहिले पाहिजे. तरच आपल्याला, भविष्यात कधीतरी त्याचे उत्तर मिळू शकेल.' असे एकमुखाने सांगतात.
' देव आहे की नाही त्याविषयी निश्चित माहिती नाही. तरीही एखाद्या गोष्टीवर असलेली श्रद्धा ही खरीच असते. जेव्हा मी संशोधन करीत असतो तेव्हा विज्ञानावर संपूर्णपणे श्रद्धा ठेवतो आणि जेव्हा मी देवासमोर उभा राहून प्रार्थना करीत असतो तेव्हा मी देवावर श्रद्धा ठेवतो.' असे सांगणारे अनेक शास्त्रज्ञ आणि संशोधक आहेत.
शतकानुशतके आणि पिढ्यान्पिढ्या शोध घेत राहिल्यावर, माणसाला आजचे हे ज्ञान प्राप्त झालेले आहे. ते ज्ञानही अल्प आहे, फार थोडे आहे, असे तेच म्हणतात.
सांगायची गोष्ट हीच की, विश्वाच्या ह्या अपरिमित विस्तारालाच सगळी पुराणे **' संसारवृक्षाचा विस्तार '** असे म्हणतात.
अहो ऽऽ, माणसाच्या देहाचा आकार तो किती? आणि त्याचे आयुष्य ते किती?
कितीही फुगवून सांगितला तरीही मानवी देहाचा आकार जास्तीत जास्त आठ फूट उंच आणि चार फूट रुंद आणि आयुष्य जास्तीत जास्त शंभर वर्षे. मग त्याला हा सगळा पसारा नाशवंत असूनही, अविनाशीच वाटणार नाही का?
आता ह्या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर त्यामधून कोणता निष्कर्ष निघेल?
**' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराचे '** स्थान हे सर्वात वरती आहे.
तेथे संसारवृक्षाचे मूळ आहे आणि त्याचा सगळा विस्तार हा खालील बाजूस, उतरत्या क्रमानेच होतो आहे. आपण त्या वृक्षाच्या मधे कुठेतरी आहोत. म्हणजेच आपल्या वरील बाजूला अथांग विस्तार आहे. आपल्या खालच्या बाजूला देखील तसाच विस्तार आहे.

आणि आपल्या सर्व बाजूंनीही तसाच विस्तार आहे.
**सांख्यशास्त्रामधे** ह्या संसारवृक्षाचे स्पष्टिकरण जरा वेगळ्या प्रकारे केलेले आहे.
' येथे वर्णन केलेला वृक्ष प्रत्यक्षामधे कोणालाही, कुठेही पहायला मिळत नाही. परंतु त्याच्याशी साम्य दर्शविणारे दृष्य आपण पाहू शकतो.' असे समजा की, सरोवराच्या एका काठावर पिंपळाचा **विशालतम** म्हणता येईल असा वृक्ष उभा आहे. आपण त्या सरोवराच्या दुसऱ्या काठावर उभे राहून, त्या वृक्षाकडे न पाहता, केवळ पाण्यामधे पडलेले प्रतिबिंब पाहतो आहोत आणि त्या प्रतिबिंबालाच वृक्ष समजत आहोत. मग आपल्याला, तो तथाकथित वृक्ष कसा बरे दिसेल?
बुंधा सर्वात वर दिसेल. वृक्षाची मुळे त्याच्याही वर असतील. पण ती जमिनीच्या आतमधे असल्यामुळे दिसणार नाहीत.
वृक्षाचा सगळा विस्तार, त्याच्या फांद्या, पारंब्या, पाने, फुले इत्यादींचा विस्तार हा खालच्या बाजूने झालेला दिसेल.
आपल्याला पाण्यामधे दिसणारा तो वृक्ष खरा नसेल. तो केवळ भासच असेल. परंतु आपल्याला तो खरा आहे असेच वाटेल.
आपण त्याच्यामधेच गुंतून जाऊ. पाण्यामधे दिसणारे प्रतिबिंब म्हणजे **व्यावहारिक विश्व** आहे **( Material World. )** आणि — ते प्रतिबिंब ज्याचे आहे तो मूळ वृक्ष म्हणजे **अध्यात्मिक विश्व** आहे. **( Spiritual World. )**
' प्रतिबिंबाचे भ्रामकत्व आणि नाशित्व जाणून त्याच्यापासून मोकळे होणे आणि अविनाशी अशा खऱ्या वृक्षाचा शोध घेऊन त्याच्याकडे जाणे हेच वेदांचे ध्येय आहे आणि त्यासाठीच वेद आपल्याला सतत मार्गदर्शन करतात.' असे सांख्य तत्वज्ञानाचे सांगणे आहे.
अशा ह्या गहन **' ब्रह्मांड वृक्षाचे '** खरे स्वरूप जो जाणतो त्याला **' वेदवित् '** म्हणजे वेदांना जाणणारा पुरुष म्हटले आहे.
ज्ञानी पुरुष म्हटले आहे. आता हा विस्तार कसा झाला आहे ते पुढील श्लोकात सांगितलेले आहे.

**अधश्चोर्ध्वम् प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।**
**अधश्च मूलान्यनुसन्ततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥ २ ॥**

तीन गुणांनी पोसलेल्या आणि ज्यापासून विषयांचे अंकूर फुटलेले आहेत, अशा त्याच्या शाखा खाली आणि वरही पसरलेल्या आहेत आणि अखेर कर्माचे रूप पावणाऱ्या त्याच्या मुळ्या खालीही मनुष्यलोकात वाढत लांब गेल्या आहेत.
हे वर्णन सांख्यशास्त्राला अनुरूप आहे असे वाटते.
सांख्यशास्त्राप्रमाणे, ' प्रकृती आणि पुरुष हे दोघे अनादि आहेत. इतकेच नाही तर ते स्वयंभू म्हणजे स्वतःच, स्वतःच्या इच्छेनेच, अस्तित्वात आलेले आणि स्वतंत्र म्हणजे एकमेकांवर अवलंबून नसलेले आहेत.'
ह्यालाच सांख्यांचे द्वैत असे म्हणतात. **' प्रकृति - पुरुष विवेक '** असे म्हणतात.
**निर्गुण पुरुष** म्हणजेच **परमेश्वर** हा संसारवृक्षाचे मूळ आहे.
कोणत्याही वृक्षाचे मूळ रुजण्यासाठी आणि त्याची वाढ होण्यासाठी जमीन असावीच लागते. जमीनच मुळाला घट्ट पकडून ठेवते.
वृक्षाचा विस्तार होण्यासाठी आवश्यक असलेले पाणी, अन्न इत्यादी गोष्टी तीच पुरवते. ही गोष्ट सर्वांना माहीत आहे.
येथे त्रिगुणात्मक प्रकृती ही त्या सुपीक जमिनीचे कार्य करीत आहे. जेव्हा निर्गुण पुरुषाचा त्रिगुणात्मक प्रकृतीशी संयोग होतो, तेव्हा तिचाच अविभाज्य असा भाग असलेले सत्व, रज आणि तम हे तीन गुण क्रियाशील होतात.
प्रथम सत्त्वगुणाच्या योगाने **बुद्धितत्त्व** निर्माण होते. ते रजोगुणाने भारले गेल्यावर, त्याच्या पासून **मन** निर्माण होते.
मनाची सहचारिणी असलेली ममता, **अहंकार** निर्माण करते. त्या अहंकाराच्या योगे **पंचमहाभूते** व्यक्त होतात.
**पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये आणि त्यांचे विषय** ह्यांचा अंतर्भाव, स्वभावतःच पंचमहाभूतांमधे होत असल्यामुळे, ती पंचमहाभूतांच्या बरोबरच आकारास येतात.
अशा प्रकारे, त्रिगुणांचाच तयार झालेला **गर्भपिंड** व्यक्त होतो आणि त्यानंतर त्या गर्भपिंडामधे **जीव** प्रवेश करतो.
जीवाने प्रवेश केल्यावर मग **' अंडज, स्वेदज, उद्भिज आणि जारज '** ह्या चार प्रकारांना अनुसरून गर्भपिंडाचा आकार व्यक्त व्हायला सुरवात होते आणि त्यामधून वेगवेगळ्या प्रकारच्या अगणित योनी निर्माण होतात.
ह्या सर्व योनींनाच त्या वृक्षाच्या शाखा म्हटलेले आहे. ह्यांना **अधः च ऊर्ध्वम् प्रसृताः** म्हणजे ' खाली आणि वर अशा सर्वत्र पसरलेल्या ' असे म्हटलेले आहे. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.
खाली वाढ होत असलेल्या फांद्या, पारंब्यांच्या रूपाने परत परत वरती जातात. प्रकृतिरूपी जमिनीत रुजतात. त्यांनाही नवीन मुळे फुटतात आणि नवीन पारंब्यांचा जन्म होऊन, त्यांचाही विस्तार व्हायला सुरवात होते.
अशा प्रकारे त्रिगुणात्मक प्रकृती, ' बुद्धी, मन, अहंकार, पाच महाभूते, तसेच दहा इंद्रिये आणि त्यांचे विषय, त्यामधून उत्पन्न होणारी इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात, चेतना आणि धैर्य इत्यादी तत्वे ' ह्यांच्या सहाय्याने संसाररूपी वृक्षाचा कल्पनातीत असा विस्तार करीत असते. हा विस्तार सर्व बाजूंनी होत असतो. ह्याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितलेली आहे.

केवळ **मनुष्यलोके** म्हणजे मनुष्ययोनीत, **कर्मानुबन्धीनि** म्हणजे कर्माना अनुसरून बांधून टाकणारी अहंकार, वासना आणि ममतारूपी मुळे, **अनुसन्ततानि** म्हणजे खाली आणि वर सर्व लोकांना व्यापून राहिली आहेत. असे सांगण्यामागे विशेष असे कारण आहे.
इतर सर्व योनींमधे केवळ पूर्वी केलेल्या कर्मांची फळे भोगण्याचाच अधिकार आहे. नवीन कर्मे करायचा अधिकार नाही.
म्हणून त्यांना **भोगयोनी** असेही म्हटलेले आहे. पूर्वकर्मांची फळे भोगून झाली म्हणजे परत मनुष्ययोनीत जन्म घ्यावाच लागतो.
म्हणून त्या योनींमध्ये अहंकार, वासना आणि ममतारूपी मुळे असूनही ती कर्मानुसार बांधून टाकणारी होत नाहीत.
मनुष्ययोनीची गोष्ट मात्र वेगळी आहे. केवळ मनुष्ययोनीच अशी आहे की जिच्यामधे, पूर्व कर्माची फळे भोगण्याबरोबरच, विशिष्ट हेतूने नवीन कर्मे करण्याचाही अधिकार आहे. ती कर्मे म्हणजे मनुष्य जन्मातील बऱ्या किंवा वाईट वर्तनाला अनुसरून जोडली गेलेली कर्मे होत. त्यांचा प्रभाव भविष्यावर होत असतो. त्यांनाच **क्रियमाण कर्म** असे म्हटले आहे. कोणतेही कर्म केल्यावर त्याचे चांगले अथवा वाईट फळ मिळणार हे निश्चित आहे. म्हणूनच ' केवळ मनुष्ययोनीमधे अहंकार, वासना आणि ममतारूपी मुळे ही कर्मानुसार बांधून टाकणारी होतात. ' असे सांगितले आहे. असो.
ह्या त्रिगुणात्मक संसारवृक्षाच्या पसाऱ्यामधून पूर्णपणे मोकळे झाल्याशिवाय माणसाला स्वातंत्र्य मिळणार नाही.
जन्म आणि मृत्यूच्या रहाटगाडग्यापासून मुक्ती मिळणार नाही. मोक्ष मिळणार नाही. मग त्यासाठी काय करायला पाहिजे?

**न रुपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा ।**
**अश्वत्थमेनम् सुविरूढमूलम् असङ्गशस्त्रेण दृढेन छित्वा ।। ३ ।।**
**ततः पदन् तत्परिमार्गितव्यम् यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।**
**तमेव चाद्यम् पुरुषम् प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ।। ४ ।।**

परंतू इहलोकी याचे स्वरूप उपलब्ध होत नाही किंवा अंत, आदि आणि आधारस्थानही मिळत नाही. अत्यंत खोल गेलेल्या मुळ्यांचा हा अश्वत्थवृक्ष अनासक्तिरूप बळकट तलवारीने तोडून टाकून, ' सृष्टिक्रमाची ही पुरातन प्रवृत्ती ज्यापासून निघाली त्याच आद्य पुरुषाकडे मी जातो.' असा संकल्प करून, जेथे गेले असता पुन्हा माघारी येत नाहीत, ते स्थान शोधून काढावे.
जरी हा संसारवृक्ष नाशवंत असला तरीही इतका अवाढव्य आहे, इतका गहन आहे, त्याचा पसारा इतका विस्तारलेला आहे की, त्याचे स्वरूप, त्याची सुरवात, त्याचा मध्य आणि त्याचा शेवट कोणालाही समजत नाही.
प्रत्येक प्राणिमात्र दिशाहीनपणे फिरत असतो. भरकटल्यासारखाच वावरत असतो. फिरून फिरून परत परत त्याच जागी येत असतो.
ह्या लोकीच्या आणि परलोकीच्या, सगळ्या नाशवान आणि मृगजळाप्रमाणे भासमान असलेल्या भोगांमधे गुंतून गेलेला असतो.
स्त्री, पुत्र, कन्या, घरदार, जमीनजुमला, मालमत्ता, मानमरातब, प्रतिष्ठा, येथे फळाच्या इच्छेने केली जाणारी आणि मृत्यू नंतर स्वर्गप्राप्ती व्हावी ह्या अपेक्षेने केली जाणारी सर्व प्रकारची कर्मे, ह्यात पूर्णपणे अडकलेला असतो आणि त्यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या सुख आणि दु:ख, प्रीती आणि अप्रीती, राग आणि लोभ, मद आणि मत्सर, भय आणि उद्वेग इत्यादी भावनांना सामोरे जात असतो.
ह्या सर्व गोष्टींच्यापासून मोकळे होणे, त्यांच्याविषयी आसक्ती न बाळगणे ह्यालाच वैराग्य म्हणतात.
ही वैराग्याची भावना दृढतम होण्याच्या क्रियेला **' असङ्ग -शस्त्र '** असे नांव दिलेले आहे.
ह्या शस्त्राचा वापर करून सर्व चराचर संसाराचा त्याग करणे, त्याचे चिंतन न करणे, त्याविषयी मोह न बाळगणे, त्याविषयीच्या सर्व प्रकारच्या वासनारूपी मुळांचा उच्छेद करणे ह्या क्रियेलाच **' असङ्गशस्त्रेण दृढेन छित्वा '** असे म्हटलेले आहे.
असे केल्यानंतर, **' तमेव चाद्यम् पुरुषम् प्रपद्ये '** म्हणजेच ह्या संसारवृक्षाचे मूळ ज्याच्या पासून निघालेले आहे त्याच आदिपुरुषाला शरण जाणे. अविनाशी **परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराला** प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने सतत त्याचेच चिंतन, मनन, भजन, पूजन इत्यादी करीत राहणे, त्याच्यावर पूर्णपणे विश्वासून त्याला अनन्यभावाने शरण जाणे. असे करणे म्हणजेच,
**' ततः पदम् तत् परिमार्गितव्यम् '** म्हणजेच त्या परम पदाचा शोध घेणे होय.
अशा प्रकारे प्रयत्न केल्यावर काय होते ते पुढील श्लोकांमधे सांगितले आहे.

**निर्मानमोहा जितसङ्गदोषाः अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।**
**द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदु:खसंज्ञैः गच्छन्त्यमूढाः पदमव्ययन् तत् ।। ५ ।।**
**न तद्भासयते सूर्यः न शशाङ्को न पावकः ।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमम् मम ।। ६ ।।**

मान व मोह यांनी जे विरहित, आसक्तिदोष ज्यांनी जिंकला आहे; अध्यात्मज्ञानाचे ठिकाणी जे नेहमी स्थिर, जे निष्काम आहेत आणि सुखदु:खापासून मुक्त झालेले आहेत, ते ज्ञाते पुरुष त्या अव्यय स्थानाला जाऊन पोहोचतात. जे सूर्य, चंद्र किंवा अग्नी प्रकाशित करीत

नाहीत, जेथे गेले असता परत ह्या संसारात येणे नाही, असे ते माझे परम स्थान होय.

ह्या पूर्वी अनेक वेळा सांगितली गेलेली ' स्थितप्रज्ञ, त्रिगुणातीत, योगयुक्त, ज्ञानवान, भक्तिमान ' इत्यादी पुरुषाची लक्षणे, विचार आणि आचार असेच आहेत. तसेच त्याचा अंतिम परिणाम मुक्ती हाच आहे. मोक्ष हाच आहे.

येथे त्यालाच **' अव्यय स्थान प्राप्त होणे '** असे म्हटलेले आहे.

सर्व जगामधे प्रकाश देणाऱ्या आणि प्रकाशित करणाऱ्या अशा जितक्या देवदेवता आहेत त्या सगळ्या देवदेवता त्याच्या इच्छेने आणि सामर्थ्याने प्रकाशित होत असतात, म्हणून त्यांच्यापैकी कोणीही ज्याला प्रकाशित करू शकत नाही असे ते ठिकाण आहे.

त्याचेच वास्तव्याचे ठिकाण आहे. **' तत् धाम परमम् मम ।।'** अर्जुना ऽऽ, तेच माझे परमधाम आहे.

उपनिषदांनी ह्या अद्वितीय स्थानाचे फार सुरेख वर्णन केलेले आहे.

**यत्र न सूर्यस्तपति यत्र न वायुर्वाति ।**
**यत्र न चंद्रमा भाति यत्र न नक्षत्राणि भान्ति ।**
**यत्र न अग्निर्दहति यत्र न मृत्युः प्रविशति ।**
**यत्र न दुःखानि प्रविश्यन्ति ।।**
**सदानंदम् परमानंदम् शांतम् शाश्वतम् ।**
**सदाशिवम् ब्रह्मादि वंदितम् ।**
**योगिध्येयम् परम् पदम् ।**
**यत्र गत्वा न निवर्तन्ते योगिनः ।।**

अर्थ — जेथे सूर्य ताप देत नाही. जेथे वायू वाहत नाही. जेथे चंद्र प्रकाशत नाही. जेथे तारे चमकत नाहीत. जेथे अग्नी जाळत नाही. जेथे मृत्यूला प्रवेश नाही. जेथे दुःखांना प्रवेश नाही आणि जेथे गेल्यावर योगी परत येत नाहीत. अशा प्रकारे सदैव आनंदित असे, परम आनंदित असे, अत्यंत शांत असे, सनातन म्हणजे प्राचीन असूनही नूतन असणारे, अत्यंत कल्याणकारक आणि ब्रह्मदेवादि देवतांच्या कडून सदैव पूजिले जाणारे असे ते परमस्थान आहे.

त्याचे यथार्थ वर्णन कोणाला बरे करता येईल? ' असो.

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनःषष्ठानीन्द्रियाणी प्रकृतिस्थानि कर्षति ।। ७ ।।**
**शरीरम् यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ।। ८ ।।**
**श्रोत्रञ् चक्षुः स्पर्शनञ् च रसनङ् घ्राणमेव च ।**
**अधिष्ठाय मनश्चायम् विषयानुपसेवते ।। ९ ।।**

माझाच सनातन अंश, जीवलोकी जीव होऊन, प्रकृतीत असणारी मनासह सहा इंद्रिये आपल्याकडे ओढून घेतो. ह्या जीवाला जेव्हा स्थूल शरीर प्राप्त होते आणि जेव्हा तो स्थूल शरिरामधून निघून जातो तेव्हा, फुलांपासून वायु जसा गंध घेऊन जातो तसा, हा जीव सर्व इंद्रिये बरोबर घेऊन जातो. कान, जीभ, त्वचा, जीभ व नाक तसेच मन ह्यांचे ठिकाणी ठाण मांडून हा विषयांचा उपभोग घेत असतो.

येथे **जीवलोके** ह्या शब्दाचा अर्थ, मृत्युलोकी जीवाला जन्म घेण्याचे माध्यम आणि वास्तव्याचे ठिकाण असलेले **शरीर** असा आहे आणि त्यामधे स्थूल आणि सूक्ष्म अशा दोनही प्रकारच्या शरीरांचा समावेश आहे.

तसेच त्या शरीरामधे जो वास्तव्य करतो, त्या जीवात्म्याला उद्देशून, **मम एव अंश** म्हणजे माझाच अंश आणि —

**सनातनः** म्हणजे प्राचीन असूनही नवीनतम असलेला असे म्हटले आहे.

वास्तविक पाहता परमेश्वर हा सर्वकाळी, सर्वस्थळी, सर्वत्र भरून राहिलेला असून, सर्वकाही संपूर्णपणे व्यापून राहिलेला आहे.

परंतु जगामधे नाना प्रकारच्या योनी अस्तित्वात असल्यामुळे त्याची अभिव्यक्ती वेगवेगळी आहे असा भास होतो.

एखाद्या मडक्यामधे असलेले आकाश, एखाद्या विहिरीमधे असलेले आकाश आणि एखाद्या घरामधे असलेले आकाश हे वेगळे नसते. एकच असते. परंतु मडके, विहीर आणि घर ह्यांच्याशी संबंध आल्यामुळे ते वेगवेगळे भासते.

येथेही तसाच प्रकार आहे. एकच परमेश्वर वेगवेगळ्या योनींमधे वेगवेगळा भासतो.

जेव्हा एखाद्या शरीरामधे जीवात्मा प्रवेश करतो, तेव्हा तो मन आणि पाच इद्रियांना आपल्याकडे आकर्षित करतो. ही पाच इंद्रिये

म्हणजे ज्ञानेंद्रिये आहेत. ह्या शिवाय पाच कर्मेंद्रियेही आहेत. परंतु त्यांचे कार्य हे ज्ञानेंद्रियांच्या शिवाय घडून येऊ शकत नाही. म्हणून त्यांचा समावेश ज्ञानेंद्रियांच्यामधेच केलेला आहे.
प्रकृतीच्या बरोबर संयोग झाल्यामुळे, मुळामधे स्वतंत्र असलेला जीवात्मा प्रकृतीकडून बांधला जातो आणि सर्व कर्मांचा कर्ता आणि भोक्ता बनतो. मन, ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये ह्यांचे कार्य हे संपूर्णपणे जीवात्म्यावरच अवलंबून असते.
जीवात्मा हाच त्यांचा स्वामी होतो आणि त्याच्या प्रेरणेनेच सर्व प्रकारची कार्ये घडून येतात.
म्हणूनच कठोपनिषदामधे स्पष्टपणे सांगितलेले आहे की,

**आत्मेंद्रियमनोयुक्तम् भोक्तेत्याहुर्मनीषिण: ।**

अर्थ — मन, बुद्धी आणि इंद्रिये ह्यांनी युक्त असलेल्या जीवात्म्याला, ज्ञानीजन भोक्ता असे म्हणतात.
हा जीवात्मा जेव्हा शरीराला सोडून जातो तेव्हा मन, बुद्धी आणि इंद्रिये ही निष्क्रिय होतात. त्यांचे कार्य थांबते.
म्हणूनच ' शरीर सोडताना जीवात्मा सर्व इंद्रियें आपल्या बरोबर घेऊन जातो आणि नवीन शरिरामधे प्रवेश करताना इंद्रियांच्यासह प्रवेश करतो.' असे म्हटले आहे.

**उत्क्रामन्तम् स्थितम् वापि भुञ्जानम् वा गुणान्वितम् ।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुष: ।। १० ।।**
**यतन्तो योगिनश्चैनम् पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।**
**यतन्तोऽप्यकृतात्मान: नैनम् पश्यन्त्यचेतस: ।। ११ ।।**

शरीरांतून निघून जाणाऱ्यास किंवा त्यात राहणाऱ्यास किंवा गुणांनी युक्त होऊन उपभोग घेणाऱ्यास मूर्ख लोक जाणत नाहीत. ज्ञानचक्षूने पाहणारे लोक मात्र त्याला ओळखतात. तसेच प्रयत्न करणारे जे योगी ते आपल्याठायी स्थित असलेल्या आत्म्याला ओळखतात.
पण ज्यांची बुद्धी शुद्ध नाही असे अज्ञ लोक प्रयत्न करूनही याला ओळखत नाहीत.
काय गंमत आहे पहा! बाळ जन्माला येते म्हणजे नक्की काय होते बरे?
ज्याने अगोदर मन, बुद्धी आणि इंद्रिये ह्यांच्यासह कोणत्या तरी एका शरिराचा त्याग केलेला असतो, तो जीवात्मा ह्या नवीन शरीरामधे मन, बुद्धी आणि इंद्रिये ह्यांच्यासह प्रवेश करतो.
सगळे आप्तेष्ट आनंदित होतात. पेढे वाटून एकमेकांचे अभिनंदन करतात. बाळाच्या आई - बापाचे कौतुक करतात.
आई - बाप बाळाचे बारसे करून त्याला आपल्या आवडीचे, कोणते तरी नांव ठेवतात. ते नांव बाळाच्या शरीराला ठेवलेले असते बरे का! पण ते कोणाच्याही लक्षात येत नाही. पुढे बाळ मोठा होतो. शाळेत जातो. अभ्यास करतो. शिक्षण घेतो.
ह्या सगळ्या कालावधीमधे त्याला सगळी मोठी माणसे, ' तू म्हणजे शरीर आहेस. शरिराची काळजी घेणे म्हणजे स्वत:ची काळजी घेणे आहे.' हेच शिकवीत असतात. त्यासाठी त्याला अनेक मार्गांनी, अनेक प्रकारचे शिक्षण दिले जाते.
' शरीराला कसे नटवायचे, कोणकोणते कपडे घालायचे, हातापायात काय घालायचे, जरा काही दुखायला लागले म्हणजे कोणते मलम लावायचे, कोणते औषध घ्यायचे, जास्त त्रास व्हायला लागू नये म्हणून डॉक्टरकडे जाऊन त्याला काय सांगायचे, वेगवेगळ्या तपासण्या कशा करून घ्यायच्या, त्याने दिलेली औषधे प्रामाणिकपणे कशी घ्यायची, इतरांच्या बरोबर कसे वागायचे, आपले हक्क कसे सांभाळायचे, आपल्या अधिकारांचे रक्षण कसे करायचे, काहीतरी मिळवायचे असेल तर त्यासाठी काय करायचे, सतत नवनवीन वस्तू आणून त्यांचा उपभोग कसा घ्यायचा, इतरांच्यापेक्षा चार पावले पुढे जाण्यात कसा पुरुषार्थ असतो, आपल्या घरामधे नवनवीन सुविधा कशा करून घ्यायच्या, आपल्याकडे असलेल्या गोष्टींचा टेंभा कसा मिरवायचा, आपल्याकडे नसलेल्या गोष्टी मिळाव्यात म्हणून काय काय करायचे,' वगैरे, वगैरे.
ह्या सगळ्या गोष्टी सगळयांच्याकडून सतत शिकवल्या जातात आणि ह्यालाच **' मुलाला घडवणे !'** असे अत्यंत अभिमानाने म्हणतात. येथे आपल्याला असा प्रश्न पडेल की, ' हे सगळे शिकवल्यामुळेच मूल जगामधे जगण्यासाठी सक्षम होते. त्याला संकटांना तोंड देण्याची शक्ती प्राप्त होते. तसे केले नाही तर कोणालाही आपले आयुष्य जगणेच अशक्य होईल. सगळे निराश होतील. हताश होतील. आत्महत्त्या करून आपले मौल्यवान आयुष्य अवेळी संपवायला प्रवृत्त होतील. आजकाल आपल्याला अशी अनेक उदाहरणे पहायला मिळतात. मग असे करणे चुकीचे आहे काय?' मुळीच नाही. असे करणे चुकीचे नाही तर अत्यावश्यकच आहे.
आपल्या शरीराची काळजी कशी घ्यायची? त्याची स्वच्छता कशी राखायची? त्याला कसे सांभाळायचे? हे सगळे मुलांना शिकवलेच पाहिजे. त्या विषयी कोणतीही शंका नाही आणि दुमत असण्याचे कारणही नाही.
त्याच बरोबर ' शरीराला गरजेपेक्षा जास्त महत्व देणे, त्याचे अवाजवी चोचले पुरवणे, ते म्हणजेच सर्वस्व आहे असे समजणे आणि त्याच्यासाठी सारासार विवेक न बाळगता, नीतिमत्ता सोडून वाटेल तसे वागणे, वाटेल ते करणे इत्यादी गोष्टी चुकीच्या असून त्या

टाळल्या पाहिजेत. शरीराची काळजी घ्यावी पण सतत काळजी करीत राहू नये.' हे सुद्धा शिकवले गेले पाहिजे.
' शाळेत गेले पाहिजे, अभ्यास केला पाहिजे, ज्ञान मिळविले पाहिजे.' हे तर मुलांना सांगायला हवेच.
त्याची गरज आहेच. त्यामुळेच व्यक्तीचा विकास होतो. त्याच बरोबर —
' आपण इतरांच्यापेक्षा शहाणे असण्यात काहीही थोरवी नाही. कारण जगात कितीतरी लोक आपल्यापेक्षा शहाणे असतात. तसेच आपण इतरांच्यापेक्षा वेडे किंवा मूर्ख असण्यात काहीही कमीपणा नाही. कारण जगात कितीतरी लोक आपल्यापेक्षा वेडे किंवा मूर्ख असतात.'
' आपण काल जसे होतो त्यापेक्षा आज किती शहाणे झालो ह्याचा रोज विचार करावा. त्यामुळे आपल्याला स्वत:मधे बदल करायला जास्तीत जास्त वाव मिळेल. स्वत:मधे सुधारणा घडवून आणता येईल.'
' इतरांची निंदा करून कोणालाही वंदनीय होता येत नाही. इतरांना वाईट ठरवून कोणालाही चांगले होता येत नाही. इतरांना वेदना देऊन, यातना देऊन, त्रास देऊन कोणालाही मन:शांती मिळवता येत नाही. इतरांना फसवून, लुबाडून मिळवलेल्या संपत्तीने कोणालाही श्रीमंत होता येत नाही. तसे करणे योग्य नाही. त्या ऐवजी, आपण दुसऱ्यांना जितकी मदत करू तितके आपले स्वत:चे आयुष्य सुधारेल. आपल्या विषयी सद्भावना निर्माण होतील.' हे सुद्धा सांगितले गेले पाहिजे. असो.
पुढे शिक्षण झाल्यावर बाळ नोकरी किंवा व्यवसाय करतो. लग्न करतो. त्यालाही मुलेबाळे होतात.
इतर नातेवाईकांशी, आप्तेष्टांशी आणि मित्रमंडळींशी नियमीतपणे संबंध येतच असतात. वादविवाद, भांडणे, समज, गैरसमज होतच असतात. मान, अपमान, आनंद, दु:ख, राग, लोभ, अहंकार, मत्सर, भय, उद्वेग इत्यादी भावभावनांना **<u>उपभोगणे</u>** किंवा **<u>भोगणे</u>** चालूच राहते. हे सगळे कोण करीत असते? कोणाच्या साक्षीने करीत असते? का करीत असते?
ते कोणाच्याही लक्षात येत नाही. कोणालाही समजत नाही. शेवटी कर्मविपाक प्रक्रियेच्या सिद्धांतानुसार कधीतरी काळाचे आक्रमण होते. गेली अनेक वर्षे बाळाच्या शरीरामधे वास्तव्य करीत असलेला **<u>जीवात्मा</u>** मन, बुद्धी आणि इंद्रिये ह्यांच्यासह बाळाच्या शरीराचा त्याग करतो. सगळे आप्तेष्ट अत्यंत दु:खित होतात. ढसाढसा रडतात. आक्रोश करतात.
ज्याचे जसे नाते असेल त्यानुसार ' आमचा अमुक अमुक गेला हो ऽऽ!' असे इतरांना सांगतात. त्यांना दुसरे काही सुचत नाही. सारख्या त्याच्याच आठवणी येतात. त्याच्याशिवाय सगळे निरर्थक आहे असे वाटायला लागते.
तो समोर शांतपणे झोपलेला दिसत असतो. तरीही त्याला **<u>आपला</u>** म्हणायला कोणीही तयार नसते.
**<u>' हा तो नाही हो ऽऽ! हे त्याचे प्रेत आहे ऽऽ! तो गेला हो गेला ऽऽ!'</u>**
अरे ऽऽ? शरीर तर इथे दिसते आहे. मग गेला तो कोण? नक्की कोण बरे गेला?
आता सगळ्यांना अंदाज आलेला असतो. उत्तर मिळालेले असते. पण त्याचा काहीही उपयोग नसतो.
कारण ते उत्तर कोणीही लक्षात ठेवू इच्छित नाही. एकदा का बाळाचे तेरावे झाले की मग परत **<u>ये रे माझ्या मागल्या.</u>**
आपल्यापैकी प्रत्येकाची हीच कथा आहे. आपली बुद्धी, आपले मन शुद्ध नसते.
आपण स्वत:ला सोडून विचार करूच शकत नाही. आपल्याला ' निरपेक्षपणे, इतरांच्यासाठी काहीतरी करावे,' असे वाटतच नाही. आधी आपल्याला कळत नाही. कळले तरी वळत नाही. हाच तर मोठा प्रश्न आहे.
असा विचार करणारे, स्वार्थ बाजूला ठेवणारे, कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करणारे, इतरांच्या आनंदाने आनंदित होणारे किती लोक असतील बरे? कोणी असलाच तर, लाखात एखादाच असेल. म्हणून तो महत्त्वाचा. तोच ज्ञानवान् कर्मयोगी.
जे ज्ञानी असतात, ज्यांना परब्रह्माविषयीचे ज्ञान झालेले असते, तेच शरीरामधे असणाऱ्या परमात्म्याला ओळखतात आणि सदैव त्याचे स्मरण ठेवून त्यानुसारच वागतात. सर्वांच्या विषयी समभाव बाळगतात.
महाभारताच्या वनपर्वामधे, धर्मराजाने यक्षराजाच्या प्रश्नाला चपखल उत्तर दिले आहे. सरोवराच्या काठावर त्याला यक्षराजाने अनेक प्रश्न विचारले. त्यातला एक प्रश्न, ' युधिष्ठिरा, जगामधले सर्वात मोठे आश्चर्य कोणते?' हा होता.
ह्या प्रश्नाचे युधिष्ठिराने काय उत्तर दिले आहे ते नीट ऐका.

**अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम् ।**
**शेषा: स्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमत: परम् ।।**

अर्थ — ' ह्या जगामधे रोजच्या रोज असंख्य प्राणी मरण पावताना, यमलोकी जात असताना सगळेच पाहतात. तरीही जे जिवंत असतात ते स्वत:ला अमर समजत असतात. अमर असल्यासारखेच वागतात. अमर होण्याचीच इच्छा करतात.
ह्यापेक्षा अधिक मोठे आश्चर्य दुसरे कोणते असेल बरे?'
ह्यावर आणखी काही बोलायची आवश्यकता आहे काय? मला तरी वाटत नाही.

आता यापुढील चार श्लोकांमधे आत्म्याच्या सर्वव्यापित्वाचे वर्णन केलेले आहे.
ते वाचत असताना आपल्याला सातव्या अध्यायामधील आठ ते बारा ह्या पाच श्लोकांची आठवण होते. तेथे **परा** प्रकृतीची माहिती सांगताना, पदार्थाचा जो मुख्य गुणधर्म असतो आणि ज्यामुळे पदार्थ ओळखला जातो, तो गुणधर्म म्हणजेच परा प्रकृतीचा आविष्कार असतो असे सांगून त्याच्या समर्थनार्थ उदाहरणे दिलेली आहेत.

**यदादित्यगतम् तेजः जगद्भासयतेऽखिलम् ।**
**यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ।। १२ ।।**
**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।**
**पुष्णामि चौषधिः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ।। १३ ।।**

जे तेज सूर्यामधे असून सर्व जगाला प्रकाशित करते, जे तेज चंद्रात आणि अग्नित आहे ते माझेच तेज आहे असे समज.
मीच पृथ्वीमध्ये प्रवेश करून आपल्या शक्तीने सर्व भूतांना धारण करतो आणि रसरूप चंद्र होऊन सर्व वनस्पतींचे पोषण करतो.
**सूर्याचे** तेज असह्य, दिपवून टाकणारे आणि सर्व जगाला प्रकाशित करणारे आहे.
**चंद्राचे** तेज सह्य, आनंददायक आणि शीतल आहे. **अग्नीचे** तेज प्रखर आणि दाहक आहे.
तिघांचे तेज वेगवेगळ्या प्रकारचे आहे. पण त्यांचे उगमस्थान एकच आहे.
ते स्थान म्हणजेच जेथे संसारवृक्षाचे मूळ आहे ते सर्वोच्च स्थान. **' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराचे '** निवासस्थान.
**पृथ्वीमधे** धारणशक्ती आहे. त्या शक्तीमुळेच ती पाण्याचा इतका मोठा साठा धारण करू शकते. त्याच्या सतत होणाऱ्या आघातांनी नाश पावत नाही. तिच्या अंगाखांद्यावर उत्पन्न होऊन वाढणाऱ्या असंख्य चल आणि अचल भूतमात्रांना धारण करते. त्यांचे भरण पोषण करते. त्यासाठी आवश्यक असलेल्या वनस्पती, भाज्या, फळे आणि धान्य इत्यादींना चंद्र किरणांच्या ऊर्जेच्या सहाय्याने वाढवीत असते. त्यांच्याद्वारेच सर्व प्राणिमात्रांचे पोषण होत असते. पृथ्वीच्या ह्या धारणशक्तीचे आणि चंद्रकिरणांच्या ऊर्जाशक्तीचे उगमस्थान एकच आहे. ते स्थान म्हणजेच **' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराचे '** निवासस्थान होय.
प्राणिमात्रांना जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न नुसते उपलब्ध असून चालत नाही.
ते ग्रहण करणे, चर्वण करणे आणि पचवणे ह्यासाठी प्राणिमात्रांचे ठिकाणी विशेष अशी शक्ती असावी लागते.
त्याविषयी पुढील दोन श्लोकांमधे सांगितलेले आहे.

**अहम् वैश्वानरो भूत्वा प्राणिनाम् देहमाश्रितः ।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नञ् चतुर्विधम् ।। १४ ।।**
**सर्वस्य चाहम् हृदि सन्निविष्टः मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनञ् च ।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ।। १५ ।।**

मीच वैश्वानररूप अग्नि होऊन प्राण्यांच्या देहात राहिलो असून प्राण व अपान ह्यांनी युक्त होऊन चारही प्रकारचे अन्न पचवितो. तसेच सर्वांच्या हृदयात मीच अधिष्ठित असून, स्मृति, ज्ञान व अपोहन ही माझ्यापासूनच होतात. सर्व वेदांच्याद्वारे जे काही जाणावयाचे ते मीच असून वेदान्ताचा कर्ता आणि वेद जाणणाराही मीच आहे.
सर्व प्राणिमात्र जे अन्न खातात ते पचवण्याची शक्ती त्यांच्या शरीरामधेच असते. तिलाच विज्ञान **पचनशक्ती** असे म्हणते.
शरिरामधे अन्नपचनाचे काम घडून येण्यासाठी, जठर आणि लहान आतड्यामधे सतत स्रवणाऱ्या विविध प्रकारच्या स्रावांना, **पाचकरस** असे म्हणतात. धर्मशास्त्रामधे अन्नपचन करणाऱ्या एकून यंत्रणेला **जठराग्नी** असे म्हटलेले आहे.
अन्न देखील चार प्रकारचे आहे असे सांगितलेले आहे. ते प्रकार पुढील प्रमाणे —
१) **भक्ष्य** — दातांनी चावून खायचे पदार्थ. ( पोळी, भाजी, भात इत्यादी )
२) **भोज्य** — गिळून खायचे पदार्थ. ( पाणी, दूध, रस इत्यादी )
३) **लेह्य** — चाटून खायचे पदार्थ. ( मध, श्रीखंड इत्यादी )
४) **चोष्य** — चोखून खायचे पदार्थ. ( ऊस, आंबा इत्यादी )
म्हणजे अन्न खाताना, ' दातांनी चावून तोडणे, बारीक करणे, गिळणे, चाटणे, चोखणे ' इत्यादी क्रिया कराव्याच लागतात.
त्या क्रिया करण्याचे ज्ञान असावेच लागते. स्मृती असावी लागते आणि त्याविषयी कोणताही संशय असून चालत नाही.
आता, ह्या सगळ्या क्रिया करणे, खाल्लेले अन्न जठरामधे पोहोचणे आणि त्याचे पचन होणे इत्यादी क्रियांसाठी जी शक्ती लागते, ऊर्जा लागते, ती वेगवेगळ्या प्रकारची असते. तरीही तिचे उगमस्थान मात्र एकच आहे.

ते स्थान म्हणजेच **' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराचे '** निवासस्थान होय.
सर्व प्राणिमात्रांच्या हृदयामधे स्थित असलेला आत्मरूपी भगवंतच हे सगळे करवून घेत असतो.
त्यासाठी आवश्यक ती शक्ती व ऊर्जाही तोच देत असतो.

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ।। १६ ।।**
**उत्तमः पुरुषत्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ।। १७ ।।**
**यस्मात्क्षरमतीतोऽहम् अक्षरादपि चोत्तमः ।**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ।। १८ ।।**

ह्या लोकांत क्षर आणि अक्षर हे दोन पुरुष आहेत. क्षर म्हणजे सर्व नाशवंत भूते आणि ह्या सर्वांच्या मुळाशी असणारे जे तत्त्व त्यास अक्षर असे म्हणतात. परंतु उत्तम पुरुष ह्या दोघाहून भिन्न आहे. त्यास परमात्मा असे म्हणतात. तो अव्यय ईश्वर त्रैलोक्यांत भरलेला असून त्रैलोक्याचे पोषण करतो. ज्याअर्थी मी क्षराच्याही पलीकडचा व अक्षराहूनही उत्तम पुरुष आहे, त्याअर्थी लोकव्यवहारामधे आणि वेदांतामधेही पुरुषोत्तम ह्या नांवाने प्रसिद्ध आहे.
**क्षर** म्हणजे जी अस्तित्वात येते, जिची सतत झीज होत असते आणि अखेरीस जी नाश पावते अशी कोणतीही गोष्ट.
सर्व विश्व हे क्षर आहे असे सांगितलेले आहे. कारण त्याला उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या तीनही अवस्था आहेत.
**अक्षर** म्हणजे जी सदैव अस्तित्वात असते, जिची कोणत्याही प्रकारे झीज होत नाही आणि जी कधीही नाश पावत नाही अशी गोष्ट.
आत्मतत्त्व हे अक्षर आहे असे सांगितलेले आहे. कारण त्याला उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या तीनही अवस्था नाहीत.
ते अवस्थातीत आहे. ह्या आत्मतत्वालाच सातव्या श्लोकामधे भगवंतांनी ' ममैवांशो ' म्हणजे **' माझाच सनातन अंश '** असे म्हटलेले आहे. हा सनातन अंशच जीवात्मा होऊन **' जीवलोके '** म्हणजे शरीरात प्रवेश करतो असे म्हटलेले आहे.
म्हणजेच जीवात्मा हा परमात्म्याहून वेगळा आहे. तो परमात्म्याचा अंश आहे. तो म्हणजे जणू काही परमात्म्याचे प्रतिबिंबच आहे. जेवढे प्राणीमात्र तेवढी प्रतिबिंबे. अगणित प्रतिबिंबे. जगामधील प्राणिमात्रांच्या संख्येला मर्यादा नाही म्हणून प्रतिबिंबांनाही मर्यादा नाही. प्रतिबिंब हे त्या प्राण्याच्या शरीरापुरतेच मर्यादित असते. त्या शरीरामधेच व्यक्त होते आणि शरीराच्या मर्यादेत राहूनच सर्व व्यवहार घडवून आणते. म्हणून शरीरामधे असेपर्यंत जीवात्म्याला, प्रकृतीची बंधने आहेत, मर्यादा आहेत.
**' परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराला '** मात्र कोणतीही मर्यादा नाही.
तो **अतीसूक्ष्म** ही आहे आणि **अतीविशाल** ही आहे. तो **वस्तुमानरहित** ही आहे आणि **वस्तुमानसहित** ही आहे.
तो **आकारमान** ही आहे आणि **आकारहीन** ही आहे. तो **व्यक्त** ही आहे आणि **अव्यक्त** ही आहे.
तो **सर्व** म्हणजे सगळे काही असूनही **सर्वातीत** म्हणजे सगळ्यापलीकडला आहे.
म्हणजेच तो सर्व विश्व निर्माण करूनही, विश्वाहून स्वतंत्र आहे.
तो **अनादि** आहे. **अनंत** आहे. **अजर** आहे. **अमर** आहे. **अक्षय** आहे. **अक्षर** आहे. **अचल** आहे. **अच्युत** आहे. **अढळ** आहे. तो **सर्वज्ञ** आहे. तो **नियामक** आहे. तो **उपास्य** आहे. तो प्रकृती आणि पुरुष ह्या दोघांचाही **शासक** आहे.
तो सर्वात **शक्तिमान, सर्वव्यापक** आणि **सर्वसमावेशक** असा असूनही, सर्वांहून वेगळा आहे. निराळा आहे. **अलिप्त** आहे.
त्याचे वर्णन कसे करायचे? ते कोणालाही शक्य नाही. कारण तो **शब्दातीत** आहे. **कल्पनातीत** आहे.
**' अद्वितीय, अतुलनीय, अनाकलनीय '** असा आहे. म्हणूनच तो सर्व लोकांमधे आणि वेदांमधे **' पुरुषोत्तम '** म्हणून प्रसिद्ध आहे. **' पुरुषांमधला उत्तम पुरुष '** म्हणून प्रसिद्ध आहे.

**यो मामेवमसम्मूढः जानाति पुरुषोत्तमम् ।**
**स सर्वविद्भजति माम् सर्वभावेन भारत ।। १९ ।।**
**इति गुह्यतमम् शास्त्रम् इदमुक्तम् मयानघ ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत ।। २० ।।**

हे भारता ! ह्याप्रमाणे मी पुरुषोत्तम हे मोह न पावता जो जाणतो, तो सर्वज्ञ होऊन सर्वभावे मलाच भजतो. हे निष्पाप अर्जुना !
असे हे गुह्यातले गुह्य शास्त्र मी तुला सांगितले. हे समजून घेतल्याने मनुष्य ज्ञानवान व कृतार्थ होऊन जाईल.
आता जो अशाप्रकारे त्या पुरुषोत्तमाला सर्वार्थाने जाणतो, ज्याच्या मनामधे त्याविषयी कोणताही संशय नसतो,

तो अंतर्बाह्य शुद्ध असणारा ज्ञानी काय करील बरे?
ज्याच्या ठिकाणी परमेश्वराविषयीचे ज्ञान असते त्याच्या ठिकाणी प्रेमही असतेच.
परमेश्वराचे ज्ञान आणि परमेश्वराविषयीचे प्रेम ह्या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत. परमेश्वराच्या बाबतीत ज्ञान आणि प्रेम ह्या गोष्टी एकरूप आहेत. त्यामुळे तो केवळ परमेश्वरावरच प्रेम करील. त्याचाच दासानुदास होईल.
सदैव त्याचेच मनन, चिंतन, भजन, पूजन करीत राहील. सर्व प्राणिमात्रांच्या आत आणि बाहेर त्याला एकमात्र परमेश्वरच दिसेल.
तो सर्वांच्या बरोबर एकसारखाच व्यवहार करील. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ह्यांचा त्याला स्पर्शही होणार नाही.
त्यांच्या बाबतीत तो तटस्थच असेल. स्थितप्रज्ञच असेल. आपले प्रत्येक कर्म म्हणजे परमेश्वराची पूजा करणेच आहे असेच समजेल.
परमेश्वराच्या कार्यामधेच आपला देह झिजवेल. मुख्य म्हणजे, त्याला हे सगळे ठरवून करावे लागणार नाही.
तो त्याचा स्वभावच असेल आणि सगळे काही त्याप्रमाणेच घडून येत राहील. असो.
ह्या अध्यायाची सुरवात आपण **आचार्य विनोबा भाव्यांच्या** विधानाने केली.
आता शेवटही त्यांच्याच विधानाने करूया. नीट लक्ष देऊन ऐका.
' वेद अनंत आहेत असे म्हणतात. पण ते आहेत कोठे? ' त्याविषयी सुरवातीलाच भगवंतांनी सांगितले आहे.
**' ज्याच्या पानांमधे वेद '** ह्या संसारवृक्षाच्या पानापानांमधे वेद आहेत. वेद हे ग्रंथांमधे लपलेले नाहीत.
' अरे ऽऽ, मीच जिवंत वेद आहे. त्यांची सर्व परंपरा माझ्यातच जिरलेली आहे. सर्व वेद मलाच जाणायचा प्रयत्न करतात.
मीच सर्व वेदांचा अर्क आहे. पुरुषोत्तम आहे.' असे भगवान् आपल्याला सांगून राहिले आहेत.
वेद आपल्या हातात आहेत. सेवा, प्रेम आणि ज्ञान ह्यांवरच जीवन रचायचे आहे. आपल्या मानवी जीवनाचा तोच खरा हेतू आहे.
**' प्रभाते करदर्शनम् ।'** सकाळी उठल्यावर आपला तळहात पहावा. कशासाठी?
काल हात श्रमला आहे की नाही? त्याला घट्टे पडले आहेत की नाहीत? आज श्रमावयास तयार आहे की नाही? ते पहावे.
श्रम करून, सेवा करून आपले हात झिजले पाहिजेत म्हणजे ब्रह्मलिखित उघडते. हा प्रभाते करदर्शनम् चा अर्थ आहे.
तो नीट समजून घ्या. हा अध्याय म्हणजे सर्व वेदांचे सार आहे. या अध्यायामधे सर्व गीतेचे सार आहे. गीतेची शिकवण येथे पूर्णपणे प्रगट झाली आहे. ती आपल्या जीवनामधे उतरविण्यासाठी सर्वांनी रात्रंदिवस झटावे, परिश्रम करावे. निरपेक्षपणे सेवा करावी. हाच ह्या अध्यायाचा संदेश आहे.'
त्यांनी सांगितलेला विचार किती मोठा आहे ते पहा. त्याच बरोबर तो विचार किती सोप्या शब्दामधे सांगितला आहे ते ही पहा.
एखादा विचार सर्वसामान्य माणसालाही सहज समजेल अशा शब्दामधे मांडणे खरोखर कठीण आहे. फार फार कठीण आहे.
' तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर कठीण लिहिणे सोपे असते. पण सोपे लिहिणे फार कठीण असते.' असे **आचार्य अत्रे** नेहमीच सांगत असत. असो. आता ह्यावर जास्त काही बोलायची गरजच नाही. ' विनोबांच्या सांगण्यावर विचार करायचा आणि त्याप्रमाणे वागायचा सतत प्रयत्न करायचा.' हेच करायचे आणि इतकेच करायचे. **आपण आचार्यांना अत्यंत आदरपूर्वक नमस्कार करूया.**

**येथे पंधरावा अध्याय पूर्ण झालेला आहे.**

ह्या अध्यायाच्या सुरवातीला सर्व संसाराला एका महान वृक्षाची उपमा दिली आहे. त्या वृक्षाचे वर्णन केले आहे आणि त्यामधून सुटण्याचा मार्गही सांगितला आहे.
त्यानंतर सूक्ष्म देह हा स्थूलदेहामधे प्रवेश करताना काय करतो, स्थूलदेहामधे राहून विषयोपभोग कसा घेतो, आणि अखेरीस त्याला सोडून जाताना काय करतो ते सांगितले.
त्यापुढे परमेश्वराचे सर्वव्यापित्व सांगून झाल्यावर, क्षर आणि अक्षर आणि त्याच्याही पलीकडे असलेला पुरुषोत्तम ह्यांच्याविषयी माहिती सांगून, त्या पुरुषोत्तमाविषयीचे ज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्याला आणखी काही समजून घेण्यासारखे शिल्लक रहात नाही. तो सर्वज्ञ व कृतार्थ होतो असे सांगितले.
आता पुढील अध्यायामधे भगवान काय सांगतात ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥**

# अध्याय सोळावा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या सोळाव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायाच्या सुरवातीला सर्व संसाराला एका महान वृक्षाची उपमा दिली आहे.

त्या वृक्षाचे वर्णन केले आणि त्यामधून सुटण्याचा मार्गही सांगितला.

त्यानंतर सूक्ष्म देह हा स्थूलदेहामधे प्रवेश करताना काय करतो, स्थूलदेहामधे राहून विषयोपभोग कसा घेतो व त्याला सोडून जाताना काय करतो ते सांगितले. त्यापुढे परमेश्वराचे सर्वव्यापित्व सांगून झाल्यावर क्षर आणि अक्षर आणि त्याच्याही पलीकडे असलेला पुरुषोत्तम ह्यांच्याविषयी माहिती सांगून, त्या पुरुषोत्तमाविषयीचे ज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्याला आणखी काही समजून घेण्यासारखे शिल्लक रहात नाही. तो सर्वज्ञ व कृतार्थ होतो असे सांगितले.

आता ह्या अध्यायामधे ज्याचे विवेचन करण्यात आलेले आहे, त्या विषयाची सुरवात सातव्या अध्यायामधील पंधराव्या श्लोकातच झालेली आहे.

**न माम् दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नरधमाः ।**

**माययापहृतज्ञाना: आसुरम् भावमाश्रिताः ।। ७ - १५ ।।**

अर्थ — मायेने ज्यांचे ज्ञान नष्ट केले, ते मूढ व दुष्कर्मी नराधम, **आसुरी** बुद्धीत पडून मला शरण येत नाहीत.

त्यानंतर नवव्या अध्यायामधील अकरा आणि बारा ह्या दोन श्लोकांमधेही त्याच विषयाचा परत एकदा उल्लेख झालेला आहे.

**अवजानन्ति माम् मूढा मानुषीन् तनुमाश्रितम् ।**

**परम् भावमजानन्तः मम भूतमहेश्वरम् ।। ९ - ११ ।।**

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।**

**राक्षसीमासुरीम् चैव प्रकृतिम् मोहिनीम् श्रिताः ।। ९ - १२ ।।**

अर्थ — सर्व भूतांचा मोठा ईश्वर, असे माझे जे परमस्वरूप, ते न जाणणारे मूर्ख लोक, मनुष्यदेह धारण केलेल्या मला, मनुष्यदेहधारी समजून तुच्छ समजतात. त्यांच्या आशा व्यर्थ, कर्मे फुकट, ज्ञान वांझोटे आणि चित्त भ्रष्ट असून त्यांनी राक्षसी व आसुरी स्वभावच धारण केलेला असतो.

ह्या स्वभाव विशेषाला भगवान् **राक्षसी** व **आसुरी** स्वभाव असे म्हणतात.

ह्या उलट जो स्वभाव विशेष असतो त्याचा उल्लेख त्यापुढील तेरा आणि चौदा ह्या दोन श्लोकांमधे आलेला असून त्याला **दैवी** स्वभाव असे म्हटलेले आहे.

**महात्मानस्तु माम् पार्थ दैवीम् प्रकृतिमाश्रिताः ।**

**भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।। ९ - १३ ।।**

**सततङ् कीर्तयन्तो माम् यतन्तश्च दृढव्रताः ।**

**नमस्यन्तश्च माम् भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।। ९ - १४ ।।**

अर्थ — परंतु हे पार्था ! दैवी प्रकृतीचा आश्रय करून राहिलेले महात्मे, सर्व भूतांचे आदिस्थान जो मी त्या मला ओळखून, अनन्यभाव होऊन माझे भजन करतात आणि यत्नशील, दृढव्रत व योगयुक्त होऊन सतत माझे कीर्तन करून व मला वंदन करून भक्तीने माझी उपासना करतात.

ह्या अध्यायामधे त्या दोनही स्वभावांना संपदा म्हणजेच संपत्ती असे म्हटलेले असून, आता त्यांचे सविस्तर विवेचन करायला सुरवात होते आहे. येथेही अर्जुनाने कोणताही प्रश्न विचारलेला नाही, तरीही श्रीकृष्ण भगवान् स्वत:च बोलायला सुरवात करीत आहे.

सोळाव्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीकृष्णाचा आहे.

तो अर्जुनाला सांगतो आहे की, —

**श्रीभगवानुवाच :**

**अभयम् सत्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः ।**

**दानन् दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ।। १ ।।**

**अहिंसा सत्यमक्रोधः त्यागः शांतिरपैशुनम् ।**

**दया भूतेष्वलोलुप्त्वम् मार्दवम् ह्रीरचापलम् ।। २ ।।**

**तेजः क्षमा धृति शौचम् अद्रोहो नातिमानिता ।**

**भवन्ति सम्पदन् दैवीम् अभिजातस्य भारत ।। ३ ।।**

अभय, शुद्ध व सात्त्विक वृत्ती, ज्ञानयोगांत निरंतर दृढ स्थिती, दातृत्व, इंद्रियांचे दमन, यज्ञ, वेदशास्त्रांचे पठण, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, कर्मफलांचा त्याग, शांती, क्षूद्र दृष्टी सुटून उदारबुद्धी असणे, सर्व भूतांचे ठायी दया, हावरेपणा नसणे, मृदुपणा, वाईट कृत्यांची लाज, व्यर्थ व्यापार सुटणे, तेजस्विता, क्षमा, धृति, शुचिर्भूतपणा, द्रोह न करणे, अती अभिमान नसणे हे गुण, हे भारता ! दैवी संपत्तीत जन्मलेल्या पुरुषास प्राप्त होतात.

येथे दैवी संपत्तीचे सव्वीस गुण सांगितलेले आहेत.

**अभयम्** — कोणत्याही प्रकारच्या भयाचा पूर्णपणे अभाव असणे.

**सत्त्वसंशुद्धिः** — अंत:करणाची संपूर्ण निर्मलता.

**ज्ञानयोगव्यवस्थितिः** — परमात्म्याचे स्वरूप जाणण्याच्या हेतूने त्याच्याशी एकरूप होऊन, सदैव ध्यानाच्या अखंड गाढ स्थितीत असणे.

**दानम्** — जे आपण स्वत: कष्ट करून मिळविलेले आहे ते धन इतरांच्या कल्याणासाठी, गरज असलेल्या योग्य व्यक्तींना, योग्य स्थळी आणि योग्य काळी, कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता, निरपेक्षपणे देणे.

**दमः** — सर्व ज्ञानेंद्रियांवर आणि कर्मेंद्रियांवर ताबा मिळविणे. त्यांना पूर्णपणे नियंत्रणात ठेवणे.

**यज्ञः** — विविध देव देवतांची पूजा करणे, त्यांना संतुष्ट करण्याच्या हेतूने, अग्नी प्रज्वलित करून त्यामधे, वेदमंत्रांचा उच्चार करून निरनिराळ्या आहुती देणे. अग्निहोत्रादी उत्तम कर्मांचे आचरण करणे. गुरुजनांची पूजा करणे. वर्ण, आश्रम आणि परिस्थितीनुसार आपले जे कर्तव्य असेल ते, मनामधे कोणताही स्वार्थ न बाळगता, अत्यंत श्रद्धेने, निष्ठापूर्वक पार पाडणे. स्वधर्माचे सदैव पालन करणे. तसे करीत असताना कितीही संकटे आली तरीही मागे न हटता, संकटांना सामोरे जाऊन त्यांचा सामना करणे.

**स्वाध्यायः** — वेद आणि शास्त्रांचे श्रद्धापूर्वक, सखोल अध्ययन करणे.

**तपः** — स्वधर्माचे पालन करण्यासाठी सर्व प्रकारचे शारिरीक आणि मानसिक कष्ट सहन करणे. वेदना आणि यातना सहन करणे.

**आर्जवम्** — मनाने, वाणीने आणि शरीराने अत्यंत सरळपणे वागणे. कधीही, कुठेही संशयास्पद वर्तन न करणे. कोणत्याही प्रकारे कपट अथवा कारस्थान न करणे. क्षूद्रबुद्धीने न वागणे. सर्वांच्या बरोबर, आपपरभाव न बाळगता, एकसारखेच वागणे.

**अहिंसा** — कधीही कोणालाही, शारिरीक, वाचिक आणि मानसिक ह्यापैकी कोणत्याही प्रकारांनी इजा न करणे. तसा विचारही न करणे.

**सत्यम्** — बुद्धी आणि अंत:करणाने विचारपूर्वक जे आणि जसे निश्चित केले असेल ते, कोणालाही न दुखावता, प्रिय शब्दांच्या सहाय्याने यथार्थपणे सांगणे.

**अक्रोधः** — क्रोधावर विजय मिळविणे. आपले अहित करणाऱ्यावरही न रागावणे.

**त्यागः** — स्वधर्माचे पालन करण्यासाठी, आपले विहित कर्तव्य पार पाडण्यासाठी, सर्व प्रकारची कर्मे करीत असूनही त्यांच्या कर्तेपणाचा अभिमान न बाळगणे. ममता, आसक्ती आणि स्वार्थ न बाळगणे कोणत्याही फळाची आशा न ठेवणे. आत्मोन्नतीच्या मार्गामधे येणाऱ्या सर्व गोष्टींना, निग्रहपूर्वक बाजूला सारणे.

**शान्तिः** — मन पूर्णपणे स्थिर असणे. त्यामधे चंचलतेचा संपूर्णपणे अभाव असणे.

**अपैशुनम्** — ' सतत इतरांचे दोष शोधत राहणे, त्यांचा सर्व लोकांच्यासमोर जाहीर उच्चार करणे, निंदा करणे, चहाडी करणे, गैरसमज पसरविणे,' इत्यादी गोष्टी निषिद्ध मानणे. अशा गोष्टी कधीही न करणे.

**दया** — इतरांच्या दु:खाचे निवारण करून त्यांना सुखी करण्याचा सतत प्रयत्न करणे. अपराध करणाऱ्याविषयीसुद्धा सहानुभूतीपूर्वक विचार करणे.

**अलोलुप्त्वम्** — इंद्रियांचा विषयांच्या बरोबर संयोग झाल्यावरही त्यांच्या विषयी आसक्ती न वाटणे.

**मार्दवम्** — अंत:करण, वाणी आणि व्यवहार ह्यांच्यामधे जराही कठोरपणा नसणे. त्या उलट केवळ कोमलताच भरलेली असणे.

**ह्रीः** — धर्मशास्त्राच्या विरुद्ध आचरण करण्याची लाज वाटणे. तसे न करणे.

**अचापलम्** — हात, पाय, वाणी आणि मन ह्यांच्या द्वारे घडून येणाऱ्या निरर्थक आणि व्यर्थ क्रियांना चपलता म्हटले आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही क्रिया न करणे.

**तेजः** — जिच्या योगाने महापापी माणसेसुद्धा प्रभावित होतात, अन्यायाचरण सोडून देतात आणि चांगली कर्मे करायला प्रवृत्त होतात, अशी श्रेष्ठ माणसांची शक्ती.

**क्षमा** — अपराध करणाऱ्याविषयीसुद्धा सहानुभूतीपूर्वक विचार करणे. त्यांना शासन करण्याची शक्ती असूनही तसे न करणे. त्यांचा राग अथवा तिरस्कार न करता, सुधारण्याची संधी देणे.

**धृतिः** — समोर मोठ्यात मोठे संकट, भय अथवा दु:ख उपस्थित झाले तरीही विचलित न होता त्यांना तोंड देणे. कोणत्याही कारणामुळे स्वधर्म आणि स्वकर्तव्य ह्यांच्या पालनामधे कसूर न करणे.

**शौचम्** — आतून आणि बाहेरून सर्व प्रकारे शुद्ध असणे. शुद्धता पाळणे.

**अद्रोहः** — कोणाच्याही विषयी मनामधे शत्रुभाव नसणे.

**नातिमानिता** — स्वत:च्या श्रेष्ठत्वाचा, ज्येष्ठत्वाचा आणि मोठेपणाचा थोडाही अभिमान नसणे.

जो पुरुष दैवी संपत्तीमधे जन्माला आलेला असतो, दैवी संपत्तीने युक्त असतो, त्याच्या अंगी हे सगळे गुण असतात असे सांगितलेले आहे. आता ह्या **दैवी गुणांची** आणि तेराव्या अध्यायामधे सांगितलेली **ज्ञानी माणसाची** लक्षणे ह्यांची तुलना करून पहा. ती एकसारखीच आहेत. जशीच्या तशीच आहेत.

**दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।**
**अज्ञानञ् चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ।। ४ ।।**

हे पार्था ! दंभ, दर्प, अती अभिमान, क्रोध, निष्ठुरपणा आणि अज्ञान हे गुण आसुरी संपत्तीत जन्मलेल्या पुरुषास प्राप्त होतात.

**दंभः** — मानपान, मोठेपणा आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी, आपला स्वार्थ साधला जाण्याच्या हेतूने केलेले ढोंग.

**दर्पः** — ज्ञान, धन, बल, ऐश्वर्य, सत्ता, अधिकार इत्यादींच्या योगाने गर्व बाळगणे, घमेंड बाळगणे, इतरांना तुच्छ समजून त्यांचा सतत अपमान करणे.

**अभिमानः** — स्वत:ला श्रेष्ठ समजणे, मानपान, मोठेपणा, प्रतिष्ठा आणि सत्कार ह्यांची सतत अपेक्षा बाळगणे आणि ते मिळाल्यावर अत्यंत आनंदित होणे.

**क्रोधः** — आपल्या मनामधील इच्छेला इतरांच्याकडून विरोध झाला, तिच्या पूर्ततेच्या मार्गामधे अडथळे निर्माण झाले आणि ती पूर्ण झाली नाही तर, कोणाकडून आपला तिरस्कार केला गेला तर, कोणी अपमानास्पद बोलले तर, कोणी अन्याय केला तर, कोणी निंदा केली तर, कोणी अपकार केला तर मनामधे उत्पन्न होणारी द्वेष भावना. हिच्यायोगे प्रतिहिंसेची, बदला घेण्याची इच्छा प्रबळ होते.

**पारुष्यम्** — कोमलतेचा अभाव असणे. कठोरता. ही तीन प्रकारची असते. इतरांना शिव्या देणे, टोमणे मारणे, अपमानास्पद बोलणे म्हणजे वाणीची कठोरता. वर्तणुकीत, वागण्यामधे नम्रतेचा संपूर्ण अभाव असणे म्हणजे शारिरीक कठोरता. क्रूरता, आक्रमकता आणि प्रतिहिंसा ह्या भावना असणे म्हणजे मानसिक कठोरता.

**अज्ञानम्** — सत्य - असत्य, धर्म - अधर्म, नीति - अनीति, योग्य - अयोग्य ह्याविषयीचे ज्ञान नसणे, त्याविषयी योग्य निर्णय घेता न येणे, विपरीत निर्णय घेतला जाणे.

जे ज्ञान नाही, तर ज्ञानाच्या विपरीत आहे ते सगळे अज्ञान असे तेराव्या अध्यायात सांगितलेले आहे. अज्ञानाची यादी फार मोठी आहे आणि ती तेराव्या अध्यायाची चर्चा करताना सांगून झालेली आहे. म्हणून येथे परत सांगण्याची आवश्यकता नाही. असो.

**दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।**
**मा शुचः संपदन् दैवीम् अभिजातोऽसि पांडव ।। ५ ।।**

ह्यापैकी दैवी संपत्ती मोक्षदायक आणि आसुरी संपत्ती बंधदायक असे समजतात. हे पांडवा ! तू दैवी संपत्तीत जन्मलेला आहेस. शोक करू नको.

‘ अर्जुना ऽऽ! अरे तू दैवी संपदेने परिपूर्ण आहेस. दैवी संपदेत जन्मलेला आहेस. मग कशाचा शोक करीत आहेस? कशासाठी शोक करीत आहेस? त्याची काहीच गरज नाही. माझे ऐक. शोक करू नकोस.’

प्रत्यक्ष परमेश्वर ज्याला असे सांगतो आहे तो अर्जुन, नैतिकतेच्या अत्यंत उच्च पातळीवर स्थिर झालेला असेल हे वेगळे सांगायलाच नको. तो खरोखरच सर्व गुण संपन्न पुरुष होता आणि तरीही विनयशील होता. असो.

**द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च ।**
**दैवो विस्तरशः प्रोक्तः आसुरम् पार्थ मे शृणु ।। ६ ।।**

ह्या लोकांत दोन प्रकारचे प्राणी उत्पन्न होत असतात. एक दैव आणि दुसरा आसुर.
दैव प्रकाराचे वर्णन विस्ताराने सांगितले. हे पार्था ! आता आसुर प्रकाराचे वर्णन मी सांगतो ते ऐक.
ह्या अगोदरच्या अध्यायांमधे **' स्थितप्रज्ञ मनुष्य, ब्राह्मीस्थिती प्राप्त झालेला मनुष्य, ज्ञानी मनुष्य, त्रिगुणातीत पुरुष, परमेश्वराचा निःसीम भक्त, निष्काम कर्मयोगी, ध्यानयोगी '** इत्यादींचे जे वर्णन आलेले आहे ते दैवी संपत्तीचेच वर्णन आहे.
येथेही पहिल्या तीन श्लोकांमधे दैवी संपदेचेच वर्णन आलेले आहे. त्यामुळेच ' दैव प्रकाराचे वर्णन विस्ताराने सांगितले,' असे भगवान म्हणत आहेत. आता ह्यापुढे आसुर प्रकाराचे सविस्तर वर्णन सांगायला सुरवात होते आहे.
पुढे जाण्याअगोदर येथे आपल्याला काही गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत.
धर्मशास्त्रामधे, आपले आयुष्य जगण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या, अस्तित्वासाठी संघर्ष करणाऱ्या प्राणिमात्रांच्या चार अवस्था सांगितलेल्या आहेत. त्या अवस्था विशिष्ट क्रमाने येत असतात. त्यांच्या योगाने प्राणिमात्रांच्या आचार विचारांमधे बदल होत जातात. सगळे प्राणी ह्या चार अवस्थांपैकी कोणत्यातरी अवस्थेतच जगत असतात.
सर्वसाधारणपणे ह्या अवस्थांमधून प्रत्येकाला जावे लागते असेही सांगितलेले आहे.
**पहिली** अवस्था म्हणजे **' आहार निद्रा भयम् मैथुनम् ।'**
**अन्न** ( आहार ), **वस्त्र** ( शरीराच्या रक्षणासाठी त्यावर आवरण घालणे ), **निवारा** ( निद्रा, भय ) आणि **मैथुन** ( नर-मादी संबंध ) ह्या प्राथमिक गरजा भागवण्याचा प्रयत्न करीत राहणे. जेव्हा शक्य होईल तेव्हा गरज भागवणे.
ह्यापैकी वस्त्र ही फक्त मनुष्य प्राण्याची गरज आहे आणि निवारा हा निद्रा व भय ह्या दोघांच्या पूर्ततेसाठी सांगितलेला आहे.
त्यांच्या विषयीची माहिती आपण थोडक्यात समजून घेऊया.

**१) अन्न** — जिवंत रहायचे म्हणजे रोज काहीतरी खायला मिळालेच पाहिजे. मग भूक लगल्यावर जे उपलब्ध असेल, जे मिळवता येईल, जे रुचेल आणि जे पचेल, असे खाद्य शोधून काढून खाणे. प्रत्येक प्राणी हे करीतच असतो. आपापल्या स्वभावानुसार करीत असतो. तसे करीत असतांना निसर्गाच्या नियमांना धरून वागत असतो.

गाय, बैल, म्हैस, बकरी इत्यादी प्राण्यांना भूक लागली म्हणजे ते गवत, पाने, पालापाचोळा, पेंढा वगैरे खातात. ती त्यांची गरज आहे. आपण त्यांना शाकाहारी प्राणी असे म्हणतो पण त्यांना ते माहीतच नसते. ते आपल्या स्वभावाप्रमाणे वागत असतात.
वाघ, सिंह, लांडगा, कोल्हा इत्यादी मांसाहारी प्राण्यांना भूक लागली म्हणजे ते इतर प्राण्यांना मारून त्यांचे मांस खातात. ती त्यांची गरज आहे. आपण त्यांना मांसाहारी प्राणी असे म्हणतो पण त्यांना ते माहीतच नसते. ते आपल्या स्वभावाप्रमाणे वागत असतात.
सर्व प्राणी, मग ते शाकाहारी असोत किंवा मांसाहारी असोत, आपला आहार निसर्गतः जसा मिळतो तसा म्हणजे कच्चाच खातात आणि पचवितात. स्वतःची भूक भागवीत असतानाही सगळे प्राणी व पक्षी निसर्गाला धरूनच वागतात.
कितीही भूक लागली तरी गाय किंवा म्हैस कधीही मांस खाणार नाही.
कितीही भूक लागली तरी वाघ किंवा सिंह कधीही गवत खाणार नाही.
आपले पोट भरल्यावर ते आपोआप खाणे बंद करतात आणि निघून जातात.
उद्याची तरतूद करून ठेवायच्या भानगडीत पडत नाहीत. भूक लागल्याशिवाय कोणीही काहीही खात नाही. इतरांची शिकार करीत नाही.
ह्याला एकमेव अपवाद आहे आणि तो मनुष्यप्राण्याचाच आहे.
खरे म्हणजे माणूस हा शाकाहारीच आहे. त्याच्या जबड्याची व दातांची रचना मांस किंवा मासे खाण्यास उपयोगी नाही.
तरीही तो मांसाहार करायला लागल्यामुळे मिश्राहारी झालेला आहे. तसेच माणूस प्रक्रिया केल्याशिवाय अन्न खाऊ शकत नाही.
म्हणून त्याने पाकशास्त्र शोधून काढले आणि त्याचा वापर करायला लागला.
' भूक लागलेली नसतानाही सारखे खात राहणे, उद्या खायला लागेल म्हणून आजच साठवून ठेवणे, इतरांना गरज असली तरीही आपल्याजवळ असलेले न देणे, त्याच बरोबर दुसऱ्याकडे असलेले त्याच्या नकळत चोरणे आणि त्याचा उपभोग घेणे, ' ह्या सगळ्या गोष्टी फक्त माणूसच करतो.

**२) वस्त्र** — सतत बदलणाऱ्या हवामानापासून बचाव करण्यासाठी शरीर झाकणे. अंगावर आवरण घालणे आणि ते अंगावर राहील ह्याची तरतूद करणे.

इतर प्राण्यांना अथवा पक्ष्यांना अशी गरज नसते. कारण त्यांच्या शरीरावर निसर्गानेच यथायोग्य आवरण चढवलेले असते.
म्हणून प्राण्यांना आणि पक्ष्यांना अंगावर कपडे घालावे लागत नाहीत. फक्त मनुष्य प्राण्यालाच वस्त्राची गरज असते.

परंतु गरजेपुरती वस्त्रे मिळाल्यावर थांबला तर तो माणूस कसला?
त्याचे समाधान होत नाही. मग वस्त्रांचाही अतिरेक केला जातो. गरज नसतानाही अतिरिक्त साठा केला जातो.
त्याच बरोबर ज्याला गरज आहे त्याला मदत करावी असे वाटतही नाही आणि तसे केले जातही नाही.

**३) निवारा** ( निद्रा आणि भय ) — ऊन, पाऊस आणि थंडी ह्यांच्यापासून, तसेच ज्यांच्यापासून आपल्याला इजा होऊ शकेल, धोका निर्माण होऊ शकेल अशा इतर वस्तुमात्र, प्राणिमात्र आणि पक्षीगण इत्यादींच्यापासून स्वत:ला वाचवण्यासाठी, झोप आल्यावर झोपण्यासाठी, तसेच अचानकपणे संकट आले तर लपून राहण्यासाठी, अनुकूल अशी, एखादी आडोशाची जागा शोधून तेथे राहणे.

त्यासाठी प्राणी गुहेमधे अथवा झाडाच्या ढोलीमधे किंवा जमिनीतील बिळामधे राहतात.
पक्षी घरटे बांधून त्यामधे राहतात आणि मनुष्य प्राणी घर बांधून राहतो.
परंतु गरजेपुरता निवारा मिळाल्यावर थांबला तर तो माणूस कसला? त्याचे समाधान होत नाही. मग निवाऱ्याचाही अतिरेक केला जातो. गरज नसताना मोठमोठी घरे बांधली जातात. अतिरिक्त घरे घेतली जातात. त्यामुळे ज्याला खरोखर गरज असते त्याला घर मिळत नाही. आपला हेतु साध्य करण्यासाठी, दोघांचेकडून नाना प्रकारचे उपद्‌व्याप केले जातात. इतरांची फसवणूकही केली जाते.
त्या उपद्‌व्यापांची आणि फसवणुकीच्या मार्गांची यादी फार मोठी आहे आणि ती आपल्या सर्वांच्या परिचयाची आहे.

**४) मैथुन** — वैषयिक गरज भागवण्यासाठी, भिन्न लिंगाच्या, स्वजातीय प्राण्याशी शरीर संबंध ठेवणे. ही गोष्ट सर्व प्राणिमात्र करीत असतात. त्यामधूनच सतत प्रजनन होत राहते. वंश विस्तार होत राहतो. सर्व प्राणिमात्रांचे अस्तित्व, स्थिरता आणि सातत्य राखण्यासाठी **( Existance, Stability and Continuity )** ते आवश्यकही आहे.

त्याबाबतीतही इतर सगळे प्राणी व पक्षी निसर्गाला धरूनच वागतात. निसर्गाच्या नियमांच्या विरुद्ध कधीही वागत नाहीत.
त्या नियमांची जाण त्यांना निसर्गानेच दिलेली असते.
‘ प्रजननाच्या विशिष्ट काळामधेच शरीर संबंध करणे. स्वजातीय नर अथवा मादीच्या बरोबरच संबंध करणे. समलिंगी संबंध न करणे. गर्भवती मादीच्या बरोबर संबंध न करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मादीवर बलात्कार न करणे.’ हे ते अलिखित नियम आहेत.
सगळे प्राणी व पक्षी त्यांचे सहजपणे पालन करतात. स्वाभाविकपणे पालन करतात.
ते कधीही निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करीत नाहीत. ह्याला एकमेव अपवाद आहे आणि तो मनुष्यप्राण्याचाच आहे.
माणूस निसर्गाचा एकही नियम पाळत नाही. करू नयेत अशा सगळ्या गोष्टी करतो.
त्याचे परिणामही विपरीतच होतात आणि ते सर्व समाजाला भोगावे लागतात.
फक्त मनुष्य प्राणीच स्वत:ला निसर्गाच्यापेक्षा श्रेष्ठ समजून, त्याच्यावर अत्याचार करून, त्याच्या नियमांना न जुमानता, त्याच्याशी सहकार्याचे वर्तन न करता, स्वत:ला हवे तसे सतत वागतो. मनाला येईल तसे वागतो.
माणूस सदैव निसर्गावर अधिकार गाजवायला पाहतो. ‘ आपण निसर्ग निर्माण केलेला नसून निसर्गाने आपल्याला निर्माण केलेले आहे,’ हे सत्य तो विसरतो. सतत करू नये ते करतो.
वर्षानुवर्षे सतत चाललेल्या त्याच्या कर्माचे परिणाम पृथ्वीच्या पाठीवर रहणाऱ्या सर्वच योनींना भोगावे लागतात. असो.

**दुसरी** अवस्था म्हणजे **‘ शाश्वती ’** अथवा **‘ सुरक्षितता ’** ही अवस्था कमीजास्त प्रमाणामधे सर्वच प्राणिमात्रांमधे असते.
अन्य प्राणीजमातींच्यामधेही विनाशाचे भय असते. कशाच्यातरी भीतीमुळे पळून जाणे अथवा कोठेतरी लपून बसणे ही अवस्था असते.
वाघ - सिंहासारखे हिंस्त्र पशू किंवा सुसर - मगरीसारखे क्रूर जलचरही प्रसंगी भयभीत होतात. पण ते भय फार थोडा काळ असते आणि त्याची मात्रा अल्प असते. त्यासाठीच ते एकत्र राहतात. कळपामधे राहतात.
तसेच वावरतात आणि आपले सर्व व्यवहार करीत राहतात. त्यामुळे त्यांना काही प्रमाणामधे सुरक्षितता प्राप्त होते.
त्यांचे भय कमी होते. समोर आलेल्या संकटाला ते एकत्रितपणे सामोरे जातात.
त्याचा नेहमी उपयोग होतोच असे नाही. परंतु तीच त्यांची संरक्षण व्यवस्था असते.
मनुष्यप्राण्यामधे मात्र ही अवस्था फार मोठ्या प्रमाणात असते.
कितीही बुद्धिमान असला आणि स्वत:ला इतर सर्व पशुपक्षांच्यापेक्षा उच्च श्रेणीचा समजत असला तरीही,
**मनुष्य हा दोन पायांचा प्राणीच आहे.** इतर सर्व प्राण्यांच्यासारखाच तोही एक प्राणी आहे.
त्याची विलक्षण बुद्धिमत्ता म्हणजे त्याला लाभलेले वरदान आहे.
त्याचबरोबर, तीच बुद्धिमत्ता म्हणजे त्याला लाभलेला भयंकर शापही आहे.
त्यामुळे सर्वसाधारणपणे माणसाचे सर्व जीवन हे भीतीच्या सावलीतच संपते. दुसरा कोणताही प्राणी माणसाइतका भयग्रस्त नसतो.
त्याला दोन कारणे आहेत असे मला वाटते.

पहिले कारण म्हणजे, ' जर केवळ शारिरीक सामर्थ्याचाच विचार केला तर, सर्व प्राणिमात्रांमधे माणूस हा तुलनेने सर्वात दुर्बळ प्राणी आहे. त्याला स्वतःचे रक्षण करता येण्यासाठी निसर्गाने काहीही दिलेले नाही.'
त्याच्याकडे धारदार नखे नाहीत. शक्तिशाली पंजे नाहीत. अणकुचीदार दात व दाढा असलेले बळकट जबडे नाहीत.
शत्रूपासून बचाव करण्यासाठी जमिनीवर अत्यंत वेगाने पळता येत नाही. जमिनीच्या आतमधे फार काळ लपून राहता येत नाही.
क्षणभरामधे झटकन आकाशात उडून जाता येत नाही. पाण्यामधे फार वेळ लपून बसता येत नाही.
क्षणार्धात आपल्या शरीराचा रंग व आकार बदलून शत्रूला फसवता येत नाही.
त्याच्याजवळ स्वसंरक्षणासाठी, शस्त्रासारखा वापर करता येईल असे काहीही नाही.
तसाच अटीतटीचा प्रसंग आला तर, एक मांजरही, माणसाला भारी पडू शकते. त्याला जखमी करून, निसटून पळून जाऊ शकते.
माणसाला स्वयंपूर्ण होण्यासाठी सुमारे दहा ते बारा वर्षांचा काळ जावा लागतो. त्यानंतरच तो स्वतःचे व्यवहार स्वतः करायला लागतो.
इतर कोणत्याही प्राण्याला स्वयंपूर्ण होण्यासाठी इतका काळ लागत नाही. सर्व प्राणी कमीतकमी वेळात स्वयंपूर्ण होतात.
माणसाने इतर प्राण्यांच्यावर मिळवलेला विजय हा त्याच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा विजय आहे.
सुसंबद्ध आणि सखोल विचार करण्याच्या शक्तीचा विजय आहे.
दुसरे कारण म्हणजे, ' माणसाला इतर कोणत्याही प्राणिमात्रांपेक्षा, माणसांच्याकडूनच सर्वात जास्त धोका असतो. जास्तीत जास्त धोका असतो आणि हे त्याला पूर्णपणे माहीत असते.' कारण आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर जितके प्राणिमात्र उत्पन्न झाले त्यांमधे —
माणूस हा सर्वात **<u>स्वार्थी, अविश्वसनीय, धोकादायक</u>** आणि **<u>आक्रमक</u>** प्राणी आहे. सगळी माणसे सारखीच असतात.
जे अपवाद असतात ते हा नियम सिद्ध करण्यासाठीच असतात. <u>लाखात एक</u> इतके दुर्मिळ असतात. एक गोष्ट लक्षात घ्या.
' आजपर्यंत माणसाने जितकी शस्त्रास्त्रे बनवलेली आहेत, त्यापैकी बहुतांश शस्त्रास्त्रे ही इतर प्राण्यांना मारण्यासाठी बनवलेली नाहीत. तर, इतर माणसांच्यापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी बनवलेली आहेत. ज्यांच्यापासून आपल्याला धोका संभवतो, त्या माणसांना मारण्यासाठीच बनवलेली आहेत. माणसाला, सर्वात जास्त भय इतर माणसांचेच वाटत असते. म्हणूनच त्याने शोधून काढलेली सर्व प्रकारची शस्त्रास्त्रे ही माणसांना ठार मारण्यासाठीच आहेत. इतर प्राण्यांना मारण्यासाठी नाहीत.'
**<u>माणसाचा सर्वात मोठा शत्रू माणूसच आहे.</u>** इतर कोणीही नाही.
अशी कल्पना करा की, परमेश्वराने सर्व प्राणिमात्रांना एकत्र बोलावून विचारले की,
' तुम्हा सर्वांना शांतपणे आणि सुखाने जगता यावे म्हणून मी काय करू?' तर सगळे प्राणिमात्र त्याच्याकडे एकच मागणे मागतील.
' हे भगवंता ऽऽ! एकच काम करा. पृथ्वीच्या पाठीवरून, ह्या दोन पायांच्या मनुष्य प्राण्याला नाहीसा करून टाका. आम्हाला तोच अत्यंत त्रासदायक ठरतो आहे. तो नसेल तर आम्ही सगळे येथे सुखाने राहू.' असो.
माणसाच्या भयाला अंत नाही. एक नैसर्गिक भय आणि दुसरे कृत्रिम भय.
ह्या दोन प्रकारच्या भयांची मात्रा फारच मोठी आणि कधीही न संपणारी आहे.
आपल्या नैसर्गिक जनन क्रियेविषयीचे भय. आपल्या अस्तित्वाविषयीचे भय. आपल्या भविष्याविषयीचे भय.
निसर्गाच्या सर्व प्रकारच्या उत्पातांचे भय. आपल्या मरणाचे भय आणि मरणानंतर पुढे आपले काय होणार ह्याचे भय.
इतर पशुपक्षांच्याविषयी वाटणारे भय. इतर जीवजंतूच्याविषयी वाटणारे भय. इतर माणसांच्याविषयी वाटणारे भय.
ह्या सर्व नैसर्गिक भयांच्या एकत्रित परिणामांनी माणूस सदैव ग्रासलेलाच असतो. त्यामधून त्याला बाहेर पडता येतच नाही.
ही गोष्ट एवढ्यावरच थांबत नाही. ह्याच्या जोडीला माणूस स्वतःच, अनेक प्रकारची कृत्रिम भये सतत निर्माण करीत असतो.
' व्यक्तिगत भय, कौटुंबिक भय, सामाजिक भय, राजकीय भय.' ही सगळी त्याची उदाहरणे होत. त्यासाठीच माणसे एकत्र राहतात.
कळपामधे राहतात. आपल्या कळपाला कुटुंब असे म्हणतात. असे अनेक कळप एकत्र राहतात आणि त्याला जमात असे म्हणतात.
अशा अनेक जमाती एकत्र राहतात आणि त्याला समाज असे म्हणतात.
प्रत्येक जमातीमधे अनेक जाती, पोटजाती आणि उपजाती असतात.
त्यानंतर सर्वांना शिक्षण देऊन त्यांच्यावरती संस्कार करणाऱ्यांचा असा, **शिक्षक** वर्ग अस्तित्वात येतो.
सर्वांच्या गरजा पुरविण्यासाठी विविध वस्तूंचे उत्पादन करून त्यांची देवाण घेवाण करणारा असा, **व्यापारी** वर्ग अस्तित्वात येतो.
विविध प्रकारच्या सेवा देणाऱ्यांचा असा **सेवक** वर्ग अस्तित्वात येतो.
सर्वांना सुरक्षित वाटावे म्हणून, **<u>पोलीसदल, सैन्यदल, न्यायखाते</u>** इत्यादी संस्था अस्तित्वात येतात.
सर्वांचे रक्षण करणाऱ्यांचा असा, एक वेगळा वर्ग अस्तित्वात येतो.
ह्या सगळ्यांच्यावर योग्य प्रकारचे नियंत्रण असावे म्हणून कोणत्या तरी स्वरूपामधे — **<u>राज्य करणारा</u>** वर्ग अस्तित्वात येतो.

ह्या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून माणसांना सुरक्षित वाटायला लागते.

‘ आपण एकटे, एकाकी नसून समाजाचा एक घटक आहोत, त्यामुळे आपल्यावर अन्याय होणार नाही. आपल्याला इतर लोक मदत करतील. एकटा सोडणार नाहीत. अन्याय झाला तर त्याविरुद्ध दाद मागता येऊ शकेल. अन्याय करणाऱ्याला कठोर शिक्षा होईल. त्यामुळे सर्वांना वचक बसेल. अन्याय करणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी होईल. आपल्याला सर्व हक्क प्राप्त होतील. शांतपणे जगता येईल. आपले रक्षण करायला राज्यकर्ते आहेत. आता आपल्याला सगळीकडे सुरक्षितपणे वावरता येईल,’ असे वाटायला लागते.

त्यामुळे मूलभूत सुरक्षितता प्राप्त होते. मानसिक स्थैर्य आणि आधार प्राप्त होतो.

इतर बाबींच्याकडे लक्ष द्यायला सवड मिळते आणि त्या योगे स्वत:चा उत्कर्ष घडवून आणण्याचा विचार करता येतो.

त्यासाठी प्रयत्न करता येतात. आवश्यक ती कृती करता येते. इतरांचे मार्गदर्शन मिळवता येते. सहकार्य मिळवता येते.

येथपर्यंत काय काय झाले आहे ते नीट समजून घेऊया.

अन्न, वस्त्र, निवारा, मैथुन इत्यादी गरजा पूर्ण करता येणे ही **पहिली अवस्था**. ती प्राप्त झाली. आपल्याला अनुकूल झाली.

त्यानंतर व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक सुरक्षितता व शाश्वती प्राप्त होणे ही **दुसरी अवस्था**. ती ही प्राप्त झाली. आपल्याला अनुकूल झाली. आता ह्या दोन्ही अवस्था प्राप्त झालेल्या आहेत. अनुकूल झालेल्या आहेत.

सर्व गरजा भागवता येत आहेत आणि सुरक्षितताही आहे. मग त्याच्यापुढे —

**‘ इतरांच्यापेक्षा मोठा होण्याची, सबळ होण्याची, महत्त्वाचा होण्याची ’** इच्छा व्हायला लागते.

ह्या इच्छेची सुरवात आपल्या घरापासूनच होते. अगदी सामान्य परिस्थितीतल्या सामान्य माणसालाही असेच वाटते.

घरातल्यांनी ऐकले नाही तर त्याला आपला अपमान झाल्यासारखे वाटते. आपले न ऐकणाऱ्याचा राग येतो.

त्याला ‘ ओरडावे, रागे भरावे, शिक्षा करावी आणि आपले ऐकायला भाग पाडावे ’ असे वाटायला लागते.

‘ घरातल्यांनी माझे ऐकलेच पाहिजे, मला सदैव मान दिलाच पाहिजे, मी सांगतो आहे तसेच केले पाहिजे, माझ्याच मतानुसार वागले पाहिजे,’ असे वाटायला लागते. इतरांच्यावर स्वामित्व गाजवण्याची इच्छा ही प्रत्येक माणसाला असतेच.

एका मर्यादेपर्यंत ती चांगली आहे. उपयुक्त आहे. कल्याणकारकही आहे. कुटुंबाचा उत्कर्ष घडून येण्यासाठी आवश्यकही आहे.

पण प्रत्येकाला ते शक्य होईलच असे सांगता येत नाही.

मुळामधे **‘ प्रेम, आदर, मान आणि कौतुक ’** ह्या गोष्टी कोणत्याही दुकानात विकत मिळत नाहीत किंवा जमिनीतून उगवतही नाहीत. तसेच इतरांच्यावर सक्ती करून मिळवता येत नाहीत.

त्यासाठी अगोदर, ‘ ज्यायोगे इतरांना आपल्याविषयी विशेष असे काहीतरी वाटायला लागेल ’ असे कर्म आपण सतत करीत राहिले पाहिजे. आपले कर्तव्य म्हणून करीत राहिले पाहिजे. स्वार्थ बाजूला ठेवून इतरांचा विचार केला पाहिजे. इतरांना निरपेक्षपणे मदत करीत राहिले पाहिजे. तरच ह्या गोष्टी, आपल्या कर्माचे फळ म्हणून, सहजपणे प्राप्त होऊ शकतात.

आपण अपेक्षा ठेवली नाही तरीही, न मागताही, आपोआप मिळतात.

इतरांच्यावर जबरदस्ती करून, धाक दाखवून मिळणारा मानसन्मान हा खोटा असतो. केवळ भास असतो, भ्रम असतो आणि तो ही सगळ्यांना मिळवता येत नाही. कारण तसे होण्यासाठी इतर अनेक गोष्टी अनुकूल असण्याची आवश्यकता असते.

शारिरीक बळ, मानसिक बळ, आर्थिक बळ, बौद्धिक बळ इत्यादी गोष्टींची गरज असते आणि त्या गोष्टी प्रत्येकाकडे असतीलच असे सांगता येत नाही. मग ज्यांना शक्य होत नाही ते आपल्या नशिबाला दोष देत जगतात.

इतरांना दोष देत, इतरांना त्रास देत, आपल्याच कुटुंबामधे भांडणे लावीत, दुसऱ्या अवस्थेमधेच राहतात.

समाजामधे त्यांची संख्या सर्वात जास्त असते. बहुसंख्य कुटुंबांमधे अशी असंतुष्ट व त्रास देणारी माणसे असतातच.

त्यांच्यापासून होणारा उपद्रव हा त्यांच्या कुटुंबापुरताच मर्यादित असतो.

पण ज्यांच्याकडे सर्व प्रकारची शक्ती मुळातच असते किंवा जी माणसे येन केन प्रकारेण तशी शक्ती प्राप्त करून घेऊ शकतात, ती त्याच्या पुढे जाण्यासाठी प्रयत्न करायला सुरवात करतात. आपल्या कुटुंबावर वर्चस्व मिळवण्याबरोबरच एकूण समाजावरही वर्चस्व मिळवण्याच्या प्रयत्नांना सुरवात करतात. येथे तिसऱ्या आणि विशेष अशा अवस्थेची सुरवात होते.

**तिसरी अवस्था** म्हणजे **स्वामित्व** गाजवणे.

‘ इतरांनी माझेच ऐकले पाहिजे. मी सांगेन तसेच वागले पाहिजे. इतरांनी काय करायचे ते मी ठरवणार. मला मात्र कोणीही काहीही सांगायचे नाही. मी काय करायचे ते मीच ठरवीन आणि तसेच करीन. मी सर्वांचा नेता होईन. सत्ताधीश होईन आणि सत्तेचा वापर मला हवा असेल तसाच करीन.’ असा विचार करून इतरांच्यावर स्वामित्व मिळविण्याचा प्रयत्न करीत राहणे, तसे स्वामित्व मिळवणे आणि ते इतरांना मान्य करायला लावणे, जे मान्य करणार नाहीत त्यांना अनेक प्रकारे त्रास देणे, त्यांचे जगणे अशक्य करणे, त्यांचा नायनाट करणे. ही सगळी त्याच प्रवृत्तीची लक्षणे आहेत.

ही अवस्था अमर्याद वाढली म्हणजे जे व्यक्तिमत्व तयार होते त्यालाच **आसुरी स्वभाव** असे म्हटले आहे.
**आसुरी संपत्ती** असे म्हटले आहे. ज्यांना शक्य होते ते ह्या तिसऱ्या अवस्थेमधे जातात.
त्यांची संख्या तुलनेने कमी असली तरीही बरीच मोठी असते. ही मंडळी सर्व समाजालाच त्रासदायक होतात.
ह्या अवस्थेला पर्यायी अशी **चौथी अवस्था** म्हणजे **कल्याणप्रद** होणे.
' माझ्याकडे जे आहे त्यातले गरजेपुरतेच घेईन. बाकीचे सगळे ज्यांना गरज आहे त्यांना देऊन टाकीन. इतरांच्या सुखासाठी सतत प्रयत्न करीत राहीन. त्यांना मदत करीन. माझ्या सर्व शक्तीचा, बुद्धीचा, संपत्तीचा आणि सामर्थ्याचा उपयोग केवळ सत्कार्यासाठीच करीन. इतरांच्यावर चांगले संस्कार करून त्यांचा उत्कर्ष घडवून आणीन. त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही. अन्याय झालाच तर त्याचे निवारण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीन. त्यासाठी पडतील ते कष्ट करीन. पडेल तो त्रास सहन करीन. पण मागे हटणार नाही. मला कोणाकडूनही काहीही नको आहे. मला कशाचीही अपेक्षा नाही. इतरांच्या कल्याणासाठी, माझ्या हातून नेहमी सत्कार्य घडावे एवढीच इच्छा आहे.' असा विचार करून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत राहणे.
ही अवस्था अमर्याद वाढली म्हणजे जे व्यक्तिमत्व तयार होते त्यालाच **दैवी स्वभाव** असे म्हटले आहे.
**दैवी संपत्ती** असे म्हटले आहे. काही माणसे ह्या चौथ्या अवस्थेमधे जातात.
ही मंडळी सर्वांनाच कल्याणकारक होतात. नि:स्वार्थीपणाने समाजाची सेवा करीत राहतात. आपल्या वर्तनाने सर्व समाजाला योग्य दिशा दाखवतात. समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी शक्यते सर्व प्रयत्न करतात. त्यांची संख्या फारच कमी असते.
ते लाखात एक इतके दुर्मिळ असतात. पण ते असतात म्हणून तिसऱ्या अवस्थेतील लोकांच्यावर अंकुश राहतो.
आसुरी स्वभावाच्या माणसांचा पराभव करता येतो. त्यांचा नाश करता येतो. असो.
तिसऱ्या किंवा चौथ्या अवस्थेमधे इतर प्राणी अथवा पक्षी जात असतील असे मला वाटत नाही. कारण त्यांच्याकडे फारच मर्यादित बुद्धिमत्ता आणि विचारशक्ती असते. फक्त माणसाकडेच अमर्याद बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती आणि विचारशक्ती असते.
तसेच तिचा वापर कशासाठी करायचा ते ठरविण्याचे स्वातंत्र्यही असते.
आपण **देव** व्हायचे की **दानव** व्हायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य माणसालाच असते.
आता यापुढे **' आसुर प्रकारच्या प्राण्यांचे '** वर्णन करण्यात आलेले आहे.

**प्रवृत्तिञ् च निवृत्तिञ् च जना न विदुरासुरा: ।**
**न शौचम् नापि चाचार: न सत्यन् तेषु विद्यते ।। ७ ।।**
**असत्यमप्रतिष्ठन् ते जगदाहुरनीश्वरम् ।**
**अपरस्परसम्भूतम् किमन्यत्कामहैतुकम् ।। ८ ।।**

काय करावे आणि काय करू नये हे आसुर लोकांस कळत नाही आणि शुचिर्भूतपणा, सदाचार व सत्य हे त्यांचे ठायी वसत नसतात. हे आसुरी लोक सर्व जग असत्य, निराधार, परमेश्वरावाचून असणारे, आपोआप स्त्री-पुरुषांच्या संयोगाने उत्पन्न झालेले आहे म्हणूनच मनुष्याच्या विषयोपभोगाखेरीज त्याचा दुसरा हेतू काय असणार, असे म्हणतात.
ज्याच्याकडे पात्रता आहे, योग्यता आहे, कर्तृत्व आहे, शुद्ध आचार विचार आहेत आणि जो निस्वार्थी आहे, अशी व्यक्ती आपल्या नेतेपदावर येणे, आपला नेता होणे, ही सर्व समाजासाठी अत्यंत आनंददायक, कल्याणकारक आणि सौभाग्यकारक गोष्ट आहे.
अशा नेत्याला सर्व प्रजाजनांच्या मनामधे नेहमीच सर्वोच्च आदराचे स्थान असते.
त्याच्या विषयी प्रेमही असते, कौतुकही असते आणि त्याचा धाकही असतो.
सर्व प्रजा त्याला नेहमीच मानाने वागवते. त्याचा आदर करते. त्यालाच आपला आदर्श मानते आणि त्याचेच अनुकरण करायला लागते. त्याच्या लोकाभिमुख राज्यकारभारालाच राज्यव्यवस्थेचे उत्तम उदाहरण समजते.
आपल्या भारत देशाला कमीतकमी, दहा हजार वर्षांचा इतिहास आहे. जगामधे दुसऱ्या कोणत्याही देशाला इतका मोठा इतिहास नाही. सध्या आपल्या देशामधे तथाकथित **लोकशाही** पद्धतीचे शासन चालले आहे. परंतु त्यापूर्वी ह्या देशामधे अनेक प्रकारच्या शासनपद्धती होऊन गेलेल्या आहेत. त्या सर्व शासन पद्धती अनेक वर्षे यशस्वीपणे चालविल्या गेल्या आहेत.
त्यामधे लोकशाही पद्धतही होती. त्या पद्धतीला **गणसत्ताक** असे म्हणत असत.
अशा सर्व शासन पद्धतींच्यामधे **' राजेशाही '** नांवाची शासन पद्धती फार प्रसिद्ध झाली. उपयुक्त ठरली. सर्व देशाचा सर्वांगीण उत्कर्ष घडवून आणणारी ठरली. भारताच्या जवळजवळ तीन चतुर्थांश भूमीवर, हजारो वर्षे राजेशाही राबवली गेली.
ह्या सर्व राजसत्तांच्या वरती **' धर्मसत्तेचे '** नियंत्रण होते, वचक होता, धाक होता.
धर्मसत्तेला न मानणारा, तिला झुगारून देणारा, आपल्या मनाला वाटेल तसे वागणारा, प्रजेच्या सुखाकडे लक्ष न देणारा, प्रजेवर अन्याय

करणारा असा कोणताही राजा फार काळ सत्तेवर राहू शकत नसे.
त्याकाळचे ऋषी, मुनी, धर्माधिकारी, इतर बुद्धिमान व्यक्ती आणि प्रजाजन त्या राजाला पदच्युत करून दुसऱ्या एखाद्या योग्य व्यक्तीची राजपदावर स्थापना करीत आणि राज्याचा कारभार योग्य प्रकारे चालेल ह्याची काळजी घेत.
आजपर्यंत ह्या देशामधे अनेक राजे महाराजे होऊन गेले. त्यांनी आपापल्या परीने आपापल्या राज्याचा कारभार केला.
न्याय आणि अन्याय ह्यांच्या विषयी दक्ष राहून प्रजाहित साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामधे —
**' इतिहासाला ज्ञात असलेले, इतिहासामधे नोंद असलेले, इतिहासाने गौरवलेले, राजसत्तेचे आणि राजपदाचे मानदंड म्हणता येतील '** असे राजेही होऊन गेले आहेत. इतिहास वाचत असताना त्यांची नांवे, त्यांचा काळ आणि त्यांचे कर्तृत्व ह्याविषयी सविस्तर माहिती वाचायला मिळते.
ज्यांच्या राजवटीमधे राज्य आणि प्रजा दोन्हीही पूर्णपणे सुरक्षित होते, सुस्थितीत होते, विकसित होत होते असे राजे पुढीलप्रमाणे —
पहिला आदर्श राजा म्हणजे **प्रभु रामचंद्र.** ( इसवीसनापूर्वी अंदाजे ६००० वर्षे )
दुसरा आदर्श राजा म्हणजे **धर्मराज युधिष्ठिर.** ( इ.स.पू. अंदाजे ३००० वर्षे )
तिसरा आदर्श राजा म्हणजे **सम्राट चंद्रगुप्त मौर्य.** ( इ.स.पू. अंदाजे ३२१ वर्षे )
चौथा आदर्श राजा म्हणजे **सम्राट अशोक.** ( इ.स.पू. अंदाजे २५९ वर्षे )
पाचवा आदर्श राजा म्हणजे **सम्राट विक्रमादित्य.** ( इ.स.पू. अंदाजे ५६ वर्षे )
सहावा आदर्श राजा म्हणजे **सम्राट समुद्रगुप्त.** ( इसवीसन ३३० वर्षे )
सातवा आदर्श राजा म्हणजे **सम्राट हर्षवर्धन.** ( इसवीसन ६०० वर्षे )
आठवा आदर्श राजा म्हणजे **कृष्णदेवराय.** ( इसवीसन १५०९ वर्षे )
नववा आदर्श राजा म्हणजे **छत्रपती शिवाजी महाराज.** ( इसवीसन १६७४ वर्षे )
हे सर्व राजे म्हणजे **दैवी स्वभाव** , **दैवी संपत्ती** ह्यांचे उदाहरण होते. आजही त्यांच्याविषयी बोलताना, सन्मानपूर्वक उल्लेख करून आदरानेच बोलले जाते. हे सर्व सांगण्यामागे माझा काही विशेष हेतू आहे. ज्याप्रमाणे —
**प्रकाश** म्हणजे काय हे माहीत असल्याशिवाय, **अंधार** म्हणजे काय ते कळत नाही.
**चांगले** म्हणजे काय हे माहीत असल्याशिवाय, **वाईट** म्हणजे काय ते कळत नाही.
**उत्तम** म्हणजे काय हे माहीत असल्याशिवाय, **अधम** म्हणजे काय ते कळत नाही.
**ऊत्कर्ष** म्हणजे काय हे माहीत असल्याशिवाय, **अपकर्ष** म्हणजे काय ते कळत नाही.
त्याच प्रमाणे **दैवी संपदा** म्हणजे काय हे माहीत असल्याशिवाय, **आसुरी संपदा** म्हणजे काय ते कळत नाही.
म्हणून इतिहासामधील दैवी संपदेत जन्मलेल्या काही थोर पुरुषांची नांवे सांगितली. असो.

**आसुर प्रकारचे लोक कसे असतात?**

हे लोक संपूर्णपणे **आत्मकेंद्रित** असतात. **स्वत:**खेरीज ते इतर कोणाचाही विचार करीत नाहीत. कधी करीत असतील तर तो केवळ **स्वत:**चा उत्कर्ष साधण्याच्या हेतूनेच करतात. **' सत्य, सदाचार, कर्तव्य, पावित्र्य, न्याय, दया, क्षमा '** इत्यादी गोष्टी त्यांना माहीतच नसतात अशातला भाग नसतो, पण त्यांना त्याच्याशी काहीही देणे घेणे नसते.
ज्याच्या योगाने त्यांचा स्वार्थ साधला जाईल, इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, नाना प्रकारचे उपभोग घेणे शक्य होईल आणि वर्चस्व कायम राहील तोच त्यांच्यासाठी धर्म असतो. तोच सदाचार असतो. तेच कर्तव्य असते आणि तीच नीति असते.
स्वार्थाशिवाय त्यांना दुसरे काहीही मान्य नसते. त्यामुळे स्वार्थ साधण्यासाठी ते कोणत्याही पातळीवर जाऊन काहीही करू शकतात.
आपण पापकर्म करू नये असा विचार त्यांच्या मनामधे कधीही येत नाही.
स्वार्थ बाजूला सारून एखादे पुण्यकर्म करावे असे त्यांना कधीही वाटत नाही.
त्यांच्या ठिकाणी मनाची शुद्धता, विचारांची शुद्धता, आचाराची शुद्धता नसतेच.
त्यांच्या स्वभावाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज काय सांगतात ते ऐका.

**काळिमा सांडील कोळसा । वरी चोखी होईल वायसा ।**
**राक्षसही मांसा । विटो शके ।।**
**परी आसुरां प्राणियां । शौच नाही धनंजया ।**
**पवित्रत्व जेवी भांडिया । मद्याचिया ।।**

अर्थ — एकवेळ कोळसा काळेपणाला टाकील, कावळा पांढरा होईल अथवा राक्षस मांसाला विटेल, पण अर्जुना ऽऽ, ज्याप्रमाणे दारूच्या भांड्याला कधीही पावित्र्य यायचे नाही, त्याप्रमाणे आसुरी प्राण्यांना कधीही शुचित्व नाही.

स्वार्थाशिवाय कसलाही विचार त्यांच्या मनामधे येतच नाही. कोणताही विधिनिषेध न बाळगता, इतरांचा जराही विचार न करता, स्वच्छंदपणे मनाला वाटेल तसे वागणे, हाच त्यांचा स्वभाव असतो. समाजामधे वावरत असताना त्यांचे आचरण कसे असते?

**जैसे चरणे शेळियेचे । कां धावणे वारियाचे ।**

**जाळणे आगीचे । भलतेउते ।।**

**तैसे पुढां सूनि स्वैर । आचरती ते आसुर ।**

**सत्येंसि वैर । सदाचि तयां ।।**

अर्थ — ज्याप्रमाणे शेळी वाटेल तेथे चरते, वारा वाटेल तेथे वाहतो किंवा अग्नी वाटेल त्या पदार्थाला जाळतो, त्याप्रमाणे स्वच्छंदीपणा पुढे करून, ते आचरण करतात. त्यांचे सत्याशी नेहमीच वाकडे असते.

सत्य बोलणे त्यांना शक्यच नसते. यदाकदाचित बोललेच तर, त्यांचा स्वार्थ साधला जाणार असतो म्हणूनच बोलतील.
सर्वसाधारणपणे सत्य भाषण त्यांच्यासाठी निषिद्धच असते. त्यावरही ज्ञानदेवांनी मार्मिक भाष्य केले आहे.

**जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया ।**

**तरी साचा बोलिया । बोलतीते ।।**

**अपानाचेनि तोंडे । जरी सुगंधा येणे घडे ।**

**तरी सत्य तयां जोडे । आसुरांते ।।**

अर्थ — जर विंचू आपल्या नांगीने गुदगुल्या करील, तरच ते सत्य भाषण करतील. जर अपान वायूचे तोंडाने म्हणजेच गुदद्वाराने सुगंधाचे येणे घडेल, तरच त्या असुरांना सत्याची प्राप्ती होईल.

त्यांचे विचार कसे असतात तेही नीट ऐका.

‘ ह्या जगाचा निर्माता, पालनकर्ता आणि विनाशकर्ता असा कोणीही नाही.

ईश्वर आहे असे मानणे म्हणजे गाढवाला शिंगे असतात असे मानण्यासारखेच आहे.

जी गोष्ट प्रत्यक्ष दिसत नाही आणि अनुभवास येत नाही, ती आहे असे म्हणणे हा वेडेपणा आहे. ईश्वर नाहीच आहे.

त्यामुळे जो अस्तित्वातच नाही त्याच्या नादी लागणे म्हणजे आपले मुळातच कमी असलेले आयुष्य वाया घालवणेच आहे.

देव आहे असे म्हणणे म्हणजे थोतांड आहे. परलोक आहे असे समजणे म्हणजे स्वत:चीच फसवणूक करणे आहे.

परलोक अथवा देव हे दोन्ही कधीही कोणालाही प्रत्यक्ष दिसत नाहीत म्हणून ते खोटे आहेत.

स्वर्ग, नरक किंवा इतर कोणताही परलोक अस्तित्वात नाही. नरक व स्वर्ग ही पाप व पुण्य यांनी प्राप्त होणारी ठिकाणे अस्तित्वातच नाहीत. त्या रिकामटेकड्या लोकांच्या भाकड कल्पना आहेत.

हे जग देवाने निर्माण केलेले नाही. परमेश्वर हे जगाचे मूळ नाही, तर —

विविध वासना, वेगवेगळ्या विषयांचा उपभोग घेण्याची इच्छा आणि ती पूर्ण करण्यासाठी चाललेली धडपड, हे सगळे ज्याच्या मुळे उत्पन्न होते, तो काम हाच जगाचे मूळ आहे. ह्या सकल जगाचा तोच खरा निर्माता आहे.

नर आणि मादी हे दोघे जेव्हा कामाच्या योगाने म्हणजेच कामवासनेने एकत्र येतात तेव्हाच जग उत्पन्न होते आणि तसे होत असताना दोघांना अपरिमित आनंद मिळत असतो. जगाचा विस्तार होण्यासाठी आणि तो सतत होत राहण्यासाठी जे जे आवश्यक असते ते ते सर्व ह्या कामाकडूनच उत्पन्न होते आणि पोसले जाते.

अखेरीस परस्परांच्याविषयी द्वेष भावना उत्पन्न करून हा कामच जगाचा नाश करतो.

जर ह्या जगाचा निर्माता, पालनकर्ता व विनाशकर्ता असा कोणी असेल तर तो काम हाच आहे. दुसरा तिसरा कोणीही नाही.

जगामधे जो बलवान असतो तोच सुखेनैव जगतो. त्यासाठीच तो अशक्तांना खातो. त्यांचे सर्वस्व आपल्या ताब्यात घेतो.

हे पाप नाही. अपराध नाही. उलट हाच जगाचा नियम आहे. म्हणून ह्या जगात आपल्या सामर्थ्याने जे जे प्राप्त करून घेता येईल ते ते प्राप्त करून घ्यावे आणि मुक्तपणाने उपभोगावे. दु:खांना भिऊन, आनंद देणाऱ्या सुखांचा त्याग करणे योग्य नाही.

नेहमी तेच कर्म करावे की ज्याच्यामुळे अखेरीस आपल्याला सुखप्राप्ती होईल, किंवा निदान आपल्या दु:खाची तीव्रता कमी होईल.

आपल्याला ह्या लोकीचे सगळे आनंद प्राप्त करून घेता येतील. त्यांचा सदैव, सुखेनैव उपभोग घेता येईल.

सर्व उपभोगांच्यापासून मिळणारे सौख्य हेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे.

तेच खरे पुण्य आहे आणि तसे न करणे हेच पाप आहे. याशिवाय निराळे असे कोणतेही पुण्य अस्तित्वातच नाही?

मोक्ष ही एक कविकल्पना आहे. जर मोक्ष मिळवता येत असेल तर रेड्याचे दूधही मिळवता येईल किंवा एखाद्या वांझ स्त्रीला पुत्रप्राप्तीही होईल. जे काही आहे ते येथेच आहे आणि ह्याच देहामधून उपभोगायचे आहे. देह मरून गेल्यावर काहीही उपभोगता येत नाही. काहीही शिल्लक रहात नाही. जर ह्या जीवनामधे असह्य दु:ख झालेच तर मृत्यूच त्यामधून सुटका करील.
मृत्यूच्या नंतर सगळेच संपून जाते. मृत्यूच्या नंतर पुढे काहीही नाही.'
आता मला सांगा की, ' असे विचार असणारा माणूस कोणते पाप करू शकणार नाही बरे?'
ज्याला अनैतिक कृत्य म्हणता येईल असे सगळे काही सतत करूनही त्याला आपल्या वर्तनाविषयी जराही खंत वाटणार नाही. लाज वाटणार नाही. उलट तो आपल्या प्रत्येक कृत्याचे समर्थनच करीत राहील.

**एतान् दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।**
**प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ।। ९ ।।**
**काममाश्रित्य दुष्पूरम् दम्भमानमदान्विताः ।**
**मोहाद्गृहित्वाऽसद्ग्राहान् प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ।। १० ।।**
**चिन्तामपरिमेयाञ् च प्रलयान्तामुपाश्रिताः ।**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ।। ११ ।।**
**आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।**
**ईहन्ते कामभोगार्थम् अन्यायेनार्थसंचयान् ।। १२ ।।**

अशा प्रकारची दृष्टी स्वीकारून अल्प बुद्धीचे हे नष्टात्मे व दुष्ट लोक, क्रूर कर्मे आचरीत जगाचा क्षय करण्यास उत्पन्न होत असतात. कधीही पूर्ण न होणाऱ्या कामाचा म्हणजे विषयोपभोगेच्छेचा आश्रय करून दंभ, मान व मद ह्यांनी व्यापलेले हे आसुरी लोक, मोहाने भलभलत्या कल्पना मनात धरून, घाणेरडी कामे करण्यास प्रवृत्त होत असतात. तसेच सुखोपभोगाच्या आमरणांत व अगणित चिंतेने ग्रासलेले, कामोपभोगात गढून गेलेले आणि तेच काय ते सर्वस्व असे निश्चयाने मानणारे, शेकडो आशापाशांनी बद्ध झालेले, कामक्रोधपरायण होऊन, सुखोपभोगासाठी, अन्यायाने पुष्कळ धनसंचय करण्याची हाव बाळगीत असतात.
त्यांच्या दृष्टीने देह म्हणजेच सर्वस्व असते आणि देहाच्या म्हणजेच सर्व इंद्रियांच्या इच्छा, आकांक्षा आणि वासना पूर्ण करण्यासाठी, जगामधे जे काही उपभोग घेता येण्यासारखे असेल त्याचा कोणत्याही मार्गाने सतत उपभोग घेणे ह्यातच त्यांची इतिकर्तव्यता असते. हेच त्यांचे अंतिम लक्ष्य असते.
' ज्याच्यापासून मला लाभ होईल तेच कर्म मी करणार. माझ्यासाठी तेच सत्कार्य, तेच सत्कर्म आणि तेच कर्तव्य. मी नेहमीच मला हवे तसेच वागणार. जग काहीही म्हणू दे. मला त्याची पर्वा नाही.'
एकदा असे ठरले म्हणजे मग अनेक मार्ग आपोआप सापडतात. इतरांना त्रास देऊन, लुबाडून सर्व काही मिळवायचे, अधिकाधिक मिळवीतच रहायचे. सामान्यतः ' खोटे बोलणे, चोरी करणे, चहाडी करणे, फसवणूक करणे, जुगार खेळणे, स्त्रियांच्या बरोबर गैरवर्तन करणे,' इत्यादी गोष्टींना गुन्हा करणे असे म्हणतात. ह्या वृत्तीलाच गुन्हेगारी वृत्ती असे म्हणतात.
समाजामधे ह्या गुन्हेगारी प्रवृत्तीची अनेक रूपे आपल्याला वारंवार पहायला आणि अनुभवायला मिळतात.
त्यांचा उल्लेख करतानाही, एक माणूस म्हणून स्वत:चीच लाज वाटायला लागते. पण तसे करणाऱ्यांना त्याची जराही लाज वाटत नाही. तरीही येथे आसुरी स्वभावाचा विषय चाललेला आहे. त्यामुळे त्यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे.
ते टाळता येणार नाही. टाळून चालणार नाही.
१) देशाचा नागरीक म्हणून सतत आपले हक्क मागत राहायचे, पण एक नागरीक म्हणून आपल्या कर्तव्यांचे पालन करायचे नाही. कधीही कुठेही शिस्त पाळायची नाही. साधे वाहतुकीचे नियमही पाळायचे नाहीत. जेव्हा कुणाचा तरी धाक असेल तेव्हाच शिस्तीने वागायचे. आपले काम लवकर व्हावे म्हणून संबंधित लोकांना लाच द्यायची तयारी ठेवायची आणि तशी लाच द्यायची. स्वत:ला वाचविण्यासाठी, वेळप्रसंगी इतरांना संकटात पाडायचे. असत्य बोलायचे. संधी मिळाल्यावर नैतिकता, प्रामाणिकपणा, सत्य, कर्तव्य इत्यादींचा विचार न करता, आपला फायदा करून घ्यायचा. आपण ज्या शिडीच्या आधाराने वर चढलो त्या शिडीलाच लाथ मारायची. आपली आई, वडील, भावंडे, बायको, मुले आणि इतर नातेवाईक ह्यांचा विचार बाजूला सारून, मनाला वाटेल तसे वागायचे.
२) आपल्याला आई आणि बाप व्हायचे असते म्हणून मुलांना जन्म द्यायचा पण त्यांचे संगोपन योग्य प्रकारे करायचे नाही. त्यांच्यावर चांगले संस्कार करायचे नाहीत. आपली आर्थिक पात्रता जाणून घेऊन, मुलांची संख्या त्या मर्यादेत ठेवायची नाही. त्यांचे भविष्य घडवायचे प्रयत्न न करता, त्यांना अक्षरश: वाऱ्यावर सोडून द्यायचे.
त्यांनी मात्र ' ज्यांनी मला जन्म दिला ते आई आणि वडील ' म्हणून आपल्याला सदैव मान दिला पाहिजे, आदर दाखविला पाहिजे

आणि आपले ऐकले पाहिजे, अशी अपेक्षा बाळगायची. त्यांच्यावर सतत अधिकार गाजवायचा प्रयत्न करीत रहायचे.
प्रसंगी वाद घालायचे, भांडणे करायची आणि त्यांनाच दोष द्यायचा.
३) शिक्षकाची नोकरी करायची पण विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे शिकवायचे नाही. त्यांच्यावर चांगले संस्कार करायचे नाहीत. त्यांना शिस्त लावायची नाही. यथायोग्य मार्गदर्शन करायचे नाही. अभ्यासाची गोडी लावायची नाही. **' उद्याचे आदर्श नागरीक '** त्यांच्यामधूनच निर्माण होत असतात, ह्याचे भान ठेवायचे नाही. एक शिक्षक म्हणून आपल्यावर असलेल्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या नाहीत.
आपल्याविषयी विद्यार्थ्यांना आदर वाटावा असे वागायचे नाही. केवळ वेगवेगळया मागण्या करीत रहायचे.
त्यासाठी वेळी अवेळी आंदोलने करायची.
४) पोलीस म्हणून नोकरी करायची पण आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडायचे नाही. गुन्हेगाराला पकडायचे नाही. लाच खाऊन त्याला मोकळा सोडून द्यायचा. समजा पकडावे लागलेच तर कमजोर गुन्हा दाखल करायचा, योग्य ते पुरावे गोळा न करता केस कमजोर करून ठेवायची आणि गुन्हा सिद्ध होणार नाही ह्याची व्यवस्था करायची. आपल्या अधिकाराचा सतत गैरवापर करायचा.
चोरांना पाठीशी घालून सावांना त्रास द्यायचा. अनैतिक मार्गाने संपत्ती गोळा करायची. आपल्या वरिष्ठांना संतुष्ट ठेवण्यासाठी त्यांचे पाय चाटायचे आणि आपल्या कनिष्ठांना लाथा मारायच्या. त्यांना आपले पाय चाटायला भाग पाडायचे.
५) सरकारी नोकरी करायची पण प्रामाणिकपणे काम करायचे नाही. प्रामाणिक माणसाचे काम करायचे नाही. त्याला सतत त्रास देत रहायचे. लाच घेऊन बेकायदेशीर कामे करायची. तशी कामे करणाऱ्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे. त्यांना मदत करायची.
एखादा प्रामाणिकपणे काम करू इच्छिणारा कर्मचारी असलाच तर त्याला नोकरी करणे अशक्य करायचे. त्याच्यावर खोटेनाटे आरोप करीत रहायचे. अपमानास्पद वागणूक द्यायची आणि त्याची बदली होण्यासाठी प्रयत्न करायचे.
बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करून माया गोळा करीत रहायचे.
६) व्यापारी म्हणून काम करायचे पण चोख माल रास्त भावात विकायचा नाही. शेतकऱ्यांनाही लुबाडायचे आणि माल खरेदी करणाऱ्या गिऱ्हाइकांनाही लुबाडायचे. साठेबाजी करायची. भेसळ करायची. काळाबाजार करायचा. व्यवसायाचे हिशोब नीट ठेवायचे नाहीत.
सरकारी कर भरायचे नाहीत. जर त्याविरोधामधे कारवाई व्हायला लागली तर संप करायचे. दुकाने बंद ठेवून जनतेची गैरसोय करायची.
७) डॉक्टर होऊन व्यवसाय करायचा पण त्या व्यवसायाच्या मूलभूत तत्त्वांचे पालन करायचे नाही. रोग्याला आपल्या फायद्याचे साधन समजून, त्याच्याकडून जास्तीत जास्त पैसे मिळवायचा प्रयत्न करीत रहायचे. गरज नसलेल्या तपासण्या करायला लावायच्या.
गरज नसलेली औषधे घ्यायला लावायची. गरज नसलेले उपचार करीत रहायचे. रोग्याची आणि त्याच्या नातेवाइकांची लूट करायची.
आजारी नसलेल्याला पैसे घेऊन खोटे वैद्यकीय दाखले द्यायचे. अगदी मरण पावलेल्या व्यक्तीच्या मृत्यूचा दाखला देण्यासाठीही त्याच्या नातेवाइकांच्याकडून पैसे घ्यायचे.
८) हल्ली सामान्य माणूस निराश झालेला आहे. हताश झालेला आहे. हतबल झालेला आहे. रोजचे जगणे हाच एक मोठा उद्योग झालेला आहे. कशाचीही शाश्वती राहिलेली नाही. सकाळी घरातून बाहेर पडलेला कोणीही मनुष्य, संध्याकाळी घरी सुरक्षित परत येईल ह्याची शाश्वती नाही. कधीही काहीही होऊ शकते आणि ते टाळणे आपल्या हातात नसते.
त्यामुळे ' आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणी आणि संकटांचे निवारण दुसऱ्या कुणीतरी करावे,' असे प्रत्येकालाच वाटत असते.
लोकांच्या ह्या मनस्थितीचा फायदा घेऊन काही लोक त्यांचा अध्यात्मिक नेता बनतात.
स्वत: कोणीतरी **' बाबा - दादा - भाऊ - बुवा - महाराज - गुरुदेव '** असल्याचे जाहीर करून, तसा आव आणून बुवाबाजी करतात. लोकांना फसवतात. आपल्या तथाकथित अनुयायांची फौज तयार करतात. त्यांच्याद्वारे जाणीवपूर्वक अंधश्रद्धा पसरवतात.
त्याद्वारे लोकांचा आत्मविश्वास नाहीसा करतात. लोकही सहजपणे त्यांच्या नादी लागतात. त्यांच्या पायावर डोके ठेवतात. त्यांना सर्व प्रकारची मदत करतात. त्यांच्या संपत्तीमधे यथाशक्ती भर घालीत राहतात. ही मंडळी जनतेची स्वावलंबनाची वृत्ती नाहीशी करतात.
धर्माच्या नांवावर अनेक अनैतिक कृत्ये करतात. विविध मार्गांनी संपत्ती गोळा करतात. त्यांची संख्या मोठी आहे.
कोणत्याही कारणाने एक गेला तर त्याची जागा घ्यायला दुसरा कोणीतरी तयार असतोच. त्यांना कोणी विरोध केलेला चालतच नाही.
आत्ता जे आठवले ते सांगितले. परंतु ही यादी फारच मोठी आहे. कशा कशाविषयी सांगायचे? काय काय सांगायचे? किती सांगायचे?
कोणत्याही स्त्रीला आपल्या **वडिलांच्याजवळ,** सर्वात सुरक्षित वाटले पाहिजे. आपल्या **भावाच्याजवळ,** सर्वात सुरक्षित वाटले पाहिजे.
आपल्या **पतीजवळ,** सर्वात सुरक्षित वाटले पाहिजे. आपल्या **मुलाजवळ,** सर्वात सुरक्षित वाटले पाहिजे.
पण जर हीच मंडळी अत्त्याचार करायला लागली तर स्त्रीने कोणाकडे जायचे? मदतीच्या आशेने कोणाकडे पहायचे?
कोणाचा आधार घ्यायचा? आरोपी घरातलाच असल्यावर, जवळचा नातेवाईकच असल्यावर, पोलीस तरी काय करतील?
एखादा अपराध घडण्यापूर्वी किंवा घडत असताना कसे थांबवू शकतील?
त्यांच्याकडे तक्रार केल्यावरच ते पुढील कारवाई करायला सुरवात करतील.

एखाद्या स्त्रीवर अत्त्याचार करीत असताना, अत्त्याचार करणाऱ्यांना तिच्या जागी आपली **' आई, बहीण, पत्नी किंवा मुलगी '** दिसत नाही का? ' अशाच एका स्त्रीने आपल्याला जन्म दिला आहे, हे सुंदर जग दाखवलेले आहे, आपल्याला लहानाचा मोठा केलेला आहे.' हे सगळे आठवत नाही का? असाच अत्याचार आपल्या आयाबहिणींच्या बाबतीत घडला तर ते चालेल का?
ह्या सगळ्या गोष्टी ते कसे विसरू शकतात? ना मनाची - ना जनाची, कसलीही लाज वाटत नाहीशी झालेली आहे.
त्याच बरोबर आजचे स्त्रियांचे वर्तनही चिंता करण्यासारखेच आहे.
त्यांच्या वागण्यातही स्वातंत्र्याचा अतिरेक होताना दिसतो आहे.
' सौंदर्य हा स्त्रीचा खरा अलंकार आहे.' हे सत्य आहे. पण त्याचे सारखे प्रदर्शन केलेच पाहिजे का?
अहो ऽऽ, **मधुबाला** सुंदर होती. **मीनाकुमारी** सुंदर होती. **नूतन** सुंदर होती.
पण चित्रपटामधे काम करताना त्यांनी कधी अंग उघडे टाकल्याचे मी तरी पाहिलेले नाही.
त्या अंगभर कपडे घालूनच वावरायच्या आणि आपल्या उत्तम अभिनयाने लाखो प्रेक्षकांचे मन जिंकायच्या. त्यांच्या मनावर राज्य करायच्या. आजही त्यांचे चित्रपट पाहतांना अतिशय आनंद होतो. त्यांना सारखे बघत रहावे असेच वाटते.
आता सगळे त्याच्या उलट चाललेले आहे. सौंदर्य कमी आणि त्याचे प्रदर्शन जास्त असला प्रकार आहे.
जर त्याविषयी कोणी काही बोलले तर ते त्यांना चालत नाही. लगेच **स्त्री स्वातंत्र्याचा** प्रश्न पुढे आणण्यात येतो.
टीव्ही वरील चर्चेमधे एका सुशिक्षित विदुषीने जाहीरपणे केलेले विधान ऐका.
' अंगावर कोणते कपडे घालायचे ते आम्ही ठरवणार. तो आमचा हक्क आहे. तुम्ही आम्हाला काही सांगायची गरज नाही. आमच्या शरीरामधे आणि त्यावरील कपड्यांच्यामधे काहीही गैर नाही. पाप असलेच तर ते तुमच्या मनामधे आहे. तुम्हाला बघवत नसेल, तुमच्या वासना चाळवत असतील, तर डोळे मिटून घ्या.'
हा काय युक्तिवाद आहे का? आणि समजा असला तर तो बरोबर आहे का?
जर बरोबर आहे असे म्हणायचे असेल तर अशाच प्रकारचा युक्तिवाद पुरुषही करू शकतील की नाही?
मग त्यांचा प्रतिवाद कसा करता येईल?
व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखाली आपण स्वत: कसेही वागायचे आणि इतरांना मात्र संयम बाळगायला सांगायचे. आपले वर्तन सुधारायला सांगायचे, नीतिमत्ता सांभाळायला सांगायची. हे योग्य नाही. टाळी कधी एका हाताने वाजत नाही. दोन हात एकत्र आले तरच वाजते. स्वत:चे चारित्र्य आणि पावित्र्य सांभाळण्याची जबाबदारी जितकी पुरुषांची आहे तितकीच स्त्रियांची सुद्धा आहे.
त्यांनी ती पार पाडायला नको का? स्त्रियांनी आणि पुरुषांनी, दोघांनीही एकमेकांच्या आदरास पात्र होण्यासारखे वर्तन करायला हवे की नाही? दोघांच्यापैकी कोणाही एकाचे अध:पतन झाले तर ते दुसऱ्याच्या अध:पतनाला कारणीभूत होईल हे निश्चित आहे.
त्याविषयी निदान माझ्या मनामधे तरी कोणताही संशय नाही.
हल्ली आपल्या समाजामधे जे काही चालले आहे ते बघवत नाही.
आजोबा आपल्याच नातीवर अत्त्याचार करताना दिसतो आहे.
बाप आपल्याच मुलीवर अत्त्याचार करताना दिसतो आहे. बाप आपल्याच मुलाची किंवा मुलीची हत्त्या करतो आहे.
मुलगा आपल्याच बापाची किंवा आईची हत्त्या करतो आहे. आई मुलीची हत्त्या करते आहे. मुलगी आईची हत्त्या करतो आहे.
नवरा बायकोची हत्त्या करतो आहे. बायको नवऱ्याची हत्त्या करते आहे.
शाळेत सातवी - आठवीत शिकणारी मुले, क्षुल्लक कारणावरून आपल्याच मित्राची हत्त्या करताना दिसत आहेत.
अनैतिक संबंध ठेवणे आणि लग्न न करताच नवराबायको सारखे एकत्र राहणे सुरू झालेले आहे.
जमते आहे तो पर्यंत एकत्र रहायचे नाही तर राम राम करायचा.
अशा जोडीला जर मुले झाली तर त्या निष्पाप मुलांचे पुढे काय होत असेल?
त्यांना बालपण उपभोगायला मिळणार नाही. आईवडिलांचे प्रेम मिळणार नाही. उलट आयुष्यभर असुरक्षित वाटत राहील. त्यांच्या मनामधे न्यूनगंड निर्माण होईल. त्याचे काय करायचे? ती जबाबदारी कोणी घ्यायची?
खून करणे, दरोडे घालणे, मारहाण करणे, बायकांच्या अंगावरचे दागिने चोरणे ह्या गोष्टी फार मोठ्या प्रमाणामधे वाढल्या आहेत. त्यांना मर्यादाच राहिलेली नाही.
' काय वाटेल ते करायचे आणि पैसा मिळवायचा. चैन करायची. मौजमजा करायची. पकडले गेलो तर पुढचे पुढे बघता येईल. आज मजा करायची. सुखोपभोगात बुडून जायचे. कसलीही काळजी करायची नाही. कुणाचीही पर्वा करायची नाही. आपल्याला हवे असेल ते सगळे काही उपभोगायचे. गरज पडली तर त्यासाठी बलात्कारही करायचा. मागे फिरायचे नाही. कशालाही भ्यायचे नाही.'
चांगल्या संस्कारांच्या अभावामुळे, हीच विचारसरणी वाढायला लागलेली आहे.

हल्लीचे चित्रपट, टीव्ही वरील कार्यक्रम आणि इंटरनेट ह्या तीनही गोष्टी तिला मोठ्या प्रमाणावर हातभार लावत आहेत.
त्यावर एक **T. R. P.** चे सोडून दुसरे कोणतेही बंधन उरलेले नाही. काय मनाला येईल ते दाखवीत असतात.
पण तसे बोलले तर लगेच, **प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचा** प्रश्न पुढे आणण्यात येतो. त्याविषयी ओरड सुरू होते. त्यांच्या जबाबदारीविषयी कोणीही काहीही बोलायचेच नाही. चर्चा करायची नाही. त्यांना आचारसंहिता लागू करण्याविषयी बोलायचे नाही.
कोणाही गुन्हेगाराला, गुन्हा केल्याची शिक्षा होतच नाही. त्यामुळे कोणालाही कायद्याची भीती वाटत नाही.
विशेष चिंताजनक गोष्ट म्हणजे हल्ली गुन्हेगारांच्यामधे पंधरा ते अठरा वर्ष वयोगटामधील अजाण बालकांचे ( ? ) प्रमाण वाढायला लागले आहे. त्या मुलांना सद्‌भावनेने काही सांगायला जायचीही सोय राहिलेली नाही.
काय सांगावे? सांगणाऱ्यालाच मार खायची वेळ यायची. त्याचाच जीव जायचा.
मुलींच्या बाबतीतही तीच कथा आहे. त्यांना काही बोलले तर बोलणाऱ्या विरुद्ध विनयभंगाची तक्रार होऊ शकते.
त्याला जेलमधे जावे लागू शकते. **आपण हे काय करतो आहोत?** **आपला समाज कुठे चालला आहे?**
ह्या विषयी विचार करायला लागलो म्हणजे डोके काम करीत नाहीसे होते. सुन्न होते. बधीर होते.
काहीही सुचत नाही. वेड लागायची पाळी येते. असो.
ह्या प्रवृत्तीच्या सर्वोच्च आविष्काराचे वर्णन यापुढे करण्यात आलेले आहे.

**इदमद्य मया लब्धम् इमम् प्राप्स्ये मनोरथम् ।**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।। १३ ।।**
**असौ मया हतः शत्रुः हनिष्ये चापरानपि ।**
**ईश्वरोऽहमहम् भोगी सिद्धोऽहम् बलवान्सुखी ।। १४ ।।**

मी आज हे मिळवले, उद्या ते प्राप्त करून घेईन; माझ्याजवळ हे धन आहे आणि ते धनही माझेच होईल;
हा शत्रू मी मारला आणि दुसरेही मारीन; मी ईश्वर, मी उपभोग घेणारा, मी सिद्ध, बलाढ्य आणि सुखी;
ह्या आसुरी स्वभावाचा सर्वोच्च आविष्कार आजच्या राजकारणात दिसतो आहे.
इंग्रजीमधे एक फार अर्थपूर्ण आणि समर्पक असे विधान आहे.

**Politics is the last destination of the scoundrels.**

अर्थ — राजकारण हे बदमाष लोकांच्या प्रवासाचे अखेरचे स्थानक आहे.
आपल्या देशाच्या आजच्या राजकारण्यांच्याकडे पाहिले, त्यांचे एक एक प्रताप ऐकले, म्हणजे ह्या विधानावर कोणाचाही विश्वास बसेल.
ह्या देशाच्या राजकारणामधे कधीकाळी —
**‘ दादाभाई नवरोजी, गोपाळकृष्ण गोखले, लाला लजपत राय, लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, स्वातंत्र्यवीर सावरकर, सेनापती बापट, महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल ’** इत्यादी शुद्ध चारित्र्याची, देशप्रेमाने भारलेली, सत्य बोलणारी आणि समाजाला स्वातंत्र्याच्या दिशेने नेणारी मंडळी कार्यरत होती, ह्यावर कोणाचा तरी विश्वास बसेल काय?
आत्ता बोलण्याच्या ओघात मला जी नांवे आठवली ती येथे सांगितली.
परंतु त्या काळी अशी अनेक चारित्र्यवान, निस्वार्थी आणि विश्वासार्ह माणसे राजकारणात क्रियाशील होती.
सर्व समाजाला मार्ग दाखवीत होती. **त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात निष्काम कर्मयोग्यांना माझा नमस्कार असो.**
आज आपल्या देशामधे जी परिस्थिती आली आहे, तिला आपणच जबाबदार आहोत. आपल्या समाजाची एकूण नीतिमत्ता फारच खालावलेली आहे. क्षुल्लक स्वार्थ साधण्यासाठी, आपणच असल्या मंडळींना आपले नेते म्हणून निवडून देतो.
अनेक लोक आपले मतदान करायचे कर्तव्यही पार पाडत नाहीत.
**‘ जनतेला तिच्या योग्यते प्रमाणेच राज्यकर्ता मिळतो.’** हेच सत्य आहे.
जर जनतेने एकत्र होऊन योग्य निर्णय घेतला, तरच हे चित्र बदलता येईल.
अहोऽऽ, साधी शिपायाची नोकरी हवी असेल, तर त्यासाठी, नोकरी देणाऱ्याने ठरवलेली, काही किमान पात्रता असावीच लागते आणि ती नोकरी मागणाऱ्याला सिद्ध करावी लागते. त्याशिवाय शिपायाची नोकरीही मिळू शकत नाही.
नोकरी मिळाल्यावरही ठरलेल्या नियमांना आणि अटींना अनुसरूनच काम करावे लागते. त्यामधे टंगळमंगळ करून चालत नाही.
आपल्या कामाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारावीच लागते. आपली चूक दुसऱ्यावर ढकलून देता येत नाही.
जर कामामधे काही चूक झाली तर त्याबद्दल शिक्षा भोगावीच लागते. अगदी नोकरीवरून काढून टाकले जाऊ शकते.

नोकरी कोणतीही असो, सगळीकडे अशीच पद्धत पाळली जाते.
अपवाद फक्त एकाच क्षेत्राचा आहे आणि ते क्षेत्र म्हणजे **राजकारण.**
राजकारणामधे प्रवेश करायला, **' किमान वय आणि भारताचे नागरिकत्व '** ह्या दोन गोष्टींच्या शिवाय, इतर काहीही लागत नाही. कोणतीही शैक्षणिक पात्रता लागत नाही. अनुभव लागत नाही. चांगले चारित्र्य लागत नाही.
अगदी एखाद्या ग्रामसभेच्या सभासदापासून ते देशाच्या पंतप्रधान आणि राष्ट्रपतीपदापर्यंत कोणतेही पद मिळवायला इतर कसलीही पात्रता लागत नाही. अशिक्षित असूनही शिक्षणमंत्री होता येते. लष्करी जीवनाचा काहीही अनुभव नसताना संरक्षणमंत्री होता येते.
अर्थशास्त्राविषयी काहीही ज्ञान नसताना अर्थमंत्री होता येते. अक्षरश: राजकारणातले कोणतेही पद मिळवता येते.
त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे पद मिळाल्यावर त्या पदाचे सर्व लाभ मिळतात, परंतु कधीही कोणतीही जबाबदारी स्वीकारावी लागत नाही. कामामधे कोणतीही चूक केली अथवा गैर प्रकार केला तरीही शिक्षा होत नाही.
आपण केलेल्या चुकीसाठी इतरांना जबाबदार धरून अगदी सहजपणे सुटता येते. जास्तीत जास्त काय होते?
तर पदाचा राजिनामा द्यावा लागतो. त्यानंतर काही काळ गेला म्हणजे दुसऱ्या पदावर वर्णी लागते.
चरायचे कुरण बदलते पण चरणे चालूच राहते. ते थांबत नाही.
निवडून आलेली पुरेशी डोकी पाठीशी उभी आहेत की नाही हेच महत्त्वाचे.
त्या डोक्यांच्या सर्व इच्छा पुरवल्या, त्यांची भूक भागवली म्हणजे झाले. ह्या सगळ्यासाठी केवळ एकाच आणि एकमेव गोष्टीची आवश्यकता असते. राजकारणात क्रियाशील असलेला आणि त्यामधे पक्का मुरलेला कोणीतरी पाठिराखा असावा लागतो.
**धर्मपिता ( Godfather )** असावा लागतो. तो जर घरातलाच असला तर, मग **सत्तेचा वारसा हक्कच** प्राप्त होतो.
त्याच्याकडून सगळे काही शिकायला मिळते, सगळे काही प्रत्यक्ष पहायला मिळते, उपभोगायला मिळते, अनुभवायला मिळते आणि सर्व प्रकारचे सहाय्य मिळते.
राजकारण आणि सत्ता ही काय चीज आहे? सत्तेच्या खुर्चीचे महत्त्व काय आहे?
तिचा उपयोग काय आणि ती कशी मिळवायची? त्यासाठी काय काय उपद्व्याप करायचे? कोणकोणते मार्ग अनुसरायचे?
एकदा का सत्तेची खुर्ची मिळाली म्हणजे ती कशी टिकवून ठेवायची? त्यासाठी काय काय उलाढाली करायच्या?
कसे कसे सोंग आणि ढोंग करायचे? जनतेची दिशाभूल कशी करायची, तिला कसे फसवायचे, कसे लुबाडायचे?
सरकारी नियम कसे वाकवायचे, त्यांना कशी मुरड घालायची? गरज पडली तर आपल्याला हवे त्याप्रमाणे त्यांना कसे बदलायचे?
भूखंड कसे गिळायचे? भ्रष्टाचार कसा करायचा? संधी मिळेल तेथे हात कसा मारायचा?
न खोदलेल्या विहिरीसाठी, न बांधलेल्या रस्त्यासाठी, अनुदाने कशी मिळवायची?
झोपडपट्ट्या कशा उभ्या करायच्या? बेकायदेशीर बांधकामे कशी करायची? त्यांना संरक्षण देऊन नियमित कसे करायचे?
त्यासाठी गरिबांचा कळवळा आल्याचे नाटक कसे करायचे? त्यांना सहानुभूती दाखवण्यासाठी रस्त्यावर कसे उतरायचे?
उपोषणाला कसे बसायचे? आरोप झाले तर त्यांच्याकडे दुर्लक्ष कसे करायचे?
फारच बोंबाबोंब झाली तर चौकशीसाठी समित्यांवर समित्या नेमून टाईमपास कसा करायचा?
प्रकरण गळ्याशी आलेच तर हाताखालच्या दुय्यम, तिय्यम अधिकाऱ्यांना अडकवून आपली सुटका कशी करून घ्यायची?
राजकीय पक्ष कसे काढायचे? पक्ष चालवायला पैसा कोठून आणायचा? निवडणुका कशा लढवायच्या आणि प्रचार कसा करायचा?
पदरी गुंडांची फौज कशी बाळगायची आणि त्यांना आपल्या ताब्यात कसे ठेवायचे? सहकाऱ्यांच्या पाठीत खंजीर कसा खुपसायचा?
त्यांचा विश्वासघात कसा करायचा? आपला स्वार्थ साधण्यासाठी इतरांचा उपयोग कसा करून घ्यायचा?
आपल्याला नको असलेल्या माणसांना मार्गामधून बाजूला कसे सारायचे? आपल्या सोयीप्रमाणे जनतेच्या भावना कशा भडकवायच्या?
त्यासाठी कधी जात, कधी प्रांत, कधी धर्म, कधी ऐतिहासिक व्यक्तींचे पुतळे, कधी दिवंगत झालेले नेते आणि त्यांची असलेली, नसलेली अथवा होऊ घातलेली स्मारके इत्यादींचा वापर कसा करायचा?
आंदोलने कशी करायची? मोर्चा कसा काढायचा? दंगली कशा घडवून आणायच्या? दहशत कशी पसरवायची?
मुख्य म्हणजे सगळे करून नामानिराळे कसे रहायचे? आणि आपल्या नंतरच्या दहा पिढ्यांची सोय कशी करायची?
हे सगळे शिकायला मिळते.
सुमारे वीस वर्षांपूर्वी, कविवर्य मंगेश पाडगांवकरांनी **' उदासबोध '** नांवाचा ग्रंथ लिहिला आहे.
त्यामधे त्यांनी एकूणच राजकारण्यांच्या विषयीचा सगळा संताप, सगळा उद्वेग व्यक्त केला आहे.
मी तो ग्रंथ अनेक वेळा वाचलेला आहे. फार चांगला ग्रंथ आहे.
ग्रंथाची सुरवातच कशी केली आहे ते लक्ष देऊन ऐका.

आज हयात असते रामदास, तर भोवती बघून हरामदास,
अंतरी झाले असते उदास, लागोनि चिंता ।।
समर्थांचिया सेवका वक्र पाहे, ऐसा गल्लीगल्लीत गुंड आहे,
त्यांचेवरी संरक्षणछत्र आहे, पोलीस, पुढाऱ्यांचे ।।
या सत्याचा लागता शोध, कुठून सुचता दासबोध?
लिहिला असता उदासबोध, श्रीसमर्थांनी ।।
भ्रष्टाचारे पोखरला देश, दीन जनांसि अपार क्लेश,
दुर्जनां यश, सज्जनां अपेश, सर्वत्र दिसे ।।
सत्य सामोरे पाहण्यासाठी, त्राण असावे लागे गाठी,
भेकड पळपुट्याचे पाठी, हिजडा लागे ।।
ग्रंथा नाम उदासबोध, कविजनतेचा संवाद,
काळा कडू आतला विषाद, हलका केला ।। — ।।

पुढे आजच्या एकूण राजकारणावर भाष्य केलेले आहे.
आपल्या सर्वांच्या मनातले विचार व्यक्त करणाऱ्या आणखी काही ओव्या ऐका.

खुर्चीसाठी सांभाळावी जात, खुर्चीसाठी ओले करावे हात,
खुर्चीसाठी गांडीवरी लाथ, अल्लद झेलावी ।।
खुर्चीसाठी ध्येये विकावी, खुर्चीसाठी भाषणे ठोकावी,
खुर्चीसाठी सुभाषिते ओकावी, मिटून डोळे ।।
मते विकत घ्यावी खुर्चीसाठी, भांडणे लावावी खुर्चीसाठी,
या बोटावरील थुंकी खुर्चीसाठी, त्या बोटावरी करावी ।।
हे खुर्चीमाहात्म्य करील श्रवण, तो होईल सत्तापुण्यपावन,
शिक्षणमंत्री करितील त्यालागुन, निरक्षर असोनही ।। — ।।
सभा ज्यास मोडता न ये, संप ज्यास फोडता न ये,
सत्ता ज्यास जोडता न ये, तो नेता न मानावा ।।
गरीब ज्यास पिळता न ये, द्रव्य ज्यास गिळता न ये,
गुंडांसवे मिळता न ये, तो नेता न मानावा ।।
पोरे, जावई, मेहुण्यांचे घरी, प्रत्यक्ष लक्ष्मी पाणी भरी,
ऐसे न दिसे दृष्य तरी, तो नेता न मानावा ।। — ।।
निवडणूक येता जवळी, जनतेसि प्रेमे कवळी,
मुद्रा करोनि बावळी, भीक मागे मतांची ।।
हातभट्टीवाले गुंड, बिल्डर, स्मगलर आदिक पुंड,
यांचे कृपेने जमवी फंड, धन्य तोचि ।।
लोक मेंढरे वळखी मनी, कत्तलखान्याचा हा धनी,
मात्र प्रचारसभेत नयनी, प्रेमाश्रु आणी ।।
जमविल्या फंडाचा हिशोब नाही, काळया पांढऱ्याचा हिशोब नाही,
दिल्या घेतल्याचा हिशोब नाही, ऐसी हिंमत दाखवी ।।
शब्दांत ओतूनिया काकवी, आश्वासने भरपूर चाखवी,
सत्ता मिळताच सोडोनि दावी, धोतर अंती ।। – ।।

त्यांनी ग्रंथाची रचना दासबोधासारखीच केलेली आहे.
पन्नास समास रचलेले असून त्याद्वारे आजच्या राजकारण्यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

वाचत असताना आपल्याला, आपल्या मनामधे येणारे विचारच वाचतो आहोत असे वाटते.
ग्रंथाच्या अखेरच्या समासामधे हे चित्र बदलण्यासाठी काय करायला हवे तेही सांगितलेले आहे. आणखी किती ओव्या सांगू?
सगळा ग्रंथच वाचनीय आहे. माझी आपल्या सर्वांना अशी विनंती आहे की, आपण एकदा तरी तो ग्रंथ वाचा.
आपल्याला हसायलाही येईल, संतापही येईल, नैराश्यही येईल आणि त्यामधून बाहेर पडायची इच्छाशक्तीही निर्माण होईल.
येथे मी **कविवर्य मंगेश पाडगांवकरांना आदराने नमस्कार करतो.** असो.

त्यावेळच्या तुलनेने, आजची परिस्थिती फारच बिघडली आहे. कालचा दिवस चांगला होता असे म्हणण्यासारखी अवस्था आहे.
सत्याची चाड नाही, अंगी प्रामाणिकपणा नाही, कितीही मिळाले तरी समाधान नाही, इतरांचा विचार करणे नाही, त्यांच्यासाठी काही करणे नाही, कशाचीही पर्वा नाही. सदैव केवळ स्वार्थाचाच विचार.

**मी! मी! आणि मीच!** **माझे! माझे! आणि फक्त माझेच!**

**माझ्यासाठीच! माझ्यामुळेच!** **माझ्याशिवाय नाहीच! मला वगळून नाहीच!**

अशीच वृत्ती असल्यावर, सगळी लाज - शरम वेशीवर टांगून सतत इतरांना फसवण्याशिवाय, त्यांना लुबाडण्याशिवाय, त्रास देण्याशिवाय, इतरांचे जगणे यातनामय करण्याशिवाय दुसरे काय केले जाईल बरे?

**आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।**
**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ।। १५ ।।**
**अनेकचित्तविभ्रान्ताः मोहजालसमावृताः ।**
**प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ।। १६ ।।**

मी संपन्न व कुलवान; माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ करीन; मी दान देईन; मी चैन करीन; ह्याप्रमाणे अज्ञानाने मोह पावलेले, अनेक प्रकारच्या कल्पनांनी भ्रम पावलेले, मोहाच्या जाळ्यात पूर्णपणे गुरफटलेले आणि विषयोपभोगात आसक्त झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक, अखेरीस घाणेरड्या नरकात पडतात.

**' मी कोण आहे म्हणून काय विचारता? मी कोण नाही ते विचारा!**

कारण मीच सगळे काही आहे! नेतृत्वाचे सगळे गुण माझ्यात एकवटलेले आहेत!
मी **कार्यसम्राट** आहे! मी **शिक्षणसम्राट** आहे! मी **दुग्धसम्राट** आहे! मी **साखरसम्राट** आहे!
मी **खाणसम्राट** आहे! मी **वाळूसम्राट** आहे! मी **पाणीसम्राट** आहे! मी **मद्यसम्राट** आहे!
मी **बिल्डरांचा सम्राट** आहे! मी **सहकारी बँकांचा अध्यक्ष** आहे! मी **बाजार समित्यांचा अध्यक्ष** आहे!
मी **नगरसेवक** आहे! मी **आमदार** आहे! मी **खासदार** आहे! मी **मंत्री** आहे!
मीच **सर्वांचा नेता** आहे! मीच **सर्वोत्तम** आहे!

**खरोखरच माझ्यासारखा दुसरा कोणीही नाही, हेच सत्य आहे!**

साहित्य संमेलन असो, नाट्य संमेलन असो किंवा पत्रकार संमेलन असो, सगळीकडे मी असतोच.
मला वगळून कोणालाही काहीही करता येणार नाही. माझ्याशिवाय काहीही होऊ शकत नाही.
प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे, सगळ्याचा **कर्ता - धर्ता - हर्ता** मीच आहे! माझ्या मार्गामधे येण्याची कोणाची हिम्मत आहे?
जो येईल त्याला नष्ट करून टाकीन! देशोधडीला लावीन! त्याचे नांव देखील शिल्लक राहणार नाही.
कोणाला कोणत्या खुर्चीत बसवायचे आणि कोणाला बसू द्यायचे नाही ते मीच ठरविणार.
कोणाला कोणती संधी द्यायची किंवा द्यायची नाही ते मीच ठरविणार.
संधी असलीच तर तिचे सोने करायला, माझ्या घरामधेच लायक माणसे आहेत.
**' माझी बायको, माझा मुलगा, माझी मुलगी, माझा पुतण्या, माझा भाचा, माझा भाऊ, माझा मेव्हणा, माझा जावई, माझी सूनबाई, माझा सेक्रेटरी '** इत्यादी सगळी मंडळी कोणत्याही सार्वजनिक पदाचा भार घ्यायला सर्वात जास्त लायक आहेत!
त्यांचा जन्म हा जनतेचे नेतृत्व करण्यासाठीच झालेला आहे.
येन केन प्रकारेण, सर्व प्रकारची सत्ता मिळवून तिचा उपभोग घेण्यासाठीच झालेला आहे.
त्यामुळे एकदा मिळालेली सत्ता सांभाळणे हे आमचे कर्तव्यच आहे.
माझ्या एका इशाऱ्यावर हजारो हुजरे जमा होतात आणि मला हवे असेल ते करतात.
मग इतरांचा विचार कशाला करायचा? त्याची काहीही आवश्यकता नाही.

**<u>युवकांचे नेतृत्व</u>** माझ्याच घरात. **<u>महिलांचे नेतृत्व</u>** माझ्याच घरात.

**<u>विद्यार्थ्यांचे नेतृत्व</u>** माझ्याच घरात. **<u>खेळाडूंचे नेतृत्व</u>** माझ्याच घरात.

समजा की, उद्या कुत्र्यांनी त्यांचा पक्ष काढायचे ठरवले तर त्यांचा नेता कोण होईल? सरळ आहे!

अहो ऽऽ, मी पाळलेला, माझ्या घरातला कुत्राच त्यांचा नेता होईल.

मग त्या सगळ्यांनी कुठे, केव्हा आणि किती वेळ भुंकायचे? कोणाला चावायचे? कोणाला पळवून लावायचे? कुठे तंगडी वर करायची? हे सगळे मीच ठरवणार. असे वेंधळ्यासारखे बघताय काय? तो माझा हक्कच असेल नाही का?

तुम्हाला कळतय ना मी काय सांगतो आहे ते ? — काय म्हणालात?

**<u>समाज काय म्हणेल? जनता काय म्हणेल? लोक काय म्हणतील?</u>**

ते सोडा हो ऽऽ! त्यांचा अधिकार मतदानापुरताच असतो. ती काळजी मी घेतोच की! मतदानाच्या अगोदरचा आठवडा त्यांचाच असतो. त्यावेळी पैसे वाटायचे, कपडे वाटायचे, साड्या वाटायच्या, भेटवस्तू द्यायच्या, सहलीला घेऊन जायचे, भरपूर खायला प्यायला घालायचे. म्हणजे सगळे काही ठीक होते. मग पाच वर्षे काळजी करायचे कारण नाही.

मधून मधून बोंबाबोंब करतात आणि कंटाळून गप्प बसतात. आपण त्यांच्यासाठी थोडे फार काहीतरी करीत असल्याचे दाखवावे लागते. त्यासाठीच वेगवेगळी शिबिरे भरवायची. सरकारी पैशाने शाळांचे गणवेश फुकट वाटायचे. वह्या पुस्तकांचे वाटप करायचे.

अल्प किंमतीत सायकली वाटायच्या. मोफत वैद्यकीय तपासणीची सोय करायची. अल्प किंमतीत चश्मे वाटायचे.

वेगवेगळे उत्सव जोरजोरात साजरे करायचे. जागोजागी मोठ्या आवाजात गाणी लावून नाचायची सोय करून द्यायची.

जनतेची स्मरणशक्ती अल्पकाळच असते. कार्यक्रमामधे नाचायला मिळाले, खायला प्यायला मिळाले म्हणजे त्यांना बाकी सगळ्याचा विसर पडतो. मग ते फारसा त्रास देत नाहीत. एऱ्हवी त्यांना कोण विचारतोय? मेंढरेच ती. हाकलावी तशी पळतात.'

असली कमालीची स्वार्थी आणि हीन विचारसरणी असलेल्या, दुष्ट प्रवृत्ती असलेल्या आणि तिला अनुसरून सतत पापकर्मे करणाऱ्या आसुरी स्वभावाच्या मंडळींचे प्रत्येक कर्म त्यांना नरकद्वाराच्या दिशेनेच नेत असते आणि मरणा नंतर, आपल्या कुकर्मांची फळे भोगण्यासाठी, ते अत्यंत घोर अशा नरकातच जातात असे सांगितले आहे.

**आत्मसम्भाविताः स्तब्धाः धनमानमदान्विताः ।**

**यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम् ।। १७ ।।**

**अहङ्कारम् बलन् दर्पम् कामङ् क्रोधञ् च संश्रिताः ।**

**मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ।। १८ ।।**

स्वतःची बढाई मारणारे, ताठ्याने वागणारे, धन व मान ह्यांच्या मदाने युक्त असलेले हे आसुरी लोक, दांभिकपणाने शास्त्रविधी सोडून देऊन केवळ नांवाचे यज्ञ करीत असतात. अहंकाराने, बलाने, दर्पाने, कामाने व क्रोधाने फुगून जाऊन, आपल्या स्वतःच्या व इतरांच्या देहात असणाऱ्या माझा द्वेष करणारे आणि निंदक असे होतात.

**<u>' लीनतेचे नाटक. नम्रतेचे नाटक. नमस्काराचे नाटक. आनंद झाल्याचे नाटक. दु:ख झाल्याचे नाटक. सांत्वनाचे नाटक. मदतीच्या आश्वासनांचे नाटक. मदत करीत असल्याचे नाटक. सेवा करीत असल्याचे नाटक. सगळीच नाटके.'</u>**

स्वार्थ साधण्यासाठी काहीही करायचे. कोणालाही छळायचे. कोणाचाही बळी द्यायचा.

अनेक पापे करून, कुकर्मे करून, सतत नीच कर्मे करून मिळवलेल्या संपत्तीचा, अधिकाराचा आणि सत्तेचा गर्व बाळगायचा.

आपला फौजफाटा बरोबर घेऊन, सुरक्षारक्षकांच्या गराड्यात, मोठमोठ्या गाड्यांमधून मिरवायचे. आलिशान घरामधे रहायचे आणि मुलाबाळांची लग्नकार्ये अत्यंत थाटामाटाने साजरी करून, पहणाऱ्यांचे डोळे दिपून जातील असे, आपल्या संपत्तीचे प्रदर्शन मांडायचे.

आपल्या पुढील दहा पिढ्यांची सोय करून ठेवायची. म्हणजे ते **<u>टगेगिरी</u>** करायला मोकळे.

आपल्या विरोधात बोलणाऱ्यांचा बंदोबस्त करायला मोकळे. असो.

हे सगळे म्हणजे जनतेशी केलेला द्रोहच आहे. जनतेची प्रतारणाच आहे. जनतेचा घोर अपमानच आहे.

देशाचे नागरीक म्हणजे परमेश्वराचे रूपच आहेत. म्हणजे पर्यायाने हा परमेश्वराचाच अपमान आहे.

पण ह्या मंडळींना कोण थांबवणार? त्यांचा हात कोण धरणार? त्यांना बाजूला करून शिक्षा कोण करणार?

त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे काय व्हायचे असेल ते होईल. पण जनतेने जिवंतपणी सतत त्रास का सहन करायचा?

त्यांची पापकर्मे कशासाठी सहन करायची? ते बरोबर नाही.

**<u>आदरणीय अण्णा हजारेंच्या</u>** अथक प्रयत्नांनी काही चांगले बदल घडून आले आहेत.

अजूनही बरेच बदल घडून येतील अशी आशा वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण होते आहे.

परंतु जोपर्यंत देशाची जनता निश्चय करून, ह्या मंडळींच्या विरोधात एकवटून उभी रहात नाही, तोपर्यंत हे चित्र पूर्णपणे बदलणार नाही.
आता यापुढे जनताजनार्दनानेच नीट विचार केला पाहिजे. आपण वर्षानुवर्षे करीत आलेल्या चुका सुधारल्या पाहिजेत.
परिस्थितीचा सामना करण्यासाठी धैर्याने उभे रहायला हवे.

**उदासबोधाच्या** अखेरच्या समासामधे, कविवर्य मंगेश पाडगांवकर काय सांगतात ते नीट ऐका.
त्यावर खरोखर विचार करा. प्रामाणिकपणे विचार करा. मनापासून विचार करा आणि निश्चयपूर्वक कृती करा.

**महात्म्यांचेफोटो लाविले, उदबत्त्या, हारांचे डोंगर ठेविले,**
**आपुलेचि आंधळेपण सेविले, घोषणा करोनी ।।**
**जात, धर्म पाहोन मते दिली, गुंड, पुंड पूजोन मते दिली,**
**लोकशाहीस वंध्या केली, सांगा कोणी? ।।**
**नेता जितुका अधिक भ्रष्ट, तितुके तयासि केले पुष्ट,**
**अनुयायांनीच केले नष्ट, माणूसपण आपुले ।।**
**सारा षंढ समाज हे पाही, बातमी वाचून निमूट राही,**
**चालीवरी राष्ट्रगीत गाई, गंभीरपणे ।।**
**भ्रष्टाचारी सर्वत्र मातले, सज्जनांनी शेपूट घातले,**
**येथ प्रत्येक घरातले, हेचि दृष्य ।।**
**उदास होऊन किती व्हावे? किती काळीज कातरावे?**
**किती आपणच चावावे? आपुले ओठ ।।**
**वितळे अज्ञान, स्वप्नभ्रांती, फिटे पळपुट्यांची षंढ शांती,**
**सत्यदर्शनातून खरी क्रांती, जन्म घेते ।।**
**धर्म-पंथ-संघ-वादांचे कळप टाळिले, एकटे निर्भय उभे राहिले,**
**स्वतःसि स्वतः स्पष्ट पाहिले, न शोधिता पळवाटा ।।**
**सत्यासि जे सामोरे गेले, निर्भयपणे डोळे भिडविले,**
**पोपटपंचीचे पाढे पढविले, फेकून दिले जयांनी ।।**
**त्यांचे निर्भय डोळ्यांतील शक्ती, हीच उदासबोधाची निष्पत्ती,**
**येथ ही ग्रंथ समाप्ती, प्रारंभ नव्या जाणिवेचा ।।**

आता ह्यावर काही बोलायची आवश्यकता आहे काय? मला तरी तसे वाटत नाही.

**उद्धरेदात्मनाऽत्मानम् नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः।।**

हे विधान एका व्यक्तीसाठी जितके सत्य आहे तितकेच, आपल्या समाजासाठी आणि आपल्या देशासाठीही सत्यच आहे.
प्रत्येक मनुष्याप्रमाणेच प्रत्येक समाजही स्वतःच स्वतःचा मित्र अथवा शत्रू असतो. त्यामुळे जनतेने हताश न होता, निराश न होता, मरगळ झटकून टाकली पाहिजे. आपला आणि आपल्या देशाचा उद्धार आपणच करून घ्यायला पाहिजे.
' दुसरा कोणीतरी येईल, आपल्याला मदत करील आणि आजची परिस्थिती सुधारेल.' अशा आशेवर राहून,
त्या **' दुसऱ्या कोणाचीतरी '** वाट पाहत राहणे बरोबर नाही. आपण जरा शांतपणे विचार करा.
आपल्या देशापुढील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे देशाची सतत वाढत असलेली लोकसंख्या, जी एकशे वीस कोटींच्यावर गेली आहे आणि अजूनही सतत वाढतेच आहे. परंतु त्याविषयी कोणताही राजकीय पक्ष काहीही करीत नाही.
फक्त चिंता व्यक्त करतात. लोकांचे मतपरिवर्तन करून लोकसंख्या आटोक्यात आणली पाहिजे असे सांगत राहतात.
त्या दिशेने प्रयत्न करीत असल्यासारखे दाखवतात. पण त्याचा परिणाम शून्य. प्रगती शून्य. नुसताच देखावा.
माझ्या मते ह्या प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे.
सर्व उपायांचा वापर करून, **' प्रसंगी सक्तीनेही '** लोकसंख्येला आळा घातलाच पाहिजे. तसे झाले नाही तर इतर सर्व उपाय व्यर्थ ठरतील. परिस्थिती आणखी वाईट होईल. लोकशाहीचा अतिरेक हा देशाला घातकच ठरेल. असो.
नागरिक म्हणून आपल्याला करता येतील अशा अनेक साध्या गोष्टी आहेत बघा.

१) सर्व प्रकारचे कायदे हे सर्व समाजाच्या सुरक्षिततेसाठीच करण्यात आलेले असतात, म्हणून प्रत्येकाने दैनंदिन व्यवहारामधे कायद्यांचे पालन केलेच पाहिजे. ती प्रत्येक नागरिकाची मूलभूत जबाबदारी आहे. आपली जबाबदारी पार न पाडता केवळ हक्क मागत राहणे अयोग्य आहे. ते गैरवर्तनच आहे. प्रत्येकाने कायद्याचे पालन केलेच पाहिजे.

लोकशाहीचा शिस्तपालनाशी काहीही संबंध नाही. **( Democracy has nothing to do with discipline.)**

२) आपण स्वत: कोणत्याही प्रकारे पापकर्म करता कामा नये आणि पापकर्म करणाऱ्याला प्रोत्साहन देता कामा नये. अन्याय करणाऱ्याला पाठीशी घालता कामा नये.

३) श्रद्धा ही आवश्यक आहे. परंतु अंधश्रद्धा ही अनावश्यक आहे. घातक आहे. आत्मविश्वास नष्ट करणारी आहे. म्हणून कोणत्याही गोष्टीच्या मागे आंधळेपणाने जाता कामा नये. नीट विचार करून, अभ्यास करून, इतरांच्या बरोबर चर्चा करून, त्यानंतर विचारपूर्वक निर्णय घेतला पाहिजे. विशेष करून **राजकीय पुढारी** आणि **बाबा - बुवा** इत्यादी धार्मिक **( ? )** मंडळींच्या बाबतीत ते फार महत्त्वाचे आहे.

४) सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या आणि रस्ते अडवून लोकांची गैरसोय करणाऱ्या कोणत्याही कार्यक्रमात, कधीही सहभागी होता कामा नये. तशा कार्यक्रमाच्या संयोजकांच्या विरोधामधे जन आंदोलन केले पाहिजे.

५) अन्यायाचा प्रतिकार अवश्य केला पाहिजे. **' मला काय त्याचे ?'** म्हणून गप्प बसणे योग्य नाही. त्यामुळेच अन्याय करणाऱ्यांना बळ मिळते.

६) मतदान न करणे म्हणजे, अयोग्य व्यक्तीला निवडून येण्यासाठी मदत करण्यासारखेच आहे. म्हणून प्रत्येक नागरिकाने प्रत्येक वेळी आपला मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे. कोणत्याही निवडणुकीमधे प्रत्येक मतदाराने, आपली जबाबदारी म्हणून, आपले पवित्र कर्तव्य म्हणून, मतदान केलेच पाहिजे.

७) कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, पक्षीय अभिनिवेष बाजूला सारून, सर्व माहिती घेऊन, विचारपूर्वक चांगल्या व्यक्तीलाच निवडून दिले पाहिजे.

८) एकाच वेळी दोन ठिकाणी निवडणूकीला उभे राहणाऱ्या उमेदवाराला कधीही निवडून देता कामा नये. तो दोन्ही ठिकाणच्या नागरिकांना फसवत असतो. त्याची निष्ठा संशयास्पदच असते. म्हणून दोन्ही ठिकाणी त्याचा पराभव केलाच पाहिजे.

९) कोणत्याही उमेदवाराला, एकदा एका पदासाठी निवडून दिल्यानंतर, त्या पदाची मुदत अधिकृतपणे संपेपर्यंत आणि त्याने आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडल्याचे सिद्ध होईपर्यंत, त्याला दुसऱ्या कोणत्याही पदासाठी निवडून देता कामा नये. त्याची निष्ठाही संशयास्पदच असते.

१०) आपण स्वत: कधीही अनधिकृत बांधकाम करता कामा नये. अनधिकृतपणे बांधलेले घर विकत घेता कामा नये. सर्व चौकशी करून अधिकृतपणे बांधलेले घरच खरेदी करावे. नियमाप्रमाणे आवश्यक ते सर्व प्रकारचे कर भरावेत. त्यात हयगय करता कामा नये. तसे करणे गुन्हा आहे.

११) अनधिकृत बांधकाम करणाऱ्या आणि अनधिकृत बांधकामांना पाठिबा देणाऱ्या, भ्रष्टाचार करणाऱ्या आणि भ्रष्टाचाराला पाठीशी घालणाऱ्या अशा कोणत्याही उमेदवाराला कधीही निवडून देता कामा नये.

१२) महापालिका, विधानसभा, लोकसभा इत्यादी अधिकृत सभांच्या कामकाजात अडथळे आणणाऱ्या, सभागृहामधे मारामाऱ्या करणाऱ्या, मोडतोड करणाऱ्या, शिवीगाळ करणाऱ्या, अशा कोणत्याही उमेदवाराला कधीही निवडून देता कामा नये.

१३) आपल्या पदाचा गैरवापर करून, शासकीय अधिकाऱ्यांना दमदाटी करणाऱ्या, मारहाण करणाऱ्या, अशा कोणत्याही उमेदवाराला कधीही निवडून देता कामा नये.

१४) एकाच घरामधील चारचार, पाचपाच माणसे, मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक म्हणून सत्ता उपभोगत असतात. एकमेकांच्या गैरकारभारामधे मदत करीत असतात. आधार देत असतात. हे योग्य नाही.

म्हणून कोणत्याही निवडणुकीमधे मतदान करीत असताना, उमेदवाराने स्वत:चे कर्तृत्व नि:संशय सिद्ध केलेले असल्याशिवाय, एकाच घरामधील दुसऱ्या व्यक्तीला निवडून देता कामा नये.

आत्ता जे मुद्दे आठवले तेवढे येथे सांगितले. ही यादी फारच मोठी आहे. असो.

**तानहम् द्विषत: क्रूरान् संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्रमशुभान् आसुरीष्वेव योनिषु ।। १९ ।।**
**आसुरीम् योनिमापन्ना: मूढा जन्मनि जन्मनि ।**
**मामप्राप्यैव कौंतेय ततो यान्त्यधमाङ् गतिम् ।। २० ।।**

अशुभ कर्मे करणाऱ्या ह्या द्वेष्ट्या व क्रूर नराधमांस या संसारातील पापयोनीतच मी टाकीत असतो. हे कौंतेया ! ह्याप्रमाणे जन्मोजन्मी आसुरी योनीच प्राप्त होऊन, हे मूर्ख लोक, माझ्याकडे कधीही न येता, अखेर अत्यंत अधोगतीला जातात.
जरा विचार करा. असेच संस्कार झालेल्या, अशीच आसुरी प्रवृत्ती असलेल्या आणि तिला अनुसरून वागणाऱ्या माणसांना त्यांच्या सर्व आयुष्यामधे ' किती पीडितांचे शाप मिळत असतील? किती गोरगरीबांचे तळतळाट मिळत असतील?
किती लोक त्यांचा मनोमन तिरस्कार करीत असतील? त्यांचा शेवट कसा असेल? मृत्यू नंतर त्यांची काय अवस्था होत असेल?'
आपल्याला ह्यातले काहीही कळू शकत नाही. पण —
' नियती नांवाची एक शक्ती सदैव कार्यरत असते आणि ती माणसाच्या प्रत्येक कर्माचे योग्य ते फळ भोगायला लावतेच,'
ह्याविषयी माझ्या मनामधे तरी कोणतीही शंका नाही. ज्याने सत्कर्म केलेच नसेल त्याला सद्गती तरी कशी मिळेल?
त्याला जन्ममृत्यूच्या चक्रामधे सतत फिरत राहून अनंत यातनाच भोगाव्या लागणार.
परमेश्वराच्या दरबारामधे कोणाचाही आणि कोणताही वशिला चालत नाही. राखीव जागा ठेवता येत नाहीत.
कोणालाही लाच देता येत नाही. मोर्चे काढून आणि गुंडगिरी करून हवे ते मिळवता येत नाही.
तेथे सर्वांच्यासाठी एकच नियम पाळला जातो. **' जसे कर्म तसे त्याचे फळ'** हाच नियम पाळला जातो आणि त्यानुसारच न्याय केला जातो. त्यामुळे तो अधोगतीलाच जाणार, ह्याविषयी शंकाच नाही.
ही गोष्ट प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे आणि आपले वर्तन सुधारायचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे.
येथे भगवंतांनी हाच संदेश दिलेला आहे.

**त्रिविधम् नरकस्येदम् द्वारम् नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभः तस्मादेतत्त्रयन् त्यजेत् ॥ २१ ॥**
**एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।**
**आचरत्यात्मनः श्रेयः ततो याति पराङ् गतिम् ॥ २२ ॥**

काम, क्रोध व लोभ असे तीन प्रकारचे नरकाचे द्वार असून ते आपला नाश करणारे आहे. म्हणून ह्या तिघांचाही त्याग करावा.
हे कौंतेया ! ह्या तीन तमोद्वारातून सुटला म्हणजे मनुष्य, आपले ज्यात कल्याण तेच आचरण करू लागतो व नंतर उत्तम गतीला पोहोचतो.
मागे दुसऱ्या अध्यायामधे, अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देताना, बासष्ट आणि त्रेसष्ट ह्या दोन श्लोकांमधे भगवंतांनी —
' आपल्या मनावर नियंत्रण ठेवू शकत नसलेल्या कोणाही मनुष्याचा सर्वनाश कशामुळे आणि कसा होतो? ' ते सांगितले आहे.
' विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्या विषयांत आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीमुळे कामना म्हणजेच इच्छा उत्पन्न होते. त्या कामनेच्या आड विघ्न आले म्हणजे क्रोध उत्पन्न होतो. अशा प्रकारे निर्माण झालेल्या क्रोधापासून अविवेक उत्पन्न होतो.
अविवेकापासून स्मरणशक्ती भ्रष्ट होते. स्मरणशक्ती भ्रष्ट झाल्यावर बुद्धीचा नाश होतो. बुद्धिनाशापासून पुरुषाचा सर्वस्वी घात होतो. सर्वनाश होतो. ज्याला स्थिर बुद्धी आणि स्थिर भावनाही नसते त्याला कधीही कुठेही शांतता मिळत नाही आणि ज्याला शांती नाही त्याला सुखही मिळत नाही.'
धर्मशास्त्रामधे माणसाचे **' काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर '** हे सहा शत्रू आहेत असे वारंवार सांगण्यात आलेले आहे. त्यांच्यापैकी काम, क्रोध आणि लोभ हे तीन पहिले आणि मुख्य आहेत. मोह, मद आणि मत्सर हे त्यांच्या नंतरचे आहेत.
म्हणून येथे त्यांनाच नरकाचा दरवाजा असे म्हटलेले आहे. त्यांचा त्याग करावा असे सांगितलेले आहे.
तसे केल्यावर मनुष्य आपोआप सन्मार्गाला लागतो. सदाचरणी होतो. सज्जन होतो. सुशील होतो.
परिणामी त्याला मरणानंतर उत्तम गती प्राप्त होते.
**काम** म्हणजे कामना. काहीतरी मिळवायची इच्छा होणे. हा एका मर्यादेपर्यंत आवश्यक आहे. उपकारकही आहे.
परंतु जेव्हा ती मर्यादा ओलांडली जाते तेव्हा तोच काम माणसाचा मोठा शत्रू होतो.
कोणीही झाला तरी त्याच्या सर्व कामना कधीही पूर्ण होत नाहीत. किंबहुना अपूर्ण राहणे हा कामाचा स्वभाव असतो.
कारण कामनांना अंत नसतो. त्या कधीही संपत नाहीत. एक कामना पूर्ण होत असताना दुसऱ्या कामनेला जन्म देत असते.
ही साखळी निरंतर चालत राहते. ' आता मला काहीही नको.' असे होतच नाही. अमर्याद कामना ही माणसाच्या ज्ञानाला झाकून टाकते. कामना पूर्ण झाली नाही तर, आपल्या कामनापूर्तीच्या आड येणाऱ्या माणसाविषयी प्रतिकाराची भावना प्रबळ होते.
**क्रोध** आपला प्रभाव गाजवायला लागतो.
क्रोध हा देखील एका मर्यादेपर्यंत आवश्यक आहे. पण त्याचा अतिरेक होणे वाईट.

अमर्याद क्रोध हा माणसाची इंद्रिये, मन आणि बुद्धी ह्यांचा ताबा घेतो.
त्याची सारासार विचारशक्ती नाहीशी करून टाकतो आणि त्याला मोहात पाडतो.
जमीनजुमला, घरदार, धनधान्य, संपत्ती इत्यादींच्याविषयी असलेल्या अत्यंत तीव्र आसक्तीला **लोभ** असे म्हटले आहे.
**मोह** हा लोभाहून फार वेगळा नसतो. ते दोघे जवळजवळ सारखेच आहेत. जुळे भाऊ आहेत.
लोभ आणि मोह ह्यांना **' कामाची प्रजा '** असे म्हटलेले आहे.
हे दोघेही एका मर्यादेपर्यंत उपकारक आहेत. पण त्यांचा अतिरेक होणे वाईट.
नंतर स्वत:विषयीचा अतिरेकी अहंकार म्हणजेच **मद** आपले काम करायला लागतो.
खरे म्हणजे अहंकार हा मनुष्याचा एक स्वाभाविक गुणधर्म आहे. एका मर्यादेपर्यंत तो आवश्यक आहे. उपकारकही आहे.
परंतु जेव्हा ती मर्यादा ओलांडली जाते तेव्हा तोच अहंकार माणसाचा शत्रू होतो. अहंकाराचे विकृत स्वरूप म्हणजे **मद** होय.
एका कवीने ' मद म्हणजे काय? मदांध माणूस कसा असतो?' ते पुढील चार ओळीत अत्यंत समर्पकपणे सांगितले आहे.
वाचताना आपण आजच्या राजकारण्यांचे वर्णन वाचतो आहोत असेच वाटते.

**वक्ता मीच, धनाढ्य मीच, जगती माझीच रीती बरी ।**
**कर्तृत्वास मदीय पार न कुणा बुद्धींत माझी सरी ।।**
**सत्ता एक मलाच योग्य, सगळी व्हावी प्रतिष्ठा मला ।**
**सारे विश्व मदांध तुच्छ समजे, तो पाहिजे टाळला ।।**

ह्यालाच **गर्व - ताठा - घमेंड - दर्प - उर्मटपणा - माज** असेही म्हणतात.
जे आपल्याला हवे आहे पण आपल्याला मिळवता येत नाही, ते ज्याच्याकडे आहे, ज्याला मिळवता येते आहे त्याच्या विषयी, एक प्रकारची विकृत भावना निर्माण होते. मनामधे जळफळाट होतो. ह्यालाच **मत्सर** असे म्हणतात.
तेराव्या अध्यायामधे ' क्षेत्र म्हणजे काय?' त्याविषयी सांगताना, भगवान श्रीकृष्ण काय म्हणाले आहेत ते परत एकदा ऐका.

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ।। १३ - ५ ।।**
**इच्छा द्वेषः सुखं दु:खं संघातश्चेतना धृतिः ।**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ।। १३ - ६ ।।**

' पाच महाभूते, अहंकार, बुद्धी आणि प्रकृति, तसेच दहा इंद्रिये व एक मन आणि पाच इंद्रियांचे पाच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, संघात, चेतना आणि धैर्य ह्या तत्त्वांच्या समुदायास सविकार क्षेत्र म्हटले आहे.'
ह्या यादीमधे हे सहा शत्रूही आलेले आहेत. म्हणजेच ते क्षेत्राचा अविभाज्य असा भागच आहेत.
त्यांचा संपूर्णपणे त्याग करणे कोणालाही शक्य होणार नाही. पण त्यांना आपल्या ताब्यात ठेवणे, त्यांचे नियमन करणे हे शक्य होऊ शकते. त्या दिशेने प्रामाणिकपणे प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. तेच अपेक्षित असते आणि आवश्यकही असते.
ह्याविषयी वाद होऊ शकतात. त्यांमधे तथ्यही असते. येथे मी आपल्याला काही विधाने सांगतो.
आपण जरा विचार करा आणि ती विधाने आपल्याला पूर्णपणे नाकारता येतील काय ते सांगा.

१) **कामानेच वंशसातत्य राखले जाते.**
विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय सतत चालू राहतात.
अहो ऽऽ, बाकीचे सोडून द्या. विधात्याला **' एकोऽहम् बहुस्याम् ।'** असे वाटले, ही पण त्याची कामनाच होती.
त्यामुळेच विश्व निर्माण झाले.

२) **क्रोधामुळेच दुष्टांना, वाईट माणसांना धाक बसतो.**
**नरसिंहाला** क्रोध आला म्हणूनच हिरण्यकश्यपूचा वध झाला.
**श्रीरामाला** क्रोध आला म्हणूनच लंकाधिपती रावणाचा वध झाला.
**श्रीकृष्णाला** क्रोध आला म्हणूनच मथुराधिपती कंसाचा वध झाला.
तसे झाले नसते तर दुष्टांचे निर्दालन झालेच नसते.

३) **लोभाच्या योगानेच ऐश्वर्य प्राप्त करून घ्यायची प्रेरणा मिळते.**
ती प्रेरणाच माणसाला जोमाने काम करायला भाग पाडते. परिश्रम करायला लावते.

तसे केल्यावरच इच्छित गोष्ट प्राप्त व्हायची शक्यता निर्माण होते.

४) **मोहाच्या योगाने अनेक गोष्टींच्यामधे रस घेता येतो.**

अनुभव घेऊन पाहण्याची इच्छा ही मोहामुळेच होते. एखादी गोष्ट त्याज्य आहे की नाही ते समजण्यासाठी त्या गोष्टीची पूर्ण माहिती असावी लागते आणि त्यासाठी असलेल्या अनेक मार्गांच्यापैकी **' अनुभव घेणे '** हा एक मार्ग आहे.

त्यायोगे आपल्याला निश्चित निर्णय घ्यायला मदत होते.

५) **मदाच्या योगाने स्वाभिमान जागा होतो, आत्मविश्वास वाढतो.**

आत्मविश्वास हा माणसाला आत्मरक्षणाची प्रेरणा देतो. परिणामी स्वसंरक्षण होते.

६) **मत्सराच्या योगाने आपल्या महत्वाकांक्षेला प्रेरणा मिळते.**

जे आपल्याला हवे आहे ते मिळवण्यासाठी सतत परिश्रम करायची मनाची तयारी होऊ शकते.

माणसाकडून तशी कृतीही घडून येऊ शकते.

वरील विधानांवर, विद्वानांच्यामधे नेहमीच वादविवाद होतात. परंतु त्यांमधे तथ्य नाही असे म्हणता येणार नाही.

महत्त्वाची गोष्ट हीच की कशाचीही मर्यादा ओलांडली जाता कामा नये. अतिरेक होता कामा नये.

हे विधान केवळ दुर्गुणांच्या बाबतीतच नाहीतर सद्‌गुणांच्या बाबतीतही सत्य आहे.

सद्‌गुणांचा अतिरेक हा देखील विनाशाला कारण होतो.

ह्यालाच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ' **सद्‌गुणविकृती** ' असे म्हटलेले आहे.

आता मी आपल्याला आणखी काही विधाने सांगतो.

आपण जरा विचार करा आणि ती विधाने आपल्याला पूर्णपणे नाकारता येतील काय ते ही सांगा.

१) **सत्य** – नेहमी सत्य बोलावे. कधीही असत्य बोलू नये. ते पाप आहे.

आपला, आपल्या घराचा, आपल्या समाजाचा किंवा आपल्या देशाचा घात करायच्या हेतूने समोर आलेल्या कोणाही माणसाशी सत्य बोलणे चूक आहे. तसे कधीही करू नये. त्याला काहीही करून, जमेल तसा मारावा. त्यामधे कोणतेही पाप नाही.

**साप विखारी देश जननिचा ये घेऊ चावा ।**

**अवचित गाठुनि ठकवुनि भुलवुनि कसाहि ठेचावा ।। ( सावरकर )**

२) **अहिंसा** – कधीही कोणालाही कोणत्याही प्रकारे इजा करू नये.

हिंसा करण्यासाठी आलेल्या माणसाला मारणे पाप नाही. मोठी हिंसा टाळण्याच्या हेतूने केलेली छोटी हिंसा ही अहिंसाच असते. तसे करणे म्हणजे पापकर्म नसून पुण्यकर्मच आहे.

**' शत्रूला प्रेमाने जिंकावे '** म्हणजे काय? अन्याय करीत असलेल्या माणसावर प्रेम कसे काय करणार?

समजा तसे केले तर तो आपल्याला मुक्त करील की स्वत:चे अंगवस्त्र समजून रगडून काढील? एका गालावर मारल्यावर दुसरा गाल पुढे केला तर आपलेच थोबाड रंगणार. मारणाऱ्याचे काहीही वाकडे होणार नाही. मारून मारून त्याचा हात दुखेल इतकेच काय ते. आपल्यावर होत असलेला अन्याय दूर होण्याचे नांवच नको.

अहो ऽऽ,मूर्खपणालाही काही मर्यादा हवी की नको? **( भालाकार भोपटकर )**

३) **दया** – इतरांच्या दु:खाचे निवारण करून त्यांना सुखी करण्याचा प्रयत्न करणे.

४) **क्षमा** – अपराध करणाऱ्याविषयीसुद्धा सहानुभूतीपूर्वक विचार करणे.

**महाराजा पृथ्विराज चौहानने,** आक्रमण करून आलेल्या **महम्मद घोरीचा,** दोन वेळा पराभव केला. परंतु नंतर साखळदंडांनी बांधून समोर आणलेल्या, रडत रडत प्राणांची भीक मागत असलेल्या पापी घोरीला **दया** दाखवली. **क्षमा** करून सोडून दिला.

ह्या कृत्याचा परिणाम त्याला पुढे भोगावा लागला. शत्रूला कधीही दया दाखवू नये आणि क्षमा करू नये.

शत्रूला जिवंत राहू देणे म्हणजे स्वत:च्या सर्वनाशाची सुरवात करणे आहे.

५) **मार्दव** – अंत:करण, वाणी, व्यवहार ह्यांच्यामधे जराही कठोरपणा नसणे.

हे बोलायला ठीक आहे. व्यवहारामधे उपयोगाचे नाही.

**' ज्याला जी भाषा समजते, त्याचे बरोबर त्याच भाषेत व्यवहार केला पाहिजे.'**

तरच आपला निभाव लागू शकतो. शत्रूच्या बरोबर शत्रूसारखेच वागले पाहिजे. अन्यथा विपरीत परिणामांना तोंड द्यावे लागते.

समर्थ रामदास स्वामींनी **दासबोधामधे** स्पष्टपणे सांगितलेले आहे की, —

**धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।**

**खटनटासी खटनट । अगत्य करी ।।**

**जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी बरी थाटे ।**

**इतुके होते परी धनी कोठे । दृष्टीस न पडे ।।**

येथे मला समर्थांच्या **श्री मनाच्या श्लोकांमधील** सहावा श्लोक आठवतो आहे.

नको रे मना **क्रोध** हा खेदकारी । नको रे मना **काम** नाना विकारी ।।

नको रे मना **लोभ** हा अंगिकारू । नको रे मना **मत्सरू दंभ** भारू ।। ६ ।।

ह्या श्लोकामधे समर्थांनी षड्रिपूंचा क्रम थोडासा बदलला आहे.

क्रोधाला, कामाच्या अगोदरचे स्थान दिलेले आहे. मत्सराला, दंभ म्हणजेच मदाच्या अगोदरचे स्थान दिलेले आहे आणि मोह हा लोभाचा जुळा भाऊ मानला आहे. त्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला नाही.

**श्री मनाचे श्लोक** हे आपल्या व्यक्तिगत आयुष्यामधे परिवर्तन घडवून आणण्यासाठी फार उपयुक्त आहेत. फार महत्त्वाचे आहेत. त्यामधील पहिला श्लोक नमनाचा असून अखेरचे चार श्लोक हे समारोपाचे आहेत. दोनशे श्लोकांमधे मनाला उपदेश केलेला आहे. त्यामधे इतका मोठा अर्थ भरलेला आहे की, प्रत्येक श्लोक हा एका स्वतंत्र व्याख्यानाचा विषय होऊ शकेल.

काही वर्षांपूर्वी मला **प्राचार्य अनंत दामोदर आठवले** ऊर्फ **स्वामी वरदानंद भारती** ह्यांचा, **' मनोबोध '** नांवाचा ग्रंथ वाचायला मिळाला. त्यामधे त्यांची मनाच्या श्लोकांवरील प्रवचने संकलित केलेली आहेत. फार सुंदर ग्रंथ आहे.

एकदा वाचायला सुरवात केली आणि सारखा वाचतच राहिलो.

आपण सर्वांनी एकदा तरी तो ग्रंथ वाचावा, असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

**येथे मी त्यांना आदराने नमस्कार करतो.** असो.

आपल्या अंगीचे दुर्गुण घालवण्यासाठी, माणसाला अगोदर त्यांची जाणीव असावी लागते.

तशी जाणीव करून देण्याचे कार्य मनाचे श्लोक म्हणताना आपोआप घडून येते.

स्वत:मधील दुर्गुणांना दाबून टाकून, सद्गुणांमधे वाढ करण्याची इच्छा निर्माण होते.

त्या दिशेने विचार करायला आणि प्रयास करायला सुरवात होते.

प्रत्येक व्यक्तीमधे होणारे परिवर्तन हे अखेरीस सर्व समाजामधे परिवर्तन घडवते.

मला सांगा, **' शेवटी समाज म्हणजे तरी काय आहे? '**

समाज काही आकाशातून पडत नाही किंवा जमिनीतून उगवतही नाही. तुम्ही, मी आणि आपल्यासारखीच अनेक माणसे, अनेक व्यक्ती मिळून समाज अस्तित्वात येतो आाणि शतकानुशतके अस्तित्वात राहतो.

त्यामुळे व्यक्तिमात्रांची अवस्था म्हणजेच एकूण समाजाची अवस्था असते. तसेच —

समाजाची **नीतिमत्ता** म्हणजे व्यक्तिमात्रांची नीतिमत्ता असते.

समाजाचा **उत्कर्ष** म्हणजे व्यक्तिमात्रांचा उत्कर्ष असतो.

समाजाचा **अपकर्ष** म्हणजे व्यक्तिमात्रांचा अपकर्ष असतो.

समाजाची **उन्नती** म्हणजे व्यक्तिमात्रांची उन्नती असते.

समाजाची **अवनती** म्हणजे व्यक्तिमात्रांची अवनती असते.

समाजाचा **विकास** म्हणजे व्यक्तिमात्रांचा विकास असतो.

समाजाचा **ऱ्हास** म्हणजे व्यक्तिमात्रांचा ऱ्हास असतो.

समाजाचे **उत्थान** म्हणजे व्यक्तिमात्रांचे उत्थान असते.

समाजाचे **अध:पतन** म्हणजे व्यक्तिमात्रांचे अध:पतन असते.

प्रत्येक माणसावर लहानपणापासून चांगले संस्कार झाले, समाजामधे इतरांच्या बरोबर वावरताना नीती - अनीति, सत्य - असत्य, न्याय - अन्याय ह्यांच्या विषयी विवेक बाळगून, तारतम्य बाळगून कसे वागायचे ह्याचे शिक्षण दिले गेले, आपण स्वत: इतरांच्यावर अन्याय करू नये, कोणताही अपराध करू नये आणि कधीही अन्याय सहन करू नये, इत्यादी गोष्टी आचरणाचे अविभाज्य अंग झाल्या, म्हणजे मग सर्व समाजाच्या नीतिमत्तेमधे वाढ होते.

म्हणून व्यक्तिगत आचरण हे अत्यंत महत्त्वाचे असते.

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**

**न स सिद्धिमवाप्नोति न सुखम् न पराङ् गतिम् ।। २३ ।।**

**तस्माच्छास्त्रम् प्रमाणन् ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**

**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तम् कर्म कर्तुमिहार्हसि ।। २४ ।।**

जो शास्त्रोक्त विधी सोडून मनास वाटेल ते करू लागला, त्याला सिद्धी मिळत नाही आणि उत्तम गतीही नाही.
म्हणून, कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते ह्याचा निर्णय करण्यासाठी तुला शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे.
शास्त्रात काय सांगितले आहे ते समजून घेऊन त्याप्रमाणे ह्यालोकी कर्म करणे तुला योग्य होय.
**' वेद, उपनिषदे, पुराणे आणि इतिहास '** ह्या सर्वांना शास्त्र असे म्हणतात.
मानव योनीमधे जन्माला आल्यावर, आपले आयुष्य जगत असताना कसे वागावे आणि कसे वागू नये, काय करावे आणि काय करू नये, मोक्षप्राप्तीचे मार्ग कोणते, ह्याविषयी सर्व काही शास्त्रामधे सांगितलेले आहे.
त्याकडे दुर्लक्ष करून, त्याची अवहेलना करून, मनाला येईल तसे वागणारा, कोणताही विधिनिषेध न पाळणारा, सदैव विषयोपभोगामधे बुडून जाणारा असा जो कोणी असेल त्याला जन्ममृत्यूच्या चक्रामधून कधीही मोकळे होता येणार नाही.
कधीही मुक्ती प्राप्त होणार नाही. मोक्ष मिळणार नाही.
ह्या उलट जो कोणी शास्त्र प्रमाण मानून, त्यात जे सांगितलेले आहे त्याचे श्रद्धापूर्वक पालन करीत राहील, स्वधर्माचे यथायोग्य पालन करीत राहील, आपले विहित कर्म निरपेक्षपणे पार पाडीत राहील, तो अखेरीस जन्ममृत्यूच्या चक्रामधून बाहेर पडेल.
त्याला आत्मानंदाची प्राप्ती होईल. परमानंदाची प्राप्ती होईल.
ब्रह्मानंदाची प्राप्ती होईल. मुक्ती प्राप्त होईल. ह्यामधे तिळमात्र शंका नाही.
म्हणून धर्मशास्त्रामधे काय सांगितलेले आहे ते समजून घेऊन त्याप्रमाणे वागणेच माणसाच्या हिताचे आहे असे सांगितले आहे.

**येथे सोळावा अध्याय समाप्त झाला आहे.**

ह्या अध्यायामधे सुरवातीला दैवी संपदेचे वर्णन करून तिचे आचरण हे मोक्षप्राप्ती करून देणारे आहे असे सांगितले.
त्यानंतर आसुरी संपदेचे सविस्तर वर्णन केले आहे. आसुरी प्रवृत्तीच्या माणसांचे विचार कसे असतात, आचार कसे असतात आणि ते सर्व समाजाला कसे त्रासदायक होतात ते सविस्तर सांगितले.
आयुष्यभर अशा प्रकारे आचरण करीत राहिल्यामुळे, मृत्यूनंतर त्यांची अवस्था कशी होते ते सांगितले.
अखेरीस ' शास्त्र प्रमाण मानून, त्यात जे सांगितलेले आहे त्याचे श्रद्धापूर्वक पालन करीत राहणे, स्वधर्माचे यथायोग्य पालन करीत राहणे, आपले विहित कर्म कोणतीही अपेक्षा न ठेवता उत्तम प्रकारे करीत राहणे, हेच मनुष्याच्या अंतिम हिताचे आहे.'
असे सांगून अर्जुनाला त्याप्रमाणे वागायला सांगितले आहे.
श्रीकृष्णाच्या सांगण्यावर अर्जुन विचार करतो आहे. त्याच्या मनामधे परत काही शंका उपस्थित झाल्या आहेत.
त्याला श्रीकृष्णाला त्या शंका विचारायच्या आहेत.
आता पुढील अध्यायामधे अर्जुन काय विचारतो आणि श्रीकृष्ण भगवान त्याला काय उत्तर देतात ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## अध्याय सतरावा

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या सतराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.

मागील अध्यायाच्या सुरवातीला दैवी संपदेचे वर्णन करून तिचे आचरण हे मोक्षप्राप्ती करून देणारे आहे असे सांगितले.

त्यानंतर आसुरी संपदेचे सविस्तर वर्णन केले. आसुरी प्रवृत्तीच्या माणसांचे विचार कसे असतात, आचार कसे असतात आणि ते सर्व समाजाला कसे त्रासदायक होतात ते सविस्तर सांगितले. आयुष्यभर अशा प्रकारे आचरण करीत राहिल्यामुळे, मृत्यूनंतर त्यांची अवस्था कशी होते ते सांगितले. अखेरीस —

' शास्त्र प्रमाण मानून, त्यात जे सांगितलेले आहे त्याचे श्रद्धापूर्वक पालन करीत राहणे, स्वधर्माचे यथायोग्य पालन करीत राहणे, आपले विहित कर्म कोणतीही अपेक्षा न ठेवता उत्तम प्रकारे करीत राहणे, हेच मनुष्याच्या अंतिम हिताचे आहे,'

असे सांगून अर्जुनाला त्याप्रमाणे वागायला सांगितले आहे. असो.

येथे आपल्या मनामधे एक मूलभूत प्रश्न येतो.

**शास्त्र म्हणजे काय? शास्त्र कशाला म्हणायचे? शास्त्राचे आचरण कशासाठी करायचे?**

शास्त्र ह्या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक **व्यावहारिक** अर्थ आहे आणि दुसरा **आध्यात्मिक** अर्थ आहे.

शास्त्र ह्या शब्दाचा व्यावहारिक अर्थ —

' जो सर्वांना, सर्व काळी आणि सर्व परिस्थितीमधे मान्य होईल आणि व्यवहारामधे उपयुक्त होईल, लाभदायक होईल, असा आचरणाचा मार्ग ' हा आहे.

दैनंदिन व्यवहारामधे, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण सगळे ज्या ज्या गोष्टी करतो, त्या कशाप्रकारे कराव्यात आणि कशाप्रकारे करू नयेत ह्याची एक विशिष्ट पद्धत असते. ती पद्धत दीर्घ अनुभवाने ठरलेली असल्यामुळे सर्वांना मान्य असते.

तिलाच **शास्त्र** असे म्हणतात. ते शास्त्र समजून घेऊन त्यानुसार वागले तर लाभ होतो. आपले जगणे सुसह्य होते.

येथे आपण सर्वांच्या परिचयाचे असे एक उदाहरण विचारात घेऊया.

' सकाळी झोपेतून उठल्यावर दंतमंजनाने दात घासून, खळखळून चुळा भराव्या व तोंड स्वच्छ करावे. पाण्याच्या सहाय्याने डोळे आणि नाक स्वच्छ करावेत. गुळण्या करून घसा साफ करावा. त्यानंतर जे खायचे अथवा प्यायचे असेल ते घ्यावे.'

हा एक **विधी** आहे. त्यामधे दररोज सकाळी झोपून उठल्यावर काय करावे ते सांगितलेले आहे.

शारिरीक स्वच्छता सांभाळण्यासाठी असे करणे आवश्यक आहे.

' सकाळी झोपेतून उठल्यावर दंतमंजनाने दात घासून, तोंड स्वच्छ केल्याशिवाय कधीही राहू नये. तोंड न धुता काहीही खाऊ अथवा पिऊ नये.'

हा एक **निषेध** आहे. त्यामधे दररोज सकाळी झोपून उठल्यावर काय करू नये ते सांगितलेले आहे.

असे करणे म्हणजे स्वत:चे स्वास्थ्य बिघडवणे आहे.

ह्या दोन्ही विधानांना एकत्र केले म्हणजे जे होते त्याला शास्त्र असे म्हणतात.

शाळा - कॉलेजात जाऊन शिक्षण कसे घ्यायचे, व्यावसायिक शिक्षण कसे घ्यायचे, एखाद्या ठिकाणी नोकरी कशी मिळवायची आणि ती कशा प्रकारे करायची ह्याचेही एक शास्त्र आहे. त्याचेही **विधी** आणि **निषेध** सांगितलेले आहेत.

डॉक्टर, वकील, शिक्षक, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, शेतकरी, कामकरी, इत्यादी सर्व व्यवसायांचेही स्वतंत्र असे शास्त्र असते.

त्या शास्त्रानुसार वागले तरच सर्व व्यवसाय सुरळीतपणे चालतात. अन्यथा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करणे **( Manufacturing )**, तिची गुणवत्ता कायम राखणे **( Quality control )**, तिची जाहिरात करणे **( Marketing )**, तिच्या विक्रीची आणि विक्रीनंतरच्या सेवेची व्यवस्था करणे **(Sales & Service )** इत्यादी सगळी सार्वत्रिक मान्यता असलेली शास्त्रेच आहेत. त्यांचे यथायोग्य आचरण हे व्यवहारामधे लाभदायक होते.

तसेच त्यांच्या विपरीत आचरण हे व्यवहारामधे हानिकारकच होते. सर्वार्थाने नुकसान करणारे होते.

म्हणून आपण जे कार्य करायचे ठरवतो, त्याचे शास्त्र शिकावेच लागते आणि त्यानुसारच वागावे लागते.

शास्त्र ह्या शब्दाचा आध्यात्मिक अर्थ —

' ज्याच्यायोगे जन्ममृत्यूच्या चक्रामधून सुटका होईल आणि मृत्यू नंतर सद्गती प्राप्त होईल असा आचरणाचा मार्ग ' हा आहे.

त्यासाठी मार्ग अनेक आहेत हे आपण आतापर्यंत सविस्तरपणे जाणून घेतलेले आहे.
' यज्ञयाग, नामस्मरण, भजनपूजन, ज्ञानयोग, कर्मयोग, राजयोग, सगुणभक्तियोग, निर्गुणभक्तियोग, अनासक्तियोग ' हे ते मार्ग आहेत.
प्रत्येक मार्गाचे शास्त्र आहे. ते शास्त्र जाणून घेऊन त्यानुसार आचरण करीत राहिले, साधना करीत राहिले, तपश्चर्या करीत राहिले तर इच्छित ध्येयाप्रत पोहोचता येते.
येथे आपल्याला प्रामुख्याने आध्यात्मिक अर्थच विचारात घ्यायचा आहे.
मागील अध्यायाच्या शेवटच्या दोन श्लोकांमधे अध्यायाचे तात्पर्य सांगितले आहे.
'' शास्त्राचा अभ्यास करून, शास्त्र जाणून घेऊन, त्याचे मनन व चिंतन करून, त्यामधे सांगितलेल्या विधी म्हणजे **' काय आणि कसे करावे '** आणि निषेध म्हणजे **' काय आणि कसे करू नये '** ह्यांचे श्रद्धापूर्वक पालन करून कर्म करणारे असे जे लोक असतात, त्यांना ह्या लोकी सुख, शांती, समाधान प्राप्त होते आणि मृत्यूनंतर उत्तम गती प्राप्त होते.''
ह्याप्रकारे आचरण करणाऱ्यांचा एक वर्ग सांगितला आहे. हाच **दैवी संपदेने** युक्त असलेला वर्ग होय.
'' शास्त्राचा अभ्यास न करता, शास्त्र जाणून न घेता, त्याचे मनन व चिंतन न करता, त्यामधे सांगितलेल्या विधी आणि निषेध ह्यांची तमा न बाळगता, त्यांची अवहेलना करून, विविध कामनांच्या आहारी जाऊन मनाला वाटेल तसे वागणारे असे जे असतात, त्यांना ह्या लोकी सुख, शांती, समाधान प्राप्त होत नाही आणि मृत्यूनंतर अत्यंत हीन गती प्राप्त होते.''
ह्याप्रकारे आचरण करणाऱ्यांचा दुसरा वर्ग सांगितला आहे. हाच **आसुरी संपदेने** युक्त असलेला वर्ग होय.
ह्या व्यतिरिक्त माणसांचा आणखी एक तिसरा वर्ग असतो. ही माणसे श्रद्धाळू असतात. त्यांना शास्त्राच्या विषयी आदरभाव असतो. परंतु शास्त्राचा अभ्यास करणे, शास्त्र जाणून घेणे, त्याचे मनन व चिंतन करणे, ह्या गोष्टी करता येण्यासाठी जी बुद्धिमत्ता लागते, सतत प्रयत्न करीत राहण्याची प्रवृत्ती असावी लागते, ती त्यांच्याकडे नसते. त्यामुळे, श्रद्धा असूनही शास्त्राविषयीच्या अज्ञानामुळे, त्यांच्याकडून नेहमीच शास्त्रानुसार विधिवत् कर्म केले जाईलच असे सांगता येत नाही. तसेच इतरही अनेक कारणांमुळे त्यांची द्विधा मनस्थिती होते. त्यांना योग्य निर्णय करता येत नाही. त्यांच्यापैकी काही कारणे पुढीलप्रमाणे असतात.
१) मुळामधे शास्त्रांच्यामधेच एकवाक्यता दिसून येत नाही. अनेक शास्त्रे परस्पर विरोधी मतांचे प्रतिपादन करतांना दिसून येतात. इतर शास्त्रांची मते खोडून काढताना दिसून येतात. त्यामुळे सत्य काय आणि असत्य काय ह्याचा निर्णय घेताना गोंधळ होतो. योग्य मार्गदर्शन करणारा गुरू देखील भेटत नाही. त्यामुळे निश्चित असा निर्णय घेता येत नाही.
२) समजा शास्त्रामधे सांगितल्याप्रमाणे कर्म करायचे ठरवले तरीही, त्यासाठी लागणारी सामग्री, करावे लागणारे विधी आणि देश - काल - पात्र इत्यादींची अनुकूलता नेहमी जमून येईलच ह्याची खात्री देता येत नाही.
३) परमेश्वर हा निर्गुण आणि निराकार आहे हे मान्य असले तरीही, तो तसा असल्यामुळेच, त्याचे मनन, चिंतन, भजन, पूजन इत्यादी करता येत नाही. तशी शक्यता फारच कमी असते. जवळ जवळ नसतेच असे म्हटले तरी चालेल.
४) परमेश्वराची सगुण रूपे अगणित आहेत. ' आपल्याला जे जे दिसते ते सगळे परमेश्वराचेच रूप आहे ' हे मान्य असले तरी तेथेही गोंधळच होतो. कारण मग दिसणारी कोणतीही चांगली किंवा वाईट गोष्ट ही त्याचेच रूप होत असल्यामुळे, कोणत्या रूपावर श्रद्धा बाळगून साधना करायची?
५) मूर्तिपूजन करायला जावे तर परमेश्वराच्या मूर्तीही अनेक. त्यांचे पूजन करायचे मार्ग वेगवेगळे. विधी वेगवेगळे. देश - काल वेगवेगळे. मग कोणत्या मूर्तीची पूजा करायची? साधना व उपासना कशी करायची? ह्याचा निर्णय करता येत नाही.
ही सगळी कारणे खरी आहेत. नाकारता येण्यासारखी नाहीत. आता अशा वर्गातल्या माणसांनी जर —
' शास्त्र आणि त्यामधे सांगितलेले विधी ह्यांना बाजूला सारले; इतर ज्येष्ठ, श्रेष्ठ, आदरणीय अशा व्यक्तींच्यावर श्रद्धा ठेवून, त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्या आचरणाचे अनुकरण करायला सुरवात केली; तसेच स्वत:च्या इच्छेनुसार, जसे शक्य होईल तसे, जेथे शक्य होईल तेथे, मनन, चिंतन, भजन, पूजन इत्यादी करायला सुरवात केली आणि सदैव तसेच करीत राहिले, तर त्यांच्या श्रद्धेला काय म्हणायचे? त्यांना कोणती गती प्राप्त होते? '
येथे अर्जुनाला हाच प्रश्न पडलेला आहे.
त्याला त्या प्रश्नाचे उत्तर श्रीकृष्णाच्या कडून जाणून घ्यायचे आहे.
सतराव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे. तो श्रीकृष्णाला विचारतो आहे की —

**अर्जुन उवाच :**

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विता: ।**
**तेषाम् निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तम: ।। १ ।।**

हे कृष्णा ! श्रद्धेने युक्त असूनही शास्त्रातील विधी सोडून जे यजन करतात, त्यांची निष्ठा कोणती बरे समजावयाची? सात्त्विक, राजस की तामस?

ह्या अगोदर चौदाव्या अध्यायामधे, ' सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण मनुष्यास बंधनामधे अडकवतात. प्रत्येक माणसामधे हे तीनही गुण असतात. त्यांचाच प्रभाव असतो आणि तेच माणसावर वर्चस्व गाजवीत असतात. त्यांच्यापैकी जो गुण प्रबळ असेल त्यानुसार माणसाचे आचरण घडून येते. तीच त्या माणसाची ओळख असते,' असे सांगण्यात आलेले आहे.

त्यानंतर सोळाव्या अध्यायामधे ' सत्त्वगुण इतर दोघांच्यापेक्षा प्रबळ झाला तर त्याच्या प्रभावामुळे दैवी व्यक्तिमत्व निर्माण होते आणि तमोगुण इतर दोघांच्यापेक्षा प्रबळ झाला तर त्याच्या प्रभावामुळे आसुरी व्यक्तिमत्व निर्माण होते,' असे सांगण्यात आलेले आहे.

आता अर्जुनाच्या ह्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर द्यायला सुरवात होते आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनाम् सा स्वभावजा ।**

**सात्विकी राजसी चैव तामसी चेति ताम् श्रृणु ।। २ ।।**

**सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।**

**श्रद्धामयोऽयम् पुरुषः यो यच्छ्रद्धः स एव सः ।। ३ ।।**

प्राणिमात्रांची ही श्रद्धा स्वभावतः तीन प्रकारची असते. सात्त्विक, राजसी आणि तामसी. कशी ती ऐक. हे भारता ! सर्व लोकांची श्रद्धा ही त्यांच्या त्यांच्या सहज प्रकृतिस्वभावाप्रमाणे होत असते. मनुष्य हा श्रद्धामय आहे. ज्याची ज्या ठिकाणी श्रद्धा असते त्याप्रमाणे तो बनत असतो.

धर्मशास्त्रामधे श्रद्धेचे दोन मुख्य प्रकार सांगितलेले आहेत.

**स्वभावजा** — अनेक पूर्वजन्मांमधे केल्या गेलेल्या कर्मांच्या संस्कारांप्रमाणे नैसर्गिक आणि स्वाभाविक असणारी अशी जी श्रद्धा ती स्वभावजा श्रद्धा होय. ही पहिली, मूळची आणि अत्यंत दृढ अशी श्रद्धा असते.

**शास्त्रजा** — विविध शास्त्रांच्या अभ्यासाने, वाचनाने, पठणाने, मनन आणि चिंतन करण्याने जी श्रद्धा निर्माण होते ती शास्त्रजा श्रद्धा होय. ही स्वभावतः असलेल्या श्रद्धेवरच अवलंबून असते.

कारण शास्त्रांचा अभ्यास करण्याची इच्छा होणे हे देखील पूर्व जन्मांमधे केल्या गेलेल्या कर्मांच्या संस्काराचेच फळ असते.

म्हणून येथे स्वभावजा श्रद्धेचाच उल्लेख केलेला आहे.

खरे म्हणजे पुरुष हा गुणातीत आहे. त्याच्या बाबतीत गुणभेद असणे शक्यच नाही. कोणाला तशी कल्पनाही करता येणार नाही.

परंतु जेव्हा तो प्रकृतीमधे स्थिर होतो तेव्हा, प्रकृतीच्या सत्त्व - रज - तम ह्या तीनही गुणांनी बांधला जातो आणि त्याच्या ठिकाणी त्या गुणांचे प्रभाव दिसायला लागतात. ज्या गुणाचा प्रभाव सर्वात जास्त असतो त्यानुसार माणसाची श्रद्धा बनत असते. ती श्रद्धाच त्याचा स्वभाव असते. तीच त्याच्या मनाची प्रवृत्ती असते आणि तेच त्याचे स्वरूप असते.

दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही एकाच गुणाचा प्रभाव नेहमीच सर्वात जास्त असेल असे सांगता येत नाही कारण इतर दोन गुण हे प्रबळ व्हायचा प्रयत्न करीत असतात. कारणपरत्वे प्रबळ होऊ शकतात आणि तसे होतातही.

म्हणून माणसाची स्वाभाविक श्रद्धाही तीन प्रकारची असते असे सांगितले आहे.

कोणीही झाला तरी त्याची कशावरती तरी श्रद्धा असतेच. मनुष्य हा श्रद्धामयच असतो.

परंतु केवळ श्रद्धा आहे म्हणून मोक्षप्राप्ती होणे शक्य नाही. श्रद्धा कोणत्या प्रकारची आहे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

शुद्ध पाण्याला **' जीवन '** असे म्हणतात हे सत्य आहे.

पण तेच पाणी जर गुळाबरोबर गेले तर गोड होते. मिठाबरोबर गेले तर खारट होते. मातीत मिसळले तर दूषित होते आणि विषारी पदार्थात मिसळले तर विष होते. ही गोष्ट आपल्याला प्रत्यक्ष व्यवहारामधे अनेकदा अनुभवाला येते. त्याचप्रमाणे —

माणसाची श्रद्धा जर सत्त्वगुणाबरोबर असेल, तर ती **सात्त्विक** होते. तीच श्रद्धा जर रजोगुणाबरोबर असेल, तर **राजस** होते.

आणि जर ती तमोगुणाबरोबर असेल, तर **तामस** होते.

मग तिची लक्षणे बदलतात आणि परिणामही वेगवेगळे होतात.

**यजन्ते सात्विका देवान् यक्षरक्षांसि राजसाः ।**

**प्रेतान्भूतगणान्श्चान्ये यजन्ते तामसा जनाः ।। ४ ।।**

सत्त्वगुणप्रधान स्वभावाचे जे पुरुष, ते देवांचे यजन करतात. राजस पुरुष यक्ष-राक्षसांचे यजन करतात आणि तामस पुरुष प्रेते व भूतगणांचे यजन करतात.

**सात्त्विक श्रद्धा** असलेली माणसे देवदेवतांची पूजा करतात.

( येथे देवदेवता म्हणजे ‘ सूर्य, चंद्र, अग्नी, वायू, इंद्र, वरुण, यम, अश्विनीकुमार, विश्वेदेव ’ इत्यादी देवदेवता असा अर्थ आहे.)
अनेक विद्या शिकतात. ज्ञानप्राप्तीसाठी सतत प्रयत्न करतात. यज्ञविधींचा अभ्यास करून कोणता यज्ञ करायचा ते ठरवतात. सर्व विधी आणि निषेधांचे पालन करून यथासांग यज्ञ करतात. त्यायोगे स्वर्गप्राप्तीसाठी तसेच मोक्षप्राप्तीसाठी सतत प्रयत्न करीत राहतात.
ह्याचा दुसरा अर्थ असा होतो की, ‘ जी माणसे देवदेवतांची पूजा करतात, विविध प्रकारे ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करतात. यज्ञविधींचा अभ्यास करून, सर्व विधी आणि निषेधांचे पालन करून यथासांग यज्ञ करतात,’ ती **सात्त्विक** श्रद्धेने युक्त असतात.

**राजस श्रद्धा** असलेली माणसे यक्ष - राक्षसांची पूजा करतात.

( येथे यक्ष म्हणजे कुबेर इत्यादी आणि राक्षस म्हणजे राहू - केतू इत्यादी असा अर्थ आहे.)
ह्याचा दुसरा अर्थ असा होतो की, ‘ जी माणसे यक्ष - राक्षसांची आणि त्यांच्याच सारख्या योनींची पूजा करतात,’ ती **राजस** श्रद्धेने युक्त असतात.

**तामस श्रद्धा** असलेली माणसे ‘ भूत - प्रेत - पिशाच्च - हडळ - समंध - मुंजा ’ इत्यादींची पूजा करतात.
त्यांना प्रसन्न करण्यासाठी विविध प्राण्यांना मारून त्यांचा बळी देतात. सूर्यास्तानंतर स्मशानामधे जाऊन अनेक प्रकारचे अमंगल विधी करतात.
ह्याचा दुसरा अर्थ असा होतो की, ‘ जी माणसे भूत - प्रेत - पिशाच्च - हडळ - समंध - मुंजा आणि त्यांच्याच सारख्या अमंगल अशा योनींची पूजा करतात,’ ती **तामस** श्रद्धेने युक्त असतात.

श्रद्धेचे हे तीन प्रकार सांगितलेले आहेत आणि ते प्रत्येक माणसामधे असतात.
केवळ सात्त्विक श्रद्धा किंवा केवळ राजस श्रद्धा अथवा केवळ तामस श्रद्धा असणारा असा कोणीही नसतो.
एखाद्या माणसामधे ‘ कोणत्या प्रकारची श्रद्धा प्रबळ आहे, बलवान आहे, इतर दोन श्रद्धांना निष्प्रभ करणारी आहे,’ त्यावरून तो कोणत्या श्रद्धेने युक्त आहे ते ठरते.
म्हणूनच ‘ सात्त्विक श्रद्धेचे जतन करून, संवर्धन करून, तिला प्रबळ करून, इतर दोन्ही श्रद्धांना नामोहरम करणे, त्यांना महत्त्व न देता त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे.’ हा अंतिमत: मोक्षप्राप्तीचा मार्ग होऊ शकतो.
अर्थात, असा मार्ग अनुसरायची इच्छा होणे हे देखील पूर्व जन्मामधे केल्या गेलेल्या कर्माच्या संस्काराचेच फळ असते.
**स्वभावजा** श्रद्धेचेच फळ असते. ह्याविषयी मनामधे कोणताही संशय असण्याचे कारण नाही.
आता ह्या विधानांचा व्यावहारिक अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करूया. जशा आपल्या कामना, वासना, इच्छा, आकांक्षा असतात, त्यांना अनुसरून आपली श्रद्धा असते आणि त्यानुसार आपण योग्य त्या व्यक्तीचे पूजन करीत असतो.
ही गोष्ट प्रत्येक माणसाच्या बाबतीत सत्य आहे.

**सात्त्विक श्रद्धा असलेला माणूस कसा वागेल? त्याचे वागणे कसे असेल?**

तो नियमितपणे दररोज देवपूजा करील. धर्मशास्त्राचे ज्ञान मिळवायचा प्रयत्न करील. त्यासाठी नियमितपणे अध्ययन करील. आपल्यापेक्षा वयाने आणि अनुभवाने मोठ्या असलेल्या व्यक्तींच्याविषयी आदर बाळगील. त्यांना वंदन करील. एखाद्या ज्ञानवान आणि शुद्ध चारित्र्याच्या विभूतीला गुरू मानून त्याच्या शिकवणीप्रमाणे वागायला सुरवात करील.
गीतेचा अभ्यास करील. सदैव तिचेच वाचन, पठण, मनन, चिंतन करीत राहील.
स्वत:विषयी अहंकार बाळगणार नाही. मनाला आवरून आपल्या ताब्यात ठेवण्याचा सतत प्रयत्न करील. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर ह्या षड्रिपूंच्यापासून दूर राहील. आपले प्रत्येक कर्म, परमेश्वराचे पूजन समजून, निष्काम भावनेने करीत राहील.
नेहमी इतरांना मदत करील.

**राजस श्रद्धा असलेला माणूस कसा वागेल? त्याचे वागणे कसे असेल?**

तो अनेक कामनांच्या पाशांनी घट्ट बांधला गेलेला असल्यामुळे, त्या विविध इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून जे जे करावेसे वाटेल, जे जे करता येईल ते ते करीत राहील. त्याच्या डोक्यामधे दुसरा कोणताही विचार असणार नाही.
सत्य आणि असत्य, नैतिक आणि अनैतिक, योग्य आणि अयोग्य ह्यांचा कसलाही विचार करणार नाही.
पैसा, प्रतिष्ठा, मानमरातब, अधिकार इत्यादी गोष्टी त्याच्यासाठी श्वासोच्छ्वासाइतक्याच आवश्यक असतील. ह्या सर्व गोष्टी ज्याच्या मार्गदर्शनाने आणि मदतीने प्राप्त होण्याची शक्यता असेल त्याला गुरू मानून त्याच्या शिकवणीप्रमाणे वागायला सुरवात करील.
षड्रिपूंच्या आहारी गेल्यामुळे तो नेहमी चिंताग्रस्त असेल.
त्याला कधीही मन:शांती लाभणार नाही. समाधान मिळणार नाही.

**तामस श्रद्धा असलेला माणूस कसा वागेल? त्याचे वागणे कसे असेल?**

त्याची वृत्ती विघातक असेल. 'मला जे हवे असेल ते मिळाले पाहिजे.' ही कामना असतेच. त्याशिवाय ' इतरांना ते कधीही मिळता कामा नये,' अशी इच्छाही असते. ह्या वृत्तीचा अमर्याद विस्तार झाला म्हणजे काय होते ते ही ऐका.

दुसऱ्याचे चांगले झालेले पाहवत नाही. त्याच्या विषयी कमालीचा मत्सर आणि द्वेष वाटायला लागतो.

जळफळाट होतो. स्वत:चे मन:स्वास्थ्य नाहीसे होते.

' मला काहीही मिळाले नाही तरी चालेल पण तो रस्त्यावर आला पाहिजे. त्याचे वाटोळे झालेच पाहिजे! तो आयुष्यातून उठलाच पाहिजे! मी बरबाद झालो तरी चालेल पण त्याला भिकेला लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही! त्याला चांगला धडा शिकवीन!' असले हीन संकल्प केले जातात.

त्यानंतर हे असले संकल्प पूर्ण करण्यासाठी अनीतिमान, दुष्ट, पापी व गुंडगिरी करणाऱ्या माणसांचे सहाय्य घेतले जाते.

त्यांच्या इच्छेनुसार वागायला सुरवात होते. असा माणूस पाप वासनांच्या आहारी जाऊन सदैव पापकर्मेच करीत राहील.

**अशास्त्रविहितङ् घोरम् तप्यन्ते ये तपो जनाः ।**

**दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ।। ५ ।।**

**कर्शयन्तः शरीरस्थम् भूतग्राममचेतसः ।**

**माम् चैवान्तःशरीरस्थम् तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ।। ६ ।।**

परंतू जे लोक दंभ व अहंकार यांनी युक्त होऊन, काम आणि आसक्ति यांच्या जोरावर, शास्त्राविरुद्ध घोर तप करतात आणि शरीरातील पंचमहाभूतादिकांच्या समुदायासच नव्हे तर शरिरांतर्गत असणाऱ्या मलाही कष्टवितात ते अविवेकी आसुर बुद्धीचे असे समज.

मागील अध्यायामधे आसुर संपदेचे सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे.

परंतु वरील दोन श्लोकांमधे जी आसुर बुद्धी सांगितलेली आहे ती थोडी निराळी आहे.

समाजामधील सर्वसामान्य माणसांच्यामधे अंधश्रद्धा पसरवून त्यांना फसवणाऱ्या —

**' मांत्रिक - तांत्रिक - जारण मारण क्रिया करणारे - काळी जादू करणारे - करणी करणारे '** इत्यादी मंडळींची वृत्ती आणि त्यांचे वर्तन ह्यांचा येथे संबंध आहे असे मला वाटते.

तसे पाहिले तर त्यांच्या बाबतीतही कामना, राग, लोभ, आसक्ती, अहंकार, मत्सर इत्यादी गोष्टी तशाच असतात.

' मी बोलतो तेच सत्य, मी करतो तेच बरोबर, माझे आचरण हेच सदाचरण आणि माझे विचार हेच सद्‌विचार,' ह्या प्रकारे स्वत:विषयी कमालीचा अहंगंड असतोच. अशी माणसे शास्त्राविषयी अनादर बाळगून शास्त्राच्या आज्ञांचा अवमान करतात. शास्त्राचे पालन करणाऱ्यांची चेष्टा करतात. अभ्यास न करता सतत शंका कुशंका काढत राहतात. ज्ञानी माणसांचा अपमान करतात.

पंडितांचा उपहास करतात. नेहमी त्यांचे बरोबर वितंडवाद घालत राहतात.

प्रत्यक्ष व्यवहारामधे स्वत: नेहमी शास्त्रबाह्य आचरण करतात. ज्यांना पाशवी म्हणता येतील अशी कर्मे करतात आणि इतरांच्याकडूनही करवून घेतात. इतरांना फसविण्यासाठी आणि आपले महत्त्व वाढवण्यासाठी नाना प्रकारचे सोंग, ढोंग आणि नाटक करतात.

स्वत:ला सिद्धी प्राप्त झालेली आहे असा दावा करतात. इतरांना सहसा करता येणार नाहीत अशी कृत्ये म्हणजे —

' वेळी अवेळी स्मशानासारख्या अपवित्र ठिकाणी जाऊन, निरनिराळे जारण - मारण विधी करणे, पशू - पक्षांचा बळी देणे, अभक्ष्य भक्षण करणे, अपेय पान करणे, इतरांना सतत खोटी भीती दाखवणे,' इत्यादी कर्मे करतात.

तसे करीत असताना इतरांना आणि अगदी स्वत:लाही शारिरीक त्रास होईल अशा गोष्टीही सतत करीत राहतात.

ह्या सगळ्या कृत्यांच्या योगे ते आपल्या शरीरातील महाभूतांच्या समुदायाला आणि परमेश्वराचा अंश असलेल्या जीवरूपी आत्म्याला क्लेश देत असतात. ताप देत असतात. यातना देत असतात. म्हणून त्यांना आसुर बुद्धीचे लोक असे म्हटले आहे.

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।**

**यज्ञस्तपस्तथा दानम् तेषाम् भेदमिमम् श्रृणु ।। ७ ।।**

आता प्रत्येकाला आवडणाऱ्या आहाराचेही तीन प्रकार होतात. तोच प्रकार यज्ञ, तप व दान यांचाही होतो. त्यांचा हा भेद सांगतो तो ऐक.

सर्वसाधारणपणे ' शरीराच्या निर्वाहासाठी काहीतरी खाणे अथवा पिणे.' ह्याला आपण आहार समजतो.

परंतु **आहार** ह्या शब्दाचा अर्थ इतका मर्यादित नाही. आहार म्हणजे **आत घेणे.** शरीरात घेणे. शरीराच्या स्वास्थ्यासाठी स्वीकारणे.

**' जिच्या योगाने पोषण होईल अशी गोष्ट शरीरामधे घेणे.'**

ही क्रिया आपण अनेक मार्गांनी, अनेक प्रकारे सतत करीत असतो पण आपल्याला त्याची जाणीवही नसते.

१) आपण तोंडाने अन्न खातो. पाणी पितो.
ह्या पहिल्या प्रकारच्या आहाराने आपल्या संपूर्ण शरीराचे पोषण होत असते.
२) आपण नाकाने श्वास घेतो. तसेच वेगवेगळे गंध घेत असतो.
३) आपण डोळ्यांनी अनेकविध वस्तुमात्रांचे दर्शन घेत असतो.
४) आपण कानांनी अनेकविध नाद ऐकत असतो. आवाज ऐकत असतो.
५) आपण त्वचेने अनेकविध गोष्टींना स्पर्श करीत असतो.
६) आपण जिभेने अनेकविध पदार्थांची चव घेत असतो.
ह्या पाचही प्रकारच्या आहाराने आपल्या ज्ञानेंद्रियांचे पोषण होत असते.
७) आपण जिभेने जे मनामधे असेल ते बोलत असतो.
८) आपण हातांनी कोणतेतरी काम करीत असतो.
९) आपण पायांनी चालण्याचे काम करीत असतो.
ह्या तीनही क्रिया करीत असताना आपण काहीही **आत घेत** नाही.
तरीही एका अर्थी तो आहारच आहे. त्या त्या कर्मेंद्रियाचा आहार आहे.
जर बोलणे बंद केले तर आपली जिव्हा निष्क्रीय होईल. काम करणे बंद केले तर आपले हात निष्क्रीय होतील.
चालणे बंद केले तर आपले पाय निष्क्रीय होतील.
आपल्या ज्ञानेंद्रियांना आणि कर्मेंद्रियांना त्यांचा आहार मिळाला नाही तर ती कार्यक्षम राहणार नाहीत.
दुसरी गोष्ट म्हणजे, ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये ह्यांनी काय करावे आणि काय करू नये हे आपले मनच ठरवीत असते. त्यांचे सतत नियंत्रण करीत असते. त्यामुळे आपल्या मनाचे पोषण हे ज्ञानेंद्रियांच्या आणि कर्मेंद्रियांच्या यथायोग्य पोषणामुळेच होत असते. असो.
एखाद्या माणसाला काय आवडेल आणि काय आवडणार नाही ही गोष्ट पूर्णपणे व्यक्तिसापेक्ष असते.
माणूस ज्या श्रद्धेचा असेल त्या श्रद्धेला पूरक असणाऱ्या गोष्टी त्याचा आहार होतात. त्याव्यतिरिक्त असलेल्या इतर सर्व गोष्टी त्याच्यासाठी त्याज्य ठरतात. अशा प्रकारे आपण घेत असलेल्या आहारची आवड नावड ही श्रद्धेनुसार बदलत असते.
पुढील तीन श्लोकांमधे त्याविषयीच सांगितलेले आहे.

**आयु:सत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना: ।**
**रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया: ।। ८ ।।**

सात्त्विक पुरुषास आवडणारे आहार हे आयुष्य, सात्त्विक वृत्ती, बल, आरोग्य, सुख आणि प्रिती ही वाढविणारे, रसयुक्त, स्निग्ध, शरीरात मुरून चिरकाल राहणारे आणि मनाला आनंददायक असतात.

**<u>सात्त्विक माणसाचा आहार कसा असतो ते पहा.</u>**

**आयु:** — जीवन. आयुष्य. **सत्व:** — सूक्ष्मदर्शी, तीक्ष्ण आणि निर्मळ अशी बुद्धी.
**बल:** — सत्कार्य करण्यास प्रेरणा देणारी आणि त्यामधे यश देणारी मानसिक आणि शारिरीक शक्ती.
**आरोग्य:** — शारिरीक आणि मानसिक आरोग्य.
**सुख:** — मनामधे प्रसन्नता असणे. समाधान असणे. संतोष असणे आणि ते चेहऱ्यावर प्रकट होणे.
**प्रीति:** — प्रेमभाव असणे. प्रेमळ स्वभाव असणे आणि तो आचरणामधे दिसणे. **विवर्धना:** — वाढ करणारा.
**रस्या:** — रसाळ. गोड. मधुर रसाने भरलेला असा पदार्थ.
**स्निग्धा:** — स्निग्ध पदार्थ. दुधासारख्या सात्त्विक पदार्थांच्यापासून निर्माण झालेले साय, लोणी, तूप इत्यादी पदार्थ.
**स्थिरा:** — ज्याचे सत्त्व शरिरामधे दीर्घकाळ टिकून राहते आणि ऊर्जा निर्माण करते असा पदार्थ
**हृद्या:** — पाहताक्षणी आनंद होईल आणि खायची इच्छा होईल असा पदार्थ.
ह्या शिवाय सात्त्विक माणूस आपल्या डोळ्यांनी चांगले पाहण्याची इच्छा धरील, कानांनी चांगले ऐकण्याची इच्छा धरील, नाकाने सुगंध अनुभवण्याची इच्छा धरील, जिभेने चांगल्या चवीचा अनुभव घेण्याची इच्छा धरील, त्वचेने चांगले स्पर्श अनुभवण्याची इच्छा धरील. त्याच्या मनामधे नेहमी तसेच विचार येत राहतील. कधीही वाईट विचार येणार नाहीत.

**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिन: ।**
**आहारा राजसस्येष्टा: दु:खशोकामयप्रदा: ।। ९ ।।**

राजस पुरुषाला आवडणारे आहार हे तिखट, आंबट, खारट, अति उष्ण, रुक्ष, झणझणीत, दाहकारक असे आणि दु:ख, शोक व रोग

उत्पन्न करणारे असतात.

**राजस माणसाचा आहार कसा असतो ते पहा.**

**दु:खः** — दु:ख देणारा. **शोकः** — चिंता उत्पन्न करणारा. **आमयप्रदाः** — विविध रोग उत्पन्न करणारे.

**कटु** — कडू. **अम्ल** — आंबट. **लवण** — खारट. **अत्युष्ण** — अतिशय गरम. **तीक्ष्ण** — तिखट.

**रूक्ष** — कोरडे. सत्वहीन. **विदाहिनः** — जळजळीत. दाह करणारे.

ह्याशिवाय राजस माणूस हा त्याच्या अनेक इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून, —

त्यासाठी जे जे करावेसे वाटेल, पहावेसे वाटेल, ऐकावेसे वाटेल, समजून घ्यावेसे वाटेल, चव घ्यावीशी वाटेल, गंध आणि स्पर्श अनुभवावा असे वाटेल, ते ते करीत राहील.

' ह्या सगळ्या गोष्टी आपल्याला कशा प्राप्त होतील?' ह्याच्या व्यतिरिक्त त्याच्या मनामधे दुसरा कोणताही विचार असणार नाही.

**यातयामङ् गतरसम् पूति पर्युषितञ् च यत् ।**

**उच्छिष्टमपि चामेध्यम् भोजनम् तामसप्रियम् ।। १० ।।**

तामस पुरुषास आवडणारे आहार हे वेळ होऊन गेलेले, निवालेले, नीरस, दुर्गंधियुक्त, शिळे झालेले, उष्टे आणि अपवित्र असतात.

**तामस माणसाचा आहार कसा असतो ते पहा.**

**यातयामम्** — अर्घपक्व. अर्धवट शिजलेले. अर्धकच्चे. **गतरसम्** — रसरहित. गोडी नसलेले.

**पूति** — दुर्गंधियुक्त. आंबलेले. **पर्युषितम्** — शिळे झालेले.

**उच्छिष्टम्** — उष्टे. खरकटे. अर्धवट खाऊन टाकलेले. **अमेध्यम्** — अपवित्र.

ह्याशिवाय तामस माणसाला ' अनैतिक संबंध, कट - कारस्थाने, चोरी, लूटमार, बलात्कार, दरोडे, खून, पळवापळवी, विध्वंसक दृष्ये,' इत्यादी पहायला आवडेल. त्याविषयीच ऐकायला, त्याचीच चर्चा करायला आणि स्वत: तसे करून बघायला आवडेल.

त्यासाठी योजना आखणे आणि योग्य संधीची वाट पाहणे आवडेल.

त्याच्या डोक्यामधे सतत तेच विचार येत राहतील. दुसरा विचार असणार नाही.

हे सगळे सविस्तर सांगण्या मागील हेतू काय असेल? आहारामधे बदल केला तर माणसाची श्रद्धा बदलू शकेल का?

एखाद्या तामसी स्वभावाच्या माणसाला सात्त्विक आहार घ्यायला लावला तर त्याचा स्वभाव बदलून कालांतराने तो सात्त्विक स्वभावाचा होईल का? **नाही.**

केवळ आहारामुळे माणसाचा स्वभाव बदलणे शक्य नाही. किंबहुना कोणताही माणूस त्याच्या आहारातला बदल कधीही स्वीकारणार नाही. समजा, कुणीतरी समजावल्यामुळे अथवा सक्ती केल्यामुळे बदल करावा लागला, तरीही तो बदल मान्य करणार नाही.

एखाद्या आजारी माणसाची तपासणी करताना, डॉक्टर त्याला काय काय होते आहे ते विचारतात. त्याची शारिरीक तपासणी करून सगळी लक्षणे समजून घेतात आणि त्यानंतर उपचार करतात. तसे केल्यावर उपचार करणे सोपे आणि परिणामकारक होते.

आजारी माणूस बरा व्हायची शक्यता वाढते.

येथेही तीन प्रकारच्या स्वभावांची आहाररूपी लक्षणे सांगितलेली आहेत.

ह्या लक्षणांच्या सहाय्याने माणसाला तो कोणत्या स्वभावाचा आहे ते समजू शकेल. एकदा ते समजले की मग, इच्छा असल्यास, राजस आणि तामस गुणांचा प्रभाव कमी करून, सात्त्विक गुणांमधे वाढ करण्याचा प्रयत्न करता येईल. आपली वृत्ती बदलता येईल. तशी बदललेली वृत्ती त्याच्या आहारामधे आपोआप बदल घडवून आणील. त्यासाठी वेगळे प्रयास करावे लागणार नाहीत.

किंबहुना अशा प्रकारे आहारामधे सहजपणे झालेला बदल हा त्याचा स्वभाव बदलल्याचा, वृत्ती बदलल्याचा पुरावाच असू शकेल.

वरील तीन श्लोकांमधे भगवान आपल्याला, प्रयत्नपूर्वक सात्विक वृत्तीत राहण्याचा सल्ला देत आहेत असे मला वाटते. यापुढील नऊ श्लोकांमधेही ' यज्ञ - तप - दान ' इत्यादी क्रियादेखील, माणसाच्या स्वभावानुसार तीन प्रकारे केल्या जातात असे सांगितलेले आहे.

**अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञः विधिदृष्टो य इज्यते ।**

**यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ।। ११ ।।**

फलाची आकांक्षा न ठेवता, यज्ञ करणे हे आपले कर्तव्य समजून, शास्त्रविधीप्रमाणे शांत चित्ताने यज्ञ करतात तो सात्त्विक होय.

येथे यज्ञ म्हणजे केवळ **' होमकुंडामधे मंत्रोच्चारासह आहुत्या देण्याचे कर्म '** असा अर्थ नसून,

**' आपण करीत असलेले प्रत्येक कर्म '** असा अर्थ आहे.

आपण सर्वांनी ही गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

**अफलाकाङ्क्षिभिः** — कोणत्याही फळाची इच्छा न करता.

**यः विधिदृष्टः यज्ञः** — जो शास्त्रविधीने नेमून दिलेला, मान्य केलेला असा यज्ञ.

**यष्टव्यम् एव** — कर्तव्य समजून. **य इज्यते** — केला जातो.

कर्म कोणतेही असले तरी ते निष्काम भावनेने करणे महत्त्वाचे आहे. तसे घडले तरच ते **सात्त्विक कर्म** होते.

**अभिसन्धाय तु फलम् दम्भार्थमपि चैव यत् ।**
**इज्यते भरतश्रेष्ठ तम् यज्ञम् विद्धि राजसम् ॥ १२ ॥**

हे भरतश्रेष्ठा ! फलाची इच्छा ठेवून किंवा आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन करण्यासाठी जो यज्ञ करतात तो यज्ञ राजस असे समज.

**दम्भार्थम्** — केवळ दांभिक आचरणासाठी. इतरांना दाखवण्यासाठी. मिरवण्यासाठी.

**फलम् अपि अभिसन्धाय** — फळ दृष्टीपुढे ठेवून. फळाची अपेक्षा बाळगून.

इतरांच्यापुढे चमकण्याच्या हेतूने, आपला मोठेपणा मिरवण्याच्या हेतूने, फळाची अपेक्षा बाळगून केलेले कोणतेही कर्म हे **राजस कर्म** होते.

**विधिहीनमसृष्टान्नम् मंत्रहीनमदक्षिणम् ।**
**श्रद्धाविरहितम् यज्ञम् तामसम् परिचक्षते ॥ १३ ॥**

शास्त्रविधी सोडून, अन्नसंतर्पणाशिवाय, मंत्रांवाचून, दक्षिणा न देता आणि श्रद्धा नसतांना केलेला जो यज्ञ त्याला तामस असे म्हणतात.

**विधिहीनम्** — शास्त्रविधींना वगळून. **मंत्रहीनम्** — योग्य मंत्रांचा उच्चार न करता.

**असृष्टान्नम्** — अन्नदान न करता. **अदक्षिणम्** — दक्षिणा न देता.

**श्रद्धाविरहितम्** — जराही श्रद्धा न बाळगता. श्रद्धेचा अभाव असताना.

ह्याविषयी काहीही बोलायची आवश्यकताच नाही. अशा प्रकारे केलेले कोणतेही कर्म हे **तामस कर्म** होते.

यज्ञाचे हे तीन प्रकार सांगून झाले. यापुढे तपाचे तीन मूलभूत प्रकार सांगितलेले आहेत.

शरीराने, वाचेने आणि मनाने केले जाणारे तप हे वेगवेगळ्या प्रकारचे असते.

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनम् शौचमार्जवम् ।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरन् तप उच्यते ॥ १४ ॥**
**अनुद्वेगकरम् वाक्यम् सत्यम् प्रियहितञ् च यत् ।**
**स्वाध्यायाभ्यासनञ् चैव वाङ्मयन् तप उच्यते ॥ १५ ॥**
**मनःप्रसादः सौम्यत्वम् मौनमात्मविनिग्रहः ।**
**भावसंशुद्धिरित्येतत् तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥**

देव, ब्राह्मण, गुरू व विद्वान यांचे पूजन, शुचिर्भूतपणा, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा यांना कायिक तप म्हणतात.

मनाला उद्वेग न देणारे, सत्य, प्रिय व हितकारक असे जे भाषण आणि वेदशास्त्रांचे अध्ययन यांना वाचिक तप म्हणतात.

मन प्रसन्न ठेवणे, सौम्यता, मुनीप्रमाणे चिंतन करण्याचा स्वभाव, मनोनिग्रह आणि शुद्ध भावना यांना मानस तप म्हणतात.

तपाचे हे जे **कायिक तप**, **वाचिक तप** आणि **मानस तप** असे तीन प्रकार सांगितले आहेत, ते आचरणात आणत असताना त्यामधेही माणसाच्या स्वभावाप्रमाणे बदल होत असतो. त्यानुसार ह्या तीनही प्रकारच्या तपाचेही तीन प्रकार होतात.

त्याचाच उल्लेख पुढील तीन श्लोकांमधे केलेला आहे.

**श्रद्धया परया तप्तम् तपस्तत्त्रिविधम् नरैः ।**
**अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्विकम् परिचक्षते ॥ १७ ॥**

हे तीन प्रकारचे तप फलाची आकांक्षा न ठेवता, उत्कृष्ट श्रद्धेने व योगयुक्त बुद्धीने केले म्हणजे त्यास सात्त्विक म्हणतात.

**श्रद्धया परया तप्तम्** — परम श्रद्धेने केले गेलेले. **अफलाकाङ्क्षिभिः** — कोणत्याही फळाची इच्छा न करता.

**तपः त्रिविधम्** — कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीन प्रकारचे तप.

अशा प्रकारे केले जाणारे तप हे सात्त्विक तप असते. त्यांचा कर्ता हा **सात्त्विक स्वभावाचा** असतो.

**सत्कारमानपूजार्थम् तपो दम्भेन चैव यत् ।**
**क्रियते तदिह प्रोक्तम् राजसम् चलमध्रुवम् ॥ १८ ॥**

आपला सत्कार, मानसन्मान किंवा पूजा व्हावी म्हणून अथवा दंभाने जे तप करतात तेव्हा त्या चल व अस्थिर अशा तपास राजस म्हणतात.

**सत्कार मान पूजार्थम्** — तपाची प्रसिद्धी केल्यामुळे आपल्याविषयी समाजामधे, ' आपण फार मोठा आणि श्रेष्ठ असा तपस्वी असल्याचा ' प्रचार आणि प्रसार होतो. आपण कोठेही गेल्यावर इतर लोक उठून उभे राहतात, स्वागत करतात. नमस्कार करतात, आदर - सन्मान करतात. आपले पाय धुतात, ओवाळतात. आपल्या आज्ञेचे पालन करतात. ह्या सर्व गोष्टींचा लाभ व्हावा आणि त्यायोगे प्रतिष्ठा मिळावी अशा हेतूने.

**दम्भेन** — दांभिकपणाने, ढोंगीपणाने, नाटक करणे. **तत् अध्रुवम् चलम्** — ते अनिश्चित आणि थोड्या काळासाठी फळ देणारे.

अशा प्रकारे केले जाणारे तप हे राजस तप असते. त्यांचा कर्ता हा **राजसी स्वभावाचा** असतो.

**मूढग्राहेणात्मनः यत्पीड्या क्रियते तपः ।**
**परस्योत्सादनार्थम् वा तत्तामसमुदाहृतम् ।। १९ ।।**

वेड्या आग्रहाने स्वत:लाच पीडा देणारे किंवा लोकांना नाडण्यासाठी जे तप करतात त्याला तामस म्हणतात.

**मूढग्राहेण** — मूर्खपणाच्या हट्टाग्रहाने. **आत्मनः पीडया** — आपल्या मन, वाणी आणि शरीर ह्यांना पीडा देऊन.

**परस्य उत्सादनार्थम्** — दुसऱ्याचे वाईट करण्यासाठी.

अशा प्रकारे केले जाणारे तप हे तामस तप असते. त्यांचा कर्ता हा **तामसी स्वभावाचा** असतो.

**दातव्यमिति यद्दानम् दीयतेऽनुपकारिणे ।**
**देशे काले च पात्रे च तद्दानम् सात्विकम् स्मृतम् ।। २० ।।**

दान करणे हे कर्तव्य आहे अशा बुद्धीने, योग्य स्थल, काल, पात्र ह्यांचा विचार करून, आपल्यावर उपकार न करणाऱ्यास जे दान देतात, ते सात्विक म्हटले आहे.

**दातव्यम्** — दान देणे हे कर्तव्यच आहे असे समजून,

**देशे** — ज्या ठिकाणी मदतीची गरज असेल त्या ठिकाणाचा विचार करणे म्हणजे **देशाचा विचार करणे** होय.

**काले** — ज्या वेळी मदतीची गरज असेल त्या वेळेचा विचार करणे म्हणजे **कालाचा विचार करणे** होय.

**पात्रे** — ज्याला ज्या वस्तूची गरज असेल तिचा विचार करून, योग्य व्यक्तीला योग्य वस्तूची मदत करणे म्हणजे **पात्रतेचा विचार करणे** होय.

**अनुपकारिणे दीयते** — मागील उपकारांची परतफेड करण्याचा हेतू न ठेवता, गरज असलेल्या सर्वांना निरपेक्षपणे मदत करणे.

अशाप्रकारे केलेल्या दानाला **सात्त्विक दान** असे म्हटलेले आहे.

एकूण समाजाचा निर्वाह योग्य प्रकारे होत रहावा ह्या हेतूनेच धर्मशास्त्राची —
' स्वकष्टाने मिळवलेल्या धनाचा दहावा भाग दान करावा.' अशी आज्ञाच आहे. जर ह्या आज्ञेचे यथायोग्य पालन केले गेले तर —
' योग्यता असलेल्या, पात्रता असलेल्या अनेक गरजवंत माणसांचे प्रश्न सुटायला' मोलाची मदत होऊ शकेल.

**यत्तु प्रत्युपकारार्थम् फलमुद्दिश्य वा पुनः ।**
**दीयते च परिक्लिष्टम् तद्दानम् राजसम् स्मृतम् ।। २१ ।।**

केलेल्या उपकारांचा मोबदला म्हणून किंवा पुढे काही फलाची आशा ठेवून संकटाने जे दान देतात, ते राजस म्हटले आहे.

**प्रत्युपकारार्थम्** — मोबदला देण्यासाठी अथवा घेण्यासाठी म्हणून,

**फलम् उद्दिश्य** — मान, प्रशंसा, प्रतिष्ठा, रोगपरिहार अथवा स्वर्गप्राप्ती व्हावी अशा कोणत्यातरी हेतूने,

**परिक्लिष्टम्** — सक्तीमुळे, भीतीमुळे, हट्टामुळे अथवा दबाव टाकला गेल्यामुळे, नाइलाज झाल्यामुळे मनाविरुद्ध केलेले,

अशाप्रकारे केलेल्या दानाला **राजस दान** असे म्हटलेले आहे.

**अदेशकाले यद्दानम् अपात्रेभ्यश्च दीयते ।**
**असत्कृतमवज्ञातम् तत्तामसमुदाहृतम् ।। २२ ।।**

अयोग्य ठिकाणी, अकाली किंवा अपात्री, सत्काररहित अगर अवहेलनापूर्वक जे दान देतात, ते तामस म्हटले आहे.

**अदेशे** — ज्या ठिकाणी मदतीची गरज नाही अशा अयोग्य ठिकाणी,

**अकाले** — ज्या वेळी मदतीची गरज नसेल अशा अयोग्य वेळी,

**अपात्रे** — कोणाला कशाची गरज आहे ह्याचा विचार न करता, दानासाठी अयोग्य माणसाची निवड करणे.

**असत्कृतम्** — अभिवादन करून, यथायोग्य संभाषण करून, सन्मानित न करता,

**अवज्ञातम्** — उपकार करीत असल्याचा आवेश आणून, कुचेष्टा करून, अपशब्द बोलून, अपमानित करून,
अशाप्रकारे केलेल्या दानाला **तामस दान** असे म्हटलेले आहे.
येथपर्यंत श्रद्धा, आहार, यज्ञ, तप आणि दान ह्यांचे, प्रत्येकी तीन प्रकार सांगून झाले.
आता ह्यापुढील पाच श्लोकांमधे शब्दब्रह्म आणि नादब्रह्म मानल्या गेलेल्या प्रणवाचे म्हणजेच ओंकाराचे माहात्म्य सांगण्यात आलेले आहे. असे म्हणतात की ' विश्वनिर्माण करण्याच्या कार्याला मान्यता देऊन **( Approval ),** परमेश्वराने कार्याज्ञापत्रावर
**( Work Order )** स्वाक्षरी केली. **( Signature ) '.** परमात्म्याची ती स्वाक्षरी म्हणजे **ॐ** हे चिन्ह आहे.
**' ओंकाराचे स्मरण करणे, चिंतन करणे, उच्चार करणे, जप करणे,'** मला मनापासून आवडते.
फार फार आवडते. अतिशय आवडते. त्यायोगे संपूर्ण शरीरामधे अनामिक लहरी यायला लागतात. मन प्रसन्न होते आणि त्याची शुद्धी व्हायला सुरवात होते. ही अतिशयोक्ती नाही. हे सत्य आहे. त्रिवार सत्य आहे.
नियमितपणे साधना केली तर कोणालाही त्याचा अनुभव घेता येऊ शकेल.
दुसऱ्या कोणत्याही मंत्राची दीक्षा घ्यावी लागते. ती गुरुमुखातूनच घ्यावी लागते. गुरूच्याकडून उच्चारण शिकावे लागते आणि त्याचा सराव करावा लागतो. परंतु ओंकार हा एकाक्षर मंत्र आहे आणि तो स्वयंसिद्ध मंत्र आहे. तो स्वत:च गुरू आहे.
त्याची गुरुमुखातून दीक्षा घ्यावी लागत नाही. उच्चार करणाऱ्याचा तो स्वत:च गुरू होतो.
विशेष गोष्ट म्हणजे, ओंकाराचा उच्चार बेसुरपणे करताच येत नाही. किंबहुना बेसुरपणे उच्चार केला तर तो ओंकार होत नाही.
दुसरेच काहीतरी होते. एखाद्याने तसा प्रयत्न केलाच तर उच्चारण करण्याच्या ओघात आपोआप योग्य स्वरावरच यायला होते.
हे त्याचे अंगभूत सामर्थ्य म्हणावे लागेल. ओंकाराविषयी अधिक सविस्तर माहिती पुढील चर्चेमधे येणार आहेच. असो.
काही काही गोष्टी अशा असतात की त्यांचा आपोआप नाद लागतो. त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत.
**ॐ** चा म्हणजेच ओंकाराचा उच्चार हा त्यापैकी एक आहे.
**' श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र '** हे देखील तसेच आहे. एकदा म्हणायला सुरवात केली की सारखे म्हणतच रहावे असे वाटते.
त्यातही जर म्हणणारा गोड आवाजामधे, सुरेलपणे म्हणत असेल तर ऐकणाराही तल्लीन होतो. समरस होतो. रंगून जातो.
दासबोधामधला **' नवविधाभक्ती '** चा चवथा दशक देखील तसाच आहे. कितीही वेळा वाचला तरी समाधान होत नाही.
परत परत वाचावे असेच वाटते. माझ्या संग्रही **श्री. मोहनबुवा रामदासी** ह्यांनी गायलेला तो दशक आहे.
फारच छान आहे. सारखे ऐकत रहावे असेच वाटते.
**श्री मनाचे श्लोक** ही तसेच आहेत. अप्रतीम रचना आहे. सारखे वाचावेत आणि म्हणावेत असेच वाटत राहते.
मनाच्या श्लोकांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. त्यांना कोणत्याही रागामधे चाल लावता येते आणि म्हणताना विलक्षण आनंद होतो.
आपल्याला दैवी स्पर्श झाल्यासारखे वाटते. **( Divine Touch.)**
मी हे सगळे आपल्याला सांगतो आहे त्या मागे कारण आहे.
आपल्यापैकी ज्यांना असा अनुभव घ्यायची इच्छा असेल त्यांनी दररोज नियमितपणे ओंकाराचा जप करायला सुरवात करा.
आपल्यालाही तसाच अनुभव येईल ह्याविषयी तिळमात्र संशय नाही. आपण प्रयत्न करून पहावा हीच माझी विनंती आहे. असो.

**ॐतत्सदिति निर्देश: ब्रह्मणस्त्रिविध: स्मृत: ।**
**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिता: पुरा ।। २३ ।।**
**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतप:क्रिया: ।**
**प्रवर्तन्ते विधानोक्ता: सततम् ब्रह्मवादिनाम् ।। २४ ।।**
**तदित्यनभिसन्धाय फलम् यज्ञतप:क्रिया: ।**
**दानक्रियाश्च विविधा: क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभि: ।। २५ ।।**
**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्द: पार्थ युज्यते ।। २६ ।।**
**यज्ञे तपसि दाने च स्थिति: सदिति चोच्यते ।**
**कर्म चैव तदर्थीयम् सदित्येवाभिधीयते ।। २७ ।।**

परब्रह्माचा - ॐ तत्सत् - अशा तीन प्रकारे शास्त्रांत निर्देश केला जातो. ह्याच निर्देशाने पूर्वी ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केलेले आहेत. म्हणून, ब्रह्मवादी लोकांची यज्ञ, दान, तप आणि इतर शास्त्रोक्त कर्मे नेहमी ॐ असा उच्चार करून प्रवृत्त होत असतात.

तत् ह्या शब्दाने, फलाची आशा न ठेवता, यज्ञ, तप, दान वगैरे अनेक प्रकारच्या क्रिया मोक्षार्थी लोक करीत असतात.
हे पार्था ! अस्तित्व आणि साधुत्व म्हणजे चांगलेपणा ह्या अर्थी सत् हा शब्द योजला जातो. तसेच चांगल्या कर्मासही सत् हा शब्द लावण्यात येतो. यज्ञ, तप आणि दान ह्यांच्या ठिकाणी स्थिर भावना असणे ह्याला सत् असे म्हणतात व त्यासाठी जे कर्म करावयाचे त्या कर्मालाही सत् हेच नांव आहे.
ज्या परब्रह्म परमात्म्या परमेश्वरापासून **कर्ता** म्हणजे कर्म करणारा, **कर्म** म्हणजे म्हणजे कृती आणि **विधी** म्हणजे कृतीची योग्य पद्धत निर्माण झालेली आहे, त्याचे स्मरण करून त्याच्या नांवाचा उच्चार करणे, ही कोणत्याही कर्माला सुरवात करताना करायची, एक महत्त्वाची आणि अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे.
**' ॐ तत् सत् '** ह्या तीन प्रकारच्या नावांनी त्याचा उल्लेख केला जातो.
ह्यांच्यापासूनच ' सर्व प्रजा, चारही वेद आणि सर्व प्रकारचे यज्ञविधी ह्यांची रचना केली गेली आहे.' अशी मान्यता आहे.
पहिले **ॐ** म्हणजेच ओंकार हे परमात्म्याचे नांव आहे. म्हणून कोणत्याही कर्माला सुरवात करताना हे नांव उच्चारायची प्रथा आहे.
दुसऱ्या **तत्** ह्या नांवाच्या उच्चारणामधे कर्मफलत्यागाचा फार महत्त्वाचा विचार आहे.
**' हे परमेश्वरा ऽऽ! हे सर्व काही तुझेच आहे! माझे काहीही नाही!'** ही भावना आहे.
कोणतेही कर्म करीत असताना, कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, निष्काम कर्म करण्याची भावना आहे. म्हणून कर्म करीत असताना हे नांव उच्चारायची प्रथा आहे.
तिसऱ्या **सत्** ह्या नांवाच्या उच्चारणामधे **' स्थिर - अविचल अशा श्रद्धेने, शुद्ध बुद्धीने, शुद्ध मनाने, सात्त्विक विचाराने, अत्यंत प्रामाणिकपणे आणि उत्तम प्रकारे '** सत्कर्म करण्याची आणि ते परमेश्वराला अर्पण करायची भावना आहे.
त्याशिवाय जर आपण करीत असलेल्या सत्कर्मामधे अनवधानाने अथवा अज्ञानाने काही उणीव राहिली, तृटी राहिली, तर ती ह्या नांवाच्या उच्चारणाने नाहीशी होते. म्हणून कर्म करून झाल्यावर हे नांव उच्चारायची प्रथा आहे.
ह्या तीनही भावनांचे स्मरण ठेवून केलेले प्रत्येक कर्म हे ब्रह्मरूपच होईल.
मग ते यज्ञकर्म असो, दानकर्म असो अथवा तपासारखे गहन कर्म असो, यथाविधी पार पडो अथवा न पडो,
त्यामधे काही उणे - अधिक राहो अथवा न राहो, ते सत्कर्मच असेल आणि कर्त्याला मोक्षप्राप्तीच्या मार्गानेच घेऊन जाईल.
अहो ऽऽ, लोखंड कसेही असले तरी परिसाजवळ गेल्यावर त्याचे सोनेच होणार. दुसरे काहीही होणार नाही. होऊ शकणार नाही.
तात्पर्य काय तर, **' ॐ तत् सत '** ह्या सर्वमान्य संकल्पामधे —
' **शास्त्राला अनुसरून, विधी - निषेधांचे पालन करून, स्वधर्माला अनुकूल फलाशा बाळगून, सद्बुद्धीने केलेले कर्म**
आणि त्यापुढील पायरी म्हणजे,
**स्वधर्माचे पालन करण्यासाठी, केवळ कर्तव्य म्हणून, फळाची अभिलाषा सोडून केलेले निष्काम कर्म**
ह्या दोघांचाही समावेश होतो.' म्हणून ' ह्या व्यतिरिक्त बाकीची सर्व कर्मे व्यर्थ होत ' असे सांगितलेले आहे. असो.
**ओंकार म्हणजे साडेतीन मात्रांचा, एकाच अक्षराचा मंत्र!**
त्याच्याविषयी काय सांगू? कितीही बोललो तरी ते अपुरेच पडेल.
जेव्हा परब्रह्म परमात्म्याला **' एकाचे अनेक व्हायची '** इच्छा झाली, त्यावेळी ब्रह्मांडाच्या उत्पत्तीकरिता कर्माचा प्रारंभ झाला.
त्याने केवळ संकल्पानेच आकाश उत्पन्न केले. काय झाले ते आपण सगळ्यांनी नीट समजून घेतले पाहिजे बरं का, —
आत्मस्वरूप ब्रह्मापासून आकाश उत्पन्न झाले म्हणजे **' परब्रह्मरूपी मातेला पहिले बाळ झाले.'**
शब्द हा एकमेव गुणधर्म असलेले आकाशरूपी बाळ जन्माला आल्यावर, त्याने आपल्या आगमनाची जाणीव करून देण्यासाठी आईला साद घातली असेल. **अ ऽऽऽऽऽऽऽ!** **उ ऽऽऽऽऽऽऽ!** **म ऽऽऽऽऽऽऽ!** **ॐ ऽऽऽऽऽऽऽ!**
हा सर्व विश्वामधे केला गेलेला पहिला **उच्चार** होता.
अव्यक्त असलेल्या, साडेतीन मात्रांच्या एकाच **अक्षराचे** व्यक्त होणेच होते. म्हणून ओंकार हा **आद्याक्षर** मानला गेलेला आहे.
तो एकाच अक्षराने निर्माण झालेला पहिला **शब्द** होता. म्हणून ओंकार हा **आदिशब्द** मानला गेलेला आहे.
त्या उच्चाराला **नाद** होता, **ताल** होता आणि **लय** होती. म्हणून ओंकार हा **आदिनाद** मानला गेलेला आहे.
म्हणून — **तो अक्षरब्रह्म आहे. तो शब्दब्रह्म आहे. तो नादब्रह्म आहे.**
त्याच्या उच्चारामधे सगळी शब्दसृष्टी सामावलेली आहे. त्याच्या उच्चाराने नादाचे आद्यन्त स्वरूप व्यक्त होते.
अनाहत आणि आहत म्हणजेच सूक्ष्म व स्थूल नादाची प्रचिती येते.

तो स्वत: **नाम** ही आहे आणि **नामी** ही आहे. तो त्याचेच नांव आहे आणि तोच त्याचे नांव आहे.
म्हणजे जे नांव उच्चारायचे ते आणि ते नांव ज्याचे आहे तो परब्रह्म परमात्माही तोच आहे.
त्याचा उच्चार कोणत्याही वेळी आणि कोणत्याही स्वरात केला तरी तो अत्यंत आनंददायकच होतो. प्रत्येकाने आपली शक्ती ओळखून त्याप्रमाणे उच्चार करावा. ह्या ठिकाणी आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते.
ओंकाराचा केवळ उच्चार करायला सुरवात केली तरीही अंतर्बाह्य शुद्धी व्हायला लागते. मनामधले सर्व वाईट विचारांचे येणे आपोआप थांबते आणि ते शांत व्हायला लागते. जोपर्यंत **ॐ** चा जप चालू असेल तोपर्यंत असेच होते.
ही भाषण करायची गोष्ट नसून अनुभवायची गोष्ट आहे. प्रामाणिकपणे प्रयत्न केलात तर आपणही अनुभव घेऊ शकाल.
**ॐ** हा परब्रह्म परमात्म्याचा पहिला संकेत मानला गेला आहे. त्याच्या शुद्ध प्रेमाचे प्रतीक म्हणून मानला गेला आहे.
ह्या ओंकारापासूनच पुढे सर्व ब्रह्मांडाची रचना झाली. सर्व वेदांची उत्पत्ती ओंकारापासून झाली आहे.
भारतीय संस्कृतीमधे **चार वेद** हे सर्वांत प्राचीन मानले जातात.
सतत आत्मचिंतन करणाऱ्या ऋषींना अलौकिक समाधी अवस्थेत प्राप्त झालेले ज्ञान, जेव्हा शब्दरूप होऊन बाहेर आले तेव्हा त्या वाङ्मयाला **श्रुती** असे संबोधले गेले. **श्रुत** म्हणजे ऐकलेले अथवा ऐकू आलेले.
मी - पणाच्या पलीकडून आलेले म्हणून वेदांना **अपौरुषेय वाङ्मय** असे म्हणतात.
हे वेद काय म्हणतात ते ऐका आणि त्यावर विचार करा.
' वेदांच्या सर्व ऋचा म्हणजे मंत्र, हृदयाकाशात लपलेल्या परमेश्वराच्या नांवामधे, एका अक्षरात, अधिष्ठित आहेत.
जो त्या एका अक्षराला जाणत नाही तो वेदमंत्र घेऊन काय करणार? दुसऱ्या सर्व ऋचा कंठस्थ असल्या तरी काय उपयोग? '
ते एक अक्षर म्हणजे **ॐ** आहे. ते ओंकारच आहे.
वेदांच्या खालोखाल **उपनिषदांना** महत्त्व दिले गेले आहे.
वेदांनी सांगितलेले मर्म सर्वांना समजेल अशा प्रकारे सांगण्यासाठीच सर्व उपनिषदांची निर्मिती झाली.
त्यांना **स्मृती** असे संबोधले गेले. **स्मृत** म्हणजे आठवलेले किंवा स्मरण केलेले.
उपनिषदांमधे, ॐ म्हणजे काय आहे आणि त्याचे महत्त्व काय आहे ते सविस्तरपणे सांगितलेले आहे. उपनिषदे अनेक आहेत. त्यामधे वेगवेगळ्या प्रकारे ओंकाराचे माहात्म्य सांगितलेले आहे. आपल्याला त्या सगळ्या विवेचनाची चर्चा करता येणार नाही. कारण येथे वेळेची मर्यादा आहे. मला तिचे पालन करावेच लागेल. परंतु, ओंकारविषयी उपनिषदे काय सांगतात ते समजून घेणे आवश्यक आहे. म्हणून येथे काही निवडक उदाहरणे पाहूया. आपण त्यांचा अर्थ समजून घ्या आणि त्यावर विचार करा ही विनंती.

**१) कठोपनिषद् —**

**सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि – ओमित्येतत् ।।**

अर्थ — यमराज नचिकेताला सांगतो आहे की, सर्व उपनिषदे ज्याचे प्रतिपादन करतात, सर्व तपांचे जे ध्येय आहे, ज्याच्या प्राप्तीच्या इच्छेने माणसे पवित्र जीवन जगतात, ते पद मी तुला थोडक्यात सांगतो. ते पद म्हणजे ओम् किंवा ओंकार होय.

**एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परं ।**
**एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ।।**

अर्थ — हे अक्षरच ( म्हणजे **ॐ** ) ब्रह्म आहे. ते सर्वात श्रेष्ठ आहे. ते जाणल्याने ज्याला जे हवे ते त्याला मिळते.

**एतदालम्बनं श्रेष्ठं एतदालम्बनं परम् ।**
**एतदालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ।।**

अर्थ — **ॐ** हा सर्वांत श्रेष्ठ व उत्तम आधार आहे. त्याचे ज्ञान झाल्याने मनुष्य ब्रह्मज्ञानी होऊन श्रेष्ठ बनतो.

**२) मांडुक्योपनिषद् —**

**ओम् इति एतद् अक्षरम् इदं सर्वं, तस्योपव्याख्यानम्,**
**भूतं भवद् भविष्यद् इति सर्वम् ओङ्कार एव ।**
**यच्च अन्यत् त्रिकालातीतं तदपि ओङ्कार एव ।।**

अर्थ — **( ॐ )** ओम् हे अक्षरच सर्व काही आहे.( हे सर्व विश्व आहे.) हे उपनिषद् त्याचे व्याख्यान ( विवेचन ) आहे. ह्या विश्वात पूर्वी झालेले, आता असलेले आणि पुढे होणारे हे सर्व **ॐ**कारच होय. इतकेच नव्हे तर याहून निराळे म्हणजे त्रिकालातीतही

( आत्मवस्तूही ) **ॐ**कारच होय.

**३) मुंडकोपनिषद् —**

**प्रणवी धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।**

**अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ।।**

अर्थ — **ओंकार** हेच धनुष्य, आपला जीव हाच बाण, ब्रह्म हे त्याचे लक्ष्य असे समजून अत्यंत सावधान मनाने त्याचा वेध करावा. बाण जसा लक्ष्यामध्ये घुसतो तसे जीवाने ब्रह्मात बुडून जावे.

**अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः स एषः अन्तश्चरते बहुधा जायमानः ।**

**ओमित्येवं ध्यायथ आत्मानं स्वस्ति वः पराय तमसः परस्तात् ।।**

अर्थ — रथचक्राच्या नाभीमध्ये जसे अर बसविलेले असतात, त्याचप्रमाणे आपल्या हृदयामध्ये सर्व नाड्या येऊन मिळतात. त्या हृदयामध्ये हा आत्मा संचार करतो. तेथे अनेक प्रकारे प्रकट होतो. **ॐ**कार रूपाने त्याचे ध्यान करा. अविद्यारूपी अंधाराच्या पलीकडे जातांना तुम्हाला विघ्न न येवो.

**४) तैत्तिरीयोपनिषद् —**

**ओमिति ब्रह्म । ओमिति इदं सर्वम् ।**

**ओमिति एतदनुकृति ह स्म वा अपि आश्रावयेति आश्रावयन्ति ।**

**ओमिति सामानि गायन्ति । ओं शोमिति स्तोत्राणि शंसन्ति ।**

**ओमिति अध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति । ओमिति ब्रह्मा प्रसौति ।**

**ओमिति अग्निहोत्रं अनुजानाति ओमिति ब्राह्मणः प्रवक्षन्नाह**

**ब्रह्मोपाप्नवानिति । ब्रह्मैवोपाप्नोति ।।**

अर्थ — **ॐ** हे ब्रह्म आहे. हे सर्व विश्व **ॐ** आहे.

**ॐ** म्हणजे **' होय '** असे म्हणणे आहे. काही सांगितले तर ऐकणारा हो **( ओ – ॐ )** म्हणून तसे करतो.

सांगणारा देखील ओ **( ॐ )** म्हणून सांगण्यास सुरवात करतो.

**ॐ** म्हणूनच वेदज्ञ ऋषीगण सामगायन करतात. **ॐ शं** असे म्हणूनच स्तोत्र - मंत्र म्हणतात.

**ॐ** असे म्हणूनच अध्वर्यु यज्ञात उत्तर देतो. **ॐ** म्हणूनच ब्रह्मा ( मुख्य पुरोहित ) आज्ञा करतो.

**ॐ** म्हणूनच अग्निहोत्राला आरंभ होतो. अध्ययनाला आरंभ करणारा ब्राह्मण **ॐ** म्हणूनच **' मला ब्रह्मप्राप्ती होवो.'** असे म्हणतो आणि त्याप्रमाणे त्याला ब्रह्माची प्राप्ती होते.

**५) बृहदारण्यकोपनिषद् —**

**ॐ खं ब्रह्म । खं पुराणं वायुरं खं इति ह स्म आह**

**कौरव्यायणीपुत्रो वेदो अयं ब्राह्मणा विदुः वेद एनेन यद् वेदियव्यम् ।।**

अर्थ — ओंकाररूपी आकाश ब्रह्म होय. हे सनातन आहे. कौरव्यायणीपुत्र म्हणाला, ज्याच्यामधे वायू राहतो ते हे आकाश. ओंकाराने हे ब्रह्म जाणले जाते. ओंकार हा वेद आहे असे ब्रह्मज्ञ समजतात. **ओंकार** म्हणजे परमेश्वराचे नाम होय. ( सर्व विश्वाचे अंतरंग म्हणजे त्याचा अर्थ ओंकाराने व्यक्त होतो म्हणून ओंकाराला आकाशाची उपमा देऊन त्यालाच वेद म्हटले आहे. )

**छांदोग्योपनिषदामधे** तर ' प्राणिमात्रांचा रस म्हणजे आधार अथवा सार पृथ्वी आहे. पृथ्वीचा रस पाणी, पाण्याचा रस वनस्पति, वनस्पतीचा रस पुरुष, पुरुषाचा रस वाणी, वाणीचा रस ऋग्वेद, ऋग्वेदाचा रस साम आणि सामाचा रस उद्‌गीथ म्हणजे **ओंकार ( ॐ )** होय. हा उद्‌गीथरूपी ओंकार **( ॐ )** सर्व रसांमध्ये अत्यंत श्रेष्ठ व उत्कृष्ट म्हणजे परमात्मस्वरूपी असा आठवा रस आहे.' असे सांगून त्याची उपासना कशी करावी ते सविस्तरपणे सांगितलेले आहे.

**पातंजलयोगदर्शनामधे** ' प्रणव म्हणजे **ॐ**कार हे त्या ईश्वराचे प्रतीक आहे. त्या **ॐ**काराचा जप करावा आणि त्याच्या अर्थाचे मनन म्हणजे ध्यान करावे. त्यामुळे आंतरिक विशुद्ध चेतनेचे म्हणजेच पुरुषाचे ज्ञान प्राप्त होते आणि त्याशिवाय योगमार्गातील अडचणी नाहीशा होतात.' असे स्पष्टपणे सांगितलेले आहे.

**ज्ञानेश्वर महाराजांना** ओंकारामधे श्रीगणेशाचे दर्शन होत होते. ते म्हणतात की —

**अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।**

**मकार महामंडल । मस्तकाकारें ।। १ - १९ ।।**

**हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।**

**तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ।। १ - २० ।।**

अर्थ — ओंकाराची पहिली अकारमात्रा हे गणेशाचे दोन पाय असून, दुसरी उकारमात्रा हे त्याचे मोठे पोट आहे आणि तिसरी मकारमात्रा हा त्याच्या गोल मस्तकाचा आकार आहे. ह्या तिन्ही मात्रा एकवटल्या म्हणजे त्यात शब्दब्रह्म म्हणजे संपूर्ण वेद कवटाळले जातात. त्या मूळकारण ओंकाररूप गणपतीला मी गुरुकृपेने नमस्कार करतो.

येथे एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो आहे.

ज्ञानदेवांनी केलेले ओंकाराचे हे वर्णन वाचा आणि त्यानंतर आपण एक गोष्ट करून पहा.

अगोदर चंद्रकोर आणि अनुस्वार वगळून ओम् लिहा. नंतर त्याला डाव्या बाजूने ९० अंशात फिरवून उभा करा आणि अनुस्वारयुक्त चंद्रकोर सर्वात वरती काढा. म्हणजे आपल्यालाही तेथे श्रीगणपतीचे रेखाचित्र दिसायला लागेल. असो.

श्री **<u>समर्थ रामदासस्वामी</u>** दासबोधामधे ओंकाराविषयी काय सांगतात ते ऐका.

**अकार उकार मकार । अर्धमात्राचे अंतर ।**

**औट मात्रा तदनंतर । बावन्न मातृका ।।**

अर्थ — अकार, उकार आणि मकार ह्या तीन व अनुस्वाराची अर्धी मात्रा मिळून साडेतीन **(औट)** मात्रांचा **<u>ओंकार</u>** व त्यापासून पुढे बावन्न मात्रा **(मातृका)** म्हणजे सोळा स्वर व छत्तीस व्यंजने तयार झाली. ( म्हणजेच **<u>ॐ</u>** पासून सगळे शब्द निर्माण झाले.)

**ऐलिकडे गुणक्षोभिणी । तेथे जन्म घेतसा त्रिगुणीं ।**

**मूळ वोंकाराची मांडणी । तेथून जाणावी ।। १३ - ३ - ५ ।।**

**अकार उकार मकार । तिनी मिळोन वोंकार ।**

**पुढे पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ।। १३ - ३ - ६ ।।**

अर्थ — अलिकडे आदिशक्ती, तिच्यापासून त्रिगुण, त्यापासून मूळ ओंकार व त्यानंतर अकार - उकार - मकार मिळून झालेल्या ओंकारापासून पुढे पंचमहाभूतांचा विस्तार झाला.

संतश्रेष्ठ **<u>तुकाराम महाराजांना</u>** पण ओंकारामधे श्रीगणेशच दिसत होता. ओंकाराचे वर्णन करताना ते म्हणतात की —

**ॐकार प्रधान । रूप गणेशाचे ।**

**हे तिन्ही देवांचें । जन्मस्थान ।। १ ।।**

**अकार तो ब्रह्म । उकार तो विष्णु ।**

**मकार महेशु । जाणियेला ।। २ ।।**

**ऐसे तिन्ही देव । जेथुनी उत्पन्न ।**

**तो हा गजानन । मायबाप ।। ३ ।।**

अर्थ — **ओंकार** हे प्राधान्येकरून गणेशाचेच रूप आहे आणि तेच तीनही देवांचे जन्मस्थान आहे. **अ**कार म्हणजे सृष्टी उत्पन्न करणारा ब्रह्मा, **उ**कार म्हणजे तिचे रक्षण करणारा विष्णु आणि **म**कार म्हणजे तिचा संहार करणारा महेश आहेत. अशाप्रकारे तीनही देव जेथून उत्पन्न झाले, तो हा ओंकाररूप गजानन आपला मायबाप म्हणजेच माता आणि पिता आहे.

खुद्द **<u>भगवद्गीतेमधे</u>** ह्या अगोदर चार वेळा ओंकाराचा उल्लेख झालेला आहे.

**रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययो: ।**

**प्रणव: सर्व वेदेषु शब्द: खे पौरुषं नृषु ।। ७ - ८ ।।**

अर्थ — पाण्यामध्ये रस मी. हे कौंतेया! चंद्रसूर्यामधली प्रभा मी, सर्व वेदांमधला **<u>प्रणव म्हणजे ओंकार मी,</u>** आकाशात शब्द आणि सर्व पुरुषांतले पौरुष्यही मीच आहे.

**ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**

**य: प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।। ८ - १३ ।।**

अर्थ — **<u>ॐ ह्या एकाक्षर-ब्रह्माचा</u>** जप करीत व माझे स्मरण करीत जो देह सोडून जातो त्याला उत्तम गति मिळते.

**पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः ।**

**वेद्यं पवित्रमोंकारः ऋक्साम यजुरेवच ।। ९ - १७ ।।**

अर्थ — ह्या जगताचा पिता, माता, धाता ( आधार ), पितामह ( आजोबा ), मी आहे. जे काही पवित्र आहे ते आणि **ओंकार** तसेच ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेदही मीच आहे.

**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।**

**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ।। १० - २५ ।।**

अर्थ — महर्षींपैकी भृगु मी, वाणीमध्ये एकाक्षर म्हणजे **ओंकार** मी आहे. यज्ञांपैकी जपयज्ञ मी, स्थिर पदार्थांत हिमालय मी आहे.
त्याशिवाय आत्ताच्या श्लोकांमधे दोन वेळा उल्लेख आलेला आहे. म्हणजे गीतेमधे ओंकाराचा, एकूण सहा वेळा उल्लेख झालेला आहे. ओंकारा व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा इतक्या वेळा उल्लेख झालेला नाही.
येथे ओंकाराच्या विषयी आपल्याला आणखी एक गोष्ट सांगतो. नीट लक्ष देऊन ऐका आणि जरा त्यावर विचार करा.

**आपण ज्याला संगीत असे म्हणतो, ते तरी काय आहे हो?**

अव्यक्ताचे व्यक्त होणे आणि त्यानंतर व्यक्ताचे परत अव्यक्त होणेच आहे ना ऽऽ! म्हणजे बघा कशी गंमत आहे.
अगोदर काहीही अस्तित्वात नसते. कधीतरी, कोणातरी माणसाला कोणतातरी विचार सुचतो.
मग तो आपल्या मनामधे आलेल्या विचाराला, काव्यशास्त्रामधील गण - मात्रा - वृत्त ह्यांचे बंधन पाळून, छान शब्दांच्या सहाय्याने कागदावर लिहितो. शब्द हेच त्या विचारांचे अस्तित्व असते. त्याला सगळे, **' गीत '** असे म्हणतात.
नंतर दुसऱ्या कोणालातरी ते गीत वाचल्यावर, त्याचा अर्थ समजून घेतल्यावर एक वेगळीच प्रेरणा मिळते.
त्याच्या मनामधे तेच शब्द स्वरांच्या रूपाने प्रकट व्हायला लागतात.
मग तो त्याला योग्य वाटणाऱ्या स्वरांच्या सहाय्याने ते शब्द गुणगुणायला लागतो. शब्दांच्यावरती स्वरांचे संस्कार करायला लागतो. शब्दांचा अर्थ, पूर्णपणे व्यक्त करू शकतील असे स्वरसमूह प्रयत्नपूर्वक एकत्र आणतो. नंतर त्या स्वरसमुहांना,
**' सा , रे , ग , म , प , ध , नी '** हे सात स्वर आणि काही चिन्हे ह्यांच्या सहाय्याने कागदावर उतरवतो.
त्याला सगळे, त्या **' गीताची चाल '** असे म्हणतात.
त्यानंतर तिसरा, गायनकला जाणणारा असा कोणीतरी, ती चाल शब्दरचनेसह समजावून घेतो.
आपल्या सुसंस्कारित गळ्यामधून योग्य प्रकारे व्यक्त करण्यासाठी प्रयत्न करतो. रियाज करतो. परिश्रम करतो.
त्याचे साथीदारही तसाच प्रयत्न करतात. पुरेशी साधना करून झाल्यावर एकदिवस, तो आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या साथीने, एकाने रचलेले आणि दुसऱ्याने चाल लावलेले गाणे, आपल्या गोड आवाजात श्रोत्यांना प्रभावीपणे म्हणून दाखवतो. त्यायोगे सर्व श्रोते आनंदित होतात. माना डोलवायला लागतात. सूचक उद्गार काढून आपला आनंद व्यक्त करतात. टाळ्या वाजवून गायकाचे कौतुक करतात.
गाणे संपल्यावरही त्या शब्दांचा आणि स्वरांचा परिणाम, सर्व श्रोत्यांच्या मनावर आणि बुद्धीवर दीर्घकाळ रेंगाळत राहतो.
अहो ऽऽ, काव्य रचनेला साठ वर्षे होऊन गेली. तिचे कवी, संगीतकार आणि गायक आता हयात नाहीत.
असे असूनही हजारो श्रोते, **' ग. दि. माडगुळकरांनी गीतरामायण काय छान लिहिले आहे हो!** आणि —
**सुधीर फडक्यांनी काय अप्रतिम चाली लावल्या आहेत हो!**
**त्यांच्या गोड आवाजाविषयी तर प्रश्नच नाही. काय सुरेख गायले आहेत! वा ऽऽ, क्या बात है ।'**
असे एकमेकांना वर्षानुवर्षे सांगत आलेले आहेत. आजही तसेच सांगत असतात आणि अजून पन्नास वर्षांनी पण तसेच सांगत असतील.
**परंतु हा सर्व परिणाम घडवून आणणारे शब्द आणि स्वर मात्र दिसत नाहीत.**
काही काळ व्यक्त होऊन आणि आपल्या मनाला अनुभूती देऊन परत अव्यक्त होतात.
स्वर दाखवता येत नाहीत. कागदावर **' सा ऽऽ '** लिहिला म्हणजे **षड्ज** दिसला अथवा ऐकायला आला असे होत नाही.
एखाद्या गायकाचे गाणे प्रत्यक्ष ऐकले अथवा त्याच्या गाण्याची रेकॉर्ड ऐकली म्हणजे आपल्या कानांच्याद्वारे मनाला स्वरांचा अनुभव घेता येतो आणि त्याने आनंद होतो.
शब्द दाखवता येत नाहीत. हाताने लिहिलेला कागद असो अथवा छापलेला ग्रंथ असो, त्यामधे अक्षरांचे, शब्दांचे आणि वाक्यांचे फोटो असतात. फोटो पाहिल्यावर, फोटोतला माणूस समोर येऊन उभा राहात नाही.
आपल्याला ' तो कोण आहे, कसा आहे, किती चांगला आहे, काय काय करतो,' इत्यादी सर्व गोष्टी आठवतात आणि त्यायोगे आनंद होतो. तसेच अक्षरे, शब्द आणि वाक्ये पाहिली, वाचली आणि त्यांचा अर्थ समजला, संदर्भ समजला म्हणजे त्यायोगे वाचणाऱ्याला आनंद होतो.

मी आजपर्यंत अनेक कलावंतांचे गाणे ऐकले आहे. अनेक कार्यक्रमांना हजर राहून गायनाचा मनमुराद आनंद घेतला आहे.
परंतु पोटभर गाणे ऐकूनही **‘ तराणा म्हणजे काय आहे?’** हे मला माहीत नव्हते.
कोणत्याही रागामधे गायलेला तराणा ऐकायला मलाही फारच आवडतो.
पण मला हे कळत नव्हते की ‘ रागाचा विलंबित आणि दृत लयीमधे विस्तार करून झाल्यावर, त्या रागाचे संपूर्ण व्यक्तिमत्व उत्तम प्रकारे रेखाटून झाल्यावर, त्यानंतर गायक तराणा का म्हणतात? त्याच त्याच शब्दांचा उच्चार परत परत कशाला करीत बसतात? त्याने काय साध्य होत असेल?’
एकदा **कुमार गंधर्वांच्या** एका **‘ ठुमरी - टप्पा - तराणा ’** ह्या नांवाच्या कार्यक्रमामधे त्यांनी केलेले विवेचन ऐकायला मिळाले.
ते काय म्हणाले आहेत ते नीट लक्ष देऊन ऐका.
‘ मी तराण्याला जे अमूर्त आहे त्याची अभिव्यक्ती मानतो. अव्यक्ताचे व्यक्त होणेच मानतो.
अगोदर बरेच काही सांगितले. आताही आणखीन काही सांगून झाले. सगळे मिळून बरेच काही सांगून झाल्यावर असे जाणवले की — अरे ऽ, इतके सगळे सांगितले, पण तरीही जे सांगायचे होते ते सांगितले गेलेच नाही.
मग जे सांगायचे बाकी असते, ते जो सांगतो तो **तराणा.**
जेव्हा संगीत अधिक बोलायला लागते, आलापी करायला लागते, चंचल आणि चपल गतीने चालायला लागते, स्वर, ताल आणि लयीच्या वरती जाऊन तरंगायला लागते, त्यावेळी व्यक्त होणारे त्याचे स्वरूप म्हणजे **तराणा.**
तराण्याच्या द्वारे संगीत अधिकाधिक उंचीला स्पर्श करीत असल्याचा भास होतो.’
हे ऐकल्यावर माझ्या काही शंकांचे उत्तर मिळाले.
**कुमार गंधर्व** हे एक विलक्षण प्रतिभाशाली गायक होऊन गेले. मी त्यांचे गाणे मनमुराद ऐकले आहे. आजही ऐकतो आहे.
आनंद अनुभवतो आहे. त्यांचे गायन म्हणजे अनेक चमत्कृतींचे मिश्रण असते. ऐकत असतांना मती गुंग होते.
तुम्ही त्यांनी गायलेली **निर्गुणी भजने** ऐकली आहेत काय? ऐकली नसलीत तर जरूर ऐका. खरोखरच कमाल केलेली आहे.
ऐकत असताना अनेक वेळा दैवी स्पर्श झाल्याचा अनुभव येतो. **( Divine Touch.)**
सर्व ऐहिक गोष्टींचा विसर पडतो. एका वेगळ्याच अवस्थेत जाणे होते. मी अनेक वेळा तसा अनुभव प्रत्यक्ष घेतलेला आहे.
त्यांचे गायन ही बोलायची गोष्ट नसून, ऐकायची व अनुभवायची गोष्ट आहे. असो.
त्यानंतर काही काळाने एक पुस्तक वाचनात आले. त्यामधे एक मुलाखत वाचायला मिळाली. ते पुस्तक कोणते होते आणि मुलाखत कोणाची होती ते आता बरोबर आठवत नाही. परंतु बहुतेक विख्यात गायक **खानसाहेब अमीर खान** ह्यांची मुलाखत असावी असे वाटते. त्यामधे त्यांनी **‘ तराणा म्हणजे काय आहे,’** ह्याविषयी स्वत:चे विचार सांगितले आहेत.
ते काय म्हणाले आहेत तेही नीट लक्ष देऊन ऐका.
‘ हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत हे संपूर्ण संगीत आहे. त्यातही कंठ संगीत म्हणजे गायन हे सर्वात कठीण व श्रेष्ठ मानलेले आहे. संगीताचा मूळ हेतू ईश्वरप्राप्ती हाच आहे. परमेश्वराची स्तुती करणे, गुणगान करणे, त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करणे, त्याच्यामधे विलीन होण्याचा प्रयत्न करणे हाच एकमेव हेतू आहे.
ह्याच हेतूने खरा कलाकार सतत साधना करतो. पराकाष्ठेची साधना करतो. आपले संपूर्ण जीवन संगीताला वाहून टाकतो. अशा साधकालाच सिद्धी प्राप्त होतात. त्याचे गायन हे वेदमंत्रांच्या उच्चाराइतकेच सामर्थ्यशाली होते.
त्याचा प्रत्येक स्वर आणि व्यंजन, इतकेच नव्हे तर त्यांच्यामधील रिकामी जागासुद्धा अर्थपूर्ण होते.
त्याला परमेश्वराचे अस्तित्व जाणवायला लागते. समजायला लागते. त्याला परमेश्वर दिसायला लागतो. परमेश्वराच्या बरोबर बोलणे, हसणे, नाचणे, गाणे अशा सर्व प्रकारे संवाद सुरू होतो. ह्या पातळीवर पोहोचलेल्या कलावंतांच्यापैकी क्वचित् एखाद्यालाच प्रत्यक्ष ईश्वराचा वरदहस्त लाभतो. **त्याला ओंकाररूप नादब्रह्माचे स्वच्छ व स्पष्ट दर्शन होते.**
तो गात असो किंवा नसो, त्याच्या मनामध्ये स्वरांच्या लाटा अखंडपणे उसळत असतात, श्रुतींचे नर्तन सतत चाललेलेच असते.
तो देहभान विसरतो, उन्मनी अवस्थेला पोहोचतो. तुर्यावस्थेला पोहोचतो. त्याला इहलोकाबरोबर काहीही देणे-घेणे उरत नाही.
ही मनुष्यत्वाची सर्वात वरची अवस्था असावी. मनुष्यत्व आणि देवत्व ह्यांच्या मधली सीमारेषा असावी.
( ज्ञानयोग, राजयोग, कर्मयोग, भक्तियोग, इत्यादी मार्गातले साधक सरतेशेवटी ह्याच अवस्थेला पोहोचत असावेत. अहंभाव संपूर्णपणे नष्ट होऊन परमेश्वराशी एकरूप झाल्याशिवाय, केवल ऐक्य झाल्याशिवाय अमानवीय असे, अद्वितीय असे, अपौरुषेय म्हणता येतील असे शब्द स्फुरणारच नाहीत. **ज्ञानेश्वरी** सांगितली जाणार नाही. **पसायदान** मागितले जाणार नाही.
**मनाचे श्लोक** सांगितले जाणार नाहीत. **दासबोध** सांगितला जाणार नाही. **अभंग** रचले जाणार नाहीत. **गीताई** रचली जाणार नाही.

**गीतारहस्या** सारखा ग्रंथ निर्माण होणार नाही, **स्वतंत्रतेचे स्तोत्र** लिहिले जाणार नाही,
कारागृहामधे यमयातना भोगत असूनही, घायपाताच्या काट्याने भिंतीवर काव्य लिहिले जाऊ शकणार नाही. असो.)
ह्या बाबतीत धर्माचा काहीही संबंध नाही. सर्व धर्मांमध्ये असे कलावंत होऊन गेलेले आहेत.
तशा त्या केवल आनंदमय अवस्थेमधे देहभान विसरून गात असताना, त्यांच्या मुखामधून उत्स्फूर्तपणे काही शब्दसमूह प्रगटले.
भाषेच्या आणि तिच्या व्याकरणाच्या दृष्टीने पाहिले तर ते शब्द निरर्थक वाटतात. संदर्भहीन वाटतात. विचित्र वाटतात.
जबरदस्तीने एकत्र आणल्यासारखे वाटतात. परंतु जर खोलवर विचार केला तर, वरवर निरर्थक वाटणाऱ्या त्या शब्दांमधे फार मोठा अर्थ भरलेला दिसून येतो. ते शब्दसमूह अमूर्त **( Abstract )** अशा **परब्रह्म - परमात्मा - परमेश्वराच्या** अस्तित्वाची, त्या कलावंतांना झालेली जाणीव व्यक्त करतात. जसे —

**तोम्** — तु ओम् — **तूच ओंकार आहेस!** **त न न न न ऽऽऽ** — नाही रे! नाही.
**तारे दानी** — तुला जाणतो! **तदारे दानी** — आम्ही सर्व जाणतो!
**ओ दानी** — तो पण जाणतो! **आ दानी** — मी पण जाणतो! **तु दानी** — तू स्वत:पण हे जाणतोस!
**यलयी यलयी ताला तुम्** — ही लय, हा ताल तूच आहेस! **तुम् ताना यला यलाले लाली** — ह्या ताना पण तूच आहेस!
**ना दिर् तुम्** — गतीहून तू वेगळा नाहीस! **तुम् दिर्** — गती तूच आहेस! **देरे ना ऽऽऽ** — तू वेगळा नाहीस!
**तु अम्** — तू म्हणजे मीच आहे! **अ तुम्** — मी म्हणजे तूच आहेस! **या री रब्बा ऽऽऽ** — अरे देवा ऽऽ!
**यालालुम् या जाली** — आपण दोघे एकच आहोत! इत्यादी - इत्यादी.

हे उस्फूर्तपणे व्यक्त झालेले शब्दसमूह इतर कलावंतानी घेतले. त्यामधे अध्यात्मिक भावना व्यक्त करणारे शब्द, नृत्यकलेतील तोडे, तबला - मृदुंग - पखवाज ह्यांचे बोल इत्यादींची भर घातली. परमेश्वराचा प्रसाद म्हणून हे शब्दसमूह वेगवेगळ्या रागांच्या माध्यमातून गायला लागले. त्यांना **' तराणा '** असे म्हणायला लागले. तराणा हा कोणत्याही वेळी, कोणत्याही रागात गाता येतो आणि त्यामधून सूर, लय, ताल व गती ह्यांचे परमोच्च एकत्व अनुभवता येते.'
आता वर दिलेला अर्थ लक्षात घेऊन पुढील दोन ओळींचा अर्थ काय होतो बघा.

**तो ऽम् तनन ऽनन तारे ऽ तदारे ऽ दानी ।**

अर्थ — तूच ओंकार आहेस! नाही रे! नाही. तुला आम्ही सर्व जाणतो.

**तन देरे तन ऽ देरे तदारे ऽ तदारे ऽ दा ऽ नी ऽ ॥**

अर्थ — नाही तू ( वेगळा ), नाही तू ( वेगळा ), आम्ही - आम्ही सर्व जाणतो!
असे हे शब्दांचे आणि स्वरांचे सामर्थ्य जेथे एकवटलेले आहे, त्या ओंकाराची महती सांगावी तेवढी थोडीच आहे.
ह्या सगळ्याचा सारांश काय तर,
**' जे जे उत्तम आहे, उदात्त आहे, उन्नतीप्रद आहे, मार्गदर्शक आहे, महान आहे, मधुर आहे, आनंददायक आहे ते ते सर्व ओंकारच आहे.'** ॐ कार हा सर्व धर्मांना मान्य असून, सर्व धर्मांच्या उपासनापद्धतीत त्याचा समावेश केला गेलेला आहे.
मुसलमान लोक त्यांच्या प्रार्थनेच्या शेवटी **आमीन** असे म्हणतात. तो ॐ आहे.
ख्रिस्ती लोक त्यांच्या स्तोत्रपठणानंतर **आमेन** असे म्हणतात. तो ॐ आहे.
ग्रीकांच्या धर्मग्रंथातील **ओमेगा ( Omega )** म्हणजे ॐ आहे.
इंग्रजीमधें **ऑम्नीप्रेझेन्ट ( Omnipresent )** म्हणजे **सर्वसाक्षी, ऑम्नीसीअण्ट ( Omniscient )** म्हणजे **सर्वज्ञानी,** आणि **ऑम्नीपोटन्ट ( Omnipotent )** म्हणजे **सर्वशक्तिमान,** ही सर्व परमेश्वराला उद्देशून वापरलेली विशेषणे आहेत.
त्यातील **ऑम्नी ( Omni )** हा प्रत्यय म्हणजे ॐ आहे.
शिखांच्या गुरुग्रंथासाहेब ह्या पवित्र धर्मग्रंथात **' एक ओंकार सत्गुरु प्रसाद '** असा उल्लेख केला गेलेला आहे.
आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून काही गोष्टी ठळकपणे समजून येतात.
ॐ हा सर्वशक्तिमान परमेश्वराचा सर्वोत्तम संकेत म्हणून मानला गेला आहे. हा परमेश्वरच माणसाच्या शरीरामधे आत्म्याच्या रूपाने राहत असतो. आत्मा हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे तो प्रत्यक्ष दिसणे फारच दुर्मिळ आहे. सामान्य माणसासाठी तर ते अशक्य आहे.
परंतू कोणत्याही कारणाने का होईना, आत्मज्ञानाची जिज्ञासा, गोडी व ओढ एकदा निर्माण झाली की मग माणूस आत्म्याचे दर्शन करून घेण्यासाठी प्रयत्न करायला लागतो. तेच त्याचे ध्येय ठरते. आपल्या ध्येयाची सतत आठवण राहण्यासाठी, साधकाला अंत:करणात काहीतरी खूण बाळगावी लागते. खूण अशी असली पाहिजे की जी साधकापाशी राहू शकेल आणि त्याच बरोबर आत्म्यापर्यंतही

पोहोचू शकेल. अशा खुणेलाच संकेत असे म्हणतात. ओंकार म्हणजेच **ॐ** हा असाच संकेत आहे.

ओंकाराचा नुसता उच्चार करीत राहिले की लगेच आपल्या मनाला आत्मतत्त्वाची आठवण होते, शरीरात जागृती निर्माण होते आणि **ॐ** च्या अर्थाशी एकरूप होण्याचे प्रयत्न सुरू होतात. ह्यालाच नामस्मरण असे म्हणतात.

**ॐ** च्या स्मरणाने, उच्चाराने व जपाने आत्म्याच्या आनंदरूपाचे चिंतन होऊन मनाला शांती व समाधान लाभते.

ओंकाराच्या उच्चारणात सातत्य, मधुरता, आघात, कंपने, घुमारा, स्पंदने इत्यादी सर्व गुण ओतप्रत भरलेले आहेत.

उच्चार करायला सुरवात केली म्हणजे ते जाणवतात. त्या गुणांच्या योगे साधक सहजपणाने उच्च अशा आध्यात्मिक पातळीवर जातो.

मला ओंकारसाधना करायला मनापासून आवडते. गेल्या अनेक वर्षांच्या प्रयत्नाने, एक गोष्ट मात्र नक्की झाली.

मी ओंकारसाधनेचा प्रचारक झालो आहे.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांनी** प्रचारकाची मोठी मार्मिक व्याख्या सांगितलेली आहे.

**' प्रचारक किंवा प्रसारक कोणास म्हणावे ?'** ते म्हणतात की,

' एखादी गोष्ट, एखाद्या माणसास इतकी पटावी, इतकी पटावी की ती गोष्ट इतरांस सांगून, तिचे अनुसरण करण्यासाठी गळ घातल्यावाचून, आग्रह केल्यावाचून राहता येऊच नये. मनाची अशी अवस्था झाली म्हणजे मग तो मनुष्य त्या गोष्टीचा नि:संशय प्रचारक होतो! कडवा प्रसारक होतो! अवश्यमेव होतो!' माझी ओंकारसाधनेच्या बाबतीत अशीच अवस्था झाली आहे.

आज ह्या ठिकाणी, सर्वांना माझी आग्रहपूर्वक विनंती आहे की, शक्य होईल तेव्हा आपण सर्वांनी ओंकाराची साधना अवश्य करावी. त्यायोगे आपल्याला अनेक लाभ होतील.

ओंकाराची साधना जो कोणी केवळ ईश्वर प्राप्तीसाठी, केवळ आनंद प्राप्तीसाठी, सातत्याने करील त्याला सर्वकाही प्राप्त होईल.

१) मन:स्वास्थ्याचा लाभ होईल.
२) शरीरातील सर्व संस्था, सर्व अवयव, सर्व ग्रंथी कार्यक्षम होतील.
३) रोगप्रतिकारक शक्ती वाढेल.
४) उत्साह आणि कार्यक्षमता वाढेल.
५) उच्च रक्तदाब व मनोकायिक ताण - तणाव नाहीसे होतील.
६) व्यक्तिमत्वामधे आमूलाग्र बदल होईल.
७) शारिरीक, मानसिक व भावनिक समतोल सांभाळला जाईल.
८) मृत्यूची भीती नाहीशी होईल.
९) अलौकिक अनुभव येतील. परमेश्वराबरोबर एकरूप व्हायला होईल.

साधना किती काळ करायला लागेल ते सांगता येणार नाही. ती गोष्ट संपूर्णपणे व्यक्तिसापेक्ष आहे.

एक वर्ष, पाच वर्षे, दहा वर्षे, कदाचित् सगळा जन्मपण लागेल. पण निराश न होता सतत साधना करीतच रहावी.

त्यामुळे **' आपल्या आयुष्याचा शेवटचा दिवस गोड होईल! '** तसे व्हावे म्हणूनच हा सगळा अट्टाहास करायचा असतो. असो.

**अश्रद्धया हुतन् दत्तम् तपस्तप्तङ् कृतञ् च यत् ।**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ।। २८ ।।**

अश्रद्धेने जे हवन केले, जे दान दिले, जे तप आचरिले आणि जे काही कर्म केले, ते असत् म्हटले आहे. ते कर्म मृत्यूनंतर परलोकीही उपयोगी पडत नाही आणि ह्यालोकीही उपयोगी पडत नाही.

**अश्रद्धया हुतम्** — श्रद्धा नसताना केले जाणारे हवन, **दत्तम्** — दिले जाणारे दान, **तप्तम् तपः** — केलेले तप,
**च यत् कृतम्** — आणि केले जाणारे कोणतेही कर्म, **असत् इति उच्यते** — व्यर्थ असते असे सांगितले जाते.

येथे करण्यात आलेले विधान हे **सत्कर्माच्या** संदर्भामधेच केलेले आहे. **दुष्कर्माच्या** संदर्भामधे केलेले नाही.

ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण कोणतेही दुष्कर्म करण्यासाठी श्रद्धेची आवश्यकता नसते.

दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही दुष्कर्माच्या फळाचा त्याग करताच येत नाही.

दुसऱ्याच्याकडे असलेली गोष्ट आपल्याला कष्ट न करता, विनासायास मिळावी ही इच्छा असते म्हणूनच माणूस चोरी करतो, खोटे बोलतो, लबाडी करतो. जर तशी इच्छा नसेल तर कोणताही माणूस दुष्कर्म करणारच नाही.

त्यामुळे दुष्कर्माचे फळ हे श्रद्धेच्या असण्यावर किंवा नसण्यावर अवलंबून नसते.

श्रद्धा असो अथवा नसो, कर्त्याला त्याच्या पापकर्माचे यथायोग्य फळ मिळणार हे निश्चित. ते कोणालाही टाळता येणारच नाही.

' यज्ञ, दान, तप इत्यादी विविध सत्कर्मे करणाऱ्याला त्यांचे फळ मिळते की नाही?'

हा प्रश्न विचारात घेऊन त्याचे उत्तर दिले आहे.
सत्कर्म करण्यासाठी, कर्त्याची कशावरती तरी **श्रद्धा असणे** आवश्यक असते. त्याशिवाय सत्कर्म करायची इच्छा निर्माण होणे शक्य नाही. कोणतेही शुभ कार्य जर श्रद्धापूर्वक केले गेले तरच त्यायोगे अंत:करणाची शुद्धी होऊ शकते.
नवीन शुभ कार्य करण्याची प्रेरणा मिळू शकते. तशी इच्छा निर्माण होऊ शकते आणि त्यानुसार कृती केली जाऊ शकते.
श्रद्धाहीन कर्म हे व्यर्थ ठरते. त्यापासून कोणताही लाभ होत नाही.
पाऊस सगळीकडे पडतो, पण पीक सगळीकडे येत नाही.
जमिनीमधून पीक येण्यासाठी मुळामधे ती सुपीक असावी लागते. **( श्रद्धा )**
जमीन सुपीक असेल आणि जर तिच्यामधे योग्यवेळी, योग्यप्रकारे, योग्य बियाणे पेरले **( परिश्रम ),**
तर मग पाऊस पडल्यावर चांगले धान्य उगवू शकते.
खडकाळ जमिनीमधे कितीही बियाणे पेरले आणि कितीही पाऊस पडला तरीही तिच्यामधून कधीही कोणतेही पीक येऊ शकणार नाही. त्याचे कारण सकसतेचा अभाव, सुपीकतेचा अभाव हेच आहे. **( श्रद्धेचा अभाव )**
त्याचप्रमाणे मुळामधे श्रद्धा नसताना, एखाद्याने कितीही कार्य केले तरी त्याचा ऐहिक आणि पारमार्थिक लाभ होत नाही.
खरे सांगायचे म्हणजे आपण जे यज्ञ, दान, तप करतो ते म्हणजे आपण अगोदरच घेतलेल्या कर्जाची परतफेड करणेच असते.
जन्माला आल्यापासून ' आपले शरीर, निसर्ग आणि समाज ' ह्या तीनही संस्थांच्याकडून आपण ऋण घेतच असतो.
त्याशिवाय आपला निर्वाह होणारच नाही.

**आपले व्यावहारिक अस्तित्व हे शरीरावर अवलंबून असते.**

शरीर, मन आणि बुद्धी ह्यांचा आपण सतत वापर करीत असतो. त्यामुळे त्यांची झीज होत असते. ती भरून काढणे, त्यांना स्वच्छ करणे आणि ती स्वच्छता कायम सांभाळणे हे आपले कर्तव्यच आहे. त्यासाठी करायच्या उपायांनाच **' तप '** असे म्हणतात.

**आपले शरीर वर्षानुवर्षे टिकून राहणे हे केवळ निसर्गामुळेच शक्य होते.**

आपण स्वत:च्या निर्वाहासाठी निसर्गाचा सतत वापर करीत असतो. जमीन, हवा, पाणी इत्यादी सगळे दूषित करीत असतो. त्यामुळे निसर्गाची सतत झीज होत असते. ती झीज भरून काढणे आणि निसर्गाची स्वच्छता आणि शुद्धता कायम राखणे हे आपले कर्तव्यच आहे. त्यासाठी करायच्या उपायांनाच **' यज्ञ '** असे म्हणतात.

**निसर्गाचा योग्य वापर करणे हे आपल्याला एकट्याला शक्य होत नाही.**

त्यासाठी आपल्याला आई, वडील, बंधु, भगिनी, नातेवाईक, शेजारीपाजारी, मित्रमंडळी ह्या सर्वांची सतत मदत घ्यावी लागते.
ह्यालाच **समाज** असे म्हणतात. हा समाजच आपल्याला लहानाचा मोठा करतो. शिक्षण देतो. सुरक्षितता देतो.
त्यामुळे सर्व समाजाने आपल्यावर केलेले अनंत उपकार यथाशक्ती फेडणे, निदान प्रामाणिकपणे तसा प्रयत्न करणे, हे आपले कर्तव्यच आहे. त्यासाठी करायच्या उपायांनाच **' दान '** असे म्हणतात.
हे मी सांगत नाही आहे बरे का!
हे **आचार्य विनोबा भाव्यांनी** त्यांच्या प्रवचनामधे सांगितलेले आहे. मी येथे त्याचा केवळ संदर्भ दिला आहे.
कारण ते शंभर टक्के सत्य आहे.
मनुष्यप्राणी हा सर्वात जास्त परावलंबी प्राणी आहे. म्हणूनच तो सामाजिक प्राणी म्हणजे समाजात राहणारा प्राणी आहे.
सर्वसाधारण मनुष्य समाजाला टाळून एकटा राहू शकत नाही. राहू शकणारच नाही.
सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत पावलोपावली इतरांची मदत घ्यावी लागते.
अहो ऽऽ, अगदी सकाळी उठल्यावर आपण दात घासायला घेतलेले दंतमंजन, दुसऱ्याच कोणीतरी तयार केलेले असते.
चूळ भरण्यासाठी पाणी हवे म्हणून नळ सोडतो. तो नळही दुसऱ्याच कोणीतरी तयार केलेला असतो.
त्यामधून येणारे पाणीसुद्धा दुसऱ्याच कोणीतरी आपल्याला घरामधे आणून दिलेले असते. पण आपल्याला त्याची जाणीवही नसते.
आपण स्वत:लाच, पुढील काही प्रश्नांचे खरे खरे उत्तर द्यायचा प्रयत्न करा.
१) तुम्ही ज्या प्रसुतिगृहामधे जन्माला आलात, ते प्रसुतिगृह तुम्ही बांधले होते काय?
२) तुम्ही ज्या घरामधे राहता, ते घर तुम्ही बांधले आहे काय?
३) तुम्ही ज्या रस्त्यावरून चालता, तो रस्ता तुम्ही तयार केला आहे काय?
४) तुम्ही ज्या शाळेत गेलात आणि शिकलात, ती शाळा तुम्ही काढली होती काय?
५) तुम्ही ज्या वाहनात बसून प्रवास करता, ते वाहन तुम्ही तयार केले आहे काय?

६) तुम्ही जे काही खाता आणि पिता, ते तुम्ही तयार केलेले असते काय?
७) तुम्ही जे कपडे वापरता, ते तुम्ही तयार केलेले असतात काय?
८) तुम्ही आजारी पडल्यावर जी औषधे घेऊन बरे होता, ती औषधे तुम्ही तयार केलेली असतात काय?
९) ती औषधे जेथे मिळतात ते दुकान तुमचे असते काय?
१०) समजा की जर आजार वाढला तर, डॉक्टरांच्या सांगण्यावरून ज्या हॉस्पिटलमधे भरती होता, ते हॉस्पिटल तुम्ही बांधलेले असते काय? इतकेच काय पण, —
११) भविष्यामधे कधितरी जेव्हा मृत्यू येईल, तेव्हा अंत्यसंस्कार देखील विशिष्ट जागीच करावे लागतील. ती विशिष्ट जागा तुम्ही तयार केली असेल काय?

ह्या सर्व प्रश्नांचे उत्तर **' नाही.'** हेच आहे की नाही? हे प्रश्न ढोबळमानाने विचारले आहेत. ही यादी न संपणारीच आहे.
खरे म्हणजे आपण जगत असताना ज्या ज्या गोष्टींचा आधार घेत असतो, त्यातले काहीही आपण तयार केलेले नसते.
मोबदल्याच्या अपेक्षेने का होईना, पण ते सगळे दुसरा कुणीतरी तयार करतो आणि आपण त्याचा उपयोग करतो. सतत उपभोग घेतो.
त्यामुळे आपले जगणे सुखावह होते. म्हणजे ते सगळे सकाम असले तरी सत्कर्मच असते.
त्यासाठी आवश्यक ते पैसे प्रत्येकजण देत असतो हे खरे असले तरीही तो मोबदला असतो.
ते दान नसते, कोणावरही उपकार करणे नसते, हे देखील सत्य आहे.
मग समाजाचे आपल्यावर असलेले हे ऋण समाजाला परत करायला नको का?
प्रत्येकाने सर्व समाजाला पुढे नेण्यासाठी, ऊर्जितावस्था आणण्यासाठी, यथाशक्ती मदत केलीच पाहिजे.
त्याला परोपकार असे म्हणता येणार नाही. दानधर्म म्हणता येणार नाही. ते तर आपले **कर्तव्यच** आहे.
त्या परतफेडीची सुरवात आपण आपल्या घरापासूनच केली पाहिजे.
तुम्हाला समाजाच्या उन्नतीसाठी काहीतरी करायची मनापासून इच्छा आहे काय?
मग तुम्ही एक काम करा! एकच काम करा! आणि एकमेव काम करा!
विशेष करून **तरुण स्त्री - पुरुषांनी** हे लक्षात ठेवून त्याप्रमाणे वागले पाहिजे.
कारण समाजाचे आणि देशाचे भविष्य त्यांच्याच हातात आहे. त्यासाठी —
**उत्तम पिता** व्हायचा मनापासून प्रयत्न करा! **उत्तम माता** व्हायचा मनापासून प्रयत्न करा!
आपल्या मुलाबाळांचे उत्तम प्रकारे संगोपन करा! तुम्हाला जे जे शक्य असेल ते ते त्यांना द्या! त्यांच्यावर उत्तम संस्कार करा!
त्यांना गीता म्हणून दाखवा. गीता म्हणायला शिकवा. तिचा अर्थ समजावून सांगा.
त्यांना तुमच्याविषयी प्रेम वाटेल, आदर वाटेल आणि धाकही वाटेल असे वागा!
त्यांना सतत काहीतरी चांगले काम करायला प्रवृत्त करा! सतत काहीतरी नवीन शिकायला प्रोत्साहन द्या!
प्रामाणिकपणे आणि सचोटीने वागायला प्रवृत्त करा! त्यांना आपल्या देशाचे उत्तम नागरिक व्हायला मदत करा!
मुख्य म्हणजे, हे सगळे काही तुम्ही तुमच्या आचरणामधूनच त्यांना शिकवा!
तुम्ही जसे वागाल तसेच ती वागतील! तुम्ही जसे बोलाल तसेच ती बोलतील!
समाजातले सर्व माता-पिता असे करतील तर, सर्व समाजाची उन्नती आपोआप घडून येईल.
त्यासाठी वेगळे काही करायची गरजच नाही. पण असे होत नाही हेच तर आपल्या समाजाचे दुखणे आहे!
त्याच बरोबर संख्येने कमी असतील, पण समाजामधे अशी अनेक माणसे असतात जी समाजाचे ऋण मानतात आणि ते यथाशक्ती फेडण्याचा प्रयत्नही करतात. सर्व समाजासाठी उपयुक्त अशा अनेक गोष्टी करतात.
कसलीही अपेक्षा न ठेवता, निरपेक्षपणे करतात. समाजकार्य म्हणून करतात. असे निरपेक्ष कार्य हे सर्वात उत्तम कार्य मानले पाहिजे. निष्काम कर्म मानले पाहिजे. आपले धर्मशास्त्र काय सांगते ते नीट ऐका.
'' तुम्ही एकातरी कुटुंबाला रहायला जागा दिली असेल तरच तुम्हाला स्वत:च्या मालकीच्या घरात रहायचा अधिकार आहे!
तुम्ही दररोज एकातरी माणसाला अन्नदान करत असाल तरच तुम्हाला अन्न ग्रहण करायचा अधिकार आहे!
अन्नदान, वस्त्रदान आणि विद्यादान ह्या प्रत्येक गृहस्थाश्रमी माणसाच्या सामाजिक जबाबदाऱ्या आहेत. त्या प्रत्येकाने पार पाडल्याच पाहिजेत. स्वत:ला प्रत्यक्षपणे पार पाडता येत नसतील तर त्या कार्यासाठी शक्य होईल तेवढी आर्थिक मदत केली पाहिजे.
त्यासाठी स्वत: कष्ट करून मिळवलेल्या धनामधून, राजाचा करभार देऊन झाल्यानंतर उरलेल्या धनाचा दहावा भाग दानराशी समजून, दान करणे आपले कर्तव्य आहे अशा बुद्धीने, योग्य स्थल-काल-पात्र यांचा विचार करून, दान केले पाहिजे.''
आपण असे काही करतो का? निदान त्याविषयी विचार तरी करतो का?

धर्मशास्त्रामधे माणसाच्या प्रवृत्ती विषयी काही विधाने केली आहेत. ती फार महत्त्वाची आहेत. विचार करण्यासारखी आहेत.
आपण ऐका आणि त्यावर विचार करा.

१) भूक लागली असताना, काहीतरी खाणे ही **प्रकृती** आहे.
येथे मर्यादित श्रद्धा असावी लागते. ' आपण खाणार असलेली गोष्ट शरीराला अपाय करणार नाही,' हा विश्वास असावा लागतो.
भूक भागणे हे त्या कर्माचे फळ असेल.

२) भूक लागली नसतानाही, सारखे खात राहणे ही **विकृती** आहे.
येथे श्रद्धा नाहीच आहे. ' आपल्याला खायची गरज आहे की नाही? आपण खाल्ले नाही तर चालणार नाही काय? आपण खाणार असलेली गोष्ट शरीराला अपाय करील की नाही?' इत्यादी विचार संभवत नाहीत. येथे केवळ कामना आणि वासनांचा अतिरेक आहे. अमर्याद लोभ आहे. समोर जे दिसेल आणि खाता येणार असेल ते सगळे सतत खात रहायचे. स्वत:ला हवे ते आणि तेच करायचे. इतरांचा विचारच करायचा नाही. शारिरीक आणि मानसिक त्रास सुरू होणे, अस्वस्थता आणि अशांती उत्पन्न होऊन त्यायोगे अमर्याद यातना भोगाव्या लागणे, हे त्या कर्माचे फळ असेल.

३) भूक लागली असताना, काहीतरी खाऊन ती भागवीत असताना, इतरांचा विचार करून, त्यांची भूक भागावी म्हणून, आपल्या जवळ असलेल्या अन्नाचा काही भाग इतरांना निरपेक्षपणे सदिच्छापूर्वक देणे, ही **संस्कृती** आहे. ह्यामधे स्वार्थ आहेच परंतु परमार्थही आहे. स्वत:च्या बरोबर इतरांचा विचार केला जातो आहे. म्हणजेच श्रद्धेचे प्रमाण वाढलेले आहे. इतरांना यथाशक्ती मदत करून त्यांची भूक भागविण्याची इच्छा निर्माण झाली आहे. मर्यादित ऐहिक आणि पारमार्थिक लाभ हे त्या कर्माचे फळ असेल.

४) भूक लागली असतानाही, ती न भागवता, स्वत: उपाशी राहून आपल्या जवळ असलेले सर्व अन्न इतरांची भूक भागावी ह्याच एकमेव हेतूने, भुकेल्यांना देणे ही त्यापुढची पायरी आहे. हे **संस्कृतीचे विकसित स्वरूप** आहे.
येथे अनन्य श्रद्धा आहे. सुसंस्कारांची परमावधी आहे. पराकाष्ठा आहे. इतरांच्या कल्याणाची भावना आहे.
अमर्यादित ऐहिक आणि पारमार्थिक लाभ हेच त्या कर्माचे फळ असेल.
ह्यावर आणखी काय सांगायचे. काही सांगायची आवश्यकता आहे काय?
माझी आपणा सर्वांना नम्र विनंती आहे. आग्रह आहे की, आपण सर्वांनी ह्यावर सकारात्मक विचार करा आणि त्यानंतर सर्व समाजासाठी जे शक्य होईल ते, अल्प प्रमाणात का होईना, पण काहीतरी करायचा प्रयत्न करा. असो.

**येथे सतरावा अध्याय समाप्त झाला आहे.**

ह्या अध्यायामधे अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देताना, **' श्रद्धा, आहार, यज्ञ, तप आणि दान '** ह्यांचे, सात्विक, राजस आणि तामस हे तीन प्रकार सांगितले आणि त्यांच्यामुळेच माणसांच्या स्वभावामधे असलेले भेद निर्माण होतात असे सांगितले.
त्यानंतर सर्व विश्व निर्माण करणाऱ्या परब्रह्माचे स्वरूप **' ॐ तत् सत् '** ह्या तीन शब्दात सामावलेले आहे असे सांगून,
कोणतेही कर्म करायला सुरवात करताना **ॐ**, कर्म करीत असताना **तत्** आणि कर्म करून झाल्यावर **सत्** ह्यांचा उच्चार केला तर ते कर्म सत्कर्म होते, ब्रह्मरूप होते, मुक्तिदायक होते असे सांगितले.
अखेरीस ' श्रद्धाहीन कर्म हे व्यर्थ ठरते. त्यापासून इहलौकिक लाभही होत नाही आणि पारलौकिक लाभही होत नाही,' असे सांगितले.
आता ह्या पुढील अध्याय गीतेचा अखेरचा अध्याय आहे.
गीतेचा समारोप करणारा अध्याय आहे.
त्या अध्यायाला **' एकाध्यायी गीता '** असेही म्हणतात.
त्या अध्यायामधे अर्जुन काय विचारतो आणि श्रीकृष्ण भगवान त्याला काय उत्तर देतात ते पाहूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

# <u>अध्याय अठरावा</u>

**— हरि ॐ —**

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आज आपल्याला गीतेच्या अठराव्या अध्यायाविषयी चर्चा करायची आहे.
हा अठरावा अध्याय म्हणजे गीतेचा शेवटचा अध्याय आहे.
गीतेच्या समारोपाचा अध्याय आहे. संपूर्ण गीतेचा सारांश सांगणारा अध्याय आहे.
हा अठरावा अध्याय कसा आहे त्याविषयी ज्ञानेश्वर महाराजांनी फार सुंदर विधान केलेले आहे.
अठराव्या अध्यायाच्या सुरवातीलाच <u>**ज्ञानदेव**</u> काय म्हणतात ते नीट लक्षपूर्वक ऐका!

**जी गीतारत्नप्रासादाचा । कळसु अर्थचिंतामणीचा ।**
**सर्व गीता दर्शनाचा । पाढाऊं जो ।। ३० ।।**
**लोकीं तरी आथी ऐसे । जे दुरूनि कळसू दिसे ।**
**आणी भेटीचि हातवसे । देवतेची तिये ।। ३१ ।।**
**तैसेचि एथही आहे । जे एकेचि येणे अध्याये ।**
**आघवाचि दृष्ट होये । गीतागमु हा ।। ३२ ।।**
**मी कळसु याचि कारणे । अठरावा अध्यायो म्हणे ।**
**उवाइला बादरायणे । गीताप्रासादा ।। ३३ ।।**
**नोहे कळसापरते काही । प्रासादी काम नाही ।**
**ते सांगतसे गीता ही । संपलेपणे ।। ३४ ।।**

अर्थ — हा अठरावा अध्याय म्हणजे गीतारूपी रत्नमंदिराचा, अर्थरूपी चिंतामणीचा बनविलेला कळस आहे. संपूर्ण गीतेचे दर्शन घडविणारा वाटाड्या आहे. लोकांची अशी समजूत असते की दुरून देवळाचा कळस दिसला म्हणजे देवळातील देवतेचे दर्शन घेतल्याचे श्रेय प्राप्त होते. गीतेलाही तोच न्याय लागू आहे. ह्या एकाच अध्यायाच्या चिंतनाने संपूर्ण गीताशास्त्राच्या दर्शनाचे श्रेय प्राप्त होते. याच कारणासाठी, ‘ श्रीव्यासांनी गीतारूपी मंदिरावर ह्या अठराव्या अध्यायाचा कळस चढविला आहे.’ असे मी म्हणतो. कळस चढवल्यावर मंदिराचे काम संपले असे समजत नाहीत का? त्याचप्रमाणे हा अध्याय गीता पूर्ण झाली असे दाखवतो.

ह्या अठराव्या अध्यायामधे संपूर्ण गीतोपदेशाचे सार दिलेले आहे, ह्याविषयी सर्व विद्वानांचे एकमत आहे.
म्हणूनच ह्या अध्यायाला <u>**एकाध्यायी गीता**</u> असेही म्हणतात.
ह्या अध्यायाच्या चर्चेला सुरवात करण्यापूर्वी गीतेमधे आतापर्यंत कोणकोणत्या विषयांवरील विवेचन केले गेलेले आहे, ते परत एकदा पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे पुढील चर्चा करणे सुलभ होईल असे मला वाटते.

<u>**पहिल्या**</u> अध्यायामधे, स्वकीयांच्या विषयीच्या आसक्तीमुळे शोकग्रस्त होऊन अर्जुनाने स्वधर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्तव्याचे पालन करण्यास नकार दिला आणि तो शस्त्रत्याग करून रथामधे रडत बसला.( **अर्जुनविषादयोग** )

<u>**दुसऱ्या**</u> अध्यायाच्या अकराव्या श्लोकापासून गीतोपदेशाला सुरवात झाली. तेथून पुढे अडतिसाव्या श्लोकापर्यंत, सांख्ययोग म्हणजेच ज्ञानयोग आणि क्षत्रियाचा धर्म ह्या दोन विषयांचे विवेचन करून झाले. त्यानंतर चाळीसाव्या श्लोकापासून अध्यायाच्या अखेरपर्यंत निष्काम कर्मयोगाचे विवेचन करून, स्थितप्रज्ञ माणसाची लक्षणे सांगितली. ( **सांख्ययोग** )

<u>**तिसऱ्या**</u> अध्यायामधे कर्मयोगाचेच विवेचन सुरू राहिलेले असून, माणसाने आपले विहितकर्म ‘ का करायचे?’ आणि ‘ का टाळायचे नाही?’ ते स्पष्टपणे, स्वच्छपणे आणि सविस्तर सांगितले. ( **कर्मयोग** )

<u>**चवथ्या**</u> अध्यायामधे कर्मयोग आणि ज्ञानयोग ह्या दोनही विषयांचे तुलनात्मक विवेचन केलेले आहे. निष्काम बुद्धीने कर्मे केली म्हणजे कर्मांचे बंधन पडत नसल्यामुळे ती मोक्ष मार्गाला अडथळा ठरत नाहीत. तसेच कर्मयोगाच्या आश्रयाने अंतिमत: परमेश्वराच्या विषयीचे ज्ञान प्राप्त होते. त्याने मनामधले सर्व संशय नाहीसे होऊन मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो. म्हणून ‘ केवळ ज्ञानयोग किंवा केवळ कर्मयोग न स्वीकारता, त्या दोघांचाही आश्रय घेऊन, आपले कर्तव्यकर्म पार पाडणेच योग्य,’ असे सांगितले. ( **ज्ञानकर्मसंन्यासयोग** )

<u>**पाचव्या**</u> अध्यायामधे तुलनात्मक विवेचन सुरू राहिलेले असून, निष्काम कर्मयोग हा कर्मसंन्यासाच्या तुलनेत आचरण्यास सोपा आहे

आणि म्हणूनच श्रेष्ठ आहे असे सांगून, अखेरीस ‘ कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे वरवर वेगवेगळे भासत असले तरी ते तत्त्वत: एकच आहेत. त्यांचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती हेच आहे,’ असे सांगितले. **( संन्यासयोग )**

**सहाव्या** अध्यायामधे माणसाला निष्काम कर्मयोगाचे यथायोग्य आचरण करता येण्यासाठी अगोदर आपले मन ताब्यात ठेवता आले पाहिजे. त्यासाठी ध्यानयोगाची साधना महत्त्वाची आहे असे सांगितले. ध्यानयोगाच्या साधनेने आपले मन आणि इंद्रियांचे संयमन कसे करायचे, त्यांना योग्य वळण कसे लावायचे ते सांगून, ध्यानयोग सिद्ध झालेल्या आणि पूर्णावस्थेला पोहोचलेल्या साधकाची अवस्था कशी होते तेही सांगितले. **( ध्यानयोग )**

**सातव्या** अध्यायामधे ज्ञान आणि विज्ञान, अपरा प्रकृती आणि परा प्रकृती, सर्व विश्व परमेश्वरापासूनच उत्पन्न झालेले असूनही, तो विश्वापासून वेगळा कसा आहे आणि वस्तुमात्रांमधे त्याचे अस्तित्व कशा प्रकारे आहे, ह्या विषयी विवेचन केले. **( ज्ञानविज्ञानयोग )**

**आठव्या** अध्यायामधे ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ आणि अधिदेह म्हणजे ह्या देहामधे राहणारा कोण आहे ह्याविषयी माहिती सांगितली. त्यानंतर अंतकाली केलेल्या परमेश्वराच्या चिंतनाने मोक्ष मिळतो असे सांगितले.
ब्रह्मलोकासह सर्व लोक अनित्य असून, केवळ परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानानेच जन्म मरणाच्या चक्रामधून सुटका होत असल्यामुळे ते ज्ञान सर्वात श्रेष्ठ आहे असे सांगितले. ब्रह्मदेवाचे दिवस आणि रात्र व त्यावेळी घडून येणाऱ्या सर्व सृष्टीच्या उत्पत्ती आणि लय ह्या विषयी सांगून पुढे, ह्या सर्व अव्यक्ताच्याही पलीकडे असणारा अव्यक्त आणि अक्षर असा पुरुष ( परमात्मा ) हा भक्तिमार्गाने प्राप्त होऊ शकतो आणि एकदा त्याची प्राप्ती झाल्यावर जीवाला मोक्ष मिळतो असे सांगितले. शुक्लगती म्हणजेच देवयान मार्ग आणि कृष्णगती म्हणजेच पितृयाण मार्ग ह्यांची माहिती देऊन त्यांचे परिणामही सांगितले. **( अक्षरब्रह्मयोग )**

**नवव्या** अध्यायामधे, ‘ विज्ञानासहित ज्ञानाचा ’ विषय सांगण्यात आलेला आहे. परब्रह्म परमात्मा परमेश्वर कसा आहे? त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे? ह्याविषयी म्हणजेच त्याच्या माहात्म्याविषयी सांगून, सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे आणि तरीही त्यापासून तो कसा वेगळा आहे, ते सांगितले. **( राजविद्या राजगुह्ययोग )**

**दहाव्या** अध्यायामधे अव्यक्त अशा परब्रह्म परमात्म्याची व्यक्त होण्याची क्षमता म्हणजेच प्रभाव हा अगम्य का असतो? तसेच त्याची एकूण व्याप्ती कशी आणि किती आहे? आणि सर्व विश्वाला तो कसा व्यापून राहिला आहे, ह्या विषयी विस्ताराने सांगून झाल्यावर, सर्व विश्वामधे कार्यरत असलेल्या, प्रमुख म्हणता येतील अशा त्र्याऐंशी दिव्य विभूती सांगितल्या. **( विभूतियोग )**

**अकराव्या** अध्यायामधे अर्जुनाचे कुतुहल शमविण्यासाठी परमेश्वराचे मूळचे स्वरूप म्हणजेच विश्वरूप दाखवले. त्या विश्वरूपाच्या दर्शनाने अर्जुन अंतर्बाह्य ढवळून निघाला. पार बदलून गेला. **( विश्वरूपदर्शनयोग )**

**बाराव्या** अध्यायामधे निर्गुणभक्तीच्या तुलनेत सगुणभक्ती करणे सुलभ, सहज जमण्यासारखे आणि सुखकारक असल्यामुळे सगुणभक्ती ही उत्तम असून सगुणभक्त मला अधिक प्रिय आहे असे सांगून, परमेश्वराची भक्ती कशी करायची? कशा प्रकारे करायची? त्यासाठी कोणकोणते मार्ग अनुसरायचे? एखादा मार्ग अनुसरणे शक्य होत नसेल तर मग त्याहून सुलभ असा दुसरा मार्ग कोणता आहे? ह्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. **( भक्तियोग )**

**तेराव्या** अध्यायामधे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्या दोन संकल्पनांच्या विषयी माहिती सांगण्यात आली. ‘ क्षेत्र म्हणजे काय? क्षेत्रज्ञ म्हणजे कोण? ज्ञान म्हणजे काय? आणि अज्ञान म्हणजे काय?’ ह्या चारही प्रश्नांचे सविस्तर विवेचन केले. त्यानंतर तोच विचार, सांख्यांच्या परिभाषेत म्हणजेच प्रकृति आणि पुरुष ह्या रूपामधे सांगायला सुरवात केली. येथपर्यंत आपल्याला सर्वत्र दिसणारे जग आणि परमात्मा ह्यांच्याविषयीचा विचार, **‘ क्षर - अक्षर ’ ‘ क्षेत्र - क्षेत्रज्ञ ’** आणि **‘ प्रकृति - पुरुष ’,** अशा एकूण तीनही प्रकारांनी सांगून झाला. **( क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग )**

**चौदाव्या** अध्यायामधे प्रकृती आणि पुरुषापासून विश्वाची उत्पत्ती होते असे सांगितले. प्रकृतीचे तीन गुण कोणते आणि त्यांचे परिणाम कोणते ते सांगितले. त्रिगुणांचा एकूण प्रभाव कसा असतो आणि ते प्राणिमात्रांच्यावर कोणकोणत्या प्रकारे वर्चस्व गाजवतात ते सांगून, त्यांच्यापासून सुटका करून घेण्याचा परिणामकारक असा मार्ग कोणता ते ही सांगितले. त्रिगुणांच्या पलीकडे गेलेल्या म्हणजेच त्रिगुणातीत अशा पुरुषाची लक्षणे व आचार कसे असतात ते सांगून, ती अवस्था स्थिर रहावी म्हणून परमेश्वराची अव्यभिचारी भक्ती करीत रहायला सांगितले. **(गुणत्रयविभागयोग )**

**पंधराव्या** अध्यायाच्या सुरवातीला सर्व संसाराला एका महान वृक्षाची उपमा दिली आहे. त्या वृक्षाचे वर्णन केले आहे आणि त्यामधून सुटण्याचा मार्गही सांगितला आहे. त्यानंतर सूक्ष्म देह हा स्थूलदेहामधे प्रवेश करताना काय करतो, स्थूलदेहामधे राहून विषयोपभोग कसा घेतो व त्याला सोडून जाताना काय करतो ते सांगितले. परमेश्वराचे सर्वव्यापित्व सांगून झाल्यावर क्षर आणि अक्षर आणि त्याच्याही पलीकडे असलेला पुरुषोत्तम ह्यांच्याविषयी माहिती सांगून, त्या पुरुषोत्तमाविषयीचे ज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्याला आणखी काही समजून

घेण्यासारखे शिल्लक रहात नाही. तो सर्वज्ञ व कृतार्थ होतो असे सांगितले. **( पुरुषोत्तमयोग )**

**सोळाव्या** अध्यायामधे सुरवातीला दैवी संपदेचे वर्णन करून तिचे आचरण हे मोक्षप्राप्ती करून देणारे आहे असे सांगितले. त्यानंतर आसुरी संपदेचे सविस्तर वर्णन केले आहे. आसुरी प्रवृत्तीच्या माणसांचे विचार कसे असतात, आचार कसे असतात, त्याचे कोणते परिणाम होतात आणि ते सर्व समाजाला कसे त्रासदायक होतात ते सविस्तर सांगितले. **( दैवासुरसंपद्विभागयोग )**

त्यानंतर मागील **सतराव्या** अध्यायामधे अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देताना, ' श्रद्धा, आहार, यज्ञ, तप आणि दान ' ह्यांचे, सात्त्विक, राजस आणि तामस हे तीन प्रकार सांगितले आणि त्यांच्यामुळेच माणसांच्या स्वभावामधे असलेले भेद निर्माण होतात असे सांगितले. नंतर सर्व विश्व निर्माण करणाऱ्या परब्रह्माचे स्वरूप हे, **' ॐ तत् सत् '** ह्या तीन शब्दात सामावलेले आहे असे सांगून, कोणतेही कर्म करायला सुरवात करताना **ॐ**, कर्म करीत असताना **तत्** आणि कर्म करून झाल्यावर **सत्** ह्यांचा उच्चार केला तर ते कर्म सत्कर्म होते, ब्रह्मरूप होते, असे सांगितले. अखेरीस ' श्रद्धाहीन कर्म हे व्यर्थ ठरते. त्यापासून इहलौकिक लाभही होत नाही आणि पारलौकिक लाभही होत नाही.' असे सांगितले. **( श्रद्धात्रयविभागयोग )**

आतापर्यंत अर्जुनाकडून अनेक प्रश्न विचारले गेले आहेत आणि त्या प्रश्नांची उत्तरे देताना भगवंताकडून अनेक विषयांचे सविस्तर विवेचन केले गेले आहे. **येथे एक महत्त्वाची गोष्ट आपल्या लक्षात आली काय?**

प्रश्न कोणताही असला आणि त्याचे उत्तर देताना कोणत्याही विषयाचे विवेचन केलेले असले तरी ते सगळे विवेचन हे प्रामुख्याने दोन दृष्टिकोनांमधून केलेले आहे. पहिला दृष्टिकोन हा **कर्मयोग्याचा** आहे आणि दुसरा दृष्टिकोन **ज्ञानयोग्याचा** आहे.

मोक्षप्राप्तीसाठी जे जे उपाय सांगितले गेले आहेत, ते ते सगळे ह्या दोन दृष्टिकोनामधून सांगितलेले आहेत.

त्यातही कर्मयोग्याचा दृष्टिकोन वरचढ ठरला आहे. कारण —

**' अर्जुनाला परत युद्धासाठी प्रवृत्त करणे, हातामधे शस्त्र धरायला लावून शत्रूच्या बरोबर लढण्यासाठी उभा करणे,'**

हाच भगवंताचा मुख्य हेतू आहे.

त्यामुळे तो हेतू साध्य करण्यासाठी प्रामुख्याने कर्मयोग्याच्या दृष्टिकोनामधून विचार करणे आणि तसेच विवेचन करणे क्रमप्राप्त आहे. अनेक अध्यायांमधे ज्ञानयोगाचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

परंतु ते करीत असताना, ' ज्ञानयोगाचे महत्त्व आणि आवश्यकता सांगण्याबरोबरच, कर्मयोगाचे महत्त्व आणि आवश्यकता सिद्ध करून, अंतिम ध्येय गाठण्याच्या दृष्टीने दोन्ही मार्ग सारखेच उपयुक्त आहेत. ज्याला ज्या मार्गाचे आचरण करणे आवश्यक असेल, शक्य असेल, इष्ट असेल आणि योग्य असेल, त्या मार्गाचे आचरण करून त्याने इहपरलोकीचे कल्याण साधावे,' असेच सांगितलेले आहे.

इतका वेळ अर्जुनाला समजावण्याचा प्रयत्न चाललेला आहे. परंतु त्याला कधीही,

' तू कर्मत्याग करून आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न कर! **श्रेष्ठ ज्ञानयोगी हो!**',

' सगळे सोडून तू ध्यानधारणेचा मार्ग अनुसरायला लाग! **श्रेष्ठ राजयोगी हो!**',

' सगळे सोडून तू परमेश्वराची भक्ती करायला लाग! **श्रेष्ठ भक्तियोगी हो!**'

असे काहीही सांगितलेले नाही. त्याउलट नेहमी —

' स्वधर्माला अनुसरून समोर आलेले कर्तव्यकर्म, फळाची आशा न ठेवता, उत्तम प्रकारे कर! **श्रेष्ठ कर्मयोगी हो!**' असेच सांगितलेले आहे.

सर्वात जास्त चर्चा भक्तियोगावर झालेली आहे. तरीही त्यामागील मुख्य हेतू **' अर्जुनाला युद्ध करायला तयार करणे '** हाच आहे. अनेक विषयांची चर्चा केली. त्यावर भाष्य करून आपले मत स्पष्टपणे सांगितले. परंतु तशा प्रत्येक चर्चेच्या अखेरीस अर्जुनाला इतर सर्व गोष्टी सोडून, केवळ **निष्काम कर्मयोगाचे** आचरण करायला सांगितले आहे. असो.

ह्या अध्यायाच्या सुरवातीला अर्जुनाने आपला अखेरचा प्रश्न विचारला आहे.

त्यामागचे कारण काय असेल ह्याविषयी अनेक विद्वानांनी आपापली मते मांडली आहेत.

त्यातली काही मते आपण समजून घेऊया.

१) अर्जुनाच्या मनामधे विचार आला की, ' कर्मावरच भर असलेल्यांना देवाने कमी लेखले आहे असे वाटते. कर्मे ही जन्म मरणास कारणीभूत आहेत. कर्माच्या अंगी असा दुष्ट धर्म आहे. कर्म यथासांग घडले तर त्याला ज्ञानाची योग्यता येते एरवी तेच कर्म नरकप्राप्तीला कारणीभूत होते. कर्मामधे नेहमीच अनंत अडचणी असतात मग त्यामुळे मोक्ष मिळणे कसे घडेल? उलट संन्यासमार्गामधे कर्मबाधेसारखा धोका नाही आणि आत्मज्ञानही प्राप्त होते. म्हणून अशा स्वभावतःच दोषयुक्त असलेल्या कर्माचा संपूर्ण त्याग करून निर्दोष असा जो कर्मसंन्यास त्याचा स्वीकार करावा हेच योग्य.' असा विचार करून त्याग आणि संन्यास ह्यातील फरक स्पष्टपणे कळावा म्हणून अठराव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुनाने प्रश्न केला.

२) ‘ ज्ञानी पुरुषाने, ज्ञानप्राप्ती झाल्यावरही लोकसंग्रहार्थ, केवळ कर्तव्य म्हणून निष्काम बुद्धीने चातुर्वर्ण्यविहित कर्मे केली पाहिजेत.’ असेच गीता सांगते आहे. तथापि निष्काम बुद्धीने का होईनात, पण आमरणांत जर कर्मे करावयाची, तर मग स्मृतिग्रंथात सांगितलेला चतुर्थाश्रम म्हणजेच संन्यासाश्रम त्याची वाट काय, हे सांगणे जरूर आहे. भगवान् केव्हा तरी ‘ कर्मत्यागरूपी संन्यास घेतल्याखेरीज मोक्ष मिळत नाही.’ असे सांगतील आणि मग युद्ध सोडून देण्यास आपल्याला आयती संधी मिळेल, असे अर्जुनास वाटत होते. परंतु सतराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत ती गोष्ट भगवंतानी काढलीच नाही. फलाशा सोड आणि कर्मे कर एवढाच उपदेश केला.
म्हणून अठराव्या अध्यायाच्या आरंभी ‘ तर मग संन्यास आणि त्याग यातील तत्व काय ते मला सांगा.’ असा अर्जुनाने प्रश्न विचारला.
३) जर गीतेची सर्व शिकवण पाहिली तर जागोजागी कर्मत्याग करू नका असाच बोध आहे. गीता कर्माचा नाही तर कर्मफलाचा त्याग सांगते आहे. कर्म सतत करायचे आणि त्याच्या फळाचा त्याग करायचा ही शिकवण सर्वत्र पाहून घ्यावी. पण ही एक बाजू झाली. दुसरी बाजू अशी दिसते की काही कर्मांचा स्वीकार करायचा आणि काही कर्मांचा त्याग करायचा. म्हणून शेवटी अठराव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुनाने प्रश्न केला की, ‘ कोणतेही कर्म फलत्यागपूर्वक करायचे ही एक बाजू. काही कर्मे अवश्यमेव टाकावीत आणि काही कर्मे करावीत ही दुसरी बाजू. यांचा मेळ कसा घालायचा?’ फलत्यागाचे मर्म समजण्यासाठी हा प्रश्न विचारला आहे.
४) भौतिक प्रकृतीच्या तीन गुणांच्या पलीकडील दिव्य स्थिती प्राप्त करून घेणे हेच जीवनाचे लक्ष्य असल्याचे आणि त्यासाठी आपले कर्म करीत असताना, परमेश्वराची अनन्य भक्ती करून, प्रत्येक कर्म त्याला अर्पण करणे हाच मार्ग सांगितलेला आहे. त्यावर विचार करीत असताना अर्जुनाला, त्याग आणि संन्यास हे दोन वेगवेगळे विषय स्पष्टपणे समजून घेण्याची इच्छा झाली. म्हणून अठराव्या अध्यायाच्या आरंभी त्याने ‘ संन्यास आणि त्याग ह्या दोन शब्दांचा अर्थ काय? ’ असा प्रश्न विचारला.
५) संन्यासयोगामधे कर्माचा स्वरूपत:च त्याग करायला सांगितलेला आहे तर कर्मयोगामधे फलाशा न बाळगता सतत कर्म करीत रहायला सांगितलेले आहे. त्याविषयी आलेला संशय दूर व्हावा म्हणून शेवटी अठराव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुनाने श्रीकृष्णाला, ‘ संन्यास आणि त्याग ह्यामधे कोणता भेद आहे?’ असा प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच सगळा अठरावा अध्याय आहे.
ह्याशिवाय आणखी अनेक मते मांडली गेलेली आहेत आणि ती मते मांडणारे सगळे आदरणीय आणि पूजनीय विद्वान आहेत.
हे सगळे वाचताना नेहमी प्रमाणे माझा गोंधळ व्हायला लागला.
मी विद्वान नसल्यामुळे त्यांची मते खोडून काढणे मला शक्य होत नाही.
त्याच बरोबर त्यांच्या मतांशी पूर्णपणे सहमतही होता येत नाही. मग मी एक गोष्ट केली.
त्या सर्व विद्वानांना मनोमन नमस्कार करून त्यांचे विचार बाजूला ठेवले आणि यथाशक्ती यथामती स्वत:च विचार करायला सुरवात केली. म्हणजे त्यांचा आधार घेऊनच विचार केला, पण स्वतंत्रपणे केला.
त्यानंतर मला जे काही जाणवले, ज्याची शक्यता वाटली ते तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करतो.
सांगताना माझे काही चुकले तर आपण मला क्षमा करावी ही नम्र विनंती. असो.
येथे मी आपल्याला काही महत्त्वाची माहिती सांगतो.
**दुसऱ्या** अध्यायाच्या अकराव्या श्लोकापासून प्रत्यक्ष गीतोपदेशाला सुरवात झाली.
येथपर्यंत सतरा अध्याय पूर्ण झालेले असून आता यापुढे अठराव्या अध्यायाला सुरवात होणार आहे.
म्हणजे परिस्थिती कशी आहे ते समजून घ्या. आतापर्यंत **संपूर्ण गीतेचे** ६२२ श्लोक झालेले आहेत.
आता विचारण्यात येत असलेल्या प्रश्नाचा श्लोक हा ६२३ वा आहे.
आतापर्यंत **अर्जुनाचे** ८२ श्लोक झालेले आहेत.
आता विचारण्यात येत असलेला प्रश्न हा त्याचा ८३ वा श्लोक आहे.
आतापर्यंत **प्रत्यक्ष गीतोपदेशाचे** ५०५ श्लोक सांगून झालेले आहेत.
गीतेचे सर्व अठरा अध्याय सलग म्हणायला मला तीन तास लागतात. कारण माझी गीता तोंडपाठ नाही.
सर्व अध्याय वाचून म्हणावे लागत असल्यामुळे मला इतका वेळ लागतो.
भगवान् श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता उत्स्फूर्तपणे सांगितलेली आहे.
त्यामुळे त्याला इतका वेळ लागला नसेल असे गृहीत धरले, तरीही अकराव्या अध्यायामधे विश्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शन घडविताना आणि ते परत आवरून घेताना त्याला थोडा अधिक वेळ लागला असेल.
त्यामुळे गीतोपदेश करायला सुरवात केल्यापासून आतापर्यंत सुमारे दीड तास तरी झाला असेल असे वाटते.
म्हणजेच ह्याचा दुसरा अर्थ असा की, भगवंताचा उपदेश ऐकणे, त्यावर विचार करणे आणि प्रश्न विचारणे ही क्रियाही तितकाच वेळ चाललेली आहे. ती क्रिया अर्जुनाकडून घडून येते आहे. गेला दीड तास तो वेगवेगळ्या विषयांवरचे विवेचन ऐकतो आहे.
त्याने आतापर्यंत जे ऐकले ते सगळेच्या सगळे त्याच्या लक्षात राहिले असेल असे मला तरी वाटत नाही.

कोणीही जरी झाला आणि कितीही बुद्धिमान असला तरीही, अगोदर ठरविलेले नसताना, कोणतीही कल्पना नसताना, अचानकपणे केले गेलेले इतके मोठे आणि गहन व्याख्यान जसेच्या तसे संपूर्णपणे लक्षात राहणे शक्य नाही.
अहो ऽऽ, इतकी वर्षे गीता म्हणत असूनही, मनन, चिंतन करीत असूनही, गीतेचा अभ्यास करीत असूनही,
जर कोणी मला अचानकपणे ' कोणत्यातरी एका अध्यायातील एखाद्या श्लोकाचा ' अर्थ विचारला तर पटकन सांगता येणार नाही.
पुस्तकामधे पाहून, श्लोक नीट वाचून, त्यावर विचार करून, त्याच्या मागील आणि पुढील श्लोकाचा संदर्भ समजून घेऊन त्यानंतर मग अर्थ सांगता येईल.
अर्जुन तर हे सगळे पहिल्यानेच ऐकतो आहे. मुख्य म्हणजे गुरुजींच्या समोर तो एकटाच बसलेला आहे.
आठवण करून देण्यासाठी, त्याच्या शेजारी दुसरा एखादा विद्यार्थी बसलेला नाही आणि त्याच्या हातामधे गीतेचे पुस्तकही नाही.
काही म्हणता काहीही नाही. गुरुजींनी सांगितलेले ऐकायचे, त्यावर विचार करायचा, ते लक्षात ठेवायचे आणि मनामधे आलेली शंका विचारायची, अशीच प्रक्रिया चाललेली आहे.
त्यातही विश्वरूपदर्शनाच्या नंतर त्याच्या मनावर कल्पनातीत परिणाम झाला आहे.
' आपण जे पहायची इच्छा केली होती त्यामधे असे काही भयानक पहावे लागेल ' ह्याची त्याला कल्पनाच नसल्यामुळे तो अंतर्बाह्य ढवळून निघाला आहे. त्याने रणभूमीवरील सगळ्या रथी - महारथींना, अत्यंत वाईट अवस्थेमधे, तडफडून मरताना पाहिले आहे. आता ह्या सर्वांचा अंत होणार आहे हे त्याला समजलेले आहे.
' आपण युद्ध केले नाही तरीही असेच होणार आहे. त्यांचे मरण निश्चित आहे. काहीही केले तरी ते टाळता येणार नाही.' हे ही त्याला माहीत झालेले आहे. ह्या सगळ्याचा सहज परिणाम काय झाला असेल बरे?
अहो ऽ, अगोदर ऐकलेले सगळे काही तो पार विसरूनच गेला असेल. तीच शक्यता सर्वांत जास्त असेल. आपण जरा विचार करा.
त्याच्या मनामधे, युद्ध न करण्याचा विचार शिल्लक राहिलाच नसेल. आतापर्यंत ऐकलेल्या ' ज्ञानयोग, कर्मयोग, राजयोग, भक्तियोग ' इत्यादी सगळ्या योगांनी त्याच्या मनामधून पलायन केले असेल. आता तेथे केवळ **भययोग** उरला असेल.
' आता भगवान जे करायला सांगत आहे तेच करायचे. जास्त शहाणपणा करायचा नाही. बडबड बंद करायची आणि केवळ युद्ध करायचे. बाकीचे सगळे तो बघून घेईल. त्याला जे काही करायचे असेल ते करील.' केवळ हाच विचार उरला असेल.
कितीही विचार केला ना, तरी मला तसेच वाटते. त्यालाही कारण आहे.
**' अत्यंत बुद्धिमान, ज्ञानी आणि अत्यंत पराक्रमी असा शूरवीर महारथी '** म्हणून ख्यातनाम असला तरीही, अर्जुनाला मी तुमच्या माझ्यासारखाच एक सामान्य माणूस मानतो. तो तसा नसता तर त्याने रणांगणामधे शस्त्रत्याग केलाच नसता.
अर्जुनाच्या जागी आपण स्वत: आहोत अशी कल्पना करा आणि मग, —
' जे पाहणे नको, ते पाहिल्यावर आपली काय हालत होईल?' ह्याचा विचार करा. मग आपल्यालाही माझे सांगणे पटेल. असो.
श्रीकृष्णाने विश्वरूप आवरून घेऊन आपले नेहमीचे सौम्य रूप दाखवल्यावर त्याने आपल्या हातांमध्ये श्रीकृष्णाचा हात घट्ट धरला आणि त्यावर मस्तक टेकले. हळूहळू त्याच्या अंगाचा कंप थांबला. आपण जिवंत असल्याची खात्री पटली.
त्यानंतर तो भगवंताला काय म्हणाला आहे ते परत एकदा नीट ऐका.
' हे जनार्दना ऽऽ! तुमचे हे नेहमीचे सौम्य रूप पाहिल्यावर आता माझे मन शांत झाले आहे. ठिकाणावर आले आहे. मी पूर्ववत सावध झालो आहे. तुम्ही दाखविलेल्या त्या विश्वरूपाच्या सागरामध्ये मी गटांगळ्या खात होतो! माझी सर्व इंद्रिये मृतप्राय झाली होती ऽऽ! सगळी जाणीव नाहीशी झाली होती. माझी वाचा बंद पडत आली होती आणि बुद्धीला ज्ञानाचा विसर पडला होता. परंतु आता तुमच्या कृपेने आणि तुमच्या दर्शनाने मी किनाऱ्याला लागलो आहे. माझा जगण्याविषयीचा संशय नाहीसा झाला आहे.'
हे सांगितल्यावरही, शरीराचा कंप थांबल्यावरही, त्याची भीती कमी झालेली नव्हती.
म्हणून श्रीकृष्णाने अत्यंत स्नेहपूर्वक दृष्टीने त्याच्याकडे पाहिले आणि निरतिशय प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरविला.
अर्जुन त्याच्याकडेच पाहात होता. त्याच्या मुखावाटे शब्द येतच नव्हते. त्याची ती नि:शब्द अशी अवस्था पाहून, भगवान स्वत:च बोलायला लागले आणि त्यांनी त्याला योग्य प्रकारे समजावले. त्यावेळी जे काही सांगितले गेले त्यामधून एक बारीकशी शंका निर्माण झाली. ती शंका विचारणे आणि विचारल्यावर तिचे उत्तर देणे हे बाराव्या अध्यायात झाले.
त्यानंतर अर्जुनाने काहीही विचारले नसताना श्रीकृष्ण स्वत:च बोलत राहिले आहेत.
अर्जुनाने मधे दोन प्रश्न विचारले आहेत, पण ते फार महत्त्वाचे वाटत नाहीत.
१) त्रिगुणांच्यापलीकडे गेलेल्या पुरुषाची लक्षणे कोणती? आचरण कसे असते? त्रिगुणांच्या पलीकडे जाण्याचे उपाय कोणते? आणि —
२) जे श्रद्धा असूनही शास्त्रविधी सोडून यजन करतात, त्यांची निष्ठा कोणती समजायची? सात्त्विक, राजस की तामस?
हे ते प्रश्न आहेत. श्रीकृष्णाचे बोलणे चालू रहावे, त्यामधे खंड पडू नये ह्या हेतूनेच विचारले असावेत असे वाटते.

आताचा हा जो अखेरचा प्रश्न आहे तो देखील सगळ्या उपदेशाचा समारोप करायला मिळावा म्हणून विचारल्यासारखा वाटतो.
तसे वाटण्यामागेही विशेष असे कारण आहे. तुम्हाला खरे सांगू का?
तेराव्या अध्यायापासून पुढचे सहा अध्याय श्रीकृष्णाने रणांगणावर सांगितले असतील असे मला वाटत नाही. खरोखरच वाटत नाही.
श्रीकृष्णाने रणांगणावर अर्जुनाला केलेल्या मूळ गीतोपदेशामधे, नंतरच्या काळामधे, काही विशेष हेतूने भर घातली गेली असावी असेच वाटते. ज्याने कोणा एकाने अथवा अनेकांनी ती भर घातली असेल ती माणसेही अत्यंत बुद्धिमान असतील ह्याविषयी माझ्या मनामधे कोणतीही शंका नाही. त्यांच्याकडे अत्यंत शुद्ध हेतू, त्या हेतूला अनुकूल अशी अध्यात्माची जोड असलेली आकलनशक्ती आणि त्यापुढे नवनिर्मितीचा आविष्कार करण्याची विशेष शक्तीही होती.
म्हणूनच भगवान् श्रीकृष्णाने केलेल्या अद्वितीय अशा वक्तव्याशी एकरूप होईल, एकरस होईल, पाण्यामधे विरघळून गेलेल्या साखरेप्रमाणे मिसळून जाईल अशा वक्तव्याची रचना ते करू शकले. आज ती रचना गीतेचे अविभाज्य अंग बनलेली आहे.
वेगळी अशी ओळखताच येत नाही. तसे करणे कुणा येऱ्या गबाळ्याचे काम नाही.

**त्या दिव्य प्रतिभा असलेल्या अज्ञात व्यक्तींना माझा शिरसाष्टांग नमस्कार.**

असे असले तरीही ह्या सर्व सहा अध्यायांचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही.
अगोदरच्या बारा अध्यायांच्या सारखेच हे सहा अध्याय देखील महत्त्वाचेच आहेत.

**' सगळी भगवद्गीता ही सर्वोत्तम आहे. वंदनीय आहे, मननीय आहे, चिंतनीय आहे आणि अनुकरणीय आहे '**

ह्याविषयी माझ्या मनामधे कोणताही संशय नाही. अकराव्या अध्यायामधे विश्वरूपाला पाहिल्यावर अर्जुन जे म्हणाला,
तेच मी भगवद्गीतेला उद्देशून, नेहमीच म्हणत असतो.

**' नमो नमस्तेऽस्तु सहस्त्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।'**

' हे गीतामाते ऽऽ! तुला माझा हजार वेळा नमस्कार असो आणि परत आणखीही तुलाच नमस्कार असो.'

**' नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व । '**

' हे गीतामाते ऽऽ! तुला पुढून आणि पाठीमागून नमस्कार असो. हे माते ऽऽ ! माझ्या डोळ्यांना दिसणारे आणि न दिसणारे असे सर्व काही तूच आहेस म्हणून तुला सर्वच बाजूंनी नमस्कार असो.'
आयुष्याच्या अंतापर्यंत माझ्या मनामधे गीतेविषयी हीच भावना कायम असेल. असो.
मला जे सांगायचे होते ते सांगितले आता आपण मूळ विषयाकडे वळूया.
आत्यंतिक विषाद झाल्यामुळे अर्जुनाला युद्धापासून **संन्यास** घ्यायचा होता. युद्धकर्माचा **त्याग** करायचा होता.
क्षत्रियाचे कर्तव्य **नाकारायचे** होते. त्याने तसे सांगितल्यामुळेच श्रीकृष्णाने उपदेश करायला सुरवात केली.
भगवान त्याला सांगायला लागले की, ' बाबारे ऽ, युद्धापासून **संन्यास** घेऊ नकोस. युद्धकर्माचा **त्याग** करू नकोस.
आपले कर्तव्य पार पाडायला **नकार** देऊ नकोस. त्याने तुझे कल्याण होणार नाही.'
अनेक प्रकारे समजावल्यावर विषाद नाहीसा व्हायला सुरवात झाली. विश्वरूप पाहिल्यावर तर तो संपूर्णपणे बदलून गेला.
त्याचा विषाद नाहीसा झाला. श्रीकृष्ण जे सांगेल तेच करायचे असा त्याचा दृढ निश्चय झाला.
त्यानंतरही त्याने, कुतुहलापोटी शंका विचारल्यामुळे उपदेश चालूच राहिला आहे.
सगळ्या चर्चेमधे **संन्यास** आणि **त्याग** ह्या दोन शब्दांचा सतत वापर केला गेला आहे आणि त्यांचे महत्त्वही वारंवार सांगितले गेले आहे. मी अर्जुनाला तुमच्या माझ्यासारखाच एक सामान्य माणूस मानतो.
कोणीही कितीही समजावले तरीही ऐनवेळी आपला गोंधळ होतो की नाही? आपल्या मनामधे शंकाकुशंका येत राहतात की नाही?
त्याचप्रमाणे, बुद्धिमान असला तरीही, अर्जुनाचा पण बरेच वेळा गोंधळ होत होता. सारखे प्रश्न पडतच होते. या वेळीही तसेच झाले.
इतके सगळे ऐकून झाल्यावर त्याच्या मनामधे परत एक विचार आला की —
'' संन्यास म्हणजे नक्की काय आहे? कशाला संन्यास म्हणायचे?
**संन्यास** म्हणजे ' सोडणे. निषिद्ध मानणे. करायचे नाकारणे. स्वीकारायचे नाकारणे.'
काहीतरी करायचे नाही असे ठरविणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे.
त्याच्याच जोडीने दुसरा एक विचार आला की —
' त्याग म्हणजे नक्की काय आहे? कशाला त्याग म्हणायचे?
**त्याग** म्हणजे ' सोडणे. निषिद्ध मानणे. करायचे नाकारणे. स्वीकारायचे नाकारणे.'
काहीतरी करायचे नाही असे ठरविणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे.

अरे ऽ? दोन्ही शब्दांचा अर्थ तर एकच वाटतो आहे. संन्यासी आणि त्यागी ह्या दोघांचेही अंतिम ध्येयही एकच असते.
जन्ममृत्यूच्या चक्रामधून सुटका करून घेऊन मोक्ष मिळवणे हेच असते. मग दोघांमधे नक्की फरक काय आहे?
ते एकदा देवाला विचारून, तो काय सांगतो ते नीट समजून घेऊया. मनामधे आलेली अखेरची शंका विचारूया. म्हणजे मग कोणतीही शंका शिल्लक राहणार नाही. गोंधळ होणार नाही. आपल्याला सर्व शक्ती पणाला लावून, एकाग्र होऊन युद्धाला सुरवात करता येईल.'' असा विचार करून त्याने श्रीकृष्णाला मनामधली शंका विचारली असावी. असो.
अठराव्या अध्यायाचा पहिला श्लोक अर्जुनाचा आहे.
तो श्रीकृष्णाला आपला अखेरचा प्रश्न विचारतो आहे की —

**अर्जुन उवाच :**

**संन्यासस्य महाबाहो तत्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ।। १ ।।**

हे महाबाहो हृषीकेशा ! हे वासुदेवा ! संन्यासातील व त्यागातील तत्त्व मी वेगवेगळे जाणू इच्छितो.
येथे भगवंताला उद्देशून वापरलेल्या दोन विशेषणांना थोडा वेगळा वेगळा अर्थ प्राप्त झालेला आहे.
विशेषणे नवीन नाहीत पण त्यांचा अर्थ मात्र थोडा बदलतो आहे.
**हृषीकेश** म्हणजे इंद्रियांचा स्वामी. ' आपली सर्व इंद्रिये ताब्यात ठेवू शकणारा, त्यांचे नियमन करू शकणारा, त्यांना योग्य मार्गावर नेऊ शकणारा असा जो,' तो हृषीकेश. त्याच बरोबर येथे अजून एक वेगळा असा अर्थही जाणवतो आहे.
' जो आपल्याला सर्व इंद्रिये ताब्यात ठेवायला, त्यांचे नियमन करायला आणि त्यांना योग्य मार्गावर आणायला मदत करू शकतो, तो हृषीकेश.' अहो ऽऽ, ज्याला स्वत:ला आपली इंद्रिये ताब्यात ठेवता येत नसतील, तो त्यासाठी इतरांना मदत कशी करू शकेल?
**केशिनिषूदन** म्हणजे ' केशी नावाच्या एका भयानक दैत्याचा वध करणारा, नाश करणारा, त्याला नाहीसा करणारा असा जो,' तो केशिनिषूदन. त्याच बरोबर येथे अजून एक वेगळा असा अर्थही जाणवतो आहे.
आपल्या मनामधे असणारा संशय हा एखाद्या भयानक राक्षसासारखाच असतो. जो पर्यंत तो असतो तोपर्यंत, आपल्याला कोणतीही गोष्ट संपूर्ण श्रद्धेने करू देत नाही. आपल्या मनाची सारखी चलबिचल होत राहते. त्यामुळे निश्चित निर्णय घेऊन तो अमलात आणता येत नाही. इतका सगळा उपदेश ऐकल्यानंतरही, अर्जुनाच्या मनामधे अजूनही शंका आहे.
अजूनही मनामधे कुठेतरी संशय आहे. त्याच्या मनाची चलबिचल चाललेलीच आहे.
इतके प्रश्न विचारून झाले तरीही प्रश्न विचारायची इच्छा होतेच आहे.
असे होणे त्यालाही योग्य वाटत नसणार पण त्याला ते टाळता येत नाही आहे. आता त्याची एकच आणि एकमेव अपेक्षा आहे.
ती म्हणजे, ' त्याच्या मनामधील संशयाचा राक्षस संपूर्णपणे नाहीसा व्हावा आणि त्याच्या मनाचे भरकटणे पूर्णपणे थांबावे.'
त्यासाठीच तो भगवंताची मदत मागतो आहे.
म्हणून आपला अखेरचा प्रश्न विचारताना, त्याने ह्या दोन विशेषणांचा वापर त्या हेतूनेच केला असावा असे मला वाटते. असो.
आता अर्जुनाच्या ह्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर द्यायला सुरवात होते आहे. पुढील दोन श्लोकांमधे **संन्यास** आणि **त्याग** ह्या दोन शब्दांच्या अर्थाविषयी प्रचलीत मतप्रवाह कोणते आहेत त्याविषयी सांगितले आहे.

**श्रीभगवानुवाच :**

**काम्यानाङ् कर्मणाम् न्यासम् संन्यासङ् कवयो विदु: ।**
**सर्वकर्मफलत्यागम् प्राहुस्त्यागम् विचक्षणा: ।। २ ।।**
**त्याज्यन् दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिण: ।**
**यज्ञदानतप:कर्म न त्याज्यमिति चापरे ।। ३ ।।**

काम्य म्हणून जेवढी कर्मे ती सोडणे ह्याला ज्ञानी शहाणे लोक संन्यास असे समजतात आणि सर्व कर्मांच्या फलांचा त्याग करणे ह्याला विवेकी पंडित लोक त्याग असे म्हणतात. कोणतेही कर्म हे दोषयुक्तच असते म्हणून त्याचा सर्वस्वी त्याग करावा असे कित्येक पंडित म्हणतात आणि यज्ञ, दान, तप व कर्म ह्यांचा कधीही त्याग करू नये असे दुसऱ्या विद्वानांचे म्हणणे आहे.
१) कशाची तरी कामना बाळगून त्या कामनेच्या पूर्ततेसाठी केलेले कोणतेही कर्म म्हणजे **काम्य कर्म** होय. मग ती कामना स्त्री, मुलेबाळे, घरदार, धनदौलत, मानमरातब, प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार ह्यांच्यापैकी कोणतीही असो अथवा संकट निवारण, व्याधी निवारण, भय निवारण ह्यांच्यापैकी कोणतीही असो. त्या सगळ्या कर्मांना काम्यकर्म असे म्हणतात आणि त्यांना निषिद्ध मानून त्यांचा **न्यास** म्हणजेच त्याग करणे म्हणजे संन्यास होय. असा एक मतप्रवाह आहे.

२) कोणतेही कर्म करीत असताना त्याच्या फळाची अपेक्षा न बाळगणे म्हणजेच त्याग होय. प्रत्यक्ष कर्म करायचे नाकारणे ह्याला संन्यास म्हणता येत नाही तर आपण करीत असलेल्या कर्माच्या फळाविषयी उदासीन राहणे, फळाची इच्छा न ठेवता त्या इच्छेपासून संन्यास घेणे ह्यालाच खरा संन्यास म्हणतात. असा दुसरा मतप्रवाह आहे.

३) कोणतेही कर्म हे दोषयुक्तच असते. कर्माला सुरवात करतानाच, कोणत्या ना कोणत्या तरी पापाशी संबंध घडून येतो. त्यानंतरही ते कर्म जर योग्य प्रकारे, यथासांग केले गेले तरच कर्त्याला ज्ञान्याची योग्यता येते. पण ती शक्यता फारच कमी आहे. कर्म हे जन्म मरणाला कारणीभूत होते. स्वर्ग अथवा नरक प्राप्तीला कारणीभूत होते. त्यामार्गामधे मोक्ष मिळण्याची शक्यता फार फार कमी असते. त्याऐवजी संन्यासमार्गामधे कर्मबाधेचा धोका टळतो आणि आत्मज्ञानही प्राप्त होते. म्हणून कर्माचा संपूर्णपणे त्याग करून कर्मसंन्यासाचा मार्ग आचरणे योग्य आहे. असा तिसरा मतप्रवाह आहे.

४) यज्ञ, दान आणि तपरूपी कर्मे ही दोषयुक्त भासत असली आणि त्यांच्या सुरवातीलाच पाप घडून येताना दिसत असले तरीही ती कर्मे सरसकट दोषयुक्त नसतात. त्यामुळे माणसाने जेवढी निषिद्ध कर्मे असतील त्यांचाच त्याग करावा. शास्त्रविहित कर्तव्यकर्माचा त्याग कधीही करू नये, असा चवथा मतप्रवाह आहे.

ह्या व्यतिरिक्तही काही मतप्रवाह असतील. परंतु हे चार मुख्य मतप्रवाह आहेत म्हणून त्यांचा उल्लेख केलेला आहे.

सनातन धर्मशास्त्रामधे, प्रकृतीला अनुसरून केल्या जाणाऱ्या कर्मांचे विविध प्रकार सांगितलेले आहेत.

आपण त्यांची थोडक्यात ओळख करून घेऊया.

१) **नित्य कर्म** — काही काही कर्मे माणसाचा जन्म झाल्यापासून मरेपर्यंत सतत करावीच लागतात. ती करायचे ठरवावे लागत नाही तर आपोआप होत असतात आणि ती न करणे कुणालाही शक्य नसते. अशी सगळी कर्मे म्हणजे, नित्य कर्म.

त्यांना **स्वाभाविक कर्म** असेही म्हणतात. ही कायिक, वाचिक, मानसिक अशी तीन प्रकारची असतात.

' श्वास घेणे आणि सोडणे, बसणे, उठणे, झोपणे, चालणे, देणे, घेणे, बोलणे, पाहणे, ऐकणे, वास घेणे, स्पर्श करणे, खाणे, पिणे, मलमूत्राचा त्याग करणे, विचार करणे ' इत्यादी सगळी कर्मे कधीही टाळता येत नाहीत. करायची नाकारता येत नाही.

आपल्या इच्छेचा प्रश्न येतच नाही. ती सदैव होतच राहतात.

नित्य कर्माचा दुसरा प्रकार म्हणजे **वर्णाश्रमानुसारी कर्म.**

ह्यामधे धर्मशास्त्रामधे सांगितलेले, ' ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ' हे चार वर्ण, ' ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास ' हे चार आश्रम, आणि त्याच बरोबरीने प्रत्येकाचा व्यवसाय, स्वभाव आणि परिस्थिती ह्यांना अनुसरून करावी लागणारी अशी —
' अध्ययन, अध्यापन, कुटुंबपालन, प्रजापालन, पशुपालन, शेती, व्यापार, संरक्षण, सार्वजनिक सेवा, न्यायदान ' इत्यादी कर्मे येतात. सर्व समाजाच्या धारण - भरण - पोषणासाठी ही कर्मे अत्यावश्यक असतात आणि प्रत्येकाला ती करावीच लागतात. त्यांच्या योगाने मनुष्याला पाप लागत नाही. पण तसे न करणारा मनुष्य हा कर्तव्यपालनामधे कसूर करणारा होतो. पापी ठरतो. त्याला पाप लागते असे सांगितलेले आहे.

२) **नैमित्तिक कर्म** — काहीतरी कारण अगोदरच घडून आल्यामुळे करावे लागणारे कर्म किंवा भविष्यामधे येणाऱ्या संकटाची आणि त्यायोगे होणाऱ्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी करावे लागणारे कर्म, म्हणजे नैमित्तिक कर्म होय.

ह्याचाच अजून एक प्रकार आहे. त्याला **प्रायश्चित्त कर्म**. असे म्हणतात.

आपल्या हातून पूर्वी घडून गेलेल्या अपराधाचे अथवा चुकीचे परिमार्जन करण्याच्या हेतूने केलेले कर्म म्हणजे प्रायश्चित्त कर्म. ह्यामुळे अगोदर केलेल्या अथवा घडलेल्या अपराधाचे पाप नाहीसे होते असे सांगितलेले आहे.

३) **काम्य कर्म** — काहीतरी मिळवण्याची इच्छा बाळगून त्या इच्छेच्या पूर्तीसाठी केलेली ' यज्ञ, दान, तप, उपासना, भजन, पूजन ' इत्यादी कर्मे म्हणजे काम्य कर्म. ह्यामुळे माणसाचा हेतू सफल होतो असे सांगितलेले आहे.

४) **निषिद्ध कर्म** — शास्त्राने अजिबात त्याज्य ठरवलेले, कधीही करू नये असे सांगून ज्यांचा सदैव निषेध केलेला आहे अशी,
' खोटे बोलणे, दुसऱ्याला फसवणे, चोरी करणे, दुसऱ्यावर अन्याय, अत्याचार करणे, माणसाची अथवा प्राण्याची हत्या करणे, व्यभिचार करणे, ' इत्यादी कर्मे म्हणजे निषिद्ध कर्म. ह्यामुळे माणसाला अनंत यातना भोगाव्या लागतात असे सांगितलेले आहे.

५) **निष्काम कर्म** — कोणत्याही फळाची इच्छा न बाळगता, स्वधर्म पालनाचे कर्तव्य म्हणून, ईश्वरार्पणाच्या बुद्धीने केलेले कर्म म्हणजे निष्काम कर्म. हे सर्वात उत्तम कर्म मानलेले आहे. ह्याचे बंधन पडत नाही असे सांगितलेले आहे.

माझ्या वाचनात आलेले कर्मांचे प्रकार येथे सांगितले. मला माहीत नसलेले असे अजूनही अनेक प्रकार असू शकतील. आपल्याला ते माहीतही असतील. माझे ज्ञान कमी आहे आणि अभ्यासही कमी आहे ह्याची मला जाणीव आहे.

पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही कर्म हे स्वभावतः चांगले अथवा वाईट नसते. तसेच ते बंधनकारकही नसते.

कर्त्याचा हेतू कर्माला चांगले अथवा वाईट करतो आणि कर्त्याची आसक्ती कर्माला बंधनकारक करते. असो.
आता ह्यानंतर श्रीकृष्ण भगवान् ह्याविषयी स्वत:चे निश्चित मत सांगत आहेत.

**निश्चयम् शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।**
**त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः ।। ४ ।।**
**यज्ञदानतप:कर्म न त्याज्यङ् कार्यमेव तत् ।**
**यज्ञो दानम् तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ।। ५ ।।**
**एतान्यपि तु कर्माणि सङ्गम् त्यक्त्वा फलानि च ।**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितम् मतमुत्तमम् ।। ६ ।।**

तरी हे भरतश्रेष्ठा ! संन्यास आणि त्याग ह्यांच्यापैकी, त्यागाबद्दल माझा निर्णय काय तो ऐक. हे पुरुषव्याघ्रा ! त्याग तीन प्रकारचा सांगितलेला आहे. यज्ञ, दान, तप व कर्म ह्यांचा कधीही त्याग करू नये. ती कर्मे केलीच पाहिजेत. यज्ञ, दान व तप ही शहाण्या पुरुषासही चित्तशुद्धिकारक आहेत. हे पार्था ! म्हणूनच ही कर्मेसुद्धा आसक्ति न ठेवता, फलांचा त्याग करून इतर निष्काम कर्मांप्रमाणेच केली पाहिजेत असे माझे निश्चित व उत्तम मत आहे.
हे विधान इतके स्पष्ट आहे की त्यावर काहीही बोलायची गरज नाही.
यज्ञ, दान आणि तप ह्या तीनही गोष्टी समाज धारणेसाठी किती आवश्यक आहेत ते मागील **<u>सतराव्या</u>** अध्यायामधे सविस्तरपणे सांगून झालेले आहे.
ही कर्मे जरी फळाच्या आशेने केली तरीही समाजासाठी उपकारकच आहेत. बंधनकारक होणारी असली तरीही कर्त्याच्या मनाची शुद्धी करणारीच आहेत. त्यातही जर ती फळाची अपेक्षा न बाळगता केली, आपले कर्तव्य म्हणून केली तर मग ती बंधनकारकही होणार नाहीत. मोक्षप्राप्तीच्या आड येणार नाहीत. म्हणूनच येथे कर्मफळाचा त्याग करून, आपले कर्तव्यकर्म सदैव करीत राहण्याचा आग्रह धरलेला आहे. भगवंतांनी संपूर्ण गीतेमधे सतत हेच सांगितलेले आहे. असो.
मागे **<u>चौदाव्या</u>** अध्यायामधे, प्रकृतीपासून निर्माण झालेल्या, विश्वामधील सर्व पदार्थांना **प्रकृतीचे विकार** असे म्हटले आहे.
ह्या विकारांच्यामुळेच, जगामधील प्राणिमात्रांमधे जे वेगवेगळे गुण दिसून येतात त्यांना <u>**' सत्व, रज** आणि **तम '**</u> ही नांवे दिली आहेत. <u>' हे तीन गुण म्हणजेच प्रकृती आहे,'</u> असे सांगितले आहे.
प्रत्येक वस्तुमात्रामधे हे तीनही गुण असतातच. एखाद्या पदार्थाच्या ठिकाणी ज्या गुणाचा जोर जास्त असेल, त्यानुसार तो पदार्थ प्रबलतम असलेल्या गुणाचा ठरतो आणि त्याच गुणाच्या नांवाने म्हणजेच, ' सात्विक, राजस किंवा तामस ' म्हणून ओळखला जातो असे सांगितले आहे. त्यानंतर **<u>सतराव्या</u>** अध्यायामधे ह्या त्रिगुणांना अनुसरून, **<u>' माणसे, त्यांचा आहार, यज्ञ, तप आणि दान '</u>** ह्यांचे जे तीन प्रकार होतात त्यांचे वर्णन केले आहे. आता तोच विषय परत एकदा सुरू होतो आहे.
येथून पुढे चाळीसाव्या श्लोकापर्यंत त्याच विषयाचा विस्तार केला जाणार आहे. त्याच त्रिगुणांच्या योगाने होणारे,
**<u>' कर्मत्याग, ज्ञान, कर्ता, कर्म, बुद्धी, धृती म्हणजे धैर्य, सुख '</u>** इत्यादींचे जे प्रकार होतात त्यांचे वर्णन केले जाणार आहे.
मागील श्लोकामधे ' यज्ञ, दान, तप व कर्म ह्यांचा कधीही त्याग करू नये,' असे सांगितलेले आहे.
त्यांच्यापैकी **<u>' यज्ञ, दान, तप '</u>** ह्यांचे त्रिगुणांच्या योगाने होणारे प्रकार ह्यापूर्वी सांगून झालेले आहेत.
आता राहिला तो **<u>कर्माचा त्याग.</u>** म्हणून अगोदर कर्मत्यागाचे तीन प्रकार सांगायला सुरवात होते आहे.

**नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।**
**मोहात्तस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः ।। ७ ।।**

स्वधर्माप्रमाणे जे कर्म नेमलेले असते त्याचा त्याग करणे योग्य नाही. कोणत्याही मोहाने केलेला त्याचा त्याग तामस म्हटला आहे.
स्वाभाविक कर्मे शरीराचा निर्वाह होण्यासाठी आवश्यक असतात. अनिवार्य असतात. आपली इच्छा असो अथवा नसो, जन्मल्यापासून मरण येईपर्यंत ती कर्मे सतत होतच राहतात. त्यामुळे स्वाभाविक कर्मांचा त्याग कोणालाही कधीही करता येत नाही.
तसेच वर्णाश्रमाप्रमाणे करावी लागणारी कर्मे देखील आवश्यक असतात. कारण समाजाचे स्थैर्य आणि सातत्य टिकून राहण्यासाठी, समाजाचे सर्व प्रकारचे व्यवहार चालू राहण्यासाठी, त्यांची आवश्यकता असते.
जन्माला आल्यापासून समाजाकडून आपण निरनिराळ्या प्रकारचे ऋण घेतच असतो.
त्यामुळे सर्व समाजाने आपल्यावर जे अनंत उपकार केलेले असतात ते यथाशक्ती फेडणे हे आपले कर्तव्यच आहे.
त्यासाठी एकच मार्ग उपलब्ध असतो. आपल्या वाट्याला आलेली सर्व कर्मे प्रामाणिकपणे करीत राहणे हाच मार्ग अनुसरावा लागतो.
तसे केले तरच आपण समाजाचे ऋण, अंशत: का होईना, फेडू शकतो.

परंतु ‘ कर्म हे स्वभावत:च वाईट असते. मोक्षमार्गामधील तो एक मोठा अडथळाच आहे,’ अशा समजुतीने वर्णाश्रमधर्माप्रमाणे वाट्याला आलेल्या कर्मांचा त्याग करणे योग्य नाही. तसे करणे समाजासाठी घातक होईल म्हणून तशा कर्मत्यागाला तामस त्याग म्हटलेले आहे. त्यामुळे त्यागाचे मोक्षरूपी फळ तर मिळणार नाहीच उलट स्वधर्म आणि स्वकर्तव्य ह्यांचे पालन न केल्यामुळे आणि समाजाचे ऋण यथाशक्ती फेडण्याचा प्रयत्न न केल्यामुळे पाप मात्र लागेल.

शिवाय कळत न कळत घडलेल्या त्या पापाचे फळ भोगण्यासाठी जन्ममृत्यूच्या चक्रामधे फिरत रहावेच लागेल.

**दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।**

**स कृत्वा राजसम् त्यागम् नैव त्यागफलम् लभेत् ।। ८ ।।**

शरीराला कष्ट होतील म्हणजे दु:खकारक होतील ह्या भीतीने जर कोणी कर्म सोडील तर तो त्याग राजस होऊन, त्यागाचे म्हणून जे काही फल मिळावयाचे ते त्याला मिळणार नाही.

१) आपला वर्ण कोणता आहे, आश्रम कोणता आहे, त्यानुसार आपला अधिकार आणि कर्तव्य कोणते आहे आणि कर्तव्य पालनासाठी कोणकोणती कर्मे केली पाहिजेत, हे सर्व काही जाणत असूनही, केवळ आपल्या शरीराला कष्ट होतील आणि मनाला त्रास होईल अशा विचाराने कर्म करायचे टाळणे.

२) एखादे काम करायला यथायोग्य सुरवात करणे आणि त्याचा त्रास होऊ लागला म्हणजे मधेच ते काम अर्धवट सोडून देणे.

३) तेच तेच काम परत परत करणे आवश्यक असूनही, तसे करायचा कंटाळा येत असल्यामुळे काम करायचे नाकारणे.

४) आपले काम दुसरा कोणीतरी करेल ह्या आशेने काम करायचे टाळणे.

देहाच्या आसक्तीमुळे केलेल्या अशा प्रकारच्या कर्मत्यागाला राजस त्याग म्हटलेले आहे.

त्यागाचे म्हणून जे मोक्षरूपी फळ असते ते अशा प्रकारच्या त्यागाने मिळत नाही.

तसेच कर्मबंधनामधून सुटकाही होत नाही आणि जन्ममृत्यूच्या चक्रामधे फिरत राहणे टाळताही येत नाही.

**कार्यमित्येव यत्कर्म नियतङ् क्रियतेऽर्जुन ।**

**सङ्गम् त्यक्त्वा फलञ् चैव स त्याग: सात्विको मत: ।। ९ ।।**

हे अर्जुना ! स्वधर्माप्रमाणे नेमलेले व कर्तव्य म्हणूनच जे कर्म फलाची आशा सोडून केले जाते, त्यालाच सात्विक त्याग असे समजतात.

वर्णाश्रमधर्माप्रमाणे करावे लागणारे, तसेच कोणत्या तरी निमित्तामुळे आपल्या वाट्याला आलेले कर्म करायचे टाळण्यापेक्षा त्याचे आदरपूर्वक आचरण करणे, आपले कर्तव्य म्हणून आचरण करणे हेच योग्य असते.

आता राहिला प्रश्न कर्माच्या फळाचा आणि बंधनाचा. ह्या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठी जो मार्ग आतापर्यंत सतत सांगितला गेलेला आहे, तोच मार्ग परत एकदा सांगण्यात आलेला आहे. आपले कर्म अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडायचे पण त्याचा अभिमान बाळगायचा नाही आणि त्याच्या फळाची आशाही बाळगायची नाही.

‘ परमेश्वराच्या इच्छेने, माझ्याकडून हे कर्म घडून येते आहे. तोच माझ्याकडून हे करवून घेतो आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. म्हणून कर्माचे जे काही फळ असेल ते त्याच्या चरणांवर अर्पण! ’ हीच भावना बाळगायची. म्हणजे काय तर —

**‘ मी ह्या कर्माचा कर्ता आहे!’** असा जो अहंकार, त्याचा **त्याग** करायचा आणि **‘ मला ह्या कर्माचे फळ मिळाले पाहिजे!’** अशी जी आशा, तिचाही **त्याग** करायचा. अशा प्रकारच्या त्यागाला सात्विक त्याग म्हटलेले आहे.

आपण सर्वांनी येथे एक महत्त्वाची गोष्ट कायमची लक्षात ठेवली पाहिजे असे मला वाटते म्हणून त्याविषयी जरा सविस्तरपणे सांगतो. सगळ्या गीतोपदेशामधे, भगवान कर्माचा त्याग करायला कधीही सांगत नाहीत. कर्माच्या फळाचा त्याग करायला सांगत आहेत.

फळाचा त्याग करण्याचे जे तत्त्व सांगितलेले आहे ते कोणत्याही प्रकारच्या कर्मासाठी वापरता येते.

फलत्यागाचे तत्त्व हे कर्मत्यागाच्या तत्त्वाच्या विरोधी तत्त्व नाही. कोणतेही कर्म करावे किंवा करू नये हे ठरविण्यासाठी फलत्यागाची कसोटी ही सर्वोत्तम कसोटी आहे. आपण जरा शांतपणे खोलवर विचार करा.

फलत्यागाच्या तत्त्वाचा वापर केला म्हणजे मग निषिद्ध कर्मे आणि काम्य कर्मे आपोआप गळून पडतात.

त्यांचा संन्यास सहजपणे घडून येतो. कारण अशी कर्मे फळाची आशा न बाळगता करता येतच नाहीत.

म्हणून एखादे कर्म करायला सुरवात करण्यापूर्वी, ‘ मी जे कर्म करू पाहतो आहे ते फळाची अपेक्षा न बाळगता करता येणे शक्य आहे काय?’ ह्याचा विचार करावा. तसे केले असता काम्य म्हणजे राजस कर्मे आणि निषिद्ध म्हणजे तामस कर्मे आपोआप त्याज्य ठरतील आणि केवळ शुद्ध सात्त्विक कर्मेच घडून येतील.

त्यानंतर जी सात्त्विक कर्मे करायची ठरतील ती सुद्धा आसक्ती आणि अहंकार ह्या दोघांचा त्याग करूनच करायची.

मुख्य म्हणजे ' मी एवढा मोठा त्याग केला,' अशा अहंकाराचाही त्याग करायचा. त्यालाही फलत्यागाची कसोटी लावायची.
कर्तृत्वाचा अभिमान आणि फळाची इच्छा ह्या दोनही गोष्टींचा **संन्यास** घ्यायचा.
म्हणजे आपले कर्म हे **अकर्म** होईल. कर्म करूनही न केल्यासारखेच होईल.
त्यामुळे केलेले प्रत्येक कर्म हे **' मोक्षप्राप्तीच्या मार्गामधील अडथळा '** होणार नाही तर कर्तव्याचे पालन करीत राहिल्यामुळे, निष्काम कर्म करीत राहिल्यामुळे **' मोक्षप्राप्तीला सहाय्यक '** होईल.
आता यापुढील दोन श्लोकांमधे खरा त्यागी कोण ते सांगितले आहे.

**न द्वेष्ट्यकुशलङ् कर्म कुशले नानुषज्जते ।**
**त्यागी सत्त्वसमाविष्टः मेधावी छिन्नसंशयः ।। १० ।।**
**न हि देहभृता शक्यम् त्यक्तुङ् कर्माण्यशेषतः ।**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ।। ११ ।।**

एखादे कर्म अकल्याणकारक असले तर त्याचा द्वेष करीत नाही व दुसरे कल्याणकारक आहे म्हणून त्यात आसक्त होत नाही, तो पुरुष सत्त्वशील, बुद्धिमान व संशयविरहित त्यागी म्हणजे संन्यासी होय. कारण ज्याला देह आहे त्याला कर्माचा संपूर्णपणे त्याग करणे शक्य नाही. म्हणून ज्याने कर्मे न सोडता फक्त कर्मफलाचा त्याग केला, त्यालाच खरा त्यागी म्हटले आहे.
आपल्याला मिळालेले मानवी शरीर हे देखील, मागील अनेक जन्मामधे घडून आलेल्या कर्मांचेच फळ आहे.
तसेच शरीराचे अस्तित्व असेपर्यंत त्याला नित्यकर्मे करीत रहावीच लागणार आहेत. ती करणे थांबवता येणारच नाही.
जरा शांतपणे आणि त्रयस्थपणे विचार केला तर —
**' आपल्याला मिळालेले शरीर हे जसे मागील कर्मांचे फळ आहे, तसेच पुढील फळांचे कारणरूप कर्मही आहे.'** ही गोष्ट समजून येते. अहो ऽ, ह्या शरीरामधून सुटका व्हावी असे वाटत असेल तर आपल्याला शरीराचीच मदत घ्यावी लागते.
**' काट्याने काटा काढणे '** म्हणतात ते हेच. दुसरा कोणीही, कधीही, कसलीही मदत करू शकत नाही.
मोक्षप्राप्तीसाठी म्हणून जे प्रयत्न करायचे असतील ते सगळे मानवी शरीराकडूनच होऊ शकतात.
त्याला दुसरा कोणताही पर्याय नाही. असे म्हणतात की, मुक्ती ही फक्त मानव योनीतच मिळविता येते. इतर कोणत्याही योनीमधे मुक्ती मिळत नाही. म्हणूनच **' मानवजन्म हा अत्यंत दुर्लभ आहे.'** असे म्हटले जाते.
मोक्ष मिळावा म्हणून जी साधना करावी लागते, ती साधना केवळ माणूसच करू शकतो आणि ती ह्या शरीरामधे राहून, त्याच्याद्वारेच करावी लागते. शरीर हेच एकमेव साधन आहे आणि कर्म करीत राहणे हा त्याचा स्वभाव आहे.
त्यामुळे संपूर्ण कर्मत्याग करणे ही अशक्य गोष्ट आहे. सर्व प्रकारची कर्मे तर करावी लागणारच. त्यांचा त्याग करता येणार नाही.
त्यांना सोडता येणार नाही. मग काय करायचे? त्यांच्या बंधनामधून मोकळे कसे व्हायचे?
ते समजण्यासाठी आपण रोजच्या व्यवहारातले एक उदाहरण पाहूया.
घरामधे कचरा साठला, अडगळ वाढली, जळमटे दिसायला लागली, कोळिष्टके दिसायला लागली. सगळीकडे झुरळी फिरताना दिसायला लागली तर आपण काय करतो? घर सोडून जातो का? घराचा त्याग करतो का? नाही.
तसे करणे निर्बुद्धपणाचे ठरेल. तो मूर्खपणा होईल. मग आपण काय करतो?
आपण दुसरे अनेक उपाय करतो आणि आपले घर राहण्यायोग्य करतो.
आपण सगळे घर झाडून स्वच्छ करतो. सगळी कोळिष्टके, जळमटे काढून टाकतो. औषध फवारून झुरळी मारून टाकतो.
सगळा कचरा घराबाहेर नेऊन टाकतो. नको असलेले सगळे सामान टाकून देतो. सगळे घर पाण्याने धुवून पुसून काढतो.
इतके सगळे कष्ट केल्यावर मग आपले घर राहण्यायोग्य होते.
येथेही तसेच करायचे आहे. सर्व प्रकारे स्वच्छता करायला सुरवात करायची.
शरीर आतून आणि बाहेरून स्वच्छ करायचे. मन स्वच्छ करायचे. बुद्धी स्वच्छ करायची.
सर्व प्रकारच्या वासनांची जळमटे झाडून काढायची. कामनांचा चिखल धुवून पुसून साफ करायचा. अहंकाराचा कचरा टाकून द्यायचा.
हे सगळे निरपेक्षपणे करीत रहायचे. आपले कर्तव्य म्हणून करीत रहायचे. मोक्षप्राप्तीची अपेक्षाही बाळगायची नाही.
कारण मोक्ष हे सुद्धा कर्मफळच आहे. सगळ्या गोष्टींच्याकडे, अगदी स्वत:कडेही त्रयस्थपणे पहायला शिकायचे.
आपल्या शरीराविषयीही ममत्व बाळगायचे नाही. त्याचे चोचले पुरवायचे नाहीत. त्याची आवश्यक तेवढी काळजी घ्यायची पण काळजी करीत रहायचे नाही. सर्व काही करीत रहायचे पण कशामधेही अडकून रहायचे नाही.
कशाचाही द्वेष करायचा नाही आणि कशाचीही आसक्ती बाळगायची नाही.

म्हणजे मग दु:ख किंवा आनंद व्हायचा प्रश्नच उद्भवणार नाही.
आपल्या वाट्याला येणारे प्रत्येक कर्म परमेश्वराची पूजा समजून, त्याची सेवा घडावी म्हणून, अत्यंत प्रामाणिकपणे उत्तम प्रकारे करायचे आणि करून झाल्यावर त्यालाच अर्पण करायचे. त्याचा दास होऊन सदैव त्याचेच चिंतन आणि मनन करीत रहायचे.
आयुष्यभर असे करीत राहणे फार फार कठीण आहे.
माणसाच्या मनावरील सत्व, रज आणि तम ह्यांचा प्रभाव सतत बदलत असतो. कमी जास्त होत असतो.
त्यामुळे ते सर्वांना शक्य होणार नाही. म्हणूनच असे करणाऱ्याला खरा संन्यासी आणि खरा त्यागी असे म्हटलेले आहे.

**अनिष्टमिष्टम् मिश्रञ् च त्रिविधङ् कर्मण: फलम् ।**
**भवत्यत्यागिनाम् प्रेत्य न तु संन्यासिनाम् क्वचित् ।। १२ ।।**

अनिष्ट, इष्ट व मिश्र याप्रमाणे कर्माचे तीन प्रकारचे फल, मेल्यावर फलाशेचा त्याग न करणाऱ्या पुरुषास मिळते. पण जो फलाशा सोडून कर्मे करणारा असतो, त्याला हे फल कधीही मिळत नाही.
येथे कर्मफलाचे स्वाभाविक असे तीन प्रकार सांगितलेले आहेत.
माणूस आयुष्यभर ज्या प्रकारे कर्मे करीत राहतो, त्यांच्याशी ते निगडीत असतात.

१) **अनिष्ट फल** — विषयासक्त होऊन, विधिनिषेधाची पर्वा न करता, जे करू नये ते कर्म करणाऱ्याला, मरणा नंतर जे फळ मिळते ते अनिष्ट फल होय. ह्या मधे सर्व प्रकारच्या नरकयातना समाविष्ट होतात.

२) **इष्ट फल** — फळाविषयी आसक्ती असूनही, वर्णाश्रमधर्माला जाणून, वेदाज्ञा प्रमाण मानून, विधिनिषेधांचे पालन करून, शास्त्रानुसार सदैव सत्कर्माचे आचरण करणाऱ्याला, मरणा नंतर जे फळ मिळते ते इष्ट फल होय. ह्या मधे स्वर्गप्राप्तीसारखे सर्व प्रकारचे उपभोग समाविष्ट होतात.

३) **मिश्र फल** — सत्य आणि असत्य, योग्य आणि अयोग्य, नैतिक आणि अनैतिक म्हणजे काय ते माहीत असूनही, केवळ आसक्ती मुळे, त्यांच्या मिश्रणाने वेगवेगळ्या प्रकारे कर्मे करणाऱ्याला, मरणा नंतर जे फळ मिळते ते मिश्र फल होय. ह्या मधे उपभोग आणि यातना दोन्ही समाविष्ट होतात.

जेव्हा शुभ आणि अशुभ कर्मांचे प्रमाण सारखे होते तेव्हा मानवी जन्म प्राप्त होतो, असे सांगितलेले आहे. येथे जीवाला निवडीचे स्वातंत्र्य प्राप्त होते. जे कामना, वासना, आसक्ती आणि अहंकारामधे गुरफटलेले असतात आणि फलाची तीव्र आशा बाळगूनच सर्व प्रकारची कर्मे करीत असतात, त्यांना ही तीन प्रकारची कर्मफले भोगावीच लागतात. त्यामधून त्यांची सुटका होऊ शकत नाही.
परंतु ज्याला कर्म केल्याचा अभिमान नसतो, तसेच कर्मफलाविषयी आसक्तीही नसते, तो आपले प्रत्येक कर्म परमेश्वराची पूजा समजून, त्याची सेवा घडावी म्हणून, अत्यंत प्रामाणिकपणे उत्तम प्रकारे करतो आणि करून झाल्यावर त्यालाच अर्पण करतो. कशाचीही अपेक्षा, अगदी मोक्षप्राप्तीचीही अपेक्षा शिल्लक राहात नाही.
मुख्य म्हणजे हे सगळे त्याला ठरवून करावे लागत नाही तर त्याचेकडून अत्यंत सहजपणे घडून येत असते.
असा जो असतो, त्याला मरणा नंतर ही तीनही प्रकारची कर्मफळे भोगावी लागत नाहीत आणि कोणत्याही कर्माचे बंधनही पडत नाही.
फलत्याग केल्यामुळे त्याची सर्व कर्मे ही अकर्मामधे रूपांतरीत झालेली असतात.
अहंकार न बाळगल्यामुळे कर्मे करूनही ती न केल्यासारखीच झालेली असतात.
पाण्यामधे राहणाऱ्या आणि तरीही पाण्यापासून संपूर्णपणे अलिप्त असलेल्या कमलपत्राच्या सारखी त्याची अवस्था असते.
जगामधे सतत वावरत असूनही कर्म बंधनही नाही आणि कर्मफळ भोगणेही नाही.
परमेश्वराच्या बँकेत त्याचे खाते असूनही नसल्यासारखे झालेले असते. म्हणजे कर्जही नाही आणि ठेवही नाही.
व्याज देणेही नाही आणि घेणेही नाही. बँक बॅलन्स झिरो झालेला असतो. त्याचे ईश्वराचे अनुसंधान कधीही सुटत नाही.
तो सदैव परमेश्वराचेच मनन, चिंतन, भजन, पूजन करीत असतो. आपले प्रत्येक कर्म परमेश्वराला अर्पण करीत असतो.
मरणानंतर अशा माणसाचे दुसरे काय होणार बरे? कर्मविपाक प्रक्रियेप्रमाणे जेव्हा कधी मरण येईल त्यावेळी अंतकाळी त्याच्या मुखामधे परमेश्वराचेच नाम येत राहील. ह्या सगळ्याचा परिणाम एकच होईल.
**मोक्ष आपण होऊन त्याला शोधत येईल आणि आलिंगन देईल.** असो.

प्रकृति आणि पुरुष, क्षर आणि अक्षर, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्या शब्दांच्या विषयी आणि त्यांच्या अर्थाविषयी आतापर्यंत बरीच चर्चा करून झालेली आहे. त्या सर्व चर्चेमधील महत्त्वाचा मुद्दा ‘ परमात्मा हा शरीरामधे राहात असला तरीही तो स्वत: काहीच करीत नाही. शरीराच्या द्वारे जे जे काही घडून येत असते ते सर्व काही प्रकृतीच्या द्वारेच घडून येत असते. परमात्मा हा केवळ साक्षिरूप असतो.’ हाच आहे. कपिलमुनी ज्याचे प्रणेते आहेत त्या सांख्यशास्त्राचा आतापर्यंत अनेक वेळा संदर्भ देण्यात आलेला आहे.

त्याविषयी विवेचन केले गेलेले आहे. कारण सांख्यांचे तत्त्वज्ञान हे **' ज्ञानाचा अंतिम आधार '** म्हणून मान्यता पावलेले आहे.
विश्वाचे सर्व व्यवहार पुरुषाच्या साक्षीने, प्रकृतीच्याद्वारे कसे घडून येतात आणि कर्ता नसूनही पुरुष त्यामधे कसा गुंतून जातो, ह्याविषयी सांख्यशास्त्रामधे सखोल विचार केलेला आहे. तसेच सांख्यशास्त्रामधे, कोणतेही कर्म, मग ते व्यावहारिक असो अथवा आध्यात्मिक असो, घडून येण्यासाठी पाच कारणे असावी लागतात असे प्रतिपादन केलेले आहे.
हा विचार फार फार महत्त्वाचा आहे. आता परत एकदा त्याचाच संदर्भ दिलेला आहे.
आपण तो नीट समजून घेतला पाहिजे. पुढील तीन श्लोकांमधे त्याविषयीचे विवेचन करण्यात आलेले आहे.

**पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।**
**साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ।। १३ ।।**
**अधिष्ठानन् तथा कर्ता करणञ् च पृथग्विधम् ।**
**विविधाश्च पृथक् चेष्टा दैवम् चैवात्र पञ्चमम् ।। १४ ।।**
**शरीरवाङ्मनोभिर्यत् कर्म प्रारभते नरः ।**
**न्याय्यम् वा विपरीतम् वा पञ्चैते तस्य हेतवः ।। १५ ।।**

हे महाबाहो ! सर्व कर्मे घडून येण्यास सांख्यांच्या सिद्धांतात जी पाच कारणे सांगितली आहेत, ती मी तुला सांगतो ऐक. ह्या विषयात म्हणजे कर्मसिद्धीच्या संदर्भात आधार, कर्ता, निरनिराळी साधने, कर्त्याकडून केल्या जाणाऱ्या नाना प्रकारच्या क्रिया आणि त्याच बरोबर पाचवे दैव होय. शरीराने, वाचेने किंवा मनाने मनुष्य जे जे कर्म आरंभितो,
मग ते न्याय्य असो वा अन्याय्य असो, त्याची ही पाच कारणे आहेत.

**सर्वकर्मणाम् सिद्धये** — सर्व कर्मे करून पूर्ण होण्यासाठी. **पंच कारणानि** — पाच कारणे.
**कृतान्ते** — सर्व कर्मांचा अंत करण्याचा उपाय सांगणाऱ्या. **सांख्ये प्रोक्तानि** — सांख्यशास्त्रामधे सांगितलेली.

कोणतेही बरे वाईट कर्म घडून येण्यासाठी केवळ ते करणारा एकटा पुरेसा नसतो. त्याच्या शिवाय आणखी काही गोष्टींची गरज असते. माणसाचे प्रयत्न सफल होऊन कर्म घडून येण्यासाठी ज्या गोष्टींची गरज असते त्यांच्यापैकी अनेक गोष्टी आपल्या ताब्यात नसतात. आपल्याला त्यांची माहिती नसते. त्या गोष्टींना **' कर्माची कारणे '** असे म्हटले आहे.

**अधिष्ठानम्** — जिच्या आधाराने कर्मे केली जातात ती जागा, स्थान, ठिकाण. जर शेती करायची असेल तर त्यासाठी योग्य अशी शेतजमीन असलीच पाहिजे. जर स्वयंपाक करायचा असेल तर त्यासाठी योग्य अशी जागा असलीच पाहिजे. हा अधिष्ठानम् ह्या शब्दाचा व्यावहारिक अर्थ झाला. ह्याचा आध्यात्मिक अर्थ म्हणजे आपला देह. आपले शरीर. कारण प्रकृतीकडून जी विविध प्रकारची कर्मे केली जातात ती करण्याची आणि त्यांच्यायोगे जी विविध सुखदु:खे मिळविली जातात ती भोगण्याची एकमेव जागा म्हणजे शरीर. जीवाला कर्मे करण्यासाठी आणि कर्मफळे भोगण्यासाठी दुसरी जागाच नाही. म्हणून देह हे अधिष्ठान असे म्हटले आहे.

**कर्ता** — कोणतेही कर्म करणारा माणूस. शेती करण्यासाठी, शेती करायचे ज्ञान असणारा शेतकरी असावा लागतो. स्वयंपाक करण्यासाठी, स्वयंपाक करायचे ज्ञान असणारी गृहिणी असावी लागते. हा कर्ता ह्या शब्दाचा व्यावहारीक अर्थ झाला. ह्याचा आध्यात्मिक अर्थ म्हणजे आपला जीव.

**' जीव '** आणि **' आत्मा '** ह्या दोन्ही स्वतंत्र संकल्पना आहेत बरे का!
ब्रह्मविद्या शास्त्रामधे **( Theosophy )** असे सांगितलेले आहे की, आत्मा ही परब्रह्माची निर्मिती आहे.
परब्रह्माचे अंशस्वरूप आहे. आत्मा म्हणजे परमात्म्याचे प्रतिबिंब आहे.
तर जीव ही प्रकृतीची निर्मिती आहे. प्रकृतीचे अंशस्वरूप आहे.
' जन्म - मृत्यू - पुनर्जन्म - पुनर्मृत्यू - अंतिमत: मोक्ष!' नांवाच्या ह्या खेळाच्या प्रक्रियेला सुरवात होण्यापूर्वी, जीव आत्म्याला सर्व बाजूंनी व्यापतो. झाकूनच टाकतो. म्हणूनच ह्या जोडीला **' जीवात्मा!'** असे म्हणतात. ( जीवाने झाकलेला आत्मा. )
ह्या दोघांचे सह अस्तित्व तसेच स्वतंत्र अस्तित्व मोक्षापर्यंत टिकून राहते. मोक्षाच्या क्षणी जीव प्रकृतीमधे आणि आत्मा परमात्म्यामधे म्हणजेच परब्रह्मामधे विलीन होतो. त्या क्षणी खेळ समाप्त होतो.
ही वेळ येईपर्यंत प्रत्येक जीवाला जन्म मरणाच्या चक्रामधे फिरत राहवेच लागते.
आत्मा हा अस्पर्शित असतो आणि सदैव अस्पर्शितच राहतो.
परंतु प्रकृतीशी संयोग झाल्यावर, जीवाने झाकला गेल्यावर, त्याला स्वत:च्या खऱ्या स्वरुपाचा विसर पडतो. तो देहरूपाने वावरायला लागतो. ' देह म्हणजे मीच आहे!' असे मानायला लागतो. आत्म्याच्या ह्या अवस्थेला जीवावस्था असेही म्हणतात.

हा झोपेमधे पडलेल्या एखाद्या स्वप्नासारखाच प्रकार असतो.
झोपलेल्या माणसाला ' स्वप्नामधली प्रत्येक गोष्ट खरोखर आपणच करीत आहोत ' असे वाटते.
त्याचप्रमाणे प्रकृती जी जी कर्मे करते ती सगळी ' आपणच केली,' असा भ्रम झाल्यामुळे जीवात्मा आनंद, दुःख, भय, शोक इत्यादी फळे भोगत राहतो. म्हणून त्याला कर्ता असे म्हणतात.

**करणम्** — कर्म करण्यासाठी लागणारी साधने. शेती करण्यासाठी निरनिराळी अवजारे, बियाणे, पाणी, खत इत्यादी साधने लागतात. स्वयंपाक करण्यासाठी शेगडी, भांडीकुंडी, धान्य, पीठपाणी इत्यादी साधने लागतात. हा करणम् ह्या शब्दाचा व्यावहारिक अर्थ झाला. ह्याचा आध्यात्मिक अर्थ म्हणजे आपल्या देहाची पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, मन, बुद्धी आणि देहामधे कार्यरत असलेली क्रियाशक्ती इत्यादी गोष्टी होत.

ही जी क्रियाशक्ती असते, ती सर्व इंद्रियांच्याकडून वेगवेगळ्या क्रिया करून घेत असते. शरीरामधे वेगवेगळ्या ठिकाणी तिला वेगवेगळी नांवे प्राप्त होतात. ह्याची व्यवहारामधे अनुभवता येतात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.
ही क्रियाशक्ती वाचेमधे आली म्हणजे तिला **बोलणे** असे म्हणतात.
हीच क्रियाशक्ती पायांमधे आली म्हणजे तिला **चालणे** असे म्हणतात.
हीच क्रियाशक्ती डोळ्यांमधे आली म्हणजे तिला **पाहणे** असे म्हणतात.
हीच क्रियाशक्ती कानांमधे आली म्हणजे तिला **ऐकणे** असे म्हणतात.
हीच क्रियाशक्ती नासिकेमधे आली म्हणजे तिला **वास घेणे** असे म्हणतात.
हीच क्रियाशक्ती हातांमधे आली म्हणजे तिला **देणे** किंवा **घेणे** असे म्हणतात.
कोणत्याही प्राण्याच्या शरीराच्याद्वारे ज्या ज्या क्रिया केल्या जातात ह्या सर्व क्रिया ही शक्तीच करून घेते. असो.

**पृथक् चेष्टाः** — मराठी भाषेमधे चेष्टा म्हणजे मस्करी - टिंगल - टवाळी करणे.
पण येथे तो अर्थ घ्यायचा नाही. चेष्टा ह्या शब्दाचा मूळ अर्थ प्रयास किंवा प्रयत्न असा आहे.
येथे मात्र ' उपलब्ध साधनांचा वापर करून कर्त्याकडून केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्रिया.' असा अर्थ आहे.
शेती करताना शेतकऱ्याकडून विविध साधनांचा वापर करून नांगरणी, पेरणी, पाणी देणे, तण काढणे, खत मिसळणे, कीटकनाशक फवारणे इत्यादी क्रिया केल्या जातात. स्वयंपाक करताना गृहिणीकडून विविध साधनांचा वापर करून शिजवणे, मळणे, लाटणे, वाटणे, भाजणे, तळणे, घुसळणे इत्यादी क्रिया केल्या जातात. हा पृथक् चेष्टा ह्या शब्दाचा व्यावहारिक अर्थ झाला. ह्याचा आध्यात्मिक अर्थ म्हणजे क्रियाशक्तीकडून शरिरामधे वेगवेगळ्या ठिकाणी घडवून आणल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्रिया असा आहे.

ह्याची उदाहरणे सांगायची झाली तर ' जिभेच्या ठिकाणी बोलणे, चव घेणे, कानांच्या ठिकाणी ऐकणे, डोळ्यांच्या ठिकाणी पाहणे, नाकाच्या ठिकाणी श्वासोच्छ्वास करणे, वास घेणे, हातांच्या ठिकाणी देणे - घेणे, पायांच्या ठिकाणी चालणे, तोंडाच्या ठिकाणी अन्न चावून खाणे, जठराच्या ठिकाणी खाल्लेले अन्न पचवणे, गुदद्वाराच्या ठिकाणी मल आणि अपान वायूचे विसर्जन, उपस्थाचे ठिकाणी मूत्र विसर्जन, ' इत्यादी सर्व प्रकारच्या क्रिया. ह्या सर्व क्रिया सतत केल्या जातात.
त्यामुळेच आपल्या शरीराचे सर्व व्यवहार सुरळीतपणे चालून आपण निरोगी राहू शकतो.

**दैवम्** — दैव ह्या शब्दाचे अनेक अर्थ सांगितलेले आहेत. दैव म्हणजे परमेश्वराची इच्छा. पूर्वी केलेल्या शुभाशुभ कर्मांचा संस्कार.
' आपल्या आवाक्या बाहेरची, आपल्याला न समजणारी आणि बदलता न येणारी, पण आपल्या प्रयत्नांना यश अथवा अपयश देणारी अशी एक शक्ती.'
' ज्यांची आपल्याला कल्पनाच नसते असे, आपल्या प्रयत्नांना अनुकूल अथवा प्रतिकूल असणारे सृष्टीचे विविध व्यापार.'
' सर्व इंद्रिय समुदायांच्या देवतांची अनुकूलता अथवा प्रतिकूलता.' वगैरे वगैरे.
शेतकऱ्याने सर्व प्रकारचे प्रयत्न केले, आवश्यक ती काळजी घेतली असली तरीही, हवामानाची अनुकूलता अथवा प्रतिकूलता, पाऊस पडणे अथवा न पडणे, अतिवृष्टी होणे, शेतजमिनीचा कस कमी अथवा जास्त होणे, बियाणाचा दर्जा, खताचा दर्जा, पिकावर रोग पडणे अथवा न पडणे, इत्यादी गोष्टी त्याच्या आवाक्यात नसतात. त्या अनुकूल असतील तर पीक चांगले येईल. पण जर प्रतिकूल असतील तर पीक येणार नाही आणि त्याच्यावर अत्यंत वाईट परिस्थिती येईल.
गृहिणीने कितीही मन लावून, आपले कौशल्य वापरून स्वयंपाक केला असला तरीही, ज्यांच्या योगाने स्वयंपाकावर परिणाम होऊ शकतो अशी अनेक बाह्य कारणे असतात. ती कारणे गृहिणीच्या आवाक्यात नसतात. ती अनुकूल असतील तर पदार्थ चांगले होतील. पण जर प्रतिकूल असतील तर बिघडतील. हा दैवम् ह्या शब्दाचा व्यावहारिक अर्थ झाला.

ह्याचा आध्यात्मिक अर्थ म्हणजे माणसाची मोक्षप्राप्तीच्या मार्गावरील प्रगती ही अंतिमत: परमात्म्याच्या इच्छेवरच अवलंबून असते. प्रत्येकाच्या हृदयामधे तो स्थित असतो आणि तोच सर्व परिणामांचे कारणही असतो. आपले मन आणि बुद्धी शुद्ध होणे, परमार्थाची ओढ लागणे, आपल्या हातून फलाशा न ठेवता निष्काम कर्म घडून येणे इत्यादी सर्व गोष्टी आपल्या आवाक्यात नसतात. अमुक एक मनुष्य परमार्थाच्या मार्गाला लागला आणि अमुक एक मनुष्य लागला नाही, ह्या मागील कारण सांगता येत नाही. माणसाला तशी बुद्धी होणे किंवा न होणे हा त्याने मागील अनेक जन्मांमधे केलेल्या कर्मांचा म्हणजेच संचित कर्माचा परिणाम असतो आणि त्याविषयी आपल्याला काहीही माहीत नसते. त्या पूर्व संचित कर्माचा हिशोब परमेश्वरच ठेवत असतो आणि त्यानुसार सर्व काही घडवून आणीत असतो. तो आपल्याला तशी बुद्धी देत असतो.

**शरीर** — शरीराने. **वाक्** — वाणीने. **मनोभिः** — मनाने. **यत् कर्म** — जे कर्म.

**न्याय्यम्** — शास्त्रानुकूल, योग्य, न्याय्य, नीतिमान. **विपरीतम्** — शास्त्राच्या विरुद्ध, अयोग्य, अन्याय्य, अनीतिमान.

कोणीही मनुष्य कोणत्याही प्रकारचे जे जे वाईट अथवा चांगले कर्म करीत असतो, त्याची ही पाच कारणे असतात.

कोणतेही कर्म, ही पाचही कारणेच एकत्रितपणे घडवून आणतात. केवळ स्थान, केवळ कर्ता, केवळ साधन, केवळ क्रिया किंवा केवळ दैव कर्मे घडवून आणू शकत नाही. ही सर्व कारणे एकत्र येतात तेव्हाच कोणतेही कर्म घडून येते.

हाच ह्या दोन श्लोकांचा मतितार्थ आहे.

आपण **' अमुक कर्म मी केले.'** असे म्हणतो त्याला काहीही अर्थ नसतो. आपण कर्ता असलो तरीही इतर चौघांचे सहकार्य मिळाले तरच कर्म घडून येते. म्हणूनच **' आपण केलेल्या कर्माचा '** अभिमान बाळगणे योग्य होणार नाही.

तसे करणे हे अज्ञानाचे लक्षण आहे.

**तत्रैवम् सति कर्तारम् आत्मानङ् केवलन् तु यः ।**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ।। १६ ।।**
**यस्य नाहङ्कृतो भावः बुद्धिर्यस्य न लिप्यते ।**
**हत्वापि स इमाँल्लोकान् न हन्ति न निबध्यते ।। १७ ।।**

अशी खरी स्थिती असताना, अशुद्ध बुद्धी असल्यामुळे, मी एकटाच कर्ता आहे असे ज्याला वाटते त्या दुर्मतीला काहीच कळत नाही. ज्याला ' मी करतो!' ही भावना नाही आणि ज्याची बुद्धी फलासक्तीपासून अलिप्त असते तो पुरुष या सर्व लोकांना मारूनही वास्तविकपणे मारीत नाही किंवा पापाने बांधला जात नाही.

आत्मा हा शुद्ध, निर्विकार, निःसंग आणि केवळ साक्षीरूप असाच आहे. तरीही जीवाने म्हणजेच प्रकृतीने झाकला गेलेला असल्यामुळे त्याला ' आपणच जीव आहोत, आपणच शरीर आहोत, आपणच सर्व प्रकारची कर्मे करीत आहोत,' असा भास व्हायला लागतो.

हे सत्य ज्याला कळत नाही किंवा कळते पण वळत नाही तो मनुष्य, प्रकृतीच्या द्वारे वर सांगितलेली पाच कारणे एकत्र आल्यावर जी जी कर्मे घडून येतात, ती आपणच केली असे समजतो. स्वतःलाच त्यांचा कर्ता मानतो आणि फळांची अपेक्षाही बाळगतो.

त्यामुळे घडून आलेल्या कर्माची फळे त्याला सतत भोगावी लागतात. त्यामधून त्याची सुटका होऊ शकत नाही.

पण ज्याला हे सत्य उमगलेले असते, ' सर्व कर्मे ही प्रकृतीच्या द्वारेच घडून येत असतात. आपण केवळ निमित्तमात्र असतो.' हे समजलेले असते, त्याची कर्तेपणाची भावना शिल्लक रहात नाही आणि तो कर्मफळाची अपेक्षाही बाळगत नाही.

परिणामी क्षात्रधर्माचे यथायोग्य पालन करीत असताना, आपले कर्तव्यकर्म म्हणून रणांगणावर युद्ध करीत असताना, तो अनेक योद्ध्यांना मारीत असला तरीही त्याला पाप लागत नाही आणि तो कर्माने बांधलाही जात नाही. ह्याचे एक सोपे उदाहरण सांगतो.

सूर्य उगवला म्हणजे दिवस होतो आणि सूर्य मावळला म्हणजे रात्र होते.

म्हणून दिवस आणि रात्र ह्या दोन्ही अवस्था सूर्यच करतो असे आपल्याला वाटते. पण वस्तुस्थिती मात्र तशी नसते.

सूर्य आपले **प्रकाश देण्याचे** कर्म करीत असतो. कशाचीही अपेक्षा न बाळगता, निरपेक्षपणे करीत असतो.

त्या दोनही अवस्थांमधे ' आपल्याला काहीतरी मिळावे ' अशी त्याची इच्छाही नसते.

त्याच्या असण्याने दिवस आणि नसण्याने रात्र होत असली तरीही, तो स्वत: दिवस किंवा रात्र नसतो आणि त्यांचा कर्ताही नसतो.

दिवस आणि रात्र ह्या अवस्था आपोआप घडून येत असतात. त्याचे कारण, **' पृथ्वीचे स्वत:भोवती सतत फिरत राहणे '** हे आहे.

सूर्य हा केवळ निमित्तमात्र असतो. म्हणून तो कर्माने बांधला जात नाही आणि त्याला कर्माचे फळही भोगावे लागत नाही.

त्याचप्रमाणे आत्मा हा स्वत: कर्ताही नसतो आणि कर्मही नसतो. तो केवळ साक्षीरूप असतो. असो.

**ज्ञानम् ज्ञेयम् परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।**
**करणङ् कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसङ्ग्रहः ।। १८ ।।**

**ज्ञानङ् कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।**

**प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि ।। १९ ।।**

ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता अशी तीन प्रकारची कर्मप्रेरणा आणि करण, कर्म व कर्ता असा तीन प्रकारचा कर्मसंग्रह आहे. ज्ञान, कर्म आणि कर्ता हे देखील गुणांच्या भेदाने तीन तीन प्रकारचे आहेत असे सांख्यशास्त्रात म्हटले आहे. ते प्रकार जसेच्या तसे तुला सांगतो ते ऐक.

**ज्ञानम्** — ज्याच्या द्वारे जाणून घेतले जाते त्याला ज्ञान असे म्हणतात.

**ज्ञेयम्** — जे जाणून घ्यायचे त्याला ज्ञेय असे म्हणतात. **ज्ञाता** — जो जाणून घेतो त्याला ज्ञाता असे म्हणतात.

**कर्मचोदना** — कोणतेही कर्म करण्याअगोदर ते करण्याची जी प्रेरणा होते तिला कर्मचोदना असे म्हणतात.

कोणतेही कर्म करण्याचा विचार करणे, तशी इच्छा करणे आणि कर्म करण्याचा निर्णय घेणे हे त्या कर्माचे सूक्ष्म स्वरूप असते. त्यालाच कर्म प्रेरणा असे म्हणतात. त्या प्रेरणेसाठी **ज्ञान, ज्ञेय** आणि **ज्ञाता** हे तीन प्रेरक असतात असे सांगितलेले आहे. ह्या नंतर त्या सूक्ष्म स्वरूपाचे रूपांतर प्रत्यक्ष कृतीमधे होते.

**करणम्** — ज्याच्या सहाय्याने कर्म केले जाते त्या साधनाला करणम् म्हणतात.

**कर्म** — कर्त्याला फळ देणारी अशी कोणतीही क्रिया म्हणजे कर्म. **कर्ता** — जो कर्म करतो त्याला कर्ता असे म्हणतात.

अशी कृती करीत असताना कर्म करणारा योग्य त्या साधनांचा वापर करतो आणि मग प्रत्यक्ष कर्म घडते.

म्हणून **कर्ता, करण** आणि **कर्म** ह्यांना कर्माचे घटक म्हणतात. कोणत्याही कर्माच्या ह्या सर्व अंगांना कर्मसंग्रह असे म्हणतात.

ह्या पूर्वी सात, आठ व नऊ ह्या तीन श्लोकांमधे प्रकृतीच्या सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांना अनुसरून होणारे त्यागाचे तीन प्रकार सांगितले आहेत. त्याचप्रमाणे आता ज्ञान, कर्म आणि कर्ता ह्यांचेही तीन प्रकार सांगायला सुरवात होते आहे.

**सर्वभूतेषु येनैकम् भावमव्ययमीक्षते ।**

**अविभक्तम् विभक्तेषु तज्ज्ञानम् विद्धि सात्विकम् ।। २० ।।**

विभक्त दिसणाऱ्या सर्व भूतांत एकच अविभक्त/अव्यय तत्व आहे असे ज्या ज्ञानाने कळते,ते सात्विक ज्ञान असे समज.

**विभक्तेषु सर्वभूतेषु अविभक्तम्** — वेगवेगळ्या दिसणाऱ्या सर्व भूतांमधे समभावाने स्थित असलेला असा जो परमात्मा, त्याला जाणणे हे सर्वात महत्त्वाचे. ' दुसरा कोणीही नाही. केवळ तो आणि तोच.'

ह्यालाच **अद्वैत** असे म्हणतात. **सहाव्या अध्यायामधे** आदर्श योग्याचे वर्णन आलेले आहे. त्याचे वर्णन करताना,
' ज्याचा आत्मा योगयुक्त झाला, त्याची दृष्टी सम होऊन, सर्व भूतांचे ठायी आपण व आपल्या ठायी सर्व भूते आहेत असे त्याला दिसू लागते.' असे सांगितलेले आहे.

**तेराव्या अध्यायामधे** ज्याला ' नानाविध क्षेत्रांमधे सारखाच असलेल्या अविनाशी अशा क्षेत्रज्ञाची ' अनुभूती आली आहे अशा योग्याचे वर्णन आलेले आहे. त्यामधे, ' सर्व भूतांचे ठायी सारखाच राहणारा व सर्व भूते नाहीशी झाली तरी ज्याचा नाश होत नाही असा जो परमेश्वर, त्याला ज्याने पाहिले त्यानेच खरे तत्त्व ओळखले असे समज.' असे सांगितलेले आहे.

विश्वामधे अस्तित्वात असलेल्या सर्व नाशिवंत पदार्थांच्यामधे, एकच अविनाशी शक्ती भरून राहिलेली आहे आणि तिच्या आधारानेच सर्व विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय होत असतो, हे समजणे आणि ह्याची अनुभूती येणे म्हणजेच **ज्ञान** होय.

ह्या ज्ञानालाच **सात्विक ज्ञान** असे म्हटलेले आहे.

**पृथक्त्वेन तु यज्ज्ञानम् नानाभावान्पृथग्विधान् ।**

**वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानम् विद्धि राजसम् ।। २१ ।।**

सर्व भूतांमध्ये भिन्न भिन्न प्रकारचे नाना भाव आहेत असा पृथक्त्वबोध ज्या ज्ञानाने होतो, ते राजस ज्ञान असे समज.

**सर्वेषु भूतेषु पृथग्विधान् नानाभावान् पृथक्त्वेन** — सर्व भूतांमधे दिसून येणाऱ्या भिन्न भिन्न प्रकारच्या विविध भावांना वेगवेगळेपणाने जाणणे.

' देहाहून वेगळे असे कोणतेही तत्त्व अस्तित्वात नसते. चैतन्याने युक्त असलेला देह किंवा देहाने युक्त असलेले चैतन्य हेच सत्य आहे. देहाचा अंत झाला म्हणजे त्यामधे असलेल्या चैतन्याचाही अंत होतो. देहभिन्न आत्मा कधीही नसतो. देहरूप आत्माच असतो. विविध प्राणिमात्रांचा देह एकसारखा नसतो. एका शरीराहून दुसरे शरीर संपूर्णपणे वेगळे असते. कारण त्यांमधे असलेल्या चैतन्याचा विकास वेगवेगळ्या प्रकारे झालेला असतो. म्हणूनच दिसणे - असणे - वागणे ह्यांचा नीट विचार केला तर समजून येते की, ते कोणत्याही बाबतीत एकसारखे नसतात. त्यांच्या क्रिया प्रतिक्रिया एकसारख्या नसतात.

वाघ हा हरिणासारखा नसतो. हत्ती हा बैलासारखा नसतो. अस्वल हे मगरीसारखे नसते.

बदक हे गरुडासारखे नसते. गांडूळ हे सर्पासारखे नसते.' ह्या प्रकारे वस्तुमात्रामधील अनेक भेदांनी आणि लहान मोठ्या आकारांनी प्रभावित होणे आणि तेच सत्य मानणे ह्यालाच **द्वैत** असे म्हणतात.

ह्या ज्ञानालाच **राजस ज्ञान** असे म्हटलेले आहे.

**यत्तु कृत्स्नवदेकास्मिन् कार्ये सक्तमहैतुकम् ।**

**अतत्वार्थवदल्पञ् च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

परंतु हेच काय ते सर्वस्व असे म्हणून एकाच गोष्टीत तत्त्वार्थ न जाणता निष्कारण गुंतून राहिलेले जे अल्पज्ञान, ते तामसज्ञान असे समज.

**एकस्मिन् कार्ये कृत्स्नवत् सक्तम्** — एकाच कार्यरूपी शरीरातच आसक्त. ' आपले शरीर हेच काय ते सर्वस्व. त्याच्या व्यतिरिक्त कशालाही किंमत नाही. ते नष्ट झाले म्हणजे सगळे काही नष्ट होते. असे समजणे.

' आपले शरीर हे अनमोल आहे. शरीर हेच आत्मा आहे. शरीर हेच जीव आहे. शरीर हेच चेतना आहे.

देव म्हणून जे काही म्हणतात ते म्हणजे केवळ दगडाची मूर्तीच आहे. मनुष्य त्याला विकून आपला उदर निर्वाह करतो ही वस्तुस्थिती असताना, देव माणसाला कर्मफळ देतो आणि भोग भोगायला लावतो असे म्हणता येत नाही. म्हणून शरीराच्या सर्व प्रकारच्या गरजा भागविणे हेच सर्वात महत्त्वाचे. पाप आणि पुण्य ह्या दोन्ही गोष्टी खोट्या आहेत. कपोलकल्पित आहेत.

शरीराच्या आणि मनाच्या कामनांची आणि वासनांची पूर्तता केलीच पाहिजे. त्यासाठी जे जे करावे लागेल ते ते केलेच पाहिजे. तसे करणे म्हणजे पाप नाही. सगळे जग हे केवळ भोगाचाच विषय आहे. जे डोळ्यांना दिसते, मन आणि इंद्रियांना आवडते आणि ज्याचा उपभोग घ्यायची इच्छा होते तेच खरे असते. त्याचा सतत उपभोग घेणे हेच मनुष्याच्या हिताचे आहे.'

अशा प्रकारची विचारसरणी म्हणजे ज्ञान नसते तर ज्ञानाचा अभावच असतो. ज्ञानाचा भास असतो.

ह्या ज्ञानालाच **तामस ज्ञान** असे म्हटलेले आहे.

**नियतम् सङ्गरहितम् अरागद्वेषतः कृतम् ।**

**अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥**

फलप्राप्तीची इच्छा न धरणारा पुरुष, मनात प्रीती किंवा द्वेष न ठेवता, स्वधर्माप्रमाणे नेमलेले जे कर्म करतो ते कर्म सात्त्विक म्हटले आहे.

**नियतम्** — धर्मशास्त्रानुसार असलेले. **सङ्गरहितम्** — कर्तेपणाचा अभिमान नसलेले.

**अरागद्वेषतः** — राग व द्वेष नसलेले. **अफलप्रेप्सुना** — फळाची अपेक्षा नसणाऱ्याकडून

एखादी आई अनेक प्रकारे कष्ट करून, त्रास सोसून आपल्या मुलाला वाढवते. त्याची सर्व प्रकारे काळजी घेते. तरीही तिला त्याचा कधीही त्रास वाटत नाही. कंटाळा येत नाही. ती सगळे काही आनंदाने करीत असते.

त्याचप्रमाणे जो मनुष्य, प्रकृतीला अनुसरून करावी लागणारी स्वाभाविक कर्मे असतात ती सगळी कर्मे, कारणवश करावी लागणारी नैमित्तिक कर्मे, तसेच शास्त्रविधीने सांगितलेली वर्णाश्रमधर्मानुसार वाट्याला येणारी कर्मे आणि कर्तव्ये ह्यांचे श्रद्धेने पालन करीत असतो, सर्व कर्मे कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता प्रामाणिकपणे करीत राहतो, ज्याला केलेल्या कर्माच्या कर्तेपणाचा अभिमानही नसतो आणि कोणाच्याही विषयी राग अथवा द्वेषाची भावना नसते, जो आपले विहित कर्म म्हणजे परमेश्वराची इच्छा समजून,

त्याचे कार्य करण्याच्या भावनेने, त्याचे पूजन करण्याच्या भावनेने आनंदाने करीत राहतो,

त्याचे प्रत्येक कर्म हे **सात्त्विक कर्म** असते.

**यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः ।**

**क्रियते बहुलायासम् तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥**

पण फलाशेची इच्छा धरणारा अहंकारी पुरुष, परिश्रमपूर्वक जे कर्म करतो ते कर्म राजस म्हणतात.

**कामेप्सुना** — कामना आणि आसक्ती असणाऱ्या कडून. **साहङ्कारेण** — अहंकार असणारा. कर्तेपणाचा अभिमान असणारा.

**बहुलायासम्** — अमर्याद परिश्रम करावे लागणार असलेले.

जो मनुष्य, आपले कर्तव्य म्हणून जी कर्मे केली पाहिजेत ती करण्यात टाळाटाळ करतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो किंवा कशीतरी उरकतो. परंतु ज्याच्यापासून कोणता ना कोणता तरी लाभ होणार असेल, ते काम करायला तत्पर असतो. उत्सुक असतो.

त्याला त्याचा त्रास होत नाही. शीण वाटत नाही आणि कंटाळाही येत नाही.

जो मनुष्य, कोणतेही कर्म करीत असताना मनामधे ' काहीतरी मिळविण्याचा ' हेतू म्हणजेच फळाची आशा बाळगतो आणि त्यासाठीच कर्म करतो,

ज्याला आपण करीत असलेल्या कर्माच्या कर्तेपणाचा अभिमान असतो, ज्याची आकांक्षा व आसक्ती अमर्याद असल्यामुळे जो सदैव नवनवीन कर्मे करायला सुरवात करीत राहतो आणि त्यामुळे होणाऱ्या परिश्रमांचा आणि सुखदु:खांचा अनुकूल वा प्रतिकूल परिणाम सहन करीत राहतो, त्याचे प्रत्येक कर्म हे **राजस कर्म** असते.

**अनुबन्धम् क्षयम् हिंसाम् अनवेक्ष्य च पौरुषम् ।**
**मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ।। २५ ।।**

पुढे काय होईल? आपले सामर्थ्य किती? आणि नाश अगर हिंसा घडेल किंवा नाही? याचा विचार न करता, मोहाने जे कार्य आरंभिले जाते ते कर्म तामस म्हटले आहे.

**अनुबन्धम्** — परिणाम. ' एखादे कर्म करणे आवश्यक आहे काय? ते केले तर पुढे काय होईल? सुखप्राप्ती होईल की दु:खप्राप्ती होईल? ' ह्याचा विचार करणे.

**क्षयम्** — हानी. ' ते कर्म करण्यासाठी किती धन खर्च होईल? किती शक्ती खर्च होईल? किती वेळ लागेल? त्यायोगे कोणकोणत्या प्रकारची हानी होऊ शकेल? तशी हानी होणे योग्य आहे काय? ' ह्याचा विचार करणे.

**हिंसाम्** — हिंसा. ' त्या कर्मामुळे इतर माणसांना किंवा इतर प्राण्यांना त्रास सहन करावा लागेल काय? त्यांच्यापैकी कोणाचे जीवन नष्ट होऊ शकेल काय? तसे करायची खरोखर गरज आहे काय? ' ह्याचा विचार करणे.

**पौरुषम्** — सामर्थ्य. ' ते कर्म पार पाडयला जे शारिरीक, मानसिक, आर्थिक व इतर सामर्थ्य लागेल, ते सामर्थ्य आपल्याकडे आहे काय? ' ह्याचा विचार करणे.

कोणतेही कर्म करायला सुरवात करण्यापूर्वी त्याविषयी सारासार विचार करणे आवश्यक असते. तसे केले नाही तर विपरीत परिणामांना सामोरे जावे लागते. जो मनुष्य अशा प्रकारचा कोणताही विचार न करता, कोणताही विधिनिषेध न बाळगता मोहग्रस्त होऊन, ज्याच्या योगे सुख तर मिळणार नाही पण दु:ख मात्र नक्की होईल अशा प्रकारची कर्मे करायला लागतो,

त्याचे प्रत्येक कर्म हे **तामस कर्म** असते.

**मुक्तसङ्गोऽनहम्वादी धृत्युत्साहसमन्वित: ।**
**सिध्यसिध्योर्निर्विकार: कर्ता सात्विक उच्यते ।। २६ ।।**

ज्याला आसक्ति नाही, जो - मी व माझे - म्हणत नाही, कार्य सिद्ध होवो वा न होवो, जो मनाने अविकारी असतो परंतु जो धैर्य व उत्साह ह्यांनी युक्त होऊन कर्म करतो, त्यास सात्त्विक कर्ता म्हटले आहे.

**मुक्तसङ्ग** — संग रहित. आसक्ति नसणे. **अनहम्वादी** — अहंकारयुक्त वचन न बोलणारा.

**धृत्युत्साहसमन्वित:** — अंगी धैर्य आणि उत्साह असलेला. **सिध्यसिध्यो:** — कार्य सफल होवो अथवा असफल होवो.

**र्निविकार:** — आनंद अथवा दु:ख इत्यादी विकारांपासून अलिप्त.

जो आपल्या वाट्याला आलेले प्रत्येक कर्म आदरपूर्वक, आपले कर्तव्य म्हणून, उत्साहित होऊन करीत राहतो, ज्याला कर्माच्या फळाची आशा नसते, कर्म करीत असल्याचा अहंकार नसते, यशापयशाविषयी चिंता नसते, यश मिळाले तरी प्रौढी मिरवीत नाही आणि अपयश आले तरी निराश होत नाही, आपण केलेल्या कर्माच्या परिणामांना जो धैर्याने सामोरा जातो,

त्याला **सात्त्विक कर्ता** असे म्हणतात.

**रागी कर्मफलप्रेप्सु: लुब्धो हिंसात्मकोऽशुचि: ।**
**हर्षशोकान्वित: कर्ता राजस: परिकीर्तित: ।। २७ ।।**

विषयासक्त, लोभी, हर्ष व शोक यांनी युक्त, कर्मफलाच्या प्राप्तीची इच्छा धरणारा, हिंसक आणि अशुद्धाचरणी अशा कर्त्यास राजस कर्ता म्हणतात.

**रागी** — आसक्ति असलेला. **कर्मफलप्रेप्सु:** — कर्माच्या फळाची इच्छा बाळगणारा.

**लुब्ध:** — लोभी. **हिंसात्मक:** — इतरांना त्रास देण्याचा स्वभाव असणारा.

**अशुचि:** — अशुद्ध आचरण करणारा. **हर्षशोकान्वित:** — आनंद अथवा दु:ख इत्यादी विकारांनी लिप्त.

ज्याला विविध विषयांचा उपभोग घ्यायची तीव्र इच्छा असते, जो कोणत्याही कर्मापासून सदैव काहीतरी मिळवण्याची इच्छा बाळगतो, जो आत्यंतिक लोभापायी, इतरांना त्रास झाला तरी त्याची पर्वा न करता, करू नये ते करतो, यश मिळाले तर आनंदित होतो आणि

इतरांना हिणवतो, अपयश आले तर अत्यंत दु:खी होऊन इतरांना दोष देत कर्माचीच निंदा करतो, त्याला **राजस कर्ता** असे म्हणतात.

**अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।**
**विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ २८ ॥**

चंचल बुद्धीचा, अडाणी, घमेंडखोर, धूर्त, बुडव्या, आळशी, शोकग्रस्त असणारा व चेंगट अशा कर्त्यास तामस कर्ता म्हटले आहे.

**अयुक्तः** — अयोग्य. **प्राकृतः** — असंस्कृत. अशिक्षित. **स्तब्धः** — घमेंडखोर. **शठः** — धूर्त.

**नैष्कृतिकः** — इतरांच्या उपजीविकेचा नाश करणारा. इतरांचे नुकसान करणारा. **अलसः** — आळस करणारा. आळशी.

**विषादी** — शोक करणारा. **दीर्घसूत्री** — चेंगट. एखादे कार्य दीर्घकाळपर्यंत रेंगाळत ठेवणारा.

जो लबाड असतो, कपटी असतो, घमेंडखोर असतो, असंस्कृत असतो, जो सारासार विचार न करता, परिणामांची पर्वा न करता अयोग्य कर्म करतो, जो कोणत्याही प्रकारे सत्कर्म करायचे टाळतो, त्याविषयी आळस करतो, जो मनामधे सदैव धुमसत असतो, दु:खी असतो, तडफडत असतो, ज्याला इतरांचे चांगले झालेले पाहवत नाही म्हणून त्यांचे नुकसान करायच्या हेतूने सर्व प्रकारे प्रयत्न करतो, त्याला **तामस कर्ता** असे म्हणतात.

**बुद्धेर्भेदम् धृतेश्चैव गुणतस्त्रिविधम् श्रृणु ।**
**प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥**

हे धनंजया ! बुद्धी आणि धृति यांचेही गुणांमुळे होणारे तीन प्रकारचे भेद, वेगवेगळे, संपूर्णपणे, तुला सांगतो ते ऐक.
येथपर्यंत ज्ञान, कर्म आणि कर्ता ह्यांचे तीन प्रकार सांगितले.
आता बुद्धी आणि धारणा ( धैर्य ) ह्यांचेही तीन प्रकार सांगायला सुरवात होते आहे.

**प्रवृत्तिञ् च निवृत्तिञ् च कार्याकार्ये भयाभये ।**
**बन्धम् मोक्षञ् च या वेत्ति बुद्धि:सा पार्थसात्विकी ॥ ३० ॥**

हे पार्था ! एखादी गोष्ट करणे व एखादी गोष्ट न करणे, कोणते कृत्य करण्यास योग्य आणि कोणते अयोग्य, कशाला भ्यावे आणि कशास भिऊ नये, बंध व मोक्ष कशात आहे हे जी बुद्धी जाणते, ती बुद्धी सात्त्विक होय.

**प्रवृत्तिम्** — संसारामधे राहून, आसक्ती सोडून, फलाशा न बाळगता, आपले कर्तव्य करीत असताना परमेश्वरार्पणबुद्धीन वागणे.

**निवृत्तिम्** — संसारापासून विरक्त होऊन, देहाभिमान सोडून, केवळ परमात्म्याशी ऐक्यभावनेने राहणे.

**कार्याकार्ये** — करण्यायोग्य कृती आणि न करण्यायोग्य कृती.

**भयाभये** — भय आणि अभय. **बंधनम्** — बंधन. **मोक्षम्** — मोक्ष. मुक्ती. **वेत्ति** — यथार्थपणे जाणते.

जिच्या योगाने मनुष्य प्रवृत्ती आणि निवृत्ती, सत्य आणि असत्य, कार्य आणि अकार्य, भय आणि अभय, बंधन आणि मुक्ती ह्यांना यथार्थपणे जाणतो, कोणत्याही प्रसंगी सारासार विचार करू शकतो आणि विचारपूर्वक योग्य निर्णय घेऊन तो अमलात आणू शकतो, ती **सात्त्विक बुद्धी** असते.

**यया धर्ममधर्मञ् च कार्यञ् चाकार्यमेव च ।**
**अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥**

ज्या बुद्धीने धर्म व अधर्म, कार्य आणि अकार्य यांचा यथार्थ निर्णय होत नाही, ती बुद्धी, हे पार्था ! राजस होय.

**धर्मम्** — धर्म. **अधर्मम्** — अधर्म. **कार्यम्** — कर्तव्य.

**अकार्यम्** — अकर्तव्य. **अयथावत्** — यथार्थपणे. **प्रजानाति** — जाणत नाही.

जिच्या योगाने मनुष्य धर्म आणि अधर्म तसेच कार्य आणि अकार्य, ह्यांमधील फरक समजू शकत नाही, सारासार विचार करू शकत नाही, निर्णय घेताना गोंधळून जातो, परिणामी योग्य निर्णय घेता येऊ शकेल ह्याची निश्चिती नसते, कधी योग्य तर कधी अयोग्य निर्णय घेतला जातो, ती **राजस बुद्धी** असते.

**अधर्मम् धर्ममिति या मन्यते तमसावृता ।**
**सर्वार्थान् विपरीतान्श्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥**

जी बुद्धी तमाने व्याप्त होऊन अधर्माला धर्म मानते आणि सर्व गोष्टीत विपरीत समज करून देते ती बुद्धी, हे पार्था ! तामस होय.

**अधर्मम् धर्मम् इति मन्यते** — अधर्मालाही ‘ हा धर्मच आहे ’ असे मानते.

**सर्वार्थान् विपरीतान्** — सर्व पदार्थांनाही विपरीत मानते. सर्व गोष्टींचा विपरीत अर्थ काढते.

जिच्या योगाने मनुष्य धर्माचा धिक्कार करतो, अधर्मालाच धर्म मानतो, सत्य नाकारून असत्याचा स्वीकार करतो, असत्यालाच सत्य मानतो, जे वंदनीय असते त्याची सदैव निंदा करतो आणि जे निंदनीय असते त्यालाच वंदनीय मानतो, परिणामी सदैव विपरीत मार्गाचेच आचरण करतो, ती **तामस बुद्धी** असते.

**धृत्या यया धारयते मन:प्राणेंद्रियक्रियाः ।**

**योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ।। ३३ ।।**

हे पार्था ! ज्या अव्यभिचारी धारणेने मन, प्राण व इंद्रिये ह्यांचे सर्व व्यापार कर्मफलत्यागरूप योगाने चालविले जातात ती धारणा सात्त्विक होय.

**मन:प्राणेंद्रियक्रियाः** — परमेश्वरप्राप्तीसाठी आपले मन, प्राण आणि सर्व इंद्रिये ह्यांना परमेश्वराचे भजन, पूजन, श्रवण, मनन, चिंतन, ध्यान, निष्काम कर्म इत्यादींकडे वळवणे. गुंतवून ठेवणे.

**योगेन** — ध्यानयोगाच्या द्वारे.

**अव्यभिचारिण्या** — परमेश्वराचा एकमेव विषय सोडून इतर कोणत्याही सांसारिक विषयांमधे न गुंतणे. त्यांचा विचारही न करणे.

**धृतिः** — धैर्य. धारणा. निश्चय.

योग हे परमेश्वराला जाणण्याचे एक साधन आहे. एक माध्यम आहे. जो मनुष्य त्या मार्गाने आपले मन, प्राण आणि सर्व इंद्रिये ह्यांच्यावर ताबा मिळवतो, निश्चयपूर्वक त्यांच्या सर्व क्रिया परमेश्वराशी सलग्न करतो, एकाग्र करतो, परमेश्वराची अनन्यभावाने भक्ती करतो, त्याची धारणा ही **सात्त्विक धारणा** असते.

**यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ।**

**प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ।। ३४ ।।**

हे अर्जुना ! ज्या धारणेने धर्म, काम व अर्थ हे पुरुषार्थ चालविले जातात व प्रसंगानुसार जी फलाची इच्छा ठेवते ती धारणा, हे पार्था ! राजस होय.

**धर्मकामार्थान्** — धर्म, अर्थ आणि काम ह्यांना. **प्रसङ्गेन** — अत्यंत आसक्त होऊन.

**फलाकाङ्क्षी** — फळाची इच्छा बाळगणारी.

जो मनुष्य सदैव फळाच्या आशेनेच कर्म करतो, विविध विषयांचा सतत उपभोग घेणे आणि त्याद्वारे इंद्रियांना तृप्त करणे हीच ज्याची इच्छा असते, ज्याचे मन, प्राण आणि सर्व इंद्रिये ही त्यामधेच गुंतलेली असतात, अती आसक्तीमुळे त्यामधून बाहेर पडू शकत नाहीत, त्याची धारणा ही **राजस धारणा** असते.

**यया स्वप्नम् भयम् शोकम् विषादम् मदमेव च ।**

**न विमुञ्चति दुर्मेधाः धृतिः सा पार्थ तामसी ।। ३५ ।।**

हे पार्था ! ज्या धारणेने मनुष्य दुर्बुद्ध होऊन झोप, भय, शोक, विषाद आणि मद सोडीत नाही, ती धारणा तामस होय.

**दुर्मेधाः** — दुष्ट बुद्धी असणारा. **न विमुञ्चति** — कधीही सोडत नाही.

ज्या मनुष्याची बुद्धी दुष्ट असते, जो नेहमी उन्मत्तपणानेच वागतो, इतरांना तुच्छ लेखतो, जो अहंभाव सोडू शकत नाही, जो भौतिक वस्तूंचा उपभोग घेणे सोडू शकत नाही, जो अनावर झोप, अती चिंता, अती भय आणि अती शोक ह्यांना सोडू शकत नाही, त्याची धारणा ही **तामस धारणा** असते.

आता सुखाचेही तीन प्रकार सांगायला सुरवात होते आहे.

**सुखम् त्विदानीम् त्रिविधम् श्रुणु मे भरतर्षभ ।**

**अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तञ् च निगच्छति ।। ३६ ।।**

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।**

**तत्सुखम् सात्विकम् प्रोक्तम् आत्मबुद्धिप्रसादजम् ।। ३७ ।।**

हे भरतश्रेष्ठा ! आता सुखाचेही तीन प्रकार मी सांगतो ते ऐक. अभ्यासाने ज्यात रमतो व जेथे दुःखाचा अंत प्राप्त होतो, जे आरंभी विषासारखे पण परिणामी अमृततुल्य ते आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून होणारे सुख सात्त्विक म्हटले आहे.

**अभ्यासात् रमते** — परमेश्वराचे भजन, ध्यान आणि सेवा इत्यादींच्या अभ्यासामधे साधक रमून जातो.

**दुःखान्तम् निगच्छति** — साधक दुःखाच्या अंतापर्यंत पोहोचतो. त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात.

**अग्रे विषम् इव** — आरंभकाळी म्हणजे सुरवातीला विषाप्रमाणे वाटते. ( तरीही )

**परिणामे अमृतोपमम्** — अखेरीस अमृततुल्य म्हणजे अमृतासारखे असते.

**आत्मबुद्धिप्रसादजम्** — आत्मसाक्षात्काराच्या अनुभूतीमुळे उत्पन्न होणारे.

डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा ह्या पांच ज्ञानेंद्रियांचे अनुक्रमे रूप, गंध, शब्द, रस आणि स्पर्श, हे जे विषय आहेत, त्यांचा उपभोग आपण सगळे सदैव घेतच असतो. आयुष्यभर त्यातच रममाण होत असतो. खरे म्हणजे अशा भोगांमधून सुख नसते तर केवळ सुखाचा आभास असतो. त्यामधून मिळणारे सुख हे तात्पुरते असते. थोड्या काळापुरतेच असते. त्याच्या तुलनेमधे सर्व प्रकारच्या ऐहिक सुखाच्याविषयी उदासीन राहून परमेश्वराच्या चिंतनामधे रममाण होण्यामधे जे सुख असते ते सर्वोत्तम असते.

पण त्यासाठी साधकाला अनेकविध प्रयास करावे लागतात. कष्ट सहन करावे लागतात.

कठोर म्हणता येतील अशी व्रताचरणे करावी लागतात. अष्टांगयोगाची साधना करावी लागते. आपल्या मन आणि इंद्रियांवर ताबा मिळवावा लागतो. सर्व प्रकारच्या ऐहिक विषयांच्यापासून अलिप्त व्हावे लागते.

असे वैराग्य प्राप्त होण्यासाठी साधना करीत असताना सुरवातीला फार दु:ख होते.

यातना होतात. वेदना होतात. त्यांना सहन करणे फार कष्टप्रद असते.

परंतु एकदा त्या दु:खाला धैर्याने स्वीकारले म्हणजे त्याची सवय होते. तशी सवय झाली म्हणजे ते दु:ख हळूहळू नाहीसे होते.

प्रदीर्घ साधनेने वैराग्य सिद्ध झाले म्हणजे मग अखेरीस साधक आत्मस्वरूपाशी एकरूप होतो. एकरस होतो. त्याला आत्मसाक्षात्काराचा अलभ्य लाभ होतो. त्यामुळे जो परमानंद प्राप्त होतो, तो अवर्णनीय असतो.

मुख्य म्हणजे हा आनंद शाश्वत असतो. कधीही कमी जास्त होत नाही. त्यामधे बदल होत नाही. कारण कोणत्याही प्रकारच्या वासना, कामना, लोभ, राग, अहंकार, मत्सर इत्यादी सर्व गोष्टींचा अंत झालेला असतो.

त्यायोगे जे सुख प्राप्त होते त्याची तुलना इतर कोणत्याही सुखाच्या बरोबर करता येणार नाही. ते सर्वोत्तम सुख असते.

त्यालाच **सात्त्विक सुख** असे म्हटलेले आहे.

**विषयेन्द्रियसंयोगात् यत्तदग्रेऽमृतोपमम् ।**

**परिणामे विषमिव तत्सुखम् राजसम् स्मृतम् ।। ३८ ।।**

इंद्रिये व त्यांचे विषय यांच्या संयोगापासून होणारे, जे आरंभी अमृतासारखे पण परिणामी विषासारखे असते, ते सुख राजस म्हटले आहे.

**विषयेन्द्रियसंयोगात्** — इंद्रिये आणि त्यांचे विषय ह्यांच्या संयोगामुळे. **अग्रे** — आरंभकाळी म्हणजे सुरवातीला.

**अमृतोपमम्** — अमृताप्रमाणे वाटते. **परिणामे विषम् इव** — अखेरीस विषासारखे असते.

आपण सगळे आपल्या नेहमीच्या व्यवहारामधे सुख ह्या शब्दाचा अर्थ ' इंद्रिये आणि त्यांचे विषय ह्यांच्यापासून मिळणारे सुख ' असाच लावतो.

आपल्याला प्रिय असलेल्या वस्तूच्या, प्रिय विषयाच्या किंवा प्रिय प्रसंगाच्या संयोगाने अनुभवास येणारी आणि हवीशी वाटणारी अशी जी अनुकूल संवेदना असते तिला सुख असे म्हणतो. अशा प्रकारचे सुख सुरवातीला फार गोड वाटते, आनंददायक वाटते. हवेहवेसे वाटते. पण ते वरवर गोड वाटणारे सुख फार काळ टिकत नाही. कालांतराने त्याचे परिवर्तन दु:खामधे होते आणि ते मात्र दीर्घकाळ भोगावे लागते. ह्याची अनेक उदाहरणे सांगता येतील. ती यादी फारच मोठी आहे.

समजा एखाद्या माणसाने, त्याला आवडणाऱ्या स्त्रीचा सदैव सहवास लाभावा म्हणून, स्वत:कडे पैसे नसताना, कर्ज काढून मोठ्या थाटामाटाने लग्न समारंभ साजरा केला तर सुरवातीला फार आनंद होतो. आपली आवडती स्त्री घरात पत्नी होऊन आली आणि तिचा निकटचा सहवास प्राप्त झाला ह्याचे सुख आणि समाधान मिळते. परंतु कालांतराने कर्जफेडीचा त्रास भोगावा लागतो.

जर पत्नीशी मतभेद झाले आणि पटेनासे झाले तर तो त्रास भोगावा लागतो.

मुले झाल्यावरही ' आपण आई - बाप झाल्याचा आनंद होतो. परंतु कालांतराने मुलांना वाढवताना, मोठे करताना त्रास भोगावा लागतो. त्यानंतरही जेव्हा मुलांचे बरोबर मतभेद होतात आणि ती आपले ऐकेनाशी होतात, त्यावेळी अपरंपार मानसिक यातना होतात.

कमालीचे दु:ख होते. ह्याचे कारण म्हणजे आपल्या वासना आणि कामनांचे शमन झालेलेच नसते.

त्या सुरवाती इतक्याच तीव्र असतात आणि अखेरपर्यंत तशाच राहतात.

आपले शरीर मात्र अशक्त होत चाललेले असते. त्यामुळे इच्छा पूर्ण होत नाहीत आणि झाल्या तरी उपभोगता येत नाहीत.

मग उरतात त्या केवळ वेदना, यातना आणि दु:ख. ते टाळता येत नाही. आपली इच्छा नसली तरीही भोगावेच लागते.

शास्त्रामधे, सुरवातीला आनंददायक वाटणाऱ्या, पण फार काळ न टिकणाऱ्या आणि अखेरीस दु:खदायक असलेल्या, अशा सुखाला **प्रेय** असे म्हटलेले आहे.

तसेच, सुरवातीला दु:खदायक वाटणाऱ्या पण अखेरीस शाश्वत आनंददायक असलेल्या, अशा सुखाला **श्रेय** असे म्हटलेले आहे.
आपली इंद्रिये आणि त्यांची विषयासक्ती ह्यांना अरण्यामधे पेटलेल्या वणव्याची उपमा दिलेली आहे.
वणवा हा कधीही शांत होत नाही. त्याला जितके इंधन मिळेल तितका अधिक भडकून उठतो.
आपल्या वासना आणि कामनांचीही तीच गोष्ट आहे. त्यांचे शमन कधीही होत नाही. त्या कधीही नाहीशा होत नाहीत. उलट विविध उपभोग घ्यायला मिळाले म्हणजे त्या अधिक तीव्र होतात. त्यांना थांबणे माहीतच नसते.
त्यांचा परिणाम म्हणजे केवळ दु:ख आणि दु:खच. जगामधे असणाऱ्या विविध विषयांचा उपभोग घेण्याने मिळणाऱ्या ह्या तथाकथित सुखालाच **राजस सुख** असे म्हटलेले आहे.

**यदग्रे चानुबन्धे च सुखम् मोहनमात्मनः ।**
**निद्रालस्यप्रमादोत्थम् तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥**

जे प्रारंभी व परिणामीही आत्म्याला मोह पाडते आणि जे निद्रा, आळस व कर्तव्याचा विसर ह्यांच्या पासून होते ते सुख तामस म्हटले आहे.

**अग्रे च** — आरंभकाळी म्हणजे सुरवातीला, **अनुबन्धे च** — परिणामी देखील
**मोहनम् आत्मनः** — आत्म्याला मोहित करणारे. **निद्रालस्यप्रमादोत्थम्** — निद्रा, आळस व प्रमाद ह्यांच्यापासून उत्पन्न होणारे.
धर्मशास्त्रामधे जे जे निषिद्ध सांगितलेले आहे ते ते सगळे सतत करीत राहणे. सदैव त्याचाच विचार करणे आणि त्यासाठीच प्रयत्न करीत राहणे. ' अपेयपान करणे, अभक्ष्य भक्षण करणे, स्वैराचारी स्त्रियांच्या सहवासात राहणे, वरून सज्जन दिसणाऱ्या पण स्वभावाने वाईट असणाऱ्या माणसांच्या सहवासात राहणे, खोटे बोलणे, चोरी करणे, घात करणे, ज्यांच्या आधाराने आणि सहकार्याने आपले आयुष्य जगत आलो आहोत त्यांनाच त्रास देणे, लुबाडणे, फसविणे, समाजद्रोह करणे, देशद्रोह करणे ' इत्यादी सर्व कर्मे करणाऱ्यांना **तमोगुणी मनुष्य** असेच म्हटलेले आहे.
अशी कृत्ये करायचा विचार करीत असताना, प्रत्यक्ष करताना आणि करून झाल्यावर त्यांना कसले सुख मिळत असेल देव जाणे. त्यामधे कोणतेही सुख मिळणे शक्य नाही. समाधान मिळणे शक्य नाही. आनंद मिळणे शक्य नाही.
केवळ दु:ख, वेदना आणि यातनाच मिळतील. असे असूनही, त्यांना सुख मानणे आणि तशी कर्मे करीत राहणे ही मानसिक विकृतीच आहे. ह्या विकृतीला **तामस सुख** असे म्हटलेले आहे.
येथे मला नेहमीच एक प्रश्न पडतो आणि त्याचे उत्तर अजूनही मिळालेले नाही. ज्याच्यामधे सुख तर नाहीच परंतु सुखाचा आभासही नाही, सुरवातीपासून अखेरपर्यंत केवळ दु:ख, वेदना आणि यातनाच आहेत, त्याला सुख का म्हटले आहे?
दुदैवाने, आज आपल्या समाजामधे अशा विकृत मनोवृत्तीच्या माणसांची संख्या फार वाढलेली आहे आणि त्यामधे सतत भरच पडते आहे. अशीच परिस्थिती राहिली तर आपल्या देशाची अवस्था फारच वाईट होईल हे सांगायला कोणाही ज्योतिषाची गरज नाही.
तसे होऊ नये म्हणून सर्वांनी, विशेष करून तरुण पिढीने, गीतेचा अभ्यास केला पाहिजे.
गीता आचरणात आणायचा प्रयत्न केला पाहिजे. असो.
**चौदाव्या** अध्यायामधे गुणत्रयविभागयोग ह्या विषयाची सुरवात झाली आहे.
तेथपासून आतापर्यंत प्रकृतीच्या सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांना अनुसरून होणारे,
' पुरुष, त्याची श्रद्धा, त्याचा आहार, यज्ञ, तप, दान, कर्मत्याग, ज्ञान, कर्ता, कर्म, बुद्धी, धृती म्हणजे धैर्य अथवा निश्चय, सुख ' इत्यादींचे तीन तीन प्रकार सांगण्यात आलेले असून त्यांच्यापैकी ' सात्त्विक प्रकार हे श्रेष्ठ, ग्राह्य व अनुकरणीय असून, राजस प्रकार हे मध्यम आणि स्वाभाविक तर तामस प्रकार हे कनिष्ठ, त्याज्य व निषिद्ध आहेत.' असे प्रतिपादन केलेले आहे.
यापुढील श्लोकामधे हा त्रिगुणात्मक प्रकृतीच्या विषयाचा समारोप केलेला आहे.

**न तदस्ति पृथिव्याम् वा दिवि देवेषु वा पुनः ।**
**सत्वम् प्रकृतिजैर्मुक्तम् यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥**

ह्या पृथ्वीवर, आकाशात किंवा देवलोकीही, प्रकृतीच्या ह्या तीन गुणांपासून सुटलेले आहे असे काहीही नाही.
सर्वात प्राचीन अशा सांख्यशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांताप्रमाणे,
' पुरुष हा निर्गुण व निराकार असतो आणि प्रकृती ही सगुण व साकार असते. सर्व विश्वाची निर्मिती ही पुरुष आणि प्रकृती ह्यांचा संयोगाने, प्रकृतीच्यापासूनच झालेली आहे.'
तीन गुणांनी युक्त असलेल्या ह्या प्रकृतीपासून पुढे निर्माण झालेल्या, होत असलेल्या आणि होणाऱ्या सर्व पदार्थांना ' प्रकृतीचे विकार ' असे म्हणतात. ह्या विकारांच्यामुळेच, विश्वामधील नानाविध प्राणिमात्र आणि पदार्थमात्रांमधे निरनिराळे असे, अनेकविध गुण दिसून येतात.

किंबहुना, ' हे तीन गुण म्हणजेच प्रकृती आहे.' असे सांख्यशास्त्राचे सांगणे आहे.
प्रकृती ही स्वतःच तीन गुणांनी युक्त असते, त्यामुळे तिच्यापासून निर्माण झालेल्या प्रत्येक वस्तुमात्रामधे हे तीनही गुण असतातच.
केवळ सत्त्वगुण, केवळ रजोगुण किंवा केवळ तमोगुण असलेली वस्तू नसते. तसेच ज्यामधे कोणताही गुण नाही असे काहीही नसते.
कारण ह्या तीन गुणांच्या पलीकडे जाणे म्हणजेच त्रिगुणातीत अवस्था प्राप्त होणे, मायेच्या पाशामधून सुटून परब्रह्माप्रत पोहोचणे,
जन्म - मरणाच्या चक्रामधून मुक्त होणे, मोक्षप्राप्ती होणे होय. वेदांतामधे ज्याला माया असे म्हणतात ती हीच त्रिगुणात्मक प्रकृती होय.
हिच्या योगानेच स्वर्गलोक, मृत्युलोक, पाताळलोक इत्यादी निर्माण झालेले आहेत.
हिच्या योगानेच ब्रह्मा - विष्णू - महेश हे तीन देव निर्माण झालेले आहेत आणि ह्या तिघांना एकत्र आणूनच, आपण ज्याला
**' त्रिगुणात्मक त्रैमूर्ती '** म्हणतो, त्या **दत्तात्रेयाची** मूर्ती सिद्ध झालेली आहे. असो.
आता समाजाचे सर्व व्यवहार योग्य प्रकारे चालत राहावेत म्हणून, ह्याच त्रिगुणांच्या आधारे उत्पन्न झालेली चातुर्वर्णरूपी व्यवस्था आणि त्या व्यवस्थेमधे ठरवलेले प्रत्येकाचे कर्तव्यकर्म ह्याविषयी सांगायला सुरवात होते आहे.

**ब्राह्मणक्षत्रियविशाम् शूद्राणाञ् च परन्तप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।। ४१ ।।**

हे परंतपा ! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांची कर्मे, त्यांच्या स्वभावजन्य गुणांप्रमाणे विभागलेली आहेत.
प्राचीन काळी जेव्हा माणूस कळप करून एकत्र राहायला लागला तेव्हा त्या सुरवातीच्या काळामधेही,
' कळपामधील सगळ्या माणसांचे दैनंदिन व्यवहार योग्य प्रकारे पार पडावे ' म्हणून कामांची वाटणी केली जात होतीच.
त्यावेळी अन्न आणि निवारा ह्या दोनच गरजा असल्यामुळे दररोज करावी लागणारी कामेसुद्धा फारच थोडी असणार.
त्या कामांचे स्वरूप ' गुहेमधे लहान मुलांच्या बरोबर कोणी रहायचे? गुहेच्या बाहेर पहारा देऊन त्यांचे रक्षण कोणी करायचे?
कंदमुळे आणि फळे कोणी शोधून आणायची? अरण्यामधे प्राण्यांच्या शिकारीला कोणी जायचे?
शिकार करून आणल्यावर, मारलेल्या प्राण्याला भाजून त्याचे मांस सर्वांना कोणी वाटायचे?' इतकेच मर्यादित असणार.
पण ती कामेही वाटून घेतली जातच असणार. त्यामधूनच हळूहळू समाज व्यवस्था अस्तित्वात यायला सुरवात झाली.
तेव्हापासूनच ' समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालावेत, त्याचे सर्वप्रकारे संरक्षण व्हावे, पोषण व्हावे, उत्कर्ष व्हावा आणि त्याला स्थैर्य प्राप्त व्हावे ' म्हणून पूर्वानुभवाच्या आधारे, समाजामधील माणसांच्या अंगभूत गुणांच्या आणि काम करण्याचे कौशल्य व क्षमता ह्यांच्या आधारे ' कोणी कोणी काय काय करायचे करायचे आणि काय काय करायचे नाही ' ते ठरविण्यात आले.
तशी व्यवस्था केली गेली आणि ती हजारो वर्षे उत्तम प्रकारे अमलात आणली गेली.
माणसाचे अंगी असलेले स्वाभाविक गुण आणि कर्मकौशल्य ह्यांच्यावर आधारित असलेली ही व्यवस्था म्हणजेच **चातुर्वर्ण्य व्यवस्था** होय. तिचा मूळ हेतू अत्यंत चांगलाच आहे. एकूण समाजासाठी कल्याणप्रद असाच आहे.
ह्यापूर्वी चवथ्या अध्यायामधे ह्या व्यवस्थेचा उल्लेख आलेला आहे.

**चातुर्वर्ण्यम् मया सृष्टम् गुणकर्मविभागशः ।**
**तस्य कर्तारमपि माम् विद्ध्यकर्तारमव्ययम् ।। ४ - १३ ।।**

अर्थ — मनुष्याचे कर्म आणि त्याचे गुण ह्यांच्या मधील भेदाप्रमाणे, चार वर्णांची व्यवस्था मीच निर्माण केलेली आहे.
पण ती व्यवस्था प्रत्येक माणसाच्या गुण आणि कर्मानुसारच केली जात असल्यामुळे वास्तविक पाहता, निर्मिती करूनही, मी त्या व्यवस्थेचा कर्ता नाही.

समाजाच्या धारणेसाठी आणि उत्कर्ष घडून येण्यासाठी, पूर्वीच्या ऋषी - मुनींनी घालून दिलेली ही व्यवस्था उत्तम प्रकारे अंमलात आणली जात होती. परंतु कालांतराने ह्या व्यवस्थेचा एका प्रकारे अतिरेक केला गेला.
स्वार्थापोटी तत्कालीन समाजधुरिणांच्या कडून, मुळामधे अस्तित्वात नसलेले नियम लावायला आणि अंमलात आणायला सुरवात झाली आणि त्यामुळे व्यक्तीच्या गुणांचे मूल्यमापन करणे आणि त्यानुसार त्याचा वर्ण ठरवणे बाजूला पडले.
अयोग्य व्यक्ती, त्यांची पात्रता नसताना, अयोग्य काम करायला लागल्या. योग्य व्यक्तीच्यावर त्याची जात, उपजात, वर्ग, वर्ण इत्यादींच्या आधारे अन्याय केला जाऊ लागला आणि परिणामी ही व्यवस्थाच दूषित झाली.
ह्या अन्यायाचे महाभारतामधील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे **महारथी कर्ण.**
केवळ तो सारथी अधिरथाच्या घरी राहिला, वाढला आणि मोठा झाला म्हणून त्याच्यावर सर्वांच्याकडून सतत अन्याय केला गेला.
त्याची हेटाळणी केली गेली. महापराक्रमी असूनही, विख्यात योद्धा असूनही, अर्जुनापेक्षाही सरस असूनही, दानवीर असूनही, त्याला **सूतपुत्र** म्हणून सदैव अपमानित केले गेले.

त्याचा अपमान करणाऱ्यांना, त्याने जाहीरपणे विचारलेला प्रश्न अजरामर झालेला आहे. त्याने विचारले आहे की,

**सुतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् ।**
**दैवायत्तम् कुले जन्म मदायत्तम् तु पौरुषम् ।।**

अर्थ — मी सारथी असेन अथवा सारथीपुत्र असेन किंवा आणखी कोणीही असेन. ( त्याने काय बिघडते? ) माणसाचा जन्म कोणत्या कुळामधे व्हावा हे त्याच्या हातात नसते तर दैवाच्या आधीन असते, परंतु माणसाचा पराक्रम आणि पुरुषार्थ हे दोन्ही त्याच्या आधीन असतात. ( त्या दोन्ही बाबतीत मी सरस आहे. मग तुम्ही सगळे मला सूतपुत्र म्हणून का हिणवता? )

कर्तृत्व असूनही, बुद्धिमत्ता असूनही, कर्मकौशल्य असूनही ज्यांच्यावर अशा प्रकारे अन्याय झालेला आहे अथवा होतो आहे त्या सर्वांची वेदना ह्या एकाच प्रश्नामधे व्यक्त झालेली आहे असे मला नेहमीच वाटते.

दुसरे उदाहरण म्हणजे निषादराज हिरण्यधनुचा पुत्र **एकलव्य.**

जन्माने निषाद असल्यामुळे द्रोणाचार्यांनी त्याला आपला शिष्य करून घेण्यास आणि धनुर्विद्या शिकविण्यास नकार दिला.

त्याच्यावर द्रोणाचार्यांनी हा सरळ सरळ अन्याय केला. गुरूने नाकारले असूनही, तो स्वत:ला मनोमन द्रोणाचार्यांचाच शिष्य मानत होता. त्यांचा मातीचा पुतळा तयार करून त्याची पूजा करीत होता. त्या पुतळयाच्या समोर, त्या पुतळयाच्या साक्षीने साधना करीत होता आणि सर्वांना तसे सांगत होता. त्यानंतर त्याने स्वत: परिश्रम करून, कष्ट करून, साधना करून, धनुर्विद्येत प्राविण्य मिळवले. अर्जुनासारख्या शिष्योत्तमालाही हेवा वाटावा इतके प्राविण्य मिळवले. असा कमालीचा निष्ठावान असलेला दुसरा कोणी शिष्य मला तरी माहीत नाही. परंतु ह्या एकाच गोष्टीचा फायदा घेऊन, अर्जुनाला दिलेला शब्द खरा करण्यासाठी, द्रोणाचार्यांनी त्याच्यावर दुसऱ्यांदा अन्याय केला. आपण कधीही न दिलेल्या विद्येसाठी त्याच्याकडे गुरुदक्षिणा मागितली.

त्याचा उजव्या हाताचा अंगठा कापून घेतला. ही अन्यायाची परिसीमा झाली.

विशेष म्हणजे हे कृत्य करणाऱ्या द्रोणाचार्यांचा जन्म मातेच्या पोटी झालेलाच नाही.

तो झाला एका द्रोणामधे. **( Test Tube Baby? )** म्हणजे त्यांना आई नव्हतीच. फक्त वडीलच होते.

केवळ भरद्वाज ऋषींचा पुत्र हीच त्यांची ओळख होती म्हणून ते ब्राह्मण ठरले. उच्चवर्णीय ठरले. शस्त्रास्त्रांचे ज्ञान मिळवण्यासाठी पात्र ठरले. तसे झाले नसते तर, सर्व दृष्टीने श्रेष्ठ असूनही, त्यांच्यावरही अन्याय झाला असता.

परशुरामांनी त्यांना धनुर्विद्या शिकवलीच नसती आणि ते कौरव - पांडवांच्या गुरूपदी बसूच शकले नसते. असो.

आता तर ही व्यवस्था म्हणजे आपल्या समाजाला लागलेला एक कलंक आहे असेच समजले जाते आणि ती व्यवस्थाच संपूर्णपणे त्याज्य मानली जाते. हे म्हणजे ह्या व्यवस्थेचा दुसऱ्या प्रकारे अतिरेक करण्यासारखेच आहे. मुळामधे —

' समाजधारणेसाठी आवश्यक असलेल्या अशा आदर्श व्यवस्थेचा दुरुपयोग करणे ' हे जसे चूक आहे, निंदनीय आहे, समाजासाठी घातक आहे, तसेच ' दुरुपयोग केला गेला म्हणून ती संपूर्ण व्यवस्थाच नाकारणे ' हे देखील चूकच आहे, निंदनीयच आहे, समाजासाठी घातकच आहे.

त्या व्यवस्थेचा दुरुपयोग करायचे थांबवून, ती योग्य प्रकारे अमलात आणणे हेच योग्य आहे आणि हेच त्याचे उत्तर आहे.

अहो ऽऽ, आपल्या घरामधे फार झुरळी झाली म्हणून कोणी घर सोडून जातो काय? नाही. कोणीही तसे करीत नाही.

उलट सगळे जण घरामधे शिरलेल्या झुरळांना मारून बाहेर काढतात आणि मग आपण नेहमीप्रमाणे रहायला लागतात.

आपल्या देशामधे सक्षम व परिणामकारक असे दिवाणी आणि फौजदारी कायदे आहेत.

परंतु त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जात नाही. इतकेच नाही तर बरेच वेळा त्यांचा दुरुपयोग केला जातो.

त्यामुळे अपराध करूनही अनेक आरोपी वर्षानुवर्षे उजळ माथ्याने वावरत असतात. त्यांना शिक्षा होतच नाही. वीस वीस वर्षे खटले चालत राहतात. त्यांचा निकाल लागून शिक्षा झाल्यावरही त्यापुढे वरिष्ठ न्यायालयामधे अपील करणे चालूच राहते.

त्यामधे अनेक वर्षे वाया जातात. सर्वोच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा दिलेली असूनही, ' राष्ट्रपतींच्याकडे दयेचा अर्ज करून ' आरोपीला वर्षानुवर्षे आरामात जगता येते. आपण सगळे असे होताना नेहमीच पाहात असतो.

जे प्रामाणिक अधिकारी असतात ते, त्याच कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करू शकतात. करताना दिसतात.

पण त्याचा परिणाम काय होतो? तर त्यांची बदली केली जाते. त्यांनाच सर्व प्रकारे त्रास दिला जातो.

त्यांची बदली करणारे आणि त्यांना त्रास देणारे जे लोक असतात त्यांना आपणच **' नगरसेवक, आमदार, खासदार '** म्हणून निवडून दिलेले असते. हा कायद्याचा दोष नसून, त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांचा दोष आहे.

त्यामुळे कायदाच नाकारणे हे योग्य उत्तर होऊ शकत नाही. असो.

चातुर्वर्ण्य हा एक फार मोठा वादग्रस्त विषय झालेला आहे. ह्याविषयी मला काय वाटते ते तुम्हाला सांगतो.

आपण सर्व जगामधील कोणताही देश विचारात घेतला किंवा कोणतीही शासन प्रणाली विचारात घेतली तरीही त्यामधे ही चातुर्वर्ण्य

व्यवस्था कार्यरत असतेच. फार तर तिला चातुर्वर्ण्य व्यवस्था म्हणत नसतील. दुसरे काहीतरी म्हणत असतील.
पण तशा प्रकारची व्यवस्था असणारच. तसे नसेल तर देशाचा कारभार चालणारच नाही.
सर्व समाज पांगळा होईल आणि कालांतराने अत्यंत निकृष्ट अवस्थेस जाऊन नाश पावेल. ह्या व्यवस्थेविषयी बरेच काही सांगता येईल.
असे पहा की, कोणत्याही देशामधे किंवा समाजामधे सर्व व्यवहार सुरळीत चालावेत म्हणून —

१) देशावर राज्य करणारे, देशाचा कारभार चालवणारे असे कोणीतरी असतात.
२) बाहेरील अथवा आतील, परकीय अथवा स्वकीय अशा शत्रूपासून देशाचे रक्षण करणारे असे कोणीतरी असतात.
३) परकीय देशांच्या बरोबर चांगले संबंध जोडणारे आणि ते सांभाळणारे असे कोणीतरी असतात.
४) नैसर्गिक अथवा अपघातामुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करून देशाच्या संपत्तीचे आणि नागरिकांचे रक्षण करणारे असे कोणीतरी असतात.
५) व्यापार उद्योग करणारे असे कोणीतरी असतात.
६) वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा पुरविणारे असे कोणीतरी असतात.
७) शेती करून सर्वांना जीवनावश्यक अन्नधान्य, भाजीपाला, फळफळावळे व इतर खाद्य पदार्थ पुरविणारे असे कोणीतरी असतात.
८) उत्तम प्रतीचे औद्योगिक ऊत्पादन करून आणि त्याची जगभर विक्री करून, देशाची अर्थव्यवस्था सुदृढ करायला हातभार लावणारे असे कोणीतरी असतात.
९) सर्व नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे कोणीतरी असतात.
१०) सर्वांना वैद्यकीय सेवा पुरविणारे असे कोणीतरी असतात.
११) अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणारे असे कोणीतरी असतात.
१२) न्यायदान करणारे, गुन्हेगारांना शिक्षा करणारे असे कोणीतरी असतात.
१३) नवीन पिढीला शिक्षण देणारे, सुशिक्षित करणारे, त्यांच्यावर सुसंस्कार करणारे, त्यांना देशाचे उत्तम नागरीक बनविणारे असे कोणीतरी असतात.
१४) धर्म, संस्कृती, नीतिमत्ता इत्यादींचे पालन करणारे आणि नवीन पिढीला त्याचे शिक्षण देणारे असे कोणीतरी असतात.
१५) सार्वजनिक स्वच्छता राखणारे, त्याविषयी काळजी घेणारे आणि तिचा सांभाळ करणारे असे कोणीतरी असतात.

हे सगळे असतात म्हणूनच देश किंवा समाज टिकून राहतो. ह्यांना तुम्ही काहीही म्हणा किंवा काहीच म्हणू नका, ते असतात हे निश्चित.
ह्यालाच सनातन वैदिक धर्मामधे **चातुर्वर्ण्य व्यवस्था** असे म्हटलेले आहे.
प्रत्येकाने आपल्या स्वभावाला अनुसरून, आपली बुद्धिमत्ता आणि कर्म करण्याचे कौशल्य ह्यांचा विचार करून, आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे आणि त्यामधे कार्य करावे.
ह्या निवडीशी माणसाचे अंगभूत **गुण** आणि **कर्म कौशल्य** ह्या दोन गोष्टी सोडून बाकी कशाचाही संबंध नाही. असो.

**शमो दमस्तपः शौचम् क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानम् विज्ञानमास्तिक्यम् ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। ४२ ।।**

शम, दम, तप, शुचिर्भूतपणा, शांती, सरळपणा, आर्जव, अध्यात्मज्ञान, विविधज्ञान व आस्तिक्यबुद्धी हे ब्राह्मणाचे स्वभावजन्य कर्म होय.

**शमः** — मनावर ताबा मिळवणे. त्याला शांत करणे. त्याचे इतस्ततः भटकणे थांबवणे. सर्व संसारिक विषयांचे चिंतन करणे पूर्णपणे सोडून देणे.

**दमः** — सर्व इंद्रियांच्यावर ताबा मिळवणे. त्यांना ऐहिक विषयांच्यापासून मुक्त करणे आणि परमेश्वरप्राप्तीच्या साधनांमधे गुंतवणे.

**तपः** — स्वधर्माचे कसोशीने पालन करणे. त्यासाठी कोणतेही कष्ट सहन करायची तयारी असणे. एखादे निश्चित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारे, कोणत्याही परिस्थितीत, आटोकाट प्रयत्न करीत राहणे.

**शौचम्** — शरीर आणि मन ह्यांची शुद्धता पाळणे. आहार, विहार, आचार आणि शरीर ह्यांची शुद्धी म्हणजे बाह्यशुद्धी. विचारांची शुद्धी, काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर इत्यादींचा नाश होऊन अंतःकरण संपूर्णपणे शुद्ध होणे म्हणजे अंतरशुद्धी. कोणत्याही मनोविकाराने अथवा विषयांच्या संबंधाने वृत्ती लिप्त न होणे आणि विकार न बळावणे. सदैव अंतरबाह्य शुद्धता पाळणे.

**क्षान्तिः** — इतरांच्याकडून झालेल्या अपराधांविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करणे. त्यांना शासन करण्याची शक्ती असूनही तसे न

करणे. त्यांचा राग अथवा तिरस्कार न करता, त्यांना सुधारण्याची संधी देणे. मान आणि अपमान, स्तुती आणि निंदा, अपेक्षित आणि अनपेक्षित, सुख आणि दु:ख, ह्यांना सारखेपणाने सहन करणे.

**आर्जवम्** — मनाने, वाणीने आणि शरीराने अत्यंत सरळपणे वागणे. कधीही, कुठेही संशयास्पद वर्तन न करणे. कोणत्याही प्रकारे कपट अथवा कारस्थान न करणे. सर्वांच्या बरोबर, आपपरभाव न बाळगता, एकसारखेच वागणे. क्षूद्रबुद्धीने न वागणे.

**ज्ञानम्** — सृष्टीमधे आपल्याला जे अगणित प्रकारचे अनेक नाशिवंत पदार्थ दिसून येतात, त्यासर्वांमधे एकच अविनाशा परमेश्वर अंतर्बाह्य भरून राहिला आहे ह्या सत्याचे आकलन होणे म्हणजे ज्ञान होय.

**विज्ञानम्** — एकाच अविनाशी परमेश्वरापासून विविध नाशिवंत पदार्थ कसे उत्पन्न होतात, त्यांचे गुणधर्म कोणते असतात, त्यांच्या क्रिया - प्रतिक्रिया कशा होत असतात आणि काही काळ अस्तित्वात राहिल्यानंतर त्यांचा क्षय कसा होतो म्हणजे ते कसे नाश पावतात ह्याचे आकलन होणे म्हणजे विज्ञान होय.

**आस्तिक्यम्** — परमेश्वर, वेद आणि शास्त्रे, इहलोक आणि परलोक इत्यादींच्यावर पूर्ण विश्वास ठेवणे. वेद आणि शास्त्रांच्या आज्ञांचे पालन करणे. स्वधर्मपालनासाठी आटोकाट प्रयत्न करणे.

ही सर्व ब्राह्मणाची स्वाभाविक कर्मे आहेत असे सांगितलेले आहे. ह्याचे दोन अर्थ होतात असे मला वाटते. पहिला अर्थ म्हणजे, ‘ जो स्वत:ला ब्राह्मण म्हणवतो, जो ब्राह्मण कुळामधे जन्माला आलेला आहे, त्याने ही सर्व कर्मे सतत करीत राहणे अपेक्षित आहे.’ दुसरा अर्थ म्हणजे, ‘ जो ही सर्व कर्मे सतत करीत असतो, तो कोणत्याही कुळामधे जन्माला आलेला असला तरीही तो ब्राह्मणच असतो. कारण त्याचा स्वभाव हा ब्राह्मण वर्णाचाच असतो.’

**शौर्यम् तेजो धृतिर्दाक्ष्यम् युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रङ् कर्म स्वभावजम् ।। ४३ ।।**

शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धातून पलायन न करणे, दातृत्व आणि प्रजेवर सत्ता चालविणे हे क्षत्रियाचे स्वभावजन्य कर्म होय.

**शौर्यम्** — न्याय्य युद्ध करण्यासाठी सदैव उत्साहित असणे, शत्रू कितीही बलवान असला तरीही त्याची भीती न बाळगणे, प्रत्यक्ष युद्ध करायची वेळ आल्यावर आपले सामर्थ्य पणाला लावून, पूर्ण शक्तीने आणि साहसाने लढत राहणे.

**तेज:** — कर्तव्यपालनाविषयी सदैव दक्ष असणे. त्यामधे, कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली येऊन, कधीही कसूर न करणे. कोणावरही अन्याय होणार नाही ह्याची पुरेपूर काळजी घेणे. ही अशी शक्ती आहे की जिच्यामुळे, अशा माणसाविषयी इतरांच्या मनामधे आदरयुक्त भीती निर्माण होते. हिलाच **प्रभाव** किंवा **प्रताप** असेही म्हणतात.

**धृति:** — कितीही मोठे संकट कोसळले, कितीही वाईट परिस्थितीचा सामना करावा लागला, सर्वनाश व्हायची वेळ आली तरीही व्याकूळ न होता, विचलित न होता, अखेरच्या क्षणापर्यंत आपले कर्तव्य करीत राहणे. ह्याला धैर्य असे म्हणतात.

**दाक्ष्यम्** — न्याय - अन्याय, योग्य - अयोग्य, मित्र - शत्रू, युद्ध करणे - तह करणे इत्यादींच्या बाबतीत निर्णय घेण्याविषयीचे कौशल्य. चातुर्य. दक्षता.

**युद्धे च अपि अपलायनम्** — न्याय्य युद्ध करीत असताना, कोणत्याही कारणाने, कोणत्याही परिस्थितीत, भयग्रस्त होऊन पळून न जाणे, माघार न घेणे. आपली सर्व शक्ती पणाला लावून लढत राहणे.

**दानम्** — जे आपण स्वत: कष्ट करून मिळविलेले आहे ते इतरांच्या कल्याणासाठी, कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता, जाहिरात न करता, निरपेक्षपणे देणे.

**ईश्वरभाव:** — नि:स्वार्थ भावाने, प्रजेच्या हिताचा विचार करून, शास्त्राज्ञे प्रमाणे राज्य करणे. अपराध्यांना कडक शासन करणे. प्रजेचे पुत्रवत् पालन करणे आणि तिला सन्मार्गाने वागण्यासाठी प्रवृत्त करणे. तिचा उत्कर्ष घडवून आणणे.

ही सर्व क्षत्रियाची स्वाभाविक कर्मे आहेत असे सांगितलेले आहे. ह्याचेही दोन अर्थ होतात असे मला वाटते. पहिला अर्थ म्हणजे, ‘ जो स्वत:ला क्षत्रिय म्हणवतो, जो क्षत्रिय कुळामधे जन्माला आलेला आहे, त्याने ही सर्व कर्मे सतत करीत राहणे अपेक्षित आहे.’ दुसरा अर्थ म्हणजे, ‘ जो ही सर्व कर्मे सतत करीत असतो, तो कोणत्याही कुळामधे जन्माला आलेला असला तरीही तो क्षत्रियच असतो. कारण त्याचा स्वभाव हा क्षत्रिय वर्णाचाच असतो.’

**कृषिगौरक्ष्यवाणिज्यम् वैश्यकर्म स्वभावजम् ।**
**परिचर्यात्मकङ् कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।। ४४ ।।**

शेती, पशुपालन आणि व्यापार हे वैश्याचे स्वभावजन्य कर्म होय आणि सेवा करणे हे शूद्राचे स्वभावजन्य कर्म होय.

**कृषि** — शेती करून विविध प्रकारची धान्ये, भाज्या, फळे, फुले, औषधी वनस्पती इत्यादींचे उत्पादन, कोणत्याही प्रकारे फसवणूक न

करता, सचोटीने करणे.

**गौरक्ष्य** — गाय ही माणसासाठी सर्वात उपयुक्त पशू असल्यामुळे ' तिचे रक्षण ' ह्या अर्थी हा शब्द वापरलेला आहे. परंतु ह्याचा अर्थ पशुपालन असाच आहे. गायी, म्हशी, बकऱ्या, शेळ्या, मेंढ्या इत्यादी प्राणी पाळून त्यांचा योग्य प्रकारे सांभाळ करून त्यांच्यापासून दूध, दही, लोणी, तूप इत्यादी पदार्थांचे उत्पादन, कोणाचीही कोणत्याही प्रकारे फसवणूक न करता, सचोटीने करणे.

**वाणिज्यम्** — सर्व समाजाच्या गरजा भागवण्यासाठी विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी करणे, त्यावस्तू विविध ठिकाणी पोहोचवण्याची नेण्याची व्यवस्था करणे आणि त्यांची योग्य किंमतीला विक्री करणे. असे करीत असताना ग्राहकांची कोणत्याही प्रकारे फसवणूक न करणे. वजनमाप, मालाची गुणवत्ता, वाजवी दलाली आणि नफा इत्यादी सर्व व्यवहार प्रामाणिकपणे करणे.

ही सर्व वैश्याची स्वाभाविक कर्मे आहेत असे सांगितलेले आहे. ह्याचेही दोन अर्थ होतात असे मला वाटते. पहिला अर्थ म्हणजे, ' जो स्वत:ला वैश्य म्हणवतो, जो वैश्य कुळामधे जन्माला आलेला आहे, त्याने ही सर्व कर्मे सतत करीत राहणे अपेक्षित आहे.' दुसरा अर्थ म्हणजे, ' जो ही सर्व कर्मे सतत करीत असतो, तो कोणत्याही कुळामधे जन्माला आलेला असला तरीही तो वैश्यच असतो. कारण त्याचा स्वभाव हा वैश्य वर्णाचाच असतो.'

**परिचर्यात्मकम्** — सेवा करणे. वरील तीनही वर्णांची सतत सेवा करीत राहणे असा अर्थ सांगितलेला आहे. ह्यामधे सर्व प्रकारच्या सेवांचा अंतर्भाव होतो.

ही सर्व शूद्राची स्वाभाविक कर्मे आहेत असे सांगितलेले आहे. पण मला हा अर्थ पटत नाही. **शूद्र** हा शब्दही पटत नाही.
पहिली गोष्ट म्हणजे माणूस कसाही असला तरीही, कोणीही मनुष्य कधीही, ' स्वत:ला शूद्र म्हणवून घेणार नाही.'
कारण तसे करणे म्हणजे स्वत:च स्वत:चा अपमान करून घेण्यासारखे आहे. ते अशक्य आहे.
परंतु कोणीही माणूस, दुसऱ्याचा अपमान करण्याच्या हेतूने त्याचा उल्लेख **शूद्र** म्हणून करू शकेल. ते सहज शक्य आहे.
कदाचित् चार वर्णांच्यापैकी एका वर्णाला शूद्र असे अपमानास्पद नांव देण्यामागे तेच कारण असू शकेल.
दुसरे म्हणजे इतरांची सेवा करणे ह्याला शूद्रपणा कसे म्हणता येईल?
मोबदला न घेता केलेली सेवा म्हणजे तर दुसऱ्याला उपकृत करणे आहे.
मोबदला घेऊन केलेली सेवा ही सुद्धा शूद्रपणा नसते. तसे करणे म्हणजे आपण केलेल्या श्रमाचा मोबदला घेणेच असते.
'' समाजात शेतामधे काम करणारे शेतमजूर, कारखान्यामधे काम करणारे कामगार, आरोग्य सेवा पुरवणाऱ्या आया, वॉर्ड बॉईज, नर्सेस, घरकाम करणाऱ्या स्त्रिया, केस कापणे, पादत्राणे तयार करणे, कपडे शिवणे इत्यादी कामे करणारी मंडळी, सार्वजनिक स्वच्छतेच्या क्षेत्रामधे काम करणारी मंडळी, बांधकाम क्षेत्रामधे काम करणारी मंडळी, '' ह्या सर्वांनी जर काम करायचे नाकारले तर आपली काय हालत होईल? हे सगळे सतत काम करीत असतात म्हणून आपण नीटपणे जगतो.
मग ह्यांना शूद्र कसे काय म्हणता येईल?

**सेनापती बापट** सार्वजनिक कार्यानिमित्त देशभर फिरायचे. असे सांगतात की,
' ते जिकडे जात असत, रहात असत, तेथला रस्ता, रोज सकाळी झाडून स्वच्छ करीत असत. सगळा कचरा गोळा करून योग्य जागी नेऊन टाकीत असत. जर रस्त्यावर शौचालय असले तर ते ही स्वच्छ करीत असत. मुख्य म्हणजे हे सगळे, समाजाची सेवा करण्याच्या हेतूने निरपेक्षपणे आणि सहजपणे करीत असत.'

**बाबासाहेब आंबेडकरांनी** आयुष्यभर ज्ञानसाधना केली. ते अत्यंत बुद्धिमान, विद्वान आणि चिकित्सक होते. देशाच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रामधे त्यांनी आपला ठसा उमटविला. अन्याय आणि अनिष्ट रुढींच्या विरोधात सतत संघर्ष केला. सामाजिक न्याय आणि माणुसकीच्या हक्कासाठी आयुष्यभर लढत राहिले. आज स्वतंत्र भारताची जी लिखित घटना आहे तिचे ते प्रमुख शिल्पकार होते. म्हणजे एका अर्थाने ते भारतीय घटनेचे स्मृतिकारच आहेत. त्यांनी मनुस्मृती जाळली असली तरीही,
ते आधुनिक **मनु** च आहेत.

**महात्मा गांधी** तर एक व्रत म्हणून, शक्य होईल तेव्हा रुग्णसेवा करीत असत.
विशेष करून महारोग्यांची सेवा आणि शुश्रुषा निरपेक्षपणे करीत असत.
सांगायचा मुद्दा हाच की, सेवा करण्याचा स्वभाव आहे म्हणून किंवा आपला चरितार्थ चालवण्यासाठी गरज आहे म्हणून, तसे कर्म करीत असलेला माणूस शूद्र होत नाही.
तसेच ज्ञानसाधना करणे, शिकणे आणि शिकविणे, सत्यासाठी संघर्ष करणे हा ज्याचा स्वभाव आहे आणि जो सतत तेच करीत आहे असा माणूस, जरी तथाकथित शूद्राच्या घरी जन्माला आलेला असला तरीही ब्राह्मणच असतो.

अहो ऽऽ, विश्वामित्र हा जन्माने क्षत्रिय होता परंतु कर्माने विख्यात महर्षी झाला.
वाल्या कोळी हा अट्टल चोर व हत्यारा होता परंतु कर्माने विख्यात महर्षी झाला.
इतिहासामधे आणि पुराणामधे अशी अनेक उदाहरणे आहेत.
ज्याचा जसा स्वभाव असेल, ज्याची जशी आवड असेल आणि ज्याच्याकडे जे काम करायचे, त्याचे ज्ञान, अनुभव आणि कौशल्य असेल, त्याला अनुसरून केलेले काम, कर्त्याला आनंद देते. समाधान देते. त्यामुळे त्याचा काम करण्याचा उत्साह वाढतो.
काम करण्यामधली एकाग्रता वाढते आणि तो सर्वोत्तम कामगिरी बजावू शकतो. कोणत्याही क्षेत्रामधे काम करणाऱ्या प्रत्येक माणसाकडून हेच अपेक्षित असते. तसे करणे म्हणजे समाजरूपी परमेश्वराची पूजा करणेच आहे.

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिम् लभते नरः ।**
**स्वकर्मनिरतः सिद्धिम् यथा विन्दति तच्छृणु ।। ४५ ।।**
**यतः प्रवृत्तिर्भूतानाम् येन सर्वमिदन् ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिम् विन्दति मानवः ।। ४६ ।।**

आपापल्या कर्मात जो पुरुष नित्य मग्न असतो त्याला त्यामुळेच परम सिद्धी प्राप्त होते. आपल्या कर्मात तत्पर राहिल्याने सिद्धी कशी मिळते ते ऐक. ज्याच्या पासून सर्व भूतांची उत्पत्ती झाली व ज्याने हे सर्व जग व्यापलेले आहे, त्याची पूजा स्वधर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्मांनी केली म्हणजे मनुष्याला त्यामुळेच सिद्धी प्राप्त होते.
येथे मला एका प्रसंगाची आठवण येते आहे. प्रसंग फार वर्षांपूर्वीचा आहे.
कोणत्यातरी कारणामुळे मला त्या दिवशी देवळात जायचे होते. त्यासाठी लवकर निघायची परवानगीही घेतली होती.
परंतु त्याच विचारामधे गुंतल्यामुळे नकळत, माझे कामामधे दुर्लक्ष होत होते. काम बरोबर होत नव्हते.
त्यावरून माझ्या साहेबांनी मला खूप झापले. फार ओरडले. मला पण राग आला. परिणामी मी देवळामधे जायचा विचार रद्द केला.
लवकर निघालो नाहीच, उलट जास्त वेळ थांबून हातातले काम योग्य प्रकारे पूर्ण केले.
काम योग्य प्रकारे पूर्ण झाल्याचे पाहिल्यावर साहेब नॉर्मल झाले. नंतर त्यांनी मला लेक्चर दिले. माझी चूक दाखवून दिली आणि समजावले. मला समजावताना ते काय म्हणाले, ते नीट ऐका.
" **Dixit**, you wanted to go to the temple. What for?
To worship holi GOD? To pray him for betterment?
Tell me one thing ! where is your GOD? In the Temple?
If it is so, then what about rest of the world? How it exist without GOD?
If it is so, then what for the GOD is required?
Then why to pray him? Why to respect him? What is use?
**<u>Remember one thing for lifetime. Never furget this fact.</u>**
GOD is not in the temple, not in the Mosque or in the Church. He is everywhere. Watching every thing. Keeping record of every thing that we do. He is impartial with everybody.
He wish that everybody should always work sincerely and to the best of his ability.
So we should complete every work with full concentration, full dedication, full enthusiasm and always try to give best results. That is real worship to the GOD.
It is said that, **<u>Work is worship to the GOD</u>** and is very true.
If you will do this, You will see him smiling in your work.
He will be very happy and will give you hundreds of blessings.
He will take care of you in every manner. Mind it well.
You are a lucky young man. Holy GOD has given you creative hands and brain.
Use them properly. Our life is very short.
Do not waste your time in such non productive activities."
त्यांच्या बोलण्यावर मी काहीच बोललो नाही. सरळ घरी परत आलो. नंतर राग शांत झाल्यावर विचार केला.
त्यांचे सांगणे चुकीचे नव्हते. फक्त त्यामुळे मला जे करायचे होते ते करायला मिळाले नाही म्हणून रागावलो होतो.
त्याचा काहीच उपयोग नव्हता. मी त्यांचे काहीही वाकडे करू शकणार नव्हतो.
उलट तेच माझे काहीतरी वाकडे करू शकले असते. त्यांनी कधीही तसे काही केले नाही हा भाग वेगळा.

उलट त्यांना माझ्याविषयी आत्मियता होती. प्रेम होते. माझे कल्याण व्हावे असेच त्यांना वाटत होते. मला ते स्वत: कधीही तसे बोलून दाखवत नव्हते. पण ही गोष्ट मला माझ्या सहकाऱ्यांनी, कारणपरत्वे अनेक वेळा सांगितली होती. असो.
मी तो प्रसंग विसरून गेलो. रोजच्या कामाचे चक्र नेहमीप्रमाणे चालूच राहिले.
हा प्रसंग जेव्हा घडला तेव्हा मी गीता वाचली देखील नव्हती. पण नंतर जेव्हा गीता वाचायला लागलो, गीतेचा अभ्यास करायला लागलो तेव्हा एक दिवस अचानकपणे मला त्यांची आठवण आली. तो प्रसंग आणि नंतरचे त्यांचे बोलणे आठवले आणि असे जाणवले की, वरील दोन श्लोकांमधे भगवान् हेच सांगत आहेत. भाषा वेगळी आहे. शब्द वेगळे आहेत पण अर्थ तोच आहे. आपल्या सर्वांना श्रीकृष्ण भगवान् काय सांगत आहेत ते नीट ऐका.
' ज्या ज्या वेळी जे जे काम करायची गरज निर्माण होईल त्या त्या वेळी, ज्याला ते काम कसे करायचे ह्याचे ज्ञान असेल, त्याची ते ते काम योग्य प्रकारे करणे ही जबाबदारी असते. ते प्रत्येकाचे कर्तव्य असते. आपले कर्तव्य पार पाडण्यामधे कधीही हयगय करू नये. पळवाटा शोधून काम टाळायचा विचार करू नये. उलट ते काम उत्तम प्रकारे कसे करता येईल ह्याचाच विचार करावा.'
' ज्याने ह्या सर्व विश्वाची निर्मिती केली आहे त्या परमेश्वराने सर्व विश्व अंतर्बाह्य व्यापलेले आहे. तो सर्वत्र भरून राहिलेला आहे. त्याची पूजा करण्याचा एकच मार्ग आहे. स्वधर्माप्रमाणे, स्वभावाप्रमाणे, अंगभूत गुण आणि कौशल्य ह्यांना अनुसरून जे जे कर्म प्राप्त होईल ते ते कर्म अत्यंत प्रामाणिकपणे, कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, परमेश्वराच्या इच्छेनुसार त्याची पूजा करीत असल्याच्या भावनेने उत्तम प्रकारे पार पाडणे आणि ते त्यालाच अर्पण करणे हाच तो मार्ग आहे. सर्वोत्तम मार्ग आहे.'
' स्वधर्माला अनुसरून आपले जे कर्तव्य आहे, ते कर्तव्य मनापासून पार पाडा! अत्यंत प्रामाणिकपणे काम करा!
देहभान विसरून काम करा! आपली सर्व शक्ती पणाला लावून काम करा! आपले लक्ष पूर्णपणे केंद्रित करून काम करा!
यशाची किंवा अपयशाची चिंता करू नका! शंका बाळगू नका!'
' आपली कर्मरूपी फुले देवाच्या पायावर वाहायची आहेत. ती ताजी, टवटवीत आणि सुवासिक असली पाहिजेत.
शिळी व कोमेजलेली असून चालणार नाहीत. म्हणून आपले कर्म हे सत्कर्मच असेल, दुष्कर्म असणार नाही, ह्याची पुरेपूर काळजी घ्या.
देव तुमच्या कर्मामधे दडलेला आहे! तुम्ही आपले काम उत्तम प्रकारे केलेत तर,
तुम्हाला त्या पूर्ण झालेल्या कामामधेच देवाचे दर्शन होईल!
देव अत्यंत आनंदाने हसत हसत तुमच्याकडे पाहील! प्रेमाने पाहील! तुमचे कौतुक करील आणि तुम्हाला आशीर्वाद देईल!'
मला एक गोष्ट सांगा. परमेश्वराच्या आशीर्वादानेच सिद्धी प्राप्त होते ना?
त्याचा आशीर्वाद नसेल तर कसली सिद्धी आणि कसला मोक्ष प्राप्त होणार?
आज मला समजते आहे की, माझ्या साहेबांनी नक्कीच गीता वाचली असणार.
गीतेचा अभ्यास केला असणार. म्हणूनच त्यांनी मला समजावताना असे सांगितले.
पण मला ते समजलेच नाही. कारण त्यावेळी मी गीता वाचलीच नव्हती. असो.

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।**
**स्वभावनियतङ् कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। ४७ ।।**
**सहजङ् कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।। ४८ ।।**
**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।**
**नैष्कर्म्यसिद्धिम् परमाम् संन्यासेनाधिगच्छति ।। ४९ ।।**

परक्याचा धर्म सुखाने आचरता आला तरी त्यापेक्षा, आपला धर्म सदोष असला तरीही, अधिक श्रेयस्कर आहे.
आपले स्वभावसिद्ध कर्म करीत असताना त्यामुळे कोणतेही पाप लागत नाही.
हे कौंतेया ! जे कर्म गुणकर्मविभागामुळे नियत आहे ते सदोष असले तरी कधीही सोडू नये. कारण धुराने व्यापलेल्या विस्तवाप्रमाणे सर्व उद्योग कोणत्या ना कोणत्या तरी दोषाने व्यापलेले असतात. म्हणून कोठेही आसक्ती न ठेवता, मन ताब्यात ठेवून निष्काम बुद्धीने वागले म्हणजे कर्मफलांच्या संन्यासाने परम नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते.
हा विषय ह्या अगोदर तिसऱ्या अध्यायामधे आलेला आहे. त्या श्लोकाचे पहिले दोन पाद ह्या ४७ व्या श्लोकासारखेच आहेत.
पुढील दोन पाद मात्र वेगळे आहेत.

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनम् श्रेयः परधर्मो भयावहः ।। ३ - ३५ ।।**

अर्थ — उत्तम रीतीने आचरलेल्या परधर्मापेक्षा, सदोष असला तरी आपला धर्मच अतिउत्तम व कल्याणकारक होय. स्वधर्माचे आचरण करीत असताना मरण आले तरी त्यात कल्याण आहे, परंतु परक्यांचा धर्म भयंकर व भीतिदायक आहे.

एकूण समाजाचे धारण आणि पोषण योग्य प्रकारे होण्यासाठी प्रत्येकाने, स्ववर्ण, स्वभाव, स्वधर्म, स्वकर्तव्य आणि स्वध्येय ह्यांना अनुसरून, जे जे कर्म करायची वेळ येईल ते ते कर्म केले पाहिजे. एकदा सुरू केलेले काम उत्तम प्रकारे पार पाडणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. त्यामधे हयगय करून चालत नाही. कोणतीही पळवाट काढून चालत नाही.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या विहित कर्मामधे केवळ सत्कर्मेच अंतर्भूत होतात.

माणूस कोणत्याही वर्णाचा असला तरीही, दुष्कर्म करणे हा कोणाचाही स्वधर्म होऊच शकत नाही.

स्वधर्म कोणालाही, कधीही पाप करायची परवानगी देत नाही. उलट ' पाप करणे निषिद्ध आहे. म्हणून कधीही पाप करू नये.' असेच सांगतो. म्हणून आपण कोणते काम करायचे ते ठरवताना, आपल्या स्वभावाला अनुसरून, आपली बुद्धिमत्ता आणि कर्म करण्याचे कौशल्य ह्यांचा विचार करून, आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडावे. त्या क्षेत्रामधे काम करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्य संपादन करावे आणि मग काम करायला सुरवात करावी. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे अशी आहे.

शस्त्रक्रिया करण्याचे ज्ञान नसताना, तसा स्वभाव नसताना आणि तशी आवडही नसताना, जर कोणी स्वत:ला डॉक्टर म्हणवून घेऊन, सर्जन म्हणवून घेऊन, शल्यकर्म करायला लागला तर त्याचे भयंकर परिणाम होतील. बरे होण्याच्या आशेने आलेल्या रोग्याचा नाहक जीव जाईल. मनुष्य हत्त्येचे पाप घडून येईल आणि त्या पापाचे फळ भोगावेच लागेल.

हल्ली असले खोटे डॉक्टर सगळीकडे दिसून येत आहेत. रुग्णांना फसवून पैसा कमवीत आहेत. हे पाप आहे. असो.

एखाद्या माणसाचा स्वभाव क्षत्रिय वर्णानुरूप असेल आणि तो नेहमी क्षत्रियाकडून केल्या जाणाऱ्या कर्माकडे आकृष्ट होत असेल तर त्याने त्यासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्य संपादन करावे आणि मग ती सगळी कर्मे करावीत.

पण मग, तो जरी ब्राह्मण कुळामधे जन्माला आलेला असला तरीही त्याने, ' मी ब्राह्मण आहे.' असा खोटा दावा करू नये.

उलट ' मी जन्माने ब्राह्मण असलो तरीही क्षत्रियच आहे,' असे मोकळेपणाने सांगावे.

हीच गोष्ट इतर वर्णांच्या बाबतीतही लागू आहे.

प्रत्येकाने आपला स्वभाव आणि आवडनिवड ह्यांना अनुसरून कर्म करावे. तोच त्याचा स्वधर्म असतो असे सांगितलेले आहे.

जो आपला स्वभाव नाही, ज्याची आपल्याला आवड नाही आणि ज्ञानही नाही, त्याला अनुसरून कधीही कोणतेही कर्म करू नये. तो त्याच्यासाठी परधर्म असतो असे सांगितलेले आहे.

खरे म्हणजे स्वधर्माचे श्रद्धेने निष्ठापूर्वक आचरण करीत असतानाही, प्रकृतीच्या तीन गुणांच्या प्रभावामुळे, आपण केलेल्या कामामधे काही ना काही दोष दिसून येतात. ह्याचे मुख्य कारण ' कोणतेही कर्म संपूर्णपणे निर्दोष नसते.' हे आहे.

आपण ह्याचा व्यावहारिक अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करूया.

' काहीतरी करायचे ठरवल्यावर श्रम करावे लागतातच. त्रास सहन करावा लागतोच. आणि प्रत्येक वेळी श्रमाचा योग्य मोबदला मिळेलच असे सांगता येत नाही.'

ज्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रामधे, आवडीचे काम करायला मिळते आहे अशी माणसे फार कमी असतात. अशा माणसांना मी तरी नशिबवान समजतो. बहुसंख्य लोकांना केवळ चरितार्थ चालविण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नसल्यामुळे, नाइलाजाने आयुष्यभर न आवडणारे कामच करावे लागते. इच्छा नसूनही मनाविरुद्ध करावे लागते.

असे असले तरीही, एकदा एखादे काम स्वीकारले म्हणजे तो स्वधर्म होतो. त्याचे पालन करणे बंधनकारक होते. पण ही गोष्ट आपल्यापैकी बहुतेकांच्या लक्षात येत नाही. व्यवहारामधे सर्वसाधारणपणे प्रत्येकाला,

' मी जे काम करतो आहे ते फारच त्रासदायक आहे. फार कष्ट करायला लावणारे आणि त्यामानाने कमी मोबदला देणारे आहे. त्यापेक्षा इतरांचे काम फार सोपे आहे. कमी त्रासाचे, कमी श्रमाचे आणि जास्त मोबदला देणारे आहे.' असेच वाटत असते.

त्यामुळे मनामधे ' आपले कार्यक्षेत्र बदलण्याचा विचार ' नेहमीच येत असतो.

एके काळी माझ्या मनामधेही असा विचार येत असे. मी त्यासाठी प्रयत्नही करीत असे.

नेहमी इतर सहकाऱ्यांचे बरोबर त्याविषयी चर्चा करीत असे. एके दिवशी फॅक्टरीमधल्या एका अत्यंत सीनियर कामगाराने, ह्याविषयी त्याचे मत सांगताना अगदी सहजपणे मला एक गोष्ट सांगितली. ती अजूनही माझ्या लक्षात आहे. तो म्हणाला,

' **दीक्षित** साहब, एक बात बताऊं क्या?'

' हां! क्या बात है? '

' **हर आदमीको अपने पडोसीकी बीवी हमेशा अच्छी लगती है ।** सबको ऐसाही लगता है । जानते हो क्यूं?'

' मैं नहीं जानता । तुम ही बताओ ।'

‘ पडोसीकी बीवीको सब लोग दूरसेही देखते है । उसके साथ नहीं रहते । इसलिये उसको ठीक तरहसे जानते भी नहीं । असलमें वो औरत जिंदगीमें जो समस्याएँ पैदा करती है, उन सभी समस्याओंका समाधान तो पडोसीकोही ढूंढना होता है । हमको नहीं । ’

‘ तुम कहना क्या चाहते हो? ’

‘ यही बात नौकरीके बारेमें भी सही है । इसलिये आदमीको इधर उधर भागना नहीं चाहिये । नौकरी बदलनेसे कुछ नहीं होगा । समस्याएँ बदलेगी, लेकिन खतम नहीं होंगी । समस्याएँ रहेगी जरूर । इससे अच्छा है कि, जो अपनी नौकरी है उसको सम्भालो । सही तरीकेसे करते रहो । उससेही भलाई है ।’

आज मला जाणवते आहे की तो बरोबर सांगत होता. पण ते मला समजत नव्हते.

ही गोष्ट ऐकून येथे उपस्थित असलेल्या महिला माझ्यावर रागावल्या असतील. त्यांना कदाचित् त्यांचा अपमान झाल्यासारखे वाटले असेल. पण ही गोष्ट स्त्री आणि पुरुष, दोघांच्याही बाबतीत सारखीच आहे.

मी आणि मला सांगणारा, दोघेही पुरुष होतो म्हणून त्याने अशी गोष्ट सांगितली. जर आमच्या जागी दोन स्त्रिया असत्या तर त्यांनी तीच गोष्ट वेगळ्या पद्धतीने सांगितली असती. कशी सांगितली असती ते ऐका.

‘ **हर औरतको अपने पडोसनका पती हमेशा अच्छा लगता है ।** सबको ऐसाही लगता है । जानती हो क्यूं?’

‘ मैं नहीं जानती । तुम ही बताओ ।’

‘ पडोसनके पतीको सब औरते दूरसेही देखती है । उसके साथ नहीं रहती । इसलिये उसको ठीक तरहसे जानती भी नहीं । असलमें वो मरद जिंदगीमें जो समस्याएँ पैदा करता है, उन सभी समस्याओंका समाधान तो पडोसनकोही ढूंढना होता है । हमको नहीं । ’

बरोबर आहे ना? आता दोघी बायका बरोबर बोलत आहेत ना?

तात्पर्य काय तर **‘ दुरून डोंगर साजरे ’** म्हणतात ना, ते बरोबर आहे. असो.

कितीही शुद्ध हेतूने, स्वधर्माला अनुसरून, शास्त्रामधे सांगितलेल्या सर्व विधी आणि निषेधांचे पूर्णपणे पालन करून काम केले, तरीही त्यामधे कोणत्या ना कोणत्या तरी स्वरुपामधे तृटी असतेच.

**ब्राह्मण** कितीही सदाचारी असला तरीही यज्ञ करीत असताना त्याच्याकडून पशुहत्त्या घडून येऊ शकते.

तसेच ‘ **क्षान्ति** ’ म्हणजे क्षमाशीलता हा ब्राह्मणाचा गुण सांगितलेला आहे. पण व्यवहारामधे क्षमाशील पुरुषाला दुर्बळ समजले जाते. भित्रा समजले जाते. क्षमाशीलता म्हणजे दुर्बलता समजली जाते.

**क्षत्रिय** कितीही सदाचारी असला तरीही त्याला शत्रूबरोबर युद्ध करावेच लागते. युद्ध करीत असताना त्याच्याकडून मनुष्यहत्त्या व पशुहत्त्या घडून येते अथवा येऊ शकते.

**वैश्य** कितीही सदाचारी असला तरीही व्यापार करीत असताना स्वत:चा नफा मिळवण्यासाठी बऱ्याच गोष्टी गुप्त ठेवाव्या लागतात. डावे उजवे करावे लागते. **इतरांची सेवा** करणारा कितीही सदाचारी असला तरीही, चरितार्थ चालवण्यासाठी, इच्छा नसली तरीही, त्याला आपल्या धन्याची अयोग्य आज्ञाही पाळावीच लागते.

शेतमजूर शेताची नांगरणी करतात तेव्हाही अनेक जीवजंतु मारले जातात.

कामगार, कुंभार, लोहार, गवंडी, पाथरवट, घरकाम करणाऱ्या स्त्रिया, आरोग्य सेवा पुरवणाऱ्या नर्सेस व आया, इत्यादी सर्व प्रकारच्या कामामधे हवा, पाणी आणि माती प्रदूषित होते आणि जीवजंतूंची हत्त्या होतच असते.

अहो ऽऽ, हे सगळे जाऊदे. अगदी साध्या गोष्टींचा विचार करा.

जेव्हा आपण रस्त्याने चालतो तेव्हा आपल्या पायाखाली, जेव्हा आपण हाताने टाळया वाजवतो तेव्हा दोन्ही हातांच्या मधे,

जेव्हा आपण झोपायला गादीवर आडवे होतो तेव्हा आपल्या अंगाखाली,

आपल्या डोळयांना न दिसणारे असंख्य जीवजंतू सतत मरत असतात आणि आपल्याला त्याची कल्पनाही नसते.

म्हणजे हिंसा करणे हे पाप आहे हे माहीत असूनही आपल्याकडून सतत हिंसा होतच असते आणि आपण ती टाळू शकत नाही.

सारांश काय तर, ‘ मूलत: शुद्ध असलेला अग्नी ज्याप्रमाणे धुराने व्याप्त असतो त्याप्रमाणे कोणतेही कर्म कोणत्या ना कोणत्यातरी दोषाने व्याप्त असतेच.’ पण त्यामुळे स्वधर्माचे आचरण करायचे नाकारणे योग्य होणार नाही.

तसेच जो आपला धर्म नाही त्याचे आचरण करणे देखील योग्य होणार नाही.

त्याऐवजी कर्मफळाचा त्याग करून, परमेश्वरार्पण बुद्धीने, आपले कर्तव्य म्हणून, पडतील ते कष्ट सोसून कर्म केले असता ते अकर्म होते. कर्म करूनही न केल्यासारखेच होते आणि कर्त्याला त्याचे बंधन पडत नाही. ह्यालाच नैष्कर्म्यसिद्धी असे म्हटले आहे.

**सिद्धिम् प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।**
**समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ।। ५० ।।**

हे कौंतेया ! याप्रमाणे सिद्धी प्राप्त झाल्यावर त्या पुरुषाला, ज्ञानाची परमावधीची निष्ठा असे जे ब्रह्म, ते ज्याप्रकारे प्राप्त होते, तो प्रकार मी थोडक्यात सांगतो ऐक.

केवळ परमेश्वराची इच्छा समजून, फळाची आशा न बाळगता आपले कर्तव्यकर्म सतत करीत राहिल्याने मनुष्याला परमसिद्धी प्राप्त करून घेता येते. ह्यालाच ज्ञानाची पूर्णावस्था म्हटलेले असून, हाच आत्मसाक्षात्काराचा मार्ग आहे.

ह्या अवस्थेचे वर्णन पुढील तीन श्लोकांमधे करण्यात आलेले आहे.

**बुद्ध्या विशुद्धया युक्तः धृत्यात्मानम् नियम्य च ।**
**शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ।। ५१ ।।**
**विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।**
**ध्यानयोगपरो नित्यम् वैराग्यम् समुपाश्रितः ।। ५२ ।।**
**अहङ्कारम् बलन् दर्पम् कामङ् क्रोधम् परिग्रहम् ।**
**विमुच्य निर्ममः शान्तः ब्रह्मभूयाय कल्पते ।। ५३ ।।**

शुद्ध बुद्धीने युक्त होऊन, धैर्याने आपले संयमन करून, इंद्रियांचे शब्दादि विषय सोडून आणि प्रिती व द्वेष दूर करून, एकांत व शुद्ध स्थळी राहणारा, मिताहारी, काया-वाचा-मन ह्यांना जिंकलेला आणि नित्य ध्यानयुक्त व विरक्त, तसेच अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध व पाश सोडून ममत्वरहित झालेला शांत अंत:करणाचा पुरुष ब्रह्मभूत होण्यास समर्थ होतो.

**विशुद्धया बुद्ध्या युक्तः** — विशुद्ध बुद्धीने युक्त असणारा.

**धृत्या आत्मानम् नियम्य** — धारणशक्तीच्याद्वारे मन व इंद्रियांना ताब्यात आणून,

**शब्दादीन् विषयान् त्यक्त्वा** — शब्दादी विषयांचा त्याग करून, **रागद्वेषौ व्युदस्य** — आसक्ती आणि द्वेष ह्यांना दूर करून,

**विविक्तसेवी** — शुद्ध अशा स्थानी एकांतामधे राहणारा, **लघ्वाशी** — गरजेपुरता आहार घेणारा,

**यतवाक्कायमानसः** — वाणी, शरीर आणि मन ह्यांना वश करून घेतलेला.

**नित्यम् ध्यानयोगपरः** — सदैव परमेश्वराचे ध्यान करण्यामधे गढून गेलेला. सदैव परमेश्वराच्या चिंतनामधे रममाण झालेला. त्यालाच आपले ध्येय मानणारा.

**वैराग्यम् समुपाश्रितः** — वैराग्याचा आश्रय घेतलेला. **अहङ्कारम् बलन् दर्पम्** — अहंकार, बल आणि घमेंड,

**कामङ् क्रोधम् परिग्रहम्** — काम, क्रोध आणि भौतिक भोगसामग्रीचा साठा करणे,

**विमुच्य निर्ममः** — त्याग करून ममतारहित झालेला. **शान्तः** — शांतीने युक्त असलेला.

असा पुरुष **ब्रह्मभूयाय** म्हणजे परब्रह्माच्या ठिकाणी एकरूप होण्यास पात्र होतो. आत्मसाक्षात्कार होण्यासाठी पात्र होतो.

ही सगळी लक्षणे आतापर्यंत अनेकवेळा सांगून झालेली आहेत.

दुसऱ्या अध्यायामधे ‘ स्थितप्रज्ञाची ’ लक्षणे सांगितलेली आहेत.

ती लक्षणे, ज्याचा **ज्ञानयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

सहाव्या अध्यायमधे, ‘ ध्यानयोग्याची ’ लक्षणे सांगितलेली आहेत.

ती लक्षणे, ज्याचा **राजयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

बाराव्या अध्यायामधे ‘ आदर्श भक्ताची ’ लक्षणे सांगितलेली आहेत.

ती लक्षणे, ज्याचा **भक्तियोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

चौदाव्या अध्यायामधे ‘ त्रिगुणातीत पुरुषाची ’ लक्षणे सांगितलेली आहेत.

ती लक्षणेही, ज्याचा **भक्तियोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची आहेत.

तसेच, ज्याचा **कर्मयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाची लक्षणे देखील अशीच असतात, असे वारंवार सांगितलेले आहे.

येथे वरील तीन श्लोकामधे जी लक्षणे सांगितलेली आहेत ती लक्षणे सुद्धा —

‘ कोठेही आसक्ती न ठेवता, मन पूर्णपणे ताब्यात ठेवून, कोणत्याही फलाची अपेक्षा न बाळगता, सदैव निष्काम बुद्धीने आपले स्वधर्मोचित कर्तव्यकर्म करीत राहणाऱ्या ’ माणसाची आहेत. म्हणजेच, ज्याचा **कर्मयोग** सिद्ध झाला आहे अशा माणसाचीच आहेत.

तात्पर्य काय तर, ‘ **ज्ञानयोगी, कर्मयोगी, राजयोगी** आणि **भक्तियोगी** ह्या चौघांच्यामधे अंतिमत: काहीही फरक रहात नाही.’

सर्वांचे अंतिम ध्येय एकच म्हणजे, ‘ **मोक्ष** ’ हेच असल्यामुळे, साधनेचा मार्ग वेगवेगळा असला तरीही अंतिम अवस्था तशीच असते.

सतत साधना करीत राहिल्यामुळे केव्हा तरी साधकाच्या अंगी तशी पात्रता येते. एकदा साधकाला अशी अवस्था प्राप्त झाली म्हणजे

मग त्याला अत्यंत सहजपणे आत्मसाक्षात्कार होतो.
ह्या ब्रह्मभूत अवस्थेचा उल्लेखही ह्यापूर्वी दोन वेळा करण्यात आलेला आहे.

**योऽन्तः सुखोऽन्तराराम: तथान्तर्ज्योतिरेव यः ।**

**स योगी ब्रह्मनिर्वाणम् ब्रह्मभूतोऽधिगच्छति ।। ५ - २४ ।।**

अर्थ — ह्याप्रमाणे जो अंत:करणात सुखी झाला, जो अंतरातच आराम पावू लागला आणि ज्याला हा अंतर्प्रकाश मिळाला, तो योगी ब्रह्मरूप होतो आणि त्याला ब्रह्मनिर्वाणपद प्राप्त होते.

**प्रशान्तमनसम् ह्येनम् योगिनम् सुखमुत्तमम् ।**

**उपैति शान्तरजसम् ब्रह्मभूतमकल्मषम् ।। ६ - २७ ।।**

अर्थ — या प्रकारे शांतचित्त, रजोविरहित, निष्पाप व ब्रह्मभूत झालेल्या योग्याला उत्तम सुख प्राप्त होते. म्हणजे ह्या अवस्थेत तो साधक रहात नाही. त्याला सिद्धावस्था प्राप्त होते. तो परब्रह्म परमात्म्याशी एकरूप होतो.

**ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।**

**सम: सर्वेषु भूतेषु मद्भक्तिम् लभते पराम् ।। ५४ ।।**

ब्रह्मभूत झाला म्हणजे तो प्रसन्नचित्त होऊन कशाचीही आकांक्षा धरीत नाही, कशाचाही शोक करीत नाही, द्वेष करीत नाही आणि सर्व भूतांचे ठायी सम होऊन, माझी परम भक्ती प्राप्त करून घेतो.
ज्याचे मन शुद्ध, निर्मळ, शांत आणि प्रसन्न असते त्याला **प्रसन्नात्मा** म्हणतात.
ही अवस्था म्हणजे पुरुष ब्रह्मभूत झाल्यानंतर, परब्रह्म परमात्म्याशी एकरूप झाल्यानंतर, त्याला आत्मज्ञान झाल्यानंतर होणारा सहज परिणाम असतो.
त्याला कोणाकडूनही कशाचीही अपेक्षा राहिलेली नसल्यामुळे तो कशाचाही शोक करीत नाही आणि कोणाचाही द्वेष करीत नाही.
सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी त्याला परमेश्वराचे अस्तित्व दिसून येत असल्यामुळे त्याच्यासाठी ' उच्च - नीच, धनवान - निर्धन, ज्ञानी - अज्ञानी, आपला - परका, ' इत्यादी भेद उरतच नाहीत. तो सगळीकडे, सर्व ठिकाणी समत्व बुद्धीनेच पाहतो.
त्याला मान देणारा आणि त्याचा अपमान करणारा हे दोघेही त्याच्यासाठी सारखेच असतात. एकाच परमेश्वराची दोन रूपे असतात. तो दोघांच्यावर केवळ प्रेम करतो. कारण तो परमेश्वराचा अनन्य भक्त असतो. परमेश्वरावर प्रेम करीत असतो.
अनन्य भक्तीच्या योगे त्याला परमेश्वराचे संपूर्ण ज्ञान झालेले असते.
परमेश्वरार्पण बुद्धीने सदैव निष्काम कर्म करीत असताना, त्याच्यावर परमेश्वराची कृपा झालेली असते. त्याला परमेश्वराचा वरदहस्त लाभलेला असतो. त्याने परमेश्वराच्या ठिकाणी प्रवेश केलेला असतो. नव्हे, नव्हे ऽऽ! तो प्रत्यक्ष परमेश्वरच झालेला असतो.
येथे मला **येशू ख्रिस्ताची** आठवण होते आहे. त्याला फक्त तेहेतीस वर्षांचे आयुष्य लाभले.
आपले सगळे आयुष्य त्याने जगाच्या कल्याणासाठी वाहिले.
ईश्वरी प्रेरणेने, परोपकारासाठी आपला देह कष्टविला. तो नेहमी झोपडीतच राहिला.
त्याने सर्वांना सतत, ' माणसाचे अंत:करण हेच देवाचे खरे मंदीर असते.' असे शिकवले.

**( The kingdom of god is within you. )**

त्याचा उपदेश भव्य, उदात्त आणि विश्वव्यापी असाच होता. तो सर्वांना काय काय सांगत असे ते नीट ऐका.

**'' मी विनाश करण्यासाठी आलेलो नसून परिपूर्ण करण्यासाठी आलो आहे. मी माझ्या मनचे काहीही सांगत नाही. मला येथे पाठवणाऱ्या माझ्या परमपित्या परमेश्वराने दिलेल्या आज्ञेप्रमाणे बोलतो आहे. मला ठाऊक आहे की त्याची आज्ञा चिरंतन आहे. मी जे काही बोलतो ते माझ्या परमपित्या परमेश्वराने सांगितलेलेच बोलतो आहे.**
**म्हणून तुम्ही माझे ऐका! माझ्या आज्ञांचे पालन करा!**
**तसे केलेत म्हणजे तुम्ही माझ्या परमपित्या परमेश्वरालाही प्रिय व्हाल!**
**आपल्या प्रभूवर, आपल्या ईश्वरावर, संपूर्ण आत्म्यानिशी, अंत:करणपूर्वक, मन:पूर्वक, सर्वशक्ती वापरून प्रेम करा !**
**आपल्या शेजाऱ्यावर स्वत:इतकेच प्रेम करा ! इतर सर्वांच्यावरही स्वत:इतकेच प्रेम करा !**
**ज्याचे अंत:करण शुद्ध असेल त्याला ईश्वराचा साक्षात्कार निश्चित होईल!**
**कधीही हत्त्या करू नका! कधीही चोरी करू नका! व्यभिचार करू नका! खोटी साक्ष देऊ नका!**
**तुमच्याकडे जे आहे ते सगळे गरिबांना देऊन टाका! दान देताना गुप्तपणे द्या! कोणालाही कळू देऊ नका!**

**अगदी उजव्या हाताने दिलेत तर ते डाव्या हातालाही कळू देऊ नका!**
**त्यायोगे तुमचा पुण्यसंचय सतत वाढेल! तुम्हाला स्वर्गीय साम्राज्यात प्रवेश मिळेल!**
**इतरांच्या अपराधाबद्दल त्यांना क्षमा करा! अगदी आपल्या शत्रूलाही क्षमा करा!**
**ढोंगी माणसांच्यापासून सदैव सावध रहा! केवळ ईश्वरावरच अविचल श्रद्धा ठेवा!**
**एकमात्र परमेश्वर सोडून इतर कोणालाही भिऊ नका! आत्मप्रौढी बाळगू नका! सर्वांच्या बरोबर सदैव नम्रतेनेच वागा!''**
त्याला सुरवातीला केवळ बारा शिष्य मिळाले. त्यांना त्याने दीक्षा दिली आणि त्यानंतर त्यांना बरोबर घेऊन, सगळीकडे हिंडून, सर्वांना कल्याणाचा मार्ग दाखवला. पण त्याच्या बदल्यात जगाने त्याला काय दिले?
**अपमान, निर्भर्त्सना, यातना आणि वेदनादायक मृत्यू.**
त्याच्यावर खोटे आरोप ठेवून, त्या आरोपांची सुनावणी करण्यात आली. न्यायदानाचे नाटक करण्यात आले व अत्यंत अघोरी शिक्षा सुनावण्यात आली. त्याच्या अंगावर लाल वस्त्र चढवून त्याची टिंगल टवाळी करण्यात आली.
त्याला खांबाला बांधून त्याच्या पाठीवर चाबकाचे एकोणचाळीस फटके मारण्यात आले.
त्याच्या खांद्यावर क्रूस देऊन त्याची धिंड काढण्यात आली. अखेरीस त्याच क्रूसावर त्याला जखडण्यात आले.
हातापायात खिळे ठोकण्यात आले. छातीमधे भाला घुसविण्यात आला. तशा अवस्थेतही त्याच्या तोंडून कोणते शब्द निघाले असतील? त्याच्या भग्न आणि व्यथित काळजामधून करुणेने भिजलेले उद्गार बाहेर पडले.

**' हे परमेश्वरा ऽऽ! हे देवा ऽऽ! त्यांना क्षमा कर!**
**आपण काय करतो आहोत, ते त्यांना समजत नाही!**
**ते अज्ञानी आहेत! त्यांना क्षमा कर!'**

अंतकाळी त्या महात्म्याने धारण केलेली शांती आणि शालीनता अद्वितीय होती. असामान्य होती. मानवी सद्गुणांची परिसीमा होती.
आता मला सांगा की, ' अत्यंत विपरीत अवस्थेमधे, अमानुष यातनांना तोंड देत असताना, असह्य वेदना सोशीत असताना, ज्याच्या मुखामधून असे शब्द बाहेर पडतील, तो तुमच्या माझ्यासारखाच एक सामान्य मनुष्य असेल काय?'
मला तरी ते शक्य वाटत नाही. तो परमेश्वरच असला पाहिजे. असो.

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्वतः ।**
**ततो माम् तत्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ।। ५५ ।।**

भक्तीने मी कोण व केवढा आहे ह्याचे त्याला तात्त्विक ज्ञान होते आणि ह्याप्रमाणे माझी तात्त्विक ओळख झाल्यावर, तो माझ्या ठिकाणी प्रवेश करतो.
परब्रह्म परमात्मा परमेश्वर कोण आहे? कसा आहे? केवढा आहे? ह्याचे ज्ञान होते. म्हणजेच तो परमेश्वराचा ज्ञानी भक्त होतो.
मागील सातव्या अध्यायामधे, **ज्ञानी** भक्त हा **आर्त**, **जिज्ञासु**, **अर्थार्थी** ह्या तीनही प्रकारच्या भक्तांच्याहून विशेष योग्यतेचा असतो. कारण ' त्याला परमात्मतत्त्वाचे संपूर्ण ज्ञान झालेले असते. परमेश्वराची प्राप्ती झालेली असते. त्याच्या सर्व प्रकारच्या आशा आकांक्षा नाहीशा झालेल्या असतात. तो परमेश्वराशी एकरूप, एकरस, एकरंग झालेला असतो. तो परमेश्वराहून वेगळा उरतच नाही.' असे सांगितलेले आहे. त्यानंतर आठव्या अध्यायामधेही ह्या विषयीची बरीच चर्चा करून झालेली आहे.
ब्रह्म ह्या संकल्पनेविषयी **समर्थ रामदास स्वामींनी** दासबोधामधे, काय काय सांगितले आहे तेही आपण पाहिलेले आहे.
आता त्याविषयी **ज्ञानेश्वर महाराजांनी** काय काय सांगितले आहे ते पाहूया.
ह्या एका श्लोकावर त्यांनी ११६ ओव्या रचलेल्या आहेत.
त्यापैकी आठ ओव्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण त्यामधे परमेश्वराचे सकारात्मक वर्णन केलेले आहे. समर्थांनी जे जे सांगितले आहे ते ते सगळे काही सांगितले आहे. परंतु फरक इतकाच की, ' परमेश्वर कसा नाही ते न सांगता, कसा आहे ते सांगितलेले आहे.'
' अर्जुना ऽऽ, समुद्रामधे मिसळून गेल्यानंतर गंगा जशी समुद्ररूपच होते, तिला वेगळे अस्तित्व उरत नाही, अथवा सूर्य अंधाराला प्रकाशू लागला म्हणजे अंधार हा प्रकाशरूपच होतो, त्याला वेगळे अस्तित्व उरत नाही, त्याचप्रमाणे तो भक्त माझ्याशी एकरूप होतो. मग तो कर्म करीत असला तरीही, त्याचे प्रत्येक कर्म कामनारहित असल्यामुळे, अभिमानरहित असल्यामुळे, न केल्यासारखेच होते. त्याचे कर्म ही माझी पूजा होते, त्याचे बोलणे म्हणजे माझी स्तुती होते.
त्याचे पाहणे म्हणजे माझे दर्शन होते, त्याचे मौन म्हणजे माझा जप होतो आणि त्याची प्रत्येक स्थिती म्हणजे माझी समाधी अवस्था होते. त्याला माझे पूर्ण ज्ञान होते. तो हे जाणतो की —

**जाणे अजु मी अजरु । अक्षयो मी अक्षरु । अपूर्वु मी अपारु । आनंदु मी ॥ ११९३ ॥**

**अचळु मी अच्युतु । अनंतु मी अद्वैतु । आद्यु मी अव्यक्तु । व्यक्तुही मी ॥ ११९४ ॥**

**ईश्य मी ईश्वरु । अनादि मी अमरु । अभय मी आधारु । आधेय मी ॥ ११९५ ॥**

**स्वामी मी सदोदितु । सहजु मी सततु । सर्व मी सर्वगतु । सर्वातीतु मी ॥ ११९६ ॥**

**नवा मी पुराणु । शून्यु मी संपूर्णु । स्थूलु मी अणु । जे काही ते मी ॥ ११९७ ॥**

**अक्रियु मी एकु । असंगु मी अशोकु । व्याप्यु मी व्यापकु । पुरुषेत्तमु मी ॥ ११९८ ॥**

**अशब्दु मी अश्रोत्रु । अरूपु मी अगोत्रु । समु मी स्वतंत्रु । ब्रह्म मी परु ॥ ११९९ ॥**

**ऐसे आत्मत्वे मज एकाते । इया अद्वयभक्ती जाणोनि निरुते । आणि याही बोधा जाणते । तेही मीचि जाणे ॥ १२०० ॥**

अर्थ — तो असे जाणतो की, मी जन्मरहित आहे, मी वृद्धपणरहित आहे. मी नाशरहित आहे, मी अव्यय आहे.
मी अपूर्व आहे, मी अपार आहे व मी आनंदरूप आहे. —
मी स्थिर आहे, मी अच्युत आहे. मी अंतरहित आहे, मी द्वैतरहित आहे.
मी सर्वांच्या आरंभीचा आहे, निराकार आणि साकारही मीच आहे. —
मी नियम्य आहे, मी नियामक आहे. मी आरंभरहित आहे, मी अमर आहे.
मी भयरहित आहे, मी सर्वांचा आश्रय आहे आणि आश्रितही मीच आहे. —
मी स्वामी आहे, मी निरंतर असणारा आहे. मी स्वयंसिद्ध आहे, मी अखंड आहे.
मी सर्व आहे, मी सर्वव्यापी आहे आणि सर्वांच्या पलीकडलाही मीच आहे. —
मी नवा आहे व मीच जुना आहे. मी शून्य आहे व मीच संपूर्ण आहे. जे काही
मोठे आहे ते मी आहे आणि जे काही सूक्ष्म आहे ते ही मीच आहे. —
मी क्रियारहित आहे, मी अद्वितीय आहे. मी संगरहित आहे, मी शोकरहित आहे.
मी व्याप्य आहे, मी व्यापक आहे आणि उत्तम पुरुष मीच आहे. —
मी शब्दरहित आहे, मी कर्णरहित आहे. मी रूपरहित आहे, मी कुळरहित आहे.
मी सारखा आहे, मी स्वतंत्र आहे आणि जे परब्रह्म ते ही मीच आहे. —
याप्रमाणे मला एकाला या अद्वय भक्तीने आत्मत्वेकरून यथार्थपणे जाणतो आणि
ह्या बोधाला जाणणारा जो, तो ही मीच आहे हे तो जाणतो.

एकदा ही अवस्था आल्यावर ' तो माझ्या ठिकाणी प्रवेश करतो.' म्हणजे नक्की काय होते बरे?
ह्याचे उत्तर सांगताना ते म्हणतात की, ' देव आणि त्याचा भक्त हे जे द्वैत आहे ते नाहीसे होते.
भक्त असतो म्हणून देव असतो आणि त्याची भक्तीही असते.
जर भक्तच राहिला नाही तर देवही राहणार नाही आणि भक्तीही राहणार नाही.'
व्यवहारामधे आपण नेहमी पाहतो की, **' जे काहीतरी असते ते कशाच्यातरी सापेक्ष असते.'**
**' वर, खाली, पुढे, मागे '** हे सगळे कशाच्यातरी सापेक्षच असते.
जर ते **' कशाच्यातरी '** नसेल तर मग हे काहीतरी असणारच नाही.
' वर, खाली, पुढे, मागे ' काहीही असणार नाही आणि त्यांना जाणण्याची क्रियाही असणार नाही.
आपण बोलताना, **' तू - तुम्ही - तो - ती - ते - त्या '** इत्यादी शब्द वापरतो. ते देखील आपल्या सापेक्षच असतात.
**' मी '** असतो म्हणून ते सगळे असतात. जर मीच नसलो तर ते आणि त्यांना जाणण्याची क्रियाही असणार नाही.
तसेच **भक्त - भगवान् - भक्ती** ही त्रिपुटीसुद्धा परस्पर सापेक्षच असते. हे तिघे एकरूप होतात.
म्हणजे तेथे ' मी ही नाही, तो ही नाही आणि भक्तीही नाही ' अशी अवस्था असते. ह्यालाच **अद्वैतावस्था** असे म्हणतात.
जेथे दुसरे काहीही असत नाही, जे काही असते ते एकच असते, एकमेव असते, अशी अवस्था म्हणजे अद्वैतावस्था.
**शून्यावस्था** म्हणतात ती हीच असावी.
' त्या माझ्या स्वरूपामधे तो **क्रमयोगी** सामावून जातो.'
ज्ञानदेवांनी हा एक, गीतेमधे न आलेला असा, नवीनच शब्द वापरला आहे.
**क्रमयोगी** ह्या शब्दाचा अर्थ, क्रमाक्रमाने ब्रह्मप्राप्ती करून घेणारा साधक असा आहे.

ह्या अवस्थेचे वर्णन करतांना त्यांनी अनेक उपमा दिल्या आहेत.

**तेथ बुझिजे बोधु बोधे । आनंदु घेपे आनंदे । सुखावरी नुसधे । सुखचि भोगिजे ।।**

**तेथ लाभु जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा । विस्मयो बुडाला उभा । विस्मयामाजी ।।**

**शमु तेथ सामावला । विश्रामु विश्रांति आला । अनुभवु वेडावला । अनुभूतिपणे ।।**

**किंबहुना ऐसे निखळ । मीपण जोडे तया फळ । सेवूनि वेली वेल्हाळ । क्रमयोगाची ते ।।**

अर्थ — हे म्हणजे ' बोधानेच बोध जाणावयाचा. आनंदानेच आनंद घ्यावयाचा. सुखानेच केवळ सुख भोगायचे.
लाभानेच लाभ प्राप्त करून घ्यायचा. तेजानेच तेजाला आलिंगन द्यायचे. आश्चर्यानेच आश्चर्यचकित व्हायचे.
ऐक्यभावानेच ऐक्य साधायचे. विश्रांतीनेच विश्रांती घ्यायची. अनुभवानेच अनुभव घ्यायचा.' असे आहे.
ह्या प्रकारे तो क्रमयोगी, आपली जीवदशा मला अर्पण करून, हे शुद्ध **मी** पणाचे फळ मिळवतो.
अथवा क्रमयोगरूपी मंदिराचा जो हा मोक्षरूपी कळस, त्यावरील पोकळीचा विस्तार होतो.

आपल्याला ह्या सगळ्या विवेचनाचा अर्थ कळला काय? जर कळला असेल तर कृपा करून आपण मला अर्थ समजावून सांगा.
आपल्यासमोर मी असत्य बोलू इच्छित नाही. बोलू शकणारही नाही. ह्याविषयी आतापर्यंत इतके बोललो असलो तरीही, अजूनही मला **अद्वैतावस्था म्हणजे काय?** ते समजलेले नाही. **शून्यावस्था म्हणजे काय?** ते समजलेले नाही.
हे मी आपल्यासमोर प्रामाणिकपणे कबूल करतो आहे. यापूर्वीही असे झालेले आहे.
**ध्यान म्हणजे काय?** ते मला समजलेले नाही. **समाधी म्हणजे काय?** ते मला समजलेले नाही.
**निर्गुण भक्ती कशी करायची?** ते मला समजलेले नाही. हे मी आपल्यासमोर प्रामाणिकपणे कबूल केले आहे.
माझे प्रयत्न चालूच आहेत पण अजून यश आलेले नाही. माझी बुद्धी कमी पडते. ज्ञान कमी पडते. साधना कमी पडते.
अनुभव कमी पडतो. असे असले तरीही, ' आयुष्यामधे कधीतरी मला ह्या सगळयाचा खरा अर्थ कळावा. त्या अर्थाची अनुभूती व्हावी,' अशी इच्छा मात्र जरूर आहे. असो.

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।**
**मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतम् पदमव्ययम् ।। ५६ ।।**

माझाच आश्रय करून सर्व कर्मे नेहमी करीत असतानाही, माझ्या अनुग्रहाने शाश्वत व अव्यय स्थान प्राप्त करून घेतो.
**सर्व कर्माणि सदा कुर्वाणः अपि** — सर्व कर्मे सतत करीत असूनही,
**मद्व्यपाश्रयः** — काया, वाचा, मने करून माझा आश्रय घेतलेला. माझा अनन्य भक्त असलेला.
**मत्प्रसादात्** — माझ्या कृपेमुळे, **शाश्वतम् अव्ययम् पदम्** — सनातन, अविनाशी असे परमपद,
**अवाप्नोति** — प्राप्त करून घेतो.

येथे भगवान काय सांगत आहेत बघा.
**परमेश्वराशी एकरूप झाल्यानंतरही भक्त कर्म करतोच आहे. त्याने कर्मत्याग केलेला नाही.**
**कर्म करायचे थांबविलेले नाही. त्याने कर्मफलाचा त्याग केलेला आहे. अहंकाराचा त्याग केलेला आहे.**
**आपले विहित कर्म परमेश्वराची पूजा समजून करतो आहे.**
**कर्म करून झाल्यावर ते विनम्रपणे परमेश्वरालाच अर्पण करतो आहे.**
दुसऱ्या अध्यायाच्या सुरवातीपासून श्रीकृष्ण भगवान अर्जुनाला हेच सांगत आले आहेत.
कोणत्याही अध्यायामधे विवेचनाचा विषय कोणताही असला तरीही, ते अर्जुनाला त्याचे विहित कर्म करायला सांगत आहेत.
फलाशा न बाळगता कर्म करायला सांगत आहेत. त्याचे कर्तव्य पार पाडायला सांगत आहेत.
कर्मयोगी व्हायला सांगत आहेत. एका निष्काम कर्मयोगाच्या आचरणाने मनुष्याला मोक्षासहित सर्व सिद्धी प्राप्त होऊ शकतात असे सांगत आहेत. असो.

**चेतसा सर्वकर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः ।**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततम् भव ।। ५७ ।।**

सर्व कर्मे मनाने मला अर्पण करून, मत्परायण होऊन, समत्वबुद्धिरूप निष्काम कर्मयोगाचा अवलंब करून, नेहमी माझ्या ठिकाणी चित्त ठेव.
अर्जुना ऽऽ, म्हणून तू तुझी सर्व कर्मे, **' इदन् न मम! '** असे म्हणून, मनाने मला अर्पण कर!

सगळीकडे, सर्वांच्याकडे समत्व बुद्धीने पाहून समत्व बुद्धीने वाग! आणि **सदैव निष्काम कर्मयोगाचे आचरण करीत रहा!**
सदैव माझाच विचार करीत रहा! माझेच चिंतन आणि मनन करीत रहा!

**मच्चित्त: सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।**
**अत चेत्त्वमहंकारात् न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ।। ५८ ।।**

माझ्या ठायी चित्त ठेवलेस म्हणजे तू माझ्या अनुग्रहाने, सर्व संकटे तरून जाशील. पण अहंकाराने माझे ऐकणार नाहीस तर मात्र नाश पावशील.

तसे केलेस तर माझ्या कृपेने, तू सर्व संकटांमधून सहजपणे पार पडशील. पण जर तसे केले नाहीस, स्वत:विषयी अहंकार बाळगून माझे सांगणे ऐकले नाहीस, आप्त स्वकीयांच्या विषयीच्या मोहाने ग्रस्त होऊन युद्ध करायला उभा राहिला नाहीस, तर तुला सर्व प्रकारच्या दु:खांचे आघात सोसावे लागतील. तू स्वत:च स्वत:चा विनाश करून घेशील आणि परमार्थाला मुकशील.

येथे थोडा विरोधाभास दिसतो.

अर्जुन हा श्रीकृष्णाचा अनन्य भक्त आहे. श्रीकृष्णालाही ते माहीत आहे आणि त्याने तसे बोलूनही दाखविलेले आहे.

त्याशिवाय तो **' कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्त: प्रणश्यति ।'** म्हणजे,

' अर्जुना, तू हे सत्य लक्षात ठेव की माझा भक्त कधीही नाश पावत नाही.' असेही म्हणालेला आहे.

मग आता असे का सांगतो आहे? ह्याचे कारण माणसामधे दडलेला सुप्त अहंकार हे आहे.

हा अहंकार कधी उफाळून येईल आणि माणसाच्या मनाचा आणि बुद्धीचा ताबा घेईल हे सांगता येत नाही.

अत्यंत सात्त्विक, त्यागी आणि परोपकारार्थ देह झिजवणाऱ्या सज्जन माणसामधेही कमालीचा अहंकार असतो आणि तो कधीकधी उसळून बाहेर येतो. ही गोष्ट अर्जुनाच्या बाबतीतही होऊ शकते.

जर तसे झाले तर तो परमेश्वराचा भक्त राहणार नाही. कदाचित् परमेश्वराची आज्ञा मानणार नाही.

आपल्या चुकीच्या निर्णयावर ठाम राहील. परिणामी त्याचे पतन घडून येईल. तसे होणे तर्कसंगत असेल.

**यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वाम् नियोक्ष्यति ।। ५९ ।।**
**स्वभावजेन कौंतेय निबद्ध: स्वेन कर्मणा ।**
**कर्तुम् नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत् ।। ६० ।।**

मी लढणार नाही - असे जे तू अहंकाराने मानत आहेस तो तुझा निश्चय फुकट आहे. तुझा स्वभावधर्म तुला ते करावयास लावील.
हे कौंतेया ! आपल्या स्वभावजन्य कर्माने बद्ध झाल्यामुळे मोहाने तू जे करू इच्छित नाहीस तेच, प्रकृतीच्या स्वाधीन होऊन, तुला करावे लागेल.

आप्त स्वकीयांचे प्राण घेणारे आणि कुलक्षय करणारे असे हे युद्ध करणे म्हणजे महापाप करणेच आहे अशा समजुतीने —

' मी युद्ध करणार नाही ' असे म्हणून तू स्वस्थ बसला असलास तरीही, तुझा तो युद्ध न करण्याचा निश्चय टिकू शकणार नाही.

तुझा क्षात्रधर्मच तुझा हा निश्चय फिरवील आणि तुला युद्ध करायला लावील. अरे ऽऽ, जरा नीट आठव.

अगोदर तूच युद्ध करायला तयार झाला होतास. युद्धाची तयारी केलीस आणि त्यासाठी अनेक शस्त्रास्त्रांनी स्वत:ला सज्ज केलेस.

अनेक नामांकित राजे, महाराजे आणि योद्ध्यांना आपल्या बाजूने युद्ध करण्याची गळ घालून, इतके मोठे सैन्य रणांगणावर उभे केलेस.

पांचालीच्या राजसभेमधे झालेल्या अपमानाचा आणि तुम्हा पांडवांच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगवायचा निश्चय करून, हातात शस्त्र घेऊन उभा राहिलास. आणि आता अचानक, ' मी युद्ध करणार नाही ' असे म्हणतो आहेस.

येथे उभ्या असलेल्या अठरा अक्षौहिणी सैन्यामधील एकालाही ते खरे वाटणार नाही.

तुझ्या चारही बंधूंना खरे वाटणार नाही. पांचालीलाही खरे वाटणार नाही आणि कुंतीमातेलाही खरे वाटणार नाही.

तुझा हा विचार व्यर्थ आहे. तू तुझ्या स्वभावाने आणि स्वधर्माने बांधला गेलेला आहेस.

जे करायचे नाही असे म्हणतो आहेस ते, तुझा क्षात्रधर्मच तुझ्याकडून करवून घेईल.

**ईश्वर: सर्वभूतानाम् हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ।। ६१ ।।**
**तमेव शरणङ् गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्पराम् शान्तिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ।। ६२ ।।**

हे अर्जुना ! ईश्वर सर्व भूतांच्या हृदयात राहून यंत्रावर चढविल्याप्रमाणे सर्व भूतांना आपल्या मायेने चाळवीत असतो. म्हणून,

हे भारता ! सर्व भावाने त्यालाच शरण जा. त्याच्या अनुग्रहानेच तुला परमशांती व नित्यस्थान प्राप्त होईल.
ह्या दोन श्लोकांमधे त्रिकालबाधित सत्य सांगितलेले आहे.
आपली सगळ्यांची अशी समजूत असते की —
‘ मी महान आहे. **( Great )** एकमेव आहे. **( One and only )** माझ्यासारखा दुसरा कोणीही नाही. **( Exception )**
जे काही घडते ते सगळे मी करतो. मी सगळे काही घडवून आणतो. माझ्यामुळे सगळे घडून येत असते.
मी नसलो तर हे काहीही घडू शकणार नाही. सगळ्या कामाचे वाटोळे होईल. सगळ्यांचे वाटोळे होईल. ’
विशेष गोष्ट म्हणजे असा विचार फक्त मनुष्य प्राणीच करतो.
अहंकार, गर्व, घमेंड, ताठा, उन्मत्तपणा, उद्दामपणा, आगाऊपणा हे सगळे माणसाकडेच असते. खरे म्हणजे ह्याला काहीही अर्थ नसतो.
सर्व जगामधे जे जे काही आहे, त्या सगळ्याची निर्मिती करणारी, नियमन करणारी आणि नाश करणारी एक आणि एकमेव शक्ती आहे. ‘ कोणी कधी कुठे काय आणि कसे करायचे ’ हे तीच ठरवीत असते आणि त्याप्रमाणेच सगळे काही घडून येत असते.
त्यामधे कोणालाही, कोणताही बदल करता येत नाही.
चंद्राने पृथ्वीभोवती फेऱ्या मारीत रहायचे. नवग्रहांनी सूर्याभोवती फेऱ्या मारीत रहायचे.
सूर्याने आकाशगंगेच्या मध्याभोवती फेऱ्या मारीत रहायचे.
आकाशगंगेने आणखीन कशाच्यातरी भोवती फेऱ्या मारीत रहायचे.
हे सगळे तिनेच ठरवलेले आहे आणि सगळ्यांना तसेच करावे लागते.
सारख्या सारख्या फेऱ्यामारून कंटाळा आला म्हणून चंद्र पृथ्वीला सोडून दुसरीकडे फिरायला जाऊ शकत नाही.
आपल्या पृथ्वीवरती जे काही अस्तित्वात आहे त्या सगळ्याला देखील त्या शक्तीने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणेच वागावे लागते.
त्याला पर्याय नाही.
वर्षानुवर्षे पाण्यात रहायचा कंटाळा आला म्हणून पाण्यामधे राहणारे जीव आपले ठिकाण सोडून जमिनीवर येऊन राहू शकत नाहीत.
वर्षानुवर्षे एकाच जागी उभे राहून कंटाळा आला म्हणून वृक्ष आपली जागा सोडून इकडे तिकडे फिरायला जाऊ शकत नाहीत.
कोणी काय खायचे, काय प्यायचे, काय करायचे आणि किती काळ जगायचे हे देखील तिनेच ठरवलेले आहे.
सगळ्यांना त्याप्रमाणेच रहावे लागते. आपल्या मर्यादा पाळाव्याच लागतात.
अगदी पंचमहाभूतांना देखील आपापल्या मर्यादेतच रहावे लागते.
जेव्हा केव्हा त्या मर्यादा ओलांडायची वेळ येते, ती वेळही तिनेच ठरवलेली असते आणि त्यावेळी मर्यादा ओलांडावीच लागते.
त्या शक्तीलाच आपण देव म्हणतो. परमेश्वर म्हणतो. ईश्वर म्हणतो. परमात्मा म्हणतो.
तोच आपल्याला, एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणे, त्याला हवे असेल तसे सगळीकडे नाचवीत असतो.
त्याच्या इच्छेप्रमाणे आपल्याला नाचावेच लागते. कारण दोऱ्या त्याच्याच हातात असतात.
आपला रिमोट कंट्रोल त्याच्याच हातात असतो. म्हणून आपल्याकडे दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नसतो.
‘ त्याला शरण जाणे, त्याची कृपा संपादित करणे आणि त्याद्वारे शांती आणि मोक्ष प्राप्त करून घेणे,’
ह्याच मार्गाचे अनुकरण करावे लागते.

**इति ते ज्ञानमाख्यातम् गुह्याद् गुह्यतरं मया ।**
**विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ।। ६३ ।।**

ह्याप्रमाणे गुह्यातले गुह्य असे हे ज्ञान मी तुला सांगितले. ह्याचा पूर्ण विचार करून, तुझ्या इच्छेस येईल ते कर.
शस्त्रत्याग केलेल्या अर्जुनाला परत युद्धाला उभा करण्याच्या हेतूने जे जे काही सांगायचे होते ते ते सगळे सविस्तरपणे सांगून झाले आहे. त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन झाली आहेत.

**येथे गीतोपदेश पूर्ण झालेला आहे.**

आता त्यावर विचार करून अतिम निर्णय घ्यायचा आहे आणि तो निर्णय अर्जुनाला स्वत:लाच घ्यायचा आहे.
ही फार फार महत्त्वाची गोष्ट आहे. वास्तविक पाहता असे काहीही न सांगता,
‘ अर्जुना ऽऽ, मी तुझ्या सर्व शंकांची उत्तरे दिलेली आहेत. आता तू माझे ऐक. मी सांगतो आहे तसेच कर. माझ्यावर विश्वास ठेव. इतर सगळे विचार बाजूला ठेव आणि हातामधे धनुष्य घेऊन परत युद्धाला उभा रहा. ही माझी आज्ञा आहे असे समज आणि तिचे पालन कर. शत्रूचा पराभव करून, समृद्ध राज्य प्राप्त करून घे. युद्ध कर आणि विजयी हो.’ अशी आज्ञा श्रीकृष्ण भगवान् करू शकले असते. अर्जुनाने त्यांच्या आज्ञेचे पालनही केले असते. तो श्रीकृष्णाचा भक्त होता, शिष्य होता, अनुयायी होता.
श्रीकृष्णाचा शब्द हा त्याच्यासाठी अखेरचा शब्दच होता.

परंतु भगवान् त्याच्यावर सक्ती करू इच्छित नाहीत. जबरदस्ती करू इच्छित नाहीत.
' अर्जुनाला जे काही करायचे ते त्याने स्वत: विचारपूर्वक करावे,' असेच वाटत असल्यामुळेच त्यांनी अंतिम निर्णय त्याच्यावरच सोडलेला आहे.
एकदा **स्वातंत्र्यवीर सावरकरांना** गीतेविषयी काय वाटते ते विचारण्यात आले होते. गीतेविषयी त्यांचे मत विचारण्यात आले होते. त्यावेळी ते काय म्हणाले ते नीट ऐका.
'' वेद, उपनिषदे, श्रुती, स्मृती, पुराणे ह्या सर्वांचे नवनीत म्हणजे गीता! तिचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की, एवढे मोठे तत्त्वज्ञान सांगूनही, ते सांगणाऱ्याने, ऐकणाऱ्यावर कोणत्याही प्रकारे सक्ती केलेली नाही.
सगळा उपदेश करून झाल्यावर शेवटी, श्रीकृष्णाने अर्जुनाला, **' विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु '** म्हणजे ' माझ्या सांगण्याचा पूर्ण विचार करून, तुझ्या इच्छेस येईल ते कर.' असेच सांगितलेले आहे.
त्यालाच अंतिम निर्णय घ्यायला सांगितला आहे.
इतर कोणत्याही धर्माच्या सर्वोच्च ग्रंथामधे असे स्वातंत्र्य दिलेले नाही. त्यामुळे **कुराण** आणि **बायबल** ह्यांना असलेली मर्यादा गीतेला नाही. म्हणूनच गीता ही तत्त्वज्ञान ह्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ आहे! सर्वश्रेष्ठ आहे!''
ह्यावर मला जास्त काही बोलता येणार नाही. तशी गरजही नाही. असो.
श्रीकृष्ण अर्जुनाकडे पाहतो आहे. अर्जुन अजूनही विचारच करतो आहे. काहीच बोलत नाही. नुसता विचारच करतो आहे.
अरे ऽऽ! ह्याच्या मनामधे अजून गोंधळ चालूच आहे की काय? सर्व प्रकारे समजावण्याचा प्रयत्न करून झाला आहे. सर्व काही सविस्तरपणे सांगून झालेले आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन झालेली आहेत.
आता आणखी काय सांगायचे? पण हा बाबा काही बोलतच नाही. अर्जुना, काहीतरी बोल ना रे बाबा! असा गप्प बसू नकोस. त्याने प्रश्न सुटणार आहे काय? तुला समजत कसे नाही?
किती वेळ तुला समजावतो आहे. त्याचा काहीच उपयोग झालेला नाही काय? तुझ्या मनामधे अजून शंका कुशंका आहेतच काय? जरी असतील तरीही त्यांना बाजूला सार. त्यांचा विचारही करू नकोस. मी काय सांगतो आहे ते ऐक. कशाचीही काळजी करू नकोस. तुझ्या यशाची, तुझ्या उत्कर्षाची, तुझ्या कीर्तीची, तुझ्या गौरवाची, तुझ्या सन्मानाची, तुझ्या इहलोकीच्या आणि परलोकीच्या कल्याणाची, सगळी काळजी मला आहे. आजपर्यंत मी तशी काळजी केलेली आहे. यापुढेही तसेच करणार आहे.
कारण आपण दोघे एकच आहोत. तुझे यश म्हणजेच माझे यश आणि तुझे अपयश म्हणजे माझेच अपयश असेच मला वाटते.

**सर्वगुह्यतमम् भूय: शृणु मे परमम् वच: ।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ।। ६४ ।।**

सर्व गुह्यांतले गुह्य अशी अखेरची एक गोष्ट मी तुला परत एकदा सांगतो आहे ती ऐक. तू माझा अत्यंत आवडता आहेस म्हणून तुझ्या हिताची ही गोष्ट मी तुला सांगणार आहे.
अर्जुना ऽऽ, तू मला फार फार आवडतोस! मी तुझ्यावर फक्त प्रेमच करतो! सदैव तुझ्या कल्याणाचीच चिंता करीत असतो. मला दुसरा कोणीही तुझ्याइतका प्रिय नाही. म्हणूनच मी परत एकदा तुझ्या कल्याणाची गोष्ट सांगतो आहे ती नीट ऐक.
येथे काही गोष्टी आवर्जून सांगाव्यात असे वाटते आहे. ह्याच्या पुढचे दोन श्लोक हे उपसंहाराचे म्हणजेच समारोपाचे आहेत. ते सांगताना भगवान् स्वत:लाच म्हणजे स्वत:च्या सगुण रूपाला उद्देशून बोलत आहेत.
आपल्या निर्गुण स्वरूपाला अथवा विश्वरूपाला उद्देशून बोलत नाहीत. म्हणजे येथे केलेला समारोप हा **सगुणभक्तिपर** आहे.
दुसरी गोष्ट म्हणजे ह्यामागील हेतू ,' अर्जुनाने निष्काम कर्मयोगाचे आचरण करावे, स्वधर्मपालन करावे, आपले कर्तव्य पार पाडावे, युद्ध करावे ' हाच आहे. म्हणजे येथे केलेला समारोप हा प्रामुख्याने **कर्मयोगपर** आहे.
तिसरी गोष्ट म्हणजे येथे दिलेले आश्वासन, अर्जुनाचे निमित्त करून, भगवान आपल्या सर्वांना देत आहेत.
त्यामुळे हे दोन श्लोक म्हणजे भगवंतांनी **' सर्व मानवजातीला '** दिलेला अंतिम संदेश आहे असे म्हणायला हरकत नाही.

**मन्मना भव मद्भक्त: मद्याजी माम् नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यन् ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।। ६५ ।।**

माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर आणि मला वंदन कर. म्हणजे तू मलाच येऊन मिळशील. हे सत्य प्रतिज्ञेने मी तुला सांगतो कारण तू माझा आवडता भक्त आहेस.
ह्या अगोदर हाच श्लोक, थोड्या फरकाने, नवव्या अध्यायामधे आलेला आहे.
त्या श्लोकाचे पहिले दोन पाद ह्या श्लोकासारखेच आहेत. पुढील दोन पाद मात्र वेगळे आहेत.

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी माम् नमस्कुरु ।**

**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानम् मत्परायणः ।। ९ - ३४ ।।**

अर्थ — माझ्या ठिकाणी मन ठेव, माझा भक्त हो, माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर. ह्याप्रमाणे मत्परायण होऊन आपला योग चालविलास म्हणजे मलाच येऊन मिळशील.

अर्जुना ऽऽ, आता कसलाही विचार करू नकोस. कशाचाही विचार करू नकोस.

फक्त माझी आठवण ठेव! तुझे मन माझ्या ठिकाणीच गुंतवून ठेव! त्याला भरकटू देऊ नकोस! मनोमन माझेच स्मरण कर!

माझेच पूजन कर! मलाच नमस्कार कर! आणि — **आपले कर्तव्य कर्म करायला उभा रहा!**

असे केलेस म्हणजे, ' तू मलाच येऊन मिळशील. माझ्याशी एकरूप होशील.' ह्याची खात्री बाळग!

तू माझा अनन्य भक्त आहेस, माझा अत्यंत आवडता भक्त आहेस म्हणून मी तुला प्रतिज्ञापूर्वक हे सत्य सांगतो आहे.

अहोऽऽ, देव भक्ताभिमानी आहे. तो आपल्या भक्ताची सर्व प्रकारे काळजी घेतो.

त्याचा योगक्षेम चालवितो. त्याला एकटा सोडत नाही. सदैव त्याच्या बरोबरच असतो. त्याचे कल्याण करतो.

आतापर्यंत हे अनेक वेळा सांगितले गेलेले आहे. येथेही त्याने तसेच सांगितलेले आहे.

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकम् शरणम् व्रज ।**

**अहम् त्वाम् सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः ।। ६६ ।।**

सर्व धर्म सोडून तू मला एकट्यालाच शरण ये. मी तुला सर्व पापांच्या पासून मुक्त करीन. भिऊ नकोस.

धर्मशास्त्रामधे स्वर्ग प्राप्तीसाठी आचरावयाचे, ' अहिंसाधर्म, सत्यधर्म, दयाधर्म, दानधर्म, गृहस्थधर्म, वानप्रस्थधर्म, संन्यासधर्म, राजधर्म, क्षात्रधर्म,' इत्यादी अनेकधर्म सांगितलेले आहेत आणि सर्व मार्गांची योग्यता सारखीच असून त्यांचा अंतिम परिणाम मोक्ष हाच आहे असे सांगितलेले आहे. येथे भगवान् तर **' सर्व धर्म सोडून तू मला शरण ये '** असे सांगत आहेत. ह्याचा मेळ कसा घालायचा? सर्व धर्म सोडून भगवंताला शरण यायचे म्हणजे काय करायचे?

ह्या विधानाचा अर्थ इतकाच आहे की,' स्वधर्म आणि स्वभाव ह्यांना अनुसरून जे जे कर्म प्राप्त होईल ते ते कर्म अत्यंत प्रामाणिकपणे, कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, परमेश्वराच्या इच्छेनुसार त्याची पूजा करीत असल्याच्या भावनेने, उत्तम प्रकारे पार पाडायचे आणि ते त्यालाच अर्पण करायचे. आपले कर्तव्य पार पाडण्यामधे हयगय करायची नाही.

**कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ।**

**करोति यद्यत्सकलम् परस्मै नारायणायेति समर्पयामि ।।**

अर्थ — काया, वाचा, मन, इंद्रिये, बुद्धि, आत्मा ह्यांच्या प्राकृतिक स्वभावानुसार आपण जे काही करतो ते सर्व नारायणाला अर्पण करायचे. **।। श्रीकृष्णार्पणमस्तु इदन् न मम ।।** सदैव हीच भावना बाळगायची.

याप्रमाणे वागत राहिले असता माणसाच्या मनामधे पापवासना कोठून येईल?

त्याच्या हातून कोणतेही दुष्कर्म तरी कसे घडून येईल? ते शक्य नाही.

आणि जर यदाकदाचित्, नकळत असो, अनवधानाने असो अथवा इतर कोणत्याही कारणाने असो, पाप घडलेच तर तेही परमेश्वरालाच अर्पण केले जात असल्यामुळे अकर्मच होईल आणि त्याचे बंधन पडणार नाही.' असो.

**येथे गीतेचा समारोप पूर्ण झालेला आहे.**

आता यापुढील पाच श्लोक हे **फलश्रुति** म्हणून सांगितलेले आहेत. गीता कोणाला शिकवायची आणि कोणाला शिकवायची नाही, गीतेचे वाचन, उच्चारण, पठण, मनन, चिंतन आणि आचरण करण्याने कोणते लाभ होतील, ह्याविषयी सांगण्यात आलेले आहे.

**इदन् ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।**

**न चाशुश्रुषवे वाच्यम् नच माम् योऽ भ्यसूयति ।। ६७ ।।**

**अतपस्काय** — एखादे निश्चित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारे, कोणत्याही परिस्थितीत, आटोकाट प्रयत्न करीत राहणे म्हणजे तप करणे. स्वधर्माचे पालन करण्यासाठी सर्व प्रकारचे शारिरीक आणि मानसिक कष्ट सहन करणे. वेदना आणि यातना सहन करणे म्हणजे तप करणे. असे कोणत्याही प्रकारचे तप न करणारा असा मनुष्य.

**अभक्ताय** — परमेश्वर, वेद, शास्त्रे, पुराणे ह्यांच्याविषयी श्रद्धा, प्रेम आणि पूज्यभाव नसलेला असा भक्तिरहित मनुष्य.

**अशुश्रूषवे** — ऐकण्याची इच्छा नसलेला मनुष्य. **माम् अभ्यसूयति** — माझ्यामधे दोष पाहणारा, माझी निंदा करणारा मनुष्य.

**न वाच्यम्** — कधीही सांगू नको.
तुझ्या हितासाठी सांगितलेले हे गीतारूपी परम रहस्य, जो तप करीत नाही, ज्याला भक्ती नाही, ऐकण्याची इच्छा नाही, तसेच जो माझी निंदा करतो, त्याला कधीही सांगू नको.

**य इदम् परमङ् गुह्यम् मद्भक्तेष्वभिधास्यति ।**
**भक्तिम् मयि पराङ् कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥**
**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।**
**भविता न च मे तस्मात् अन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥**

जो कोणी मनुष्य माझ्यावर आत्यंतिक श्रद्धा ठेवून, माझ्यावरील आत्यंतिक प्रेमभावनेने, तुला सांगितलेले हे गोपनीय असे गीताशास्त्र, माझ्या भक्तांना सविस्तर सांगेल, तो माझा परम भक्त होऊन मलाच येऊन मिळेल ह्यात मुळीच शंका नाही.
मला अत्यंत प्रिय असलेले असे हे कार्य करणारा, त्याच्याहून अधिक असा कोणीही असणार नाही.
तसेच भविष्यामधे ह्या पृथ्वीच्या पाठीवर, मला त्याच्याहून अधिक प्रिय असलेला असा दुसरा कोणीही होणार नाही.
सर्वसाधारणपणे असे सांगितले आहे की, भगवद्गीतेविषयीची चर्चा ही केवळ भक्तांमधेच करावी.
कारण जे परमेश्वराचे भक्त नाहीत आणि ज्यांची परमेश्वरावर श्रद्धा नाही, त्यांना भगवद्गीता समजणे शक्य होणार नाही.
दुसरी गोष्ट म्हणजे जे भगवान् श्रीकृष्णाला आणि भगवद्गीतेला तत्त्वतः स्वीकारीत नाहीत, विश्वास ठेवीत नाहीत आणि सतत शंका कुशंका काढीत राहतात त्यांनी, आपल्या लहरीनुसार आणि मनाला वाटेल तसे, भगवद्गीतेचे विवेचन करण्याचा अपराध करू नये. तसे करणे म्हणजे महापाप आहे. हा विषय शुष्क अशा ज्ञानी मंडळींच्यासाठी नसून भक्तांच्यासाठी आहे.
असे असले तरीही, जो कोणी भगवद्गीतेचा सखोल अभ्यास करून, मनन आणि चिंतन करून, तिचा अर्थ समजून घेऊन, लोककल्याणाच्या हेतूने, व्याख्यानाच्या रूपाने किंवा कीर्तनाच्या रूपाने प्रस्तुत करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत राहील, अथवा इतरांना उच्चारण आणि पठणाच्या रूपाने यथार्थपणे शिकवील, तो आपल्या जीवनामधे उन्नतीकडे वाटचाल करील. त्याचे इहपरलोकी कल्याण होईल.

**अध्येष्यते च य इमम् धर्म्यम् संवादमावयोः ।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहम् इष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥**
**श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः ।**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान् प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥**

ह्या ठिकाणी आपल्या दोघांच्यामधे झालेल्या गीतारूपी धर्मसंवादाचे जो कोणी अध्ययन करील, पठण करील, मनन करील, चिंतन करील, त्याने माझी ज्ञानयज्ञाने पूजा केली असेच मी समजेन. तसेच किंचितही दोषदृष्टी न ठेवता आणि अत्यंत श्रद्धायुक्त होऊन, जो कोणी ह्या गीताशास्त्राचे श्रवण करील तो मनुष्य सर्व पापांच्यापासून मुक्त होईल आणि त्याला, पुण्यकर्म करणाऱ्यांना प्राप्त होणाऱ्या, श्रेष्ठ आणि शुभ लोकांची प्राप्ती होईल.

**येथे फलशृति सांगून पूर्ण झाली आहे.**

श्रीकृष्ण अर्जुनाकडे पाहतो आहे. अर्जुनाचा चेहरा आनंदित झालेला आहे. त्याच्या मुखावर अष्टसात्त्विक भाव दाटून आलेले आहेत. तो एका वेगळयाच मानसिक अवस्थेमध्ये गेलेला आहे. श्रीकृष्णाकडे पाहतो आहे पण काहीच बोलत नाही. नुसता पाहतो आहे. एकटक पाहतो आहे. आता त्याच्या मनामधील द्वैतभावना नाहीशी झाली आहे आणि तिची जागा दृढ अशा ऐक्यभावनेने घेतली आहे. ते ऐक्य श्रीकृष्णाबरोबर झालेले आहे. प्रत्यक्ष परमेश्वराशी झालेले आहे. आता कोणतीही शंका उरलेली नाही.
मनातल्या सर्व शंकांचा अंत झाला आहे.
आता उरली आहे ती केवळ स्वधर्मपालनाची इच्छा ऽ! शत्रूच्या बरोबर प्राण पणाला लावून लढण्याची इच्छा ऽ!
सर्व कौरवांना मातीत मिसळून टाकण्याची इच्छा ऽ! आजवर झालेल्या सर्व अन्यायाचा बदला घेण्याची इच्छा ऽ!
पांचालीच्या अपमानाचा सूड घेऊन, तिला आनंदित झालेली पहायची इच्छा ऽ!
वनवास आणि अज्ञातवासामध्ये भोगाव्या लागलेल्या हाल-अपेष्टांचा सर्व हिशोब चुकता करायची इच्छा ऽ!
कुंतीमातेला आनंद प्राप्त करून देण्याची इच्छा ऽ! भगवंताचा भक्त होऊन त्याच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करण्याची इच्छा ऽऽऽ!
अशा वेळी भगवंतानी त्याला शेवटचा प्रश्न विचारला आहे.

**कच्चिदेतच्छ्रुतम् पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।**
**कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥**

अर्जुना ऽऽ, अरे माझ्याकडे असा बघतोस काय? काही तरी बोल.
मला सांग, आतापर्यंत तुला समजावण्यासाठी मी जे जे काही सांगितले, ते सगळे तू लक्षपूर्वक ऐकले आहेस ना? त्यावर विचार केला आहेस ना? तुला माझे सांगणे पटले आहे ना? तुझे अज्ञान नाहीसे झाले आहे ना? तुझा स्वकीयांच्या विषयीचा मोह नाहीसा झाला आहे ना? युद्ध करणे अथवा न करणे हे आपल्याच हाती आहे असे तुला अजूनही वाटते आहे काय? माझ्या प्रश्नांचे उत्तर दे.
ह्या क्षणी अर्जुनाच्या ठिकाणी द्वैत उरलेले नाही. तो आणि श्रीकृष्ण वेगवेगळे आहेत असे त्याला वाटतच नाही आहे.
ह्या क्षणी तो मनाने श्रीकृष्णाशी एकरूप झालेला आहे. परंतु भगवंतानेच योजलेली **' विनाशाय च दुष्कृताम् । '** आणि त्यानंतर **' परित्राणाय साधूनाम् '** ही दोन कार्ये पूर्ण करण्यासाठी, त्याचे शरीराने वेगळे असणे मात्र आवश्यक आहे. असो.
अत्यंत आनंदित झालेल्या अर्जुनाचा कंठ भरून आलेला आहे.
तशाच अवस्थेमधे त्याने आपले दोन्ही हात जोडून श्रीकृष्णाला नमस्कार केला आणि तो बोलायला लागला आहे.

**अर्जुन उवाच :**

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनम् तव ।। ७३ ।।**

हे अच्युता ! तुमच्या प्रसादाने मोह नष्ट झाला आणि मला माझ्या कर्तव्यधर्माची स्मृती प्राप्त झाली. मी आतां संशयरहित होऊन राहिलो आहे आणि तुमच्या आज्ञेप्रमाणे युद्ध करीन.
हे श्रीकृष्णा ऽऽ, आता बोलण्यासारखे काय राहिले आहे?
तुम्ही जे ज्ञान मला सविस्तरपणे सांगितलेत, त्या ज्ञानाच्या योगाने मी कृतार्थ झालो आहे. मोह रहित झालेलो आहे.
माझ्या मनामधे आता कोणताही संशय उरलेला नाही. कोणतीही शंका उरलेली नाही.
तुमच्या आज्ञेचे निष्ठापूर्वक पालन करणे, हे एकमेव कर्तव्य सोडून, माझ्यासाठी दुसरे कोणते कर्तव्यही उरलेले नाही.
तुम्ही माझे सर्वस्व आहात. माझे पाठिराखे आहात. माझी काळजी करीत आहात. माझ्या कल्याणाची काळजी घेत आहात. मग मला कशाची चिंता असणार? आता तुम्ही जे करायला सांगाल, तेच मी करणार आहे. हा माझा निश्चय झालेला आहे.
अंतिम निर्णय झालेला आहे. तुमच्या आज्ञेप्रमाणे आता मी शत्रूच्या बरोबर युद्ध करणार आहे.
असे म्हणून अर्जुन परत आपल्या जागेवर आला. हातात गांडीव धनुष्य घेऊन, प्रत्यंचा ताणून तिचा झंकार - नाद केला.
त्याला तसे करताना पाहिल्यावर सर्व पांडव वीरांनी आनंदाने गर्जना केल्या आणि पुन्हा एकदा आपापले शंख फुंकले.
श्रीकृष्ण अतिशय समाधानाने स्वत:शीच हसला आणि आपल्या जागेवर बसून, त्याने घोड्यांचे लगाम परत हातात धरले.
लगाम ताणले जाताच, रथाचे चारही घोडेसुद्धा सावध झाले. सारथ्याच्या पुढील सूचनेचे पालन करण्यासाठी सिद्ध झाले. असो.
**अर्जुन भुकेने व्याकूळ झाला होता.** त्याची भूक भागविण्यासाठी भगवान श्रीकृष्ण गवळी झाले. त्यांनी उपनिषदरूपी गायींचे दूध काढून अर्जुनाच्या पुढे ठेवले. त्या दुग्धपानाने अर्जुनरूपी वासरू तृप्त झालेले आहे. भगवंतानी उपनिषदरूपी गायींचे जे दूध काढले, ते दूध म्हणजेच, ही अठरा अध्यायांची सुंदर, पावन, वंदनीय, स्मरणीय, उच्चारणीय व अनुकरणीय अशी **श्रीमद्भगवद्गीता.**
पण अजून एक गोष्ट बाकी आहे आणि ती गोष्ट आता घडून येणार आहे.
संजय ' भीष्माचार्यांच्या दु:खद पतनाची ' बातमी सांगायला धृतराष्ट्राकडे गेला.
ती बातमी ऐकून अत्यंत दु:खित झालेल्या राजाने विचारलेल्या प्रश्नाचे तो उत्तर देतो आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी रणांगणावर काय काय झाले होते त्याची माहिती सांगतो आहे. ते सांगत असताना, आवश्यक तेथे स्वत:चे मतही सांगतो आहे.
गीतेच्या पहिल्या अध्यायाला सुरवात झाल्यापासून आतापर्यंत संजयाचे पस्तीस श्लोक झालेले आहेत.
त्याने जे ऐकले आणि पाहिले त्याचा त्याच्या मनावर फार मोठा आणि खोलवर परिणाम झालेला आहे.
ह्यापुढील अखेरचे पाच श्लोक संजयाचे आहेत.
त्यापैकी चार श्लोकांमधे, ' भगवान् श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्या दोघांच्यामधे झालेल्या ह्या संवादाविषयी ' त्याला काय वाटते आहे ते तो राजाला सांगतो आहे.

**संजय उवाच :**

**इत्यहम् वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।**
**संवादमिममश्रौषम् अद्भुतम् रोमहर्षणम् ।। ७४ ।।**
**व्यासप्रसादाच्छ्रुतवान् एतद्गुह्यमहम् परम् ।**
**योगम् योगेश्वरात्कृष्णात् साक्षात्कथयतः स्वयम् ।। ७५ ।।**

‘ हे राजन्, ह्याप्रमाणे भगवान् वासुदेवाचा आणि महात्मा अर्जुनाचा संवाद मी ऐकला.
हा संवाद कसा होता म्हणाल तर अंगावर रोमांच उभे करणारा असाच होता. वास्तविक मी कोण आहे बरे? कोणीही नाही.
मी आपला एक नोकर आहे. एक सामान्य सारथी आहे. पण केवळ दैवयोगाने मुनिवर व्यासांचा माझ्यावर अनुग्रह झाला.
मला त्यांच्या कृपेचा लाभ झाला आणि माझे भाग्य उजळले. मी दुसरा अर्जुन झालो.
त्या भाग्यवान महारथ्याला जे जे ऐकायला आणि पहायला मिळाले ते ते सगळे, प्रत्यक्ष योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण स्वत: सांगत असताना, मलाही ऐकायला आणि पहायला मिळाले. मागील अनेक जन्मांमधे मी पुण्याचा साठा जमवीत आलो असणार.
त्याशिवाय अशी दुर्लभ गोष्ट प्रत्यक्ष पहायला मिळणे शक्य नाही. माझ्या सद्भाग्याची ही परिसीमाच झाली असे मला वाटते आहे. ’

**राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।**
**केशवार्जुनयोः पुण्यम् हृष्यामि च मुहुर्मुहुः ।। ७६ ।।**
**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतम् हरेः ।**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ।। ७७ ।।**

‘ हे राजा धृतराष्ट्रा ! केशव व अर्जुन ह्या दोघांच्या मधे झालेला संवाद इतका विलक्षण होता, इतका अद्भुत होता, इतका उपकारक, पुण्यकारक आणि कल्याणकारक होता की त्याची आठवण होऊन मला पुन:पुन्हा आनंद होत आहे.
माझ्या सर्वांगामधून आनंदाच्या लहरी उसळून येत आहेत. त्याविषयी काय बोलू तेच मला कळत नाही.
माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी योग्य शब्दच सुचत नाहीत.
हे राजन्, त्यातही एक विशेष अशी गोष्ट मला अनुभवायला मिळाली आहे.
भगवान् श्रीहरीचे ते अद्वितीय असे विश्वरूप पाहून मी मंत्रमुग्ध झालो. त्या विलक्षण अनुभवामुळे मी स्वत:ला विसरून गेलो.
माझे अस्तित्व त्या विश्वरूपामधे विरघळून गेले. ह्या विश्वाच्या पसाऱ्यामधे आपण नगण्य असल्याची मला जाणीव झाली.
अगदी ह्या क्षणी देखील श्रीहरीचे ते अतिशय अद्भुत, अकल्पनीय, अनाकलनीय आणि अवर्णनीय, असे विश्वरूप मनांत येऊन, मला फार आश्चर्य वाटते आहे आणि परत परत आनंद होत आहे. माझ्या अंगावर रोमांच उभे राहात आहेत.
माझे मन अष्टसात्त्विक भावांनी भरून येत आहे आणि कृष्णचरणी लीन होते आहे.’
इतके सांगून संजय शांतपणे बसून राहिला. विश्वरूपाच्या आठवणीत गुंतून गेला.
आताही तो श्रीकृष्णाच्या अमर्याद सामर्थ्याचाच विचार करतो आहे. असो.
आतापर्यंत धृतराष्ट्राने संजयाचे सगळे बोलणे ऐकलेले आहे. परंतु त्याने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.
कोणत्याही बाबतीत आपले मत व्यक्त केलेले नाही. असे का झाले असेल बरे?
खरे म्हणजे संजयाच्या कडून विश्वरूपाचे सविस्तर वर्णन ऐकत असताना, त्याच्या तोंडूनही आश्चर्य व्यक्त करणारे उद्गार यायला हवे होते. पण तसे काहीच झाले नाही. तो आपला शांतपणे ऐकत बसला आहे. त्यालाही कारण आहे.
धृतराष्ट्र हा जन्मांध असल्यामुळे त्याने आपल्या आयुष्यामधे कधीही, कुठेही, प्रत्यक्षपणे असे काहीही पाहिलेले नव्हते. अगदी स्वत:ची माता सत्यवती, पिता व्यासमुनी, बंधू पांडू आणि विदुर, चुलते भीष्माचार्य, पत्नी गांधारी आणि पुत्र दुर्योधन ह्यांनाही पाहिलेले नव्हते.
ह्या जगाविषयी त्याने घेतलेला सगळा अनुभव हा, इतर चार ज्ञानेंद्रियांच्या द्वारे, आणि त्यांच्या मर्यादेत राहून, म्हणजे —
**‘ शब्द, स्पर्श, रस** आणि **गंध ’** ह्यांच्या द्वारेच घेतलेला होता. ह्याशिवाय त्याला **हालचालींचे ज्ञानही** उपयोगी पडत असणार.
तो अत्यंत बलवान होता. परंतु त्याने स्वत:लाही प्रत्यक्षपणे पाहिलेले नव्हते. आपण कसे दिसतो? हे देखील त्याला माहीत नव्हते.
तो अंगावर राजवस्त्रे घालायचा. सगळे अलंकार घालायचा. आपल्या मस्तकावर राजमुगुट ठेवायचा. सिंहासनावर बसायचा. तरीही त्याने एकही वस्त्र अथवा एकही अलंकार प्रत्यक्षपणे पाहिलेला नव्हता. राजमुकुटही पाहिलेला नव्हता आणि सिंहासनही पाहिलेले नव्हते.
आयुष्यात प्रत्यक्षपणे काहीही पाहिले नसल्यामुळे, तो कल्पना तरी कशाची करणार? त्याची कल्पनाशक्तीही अत्यंत मर्यादितच असणार.
आधुनिक विज्ञान असे सांगते की, ‘ आयुष्यामधे काहीही प्रत्यक्ष पाहिलेले नसल्यामुळे, जन्मांध माणूस एखाद्या दृष्याची कल्पना करू शकत नाही. स्वप्न पाहू शकत नाही. परंतु त्याची इतर चारही इंद्रिये, सामान्य माणसापेक्षा अधिक कार्यक्षम असतात.
त्यामुळे जर त्याला स्वप्ने पडली, तर ती संभाषणात्मक असू शकतात. दृष्यात्मक असू शकत नाहीत.
म्हणजे तो स्वप्न पाहू शकत नाही तर ऐकू शकतो. ’
स्वतंत्रपणे काहीही करू शकत नसल्यामुळे, प्रत्येक गोष्ट इतरांच्या आधारानेच करायची.
अत्यंत विश्वासू म्हणता येईल अशा पत्नीच्या डोळ्यांनी जग पाहण्याची शक्यताही नव्हती.
कारण त्याच्याशी विवाह होणार हे कळल्यावर गांधारीने स्वत:च्या डोळ्यांवर काळी पट्टी बांधायला सुरवात केली. विवाहानंतर मरेपर्यंत सगळे आयुष्य ती एखाद्या आंधळीसारखीच राहिली. तसे राहण्याचा निर्णयही तिने धृतराष्ट्राला न विचारता स्वत:च परस्पर घेतला होता.

विशेष म्हणजे धृतराष्ट्रानेही तिला त्यापासून परावृत्त करण्याचे धाडस दाखविले नाही.
तुम्हाला खरं सांगू का? जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व घटनांचा विचार केला तर,
**' धृतराष्ट्र हा महाभारतामधील सर्वांत दुर्दैवी पुरुष होता '** असेच म्हणावे लागेल.
सगळे आयुष्य अशा प्रकारे जगलेल्या माणसाला विश्वरूपासारख्या अत्यंत गूढ आणि गहन संकल्पनेविषयी कोणतीही कल्पना करता येणे कसे शक्य होईल? त्यामुळे त्याचा चेहरा निर्विकार असण्याचीच शक्यता जास्त असेल.
समजा जर संजयाला त्याच्या चेहऱ्यावर काही भाव दिसलेच असतील तर, केवळ ' दु:ख, चिंता आणि भय ' हेच भाव दिसले असतील. असो.
ह्या पुढचा जो श्लोक आहे, त्यामधे संजय राजाला त्याचे मत सांगतो आहे.
विशेष गोष्ट म्हणजे, त्याचे मत धृतराष्ट्राच्या मताविरुद्ध आहे. त्याला नाउमेद करणारे आहे. त्याला मानसिक यातना देणारे आहे.
मालकाने प्रश्न विचारलेला नसताना आपले विरोधी मत सांगायचे धाडस कोणताही नोकर करणार नाही.
परंतु, ज्याअर्थी संजय आपले मत स्पष्टपणे सांगतो आहे त्याअर्थी धृतराष्ट्राने त्याला प्रश्न विचारला असावा असे वाटते.
गीतेमधे तसा उल्लेख नसूनही तर्कशास्त्राच्या आधारे तसेच मानावे लागते. असो.
भीष्माचार्य रणभूमीवर लढत होते तोपर्यंत तो कौरवांच्या विजयाविषयी आश्वस्थ होता.
परंतु ' त्यांचा पराभव झाला आहे, त्यांचे पतन झाले आहे ' हे समजल्यावर त्याला फार मोठा धक्का बसलेला असून अत्यंत दु:ख झालेले आहे. आता तो युद्धामधील अंतिम विजयाच्या विषयी साशंक झालेला आहे. कौरवांचा विजय होईल ह्याची त्याला शाश्वती वाटत नाही आहे. म्हणून संजय काहीच बोलत नाही आणि शांतपणे बसला आहे असे जाणून धृतराष्ट्राने त्याला आपल्या मनातला प्रश्न विचारला असेल. तो संजयाला म्हणाला असेल की,
' संजया ऽऽ, दुर्योधन हा स्वत: फार मोठा पराक्रमी योद्धा आहे. त्याला कर्णासारखा महारथी जिवलग मित्र म्हणून लाभला आहे. द्रोणाचार्यांच्यासारखा अद्वितीय असा योद्धा त्याच्या बाजूले लढतो आहे. तसेच त्याचे सैन्य हे पांडवांच्या सैन्यापेक्षा अजूनही फार मोठे आहे. असे असले तरीही भीष्मांच्या पतनामुळे माझ्या मनामधे शंका उत्पन्न झाली आहे. ह्या युद्धामधे अखेर कोणाचा विजय होईल? कौरवांचा की पांडवांचा? त्याविषयी तुला काय वाटते ते मला सांग.'
**यत्र योगेश्वर: कृष्ण: यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूति: ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**
त्याचा प्रश्न ऐकून संजय भानावर आला. त्याच्याकडे पाहात बोलायला लागला.
हे राजन्, ह्याविषयी मी आपल्याला काय सांगणार? पांडवांचे सैन्य कमी असले तरीही दोन्ही पक्ष तुल्यबळ आहेत.
तसे नसते तर महारथी भीष्माचार्यांचे पतन झालेच नसते. ह्या युद्धाच्या अखेरीस कौरवांचा विजय होईल की पांडवांचा ते मला माहीत नाही. असे असले तरीही, एक गोष्ट मला निश्चितपणे जाणवते आहे.
' ज्या बाजूला योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण आहे आणि महारथी धनुर्धर अर्जुन आहे, त्या बाजूलाच श्री, विजय, शाश्वत ऐश्वर्य आणि नीति आहे. म्हणून अखेरीस पांडवांचाच विजय होईल असे माझे मत आहे.'
ह्या श्लोकाचे महाराष्ट्र कवी मोरोपंतांनी **आर्यागीतेमधे** केलेले रूपांतर ऐका.

**योगेश कृष्ण जिकडे जिकडे पार्थहि धनुर्धर उचित ।**
**तिकडे ऐश्वर्य विजय ध्रूवानीतीहि मन्मती खचित ।।**

ह्या श्लोकाचे वा. गो. थत्ते ह्यांनी **बाळबोध गीतेमधे** केलेले रूपांतर ऐका.

**जिथे योगमूर्ती प्रभू श्री मुरारी । गुडाकेश जेथे धनुर्बाण धारी ।**
**जयश्री तिथे नित्य ऐश्वर्य नीती । नृपा हाच माझा अभिप्राय अंती ।।**

ह्या श्लोकाचे आचार्य विनोबा भावे ह्यांनी **गीताईमधे** केलेले रूपांतर ऐका.

**योगेश्वर जिथें कृष्ण जिथें पार्थ धनुर्धर । तिथें मी पाहतों नित्य धर्म श्री जय वैभव ।।**

ह्या श्लोकासाठी **ज्ञानेश्वरीमधे** ओव्या रचताना ज्ञानेश्वर महाराजांनी तर कमाल केली आहे. उत्तमोत्तम उपमांचा अक्षरश: वर्षाव केला आहे. संजयाचे मत व्यक्त करण्यासाठी त्यांनी अनेक ओव्या रचलेल्या आहेत. ते काय म्हणतात तेही ऐका.

**यया बोला संजयो म्हणे । जी येरायेरांचे मी नेणे । परी आयुष्य तेथे जिणे । हे फुडे की गा ।।**
**चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेका । असणें कीं जी ।।**
**रावो तेथें कटक । सौजन्य तेथें सोइरीक । वन्हि तेथें दाहक । सामर्थ्य कीं ।।**

**दया तेथें धर्मु । धर्मु तेथें सुखागमु । सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ।।**

**वसंत तेथें वनें । वन तेथ सुमनें । सुमनीं पालिंगनें । सारंगांचीं ।।**

**गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथी जैसें ।।**

**भाग्य तेथें विलासु । सुख तेथें उल्लासु । हें असो तेथ प्रकाशु । सूर्य जेथें ।।**

**तैसें सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी का सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ।।**

**कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें । तैं जयो लागेंवेगें । तेथेंचि आहे ।।**

**विजयी नामें अर्जुन विख्यातु । विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु । श्रियेसीं विजय निश्चितु । तेथेंचि असे ।।**

**म्हणौनि जेथ श्री श्रीमंतु । जेथ तो पांडुचा सुतु । तेथ विजय समस्तु । अभ्युदयो तेथ ।।**

**जेथ तो श्रीवल्लभु । जेथ भक्त कदंबु । तेथ सुख आणि लाभु । मंगळाचा ।।**

**या बोला आन होये । तरी व्यासाचा अंकु न वाहें । ऐसें गाजोनि बाहे । उभिली तेणें ।।**

**एवं भारताचा आवाका । आणूनि श्लोका येका । संजये कुरुनायका । दिधला हाती ।।**

अर्थ — हे महाराज, दोघांच्यापैकी कोणाचा विजय होईल ते मी जाणत नाही.

परंतु जेथे आयुष्य आहे तेथे जगणे निश्चित आहे.

जेथे चंद्र असेल तेथे चांदणे हे असणारच, जेथे शिव असेल तेथे शक्ति असणारच,

जेथे संत असेल तेथे सुविचार हे असणारच.

जेथे राजा असेल तेथे सैन्य हे असणारच, जेथे सौजन्य असेल तेथे सोयरीक ही असणारच,

जेथे अग्नी असेल तेथे जाळण्याची शक्ती ही असणारच.

जेथे दया असेल तेथे धर्म हा असणारच, जेथे धर्म असेल तेथे सुखप्राप्ती ही असणारच,

जेथे सुख असेल तेथे पुरुषोत्तम हा असणारच.

जेथे वसंत ऋतु असेल तेथे झाडांना नवी पालवी ही असणारच, जेथे नवी पालवी असेल तेथे फुले ही असणारच,

जेथे फुले असतील तेथे भ्रमरांचे समुदाय हे असणारच.

जेथे गुरू असेल तेथे ज्ञान हे असणारच, जेथे ज्ञान असेल तेथे आत्मदर्शन हे असणारच,

जेथे आत्मदर्शन असेल तेथे समाधान हे असणारच.

जेथे भाग्य असेल तेथे सुखोपभोग हे असणारच, जेथे सुखोपभोग असतील तेथे प्रसन्नता ही असणारच.

हे राहूदे. जेथे  सूर्य असेल तेथे प्रकाश हा असणारच.

त्याचप्रमाणे ज्याच्यामुळे चारही पुरुषार्थ सनाथ झाले आहेत तो श्रीकृष्ण जेथे असेल तेथे लक्ष्मी ही असणारच.

त्याचप्रमाणे श्रीकृष्ण हा स्वत:च विजयाचे स्वरूप आहे. तो ज्या पक्षात राहिला आहे त्या पक्षात जयही असणारच आहे.

अर्जुन हा विजय ह्या नांवाने प्रसिद्ध आहे आणि श्रीकृष्ण हा तर विजयाची मूर्तीच आहे.

शिवाय तो लक्ष्मीसह तेथे आहे म्हणून त्या पक्षाकडे जय निश्चितपणे आहे असे समजा.

म्हणून जेथे लक्ष्मी, श्रीकृष्ण आणि पांडूराजाचा पुत्र अर्जुन हे तिघेही आहेत तेथेच विजय आहे आणि सर्व गोष्टींची भरभराटही तेथेच आहे. जेथे तो लक्ष्मीचा पती श्रीकृष्ण आहे आणि जेथे भक्तांचा समुदाय आहे, तेथे सुखाची आणि कल्याणाची प्राप्ती ठेवलेलीच आहे.

**‘ माझे हे बोलणे जर खोटे ठरले तर मी व्यासांचा शिष्य आहे असे सांगणार नाही.**’ अशी गर्जना करून त्याने आपले हात वर केले. याप्रमाणे सर्व भारताचे तात्पर्य एका श्लोकामधे आणून, संजयाने धृतराष्ट्राच्या हातात दिले.

त्यापुढेही ज्ञानदेवांनी अत्यंत महत्त्वाचे विधान केलेले आहे. ते म्हणतात की,

‘ अनंत वेदांचे सव्वा लक्ष भारत झाले व भारताचे सार ही सातशे श्लोकांची गीता झाली. संजयाचा पूर्णोद्गार असलेला हा शेवटचा श्लोक म्हणजे गीतेच्या सातशे श्लोकांचेही तात्पर्य आहे. जो ह्या एकाच श्लोकावर विश्वास ठेवून राहील, त्याने संपूर्ण विद्यामात्रांचे खरे स्वरूप हस्तगत केले असे होईल.’

आता ह्यावर आपण काय बोलणार? मला तरी काहीही बोलता येत नाही. येथे फक्त एकच गोष्ट आपल्याला आवर्जून सांगतो.

गीतेचे वाचन अथवा पठण करीत असताना, हा शेवटचा श्लोक एकापाठोपाठ तीन वेळा म्हणायची पद्धत आहे.

तसेच गीतेविषयी काहीही बोलायचे झाल्यास, व्याख्यान द्यायचे झाल्यास अथवा प्रवचन करायचे झाल्यास ह्या श्लोकाने समापन केले जाते. तशी परंपराच आहे. ह्या दोनही गोष्टी, गीतेच्या अखेरच्या श्लोकाचे अनन्य साधारण महत्त्व व्यक्त करतात असे मला वाटते.

असो.

**<u>येथे अठरावा अध्याय समाप्त झाला आहे.</u>**

ह्या अध्यायामधे सुरवातीला अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देताना,
‘ माणसाने यज्ञ, दान, तप व कर्म ह्यांचा कधीही त्याग करू नये. ती कर्मे शहाण्या पुरुषासही चित्तशुद्धिकारक असतात म्हणून ही कर्मेसुद्धा आसक्ति न ठेवता, फलांचा त्याग करून इतर निष्काम कर्मांप्रमाणेच केली पाहिजेत असे माझे निश्चित व उत्तम मत आहे.’ असे सांगितले.

त्यानंतर त्रिगुणांच्या योगाने, ‘ कर्मत्याग, ज्ञान, कर्ता, कर्म, बुद्धी, धृती म्हणजे धैर्य, सुख ’ इत्यादींचे जे प्रकार होतात त्यांचे वर्णन केले. त्यापुढे चातुवर्ण्य व्यवस्थेनुसार ‘ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांची स्वभावजन्य कर्मे आणि उत्तरदायित्व ’ ह्या विषयी सांगून, जो मनुष्य आपल्या नियतकर्मामधे मग्न असतो आणि स्वधर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्मरूपी फुलांनी परमेश्वराची सदैव पूजा करीत राहतो, त्याला त्यामुळेच सिद्धी प्राप्त होते, असे सांगितले.

त्यापुढे ‘ सुखावह वाटणाऱ्या परधर्माचे आचरण करण्यापेक्षा, सदोष वाटत असला तरीही स्वधर्माचेच आचरण केले पाहिजे. तेच अधिक श्रेयस्कर आहे. स्वधर्मानुसार कर्म करीत असताना, त्यामुळे कोणतेही पाप लागत नाही.’ असे सांगून ‘ केवळ परमेश्वराची इच्छा समजून, फळाची आशा न बाळगता आपले कर्तव्यकर्म सतत करीत राहिल्याने मनुष्याला परमसिद्धी प्राप्त करून घेता येते.

अशा प्रकारे सिद्धी प्राप्त झाली ब्रह्मभूत झाला म्हणजे तो प्रसन्नचित्त होऊन कशाचीही आकांक्षा धरीत नाही, कशाचाही शोक करीत नाही, द्वेष करीत नाही आणि सर्व भूतांचे ठायी सम होऊन, माझी परम भक्ती प्राप्त करून घेतो. भक्तीने मी कोण व केवढा आहे ह्याचे त्याला तात्विक ज्ञान होते आणि ह्याप्रमाणे माझी तात्विक ओळख झाल्यावर, तो माझ्या ठिकाणी प्रवेश करतो. त्यानंतरही आपली सर्व कर्मे करीत असतानाही, शाश्वत व अव्यय स्थान प्राप्त करून घेतो.’ असे सांगितले.

त्यानंतर ‘ कर्म करणे हा प्रकृतीचा धर्म असल्यामुळे ते कधीही सोडता येत नाही. म्हणून कर्ता आणि करविता एकमात्र परमेश्वरच आहे असे समजून त्यालाच शरण जाऊन निष्काम बुद्धीने सर्व कर्मे करीत जा. माझ्यावर विश्वास ठेव. माझा अनन्य भक्त हो. मी तुला सर्व पापांच्यापासून मुक्त करीन.’ असा अर्जुनाला उपदेश केला.

अशा प्रकारे गीतेचा समारोप करून झाल्यावर फलश्रुति सांगितली आणि अर्जुनाला त्याच्या अंतिम निर्णयाविषयी विचारले.

त्यावर अर्जुनाने ‘ तुमच्या प्रसादाने माझा मोह नाहीसा झाला असून माझ्या कर्तव्याची जाणीव झाली आहे. आता मी तुमच्या सांगण्याप्रमाणे युद्ध करायला तयार आहे.’ असे उत्तर देऊन परत हातात धनुष्य घेतले.

त्यानंतर संजयाने ‘ भगवान् श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्या दोघांच्यामधे झालेल्या ह्या संवादाविषयी ’ त्याला काय वाटते आहे ते सांगितले असून, अखेरच्या श्लोकामधे युद्धाच्या अंतिम परिणामांच्याविषयी स्वतःचे मत सांगितले.

**<u>येथे श्रीमद्‌भगवद्‌गीता पूर्ण झालेली आहे.</u>**

यापुढील प्रवचन हे गीतामाहात्म्याचे आहे. त्यामधे आपण गीतामाहात्म्य म्हणजे काय आहे?
ते कशासाठी म्हणायचे असते? त्याचा उपयोग काय आहे? त्यामधील श्लोकांचा अर्थ काय आहे?
गीतापठण कशा प्रकारे करायचे असते? ह्या विषयी सविस्तर चर्चा करूया.
अस्तु !!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## – श्रीमद्‌भगवद्‌गीता माहात्म्य –

### — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आतापर्यंत आपण श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या सर्व अठरा अध्यायांचे वाचन केले.
त्यावर यथाशक्ती यथामती चर्चा केली. प्रत्येक अध्यायाचा त्याच्या मागील व त्याच्या पुढील अध्यायाचे बरोबर काय संबंध आहे ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सर्व श्लोकांचा संदर्भासह अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न केला.
भगवान श्रीकृष्णांनी कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अर्जुनाला जो उपदेश केला, तो महर्षी व्यासांनी शब्दबद्ध करून महाभारतामधे समाविष्ट केला. ती व्यासवाणी असल्यामुळे मंत्ररूप आहे. छंदोबद्ध आहे. तिला गेयता आहे. नाद आहे, ताल आहे, लय आहे.
खरे सांगायचे म्हणजे, सगळी गीता ही मंत्ररूप आहे.
त्यातही भगवान श्रीकृष्णाने सांगितलेले, प्रत्यक्ष गीतोपदेशाचे जे पाचशे सत्तर श्लोक आहेत ते मंत्ररूप आहेत. नव्हे नव्हे ते मंत्रच आहेत. त्यांच्यामधे स्वधर्मपालन करण्यासाठी, आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी, आवश्यक ते कर्म करण्याची प्रेरणा देणारे असे, विलक्षण सामर्थ्य आहे.
तसेच अकराव्या अध्यायामधले संजयाचे पाच श्लोक आणि अर्जुनाचे बत्तीस श्लोक म्हणजे रसाळ स्तोत्रमंत्रच आहेत.
त्यामधे परमेश्वराची मनापासून स्तुती केलेली आहे. त्याला नमस्कार केलेला आहे. आता पुढे जाण्याअगोदर आपण —
**‘ मंत्र म्हणजे काय?** आणि **‘ कोणत्या शब्दसमुहाला मंत्र म्हणायचे?’** हे समजून घ्यायचा प्रयत्न करूया.
ज्या वाक्याचा अर्थ समजण्यासाठी काही मनन करावे लागते, चिंतन करावे लागते,
तसे केल्यावर ज्याच्या अर्थावर यथायोग्य प्रकाश पडतो, तसेच ज्याचा अर्थ उत्तरोत्तर विकसित होऊ शकतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्याच्या यथायोग्य उच्चारणाने माणसाचा शारिरीक, मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक उत्कर्ष घडून येतो,
त्या वाक्याला **मंत्र** असे म्हणतात.
मंत्राचा उच्चार म्हणजे मंत्राच्या शब्दांचा विशिष्ट क्रमाने, विशिष्ट स्वरामधे, लयीमधे आणि तालामधे केलेला उच्चार होय.
मंत्राच्या उच्चाराचा ध्वनी आणि गती हे परस्परावलंबी आहेत. मंत्राला वाटेल तशी चाल लावायची नसते. धर्मशास्त्राची तशी परवानगी नाही. सुप्रसिद्ध गायत्री मंत्राला वेगवेगळ्या चाली लावून त्याच्या सी. डी. काढण्यात आलेल्या आहेत. पण ते योग्य नाही.
तसे उच्चारण केल्याने गायत्री मंत्र हा मंत्र रहात नाही. एक मंत्र म्हणून त्याच्या ठिकाणी असलेले सामर्थ्य नाहीसे होते.
कोणत्याही मंत्राचे उच्चारण विशिष्ट वेळी, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट पद्धतीने आणि विशिष्ट स्वरामधे, लयीमधे व तालामधेच केले जाते. तसे उच्चारण करण्याचे अनेक लाभ आहेत.
मंत्राचा अर्थ नीट समजून घेऊन मग त्याचा अर्थ व्यक्त होईल अशा पद्धतीने उच्चार आणि जप योग्य प्रकारे केला तरच तो मंत्र फलप्रद होतो. अन्यथा होत नाही.
मंत्रांच्या जपाने मनुष्याची आकर्षण शक्ती फार मोठ्या प्रमाणात वाढते. केवळ त्याच्या बोलण्याच्या प्रभावानेच ऐकणारा आकर्षित होतो.
मंत्रांचा विधी म्हणजे त्यांची अभौतिक शरीरेच असतात. अभौतिक यंत्रेच असतात आणि ती यंत्रे म्हणजे सूक्ष्म शक्तींवर स्वामित्व गाजविण्याचे साधन असते.
मंत्रशक्ती प्राप्त होण्यासाठी सर्व प्रकारची **‘ शुचिता ’** अत्यावश्यक आहे.
येथे, मला राहवत नाही म्हणून, आपल्या प्राचीनतम हिंदुस्थानाची **राष्ट्रभाषा** असलेल्या, **देवभाषा** असलेल्या, **गीर्वाणभारती** म्हणून ओळखली जाणाऱ्या **संस्कृत** भाषेविषयी आणि तिच्या लिपी विषयी थोडेसे सांगतो.
सर्व वेद हे मंत्रमय आहेत. मंत्ररूप आहेत. सर्व वेदमंत्र हे **संस्कृत** भाषेमधेच आहेत.
**संस्कृत** म्हणजे **‘ शुद्ध केलेले, स्वच्छ केलेले आणि सुसंस्कार केलेले.’** जे अशुद्ध आहे, अस्वच्छ आहे आणि संस्कारहीन किंवा कुसंस्कारित आहे, त्याला संस्कृत म्हणता येणार नाही. ते संस्कृत म्हणायला पात्र नाही.
**संस्कृत** ही अत्यंत रसाळ आणि नादमधुर भाषा आहे.
**संस्कृत** ही जगामधील सर्वात प्रगत आणि प्रगल्भ भाषा आहे.
**संस्कृत** भाषेइतके वर्णोच्चार जगातील दुसऱ्या कोणत्याही भाषेमधे नाहीत.
**संस्कृत** भाषेइतके शब्द जगातील दुसऱ्या कोणत्याही भाषेमधे नाहीत.
म्हणूनच तिला **‘ शब्दरत्नाकर!’** म्हणजे शब्दरूपी रत्नांचा सागर असे म्हणतात.

**संस्कृत** भाषा ही जगामधे अस्तित्वात असलेल्या ७५ टक्के भाषांची जननी आहे.
असे, भाषा निर्माण करण्याचे, सामर्थ्य दुसऱ्या कोणत्याही भाषेत नाही.
**अशा ह्या संस्कृत भाषेला आपण आदराने नमस्कार करूया!**
संस्कृत भाषा ज्या लिपीमधे लिहिली जाते तिला **देवनागरी लिपी** असे म्हणतात.
जगामधील कोणतीही भाषा तिच्या उच्चारानुसार अचूकपणे लिहिणे आणि जे लिहिले असेल ते वाचून अस्खलीतपणे उच्चारणे हे केवळ देवनागरी लिपीनेच शक्य होऊ शकते. दुसऱ्या कोणत्याही लिपीने ते शक्य होत नाही. ह्याचे कारण काय? तर, —
देवनागरीमधे लिहिताना शब्दाचा जसा उच्चार असेल तसेच लिहायचे असते आणि वाचताना देखील तसेच वाचायचे असते.
त्याचे स्पेलिंग करावे लागत नाही. ' **मधुसूदन** ' लिहायचे म्हणजे मधुसूदन असेच लिहायचे आणि तसेच वाचायचे.
' **Madhusudan** ' असे लिहायची गरज नसते आणि ते पाठ करायचीही गरज नसते.
त्यामुळे लिहिताना अथवा वाचताना कोणताही गोंधळ होत नाही.
' लिहायचे एक आणि उच्चार भलताच करायचा.' ही भानगड नाही.
जर ' **Go** ' लिहिले असेल तर **गो** असे वाचायचे.
परंतु ' **To** ' लिहिले असेल तर मात्र, **टो** असे वाचायचे नाही. **टू** असे वाचायचे. ही भानगड नाही.
म्हणून आपल्याला जी भाषा येत नाही, त्या भाषेमधील गद्य अथवा पद्य अगोदर देवनागरीमधे लिहून, पाठ करून, नंतर ती भाषा जाणणाऱ्यांना म्हणून दाखविले तर ऐकणाऱ्यांचा, ' ह्याला आपली भाषा उत्तम प्रकारे बोलता येते.' असा गैरसमज होतो.
आपली मराठी भाषा ही देखील देवनागरीतच लिहिली जाते.
**अशा ह्या देवनागरी लिपीलाही आपण आदराने नमस्कार करूया!**
सांगायचा मुद्दा हाच की, भगवद्‌गीता ही स्वयंसिद्ध मंत्रमाला आहे.
मंत्रांचे सामर्थ्य म्हणून जे काही सांगितलेले आहे ते सर्वकाही गीतेमधे आहे.
गीता म्हणजे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. भारतीय संस्कृतीचे सारसर्वस्व आहे!
इतकेच नाही तर जगामधील सर्व धर्मग्रंथांच्यामधे गीतेचे स्थान हे अद्वितीय असेच आहे आणि भविष्यामधे ते तसेच राहील ह्याविषयी तिळमात्र शंका नाही. गीता म्हणजे काय आहे ते आपण पहिल्याच प्रवचनामधे पाहिलेले आहे.
भगवद्‌गीता ही स्थलकालातीत आहे. भगवद्‌गीता ही धर्मातीत आहे.
गीता ज्या परिस्थितीमधे सांगितली आहे ती परिस्थिती अद्वितीय आहे!
गीता जेथे सांगितली गेली ती जागा अद्वितीय आहे! गीता ज्याने सांगितली तो अद्वितीय आहे!
गीता ज्याला सांगितली तो देखिल अद्वितीय आहे! कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी गीता ही अद्वितीयच आहे!
भगवान श्रीकृष्णाने गीतेमधे कर्मयोग, ज्ञानयोग, राजयोग, भक्तियोग ह्यांचा अतिशय सुरेख आणि मनोहारी असा समन्वय करून दाखविलेला आहे.
गीता म्हणजे, मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे आणि त्याला जीवनाच्या अंतिम ध्येयाकडे म्हणजेच मोक्षाकडे नेणारे स्वयंसिद्ध शास्त्र आहे.
' गीता म्हणजे साधकांच्या जीवनामधे आमूलाग्र बदल घडवून आणणारी, अंतर्बाह्य बदल घडवून आणणारी, अत्यंत प्रभावशाली अशी मंत्रमाला आहे.' गीतेला पर्याय म्हणजे केवळ गीताच. दुसरे काहीही नाही. असो.
कोणतेही मंत्र म्हणताना अगोदर त्यांचा ऋषी, छंद, देवता, बीज, शक्ती आणि कीलक ह्यांचा श्रद्धेने स्मरणपूर्वक उच्चार केला जातो.
त्यानंतर करन्यास, अंगन्यास व कवचम् ह्यांचा उच्चार करून मंत्रदेवतेचे ध्यान केले जाते.
ह्या सर्व विधीची पूर्तता करून झाल्यावर, मग प्रत्यक्ष मंत्रोच्चारणाला सुरवात केली जाते.
धर्मशास्त्रानुसार ही पूर्वापार चालत आलेली पद्धत आहे.
परंतु ती गीतापठणाचेवेळी पाळली जातेच असे नाही. सहसा पाळली जात नसावी.
भगवद्‌गीतेलाही ऋषी, छंद, देवता, बीज, शक्ती, कीलक, करन्यास, अंगन्यास व कवचम् ह्या सर्व गोष्टी आहेत.
तरीही, गीतापठणाच्यावेळी त्यांचे क्रमवार उच्चारण केले गेल्याचे, मी तरी पाहिलेले अथवा ऐकलेले नाही.
कोणतेही विधी पूर्ण न करताच, आदिम श्लोक म्हणून झाल्यावर, सरळ गीतापठणाला सुरवात केली जाते.
ह्याचे कारण काय ते मला माहीत नाही. असो.
दुसरे म्हणजे कोणतेही मंत्र अथवा स्तोत्र म्हणून झाल्यावर फलश्रुतीही म्हणायची प्रथा आहे.

फलश्रुती म्हणजे कोणत्याही स्तोत्राचा अंतिम भागच असतो.
गीतेच्या अठराव्या अध्यायातील सदुसष्ट ते एकाहत्तर हे पाच श्लोक फलश्रुती म्हणून सांगितलेले आहेत.
ते श्लोक गीतापठणाचेवेळी नियमीतपणे म्हटले जातात.
असे असले तरीही, गीतापठण करण्यापूर्वी अथवा गीतापठण करून झाल्यावर **गीतामाहात्म्य** म्हणायची प्रथा आहे.
ह्यातही निश्चित असा नियम नसावा. कारण ते दोन्हीपैकी कोणत्याही वेळी म्हटले जाते.
खरे म्हणजे एखादी मंत्रमाला म्हणण्यापूर्वी तिचे महत्त्व सांगणे, त्यानंतर ती मंत्रमाला म्हणणे आणि अखेरीस त्या मंत्रमालेच्या उच्चारणाचे फळ काय ते सांगणे हाच क्रम योग्य आहे.
पण गीतामाहात्म्यामधे **' गीतेचे महत्त्व, तिची प्रशंसा आणि फलश्रुती '** ह्या तीनही गोष्टी एकत्र आलेल्या आहेत.
एकाच दोऱ्यामधे ओवलेल्या विविधरंगी मण्यांच्यासारख्या सलग गुंफलेल्या आहेत.
त्यामुळे ते, गीतापठणापूर्वी अथवा गीतापठणानंतर, कधीही म्हटले तरी चालत असावे.
इतकेच नाही तर ते एक संपूर्ण, स्वतंत्र आणि परिपूर्ण असे स्तोत्रच आहे.
त्यामुळे फक्त गीतामाहात्म्यच म्हटले तरीही, एखादे स्तोत्रपठण केल्यासारखेच वाटते.
अनेक ठिकाणी, वेगवेगळे श्लोक ऐकले आणि मला ते फार आवडले.
पुढे त्यांचा अर्थ समजून घेतल्यावर तर अधिकच आवडायला लागले म्हणून त्यांचा शोध घ्यायला सुरवात केली.
परिणामी मला पंचवीस श्लोक मिळाले. त्यामधे —
' गीता म्हणजे काय आहे? गीतेची महती काय आहे? गीता सांगणाऱ्याची महती काय आहे? त्याचा प्रभाव कसा आहे?
साधकाला गीता पठणाच्या योगाने कोणता लाभ होतो?'
इत्यादी प्रश्नांची उत्तरे आणि त्यांच्याशी संबंधित अशी इतर माहिती दिलेली आहे.
अनेकवेळा गीतापठणापूर्वी सांगितलेल्या क्रमानुसार गीतामाहात्म्य म्हणून पाहिले.
तसेच गीतापठणानंतरही त्याच क्रमानुसार गीतामाहात्म्य म्हणून पाहिले. त्याविषयी यथाशक्ती यथामती विचार केला.
तसे केल्यावर मला असे जाणवले की, श्लोक तेच असले तरीही, त्यांचा आपल्या मनावर होणारा परिणाम बदलतो.
वेगवेगळा असतो. निदान मला तरी तसाच अनुभव आलेला आहे.
ह्याविषयी मला जे वाटते ते आपल्याला सांगण्याचा प्रयत्न करतो.

**जर गीतापठणापूर्वी गीतामाहात्म्य म्हटले तर त्याचा परिणाम कसा होतो?**

तो परिणाम हा उष:कालाच्या परिणामासारखा असतो. सूर्योदयापूर्वीचा एक तास म्हणजे **उष:काल.**
त्यालाच व्यावहारिक भाषेमधे आपण **' पहाट झाली '** असे म्हणतो.
दिवसभरामधे उष:काल हा अत्यंत महत्त्वाचा काल मानलेला आहे.
तसेच त्या काळाला देवतेचे स्थान देण्याच्या हेतूने **' उषादेवी '** असेही म्हणतात.
ऋग्वेदामधे **उषा** ही एक प्रमुख देवता असून, तिच्यावर १८३ मंत्र रचलेले आहेत.
त्या मंत्रांमधे उष:काल आणि उषादेवीचे फार सुंदर वर्णन केलेले आहे.
त्या वर्णनाचा काही अंश आपल्याला सांगतो तो ऐका आणि विचार करा.
' रात्र सरत आली आहे. उष:काल होऊ लागला आहे. अंधार नाहीसा होऊ लागला आहे व आकाश उजळू लागले आहे.
आपली भगिनी जी निशा, तिचा अंधार उषादेवी आपल्या तेजाने नष्ट करू लागली आहे.
तिने आपल्या भगिनीला गुप्त प्रदेशात पाठवून दिले आहे.
रोजच्या रोज परत परत उगवणारी आणि पुरातन असूनही सदैव नवीन भासणारी अत्यंत देखणी अशी ही उषादेवी, तिला आम्ही नमस्कार करतो.
तेजस्विनी उषादेवीच्या सुंदर रथाचे घोडे तांबुस वर्णाचे आहेत. आपल्या तेजाने ती द्यूलोकाचे द्वार उघडते. त्यामुळे पूर्व दिशेला रक्तिमा यावयास लागतो. पूर्वदिशा अतिशय रमणीय व तेजस्वी होत जाते.
पूर्व दिशेने आलेली आणि पश्चिम दिशेकडे दृष्टी असलेली उषादेवी एखाद्या नर्तकीप्रमाणे आपली रंगरूपी वसने बदलायला लागते.
नवनवीन रंगीत वस्त्रे पांघरून आनंद व्यक्त करते. त्यामुळे सगळीकडे तिची दिव्य प्रभा पसरायला लागते.
आकाशामधे सप्त रंगांची उधळण व्हायला लागते. अंतरिक्ष आणि पृथ्वी प्रकाशाने भरून जायला लागते.
उषादेवी ही चिरतरुण आहे. ती सूर्यदेवाच्या तेजानेच प्रकाशित होते. सर्व विश्वाला सूर्यदेवाच्या आगमनाची सूचना देते.

सूर्यदेवाच्या आगमनाची वार्ता देणाऱ्या पवित्र उषादेवीचे आम्ही स्वागत करतो.
सदैव अत्युच्च स्थानी विराजमान असणाऱ्या उषादेवीला आम्ही वंदन करतो आणि तेजाचे निधान असणाऱ्या सूर्यदेवाचे स्वागत करायला उत्सुक होतो.
अत्यंत प्रभावशाली असलेली उषादेवी सर्वांना कर्म करायला प्रवृत्त करते.
जे अज्ञानी असतात त्यांना ज्ञान मिळवायला प्रवृत्त करते. जे ज्ञानी असतात त्यांना अधिक ज्ञान मिळवायला ऊर्जा देते.
जे साधक असतात त्यांना साधना, जप, तप, ध्यान इत्यादी करायची प्रेरणा देते.
तिच्या पाठोपाठ तेजस्वी सूर्यदेवाचे आगमन होते. सौंदर्यवती उषादेवी ही सूर्यदेवाची सखी आहे. दूत आहे.
परमतेजस्वी आणि प्रभावशाली सूर्यदेवच उषादेवीला प्रेरणा देत असतो. आपल्या आगमनाची सूचना देण्यासाठी तिला पुढे पाठवीत असतो आणि त्यानंतर स्वत: प्रगट होतो. त्याच्या दिव्य तेजाने सर्व विश्व उजळून निघते. जगामधील सर्व प्राणिमात्र आणि पक्षिगण आपापली विहित कर्मे करण्यास सुरवात करतात.'
किती सुंदर वर्णन केले आहे पहा! आता वरील वर्णनामधील,
**' सूर्यदेव म्हणजे श्रीमद्भगवद्गीता, उषादेवी म्हणजे गीतामाहात्म्य आणि आपले मन म्हणजे आकाश आहे '** असे समजा आणि गीतामाहात्म्य म्हणायला सुरवात करा.
आपल्या असे लक्षात येईल की उषादेवीच्या आगमनाने आकाशावर जे जे परिणाम होतात आणि जे जे बदल घडून येतात,
ते ते सर्व परिणाम, गीतामाहात्म्याच्या पठणाने, आपल्या मनावर होतात आणि आपल्या मनामधे बदल घडून येतो.
आपले मन शांत होते. स्थिर होते. स्तब्ध होते. आनंदित होते. आपण भगवद्गीतेचे पठण करायला उत्सुक होतो. असो.
हा झाला गीतापठणापूर्वीचा पहिला प्रकार व त्याचा परिणाम. आता आपण गीतापठणानंतरचा विचार करूया.
योगायोगाची गोष्ट अशी की येथे तसेच घडून येते आहे.
सगळी गीता म्हणून झाल्यावर आणि त्यावर विचार करून झाल्यानंतर आपण गीतामाहात्म्य म्हणून त्यावर विचार करणार आहोत. असो.

**जर गीतापठणानंतर गीतामाहात्म्य म्हटले तर त्याचा परिणाम कसा होतो?**

असे पहा की, आपण जेव्हा देवाच्या दर्शनासाठी देवळात जातो, त्यावेळी देवाचे दर्शन घेऊन, त्याला प्रदक्षिणा घालून, मनोभावे नमस्कार करून झाल्यावर, देवळातील पुजारी, देवाचा **प्रसाद** म्हणून, आपल्याला काहीतरी खायला देतो.
तो प्रसाद खाऊन झाल्यावर आपण देवाला परत एकदा नमस्कार करून, देवळाबाहेर येतो.
त्यावेळी आपल्या मनामधे देवाची मूर्ती असते, वाचेने त्याचे नामस्मरण होत असते आणि जिभेवर प्रसादाची गोडी रेंगाळत असते.
येथे आपण गीतामंदिरामधे प्रवेश करून परमेश्वराचे दर्शन घेतले. त्याने केलेला उपदेश ऐकला.
आपल्याला त्याच्या विराट स्वरूपाचे दर्शनही झाले. त्याला मनोमन साष्टांग नमस्कार करून झाले. प्रदक्षिणा घालून झाल्या.
आणि आपण मंत्रमुग्ध होऊन त्याच्यापुढे उभे राहिलो आहोत.
येथे **भाविकही** आपणच आहोत आणि **पुजारीही** आपणच आहोत.
त्यामुळे प्रसाद देणारा आणि प्रसाद घेणाराही आपणच आहोत. आपल्या आणि परमेश्वराच्यामधे वेगळा असा कोणीही मध्यस्थ नाही.
येथला प्रसादही विशेष असा आहे. विलक्षण असा आहे. आता आपल्याला प्रसाद मिळणार आहे.
गीतामाहात्म्याचा प्रसाद मिळणार आहे. हा खायचा प्रसाद नसून ऐकायचा प्रसाद आहे. कानांनी ग्रहण करायचा प्रसाद आहे.
तो प्रसाद ग्रहण केल्यावर आपले देवदर्शन पूर्ण होणार आहे. आपली ही गीतामंदिराची यात्रा, ही गीतापंढरीची वारी पूर्ण होणार आहे.
गीतामाहात्म्याचा येथे होणारा परिणाम हा गोड प्रसादासारखा आहे.
अर्थात हे माझे मत आहे. आपण त्याच्याशी सहमत व्हालच असे नाही. तर —
**' गीतामाहात्म्य '** म्हणजे गीतामंदिरातील देवदर्शनानंतर मिळालेला महाप्रसादच आहे.
अत्यंत रसाळ आणि मधुर असा प्रसाद आहे. उच्चारणाच्या योगाने जिभेने आणि श्रवणाच्या योगाने कानांनी ग्रहण करायचा प्रसाद आहे.
प्रसाद ग्रहण करणारा, त्या अवीट गोडीने तृप्त झालाच पाहिजे.
येथेही गीतामाहात्म्याच्या उच्चारणाने आपले मन अत्यंत शुद्ध होते. अतिशय शांत होते. स्थिर होते. स्तब्ध होते. आनंदित होते.
असा माझा अनुभव आहे. ' आज आपणही अनुभव घेऊन पहावा ' हीच नम्र विनंती. असो.
आज आपल्याला गीतामाहात्म्याच्या श्लोकांच्याविषयी चर्चा करायची आहे.
सुरवात अर्थातच आदिम श्लोकाने केली जाते. पठणाची पद्धतही पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे आणि त्याप्रमाणेच पठण करावे असे सुचविलेले आहे. असो.
सुयोग्य अशा बैठक स्थितीमधे स्थिर होऊन डोळे मिटून घ्यावे. परमपवित्र ओंकाराचा तीन वेळा उच्चार करावा.

क्षणभर शांतपणे बसावे. त्यानंतर पुढे दिलेले गीतामाहात्म्याचे सर्व श्लोक, एकाग्र मनाने आणि यथायोग्य शब्दोच्चारण करुन म्हणावेत. गीतामाहात्म्यामधे जेथे जेथे नमस्कारवाचक शब्द आलेले आहेत, त्या सर्व शब्दांचे उच्चारण करताना आपले हात जोडून नमस्कार करावा.

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

नारायणाला म्हणजेच भगवान श्रीकृष्णाला, नरांमध्ये सर्वोत्तम नर असा अर्जुन त्याला, सरस्वती देवीला आणि व्यासांना नमस्कार करून मग जय म्हणजे महाभारत म्हणण्यास सुरवात करावी.

ह्या श्लोकाविषयी आपण यापूर्वी सविस्तर चर्चा केलेली आहे. त्यामुळे येथे त्याची पुनरावृत्ती करण्याची गरज नाही.

हा श्लोक म्हणून झाल्यावर गीतामाहात्म्याला सुरवात होते.

**— अथ गीतामाहात्म्यम् —**

**ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**

**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।**

**अद्वैतामृतवर्षिणी भगवतिमष्टादशाध्यायिनीम्**

**अंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।। १ ।।**

येथे श्रीमद्भगवद्गीतेच्या महाभारतामधील समावेशा विषयीची माहिती तसेच तिचे महत्त्व सांगितलेले असून, तिचे ध्यान करण्यास सुचविलेले आहे.

( स्वजनांच्या नाशाच्या विचाराने अत्यंत दु:खित झालेल्या आणि युद्धकर्म करण्यास नकार देणाऱ्या ) मोहग्रस्त अर्जुनाला, भगवान नारायणाने स्वत: उपदेशिलेल्या आणि मुनिवर व्यासांनी महाभारतामधे समाविष्ट केलेल्या, अद्वैत तत्त्वज्ञानरूपी अमृताचा वर्षाव करणाऱ्या, अठरा अध्यायांचा समावेश असलेल्या आणि जन्ममरणरूपी संसाराचा उच्छेद करणाऱ्या तेजस्वी आणि पूजनीय अशा, हे माते भगवद्गीते, मी तुझे ध्यान करतो.

**नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे**

**फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।**

**येन त्वया भारततैलपूर्ण:**

**प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप: ।। २ ।।**

येथे महामुनी व्यासांच्या महान कार्याचा उल्लेख केला असून त्यांना अत्यंत आदराने नमस्कार करण्यास सुचविलेले आहे.

पूर्ण फुललेल्या कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे नेत्र असलेल्या आणि ज्यांची बुद्धी विशाल आहे अशा हे व्यासमुने,

ज्या आपण महाभारतरूपी तेलाने पूर्ण भरलेला हा **भगवद् गीतारूपी** ज्ञानमय दिवा लावला, त्या आपणाला नमस्कार असो.

यापुढील तीन श्लोकांमधे भगवान श्रीकृष्णाचे माहात्म्य आणि त्याने केलेले गीतोपदेशाचे महान कार्य ह्यांचा उल्लेख केला असून, त्याला अत्यंत आदराने नमस्कार करण्यास सुचविलेले आहे.

**प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।**

**ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नम: ।। ३ ।।**

पूर्णपणे शरण आलेल्याला कल्पवृक्षाप्रमाणे इच्छित फळ देणारा, रथ हाकण्यासाठी ज्याच्या एका हातात वेताची काठी आहे आणि ज्याने ज्ञानमुद्रा धारण केली आहे अशा, गीतामृताचे दोहन करणाऱ्या श्रीकृष्णाला नमस्कार असो.

**कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।**

**प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नम: ।। ४ ।।**

कृष्ण हाच वासुदेव म्हणजे सर्व प्राणिमात्रामधे राहणारा दिव्य अंश आहे, हरी म्हणजे पापहरण करणारा आहे आणि परमात्मा म्हणजे सर्व विश्वाची निर्मिती, पालन आणि विनाश करणारे, सर्वोच्च असे, आत्मतत्त्व आहे. मनुष्याच्या सर्व दु:खांचा नाश करणाऱ्या गोविंदाला नमस्कार असो.

**वसुदेवसुतम् देवम् कंसचाणूरमर्दनम् ।**

**देवकीपरमानन्दम् कृष्णं वंदे जगद्गुरुम् ।। ५ ।।**

जो वसुदेवाचा पुत्र आहे, जो कंस - चाणूर इत्यादी दुष्टांचा नाश करणारा आहे, जो देवकीमातेचा परमानंद आहे,

( ज्याला केवळ पाहिल्यावर देवकीमातेला पराकोटीच्या आनंदाची प्राप्ती होते, सर्वोच्च आणि सर्वोत्तम आनंदाची प्राप्ती होते ) आणि जो सर्व जगाचा गुरू आहे त्या श्रीकृष्णाला नमस्कार असो.

**भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनीलोत्पला**
**शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ।**
**अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी**
**सोत्तीर्णा खलु पांडवै रणनदी कैवर्तकः केशवः ।। ६ ।।**

येथे कुरुक्षेत्रावर झालेल्या त्या अद्वितीय अशा महायुद्धाला रणनदीची यथार्थ उपमा देण्यात आलेली असून तिच्या भयानकतेचे वर्णन करण्यात आलेले आहे.

१) **भीष्म द्रोण तटा** — भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य हे दोघे ज्या नदीचे तट आहेत.

कोणत्याही नदीचे दोन्ही तट किंवा काठ किंवा तीर तिची दिशा, तिचा प्रवाह आणि त्या प्रवाहाची गती निश्चित करतात. महायुद्धाच्या पहिल्या पंधरा दिवसातील, म्हणजे द्रोणाचार्यांच्या मृत्यूपर्यंतच्या काळामधील युद्धविषयक सर्व डावपेच ते दोघेच ठरवीत होते.
ह्या खंबीरपणे उभ्या असलेल्या दोन तटांच्या मधून ती नदी कमालीच्या वेगाने उसळून आणि उफाळून वाहते आहे.

२) **जयद्रथ जला** — जयद्रथ हा ज्या नदीतील पाणी आहे.

नदीतील पाणी दोन्ही तटांशी सतत व निरंतर संपर्कात असते. तसेच वाहणाऱ्या पाण्याच्या स्वरूपावरून नदीचा स्वभाव व स्वरूप ठरते. जयद्रथ हा भीष्माचार्य व द्रोणाचार्य ह्या दोघांच्या मधला यथायोग्य संपर्काधिकारी आहे आणि पांडवांचा अत्यंत कट्टर असा शत्रू आहे.

३) **गांधार नीलोत्पला** — गांधारराज शकुनी हा ज्या नदीतील गडद निळा खडक आहे.

पाण्यातला खडक हा फारसा दिसत नाही, जाणवत नाही पण अत्यंत धोकादायक असतो. त्याच्यावर आपटलेली कोणतीही गोष्ट नाश पावते. नष्ट होते. शकुनी म्हणजे सर्वात कपटी, धूर्त व धोकादायक व्यक्ती. शिवाय तो दुर्योधनाचा मामा असून, त्याचा सर्वात विश्वासू सहकारी आहे.

४) **शल्य ग्राहवती** — मद्र नरेश शल्य हा ज्या नदीतील सुसर आहे.

भक्ष्याला जाणीव होण्याअगोदरच झडप घालणे व गिळून टाकणे हा सुसरींचा आणि मगरींचा गुणधर्म आहे.
म्हणून सर्व जलचरांच्यामधे मगर आणि सुसर हे अत्यंत धोकादायक मानले जातात.

५) **कृपेण वहनी** — कृपाचार्य हा ज्या नदीतील गतिमान आणि धोकादायक असा प्रवाह आहे.

मार्गामधे येणारे सर्वकाही उखडून टाकणे, फेकून देणे, नष्ट करणे आणि कोणालाही नदी ओलांडणे अशक्य करून टाकणे हा गतिमान प्रवाहाचा गुणधर्म आहे.

६) **कर्णेन वेलाकुला** — कर्ण हा ज्या नदीतील भक्कम वेलींचे काटेरी व धोकादायक जाळे आहे.

नदीच्या प्रवाहातील काटेरी वेलींच्या जाळ्यात अडकायला झाले तर सुटका होणे अशक्य आणि मरण निश्चित.

७) **अश्वत्थाम विकर्ण घोरमकरा** — द्रोणपुत्र अश्वत्थामा आणि महारथी विकर्ण हे ज्या नदीतील भयंकर मगरी आहेत.

भक्ष्याला जाणीव होण्याअगोदरच झडप घालणे व गिळून टाकणे हा सुसरींचा आणि मगरींचा गुणधर्म आहे.

८) **दुर्योधनावर्तिनी** — दुर्योधन हा ज्या नदीतील गतिमान भोवरा आहे.

भोवऱ्याच्या परिघात येणारी कोणतीही गोष्ट अत्यंत गतिमान होते. गोल गोल फिरत त्याच्या मध्याकडे खेचली जाते आणि नाश पावते.
अशी ही भयंकर रणनदी, पांडव कसे काय तरून जाऊ शकले?

९) **कैवर्तकः केशवः** — कारण स्वतः केशव त्यांचा नावाडी होता.

ह्या श्लोकामधे महायुद्धाच्या एकूण विषम परिस्थितीचे वस्तुनिष्ठ आणि अचूक वर्णन केलेले आहे. जर श्रीकृष्ण पांडवांची पाठराखण करीत नसता, त्यांचे सर्वप्रकारे रक्षण करायला सिद्ध नसता, त्यांच्या हिताची सर्वतोपरी काळजी घ्यायला तत्पर नसता तर पांडव कधीही विजयी होऊ शकले नसते.

**पाराशर्यवचः सरोजममलम् गीतार्थगंधोत्कटम्**
**नानाख्यानककेसरम् हरिकथा सम्बोधनाबोधितम् ।**
**लोकेसज्जनषट् पदैरहरहः पेपीयमानम् मुदा**
**भूयाद्भारतपङ्कजम् कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ।। ७ ।।**

येथे महाभारताला कमळाची उपमा दिलेली असून त्याचे फार सुंदर वर्णन केले आहे.

पराशरमुनींचा पुत्र असलेल्या व्यासमुनींची वाणी म्हणजे जणूकाही विशाल सरोवरच असून त्या विशाल सरोवरामधे उगवलेले, मधुर आणि आनंददायक अशा गीतेचा अर्थ हाच ज्याचा सुगंध आहे, विविध प्रकारची अनेकानेक आख्याने हेच ज्याचे कोमल परागकण आहेत, हरिकथारूपी सदुपदेशाने जे प्रफुल्लित झाले आहे, विकसित झाले आहे, सज्जनरूपी भ्रमरांच्या समुदायांकडून प्रतिदिनी ज्याचे आनंदाने सेवन केले जाते आणि जे कलियुगातील अपूर्णतेच्या मळाचा नि:शेष नाश करून त्यातून मुक्त करते,
असे हे महाभारतरूपी कमळ आम्हाला कल्याणदायी होवो.

**मूकम् करोति वाचालम् पङ्गुं लङ् घयते गिरिम् ।**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ।। ८ ।।**

ज्याची कृपा झाली असता मुका मनुष्य बोलायला लागतो आणि पांगळा मनुष्य पर्वतावर चढतो त्या परमानंददायी माधवाला माझा नमस्कार असो.

‘ परमेश्वराची कृपा झाली म्हणजे अशक्य गोष्टीसुद्धा शक्य होतात ’ हे सत्य आहे.

त्याच बरोबर ‘ हे सत्य प्रत्यक्षात येण्यासाठी, मुक्या माणसाने बोलायचा प्रयत्न करणे आणि पांगळ्या माणसाने चालायचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. जर तसे झाले नाही तर परमेश्वराची कृपा होणे शक्य नाही.’ हे देखील सत्य आहे.

‘ जो स्वत:ला मदत करतो, आपल्या उत्कर्षासाठी सतत प्रयत्न करतो, त्यालाच देव मदत करतो. सदैव दुसऱ्यावर विसंबून राहणाऱ्याला, सतत दुसऱ्याकडून मदतीची अपेक्षा करीत राहणाऱ्याला देव मदत करीत नाही.’ हे त्रिवार सत्य आहे.

यापुढील बारा श्लोक म्हणजे, गीतापठणाच्या एकूण लाभाविषयी सविस्तर माहिती सांगणारी श्लोकमालाच आहे. गीतेच्या वाचनाने, पठणाने, मननाने आणि चिंतनाने मनुष्यमात्राला कोणते लाभ होतात त्याविषयी सांगितले आहे.

**गीताशास्त्रमिदं पुण्यम् य: पठेत् प्रयत: पुमान् ।**
**विष्णो: पदमवाप्नोति भयशोकादिवर्जित: ।। ९ ।।**

गीता शास्त्र हे पुण्यकारक आहे. ह्या शास्त्राचे प्रयत्नपूर्वक पठण करणाऱ्या मनुष्याच्या सर्व प्रकारच्या भीतीचा आणि सर्व प्रकारच्या दु:खांचा नाश होऊन अखेरीस त्याला भगवान विष्णूच्या चरणांची प्राप्ती होते. ( मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो. )

**गीताया: पुस्तकं यत्र यत्र पाठ: प्रवर्तते ।**
**तत्र सर्वाणि तीर्थानि प्रयागादीनि तत्र वै ।। १० ।।**

जेथे गीतेचे पुस्तक असते आणि गीतेचे पठण चालते, तेथे प्रयागराजादी सर्व तीर्थे वास्तव्य करीत असतात.

हा एक महत्त्वाचा श्लोक आहे असे मला वाटते. जर नियमितपणे, अर्थ समजून घेऊन आणि एकाग्र होऊन गीतापठण केले तर घरामधील वातावरण संपूर्णपणे बदलते असा माझा अनुभव आहे. जेथे गीता म्हणायला शिकविली जाते, पाठ करून घेतली जाते, तेथे असाच परिणाम दिसून येतो. हा गीतेचा प्रभाव आहे. गीतामंत्रांचे अंगभूत असे सामर्थ्य आहे.

म्हणून पूर्णपणे समरस होऊन सदैव गीतापठण करणे हे कल्याणकारकच आहे.

ते करीत राहिले तर आपल्या घरामधे, मनामधे आणि बुद्धीमधे सर्व प्रकारचे पावित्र्य रहायला येते.

तेथे वाईट वासना, वाईट विचार, वाईट आचार राहू शकत नाहीत. ती जागाच पवित्र होत असल्यामुळे, तेथे राहणे म्हणजे एखाद्या तीर्थक्षेत्रामधे राहण्यासारखेच होते. मनात परमेश्वराविषयी दृढ श्रद्धा निर्माण झाल्यामुळे, असेल त्या परिस्थितीमधे आनंद मानायची सवय लागते. मग कोणत्याही तीर्थयात्रेला जायची, व्रतवैकल्ये करायची, एखाद्या बाबा अथवा महाराजाच्या नादाला लागायची, उपासतापास करीत रहायची, नवस बोलायची गरजच रहात नाही.

**गीताध्ययनशीलस्य प्राणायामपरस्य च ।**
**नैव सन्ति हि पापानि पूर्वजन्मकृतानि च ।। ११ ।।**

नित्य गीतेचे अध्ययन व पठण करणाऱ्या मनुष्याला आपोआप प्राणायाम घडतो आणि मागील जन्मामध्ये तसेच ह्या जन्मामध्ये घडलेल्या पापाच्या पासूनही मुक्ती मिळते.

ह्यामधील पूर्वार्ध कोणालाही प्रत्यक्ष अनुभवता येण्यासारखा आहे. मोकळ्या आवाजात, योग्य स्वरामधे, व्याकरणदृष्ट्या शुद्ध आणि स्पष्ट उच्चार करून, श्वास-प्रश्वासाची क्रिया योग्य जागी करून, गीतापठण करायला सुरवात करा.

श्रद्धेने, नियमितपणाने, रोजच्या रोज पठण करायला लागा आणि —

‘ आपली जीभ किती लवचिक होते, बोलताना शब्दांचे उच्चारण कसे सुधारते, फुप्फुसांना किती व्यायाम होतो,
श्वासावर कसा ताबा ठेवता यायला लागतो, श्वसनसंस्थेचे कार्य किती सुधारते, आपली स्मरणशक्ती किती सुधारते,
आपले मन कसे शांत व्हायला सुरवात होते, स्थिर व्हायला सुरवात होते, स्वत:कडेच कसे त्रयस्थ वृत्तीने पाहता यायला लागते आणि

मनामधील भीतीची भावना कशी कमी व्हायला लागते ' ह्याचा स्वत:च अनुभव घ्या.
उत्तरार्धाविषयी मी आपल्याला काहीच सांगू शकणार नाही कारण माझी तेवढी योग्यता नाही. यापुढेही अशा स्वरूपाची काही विधाने आलेली आहेत. पुढे बोलण्याच्या ओघामधे मला त्या विधानांच्याविषयी काय वाटते ते सांगेन. असो.

**मलनिर्मोचनं पुंसां जलस्नानम् दिने दिने ।**

**सकृद्गीताम्भसि स्नानम् संसारमलनाशनम् ।। १२ ।।**

आपण रोज सकाळी उठल्यावर पाण्याने आंघोळ करतो. तसे केले असता आपल्या शरीरावरचा मळ नाहीसा होतो. आळस निघून जातो आणि आपण ताजेतवाने होतो. उत्साहित होऊन दैनंदिन कामाला सुरवात करतो. किंबहुना शरीर स्वच्छ व्हावे व काम करायला उत्साह यावा म्हणूनच रोज स्नान करायचे असते.
त्याचप्रमाणे गीतारूपी जलाने रोज स्नान केले असता म्हणजेच रोज गीतापठण केले असता आपले मन शुद्ध होते, स्वच्छ होते, त्यावर साठलेला संसाराविषयीचा आसक्तीरूपी मळ नाहीसा होतो. शरीरशुद्धी प्रमाणेच मन:शुद्धीही आवश्यक असते.
म्हणून दररोज गीतापठण अवश्य करावे असे सुचविलेले आहे.

**गीतासुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ।**

**या स्वयम् पद्मनाभस्य मुखपद्माद्विनि:सृता ।। १३ ।।**

**पद्मनाभ** म्हणजे ज्याच्या नाभीमधून कमळ बाहेर आलेले आहे असा. म्हणजेच भगवान **श्रीविष्णू.**
त्या कमळमधेच ब्रह्मदेव आसनस्थ झालेला आहे. तसेच **' श्रीकृष्ण हा श्रीविष्णूंचाच अवतार आहे.'** हा संदर्भ समजून घ्या.
त्यामुळेच प्रत्यक्षामधे भगवद्गीता ही श्रीकृष्णाने सांगितलेली असली तरीही येथे **' श्रीविष्णूंनी सांगितली '** असा उल्लेख आलेला आहे. तर, —
जी प्रत्यक्ष पद्मनाभ विष्णू भगवंताच्या मुखकमलामधून व्यक्त झालेली आहे अशा श्रीगीतेचे चांगल्या रीतीने पठण करणे, तिचा अर्थ समजून घेणे, त्या अर्थामागील भाव अंत:करणामधे धारण करणे आणि त्यानुसार आचरण करण्याचा सतत प्रयत्न करीत राहणे, हे प्रत्येकाचे मुख्य कर्तव्य आहे. जो मनुष्य हे कर्तव्य पूर्ण श्रद्धेने, प्रामाणिकपणे सतत पार पाडत असतो त्याला अन्य शास्त्रांचा आणि त्यांच्या विस्ताराचा अभ्यास करण्याची आणि त्यांमधे सांगितलेल्या विविध सकाम कर्मकांडामधे गुंतून पडण्याची काय गरज आहे? तशी आवश्यकताच उरत नाही. कारण एका गीतेमधे सर्व शास्त्रे सामावलेली आहेत.

**यो अष्टादशजपो नित्यं नरो निश्चल मानसः ।**

**ज्ञानसिद्धिं स लभते ततो याति परं पदम् ।। १४ ।।**

गीतेचे अठरा अध्याय आहेत. जो मनुष्य निश्चल मनाने म्हणजे एकाग्र होऊन, अर्थ समजून घेऊन, श्रद्धापूर्वक सर्व अठराही अध्याय नेहमी म्हणतो, त्याला ज्ञानसिद्धीचा लाभ होऊन परमपद प्राप्त होते.

**गीताभ्यासं पुनः कृत्वा लभते मुक्तिमुत्तमाम् ।**

**गीतेत्युच्चारसंयुक्तो म्रियमाणो गतिं लभेत् ।। १५ ।।**

परत परत गीतापठण केल्यास, गीतेचा अभ्यास केल्यास, मनन व चिंतन केल्यास मनुष्याला उत्तम मुक्तीचा लाभ होतो.
**' गीता '** असा शब्द उच्चारून मरणाऱ्या मनुष्याला देखील सद्गती लाभते.

**गीतार्थ श्रवणासक्तः महापापयुतोऽपि वा ।**

**वैकुण्ठं समवाप्नोति विष्णूना सह मोदते ।। १६ ।।**

गीतेचा अर्थ ऐकण्याची आवड असणारा मनुष्य महापापी असला तरीही तो वैकुंठाला जातो आणि भगवान विष्णूच्या सहवासाचा आनंद उपभोगतो.
खरे सांगायचे म्हणजे, गीतेचा अभ्यास करणारा मनुष्य हा पापी असूच शकत नाही.
हे विधान ' अगोदर पापकर्म करीत असलेल्या, पापकर्मामधे आकंठ बुडालेल्या ' माणसांच्या संदर्भामधे केलेले आहे.
काम आणि क्रोधाच्या आहारी गेल्यामुळे, समजत असूनही असे होत असते.
तिसऱ्या अध्यायामधे अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना भगवान श्रीकृष्णाने ह्याविषयी सविस्तर विवेचन केलेले आहे.
असे असले तरीही, कोणत्याही कारणाने का होईना, कधीतरी उपरती होऊन, ज्या क्षणी माणसाच्या मनामधे गीतेची आवड निर्माण होते, आपण गीता वाचावी, म्हणावी, तिचा अर्थ समजून घ्यावा अशी तीव्र इच्छा निर्माण होते,
तो त्याच्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा क्षण असतो. **सुवर्णक्षण** असतो.
आयुष्याला एक वेगळे वळण देणारा क्षण असतो. **( Turning Point )**

त्याला प्रवृत्तीमार्गावरून निवृत्तीमार्गावर नेणारा क्षण असतो. गीतार्थ ऐकून ऐकून त्याच्यामध्ये परिवर्तन घडून येते.
त्याची पापबुद्धी नाहीशी होते. केवळ स्वत:चाच विचार करायची वृत्ती कमी होऊन, तो इतरांचा विचार करायला लागतो.
इतरांना त्रास देणे थांबवतो. आपपरभाव बाजूला सारून, सर्वांना मदत करायला लागतो. सन्मार्गावर चालायला लागतो. ती त्याची सहज प्रवृत्ती बनते.

**गीतार्थं ध्यायते नित्यं कृत्वा कर्माणि भूरिशः ।**
**जीवन्मुक्तः स विज्ञेयः देहान्ते परमं पदम् ।। १७ ।।**

कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, केवळ आपले कर्तव्य म्हणून, सर्व कर्मे उत्तम प्रकारे करीत असलेला मनुष्य म्हणजे **निष्काम कर्मयोगी.** तसे करू न शकणारा, नेहमी फळाची अपेक्षा बाळगून सकाम कर्मेच करणारा असा मनुष्य जर गीतेचे आणि तिच्या अर्थाचे नित्य ध्यान करायला लागला, तर त्याच्या विचारांमधे आणि आचारामधे आमूलाग्र परिवर्तन घडून येते आणि कालांतराने तो हळूहळू, कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता, केवळ कर्तव्य म्हणून सर्व कर्मे करायला लागतो.
त्याला कोणाकडूनही काहीही नको असते. त्यामुळे तो सदैव मुक्तच असतो.
शरीराने जिवंत असला आणि सगळी कर्मे करीत असला तरीही त्याला जीवनमुक्तच समजले पाहिजे.
देहावसानानंतर तो परमपदालाच जातो.
यापुढील दोन श्लोक म्हणजे एक वाक्यच आहे.

**सर्वशास्त्रमयी गीता सर्वदेवमयो हरिः ।**
**सर्वतीर्थमयी गङ्गा सर्ववेदमयो मनुः ।। १८ ।।**

**गीतेमध्ये** सर्व शास्त्रांचे सार सामावलेले आहे. **भगवान् श्रीकृष्णामध्ये** सर्व देव सामावलेले आहेत.
**सुरनदी गंगेमध्ये** सर्व तीर्थे सामावलेली आहेत आणि राजर्षी **मनूच्या धर्मशास्त्रामध्ये** सर्व वेद समाविष्ट आहेत.
चारही वेदांमधे **ऋग्वेद** हा सर्वांत महत्त्वाचा आणि पहिला वेद आहे. आणि —
**गायत्री मंत्र** हा ऋग्वेदामधला अत्यंत महत्त्वाचा मंत्र आहे.

**गीता गङ्गा च गायत्री गोविन्देति हृदि स्थिते ।**
**चतुर्गकारसंयुक्ते पुनर्जन्म न विद्यते ।। १९ ।।**

**गीता** ह्या शब्दामधे पहिले अक्षर **ग** हे आहे. **गंगा** ह्या शब्दामधे पहिले अक्षर **ग** हे आहे.
**गायत्री** ह्या शब्दामधे पहिले अक्षर **ग** हे आहे. **गोविंद** ह्या शब्दामधे पहिले अक्षर **ग** हे आहे.
ह्या चारही शब्दांचे महत्त्व आणि माहात्म्य शब्दातीत आहे. आता जरा विचार करा,
**ग**काराने सुरवात होणाऱ्या, ह्या चारही परमपवित्र नांवांना सदैव हृदयामधे धारण करणारा, त्यांचेच भजन, पूजन, मनन, चिंतन करणारा आणि सदैव त्यांना अनुसरूनच आचरण करणारा मनुष्य कसा असेल बरे?
**तो अंतर्बाह्य शुद्धच असेल. पवित्रच असेल. वंदनीयच असेल.** त्याला जिवंतपणीच मोक्ष प्राप्त झालेला असेल.
कर्मविपाक प्रक्रियेनुसार येणारे मरण म्हणजे केवळ नश्वर शरीर पंचमहाभूतांमधे विसर्जित होण्याचा एक उपचार असेल.

**भारतामृतसर्वस्वम् विष्णोर्वक्राद्विनिःसृतम् ।**
**गीतागंगोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ।। २०।।**

सर्व वेदांमधून जो अर्थ प्राप्त होतो, तो सगळा अर्थ महाभारतामधे सापडतो आणि महाभारताच्या अठरा पर्वांमधे जो काही अभिप्राय आहे, तो सगळा अभिप्राय गीतेमधे सामावलेला आहे. म्हणूनच —
**' सर्व वेदांचे सार म्हणजे महाभारत आणि महाभारताचे सार म्हणजे गीता.'** अशी मान्यता आहे.
येथे गीतेला परमपवित्र अशा गंगाजलाची उपमा दिली आहे.
भगवान् विष्णूंच्या मुखामधून बाहेर पडलेले, महाभारताचे साररूप असलेले, असे हे गीतारूपी गंगोदक जो प्राशन करतो, म्हणजेच जो मनुष्य गीतेचे श्रद्धापूर्वक उच्चारण सतत करतो, त्याला परत जन्म येत नाही. **( मरणानंतर मोक्ष प्राप्त होतो. )**
नवव्या श्लोकापासून ते ह्या श्लोकापर्यंत गीता पठणाचे काय काय फळ मिळते ते सांगताना, प्रत्यक्ष अनुभव घेता येण्यासारख्या अनेक विधानांच्या बरोबरीने, प्रत्यक्ष अनुभवता न येणारी अशी पुढील विधाने केलेली आहेत.
१) मृत्यूनंतर भगवान विष्णूच्या चरणांची प्राप्ती होते. ( मोक्ष प्राप्त होतो. )
२) ह्या आणि मागील जन्मामध्ये घडलेल्या पापांच्या पासून मुक्ती मिळते.

३) ज्ञानसिद्धीचा लाभ होऊन परमपद प्राप्त होते.
४) **गीता** असा शब्द उच्चारून मरणाऱ्या मनुष्याला देखील सद्‌गती लाभते.
५) गीतेचे श्रद्धापूर्वक उच्चारण सतत करणाऱ्या मनुष्याला परत जन्म येत नाही.
ह्या विधानांचा अनुभव, आजपर्यंत कोणाला तरी आला असेल काय?
मला तरी ते शक्य वाटत नाही. त्यामागचे कारण उघड आहे. हे सगळे मृत्यूनंतर होणारे लाभ आहेत, असे सांगितलेले आहे.
जन्मानंतरची अवस्था म्हणजे व्यक्त अवस्था असते. अव्यक्ताचे व्यक्त होणे असते.
त्या काळामधे होणारे लाभ प्रत्यक्ष अनुभवता येतात. प्रत्यक्ष दिसतात. जाणवतात.
मृत्यूनंतरची अवस्था म्हणजे अव्यक्त अवस्था असते. व्यक्ताचे अव्यक्त होणे असते.
त्या काळामधील अनुभव कसे असतील देव जाणे. त्याविषयी आपण काय बोलणार?
त्यावर विश्वास ठेवणे अथवा न ठेवणे हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा भाग आहे.
असे असले तरीही गीता पठणाचे जे अनुभव आपण प्रत्यक्ष घेऊ शकतो, ते इतके उत्तम आहेत, इतके मोठे आहेत की,
त्यांच्या प्राप्तीसाठी तरी, श्रद्धापूर्वक गीतापठण करीत रहायला काहीच हरकत नाही.
ह्याच्यामागे शास्त्रकारांचा एक वेगळाच हेतू असावा असे मला वाटते.
सर्व साधारणपणे लहान मुलाला अभ्यासाची आवड नसते. मुळाक्षरे गिरवायची आणि पाढे शिकायची आवड नसते.
त्याला त्यासाठी तयार करावे लागते. अगोदर गोडीगुलाबीने समजावण्याचा प्रयत्न करणे हा एक मार्ग आहे.
त्याने नाही जमले तर मग, त्याला रागे भरणे, ओरडणे, फटके देणे आणि अभ्यास करायची सक्ती करणे हा दुसरा मार्ग आहे.
जर त्यानेही नाही जमले तर मग, कसलीतरी लालूच दाखविणे हा तिसरा मार्ग आहे.
‘ बाळा ऽऽ, तू मला एक ते शंभर आकडे न चुकता पाठ म्हणून दाखवलेस तर मी तुला मोठ्ठा खाऊ देईन.’ असे सांगितले म्हणजे मग बाळ अभ्यास करायला लागतो. पाटी घेऊन अक्षरे गिरवायला सुरवात करतो.
त्याला पाढे पाठ करायची आवड नसते. इच्छाही नसते. परंतु ‘ एक ते शंभर अंक पाठ केले तर मोठ्ठा खाऊ मिळेल.’ ह्या आकर्षणामुळे तो अभ्यासाला सुरवात करतो. मग हळूहळू त्याचे अंक पाठही होतात आणि त्याला खाऊही मिळतो.
त्याच्यासाठी **मोठ्ठा खाऊ मिळणे** हे, अंक पाठ करण्याचे **फळ** असते.
हा मानवी स्वभाव लक्षात घेऊन, बुद्धिमान शास्त्रकारांनी **‘ फलश्रुती ’** सांगायला सुरवात केली असावी.
जवळजवळ सर्व स्तोत्रांचा उत्तरार्ध म्हणजे फलश्रुतीच असते.
‘ कोणतेही स्तोत्र रोजच्यारोज का म्हणायचे? कशाला पाठ करायचे? त्याचा काय उपयोग आहे? काय फायदा आहे?’
ह्या प्रश्नांचे उत्तर त्यामधे दिलेले असते.
उदाहरण म्हणून आपण सुप्रसिद्ध **श्रीगणपती अथर्वशीर्षाचा** विचार करूया.
ह्यामधील पहिले दहा श्लोक म्हणजे स्तोत्र असून त्यापुढील चार श्लोक म्हणजे फलश्रुती आहे.
त्यामधील पुढील ओळी आणि त्यांचा अर्थ ऐका.

**सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।**
**प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।**
**सायंप्रातः प्रयुंजानोऽ अपापो भवति ।**

अर्थ — सायंकाळी पठण करणाऱ्याची दिवसा केलेली पापे नाश पावतात. सकाळी पठण करणाऱ्याची रात्री केलेली पापे नाश पावतात. सकाळी आणि संध्याकाळी पठण करणारा निष्पाप होतो.
आता जरा विचार करा. खरोखर असे होणे शक्य आहे काय? मुळीच नाही.
माणसाने केलेले पाप अथवा पुण्य, मग ते कधीही केलेले असो, त्याला फळ दिल्याशिवाय कधीही नाश पावत नाही.
कोणत्याही स्तोत्राचे पठण, अगदी गीतापठणही त्यामधे हस्तक्षेप करू शकत नाही. बदल करू शकत नाही.
‘ परमेश्वर लोकांचे कर्तृत्व, त्यांची कर्मे व कर्मफले निर्माण करीत नाही. तसेच सर्वव्यापी परमात्मा कोणाचेही पाप किंवा पुण्यही ग्रहण करीत नाही.’ असे स्वत: परमेश्वरानेच, पाचव्या अध्यायामधे स्पष्टपणे सांगितलेले आहे.
ज्ञानावर अज्ञानाचे पांघरूण पडलेले असल्यामुळे मायेने प्राणी मोह पावतात आणि आपापल्या स्वभावानुसार बरी वाईट कर्मे करायला प्रवृत्त होतात. प्रत्येकाला त्याने केलेल्या बऱ्यावाईट कर्माचे फळ भोगावेच लागते. त्यामधून कोणाचीही सुटका नाही. हेच सत्य आहे.
हे जे सांगितलेले आहे ते म्हणजे, जर श्रीगणपती अथर्वशीर्षाचे नियमीतपणे पठण केलेत, तर तुम्हाला **‘ मोठ्ठा खाऊ मिळेल ’** असे

सांगण्यासारखे आहे. त्या आकर्षणामुळे का होईना, स्तोत्रपठण करायची बुद्धी व्हावी हा हेतू आहे.
तशी बुद्धी झाली म्हणजे मग, हळूहळू माणसाच्या मन, बुद्धी, विचार, आचार इत्यादींच्यामधे सकारात्मक बदल व्हायला लागतो आणि तो सत्कर्म करायला प्रवृत्त होतो. त्याची सन्मार्गाकडे वळायची शक्यता निर्माण होते. असो.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।**
**पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धम् गीतामृतम् महत् ॥ २१ ॥**

ह्या श्लोकामधे गीतेच्या माहात्म्याचे, उपमा अलंकाराचा वापर करून, उत्तम प्रकारे, यथार्थ वर्णन केलेले आहे.
अचूक वर्णन केलेले आहे. ज्याने कोणी हा समर्पक श्लोक रचला असेल त्याला माझा नमस्कार!
**सर्वोपनिषदो गावो** — सगळी उपनिषदे म्हणजे गायी आहेत.
**दोग्धा गोपालनन्दनः** — भगवान् श्रीकृष्ण हा त्या गायींचे दूध काढणारा दोग्धा म्हणजे गवळी आहे.
**पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता** — बुद्धिमान अर्जुन म्हणजे, त्या गायींना पान्हा आणणारे असे वत्स म्हणजे वासरू आहे.
आणि अशा तीनही अपूर्व गोष्टी एकत्र आल्यावर, त्यानंतर —
**दुग्धम् गीतामृतम् महत्** — जे दूध काढले, ते म्हणजेच **गीतारूपी अमृत** होय.
वेदांमधे अपौरुषेय वाणीने सांगितलेले गूढ ज्ञान सोपे करून सांगण्यासाठी उपनिषदांची निर्मिती झालेली आहे.
त्याच हेतूने उपनिषदांमधे वेगवेगळ्या कथा सांगण्यात आलेल्या आहेत. म्हणूनच उपनिषदांना **वेदांत** असेही म्हणतात.
अशा त्या सर्व उपनिषदांचा सारांश गीतेमधे सांगितलेला आहे. म्हणजेच गीता म्हणजे वेदांताचाही वेदांत आहे.
उपनिषदांचेही उपनिषद आहे. त्यामुळे तिला **उपनिषदांत** असेही म्हणता येईल, असे मला मनापासून वाटते.

**एकम् शास्त्रम् देवकीपुत्रगीतम्**
**एको देवो देवकीपुत्र एव ।**
**एको मंत्रस्तस्य नामानि यानि**
**कर्माप्येकम् तस्य देवस्य सेवा ॥ २२ ॥**

देवकीचा पुत्र असलेल्या श्रीकृष्णाने गायलेली म्हणजे सांगितलेली गीता म्हणजे,
‘ माणसाने आपले आयुष्य कसे जगावे?’ ते सांगणारे एकमेव शास्त्र आहे.
देवकीचा पुत्र असलेला श्रीकृष्ण हाच एकमेव देव आहे. बाकीचे सगळे देव म्हणजे त्याचीच रूपे आहेत.
म्हणूनच तो **परमेश्वराचा पूर्णावतार** मानला गेला आहे.
त्याचे नांव हेच एखाद्या मंत्रासारखे आहे. त्याच्या नांवाचा सतत उच्चार करणे म्हणजे मंत्राचा उच्चार करण्यासारखेच आहे.
म्हणून स्वधर्माला अनुसरून आपले जे कर्तव्य आहे, ते मनापासून पार पाडून, आपले प्रत्येक काम, कोणत्याही फळाची आशा न बाळगता, उत्तम प्रकारे पार पाडून, त्याद्वारे भगवान श्रीकृष्णाची सेवा करावी.
आपल्या कर्मरूपी फुलांनीच त्याची पूजा करीत असताना ती फुले स्वच्छ, ताजी आणि सुगंधित असतील ह्याची काळजी घेतली म्हणजे झाले. तसे झाले म्हणजे आपल्यावर त्याची कृपादृष्टी राहीलच.

**शान्ताकारम् भुजगशयनम् पद्मनाभम् सुरेशम्**
**विश्वाधारम् गगनसदृशम् मेघवर्णम् शुभाङ्गम ।**
**लक्ष्मीकान्तम् कमलनयनम् योगिभिर्ध्यानगम्यम्**
**वंदे विष्णुम् भवभयहरम् सर्वलोकैकनाथम् ॥ २३ ॥**

ह्या श्लोकामधे भगवान विष्णूचे फार सुंदर वर्णन केलेले असून त्याला मनोभावे नमस्कार करायला सुचविले आहे.
वर्णन करतांना कोणकोणते शब्द वापरले आहेत ते ऐका आणि त्यांचा अर्थ समजून घ्या.
**शान्ताकारम्** — ज्याचे स्वरूप अतिशय शांत आहे, पाहणाऱ्याला अंतर्बाह्य शांतीचा अनुभव देणारे आहे.
**भुजगशयनम्** — ज्याने शेष नागाच्या शय्येवर शयन केले आहे. **पद्मनाभम्** — ज्याच्या नाभीमधून कमळ बाहेर आलेले आहे.
**सुरेशम्** — सुर म्हणजे देव. जो सर्व देवांचाही देव आहे. ईश्वर आहे.
**विश्वाधारम्** — जो सर्व जगताचा मूलाधार आहे. **गगनसदृशम्** — जो आकाशाप्रमाणे सर्वव्यापी आहे.
**मेघवर्णम्** — ज्याचा वर्ण मेघाप्रमाणे सावळा आहे. **शुभाङ्गम** — ज्याचे सर्वांग शुभलक्षणांनी युक्त आहे, अतिशय सुंदर आहे.
**लक्ष्मीकान्तम्** — जो देवी लक्ष्मीचा पती आहे.

**कमलनयनम्** — ज्याचे नेत्र कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे, अत्यंत आकर्षक आहेत.
**योगिभिर्ध्यानगम्यम्** — जो योगीजनांच्याकडून ध्यानाद्वारे प्राप्त करून घेतला जातो.
**भवभयहरम्** — जो मनुष्याच्या जन्ममरणाच्या चक्राविषयीच्या भयाचा नाश करणारा आहे.
**सर्वलोकैकनाथम्** — जो तीनही लोकांचा एकमेव स्वामी आहे. **(One & Only)**
अशा त्या भगवान विष्णूला मी नमस्कार करतो.

**आकाशात् पतितम् तोयम् यथा गच्छति सागरम् ।**
**सर्व देवम् नमस्कारम् केशवम् प्रति गच्छति ।। २४ ।।**

ज्याप्रमाणे आकाशातून धरणीवर पडलेले पाणी, कुठेही पडले तरीही, अखेरीस सागरालाच जाऊन मिळते त्याप्रमाणे —
आपण केलेला नमस्कार, मग तो कोणत्याही देवदेवतांना केलेला असला तरीही, भगवान विष्णूलाच जाऊन पोहोचतो.
कारण सगळे देव देवता म्हणजे त्याचीच रूपे आहेत.
यापुढील श्लोक हा गीता माहात्म्याचा अखेरचा श्लोक असून त्यामधे भगवान नारायणाचे माहात्म्य सांगितले असून त्याला नमस्कार करायला सुचविले आहे.

**यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै**
**वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।**
**ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो**
**यस्यान्तम् न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ।। २५।।**

ब्रह्मदेव, वरुणदेव, इंद्रदेव, रुद्रगण आणि मरुद्गण हे सर्व, दिव्य स्तोत्रांनी ज्याचे स्तवन करीत असतात, स्तुती करीत असतात, सामवेदाचे गायक अंग, पद, क्रम इत्यादींचे यथायोग्य पालन करून, वेद आणि उपनिषदे यांच्या सहाय्याने ज्याचे गुणगान करीत असतात, योगीजन ध्यानस्थ होऊन आपल्या अंतःकरणामधेच ज्याला पाहतात आणि विद्वान, ज्ञानवान अशा ऋषिमुनींना, देवांना, दानवांना किंवा इतर कुणालाही ज्याचा पार लागत नाही, आदि, मध्य व अंत समजू शकत नाही,
अशा त्या परमपुरुष नारायणदेवाला माझा नमस्कार असो.

**।। हरये नमः । हरये नमः । हरये नमः ।।**

येथे परमेश्वराला त्रिवार वंदन करायला सुचविलेले आहे.
जर गीतापठणापूर्वी गीतामाहात्म्य म्हणत असाल तर, ह्यानंतर काही काळ स्तब्धपणे बसून भगवान श्रीकृष्णाचे स्मरण, चिंतन, मनन करावे. त्याला मनापासून वंदन करावे आणि मग श्रीमद्‌भगवद्‌गीता म्हणायला सुरवात करावी.
जर गीतापठणानंतर गीतामाहात्म्य म्हणत असाल तर, ह्यानंतर काही काळ स्तब्धपणे बसून भगवान श्रीकृष्णाचे स्मरण, चिंतन, मनन करावे. त्याला मनापासून वंदन करावे आणि मग जागेवरून उठावे.
**गीता ही आपली माता आहे. मार्गदर्शक आहे. आपली गुरू आहे.**
म्हणून ती पूर्णपणे लक्ष देऊन, मनापासून आणि अत्यंत आदराने म्हणावी.
आवाज खणखणीत असावा. स्वर योग्य असावा. शब्दोच्चार स्पष्ट, स्वच्छ आणि शुद्ध असावेत.
श्वास - प्रश्वासाची क्रिया योग्य जागी करावी. वाटेल तेथे शब्द तोडू नयेत. सर्व श्लोक त्यांचा अर्थ समजून घेऊनच म्हणावेत.
गीतेमधे जेथे जेथे **' श्रीभगवानुवाच - '** हा शब्द येतो, तो उच्चारताना हात जोडून आदरपूर्वक नमस्कार करावा.
तसेच अर्जुनाच्या श्लोकांमधे अनेक वेळा नमस्कारवाचक शब्द आलेले आहेत.
ते शब्द उच्चारतानाही हात जोडून आदरपूर्वक नमस्कार करावा.
एकदा सुरू केलेला कोणताही अध्याय पूर्ण म्हणावा. अर्धवट म्हणू नये. आणि शेवटची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे —
गीता कधीही उलटी म्हणू नये. कोणताही अध्याय शेवटच्या श्लोकापासून पहिल्या श्लोकापर्यंत अशा क्रमाने म्हणू नये.
तसे करणे म्हणजे गीतेचा अवमान करण्यासारखे आहे. अपमान करण्यासारखे आहे.
गीतेच्या कारण आणि परिणाम ह्यांची विटंबना करण्यासारखे आहे.
आपल्या पठणशक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी असले नकोत ते उपद्व्याप करणारी मंडळी मी पाहिली आहेत.
लोक असे का करतात? प्रसिद्धी मिळवण्यासाठी भगवद्‌गीतेबरोबर खेळ का करतात? गीता उलटी का म्हणतात?
सातशे श्लोकांच्यापैकी कोणताही श्लोक, त्याचा क्रमांक सांगताच तात्काळ म्हणता आला तरी त्याचा उपयोग काय?
त्याने कोणता विशेष लाभ होईल? आणि आचरणाचे काय?

सगळी गीता पाठ करणे फार कठीण आहे हे निर्विवाद! मला ते अजूनही जमलेले नाही.
परंतु गीतेत सांगितल्याप्रमाणे आचरण करणे हे त्याहून कठीण आहे. महा कर्मकठीण आहे. लाखात एखाद्यालाच जमले तर जमेल.
मनात असेल तर त्या दिशेने प्रामाणिकपणे प्रयत्न करणे आपल्या हातात आहे. ते करायचे सोडून हे नकोत ते उद्योग का करायचे?
भगवान श्रीकृष्णाचा आणि त्याने सांगितलेल्या श्रीमद्भगवद्गीतेचा अपमान होईल, अवमान होईल अशी कोणतीही कृती, कायेने, वाचेने अथवा मनाने, कोणीही, कधीही, कुठेही करू नये. ते महापाप आहे. असो.
ह्या सर्व सूचनांचे पालन करून गीतापठण करणे अपेक्षित आहे.
पठण कोणत्या चालीमधे करायचे हा मुद्दा गौण आहे. हिंदुस्थानामधे गीतेच्या पंधरा चाली प्रचलीत आहेत आणि त्या अधिकृत आहेत. प्रत्येक प्रांताची चाल वेगळी आहे. त्यामुळे चाल महत्त्वाची नाही.
गीतापठण आणि उच्चारण योग्य प्रकारे होते आहे की नाही? हेच महत्त्वाचे आहे.
गीतेचा सतत अभ्यास करणे, पठण करणे, मनन करणे, चिंतन करणे, तिचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे आणि त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत राहणे हे महत्त्वाचे.
स्वतः श्रीकृष्ण भगवान आपला पाठिराखा आहे. त्यामुळे कधी ना कधीतरी यश येईलच हे नक्की.
गीतेचे आणखी एक वैशिष्ट्य सांगण्यासारखे आहे.
एकदा का एखाद्याने प्रामाणिकपणे श्रीमद्भगवद्गीता शिकायला सुरवात केली म्हणजे मग ती शिकणाऱ्याच्या मनाचा आणि बुद्धीचा ताबा घेते. त्याच्या मनामधे कायमचे वास्तव्य करते.
तो प्रत्यक्षपणे गीतापठण करीत नसला तरीही त्याच्या मनामधे गीतेचे पठण, मनन, चिंतन सतत चालत राहते.
ज्याप्रमाणे एखादी माता आपल्या लहानग्या बाळाची सतत काळजी घेत असते,
त्याप्रमाणेच गीता साधकाची सदैव साथ करते. त्याला एकटा राहूच देत नाही. सदैव त्याच्या बरोबर राहून त्याचे रक्षण करते.
आयुष्यामधे येणाऱ्या सर्व बऱ्यावाईट प्रसंगांना सामोरे जाण्याचे मानसिक सामर्थ्य देते. सर्व प्रकारे उत्कर्ष घडवून आणते.
त्याचा योगक्षेम चालवते. त्याची काळजी घेते. त्याचे कल्याण करते. असो.

**<u>येथे गीतामाहात्म्य पूर्ण झालेले आहे.</u>**

हा गीतामाहात्म्यरूपी प्रसाद भक्षण करून मी आनंदित झालो आहे. तृप्त झालो आहे.
आपणही सगळे तृप्त झाले असाल ह्याविषयी मला संशय नाही. असो.
आता आपण परत गीतामंदिराच्या प्रवेशद्वाराबाहेर जाणार आहोत.
आता अजून काय बोलायचे? काही बोलणे शक्य आहे काय?
मला काय बोलावे तेच कळत नाही.
तरीही ह्या प्रवचनमालेचा समारोप करावा लागणारच आहे.
यापुढील प्रवचन हे अखेरचे असेल. समारोपाचे असेल. त्यावेळी काही महत्त्वाचे मुद्दे सांगण्याचा प्रयत्न करीन.
बोलविता धनी जे सांगेल तेच बोलेन.
अस्तु !!!!!!!!!!!!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

## — समारोप —

## — हरि ॐ —

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**

**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ।। आदिम श्लोक ।।**

आतापर्यंत श्रीमद्‌भगवद्‌गीता ह्या विषयावर वीस प्रवचने झाली.

त्यांपैकी पहिले प्रवचन हे विषयप्रवेशाचे होते.

त्यामधे **' श्रीमद्‌भगवद्‌गीता '** म्हणजे काय आहे? तिचा अभ्यास कशासाठी करायचा? कसा आणि कधी करायचा? ह्याविषयी सविस्तर चर्चा करून झाली.

पुढे दुसऱ्या प्रवचनापासून ते एकोणिसाव्या प्रवचनापर्यंत, आपण गीतेच्या सर्व अठरा अध्यायांच्या विषयी सविस्तर चर्चा करून त्यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विसावे प्रवचन हे गीतामाहात्म्याचे होते. त्यामधे आपण सव्वीस श्लोकांच्या विषयी सविस्तर चर्चा करून त्यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला.

आजचे प्रवचन हे एकविसावे आहे आणि हे प्रवचन समारोपाचे आहे. आज आपल्याला ' गीताप्रवचन मालेचा ' समारोप करायचा आहे.

सुरवातीला आपण सगळे गीतामंदिराच्या बाहेर उभे होतो. नंतर आपण मंदिराचे प्रवेशद्वार उघडून आत प्रवेश केला.

देवाचे दर्शन घेतले, त्याचे अमोघ आणि रसाळ वक्तृत्व ऐकले.

अर्जुनाने विचारलेले प्रश्न आणि त्याने त्या प्रश्नांची दिलेली उत्तरे ऐकली.

त्या संभाषणाच्या ओघात आलेले विविध योगमार्गाचे विवेचन ऐकले. त्याचा अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न केला.

त्याच दरम्याने आपल्याला त्याच्या एकमेव अशा, अद्वितीय अशा, कल्पनातीत अशा विराट स्वरूपाच्या म्हणजेच विश्वरूपाच्या दर्शनाचा अलभ्य लाभही झाला.

अगोदर आपण अर्जुनाला झालेला विषाद पाहिला.

त्याला त्या अवस्थेमधून बाहेर काढण्यासाठी, भगवंतांनी केलेला उपदेश ऐकला आणि अखेरीस, अर्जुनाचा शोक नाहीसा होऊन, स्वजनांच्या विषयीचा मोह नाहीसा होऊन, तो परत युद्धाला तयार झाला, हे देखील पाहिले.

म्हणजेच आपल्याला, **' कारण, कार्य आणि परिणाम '** ह्या तीनही गोष्टी घडून आलेल्या पहायला मिळाल्या.

अशा प्रकारे देवदर्शन झाल्यावर आपण गीतामाहात्म्यरूपी गोड प्रसाद ग्रहण केला.

त्यामधे अर्जुन आणि श्रीकृष्ण भगवान ह्यांच्या मधे झालेल्या ह्या संभाषणाचे महत्त्व काय आहे, माहात्म्य काय आहे आणि पठणाचा लाभ काय आहे ते समजून घेतले.

आता आपण परत गीतामंदिराच्या प्रवेशद्वाराबाहेर येऊन उभे राहिलो आहोत. आता यापुढे काय बोलायचे?

माझी बुद्धी काम करीत नाहीशी झाली आहे. काय बोलावे तेच कळत नाही. शब्दच सुचत नाहीत. मी मंत्रमुग्ध झालो आहे.

मला मागील सर्व अध्यायांची, त्यांच्यामधे आलेल्या विषयांची आणि त्यावर आपण केलेल्या चर्चेची आठवण येते आहे.

त्या आठवणीत गुंतून जायला होते आहे. कमालीचा आनंद होतो आहे. आठवणीमधून बाहेर येऊच नये असे वाटते आहे.

काही काही गोष्टी अशा असतात की त्या पाहिल्यावर पाहणारा आश्चर्यचकित होतो. मंत्रमुग्ध होतो.

त्याला स्वत:चाही विसर पडतो आणि नकळतच तोंडात बोट घालून तीच गोष्ट परत परत पहायला लागतो.

तिचीच आठवण करायला लागतो. **आपण वेरूळची लेणी पाहिली आहेत काय?**

पाहिली नसतील तर औरंगाबादला जाऊन एकदा तरी सगळी लेणी जरूर पहा. ती सर्वच लेणी अप्रतिम आहेत. परंतु त्या लेण्यांमधे सोळाव्या क्रमांकाचे जे लेणे आहे, ते **' कैलास लेणे '** ह्या नांवानेच प्रसिद्ध असलेले, भगवान शंकराचे भव्य मंदीर आहे.

ते सर्व जगामधले असे एकमेव मंदीर आहे की जे —

**' एकाच पाषाणात कोरलेले, अखंड, जोडरहित आणि कळसापासून सुरवात करून पायापर्यंत घडविलेले '** आहे.

त्या मंदिराला युनेस्कोने **' जागतीक वारसा '** **( World Heritage.)** म्हणून मान्यता दिलेली आहे.

त्या एका मंदिराच्या निर्माणाला सुमारे शंभर वर्षे लागली आहेत. आपल्याला तेथे शिल्पकलेचे सर्व आविष्कार पहायला मिळतात.

**' शिल्पकलेची पूर्णावस्था '** म्हणजे काय ते, तेथे गेल्यावरच समजते.

मंदीर पाहून बाहेर आल्यावर, पाहणाऱ्याची काहीशी अशीच अवस्था होते.

मंत्रमुग्ध व्हायला होते. बुद्धी काम करेनाशी होते. काय बोलावे तेच कळत नाही.

एकूणच वेरूळच्या सर्व लेण्यांची निर्मिती हेच एक आश्चर्य म्हणावे लागेल.

त्या सर्व लेण्यांचे आरेखन कोणी केले असेल? **( Design )** नियोजन कोणी केले असेल? **( Planning )**
सर्व लेणी खोदण्यासाठी कोणकोणती हत्यारे वापरली असतील? **( Tools )**
खोदकाम करताना तोडून वेगळा केलेला सगळा दगड तेथून कसा हलवला असेल?
कोठे नेऊन टाकला असेल? त्याचे काय केले असेल? ह्या प्रश्नांची उत्तरे माहीत नाहीत.
पिढ्यानपिढ्या ते काम चालले आणि सुमारे चारशे वर्षांच्या काळामधे पूर्ण झाले.
म्हणजे पहिल्या पिढीतल्या लोकांनी जे करायचे ठरवले होते त्याचे पुढील एकोणीस पिढ्यांनी काटेकोरपणे पालन केले आणि त्यांचे एक अद्वितीय म्हणता येईल असे, भव्य - दिव्य असे स्वप्न साकार केले.
त्या लेण्यांची निर्मिती ज्यांनी केली त्या शिल्पकारांची नांवे कोणालाही माहीत नाहीत. त्यांच्यापैकी कोणाचेही नांव तेथे लिहिलेले नाही. ते अज्ञातच राहिले आहेत. पाहणाऱ्याला ते काय सांगतात माहीत आहे काय?
'' अरे ऽऽ, आमच्या नांवाशी तुला काय करायचे आहे? आम्ही जे काम करून ठेवले आहे ते पहा. शिल्पकलेचा आनंद घे. जर शक्य झाले तर तू स्वत: भव्यदिव्य असे काहीतरी करायचा प्रयत्न कर!''
त्या अद्वितीय अशा कैलास लेण्यामधे जाऊन उभे राहिल्यावर, अशी अप्रतीम निर्मिती करणाऱ्या त्या सर्व अज्ञात शिल्पकारांच्या तुलनेत आपण किती क्षुल्लक आहोत, नगण्य आहोत आणि आपला स्वत:विषयीचा अहंकार किती खोटा आहे,
ह्याची स्पष्ट जाणीव होते आणि आपण त्यांना मनोभावे नमस्कार करतो.
मग आपण स्वत:च्या नकळतच, तोंडात बोट घालून, समोरच्या चमत्काराकडे परत परत पहायला लागतो.
सहप्रवाशांच्या बरोबर, एक उपचार म्हणून काहीतरी बोलायला लागतो. खरे म्हणजे त्यावेळी मौन पाळणे हेच योग्य असते.
परंतु सतत बडबड करायची सवय असल्यामुळे आपण गप्प बसू शकत नाही.
भगवान श्रीकृष्णाने निर्माण केलेल्या ह्या गीतामंदिराच्या दर्शनानंतर आपली तशीच अवस्था होते. आपल्याला काहीच बोलता येत नाही आणि त्याच बरोबर काहीतरी बोलल्याशिवाय राहवतही नाही. म्हणून आपण जे सुचेल ते बोलायला लागतो. असो.
गेले अनेक दिवस आपण गीतारूपी आम्रवृक्षाच्या मधुर फळांचा आस्वाद घेतला.
पहिल्या प्रवचनापासून ते मागील विसाव्या प्रवचनापर्यंत आपण जी काही चर्चा केली ती चर्चा म्हणजे —
श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे **अंतरंग परीक्षण** होते.
कोणत्याही ग्रंथाचा अभ्यास करताना तो दोन प्रकारे केला जातो.
एखादा ग्रंथ संपूर्णपणे वाचून त्याचा अर्थ समजून घेणे. त्यामधे काय सांगितले आहे ते समजून घेणे. नंतर त्याविषयी इतर विद्वानांनी व्यक्त केलेले विचार समजून घेणे, त्या विचारांचा अभ्यास करून, त्यातील मर्म समजून घेणे, ग्रंथामधील रहस्यांचा उलगडा करायचा प्रयत्न करणे, त्यातील मतितार्थ काढणे आणि तो जनसामान्यांच्यापुढे, त्यांना समजेल अशा शब्दात मांडणे, हा पहिला प्रकार.
त्याला ग्रंथाचे **अंतरंग परीक्षण** करणे असे म्हणतात.
एखादा ग्रंथ संपूर्णपणे वाचून त्याचा अर्थ समजून घेणे. नंतर त्या ग्रंथाच्या बाह्य स्वरूपाचा सखोल अभ्यास करणे.
' ग्रंथाचा कर्ता कोण? ग्रंथ कोठे निर्माण झाला? कधी निर्माण झाला? ग्रंथाची भाषा कशी आहे? शब्दरचना कशी आहे?
त्यामधील विचार हे स्वतंत्र आहेत की दुसऱ्या कोणापासून घेतलेले आहेत? घेतलेले असल्यास कोणते विचार, कोणाकडून घेतलेले असू शकतील? त्या ग्रंथाचा काळ कोणता असावा? त्या काळामधील समाजाची एकूण स्थिती कशी होती? ते जाणून घ्यायला ग्रंथाची मदत होऊ शकते काय?' इत्यादी गोष्टींचा सखोल विचार करणे, त्यातील मतितार्थ काढणे आणि तो जनसामान्यांच्यापुढे, त्यांना समजेल अशा शब्दात मांडणे, हा दुसरा प्रकार.
त्याला ग्रंथाचे **बहिरंग परीक्षण** करणे असे म्हणतात.
तशा परीक्षणाचा, ग्रंथाच्या मूळ हेतूशी काही संबंध असेलच असे निश्चितपणे सांगता येत नाही.
तसेच त्या परीक्षणाचा, ग्रंथाच्या जनमानसावरील प्रभावावर कोणताही परिणाम होऊ शकत नाही.
अनेक विद्वान लोक तर अशा परीक्षणाला अनावश्यक अथवा दुय्यम मानतात. तरीही, एका मर्यादेपर्यंत तेही महत्त्वाचे आहे.
आवश्यक आहे. कोणत्याही ग्रंथाचा अशा प्रकारानेही अभ्यास झाला पाहिजे.
त्यामुळे ग्रंथाविषयी बरीच महत्त्वाची माहिती उजेडात येऊ शकते.
अनेक नवीन सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक संदर्भ मिळू शकतात.
कालनिर्णयाविषयी काही अंदाज तरी करता येऊ शकतो. असो.
तसा अभ्यास करण्याची माझी पात्रता नाही हे मला माहीत आहे. तरीही —
**श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा** अभ्यास करताना माझ्या मनामधे काही प्रश्न नेहमीच येतात.

मी त्यांची उत्तरे शोधायचा पुष्कळ प्रयत्न केला. पण अजूनपर्यंत समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत.
केवळ माहितीसाठी म्हणून ते प्रश्न आपल्याला सांगतो.

१) रणांगणावर दोन्ही बाजूंची सैन्ये युद्धासाठी सज्ज झालेली असताना, दोन्ही बाजूंनी शंखनाद करून झालेले असताना, अत्यंत अटीतटीच्या प्रसंगी, अठरा अध्यायांची गीता सांगायला श्रीकृष्णाला आणि ती ऐकायला अर्जुनाला, सुमारे दोन तासांचा वेळ कसा मिळाला? त्या वेळामधे इतर सर्व सैन्य काय करीत होते?

२) दोन्ही सैन्यांमधील, विशेषत: पांडवांच्यामधील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ योध्यांच्यापैकी एकालाही, अर्जुनाच्या रथाजवळ जाऊन, त्या दोघांचे काय चालले आहे त्याविषयी विचारपूस करावी असे का वाटले नाही?

३) गीतेच्या पहिल्या अध्यायाला **अर्जुनविषादयोग** असे नांव का दिले आहे?
अर्जुनाने दोन्ही सैन्यांच्यामधे उभे राहून निरीक्षण केल्यावर,
‘ दोन्ही सैन्यांमधे आपलेच बांधव असून, त्यांना मारले असता आपल्याच कुलाचा विध्वंस होईल!’ हे प्रत्यक्ष डोळयांनी पाहिल्यावर आणि मनाला त्या पातकाचे विपरीत परिणाम जाणवल्यावर अर्जुनाला अपरंपार दु:ख झाले. विषाद झाला. त्याने शस्त्रत्याग करून युद्ध न करण्याचा निश्चय केला. अर्जुनाकडून पराकोटीचे दु:ख होण्याचे कर्म घडले. त्यामधे कसलेही **कौशल्य** नव्हते. **समत्वबुद्धी** नव्हती. आपले विहित कर्म करीत राहण्याचा हेतू नव्हता. त्यामधे केवळ स्वजनांच्याविषयीची आसक्ती होती.
मग त्याच्या त्या कृतीला **योग** का म्हणायचे?

४) दुसऱ्या अध्यायामधे अविनाशी आत्मतत्त्वाचे फार सुंदर वर्णन केलेले आहे. ( श्लोक १९ ते ३० ) ते वाचत असताना आपल्या डोळयापुढे, आत्म्याचे कल्पनाचित्र उभे राहते. आत्मतत्त्व कसे असेल ह्याची साधारण कल्पनाही येते. त्याचे वर्णन करताना अनेक विशेषणे वापरलेली आहेत. परंतु **आत्मा** हा शब्द एकदाही वापरलेला नाही? त्यामागचे कारण काय असू शकेल?

५) गीतेमधे संन्यास, यज्ञ, द्वंद्वातीत वृत्ती, कामक्रोधाचे नियमन, आदर्श मानव, विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय इत्यादी विषय परत परत का सांगितले आहेत?

६) युद्ध करण्यास नकार देणाऱ्या अर्जुनाला परत युद्धाला प्रवृत्त करण्यासाठी गीता सांगितली आहे. मग वैराग्यपर शब्दांची, गुणांची आणि विचारांची चर्चा वारंवार का होते?

७) गीतेची परिभाषा एकसारखी नाही. सर्वसाधारणपणे कोणताही माणूस एखाद्या विषयावर बोलत असला म्हणजे त्याची बोलीभाषा आणि भाषाशैली एकाच प्रकारची असते.
अशिक्षित माणूस, सुशिक्षित माणूस, विद्वान माणूस, कविमनाचा माणूस, गावंढळ माणूस, धूर्त माणूस, राजकारणी माणूस, कारस्थानी माणूस, प्रेमळ माणूस, हे सगळे जरी एकच भाषा बोलत असले तरीही प्रत्येकाची बोलायची पद्धत आणि शब्दरचना स्वतंत्र असते आणि एकसारखीच असते. ती इतरांच्या सारखी नसते. तसे गीतेत दिसत नाही. चर्चा सुरू असताना अचानकपणे मधेच ती विवरणाची भाषा बदलते. असे का होते?

८) ईश्वराचा उल्लेख काही अध्यायांमधे जवळजवळ सर्व ठिकाणी प्रथमपुरुषी आहे. तर काही अध्यायांमधे जवळजवळ सर्व ठिकाणी तृतीयपुरुषी आहे. असे का?

९) प्रत्यक्ष रणांगणावर गीतेतले किती श्लोक सांगितले गेले असतील?

१०) व्यासमुनींनी जय नांवाच्या इतिहासाची रचना केल्यानंतर, पुढील काळामधे त्यामधे भर पडत गेली आणि ते महाभारत झाले. गीतेमधेही तशीच भर पडत गेली कां?

११) संपूर्ण गीतेमधून निष्पन्न होणारा अंतीम संदेश नक्की कोणता?

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा मी बराच प्रयत्न केला. बरेच वाचन केले. बऱ्याच अभ्यासकांच्या बरोबर चर्चा केल्या.
त्यांना शंका विचारल्या. परंतु निश्चित अशी उत्तरे मिळालीच नाहीत. उदाहरणादाखल एक प्रश्न विचारात घेऊया.
**गीतेचा अंतिम संदेश कोणता आहे?** ह्या प्रश्नाविषयी कोणी कोणी काय काय सांगितले आहे ते ऐका.
एका गीतेचाच आधार घेऊन ——

**श्रीमद्आद्यशंकराचार्यांनी** अद्वैतवादाचे व ज्ञानयोगाचे किंवा संन्यासयोगाचे प्रतिपादन केले आहे. मोक्षप्राप्तीसाठी कर्मसंन्यास करणे अत्यावश्यक आहे असे सांगितले आहे.

**श्रीरामानुजाचार्यांनी** विशिष्टाद्वैतवादी भक्तियोगाचे प्रतिपादन केले आहे.

**श्रीमध्वाचार्यांनी** द्वैतवादी भक्तियोगाचे प्रतिपादन केले आहे.

**श्रीवल्लभाचार्यांनी** शुद्धाद्वैतवादी भक्तियोगाचे प्रतिपादन केले आहे.

**श्रीनिंबार्काचार्यांनी** द्वैताद्वैतवादी भक्तियोगाचे प्रतिपादन केले आहे.

**श्रीज्ञानेश्वरांनी** भक्तियोगाचे, कर्मयोगाचे आणि त्याहीपेक्षा राजयोगाचे म्हणजेच पातंजलयोगाचे प्रतिपादन केले आहे.

**लोकमान्य टिळकांनी** कर्मयोगाचे प्रतिपादन केले आहे.

**पंडीत सातवळेकरांनी** पुरुषार्थयोगाचे प्रतिपादन केले आहे.

**योगी अरविंदांनी** आणि **महात्मा गांधींनी** अनासक्तियोगाचे प्रतिपादन केले आहे.

साम्यवादी नेते **श्री. श्रीपाद अमृत डांगे** यांनी साम्यवादाचे **( Communism )** प्रतिपादन केले आहे.

ह्याव्यतिरिक्त अनेक पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारवंतानी स्वतंत्र ग्रंथ अथवा सविस्तर लेख लिहून आपापल्या विविध मतांचे प्रतिपादन केले आहे. ते वाचताना, आपल्याला प्रत्येकाचे प्रतिपादन मनोमन पटते, योग्य वाटते आणि गीतेमधे हेच सांगितले असावे किंवा हे पण सांगितले असावे असे वाटायला लागते.

कित्येक विचारवंतानी गीता म्हणजे ' ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि राजयोग ह्या चारही मार्गांचा सुरेख समन्वय साधणारा ग्रंथ आहे.' असे सांगितले आहे.

' ह्या जगामधे आयुष्य योग्य प्रकारे जगण्यासाठी आणि त्यानंतर मोक्ष साधण्यासाठी ज्याला जे हवे असेल ते त्याने घ्यावे, जो मार्ग आवडेल तो अनुसरावा,' असे मत मांडले आहे.

ह्या उलट कित्येक विचारवंतांनी, ' गीतेतील ब्रह्मविद्या वरवर सुलभ दिसली तरी तिचे खरे मर्म अत्यंत गूढ आहे आणि ते समजणे जवळजवळ अशक्य आहे. एखाद्या श्रीकृष्णाच्या किंवा महर्षी व्यासमुनींच्या तोडीचा गुरू भेटला तर त्या सद्‌गुरुच्या मुखातूनच कदाचित् समजू शकेल,' असे मत मांडले आहे.

ह्या सर्वांचे सांगणे मला नाकारता येत नाही. परंतु त्यांच्यामधेच एकमत होत नाही त्यामुळे स्वीकारताही येत नाही.

परिणामी माझा गोंधळ होतो. ह्या विषयी मला काय वाटते ते तुम्हाला सांगू काय?

गीतेमधे हे सगळे योग सविस्तरपणे सांगितलेले आहेत. त्यांचे महत्त्व सांगितलेले आहे.

परंतु गीता ही एखाद्या शोभादर्शक यंत्रासारखी आहे. **( Kaleidoscope )**

पाहणारा जसे पाहील त्याप्रमाणे शोभादर्शक यंत्रामधील दृष्य बदलते.

त्यामुळे दृष्य सारखे बदलत असते आणि त्या त्या वेळी तेच खरे वाटते.

आपल्याला **' हत्ती आणि सात आंधळे '** ही गोष्ट माहीत असेलच.

त्यांच्यापैकी प्रत्येक जण हत्तीला स्पर्श करून, आपापल्या समजुती प्रमाणे अर्थ लावतो. हत्ती कसा आहे ते सांगायचा प्रयत्न करतो. परंतु, हत्ती खरोखर कसा आहे ते कोणालाही समजत नाही. तरीही ते आपापसात वाद घालीत बसतात. येथेही तशीच गोष्ट आहे. गीता ही इतकी मोठी आहे, इतकी महान आहे, इतकी सर्वव्यापी आहे, इतकी सर्वसमावेशक आहे की ती अर्थाच्या दृष्टीने पूर्णपणे आवाक्यात येणे फार कठीण आहे. कोणीही काहीही सांगितले तरी, ' तो त्याला काय वाटते तेच सांगत असतो.' आणि

' गीतेचा अंतिम संदेश तोच आहे ' अशा समजुतीने प्रतिपादन करीत राहतो.

शोकग्रस्त झालेल्या अर्जुनाला युद्ध करण्यासाठी परत उभा करणे हाच श्रीकृष्णाचा हेतू असल्यामुळे त्याने कर्मयोगावर भर दिला आहे.

जर परिस्थिती वेगळी असती, व्यक्ती वेगळी असती आणि हेतू वेगळा असता, तर?

जर रणभूमीवर दुर्योधनाला गीता सांगायची वेळ आली असती तर?

म्हणजे असे समजा की, ' युद्धासाठी अत्यंत उतावीळ झालेल्या, पांडवांचा सर्वनाश करायचा निश्चय केलेल्या आणि त्यासाठी काहीही करायला सिद्ध असलेल्या, अकरा अक्षौहिणी चतुरंग सेनेसह कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर उभा राहिलेल्या, अशा पापी दुर्योधनाला युद्धापासून परावृत्त करणे हा श्रीकृष्णाचा हेतू असता' तर?

तर कदाचित श्रीकृष्णाने गीतोपदेश करताना त्या **' परिस्थिती, व्यक्ती आणि हेतूला '** अनुसरून इतर कोणत्यातरी योगमार्गावर भर दिला असता.

तात्पर्य काय तर, ' गीतेमधे सांगितलेल्या सर्व योगमार्गांच्यापैकी आपल्याला जो मार्ग पटेल, रुचेल आणि आचरणात आणणे शक्य होईल, तो मार्ग प्राप्त परिस्थितीनुसार आपल्या जीवनामधे आचरणात आणायचा सतत प्रयत्न करीत रहायचे आणि आपला आध्यात्मिक उत्कर्ष साधायचा. मोक्ष मार्गावर वाटचाल करीत रहायचे. कधी ना कधी मुक्कामाला पोहोचता येईल ह्याविषयी खात्री बाळगायची.'

आपल्याला हे आणि हेच करता येण्यासारखे आहे. वादविवाद करून फारसा उपयोग होणार नाही. असो.

श्रीकृष्णाने सांगितलेल्या **' मूळ गीतेमधे किती श्लोक होते? '** ह्याविषयी देखिल अनेक मत प्रवाह आहेत.

पण ते सगळे अंदाज केलेले आहेत. कोणताही निश्चित निर्णय केलेला नाही.

१) मूळ जय नांवाच्या इतिहासामधे गीता नव्हतीच. कारण इतके गहन असे ज्ञान, इतक्या अटीतटीच्या प्रसंगी, रणभूमीवर सांगण्याचे काहीच कारण नव्हते. तितका वेळ मिळणेही शक्य नव्हते. फार फार तर काही महत्त्वाच्या मुद्यांवर थोडक्यात चर्चा करून अर्जुनाची समजूत काढून श्रीकृष्णाने त्याला युद्धासाठी परत उभा केला असेल.

गीतेसारखा अद्वितीय ग्रंथ महाभारतामधे, काही विशेष हेतूने, नंतरच्या काळामधे समाविष्ट करण्यात आला असावा असे वाटते.

२) व्यासमुनींनी जय नांवाच्या इतिहासाची रचना केली. त्यावेळी ती पंचवीस हजार श्लोकांची होती. त्यापुढील काळामधे त्यामधे पंचाहत्तर हजार म्हणजे तिप्पट श्लोकांची भर पडली आणि आजचे लक्ष श्लोकी महाभारत निर्माण झाले.

गीता ही महाभारतामधे पहिल्यापासून होती. परंतु त्यावेळी तिच्या श्लोकांची संख्या एकशे पंचाहत्तर असावी. नंतरच्या काळामधे तीमधेही पाचशे पंचवीस म्हणजे तिप्पट श्लोकांची भर पडली असेल आणि ती आजची सातशे श्लोकांची गीता झाली असावी असे वाटते.

३) मूळची गीता ही सहा अध्यायांची असावी आणि तीमधे अंदाजे १२६ श्लोक असावेत.

तत्कालीन समाजाला संन्यासमार्गापासून परावृत्त करण्याच्या हेतूने तीमधे फक्त कर्मयोगच सांगितलेला होता. ही मुनिवर व्यासांची निर्मिती असावी. ते गीतेचे पहिले लेखक असावेत. ही गीतेची पहिली अवस्था म्हणता येईल.

नंतर सुमारे शंभर वर्षांचा काळ गेल्यावर, त्यावेळची सामाजिक गरज म्हणून नवीन सहा अध्यायांची भर घातली गेली.

त्यामधे, मानवी आचाराची सात्त्विक, राजस आणि तामस अशी वर्गवारी, तत्त्वज्ञान आणि विधियुक्त आचरण इत्यादींच्या विषयीची माहिती म्हणजेच ज्ञानयोग सांगितला.

ह्यावेळी गीता बारा अध्यायांची आणि अंदाजे २४० श्लोकांची झाली असावी. त्यामुळे लोकांच्यामधे गीतेचा प्रसार वाढला असावा. ह्या विस्ताराचा निर्माता कोण होता ते माहीत नाही. पण तो गीतेचा दुसरा लेखक असावा. ही गीतेची दुसरी अवस्था म्हणता येईल.

त्यानंतर सुमारे तीनशे वर्षांचा काळ गेल्यावर ‘ गीता ही केवळ ज्ञानी, योगी आणि संन्यासीजनांच्यापुरती मर्यादित न राहता सर्वसामान्य माणसांनाही आवडावी, रुचावी, पटावी, उपयुक्त व्हावी ’ ह्या हेतूने पूर्वीच्या बारा अध्यायांची पुर्नरचना करण्यात आली असावी. त्यांमधे नवीन श्लोक जोडले गेले असावेत आणि त्याद्वारे विविध मतांचे प्रतिपादन करण्यासाठी सुयोग्य असे विशेष वळण देण्यात आले असावे. त्याशिवाय नवीन सहा अध्यायांची भरही घातली गेली असावी. त्यामधे सगुणभक्ती, विभूतिपूजा, अवतार आणि विशेषरूप, मूर्तीपूजा इत्यादींच्या विषयीची माहिती म्हणजेच भक्तियोग सांगितला असावा.

ह्यावेळी गीता अठरा अध्यायांची आणि ७०० श्लोकांची झाली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते तिसरे सहा अध्याय बारा अध्यायांच्या नंतर म्हणजे शेवटी न जोडता पहिल्या सहा आणि दुसऱ्या सहा अध्यायांच्या मधे जोडले गेले असावेत.

तसे करण्यामागे, ‘ वेदांती, सगुणभक्ती, निर्गुणभक्ती आणि एकूणच भक्तिमार्ग हा गीतेमधे मूळचाच असून अठरा अध्यायी गीतेचा एक सलग प्रवाह चाललेला आहे असेच वाटावे ’ हा हेतू असावा.

त्याच हेतूने धृतराष्ट्र, संजय, अर्जुन आणि श्रीकृष्णाचे संभाषणात्मक श्लोकही ह्याच वेळी जोडले गेले असावेत.

ह्या विस्ताराचा निर्माता कोण होता ते माहीत नाही. पण तो गीतेचा तिसरा लेखक असावा.

ही गीतेची तिसरी आणि अखेरची अवस्था म्हणता येईल.

ह्या अवस्थेला अंदाजे २,२०० वर्षे झालेली आहेत.

ही गीता म्हणजेच आपण सगळे आज वाचतो ती गीता आहे.

अर्जुनाला प्रत्यक्ष रणक्षेत्रावर झालेला ईश्वरोपदेश म्हणजे दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायाचे गद्य स्वरूप असावे. पहिल्या लेखकाने त्याचा पद्यमय विस्तार केला असावा. पहिल्या लेखकाच्या रचनेमधे पुढील दोन लेखकांनी त्यांच्या काळच्या गरजा व आवश्यकता लक्षात घेऊन भर घातली असावी.

म्हणूनच गीतेमधे ‘ कर्मयोग, ज्ञानयोग, नीती, वैराग्य, निर्गुणभक्ती, सगुणभक्ती, राजयोग ’ इत्यादी सर्वच विषय आलेले असून, प्रत्येक अवस्थेमधे एखाद्या विषयावर जोर दिलेला आहे.

त्यामुळे वाचकाचे ज्या अवस्थेकडे विशेष लक्ष जाते, त्या अवस्थेतील विषय हाच गीतेतील मुख्य प्रतिपाद्य विषय आहे असे त्याला वाटते आणि तो आपल्या वाटण्याचे यथाशक्ती समर्थन करीत राहतो. गीतेकडे जो जसे पाहतो, त्याला गीता तशीच आहे असे वाटते. म्हणून आजची गीता ही सर्व योगशास्त्रांचा समावेश असलेली सर्वसमावेशक रचना झालेली आहे.

४) चारही वेद हे धर्मग्रंथ होते. त्यामुळे धर्मशास्त्राने ‘ वेदांच्यामधे कोणत्याही प्रकारे फेरफार करायला ’ बंदी घातलेली आहे. ह्या शास्त्राज्ञेचे सर्वांच्याकडून काटेकोरपणे पालन केले गेले व आजही केले जात असल्यामुळे मूळचे वेद जसेच्या तसे राहिले. त्यामधे कानामात्रेचाही बदल झाला नाही. वेद हे घनपाठ पद्धतीने शिकवले व शिकले जात होते. त्यांचे शास्त्रशुद्ध पठण केले जात होते. त्यामुळेच हजारो वर्षांचा प्रदीर्घ कालावधी जाऊनही एका अक्षराचाही फरक न होता ते आपल्यापर्यंत पोहोचले आहेत.

आजही शास्त्रशुद्ध पद्धतीने वेदपठण शिकायला बारा वर्षे लागतात.
परंतु, रामायण आणि महाभारत ह्यांच्याविषयी तसे म्हणता येत नाही. ते आपल्या देशाचा प्राचीन इतिहास आहेत.
( ह्या विधानाविषयीपण बरेच वादविवाद आहेत. अनेक ज्ञानवान विद्वान अभ्यासक आणि संशोधक रामायण आणि महाभारत म्हणजे, आर्यावर्ताचा प्राचीन इतिहास नसून, ' मानवी कल्याणाचा हेतू मनामधे बाळगून, तत्कालीन ऋषी - मुनींनी सांगितलेल्या अनेक रसाळ व मधुर कथांचा संग्रह आहे.' असे मानतात. )
त्यामुळे त्यांच्यामधे बदल केला गेला असणे, नवीन विषयांची भर घालण्यासाठी वाढ केली गेली असणे शक्य आहे.
गीता ही महाभारतामधेच असल्यामुळे तिच्यामधेही बदल केला गेला असू शकेल.
मूळच्या गीतेमधे पुढील काळाच्या गरजेप्रमाणे आणि आवश्यकतेनुसार नवे विषय आणि नवीन श्लोक घातले गेलेले असू शकतील.
ज्यावेळी गीतेला धर्मग्रंथ म्हणून मान्यता मिळाली त्यावेळेपासून तिच्या बाबतीतही शास्त्राज्ञा लागू करून तिचे पालन केले जायला लागले असावे. म्हणून त्यानंतर गीतेमधे कोणताही बदल झाला नसावा.
ह्याव्यतिरिक्त अजूनही बरीच मते मांडली गेली आहेत. पण विस्तारभयास्तव मी ती सांगत नाही.
केवळ उदाहरण म्हणून गीतेचा अंतिम संदेश कोणता आहे आणि श्रीकृष्णाने सांगितलेल्या मूळ गीतेमधे किती श्लोक होते ह्या दोन प्रश्नांच्या विषयी वाचलेली विविध मते मी आपल्याला सांगितली. ते सगळे विद्वान अभ्यासकांनी केलेले अंदाज आहेत हे लक्षात ठेवा. मूळ प्रश्नाचे निश्चित उत्तर कोणीही दिलेले नाही.
आतापर्यंत आपण जे वेगवेगळे विचार ऐकलेत, त्यामुळे कदाचित गोंधळून गेला असाल?
ज्यावेळी हे सगळे वाचत होतो त्यावेळी मी देखील फार गोंधळून गेलो होतो. काहीही सुचेनासे झाले होते. शेवटी वाचन बंद केले. सगळे ग्रंथ बाजूला सारले आणि फक्त गीताच वाचायला लागलो. तिच्या अर्थाचेच मनन व चिंतन करायला लागलो.
सुमारे पंधरा दिवस झाल्यानंतर एका रात्री अर्धवट झोपेत असताना, अचानकपणे कुणीतरी माझ्याबरोबर बोलतो आहे असे जाणवले. कोण बोलतो आहे ते कळत नव्हते. पण आवाज ऐकू येत होता.
'' अरे बाबा ऽऽ, हे सगळे वाचून आणि त्यावर विचार करून तुला काय करायचे आहे? त्याचा काही उपयोग होणार आहे काय? समजा तुला वाटते त्याप्रमाणे तेरा ते अठरा हे सहा अध्याय श्रीकृष्णाने रणांगणावर सांगितले नसतील, तरी त्याने काय फरक पडणार आहे?
समजा गीता ही एकाने लिहिलेली नसून अनेकांनी लिहिली असेल, मूळ गीतेमधे आपापल्या इच्छेप्रमाणे भर घालीत गेले असतील, तिचा विस्तार करीत गेले असतील, तरी त्याने काय फरक पडणार आहे?
समजा गीतेचा अंतिम आणि एकमेव असा संदेश कोणताही असला अथवा कोणताही नसला, तरी त्याने काय फरक पडणार आहे?
ह्या सगळ्या विचारांचा आणि चर्चेचा गीतेच्या श्रेष्ठतेशी, तिच्या पावित्र्याशी, महानतेशी, तिने उत्तम प्रकारे केलेल्या मार्गदर्शनाशी आणि सांगितलेल्या मोक्षप्राप्तीच्या विविध मार्गांशी काही तरी संबंध आहे काय?
मग असले विचार आणि चर्चा, केवळ वाचून सोडून देणेच योग्य नाही का ठरणार?
कोणतीही गरज नसताना, आवश्यकता नसताना, त्यावर अधिक विचार करीत राहून आपला वेळ वाया न घालवणेच योग्य नाही का ठरणार?
गेली पाच हजार वर्षे अथवा कोणा विद्वानाने सांगितल्या प्रमाणे गेली दोन हजार दोनशे वर्षे मानवजातीला सदैव मार्गदर्शन करणारी श्रीमद्भगवद्गीता ही —
' कालही सर्वश्रेष्ठ होती, आजही सर्वश्रेष्ठ आहे आणि भविष्यातही सर्वश्रेष्ठच असेल. तिची जागा दुसरे कोणीही घेऊ शकणार नाही. ती एकमेव आहे. अद्वितीय आहे. अतुलनीय आहे.' हे तू विसरलास की काय?
आज जी सातशे श्लोकी गीता आहे तिचाच एकत्रितपणे विचार कर की ऽऽ!
तुला, तुझ्या समोर एक सुगंधित फूल दिसत असताना, त्याचा रंग, त्याचा गंध आणि त्याचे सौंदर्य ह्यांचा अनुभव घ्यायचे सोडून, त्याच्या पाकळ्या कशाला मोजत बसतोस? त्याच्या देठाची लांबी कशाला मोजतोस? ''
बोलणे थांबले आणि मला जाग आली. आनंद झाला. मन हलके झाले. शंका नाहीशा झाल्या आणि परत शांतपणे झोपलो.
तेव्हापासून एक निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे वागायला लागलो.
अशा प्रकारच्या चर्चा ऐकल्यावर अथवा वाचल्यावर त्यांना केवळ ' एक वेगळी माहिती ' समजून चालायचे.
ते मनावर घ्यायचे नाही. त्यावर विचार करीत रहायचे नाही. असो.
ही सगळी गीता - प्रवचने लिहिली जात असताना अशा प्रकारचा अनुभव मला अनेकवेळा आला आहे आणि त्यायोगे मनामधे आलेल्या कोणत्यातरी शंकेमुळे थांबलेले लेखन परत सुरू झाले आहे. ह्या प्रकाराला मी **' परमेश्वराची कृपा '** असे समजतो.

ह्या निमित्ताने माझे आपणा सर्वांना अत्यंत आग्रहाचे सांगणे आहे. सर्वांना हात जोडून नम्र विनंती आहे की, —

**' कोणत्याही परिस्थितीत भगवद्गीतेवरील आपली श्रद्धा ढळू देऊ नका.'**

मनामधे कसलीही शंका कुशंका बाळगू नका. नेहमी एक व्रत म्हणून गीतेचे वाचन, पठण, मनन, चिंतन करीत रहा.

गीता आचरणात आणायचा प्रयत्न करीत रहा. श्रद्धापूर्वक तसे केलेत तर सर्वांना त्याचा लाभच होईल.

ज्याला जो अर्थ काढायचा असेल तो काढू द्या. ज्याला ज्या शंका व्यक्त करायच्या असतील, त्याला त्या करू द्या.

ज्यांना चर्चा करायच्या असतील, त्यांना चर्चा करू द्या. ज्यांना वाद घालायचे असतील, त्यांना वाद घालू द्या.

असल्या गोष्टींना फार किंमत देऊ नका. त्यांच्यावर फार विश्वासही ठेवू नका.

तसे केले तर आपलेच नुकसान होईल. ही गोष्ट निश्चित आहे. त्रिवार सत्य आहे.

ह्या विषयी सांगताना ज्ञानेश्वर महाराजांनी एक, फार सुंदर आणि समर्पक अशी ओवी रचलेली आहे. ते काय सांगतात ते नीट ऐका.

**लोखंड परिसावरी रुसले । तव ते सोनेपणासी मुकले ।**
**येथ कुणाचे काय बा गेले । ज्याचे त्याने अहीत केले ।।**

कोणीतरी काहीतरी बोलून कान भरल्यामुळे, लोखंड परिसावर रागावले. ' मी परिसाच्याकडे जाणार नाही ' असे म्हणाले आणि रुसून बसले. त्याचा परिणाम काय झाला? तर लोखंड हे लोखंडच राहिले. परिसाचे काहीही बिघडले नाही. कसलेही नुकसान झाले नाही. नुकसान लोखंडाचेच झाले. परिसाचा सहवास नाकारल्यामुळे त्याचे सोने होऊ शकले नाही. उत्कर्ष होऊ शकला नाही.

त्याने आपल्या हाताने स्वत:चे अहीत करून घेतले.

**श्रीमद्भगवद्गीता** म्हणजे ह्या ओवीमधला **परीस** आहे आणि मी आणि तुम्ही म्हणजेच आपण सगळे **लोखंड** आहोत.

ह्याविषयी निदान माझ्या मनामधे तरी कोणतीही शंका नाही. आता नीट विचार करून योग्य निर्णय घ्यावा एवढेच सांगणे आहे.

कोणत्याही दृष्टिकोनामधून विचार केला तरीही गीता हीच सर्वोत्तम आहे. सर्वश्रेष्ठ आहे.

अहो ऽऽ, आपण बाकीचे सगळे बाजूला ठेवूया. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णालाही,

**' एकदा सांगितलेली गीता परत सांगता आलेली नाही. '** त्याने स्वत:च, अर्जुनाला तसे स्पष्टपणे सांगितले आहे.

महाभारतातल्या आश्वमेधिकपर्वामधील, अनुगीता उपपर्वामधे, सोळाव्या अध्यायात त्याविषयीचा सविस्तर उल्लेख आलेला आहे.

महायुद्ध होऊन गेल्यानंतर पुढे एक दिवस श्रीकृष्णासह सुखदु:खाच्या गोष्टी करीत असताना, अर्जुनाला परत एकदा गीतोपदेश ऐकायची इच्छा झाली. तो श्रीकृष्णाला म्हणाला, —

'' हे कृष्णा, युद्ध सुरू होण्यापूर्वी तुम्ही मला जो उपदेश केला होता, ते सर्व ज्ञान मी आता विसरलो आहे. इतक्या दिवसांमधे माझे चित्त विचलीत झाल्यामुळे तसे झाले आहे. आपण मला तो सगळा उपदेश परत एकदा करा. ते ज्ञान मिळवायला मी अत्यंत उत्सुक झालो आहे.'' त्यावर श्रीकृष्ण त्याला काय म्हणाला ते नीट ऐका.

'' अर्जुना! हे अशक्य आहे. त्यावेळी विशेष परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे, तुला युद्धासाठी परत तयार करण्याच्या हेतूने, अत्यंत योगयुक्त चित्ताने मी उपदेश केला. पण तू तो महान उपदेश विसरलास. ही फार वाईट गोष्ट झाली आहे.

तू श्रद्धाहीन आणि मंद बुद्धीचा झाला आहेस असेच वाटते आहे.

तो सगळा उपदेश ब्रह्मपदाच्या प्राप्तीसाठी म्हणजेच मोक्षप्राप्तीसाठी उपयुक्त होता.

आता तो सगळा उपदेश, त्याच प्रकारे, तसाच्या तसा पुन्हा सांगणे मलाही शक्य होणार नाही. तसे करणे अशक्य आहे.''

त्यानंतर त्याला श्रीकृष्णाने जो उपदेश केला तो **अनुगीता** ह्या नांवाने प्रसिद्ध आहे. पण त्याला गीतेची सर नाही.

भगवद्‌गीता जनसामान्यांच्यामधे प्रसिद्ध होऊन तिला सार्वत्रिक मान्यता मिळाल्यानंतर, खुद्द महाभारतामधे तसेच वेगवेगळ्या पुराणांमधे, विविध नांवांनी अनेक गीता रचल्या गेल्या आहेत. त्यांची संख्या सुमारे पन्नास आहे असे सांगतात.

परंतु त्यांच्यापैकी कोणत्याही गीतेला भगवद्‌गीतेचे स्थान मिळालेले नाही.

गीता हा शब्द उच्चारला म्हणजे ऐकणाऱ्याला, दुसरी कोणतीही गीता न आठवता फक्त भगवद्‌गीताच आठवते.

**' गीता म्हणजे भगवद्‌गीता '** असाच अर्थ रूढ झालेला आहे.

नेहमी तिचे स्थान सर्वोच्च राहिले आहे आणि यापुढेही तसेच राहील ह्यात शंका नाही.

आपण हे **बहिरंग परीक्षण** येथेच संपविणे योग्य होईल असे मला वाटते. असो.

आता भगवद्‌गीतेच्या उच्चारणाविषयी मला काय वाटते ते थोडक्यात सांगतो.

गीतापठण करताना श्लोकांच्या उच्चारणाचे सर्व साधारण नियम पुढीलप्रमाणे —

१) प्रत्येक श्लोकामधे चार पाद आहेत. प्रत्येक पादाच्या शेवटच्या अक्षराचा उच्चार दीर्घ करावा. जसे —

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ऽऽ  समवेता युयुत्सवः ऽऽ ।**

**मामकाः पांडवाश्चैव ऽऽ  किमकुर्वत संजय ऽऽ ॥**

२) पादाच्या शेवटी विसर्ग असेल तर त्याचा उच्चार अक्षरानुसार पण दीर्घ करावा. जसे—

**समवेता युयुत्सवः ऽऽ ।** मधे युयुत्सव हा ऽऽ असा करावा.

**सर्व एव महारथाः ऽऽ ।** मधे महारथा ऽऽ हा असा करावा.

**यद्वा जयेम यदि वा नि जयेयुः ऽऽ ।** मधे जयेयु हू ऽऽ असा करावा.

**त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ऽऽ ।** मधे दर्शिभि ही ऽऽ असा करावा.

**सा निशा पश्यतो मुनेः ऽऽ ।** मधे मुने ऽऽ हे असा करावा.

**सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ऽऽ** । मधे गुणै ऽऽ हि असा करावा.

**तथा मानापमानयोः ऽऽ ।** मधे मानयो ऽऽ हो असा करावा.

**अणोरणीयांसमनुस्मरेद्यः ऽऽ ।** मधे स्मरेद्य हा ऽऽ असा करावा.

३) पादाच्यामधे विसर्ग असेल तर त्याचा उच्चार ' पठणाची चाल आणि लय ' ह्यांचा विचार करून करावा.

४) अनुस्वाराचा उच्चार करताना ज्या अक्षरावर अनुस्वार असेल त्याच्या पुढील अक्षर ज्या गटाचे असेल त्या गटाच्या अखेरच्या अक्षरानुकूल उच्चार करावा. उदाहरणार्थ —

**पश्यैतां पांडुपुत्राणां  आचार्य महतीं चमूम् ।**

**व्यूढां द्रुपदपुत्रेण  तव शिष्येण धीमता ॥**

येथे पाच अनुस्वार आलेले आहेत.

अ) **ता** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **प** हे आहे.

ते अक्षर **प, फ, ब, भ, म** ह्या गटातील असून **म** हे अखेरचे अक्षर आहे.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **पश्यैताम्** असा करावा.

आ) **पां** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **ड** हे आहे.

ते अक्षर **ट, ठ, ड, ढ, ण** ह्या गटातील असून **ण** हे अखेरचे अक्षर आहे.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **पाण्डु** असा करावा.

इ) **णां** अक्षरावर अनुस्वार असून तेथे पाद संपलेला आहे. त्याच्या पुढे अक्षर नाही.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **पुत्राणाम्** असा करावा. म्हणजेच —

पादाच्या शेवटी अनुस्वार असेल तर उच्चार करताना मकारानुकूलच करावा.

ई) **ती** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **च** हे आहे.

ते अक्षर **च, छ, ज, झ, ञ** ह्या गटातील असून **ञ** हे अखेरचे अक्षर आहे.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **महतीञ्**  असा करावा.

उ) **ढां** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **द** हे आहे.

ते अक्षर **त, थ, द, ध, न** ह्या गटातील असून **न** हे अखेरचे अक्षर आहे.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **व्यूढान्** असा करावा.

आता आपण अजून एक उदाहरण विचारात घेऊया.

**सिंहनादं विनद्योच्चैः  शंखम् दध्मौ प्रतापवान् ॥**

येथे तीन अनुस्वार आलेले आहेत.

अ) **सिं** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **ह** हे आहे. ते अक्षर कोणत्याही गटात नाही.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **सिम्ह** असा करावा.

आ) **दं** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **वि** हे आहे. ते अक्षर कोणत्याही गटात नाही.

म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **नादम्** असा करावा.

इ) **शं** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **ख** हे आहे.

ते अक्षर **<u>क, ख, ग, घ, ङ</u>** ह्या गटातील असून **ङ** हे अखेरचे अक्षर आहे.
म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **शङ्ख** असा करावा.
हे सर्व साधारण नियम आहेत. परंतु त्यामधील अनुस्वाराच्या नियमाविषयी जरा गडबड आहे.
' अनुस्वाराचा उच्चार **ङ , ञ , ण , न , म** ह्या अक्षरांना अनुकूल असा करावा' हा नियम मान्य असला तरीही —
**ङ** आणि **ञ** ही दोन अक्षरे चमत्कारीक आहेत. विचित्र आहेत. त्यातही **ञ** हे अक्षर फारच विचित्र आहे.
**संजय** हा शब्द घ्या. येथे **स** अक्षरावर अनुस्वार असून त्यापुढील अक्षर **ज** हे आहे.
म्हणून अनुस्वाराचा उच्चार करताना **सञ्जय** असा करावा. हा झाला नियमाप्रमाणे उच्चार.
आता हा उच्चार जरा लक्षपूर्वक करा आणि ऐकायला कसा वाटतो ते सांगा.
हाक मारणारा माणूस, संजय नांवाच्या माणसाला चिडवतो आहे, त्याची टिंगल करतो आहे, मस्करी करतो आहे असेच वाटते.
**धनंजय** आणि **पांचजन्य** ह्या दोन शब्दांचा उच्चारही ऐकायला विचित्र वाटतो.
म्हणून **सञ्जय** असा उच्चार केला जात नाही. **सन्जय** असाच उच्चार केला जातो.
**धनञ्जय** असा उच्चार केला जात नाही. **धनन्जय** असाच उच्चार केला जातो.
**पाञ्चजन्य** असा उच्चार केला जात नाही. **पान्चजन्य** असाच उच्चार केला जातो.
**' अमृतं चैव मृत्युश्च  सदसच्चाहमर्जुन ।।'** ह्यातील **अमृतञ्** असा उच्चारही ऐकायला विचित्र वाटतो.
त्याचा उच्चार **अमृतम्** असाच केला जातो. ही गोष्ट लक्षात घ्या.
**' न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय । '** ह्यातील **मां** ह्या शब्दाचा उच्चार, त्याच्या पुढे कोणतेही अक्षर असले अथवा नसले तरीही, **माम्** असाच केला जातो. **माङ् , माञ् , माण् , मान्** ह्यांपैकी कोणताही उच्चार कधीही केला जात नाही.
एकदा केवळ कुतुहल म्हणून गीतेमधील सर्व अनुस्वारयुक्त शब्द मुळामधे कसे आहेत त्याची तपासणी केली तेव्हा ते सगळे मकारानुकूलच आहेत असे दिसून आले. त्यानंतर सर्व अनुस्वारांचे उच्चारण मकारानुकूलच करून सगळी गीता म्हणून पाहिली.
त्यावेळी कुठेही अडखळलो नाही. काहीही अडले नाही. काहीही खटकले नाही. कुठेही गैर वाटले नाही.
अहो ऽऽ, भाषा ही अगोदर निर्माण झाली आहे. तिचे व्याकरण नंतर आलेले आहे. भाषेचे व्याकरण नव्हते तेव्हाही लोक बोलत होते. आपापले विचार एकमेकांना सांगत होते. नेहमीचे सगळे व्यवहार करीत होते.
भाषेमधे सुसूत्रता यावी, अधिकृतता यावी आणि लिहिताना - बोलताना - वाचताना तसे करणाऱ्याच्या मनातला अर्थ पूर्णपणे व्यक्त केला जावा म्हणून काही निश्चित नियम ठरविण्यात आले. त्या नियमांना भाषेचे व्याकरण असे म्हणतात.
सांगायचा मुद्दा इतकाच की, **<u>' गीतेचा अर्थ सर्वात महत्त्वाचा आहे.'</u>** तो जसाच्या तसा व्यक्त होईल असेच उच्चारण केले पाहिजे. तरच अपेक्षित परिणाम साधता येईल.' असो.
ही सगळी प्रवचने ज्या भाषेमधे लिहिली गेली आहेत त्या, **<u>मराठी भाषेला,</u>**
आपल्या **<u>मातृभाषेला</u>** मी अत्यंत आदराने नमस्कार करतो.
तिच्या हाताला धरून चाललो, तिच्या मांडीवर बसलो, तिच्या गळ्याला मिठी मारली, तिच्या पाठीवर बसलो,
तिला अनेक प्रश्न विचारले, कधीकधी रागावलो, रुसून बसलो, काही सुचेनासे झाल्यावर लिहायचा पण थांबलो.
तिने पण माझे लाड केले. लिहिताना मला मदत केली. अनेक गोष्टी सांगितल्या.
'' गधड्या ऽऽ, हे काय लिहिले आहेस? शी ऽऽ, खोडून टाक ते आणि परत लिहायला सुरवात कर.'' असे म्हणून अनेक वेळा रागावली सुद्धा. पण तिने माझा हात सोडला नाही. मला लेखन पूर्ण करायला लावलेच.
आई आहे ना ती. मग असेच करणार. आपला मुलाला योग्य मार्गानेच नेणार.
येथे मला **<u>कवीवर्य सुरेश भट</u>** ह्यांच्या एका सुप्रसिद्ध कवितेची आठवण झाली आहे.
तिच्या काही ओळी सांगून हा विषय संपवतो.

**लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।**
**धर्मपंथ जात एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी ।**
**बोलतो मराठी, ऐकतो मराठी,**
**जाणतो मराठी, मानतो मराठी ।।**

**<u>— हे मायमराठी माते! तुला माझा शिरसाष्टांग नमस्कार असो —</u>**

एखाद्या प्रवचनमालेचा समारोप करताना, त्या प्रवचनांचा जो प्रतिपाद्य विषय असेल, त्या विषयाची पूजा करण्याची, स्तुती करण्याची आणि काही मागणे मागायची प्रथा आहे.

येथे आपला प्रतिपाद्य विषय **' श्रीमद्भगवद्गीता '** हा आहे.

ह्या गीतामातेची पूजा करून, तिची स्तुती करून, तिच्याजवळ काही मागणे मागायचा सगळ्यात उत्तम मार्ग म्हणजे तिची आरती करणे हा आहे. त्यासाठी शोध घेत असताना मला एक सुंदर आरती मिळाली.

आरतीच्या पहिल्या सहा कडव्यांमधे गीतेमधे असलेल्या सर्व गुणांचा उल्लेख करून तिचा जयजयकार केलेला आहे आणि शेवटच्या कडव्यामधे तिच्याजवळ मागणे मागितले आहे.

आता आपण आरतीचे शब्द आणि त्यांचा अर्थ समजून घेऊया.

**ॐ जय भगवद् गीते ऽऽ , जय जय भगवद् गीते ऽऽ ।**
**हरि हिय कमलविहारिणि , सुंदर सुपुनीते ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। १ ।।**

अर्थ — हरी म्हणजेच परमेश्वराच्या हृदयकमलामधे विहार करणाऱ्या, सुंदर - शुद्ध - पवित्र - पावन अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**कर्म सुमर्म प्रकाशिनि ऽऽ , कामासक्ति हरा ऽऽ ।**
**तत्वज्ञान विकाशिनि , विद्या ब्रह्म परा ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। २ ।।**

अर्थ — सर्व प्रकारच्या कर्माविषयीच्या गूढ अशा ज्ञानावर प्रकाश पाडणाऱ्या, सर्व प्रकारच्या कामना आणि आसक्ती नाहीशा करणाऱ्या, तत्त्वज्ञान प्राप्त करून देणाऱ्या अंतर्शक्तीचा विकास करणाऱ्या आणि स्वत:च ब्रह्मविषयक ज्ञान असलेल्या, अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**निश्चल भक्ति विधायिनि ऽऽ , निर्मल मल हारी ऽऽ ।**
**शरणरहस्य प्रदायिनि , सब विधि सुखकारी ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। ३ ।।**

अर्थ — अढळ, अचल, स्थिर अशी भक्ती प्रदान करणाऱ्या, अत्यंत निर्मळ असलेल्या आणि सर्व प्रकारचा मळ नाहीसा करणाऱ्या, संपूर्ण समर्पणाच्या भावनेचे गूढ उकलणाऱ्या आणि सर्व प्रकारचा आनंद देणाऱ्या, अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**राग द्वेष विदारिणि ऽऽ , कारिणि मोद सदा ऽऽ ।**
**भवभय हारिणि तारिणि , परमानंद प्रदा ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। ४ ।।**

अर्थ — सर्व प्रकारचा क्रोध आणि मत्सर नाहीसा करणाऱ्या, सदैव आनंदाचेच कारण होणाऱ्या, जन्म आणि मृत्यू ह्यांच्या विषयीची भीती नाहीशी करून, संसारसागरामधून तारून नेणाऱ्या आणि सर्वोच्च आनंद प्रदान करणाऱ्या, अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**आसुर भाव विनाशिनि ऽऽ , नाशिनी तम रजनी ऽऽ ।**
**दैवी सद्गुण दायिनि , हरि रसिका सजनी ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। ५ ।।**

अर्थ — सर्व प्रकारच्या वाईट विचारांचा नाश करणाऱ्या, अंधाराने व्यापलेल्या रात्रीचा नाश करणाऱ्या, सर्व सद्गुणांचे दान देणाऱ्या, हरी म्हणजेच परमेश्वराला अत्यंत प्रिय असलेल्या आणि त्याला सुख देणाऱ्या, अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**समता त्याग सिखावनि ऽऽ , हरि मुखकी वाणी ऽऽ ।**
**सकल शास्त्रकी स्वामिनि , शृतियोंकी रानी ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। ६ ।।**

अर्थ — समता आणि त्यागाचे समग्र ज्ञान देणाऱ्या, हरी म्हणजेच परमेश्वराच्या मुखामधून शब्दरूपाने बाहेर आलेल्या, ज्ञात आणि अज्ञात अशा सर्व शास्त्रांचे भांडार असलेल्या आणि शृती म्हणजेच चारही वेदांची राणी असलेल्या, अशा भगवद्गीतामातेचा विजय असो.

**दयासुधा बरसावनि ऽऽ , मा तू कृपा कीजे ऽऽ ।**
**हरिपद प्रेमदान कर , अपनो कर लीजे ।**
**ॐ जय भगवद् गीते ऽऽ ।। ७ ।।**

अर्थ — दयारूपी अमृताचा वर्षाव करणाऱ्या हे माते भगवद्गीते ऽऽ! तू आमच्यावर कृपा कर!

आम्हाला हरीच्या म्हणजेच परमेश्वराच्या चरणांची प्राप्ती करून दे. आम्हाला आपलेसे करून घे.

हे गीतामाते ऽऽ, तुझा विजय असो.

**<u>येथे समारोपाचे प्रवचन पूर्ण झाले आहे.</u>**

जे सांगायचे होते ते सगळे सांगून झाले आहे.
गेले अनेक दिवस, आपण माझ्यासारख्या एका सर्वसामान्य माणसाची बडबड ऐकून घेतलीत.
त्याबद्दल मी आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो आहे.
सांगताना माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर त्यासाठी आपण उदार अंत:करणाने मला क्षमा करावी हीच नम्र विनंती करतो आहे. सर्व श्रोत्यांच्याकडे माझे हेच मागणे आहे.

**<u>येथे ही गीता प्रवचन माला पूर्ण झाली आहे.</u>**

आता सांगण्यासारखे काहीही शिल्लक राहिलेले नाही.
आतापर्यंत जे काही सांगितले, ते ज्याच्या कृपेने आणि आशिर्वादाने सांगू शकलो, त्याची क्षमा मागायची इच्छा झाली आहे.
कर्ता करविता तोच आहे. त्याच्याच इच्छेनुसार, त्याच्याच प्रेरणेने, त्यानेच सुचविल्याप्रमाणे आणि दिलेल्या शक्तीच्या योगाने, माझ्याकडून हे लेखन घडून आले.
पण अजूनही मला गीता पूर्णपणे आचरणात आणणे जमलेले नाही.
मी त्यासाठी सतत प्रयत्न करीत असतो पण ते नेहमीच शक्य होत नाही.
म्हणून त्याची मनापासून क्षमा मागायची आणि त्याच्याकडे याचना करायची इच्छा झाली आहे.
त्याच्याजवळ मागणे मागायची, इच्छा झाली आहे.
तेवढे एकमेव काम करून आपणा सर्वांचा निरोप घेतो.
आपणा सर्वांना निरोपाचा नमस्कार करतो आहे.
त्याचा स्वीकार करावा हीच नम्र विनंती.
अस्तु!!!!!!!!!!

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।**

**<u>।। श्रीकृष्णार्पणमस्तु — इदं न मम ।।</u>**

## — क्षमायाचना —

ऐका हो जी नारायणा, तुमच्या भक्ताची प्रार्थना ।
वंदन करितो श्रीकृष्णा, अनन्य भावे ।। १ ।।
तुम्हीं जे जे सांगितले, सखोल विवरण केले ।
जे जे मार्ग दाविले, भगवद्‌गीतेमाजी ।। २ ।।
मी ते सारे वाचले, अर्थ समजोनी घेतले ।
तयाचे मनन केले, सदा सर्वदा ।। ३ ।।
वाचले ते रुचले, मनोमनी पटले ।
आचरण्यास केले, यथाशक्ती प्रयत्न ।। ४ ।।
धरली विवेकाची कास । सोडली फळाची आस ।
विहित कर्म सरस, करित राहिलो ।। ५ ।।
मानुनी तुम्हास गुरू, लागलो मना आवरू ।
मन नाठाळ वासरू, नावरे आवरीता ।। ६ ।।
भगवद्‌गीतेची पारायणे, सदा केली तया कारणे ।
परंतु गीता आचरणे, जमलेच नाही ।। ७ ।।
अहंकार सदोदित, देतो वासनांची साथ ।
की वासना सदोदित, अहंकारा चेतविती ।। ८ ।।
हे मजसी कळेना, कळोनी आकळेना ।
चित्त स्थिर होईना, काय करू? ।। ९।।
लोभ मोह होती स्वार, माझिया मनाचिया वर ।
तयामधे क्रोधाची भर, काय करू? ।। १० ।।
सहा शत्रू एक होती, मनासी खेचून नेती ।
करू नये ते करविती, काय करू? ।। ११ ।।
मजला जे समजले, ते इतरांसी सांगितले ।
जरि असे काही चुकले, क्षमा केली पाहिजे ।। १२ ।।
एकच मागणे वासुदेवा, मस्तकी हात ठेवावा ।
अंतकाळ येइल तेव्हां, कृपा असो द्यावी ।। १३ ।।
अंतर शुद्ध असावे, तव चरणी लीन रहावे ।
समाधाने निरोपावे, नाशवंत जगतासी ।। १४ ।।

---